म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय :....निबंध.....
दा.क्र.: ३३६६

राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता



REFBK-0026079

डॉ. ज. घु. नाईकवाडे

संदर्भ निबंध -
३३६९
२६०७९
१४३।९०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३६९
निबंध २६०७९
१४३।९०



राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता

डॉ. ज. घु. नाईकवाडे

REFBK-0026079

साहित्य प्रसार केन्द्र
सीताबर्डी, नागपूर १२

निवेदन

'राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता इ. स. १८५० ते इ. स. १९५० एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील माझ्या शोध प्रबंधाला १९८४ मध्ये नागपूर विद्यापीठाने वाङमय आचार्य (पीएच्. डी.) ही पदवी दिली.

एका तपाहून अधिक काळ या विषयाच्या अभ्यासात मी घालविला. त्याकरिता मला अनेक ग्रंथांचे व नियतकालिकांचे वाचन करावे लागले. शोध प्रबंधाकरिता तयार झालेले मूळ टंकलिखित बाराशे पृष्ठांचे झाले होते. ते जसेच्या तसेच पुस्तक रूपाने प्रकाशित करणे सोईचे नव्हते. म्हणून त्यात आवश्यक तेथे संक्षेप केला आहे. आज माझा शोध-प्रबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध होताना मला विशेष आनंद होत आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने या पुस्तकाच्या प्रकाशनाकरिता आंशिक आर्थिक अनुदान देऊन मला उपकृत केले आहे.

नागपुरातील हिस्लॉप महाविद्यालयाने शुद्ध समाजसेवेच्या उद्देशाने चालविलेल्या हिस्लॉप कॉलेज सिटी नाईट हायस्कूलचा विद्यार्थी असताना त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून गुरुवर्य अ. ना. देशपांडे यांच्याशी माझा परिचय झाला. हिस्लॉपच्या विद्यार्थी शिक्षकांनी आणि गुरुवर्य देशपांडे यांनी आमच्या जडणघडणीकडे सहानुभूतीने लक्ष पुरविले. याच रात्रीच्या शाळेतून मॅट्रिक झाल्यानंतर उच्च शिक्षण घेण्याची इच्छा झाली म्हणून त्याच महाविद्यालयात प्रवेश घेतला. लोखंडाला परिसाचा स्पर्श व्हावा आणि अचानक त्याचे सुवर्णात रूपांतर व्हावे तसा चमत्कार घडून आला. मराठी ग्रंथवाचनाची, मराठी वाङमयाच्या आस्वादाची आणि थोडे फार लेखन करण्याची संधी गुरुवर्य डॉ. देशपांडे यांचीच. माझ्या 'पीळ' या पहिल्या कथासंग्रहाला प्रस्तावना त्यांचीच आहे. "शिकविताना स्वत: चैतन्यात न्हाणारा आणि विद्यार्थ्यांनाही चैतन्याने न्हाऊ घालणारा गुरुवर्य डॉ. अ. ना. देशपांडे यांच्यासारखा मराठीचा दुसरा प्राध्यापक माझ्या तरी पाहण्यात नाही." हे डॉ. वि. स. जोगांचे गुरुवर्यांसंबंधीचे विधान यथार्थ आहे. माझ्या प्रबंधाचे मार्गदर्शकही गुरुवर्य डॉ. देशपांडेच. त्यांनीच वारंवार उत्तेजन देऊन माझ्याकडून प्रबंध लेखनाचे कार्य करून घेतले. त्यामुळे मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

महाराष्ट्रातील साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीत सदैव अग्रभागी असणारे, सुप्रसिद्ध मेधावी वक्ते, आचार्यकुलाचे कुशल कार्यकर्ते, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, प्रथितयश कवी, समीक्षक, संपादक, विचारवंत लेखक म्हणून प्राचार्य राम शेवाळकरांचा सर्वदूर लौकिक आहे. त्यांनी या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना या ग्रंथाचे भूषण आहेच पण माझेही भाग्य आहे असे मी समजतो. त्यांच्या अखंड भ्रमंतीतही त्यांनी प्रस्तावना लिहून मला आजन्म उपकृत केले आहे.

या निवेदनाच्या निमित्ताने या प्रबंधलेखनाची थोडी पार्श्वभूमी सांगणे उचित ठरेल. दीडशे वर्षांच्या ब्रिटिशांच्या गुलामीनंतर भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याबरोबर समतेचे, लोकशाहीचे, मानवतावादाचे, सर्वोदयाचे, समाजवादी समाजरचनेचे, पंचशीलाच्या तत्त्वज्ञानाचे वारे देशात वाहू लागले. नव्यानेच राष्ट्राचे सूत्रधार बनलेले नेतेही याच ध्येयवादाने प्रेरित होऊन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात-देखील याच तत्त्वज्ञानाचा जयजयकार करून आपल्या उदार मतवादाचा परिचय देऊ लागले. राष्ट्रवाद त्यांना संकुचित वाटू लागला. युद्धखोर जर्मनी, इटाली यांच्यामुळे तो विघातक व आक्रमक वाटू लागला. राष्ट्र बलसंपन्न, शस्त्रांनी, अस्त्रांनी, सैनिक बळानेही सुसज्ज असण्याची, सीमा सुरक्षित असण्याची आवश्यकता नाही. शक्यतो राष्ट्राने आपले शस्त्रास्त्रबळ व सैनिकबळही उत्तरोत्तर मर्यादित केले पाहिजे. त्यासाठी उपयुक्त असणारे यंत्रबळ लोकोपयोगी वस्तूंच्या निर्मितीसाठी उपयोगात आणले पाहिजे असे आमचे राष्ट्रधुरीण सांगू लागले. पण स्वातंत्र्य प्राप्त होऊन जेमतेम पंधरा वर्षांचा काळ जात नाही तोच एकोणवीसशे बासष्ट साली शांततापूर्ण सहजीवनाची, पंचशीलाची उदात्त भाषा बोलणाऱ्या विश्वबंधुत्ववादी चीनने भारताच्या उत्तरपूर्व सीमेवर अचानक आक्रमण केले. या आक्रमणाने आमच्या नेत्यांची व आमचीही झोप उडाली. सारा देश हादरून गेला. आमचे युद्धसाहित्य तुटपुंजे ठरले. आम्ही अमेरिकेकडे सहकार्याची आणि युद्धसाहित्याची याचना केली. अमेरिका भारताच्या मदतीला धावून आली; हे बघताच धूर्त चीनने एकतर्फी युद्धबंदी केली. तिबेट (त्रिपिटक) वर आम्ही पाणी सोडलेच होते त्याबरोबरच हजारो मैलांचा आमचा भूप्रदेशही चीनने आपल्या घशात घातला. गेल्या अठ्ठावीस वर्षांचा काळ गेला पण तो प्रदेश आम्हाला अजून परत मिळविता आला नाही. मात्र चीन ने आम्हाला स्वप्नरंजनातून जागे करण्याची, वास्तवाची जाणीव देण्याची कामगिरी बजावली.

त्या आघातातून आम्ही कसे बसे सावरतो तोच एकोणवीसशे पासष्ट साली सहोदर पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. भारताची राजधानी दिल्ली जिंकण्याची स्वप्ने त्याने रंगविली. त्यानेही भारताच्या सीमेचे लचके तोडून त्यावर आपला अधिकार सांगितला. चीनच्या आक्रमणाने सावध झालेल्या भारताने पाकिस्तानचा पराभव केला पण वाटाघाटीच्या ताश्कंद करारप्रसंगी पंतप्रधान शास्त्री-सारखा उमदा मोहरा आम्हाला गमवावा लागला. मात्र या दोन्ही आक्रमणांनी आम्हाला व्यवहार-वादाकडे वळविले. संपूर्ण देशात नव्याने सुप्त राष्ट्रवादाचे पुनरुज्जीवन झाले. राष्ट्रवादाचे विचार-मंथन सुरू झाले. विश्व कुटुंबवादाच्या कविता लिहिणारे कवी पुन्हा राष्ट्रवादी कविता लिहू लागले. त्यांना पृथ्वीचा मानदंड असा हिमालय आता ठेंगणा भासू लागला. बर्फाचे तट धडाधड पेटत असल्याचे दृश्य त्यांना दिसले. शिवाचे सदन कोसळत असल्याची आणि हिमालयाच्या शुभ्र हिमावर भारत-मातेचे रक्ताचे ओघळ त्यांना दिसू लागले.

आम्ही आमच्या जनतेला, आमच्या सैनिकांना राष्ट्रीय भावनेचे आवाहन केले. त्यांना भारतीय वीर पुरुषांच्या पराक्रमाची गाथा ऐकविली. आमचे कवीही प्रत्यक्ष आघाडीवर जाऊन सैनिकांना उत्तेजन देऊन आले. आमच्या पराक्रमी सैनिकांनीही घरदार, बायका, मुले, सर्वांना विसरून आपल्या प्राणांची बाजी लावली. ती 'हकिकत' आम्ही चित्रपटातून ऐकली व पाहिली. 'ये मेरे वतनके लोगो' यासारख्या गीतांतून, स्वरसम्राज्ञी लता दिदींच्या दर्दभऱ्या गळ्यातून ही गीते गायिली गेली पंतप्रधान नेहरूंचेही नेत्र अश्रूंनी डबडबले. त्या शूर सैनिकांच्या हौतात्म्याचा अभिमान वाटला.

राष्ट्रवाद सर्व प्रतिष्ठित असल्याची पुन्हा भारतीयांना आणि नेत्यांना जाणीव झाली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता या विषयाची मी माझ्या प्रबंधासाठी निवड केली.

ज्या राष्ट्राच्या रक्षणासाठी आमच्या बहादुर सैनिकांनी किंमत मोजली ते राष्ट्रीय स्वातंत्र्यही सहस्रावधींच्या बलिदानातून लक्षावधींच्या हाल अपेष्टातून, तुरुंगवासातून, देशभक्तांच्या अमानुष छळांतून जन्माला आलेले आहे. आमच्या क्रांतिकारकांनी अंदमानच्या, एडनच्या काळकोठडीत आयुष्याच्या उमेदीची वर्षे घालविलेली आहेत. काहींनी तर तिथेच अखेरचा श्वास घेतला आहे. त्यांच्या लढ्याची, त्यागाची आठवण करून देणारी ही कविता आहे. वेदमंत्राहून पावन असणाऱ्या 'वन्दे मातरम्' या संजीवनी मंत्राचा संदेश देणारी ही कविता आहे. आमच्या पारतंत्र्याच्या काळातील राष्ट्रीय आशा आकांक्षांची, भावना, विकारांची या कवितेने उत्तम नोंद घेतली आहे. संपूर्ण राष्ट्रीय जीवनाचे प्रतिबिंब याच कवितेत पडलेले आहे. आमच्या नव्या पिढीला या स्वातंत्र्यलढ्याचा, त्यागाचा, बलिदानाचा परिचय व्हावा अशीही एक सुप्त इच्छा या प्रबंध लेखनामागे आहे.

पुरातत्त्व खाते राष्ट्रातील प्राचीन अवशेषांचे, ऐतिहासिक वास्तूंचे, स्मृतिचिन्हांचे, शिल्पांचे, कला, साहित्याचे जतन व संगोपन करून आमच्या संपन्न राष्ट्रीय परंपरेचे, संस्कृतीचे दर्शन घडवीत असते. अशाच प्रकारचे कार्य अतिशय समर्थपणाने आमच्या राष्ट्रीय कवींनी, राष्ट्रीय शाहिरांनी या राष्ट्रीय कवितेच्या रूपाने जाणीवपूर्वक केलेले आहे. पारतंत्र्याच्या काळात 'वन्दे मातरम्' असा मातृभूमीचा जयजयकार करणे गुन्हा होता. राष्ट्रीय कविता लिहिणाऱ्यांनी तुरुंगवास भोगला, हाल-अपेष्टा सहन केल्या, नोकऱ्या गमावल्या, घरादारावर तुळशीपत्र ठेवले त्याचाही ही कविता अस्सल पुरावा आहे. म्हणूनच ती जाणीवपूर्वक लिहिल्या गेली असे मी विधान केलेले आहे.

राष्ट्रीय प्रेरणांचे स्वरूप बरेच मोघम असल्याचे या पाहणीत आढळले. ते अधिक स्पष्ट व्हावे या हेतूने राष्ट्रवादी विचारवंतांचा स्वतंत्र अभ्यास करून त्याला अनुसरून राष्ट्रीय कवितांची अभिव्यक्ती कशी झाली हेही सांगण्याचा प्रयत्न यथाशक्ती केला आहे. राष्ट्रीय कार्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांची कृतज्ञतापूर्वक नोंद घेता आली आणि राष्ट्रासाठी तन, मन, धन नव्हे तर सर्वस्व वेचणाऱ्या राष्ट्रीय पितरांचे पुण्यस्मरणही या निमित्ताने घडले.

प्रबंधाचा विषय तात्त्विक आणि भावनिक, काळाचा आवाका मोठा, कवींची आणि कवितांची विपुलता त्यामुळे केवळ एकट्याच्या बळावर हा प्रकल्प पूर्ण करणे मला एकट्याला अशक्य होते. त्यामुळे अनेकांकडे मी सहकार्यासाठी गेलो आणि अनेकांनी मला विविध प्रकाराने सहकार्य केलेले आहे. कै. गुरुवर्य प्रा. भ. श्री. पण्डित, गुरुवर्य डॉ. वि. भि. कोलते, डॉ. ब. स. येरकुंटवार, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. सु. म. डोळके, प्रा. म. शं. वाबगावकर, डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे, डॉ. द. भि. कुळकर्णी या सर्वांच्या सहकार्याबद्दल आणि मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालयाचे प्राचार्य आणि माझे मित्र श्री. म. पांडे यांनी मला या प्रबंध-लेखनकालात सर्वतोपरी सहकार्य करून उपकृत केलेले आहे. 'राष्ट्रवाद' हा प्रामुख्याने राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे. या विषयाशी माझी केवळ तोंडओळख होती. माझे मित्र आणि ज्येष्ठ सहकारी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. चं. व्यं. दिवाण आणि त्यांचे सहकारी डॉ. सु. वा. भालेराव या दोघांनीही माझी उत्तम तयारी करून दिली, ग्रंथ सुचविले, चर्चा केली. त्यामुळेच प्रबंधाचा पूर्वार्ध मला लिहिणे शक्य झाले. याबद्दल या मित्रद्वयांचा मी अत्यंत आभारी आहे. माझे एक ज्येष्ठ सहकारी

मित्र आणि विद्वान प्रा. शं. ग. सहस्रभोजनी यांनी माझ्या प्रबंधासाठी केलेले सहकार्य व घेतलेले परिश्रम शब्दातीत आहेत. त्यांच्या डोळस मार्गदर्शनाने मला अनेक राष्ट्रीय संकल्पनांचे यथातथ्य आकलन झाले. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

माझे स्नेही, शाहिरी वाङमयाचे चिकित्सक अभ्यासक श्री. अनंत फंदी यांनी आधुनिक शाहिरांचे साहित्य आणि संदर्भ पुरवून मला उपकृत केलेले असल्याने त्यांचा मी आभारी आहे. माझे प्राध्यापक मित्र प्रा. नीळकंठराव धुळे, डॉ. सुधीर बोधनकर, डॉ. वि. स. जोग या अनुभवी मंडळींनी मला विविध प्रकारचे सहकार्य केलेले आहे. त्यांचाही मी आभारी आहे. माझी विद्यार्थिनी प्रा. चारुशीला फत्तेखानी हिचेही या प्रबंधाची संदर्भसूची करताना सहकार्य लाभले. तिचाही मी आभारी आहे. या प्रबंधाला प्रकाशकाच्या दृष्टिपथात आणण्याचे अतिशय अवघड आणि मोलाचे कार्य नागपूर विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल डॉ. व्ही. व्ही. कुळकर्णी यांनी केलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. या प्रबंधाच्या प्रकाशनाची जबाबदारी शिरावर गंगौघ धारण करणाऱ्या शिवासारखीच कठीण होती. ते अवघड कार्य नागपूरच्या साहित्य प्रसार केन्द्राचे संचालक व प्रकाशक श्री. भा. ल. कुलकर्णी यांनी अतिशय चोखपणाने पार पाडले आहे. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

प्रस्तुत ग्रंथातील प्रतिपाद्य विषयाची वाचकांना चटकन कल्पना यावी असे प्रतीकात्मक मुखपृष्ठ-रेखाटन करणारे पुण्याचे चित्रकार श्री. सुहास चांडक यांचाही मी आभारी आहे. या प्रबंधासाठी आवश्यक ते संदर्भ ग्रंथ पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, श्री. बिंझाणी सिटी कॉलेज ग्रंथालय, सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय ग्रंथालय, नागपूर येथील शासकीय ग्रंथालय, नागपूर महाविद्यालय ग्रंथालय, हिंदुधर्म संस्कृती मंदिर ग्रंथालय, विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी ग्रंथालयाचे मानद संचालक माझे मित्र श्री. चंद्रकांत कुळकर्णी आणि ग्रंथालयाच्या ग्रंथपाल सौ. मनाली दाणी, आणि पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे प्रमुख कार्यकर्ते श्री. म. श्री. दीक्षित यांनी अतिशय तत्परतेने केले. त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे.

जिच्या उल्लेखाशिवाय हे निवेदन आणि ऋणनिर्देश अपूर्ण राहील अशा एका व्यक्तीचे शेवटी आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. रणक्षेत्रावर प्रत्यक्ष युद्ध करणाऱ्या रथीचे जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व कुशल सारथ्यकर्म करणाऱ्या व्यक्तीचेही आहे. प्रेम, प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन ही सारथ्याची उत्कृष्ट भूमिका बजावली आहे माझ्या प्रिय पत्नीने, सौ. सुमतीने. तिच्या सक्रिय कुशल सहकार्याशिवाय प्रबंधाचा जगन्नाथाचा रथ प्रकाशनाच्या क्षेत्रापर्यंत पोहोचलाच नसता. तेव्हा तिला अंतःकरणपूर्वक पुनश्च धन्यवाद देऊन हे निवेदन संपवितो. नागपूरच्या नाग मुद्रणालयाचे संचालक श्री. दिवाकरराव धाक्रस आणि श्री. अजेय धाक्रस यांचाही सुरेख व सुबक मुद्रणासाठी आभारी आहे.

फाल्गुन कृष्ण द्वितीया, शुक्रवार
तुकाराम बीज, शके १९१०
दि. २४ मार्च १९८९

डॉ. ज. घु. नाईकवाडे

oo संसाराच्या वक्रगती खडतर
वाटेवर आयुष्यातील उन्हाळे, पावसाळे
अनुभवीत गेली पस्तीस वर्षे
एकनिष्ठेने, बिनबोभाटपणे
उत्साहपूर्वक, प्रसन्नचित्ताने
माझी साथ करणाऱ्या
प्रिय पत्नी सौ. सुमतीला
ही साहित्यकृती अर्पण.

अनुक्रम

१	विषयप्रवेश	१
२	राष्ट्रवादाची पूर्वपीठिका आणि राष्ट्रवादाचे स्वरूप	३
३	भारत आणि महाराष्ट्र परस्परसंबंध	३६
४	आधुनिक महाराष्ट्रातील राष्ट्रधर्माचे प्रणेते	६१
५	राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता	१५८
६	आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा पहिला कालखंड (इ. स. १८५० ते १८७४)	१८३
७	राष्ट्रीय जागृतीचा कालखंड (इ. स. १८७४ ते १९०५)	२०७
८	राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग (इ. स. १९०५ ते १९२२)	२४७
९	राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा कालखंड (इ. स. १९२२ ते १९३५)	३४७
१०	संमिश्र वैचारिक प्रभावाचा कालखंड (इ. स. १९३५ ते १९५०)	४४४
११	उपसंहार	५३६
१२	संदर्भ ग्रंथ	५४१



प्रस्तावना

प्राचार्य राम शेवाळकर

राष्ट्र म्हणजे काय ? ते केव्हा व कसे निर्माण होते ? देश व राष्ट्र ह्यामध्ये फरक काय ?

देशाला भौगोलिक सीमा असतात. क्षेत्रफळ असते. राष्ट्राला स्वाभिमानाच्या सरहद्दी असतात. देशात जमीन, पर्वत, नद्या व अरण्ये असतात. राष्ट्रामध्ये जितीजागती माणसे असतात, माणसांची जिवंत मने असतात, निष्ठा असतात, आग्रह असतात. या आग्रहाचे पीळ असतात. त्यातून इतिहास आकाराला येतो व क्वचित भूगोल बदलत असतो. रामायणात राम वनवासाला जायला निघाला त्यावेळी वसिष्ठ म्हणाले :

न तद् भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपतिः ।
तद् वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ॥

ज्या ठिकाणी राज्य रामाचे नाही, त्या भूप्रदेशाला राष्ट्र मानण्याची वसिष्ठांची तयारी नाही. याउलट रामाचे वास्तव्य असणाऱ्या वनभूमीलाही 'राष्ट्र' ही संज्ञा देण्यास ते तयार आहेत. त्यांच्या मते रामाचे प्रशासन (वा निवाससुद्धा) हा देशाला राष्ट्र बनविण्याचा महत्त्वाचा निकष आहे. अर्थात रामाचे विभूतिमत्त्व, गुणसंपदा, चारित्र्य व त्याच्यावरील प्रजेचे प्रेम, हे त्यांनी राष्ट्रभावनेसाठी आवश्यक मानले आहे. भारतीय विचारसरणीप्रमाणे विशिष्ट काल व परिस्थितीपेक्षा त्याच्या केंद्रवर्ती असणारी व्यक्ती हीच प्रभावशाली असते. काल व परिस्थितीचा प्रभाव सर्वसामान्य माणसावर पडतो. अशा माणसांच्या आकांक्षा परिस्थितीला वळण देत असतात व कालावर दूरगामी परिणाम करीत असतात. काळ आपल्या स्वभावानुसार बदलत असतो. परिस्थितीही तिच्या नियतीनुसार वळणे घेत असते. या बदलानुसार स्वतःचे मोहरे वळविण्याची सवय माणसाला असते. पण लोकोत्तर

महापुरुषांचे तसे नसते. त्यांच्या पराक्रमाचाच नव्हे तर भृकुटिभंगाचाही प्रभाव परिस्थितीवर पडत असतो. परिस्थिती पुष्कळदा तीच असते. लक्षावधी माणसे आपली आयुष्ये निमूटपणे तिच्या ओंजळीत सोपवून देत स्वस्थ बसतात. पण एखादा शिवाजी येतो व फक्त बारा मावळचांच्या भरवशावर बलाढ्य साम्राज्यशाहीला हतबल करून पाहता पाहता हिंदवी स्वराज्याची स्थापना करतो. तो समाजाच्या आधाराची वाट पाहत नाही. त्याच्यामागे लोकच काय, आप्तही उभे राहायला कचरतात. किंवहुना निकटचे नातलग हेच त्याच्या महत्त्वाकांक्षेचे पहिले मारेकरी ठरतात. त्याची रीती लोकानुनयाची नसते. त्यामुळे तो लोकमत अजमावण्याच्या फंदातच पडत नाही. तो स्वतःच्या अंतरात्म्याचा तेवढा कौल घेतो. त्यालाच 'श्री' ची इच्छा मानून जिवाच्या कराराने नेमलेल्या कुरुक्षेत्रात उडी घेतो. त्याच्या हातातील शस्त्राच्या तळपत्या पात्याकडे कालपुरुष स्तिमित होऊन पाहत राहतो. व परिस्थितीही नम्र होऊन निमूटपणे त्याचे पातिव्रत्य पत्करते. म्हणूनच महाभारताने याबाबत आपला निःसंदिग्ध निर्वाळा देऊन टाकला आहे.

'कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूत्, राजा कालस्य कारणम् ।।'

नव्या काळात काळाचे हे नियंतेपण राजाकडून महापुरुषाकडे आले आहे. असा महापुरुष प्राणतत्व पावला, की देशाचे राष्ट्र होते, असाच वसिष्ठाच्या तेजस्वी वचनाचा इत्यर्थ आहे.

माणूस आपल्या प्रेमाने, श्रद्धेने व अभिमानाने मातीमध्ये प्राण फुंकतो. पर्वत, नद्या, अरण्ये व जमीन-हा निसर्ग सर्वत्र असतो. माणसांची वसाहत आहे तिथेही असतो, व अद्याप अज्ञात राहिलेल्या आफ्रिकेच्या निबिड अरण्यातही असतो. निर्जन वाळवंटात वा वनप्रदेशात राष्ट्राचे प्रश्न फारसे उत्पन्न होत नाहीत. तिथे विहरणाऱ्या पशुपक्ष्यांना हे प्रश्न कधी पडत नाहीत. तिथे माणूस आला की, तो स्वतःच्या ममत्वाचे वर्तुळ निर्माण करतो. सजीव सृष्टीप्रमाणेच अचेतन वस्तूंवरही प्रेम करतो. त्यांनाही व्यक्तित्व, नामरूप व क्वचित देवत्वही अर्पण करतो व स्वतःच्या भावनेने जन्माला घातलेल्या देवाचे अंकित राहण्यात समाधान मानतो. त्याच्या ममत्वाचे हे क्षितिज त्याच्या कर्तृत्वानुसार विस्तारत जाते वा आकुंचन पावते. आपणच वाढविलेल्या या मूक-परिसराच्या रक्षणासाठी वा प्रतिष्ठेसाठी तो स्वतःच्या जिवाचीही तमा बाळगत नाही. मोगल वा इंग्रजांकडे जाण्यास जमिनीची खुषीही

नसते, वा तक्रारही नसते. स्वामी कोणताही आला, तरी तिची प्रतिक्रिया शून्य असते. गौरीशंकर हे जगातील सर्वोच्च शिखर भारताकडे राहिले काय, वा चीनकडे गेले काय, तरी त्याचा त्याच्या उंचीवर परिणाम होत नाही. पण माणसाची भावना मात्र त्याला माऊंट एव्हरेस्ट किंवा गौरीशंकर ठरवते. त्याबरोबर त्याच्या अभिमानाची उंची गगनचुंबी होते. टेम्स, नाईल, मिसिसिपी, हो हँग हो, व्होल्गा वा गंगा–नद्या या दृष्टीने सर्व सारख्याच. पण भारतीयांच्या दृष्टीने गंगेच्या शितोडचालाही पिढचांच्या उद्धाराचे श्रेय लाभते. माणसाने स्वतःच्या भावनेचे अर्घ्य अर्पून पाण्याचे तीर्थ केले व मातीला पावित्र्य दिले. सर्वत्र समान असलेल्या पाण्यातून, मातीतून, वाळूतून व वनस्पतीतून मानवी मनाने राष्ट्रांना जन्म दिले.

देशाला भूगोल असतो. राष्ट्राला इतिहास असतो. हा इतिहास माणसाने आपल्या पराक्रमाने आकाराला आणलेला असतो. इतिहास या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गतकालीन घटितांवरही माणसाचे प्रेम असते. अतीतातील यशापयश, चढउतार, उन्नती–अवनती व छाया–प्रकाश यांचाही त्याला अभिमान असतो. यातूनच तो वर्तमानासाठी आवश्यक ती स्फूर्ती घेतो. स्वतःच्या पुरुषार्थाने भूगोलाच्या सीमा वाढवितो व इतिहास उज्ज्वल करतो. राष्ट्रभावना अशा रीतीने प्रेरक व कृतिशील होते.

काव्य हा अशा जिवंत मनाचा, त्यातील प्रबल आवेगाचा अनिवार व उत्स्फूर्त उद्‌गार असतो. परवशतेच्या प्रतिकूल काळात, किंवा राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगी राष्ट्रभक्तीला प्रखर तेज चढलेले असते. राष्ट्रीय भावना अधिक व्यापक झालेली असते. स्वातंत्र्याच्या वा स्वास्थ्याच्या काळात या भावनेवर एक तवंग आलेला असतो. एखाद्या तात्कालिक संकटाने आव्हान दिले की, माजलेल्या खळबळीमुळे हा तवंग तेवढचापुरता बाजूला सारला जातो. प्रतिकूल काळात बाकी संपूर्ण राष्ट्राचे स्वत्व व सत्त्व पणाला लावले जाते. त्यातून अत्यंत ज्वालाग्राही अशी शौर्यगीते निर्माण होतात, ज्यामध्ये दीर्घकाळपर्यंत प्रेतांनाही पराक्रमाची प्रेरणा देण्याची क्षमता निहित असते. स्थैर्याच्या वा स्वास्थ्याच्या कालखंडात शृंगारिक व सुखवादी काव्याला बहर येतो. गुप्तांच्या कालातच कालिदास उत्पन्न होतो. सातवाहनाच्या काळात हालाची सप्तशती निर्माण होते. व उत्तर पेशवाईमध्ये लावण्याचा सुकाळ होतो.

महाभारताच्या उद्योगपर्वात शिष्टाई विफल झाल्यानंतर परतणाऱ्या कृष्णाने केलेल्या विनंतीवरून कुंती आपल्या वनवासी पुत्रांना निरोप पाठवते. त्यात विदुलेने संजयाला केलेल्या उपदेशावर भर असतो. अकर्मण्यतेमुळे व सुखासीनतेपोटी राज्य गमावून वसलेल्या सर्वच क्षात्रपुत्रांना पेटून उठण्याची प्रेरणा देण्याचे सामर्थ्य त्या उपदेशात असते. त्यावेळी पराधीन पांडवांना त्याचीच गरज असते. प्रतिकूल कालात दैववाद बळावण्याची नेहमीच भीती असते. क्वचित कुठे एखादा स्फुल्लिंग राखेखाली वाट पाहत दबा धरून वसलेला असतो. एकदम वणवा भडकवून देण्याची आपली ईर्ष्या त्याने जपून ठेवलेली असते. असा स्फुल्लिंग हाच राष्ट्रीय कवितेचा मूलस्रोत असतो.

१८१८ मध्ये भारताचे स्वातंत्र्य गेले. त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षे निपचित पडून राहण्यात किंवा आत्मखंडना करण्यात गेली. विद्ध झालेला स्वाभिमान पुन्हा प्रज्वलित होण्यास विष्णुबुवा ब्रह्मचारी व विष्णुशास्त्र्यांचा उदय व्हावा लागला. तोपर्यंत न्यूनगंडप्रेरित, तेजोभंग करणारे निबंध साहित्य, बुकीश व अतिरंजित नाटके व इंग्रजी व संस्कृत साहित्याची भाषांतरे यांचीच पैदास होत राहिली. विष्णुद्वयांमुळे ही आत्मग्लानीची झापड ओसरून स्वत्वाची ओळख व व स्वाभिमानाचा संचार होण्यास सुरुवात झाली. लो. टिळक, हरिभाऊ, केशवसुत, खाडिलकर, शि. म. परांजपे व अ. ब. कोल्हटकर यांच्या सशक्त साहित्याची गंगोत्री निबंधमाला हीच आहे. पारतंत्र्याचा पीळ जसजसा काचत व जाचत राहिला, तसतशी स्वाभिमानपोषक तेजस्वी साहित्याची निर्मिती होण्याची चिन्हे वाढू लागली. राष्ट्रीय काव्याची पहाट याचवेळी उजाडली. विनायक, स्वा. सावरकर, कवी गोविंद, गोविंदाग्रज या कवींच्या कवितांनी महाराष्ट्रातील तरुण पिढी अंतर्बाह्य पेटून उठली. दु. आ. तिवारी, कुंजविहारी, यशवंत, सेनापती बापट, साने गुरुजी, टेकाडे यांसारख्या कवींच्या ओळी तरुणांच्या ओठांवर खेळू लागल्या. कुसुमाग्रज, कांत, पोवळे, बोरकर यांच्या कढत कवितांनी सर्व वातावरण झपाटून गेले. स्वा. सावरकरांचे समग्र साहित्य, विशेषत: मॅझिनीच्या चरित्राला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, पोवाडे, गोमांतक, सागरास, सांत्वन, माझे मृत्युपत्र– यासारख्या अग्निपराग ओतणाऱ्या कविता यांचा प्रभाव केवळ महाराष्ट्रावरच नव्हे, तर सर्व तरुण भारतावर फार मोठ्या प्रमाणावर होता. काऊ-चिऊच्या गोष्टी व तो-तिच्या गुलाबी कहाण्या यांच्याहीपेक्षा या तेजोगीतांनी तरुण पिढीचे मन अंकित केले. एक प्रकारे महाराष्ट्राचे धगधगीत

तारुण्यच या कवितांमधून स्फोटकपणे धडाडत राहिले. या कवितांतील आशय इतका उष्ण होता व अभिव्यक्ती इतकी दाहक होती की, केवळ उच्चारानेही ओठ करपून जावेत व श्रवणाने कान लाल व्हावेत. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय भावनेच्या निर्मितीमध्ये विष्णुशास्त्री, टिळक, कवी विनायक, सावरकर, परांजपे, खाडिलकर, नाथमाधव, साने गुरुजी, तिवारी व कुसुमाग्रज यांचे योगदान अविस्मरणीय आहे.

राष्ट्रीय काव्य हा भारताचा व विशेषतः महाराष्ट्राचा एक गौरवास्पद विशेष आहे. माझे मित्र डॉ. जगन्नाथ नाईकवाडे यांनी 'आचार्य' पदवीसाठी केलेल्या संशोधनाच्या निमित्ताने हे रोमहर्षक साहित्यविश्व अध्ययनासाठी निवडले. डॉ. नाईकवाडे हे एक अनुभवी प्राध्यापक, अभ्यासक व ललितलेखकही आहेत. स्वतः कडव्या राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे ते या विषयाकडे स्वाभाविकच आकृष्ट झाले. संशोधनासाठी व अभ्यासासाठी हा विषय निवडण्याची त्यांना प्रेरणा झाली, हे त्या विषयाचे व त्यांचेही भाग्य. भारतातील व महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या वाटचालीचा मागोवा यापूर्वी मराठीमध्ये आचार्य जावडेकर, प्रा. न. र. फाटक व इंदुमती पंडित यांनी घेतला आहे. त्यामध्ये इतिहासाची, समाजशास्त्राची वा भारतीय व महाराष्ट्रीय पिंड तपासून घेण्याची दृष्टी आहे. डॉ. नाईकवाडे यांची बैठक आत्मीयतेची व अभिमानाची आहे. १८५० ते १९५० या शतकाचा कालखंड त्यांनी आपल्या अभ्यासासाठी निवडला आहे. भारतातील राष्ट्रवादाचे बीजारोपण, अंकुरणे, फोफावणे, उद्रेक, स्फोट व शमन हे सगळे टप्पे त्यांनी यात तपासले आहेत. राजा राममोहन रॉय व न्या. रानड्यांपासून डॉ. आंबेडकर व गोळवलकर गुरुजींपर्यंतचा पल्ला, विचार व कार्य यांचा आढावा घेण्याच्या दृष्टीने तसा लांबच होता. त्या कालखंडातील प्रकाशित साहित्याचा शोध, रसग्रहण व मूल्यमापनाच्या दृष्टीने करावयाचा व्यायाम तसा अंगाबाहेरच होतो. त्यातही त्यांनी आपल्या प्रबंधाचा जवळजवळ निम्मा भाग राष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट करण्यात व तिच्या प्रकाशात जागतिक विचार–विश्वाच्या कोंदणातील भारतीय व महाराष्ट्रीय अभिव्यक्तीचा आलेख रेखाटण्यात खर्च केला आहे. राष्ट्रवादाच्या कल्पनेचा पंधराव्या शतकातील उगम, त्याचे जगभरातील पडसाद, भारतापर्यंत येऊन पोहोचलेले लोण व एतद्देशीय राजकारणात त्याचा झालेला प्रसार, याचा विस्ताराने आढावा लेखकाने या प्रबंधात घेतला आहे. त्याबरोबरच प्राचीन व मध्ययुगीन भारतातील राष्ट्रकल्पनेचाही ऊहापोह

त्यांनी अभिमानाने केला आहे. ' पृथ्वी समुद्रपर्यंताया: एकराष्ट्र ' ही एक-राष्ट्रीयत्वाची कल्पना त्यांच्या वरील ऊहापोहाचा अर्थातच आरंभबिंदू आहे. खरे म्हणजे माणसाचे आत्मीयतेचे व अभिमानाचे वर्तुळ विस्तारत जाण्यातूनच राष्ट्रवादाचा उद्भव होतो. त्यामुळेच ही संकल्पना उत्पन्न होण्यासाठी पंधराव्या सोळाव्या शतकापर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता नसते. प्रत्येकामध्ये प्रादेशिक प्रेम व अभिमान मूलत:च असतो. त्यातूनच राष्ट्रवादाचा विकास क्रमाने दृढ होत जातो. तसा तो भारतातही झाला आहे. विसाव्या शतकातील विज्ञानाच्या प्रगती-मुळे जग एकदम लहान झाले. सर्व देशांशी संपर्क आटोक्यात आला. त्यामुळे रहदारीचे जाळे वाढले. त्यातून विश्वैक्याची व विश्वमानवाची कल्पना उगवली. परिणामी राष्ट्रवाद संकुचित ठरून इतिहासजमा होण्याची भीती वाढली. रशियातील साम्यवादी क्रांतीने जगातील सर्व कामगारांच्या एकजुटीची घोषणा लोकप्रिय केली. आता राष्ट्रा-राष्ट्रांच्या सीमा वितळून जाऊन सर्व जग एक होण्याचे आरवत स्वप्न सफल होण्याची आशा बळावली. पण खुद्द रशिया, युगोस्लाव्हिया व चीन या साम्यवादी देशांनी विश्वैक्याच्या आरोळीत आपला सूर मिसळूनही, स्वत:चा उत्कर्ष व वर्चस्व यासाठी राष्ट्रवादाची पुन्हा कास धरली. सर्व जगात आनंदाचे एकच आवार उत्पन्न होण्याच्या आशेने स्वत:चे घर जमीनदोस्त करण्याची घाई सुदैवाने कोणीच केली नाही. मॅझिनीच्या प्रतिपादनाप्रमाणे व्यक्ती हे राष्ट्राचे मुख्यांग, तर राष्ट्र हे मानवतेचे मुख्यांग आहे. आपल्या वर्चस्वाची, प्रभुत्वाची व विस्ताराची जीवघेणी स्पर्धा बलाढ्य देशांनी थांबविली, तर कुणालाही आपल्या राष्ट्रवादाच्या भिंती शाबूत ठेवण्याची गरज राहणार नाही. तोपर्यंत बाकी प्रत्येकाच्या मानवता-मंदिराचे प्रवेशद्वार राष्ट्रवादाचेच राहणार !

डॉ. नाईकवाडे यांच्या या बृहद्ग्रंथाचे विवेचन व मागोवा असे सरळसरळ दोन भाग पडतात. महाराष्ट्रातील व्यवहारचतुर लेखकाने यातून दोन स्वतंत्र ग्रंथांच्या निर्मितीचे श्रेय सहज साधले असते. ग्रंथाच्या उत्तरार्धातील शतकाच्या कालखंडाचे ग्रंथकाराने पाच भागात विभाजन केले आहे. राष्ट्रीय भावनेच्या जागृतीसाठी प्रेरक ठरणारे अतीताचे औक्षवाण, राष्ट्रवादाचा सर्वांगीण प्रभाव, बहर, ओहोटी या क्रमाने त्यांनी साहित्याचा, विशेषत: काव्याचा अभ्यास केला आहे. राष्ट्रीय काव्य ही एखाद्याच्या आवडीची, तत्कालीन फॅशनची वा एखाद्या कालनिष्ठ लाटेची निष्पत्ती नसते. तर ती एका जातिवंत मनोवृत्तीची अपरिहार्य अभिव्यक्ती असते. एखाद्या स्फूर्तिदायक वा

प्रभावी काव्यातून पडसादात्मक अशी निर्जीव पैदास केव्हाही होऊ शकते. तशीच ती राष्ट्रीय काव्याच्या बाबतीतही झाली असण्याची शक्यता आहे. पण मुळात ज्वलंत देशभक्ती असल्याखेरीज तेजाचे निःश्वास बाहेर पडणार नाहीत. अंतःकरणात राष्ट्रभक्तीचे स्थंडिल धगधगत असले, की त्यातून बाहेर पडणाऱ्या अग्निकणांचे शब्द होतात व वाचणाऱ्याला नि ऐकणाऱ्याला चटका देतात, चटकाही लावतात. 'तुजसाठी मरण ते जनन । तुजवीण जनन ते मरण' अशी ओतप्रोत समर्पणवृत्ती असली की, समग्र अस्तित्वच राष्ट्रतेजाने भारून व भारावून जाते. अशावेळी सहज वाटणाऱ्या श्वासोच्छ्वासांचीही उग्र अग्निगीते बनतात व त्यांच्या स्वरातील केवळ धगीनेसुद्धा मनामनामध्ये वणवे पेटतात.

सुदैवाने भारतातील देशभक्तीचे व क्रांतिकार्याचे मूळ यज्ञकुंड महाराष्ट्रातच धडाडत होते. त्यातूनच उभ्या देशाला हौतात्म्याची स्फूर्ती झाली. मराठी काव्यात त्याची आच उमटणे अगदी स्वाभाविक होते. डॉ. नाईकवाडे यांच्या विवेचनामुळे ते तेजस्वी व रोमांचक पर्व स्मरणोज्जीवित होते, त्यामुळे वठलेल्या मनांनाही अग्नीचे अंकुर फुटतात व सळसळत्या वृत्तींना ज्वालांची फुले येतात. हे शतकाचे शब्द-विश्व कवेत घेण्यासाठी डॉ. नाईकवाडे यांना व्यासंगाचा फार मोठा आटापिटा करावा लागला. पण त्याचे त्यांना कष्ट झाले नसतील व शिणवटाही आला नसेल, याची मला खात्री आहे. मन लावून केलेल्या या साधनेतील व्यतीत झालेला त्यांचा प्रत्येक क्षण सार्थकी लागल्याचे समाधान त्यांची सोबत अखंड करीत असेल व आपले वयही तेवढ्या काळापुरते स्थगित झाल्याचा ऊबदार अनुभव त्यांना आला असेल !

वर्णनाचा पाल्हाळ, एकांतिक भूमिकेमुळे विवेचनाला पडलेली मर्यादा, निवड व प्रतिपादन यातील विवेकबुद्धीची जांभई व तपशिलातील स्खलने यांना महत्त्व देणे अपराधीपणाचे वाटावे, असा रोमांचकारी प्रत्यय देणाऱ्या या प्रकाशपर्वाच्या पूजनाने सहृदय वाचकांच्या मनाला नव्याने तारुण्याची डहाळी फुटेल. तिच्यावरील लसलसत्या कोंबांनी सध्याच्या स्वत्वशून्य, बाजारू व निःसत्त्व वातावरणावरही मात करण्याचे बळ त्याला प्राप्त होईल, अशी मला आशा आहे. त्यासाठी डॉ. नाईकवाडे ह्यांच्या परिश्रमाचे अभिनंदन !

नागपूर
२३ मार्च १९८९

राम शेवाळकर



विषयप्रवेश—प्रबंधाची भूमिका

जगाच्या व्यवस्थेचा आधार—राष्ट्रवाद

भूमिका— जगात अस्तित्वात असलेल्या विविध धर्मांची स्वतंत्र जीवनदर्शने आहेत. मानवी जीवनाच्या वाटचालीत उदयाला आलेली, मानवतावाद, समाजवाद, साम्यवाद इत्यादी जीवन-दर्शनेही अस्तित्वात आहेत. या जीवनदर्शनांच्या ओळीत एक स्वतंत्र जीवनदर्शन म्हणून राष्ट्रवादाला प्रतिष्ठा द्यावी किंवा देऊ नये यासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. मात्र या मतभेदामुळे राष्ट्रवादाचे मानवी जीवनातील महत्त्व कमी होत नाही. गेल्या दोनतीनशे वर्षांचा जगाचा इतिहास पाहिला तर राष्ट्रवादाच्या अद्‌भुत सामर्थ्याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. "लोकशाहीप्रमाणे राष्ट्रवाद ही देखील एक गतिमान कल्पना" असल्यामुळे देश, काल स्थितिपरत्वे त्याचे स्वरूप आणि प्रभाव यात अंतर असणे स्वाभाविक आहे. तरीही मानवजातीचे डोळे दिपविणारी, अत्यंत शौर्याची, पराक्रमाची, अचाट साहसाची, अपूर्व त्यागाची, औदार्याची आणि बलिदानाची कृत्ये याच भावनेने प्रेरित होऊन मानवाने केलेली आहेत. दोनअडीचशे वर्षांत अनेक राष्ट्रांनी केलेला औद्योगिक, भौतिक आणि सांस्कृतिक विकास म्हणजे राष्ट्रभक्तीच्या भावनेचे दृश्य फळ आहे. धार्मिक आणि जातीय भावनेपेक्षाही राष्ट्रभावनेचा प्रभाव सर्वंकष आहे. हिंदीचे ख्यातनाम विचारवंत आणि साहित्यिक डॉ. जैनेन्द्रकुमारजी राष्ट्रवादाच्या प्रभावासंबंधी लिहितात, "... राष्ट्रवाद सब जगह प्रधान है। राज्यप्रधान व्यवस्था में राष्ट्रवाद पनपे बिना रह नही सकता। सोशालिज्म, कम्युनिज्म राष्ट्राधारित धारणाएँ नही है। लेकिन सोशालिज्म नेशनल बना और कम्युनिज्म को भी नेशनलरूप में देखा जा सकता है। ... राष्ट्रवाद वह आधार है जिसपर दुनियाकी व्यवस्था चल रही है।" या राष्ट्रवादाच्या व्यापक प्रभावामुळेच राष्ट्रवादाचे, त्याच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि विविध स्वरूपाचे विस्तृत विवेचन या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात केलेले आहे.

जीवन आणि साहित्य

'मानवी जीवनावर केलेले भाष्य म्हणजे साहित्य' या साहित्याच्या व्याख्येत साहित्य जीवनाशी संबंधित असल्याचे गृहीत धरलेले आहे. जीवन आणि साहित्य परस्परावलंबी व परस्परांना पोषक आणि प्रेरक ठरणारे आहे. मात्र साहित्य ही स्वतंत्र मूल्य असलेली वस्तू आहे किंवा नाही यासंबंधी विचारवंतांत मतभेद आहेत. यातून साहित्य हे साधन की साध्य या वादाचा उदय झालेला आहे. साहित्याची कालसापेक्षता आणि कालनिरपेक्षता दोन्ही मान्य असणारे विद्वान आहेत तर काहींना दोहोतून एकच तत्त्व मान्य आहे. राष्ट्रवादाचा मानवी जीवनावर सर्वंकष प्रभाव असल्यामुळे

राष्ट्रभावनेच्या संदर्भात साहित्याचा विचार केलेला असून साहित्याची एक शाखा म्हणून काव्य-प्रकाराचाही विचार केलेला आहे.

अधिक्षेप नव्हे अभ्यासाची सोय

राष्ट्रीयभावना तीव्र आणि जीवनव्यापी असल्यामुळे तिचा उणाअधिक प्रभाव अनेक कवींवर असणे स्वाभाविक आहे. गेल्या शंभरवर्षांच्या काळात काव्यलेखन करणाऱ्या बहुतेक कवींनी राष्ट्रीय भावनेची अभिव्यक्ती करणाऱ्या कवितांची निर्मिती केली असण्याची शक्यता आहे. वरील अर्थाने या कालखंडातील सर्वच कवी राष्ट्रकवी म्हणून ओळखले गेले पाहिजेत. प्रस्तुत शोध-प्रबंधात अशाच कवींची अभ्यासाकरिता निवड केलेली आहे की ज्यांचा पिंड प्राधान्याने राष्ट्रवादी होता किंवा आहे; ज्यांनी इतर काव्यविषयावरोवरच राष्ट्रीय भावनेलाही महत्त्व दिलेले आहे. याचा अर्थ असा नव्हे की राष्ट्रीय भावनेव्यतिरिक्त इतर भावनांना प्राधान्य देणाऱ्यांना माझ्यालेखी गौणत्व आहे. केवळ विषयाची मर्यादा आणि अभ्यासाची सोय म्हणून हे निवडीचे तत्त्व स्वीकारलेले आहे.

राष्ट्रीय कवितेचे प्रमुख कालखंड आणि प्रधान प्रवृत्तीचे दिग्दर्शन

या शोधप्रबंधात एका प्रदीर्घ कालखंडातील 'काव्य' या विशेष वाङ्मय प्रकारावरील राष्ट्रभावनेच्या प्रभावाचे प्राधान्याने विवेचन करावयाचे असल्यामुळे, त्या त्या कवींच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांचा, राजकीय लढ्यांचा, राष्ट्रीय पुरुषांच्या कर्तृत्वाचा पार्श्वभूमी म्हणून आवश्यक तेवढाच उल्लेख करण्याचे धोरण अंगीकारिले आहे. सुमारे शंभर वर्षांच्या आधुनिक मराठी कवितेच्या कालखंडाची त्या त्या कालखंडातील विशेष प्रवृत्ती लक्षात घेऊन पाच भागांत मांडणी केलेली आहे.

(१) राष्ट्रीय कवितेचा पहिला कालखंड इ. स. १८५० ते १८७४ **पूर्वज स्मृति कालखंड.**

(२) इ. स. १८७४ ते इ. स. १९०५ हा दुसरा **राष्ट्रीय जागृतीचा कालखंड.**

(३) इ. स. १९०५ ते इ. स. १९२२ **राष्ट्रीय उत्थानाची उत्स्फूर्त प्रेरक व तेजस्वी गाणी गाणाऱ्या 'अभिनव भारता'चा कालखंड. अथवा राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग.**

(४) इ. स. १९२२ ते इ. स. १९३५ **गांधीवादी राष्ट्रीय चळवळींनी** प्रभावित होणाऱ्या कवितेचा कालखंड.

(५) इ. स. १९३५ ते इ. स. १९५० मानवतावादी राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद आणि व्यक्तिवाद या संमिश्र वैचारिक **प्रभावातून काव्यनिर्मिती करणारा कालखंड अथवा राष्ट्रीय कवितेच्या ओहटीचा कालखंड.**

शेवटच्या प्रकरणात समारोपात्मक विवेचन करण्याचे ठरविले आहे.

ऽऽ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३६६
६७९
८३३९०

राष्ट्रवादाची पूर्वपीठिका आणि राष्ट्रवादाचे स्वरूप

पाश्चिमात्यांच्या दृष्टिकोणातून राष्ट्रवादाचा इतिहास

राष्ट्रीय भावनेचा प्रभाव– आधुनिक मानवी जीवन भौतिक आणि अभौतिक अशा दोन प्रमुख घटकांनी प्रभावित आणि नियंत्रित झालेले असल्याचे दिसून येईल. भौतिक घटकांत निसर्गाचा, भौगोलिक वातावरणाचा समावेश करता येईल तर अभौतिक घटकांत मानवनिर्मित ज्ञानविज्ञान, इतिहास, शास्त्रे, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृती, भाषा आणि साहित्य यांचा समावेश करता येईल. मानवाच्या प्राथमिक अवस्थेत जैविक घटकाला प्राधान्य असल्याचे दिसून येत असले आणि जीवनावश्यक प्राथमिक गरजा भागविण्यातच त्याचा बराच काळ खर्च होताना दिसला तरी उत्तरोत्तर जातीय आणि धार्मिक भावनेचे प्राबल्य वाढल्याचे दिसून येईल. मध्ययुगीन काळात या धार्मिक भावनेची जागा भक्तिभावनेने घेतली व संपूर्ण विश्वात भक्तियुगाची लाट आली. या भक्तिभावनेचा व्यापक व बलवत्तर प्रभाव मानवी मनावर होता. पुढे या भक्तिभावनेचीच जागा राष्ट्रभावनेने घेतली. राष्ट्रभावनेचे धर्मभावनेशी आणि भक्ती भावनेशी निकटचे नाते आहे. भक्तीचे जसे नऊ प्रकार आहेत तसेच राष्ट्रीय भावनेचेही दाखविता येतील. राष्ट्रपूजा, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्राकरिता सर्वस्व अर्पण, राष्ट्रदैवत या सर्व शब्दांतून या भावनेची धर्म आणि भक्तिभावनेशी असलेली समानता दाखविता येईल. जोहान्स जी. हर्डर हा जर्मन राष्ट्रवादी तत्त्वज्ञ तर राष्ट्रभावनेला आध्यात्मिक आणि नैतिक भावना म्हणूनच गौरवितो.[२] एका अर्थाने ते स्वाभाविकच म्हटले पाहिजे. कारण मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात असणाऱ्या श्रद्धा, सेवा, त्याग, शौर्य, स्वाभिमान, औदार्य, न्याय-प्रियता, सहिष्णुता आणि बंधुभाव इत्यादी उत्तमोत्तम गुणांचा प्रकर्ष या देशभक्तीच्या भावनेतूनच प्रकट झाल्याचे दिसून येईल. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी विचारवंत रूसो म्हणतो, " It is certain that the greatest miracles of virtue have been produced by patriotism."[३]

राष्ट्रभावनेची दोन रूपे

मानवातील सत्प्रवृत्तींचा प्रकर्ष करणाऱ्या राष्ट्रभावनेमुळे मानवामध्ये एक प्रकारचा जिवंत-पणा निर्माण होऊन त्याच्या व्यक्तित्वाची (personality) वाढ होण्याला साहाय्य झालेले आहे यात शंका नाही. मानवी जीवनाला उपयुक्त आणि पोषक अशा सत्प्रेरणांचा विकास करणे, त्यांचा उत्कर्ष साधने ही राष्ट्रभावनेची विधायक बाजू आहे. तिचे ते सोज्वळ रूप आहे. त्याचबरोबर अतिरेकी व आक्रमक राष्ट्रभावनेच्या आहारी जाऊन स्वार्थांधता, अन्याय, अत्याचार, क्रौर्य, द्वेष, क्षुद्रपणा इत्यादी असत्प्रवृत्तीतून उदयाला येणाऱ्या उपद्रवकारक दुर्गुणांनाही उत्तेजन मिळालेले आहे.[४] राष्ट्रभावनेच्या या दाहक ठिणग्यांनी चेतविलेल्या विघातक वणव्यात अनेक राष्ट्रे होरपळून

निघाली, त्या विनाशात कोटचवधी घरादारांची जाळपोळ, लुटालूट झाली, लक्षावधी लोकांचे बळी गेले आणि अब्जावधी रुपयांची साधनसंपत्ती नष्ट झाल्याचे इतिहास पुरुषाला माहीत आहे.

या भावनेला विधायक आणि विघातक अशा दोन्ही बाजू असल्यामुळे तिच्या स्तुतिपाठकांप्रमाणेच तिच्या निंदकांचीही संख्या वाढलेली आहे. स्वार्थी, संकुचित, कूपमंडुकवृत्तीची, प्रतिगामी, बुरसटलेली, जातीय, साम्राज्यवादी, किंवा फॅसिस्ट भावना म्हणून तिचा अधिक्षेप करण्यात आलेला आहे व अजूनही येत आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की इतकी दूषणे देऊनही आणि नवे विश्वकुटुंबवादाचे तत्त्वज्ञान अस्तित्वात येऊनही जगातील कोणत्याही राष्ट्रजातीने वा राष्ट्रसमूहाने तिचा सर्वार्थाने त्याग केल्याचे दिसून येत नाही. विश्वव्यापक अशा विश्वबंधुत्वाचे आदर्श तत्त्वज्ञान जगात पसरविणाऱ्या, त्याचा प्रचार करून अखिल मानवजात सुखी नि संपन्न करणाऱ्या राष्ट्रांनाही प्रसंगी आपला प्रेषित वाद बाजूला सारून राष्ट्रवादाचीच कास धरावी लागल्याचे इतिहासात नमूद आहे. राष्ट्रवादाचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून सखोल अभ्यास करून त्याचे स्वरूप जगापुढे मांडणारे अनेक पाश्चात्य विद्वान असले तरी त्या सर्वात प्रोफेसर हॅन्स कोहन या अमेरिकन पंडिताचा या क्षेत्रातील अधिकार इतरांनी मान्य केलेला आहे.

राष्ट्रवादाचा इतिहास

आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथाचा उपोद्घात करताना श्री. कोहन यांनी थोडक्यात राष्ट्रवादाच्या विस्ताराची कल्पना पुढील शब्दात मांडलेली आहे. "आधुनिक इतिहास घडविणाऱ्या ज्या अनेक शक्ती आहेत त्यापैकी राष्ट्रवाद ही एक प्रभावी शक्ती होय. तिचा उगम पश्चिम युरोपात अठराव्या शतकात झाला. एकोणिसाव्या शतकाच्या काळात राष्ट्रवाद सर्व युरोपभर पसरला आणि विसाव्या शतकात तो विश्वव्यापी झाला. राष्ट्रवाद ही इतिहासाची निर्मिती असल्यामुळे भिन्नभिन्न देशांत त्या त्या देशातील राजकीय कल्पना आणि सामाजिक रचना यांच्या स्वरूपानुसार राष्ट्रवादाचे स्वरूपही भिन्नभिन्न असल्याचे आढळते.[५]

राष्ट्रवादी विचारसरणीचा विश्वसंचार

तेराव्या शतकातील ख्रिस्ती जगताचा अभ्यास करणाऱ्याला तत्कालीन धर्मकल्पनांच्या अभ्यासाची जशी आवश्यकता असते तशीच आधुनिक इतिहासाचा अर्थ समजावून घेण्यासाठी राष्ट्रवाद आणि त्यातील सुप्त घटकांचे परिणाम सर्वप्रथम समजावून घेण्याची आवश्यकता श्री. कोहन यांनी प्रतिपादन केलेली आहे. धर्माप्रमाणेच राष्ट्रवाद वेगवेगळ्या स्वरूपात प्रगट होऊ शकतो. क्वचित एक दुसऱ्याशी मेळ न साधणाऱ्या (परस्पर विरोधी) स्वरूपातही तो दिसून येतो. आधुनिक इतिहास घडविणारा एक महत्त्वपूर्ण घटक या नात्याने राष्ट्रवादाचे हे वैश्विक स्वरूप केवळ नवोदित स्वतंत्र राष्ट्रातच नव्हे तर पाश्चात्य राष्ट्रात व स्वतःला साम्यवादी समजणाऱ्या राष्ट्रातही दिसून येते.

पाश्चिमात्य हिब्रू व ग्रीक लोकांची धारणा

राष्ट्रवादाची संकल्पना आधुनिक असली तरी राष्ट्रवादाचे काही मूलभूत गुणविशेष फार पुरातन काळापासून अस्तित्वात असल्याचे सूक्ष्म दृष्टीने बघणाऱ्याला आढळतात. पाश्चिमात्य हिब्रू व ग्रीक लोकांमध्ये या मूलभूत गुणविशेषांचा विकास झाल्याचे दिसून येते. पाश्चिमात्य संस्कृती आणि पाश्चिमात्य राष्ट्रवाद यांची मुळे एकाच भूमीत रुजलेली आहेत असे श्री. कोहन मानतात. जगात सत्धर्माचा प्रचार करण्याचे, प्रेषितांना जन्माला घालून धर्मविषयक कल्पना त्या प्रेषितांद्वारे प्रगट

करण्याचे कार्य ईश्वराने आपल्याकडे सोपविले असल्याची एक प्रबळ भावना हिब्रू या जमातीत होती. ईश्वरी योजनेप्रमाणे जीवन जगण्याचे फळ म्हणून एक वेगळा भूप्रदेशही देण्याचे आश्वासन ईश्वराने दिले आहे अशी त्यांची श्रद्धा होती. थोडक्यात एक विशिष्ट भूप्रदेश, एक वारा टोळ्या असलेला लोकसमूह, एक विशिष्ट धर्म आणि त्या लोकसमूहाची विशिष्ट भाषा यांच्या संयोगातून हिब्रू लोकांत सहजीवनाची व त्याद्वारे एकराष्ट्र स्थापन करण्याची एक सुप्त आकांक्षा हिब्रू लोकांच्या अंतर्मनात असावी असे या वैशिष्ट्यांवरून वाटते.[१]

ग्रीक व हिब्रू या दोन्ही जमातींना आपण इतर जमातींपेक्षा अगदी वेगळे आहोत अशी स्पष्ट जाणीव असल्याचे दिसून येते. (१) ईश्वराने विशिष्ट कार्यासाठी निवडलेले लोक, (२) सामान्य भूतकाळाची जाणीव तीवरील भर व समान भविष्याची आकांक्षा, (३) जमातीचे मिसियानिझम-मध्ये म्हणजे राष्ट्रस्वरूपात रूपांतर या मूलभूत भावनांमध्येच राष्ट्रीय भावनेचे मूळ आहे.

ग्रीक लोकांमध्येही स्वसमाजाच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक श्रेष्ठतेची तीव्र जाणीव असल्याची भावना होती. ती कधी कधी प्रभावी स्वरूपात व्यक्त होत असे. या भावनेच्या जोडीला व्यक्तीने आपली निष्ठा राजकीय समूहाला वाहिली पाहिजे असा विचार जोडल्या गेला व त्यातूनच त्यांच्या नगरराज्याची निर्मिती झाली.

रोमन संस्कृतीचा उदय

ग्रीक संस्कृतीच्या ऱ्हासानंतर रोमन संस्कृती अस्तित्वात आली. तिच्या आश्रयाने बराचसा साम्राज्यविस्तार झाला. या संस्कृतीमुळे निरनिराळ्या वंशांचे, रूढींचे व आवडीनिवडीचे लोक एकत्रित आले व रोमन साम्राज्य बहुजिनसी बनले. या वेगवेगळ्या समाजाचे नियंत्रण करण्या-साठी कायदे व न्यायपद्धती अस्तित्वात आली व त्या पद्धतीचेच पुढे बऱ्याच प्रमाणात अनुकरण करण्यात आले. ऑगस्टस सिझरच्या साम्राज्यात येशू ख्रिस्त जन्माला आला व त्याने ख्रिस्ती धर्माची स्थापना केली. कान्स्टान्टाईन या सम्राटाने या नव्या धर्माचा स्वीकार केल्यामुळे त्या धर्माला चांगलीच प्रतिष्ठा मिळाली. इतक्यात गोडवेण्डाल वगैरे टोळ्यांनी हल्ले चढविल्यामुळे एवढे मोठे रोमन साम्राज्य इ. सनाच्या पाचव्या शतकात मोडकळीस आले. या साम्राज्याचे तुकडे झाल्यावर जी काही उरली सुरली राजघराणी होती त्यांनी जवळपासचे भूभाग हस्तगत करून छोटी छोटी राज्ये निर्माण केली. युगधर्माच्या प्रभावाने ख्रिस्ती लोकांतही पुढे पुढे सत्तेची लालसा निर्माण झाली व ते राज्यसंस्थांशी स्पर्धा करू लागले. यातूनच पुढे रिनेसन्सच्या युगाला सुरुवात झाली.

रिनेसन्स आणि रिफार्मेशन

रिनेसन्स् म्हणजे जुन्या विद्यांचे पुनरुज्जीवन. रिनेसन्स आणि रिफार्मेशन या पश्चिम युरोपा-तील ख्रिस्ती जगातील दोन महत्त्वाच्या आध्यात्मिक व क्रांतिकारी घटना होत. या घटनांच्या आधारेच पाश्चिमात्य जगाने मध्ययुगातून आधुनिक काळात प्रवेश केला. या दोन चळवळींमुळेच विदग्ध वाङ्मय आणि बायबलचा जुना करार तत्कालीन लोक एका निराळ्या दृष्टिकोणातून अभ्यासू लागले. या नव्या अभ्यासातूनच त्यांना राष्ट्रीय जाणिवेची बीजे गवसली असे श्री. कोहन यांचे मत आहे. ग्रीकांची राष्ट्रनिष्ठा आणि रोमन लोकांची जनतंत्रावरील निष्ठा या दोन्ही निष्ठांचे या चळ-वळीमुळे पुनरुज्जीवन घडून येऊन गतेतिहासाच्या परंपरेच्या अभिमानातून इटालियन विचारवंतांमध्ये जुन्या रोमन साम्राज्याविषयी जिव्हाळा निर्माण झाला. आपण त्यांचे वारसदार आहोत अशी भावना

निर्माण झाली. रिनेसन्सचा परिणाम म्हणून जी निधार्मिकता उदयाला आली होती ती रिफार्मेशनच्या चळवळीमुळे नष्ट झाली. इ. स. सोळाव्या-सतराव्या शतकातील युरोपियन समाजात क्रिश्चानिटी आणि संबंधित धार्मिक वादविवादाचे पेव फुटले. त्यामुळे राष्ट्रीय आदर्शाऐवजी धार्मिक संघर्षाची वाढ झाली. त्याचा एक परिणाम असा झाला की धर्मासंबंधी अश्रद्धा बाळगणाऱ्या अनेक लोकांना पाखंडी ठरवून शासन करण्यात आले. अनेकदा हद्दपार करण्यात आले. मॅकिएव्हॅलीवर पाखंडी म्हणूनच टीका झाली.

निकोलो मॅकिएव्हॅली (इ. स. १४६७ ते १५२७)

इटालीतील फ्लॉरेन्सचा राहणारा हा थोर पुरुष राष्ट्रवादाच्या नव्या विज्ञानाचा जनक म्हणून ओळखल्या जातो. याचा विश्ववादावर किंवा धर्मावर विश्वास नव्हता. धार्मिक संघर्षाच्या या काळात एकट्या मॅकिएव्हॅलीने राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. 'दि प्रिन्स' या त्याच्या मौलिक ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणात इटलीची रानटी लोकांपासून मुक्तता करणारा पुरुष निर्माण व्हावा अशी तो प्रार्थना करतो. "राष्ट्राच्या निरपेक्ष हिताचा प्रश्न उत्पन्न होतो तेव्हा न्याय वा अन्यायाचा विचार करण्याची आवश्यकता नाही. दया व क्रौर्य, प्रशंसा किंवा मानहानी यांचाही विचार करणे अप्रस्तुत आहे. इतर सर्व गोष्टी बाजूस सारून राष्ट्राने आपले स्वातंत्र्य व अस्तित्व टिकून राहील अशी कृती करावी." "सर्वांच्या हिताकरिता आवश्यक तेथे व्यक्तीने आपल्या स्वतंत्र संकल्पाचे विसर्जन केले पाहिजे" असा मॅकिएव्हॅलीचा आग्रह होता.

विद्यांच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळेच वॉयवलचे देशी भाषांत भाषांतर करण्यात आले. त्यामुळे देशी भाषांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. अशाप्रकारे रिनेसन्सचा प्रत्यक्ष राष्ट्रवादाशी संबंध आला. देशी भाषांना प्रतिष्ठा प्राप्त झाल्यामुळे दुसरा एक दृश्य परिणाम म्हणजे वाङ्मयनिर्मिती. मुद्रणकलेच्या शोधापासून वाङ्मय सर्व साधारण लोकांपर्यंत पोचले. त्याचा उपयोग राष्ट्रीय सुधारणा व राष्ट्रीय जागृतीसाठी झाला. अशाप्रकारे रिफार्मेशनचा राष्ट्रवादाशी सरळ संबंध आला असे श्री. कोहन यांनी प्रतिपादन केले आहे.[७]

राष्ट्रवाद व स्वातंत्र्याच्या भावनेचा उदय

आधुनिक राष्ट्रवादाचे पहिले प्रकट स्वरूप सोळाव्या शतकातील इंग्लंडमध्ये आढळते. महत्त्वाची गोष्ट अशी की याच शतकात इंग्लंडकडे युरोपचे पुढारीपण आले आणि वैज्ञानिक दृष्टिकोण, राजकीय विचारसरणी व व्यापार, उद्योग या आधुनिक युगाच्या विविध क्षेत्रांत ते त्याने समर्थपणे गाजविले. त्यामुळे इंग्लिश लोकांत स्वतःच्या कर्तृत्वासंबंधी दांडगा आत्मविश्वास निर्माण झाला. विशिष्ट ऐतिहासिक कार्य पार पाडण्यासाठी ईश्वराने निवडलेले लोक ही भावनादेखील या आत्म-विश्वासात निहित होती. या कालबिंदूपासूनच खऱ्या अर्थाने रिफार्मेशनच्या युगाची सुरुवात झाली, धार्मिक अधिष्ठान आणि व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना यातून इंग्लंडच्या राष्ट्रवादाचा उदय झाला.

राष्ट्रवादी पाश्चिमात्य विचारवंत

सोळाव्या शतकातील इंग्लिश राष्ट्रवाद प्रामुख्याने व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेशी बद्धमूल झाला होता. व्यक्तिस्वातंत्र्याच्या उत्स्फूर्त भावनेचे प्रकटीकरण पाश्चिमात्य महाकवी जॉन मिल्टन (१६०८ ते १६६४) या कवीने केले. "गुलामी आणि अंधश्रद्धा यातून माणसाची मुक्ती व्हावी, ... सत्य जाणून घेण्याचे, बोलण्याचे आणि सदसद्विवेक बुद्धीला स्मरून मुक्तपणे चर्चा करण्याचे स्वातंत्र्य

हवे." .... 'एरिओ पॉजिटिका' या ग्रंथात मिल्टनने अनिर्बंध मुद्रणस्वातंत्र्याचा पुरस्कार केला.[८] प्युरिटन क्रांतीचा सुप्रसिद्ध नेता ऑलिव्हर क्रॉमवेल (१५९९ ते १६५८) यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे " प्युरिटन क्रांतीने दोन महत्त्वाचे प्रश्न इतिहासाच्या प्रकाशात आणले. (१) विवेकस्वातंत्र्य (२) विषय स्वातंत्र्य आणि म्हणूनच १६५४ च्या पार्लमेंटमध्ये गर्जून घोषणा केली, " मुक्त धर्मसंस्थेकरिता मुक्त राष्ट्र हवे !" याचा अर्थ पोपच्या धार्मिक सत्तेपासून मुक्त असे राष्ट्रीय चर्च निर्माण करण्यात यावे.

जॉन लॉक (१६३२ ते १७०४) आणि जिनजेवस रुसो (१७१२ ते १७७८)

पाश्चिमात्य राष्ट्रवादाचा ऐतिहासिकदृष्टचा विचार करणाऱ्या अभ्यासकांना लॉक आणि रुसो यांच्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानाला डावलून चालावयाचे नाही इतके त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सतराव्या शतकात निर्माण झालेल्या इंग्लिश राष्ट्रवादातूनच इंग्लंडमध्ये व्यापारी व मध्यमवर्गाची निर्मिती झाली. व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तीचे अधिकार यावर भर असलेल्या या राष्ट्रवादाचे स्वरूप मानवतावादी होते. नव्या उदयाला आलेल्या दोन्ही वर्गांच्या आकांक्षाचे प्रगटीकरण जॉन लॉक याच्या तत्त्वज्ञानात आढळते. व्यक्तिव्यक्तीचे स्वातंत्र्य, तिची प्रतिष्ठा आणि सुख हे राष्ट्रजीवनाचे आधारभूत घटक होत, असे मानणारा तो विचारवंत होता. शासितांनी स्वेच्छेने स्वत:वर राज्य करण्यासाठी नैतिक अधिष्ठानाद्वारे निर्माण केलेली अधिसत्ता म्हणजे शासन संस्था होय असा त्याचा दुसरा सिद्धान्त होता. वंशपरंपरा, धर्म, भाषा व साहित्य यांच्या सामान्य परंपरांना लॉक मानत नव्हता.[९]

इंग्रजांच्या वैचारिक प्रभावामुळे युरोपात बुद्धियुगाचा प्रारंभ झाला हे आपण पाहिले. लॉक-प्रमाणेच रुसोदेखील व्यक्तिस्वातंत्र्यावर निष्ठा ठेवणारा असला तरी व्यक्तिवादाच्या मर्यादा त्याने ओळखल्या होत्या. वांशिक आणि धार्मिक सत्तेच्या विघटनामुळे राष्ट्राचे सामूहिक व्यक्तित्व स्थापित करण्याची आवश्यकता त्याला जाणवली होती. राष्ट्राच्या सामूहिक व्यक्तित्वातून समाजजीवन आणि समाजव्यवस्था यांचे संगोपन, संवर्धन व समर्थन होऊ शकेल हे त्याच्या प्रतिभेने ओळखले होते. १७६२ मध्ये त्याने जगप्रसिद्ध 'सामाजिक करार' हा ग्रंथ लिहिला. त्यात त्याने देशभक्तीने प्रेरित झालेल्या आदर्श समाजाचे चित्र रेखाटले. नागरिकांच्या ठिकाणी असलेल्या आंतरिक गुणांच्या आधारावरच राजकीय एकत्रीकरण होऊ शकते यावर रुसोचा दृढ विश्वास होता. पितृभूमीवरील अव्यभिचारी प्रेम व निष्ठा यांचे संस्कार शिक्षणाद्वारे बालकांवर केल्यास आवश्यक ते ऐक्य निर्माण होऊ शकते अशी त्याची धारणा होती.

इंग्लंडमधील घटनात्मक स्वातंत्र्यापासून प्रेरणा घेऊनच १७८९ ते १७९२ या कालात फ्रेंच राज्यक्रांती झाली. फ्रेंच विचारवंतांनी लोकांच्या देशभक्तीला आवाहन केले आणि त्यातूनच नव्या फ्रेंच राष्ट्राचा उदय झाला. या क्रांतीचा एक इष्ट परिणाम घडून आला तो असा की राष्ट्रवाद हा सर्व लोकांच्या संघटनेचा आणि स्वमताच्या अभिव्यक्तीचा प्रमुख आधार बनला. फ्रेंच राज्यक्रांतीपासूनच सामाजिक आणि धार्मिक समाजनिर्मितीचा शोध सुरू होऊन त्यातूनच राष्ट्रवादातील दोन परस्पर विरोधी अशा प्रवृत्तींचा उदय झाला. यापैकी एक प्रवृत्ती व्यक्तीच्या प्रतिष्ठेला महत्त्व देणारी तर दुसरी व्यक्तीला शत्रुवत समजून सामूहिक भावनेला महत्त्व देणारी व्यक्तिप्रतिष्ठा की सामूहिक प्रतिष्ठा यांच्यातूनच पुढे समाजवाद राष्ट्रवादाशी स्पर्धा करू लागला. त्यानंतरच्या म्हणजे विसाव्या शतकात

हिटलरीझम् आणि स्टॉलिनीझम् यात दोन गतिशील व क्रांतिप्रवण जन आवाहनांचे एकत्रीकरण घडून आले.[१०]

नवराष्ट्रवाद व युद्धांची मालिका

प्रारंभी फ्रेंच राज्यक्रांतीने विश्वशांतीचा उद्घोष मोठ्या अभिमानाने केला असला तरी क्रांतीनंतरच्या थोड्याच काळात फ्रान्समध्ये नेपोलियनची सत्ता आली. त्यातून फ्रान्स आणि शेष युरोपीय राष्ट्रे यांच्यात भयानक विनाशकारी अशा युद्धमालिकांची निर्मिती झाली. या युद्धांमुळे राष्ट्रीय भावनांची फार मोठ्या प्रमाणात निर्मिती होऊन १७६९ ते १८२३ या कालखंडात आयर्लंडपासून रशियापर्यंत आणि इटलीपासून नार्वेपर्यंत अशी दक्षिणोत्तर राष्ट्रीय भावना युरोपात पसरली. नवराष्ट्रवादाचे रोपटे सर्व युरोपभर जोमाने फोफावू लागले.[११]

'लोकात्म्याचा सिद्धान्त' मांडणारा जोहान्स जी. हर्डर : (१७४४ ते १८०३)

नेपोलियनने केलेल्या युद्धानंतर राष्ट्रवाद सर्व युरोपात पसरला हे आपण पाहिले आहे. परंतु पूर्व युरोपातील काही देश समाजरचना व राजकीय जागृती या दृष्टीने मागासलेले असल्यामुळे त्यांच्या सामाजिक पुनरुज्जीवनाचे स्वरूप राजकीय न होता सांस्कृतिक झाले. त्या देशातील कवी व विद्वान लोक नवसमाजाची स्वप्ने पाहू लागले. रुसोचा शिष्य जोहान्स जी. हर्डर हा या नव्या विद्वानांपैकीच होता. त्याने 'लोक आत्म्याचा' (folk–soul) सिद्धान्त मांडला. लोक आत्म्याचे मूळ फार पुरातन काळापासून तो आधुनिक काळापर्यंत जिवंत असलेल्या त्या त्या देशाच्या परंपरेत असल्याचे हर्डरने प्रतिपादन केले. प्रत्येक राष्ट्राची सुधारणा व संस्कृती ही त्या त्या देशाच्या वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रीय जीवनातून अभिव्यक्त होत असल्यामुळे राष्ट्रीयत्व ही केवळ राजकीय किंवा जैविक संकल्पना नसून ती प्रामुख्याने आध्यात्मिक आणि नैतिक संकल्पना आहे असे हर्डरने आपल्या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण केले.[१२]

फ्रेडरिक श्लेगेल (१७७२ ते १८२९)

हर्डरने मांडलेल्या राष्ट्रवाद आणि परंपरा यांच्या संबंधासारखेच स्वरूप फ्रेडरिक श्लेगेलने निर्माण केलेल्या जर्मन रोमँटिसिझमचे होते. जर्मन रोमँटिसिझमच्या अधिष्ठानातून एक वेगळी वैचारिक क्रांतीची लाट साऱ्या युरोपभर पसरली. त्यातून भव्योदात्त कल्पना आणि उत्कट रसरशीत भावना यावर आधारलेल्या काव्याची निर्मिती झाली. स्वतः श्लेगेल हा राष्ट्रवादी साहित्यिक असल्यामुळे पितृभूमीच्या उत्कट प्रेमाचे, तिच्या विशिष्ट प्रकृतीचे आणि ऐतिहासिक वैभवाचे मूर्तीकरण त्याने आपल्या साहित्याद्वारे केले.

जर्मन तत्त्वज्ञ हेगेल (१७७०–१८३१) व कॉन्ट (१७२४–१८०४)

सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याने राज्य ही एक दैवी कल्पना असल्याचा सिद्धान्त मांडला. राज्याच्या तुलनेत व्यक्तीचे सुखदुःख या गोष्टींना अजिबात महत्त्व नाही. व्यक्तीने राज्याला देव समजून त्याची पूजा केली पाहिजे असे हेगेलने प्रतिपादन केले. त्यामानाने कॉन्ट हा व्यक्तिवादी, उदारमतवादी आणि वैश्विक जाणिवेचा पुरस्कर्ता होता. जर्मन महाकवी गटे (१७४९–१८३२) आणि शिलर (१७५९–१८०५) या दोघांनी आपली सामाजिक पुनरुज्जीवनाची प्रेरणा पुरातन ग्रीकांच्या व्यक्तिवादातून घेतलेली होती.[१३]

अर्नेस्ट मोरिप्झ आर्नंड् (१७६९–१८६०) व फ्रेडरिक लुडविग जॉन (१७७८–१८५२)

आर्नंड् या जर्मन लेखकाने जर्मन वंशाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. जर्मन वंशाचे लोक शुद्ध रक्ताचे असून त्यांची भाषा ही शुद्ध स्वरूपाची आहे असा सिद्धान्त मांडला. या वंशश्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून जर्मन, फ्रेंच संघर्षाला सुरुवात झाली. 'जर्मन फोक्डम' या ग्रंथाचा कर्ता फ्रेडरिक लुडविग जॉनने श्रेष्ठ जर्मन लोक म्हणजे एक दैवी सर्जनशील शक्ती आहे असा सिद्धान्त मांडला. व्यक्ति-स्वातंत्र्य हा पश्चिम युरोपातील राष्ट्रवादाचा आधार तर वंशश्रेष्ठत्व व देशभक्ती हा जर्मन राष्ट्र-वादाचा आधार असल्यामुळे दोन्ही युरोपीय असूनही त्यांच्यात फारच थोडे साम्य होते असे मत श्री. कोहन यांनी व्यक्त केले आहे.[१४]

जोसेफ मॅझिनी (१८०५–१८७२)

फ्रेंच राज्यक्रांतीपासून प्रेरणा घेऊन इटली, जर्मनी आणि पोलंड या राज्यांतही क्रांतीचे उठाव झाले, परंतु जनतेच्या सामर्थ्याभावी ते अपयशी ठरले. त्यामुळे या देशांतील देशभक्तांना देशोधडीचा मार्ग स्वीकारावा लागला. स्वित्झरलंड व इंग्लंडमध्ये आश्रयाला गेलेल्या इतर देशभक्तांत सुप्रसिद्ध इटालियन देशभक्त मॅझिनीही होता. मॅझिनीला एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रवादाचा प्रातिनिधिक पुरुष मानतात. 'दि सिक्रेट ऑफ रायझिंग दि मॉसेस' म्हणजे जनतेला संघटित करण्याचे रहस्य या ग्रंथाद्वारे त्याने इटालियन लोकांना आवाहन केले. त्याने 'यंग इटली' या देशभक्तांच्या गुप्त संघटनेची स्थापना केली. मॅझिनीच्या आक्रमक आणि जहाल राष्ट्रीय विचारांचा प्रतिध्वनी केवळ युरोपातच नव्हे तर आशियाच्या टोकाला असलेल्या चीनपर्यंत पोहोचला.[१५]

राष्ट्रवाद आणि वस्तुनिष्ठ राजकारणाचा कालखंड

साम्राज्यवादातून मुक्त झालेल्या देशांत राष्ट्रवादाचा उदय

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापर्यंत रशियन, प्रशियन, ऑस्ट्रियन आणि अटोमन साम्राज्ये कोसळून त्यातून मुक्त झालेल्या देशात राष्ट्रवादाचे वारे जोराने वाहू लागले. एकोणिसाव्या शतकात बऱ्याच देशांत राजकीय क्रांत्या झाल्या. जर्मन राष्ट्राचे अपुरे राहिलेले एकत्रीकरण बिस्मार्कने पूर्ण केले. या कालखंडात मध्यम वर्गीयांची आर्थिक शक्ती वाढली. त्यांच्या स्वतंत्र राष्ट्रासंबंधीच्या आकांक्षा सफल झाल्या. इ. स. १८५२ ते १८७८ हा कालखंड युरोपियन राष्ट्रीय आकांक्षेच्या पूर्तीच्या दृष्टीने निर्णायक समजल्या जातो. हा युरोपातील वस्तुनिष्ठ राजकारणाचा कालखंड होय. या कालखंडात व त्यानंतरच्या काळात युरोपात जी राष्ट्रनिर्मिती झाली ती जनक्रांती किंवा प्रचाराच्या साधनाद्वारे न होता शासनव्यवस्था, युद्धे आणि राजकारण यांच्या साहाय्याने झाली. याच काळात राष्ट्रवादाला आर्थिक हितसंबंधाची जोड देण्यात आली. या आर्थिक घटकाचा भांडवलशाही व औद्योगीकरणाशी नजीकचा संबंध होता. त्यामुळे व्यक्तिकेंद्रित सत्ता संपुष्टात आली. अमेरिकन राष्ट्रवाद आणि आर्थिक प्रगती यांनी प्रभावित 'लिस्ट' या मुत्सद्याने आंतरराष्ट्रीय मुक्त व्यापाराच्या चळवळीला तीव्र विरोध करून राष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या सिद्धान्ताचा पुरस्कार केला व आर्थिक राष्ट्रवादाचा उदय झाला.[१६]

रशिया, चीन आणि जपान यांच्यात राष्ट्रवादाचा उदय

इ. स. १८६७ मध्ये दुसरी पॅनस्लॉव्ह सभा मास्को येथे भरली. त्या सभेत पुन्हा हिब्रू परंपरा-वादी दृष्टिकोन मांडण्यात आला. सर्व स्लॉव्हवंशीय लोकांच्या पुढारीपणाचा दावा रशियाने केला.

१९१७ मध्ये अल्पकाळाकरिता लोकशाहीच्या तोंडवळ्याचे सरकार अस्तित्वात आले. परंतु १८१८ मध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली झालेल्या जगप्रसिद्ध क्रांतीने ते संपुष्टात आले. लेनिनने रशियन 'नॅशनॉलिस्ट मेसियानिझम' चे पुनरुज्जीवन केले आणि मग रशिया सर्व मानवजातीचा तारक आहे अशी त्याने घोषणा केली.[१७]

चीनचे लोक स्वतःच्या साम्राज्याला स्वर्गीय साम्राज्य म्हणत असत. त्यामुळे इतर देश निसर्गतःच या साम्राज्याचे मांडलिक आहेत अशी चीनची धारणा होती. चीनमध्ये पुरातन धर्माधिष्ठित निरंकुश सत्ता होती. तिला धक्का देण्याचे कार्य चीनच्या राष्ट्रीय क्रांतिचळवळीने केले. या चळवळीचे पुढारीपण सन्यत्सेन (१८६६–१९२५) या पुढाऱ्याकडे होते. त्याने कुमिनटांग या नावाने प्रसिद्ध असलेल्या जनता पक्षाची स्थापना केली आणि 'सायमिनच्यू'मध्ये त्याने चिनी राष्ट्रवादाच्या विकासाच्या त्रिविध तत्त्वांची घोषणा केली. युरोपीय राष्ट्रवादाचा पुरस्कार व स्वयंनिर्णयाचा अधिकार, जनतंत्राची निर्मिती, उत्तम प्रशासनाद्वारे सर्वांच्या चरितार्थाची सोय करणे हे त्यांच्या त्रिविधसूत्राचे प्रमुख घटक होते. आधुनिक राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेली उदारमतवाद व लोकशाहीची परंपरा नसल्यामुळे पुढे चीनमध्ये दीर्घकाळ अराजक माजले त्यातून पुढे चीन हे साम्यवादी राष्ट्र निर्माण झाले. आज चीनमध्ये कम्युनिस्ट राष्ट्रवादाचा प्रभाव आहे.

चिनी साम्राज्याच्या स्वप्नाला धक्का देण्याचे कार्य सोळाव्या शतकातील 'हिदयोशी तोयोतोमी' या जपानी माणसाने केले. युद्धात रशियाचा पराभव केल्यामुळे जपानचा आत्मविश्वास वाढला होता. विसाव्या शतकात चीनचा त्याने पराभव केला. याचे कारण सांगताना जपानवर पाश्चिमात्यांच्या सनदशीर व स्वातंत्र्याच्या भावनेचा पगडा होता. पुढे दुसऱ्या महायुद्धात मात्र १९४५ मध्ये दोस्त राष्ट्रांनी 'जपान' चा पाडाव केला असला तरी जपानी लोकांच्या पराक्रमाने आशियात अनेक राष्ट्रांचा उदय झाला असे श्री. कोहन यांचे मत आहे.[१८]

आर्थर दि गॉबीन् (१८१६–१८८२) वंशवाद आणि सर्वनियंत्रणवाद

जैविक राष्ट्रवाद

विसाव्या शतकात पॅनस्लॉव्हिझमप्रमाणेच पॅनजर्मानिझमची चळवळ निर्माण होऊन पाश्चिमात्य जगातील उदारमतवादी परंपरेचा लोप झाला. पाश्चिमात्यांची राष्ट्रसंकल्पना मुळात राजकीय व व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित होती. पण पॅन चळवळीचा परिणाम असा झाला की जीवनाच्या सर्वच क्षेत्रांचे नियंत्रण करणारा टोटालिटोरियनवाद अस्तित्वात आला. जीवनात शुद्ध-रक्त हीच सर्वात महत्त्वाची गोष्ट व स्पुटॅनिक जर्मनवंश अशा शुद्ध रक्ताचा असून तो कार्यक्षम असल्यामुळे ईश्वराने त्या वंशाची निवड केली आहे' अशा स्वरूपाचे विचार गॉबीन् याने मांडले. याला गॉबिन्चा जैविक राष्ट्रवाद असे संबोधण्यात येऊ लागले.[१९]

स्वदेशहितावर आधारलेला राष्ट्रवाद

गॉबीन्ने प्रसृत केलेल्या जैविक स्वरूपाच्या राष्ट्रवादावर तसेच मानवतावादी राष्ट्रवादावर आक्षेप घेणारे दोन लेखक युरोपात पुढे आले. चार्लस मुरास (१८६४–१९५२) मॉरिस बरे (१८६२–१९२३) हे ते विचारवंत. त्यांनी एकसंघीय, एकदेशीय राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. मानवतावादी राष्ट्रवाद कालबाह्य ठरला असून भूप्रदेश किंवा देश एवढीच मर्यादा राष्ट्र या दृष्टीने मान्य केली.[२०]

फॅसिझमचा उदय म्हणजे अतिरेकी राष्ट्रवाद

आधुनिक मध्यमवर्गीय सुधारणेला विरोध करणाऱ्या सत्ताकांक्षी लोकांनी सामूहिकपणे चालविलेली राष्ट्रीय चळवळ म्हणजे फॅसिझम होय. इटलीचा जगद्विख्यात नेता बेनिटो मुसोलिनी याने मॅझिनीच्या मानवतावादी राष्ट्रवादाचा वारसा झुगारून दिला. जे जे विचार, ज्या ज्या कृती आणि ज्या ज्या भावना राष्ट्रशक्तीच्या विकासाला पोषक ठरतील त्या त्या सर्व योग्य व आचरणीय असून व्यक्तीचे सर्वोच्च कर्तव्य म्हणजे राष्ट्रसेवा, असे मुसोलिनीचे तत्त्वज्ञान होते. मॅकियाव्हेलीच्या राष्ट्रवादी विचारांचा तो वेगळा परिपाक होता. फॅसिस्ट शिक्षणपद्धतीत निरपेक्ष राष्ट्रभक्ती हेच मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारण्यात आले. अशा प्रकारे संपूर्ण एकांगी, एकदेशीय व अतिरेकी स्वरूपाचा राष्ट्रवाद अस्तित्वात आला. याच अतिरेकी राष्ट्रवादाची लागण जर्मनीत लागली. नॉझिझमच्या नावाखाली तो बावरू लागला आणि दुसऱ्या महायुद्धानंतर त्याचाही निकाल लागला हे इतिहासाला परिचित आहे.[२१]

मध्यपूर्वेतील राष्ट्रवाद

इ. स. १९१४ ते १९१९ मध्ये झालेल्या पहिल्या जागतिक महायुद्धानंतर तीन तुर्की साम्राज्ये रसातळाला गेली. त्यानंतर मुस्तफा केमालपाशाने धर्मनिरपेक्ष तुर्की राज्याची स्थापना केली. त्यानंतर इराण, अफगाणिस्तान, लिबिया, इजिप्त, सौदी अरेबिया, इराक, जार्डन, इन्डोनेशिया ही मुस्लिम राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धानंतर उदयाला आली. पुढे इस्त्रायलशी असलेल्या मुस्लिम राष्ट्रांच्या शत्रुत्वातून पॅन इस्लामची चळवळ बळावली असल्याचे आजच्या काळात दिसून येते.[२२]

ज्यू लोकांचा राष्ट्रवाद

तेराशे वर्षे परकीयांच्या सत्तेखाली दडपल्या गेलेल्या ज्यूंची झिऑनिझम ही राष्ट्रीय चळवळ इ. स. १८९७ पासून सुरू झाली. या चळवळीचा जनक थिओडोर हर्शल (१८६०–१९०४) हा होता. जेरुसलेम येथील आपल्या राहत्या घरी झिऑनिस्ट काँग्रेसची स्थापना केली व "आपल्या मातृभूमीला परतून आम्ही नवे राष्ट्र निर्माण करू," अशी घोषणा केली. हर्शलचा राष्ट्रवाद बॉविन्यूच्या जैविक राष्ट्रवादासारखा वांशिक श्रेष्ठत्वावर आधारलेला आहे. ज्यू हे कडवे राष्ट्रवादी म्हणून जगात विख्यात आहेत.[२३]

पाश्चिमात्यांच्या दृष्टिकोणातून भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास

पाश्चिमात्य देशाशी भारताचा संबंध केवळ दोन शतकांपूर्वी आला. किंबहुना साम्राज्यवाद आणि वसाहतवादाच्या नावावर युरोपने तो भारतावर लादला असे म्हणणेच युक्त दिसेल.

भारतातील नव जागृतीचे श्रेय पाश्चिमात्यांना

✓ अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात पाश्चात्यांचा प्रभाव सर्व विश्वव्यापक झाला; त्यामुळे त्याचा परिणाम आशियातील देशावरही झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पाश्चिमात्यांची राजकीय प्रणाली, त्यांचा भौतिक विकास, उदारमतवाद, त्यांचा बुद्धिवाद, आर्थिक व्यवस्था आणि स्वातंत्र्यावरील विश्वास या सर्व घटकांचा प्रभाव पौरस्त्य देशातील उच्चवर्णीयांवर पडला. त्यांच्या परंपरावादी जीवनात या प्रभावाने नवजागृतीची लाट उसळून आली. पाश्चिमात्यांचे शासकीय कौशल्य, त्यांची न्यायदानाची पद्धती, त्यांचा प्रामाणिकपणा आणि स्वातंत्र्यप्रेम या गोष्टी पौरस्त्यांनी आत्मसात केल्या. पाश्चिमात्यांची भौतिक समृद्धी, पुरोगामी विचारसरणी, साहसी व पराक्रमी वृत्ती

यामुळे पाश्चिमात्यांच्या ठिकाणी अतिरेकी स्वाभिमानाची भावना प्रकर्षाने वाढलेली असल्यामुळे ते इतरांना मागासलेले व रानटी समजू लागले. इतरांसंबंधी तुच्छतापूर्वक उद्‌गार काढू लागले. त्यामुळे पौरस्त्य लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या. ही गोष्ट मान्य केली तरी पाश्चिमात्यांच्या संबंधामुळे आणि सहवासामुळेच आशियातील लोकांत नवजागृती होण्याला मदत होऊन अखेरीस पाश्चिमात्यांच्या विस्तारवादी साम्राज्याचा अंत झाला हे आधुनिक इतिहासाला ज्ञात आहे. या ऐतिहासिक प्रक्रियेचे पुढारीपण प्रामुख्याने इंग्लंडकडे होते हे लक्षात घेतले पाहिजे.

मॅकॉलेचे भविष्य खरे ठरले

ब्रिटिश राजवटीमुळे भारतातही एक नवे पर्व सुरू झाले. भारतीयांत प्रथमच व्यक्तिस्वातंत्र्याची व स्वयंशासनाची आकांक्षा निर्माण झाली. ब्रिटिश राजवटीपूर्वी भारत या गोष्टींना परिचित नव्हता. इ. स. १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉले याने विज्ञानाधिष्ठित अशी पाश्चिमात्य शिक्षणपद्धती भारतात सुरू करावी; व त्यावरोवरच ग्रीस ते आधुनिक इंग्लंडपर्यंतचा स्वातंत्र्याचा विकास कसकसा झाला हा विषयदेखील शिकविण्यात यावा मग त्याचा ब्रिटिश राजवटीवर इष्ट वा अनिष्ट कोणताही परिणाम झाला तरी चालेल असे स्पष्टपणे इंग्रज सरकारला सुचविले. या शिक्षणविषयक सुधारणा सूचवितानाच लॉर्ड मेकॉले यांनी भारतासंबंधी एक भाकितही बोलून दाखविले. त्यांनी लिहिले, "युरोपियन विद्यांचे शिक्षण लाभल्यामुळे युरोपियन संस्थांसंबंधी भारतीयांच्या मनात तशा संस्था निर्माण करण्याची इच्छा निर्माण झाली आणि त्यांनी संस्था निर्माण करून त्यापलीकडेही त्यांनी झेप घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली तरी चालेल. असा दिवस उजाडेल किंवा नाही हे मी सांगू शकत नाही पण सुदैवाने तो तसा उजाडल्यास इंग्लंडच्या इतिहासातील तो सर्वात गौरवाचा दिवस राहील." मॅकॉलेचे ते भाकीत खरे ठरलेले आहे.

राजकीय एकतेची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय ब्रिटिश सत्तेचे

लॉर्ड मेकॉलेच्या या भविष्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी इ. स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रसभेचे पहिले अधिवेशन मुंबई येथे भरले. राष्ट्रीय सभेची स्थापना एका उदारमतवादी भारतीय सनदी 'ह्यूम' नावाच्या इंग्लिश माणसाने केली हे लक्षात ठेवले पाहिजे. राष्ट्रीय सभेचा उद्देश परस्परविरोधी अशा सर्व घटनांना संघटित करून नवराष्ट्राची सामाजिक व राजकीय उत्क्रांती घडविणे, आणि भारत व ब्रिटन यांचे संबंध अधिक वळकट करणे असा होता. आशियात प्रथमच जनतेच्या आकांक्षांना वाचा फोडण्यासाठी एक व्यासपीठ अस्तित्वात येऊन त्यामुळे वंश; वर्ण, जाती, धर्म आणि भाषा इत्यादी मतभेद मिटविण्याला त्यामुळे मदत झाली. भारतात वांशिक व जातीय विलगता चरमसीमेवर पोहोचलेली असून एका समान भाषेचाही या देशात अभाव होता. राजकीय एकतेची जाणीव या देशातील लोकांना नव्हतीच असे म्हटले तरी चालेल. ही महत्त्वाची जाणीव ब्रिटिश शासनाने व त्यांच्या शिक्षणपद्धतीने भारतीयांत निर्माण झाली.

सांसदीय पद्धतीचे बीजारोपण

काँग्रेसचे बहुसंख्य सभासद हिंदू असले तरी पहिल्या तीस वर्षांत तीन मुसलमान, चार इंग्रज व पारशी यांनी राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपद भूषविले. त्यापैकी इंग्रज माणूस दोनदा व पारशी तीनदा अध्यक्ष म्हणून निवडल्या गेला. थोड्याच दिवसांत भारत हा स्वयंशासनाला पात्र होईल आणि राष्ट्रीयसभेद्वारे एतद्देशीय लोकांत सांसदीय पद्धतीची बीजे रुजतील असे सांगूनच राष्ट्रीय सभेचे

सदस्यत्व स्वीकारण्यासाठी भारतीय जनतेला आवाहन करण्यात आले. पहिल्या अध्यक्षाने, "आपसात असलेले भेदभाव विसरुन जनतेत ऐक्य निर्माण करणे आणि देशभक्तीची भावना निर्माण करणे" हे उद्दिष्ट कथन केले.

राष्ट्रीय चळवळीचे संक्षिप्तवृत्त आणि स्वतंत्र भारताची निर्मिती

विसाव्या शतकाच्या प्रारंभी काँग्रेसचे पुढारीपण उदारमतवादी पाश्चिमात्य विचारांनी प्रभावित झालेल्या लोकांकडून मौलिक परिवर्तनवादी (रॅडिकल) भारतप्रेमी (इन्डोफिल्स) लोकांकडे आले. अशा लोकांचे पुढारी लोकमान्य टिळक होते. त्यांनी हिंदूंच्या इतिहासापासून प्रेरणा घेतली होती. त्यामुळे सनातनी विचारांच्या लोकांत अर्धधार्मिक आणि कट्टर अशी राष्ट्रभावना निर्माण करण्यात लोकमान्य टिळक यशस्वी झाले. टिळकांचेच कार्य पुढे गांधीजींनी आपल्या नेतृत्वाखाली सुरू ठेवले. गांधीजींच्या हातात राष्ट्रीय सभेची सूत्रे आल्यावर त्यांनी अहिंसेवर अधिक भर दिला. गांधीजींची स्वतःची जीवनपद्धती आणि नैतिक विचारांचे आकर्षण यामुळे ग्रामीण जनतेत विचारांची जागृती झाली. इ. स. १९३५ च्या सुधारणा कायद्याने ब्रिटिश शासनाने साम्राज्यांतर्गत घटकराज्ये हे भारताचे उद्दिष्ट राहील असे अधिकृतरीत्या घोषित केले. राष्ट्रीय सभा ही खऱ्या अर्थाने एतद्देशीय लोकांची प्रतिनिधी सभा ठरली; मात्र या सभेला प्रामुख्याने हिंदुसमाजाचे समर्थन होते. दुसऱ्या महायुद्धानंतर भारत एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. राष्ट्रीय सभेत हिंदू बहुसंख्य असले तरी मुसलमान मात्र बहुसंख्येने राष्ट्रीय सभेपासून दूरच राहिले. हिंदूपासून वेगळी अशी विभक्त मुस्लीम राज्याची मागणी करण्याचे त्यांचे धोरण होते. राष्ट्रीय सभेला विरोध करुन मुसलमानांनी मुस्लीम लीग या संस्थेची स्थापना केली आणि बॅ. जिनांच्या नेतृत्वाखाली वेगळ्या मुस्लीम राष्ट्राची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट घोषित केले. त्या घोषणेनुसार वेगळ्या मुस्लिम राष्ट्राची निर्मिती होऊन भारतातच एक 'पाकिस्तान' नावाचे इस्लामी राष्ट्र उदयाला आले. डॉ. कोहन यांनी राष्ट्रीय चळवळीचे विवेचन अत्यंत संक्षेपाने आणि स्थूलमानाने केलेले असल्याचे अभ्यासकाच्या चटकन लक्षात येते.

विश्वव्यापी राष्ट्रवाद

इ. स. १९४५ पासून पुढे इतिहासात प्रथमच सर्व मानवजातीने एकाच स्वरूपाचा दृष्टिकोण स्वीकारला असल्याचे दृश्य दिसते. या दृष्टिकोणाचा मुख्य आधारही हाच आहे. राष्ट्रवादाची निर्मिती हेच दर्शविते की सर्व जगभर लोक जागरूक आणि कार्यशील झालेले असून त्यांना नवीन समाज-रचना हवी आहे. भिन्न-भिन्न देशानुरूप राष्ट्रवादाचे स्वरूप भिन्न भिन्न आढळते या सिद्धान्तासंबंधी राष्ट्रवादी इतिहासकारांमध्ये मतैक्य आहे. त्याच बरोबर भिन्नतेचे कारण म्हणून त्या त्या देशाचा वैशिष्ट्यपूर्ण इतिहास आणि वैशिष्ट्यपूर्ण समाजरचना हे तत्त्वही बहुतेकांना मान्य असल्याचे श्री. कोहन यांचे मत आहे.[२५]

राष्ट्रवादाचा पुनश्च उद्रेक आणि राष्ट्रसंघटना

इ. स. १९६० च्या सुमारास आशिया, आफ्रिका आणि लॅटिन (दक्षिण अमेरिका) अमेरिका या खंडात राष्ट्रवादाचा प्रभाव अधिक स्पष्टपणे दिसू लागला आहे. ब्रिटनने इ. स. १९४७ मध्ये भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश आणि सिलोन यांना स्वातंत्र्य देऊन जगातील साम्राज्यवादी शक्तींना आपल्या कृतीने उदाहरण घालून दिलेले आहे असे इतिहासकारांचे मत सांगितले जाते. सत्तेचाळीस-

नंतरच्या अवघ्या दहा वर्षांच्या काळातच राष्ट्रवादाच्या गतिकारक प्रभावामुळे आशियाखंडाचा संपूर्ण नकाशाच बदलून गेल्याचे दृश्य दिसून येते. आश्चर्याची गोष्ट अशी की आंतरराष्ट्रीय विचार-प्रणालीवर आधारलेल्या व वैश्विक मानवराष्ट्राची व्यापक लोकप्रिय कल्पना उराशी बाळगणाऱ्या साम्यवादी देशांतही राष्ट्रवाद फोफावला असून त्याचे पूर्वीचे मास्को हे केन्द्रही बदलले आहे. आज प्रत्येक साम्यवादी देश आपआपल्या कल्पनेप्रमाणे साम्यवादाचा मार्ग चोखाळत आहे.

राष्ट्रसंघटनेला आलेले जबाबदार जागतिक संघटनेचे स्वरूप

आधुनिक काळात 'राष्ट्रसंघटना' ही जगातील सर्व वंश, राष्ट्र आणि विचारप्रणाली यांना एकत्र येऊन विचारविनिमय करण्याचे एक श्रेष्ठ व्यासपीठ ठरली आहे. पंचवीस तीस वर्षांतील आपल्या अस्तित्वाने 'युनो' या संघटनेने आपला जिवंतपणा आणि प्रभाव वेळोवेळी प्रदर्शित केलेला असून लीग ऑफ नेशन्सपेक्षा ती अधिक यशस्वी ठरलेली आहे. या संघटनेमुळे सर्व जगातील लहान मोठ्या, नव्या जुन्या, विकसित अविकसित, अशा राष्ट्रांना एकत्रित येऊन खुल्या दिलाने चर्चा करता येते. पाश्चिमात्य लोकसभेच्या परंपरा पाळण्यात येऊन सर्वांना मत प्रतिपादन करणे शक्य झालेले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वदूर, सर्वव्यापी जो राष्ट्रवादाचा उदय झाला त्याचे 'युनो' (राष्ट्र-संघटना) प्रतिनिधित्व करते. दुसऱ्या महायुद्धाने केवळ सर्वंकष विनाशकारी अस्त्रांचीच निर्मिती केली असे जसे म्हणता येईल तसेच या महायुद्धाने राष्ट्राराष्ट्रातील संबंधही वाढीस लागले. या सर्व गोष्टींमुळेच 'राष्ट्रसंघटनेला' एका जबाबदार जागतिक संस्थेचे स्वरूप प्राप्त झालेले आहे; असे श्री. कोहन यांनी आपले मत मांडलेले आहे.[२६]

राष्ट्रवादाचे मूळ

राष्ट्रवाद म्हणजे काय– असा प्रश्न उपस्थित करून श्री. कोहन त्याचे स्वरूप पुढील शब्दातून व्यक्त करतात. "राष्ट्रवाद ही एक मनाची अशी अवस्था आहे, की ज्या अवस्थेत व्यक्तीची सर्व निष्ठा राष्ट्राच्या ठिकाणी केंद्रित झालेली असते. स्वतःच्या जन्मभूमीविषयी प्रगाढ असा जिव्हाळा, राष्ट्रीय परंपरेविषयीचा उत्कट अभिमान आणि त्या भूमीवरील शासकीय सत्तेसंबंधीची अतीव आपुलकी या गोष्टी उण्या अधिक प्रमाणात ऐतिहासिक काळापासून नेहमीच आढळून येतात. परंतु अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत तरी आजच्या स्वरूपात आढळणारी आणि चढत्या वाढत्या प्रमाणात सामाजिक व व्यक्तिगत जीवन घडविणारी राष्ट्रवादाची भावना जगाला मान्य झालेली नव्हती. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात आणि पोलंडच्या विभाजनाच्या वेळी प्रथमच 'राष्ट्र' हा शब्द उपयोगात आला. 'देश' या शब्दाचा पर्यायवाचक म्हणूनच 'राष्ट्र' शब्द उपयोगात आला हे लक्षात ठेवले पाहिजे. आजही राष्ट्रवाद आणि देशप्रेम या दोन शब्दांच्या अर्थाची नेहमीच गल्लत केली जाते. वास्तविक 'राष्ट्र' म्हणजे जनतेतील जाणीवयुक्त कार्यशील अंश आणि लोक किंवा जनता म्हणजे सामाजिक, राजकीयदृष्टचा निष्क्रिय असलेला मानवी समूह होय."[२७]

समूहाने एकत्र जीवन जगण्याची जिवंत व कार्यक्षम इच्छा हेच राष्ट्रवादाचे मूळ

प्रत्येक राष्ट्रीय समूहाचे एक वेगळे राज्य असावे, ते त्याचे म्हणून असावे व तो संपूर्ण राष्ट्रीय समूह त्यात अंतर्भूत असावा अशी मागणी वर्तमानकाळात सतत पुढे येत आहे. भिन्न भिन्न, राष्ट्रीय समूह हे इतिहासातील जिवंतशक्तीचे परिणाम असून त्यात वारंवार बदल होत असल्यामुळे त्याचे निश्चित स्वरूप असे नसते. शिवाय हे समूह अतिशय जटिल असल्यामुळे त्यांची निश्चित परिभाषा

करणे अशक्य होऊन बसते. या समूहांपैकी बहुतेकात काही वस्तुनिष्ठ घटक आढळतात. किंवहुना या घटकांमुळेच हे समूह एकापासून दुसरे भिन्न असल्यामुळे वैशिष्टचपूर्ण असतात हे अभ्यासकांच्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. उदा. सर्वसाधारणपणे समान वंशपरंपरा, भाषा, भूप्रदेश, राजकीय एकता, धर्म इत्यादी घटकांची नावे सांगता येतील. परंतु राष्ट्रीयत्वाची काटेकोर व्याख्या करण्यास यापैकी कोणताही एकच एक घटक पुरेसा ठरत नाही. या सर्व घटकांहून अतिशय महत्त्वाचा नि आवश्यक घटक म्हणजे समूहाने एकत्र जीवन जगण्याची जिवंत व कार्यक्षम इच्छा हाच होय. Corporate will of nation हेच राष्ट्रवादाचे मूळ होय. यालाच आपण राष्ट्रवाद असे संबोधतो. ही समूहाने एकत्र जीवन जगण्याची बलवत्तर आकांक्षा राष्ट्रीय राज्याची निर्मिती करते व बहुसंख्य लोकांना [२८] प्रेरक ठरते. ही आकांक्षाही स्थलकालपरत्वे भिन्न असते हे राष्ट्रवादाच्या वर्गीकरणावरून अधिक स्पष्ट होते.

राष्ट्रवादाचे वर्गीकरण

कोणत्याही विषयाचे वर्गीकरण सामान्यपणे त्या विषयाचे स्वरूप आणि अभ्यासाची दिशा निश्चित करणारे असते. वर्गीकरण करताना अभ्यासकाने निवडलेल्या आधारावरच त्या वर्गीकरणाची मौलिकता अवलंबून असते. राष्ट्रभावना ही गतिमान कल्पना असल्यामुळे तिचे स्वरूप बहुरंगी आणि बहुढंगी आहे; त्यामुळे तिचे वर्गीकरणही विविध विषयांच्या अभ्यासकांनी विविधप्रकारे केलेले आहे.

(१) ऐतिहासिक दृष्टिकोणातून केलेले वर्गीकरण[२९]– राष्ट्रवादाचा उदय आणि विकास लक्षात घेऊन कालक्रमानुसारी पद्धतीने इतिहासकारांनी त्या त्या कालाची प्रत्येक अवस्था दाखविणारे वैशिष्टचपूर्ण वर्गीकरण केलेले आहे.

(अ) एकत्रकारी राष्ट्रवाद इ. स. १८१५ ते १८७१
(ब) वर्णनात्मक अथवा अनुकरणात्मक राष्ट्रवाद– १८७१ ते १८९७
(क) आक्रमक राष्ट्रवाद– इ. स. १९०० ते १९४५
(ड) तत्कालीन राष्ट्रवाद– इ. स. १९४५ ते १९५४

(२) कार्लटन जे. एच्. हेज यांनी केलेले वर्गीकरण–[३०] या वर्गीकरणाला हेज यांचे सुवर्ण-मध्याचे सूत्र असे नाव आहे. राष्ट्रवादामागील प्रेरणेचा आधार घेऊन हेजने हे वर्गीकरण केलेले आहे.

(अ) मानवतावादी राष्ट्रवाद, (ब) जाकोबियन राष्ट्रवाद, (क) उदारमतवादी राष्ट्रवाद, (ड) एकत्रकारी राष्ट्रवाद, (इ) आर्थिक राष्ट्रवाद.

(३) डॉ. हॅन्स कोहन यांचे मौलिक स्वरूपाचे वर्गीकरण

श्री. कोहन यांच्या वर्गीकरणाला कोहनची 'डिकॉटामी' (परस्पर विरोधी तत्त्व) असेही म्हणतात. श्री. कोहन यांनी जगातील राष्ट्रांचे गटात विभाजन केलेले आहे.

(१) पाश्चिमात्य राष्ट्रगटातील राष्ट्रवाद आणि (२) पाश्चिमात्येतर जगातील राष्ट्रवाद. राष्ट्र-वादाचे मूळ, त्याचे विशेष, त्याचा विकास आणि त्याचा विशिष्ट अर्थ या सर्व गोष्टी विशिष्ट प्रदेशाच्या दीर्घकालीन ऐतिहासिक प्रक्रियेचे फळ आहे असा श्री. कोहन यांचा सिद्धान्त आहे. देश, काल, स्थितिनिरपेक्ष राष्ट्रवाद आणि प्रदेशसापेक्ष राष्ट्रवाद हे दोन्ही एक नसून यापैकी प्रत्येक राष्ट्रवाद हा त्या त्या देशातील ऐतिहासिक परंपरा आणि राजकीय वातावरण यातून निर्माण झालेला

असल्यामुळे त्यांच्यात दोन ध्रुवांइतके अन्तर आहे. आधुनिक इतिहासाच्या घटनाक्रमाच्या संदर्भात राष्ट्रवादाचे दोन परस्परविरोधी अर्थ संभवतात असे श्री. कोहन यांनी प्रतिपादन केलेले आहे.

(१) पाश्चिमात्य देशातील राष्ट्रवादाची प्रमुख वैशिष्ट्ये

(अ) १. पाश्चिमात्य राष्ट्रवादाचे मूळ– या राष्ट्रवादाचे मूळ प्रामुख्याने राजकीय घटनेत असून ती घटना म्हणजे राष्ट्रवादाच्या उदयापूर्वी झालेली राष्ट्र–राज्याची निर्मिती. राष्ट्रवादाच्या निर्मितीपूर्वी राष्ट्र राज्य अस्तित्वात असल्याने दोहोंची निर्मिती एकाच वेळी होऊ शकली. २. नव्या विद्यांच्या पुनरुज्जीवनातून ऐतिहासिक प्रेरणा घेऊन धर्मसुधारणा, नवसमाजरचना आणि भौतिकवादी मध्यमवर्गाची निर्मिती झाली. याच मध्यमवर्गीयांच्या हातात पुढे राजकीय सत्ता आली. या नव्या वर्गाने साम्राज्यवाद, वैश्विक राज्यवाद या दोन्ही कल्पनांचा त्याग केला. देशांतर्गत महत्त्वाचे राजकीय व सामाजिक परिवर्तन होऊन त्यातून त्यांच्या राष्ट्रवादाची निर्मिती झाली.

(ब) या राष्ट्रवादाचे विशेष– १. बहुरंगी आणि मुक्तद्वार असा समाज या देशात अस्तित्वात होता. स्वातंत्र्य, घटनात्मक शासन आणि सहिष्णुता यांच्यासाठी लोकांनी केलेल्या संघर्षातून यांच्या राष्ट्रराज्याचा उदय झाला. २. कायद्यावर आधारित, स्वतंत्र नागरिकांनीयुक्त समाजाची निर्मिती करणे हा त्यांच्या राष्ट्रवादाचा हेतू होता. बुद्धिनिष्ठा, विश्ववाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य या कल्पनांशी पाश्चात्यांचा निकटचा संबंध असून मानवकल्याणाचा उदार दृष्टिकोण त्यांच्या राष्ट्रवादामागे होता. राष्ट्र ही वस्तुस्थिती आहे हे संघर्ष करणारांना मान्य होते. लोकांचा वर्ग आणि वंश कोणताही असला तरी मूलतः समतेची कल्पना मान्य आणि या सर्वच कल्पनांवर त्यांची श्रद्धा. ३. बुद्धिवादी आशावाद व नैसर्गिक कायद्याची अमर्यादता यावरील दृढविश्वास हा पाश्चात्यांचा राष्ट्रविषयक दृष्टिकोण असल्यामुळे त्यांच्या राष्ट्रवादात एक प्रकारचा आत्मविश्वास आढळतो.

४. पाश्चात्य राष्ट्रवादाचे दोन मुख्य आधार– (१) राजकीय, आर्थिकदृष्ट्या समर्थ व संपन्न असा सुशिक्षित मध्यमवर्ग आणि (२) सामाजिक लोकशाहीनिष्ठ कामगार संघटना हे या राष्ट्रवादाचे मुख्य दोन आधार.

(२) पाश्चिमात्य राष्ट्रगटाहून भिन्न अशा राष्ट्राचा राष्ट्रवाद अथवा मध्यपूर्व युरोप आणि आशियातील राष्ट्रवाद : या राष्ट्रवादाचे मूळ

(अ) १. पाश्चात्यांच्या राष्ट्रवादाची निर्मिती प्रामुख्याने राजकीय घटनेतून झाली तर पूर्वेकडील राष्ट्रवादाची सांस्कृतिक साहचर्यातून झालेली आहे असे दिसून येईल. आशियातील वा मध्यपूर्व युरोपातील राष्ट्रवाद उदयाला आला त्या वेळी या देशाची अवस्था राजकीय व सामाजिकदृष्ट्या अवनतीची होती. २. राज्याच्या सीमा व राष्ट्रीयत्वाच्या भावना यांच्यात मेळ नव्हता. अस्तित्वात असलेल्या राज्याच्या स्वरूपाविरुद्ध निषेध करण्यासाठी राष्ट्रवादाचा उदय झाला. ३. पाश्चात्य लोकांचे सांस्कृतिक साहचर्य हे या देशातील राष्ट्रवादाच्या उदयाचे एक प्रमुख कारण आहे असे म्हणता येते. परंतु या साहचर्याचा या देशांना लवकरच विसर पडला आणि आपल्या भूतकालीन वारसाचे गोडवे गाण्यात या राष्ट्रवादाने सुरुवात केली.

(ब) १. या राष्ट्रवादाची प्रमुख वैशिष्ट्ये– या देशातील लोकांच्या मनावर विश्वसाम्राज्याच्या मध्ययुगीन कल्पनेचा विलक्षण पगडा बसलेला होता. त्यावरोबरच अशाश्वत असा विश्ववादही यांनी जोपासला होता.

२. पाश्चात्यांच्या तुलनेत या देशातील समाज एकधर्म, एकराज्य या आधारे राष्ट्रनिर्मिती करणारा होता. सामूहिक सत्ता, बंदिस्त समाज, राष्ट्रीय एकता, परकीय प्रभुत्वापासून मुक्तता आणि श्रेष्ठ राष्ट्रांच्या विस्ताराची आवश्यकता असाच या देशामधील राष्ट्रवादाचा सामान्य अर्थ होता. देशांतर्गत व्यक्तिस्वातंत्र्य हा विचार त्यांच्या दृष्टीने गौण होता.

३. प्रथम या राष्ट्रवादावर पाश्चात्यांच्या राष्ट्रवादाचा प्रभाव पडला पण पुढे मात्र त्या त्या देशातील सुशिक्षित वर्गाने स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रवाद विकसित केला.

४. आदर्श पितृभूमी निर्माण करणे हेच त्यांचे उद्दिष्ट बनले. पौराणिक दंतकथा, लोककथा आणि भविष्यकाळाचे स्वप्नरंजन यांच्याशी या राष्ट्रवादाचे निकटचे नाते आहे. नियतकार्यविषयक कल्पनांना प्राधान्य देणाऱ्या भूतकाळाला साद घालणाऱ्या अ–राजकीय स्वरूपाच्या इतिहासातून जन्माला आलेल्या भावनात्मक घटकांवर या राष्ट्रवादाची उभारणी झाली आहे.

५. राष्ट्र हे राजकीय एकक (युनिट) असून सुधारणापूर्व जनैक्यभावना हा पाश्चात्येतर राष्ट्रीय संकल्पनेचा आधार राहिलेला आहे. बुद्धिनिष्ठ समाजव्यवस्थेचा अभाव, ऐक्यपोषक सामाजिक घटकांचा अभाव या देशांमध्ये असल्यामुळे लोकसमुदाय हाच त्यांनी राष्ट्रवादाचा आधार निश्चित केला. त्याला एका गूढ अशा आध्यात्मिक आदर्शाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. राष्ट्याराष्ट्रातील भिन्नतेवर आणि प्रत्येक राष्ट्राच्या स्वयंपूर्णतेवर भर देणारा हा राष्ट्रवाद होता.

६. नागरिकत्वाची पाश्चात्य कल्पना त्यांना ज्ञात नव्हती. 'लोक' या संज्ञेचा त्यांचा अर्थ अतिशय संदिग्ध होता.

७. यांच्या राष्ट्रवादाची मुळे सामाजिक व राजकीय वास्तवतेपासून भिन्न व दूर अशा भावनात्मकतेत असल्यामुळे न्यूनगंडाची भावना व आत्मविश्वासावर अभाव या राष्ट्रवादात आढळतो.

८. सामान्यजनता आणि उच्चवर्णीय लोक हाच या राष्ट्रवादाचा मुख्य आधार आहे. विकासाच्यादृष्टीने या राष्ट्रवादाचा विचार केला तर प्रारंभी हा राष्ट्रवाद बाह्य प्रेरणांवर आधारित होता. त्यानंतर मात्र त्यातून परस्परविरोधी अशा दोन प्रवाहांची निर्मिती झाली. एक प्रवाह ब्रिटिश सांसदीय संस्था, मध्यमवर्गीय लोकशाही आणि औद्योगिक क्रांती यांनी संपन्न असलेल्यांचा तर दुसरा एक मेवात्मकता या राष्ट्रीय विशेषांवर भर देऊन पाश्चात्य सुधारणा व संस्कृती यांना विरोध करणारा-पुराणमतवादी होता. राष्ट्रवादी उद्दिष्टांसाठी या दुसऱ्या प्रवाहाने इतिहासापासून प्रेरणा घेतली.[३१]

सांस्कृतिक अभिसरणाच्या क्रियेतून राष्ट्रवादाची कल्पना प्रसारित होऊ शकते

श्री. स्नॉयडर यांच्या मते श्री. कोहन यांच्या सूत्राने दोन गोष्टी स्पष्ट केल्या. पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे युरोपियन संस्कृतीच्या प्रभावाला विरोध होण्याची कारणमीमांसा स्पष्ट केली आणि दुसरी गोष्ट म्हणजे सांस्कृतिक अभिसरणाच्या क्रियेतून राष्ट्रवादाची कल्पना प्रसारित होऊ शकते; मात्र राष्ट्रवादाचा विशिष्ट अर्थ आणि स्वरूप हे जनतेच्या आशाआकांक्षावर अवलंबून असते असेही आपले मत त्यांनी मांडले. आपल्या विधानाचे स्पष्टीकरण करताना उत्तम नमुनेदार उदाहरण म्हणून भारताचा उल्लेख केलेला आहे. श्री. स्नॉयडर म्हणतात, " भारत देश हे त्याचे उत्तम व नमुनेदार उदाहरण आहे. अनेक पिढ्यांच्या पाश्चात्यांच्या सांस्कृतिक सहवासामुळे भारतीय बुद्धिवंतांनी ब्रिटिशांच्या स्वातंत्र्य आणि स्वयंशासनासंबंधीच्या कल्पना आत्मसात केल्या. त्यामुळे भारतीय मनात

एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली. ही जागृती सर्वस्वी ब्रिटिशांच्या सांस्कृतिक प्रभावाची निर्मिती होती. या जागृतीस भारतातील राष्ट्रीय चळवळीने खतपाणी घातले." ... डॉ. स्नॉयडर पुढे सांगतात, " भारतातील या नवराष्ट्रवाद्यांनी ब्रिटिशांच्या केवळ राजकीयच नव्हेतर सांस्कृतिक प्रभावालादेखील प्रखर विरोध केला. या नवराष्ट्रवाद्यांच्या मते भारतीय राष्ट्रवाद इंग्लंडच्या राष्ट्रवादाहून भिन्न असणे आवश्यक होते. परिणामी त्यांनी ब्रिटिशांच्या उदारमतवादावर भर दिला नाही. उलट त्यांनी राष्ट्रीय चालीरीती आणि भारताची श्रेष्ठ व गहन आध्यात्मिक विचारधारा यावरच अधिक भर दिला. या नवराष्ट्रवाद्यांनी भारतातील धार्मिकता, मानवजातीच्या सेवेशी संबंधित असे भारताचे नियतिनियोजित वैशिष्ट्यपूर्ण कार्यावर भर देऊन संपूर्ण विश्व (कृण्वंतो विश्वं आर्यम्) आर्य करून सोडण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली."

राज्यशास्त्रज्ञांनी केलेले वर्गीकरण– इतिहासकारांनी केलेल्या वर्गीकरणाचे स्वरूप आतापर्यंत आपण पाहिले. राज्यशास्त्राच्या दृष्टिकोणातून प्रो. मॅक्स ह्याँडमन यांनी राष्ट्रवादाचे पुढील वर्गीकरण केलेले आहे. (१) बळजबरीचा राष्ट्रवाद, (२) अस्मिताधिष्ठित राष्ट्रवाद, (३) दक्षता राष्ट्रवाद व (४) प्रतिष्ठात्मक राष्ट्रवाद. यातील पहिला इतर राष्ट्रीयत्व असणाऱ्या गटावर बंधने लादणारा, दुसरा परकीयांच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याची धडपड करणारा उदा. भारतीयांचा. तिसरा सर्वांगीण राष्ट्रहितावद्दल जागरूक असणारा आणि चवथा इतर राष्ट्रांवद्दल तुच्छतेची भावना बाळगणारा होय. तिसऱ्याचे दर्शन सर्वत्र घडते. चवथ्याचे उदाहरण म्हणून जपानचे सांगता येईल.

समाजशास्त्रज्ञांनी केलेले वर्गीकरण– राज्यशास्त्रज्ञांनी जसे राष्ट्रवादाचे राजकीय प्रवृत्ती लक्षात घेऊन वर्गीकरण केलेले आहे तसेच गटागटातील सत्तासंघर्षाचे स्वरूप लक्षात घेऊन डॉ. मॅक्सवर्थ या समाजशास्त्रज्ञाने राष्ट्रवादाचे पुढील वर्गीकरण केलेले आहे. (१) वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीतून उदयास येणारा राष्ट्रवाद, (२) विशिष्टवादी राष्ट्रवाद, (३) सीमावर्ती लोकांचा राष्ट्रवाद आणि (४) अल्पसंख्याकांचा राष्ट्रवाद. पहिला इटली जर्मनी एकत्रीकरणाच्या प्रयत्नातून उदयाला आलेला; दुसरा ज्यू अथवा निग्रो यांचा, देशोदेशीच्या सीमेवर राहणाऱ्यांचा तिसरा, व चवथा भारतातल्या अल्पसंख्याकांचा म्हणता येईल.[१२]

मानसशास्त्रज्ञांनी केलेले वर्गीकरण– समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या वर्गीकरणाप्रमाणेच समूहवर्तनावर भर देऊन मानसशास्त्रज्ञांनीही वर्गीकरण केलेले आहे. गस्टॉव्ह इक्हेझर या मानसशास्त्रज्ञाने (१) जाणीवयुक्त राष्ट्रवाद, (२) नेणीव युक्त राष्ट्रवाद असे दोन प्रकारचे वर्गीकरण केलेले आहे. विशिष्ट जीवनमूल्ये, आदर्श यांचा राष्ट्रीयत्वाच्या निर्मितीसाठी उघडपणे उच्चार, आचार आणि प्रचार जाणीवपूर्वक करणे हे पहिल्या प्रकाराचे वैशिष्ट्य, तर प्रत्यक्ष जाणीव नसली तरी प्रत्यक्ष जीवन जगताना समूहगटाने विशिष्ट पद्धतीने जीवन जगणे.[१३] हे दोन्ही प्रकार भारतीय राष्ट्रवादात आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद हे पहिल्याचे तर हिंदुसंस्कृतीवर अधिष्ठित भारतीय राष्ट्रवाद हे दुसऱ्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

ग्रिनबर्गचे पर्यावसानावर आधारित वर्गीकरण– हेजने सांगितलेले सुवर्ण मध्याचे सूत्र आधाराला घेऊन ग्रिनबर्ग या विद्वानाने राष्ट्रवादाचे अंतिम पर्यवसान लक्षात घेऊन दोन प्रकारे वर्गीकरण केलेले आहे. (१) भौतिक राष्ट्रवाद आणि (२) आध्यात्मिक राष्ट्रवाद. ज्या राष्ट्रवादाचे पर्यवसान राष्ट्रांच्या परस्पराशी द्वेष, शत्रुत्व, तिरस्कार आणि शेवटी युद्ध या स्वरूपात होते आणि परस्परांचा विनाशही

संभवतो तो भौतिकवादी राष्ट्रवाद आणि ज्यातून प्रेम, सहकार्य, सहानुभूती व बंधुत्वाची भावना वृद्धिंगत होते असा राष्ट्रवाद आध्यात्मिक राष्ट्रवाद होय.[१३]

वर्गीकरणाच्या विवेचनाचा समारोप– श्री. हेज, श्री. कोहन, श्री. ह्याँडमन, श्री. मॅक्सवर्थ, श्री. गस्टॉव्ह इक्हेझर आणि श्री. ग्रिनवर्न यांनी केलेल्या राष्ट्रवादाच्या वर्गीकरणाचे थोडक्यात स्वरूप पाहिले आहे. भारतीय राष्ट्रवादात अनेक राष्ट्रवादांचा तोंडवळा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्याला दिसून येईल. आध्यात्मिक राष्ट्रवाद, मानवतावादी राष्ट्रवाद येथे दाखविता येईल तर सशस्त्र क्रांतिकारकांचा राष्ट्रवाद जाकोबियन राष्ट्रवाद म्हणून सांगता येईल. मवाळांचा उदारमतवादी राष्ट्रवादही सांगता येईल. दादाभाई नौरोजी, न्या. रानडे व गो. कृ. गोखले यांनी आर्थिक राष्ट्रवाद मांडल्याचे दिसेल. श्री. कोहन यांचे परस्परविरोधी तत्त्वावर आधारित विवेचन अभ्यासपूर्ण आहे, मात्र भारतीय राष्ट्रवादाचे पुरेसे स्पष्टीकरण करणारे नाही. आधुनिक राजकीय, वैचारिक, बुद्धिनिष्ठ परंपरा नसलेला म्हणून मागासलेल्या, अडाणी, आत्मविश्वासशून्य लोकांचा, न्यूनगंडाची भावना असणारा हे विवेचन भारताला अन्याय करणारे आहे असे खेदाने म्हणावे लागेल. मात्र राष्ट्रवादाकडे किती विविध दृष्टिकोणांतून बघण्यात येते आणि त्यामुळे किती विविध प्रकारांनी त्याचे दर्शन घडते याची कल्पना येऊ शकते.

राष्ट्रवादाची आधुनिकता– राष्ट्रवादाचे मूळ, त्याचा इतिहास आणि विविध शास्त्रज्ञांनी त्याचे केलेले वर्गीकरण यांचा अभ्यास केल्यानंतर आता राष्ट्रवादासंबंधीच्या एका वादग्रस्त प्रश्नाचा ऊहापोह करावयाचा आहे. राष्ट्रवाद अर्वाचीन की प्राचीन ? हा तो प्रश्न असून अनेक विद्वानांनी त्यासंबंधी आपले विचार मांडलेले आहेत. राष्ट्रवादात परंपरेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. परंपरेच्या आधारावरच राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान आधारलेले आहे असे कित्येकांचे प्रतिपादन आहे परंतु आधुनिकतेचा पक्षही भरभक्कमपणे मांडणारे अभ्यासक आहेत. त्यांच्या मते आज ज्या प्रमाणात मानवी निष्ठा राष्ट्राशी निगडित आहे तशी ती पूर्वी कधीही नव्हती. भिन्नभिन्न राष्ट्रीय समूहांनी, भिन्न वंशसमूहांनी बनलेल्या साम्राज्याशी आणि त्या त्या साम्राज्यातील सामान्य सुधारणांद्वारे लाभणाऱ्या शांततेच्या अभिवचनात पूर्वीच्या मानवी निष्ठेचा उगम होता.[१५]

राष्ट्रवादाच्या युगाचा प्रारंभ होण्यापूर्वी काही ऐतिहासिक व्यक्तींनी राष्ट्रवादाशी जवळीक असणारे विचार व्यक्त केले असले तरी आपले सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय जीवन राष्ट्र या कल्पनेवर अवलंबून आहे असे त्यांना वाटत नव्हते. इतकेच नव्हे तर अठराव्या शतकापर्यंत युरोपातील सैनिक व नागरिक परकीय राज्यकर्त्यांच्या अधिसत्तेखाली प्रामाणिकपणे सेवा करण्यात धन्यता मानत असत. सांस्कृतिक जीवनाचे एक भक्कम अधिष्ठान म्हणून राष्ट्रीयत्वाकडे पाहण्याची शिक्षण, ज्ञानोपासना, चारित्र्यविकास, राष्ट्रीय कल्पनांच्याद्वारे घडविण्याची प्रवृत्तीच लोकांत नव्हती.[१६] याचा अर्थ असा की राष्ट्रीयत्वाची कल्पना ही प्राचीन नसून आधुनिक आहे असे श्री. कोहन यांनी प्रतिपादन केले आहे. 'राष्ट्र' ही आधुनिक कल्पना आहे असे कार्लटन जे. एच. हेज यांचेही मत आहे. मात्र या सर्व अभ्यासकांनी आधुनिकतेची कल्पना अगदी टोकाची वा एकांतिक म्हणून स्वीकारलेली नाही.

अनेक भारतीय लेखक राष्ट्रवादाची आधुनिकता मान्य करणारे आहेत, परंतु पाश्चात्यांप्रमाणेच आधुनिकतेचे तत्त्व मान्य करताना प्राचीन परंपरेचे सूत्र या भारतीय लेखकांनी देखील नाकारलेले नाही.

परंतु जोहान्स जी. हर्डरच्या लोकात्म्याच्या सिद्धान्तावर ज्यांची श्रद्धा आहे असे अभ्यासक राष्ट्रवाद ही आधुनिक काळाची शत-प्रतिशत निर्मिती आहे असे मानत नाहीत. लोकात्म्याचे मूळ फार पुरातन काळापासून तो आधुनिक काळापर्यंत जिवंत असलेल्या; त्या त्या देशाच्या परंपरेत' राष्ट्रवादात असल्याचे हर्डरने प्रतिपादन केलेले आहे. प्रत्येक राष्ट्राची सुधारणा व संस्कृती ही त्या त्या देशाच्या वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रीय जीवनातून अभिव्यक्त होत असल्यामुळे राष्ट्रीयत्व ही केवळ राजकीय किंवा जैविक संकल्पना नसून ती प्रामुख्याने आध्यात्मिक आणि नैतिक संकल्पना आहे असा हर्डरचा सिद्धान्त आहे.[३७]

कित्येक मानसशास्त्रज्ञ राष्ट्रजाणिवेचे मूळ मानवी प्राण्यांच्या समूह भावनेत असल्याचे सांगतात. मानवाच्या ठिकाणी असलेल्या उपजत वृत्ती आणि विचार यांनी ही समूहभावना साकार झाल्याचे प्राचीन काळापासून दिसून येते. इतरांचे अनुकरण, सूचनांचे अनुसरण, सहानुभूतीची भावना, भांडखोरपणा, सत्ता गाजविण्याची व सत्ता मान्य करण्याची इच्छा इत्यादी घटक उपजत वृत्तीत असतात. परंपरा, हितसंबंध आणि ध्येये या गोष्टी विचार या घटकात समाविष्ट होतात. राष्ट्रीय ऐक्याची आकांक्षा, राष्ट्रीय स्वातंत्र्याची आकांक्षा, राष्ट्रीय वैशिष्ट्ये जोपासण्याची आकांक्षा आणि इतर राष्ट्रांहून श्रेष्ठ असण्याची आकांक्षा हे राष्ट्रीय जाणिवेचे मुख्य घटक मानले जातात. मानवी समूहभावनेतून या सर्व घटकांची निर्मिती होत असून ही समूहभावना मानवांइतकीच पुरातन आहे. ही समूहभावनाच परस्पर हितसंबंध आणि ध्येये यांच्याद्वारे राष्ट्रसमूहभावनेत परिवर्तित होत असल्यामुळे राष्ट्रनिष्ठा ही भिन्न स्वरूपात का होईना प्राचीन काळापासून अस्तित्वात असली पाहिजे असे विद्वानांचे मत आहे. विल्यम मॅक्डुगल, जी. एम्. स्ट्रॉटम, डब्ल्यू. एरेनस्टॉईन व पिल्सबरी या मानसशास्त्रज्ञांनी थोड्याफार फरकाने असेच विचार व्यक्त केले आहेत. या सर्व विचारांचा निष्कर्ष असा की सहजप्रवृत्ती, समूहभावना, विचार, हितसंबंध, आकांक्षा व ध्येये मानवी समाजात पुरातन काळापासून असल्यामुळे वेगळ्या स्वरूपात का होईना राष्ट्रीय भावना अस्तित्वात असली पाहिजे.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचा विचार करताना प्राचीन आध्यात्मिक परंपरेचा वारसा 'मॉडर्न इंडियन पोलिटिकल थॉटस्'चे लेखक डॉ. व्ही. पी. वर्मा यांनीही मान्य केला असून त्याकरिता राजा राममोहनराय यांच्यापासून सुरुवात करून, महर्षी दयानन्द, स्वामी विवेकानन्द, स्वामी रामतीर्थ, डॉ. भगवानदास, लोकमान्य टिळक, महर्षी अरविंद आणि महात्मा गांधी या राष्ट्रीय नेत्यांच्या, विचारांचे अधिष्ठान आध्यात्मिक असल्याचे विस्तृतपणे नमूद केलेले आहे.[३८] डॉ. राधाकुमुद मुखर्जी, प्रा. न. ना. भिडे, लोकमान्य टिळक, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, म. म. बाळशास्त्री हरदास, डॉ. ना. य. डोळे, डॉ. सुरेन्द्र मीत्तल हे सर्वच विद्वान हर्डरच्या मताचा बऱ्याच अंशी पुरस्कार करणारे म्हणजे त्याची प्राचीनता मान्य करणारे आहेत.

या सर्व विवेचनाचा थोडक्यात निष्कर्ष असा की राष्ट्र ही संकल्पना जशी अर्वाचीन आहे तशीच ती प्राचीनही आहे. अर्वाचीन संकल्पनेचा आधार राजकीय आहे तर प्राचीन संकल्पनेचा आधार सांस्कृतिक आहे. स्वतःला आधुनिक समजणारेही विशिष्ट कार्याकरिता ईश्वराने निवडलेले लोक, ईश्वरांच्या संदेशाचा प्रसार करणारे लोक या सांस्कृतिक कल्पनेपासून मुक्त नाहीत. किंबहुना राष्ट्रीय अस्मितेचा विचार करताना प्रत्येक राष्ट्र स्वतःला प्राचीन समजण्यात स्वतःचा गौरव करीत असते.

' राष्ट्र ', ' राष्ट्रीयत्व ' व ' राष्ट्रीय लोक ' या संज्ञांचा अर्थ

राष्ट्रवादाचा इतिहास, राष्ट्रवादाचे वर्गीकरण, राष्ट्रवादाचे प्रकार, राष्ट्रवादाचे मूळ आणि त्याची आधुनिकता व प्राचीनता या मुद्यांचा आतापर्यंत आपण परिचय करून घेतलेला आहे. आता ' राष्ट्र ', ' राष्ट्रीयत्व ' व राष्ट्रीय लोक यासंबंधी विद्वानांनी केलेला अर्थ जाणून घेणे अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. प्रथम 'राष्ट्र' या संज्ञेचा अर्थ पाहू. आधुनिक राजकीय वाङ्मयात आजकाल हे शब्द विपुल प्रमाणात योजण्यात येतात. जगातील सर्वच भाषांत या शब्दांचे वैपुल्य आढळते. या शब्दांच्या अर्थाबद्दल मात्र विविध मतमतांतरे आहेत. इंग्रजी भाषेतील 'नेशन' (' Nation ') या शब्दाची व्युत्पत्ती पाहिली तर तीत या शब्दाचा आधुनिक अर्थ ग्रथित झाल्याचे दिसून येत नाही. नेशन या शब्दाचे मूळ 'नेशिवो' 'Natio' या लॅटिन शब्दात असून त्याचा अर्थ ट्राईब (Tribe), जन्म अथवा वंश असा आहे. वेवस्टरच्या विशाल शब्दकोशात 'नेशन' या शब्दाचे पुढील अर्थ दिलेले आहेत. कम्युनिटी, कास्ट क्लॉस, किंवा व्यवसायाने व हितसंबंधाने निर्माण झालेला वंश, वर्ग, देश, रक्ताचे नाते असणारे लोक किंवा भाषा, धर्म, परंपरा यांनी परस्परांशी संबंधित लोक, संस्था, परंपरा आणि सामाजिक ऐक्य असलेला मानवी समुदाय असे भिन्नभिन्न अर्थ दिलेले आहेत.[३९] या सर्व अर्थांतून नेमका कोणता अर्थ स्वीकारावा यासंबंधी अभ्यासकांच्या मनात संदेह निर्माण होतो. कारण ' राष्ट्र ' या शब्दासाठी दिलेल्या अर्थात ' राष्ट्रीयत्व ' या शब्दाच्या अर्थाचीही गुंतागुंत झालेली दिसते.

' दि मिनिंग ऑफ नॅशनालिझम ' या ग्रंथाचा कर्ता प्रोफेसर लुईस एल्. स्नॉयडर म्हणतो, " आपण सर्व राष्ट्रवादाच्या युगात जगणारे आहोत. अनेक ऐतिहासिक चळवळींप्रमाणेच राष्ट्रवादाची मुळे खोल अशा भूतकाळात गेलेली असून राजकीय, आर्थिक, सामाजिक, बौद्धिक आणि मानसशास्त्रीय या घटकांनी क्रमाक्रमाने राष्ट्रवाद साकार झाला आहे. क्रमाक्रमानेच त्याचे सामान्य स्वरूपही निश्चित झालेले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतून प्रथम प्रकर्षाने त्याची जाणीव झाली. अगदी प्राथमिक अवस्थेत असणाऱ्या मानवी सहज प्रवृत्तीतून राष्ट्र भावनेची निर्मिती होऊन जन्मभूमीबद्दलचे प्रेम, देशाबद्दलचे प्रेम आणि परकीयांसंबंधीची द्वेषमूलक भावना तिच्यातून प्रकट झाल्या आणि अत्यंत क्लिष्ट गोष्ट म्हणजे इतिहासाच्या प्रवाहात राष्ट्रभावनेचा अर्थ सतत बदलत गेला.[४०] त्यामुळेच शब्दकोशात एकाच संज्ञेला इतके विविध अर्थ सांगण्यात येऊ लागले असे म्हणावे लागते. म्हणूनच रॅम्सेमूर, लॉर्ड ब्राईस, सिडने हर्बर्ट व बनॉर्ड जोसेफ आदि पाश्चात्य पंडितांनी प्रांजळपणे अशी कबुली दिली आहे की ' राष्ट्र ' या शब्दाची निश्चित व्याख्या करणे दुःसाध्यच आहे.[४१]

राष्ट्राची विविध लक्षणे– ' राष्ट्र ' या शब्दाची निश्चित व्याख्या करता येत नसली तरी मानवी समूहात अस्तित्वात असलेल्या भिन्नभिन्न भेदांची लक्षणे राष्ट्रवादाचा अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य पंडितांनी केलेली आहेत.

मानवी इतिहासाच्या सुरुवातीपासून भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व्यवस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, संस्कृती व चालीरीती या सर्व गोष्टींचे जे अनेकविध संस्कार मानवी समाजावर घडून आले त्यामुळेच तो नानारंगी व विविध लक्षणांनी युक्त असा झालेला आहे. हजारो वर्षांच्या संस्कारांनी निरनिराळ्या मानवी समुच्चयांना आलेले हे वैशिष्ट्य इतके दृढमूल झाले आहे की वैशिष्ट्यविरहित अशा एखाद्या शुद्ध निर्लेप मानवाची किंवा मानव समुच्चयाची कल्पनासुद्धा करता येणार नाही. या लक्षणात वंश, भाषा, देश, धर्म, संस्कृती, इतिहास, परंपरा, शिक्षण व साहित्य, राजकीय व

आर्थिक हितैकता इत्यादी लक्षणे प्रमुख मानलेली आहेत. त्यांचाच आता क्रमाक्रमाने विचार करावयाचा आहे.

(१) राष्ट्र आणि वंश– राष्ट्राच्या संदर्भात विशिष्ट वंशाला वरेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. विशेषतः जर्मन लोकांनी या लक्षणाला विशेष प्राधान्य दिलेले आहे. सुरुवातीपासूनच जर्मन लोकांना आपल्या वंशाचा अभिमान होता. परंतु गाविन् याने जर्मनवंश श्रेष्ठ व शुद्ध रक्ताचा असून जगात काही नियत कार्य करण्यासाठीच याची निर्मिती झाली असे मत मांडले. त्यातूनच वंश श्रेष्ठत्वाचे महत्त्व अधिक वाढले. तात्त्विकदृष्टचा राष्ट्र व वंश यात भेद असून दोघांचे अर्थ भिन्न आहेत. वंश ही भौतिकशास्त्रात वापरली जाणारी संज्ञा आहे तर राष्ट्र ही समाजशास्त्रांतर्गत येणारी संज्ञा आहे. अनुवांशिकता व तद्जन्य जैविक गुणांशी वंशाचा संबंध आहे तर समाजाद्वारे परिवर्तनीय अशा सामाजिक व ऐतिहासिक गुणविशेषांचा बोध 'राष्ट्र' या संज्ञेद्वारे होतो असे पाश्चात्य विद्वानांचे मत आहे. अनेकदा 'राष्ट्र' या संज्ञेचा पर्यायवाची म्हणून वंश शब्द वापरला जात असला तरी त्यात बरीच संदिग्धता आहे. कधी कधी राष्ट्रीयत्व भाषिक किंवा समान रीतिरिवाज यांच्यामुळे एकत्र आलेल्या मानवसमूहासाठी 'वंश' या शब्दाचा उपयोग केला जातो.

मर्सेलिस वूल हा शास्त्रज्ञ म्हणतो, "वंश शब्दाने आपल्याला विशिष्ट सातत्याचा बोध होत असून त्यात प्राधान्याने नैसर्गिक रक्ताचे नाते सुचविले जाते. त्यामुळे त्याचा राष्ट्रीयत्व, रीतिरिवाज, भाषा यांच्याशी काहीही संबंध नाही." [४२] तेव्हा वंश हे राष्ट्राचे व्यवच्छेदक लक्षण म्हणता येत नाही.

(२) राष्ट्र आणि राज्य– फ्रेंच राज्यक्रांतीनंतर भिन्न देशात ज्या विविध धारणा निर्माण झाल्या. त्यामुळे 'राज्य' या संज्ञेसंबंधी अधिकच गुंतागुंत निर्माण झाली. रूसो, बेन्थाम व जेफरसन या बुद्धिवादी विद्वानांच्या विचारांचा अनुक्रमे फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिका या देशात अत्यंत प्रभाव पडल्यामुळे एका विशिष्ट भूप्रदेशावरील सार्वभौमत्वाचे राज्य हे एकक वा लक्षण समजण्यात येऊ लागले. याउलट जर्मनतत्त्वज्ञ हेगेल याने 'राज्य' या संकल्पनेचे दैवीकरण करून व्यक्तीने राज्याला देव समजून त्याची पूजा केली पाहिजे व आपल्या सर्व निष्ठा राज्याला अर्पण केल्या पाहिजेत असे एकांतिक मत मांडले. [४३]

हेराल्ड लास्कीच्या मते, 'राज्य ही एक व्यवहारोपयोगी शासनव्यवस्था होय.'[४४] डॉ. स्नायडरच्या मते, "राष्ट्र व राज्य या दोन्ही संज्ञा विशिष्ट गोष्टींच्या निदर्शक आहेत. 'राष्ट्र' या शब्दाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक गुण व्यक्त होतात तर 'राज्य' या संज्ञेत मुख्यतः वैधानिक प्रभुत्वाशी संबंध असतो." [४५] स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर ब्रिटिशांची सार्वभौम सत्ता असल्यामुळे ते राज्य होते पण ते ब्रिटिश राष्ट्र नव्हते. उलट भारतीयांच्या दृष्टीने ते राष्ट्र होते पण राष्ट्र-राज्य नव्हते. तेव्हा राज्य हे राष्ट्राचे एकच एक लक्षण होऊ शकत नाही.

(३) राष्ट्र आणि भाषा– इतिहासाप्रमाणेच भाषा ही गतिशील म्हणूनच परिवर्तनशील असते. काल आणि परिस्थितीनुसार तिच्या स्वरूपात व रचनेत बदल होत असतो. भाषा हे मानवाच्या अभिव्यक्तीचे सजीव उपकरण असल्यामुळे एखाद्या मानवी समूहाच्या प्रत्यक्ष जीवनातील वैचारिक अभिव्यक्तीशी व पद्धतीशी जुळणारे लवचिक असे स्वरूप ती धारण करते. पाश्चात्य जगात नव्या विद्यांचे पुनरुज्जीवन आणि धर्मसुधारणा या चळवळीमुळे भाषांना अधिक महत्त्व आले. कारण बायबलची इंग्लिश, जर्मन आदिभाषांत भाषांतरे झाली. ही भाषांतरे म्हणजे या नवीन विकासाचे

सूचक लक्षण समजले जात होते. मुद्रणकलेच्या शोधामुळे भाषेच्या विकासाला व लोकशिक्षणाला चालना मिळाली. जुन्या बोलींचा नाश झाला व भाषेचे स्वरूप एकजिनसी होऊन भाषेच्या आधारावर नवराष्ट्रांची निर्मिती झाली. भाषेच्या या विकासामुळेच आधुनिक राष्ट्रांत भाषापूजनाची, भाषा गौरवाची प्रवृत्ती वाढीस लागून भाषा हे राष्ट्रीय जीवनाचे प्रतीक समजल्या जाऊ लागले. आज प्रत्येक राष्ट्र आपल्या भाषेचे संरक्षण करते. केवळ भाषाशास्त्रज्ञ नव्हे तर सामान्य जनता तिच्याकडे स्वातंत्र्य, राष्ट्रीय प्रतिष्ठा, राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व, राष्ट्रीय संस्कृती व आपली वैशिष्ट्ये यांच्या अभिव्यक्तीचे प्रभावी व प्रमुख साधन म्हणून बघत असते. याशिवाय भाषेमुळे सांस्कृतिक संचित, ऐतिहासिक परंपरा, लोकस्मृती, राष्ट्राची सांस्कृतिक एकता यांचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोचविण्याचे कार्य प्रामुख्याने होत राहते. त्यामुळेच राष्ट्राची सांस्कृतिक एकता अक्षुण्ण राहते. भाषेच्या ठिकाणी असलेल्या या विविध वैशिष्ट्यांमुळेच एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रापासून वेगळे असल्याचे दिसून येते. भाषेप्रमाणेच लिपीवरदेखील राष्ट्रवादाचा परिणाम झालेला आहे.[४६] भाषा ही राष्ट्रांच्या सीमांची निश्चिती करते. भारतातही प्राचीन संस्कृत भाषेचा गौरव करण्यात येतो याचे कारण भारताचे सर्व सांस्कृतिक संचित तिच्यात साठविलेले आहे. आधुनिक भारताची एक भाषा असावी म्हणून राष्ट्रभाषा हिंदीचा आग्रह आणि देवनागरी लिपीची मागणी वारंवार केली जाते, यामागील भूमिका निश्चितच राष्ट्रीय स्वरूपाची आहे. परंतु विविध भाषा बोलणारी राष्ट्रे जगात अस्तित्वात आहेत. स्वित्झरलंड हे त्याचे उदाहरण सांगता येईल. स्पेनिश भाषा बोलणारी वीस राष्ट्रे आहेत. तेव्हा भाषा हे एकमेव लक्षण ठरू शकत नाही.

(४) राष्ट्र आणि धर्म– राष्ट्रवादाच्या युगापूर्वी 'धर्म' हीच एक प्रभावी शक्ती होती. किंबहुना राजकीय निष्ठेचे धर्म हेच अधिष्ठान होते. युरोपातील धर्मयुद्धांच्या काळात राष्ट्रवार गट अस्तित्वात नव्हते तर कॅथॉलिक अथवा सनातनी ख्रिश्चन असेच स्वतःला म्हणवीत असत. धर्म सुधारणेच्या चळवळीने धर्माचे जुने स्वरूप पालटले आणि धर्म हा राष्ट्रीय जीवनाचा एक महत्त्वाचा घटक बनून त्यातून राष्ट्रीय चर्चची कल्पना उदयास आली, हे राष्ट्रवादाचा इतिहास अभ्यासताना आपण पाहिले आहे. पुढे युरोपात विश्वव्यापी धर्मसत्ता आणि राष्ट्र यांच्यातील संघर्ष तीव्र होऊन अनेक राष्ट्रांनी सुधारलेला ख्रिश्चन धर्म म्हणून प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारला याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे हा पंथ आर्थिक व भावनात्मक गरजांशी मिळताजुळता होता. धर्मसुधारणेच्या काळात सतत होणाऱ्या युद्धांनी सुधारणेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण केला.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात बुद्धिवादाचे युग सुरू झाले व सर्वच क्षेत्रांत जागृतीची एक लाट उसळून तिचा प्रभाव अठराव्या शतकावर पडला. न्यूटन, लॉक यांच्या बुद्धिवादी वारसदारांनी निसर्ग आणि बुद्धी ही नवी केन्द्रे निर्माण केली. ईश्वरी कृपा, मुक्ती आणि नियती या जुन्या श्रद्धाकेन्द्रांचे उच्चाटन झाले. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे बुद्धिवादी लोकांनी धर्माला राजकारणापासून मुक्त केले. राष्ट्र आणि धर्म यांच्या संदर्भात डॉ. स्नॉयडरने प्रो. कोहनचे पुढील मत उद्धृत केलेले आहे. प्रो. कोहन म्हणतात, "या प्रक्रियेमुळे धर्माची खरी प्रतिष्ठा नामशेष झाली नाही उलट त्याची आध्यात्मिक शक्ती कायमच राहिली. आत्म्याला दिव्यत्व व संतोष मिळवून देण्याचे धर्माचे कार्य चालूच राहिले परंतु राजकीय जुलूम जबरदस्तीचा घटक मात्र त्यातून नाहीसा झाला. हा घटक अनेक शतके धर्मात प्रभावी होता.[४७] (त्यामुळेच कोपर्निकस गॅलिलियोसारख्या संशोधकांचा छळ

झाला.) राजकीय सत्ता आणि धर्मसत्ता असलेल्या शासनापासून संबंध तुटल्यामुळे धर्माला गौणत्व येऊन व्यक्तिगत जीवन आणि स्वयंस्फूर्तता एवढ्यापुरताच तो मर्यादित राहिला."[४८]

प्रो. कोहन यांचे हे विधान पाश्चात्य स्वतंत्र देशांच्या बाबतीत प्राधान्याने खरे आहे. सेमिटिक वंशाचे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विशेषतः ख्रिस्ती व इस्लामधर्मी लोकांचा इतिहास पाहिला तर त्यांनी राजकीय आक्रमणावरोवरच धार्मिक आक्रमणे केल्याचे दिसून येईल. या आक्रमणाच्या प्रभावाने अनेक ख्रिस्ती मुसलमान झाले, आणि अनेक मुसलमान ख्रिस्ती झाले. आफ्रिकनांच्या बाबतीत तोच प्रकार घडून आला. अनेक चिनी लोक मुसलमान व ख्रिस्ती झाले. हिंदू म्हणून ओळखले जाणारे भारतीय मात्र बहुसंख्येने मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले नाहीत. ज्यांनी धर्मांतर केले ते एक तर बलात्काराने किंवा अन्य प्रलोभनांमुळे घडून आले आहे. या खंडप्राय प्रदेशावर शतकानुशतके राजकीय व धार्मिक अशी दुहेरी आक्रमणे होत राहिली परंतु भारतीय समाजाचे स्वरूप फारसे बदलले नाही याचे मुख्य कारण म्हणजे लोकांच्या जीवनाचे अधिष्ठान धर्म हेच असल्याचे दिसून येईल.[४९] धर्म, पंथ, भाषा यांची विविधता असूनही धर्माच्या किंवा पंथाच्या नावावर युद्धे नि रक्तपात झाल्याचे इतिहासकार सांगत नाहीत. ज्या भारतीय धर्मसुधारकांनी आधुनिक विद्यांचे पुनरुज्जीवन घडवून आणून धर्मसुधारणेच्या युगाचा आरंभ केला त्यांचा आधार आध्यात्मिकच होता असे दिसून येते. पुढे धार्मिक आधारावरच भारताची फाळणी होऊन हिंदुस्थान आणि पाकिस्तान ही राष्ट्रे निर्माण झाली कारण धर्म हाच विभक्त होण्याचा आधार सांगितला गेला. म्हणून डॉ. स्नॉयडर म्हणतात, "मनुष्याच्या अंतर्मनात कुठेतरी राष्ट्र आणि धर्म या दोहोत अप्रत्यक्ष आणि सुप्त असा संबंध कायमच राहिला आहे. त्यामुळे राष्ट्रीय जाणीव काही प्रमाणात अजूनही धर्माधिष्ठित आहे. किंबहुना धर्मभावना ही राष्ट्रभावनेशी एकजीव झाली आहे. धर्मात जी गूढतत्त्वे व भावनात्मक अभिव्यक्ती आढळते तशीच ती कित्येकदा राष्ट्रवादातही दिसून येते.[५०]

(५) राष्ट्र व देश– देश म्हणजे राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अधिष्ठानभूत देह होय. माणसाचे मन हे देहाचा आधार घेतल्याशिवाय व्यवहार करू शकत नाही त्याचप्रमाणे राष्ट्रीयत्वाची भावना कोणत्या तरी देशाचा वा भूप्रदेशाचा आधार घेतल्याशिवाय व्यवहार करू शकत नाही.[५१] मानवी जीवनाला विशिष्ट आकार देणाऱ्या घटकांत भौगोलिक परिस्थितीचा वाटा आहे हे सर्वच विद्वानांना मान्य आहे. वर्ण, उंची, आकार, स्वभावविशेष आणि जीवनविषयक दृष्टिकोण यावरही भौगोलिक प्रभाव दिसून येतो असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पुरातनकाळी भौगोलिक एकता सर्वांत महत्त्वाची समजली जात असे. आधुनिक काळात भौगोलिक एकता हा राष्ट्राच्या अस्तित्वाचा केवळ एक महत्त्वाचा घटक मानला गेला असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. राष्ट्रनिर्मितीच्या कार्यातही या घटकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणूस ज्या भौगोलिक परिसरात निवास करतो, जीवन जगतो त्या परिसरासंबंधी त्याला आत्मीयता वाटणे अगदी स्वाभाविक आहे. जी गोष्ट एका व्यक्तीची तीच व्यक्तिसमूहाची असून, त्या परिसराने व्याप्त भूभागासंबंधी व्यक्तिसमूहाची आत्मीयतेची भावना निर्माण झाली की स्वराष्ट्रभावनेचा उदय होतो. त्यामुळे राष्ट्र व देश यांचा अन्योन्य संबंध आहे.[५२]

मातृभूमीच्या भावभक्तीने ओथंबलेले वाङ्मय जीत नाही अशी एकही भाषा जगात नाही. या भावनेची ज्वलंत उदाहरणे म्हणजे जोसेफ मॅझिनीने 'यंग इटली' समोर दिलेले भाषण, जर्मन

देशभक्त अर्स्ट अर्न्ट याने जर्मनीबद्दल काढलेले गौरवपूर्ण उद्‌गार, शेक्सपिअरचे इंग्लंडचे वर्णन, ज्यूंची आर्ततापूर्ण प्रार्थना अशी विविध सांगता येतील. भारत हा जगातला सर्वात प्राचीन असा देश असल्यामुळे अगदी वेदकालापासून तो आधुनिककाळापर्यंत भारतभूमीची गौरवस्तोत्रे गायिलेली आहेत. विष्णु पुराणाच्या द्वितीयांशातील तृतीय भागात पुढील श्लोक आलेले आहेत.

"अत्रापि भारतं श्रेष्ठं जम्बुद्वीपे महामुने ।
यतो कर्मभूरेषा ततोऽन्या भोगभूमया ॥२२॥
अत्र जन्म सहस्राणां सहस्रैरपि सत्तम ।
कदाचिल्लभते जन्तुर्मानुष्यं पुण्यसंचयम् ॥२३॥
गायन्ति देवाः किल गीतकानि । धन्यास्तु ये भारतभूमिभागे ॥
स्वर्गापवर्गस्यच हेतुभूते । भवन्ति भूयः पुरुषाः सुरत्वात् ॥२४॥"

याप्रमाणे अनेक अवतरणे देऊन प्राचीनांनी केलेली स्तुती वर्णन करता येईल. बंकिमचंद्रांचे 'वन्देमातरम्' रवीन्द्रनाथ ठाकूरांची "देवी भुवन मन मोहिनी नीलसिंधुजल धौत चरणतल" 'जन गण मन' ही गीते, कवि महंमद इक्बालचे 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा' अशी आधुनिक उदाहरणेही देता येईल. स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद, स्वामी रामतीर्थ यांनीही मातृभूमीचा गौरव करणारी गीते, स्तोत्रे लिहिली आहेत. इतर भारतीय भाषाभगिनींप्रमाणे मराठीतही देशभक्तीपर गीतांना वाण नाही. या गीतांवरून भूप्रदेशाचे किती महत्त्व आहे हे चटकन लक्षात येते.

राष्ट्राच्या अस्तित्वाकरिता भूप्रदेश किंवा देश हा महत्त्वाचा घटक असला तरी 'राष्ट्र' या शब्दाचा अर्थ स्पष्ट होण्यास त्याची फारशी मदत होत नाही असे विद्वानांचे मत आहे. त्यांच्या मते आज अस्तित्वात असलेल्या भूप्रदेशात कालांतराने बदल होण्याची शक्यता असते. मानवाच्या ऐतिहासिक जीवनाचा पाया भूगोल हाच असला तरी त्यावरून इतिहासातील घटनांचा प्रवाह स्पष्ट बघता येत नाही. धर्माच्या आधारावर भारतात पाकिस्तान हे दुसरे राष्ट्र निर्माण झाले ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी भूप्रदेशाचा आधार बदलला हे मान्य करावे लागते. भूप्रदेशाप्रमाणे एकधर्मही राष्ट्रवादाचा आधार होऊ शकत नाही हे पाकिस्तानपासून विभक्त होणाऱ्या 'बांगला देश' या नव्या राष्ट्राने सिद्ध केले आहे. याचा अर्थ असा की भूप्रदेश हे राष्ट्रीयत्वाचे एकमेव लक्षण ठरू शकत नाही.

ज्यू लोकांचे उदाहरण हे मानसशास्त्रीय घटकांवर अधिक भर देणारे आहे. सुमारे चार हजार वर्षांचा इतिहास असणारे यहूदी सरासरी दोन हजार वर्षे जगात भटकत होते, त्यांना स्वतःचा भूप्रदेश नव्हता तरी राष्ट्रभावना त्यांनी शेकडो वर्षे आपल्या अंतःकरणात जोपासली आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर नव्याने ज्यू राष्ट्राचा उदय झाला. तेव्हा (विशिष्ट वातावरणावरच आणि मानसशास्त्रीय घटकांवरच भूप्रदेशाचे अस्तित्व कायम राहू शकते हे मान्य केले तरी राष्ट्रीय निष्ठा या भूप्रदेशाशी घट्ट बांधलेल्या असतात हे देखील नाकारता येत नाही. तसे नसते तर यहुदी लोक जगातील भिन्न भिन्न देशांतील वास्तव्य सोडून पुन्हा नव्या इस्त्रायलमध्ये स्थायिक होण्यास गेलेच नसते.[५३])

(६) राष्ट्र आणि परंपरा– भूप्रदेशाप्रमाणेच परंपरेलाही राष्ट्रनिर्मितीच्या घटकात महत्त्वाचे स्थान आहे. प्रो. कोहन यांनी राष्ट्रीयत्वाची व्याख्या करताना हितसंबंध, हितसंबंधांचे सातत्य आणि

सेंद्रियत्व या संज्ञांचे स्पष्टीकरण करून व्याख्या दिल्या आहेत. हितसंबंध किंवा ज्याला आपण स्वार्थ म्हणतो त्याचा अर्थ व्यक्तिगत स्वार्थ असा न करता गटाचा किंवा समूहाचा सर्वसामान्य स्वार्थ असा व्यापक केला आहे. हा सामान्य स्वार्थ ऐहिक, बौद्धिक, नैतिक आणि कलात्मक ठेवा होय. या सर्वांचा समावेश हितसंबंध या संज्ञेत केलेला आहे. या हितसंबंधामुळेच सामूहिक ऐक्य शक्य होते. हितसंबंधांचे किंवा स्वार्थाचे सातत्य ही इतिहासाची जडणघडण असून प्रत्येक पिढी ही मागील पिढीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक चैतन्यमय परंपरेची वारसदार असते. उत्क्रांतीनुसार जे जीव निर्माण होतात त्यात असे चैतन्य आढळते हा त्यांचा एक विशेष असल्यामुळे ही चैतन्यमयता राष्ट्रीयत्वाने युक्त असते. त्यातून काही यंत्रणा निर्माण होऊन परिसर व समूह यांच्यामध्ये संबंध प्रस्थापित होऊ शकला... स्वार्थाचे हे प्राचीन सामूहिक स्वरूप विकसित होऊन काळाच्या ओघात त्या त्या राष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा आणि वैधानिक शासकीय आणि इतर यंत्रणा निर्माण झाल्या. या यंत्रणांद्वारेच राष्ट्र आपली उद्दिष्टे प्राप्त करू शकते असे प्रो. कोहन यांनी प्रतिपादन केलेले आहे.[५४]

डॉ. इ. हॅन वरी हॉन किन्स राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विचार करताना परंपरेसंबंधी म्हणतो की, कोणताही मानववंश जे रीतिरिवाज पाळतो किंवा ज्या विचारपद्धतींचा सातत्याने अंगीकार करतो त्यांच्या अभ्यासामधून राष्ट्रवादाचे स्वरूप कळून येण्यास साहाय्य होते....वर्तनसातत्य हे सामूहिक मनाचे एक वैशिष्ट्य आहे.[५५] याचा अर्थ असा की, राष्ट्राचा परंपरेशी अतूट संबंध आहे.

डॉ. वर्नार्ड जोसेफ या राष्ट्रवादाचा तौलनिक अभ्यास करणाऱ्या पंडिताने आपल्या ग्रंथात सिडने हरबर्टची परंपरेची महत्त्व स्पष्ट करणारी व्याख्या दिली आहे. राष्ट्र म्हणजे काय हे सांगताना हर्बर्ट म्हणतो, " a social group bound together by a consciousness of kind which springs from the tradition evoked by the group's historic past and is directly related to a definite home country."[५६]

राष्ट्रनिर्मितीत परंपरेला अत्यंत महत्व आहे. परंपरेच्या अभिमानाच्या संजीवनी मंत्रानेच मृतप्राय झालेली राष्ट्रे पुन्हा हातपाय हलवू लागली. परंपरेत राष्ट्रीय उत्थानाची प्रचंड शक्ती साठविलेली असते. कोणत्याही राष्ट्राला या परंपरेच्या मूळ स्रोतापासून फारसे दूर जाता येत नाही. अनेक उदाहरणे देऊन परंपरेचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्व स्पष्ट करता येते.

(७) वाङ्मय, शिक्षण, संस्कृती आणि राष्ट्र– राष्ट्रीयत्वाच्या घटकात असे काही घटक आहेत की जे काही बाबतीत राष्ट्रीयत्वाचे जनक असतात तर काही बाबतीत राष्ट्रीयत्वजन्य असतात. प्रसंगविशेषी कार्य व कारण अशी दोन्हीही स्वरूपे धारण करणारे राष्ट्रीयत्वाचे वाङ्मय, शिक्षण, संस्कृती व कला हे घटक होत. रूसोचा असा विश्वास होता की नागरिकांच्या आंतरिक गुणांवरच समाजाचे राजकीय एकत्रीकरण होऊ शकते. त्याकरिता पितृभूमीवरील अव्याभिचारी निष्ठा आवश्यक असल्यामुळे असे प्रेम व निष्ठा शिक्षणाद्वारे मुलांच्या मनामध्ये रुजविल्या पाहिजेत असे त्याने प्रतिपादन केलेले आहे.[५७] व्हाल्टेअर म्हणतो, " चार्ल मेग्नापेक्षा आमच्या फ्रेंच भाषेने अधिक विजय संपादन केलेले आहेत." फ्रेंच वाङ्मयाने युरोपात अद्वितीय स्थान मिळविलेले आहे आणि त्याचा परिणाम फ्रेंच राष्ट्रीयत्वाच्या दृढीकरणात झाला असे इतिहासकारांचे मत आहे. इंग्लिश लोकांच्या शिक्षणात, त्यांनी निर्माण केलेल्या पब्लिक स्कूल्समधून शिकविल्या जाणाऱ्या 'आंग्ल सभ्यतेत' इंग्रजांच्या राष्ट्रीय विकासाचे मूळ आहे असे इंग्रजांसंबंधी मोठ्या अभिमानाने सांगितले

जाते. " Waterloo was won on the playing fields of Eton " ही इंग्लिश गर्वोक्ती या दृष्टीने सार्थ आहे. तत्त्वज्ञ वा विचारवंत पाश्चात्य असो वा पौर्वात्य असो तो ' राष्ट्र ' या संज्ञेचा उपयोग सांस्कृतिक एकतेच्या संदर्भात करणे पसंत करीत असतो. समान इतिहास, समान भाषा; समान वाङ्मय, समान परंपरा, सर्वांना पूज्य वाटणारे जननायक आणि या सर्वांसंबंधी निष्ठेची भावना ' राष्ट्र ' या कल्पनेशी संबंधित सांस्कृतिक एकतेत अभिप्रेत असल्याचे सर्वांनाच मान्य आहे.

राष्ट्रीय संदर्भात संस्कृतीचे महत्त्व विशद करताना इ. रेनॉन हा फ्रेंच लेखक म्हणतो, " विशिष्ट सांस्कृतिक परंपरा ही प्रत्येक राष्ट्राचा बहुमोल ठेवा आहे. राष्ट्रीय विकासाच्या इतिहासात त्याचे महत्त्व वरेच आहे. प्रत्येक राष्ट्रवादी आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा अभिमानी असतो. आपल्या राष्ट्रात झालेले शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, धर्म संस्थापक, साहित्यिक आणि कलावंत हे अप्रत्यक्षपणे आपल्या राष्ट्राचे निर्माते आहेत असे तो समजत असतो आणि म्हणूनच आपल्या राष्ट्राच्या विशिष्ट संस्कृतीचा अभिमान हे राष्ट्राभिमानाचे एक मुख्य अंग समजले जाते."[५८]

इ. रेनॉन याचे विधान जसे पाश्चात्य राष्ट्रांच्या बाबतीत खरे आहे. तितकेच किंबहुना त्यापेक्षा काकणभर भारतासारख्या सर्वात प्राचीन देशाच्या बाबतीत अधिक खरे आहे. भारतीय संस्कृती, वाङ्मय आणि शिक्षण यांच्या राष्ट्रीय महत्त्वासंबंधी अभिप्राय व्यक्त करताना डॉ. केतकर म्हणतात, " पुढील पिढीस ज्याबद्दल अभिमान बाळगता येईल अशा गोष्टी आपल्या वाङ्मयात थोड्या थोडक्या नाहीत. ज्या विशिष्टत्वास सोडून कोणी परकीय समाजास मिळाला तर दुःख होईल अशी गोष्ट शेवटी निघते ती पूर्वजांविषयी, संस्कृत भाषेविषयी, संस्कृत ग्रंथांविषयी अभिमानाची होय. जे आपणास रक्षणीय आहे आणि जे रक्षण करता येईल अशी एवढीच गोष्ट आहे."[५९]

लोकमान्य टिळकांनी ' महाभारत ' या आर्यमहाकाव्याचे राष्ट्रीय महत्त्व स्पष्ट करताना, " राष्ट्राचा अभ्युदय होण्यास अनेक कारणे लागतात हे निर्विवाद आहे पण राष्ट्रातील सर्व लोकांस एकसमयावच्छेदेकरून आनंद, ज्ञान, ईर्षा किंवा उत्साह देणारे प्राचीन महाकाव्यासारखे दुसरे साधन मिळणे कठीण"[६०] असे उद्गार काढले ते यथार्थ मानावे लागतील. म्हणूनच पारतंत्र्याच्या काळात राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय साहित्य, राष्ट्रीय संस्कृती या शब्दांचा वारंवार उपयोग करण्यात आला व त्यांची निर्मिती करण्याचे बुद्धिपुरस्सर प्रयत्न झाले हे विसरता येत नाही. मात्र यांना भाषा, धर्म परंपरा, भूप्रदेश यांच्याइतकेच एक महत्त्वाचा घटक म्हणून महत्त्व द्यावे किंवा नाही यासंबंधी विविध मतमतांतरे आहेत. पण त्यांचे एक प्रभावी घटक या नात्याने महत्त्व नाकारता येत नाही; कारण शिक्षण आणि संस्कृती यांचे अभिसरण करण्याचे वाङ्मय हे महत्त्वाचे साधन आहे.

(८) राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची जाणीव (National consciousness)

राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेलाच ' will to be a nation ' असेही पाश्चात्य पंडित नाव देतात. राष्ट्रीयत्वाच्या विविध लक्षणांतील एक महत्त्वाचे लक्षण म्हणून अनेक पाश्चात्य विद्वानांनी या जाणिवेला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. राष्ट्रीय जाणीव ही राष्ट्रीय ऐक्याची द्योतक आहे. वरीच लहान लहान राज्ये एकत्र करून इटली हे राष्ट्र निर्माण झाले. प्रिन्स बिस्मार्कने अनेक संस्थानांचे एकत्रीकरण करून बलशाली अशा जर्मन राष्ट्राची निर्मिती केली.[६१] जगातील अनेक राष्ट्रांच्या बाबतीत या ऐक्यजाणिवेने कार्यभाग साधला आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या जाणिवेसंबंधी हर्बर्ट स्पेन्सर हा समाजशास्त्रज्ञ म्हणतो, " समाजामुळे सहकार्य शक्य होते आणि सहकार्यामुळे समाज अस्तित्वात

येतो. समाज निर्माण होण्याकरिता ऐक्यभावनेची इच्छा असणाऱ्या लोकांची गरज असते; आणि या ऐक्यामुळे जे लाभ होतात त्यामुळे लोक एकत्र येतात."[१२]

जागतिक कीर्तीच्या मानसशास्त्रज्ञांनी सखोल अध्ययन आणि विविध प्रयोग करून 'आम्ही' (we) या भावनेसंबंधी काही मौलिक निष्कर्ष काढलेले आहेत. त्यांच्या दृष्टीने राष्ट्रीयत्व ही धर्मजन्य अवस्थेप्रमाणेच एक मानसशास्त्रीय व व्यक्तिनिष्ठ अशी मनाची अवस्था आहे. राष्ट्रीयत्व हा एक आध्यात्मिक ठेवा, एकभावानुभव, एक विचारप्रणाली आणि जीवन जगण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती आहे. सामूहिक जीवन, सामूहिक संबंध आणि सामूहिक स्वाभिमानाशी ही भावना निगडित आहे. मानसशास्त्रीयदृष्टीने राष्ट्रवादाचा सखोल व्यासंग करणारा डॉ. पिल्सबरी म्हणतो की, " राष्ट्र म्हणजे असा लोक समूह की ज्यात एकत्वाची प्रबळ भावना असून जो सामूहिक भावनांचा अनुभव घेऊ शकतो. [१३] बर्नार्ड सी. एबर हा मानसशास्त्रज्ञ म्हणतो, "कोणताही असा लोकसमूह की जो स्वत:ला एक मानतो आणि ज्यात राजकीय एकतेची सामान्य भावना अवश्य असते त्यालाच राष्ट्र असे म्हणतात."[१४]

मानसशास्त्रज्ञांनी व्यक्त केलेली ही विविध मते लक्षात घेतली म्हणजे राष्ट्रनिर्मितीत 'आम्ही' (we) या भावनेचे किती महत्त्व आहे ते चटकन लक्षात आल्याशिवाय राहत नाही. अनेकदा शत्रुवत व संकटमय भासणाऱ्या जगात मानवाला असुरक्षितता जाणवते. ही असुरक्षितता 'आम्ही' (we) या भावनेमुळे नाहीशी होते. त्यामुळे तिचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. सुरक्षिततेच्या भावनेमुळेच व्यक्ती कुटुंबसंबंधाला घट्ट पकडून ठेवते. कुटुंब हा एक लहान सामाजिक गट आहे. व्यक्तीची कुटुंबाशी जशी बांधिलकी असते तशीच व्यक्तीची राष्ट्राशी बांधिलकी असते; त्यामुळे इतर राष्ट्रांकडून होणाऱ्या खऱ्या किंवा काल्पनिक आघातापासून संरक्षण लाभावे याकरिता व्यक्ती राष्ट्राशी एकजीव होत असते.

भारतीय विचारवंतांचा 'आम्ही' या जाणिवेसंबंधीचा विचार

भारतीयांनीदेखील 'आम्ही' (we) या राष्ट्रीय जाणिवेचा सखोल विचार केलेला आहे. या संदर्भात लोकमान्य टिळक म्हणतात, " स्वत्व हेच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा मूळ पाया असून या स्वत्वाच्या सीमेचा परिच्छेद ठरविण हे काम महत्त्वाचे आहे. ... एकपक्षी दुरान्वित लोक वगळून अलीकडे येऊ लागले असता व दुसरेपक्षी आपण व आपले कुटुंब व आपला समाज अशा रीतीने आपली स्वत्वबुद्धी विस्तृत करीत गेले असता राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या परिच्छेदाची बरोबर रेषा कोठेतरी सापडलीच पाहिजे."[१५] या टिळकांच्या विवेचनावरून हे सहज उमगेल की, आपण लोक म्हणजे अमके अशी स्वत्व बुद्धी असल्यावाचून राष्ट्र या नावाला काही अर्थ उरत नाही. आपुलकीची ही राष्ट्रीय मर्यादा ठरली म्हणजे तिच्या बाहेरचे इतर लोकसमुदाय परक्यांमध्ये मोडतात.

आतापर्यंत केलेल्या विवेचनाचा थोडक्यात निष्कर्ष असा की राष्ट्रनिर्मितीला राष्ट्रीयत्वाची 'आम्ही' (we) ही जाणीव हे एक महत्त्वाचे लक्षण म्हणून बहुतेक विद्वानांना मान्य आहे.

(९) राष्ट्र आणि प्रशासन व आर्थिक हितैकता– राज्यशासन वा प्रशासन आणि राष्ट्रीयत्व यात अभिन्नत्व मानणारे अनेक पाश्चात्यपंडित आहेत. याचे मुख्य कारण असे की युरोपात जेव्हा राष्ट्रे निर्माण झाली तेव्हा साधारणपणे राज्यांच्या मर्यादांप्रमाणे राष्ट्रांच्या मर्यादाही अस्तित्वात आल्या तशीच विशिष्ट शासनव्यवस्थाही निर्माण झाली. या शासनव्यवस्थेने राष्ट्रीयत्वाची प्रतिष्ठा

वाढविण्याचा सहेतुक उपक्रम केला. त्यामुळे राष्ट्र आणि राज्यशासन यांना एकच समजण्यात येऊ लागले. परंतु राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी तसेच शासनव्यवस्था वेगळी असताही राष्ट्रीयत्वाची भावना अस्तित्वात असल्याचे अनेक अभ्यासकांना मान्य आहे. प्रशासनाचा उपयोग असलेले राष्ट्रीयत्व अधिक स्थायी, प्रखर आणि बलवान बनविण्याकडे झालेला असला तरी राज्यशासन हे राष्ट्रीयत्वाचे महत्त्वाचे लक्षण ठरू शकत नाही हेच मत अनेक विचारवंतांची दिलेले आहे. राष्ट्रनिर्मितीला शासन-व्यवस्थेचा बराच उपयोग होऊ शकतो हे निःसंशय खरे आहे.[११]

प्रशासनाप्रमाणेच आर्थिक हितैकता राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्याला अतिशय उपयुक्त असे कारक आहे हे विसरता येत नाही. कोणत्याही सामूहिक जीवनात आर्थिक हितसंबंधांना अतिशय महत्त्वाचे स्थान असल्यामुळे त्याच अस्तित्व विसरता येत नाही. यामुळेच आर्थिक राष्ट्रवादाचा विद्वानांनी स्वतंत्रपणे अभ्यास केल्याचे आपल्याला आढळून येते. इंग्लंडची अर्थव्यवस्था, अमेरिकन राष्ट्रवाद व आर्थिक प्रगती यांनी प्रभावित होऊन 'लिस्ट' या पाश्चात्य मुत्सद्याने आंतरराष्ट्रीय मुक्त व्यापाराच्या चळवळीला तीव्र विरोध करून राष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या सिद्धान्ताचा पुरस्कार केल्याचे मागे नमूद केलेच आहे. इंग्लंडच्या ॲडाम स्मिथ आणि जीन बॉप्टिस्ट या दोन अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्रीय राष्ट्रवादाचा जोरदार पुरस्कार केला. 'दि वेल्थ ऑफ नेशन' या ॲडाम स्मिथच्या ग्रंथाची पहिली आवृत्ती इ. स. १७७६ मध्येच प्रसिद्ध झाली होती. शांततेच्या काळी राष्ट्रात सुरक्षिततेची भावना कायम ठेवणे आणि युद्धकाळी स्वयंपूर्णता राखून देशाचे रक्षण करणे हे या आर्थिक राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान आहे. प्रो. टाइन्वी हा तर आर्थिक हितैकता व राष्ट्रीयत्व एकमेकास सोडून असूच शकत नाही असे मानतो. त्यामुळे आर्थिकहितैकता राष्ट्रीयत्व उत्पन्न करणारा एक आवश्यक व महत्त्वाचा घटक आहे असे म्हणता येते.[१७]

(१०) राष्ट्र व परकीय आक्रमणे, परकीयांनी केलेले छळ– आतापर्यंत अभ्यासलेल्या वंश, भाषा, धर्म, भूप्रदेश, परंपरा इत्यादी घटकांप्रमाणेच परकीय आक्रमण हा राष्ट्रनिर्मितीला कारणीभूत ठरणारा एक महत्त्वाचा घटक आहे. परकीयांच्या आक्रमणांमुळे नसलेले राष्ट्रीयत्व निर्माण होते तसेच सुप्त असलेले राष्ट्रीयत्व उफाळून वर येते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात परकीय आक्रमणामुळेच त्यांचे राष्ट्रीयत्व प्रकट झाले. मूर लोकांच्या स्वाऱ्यांमुळेचस्पॅनिश लोकांचे राष्ट्रीयत्व उज्ज्वल बनले. नेपोलियनच्या जर्मनीवरील आक्रमणानेच जर्मनांना राष्ट्रीयत्वाचा ठेवा गवसला. भारताच्या संदर्भात तर या घटकाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.[१८] भारत हे सर्वात पुरातन राष्ट्र असल्यामुळे पुरातन काळापासून परकीय आक्रमणांना सतत तोंड देण्याचे कार्य भारताला करावे लागले आहे. किंबहुना शतकानुशतके परकीयांशी केलेल्या संघर्षामुळेच भारत टिकून राहिलेला आहे. जगण्यासाठी संघर्ष हे उत्क्रांतिवादाचे महत्त्वाचे तत्त्व हिंदुस्थानच्या बाबतीतही खरे आहे.

डॉ. केतकरही असाच अभिप्राय देतात. "आपल्या रुचीला न आवडणारी अथवा आपल्या स्वाभिमानास कमीपणा आणणारी अशी गोष्ट आपल्याला कबूल केली पाहिजे. ती ही की आपल्या समाजाचे दृढीकरण करण्याच्या बाबतीत फार महत्त्वाचे कार्य एका परकीय सत्तेने केले आहे."[१९]

आचार्य जावडेकर म्हणतात, "आधुनिक भारतीय राष्ट्रवाद हा परतंत्र राष्ट्रांत निर्माण झाला. त्याचे ध्येय आपल्या राष्ट्राचे वैभव वाढविण्यासाठी साम्राज्यप्रस्थापना करणे हे नसून परकीय समाजापासून त्याची मुक्तता करणे हे प्रथमपासून आतापर्यंत होते. हिंदुस्थानात या काळात वेदान्ताचे

जे पुनरुज्जीवन झाले ते प्रस्थापित राजसत्तेचे समर्थन करण्याच्या बुद्धीतून झालेले नसून प्रस्थापित राजसत्ता उलथून पाडून स्वराज्यसंस्थापना करण्याच्या प्रयत्नास चालना देण्याच्या बुद्धीने झालेले आहे."[७०]

श्री. य. कोल्हटकरांनी असेच मत व्यक्त केलेले आहे. जुलूम आणि छळ यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना अधिक प्रवळ, अधिक वलिष्ठ आणि अधिक प्रखर होऊन ती ऐक्यवर्धनाला पोषक ठरलेली आहे. थोडक्यात निष्कर्ष असा की परकीयांची आक्रमणे नि छळ राष्ट्रनिर्मितीला प्रेरक असा महत्त्वपूर्ण घटक आहे हे मान्य करावे लागते.

' राष्ट्रांसंबंधी केलेल्या काही व्याख्यांचा परामर्श '

राष्ट्रवादाच्या विचारप्रणालीचे वस्तुनिष्ठ दर्शन घडविण्याच्या दृष्टीने आतापर्यंत राष्ट्रवादाशी संबंधित प्रमुख मुद्यांचे विवेचन करण्याचा मी प्रयत्न केला आहे. राष्ट्रवादाच्या इतिहासाचे विहंगमावलोकन करून निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी केलेल्या राष्ट्रवादाच्या वर्गीकरणाचे स्वरूप पाहिले आहे. राष्ट्र, राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रवाद या संज्ञांचे कोशकर्त्यांनी दिलेले विविध अर्थ आणि कालाच्या प्रवाहात त्यात झालेली स्थित्यंतरेही लक्षात घेतलेली आहेत. त्यानंतर राष्ट्रवादाच्या कल्पनेचे मूळ शोधण्याचा निरनिराळ्या विद्वानांनी केलेला प्रयत्न लक्षात घेऊन त्याबाबतीत त्यांच्या मतांचेही विवेचन केलेले आहे. राष्ट्रवादाची आधुनिकता आणि प्राचीनता यासंबंधी अभ्यासकांचा दृष्टिकोन लक्षात घेतल्यानंतर राष्ट्रीयत्वाचे प्रमुख कारक कोणते ? त्यांचे राष्ट्रनिर्मितीत स्थान व महत्त्व काय ? यासंबंधीची साधकबाधक चर्चा प्रमुख ग्रंथकारांच्या आधारे केलेली आहे. एवढ्या विवेचनानंतर राष्ट्रवादाचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांनी राष्ट्रासंबंधी केलेल्या काही व्याख्यांचा थोडक्यात परामर्श घेण्याचे ठरविले आहे.

तार्किक विचारात कोणत्याही वस्तूची व्याख्या करणे हे सोपे कार्य नाही. अनुगुण आणि व्याप्ती या घटकांना प्राधान्य देऊन प्रामुख्याने व्याख्या केली जात असली तरी अनेकदा व्यवच्छेदक लक्षण दृष्टिआड होते तर कधी कधी अव्याप्ती, अतिव्याप्ती असले दोष घडण्याची शक्यता असते. कोणताही शास्त्रज्ञ व्यवच्छेदक लक्षण आणि व्याप्ती याबाबतीत येणारे दोष टाळण्याचा प्रयत्न करीत असला व आपली व्याख्या निर्दोष, समावेशक व परिपूर्ण व्हावी असा त्याचा प्रयत्न असला तरी तो शतप्रतिशत यशस्वी होईलच याची शाश्वती देता येत नाही. या सर्व मर्यादा लक्षात घेऊन पाश्चात्य ग्रंथकारांनी केलेल्या व्याख्यांचा अनुवाद करताना काटेकोर अर्थपूर्ण शब्द योजनेपेक्षाही लेखकाच्या आशयालाच प्राधान्य देण्याचे ठरविलेले आहे. विशिष्ट व्याख्येत राष्ट्रीयत्वाच्या कोणत्या घटकांवर लेखकाचा भर आहे एवढेच त्यातून समजावून घ्यावयाचे आहे. प्रथम पाश्चात्य पंडितांनी 'राष्ट्र' या संकल्पनेसंबंधी केलेल्या व्याख्या पाहू.

सुप्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार अर्नेस्ट बार्कर राष्ट्राची समावेशक व्याख्या करताना म्हणतो, " राष्ट्र म्हणजे असा लोकसमूह की जो अनेक वंशांचा बनलेला असून ज्याच्याजवळ इतिहासाच्या कालौघात प्राप्त झालेला भावनांचा व विचारांचा सर्वसामान्य ठेवा असून जो एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करतो, विचारधनासोबतच स्वतःची अशी धार्मिक श्रद्धाही त्याच्या ठिकाणी असते आणि भावना, विचार, श्रद्धा यांच्या अभिव्यक्तीसाठी सामान्यपणे जो एकाच भाषेचा उपयोग करतो, तसेच भविष्यकालीन जीवनासंबंधी एक सामान्य आकांक्षा बाळगतो व राज्य हे त्याच्या आकांक्षेचे प्रकट स्वरूप असते."[७१]

जवळजवळ सर्वच महत्त्वाचे घटक बार्करच्या व्याख्येत आलेले असले तरी त्याचा मुख्य भर समान ऐतिहासिक परंपरेवर असल्याचे दिसून येते.

सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक अर्नेस्ट रेनॉन म्हणतो, "राष्ट्र हे एक भव्य संघटन असून त्यागातून त्याची रचना झालेली असते. पूर्वी केलेल्या त्यागाप्रमाणेच प्रसंग पडल्यास पुन्हा लोक त्यागाला सिद्ध असतात. राष्ट्र या शब्दामागे भूतकाळ अभिप्रेत असून वर्तमानकाळी दृश्य कृतीद्वारे राष्ट्र स्वतःचे नवीनीकरण करीत असते. आपले वैशिष्ट्यपूर्ण जातीय जीवन सातत्याने जगण्याची इच्छा, ती इच्छा व्यक्त करण्याची क्रियाशीलता व तिच्याद्वारे प्रतिदिन होणारे जनमताचे प्रदर्शन म्हणजेच राष्ट्र होय.[७२]

ऐतिहासिक परंपरेचे सातत्य आणि हे पारंपरिक सातत्य टिकविण्याच्या इच्छेतून घडविले जाणारे क्रियात्मक जीवन आणि त्याकरिता त्याग करण्याची तयारी या महत्त्वाच्या घटकांना रेनॉनने प्राधान्य दिलेले आहे.

दुसऱ्या एका व्याख्येत रेनॉन म्हणतो, " राष्ट्र म्हणजे अनेक आत्म्यांची एकता निर्माण करणारे आध्यात्मिक तत्त्व होय. या तत्त्वाच्या दोन सलग बाजू असून एकीचे भूतकाळात तर दुसरीचे वर्तमानकाळात अस्तित्व असते. पहिल्यात समृद्ध परंपरेची सामायिक स्मृतिरूप संपत्ती असते तर दुसऱ्यात सहजीवनाची प्रत्यक्ष तीव्र इच्छा असते. त्यावरोवर त्या इच्छेला मान्यता देऊन आपला जो सामान्य वारसा आहे त्याचा महत्तम लाभ घेण्याची आकांक्षाही त्या लोकसमूहात असते. .... ज्याला आपण विशिष्ट लोक म्हणतो त्याला राष्ट्र या घटकात सर्वोपरि प्राधान्य आहे.[७३]

कट्टर राष्ट्रवादी जर्मन राज्यशास्त्रज्ञ फ्रॉन्सिस लॉयवर आपल्या सुप्रसिद्ध व्याख्येत म्हणतो, ' भटक्या अवस्थेतून बाहेर पडलेला, सातत्याने एका सलग, सीमावद्ध निश्चित तसेच विशिष्ट नामांकित भूप्रदेशात वास्तव्य करणारा, त्या भूभागाकरिता श्रमणारा, स्वतःची भाषा असणारा आणि त्या भाषेतून साहित्यनिर्मिती करणारा, किमान लोकसंख्या असणारा, इतर समाजांहून भिन्न अशा सामान्य संस्था असलेला, समान भविष्यासंबंधी सामान्य आकांक्षा बाळगणारा, विशिष्ट सजीवतेने युक्त, बौद्धिक, राजकीय व आंतरिक एकता यांनीयुक्त पण इतर जनसमूहापासून वेगळा असा एकजिनसी लोकसमूह म्हणजे राष्ट्र होय.[७४]

आधुनिक अर्थाने ' राष्ट्र ' या संकल्पनेच्या सर्व लक्षणांनी युक्त अशी ही व्याख्या आहे म्हणूनच राष्ट्रवादाचे प्रमुख अभ्यासक या व्याख्येला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान देतात.

एम्. हावसर हा विद्वान म्हणतो, " राष्ट्र ही वंश अथवा भाषेची निर्मिती नसून सहजीवन जगण्याच्या लोकांच्या इच्छेतून राष्ट्राची निर्मिती होते." [७५] या व्याख्येतदेखील सहजीवन जगण्याच्या इच्छेलाच प्राधान्य मिळालेले आहे.

जे. हालंड रोज हा इतिहासशास्त्रज्ञ म्हणतो, " मी राष्ट्र ही संज्ञा राजकीय अर्थाने वापरतो. स्वतःचे संघटित राज्य असलेला वैशिष्ट्यपूर्ण लोकसमूह म्हणजे राष्ट्र होय." [७६] राष्ट्र–राज्य आणि वैशिष्ट्यपूर्ण समाज हेच राष्ट्राचे प्रमुख आधारभूत घटक जे. हालंड रोज यांना मान्य आहेत.

डब्ल्यू. बी. पिलसबरी हा मानसशास्त्रज्ञ म्हणतो, " राष्ट्र म्हणजे असा लोकसमूह की ज्यात एकत्वाची प्रबळ भावना असून जो सामूहिक भावनांचा अनुभव घेऊ शकतो. .... राष्ट्र ही एक अशी वस्तू आहे की जिच्याभोवती संबंधित घटकांच्या भावना केन्द्रित होतात. राष्ट्रविषयक निष्ठेतून या

घटकांना आनंद प्राप्त होतो. तसेच ज्यामुळे राष्ट्राचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता वा धोका निर्माण होतो त्यावेळी राष्ट्राशी संबंधित असलेल्या घटकांना राग येतो किंवा दुःख होते." ७७

मानसशास्त्रीय भूमिकेतून पिल्सबरीने ही व्याख्या केलेली असली तरी ती राष्ट्राचे व्यवच्छेदक लक्षण सांगणारी आहे. राष्ट्र संकल्पनेतील भावनात्मक घटक भावनात्मक ऐक्य यांना प्राधान्य देऊन आनंद, संताप व दुःख यांच्या अभिव्यक्तीने त्यासंबंधीची सेंद्रियता वा सजीवता व्यक्त केलेली आहे.

भारतीय विद्वानांनी केलेल्या व्याख्या

बार्कर, रेनॉन, लॉयबर, रोज, हावसर आणि पिल्सबरी या पाश्चात्य विद्वानांनी केलेल्या राष्ट्र-विषयक व्याख्यांचा आपण परिचय करून घेतला आहे. भारत हे एक राष्ट्र आहे अशी ज्या राष्ट्र-भक्तांची निष्ठा होती त्यांनी देखील भारताच्या संदर्भात 'राष्ट्र' या संकल्पनेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे त्यांचाही अभ्यासाच्या दृष्टीने परामर्ष घेणे आवश्यक आहे.

ॲनी बेझंट म्हणतात, "राष्ट्र म्हणजे दैवी तेजाचा स्फुल्लिंग होय. दैवी ब्रह्मतत्त्वाचा अंश असा दृश्य विश्वातील जीवनविषयक आविष्कार म्हणजेच राष्ट्र ! या राष्ट्ररूपी दैवी स्फुल्लिंगाभोवती व्यक्तींचा समूह एकत्रित होतो आणि त्यांना एकमेकांशी जोडतो त्या व्यक्ती समूहाचे गुण, त्याची शक्ती आणि त्याचा प्रकार हे सारे त्याच्या दैवी जीवनाचा जो अंश राष्ट्ररूपाने प्रगट झाला त्यावर अवलंबून असतात... राष्ट्रीयत्वाची जादू एकतेच्या भावनेत सामावलेली असून राष्ट्रीयत्वाचा उपयोग राष्ट्रीयत्वाच्या प्रकाराला अनुकूल अशा मार्गांनी विश्वसेवा करणे हाच एकमेव हेतू असतो." ७८

लोकमान्य टिळक म्हणतात, "ज्या लोकसमुदायाला एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाही, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनी एकत्र बांधलेले नाहीत अथवा ज्यांच्या अंगात इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचे वैशिष्ट्य वास करीत नाही ते लोक किंवा समुदाय कधीही राष्ट्र संज्ञेस पात्र होत नाहीत."७९ आपण आणि परके यांच्यातील भेद स्पष्ट करताना लोकमान्य म्हणतात, "स्वत्त्व हेच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा मूळ पाया असून या स्वत्वाच्या सीमेचा परिच्छेद दाखविणे हे काम महत्त्वाचे आहे.... कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणे हा होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा ? अर्थात हिंदुत्वाचा. आम्हाला धर्माची काही एक परंपरा आहे. त्या परंपरेतील ज्ञान इतर धर्मांतील ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे आणि ही परंपरा आम्ही सोडून दिली तर आमचे असे म्हणण्यासारखे आम्हास सामान्य बंधन काहीच नाही. या गोष्टी आम्ही लक्षात बाळगल्या पाहिजेत." ८०

विपिनचंद्र पाल म्हणतात, "राष्ट्र ही एक आध्यात्मिक आणि नैतिक सजीवता मानल्यास तिची अभिव्यक्ती सातत्याने ऐतिहासिक स्मृती आणि भावी उद्दिष्टे यांच्याद्वारे होते हेही मान्य करावे लागते."८१

महर्षी अरविंद घोष म्हणतात, "राष्ट्रीयत्व राष्ट्रांतर्गत दैवी एकतेच्या साक्षात्काराची केवळ तीव्र आकांक्षा होय. अशा आकांक्षेनी प्रेरित झालेल्या राष्ट्रातील घटक व्यक्ती, राजकीय, आर्थिक, सामाजिकदृष्ट्या बाह्यतः कितीही विविधतापूर्ण असल्या तरी त्यांचे ऐक्य असते." ८२

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी आपल्या 'हिंदुत्व' या सुप्रसिद्ध ग्रंथात 'हिंदु-राष्ट्र' या संकल्पनेची विस्तृत तात्त्विक आणि व्यावहारिक चर्चा करून राष्ट्रीयत्वाची सर्वच प्रमुख लक्षणे

हिंदूंच्या राष्ट्रियत्वात असल्याचे सप्रमाण प्रतिपादन केलेले आहे. हिंदूंच्या राष्ट्रीयत्वाची त्यांनी पुढील व्याख्या केलेली आहे.

" आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका
पितृभू: पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृत: !!"

इ. स. १९३८ मधील अखिल भारतीय हिंदू महासभेच्या नागपूर येथील अध्यक्षीय भाषणात हे हिंदुराष्ट्र आहे असे प्रतिपादन करताना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, होय, " आम्ही हिंदू हे स्वयमेव एक राष्ट्र आहोत. कारण धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक अशा साऱ्या आप्त-बंधनांनी आम्ही एकात्म, एक राष्ट्र बनलो असून त्यांच्या जोडीला प्रादेशिक एकतेचीही देणगी आम्हाला नित्याची लाभली आहे. आमचे वांशिक अस्तित्व हिंदुस्थानशी -आमच्या प्रिय अशा पितृभूशी नि पुण्यभूशी – एकरूपता पावलेले आहे. पण या सर्वांहूनही महत्त्वाची अशी गोष्ट म्हणजे आमची इच्छा आम्ही हिंदुराष्ट्र आहोत अशी आहे ही होय आणि म्हणूनच आम्ही राष्ट्र आहोत." [८३]

डॉ. श्री. व्यं. केतकरांनीदेखील राष्ट्रीयत्वाची सर्वसामान्य व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात, " ज्या संघाचे कार्यक्षेत्र नियमित नसून सर्वव्यापी आहे आणि मनुष्यमात्राच्या सामुच्चयिक स्थितीची पूर्णावस्था ज्या संघात दृग्गोचर होते तो संघ म्हटला म्हणजे राष्ट्र होय." [८४]

डॉ. केतकरांसारखी सर्वसामान्य व्याख्या श्री. य. कोल्हटकर यांनीही केलेली आहे.

डॉ. बा. य. डोळे यांनी पाश्चात्यांच्या पद्धतीच्या दोन तीन व्याख्या आपल्या ग्रंथात देऊन एका व्याख्येकडे पसंती दर्शविली आहे. ती व्याख्या अशी, " जेव्हा लोक राष्ट्रीय प्रतिमांभोवती संघटित होतात, ते समान विचार करतात, समान पद्धतीने राहतात व सामूहिक कृतीस तयार होतात, दिल्लीचे, महाराष्ट्रीय, हिंदू याऐवजी भारतीय म्हणून आवश्यक झाल्यास लढण्यास व मरण्यास तयार होतात व हे योग्य आहे असे त्यांना वाटते त्या वेळी त्या लोकांचे राष्ट्र होते." [८५]

प्रा. न. ना. भिडे म्हणतात, " ज्या मानवजीवनध्येयविषयक म्हणजेच आंतर जीवनविषयक भावना मानवजीवन दिव्य आणि रम्य करतात व ज्या मनोभूमिकेवर केंद्रित होऊन देश, वंश, भाषा व तद्गत वाङ्मय, राज्यतंत्र, आर्थिक हितैकता (Community of Economics Interests)– व परकीय आक्रमणविषयक दक्षता या सात अंगांनी अभिव्यक्त होतात त्या सर्व मिळून राष्ट्रियत्वाचे स्वरूप होय. अशा तऱ्हेच्या राष्ट्रीयत्वाने युक्त असा जनसमाज म्हणजे राष्ट्र व त्या समाजाचा घटक हा राष्ट्रीय होय." [८६]

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनीही 'राष्ट्र'विषयक संकल्पना विस्तारपूर्वक मांडलेली आहे. ते सांगतात, " कोणत्याही लोकसमूहाला समाज किंवा राष्ट्र या पदवीला जावयाचे असेल तर काही किमान अपेक्षा तरी त्याने पुऱ्या करणे अवश्य असते. अनेक सांस्कृतिक बंधनांनी, अनेक निष्ठांच्या चिवट धाग्यांनी, अनेक श्रद्धांच्या सूत्रांनी तो समूह दृढमूल असला पाहिजे. अनेक आधार, परंपरा, दैवते, श्रद्धास्थाने, पुण्यपुरुष, अनेक मानबिंदू, पुण्यग्रंथ ही आपल्या सर्वांची एक आहेत ही जाणीव त्या समूहातील प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जागृत असली पाहिजे. या जाणिवेमुळेच या समूहातील सर्व घटकांची सुखदु:खे एक होतात, रागद्वेष समान होतात, सर्वांचे अभिमान सुसंवादी होतात तो समूह एकरूप होतो. सर्वांचे पूर्वपरंपरांचे अभिमान एक केंद्र असले, वर्तमान सुखदु:खे अभिन्न असली आणि

भविष्यकाळच्या आकांक्षा आणि ध्येये समरूप असली म्हणजे तो लोकसमूह समाज या पदवीला प्राप्त होतो. समूहाच्या स्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीने याची फार आवश्यकता असते. सर्वांचे राग-द्वेष, सुखदुःखे, अभिमानस्थाने अभिन्न असली तरच समूहातील कोणाही एकावर आघात झाला तर तो स्वतःवरच झाला असे समजून सर्व समाज खवळून उठतो आणि असा सामूहिक संताप ज्या समूहात उद्‌भवू शकतो तोच स्वसंरक्षण करू शकतो. अन्यथा तो दुबळा होऊन परक्यांच्या भक्ष्यस्थानी पडतो. आत्मसंरक्षणाला, स्वातंत्र्य संरक्षणाला जो समूह समर्थ नाही त्याला समाज किंवा राष्ट्र म्हणणे शक्य नाही." ८७

वैदिक आर्यांचे राष्ट्रनिर्मितीचे सफल ध्येय

वैदिक आर्यांच्या सर्वसंग्राहकतेचा परिचय देताना डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात, " बदरीनाथ, जगन्नाथ, रामेश्वर, द्वारका या चार धामांच्या यात्रा, गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू, कावेरी या सप्त अखिल भारतीय नद्यांची स्नाने, बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन, अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका पुरी व द्वारावती या पुण्य नगरींच्या यात्रा, यांचा पुराणांनी जो आग्रहाने उपदेश केला व त्यापासून मिळणाऱ्या थोर पुण्याचे जागोजाग जे वर्णन केले आहे ते अखिल भारतीय समाजाला एकरूप देण्याच्या हेतूनेच होय यात शंका नाही. या सर्व संग्राहकतेमुळेच वैदिक आर्यांनी मनापुढे ठेवलेले राष्ट्रनिर्मितीचे ध्येय सफल झाले असे बहुतेक सर्व पंडितांचे मत आहे."८८ (एकभूमी, एक परंपरा व बहुधा एक भाषा हे राष्ट्रधर्माचे संभवंध म्हणून मान्यता पावलेले आहेत." ८९)

डॉ. सहस्रबुद्धे यांची व्याख्या प्रदीर्घ आणि स्पष्टीकरणात्मक स्वरूपाची असली तरी पाश्चात्यांनी केलेल्या व्याख्यांचे सर्व सार या व्याख्येत सामावलेले आहे. डॉ. ॲनि बेझंट, महर्षी अरविंद, लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या व्याख्या भारत म्हणजेच स्वदेशसापेक्ष असल्या तरी त्यांच्यात ही सर्वसामान्य लक्षणे आलेली आहेत. विपिनचंद्र पाल, डॉ. केतकर, श्री. कोल्हटकर, श्री. भिडे, डॉ. डोळे यांच्या सर्वसामान्य व्याख्यांतील आशयही डॉ. सहस्रबुद्धयांच्या व्याख्येत आलेला आहे. स्वदेशसापेक्षताही त्यांनी स्पष्ट केलेली असून वैदिक आर्यांनी आपले राष्ट्र-निर्मितीचे ध्येय साकार करण्यासाठी भारतातील नैसर्गिक स्थळांचा, नद्यांचा, दैवतांच्या स्थळांचा, पुण्यनगरींचा, चार धामांचा आणि यांच्या यात्रांनी मिळणाऱ्या थोर पुण्याचा उल्लेख केल्याचे सांगून भारतीय राष्ट्रवाद्यांचे वैशिष्ट्यही स्पष्ट केलेले आहे. पाश्चात्य पंडितांनी आणि भारतीय विद्वानांनी ज्या भिन्न भिन्न दृष्टिकोणांतून ' राष्ट्र ' या संकल्पनेचा विचार केला तो लक्षात घेतला म्हणजे राष्ट्रीयत्व हे मानवी जीवनाच्या संपूर्ण क्षेत्रांना व्यापून असल्याचे चटकन लक्षात येते; मात्र डॉ. हेन्स कोहन यांनी म्हटल्याप्रमाणे त्याचे स्वरूप भिन्न भिन्न देशांत भिन्न भिन्न असते. भारत देशही त्याला अपवाद नाही.

आतापर्यंत राष्ट्रवादाच्या सर्वसामान्य स्वरूपाचे विवेचन करण्याचा यथाशक्य प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न करीत असताना या राष्ट्रवादी प्रणालीचे वस्तुनिष्ठ दर्शन व्हावे या दृष्टीने विविध मुद्यांचा ऊहापोह करून शेवटी पाश्चात्य आणि भारतीय विद्वानांनी केलेल्या ' राष्ट्र ' या संकल्पने-संबंधीच्या व्याख्यांचाही विचार केलेला आहे. राष्ट्रवादाच्या या सर्वसामान्य विवेचनानंतर भारतीय राष्ट्रवादाच्या विचाराकडे आता वळावयाचे आहे. भारत हे राष्ट्र आहे यासंबंधीचे काही अभिप्राय या विवेचनातच आपण पाहिलेले आहेत. परंतु आधुनिक अर्थाने राष्ट्र म्हणून भारताला काही प्राचीन

परंपरा आहे किंवा नाही, असल्यास त्या परंपरेचे स्वरूप काय होते ? विविध पंथ, विविध भाषा, विविध वर्ग, वर्ण आणि जाती, विविध भूप्रदेश, वेशभूषा चालीरीती अशा विविधतेने नटलेल्या देशाला एकसूत्रात गुंफणारे असे कोणते तत्त्व अस्तित्वात होते, त्याचा प्रत्यय भारताच्या राष्ट्रीय जीवनात ऐतिहासिक काळात कधी काळी आला होता काय ? आधुनिक राष्ट्रवादाचे प्रणेते कोण ? त्यांनी राष्ट्रनिर्मितीच्या दृष्टीने केलेले कार्य या सर्व मुद्यांचे स्वतंत्र विवेचन ' भारतीय राष्ट्रवाद ' या स्वतंत्र प्रकरणात करावयाचे योजिलेले आहे. कारण भारतीय राष्ट्रवादाच्या संदर्भातच आधुनिक मराठी कवितेतील राष्ट्रवादाच्या प्रभावाचे अध्ययन करणे हाच प्रबंधाचा हेतू आहे. तेव्हा आता दुसऱ्या प्रकरणाकडे वळू.

ʃʃʃ

भारत आणि महाराष्ट्र परस्परसंबंध

प्रास्ताविक

राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता असा प्रबंधाचा विषय असताना आणि राष्ट्रवादासंबंधी सर्वसामान्य विवेचन पहिल्या प्रकरणात झालेले असताना पुन्हा भारतीय राष्ट्रवादाचा अभ्यास महाराष्ट्राच्या संदर्भात अपेक्षित आहे काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थीच द्यावे लागेल. कारण भारत आणि महाराष्ट्र यांचे नाते पाणी आणि तरंगासारखे आहे. पाणी आणि तरंग यांना वेगळे करता येत नाही किंबहुना एकाच वस्तूची ती दोन रूपे आहेत. महाराष्ट्राची परंपरा, महाराष्ट्राचे जीवन, महाराष्ट्राचे कार्य भारतीय जीवन परंपरेत एखाद्या नदीप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण आहे. पण नदी जशी शेवटी सागरालाच जाऊन मिळते तसे महाराष्ट्राचे जीवन भारतीय जीवनाशी एकरूप झालेले आहे हे कधीच विसरता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील कोणत्याही व्यापक समस्येचा विचार करताना भारतीय परिस्थितीची पार्श्वभूमी लक्षात घेणे वस्तुनिष्ठ विवेचनासाठी आवश्यक आहे.

पाश्चिमात्य राष्ट्रवादाचा आधुनिक भारतावरील प्रभाव

पाश्चात्य पंडितांनी आणि भारतीय पंडितांनी केलेल्या " राष्ट्र " विषयक व्याख्यांचा आपण विस्तृत परिचय करून घेतलेला आहे. दोन्ही पंडितांच्या व्याख्यांत अनेक समान घटक असल्याचे सूक्ष्म दृष्टीच्या अभ्यासकाला सहज आढळून येतात. केवळ घटकांचेच हे साम्य नाही तर अनेक व्याख्या एक दुसरीशी आशयदृष्ट्याही समान असल्याचे दिसून येतात हे मान्य करावे लागते. हे साम्य सहजा-सहजी आलेले नाही तर ते बरेचसे पाश्चात्यांच्या अनुकरणाने आलेले असावे असे म्हणण्याला वाव आहे. आधुनिक भारतीय विद्वानांनी " राष्ट्र " या संकल्पनेसंबंधी केलेला विचार प्राधान्याने पाश्चात्यांच्या या विषयावरील ग्रंथांच्या अध्ययनाद्वारेच केलेला आहे असे म्हणता येते. कारण इ. स. १८२० पासून भारतात इंग्रजी विद्येच्या प्रसारास प्रारंभ झाला. त्याआधी दोन वर्षे पाश्चात्यांनी भारतीयांचा पराभव करून राजकीय सत्ता स्थापन केलेली होती. नव्या विद्यांच्या, विज्ञानवृद्धीच्या आणि शास्त्रीय साधनांच्याद्वारे पाश्चात्य राष्ट्रे शस्त्रास्त्रदृष्टचा बलसंपन्न आणि भौतिकदृष्टचा समृद्ध झालेली आहेत, याचा प्रत्यय नव्या शिक्षणाने आमच्या देशातील समाजधुरीनांना तीव्रतेने आला. किंबहुना आपला मागासलेपणा हेच आपल्या पराभवाचे कारण असे काहींना वाटू लागले. त्यामुळे बहुतेक नवशिक्षितांनी पाश्चात्य शिक्षणासंबंधी मोठे गौरवाचे उद्‌गार काढले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजी विद्येला दिलेली " वाघिणीच्या दुधाची उपमा " पाश्चात्यांच्या श्रेष्ठत्वाची द्योतक आहे. याच नवशिक्षितांनी पाश्चात्यांचे स्वभावविशेष, गुण, विद्या, आचारविचार उण्या–

अधिक प्रमाणात उचलले, आणि इतरांनीही ते उचलावेत असा प्रचार करायला सुरुवात केली. त्यातही शास्त्रीय ज्ञान ही युरोपीय लोकांची विद्या कामधेनू त्यांच्या संपूर्ण उत्कर्षाची जन्मदात्री आहे, तिला आपण प्रसन्न करून घेतलेच पाहिजे असे जवळ जवळ सर्वच प्रतिपादन करू लागले.

ज्याअर्थी ब्रिटिशांनी युद्धात आणि मुत्सद्देगिरीत आपल्याला पराभूत केले त्याअर्थी ते आपल्यापेक्षा सर्वच क्षेत्रांत श्रेष्ठ आहेत असे सांगणारा एक नव्या पदाधिकाऱ्यांचा वर्गही या देशात उदयाला आला. पाश्चात्यांच्या सामर्थ्याने व तेजाने या वर्गाचे डोळे दिपून गेले. आता संपूर्ण बाबतीत पाश्चात्यांचे अनुकरण केल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाही असेही या वर्गाला वाटू लागले. या वर्गाबरोबरच भारतीय परंपरेचा अभिमान बाळगणारा एक सुशिक्षित वर्गही भारतात प्रथमच निर्माण झाला. इंग्रज सत्ताधारी होण्यापूर्वी या देशाची सत्ता ज्या पूर्वजांच्या हातात होती, ज्यांनी परकीयांविरुद्ध एकाकी संग्राम करून आपले स्वातंत्र्य काही काळ अबाधित राखले होते, सत्तेचा आणि वैभवाचा काही प्रमाणात उपभोग घेतला होता व पराक्रम गाजवून सत्तासंवर्धनही केलेले होते, त्यांच्याबद्दल या नव्या वर्गाला अभिमान वाटणे स्वाभाविकच होते. या दोन वर्गामधून स्थूलमानाने प्रतिक्रियात्मक उदारमत–राष्ट्रवादी वर्ग आणि पारतंत्र्याबद्दल चीड बाळगणारा व स्वातंत्र्य घेण्यासाठी उतावीळ झालेला आणि परंपरेपासून प्रेरणा घेणारा अस्मितादर्शी राष्ट्रवादी वर्ग असे दोन वर्ग उदयाला आले. ब्रिटिशांची सत्ता आणि त्यांचे साहचर्य यांचा या दोन्ही वर्गांवर स्वाभाविकपणेच प्रभाव पडला तरी प्रत्येकाच्या प्रतिक्रिया मात्र भिन्न भिन्न स्वरूपात घडून आल्या.

पाश्चात्यांच्या प्रभावाचे स्वरूप

या प्रतिक्रियेचे स्वरूप कसे संमिश्र होते हे डॉ. धनंजयराव गाडगिळांनी मोठ्या मार्मिकपणे " भारत व महाराष्ट्र " या लेखात दाखविलेले आहे. श्री. गाडगीळ म्हणतात, " प्रथम अवमान व उपेक्षा, व नंतर शक्य तितके संसर्ग टाळण्याचे प्रयत्न हे यशस्वी न झाल्यामुळे व युरोपीय आक्रमण चालूच राहिल्यामुळे, युरोपीय काही बाबतीत वरिष्ठ आहेत याची उगवती जाणीव, ही तीव्र झाल्यावर त्यांच्या सामर्थ्याच्या मूळ स्थानाचा शोध व विशिष्ट बाबतीत अनुकरण करण्याचा प्रयत्न, पण त्याबरोबरच आपल्या कल्पना व व्यवस्था याबाबत शक्य तितका कमी फरक व्हावा असा कटाक्ष, तसेच स्वातंत्र्य, समता व बंधुभाव वगैरे जी नवीन मूल्ये स्वीकारार्ह अगर ज्यांचा उघडरीतीने पुरस्कार करणे अटळ, तीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आमच्या परंपरेतच वसतात हे दाखविण्याचा आग्रह, सर्व साधारणपणे आमचा पुरातन काळ उज्ज्वल परंतु मध्यंतरी कारणपरत्वे अधोगती झाली किंवा प्रगती खुंटली म्हणून समाजात मांद्य आले, युरोपीयन पुढे गेले असे स्वतःस व इतरास भासविण्याचा सर्वांचा प्रयत्न सुरू झाला.[९०]

भारतीयांनी प्रतिकारार्थ उभी केलेली राष्ट्रभावना

श्री. गाडगीळांनी भारतीय समाजातील संमिश्र प्रतिक्रियेचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे तसेच " राष्ट्र " या संकल्पनेसंबंधीचे स्वरूप श्री. ग. वि. केतकरांनी स्पष्ट केलेले असून तेही चिंतनीय आहे. दि. ३० जुलै १९७२ च्या साप्ताहिक " सोबत " मधील आपल्या लेखात श्री. केतकर म्हणतात, " राष्ट्रकल्पना म्हणजे ब्रिटिशांच्या अपकारातील देणगी होय. " राष्ट्र " हा शब्द संस्कृत भाषेमध्ये होता पण त्याचा अर्थ एका राज्याच्या सत्तेखालचा प्रदेश व त्यातील लोक इतकाच होता. " नेशन " या शब्दामध्ये कितीतरी अधिक मानवी भावना, अभिमान, जिव्हाळा आणि एकता यांची व्यंजना भरली

आहे. त्यावरून Nationality, Nationhood हे इंग्रजी शब्द आले. इंग्लंड, फ्रॉन्स यांच्यासारखा नेशनहूड भारताला कधीही नव्हता व अद्याप तो उत्पन्न झालेला नाही. भारत हे एक राष्ट्र नव्हते हे सत्य इंग्रजांनी विदारकपणे मांडण्याचा प्रयत्न आपल्या सत्तेला अपरिहार्य ठरविण्याच्या हेतूने केला. तेव्हा प्रतिक्रियेने भारत हे एक राष्ट्र आहेच असे दाखविण्यासाठी इतिहास धुंडून एकत्वाचे पुरावे गोळा करण्याची धडपड झाली.[११]

युगधर्माचा प्रभाव नाकारता येत नाही

डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि श्री. ग. वि. केतकर या विद्वानांनी भारतीय समाजजीवनासंबंधी मांडलेले विचार हे केवळ उदाहरणादाखल म्हणून दिलेले आहेत. त्यातून पाश्चात्यांकडे पाहण्याचा काही भारतीयांचा दृष्टिकोण स्पष्ट होतो. तसाच पाश्चात्यांचा प्रभावही सुशिक्षित भारतीयांवर किती सर्वंकष आहे याची जाणीव होते. तो काळच पाश्चात्यांच्या जागतिक वर्चस्वाचा होता. किंवहुना पाश्चात्यप्रभावाला युगधर्माचे स्वरूप प्राप्त झालेले होते असे म्हणणे अधिक योग्य होईल. डॉ. व्ही. पी. वर्मा या प्रभावाचे विवेचन करताना आपल्या विद्वत्तापूर्ण ग्रंथात लिहितात, " पाश्चात्यांच्या वाङ्मयाचा भारतीयांवर संमिश्र परिणाम झाला. त्यातही सुप्रसिद्ध इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनीचा परिणाम सर्वात प्रभावी होता. भारतीय तरुण मॅझिनीच्या राष्ट्रीय विचाराने भारले गेले होते. त्याचे प्रत्यंतर म्हणजे बाबू सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांनी इंग्रजीत, लालालजपतराय यांनी उर्दूत, आणि बॅ. सावरकरांनी मराठीत मॅझिनीच्या चरित्राची भाषांतरे केली." पुढे १९२० नंतर कार्लमार्क्स, लेनिन, मुसोलिनी आणि हिटलर यांच्या प्रभावाखाली साम्यवादी, समाजवादी आणि फॉरवर्ड ब्लॉककडे लोक आले होते. पंडित जवाहरलाल नेहरु, मानवेन्द्र रॉय आणि सुभाषचंद्र बोस ही नावे या प्रभावाच्या संदर्भात घेता येतील. त्याचवरोवर अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन या क्रांत्यांचेही परिणाम भारतीय पुढाऱ्यांच्या मनावर झाल्याचे स्पष्टपणे जाणवते.[१२] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे युगधर्माच्या प्रभावापासून भारतीय मन मुक्त नव्हते.

भारतीय अस्मितेचा प्रभावही दुर्लक्षित करण्यासारखा नाही

केवळ पाश्चात्यांचाच प्रभाव भारतीय मनावर होता असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होईल. पाश्चात्यांच्या प्रभावाइतकाच भारतीय अस्मितेचा प्रभावही भारतीय मनावर होता. डॉ. वर्मांनीच भारतीय अस्मितेच्या प्रभावाचेही वर्णन केलेले आहे हे येथे लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणतात, " पाश्चात्यांच्या विचारांचा प्रभाव भारतीय पुढाऱ्यांच्या मनावर होता हे खरे असले तरी संपूर्ण भारतीय नेते स्वातंत्र्याची चळवळ केवळ पाश्चात्यांच्या आदर्शाने व तंत्राने चालवीत होते असे म्हणणे म्हणजे राष्ट्रीय इतिहासाला सोयीस्कर वगल देण्यासारखेच ठरेल. भारतीयांत देशभक्तीची भावना समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, महादजी शिंदे, रणजितसिंग आणि १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धातील शूर सेनानींनी अखंडपणे प्रज्वलित ठेवलेली होती. विशेषत: महाराष्ट्रात शिवाजी महाराजांनी हिंदुपदपादशाहीची स्थापना केल्यानंतर व पुढे पहिला बाजीराव पेशवा झाल्यानंतर त्याचे वंशज १८१८ पर्यंत सत्ता सांभाळून होते. या ऐतिहासिक पुराव्यावरून पाश्चात्यांच्या प्रभावाप्रमाणेच हा दुसरा प्रभावही तितकाच जोरदार होता. किंवहुना हाच दुसरा प्रभावी वारसा भारताच्या राष्ट्रीय चळवळीला खऱ्या अर्थाने कारणीभूत झाला हे इतिहासाला मान्य करावे लागते.[१३]

युद्धात पराभूत झालेले राष्ट्र सर्वच क्षेत्रांत पराभूत असते काय ?

वरील विवेचनाचा अर्थ असा की भारतालाही वैशिष्ट्यपूर्ण अशी राष्ट्रीय परंपरा आहे आणि ती स्फूर्तिदायक आहे हे मान्य करावे लागते. ब्रिटिशांनी भारतीय सत्ताधाऱ्यांचा पराभव करून आपली सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे ते युद्धाच्या क्षेत्रात, मुत्सद्देगिरीच्या क्षेत्रात भारतीयांपेक्षा वरचढ भासू लागणे स्वाभाविक होते. आपण श्रेष्ठ आहोत असा अहंकार ब्रिटिशांनाही झाला असल्यास आश्चर्य नाही. त्यांच्या वागण्यात तो तत्कालीन लोकांना जाणवतही होता. परंतु काही भारतीय पुढारी आपली ऐतिहासिक गौरवशाली परंपरा विसरले नव्हते. काहींना मात्र पारतंत्र्याच्या जबरदस्त धक्क्याने अंधारीच आलेली होती आणि त्यांचे परंपरेचे भानच ते हरवून बसले होते. पाश्चात्य इतिहासकारही भारताची ही गौरवशाली परंपरा दृष्टीआड करीत होते असे म्हणता येते.

आज उपलब्ध असलेल्या विविध पुराव्यांच्याद्वारे भारत हे एक प्राचीन राष्ट्र असल्याचे बहुतेक अभ्यासकांना मान्य आहे. प्रो. मॅक्समुल्लर, जस्टीस वुड्राफ, डॉ. अलेक्सिस कॅरेल, रोमोरोलाँप्रभृती पाश्चात्य पंडितांनी भारतीय तत्त्वज्ञान, धर्म, परंपरा, समाज, भाषा इत्यादी विषयांवर अभ्यासपूर्ण लिखाण करून प्राचीन भारताच्या भौतिक समृद्धीची, वैशिष्ट्यपूर्ण विकसित समाजजीवनाची, वैचारिक प्रगल्भतेची आणि जीवनसापेक्ष तत्त्वज्ञानाची जगाला जाणीव दिलेली आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कार्यकालात आस्ट्रेलियाचे प्रतिनिधी म्हणून भारतात सुमारे सात वर्षे वास्तव्य करणारे, श्रीयुत वॉल्टर क्रोकर यांनी पंडित नेहरूंसंबंधी एक ग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे. भारतीय समाजजीवनाबद्दल या थोर मुत्सद्याने काढलेले उद्‌गार विशेष प्रकाश टाकणारे आहेत. तो म्हणतो, "A notable value in Hinduism is the spirit of co-existence and with it the habit of tolerance and compromise which has become second nature in a country embracing millions of people of different languages, cultures, religious sects and indeed races." भिन्नतेत एकता राखण्याचा हिंदूंचा स्वभावधर्म असल्यामुळेच जातींना अंतर्गत आचारांची, दैवतांची, चालींची स्वतंत्रता न बिघडता हिंदुसमाजामध्ये नांदता आले."[९४] हा श्री. वॉल्टर क्रोकर यांचा अभिप्राय भारतीयांच्या सुसंस्कृतपणावर प्रकाश टाकणारा आहे ?

आधुनिक अर्थाने प्राचीन भारत राष्ट्र होते काय ?

भारतीय लोक पाश्चात्यांपासून इतिहासाचे शास्त्र आणि इतिहाससंशोधनाची पद्धती या दोन्ही गोष्टी शिकले आणि त्या संदर्भात पाश्चात्यांचे ऋण भारतीयांनी मान्य केलेच पाहिजे. पाश्चात्यांच्या धर्तीचा इतिहास लिहिण्याची पद्धती भारताला माहीत नसली तरी भारतीय जीवनाचे अंतरंग ज्यात उघड झालेले आहे असा सांस्कृतिक इतिहास साहित्याच्या माध्यमातून भारतीय इतिहासकारांनी हजारो वर्षांपासून लिहून ठेवलेला आहे हे विसरता येत नाही. इतिहास वा परंपरा यांचा हजारो वर्षांचा वारसा भारताला सुदैवाने लाभलेला आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. झरथुष्ट्राचा चरित्रकार जॅक्सन म्हणतो, "Tradition is a phase of History." भारताच्या संपूर्ण परंपरेचा विचार केला तर हे विधान अर्थपूर्ण वाटू लागते. केवळ प्रतिक्रिया म्हणून नव्हे तर खरोखरच भारतात राष्ट्र म्हणून काही प्राचीन परंपरा आहे काय ? कधी काळी या खंडप्राय प्रदेशात राष्ट्रवादाचा उदय झाला होता काय ? आधुनिक राष्ट्रवादाची प्रमुख लक्षणे प्राचीन भारतात आढळतात काय ? असल्यास त्यांचे तत्कालीन स्वरूप कोणते असावे ? मातृभूमीबद्दलचे उत्कट प्रेम, आपपरभाव आणि विशिष्ट परिस्थितीत आपआपली विविधता आणि भेद विसरून एका उदात्त ध्येयासाठी संघटितपणे

प्रतिकार करण्यासाठी हे राष्ट्र सज्ज होते काय ? या सर्व प्रश्नांची उत्तरे इतिहासाच्या आधारे देण्याचा प्रयत्न या प्रकरणात करण्याचे ठरविले आहे.

प्राचीन भारतीय राष्ट्रवाद

जगातील कोणत्याही समाजाला जे वैशिष्ट्य येते ते त्या त्या समाजाच्या विशिष्ट संस्कृतीमुळे येत असते आणि ही संस्कृतीची अखंडितता तिच्या परंपरेनेच अखंडित राहते. डॉ. इरावती कर्व्यांच्या प्रतिपादनाचा भावार्थ असा की, परंपरेची अखंडितता म्हणजे अनुस्मरण व थोड्या अंशाने का होईना अनुसरण असते. भारतीय संस्कृतीत हे अनुस्मरण व अनुसरण ही ममत्वाचीही भावना आजतागायत शिल्लक आहे. म्हणूनच ती संस्कृती एक आहे. भारतीय संस्कृतीत कालौघात काही दुवे जरी झिजले असले तरी परंपरा मात्र खंडित झालेली नाही.[९५]

कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या त्या समाजाच्या अखंड परंपरेत असते. परंपरा संकेतांची बनलेली असते. या संकेतांनीच त्या समाजाच्या सवयी बनतात हे आपण पाहिले आहे. अनुस्मरण आणि अनुसरण यांच्याद्वारे संकेतांचे संक्रमण होऊन ते पिढ्यानुपिढ्या टिकून राहतात. कारण संकेतांना शब्दांचे रूप प्राप्त होते आणि शब्दांची भाषा बनते. भाषा हेच संस्कृतीचे गमक असल्यामुळे तिच्या माध्यमातूनच संस्कृतीची निर्मिती, संचय व संक्रांती होत असते. सुसंस्कृत समाजात भाषा हेच संस्कृतिसंचयाचे मुख्य साधन असते आणि ही भाषाच साहित्यनिर्मिती करून अखंडतेचे सूत्र अनंतकाल कायम राखते. या साहित्याच्या आधारेच समाजाच्या परंपरेची, त्याच्या वैशिष्ट्यांची जाणीव होते. प्राचीन काळातील भारतीय साहित्याचा अभ्यास करूनच भारत हे एक महान राष्ट्र म्हणून अस्तित्वात होते असा सिद्धान्त इतिहासकारांनी मांडलेला आहे. ज्या ग्रीक परंपरेचा पाश्चात्य आधार घेतात त्या ग्रीकांच्या पूर्वीच भारतात गणराज्यांची म्हणजेच लोकशाहीची परंपरा अस्तित्वात होती असे दिसून येते. विशिष्ट नागरिकत्वाची परंपरा, वैचारिकता आणि ध्येयनिष्ठा याशिवाय गणराज्याची निर्मिती होऊ शकत नाही असे डॉ. सहस्रबुद्धयांचे मत आहे.

इ. स. पूर्व ८०० ते इ. स. ६०० हा भारताचा अत्यंत वैभवाचा काळ होय. भारतामध्ये लोकसत्तांचा उदय होऊन त्यांचा उत्कर्ष झाला तोही याच काळात. या भूमीला चिरंतन ऋणी करून ठेवणारे महान तत्ववेत्ते, थोर सम्राट, धर्मप्रवक्ते व साहित्यसम्राट हेही बहुतेक सर्व याच काळात होऊन गेले. स्वातंत्र्यावाचून संस्कृतीच्या कोणत्याही अंगाची जोपासना होत नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विचारशीलता आणि मानवता ही लोकशाहीची आधारभूत तत्त्वे तत्कालीन भारतीय समाजात अस्तित्वात होती हे डॉ. जयस्वाल आणि डॉ. अळतेकर यांच्या ग्रंथाचे आधार घेऊन डॉ. सहस्रबुद्धे यांनी सांगितले आहे.[९६]

या गणराज्यांचा काळ भगवान श्रीकृष्णाइतकाच प्राचीन असल्याचे इतिहासकार सांगतात.

हिंदुस्थानातील प्राचीन प्रजासत्ताक राज्यांची ही परंपरा थोडीथोडकी नव्हे तर हजार एक वर्षे अबाधित अशी चालून पुढे हळूहळू नामशेष झाली.[९७]

त्या काळात जशी गणराज्ये अस्तित्वात होती तशीच नृपसत्ताही अस्तित्वात असली तरी ती निरंकुश नव्हती. अर्वाचीन लोकसभेच्या स्वरूपाचे "समिती" या नावाचे मंडळ राज्यावर नियंत्रण ठेवीत असे. अनेक कुलांच्या समुदायाला "विश्" अशी संज्ञा होती व तिचा जो प्रमुख असे त्याला "विश्वति" असे म्हणत. समितीत प्रायः कुलपति व विश्वति हे सभासद असत. या समितीतील

लोकांमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेनापती व मंत्री यांची प्रत्यक्ष शासन चालविण्यासाठी निवड करण्यात येत असे. बाळशास्त्री हरदास यांच्या "वेदातील राष्ट्रदर्शन–उत्तरार्ध" या ग्रंथात "समिती" या प्रकरणात तसेच "वैदिक राजसत्तेचे स्वरूप" या प्रकरणात राजसत्तेसंबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. ती जिज्ञासूंनी पाहिली तर त्यांना अधिक चांगली कल्पना येईल.[९८]

प्राचीन भारतीयांचा इहवाद

प्राचीन भारतीयांनी सुमारे हजार वर्षे प्रजातंत्राची परंपरा जतन केली हे आपण पाहिले आहे. याचा अर्थ असा की ही परंपरा धारण करणाऱ्यांचा इहवादावर दृढ विश्वास होता. "भारताचा प्राचीन इतिहास अत्यंत वैभवशाली आहे. धर्म, विद्या, कला, कृषी, व्यापार, राजनीती, पराक्रम या सर्वच क्षेत्रांत भारताने उत्कर्षाचे शिखर गाठले होते आणि ज्या अर्थी या भूमीने असा अभ्युदय पाहिला होता त्या अर्थी येथले शासन इहवादी असलेच पाहिजे." असा निष्कर्ष डॉ. सहस्रबुद्धेंनी काढलेला आहे.[९९] आपले जीवनाचे तत्त्वज्ञानही इहवादाच्या पायावरच उभारलेले होते हेही तितक्याच निश्चयाने इतिहास सांगत आहे. श्रीराम, श्रीकृष्ण, भीम आणि अर्जुन यांच्यापासून थेट राष्ट्रकूट राजांपर्यंत ही परंपरा सांगण्यासारखी आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थांत अर्थ आणि काम या दोन पुरुषार्थांना महत्त्व असल्याशिवाय पहिला आणि चवथा पुरुषार्थ साधता येत नाही हेच या इहवादी शासनाने शिकविले.

भारताचे अभिमानास्पद सुवर्णयुग

इ. स. पूर्व ६०० ते इ. स. ८०० हा चौदाशे वर्षांचा पहिला कालखंड म्हणजे भारताचे अभिमानास्पद सुवर्णयुग होते. या कालखंडात रामायण, महाभारत आले, कालिदास, भवभूति झाले. नागार्जुन, आर्यभट्ट, वराहमिहिर, लल्लु, चरक, सुश्रुत हे शास्त्रज्ञ झाले. पाणिनी, चंद्रगुप्त मौर्य, अशोक, गौतमीपुत्र शातकर्णी, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, विक्रमादित्य, सत्याश्रय पुलकेशी, सम्राट हर्ष, राष्ट्रकूट, गोविंद हे सम्राट याच काळातले. चाणक्य हा एकच राजनीतिज्ञ आपल्या डोळ्यांपुढे आज आहे. पण त्याने पूर्वीच्या नीतिशास्त्रज्ञांची पंचवीस तीस तरी नावे दिलेली आहेत आणि भारताच्या सुवर्णयुगासंबंधी लिहितांना हेच पावलोपावली दिसते असे डॉ. सहस्रबुद्धे सांगतात.

प्रत्येक क्षेत्रातील शेकडो नावे आज विस्मृतीत गेली आहेत. वेरुळ, अजिंठा, खजुराहो, घारापुरी यांचे शिल्पकार कोण ते आपल्याला माहित नाही. जगभर फिरून भारतात सुवर्णाच्या राशी आणून ओतणाऱ्या व्यापाऱ्यांपैकी एकाचेही नाव आपल्याला माहीत नाही. त्या काळचे तानसेन, गंधर्व, उदयशंकर गोपीकृष्ण यांची नावे आपण विसरून गेलो आहोत. रसायन, पदार्थविज्ञान, वैद्यक, उद्योग, प्रत्येक क्षेत्रात त्याकाळी अनेक संशोधक होऊन गेले हे आज उपलब्ध असलेल्या इतिहासावरून स्पष्ट दिसते. पण आपल्याला त्याची माहिती नाही तरीही त्या काळात मानवी कर्तृत्वाने सर्व क्षेत्रांत अमाप बहर आला होता यात आता शंकेला जागा उरली नाही असे डॉ. सहस्रबुद्धे सांगतात.[१००]

प्राचीन भारतीयांच्या राष्ट्रीयत्वाचा उदय व विकास

डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात इहवादी जीवनप्रणाली आणि लोकशाही यांच्या आधारावरच आधुनिक कालातील राष्ट्रवादाची निर्मिती झालेली असल्याचे दिसून येते. तोच सिद्धांत प्राचीन भारताच्या बाबतीतही तितकाच खरा आहे. हा सिद्धांत मांडताना डॉ. मुन्शी, डॉ. पुसाळकर, डॉ. केतकर, साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास आणि पंडित सातवळेकर यांच्या ग्रंथांचा आधार डॉ. सहस्र-

बुद्धयांनी घेतलेला आहे. प्रजासत्ताक आणि इहवाद यांच्या आधारावरच प्राचीन भारतीयांनी आपले राष्ट्र निर्माण केले होते असा या इतिहासकारांचा पुरावा त्यांनी मांडलेला आहे.

आर्यांचे कार्य

आर्य हे भारतातील किंवा भारताबाहेरील यासंबंधी पंडितांत मतमतांतरे आहेत. पण भारतीय संस्कृतीच्या उदयकाळी सुमारे सहा हजार वर्षांपूर्वी एक पराक्रमी, प्रज्ञासंपन्न, विजिगीषु व सुसंस्कृत समाज म्हणून आर्य उदयास आले. त्यावेळी भारतात द्रविड, असुर, राक्षस, वानर, दैत्य, दानव, नाग, निषाद, किरात, कैवर्त, दास, दस्यू, पुलिंद, शक, आंध्र, पणी, कंबोज, पारद, पल्हव, खस इत्यादी पुंजके करून राहणाऱ्या शेकडो जमाती अस्तित्वात होत्या. आर्यांचे यजनशीलता व तत्संबंधीत वैदिक-संस्कृती हे व्यवच्छेदक लक्षण होते. कश्यप, आस्तिक या आर्यांची संतती म्हणून ज्यांचा प्राचीन वाङमयात उल्लेख आहे त्यात वर उल्लेखिलेल्या अनेक जमातींची नावे आहेत. आंध्र, पुंड्र, शवर, पुलिंद व मुतिव या सर्व जमाती विश्वामित्रांचे पुत्र होत असे शुनःशेपाच्या कथेवरून सांगितले जाते. या विविध जमातींचे आर्यांनी आर्यीकरण तर केलेच पण शक, कुशाण आणि हुण या परकीय रानटी हिंस्रजमाती भारतात येऊन निवास करू लागल्यानंतर त्यांचेही आर्यीकरण झाले. सर्व समाज वैदिक संस्कृतीच्या कक्षेत आणून या अखिल भारतीय लोकसमुदायाला राष्ट्र पदवीला नेण्यासाठी आर्यांनी अक्षरशः मिशनरींसारखी हाडाची काडे केली. अगस्त्य विंध्यपर्वत ओलांडून दक्षिणेतल्या घननिविड महारण्यात प्रवेश करता झाला. अत्री, शरभंग, सुतीक्ष्ण यांचे आश्रमही अरण्यातच होते. रावण राक्षस असला तरी तो वेदवेत्ता व यज्ञकर्म करणारा होता असा रामायणात उल्लेख आहे.[१०१]

राष्ट्रभाषा संस्कृत आणि तिचे कार्य

वेद, यज्ञसंस्था व संस्कृत भाषा या तीन साधनांना सोबत घेऊन वैदिक ऋषी व राजे जिथे जात तिथे ते या त्रयींना बरोबर नेत असत व इतरांना वैदिक यज्ञदीक्षेबरोबरच संस्कृत भाषेचे पाठ देत असत. अखिल भारताची एकभूमी, त्याचे एक राष्ट्र घडविण्यात संस्कृत भाषेचे फार मोठे साहाय्य झाले असले पाहिजे यात शंका नाही. राष्ट्रनिर्मितीत संस्कृत भाषेचे स्थान सांगताना डॉ. सहस्रबुद्धयांनी मोठा मार्मिक दाखला दिलेला आहे. ते म्हणतात, "इंग्रजी राज्यात सर्व भारतात इंग्रजी भाषा पसरली म्हणूनच दक्षिणेतले टिळक, रानडे, गोखले, सत्यमूर्ती, सुब्रह्मण्यम यांचे उत्तरेतील लजपतराय, बिपिनचंद्र, मालवीय यांच्याशी सामरस्य होऊन अखिल भारताचे एक राष्ट्र घडविणे सुलभ झाले. हेच कार्य पूर्वी संस्कृत भाषेने केले आणि त्याचे सर्व श्रेय अखिल भारतात वेद व संस्कृत वाणी व यज्ञसंस्था यांचा प्रचार करणाऱ्या अगस्त्यप्रभृती ऋषींना व त्यांचे संरक्षण करणाऱ्या श्रीराम, श्रीकृष्णांना आहे.[१०२]

श्रीराम आणि श्रीकृष्ण या अवतारी पुरुषांचे कार्य

रावण वधानंतर संपादन केलेले लंकेचे राज्य त्याच्याच भावाला विभीषणाला रामाने अर्पण केले, अयोध्येत आल्यानंतर त्याने अश्वमेध केला व तो चक्रवर्ती सम्राट झाला. प्रजानुरंजन हे रामचंद्राच्या राजनीतीचे सूत्र होते. म्हणून आज विसाव्या शतकातही रामराज्याची कल्पना लोकांना आवडते. परशुरामकृत क्षत्रियसंहार, वसिष्ठ विश्वामित्रांचा संघर्ष व राक्षसी संस्कृतीचे भयानक आक्रमण इत्यादी रूपांनी श्रीरामाच्या काळी जी समस्या समाजनेत्यांना भेडसावीत होती, तिचे उत्तर समन्वयाच्या पद्धतीने श्रीरामचंद्रांनी दिले. भारतीय राष्ट्रीयत्व आकारास आणले. डॉ. सहस्रबुद्धे

सांगतात की, भारताचे एक राष्ट्र करण्याच्या दृष्टीने असाच प्रयत्न श्रीकृष्णाने केलेला आहे. वेद; यज्ञसंस्था, संस्कृतवाणी व एकंदर आर्यसंस्कृती यांनी एकरूप झालेल्या समाजाला एकाच सार्वभौम सत्तेखाली आणून ती ऐक्यबंधने दृढ करून टाकण्याचे महाकार्य युधिष्ठिराद्वारा राजसूय यज्ञ व भारतीय युद्धानंतर अश्वमेध करून साध्य केले. श्रीकृष्ण हा अतिशय उदारमतवादी होता. त्याच्या तत्त्वोपदेशामुळे तथाकथित शूद्र समाजात आर्यांच्या संस्कृतीचा प्रसार फार वेगाने झाला.[१०३]

इतिहास पुराणांचे राष्ट्रीय कार्य

रामायण, महाभारत या आर्ष महाकाव्यांना इतिहास ग्रंथ म्हणतात. त्यांनी वर्णन केलेल्या घडामोडी इतिहासकाळात घडलेल्या नसून वेदकाळात घडलेल्या आहेत. वेद, ब्राह्मण ग्रंथांप्रमाणेच भारतीय समाज एकरूप करण्याचे कार्य प्रयत्नपूर्वक या इतिहास आणि पुढे पुराणांनी केलेले आहे. वैदिक कालानंतर निर्माण झालेल्या उपनिषदांनी वैदिक यज्ञयागाचा आणि कर्मकांडाचा अनादर केला. याच काळात पुढे बौद्ध व जैन धर्माचा उदय झाला. त्यांनी धर्माला उदार स्वरूप देण्याचा प्रयत्न करून तो सर्वसामान्य लोकांना सुलभ करून टाकला. पाली, अर्धमागधी या प्राकृत भाषांमधून त्यांनी धर्माचे प्रतिपादन केल्यामुळे बहुजन समाज वैदिक धर्माचा त्याग करून तिकडे जाऊ लागला. अशा परिस्थितीत पुराणांनी सामाजिक पुनरुज्जीवन घडवून आणले. शिव, ब्रह्मा, विष्णू, राम, कृष्ण, गणपती ही नवी श्रद्धास्थाने निर्माण केली. तसेच दीर्घ काव्ये आणि आख्यानांची रचना केली. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी देवतांचे अद्वैत निर्माण केले.[१०४]

आर्य नेत्यांचे राष्ट्रीय कार्य

आर्य हे नाव वंशवाचक नसून ते गुणवाचक आहे हे सर्वांनाच विदित आहे. येथे सर्वांना राहावयाचे आहे हे आर्य नेत्यांनी निश्चितपणे ठरविले. यज्ञ हे दैवत, वेदमंत्रांनी त्याची पूजा हा त्यांचा धर्म आणि वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, आर्षमहाकाव्ये या संस्कृत ग्रंथांतून जोपासली गेलेली यज्ञधर्म प्रधान संस्कृती. याच संस्कृतीचा आर्यांनी प्रसार केला. सर्व भारतीय समाज एकरूप झाला पाहिजे असा आर्यांचा बुद्धिनिश्चय असल्यामुळे ज्यांना या संस्कृतीबद्दल आपपरभाव होता त्यांना प्रारंभी परकीय म्हणूनच त्यांनी वागविले पण पुढे मात्र आपल्या ध्येयाच्या आड वर्ण, वंश, संस्कृत असंस्कृतपणा येऊ द्यावयाचा नाही असा व्यापक विचार करून त्यांनी यज्ञनिष्ठेला भूमिनिष्ठेचा आश्रय दिला. यज्ञीय भूमी, यज्ञपुनीत भूमी तीच आर्यभूमी असाच त्यांचा भाव असल्यामुळे यज्ञाच्या जोडीला आलेल्या भूमिनिष्ठेच्या दृढीकरणातून राष्ट्रनिष्ठेच्या थोर संघटनतत्त्वाचा उद्भव झाला. आर्यांच्या भूमिविषयक कल्पनेत क्रमाक्रमाने बदल होत जाऊन अखिल भारत हे त्यांचे क्षेत्र झाले. या क्षेत्राबाहेरील लोकांना म्लेंच्छ, परकीय समजण्यात येऊ लागले. भिन्न भिन्न जमातींचे एकत्रीकरण म्हणजेच सग्राहकता आणि सहिष्णुता ही महाव्रते अंगीकारून त्यांनी प्रत्येकाच्या धर्मभावनेचा, देवतांचा, आचारांचा आदर केला. त्यानंतर मात्र त्यांचा आपपरभाव भूमीवरून ठरू लागला.

पाणिनीचे सांस्कृतिक कार्य

"संस्कृत भाषा हे भिन्न भिन्न प्रांतीयांच्या विचार विनिमयाचे, म्हणून सर्वांना एका सूत्रात गोवणारे प्रभावी साधन होऊन बसले होते. हे साधन शाश्वत व टिकाऊ बनवायचे तर ते शिस्तीच्या नियमांनी बांधून वज्रलेप करण्याचे कार्य इ. स. पूर्व सातव्या शतकात पाणिनी या व्याकरणकाराने केले. सांस्कृतिक ऐक्यवर्धनाच्या दृष्टीने पाणिनीचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे संस्कृत

भाषा वंदिस्त झाली हे खरे पण ती वंदिस्त झाली म्हणूनच अमर झाली."[१०५] भारताचे अद्वैत तत्त्वज्ञान, महाकाव्ये, स्मृतिग्रंथ आणि आयुर्वेदशास्त्रे याच संस्कृतात रचल्या गेली.

एकदेश, एक राष्ट्र ही जाणीव निर्माण करणारे श्रेष्ठ समाजशास्त्र

पृथ्वीवर निरनिराळे भूप्रदेश निसर्गाने निर्माण केले असले तरी त्यांचे देश अथवा राष्ट्रात रूपांतर करण्याचे कार्य मानवी समाजाचे आहे. अखिल भारत एक देश, एक राष्ट्र ही जाणीव सर्व हिंदुवासीयांच्या मनात दृढ आहे. याचे श्रेय त्या प्राचीन आर्यांना म्हणजेच द्रविड, असुर, नागदैत्य यांनी जो श्रेष्ठ आर्य नावाचा वर्ण घडविला त्याला आहे. हे यश फार मोठे आहे. एक धर्म असूनही अनेकांना एक राष्ट्र निर्माण करता आले नाही. केवळ प्राचीन काळात चीन आणि अर्वाचीन काळात अमेरिका यांना फक्त याबाबतीत यश आले आहे असे इतिहास सांगतो. भारताला हे यश येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जगातील सर्व समाजशास्त्रांपेक्षा श्रेष्ठ असलेले त्याचे समाजशास्त्र होय असे अनेक पंडितांचे मत आहे.

प्राचीनांचे राष्ट्रनिष्ठेचे तत्त्वज्ञान

या भूमीत सर्वांना राहावयाचे आहे हे आर्यनेत्यांनी निश्चितपणे ठरविले होते. त्यासाठी सर्व भारतीय समाज एकरूप झाला पाहिजे असा त्यांचा बुद्धिनिश्चय होता. या एकरूपतेच्या ध्येयाच्या आड वर्ण, वंश, सुसंस्कृतपणा, असंस्कृतपणा येऊ द्यावयाचा नाही आणि सहिष्णुता, उदारता, संग्राहकता ही महाव्रते स्वीकारून प्रत्येकाच्या धर्मभावनांचा, दैवतांचा इतकेच नव्हे तर आचारांचा आदर करावयाचा हे त्यांनी ठरवून टाकले होते. त्यामुळे दळणवळणाची पुरेसी साधने उपलब्ध नसतानाही वरील धोरणामुळे भारतीय समाजात एकरूपता घडून आली हे त्यांचे कर्तृत्व असामान्य कोटीतले होय. कोणताही समाज संघटित व्हावयाचा असेल तर त्याला काही संघटनातत्त्व असले पाहिजे. धर्म, राष्ट्र, वंश ही ती संघटनातत्त्वे असून जगाच्या इतिहासात भिन्न भिन्न लोकांनी त्यांचा स्वीकार केलेला आहे. गेल्या चारपाच शतकांत राष्ट्र हे तत्त्व उदयाला आले आणि आज बहुतेक देश या तत्त्वाच्या आधारेच संघटित होत आहेत. एकभूमी, एक परंपरा, एक भाषा हे राष्ट्रधर्माचे समवंध म्हणून मान्यता पावलेले आहेत. तसेच आपपरभाव हे समुदाय संघटित होण्याचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

भारतीयांनी प्रथम भूमीला माता हे अभिधान दिले. यासंबंधीचे उल्लेख अथर्ववेद, वायुपुराण, विष्णुपुराण, ब्रह्मपुराण यांच्यातील अनेक वचनांत आहेत. पण ही केवळ ग्रंथगत निष्ठा नव्हती तर शिकंदराच्या काळी या राष्ट्रनिष्ठेची कसोटी लागली. कोणतेही संघटनतत्त्व समाजात किती प्रभावी आहे याची खरी कसोटी परकीय आक्रमणाच्या वेळीच लागते. शिकंदराचे भारतावरील भीषण आक्रमण ते रणकुंड आणि त्यातून भारताचे पहिले सम्राट महाराज चंद्रगुप्त मौर्य यांनी निर्माण केलेले अखिल भारताचे पहिले साम्राज्य हे शुद्ध सुवर्ण होय. हिंदू लोक प्रचंड असे संघटित सामर्थ्य निर्माण करू शकतात हे इतिहासकाळात त्या वेळी पहिल्यांदा सिद्ध झाले.

वैदिक धर्माचा आणि भारतभूमीचा कडवा अभिमान लोकांच्या चित्तात असल्यामुळेच आपला धर्म आणि आपली भूमी यांचा शिकंदर शत्रू आहे ही आपपरभावना जागृत झाली. स्वभूमीचे प्रेम व आक्रमकांचा द्वेष या राष्ट्रनिष्ठेच्या दोन बाजू आहेत. राष्ट्रनिष्ठेसंबंधी प्लुटार्क म्हणतो, " लष्करा-इतकाच या फिलॉसॉफरनीही शिकंदराचा पिच्छा पुरविला होता. जे राजे त्याला शरण गेले त्यांची हे ब्राह्मण निर्भत्सना करीत आणि स्वतंत्र राजांना शिकंदराविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न करीत असत." त्यामुळेच अशा कित्येक उपदेशकांना पकडून शिकंदराने फाशी दिले असे इतिहासकार सांगतात.[१०६]

पहिले स्वातंत्र्य युद्ध

शिकंदराच्या मृत्यूनंतर दहा पंधरा वर्षांनी सेल्यूकस निकेटरने भारतावर आक्रमण केले आणि त्याचा चंद्रगुप्त मौर्याने दणदणीत पराभव केला. या काळात हिंदूंच्या संघटित सामर्थ्याचा प्रत्यय आला. म्हणूनच हे युद्ध म्हणजे भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध होते असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात.

पुढे अशोकाच्या काळानंतर डेमिट्रियसने केलेल्या आक्रमणाच्या वेळी बुद्ध धर्माचा प्रभाव वाढला होता. शस्त्रबळाची निंदा, अहिंसेचे प्रेम, ऐहिक ऐश्वर्याचा तिटकारा हे त्रिविध रोग त्या काळी मध साम्राज्याला जडले होते. पण कलिंगाच्या खारवेल राजाने डेमिट्रिसचा पराभव करून त्याला सीमापार पिटाळले. मागाहून आलेल्या मिनँडरच्या वेळी दुबळ्या वृद्धरथ मगध सम्राटाला ठार करून त्याचा सेनानी असलेल्या पुष्यमित्राने मिनँडरचा निःपात केला. दक्षिणेतही पैठणच्या शातवाहना [शालिवाहन] वर शकांची धाड कोसळली. सतत पन्नास वर्षे संघर्ष देऊन पुढे त्याच कुळातला गौतमी पुत्र सातकर्णी याने शकांचा राजा नाहप याला ठार केले. भयंकर आक्रमक कुशाणांचा समुद्रगुप्ताने पूर्ण पराभव केला. शक आणि कुशाण यांच्यापेक्षा हूण अतिशय हिंस्र आणि रानटी होते पण त्यांचाही यशोधर्म्याने निःपात केला. हे सर्व पराक्रम केवळ सैन्याच्या बळावर झालेले नाहीत, यामागे राष्ट्रनिष्ठा होती. समान संकट दिसताच आपसातील क्षुद्र मतभेद, मत्सर, अहंकार यांना विवेकाने जिंकण्याचे सामर्थ्य लोकांत होते. हेच त्यांच्या जिवंतपणाचे, स्वत्वाचे, स्वाभिमानाचे, जागृत निष्ठेचे लक्षण होय.

वैदिक धर्मीयांनी वेदकालापासून राष्ट्रनिष्ठा हे संघटनतत्त्व स्वीकारले होते. गुप्तकालातही त्यांची निष्ठा जिवंत होती. भारताच्या इतिहासात हा चौदाशे वर्षांचा काल हा प्राचीन भारताच्या उत्कर्षाचा कळस होय असे इतिहासकारांचे मत आहे. म्हणूनच त्यांनी या काळाला सुवर्णयुग असे सार्थ नाव दिले.

मध्ययुगीन भारतातील राष्ट्रवादाचे स्वरूप

प्राचीन भारताचा राष्ट्रीय दृष्ट्या परमोत्कर्षाचा इतिहास अवलोकन केल्यानंतर आता मध्ययुगीन भारताच्या राष्ट्रनिष्ठेचा विचार करावयाचा आहे. इ. स. ८०० ते इ. स. १८०० असा एकूण हजार वर्षाचा कालखंड इतिहासकार मानतात. " इहवादीशासन " या ग्रंथात डॉ. सहस्रबुद्धयांनी हाच काळ मान्य केलेला आहे. भारताच्या " कर्तृत्वाला ओहोटी " लागल्याचा प्रत्यय या कालखंडात त्यांना आलेला आहे. या ओहोटीची मीमांसा परखडपणे करताना डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात- " दुसऱ्या कालखंडाच्या आरंभीच नव्या स्मृतींची रचना बंद झालेली दिसून येते. धर्माची परिवर्तनीयता संपली. पुढच्या काळात फक्त निबंधकार म्हणजे स्मृतीचे भाष्यकार झाले. त्यांनी मीमांसकांची समन्वय पद्धती अवलंबून बुद्धिप्रामाण्य संपुष्टात आणले. देशकाल पाहून आपल्या बुद्धीने स्वतंत्र धर्मशास्त्र रचावयाचे ही धमक, ही प्रतिभा,हे बुद्धिस्वातंत्र्य या हजार वर्षाच्या काळात भारतात कोणीही प्रगट केले नाही. विचारस्वातंत्र्य लोपले, हाच याचा अर्थ होय. यांच्या जोडीला निवृत्तिवाद, संन्यासवाद आला आणि ऐहिक आकांक्षाही हळूहळू मंदावल्या व पुढे सुकून गेल्या. अर्थातच मानवी कर्तृत्व हळूहळू मंदावले व पुढे आटून गेले."[१०७]

या काळाचे अत्यंत निराशाजनक चित्र रेखाटताना ते उद्वेगाने म्हणतात, " या हजार वर्षांत राजपूत, विजयनगर, मराठे, शिख यांनी काही असामान्य राज्यकर्ते निर्माण केले व भारताच्या बहुतेक प्रदेशांत ज्ञानेश्वर, तुकाराम, तुळसीदास, कबीर यासारखे काही सत्पुरुष उदयास आले. झाले हिशेब संपला. [१०८]

प्राचीन आर्यांनी जे अलौकिक यश संपादन केले व जो उत्कर्ष साधला त्याला भूमीसंबंधीची जिवंत निष्ठा, वैदिक धर्मसंस्कृतीचा जाज्वल्य अभिमान आणि जगातील सर्व समाजशास्त्रांपेक्षा श्रेष्ठ असलेले भारतीयांचे समाजशास्त्र ही कारणे उपकारक ठरली. या समाजशास्त्राचा दृष्टिकोन सहिष्णू व समावेशक होता. त्यामुळे बळाचा, सक्तीचा वापर न करता खुषीने अनेक जमातींना हिंदु-जातीत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने समाजशास्त्र उपयुक्त ठरले असले तरी दृढीकरणाच्या दृष्टीने ते दुर्बल ठरले हे डॉ. केतकरांचे मत डॉ. सहस्रबुद्धयांनी आपल्या सिद्धांतासाठी मांडलेले आहे. हा दोष सांगताना डॉ. केतकर म्हणतात, " हिंदुसमाजव्यवस्थेतील सर्वात मोठा दोष म्हटला म्हणजे दृढीकरणाची अल्पता होय. अनेक समाज एका संस्कृतीखाली आणण्याचे कार्य झाले पण उत्पन्न केलेले सादृश्य दृढ करावयाचे काम उरले." [१०९]

भिन्न स्वरुपी लोकांचा समुच्चय बनलेला हिंदुसमाज जोपर्यंत भूमी, धर्म आणि राष्ट्र या घटकांवर अधिष्ठित होता तोपर्यंत तो संघटित होता, वैभवशाली होता व स्वतंत्र होता हा डॉ. सहस्रबुद्धे यांनी प्राचीन भारतातील परिस्थितीच्याद्वारे मांडलेला सिद्धांत आहे. मध्ययुगात हे दृढीकरणाचे कार्य झाले नाही म्हणून तो विघटित आणि दुबळा बनला असा निष्कर्ष त्यांनी केतकरांची विधाने देऊन मांडलेला आहे.

भारतीय समाजाच्या विघटनाचा कालखंड

पुढे आठव्या शतकापासून अरबांची भयानक आक्रमणे भारतावर होऊ लागली. याच काळात अरबांनी दक्षिण युरोप आपल्या पराक्रमाने जवळ जवळ जिंकला होता.

पुढे डॉ. सहस्रबुद्धे ऐतिहासिक आधार देऊन म्हणतात, " १००१ पासून हे चित्र पालटू लागले. इ. स. ९८० मध्ये जयपाळाचा पंजाबात पराभव झाला व भारताचे चित्र बदलले. सबक्तगीनने पंजाब घेतला. त्याचा मुलगा महंमूद गझनी याने एकूण सतरा स्वाऱ्या भारतावर केल्या पण एकदाही हिंदूंना त्याचा पराभव करता आला नाही. पुढील तीनशे वर्षे मुसलमानी आक्रमणे अव्याहतपणे चालू होती. भारताचे इ. स. हजार पूर्वीचे वैभव, क्षात्र तेज, शौर्य, धैर्य, त्याचे स्वातंत्र्य व त्याचे दिग्विजय सर्व मावळून दैन्य, दौर्बल्य, पारतंत्र्य, गुलामगिरी, प्रतिकार–शून्यता, मानहानी व स्वत्वशून्यता अशी दोन चित्रे दिसू लागली."[११०]

भारतीय समाजातील दोन प्रवाह

" भारतीय समाजाची विघटना घडून येण्याचे कारण म्हणजे प्राचीन कालापासून भारतात दिसून येणारे दोन विचारप्रवाह. दैववाद, नियती, निवृत्तिवाद, विषमता, दुराभाव, शब्दप्रामाण्य, विकृतधर्म तत्त्वे, या प्रवाहावरोबरच समता, सहकार्य, स्वातंत्र्य, मानवनिष्ठा, बुद्धिवाद, प्रवृत्तिवाद असा दुसराही प्रवाह प्राचीन कालापासूनच भारतीय समाजात होता. प्राचीन कालातील हिंदूंनी पहिल्या प्रवाहाचा जोर वाढू दिला नाही. त्यावर जबरदस्त नियंत्रण ठेवले पण मध्ययुगात मात्र हळूहळू या पहिल्या प्रवाहाचा जोर वाढला. या काळात हिंदुधर्म हा समाजधर्म राहिला नाही तो संपूर्ण व्यक्तिधर्म झाला. सर्वश्रेष्ठ अशा राजधर्माचा समाजाला विसर पडला."[१११]

मध्ययुगीन भारतीय समाजाची स्थिती स्वत्वशून्य, कळाहीन आणि प्रतिकारशून्य झाली असतानाही डॉ. सहस्रबुद्धे यांना कुठे कुठे पौरुषाचे, पराक्रमाचे, स्वाभिमानाचे, तेजस्वितेचे आणि प्रखर प्रतिकाराचेही दर्शन झालेले आहे. हे भाग्य ज्यांच्या वाट्याला आले असे रजपूत, विजयनगरकर,

शिख आणि मराठे यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापनही त्यांनी केलेले आहे. त्याचाच आता थोडक्यात विचार करावयाचा आहे. मुसलमानी आक्रमणामुळे विघटित भारतीय समाज खचून गेला. " हिंदु-समाजातील अनिष्ट तत्त्वांमुळे स्वराज्य आणि स्वधर्म यांचा पूर्वी असलेला संबंध तुटला. हिंदुराजे स्थितप्रज्ञ झाले. मुसलमानी आक्रमणाने सूर्य चंद्र वंश सांगणाऱ्या हिंदुराजांची राज्येच नष्ट केली. इ. स. १३०३ मध्ये अल्लाउद्दिनने चितोडचा विध्वंस केला त्या वेळी राणी पद्मिनीसह १५,००० रजपूत स्त्रियांनी जोहार केला. इ. स. १३२० पर्यंत मलिक काफूर या पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य हिंदूने मुसलमान धर्म स्वीकारल्यानंतर दक्षिणची सर्व राज्ये बुडविली. अशा रीतीने सिंध, पंजाब, दिल्ली, उत्तरप्रदेश, बंगाल, बिहार, गुजराथ, माळवा, मेवाड, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तेलंगण, केरळ अशा सर्व हिंदुस्थानभर मुसलमानी सत्ता स्थापन झाली पण धर्मतत्त्वावर पूर्वीप्रमाणे हिंदुराजांची संघटना होऊ शकली नाही. इ. स. १३६४ मध्ये हसनगंगू बहामनी याने दक्षिणेत गुलबर्गा येथे स्वतंत्र राज्य स्थापन केले."[११३]

राजपूतांचे राष्ट्रीय कार्य

राजस्थानात बाप्पारावळपासून राणासंगापर्यंत जवळजवळ आठशे वर्षे रजपूतांनी मुस्लिम आक्रमणांचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल भारत त्यांचा कायमचा ऋणी राहील यात शंका नाही. परंतु त्यांच्या मर्यादांचा विचारही करणे आवश्यक आहे. एवढी भयानक सतत आक्रमणे होऊनही अखिल राजस्थानचे एकछत्री राज्य त्यांना निर्माण करता आले नाही. रजपूत राजे पराक्रमी, कडवे, त्यागी व प्राणदान करणारे असले तरी संघटित होणे त्यांना जमले नाही. आपसातील नित्य स्पर्धा व कलह यांच्यातच त्यांची शक्ती क्षीण होत होती. विचित्र मानापानाच्या कल्पनांचा जबरदस्त पगडा त्यांच्या मनावर बसला होता. स्वराज्य व स्वधर्म यांचा त्यांना विसर पडला होता. व्यक्तिदृष्ट्या ते धर्मनिष्ठ होते पण धर्म हा समाजाच्या अभ्युदयासाठी असतो, संघटनेसाठी असतो, ते एक संघटना तत्त्व आहे याची जाणीवच त्यांना झाली नाही. " रजपूत तेवढा मेळवावा व हिंदुधर्म रक्षावा " हे तत्त्व त्यांच्या लक्षात आले नाही. या राण्यांचे क्षत्रियत्व मोगलांची सत्ता मजबूत करण्यात व पुढे पुढे त्यांच्या घराण्याशी विवाह करण्यात खर्ची पडले. रजपुतांचे कर्तृत्व हे मोठे असले तरी ते वैयक्तिक कर्तृत्व होते असा निष्कर्ष डॉ. सहस्रबुद्धे यांनी काढला असून तो चिंतनीय नाही असे कोण म्हणेल ?[११४]

विजयनगरचे सम्राट

स्वराज्य आणि स्वधर्म यातील सामाजिक अभ्युदयाचे अनुसंधान सुटल्याने महापराक्रमी रजपुतांच्या गुणांचा राष्ट्रनिर्मितीसाठी उपयोग होऊ शकला नाही. धर्म हे महत्त्वाचे सामाजिक व अभ्युदयाचे संघटनतत्त्व आहे याची जाणीव चौदाव्या शतकातील विद्यारण्य तथा माधवाचार्य या " संन्याशाला " झाली. मुसलमानांनी बळजबरीने बाटविलेल्या हरहर आणि बुक्क या कांपिली देव राजाच्या सरदारांना शुद्ध करून हिंदुधर्मात घेतले आणि मग विद्यारण्यांच्या मार्गदर्शनाखालीच या सरदारांनी विजयनगरच्या राज्याची स्थापना केली. तुंगभद्रेच्या दक्षिणेस कर्नाटक, आंध्र, तामीलनाडू व केरळ या चार प्रदेशांवर एकछत्री साम्राज्य स्थापन केले. त्यासाठी अविरत तीनशे वर्षे संग्राम केला आणि मधून मधून विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा येथील बहामनी राज्यावर आक्रमण करून त्यांची सत्ता काही काळ खिळखिळी करून टाकली. विद्यारण्यांचे गुरू शृंगेरीचे शंकराचार्य विद्यातीर्थ यांनी दक्षिणेत आठ पीठे स्थापन करून प्रत्येक ठिकाणी एका थोर संन्याशाची नियुक्ती

करून त्या सर्वांचे मुख्य म्हणून विद्यारण्यांची नेमणूक केली. मुस्लिमांच्या आक्रमणापासून हिंदुधर्माचे रक्षण व्हावे ही तीव्र इच्छा दक्षिणेतील हिंदूंच्या सर्व जातींत निर्माण झाली होती.

"बुक्काच्या कारकिर्दीत वेदविद्यांचे संशोधन करण्यासाठी विद्यारण्यांच्या नेतृत्वाखाली एक पीठ निर्माण करण्यात आले. त्याने जैन व वैष्णव यांच्यातील वैषम्य नष्ट केले. विद्येप्रमाणेच लष्करी यंत्रणाही कार्यक्षम केली. कृष्णदेवरायानंतर आलेल्या रामराजाच्या कारकिर्दीत तर बहामनी राजांवर सतत आक्रमणे होत होती. १५५७ साली आदिलशहा व कुतुबशहा यांनी रामराजाच्या साहाय्याने निजामशाहीवर हल्ला केला. त्या वेळी रामराजाच्या हिंदुसैन्याने अनेक मशिदींचा विध्वंस केला व मुस्लिम स्त्रियांची विटंबना व कुराणाचा अवमान करताच मुसलमानांना आपली चूक जाणवली आणि धार्मिक तत्त्वावर पुढे मुसलमान सत्ता एकत्र झाल्या व राक्षस तागडीच्या लढाईत त्यांनी विजयनगरच्या साम्राज्याला जबरदस्त तडाखा दिला. या अपघातानंतरही विजयनगरचे हिंदु राज्य बराच काळ अस्तित्वात होते. पुन्हा १६५२ मध्ये परत मुसलमानी सत्तांनी आक्रमण करून विजयनगरच्या हिंदुसत्तेचा समूळ उच्छेद केला. हे हिंदुराज्य बुडविण्यात मुसलमानी सरदारांचा प्रमुख हात होताच परंतु त्यांना साहाय्य करण्याचे कार्य शहाजी राजे भोसलेही प्रामुख्याने करीत होते."[११५]

शिखांचे कार्य

राजपूत सत्ता, विजयनगर सत्ता या दोन्हीही मुसलमानांनीच बुडविल्या. कारण प्राचीन राष्ट्रीय भावना हिंदूंच्या ठायी नव्हती. स्वराज्य व स्वधर्म यांचे अद्वैत त्यांना समजले नव्हते. ते काही प्रमाणात भारतात शिखांना समजले आणि त्यांनी मुसलमानी सत्तेशी सुमारे दोन अडीचशे वर्षे प्रखर संघर्ष केला. त्यांचा इतिहासही पराक्रमांनी भरलेला आहे. त्यांची सुरुवात गुरू अंगदापासून झाली आणि बंदा बैरागी व रणजितसिंग यांच्यापर्यंत टिकून राहिली. मुस्लिम आक्रमणाचा प्रतिकार करणारी पंजाबात एक स्वतंत्र शक्ती शिख गुरूंनी निर्माण केली, हे त्यांचे मोठे यश होय. गुरू अंगद, गुरू अर्जुन, गुरू तेगबहादूर, गुरू गोविंदसिंग, बंदा बैरागी यांनी अत्यंत शौर्याने मुस्लिम सत्तेशी सामना करून हजारोंचे बलिदान केले. पंजाबात शिखांचा उदय झाला नसता तर सिंध, बलुचिस्तान, अफगाणिस्तान यांच्याप्रमाणेच पंजाब, पेशावर, काश्मिर हे प्रदेश हिंदुत्व, हिंदुसंस्कृती आणि हिंदुस्थान यांना मुकले असते.

शिख गुरू आणि त्यांचे अनुयायी यांनी आपल्या बलिदानाने भारतावरचा तो अनर्थ टाळला. एका फार मोठ्या भयानक विपत्तीतून हिंदुसमाजाचे शिखांनी रक्षण केले. पण शिखांनी प्रारंभी घडविलेली सामाजिक क्रांती, स्वसमाजाला प्राप्त करून दिलेली अस्मिता, धर्मासाठी त्यांनी केलेले बलिदान यांचा विचार करता हे त्यांचे यश फार मर्यादित आहे. कारण ते हिंदूंपासून फुटून बाहेर पडले. इतरांपासून विभक्त व अंतरात असंघटित राहिल्यामुळे अस्मिता असूनही शीख प्रभावी होऊ शकले नाहीत. उलट केस, कृपाण, कच्छ कडे या निर्जीव आचारांनाच प्राधान्य दिले.[११६] यामुळे शिखांना अखिल भारतात क्रांतीची बीजे पेरताच आली नाहीत.

महाराष्ट्राची परंपरा

महाराष्ट्राचे कार्य, महाराष्ट्राची परंपरा व महाराष्ट्राचे जीवन ही सर्व भारतीय जीवनपरंपरेत समाविष्ट आहेत, कारण भारताचा आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास एक आहे. परंपरा, संस्कृती, तत्त्वविचार, समाजरचना आणि जीवनमूल्ये या दृष्टीनेही भारत व महाराष्ट्र यात

अंतर नाही. विशिष्ट भूप्रदेश, भाषा आणि आचारविचार यामुळेच एखाद्या प्रदेशाला वैशिष्ट्य प्राप्त होत असल्यामुळे ती वैशिष्ट्ये इतर भारतातर्गत असलेल्या प्रदेशांप्रमाणेच महाराष्ट्रातही आहेत. "प्रादेशिक व्यक्तिमत्त्व हे प्राधान्याने भाषेवरून ठरत असते. प्रत्येक प्रदेशाचे मातृभाषा हे त्या वैशिष्ट्याचे प्रतीक असल्यामुळे तिच्यात ते मुख्यतः निहित असते व तिच्याद्वारेच ते व्यक्त होते. अशा या भौगोलिक व सामाजिक शक्तींनी बनविल्या गेलेल्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाला त्या त्या भाषेत अभिव्यक्ती लाभलेली असते आणि जो जो जीवनानुभव भाषेमध्ये व्यक्त होतो तो तो पुढील जीवन संस्कारित करतो."

"प्रादेशिक परिस्थिती, तिच्यामुळे निर्माण झालेली परंपरा, तिची अभिव्यक्ती व या अभिव्यक्तीने संस्कारित झालेले व्यक्ती मन यांची एक अभेद्य साखळी असते."[११७] हे सर्वसामान्य विवेचन भारतातील कोणत्याही प्रदेशाच्याबाबतीत सांगता येईल. महाराष्ट्राच्याबाबतीतही ते तितकेच खरे आहे. भारतासारखीच हजारो वर्षांची ऐतिहासिक परंपरा महाराष्ट्रालाही आहे. दण्डकारण्य, दक्षिणापथ ही नावेच त्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देणारी आहेत. गंगावाडी, नाशिक, कोल्हापुरानजीक ब्रह्मगिरी आणि संगमनेरजवळील जोवे ही स्थाने तर प्रागैतिहासिक आदि पाषाण युगातील म्हणजे इ. स. पूर्व पाच लक्ष ते तीस लक्ष वर्षांइतकी पुरातन असल्याचे पुरातत्त्वकोविद सांगतात. डॉ. भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे, डॉ. पां. वा. काणे, डॉ. श्री. व्यं. केतकर, म. म. वा. वि. मिराशीप्रभृती लेखकांनी प्राचीन महाराष्ट्रासंबंधी विविध प्रकारचे संशोधन करून त्याच्या स्थलकालाचा, राजघराण्यांचा आणि सांस्कृतिक जीवनाचा इतिहास मांडलेला आहे तो अभ्यासकांना सुपरिचित आहे. "वसाहतकाल हा सामान्यतः शकपूर्व चारशे–पाचशे वर्षातील असला पाहिजे. हा समाज चातुर्वर्ण्याधिष्ठित व वतनबद्ध असे. चातुवर्ण्याचे ज्यात रक्षण होईल असे राज्य स्थापन करणे व वाढविणे, त्यासाठी जरूर तर नव्या नव्या वसाहती स्थापन करणे, या कामी रट्ट हे नेतृत्व करीत त्यांच्या हेतूस "महाराष्ट्र धर्म" हे नाव प्राप्त झाले."[११८]

यादव पूर्वकाळात महाराष्ट्रात बदामी चालुक्य, राष्ट्रकूट, सातवाहन, अभीर, वाकाटक, शिलाहार, मुंड इत्यादी राजवंशाचे राज्य होते. याबद्दल इतिहास पंडितांत एकमत आहे. सातव्या शतकात म्हणजेच सुमारे १३०० वर्षांपूर्वी हुयेनसंग या चिनी फिरस्त्याने मराठ्यांच्या स्वभावाविषयी मोठे मार्मिक वर्णन केलेले आहे. तो म्हणतो, "मराठे हे राहणीचे इमानदार लोक आहेत, ते गर्विष्ठ आणि आतल्या गाठीचे आहेत. ममतेने वागविल्यास त्यांच्या कृतज्ञतेची कोणीही हमी घ्यावी. पण जर का कोणी त्यांना अपाय केला तर मात्र त्यांचा काटा काढायला ते मागेपुढे पाहणारे नव्हेत. इभ्रतीला किंवा अब्रूला लागलेला अथवा लावलेला कलंक पुसून काढण्यासाठी ते आपल्या प्राणांचीही तमा बाळगीत नाहीत. संकटात सापडलेल्यांनी त्यांना हाक मारली तर त्यांना वाचवायला ते आपल्या जीवाचीही कुर्बानी करतात. अन्यायाचा सूड उगवायचा असेल तर शत्रूला तसे आधी स्पष्ट इषाऱ्याने कळवून मगच ते त्याच्यावर हात टाकतात. लढाईत पळत्या शत्रूचा पाठलाग करीत असताना शरण येतील त्यांना कदापि ते मरण देणार नाहीत. मराठे लोक चांगले विद्याव्यासंगी आहेत आणि त्यांच्यात पाखंडयांचा (स्वतंत्र मतवाद्यांचा) भरणा बराच आहे." [११९]

मराठे लोकांची वैशिष्ट्ये

मराठे लोकांची वैशिष्ट्ये सातव्या शतकापासून इतिहासकारांना ज्ञात असली तरी महाराष्ट्राची अखंड परंपरा यादवकाळी निर्माण झाली. बहामनी कालात तिला ग्रहण लागले. शिवकालात पुन्हा

ती आपल्या तेजाने चमकली आणि पेशवेकालात तिने सर्व हिंदुस्थानभर आपली चमक दाखविली. भारतातील सर्व प्रदेशांत आपल्या नजीकच्या भूतकाळातील कामगिरीबद्दल ज्याला सर्वात अधिक अभिमान वाटावा अशी महाराष्ट्राची कामगिरी आहे. महाराष्ट्राच्या लोकांच्या हातून हे जे अभिमानास्पद कार्य घडून आले याचे मूळ राजनीतिज्ञ महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीत आणि इतिहासात असल्याचे सांगतात.

दुसरी गोष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे म्हणा वा परंपरागत वृत्तीमुळे म्हणा महाराष्ट्राला व्यापारउदीम किंवा उद्योगधंदे या व्यवसायात विशेष प्रगती करता आली नाही. साहजिकच स्वाभिमान आणि बुद्धिमत्ता यांना पुरेसा वाव मिळेल असे क्षेत्र म्हणजे राजकारण व शासनव्यवस्था हेच महाराष्ट्राचे प्रमुख कार्यक्षेत्र बनले. महाराष्ट्राचा पिंड "राजकीय" का बनला याचे उत्तर महाराष्ट्राच्या इतिहासामध्येही शोधले पाहिजे. महाराष्ट्राचा आतापर्यंतचा इतिहास स्वातंत्र्याचा किंवा स्वातंत्र्यसंपादनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा इतिहास आहे. इंग्रज अंमल स्थिर होण्यापूर्वी भारतामध्ये जे समाज स्वातंत्र्य उपभोगित होते त्यात महाराष्ट्र अग्रेसर होता.

"भारतातील बऱ्याच भागांत इंग्रजांनी मराठ्यांकडूनच राजसत्तेचा तावा घेतला. इंग्रजांपूर्वी भारतामध्ये देशीराज्य प्रस्थापिण्याचा मोठा प्रयत्न मराठ्यांनीच केला व तो काही प्रमाणात यशस्वी झाला. वैभवशाली राजकीय इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा लाभल्यामुळे त्याची अस्मिता मोठी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये नेहमी ठळकपणे व्यक्त होत असलेली वैशिष्ट्ये स्वाभिमान आणि अन्यायाची चीड ही या अस्मितेची प्रतीके होत."[१२०]

मराठ्यांच्या अस्मितेची प्रतीके

स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अन्यायाची चीड ही अस्मितेची प्रतीके निर्माण करण्याचे श्रेय हिंदुपदपातशाही स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना आहे. श्री. शिवाजी महाराजांनी हे कार्य महाराष्ट्रातील लोकांच्या मनात स्वदेश आणि स्वधर्म यांचे नवीन वारे भरून, त्यांच्या पांगलेल्या शक्तीला संघटित करून आणि परिस्थितीचे खरे स्वरूप समजावून घडवून आणले. म्हणूनच न्या. रानडे "मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष" या ग्रंथात म्हणतात, "मराठ्यांचा इतिहास म्हणजे एका खऱ्या हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास होय. ह्या राष्ट्राने मुसलमानी लोकांच्या धांगडधिंग्याच्या क्षुब्ध झालेल्या तरंगांतून आपले डोके खूप वर उचलले. पुढारी लोकांच्या प्रयत्नास जो मागून मोठा पाठिंबा मिळाला तो हाच आणि ह्या राष्ट्रोदयाच्या आधारस्तंभामुळेच महाराष्ट्र मंडळाच्या अग्रणीस वाटले की इतर एतद्देशीय सत्ता एकत्र करून आपल्या मुठीत आणता येईल आणि दिल्ली येथे मुख्य हिंदुपातशाहीची स्थापना करता येईल."[१२१]

महाराष्ट्रातील राष्ट्रवादी परंपरा

मराठ्यांच्या सत्तेला न्या. रानडे हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास म्हणतात. यातून रानड्यांना आधुनिक अर्थाने राष्ट्रवादाचा उदय सुचवावयाचा होता असे दिसते. कारण न्या. रानडे म्हणतात, "जेव्हा एकूण एक माणसाच्या हृदयात राष्ट्रवादाचे बीज पेरले जावे किंवा स्वत्वाचा भक्कम आणि खोल पाया बसावा, तेव्हाच असे अलौकिक पराक्रम घडून येतात. राष्ट्रीकरण म्हणून ज्यास नाव देता येईल अशा प्रकारची एक विलक्षण वृत्तपरंपरा घडून आली, त्यामुळेच मराठी सत्तेचा प्रथमारंभ झाला. प्रथमतः लोकांत स्वत्वाची जागृती झाली. नंतर आपण एकाच जातीचे, एकच भाषा बोलणारे

आणि एकाच ग्रंथसमूहास पूज्य मानून अध्ययन करणारे असे आहो अशा प्रकारची ऐक्यप्रवर्तक बुद्धी उत्पन्न झाली. हिंदुस्थानमध्ये अशा प्रकारच्या स्वराष्ट्रस्थापनेचा प्रयोग महाराष्ट्रमंडळात प्रथमतः झाला आणि पहिला प्रयत्न म्हणून त्या इमारतीत जितका भरीवपणा यावा तितका आला नाही."[१२२]

आधुनिक राष्ट्रवादाच्या लक्षणांचा साक्षात्कार

एवढा उतारा देण्याचे मुख्य कारण असे आहे की, त्यावरून न्या. रानडे यांच्या मनातील आशय स्पष्ट व्हावा. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नात रानडयांना आधुनिक राष्ट्रवादाची लक्षणे आढळली. " सगळी लोकसंख्या नवीन विचारांनी उंचवळली " या वाक्याला विशेष अर्थ आहे. एक ध्येय, एक धर्म, एक भूमी, एक भाषा, एक संस्कृती, एक परंपरा, एक वाङमय आणि समान सुखदुःखे, समान रागद्वेष, समान भूत आणि समान भविष्य, समान आकांक्षा यांनी युक्त असा लोकसमुदाय म्हणजेच राष्ट्र असे सर्वसाधारण राष्ट्राचे स्वरूप सांगता येते. रानडयांच्या मते ते सर्वच घटक एकत्र आले आणि आपण सर्व एक आहोत ही भावना निर्माण झाल्यामुळेच मराठयांनी राष्ट्र-निर्मिती केली. ही एकजूट घडून येण्याचे मुख्य कारण म्हणजे परकीयांनी केलेले अत्याचार, जुलूम हेच होय. जोपर्यंत सर्वांचे हितसंबंध एक होत नाहीत तोपर्यंत राष्ट्रीय ऐक्य घडून येत नाही. मराठयांच्या जीवनमरणाचा प्रश्न मुसलमानी आक्रमणाने निर्माण केला होता. त्यामुळेच त्यांचे ऐक्य झाले व मराठी सत्ता उदयाला आली. महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे मूळ या मराठयांच्या परंपरेत आहे हे मान्य केले म्हणजे या परंपरेच्या आधारावरच पुढील काळात महाराष्ट्राने केलेल्या राष्ट्रीय कार्याची कल्पना येऊ शकते.

संत मंडळीचे कार्य : भिन्न भिन्न मते

युरोपातील राष्ट्रवादाचा उदय सोळाव्या शतकातील रिनॉसन्स आणि रिफार्मेशन या चळवळीतून झाला हे आपण पाहिले आहे. न्या. रानडयांनी युरोपातील या धर्मसंशोधनाच्या चळवळीशी पंधराव्या व सोळाव्या शतकातील महाराष्ट्रीय संतांनी केलेल्या धार्मिक चळवळीचे साम्य असल्याचे बाखवून संतांच्या धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीतून मराठयांच्या राज्याची स्थापना झाल्याचे आपले मत मांडले आहे. " या धार्मिक चळवळीत उच्च वर्गातील लोकांप्रमाणेच हीन समाजांतील लोकही होते," असे सांगून नामदेवापासून चोखामेळयापर्यंतच्या संतांची नावे दिलेली आहेत. "राजकीय पुढारी या धार्मिक पुढाऱ्यांच्या सल्ल्याने वागत असत. शिवाजीचा मुख्य उपदेशक रामदास होता व त्याच्या अलौकिक धोरणामुळे समर्थ अशी संज्ञा प्राप्त झाली होती."[१२३] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आधुनिक राष्ट्रवादाचा उदय शिवाजी महाराजांच्या काळी महाराष्ट्रात झालेला होता असेच न्या. रानडे यांना सांगावयाचे आहे.

संतांच्या कार्यासंबंधी विवेचन करताना डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात, " या तीनशे वर्षांच्या काळात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम हे संत महाराष्ट्रात समाजाचे धर्मक्षेत्रातील नेते होते. पण हे संत व त्यांचे अनुयायी पूर्णपणे निवृत्तिवादी होते. संसार, स्त्री, पुत्र, धन, वित्त, राज्य, ऐश्वर्य यांची त्यांनी कमालीची निंदा केली आहे. त्यांचा भक्तिमार्ग हा व्यक्तिधर्म होता. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे भागवतधर्म हा मूळचा प्रवृत्तिवादी, गीतेतला कर्मयोग तो हाच होय." " शिव छत्रपतींनी पतित शुद्धी, समुद्रपर्यटन कलियुगातील क्षत्रियांचे अस्तित्व व ब्राह्मणाचे जन्मसिद्ध श्रेष्ठत्व, यासंबंधीचे धर्मशास्त्र धिक्कारले नसते तर स्वराज्याची स्थापना झाली नसती."[१२४]

न्या. रानडे आणि डॉ. सहस्रबुद्धे दोघेही राष्ट्रवादी लेखक आहेत पण संतांच्या कार्याबद्दल तसेच मराठी सत्तेच्या उदयाबद्दल दोघांच्याही मनात अंतर असल्याचे दिसून येते. संतांच्या धार्मिक चळवळीने स्वतंत्र राजकीय सत्तेची पार्श्वभूमी निर्माण केली असे रानड्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे। तर भागवत धर्मीय संतांनी निवृत्तिवाद, दैववाद, संन्यासमार्ग लोकांना शिकविला असा आक्षेप घेऊन व राजवाड्यांचे मत मान्य करून विजयनगरच्या कार्याला महत्त्व दिलेले आहे. डॉ. सहस्रबुद्धे इतर संतांपासून रामदासांना वेगळे काढतात. त्यांच्या मते प्रवृत्तिमार्गाची, ऐहिकतेची, ऐश्वर्याची आणि पुरुषार्थाची शिकवण देण्याचे कार्य केवळ एकट्या समर्थांनी केले आणि त्यामुळेच मराठ्यांची स्वतंत्र सत्ता अस्तित्वात आली.

मराठ्यांच्या सत्तेच्या उदयाची कारणमीमांसा

महाराष्ट्रात मराठ्यांच्या सत्तेच्या उदयाला परिस्थितीची अनुकूलता एकराष्ट्रीयत्वाची जागृती आणि युद्धशास्त्राचे नैपुण्य ही त्रिविध कारणे पोषक ठरली असा निष्कर्ष "वैदिक संस्कृतीची पुनर्घटना" आणि "मराठ्यांचा उदयास्त" या ग्रंथांतून श्री. अप्रबुद्धांनी काढलेला आहे. श्री. अप्रबुद्धांनी काढलेला निष्कर्ष वस्तुनिष्ठ स्वरूपाचा वाटतो. तो मान्य केला नाही तर अनेक प्रश्नांची गुंतागुंत होते आणि निर्णय करणे अशक्य होते. भौगोलिक प्रदेशाची अनुकूलता, डोंगराळ मुलुख, किल्ले हे मराठ्यांचे बळ होते. मुसलमान शौर्यात वरचढ असले तरी या दुर्गयुद्धात ते मराठ्यांपुढे टिकू शकले नाहीत कारण मराठ्यांचे युद्धशास्त्र श्रेष्ठ होते. मेवाडने आपल्या कुवतीप्रमाणे मोगली सैन्याचा ओघ वर्षानुवर्षे अडकवून ठेवला होता. त्याचा फायदा मराठ्यांना अनायासेच मिळाला. विजयनगरकरांनी बहामनी राज्यांवर वारंवार आक्रमणे करून त्यांना खिळखिळे केले होते. या बहामनी राजवटीमुळेच मराठ्यांना कधीच स्वस्थता लाभलेली नव्हती आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राने आपले स्वत्व गमावले नव्हते. साक्षेप करून, बाहेर पडून पराक्रम करण्याची आणि इतर प्रदेशांना मदतीचा हात देण्याची शक्ती मराठ्यांमध्ये होती. बहामनी राजवटीतच मराठा सरदारवर्ग अस्तित्वात आला त्याला राज्यव्यवस्थेचे प्रशिक्षण मिळाले. महाराष्ट्रातील लोकांची स्थिती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या काळात अतिशय विकट होती. बारा वर्षांच्या दुष्काळाने लोक जीवनाला कंटाळले होते. त्या परिस्थितीचे मोठे विदारक चित्र समर्थांनी रेखाटलेले आहे.

नसे आंथराया नसे पांघराया। नसे धाम ना दृढ छाया निजाया।
नसे अन्न खाया, नसे रम्य जाया। वृथा शीण संसार कर्ती रडाया ॥१॥

नसे द्रव्य काही, घरी धान्य नाही। बहुवेष्टिला काम, क्रोधादि देही।
पराधिनता वेळ नाही मराया। वृथा शीण संसार कर्ती रडाया ॥२॥

या दारुण अवस्थेतच महाराष्ट्रात राष्ट्रीय ऐक्याची निर्मिती झाली. कारण सर्वांच्या मरणाचा प्रश्न होता. ही आपत्ती समान होती आणि संघटित झाल्याशिवाय या आपत्तीतूनच मार्ग नव्हता. त्यातून महाराष्ट्रात स्फूर्तीची लाट उत्पन्न झाली, पुढारी मिळाला आणि समाजातील खालचे स्तर क्रांतीकरता सज्ज झाले. त्यात वारकरी धारकरी दोन्ही वर्ग सामील झाले होते.

या वेळच्या क्रांतीची गती एकमेकांच्या उलट होती, राज्यक्रांती ही समाजाच्या खालच्या थरापासून वरच्या थरापर्यंत जाते आणि विचारक्रांती समाजाच्या वरच्या थरातून झिरपत खालच्या थरात पसरते म्हणजे तिची गती वरून खाली असते. अशा दोन गतींनी सारा समाज, समर्थ व शिवाजी

महाराज या दोन महापुरुषांनी खळवळून सोडला आणि महाराष्ट्रात स्वतंत्र सत्तेचा उदय झाला.[१२५] त्याचा नव्या वर्णनिर्मितीशी, निवृत्तिमार्गाशी, जातिव्यवस्थेशी, कर्मकांडाशी, संन्यासमार्गाशी काहीच संबंध नव्हता. मूळ समाजव्यवस्थेत कोणताही जमीन अस्मानचा बदल झालेला नव्हता. समर्थांनी देखील जातीभेद व चातुवर्ण्य सोडा असा कुठेही उपदेश केलेला नाही. श्री. शिवाजी महाराजही जुन्या परंपरेच्या विरुद्ध गेले नाहीत. राष्ट्रीय ऐक्य, परिस्थितीशी अनुकूलता आणि युद्ध-शास्त्राचे कौशल्य यामुळेच हे स्वराज्याचे उत्थान घडून आले असे मानावे लागते. "इंग्रज व मराठे" या ग्रंथाचे लेखक न. चि. केळकर यांनीही असाच निर्वाळा दिला आहे. या ग्रंथाचे प्रस्तावनालेखक इतिहासाचार्य ग. ह. खरे यांनीही हेच मत व्यक्त केले आहे. या सूत्राच्या आधारेच राजपूतांच्या विजय नगरच्या आणि शिखांच्याही पराभवाची मीमांसा करता येते. मराठ्यांचा पुढे पराभव झाला त्याचे कारण ही सूत्रे जोपासली गेली नाहीत यामुळेच झाला असे म्हणता येते.

विपरीत इतिहास सांगणारे तर्कतीर्थ जोशी

जातिभेद किंवा वर्णव्यवस्था ही मोडकळीला येऊन शिवशाहीची स्थापना झाली हे मत कसे भ्रांत आहे, हे महाराष्ट्र सरकारचे इतिहासलेखनाचे नवे धोरण यासंबंधीचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि इतिहासाचार्य ग. ह. खरे यांचा १९७२ मध्ये जो वाद झाला त्यावरूनही स्पष्ट होते. "महाराष्ट्र टाइम्स"च्या ३ सप्टें. १० सप्टें आणि ८ आक्टो. १९७२ मध्ये तो चर्चिला गेला. तर्कतीर्थांना उत्तर देताना. खरे लिहितात, "शिवाजी महाराजांनी येथील लोकांना हाताशी धरून स्वराज्य स्थापिले, जातिभेद त्यांच्या आड आला नाही. कोणत्या श्रेष्ठ जाती, कोणत्या कनिष्ठ जातींवर कसा, कोणता जुलूम करीत हे पुरावे देऊन दाखविले पाहिजे, ब्राह्मणापासून ते महार, मांग, चांभार इत्यादी जमातीपर्यंतचे मेहत्रे न्याय करण्यासाठी कधी कधी गावदेवाच्या देवळात बसून न्यायदानाचा महजर करून देत असत ते कसे काय होत असेल ? जुन्या काळात एका जमातीने दुसऱ्या जमाती-विरुद्ध उठाव केल्याचे आढळत नाही.....त्या वेळी आजच्याएवढी संपत्तीची विषम वाटणी झाली नव्हती." सांगण्याचा मुद्दा असा, स्वराज्य स्थापन करण्याच्या आड जातिभेद आला नाही, व पुढे मराठ्यांच्या सत्तेचा अस्त झाला त्यालाही जातिभेद कारण झाला असे म्हणण्यासारखा पुरावा नांही.

एक ऐतिहासिक सत्य–जातिभेद, चातुवर्ण्य हिंदवी स्वराज्याच्या आड आले नाही

जातिभेद, चातुवर्ण्य जसे हिंदवी स्वराज्याच्या आड आले नाही तसा निवृत्तिवादही आड आलेला नाही. वास्तविक अहिंसेचा अतिरेक जैनधर्मी लोकांनी केला आणि "सर्वं दुःख सर्वं क्षणिकं" हे तत्त्वज्ञान सांगून बौद्ध धर्मियांनी निवृत्तिवादाची विचारसरणी लोकांत प्रचलित केली. परंतु बौद्ध धर्मातूनच निघालेल्या हीनयान पंथाने काही प्रमाणात वैदिक धर्माचेच धोरण स्वीकारले अ इति-हासाचे अभ्यासक म्हणतात. वारकरी आणि धारकरी या दोघांनीही स्वराज्यनिर्मितीच्या कार्यात खांद्याला खांदा लावून सहकार्य केले. वारकऱ्यांचा पंथ वेगळा आणि समर्थांचा वेगळा असेही समजण्याचे कारण नाही. समर्थांनी ऐहिकवाद शिकविला, आणि निवृत्तिवादाचा निषेध केला अशा प्रकारचे जे प्रतिपादन डॉ. सहस्रबुद्धे यांनी केले आहे, आणि त्याला आधार म्हणून "राजगुरू समर्थ रामदास" या डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या ग्रंथाचा हवाला दिलेला आहे तो तर्कशुद्ध वाटत नाही. डॉ. पेंडसे म्हणतात, "ज्ञानदेवांप्रमाणेच गीतेतील ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचा पुरस्कार समर्थांनी कसा केला ते यथाशक्ती यथाबुद्धी या ग्रंथात दाखविले आहे."[१२६]

वस्तुस्थिती अशी आहे की आधी मराठेशाहीचा अस्त झाला आणि नंतर या अस्ताची वा पराभवाची कारणे आमचे विचारवंत शोधू लागले. पाश्चात्य शिक्षणाने प्रभावित होऊन आणि त्यांचे समाजशास्त्र, राज्यशास्त्र इतकेच नव्हे तर त्यांनी मांडलेले सिद्धान्त जसेच्या तसे स्वीकारून आम्ही आमच्या पराभवाची मीमांसा करू लागलो. त्यांनी सामाजिक विषमता हे कारण सांगताच आम्हाला ते एकदम पटले. त्यांनी जातिभेद, जन्मनिष्ठ वर्णव्यवस्था हे समाजाच्या विघटनाचे कारण सांगताच आम्हाला ते यथार्थ वाटले. राष्ट्रविषयक कल्पना तुमच्याकडे नाही असे म्हणतात, आम्ही ते स्वीकारले. वर्णश्रेष्ठत्वाची कल्पनाच भारतीयांच्या विषमतेचे मूळ आहे असे त्यांनी सांगताच आम्हाला ते पटले. वास्तविक राज्यशासनव्यवस्थेची अतिशय महत्त्वाची तत्त्वे आम्हाला शिवाजी महाराजांनी शिकविली होती. प्रत्यक्ष राज्यसंस्था निर्माण करून दिली होती. हक्काचे स्वातंत्र्य मिळवून दिले होते. विशिष्ट प्रकारची गनिमी काव्याची युद्धपद्धती महाराजांनीच आम्हाला शिकविली.

लोकशाही पद्धतीचे हिंदवी स्वराज्याचे ध्येय

इतकेच नव्हे तर ज्याला आपण आज लोकशाही शासनव्यवस्था म्हणतो तशा स्वरूपाचे राज्ययंत्र निर्माण केले होते.

" हिस्टरी ऑफ मराठा पीपल " या किंकेड पारसनीस यांच्या ग्रंथाचा हवाला देऊन श्री. के. रा. पुरोहित सांगतात, " शिवाजी महाराजांनी सैन्याची व्यवस्था इतकी सुसज्ज व प्रभावशाली ठेवली होती की ईस्ट इंडिया कंपनीतील ब्रिटीश लष्करी अधिकाऱ्यांनी त्या पद्धतीचे केलेले अनुकरण यशस्वी झाले. इतकेच नव्हे तर, ब्रिटीश आमदानीतील सैन्यरचनाही याच पद्धतीत सुधारणा करून ठरविण्यात आली असल्याचे इतिहासकार सांगतात. शिवाजी महाराजांनी आपले राज्याचे व सैन्याचे ध्येय राज्यारोहणप्रसंगी जाहीर करताना स्पष्ट सांगितले होते की, लाचलुचपत अगर विश्वासघात त्याचप्रमाणे कार्यातील दिरंगाई सैन्याच्या शिस्तीला धरून ठरणार नाही, वारसा हक्काने बापाच्या गादीवर मुलगा बसणार नाही, त्याचप्रमाणे सैन्याधिकारी अगर मंत्री यांच्याही मुलांना लायकी सिद्ध झाल्याखेरीज तसा हुद्दा मिळणार नाही. प्रत्यक्ष आपल्यामागे संभाजी महाराजांनाही राज्याचा वारसा मिळावा असा उल्लेख त्यांनी कधीही केला नाही. यावरून लोकशाहीचे ध्येय हे शिवाजी महाराजांच्या हिंदुपदपातशाहीचे ध्येय होते असे अनेक बखरीतून लिहिलेले आढळून येते." [१२७]

मराठेशाहीच्या अस्ताची मीमांसा

राज्यसंस्था, हक्काचे स्वातंत्र्य, गनिमीपद्धतीचे युद्धतंत्र, पहिल्या देणगीत सरंजामदारी न देण्याची प्रथा, धर्माकरिता राज्य व पराक्रम आणि स्वकीयाविरुद्ध परकीयांची मदत न घेणे ही प्रमुख तत्त्वे शिवाजी महाराजांनी सांगितली होती. सैन्यासंबंधीचे धोरण आताच आपण पाहिले आहे. परंतु शिवाजी महाराजांच्या अकाली निधनानंतर राजारामाच्या कारकिर्दीतच सरंजामदारीला सुरुवात झाली. धर्माकरिता, स्वराज्याकरिता पराक्रम हे तत्त्व अस्तंगत झाले आणि वतनाकरिता मराठे सरदार पराक्रम करू लागले. एकराष्ट्रीयत्वाचे सूत्र सुटले. ज्या जातीयवादाने आमचा नाश केला असे सांगितले जाते ते जातीयवादाचे भूत ताराबाईच्या कारकिर्दीत निर्माण झाले. बाळाजी विश्वनाथाने ताराबाईच्या मुलाला गादीवर बसविण्याचे नाकारलेल्या व्यक्तिद्वेषातून ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाची सुरुवात झाली.

मराठेशाहीच्या आयुष्यातील दोन खेददायक घटनांचा श्री. अप्रबुद्धांनी मराठ्यांचा ऱ्हास सांगताना आवर्जून उल्लेख केलेला आहे. (१) आग्र्यांचा नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांच्या मदतीने केलेला पराभव आणि (२) पानिपतचा पराभव. स्वकीयांविरुद्ध परकीयांची मदत घेऊ नये हे सूत्र नानासाहेबांनी पाळले नाही. आग्र्यांच्या भांडणात इंग्रजांची मदत घेऊनही विजयदुर्ग मराठ्यांना मिळाला नाही परंतु त्यामुळे पेशव्यांनी मराठा सरदारांची सहानुभूती गमावली आणि इंग्रजांना आपले मर्मही दाखवून दिले. पेशवाईतील कर्त्या-पुरुषांची अकाली निधने, मराठे सरदारांची परस्परांतील भांडणे, लाचलुचपत, विश्वासघात आणि जातीयवाद यातून मराठ्यांचा अस्त झाला.[११८]

१८५७ चे स्वातंत्र्य युद्ध

इंग्रजांच्या हातात मराठ्यांची सत्ता गेल्यावर त्यांचे साक्षेपीपणा, चौकसपणा, देशाभिमान, धाडस हे गुण या देशातील लोकांच्या लक्षात येऊ लागले. त्यामुळे आपल्या चुकांची जाणीव या देशातील लोकांना होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणजेच १८५७ चे स्वातंत्र्य युद्ध होय. या युद्धातही महाराष्ट्रीयांचा सिंहाचा वाटा होताच, हे तात्या टोपे, नानासाहेब, झांशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या कामगिरीवरून उघड उघड दिसते. शिवाजी महाराजांच्या काळात राजकीय क्रांती खालच्या स्तरातून घडत होती आणि वैचारिक क्रांती वरच्या थरातून खालच्या स्तरापर्यंत पाझरत येत होती, त्यामुळे ते उत्थान यशस्वी झाले. यावेळी वरच्या स्तरातील लोकांची मानसिक तयारी झालेली नव्हती व खालचे स्तर निष्क्रिय होते. उत्तर व दक्षिण अशी उठावणी एकदम होऊ शकली नाही. फंदफितुरी अतोनात वाढली होती.

सत्तावनी स्वातंत्र्ययुद्धाचे महत्त्व

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यांच्या इतिहासात अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय राष्ट्रीयत्वाची परंपरा किती अखंड आहे, किती तेजस्वी आहे याचे दर्शन खुद्द पाश्चात्यांना या युद्धामुळे घडले. स्वकीय कोण, परकीय कोण याचा अनुभव भारतीयांना आला. लोकशाहीच्या, उदारमतवादाच्या, व्यक्तिस्वातंत्र्याच्या घोषणा करणारे स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांची परंपरा सांगणारे, कल्याणकारी सुसंस्कृत शासक म्हणून आढ्यता मिरविणारे ब्रिटिश लोक कोणत्या मनोवृत्तीचे आहेत याचे दर्शन भारतीय जनतेला झाले. त्यांचे साम्राज्यवादी विषारी दात पाडण्यासाठीच ही राष्ट्रीय क्रान्ती घडून आली होती.

देशाभिमान, राष्ट्राभिमान, देशभक्ती, धर्मनिष्ठा आणि हौतात्म्य यांचा या स्वातंत्र्य लढ्यात परिचय देऊन भारत हे एक जिवंत राष्ट्र आहे हे सिद्ध झाले. विशिष्ट ध्येय, त्यासाठी विवक्षित साधने आणि विशिष्ट नियोजनपूर्वक प्रयत्न या सर्वांनी मिळून कोणत्याही क्रान्तीचे तत्त्वज्ञान बनत असते असे राज्यशास्त्रज्ञ सांगतात. हे क्रांतीचे तत्त्वज्ञान सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाला लावून दाखविता येते. अठराशे सत्तावनच्या क्रांतीचा लढा, लोकयुद्धाचा, भारतीयांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा प्रयत्न होता असे इंग्रज इतिहासकारांनीच नमूद करून ठेवलेले आहे. काही भारतीय विद्वानांना या लढ्याचे महत्त्व वाटत नसले तरी ब्रिटिशांनी ते पुरते जाणले होते, कारण आमच्या विविधतेतून उदयाला आलेल्या एकराष्ट्रीयत्वाचे दर्शन पुन्हा एकदा १८५७ साली झाले. अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध म्हणूनच भारतातील राष्ट्रभक्तीचे, जहाल देशभक्तांचे व सशस्त्र क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान झालेले आहे. त्याचे एक महत्त्वाचे गमक असे सांगता येईल की या स्वातंत्र्यसंग्रामाशी संबंधित अशा सर्वच प्रकारच्या साहित्यावर ब्रिटीश सरकारने बंदी घातली होती व काही साहित्य जप्तही केले होते.

स्वकीयांचा गौरव व परकीयांची निन्दा करणे हा सामान्यपणे मनुष्य स्वभाव आहे. म्हणून या युद्धा-संबंधी खुद्द ब्रिटीश इतिहासकारांचे काय अभिप्राय होते एवढे जरी लक्षात घेतले तरी केवळ शिपायांचे बंड होते किंवा स्वातंत्र्य युद्ध होते यासंबंधी शंका राहणार नाही.

जस्टीन मेकॉर्थी हा प्रख्यात ब्रिटीश इतिहासकार आपल्या " हिस्ट्री ऑफ अवर ओन टाइम्स " या त्रिखंडात्मक ग्रंथात म्हणतो, It was not along the sepoy who rose in revolt it was not by any means a merely military grievences, national hatred, and religious fanaticism against the English occupation of India. The Mahamedan and the Hindu forgot their old religious antipathies to join against the christain. ..... The Meerat Sepoys found in a movement, a leader, a flag and cause and the mutiny was transformed into a revolutionary war, when the Meerat Sepoys reached Jamuna, glittering in the morning light, they had all unconsciously seized one of the great critical moments of history and converted a military mutiny into a national and religious war ! " [१२९]

" ते धर्मयुद्ध आणि स्वातंत्र्ययुद्धच होते "

केसरीच्या स्वातंत्र्य समर शताब्दी विशेषांक १९५७ साठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेल्या लेखाचे शीर्षक वर अवतरणात दिलेले आहे. वर दिलेला इंग्रजी उतारा सावरकरांच्या लेखातीलच आहे. स्वा. सावरकरांनी चार्लसबॉल नावाच्या दुसऱ्या एका ब्रिटीश इतिहासकाराचा दाखला आपल्या या समर्थनासाठी दिलेला आहे. तो लिहितो, त्या क्रांतीचा प्रसार इतक्या वेगाने नि त्वेषाने अनपेक्षित-पणे झाला की त्याला तोड नाही. शेवटी तो सांगतो, " It became the rebellion of a whole people in cited to outrage by resentment for immaginary wrong and sustained in their delusions by hatred and fanaticism." [१३०]

स्वा. सावरकर म्हणतात– " मी त्या क्रांतियुद्धाच्या इतिहासाला " राष्ट्रीय स्वातंत्र्य समर " एवढेच नाव दिले आहे. परंतु वरील उताऱ्यात हा इंग्लिश इतिहासकार सत्यतेस निर्भयपणे व निःपक्षपातीपणे सांगण्याच्या एका मानसिक लहरीमध्ये गवसून निर्णायक शब्दात सांगतो की, " मीरतच्या सैनिकाने केलेली ती उठावणी प्रसरण पावता पावता " It became the rebellion of a whole people." स्वा. सावरकरांचा " सत्तावनचे स्वातंत्र्य समर " हा ग्रंथ तर आधुनिक भारताच्या इतिहासात क्रांतिकारकांची गीता समजल्या गेला आहे. प्रत्यक्ष युद्धकाळात भारतात उपस्थित असलेल्या ब्रिटीश इतिहासकारांचे पुरावे देऊन स्वा. सावरकरांनी ते केवळ शिपायांचे बंड नव्हते तर ते एक लोकयुद्ध होते, ते एक धर्मयुद्ध नि स्वातंत्र्ययुद्ध होते हे सिद्ध केले आहे.

श्री. दादुमिया उपाख्य डॉ. नेने यांचे नवे संशोधन

श्री. दादुमिया यांनी १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासावर नवीनप्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. सौराष्ट्रात जामनगरजवळील सिहोर येथे नानासाहेब पेशवे जवळ जवळ छेहेचाळीस वर्षे स्वामी दयानंद या नावाने युद्धानंतर निवास करीत होते अशी माहिती या नव्या संशोधनात त्यांनी सांगितली आहे. नानासाहेब पेशव्यांचा मुलगा श्रीधर त्यांच्यासोबत होता. पुढे त्याचे नाव गिरिधर भाई असे ठेवण्यात आले. या गिरिधर भाईची केशवभाई, नटवरभाई व हरिहरभाई ही

तीन मुले हयात असून नानासाहेबांनी आपल्यासोबत आणलेल्या अखंड मृगचर्म, गुंजमणी शंख, बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची पगडी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या गादीवरील पादुका म्हणून ठेवलेल्या खडावा, भवानी तरवार व बंदुक या वस्तू होत्या."[१३१]

नानासाहेबांचे आश्रित श्री. कल्याणजी यांच्या दैनंदिनीच्या आधारे डॉ. नेने यांनी हा पुरावा मांडला आहे. सुमारे तीन लक्ष फौज नानांच्या जवळ होती. राजेरजवाडे यांच्या सहकार्याची त्यांनी अपेक्षा केली होती. पण राजेरजवाडयांनी त्यांना मदत नाकारली. त्यामुळे त्यांचा या संस्थानिकांवर बराच राग असल्याचे दिसते. नानासाहेब पेशव्यांसंबंधी श्री. कल्याणजी आपल्या दैनंदिनीत काही नवीन सांगतात, " मुसलमान आपलेच बंधू आहेत. फक्त त्यांचा धर्म जबरदस्तीने बदलविण्यात आला आहे. ते सारे पुन्हा आपले हिंदू होतील तो दिवस परमभाग्याचा. " मरण्यापूर्वीचा नानासाहेबांचा संदेश अत्यंत हृदयस्पर्शी आहे. " इंग्रजांचे पुरते संपले अशी खात्री झाली की मगच माझ्याविषयी तुम्ही जाहिरात करा. मला अंधारात ठेवू नका. स्वतंत्र हिंदुस्थानवर जो कोणी पहिला भारतीय राज्य करील तो माझा खरा वारस असेल." भारताच्या सरहद्दीसंबंधीही नानासाहेबांनी स्पष्ट जाणीव दिली आहे. ते लिहितात, " आपली सरहद्द हिराजपासून, सिंगापूर व गजनीपासून लंकेपर्यंत सर करा. जावा, सुमात्रा व बाली बेटे तसेच काबूल पठाणांचा देश हे सारे आपलेच भाग आहेत."

लष्करासंबंधी नानासाहेबांचे धोरण लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, " लष्कर हाच सत्तेचा कणा आहे. कोणाची राजसत्ता उलथून पाडावयाची असेल तर त्याच्या लष्करात बंडाळी माजवून आणा. ..... एखादा लहानसा विजय किंवा पराभव म्हणजे काही विशेष घडले असे नाही. उत्तम शासन फार महत्त्वाचे आहे. आपल्या देशात स्थैर्य ठेवण्यासाठी सरहद्दी नेहमी तापत ठेवल्याच पाहिजेत. तेथे लढाई बंद करणे इष्ट नाही. युद्ध बंद केले की पडती सुरू झालीच समजा. लष्कराची नाडी योग्य प्रकारे समजून घेऊन त्याप्रमाणे वागा. कोणत्याही परिस्थितीत लष्कराने उठाव केला न पाहिजे." [१३२]

अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराचा प्रभाव

सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की, या स्वातंत्र्ययुद्धाने पुराणकाळापासून चालत आलेली राष्ट्रीयत्वाची आणि राष्ट्रीय नेत्यांची परंपरा अभंग राखली. या युद्धाने बहादूरशहा जफर, नानासाहेब, तात्या टोपे आणि झाशीची राणी यांना राष्ट्रनायकाचे स्थान मिळवून दिले. भारतीयांच्या राष्ट्रीय भावनेत भूमीला, धर्माला आणि परंपरेला एक आगळे महत्त्व असल्याचे सिद्ध झालेले आहे. राष्ट्रातील माणूस धर्माने, पंथाने, वर्गाने व जातीने भिन्न असला तरी परस्परांचे हितसंबंध एक असल्यास वयं पंचाधिकं शतम् हे या प्रसंगाने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. राष्ट्राकरिता सर्वस्वाचे बलिदान करण्याची प्रेरणाही याच स्वातंत्र्ययुद्धाने दिलेली आहे. येणाऱ्या पिढ्यांमध्ये भावी स्वातंत्र्याची आकांक्षा आणि स्वाभिमान निर्माण केला. हेच या युद्धाचे मुख्य व महत्त्वाचे फलित आहे.

आधुनिक भारतातील राष्ट्रीय पुनरुज्जीवनाची पार्श्वभूमी
तमो युग की नवभारताच्या निर्मितीचा प्रभाव ?

आधुनिक भारताच्या १८०० ते १८७४ पर्यंतच्या कालखंडाला वाङ्मयेतिहासकारांनी आपआपल्या वैचारिक धारणेप्रमाणे भारताचे तमोयुग आणि नवभारताच्या निर्मितीची प्रभात अशी काहीशी परस्परविरोधी नावे दिलेली आहेत. त्यामागे दोन प्रकारची गृहीत कृत्येही आहेत.

पारतंत्र्याची गडद कृष्णछाया, पराभूत मनोवृत्ती, स्वतंत्र कर्तृत्वाचा अभाव, न्यूनगंडाची भावना, आत्मविश्वासाचा लोप आणि राज्यकर्ते आपल्यापेक्षा सर्वच क्षेत्रांत श्रेष्ठ असल्याची समजूत भारताचे तमोयुग ठरविणाऱ्यांची आहे.

ब्रिटिश अधिकाऱ्यांचे धोरण आणि चातुर्य

आमच्या तुलनेत तुम्ही मागासलेले आहात ही जाणीव तीव्रतेने करून देण्याचे कार्य देशातील ब्रिटीश अधिकाऱ्यांनी मोठ्या धोरणाने आणि चातुर्याने करून दिले. वेलस्लीने आपल्या आमदानीत तैनाती फौजा भारतीय संस्थानिकांच्या डोक्यावर बसविल्या आणि त्यांच्या खर्चासाठी संस्थानिक त्यांच्या प्रजेवर दडपणे आणून, नाना प्रकारे छळून संपत्ती गोळा करू लागले. डलहौसीने निरनिराळी निमित्ते शोधून काही संस्थाने खालसा केली, प्रादेशिक सत्तेचा विस्तार केला. संस्थानिकांच्या आश्रयाने असणारे सैन्य व इतर आश्रित बेकार झाले. त्यापैकी काही सैनिकांना ब्रिटिशांनी सैन्यात दाखल करून घेतले, परंतु अल्प मोबदला, दुय्यम प्रतीची वागणूक यांनी ते असंतुष्टच राहिले. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी हजारो वर्षांपासून चालत आलेले देशी उद्योगधंदे नष्ट करण्याचा सपाटा चालविला. एवढ्या मोठ्या खंडप्राय प्रदेशावर सुदूर पश्चिमेतून येऊन आपण राज्य स्थापन केले याबद्दलचा इंग्रज अधिकाऱ्यांचा अहंकार पराकोटीला गेला होता. ब्रिटीश अधिकारी भारतीयांकडे कोणत्या दृष्टीने बघत होते यासंबंधीचा पुरावा आचार्य जावडेकरांनी मांडलेला आहे. ते लिहितात, "....हिंदी लोकांत पाश्चात्यविद्येचा प्रसार व्हावा, त्यांना आधुनिक राष्ट्रीयीकरणाचे आपल्या देशातील ज्ञान व्हावे, त्यांचा राजकारणात हळूहळू प्रवेश व्हावा आणि असे होता होता अखेरीस त्यांनी राजकीय स्वातंत्र्य मिळवावे, पण त्यांच्यात स्वातंत्र्याची भावना अकाली फैलावू नये, सामान्य जनतेत ही भावना फैलावण्यापूर्वी तिचा स्पर्श हिंदी सैनिकांस होऊ नये आणि आपला दरारा कमी होऊन आपले मर्मस्थान हिंदी लोकांच्या हाती जाऊ नये, अशी विचारसरणी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांची बनली.[१३३]

इंग्रज मिशनऱ्यांची मनोराज्ये

भौतिकशास्त्राचे आणि सामाजिक विद्यांचे ज्ञान देऊनही भारतीय समाजात अपेक्षित सुधारणा होऊ शकणार नाही असेही या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे मत होते. या मार्गात सर्वांत मोठा अडथळा जुन्या सनातन वैदिक धर्माचा होता. हा वैदिक धर्म भारतीयांच्या सर्व अडाणीपणाचे मूळ आहे अशी या नव्या सत्ताधिकाऱ्यांची धारणा होती. भारतीयांचा संपूर्ण कायापालट करावयाचा तर त्यांचे आध्यात्मिकदृष्ट्या देखील कल्याण करणे आपले पवित्र कार्य आहे आणि ते आपली राजकीय सत्ता आणि मिशनरी यांच्या साहाय्याने पूर्ण करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी ते योजनाही आखू लागले. " पाश्चात्य पंडित भारताच्या प्राचीन वैभवावर आघात करीत होते तर मिशनरी सनातनहिंदु धर्मावर भडिमार करीत होते. मिशनरी शाळा, दवाखाने, वसतिगृहे स्थापून सेवेपेक्षाही धर्मांतराचे काय करीत होते. सैनिकांना बढतीची प्रलोभने दाखवून, प्रसंगी वाटवून धर्मांतर करवीत होते. ईस्ट इंडिया कंपनीचा प्रमुख डायरेक्टर मॅंगल्स हा १८५७ साली ब्रिटिश पार्लमेंटमध्ये म्हणतो, " हिंदुस्थानच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत ख्रिस्ताचा ध्वज फडकविण्याकरिताच हे हिंदुस्थानचे अफाट साम्राज्य ईश्वराने आपल्या हाती सोपविले आहे. म्हणून सबंध हिंदुस्थान ख्रिस्तमय करण्याच्या महत्कार्यात कोणत्याही प्रकारची ढिलाई न करता प्रत्येकाने आटोकाट प्रयत्न करणे अवश्य आहे.[१३४]

स्वामी दयानंद सरस्वतीचे कार्य (१८२४–१८८३)

इंग्रज अधिकारी आणि त्यांचे धर्मप्रसारक मिशनरी यांच्यासंबंधी विवेचन करण्याचे मुख्य कारण असे की त्यांच्या भारतीय समाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नामुळे केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर धार्मिक क्षेत्रातही तीव्र प्रतिक्रिया उमटली. स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेल्या १८७५ मधील "आर्यसमाजा" ची पार्श्वभूमी या विवेचनामुळे लक्षात येण्याला मदत होते. स्वामीजी शुद्ध अध्यात्मवादी नव्हते. राष्ट्रीय ऐक्य, सामाजिक बंधुभाव आणि देशप्रेम लोकांत निर्माण व्हावे अशीच स्वामीजींची इच्छा होती. त्यासाठीच त्यांनी स्वदेश व स्वधर्माची लोकांना शिकवण दिली. अलीकडील ऐतिहासिक संशोधनामधून जे पुरावे उपलब्ध झालेले आहेत त्यावरून स्वामी दयानंद सरस्वती यांचा १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाला सक्रिय पाठिंबा होता असे दिसते. त्यांनीच युद्धातील अपयशामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या नानासाहेब पेशवे यांना आत्महत्येपासून परावृत्त करून कन्याकुमारी येथे संन्यासदीक्षा दिली व त्यांचे नवे नाव दयानंद स्वामी असेच ठेवले, असे श्री. दादुमिया यांचे मत आहे. आपल्या स्वातंत्र्य युद्धातील अपयशाचे कारण राष्ट्रीय ऐक्याचा अभाव असल्याचे त्यांनी ओळखले आणि त्यानंतरच त्यांनी "आर्यसमाजा" ची स्थापना केली. हिंदुसमाज बलशाली, संघटित आणि देशभक्त झाला पाहिजे, त्याच्यात परस्परांसंबंधी बंधुभाव वाढला पाहिजे, त्यातील जातीय फुटीरता संपुष्टात आली पाहिजे असाच आर्यसमाजाची स्थापना करण्यामागे त्यांचा हेतू होता. म्हणूनच १८७५ साली पंजाबात त्यांनी आर्यसमाजाची मुहूर्तमेढ रोवली.

हिंदुधर्माचे व्यापक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना सुलभ करून सांगण्यासाठी आणि "आर्य-समाजाची" शिकवण देण्यासाठी "सत्यार्थप्रकाश" या नावाचा ग्रंथही त्यांनी हिंदीतच लिहिला. स्वामीजींनी मिशनऱ्यांच्या मताचे आवेशपूर्ण शब्दांनी खंडन केले. स्वामीजी मूर्तिपूजक नसले तरी यज्ञसंप्रदायी होते. देशभर अखंड प्रवास करून आर्यसमाजाचा, सनातन वैदिकधर्माचा प्रचार व प्रसार त्यांनी केला. देशभर आर्यसमाजाच्या शेकडो शाखा स्थापन करूनच स्वामीजी थांबले नाहीत तर त्यांनी भारतभर धर्मशुद्धीची मोहीम काढून बळजबरीने, प्रलोभनाने वाटविलेल्या हजारो ख्रिस्ती व मुसलमानांना शुद्धी करून स्वधर्मात आणि आर्यसमाजात आणले. याच आर्यसमाजातून पुढे देशभक्तांची एक अखंड मालिका जन्माला आली. स्वामी दयानंदाच्या धार्मिक चळवळीमुळे मिशनऱ्यांच्या धर्म प्रसाराला आळा बसला आणि सुधारणावादी ब्राह्मोसमाजाचा प्रभाव कमी झाला. शुद्धी चळवळीमुळ मुसलमानांचा त्यांच्यावर व त्यांच्या अनुयायांवर रोष झाला. विसाव्या शतकात हिंदु–मुस्लिम ऐक्याची आवश्यकता स्वातंत्र्यासाठी पुढाऱ्यांना भासू लागली तेव्हा शुद्धी चळवळीमुळे त्यात अडथळे निर्माण झाले असल्याची जाणीव काही हिंदुपुढाऱ्यांना झाली आणि त्यामुळे स्वामीजींना प्रतिक्रियावादी-जातीय अशी शेलकी विशेषणे लावण्यात आली. स्वधर्माची, स्वत्वाची, देशभक्तीची जाणीव लोकांना एक धार्मिक क्षेत्रातील नेत्याने करून दिली हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

नवभारताच्या निर्मितीचे अग्रदूत–राजा राममोहनराय (इ. स. १७७२–१८३३)

जे विद्वान अभ्यासक १८०० ते १८७४ या कालखंडाला "भारताच्या नवनिर्मितीची प्रभात" समजतात ते बंगालमधील राजा राममोहनराय यांना या नवनिर्मितीचे अग्रदूत मानतात. नव्या धर्मसंस्था व धर्मसंप्रदाय यांच्या पुनरुज्जीवनाचे जनकत्व राजा राममोहनराय यांनाच देतात. राजा राममोहनराय यांनी पाश्चात्य शिक्षण घेतलेले होते. ते स्वत: अनेक वर्षे इंग्लंड येथे राहात होते. ते अनेक भाषा व शास्त्रे जाणणारे विद्वान होते. त्यांनी वेदातील ज्ञानावर भाष्ये केली होती. ते पाश्चात्य

संस्कृतीने अत्यंत प्रभावित झाले होते आणि इंग्रजी सत्तेबद्दल त्यांच्या अंतःकरणात कृतज्ञतेची भावना होती. १८२८ साली जातिभेदातीत अशा ब्राह्मसमाजाची त्यांनी स्थापना केली. निराकाराची उपासना, प्रपंचास परमार्थरूप मानून चालणे, सामुदायिक ध्यानधारणा, प्रेम आणि लोकसेवा, समता आणि बंधुता ईश्वर हा सर्वांचा पिता असून आपण सर्व जीव एकमेकांचे बांधव आहोत अशी मुख्यतत्त्वे या समाजाद्वारे शिकविली जात असत. या समाजाचा मूर्तिपूजेला विरोध होता. सतीच्या चालीविरुद्ध कायदा करण्याची मागणी राजा राममोहनराय यांनीच केली आणि वृत्तमुद्रणाचे स्वातंत्र्य सरकारला मागितले. हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचे कार्य राजा राममोहनराय यांनी सुरू केले असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. राजा राममोहनराय यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार श्री. देवेन्द्रनाथ ठाकूर आणि श्री. केशवचन्द्र सेन यांनी केला.[१२५]

ऽऽऽ

आधुनिक महाराष्ट्रातील राष्ट्रधर्माचे प्रणेते

" मनगटाचे बळ राजाला दाखवा " असे सांगणारे श्री. दादोबा तर्खडकर (१८१४-१८८२)

केशवचंद्राच्या महाराष्ट्रातील आगमनापूर्वीच मराठीचे पाणिनी म्हणून गौरविले गेलेल्या दादोबा पांडुरंग तर्खडकरांनी सरकारी नोकरीच्या निमित्ताने सुरत येथे असतानाच " मानवधर्म सभेची स्थापना केली होती. त्यांनीच पुढे १८४९ मध्ये " परमहंस सभा " स्थापन केली. मानवधर्म सभेची अथवा परमहंस सभेची तत्त्वे ब्राह्मसमाजासारखीच होती. पुढे १८६० मध्ये " परमहंस सभा " संपुष्टात आली आणि दादोबा पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग आणि भास्कर पांडुरंग या तिघा तर्खडकर बंधूंनी पुढाकार घेऊन ब्राह्मसमाजाच्या प्रेरणेनेच १८६७ मध्ये मुंबई येथे " प्रार्थना समाजाची " स्थापना केली. दोन वर्षांनी डॉ. भांडारकर, न्या. रानडे या समाजास येऊन मिळाले. " सुबोध पत्रिका " हे मुखपत्र काढून प्रार्थना समाजाने आपल्या विचारांचा प्रसार केला. इ. स. १८५२ मध्ये मुंबई येथे श्रीमंत जगन्नाथ शंकर शेठ यांच्या अध्यक्षतेखाली " धी. बॉम्बे असोसिएशन " या संस्थेची स्थापना झाली. या सभेने ब्रिटीश पार्लमेंटकडे हिंदुस्थानातील राज्यकारभारासंबंधी केलेला अर्ज म्हणजे महाराष्ट्रातील राजकीय चळवळीचे बीजारोपण होय असे " दादोबा पांडुरंगांच्या " चरित्राचे संपादक श्री. अ. का. प्रियोळकर यांचे मत आहे.

श्री. दादोबा म्हणतात, " राजाचे राज्य हे प्रजेच्या कल्याणाकरिता आहे, प्रजेसंबंधी समभाव राखण्याकरिता आहे. पण तसे न करता उलट जर तो प्रजेला पीडा देऊ लागला, तिला दरिद्री बनवू लागला, एका देशातील प्रजेवर कृपा ठेवून त्यांना धनवान बनविण्याचा उद्योग करू लागला आणि दुसऱ्या देशातील प्रजेला निर्धन करण्यास इच्छू लागला तर अशा राजावरोवर लढा करून धर्मबुद्धीने चालणाऱ्या राजाकडे राज्य सोपविले पाहिजे. ..... म्हणून प्रजेकडून एखाद्या माणसाला ज्यावेळी एखाद्याकडून त्रास पोचतो त्यावेळी त्याने राजाकडे फिर्याद करावी, आणि स्वतः राजाच ज्यावेळी प्रजेला दुःख देऊ इच्छितो तेव्हा प्रजेने स्वतःचे मनगटाचे बळ राजाला दाखविण्याकरिता परमेश्वराचे साहाय्य मागावे."

" भारतीय स्वातंत्र्याला पहिली हाक "

दुसऱ्या एका सभेसमोर दिलेल्या भाषणात श्री. दादोबा म्हणतात, इंग्रजांचे राज्य चांगले आहे पण हा राजा परदेशचा आहे. त्यामुळे आपल्या देशातील लोकांवर त्याची जेवढी प्रीती आहे तेवढी या देशातील लोकांवर नाही, म्हणून इकडची प्रजा दुःखी आहे. गोवर्धनदास नावाच्या एका सभासदाने

" इंग्रजी राज्य त्याला कारणीभूत आहे असे सांगताच दादोबा म्हणाले, " तुम्ही म्हणता ही गोष्ट खरी आहे पण यात सारा दोष आपल्याच लोकांचा आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. हे जे सगळे झाले आहे ते आपल्या लोकांच्या दुर्बलपणामुळे व विचारहितपणामुळे झाले आहे." बॉम्बे असोसिएशनने पाठविलेल्या अर्जाला श्री. प्रियोळकर " स्वातंत्र्याची पहिली हाक " असे संबोधन वापरतात. श्री. दादोबांनी भारतीयांच्या रोगाचे निदान करताना दुर्बलता, अज्ञान, मूर्खपणा या दुर्गुणांवर बोट ठेवले असल्याचे दिसते.

स्वराज्याचे भविष्य सांगणारे लोकहितवादी (१८२३–१८९२)

नव महाराष्ट्राच्या निर्मितीत ज्या थोर पुरुषांनी हातभार लावला त्या पहिल्या पाच अग्रणींत रावबहादूर गोपाळ हरी देशमुख उपाख्य लोकहितवादी यांची गणना होते. १८४४ ते १८७९ पर्यंत सुमारे ३५ वर्षे त्यांनी सरकारी नोकरीत काढली. समाजसेवेची तळमळ, ज्ञानप्रसाराची कळकळ त्यामुळे वृत्तपत्रे काढयाचा आणि ग्रंथसंग्रहालये स्थापन करण्याचा नाद लागला, "पुण्याचा ज्ञानप्रकाश" व " नगरवाचन मंदिर " त्यांच्याच उद्योगाचे फळ होय. " इन्दुप्रकाश " या वृत्तपत्राच्या जन्माशी त्यांचा संबंध होता. मुंबईच्या " प्रभाकर " या पत्रातून १८४८ च्या प्रारंभापासून तो १८५० पर्यंत त्यांनी " शतपत्रे " लिहिली. सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक अशा विविध विषयांसंबंधी या पत्रातून त्यांनी आपले विचार निर्भीडपणे मांडले. समाजव्यवस्थेतील विकृतीवर व विसंगतीवर त्यांनी नेमके बोट ठेवले. वाचलेल्या नव्या इंग्रजी विचारांनी प्रभावित लोकहितवादींनी मर्मभेदक टीका केली. टीका करताना त्यांच्या लेखणीला स्फुरण चढत असे. किंबहुना आपला समाजधर्म, चालीरीती, परंपरा यांच्यासंबंधी तुच्छतापूर्वक बोलणे हा त्या काळचा युगधर्मच होता. लोकहितवादीही त्याला अपवाद नव्हते. त्या काळातले एक ग्रंथकार म्हणूनही लोकहितवादींनी लौकिक मिळविला. भूगोल, इतिहास, धर्म इत्यादी विषयांवर त्यांचे सुमारे चाळीस ग्रंथ प्रकाशित झाले, " इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे " अशीच लोकहितवादींची धारणा होती. इंग्रज सत्ताधीश सर्व गुणसंपन्न असल्यामुळे त्यांच्या साहचर्यानेच आपल्यात सुधारणा होईल यावर त्यांची श्रद्धा होती, " सूज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करू नये " असा त्यांचा संदेश होता. कारण " आमच्या देशाची रीती बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही व लोकांस स्वतःचे राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुनः गर्दी होईल व बेबंदी, अंधाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय होणार नाही."

लोकहितवादींचा आशावाद

हिंदुलोकांसंबंधी लोकहितवादींना इतका तिटकारा आला होता की ते अक्षरशः शिव्याच मोजत असत.[१३६] " हिंदुलोक सांवापुढचे आहेत (नंदीबैल), अडणीवरचे (शंख) आहेत, नंदीबैल आहेत, त्यांना शंभर जोडे मारावेत व एक मोजावा,"[१३७] असे वैतागाने म्हणत असत. तात्पर्य, रोगापेक्षा औषधच जहाल होते. मात्र असे समाजाला फटकारीत असतानाच आपल्या देशाला पार्लमेंट लाभावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केलेली आहे. मात्र त्याकरिता आपले लोक सुशिक्षित व सूज्ञ झाले पाहिजे ही त्यांची अट आहे. आपल्या देशाला स्वराज्य व स्वातंत्र्य मिळणारच असा त्यांचा आशावादी दृष्टिकोन होता.

विष्णुबुवा ब्रह्मचारी उपाख्य विष्णू भिकाजी गोखले १८२५–१८७१)

आधुनिक भारताचा पहिला हिंदू मिशनरी

महर्षी स्वामी दयानंदाच्या आर्य समाजाची स्थापना होण्यापूर्वी महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला आळा घालण्याचे कार्य स्वयंप्रेरणेने विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी केले. आपल्या अफाट वक्तृत्वाने आणि अचाट युक्तिवादाने त्यांनी मुंबईच्या चौपाटीचा किनारा दणाणून सोडला होता असे त्यांचे चरित्रकार गौरवाने सांगतात. धर्माभिमानाची शिकवण देणे हेच विष्णुबुवांनी आपले जीवनकार्य ठरविले होते. राष्ट्राभिमानाचे एक प्रमुख अंग म्हणजे धर्माभिमान होय म्हणून विष्णुबुवांचे कार्य खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कार्य होते. त्यांची वैदिक धर्मावर दृढ श्रद्धा होती. या वैदिक धर्मातील तत्त्वे प्रतिपादन करण्यासाठीच त्यांनी काही ग्रंथही लिहिलेले आहेत. धर्माचा त्यांचा अर्थ व्यापक होता. त्यात आध्यात्मिक अभ्युदयाबरोबरच ऐहिक अभ्युदयही अभिप्रेत होता. समाजात अनेक सुधारणा झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत असले तरी त्या सुधारणा करताना पाश्चात्य संस्कृतीचा आधार घेऊ नये असे त्यांचे स्पष्ट मत होते. ज्या काही सुधारणा करावयाच्या असतील त्या आपल्या प्राचीन संस्कृतीच्या आधारेच केल्या पाहिजेत व त्यानेच अभ्युदयाचा मार्ग उपलब्ध होईल अशी त्यांची शिकवण होती.

कार्ल मार्क्सपूर्वी विश्वकुटुंबवादाची शिकवण देणारा तत्त्वचिंतक

"सुखदायक राज्य प्रकरणी" या निबंधात विष्णुबुवांनी विश्वकुटुंबवादाची शिकवण दिलेली आहे. ही शिकवण देणारा ब्रह्मचारी अध्यात्मप्रवण वृत्तीचा आहे. आचार्य जावडेकरांचा या निबंधावरील अभिप्राय मार्मिक आहे. ते म्हणतात, "विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांचे हे कम्युनिझमच्या धर्तीवरचे विचार वाचले म्हणजे ज्याने कार्ल मार्क्स वाचला नाही त्याला हा कम्युनिझम कसा सुचला असा अचंबा अलीकडील काही सुशिक्षितांना वाटतो. पण ही गोष्ट इतकी अचंबा वाटण्यासारखी नाही, अशी आमची समजूत आहे. ज्या मनुष्याने आपल्या स्वार्थाची होळी केली आहे, वर्गस्वार्थाचाही पगडा ज्या संन्यस्त मनावर बसलेला नाही, प्राचीन ऋषींच्या प्रतिभेला आकलन झालेले विश्वकुटुंबाचे ध्येय ज्याने शक्यतो आचरणात आणण्याचे प्रयत्न चालविले आहेत, ... यंत्रकला व ही भौतिक विद्या यांचा उपयोग प्रजेचे मुलांप्रमाणे प्रतिपालन करणाऱ्या राजसत्तेने करावा ... अशी कल्पना सुचण्यास कार्ल मार्क्सच्या ग्रंथाचे अध्ययन करण्याचे कारण नाही.[१३८]

भारताचे राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी (१८२५–१९१७)

अखिल भारतीय नेतृत्व म्हणून ज्या महाराष्ट्रातील लोकांचा गौरव झाला त्यात दादाभाई नौरोजी हे अग्रगण्य होते. इ. स. १८४८ पासून अनेकविध मार्गांनी त्यांनी समाजसेवेला सुरुवात केली. "ज्ञानप्रसारक सभा" "बॉम्बे असोसिएशन" अशा अनेक संस्था श्रीमान दादाभाईंच्या सहकार्याच्या बळाने निर्माण झाल्या. या नव्या स्थापन केलेल्या संस्थांचे कार्यही सातत्याने काही काळ चालले. भारतीय जनतेचे प्रतिनिधी या नात्याने १८७१ साली विलायतेतील "ईस्ट इंडिया फिनॅन्स कमिटी"पुढे साक्ष देऊन ब्रिटिशांच्या सत्तेचे कृष्ण अंतरंग त्यांनीच चव्हाट्यावर मांडले. ब्रिटिश साम्राज्य हिंदी लोकांच्या पैशावर आणि रक्तावर उभारलेले असून या रक्तशोषणामुळेच भारतीय जनता मृत्युपंथाला लागली असल्याचे त्यांनी पार्लमेंटला अगदी निर्भीडपणे सांगितले.

आमच्या दारिद्र्यावर, उपासमारीवर स्वराज्य हाच एकमेव उपाय आहे

भारतीय जनतेच्या दारिद्र्याचा आणि उपासमारीचा प्रश्न सोडविण्याचा एकच उपाय आहे आणि तो म्हणजे स्वराज्य, हा विचार जसा १९०६ साली त्यांनी प्रथम मांडला तसाच ब्रिटीश साम्राज्याची उत्पत्ती, स्थिती आणि विनाश ही सर्व हिंदी जनतेच्या शोषणात व दारिद्र्यात असल्याचा विचारही त्यांनीच प्रथम मांडला. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास आणि सनदशीर चळवळीच्या मार्गावरील श्रद्धा असल्यामुळे देशभक्त असलेले दादाभाई एका अर्थाने अखेरपर्यंत राजनिष्ठच राहिले असा आपला अभिप्राय आचार्य जावडेकरांनी दिलेला आहे, तो चिंतनीय वाटतो.

बहुजन समाजातील पहिला क्रांतिकारक–महात्मा ज्योतिराव फुले (१८२७–१८९०)

सामाजिक विषमता नष्ट करून राष्ट्रीय समतेचा संदेश देण्याचे, प्रस्थापना करण्याचे व्रत ज्योतिबांनी आमरण स्वीकारले होते. या समतेच्या तत्त्वावरील सामाजिक सुधारणेसाठी आवश्यक असलेली कृतिशीलता आणि निर्भयपणा त्यांच्या अंगी होता. स्वजनांचा प्रखर विरोध सोसूनही त्यांनी अस्पृश्यांची शाळा चालविली, बालहत्याप्रतिबंधक गृहाची निर्मिती केली, घरचा हौद अस्पृश्यांना पाण्यासाठी मोकळा करून दिला, विधवा विवाहाला उत्तेजन दिले आणि मुलींच्या शिक्षणासाठी महाराष्ट्रात सर्वप्रथम शाळा काढली. ही सर्व सामाजिक कार्ये करीत असतानाच हिंदूंच्या चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता या समाजव्यवस्थेवर प्रखर हल्ला चढविला. या सर्व चालीरीतींचा आधार असलेले हिंदुधर्मशास्त्र त्यांच्या टीकेचे लक्ष्य बनले होते. वर्णश्रेष्ठत्वाच्या नावाखाली ब्राह्मणांनी केलेल्या सामाजिक अन्यायावर, जुलूमांवर त्यांनी प्रखर टीका केली. इंग्रज सरकारच्या न्यायबुद्धीवरच नव्हे तर त्यांच्या दयाबुद्धीवर फुल्यांची नितांत श्रद्धा होती. इंग्रजांचे राज्य या देशात असावे, ती काळाची गरज आहे असा त्यांचा विश्वास होता. या देशात सरकारने सार्वत्रिक शिक्षणाची व्यवस्था करावी, शेतकऱ्यांना निरनिराळ्या सवलती द्याव्या आणि कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करावे अशी त्यांची मागणी होती आणि त्याकरिता ते सदैव प्रयत्नशील राहिले. आपल्या सामाजिक सुधारणेच्या ध्येयाच्या प्रसारासाठी १८७३ मध्ये त्यांनी "सत्यशोधक" समाजाची स्थापना केली. प्रार्थना सामाजासारखेच महात्मा फुल्यांचे सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान आहे. ऐन तारुण्यात महात्मा फुल्यांचा ओढा इंग्रजांविरुद्ध बंड करणाऱ्या क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांच्याकडे होता. पुढे काही इंग्रज मिशनरी लोकांशी त्यांचा परिचय झाला आणि त्याचे रूपांतर मैत्रीत झाले आणि त्यानंतर मात्र फुल्यांचा आमूलाग्र दृष्टिकोनच बदलला. राष्ट्रवादी फुले मग मानवतावादी बनले.

इंग्रज हेच आपले खरेखुरे तारक आहेत

इंग्रज हेच आपले खरेखुरे तारक आहेत यावर ज्योतिराव फुल्यांची नितांत श्रद्धा होती. ती श्रद्धा पराकोटीला गेलेली असल्याचे त्यांच्या ग्रंथातील पुरावे पाहून वाटते. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल ज्योतिरावांना अभिमान होता हे त्यांनी लिहिलेल्या "छत्रपतींचा पोवाडा" या कलाकृतीवरून दिसते. "ब्राह्मणांचे कसब," "शेतकऱ्यांचा आसूड," "गुलामगिरी," "सत्सार अंक १ व २" आणि विविध प्रकारचे स्फुट लेखन आणि स्फुट कवितालेखनही फुल्यांनी केलेले आहे. फुल्यांचे समग्र लेखन समाजनिष्ठ आहे. ब्राह्मणी सत्तेपासून दलितांचे रक्षण व्हावे अशी फुल्यांची श्रद्धा होती. आपल्या गुलामगिरी या निबंधात ते सांगतात, "यापुढे तरी सरकारने शुद्धीवर येऊन प्रत्येक खेड्यात एकातरी इंग्लिश अथवा स्कॉच गृहस्थाला गतकुळी शेते इनाम देऊन त्याला गावच्या कच्च्या हकीगतीविषयी रिपोर्ट करण्यास सांगावे."[१३९] ब्राह्मण कुळकर्णी किंवा अधिकारी नसावा यासाठी

फुल्यांनी ही सूचना केलेली आहे. याच निबंधात त्यांच्या एका स्नेह्याने " तुम्ही बालपणी दांडपट्ट्याची आणि गोळी निशाण मारण्याची कसरत कशाकरिता करीत होता ?" असा प्रश्न विचारला त्याचे ज्योतिबांनी दिलेले उत्तर मासलेवाइक आहे. ते म्हणतात, " आपल्या दयाळू इंग्रज सरकारास पालथे घालण्याकरिता !" " ही दुष्ट मसलत तुम्हाला कुणी शिकविली ?" ज्योतिबा सांगतात, " चार सुधारल्या भट विद्वानांपासून ... ... यास्तव सर्व जातींच्या लोकांची एकी झाल्याशिवाय या लोकांस देशातून एकदम हाकलून देण्याची आपल्यास ताकद येणार नाही. ..... असे त्यांनी मला टॉम्स पेन्स वगैरे ग्रंथकारांच्या पुस्तकातील कित्येक वाक्यांच्या आधारे सांगितले त्यावरून मी तसले वेडेचार काही दिवस करून पाहू लागलो."[१४०]

याच ज्योतिबांनी शिवाजीचा पोवाडा गाताना, शिवाजी महाराजांच्या वीरवृत्तीचा आणि मुत्सद्देगिरीचा गौरव केलेला आहे.

" मावळी गडी सोवतीला । शिपाई केले उघडघाला,
लढवी अचाट बुद्धीला । लोभ द्रव्याचा नाहिं केला,
राजा क्षेत्रांमध्ये पहिला । नाही दुसरा उपमेला,
युद्धी नाहीं विसरला । लावी जीव रयतेला
टळेना रयत सुखाला । वनवी नव्या कायद्याला,
दाद घेई लहानासानाची । हयगय नव्हती कोणाची "

शेतकऱ्यांचे केविलवाणे असहाय जीवनचित्र ज्योतिरावांनी रेखाटलेले आहे.

" कमरेपुरती लंगोटी । फिरती नांगराचे पाठीं,
ढोरामागे सर्वकाळ । पोरे फिरती रानोमाळ,
ताककण्या पोटभरी । धन्य म्हणे संसारी,
असे वस्त्राची कमती । एकमेकां चिकटती."

ब्राह्मण जातीवरचा आपला राग व्यक्त करताना महात्मा ज्योतिराव म्हणतात, " देवाजीने एकदा शूद्रांवर दया करून इंग्रज बाहाद्दरांच्या हातून भटनानाचे बंड मोडविले म्हणोन बरे झाले."[१४१] १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धासंबंधीची ही ज्योतिबांची प्रतिक्रिया लक्षात घेण्यासारखी आहे. राष्ट्रीय सभेसंबंधी ज्योतिबांचे मत त्यांच्या अखंदादि काव्यरचनेतून व्यक्त झालेले आहे. ते बहुजन समाजाला व अन्त्यजांना तळमळीने सांगतात,

" अंत्यजांनो, तुम्ही उपकार स्मरा । पोटी गच्च धरा ॥ इंग्लिशास ॥
आर्य हितासाठी न्याशनल सभा । शुद्रादीका शोभा ॥ कशी राहे" ॥ [१४२]

ज्योतिरावांच्या साहित्यातून असे अनेक उतारे देऊन त्यांचा राष्ट्राकडे व राष्ट्रीय घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोण कसा पूर्वग्रहदूषित, अतिरेकी व अर्धसत्य होता हे लक्षात येऊ शकते. तुरुंगातून सुटल्यावर लोकमान्य टिळक आणि आगरकरांचा सत्कार त्यांनी केला. अडचणीच्या प्रसंगी जामीन भरण्याची व्यवस्था केली वगैरे गोष्टी त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या द्योतक आहेत परंतु त्यांचे लिखाण पूर्वग्रहदूषित आहे असेच म्हणावे लागते. म्हणूनच डॉ. सहस्रबुद्धे म्हणतात, " लोकहितवादी रानडे, यांची इंग्रज राज्यकर्त्यांवर एकपट श्रद्धा असली, तर महात्मा फुले यांची दसपट शतपट

होती. " महाराष्ट्राचे थोर साहित्यिक, देशभक्त व समतोल वृत्तीचे निबंधकार फुल्यांसंबंधी म्हणतात, " सत्यशोधक ज्योतिबा फुले सडेतोड बोलत व लिहीत, पण त्यांची माहिती थोडी आणि दृष्टी आकुंचित होती."[१४३] वा. म. जोशी

एखादा फुल्यांचा पक्षपाती असलेला लेखक या दोन्ही लेखकांवर जातीयतेचा आरोप करून मोकळा होऊ शकतो. परंतु त्यात फारसे तथ्य नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी " समग्र फुले वाङ्मय " या ग्रंथाच्या प्रस्तावनेत " स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताकाच्या अधिष्ठानाला आवश्यक असलेली मूलभूत मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि जातिभेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचार सरणी नरव्याघ्रांचे अग्रणी असलेल्या ज्योतिरावांनी आवेशाने सांगितली "[१४४] असे फुल्यांचे कर्तृत्व व्यक्त करणारे विधान केलेले आहे.

कावेबाज ब्रिटीश राज्यकर्त्यांचे वास्तविक स्वरूप फुले जाणू शकले नाहीत

एकीकडे ज्योतिरावांच्या विचारांची झेप अखिल मानवजातीला कवेत घेणारी आहे. ती एक हनुमान उडी आहे. मानव आणि विश्वकुटुंबवाद यांच्यामध्ये राष्ट्र ही एक जाती आहे. मानवतावादाकडे अग्रेसर होण्याकरिता, कूळ, जाती, राष्ट्र या पायऱ्या ओलांडून जावे लागते. विश्वबंधुत्वाचे तत्त्वज्ञान मान्य असणाऱ्या रशिया, चीन, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड इत्यादी देशांनी राष्ट्र-कल्पनेचा त्याग केलेला नाही. राष्ट्र आहेत म्हणून तर " राष्ट्रसंघ " आहे. " युनो " आहे. " विश्वकुटुंबवादाच्या अलीकडची पायरी म्हणजे राष्ट्रवाद. आपआपल्या राष्ट्राचा विकास साधण्यासाठी त्याची आजही आवश्यकता आहे. या कल्पनेला कोणत्याही राष्ट्राचा विरोध असण्याचे कारण नाही. महात्मा ज्योतिबा फुल्यांना या मधल्या पायरीचे भानच राहिले नाही असे त्यांच्या कार्याबद्दल आदर बाळगूनही म्हणावे लागते."[१४५] मुलावरील अतिप्रेमामुळे त्याचे दुर्गुण व दोष मातेला दिसत नाहीत म्हणतात. या आंधळेपणाला डोळस आंधळेपण असे नाव आहे. इंग्रज राज्यकर्त्यांच्या संदर्भात ज्योतिरावांना हे डोळस आंधळेपण आलेले असावे काय ? कारण इंग्रज राज्यकर्ते त्यांना दयाळू आणि तारक वाटतात.

भारतीय राष्ट्रवादाचे प्रणेते आणि आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते
न्या. मा. गो. रानडे (१८४२–१९१०)

राजा राममोहनराय, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, दादाभाई नौरोजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि महात्मा ज्योतिराव फुले या थोर महापुरुषांप्रमाणेच केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारतवर्षाला ज्यांच्या कार्याबद्दल अभिमान वाटावा असा थोर नेता महाराष्ट्रात जन्माला आला. भारतीत आध्यात्मिक उदारमतवादाचा उद्गाता, महाराष्ट्राचा साक्रेटिस, मराठ्यांच्या इतिहासावर भाष्य करणारा सेंट ऑगस्टीन व टॉयन्बी, भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाचा जनक अशा विविध विशेषणांनी त्यांचे मोठेपण सिद्ध झालेले आहे.

महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवनाचा पाया घालणारा महान शिल्पकार

" रानड्यांनी आपल्या विशाल व सहानुभूतिपूर्ण दृष्टीने सामाजिक जीवनाच्या सर्व अंगोपांगांचे विश्लेषण केले आणि धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रातील विचारांना एका व्यापक तत्त्वज्ञानाची बैठक मिळवून दिली. न्या. रानड्यांच्या स्वभावात व धोरणात वैचारिक समन्वय व व्यावहारिक तडजोड या दोन तत्त्वांना महत्त्व होते. त्यामुळे लोकसंग्रहासाठी आपल्या उदारमतवादाची

परंपरावादाशी सांगड घालून ध्येयाचे अनुसंधान कायम राखले. महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवनाचा पाया घालणारे ते महान शिल्पकार होते. त्यांनी "पुनर्विवाहोत्तेजक मंडळी," "वक्तृत्वोत्तेजकसभा," "वसंत व्याख्यानमाला," "फिमेल हायस्कूल," "प्रार्थना समाज" "सार्वजनिक सभा" इत्यादी अनेक लहान मोठ्या संस्थांना जन्म दिला संस्थांच्या निर्मितीबरोबरच त्यांचे लक्ष सामाजिक सुधारणांवरही केन्द्रित झालेले होते. "सार्वजनिक सभे"च्या निर्मितीचा उद्देश प्राधान्याने राजकीय होता. पण या संस्थेकडून राजकीय स्वरूपाचे कार्य पार पडले नाही. न्या. रानडे यांनी निर्माण केलेल्या या संस्थांचे लोण संपूर्ण महाराष्ट्रभर पसरले आणि इतर कोणत्याही प्रांतापेक्षा निरनिराळ्या क्षेत्रांत महाराष्ट्र आघाडीवर राहिला याचे रहस्य न्या. रानडेंच्या या योजकतेत आहे.

काही अभ्यासकांच्या मते न्या. रानडे हे जसे महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचे अग्रणी व या क्षेत्रातील भारतातल्या कार्यकर्त्यांचे गुरू ठरले तसे ते राजकीय बाबतीत ठरू शकले नाहीत. कारण त्यांचा राजकीय विचार हा त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा एक भाग होता. बुद्धिप्रामाण्य, व्यक्ति-स्वातंत्र्य, परमतसहिष्णुता, उदारमतवाद आणि सामाजिक कर्तव्यबुद्धी या मूल्यांनी त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान आकाराला आले होते. भारताचा उत्कर्ष झाला पाहिजे याचा निदिध्यास त्यांना लागलेला होता आणि सरकारी नोकरीत अत्यंत जबाबदारीच्या पदावर असूनही अविरत उद्योगात ते गढून गेलेले होते. न्या. रानडे हे महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे जनकही समजले गेले पाहिजे. लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे मातीच्या गोळ्याप्रमाणे थंड चेतनाहीन झालेल्या महाराष्ट्रात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य त्यांनी अहर्निश केले. विविध ज्ञानशाखांचा सखोल व्यासंग, सृजनात्मक प्रज्ञा आणि आपल्या देशबांधवांच्या कल्याणाची तळमळ यामुळेच विजयानगरच्या साम्राज्याची स्थापना करणाऱ्या विद्यारण्य उपाख्य माधवाचार्यांशी "सर्वज्ञः स हि माधवः" अशी लो. टिळकांनी सार्थ तुलनाही केलेली आहे. न्या. रानडे हे राजकीय बाबतीत गुरू ठरले नाहीत हे वर आलेले विधान अर्धसत्य आहे. कारण भारतसेवक गोखले लो. टिळकांच्या जीवनापासून प्रेरणा घेऊन डेक्कन सोसायटीत आलेले असले तरी पुढे ते आगरकरांचे सहकारी बनले आणि न्या. रानड्यांना गुरुस्थानी समजू लागले.

न्या. रानड्यांनी राजकारणात ज्या आध्यात्मिकतेचा पुरस्कार केला तीच आध्यात्मिकता गोखल्यांनी राजकारणात आणली आणि त्यांचे राजकीय शिष्य म्हणून महात्मा गांधींनी तर आपल्या संपूर्ण जीवनाचा आधारच आध्यात्मिकता करून टाकला; तेव्हा न्या. रानडे राजकीय बाबतीत गुरू ठरले नाहीत हे विधान अर्धसत्य आहे. न्या. रानड्यांच्या बाबतीत दोन मर्यादा होत्या. एकतर त्यांची दादाभाई नौरोजींप्रमाणेच इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर श्रद्धा होती आणि "इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदानच होय" असा त्यांचाही विश्वास होता. दुसरी गोष्ट रानडे हे न्यायमूर्तिपदावर आणि शासकीय सेवेत होते. या दोन्ही मर्यादांमुळे आणि त्यांच्या सौजन्यशील, सहिष्णू प्रकृतीधर्मामुळे इंग्रजांवर उघड उघड आघात करणे शक्यच नव्हते, परंतु ज्या ठिकाणी इंग्रजांच्या चुका दिसतील, अन्याय लक्षात येतील तिथे सौम्य शब्दात कान उघाडणी करायलाही ते कचरले नाहीत. पण असे प्रसंग अल्पच असावेत, म्हणून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात, "ब्रिटिश राज्यकर्त्यांविषयी बोलताना न्या. रानडे, दादाभाई नौरोजी इतकीसुद्धा टीका करण्यास तयार नसत हे देखील तितकेच खरे आहे."[४१]

न्या. रानड्यांचा उदारमतवाद

न्यायमूर्ती रानडे उदारमतवादी असलेल्या राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रवाद आक्रमकच असला पाहिजे किंवा परकीयांच्या द्वेषावरच त्याची उभारणी झाली पाहिजे असे काही राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान

नाही. सर्व जगातील पारतंत्र्य, अन्याय आणि जुलूम नष्ट करण्याची विचारसरणी देखील राष्ट्रवादी असू शकते. या राष्ट्रवादाला " मानवतावादी राष्ट्रवाद " असेही नाव दिले जाते. शांत प्रकृतीच्या, सहिष्णुवृत्तीच्या, तडजोडीच्या धोरणाचा अवलंब करून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या न्या. रानड्यांनी या उदारमतवादी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. न्या. रानड्यांचा हा उदारमतवाद असलेला राष्ट्रवाद इंग्रजांच्या अनुकरणातूनच आलेला होता. इंग्रजांची सत्ता या देशातून घालवावयाची असल्यास या देशातील लोकांनी संघटित झाले पाहिजे. या देशात धर्माच्या आधारावर दोन भिन्न भिन्न समुच्चय अस्तित्वात होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावयाचा असल्यास हिंदू आणि मुसलमान या भिन्न समुच्चयांचा एकच राष्ट्ररूपी विशाल समुच्चय उत्पन्न करावा आणि आपले स्वराज्याचे ध्येय साकार करावे असा न्या. रानड्यांचा हेतू असला पाहिजे. डॉ. केतकरांनी रानड्यांच्या उदारमतवादाचे स्वरूप एकाच वाक्यात सांगितले आहे. " मी हिंदु नाही, मी मुसलमान नाही, मी हिंदी आहे अशी भावना असणे." [१४७]

डॉ. केतकरांनी न्या. रानड्यांच्या उदारमतवादाच्या मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत. परंतु रानड्यांच्या उदारमतवादी राष्ट्रवादानेही या देशात मूळ धरलेले आहे हे अभ्यासकांना विसरता येत नाही. डॉ. ना. र. देशपांडे, न्या. रानड्यांना आधुनिक भारताचे प्रवर्तक तर समजतातच परंतु भारतीय राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान मांडणारे थोर कार्यकर्ते म्हणूनही गौरवितात. न्या. रानड्यांच्या राजनिष्ठेचा दोष ते एकोणिसाव्या शतकातील रूढ उदारमतवादाच्या तत्त्वज्ञानावर ढकलतात. डॉ. श्रीमती नलिनी पंडित या थोर नेत्यांच्या पारंपरिक संस्कारांकडे निर्देश करतात. त्या म्हणतात, " स्वतःच्या सामर्थ्याचा प्रत्यय येईपर्यंत साम्राज्यशाहीच्या विरोधकांना स्वसंरक्षणासाठी तरी राजनिष्ठेचे चिलखत आवश्यक असते हे खरे असले तरी रानडे–दादाभाईंच्या राजनिष्ठेत धोरणापेक्षा भावनेचा भागच अधिक होता. त्यांच्या मनावरील प्राचीन संस्काराप्रमाणे राजद्रोह हा नुसता गुन्हाच नव्हे तर ते एक पाप होते. [१४८] न्या. रानडे, दादाभाई नौरोजी ही सुधारणावादी विचारसरणीची नेतेमंडळी उदारमतवादी असली तरी सश्रद्ध होती. देवाधर्मावर त्यांचा विश्वास होता. न्या. रानडे तर साधु–पुरुषच ओळखले जावे इतके चारित्र्यसंपन्न होते. तरीही ते राष्ट्रीय वृत्तीचेच होते. त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीची खरीखुरी साक्ष त्यांच्या " राईज ऑफ मराठा पॉवर " या ग्रंथाच्या पानापानातून स्पष्टपणे जाणवल्याशिवाय राहत नाही. त्यांना मराठ्यांच्या परंपरेचा अभिमानही होता. एखाद्याला परंपरेचा अभिमान असला म्हणजे त्यात काही न्यून असल्याची शक्यता आहे असे समजणेही योग्य नाही.

रानड्यांनी प्रतिपादिलेले संत मंडळाचे कार्य आणि राष्ट्रवादाचा उदय

महाराष्ट्र संत मंडळाच्या कार्याचे मूल्यमापन करताना न्या. रानड्यांच्या पुढे युरोपातील राष्ट्रवादाच्या उदयाचा इतिहास होता. या राष्ट्रवादाला बळ देण्याचे कार्य सोळाव्या शतकातील रिनॉसन्स आणि रिफॉर्मेशन या चळवळींच्या द्वारे मिळालेले होते. न्या. रानड्यांना महाराष्ट्रातील संतांच्या चळवळीत आणि त्यांच्या पार्श्वभूमीवर उदयाला येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे साम्य आढळले आणि संतांच्या चळवळीतूनच म्हणजे सर्वसामान्य लोकांच्या प्रयत्नातूनच महाराष्ट्रात मराठ्यांच्या राज्याची स्थापना झाल्याचे आपले मत त्यांनी "मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष" (राईज ऑफ मराठा पॉवर) या ग्रंथात मांडले.

रानड्यांच्या उदारमतवादापेक्षा त्यांनी राष्ट्रवादाच्या उदयाचे केलेले ऐतिहासिक विवेचन अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहेच परंतु त्यापेक्षाही महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातही राष्ट्रवादाच्या उदयाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. न्या. रानड्यांनी महाराष्ट्राची परंपराच इथे सांगितली आहे. " मराठ्यांचा इतिहास म्हणजे एका खऱ्या हिंदी राष्ट्राच्या रचनेचा इतिहास होय. या राष्ट्राने मुसलमानी लोकांच्या धांगडधिंग्याच्या क्षुब्ध झालेल्या तरंगातून आपले डोके खूप वर उचलले. पुढारी लोकांच्या प्रयत्नास जो मागून मोठा पाठिंबा मिळाला, तो हाच. आणि या राष्ट्रोदयाच्या आधार-स्तंभामुळेच महाराष्ट्र मंडळाच्या अग्रणीस वाटले की इतर एतद्देशीय सत्ता एकत्र करून आपल्या मुठीत आणता येईल आणि दिल्ली येथे मुख्य हिंदुपातशाहीची स्थापना करता येईल." [१४९] हा न्या. रानड्यांचा उतारा अतिशय बोलका आहे. ..... पुढे एका ठिकाणी ते सांगतात, " एकट्या दुकट्या साहसी व्यक्तीच्या धाडसास यश येऊन मराठी सत्तेची उभारणी झाली नाही. सगळी लोक-संख्या जेव्हा नवीन विचारांनी उंचबळली आणि जात, धर्म, भाषा आणि वाङ्मय ह्या दृढ प्रेम-शृंखलांनी परस्पर पूर्णपणे जखडून गेली तेव्हाच मराठी सत्तेचा प्रादुर्भाव झाला." [१५०] अशा प्रकारे राष्ट्रीय उदयाची मीमांसा करणारे न्या. रानडे हे शुद्ध उदारमतवादी होते, किंवा ते भाऊक राजनिष्ठ होते असे म्हणणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. मराठ्यांच्या परंपरेसंबंधी डॉ. व्ही. पी. वर्मा लिहितात, " The germinal roots of the concept of political freedom in modern India have been laid primarily by the Maharashtra leaders and fighters like Phadke, Chaphekar, and Lokmanya Tilak who were in ideological continuity with the early fighters for freedom in the seventeenth and eighteenth centuries." [१५१]

परंपरेने आलेल्या राष्ट्रीयत्वाचे हे भान भारताला आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य रानड्यांनी आपल्या ग्रंथाद्वारे केले, म्हणूनच राष्ट्रीयत्वाचे जनकत्व त्यांना दिले जाते. सतराव्या आणि अठराव्या शतकातील स्वातंत्र्याची परंपरा केवळ मराठ्यांनाच नव्हे तर सर्व सुशिक्षित भारतीय आणि राज्यकर्त्या इंग्रजांना न्या. रानड्यांनी समजावून सांगितली. न्या. रानड्यांनी पेशवे दप्तराचे वाचन करून त्यावर अभ्यासपूर्ण लेखन केले. त्याचा परिणाम असा झाला की इतिहास संशोधनाची परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली. इतिहासाचार्य राजवाडे, रावबहादूर साने, पारसनीस, सरदेसाई, चि. वि. वैद्य, श्री. पावगी अशी कितीतरी नावे सांगता येतील. या इतिहाससंशोधनातून मराठी मनात राष्ट्रीय-त्वाच्या भावनेचा परिपोष झाला.

धार्मिक पुनरुज्जीवनाचे पोषक कार्य

राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कार्याला धार्मिक पुनरुज्जीवनाच्या कार्याचे बळ मिळाले. न्या. रानडे प्रार्थनासमाजाचे सदस्य असले तरी संतांवर त्यांची श्रद्धा होती. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांचे काव्यग्रंथ त्यांच्या नित्य पठनात असत. हिंदुधर्माबद्दलही त्यांच्या अंतःकरणात आदराचीच भावना होती. प्रत्येकच धर्मात काही अनिष्ट चालीरीती असतात हे ते ओळखून होते. त्यामुळे धर्मांतराचे विचार त्यांच्या साधुशील अंतःकरणात कधीच आले नाहीत. न्या. रानडे यांच्याच विचाराचे असलेले कृष्णशास्त्री चिपळूणकर देखील हिंदुधर्माचे अभिमानी होते. " विचार लहरी " या नावाचे साप्ताहिक चिपळूणकर चालवीत असत. हिंदुधर्मावर हल्ला चढविणाऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्यांचा खरपूस समाचार या साप्ताहिकातून शास्त्रीबोवा घेत असत. याच काळात महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान बाळगणारे

आणि छत्रपती शिवाजी महाराजांवर महाकाव्य लिहिण्याचा संकल्प करणारे एक विद्वान आणि सामाजिक कार्यकर्ते व फर्डे वक्ते महादेव मोरेश्वर कुंटे यांनीही ख्रिस्ती मिशनरींच्या आक्रमणाचा हल्ला परतवून लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी "आर्यसंस्कृतीची स्थित्यंतरे" या नावाचा इंग्रजी ग्रंथ लिहून त्यातून वैदिक आणि बौद्ध या धर्माचा इतिहास इंग्रजांपुढे मांडला. राष्ट्रीय काव्याच्या संदर्भात कुटचांचा स्वतंत्र विचार करावयाचा असल्यामुळे या ठिकाणी त्यांच्या सांस्कृतिक कार्याचा ओझरता उल्लेख केलेला आहे.

याच कालखंडात आपल्या सुधारणावादी विचारसरणीने, प्रत्यक्ष कृतीने आणि प्रगाढ विद्वत्तेने महाराष्ट्राला सुपरिचित असलेले शंकर पांडुरंग पंडित हे एक सामाजिक कार्यकर्ते होऊन गेले. "वेदार्थयत्न" या नावाचे मासिक काढून सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे आणि धर्मजागरणाचे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्राच्या भागवत धर्माच्या मंदिराचा कळस म्हणून ज्यांचा वारकरी आदरपूर्वक उल्लेख करतात त्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेचे अत्यंत परिश्रमपूर्वक संपादन करण्याचे कार्यही पंडितांनी केलेले आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे धार्मिक अस्मितेच्या पुनरुज्जीवनाचे कार्य राष्ट्रीय अस्मितेच्या पुनरुज्जीवनाबरोबरच संपूर्ण भारतभर सुरू झालेले असले तरी महाराष्ट्रात ते अधिक जोमाने सुरू झालेले होते. स्वत्वाची जाणीव हळूहळू का होईना पण लोकांच्या मनात होऊ लागली होती. या पुनरुज्जीवनाला काही भारतीय सत्पुरुषांनी हातभार लावलेला होता.

अस्मितादर्श राष्ट्रवादाचे जनक विष्णुशास्त्री चिपळूणकर

"महाविष्णूचा अवतार" (१८५०–१८८२)

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वीचे देशातील काय किंवा महाराष्ट्रातील काय एकूण वातावरण राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीने बहुतांशी निराशाजनकच होते. अठराशे सत्तावन साली होऊन गेलेल्या स्वातंत्र्ययुद्धाची मोठमोठ्या समाजधुरीणांनी दखलच घेतली नव्हती. किंबहुना नानासाहेब, तात्या टोपे, झांशीची राणी या क्रांतिकारकांनी केलेली प्रचंड धडपड, त्यासाठी केलेले जीवाचे रान आणि शेवटी काहींनी केलेले बलिदान याचा अर्थ समजावून घेण्याची पात्रताच अव्वल इंग्रजीतील सुशिक्षित जाणते लोक गमावून बसले होते. इंग्लंड हे आपले कल्याणकर्ते राष्ट्र नसून खऱ्या अर्थाने शत्रुराष्ट्र आहे, त्यानेच आपल्याला गुलाम केले आहे. आपली राजकीय सत्ता आणि भारतावरील सार्वभौमत्व टिकविण्यासाठीच या लोकांनी क्रांतिकारकांचे सशस्त्र आक्रमण मोडून काढले, याचाही या लोकांना विसर पडला होता. किंबहुना क्रांतिकारकांचा हा प्रयत्न लक्षात घेण्यासारखा नाही अशीच त्यांची धारणा होती.

उलट "इंग्रजी सत्ता हे ईश्वरी वरदान आहे," त्यांच्या दयाळूपणामुळे भटनानाचे राज्य आले नाही ही खरोखर परमेश्वरी कृपा आहे, इंग्रज आमचे हितकर्ते गुरु आहेत असे म्हणण्यापर्यंत तत्कालीनांची मजल गेली होती. या ब्रिटीशनिष्ठ पक्षाचे वर्णन स्वा. सावरकरांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे. "आपले स्वराज्य गेले हे बरे झाले, ... त्यांची सत्ता नि कृपाछत्र आमच्यावर निदान तीन, चार शतके तरी राहावे ह्यातच आमचे कल्याण आहे आमचे झाडून सारे पूर्वज, अडाणी धर्मभोळे नि मूर्ख होते. नाना फडणवीस आज असता तर तो वेडचातच काढला जाता. सत्तावनचे बंडही स्वदेशावर कोसळलेली आपत्ती होती" असेही काहींचे अभिप्राय होते. इंग्रजी राज्य म्हणजे कायद्याचे राज्य, सुव्यवस्थेची राजवट, प्रगतीवर संस्कृतीचे रोपण करणारे म्हणूनच राज्यकर्त्यांकडे पुढारी बघत होते आणि लोकांनाही तसेच समजावीत होते. स्वकीय, परकीय भावनेपेक्षा राजनिष्ठा व्यक्त करण्यातच

त्यांना इतिकर्तव्यता वाटत होती. या लोकांच्या मनोवृत्तीसंबंधी वि. का. राजवाडे संतापाने म्हणतात, "बंगाल, राजपुताना व महाराष्ट्र या तीन प्रांतांतील कित्येक वृद्ध लोक असे सांगतात की शके १७७९ (१८५७) तील ह्या प्रचंड धडपडीचा अर्थच कळण्याची आपली ताकद नव्हती. मग स्वपक्ष किंवा परपक्ष घेण्याची किंवा टाकण्याची वाव दूरच राहिली ! जुन्याच्या अभिमानाने किंवा स्मरणाने येणारा त्वेषही या कुलहीन, राष्ट्रहीन व समाजहीन लोकांच्या ठायी नव्हता. भाऊ दाजी, विनायकराव वासुदेवजी, नाना मोरोजी, दादोवा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, केशो लक्ष्मण छत्रे, ईश्वरचंद्र विद्यासागर, दिनकरराव राजवाडे, सालरजंगे, टी. माधवराव, विश्वनाथ नारायण मंडलिक, विश्राम रामजी घोले वगैरे कारकुनी पेशाची राष्ट्रहीन आंग्लशिक्षित मंडळी ह्याच युगातली होत. तरुण दादाभाई नौरोजी ह्या राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगी लंडनात स्वदेशीयांकरिता नोकऱ्या मागण्याच्या अर्जदारीत गुंतले होते. असल्या मंडळींना स्वदेश, स्वसमाज व स्वतःचा इतिहास यांची मातब्बरी काय होय ?"[१५२]

हळव्या मनाच्या माणसाला राजवाडचांच्या लेखणीचे हे फटकारे अस्वस्थ केल्याशिवाय राहणार नाहीत हे खरे असले तरी प्रस्तुत विवेचन त्या काळातील लोकांच्या मनोवृत्तीचे दर्शन घडविणारे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महाविष्णूने अवतार धारण केला, अशा आशयाचे विधान डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी केलेले आहे. त्यांच्या एका हातात दुर्मत दमनासाठी उचललेली गदा होती, तर दुसऱ्या हातात राष्ट्रकल्याणासाठी उगारलेले सुदर्शन चक्र होते. या मालाकार विष्णूच्या प्रचंड शक्तिमान आणि प्रखर सूर्यासारखे तेज प्रगट करणाऱ्या सुदर्शनाने राष्ट्रहीन, समाजहीन, दुबळ्या प्रवृत्तीचा विध्वंस होऊ लागला, आणि स्वत्वाचा, पौरुषाचा, अस्मितेचा उदय होण्याची प्रक्रिया सुरू झाली. निबंधमालेच्या चित्कळेच्या स्पर्शाने महाराष्ट्रात पुन्हा नवे स्फुरण जागृत झाले.

महाराष्ट्रातील युगप्रवर्तक महामानव

अवघ्या बत्तीस वर्षांच्या वयात विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेद्वारे केलेल्या राष्ट्रीय कार्याला इतिहासात जोड नाही. ही गोष्ट खरी आहे की विष्णुशास्त्र्यांपूर्वी व खुद्द त्यांच्या काळातही विद्वत्तेने आणि कर्तृत्वाने असाधारण अशी अनेक माणसे महाराष्ट्रात होती. काही तर वैचारिक-दृष्ट्याही त्यांच्यापेक्षा काकणभर श्रेष्ठच असतील. परंतु चिपळूणकरांची पदवी त्यांना देता येणार नाही. साहित्याचे सामर्थ्य किती प्रचंड असते; आणि राष्ट्रीय उत्थानाचे कार्य साहित्य शक्तीच्या द्वारे किती प्रभावीपणे होऊ शकते याचा प्रत्यय तत्कालीन लोकांना निबंधमालेमुळेच आला ही गोष्ट निर्विवाद आहे. या निबंधमालेच्या साधनाद्वारेच स्वदेश, स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषा यांच्यासंबंधी अभिमान निर्माण करण्यात चिपळूणकर यशस्वी झाले. देशभक्त, राष्ट्रभक्त चिपळूणकरांच्या अभिव्यक्तीने अस्मितादर्श राष्ट्रवादाचा महाराष्ट्रात उदय झाला. म्हणूनच "युगप्रवर्तक" असे गौरवपूर्ण विशेषण त्यांना इतिहासकारांनी बहाल केले.

चिपळूणकरांच्या जीवनाचा संक्षिप्त आलेख

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळी धाकटचा चिपळूणकरांचे वय केवळ सात वर्षांचे होते त्यांचे वडील बृहस्पतितुल्य विद्वान, लेखक, कवी आणि रसिक म्हणून महाराष्ट्रात गाजलेले होते कृष्णशास्त्री चिपळूणकर दक्षिणा प्राईज कमिटीचे चिटणीस असल्यामुळे वृत्तपत्रे, अभिप्रायार्थ नवीन ग्रंथ, नियतकालिके अनायासेच घरी येत असत. विद्यार्थीदशेत मासिकांच्या संपादनाचे धडे मिळाले आणि बहुतेक प्राचीन काव्याचे अध्ययन झाले. कॉलेजात गेल्यावर हे वाचन अधिक चौफेर झाले असावे. संस्कृत काव्य, नाटके यांचे वाचन होतेच. पुढे पाश्चात्य ग्रंथकार आणि शास्त्रे व इतिहा यांचे वाचन झाले. त्यातही डॉ. जॉनसन, ॲडिसन, मेकॉले, रुसो, वाल्टेर, लॉक या पाश्चात्य ग्रंथकारांचा वि ष अभ्यास त्यांनी केला. १८७२ मध्ये मुंबई विद्यापीठाचे ते पदवीधर झाले. ही पदवी संपादन करण्यापूर्वीच

त्यांनी "संस्कृत कविपंचक" या विद्वत्तापूर्ण ग्रंथाचे लेखन केले होते. पदवीधर होताच वडिलांच्या शालापत्रकाच्या संपादनाची पूर्ण जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि स्वावलंबी असावे म्हणून शिक्षक या नात्याचे जीवनाला आरंभ केला. त्या काळातच त्यांचे स्फुट लेखन सुरू होते. शिक्षकाच्या व्यवसायात असतानाच वयाच्या चोविसाव्या वर्षी त्यांनी पुण्याला निबंधमालेची सुरुवात केली. त्यांचे लेखन जसजसे अधिक तेजस्वी आणि ओजस्वी होऊ लागले. .....

तसतशी लेखनस्वातंत्र्यावर सरकारकडून बंधने पडण्याची अधिक शक्यता त्यांना वाटू लागली. पुण्याहून रत्नागिरीला त्यांची बदली करण्यात आली त्यामागील हेच कारण होते. "शेवटी स्वतंत्र वृत्तीच्या चिपळूणकरांनी १८७९ मध्ये सरकारी नोकरीचा त्याग केला. आता ते पूर्णपणे मुक्त झाले. स्वतंत्र असे जीवननिर्वाहाचे साधन असावे म्हणून त्यांनी "चित्रशाळेची" स्थापना केली. "किताबखाना" सुरू केला. स्वतंत्र देशाला उपयुक्त असे राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या हेतूने १८८० मध्ये न्यू इंग्लिश स्कूलची प्रतिष्ठापना टिळक व आगरकर या आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने करून त्यांच्या सहकार्याने लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी १८८१ मध्ये "केसरी" व "मराठा" या वृत्तपत्रांची स्थापना केली. चिपळूणकरांनी एकटयाने सतत आठ वर्षे निबंधमालेचे लिखाण केले आणि तिची समाप्ती करताना कृतकृत्य झाल्याचे स्वगौरस्वपर उद्‌गारही काढले. अवघ्या बत्तीस वर्षांच्या वयात या थोर पुरुषाचा अकाली अंत झाला. पण त्याबरोबरच महाराष्ट्रात अस्मिता-दर्श राष्ट्रवादाचा उदयही झाला. चिपळूणकरांचे हे राष्ट्रीय ऋण सर्वांनी मान्य केलेले आहे.

इंग्रज राज्यकर्त्यांचे वास्तवरूप दाखविणे हेच उद्दिष्ट

विष्णुशास्त्र्यांची अखंड ज्ञानसाधना, चौफेर विद्याव्यासंग, लेखणीच्या प्रभावाचा आलेला आत्मप्रत्यय, दांडगा आत्मविश्वास या सर्व गोष्टी त्यांच्या अहंकाराचे आधीच पोषण करीत होत्या. त्या अहंवृत्तीलाच स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म, स्वातंत्र्य आणि स्वदेशाभिमान यांची जोड मिळाल्याने उत्तरोत्तर तो उत्कट, प्रखर आणि तेजस्वी झाला. स्वाभिमानाचे व स्वावलंबनाचे त्याला पाणी चढले. इंग्रजी विद्येच्या म्हणजेच वाघिणीच्या दुधावर तो अधिक पुष्ट झाला आणि तारुण्याच्या उसळत्या जोमाने निबंधमालेच्या माध्यमातून त्याचा विस्फोट झाला. सुरुवातीला या विस्फोटाचे स्वरूप भाषाभिमानाचे होते. कोणत्याही प्रकारच्या अभिव्यक्तीला, आविष्काराला मराठी भाषा समर्थ आहे हे चिपळूणकरांनी स्वतःच्या प्रयोगाने सिद्ध केले होते. भाषा हे दुधारी शस्त्रासारखे उपयुक्त साधन आहे याची त्यांना जाणीव होती. केवळ ज्ञानप्रसारच नव्हे तर या भाषेने लोकांच्या अंतरंगातही प्रवेश करता येतो हेही ते जाणून होते. इंग्रजांच्या आगमनामुळे आमच्यात व आमच्या देशात सुधारणा घडून आल्या असे तुणतुणे वाजविणाऱ्या इंग्रज स्तुतिपाठकांना त्यांनी बेधडक सांगून टाकले, "इंग्रज इकडे आले नसते तर आपले काही अहित झाले असते असे नाही. इतकेच नव्हे इंग्रज या जगात नसले तरी त्यांच्यावाचून आम्ही रसातळात पोचलो असतो असे नाही."

"आमच्या देशाची स्थिती" या सुप्रसिद्ध निबंधाचा हेतू सांगताना "आमच्या राज्यकर्त्यांची स्थिती, एतद्देशीय राजेरजवाडयांची स्थिती आणि सामान्य लोकांची स्थिती" असे तीन भाग केलेले आहेत. आणि तीनही भागाचे उद्दिष्ट एकच असून ते म्हणजे इंग्रज राज्यकर्त्यांचे वास्तवरूप हिंदी लोकांना दाखविणे ! इंग्रज सत्ताधारी हे लुटारू भामटे आहेत, त्यांनी हिंदुस्थानची लूट करून इथल्या लोकांना कंगाल बनविले आहे, ते प्रजारक्षक असल्याचा आव आणत असले तरी प्रजाभक्षक आहेत. एके काळी हेच राज्यकर्ते आमच्या देशातील राजापुढे हात बांधून अदबीने उभे राहत असत, त्यांची क्षमायाचना करीत असत. परंतु आता कृतघ्नपणाने वागत आहेत. या इंग्रजांचे पाय ज्या ज्या

देशाला लागले त्या त्या देशाचा नाश ओढवला !" इंग्रज सत्ताधीशांच्या कुटील धोरणाचे आणि फूटपाडया वृत्तीचे जणू भविष्यच चिपळूणकरांनी सांगितले.

चिपळूणकरांचा परंपराभिमान

परंपराभिमान हे आधुनिक राष्ट्रवादाचे एक महत्त्वाचे गमक आहे. चिपळूणकरांना भारतीयांच्या सर्वच उदात्त व पवित्र परंपरांचा जाज्वल्य अभिमान होता. त्यांचा अस्मितादर्श राष्ट्रवाद या परंपराभिमानावर प्राधान्याने पोसलेला होता आणि ह्या परंपरा श्रेष्ठ प्रकारच्या आहेत अशी त्यांची मनोमन श्रद्धा होती. आपल्या स्वदेशाचा आणि स्वधर्माचा गौरव करताना त्यांनी पुरातन काळापासून ऐतिहासिक कालापर्यंत झालेल्या, आणि जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत पराक्रम गाजविणाऱ्या विभूतींची नामावली देऊन इंग्रजांच्या तुलनेत आम्ही कुठेच उणे नाही हे दाखविले आहे. ते म्हणतात, "आम्हाला इंग्रजांचे गुरुत्व पत्करण्याचे मुळीच कारण नाही," हे सांगताना, व्यास, वाल्मीकी, कालिदास, कपिल, पाणिनी, आर्यभट्ट, भास्कराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, चंद्रगुप्त, पोरस, शिवाजी, बाजीराव, माधवराव, महादजी, यशवंतराव होळकर, रणजीतसिंग, रमाबाई, अहल्यावाई, लक्ष्मीवाई, नानासाहेव, तात्या टोपे अशा अनेक स्त्री पुरुषरत्नांची नावे सांगून कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांतील गुणसंपदा जोपसण्याची ऐपत आम्ही हिंदुधर्मीयात आहे,' असे वारंवार आवर्जून सांगितलेले आहे. प्रत्ययहीन, अस्मिताहीन, स्वाभिमानशून्य, पराभवाने हताश झालेल्या लोकांना आपल्या परंपरेसंबंधी सांगतांना चिपळूणकर म्हणाले, "आम्ही आज तीन चार हजार वर्षे या देशात नांदलो, एवढाली राज्ये चालविली, कायदेकानून केले, शास्त्रे निर्माण केली, कला उदयास आणल्या, ऐहिक व अध्यात्मविचार केले ते सर्व या आंग्लभीम मंडळीच्या जिवावर काय ?"[१५३]

एक पाय तुरुंगात ठेवून देशोन्नतीसाठी लेखणी हाती घेतली आहे.

विष्णुशास्त्र्यांनी स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, यांचा केवळ अभिमानच शिकविला नाही तर स्वतःच्या आचरणाने तो आदर्श म्हणून लोकांपुढे ठेवला. इंग्रजी भाषेत ग्रंथरचना करणे त्यांना अशक्य नव्हते. परंतु भाषाभिमानामुळे मराठीतच निबंधमालेची निर्मिती केली. स्वदेशाकरिता, स्वातंत्र्याकरिता त्याग करण्यास सिद्ध झाले पाहिजे हे तत्त्व सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी सिद्ध केले. त्यांच्या लिखाणामुळे सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोपही केला होता. परंतु चिपळूणकर निर्भयपणाने आपले कार्य करीत राहीले. चिपळूणकर आणि त्यांच्या आधीच्या पिढीतील कार्यकर्त्यांमधील अंतर स्पष्ट करताना आचार्य जावडेकर सांगतात, "आपल्या पारतंत्र्याचा व आपल्यावरील जुलुमाचा प्रतिकार हे मनुष्याचे आद्य कर्तव्य असून लोकांत नुसती कायदे पाळण्याची वृत्ती फैलावण्याचा प्रयत्न करणे हेच पुढाऱ्यांचे काम नाही, तर त्यांची जुलुमाचा प्रतिकार करण्याची बुद्धी व स्वातंत्र्याकांक्षा जागृत करणे हे लोकनायकाचे आद्य कर्तव्य आहे. चिपळूणकर, आगरकर यांच्यापूर्वी कोणास हे तत्त्व केवळ माहीत होणे वेगळी गोष्ट आहे. आणि त्याचा उघडपणे प्रचार करण्यास पुढे येणे आणि त्यासाठी होतील ते कष्ट सोसण्यास तयार होणे यात महदंतर आहे. हे अंतर प्रथम ओलांडण्याचा मान कायदेशीर चळवळ करणाऱ्यांत महाराष्ट्रातील या लोकांसच दिला पाहीजे." कुणी एकदा शास्त्रीबुवांना प्रश्न केला, "असे कडक लेख तुम्ही लिहिता तरी कसे ?" त्यावर त्यांनी उत्तर दिले, "अगोदर एक पाय तुरुंगात ठेवून आम्ही देशोन्नतीसाठी आपली लेखणी हाती घेतली आहे."[१५४]

उज्ज्वल ध्येयवादाची शिकवण

चिपळूणकर स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, स्वातंत्र्य यांच्याबद्दलचा अभिमान जागृत करून थांबले नाहीत. त्यांनी त्या अभिमानाला ध्येयवादाची जोड दिली. ध्येयवादाची जोड दिल्यामुळे तो अभिमान अधिक तेजस्वी झाला. पाश्चात्यांचे अनुकरण केल्याशिवाय आपला अभ्युदय होणार नाही अशा विचारांच्या सुधारकांना त्यांनी फटकारले व प्रश्न केला, " सत्य हे एकाच राष्ट्राला, एकाच धर्माला किंवा एकाच पक्षाला अनुसरून असते असे नाही, तर अशोधित धातूत जसे सुवर्णरज यदृच्छेने मिसळलेले असतात व रसायनाच्या व्यापारांनी त्यांचे पृथक्करण करत ते वेगळे काढावे लागतात. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणे हा दुराभिमान होय."[१५५] या भूमिकेतूनच त्यांनी इंग्रजी राजवटीचे वस्तुनिष्ठ स्वरूप लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना ब्रिटीश सत्तेवर, पाश्चात्य पंडितांवर, राजेरजवाड्यांवर, मिशनरी लोकांवर आणि त्यांचे अनुकरण करणाऱ्या ब्राह्मो-समाज, प्रार्थनासमाज इत्यादी पंथांवर आणि समाजसुधारकांवर लेखणीचे शस्त्र धरावे लागले. सुधारक हे या ध्येयवादाच्या आड येत होते. श्रीमती नलिनी पंडितांनी चिपळूणकरांचा पक्ष उचलून धरताना पुढील विचार मांडले आहेत. त्या म्हणतात, " तरुणांचा स्वाभिमान आणि महत्त्वाकांक्षा जागृत करताना त्यांच्या पराक्रमाचा देशाला फायदा व्हावा म्हणून त्याला उज्ज्वल ध्येयवादाची जोड देण्याची चिपळूणकरांनी दक्षता घेतली. समाजासाठी व्यक्तिसुखाचा होम करण्याची आणि विकट परिस्थितीवर मात करून प्रतिकारक्षमता टिकवून धरण्याची ताकद ध्येयवादाशिवाय येत नाही." हा ध्येयवादच चिपळूणकरांनी महाराष्ट्राला शिकविला. [१५६]

चिपळूणकरांचा साध्यसाधनविवेक

स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, स्वभाषाभिमान जागृत करून, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्य संपादन करणे हे चिपळूणकरांचे साध्य होते. स्वातंत्र्याकरिता देशाने कोणती पावले उचलावीत व राष्ट्ररचना कोणत्या पायावर करावी याकरिता योग्यप्रकारे मार्गदर्शन चिपळूणकरांनी आपल्या निबंधातून केलेले नाही असा डॉ. फडकुले आणि काही टीकाकारांचा चिपळूणकरांवर आक्षेप आहे. हा आक्षेप नुसता निराधारच नाही तर पूर्वग्रहदूषित होऊन करण्यात आलेला आहे. पारतंत्र्यापासून देशाला मुक्त करता यावे, लोकांना एकूण वस्तुस्थितीची जाणीव व्हावी एवढ्यासाठीच तर 'दुर्मतध्वंसनार्थ' त्यांनी लेखणीचे धनुष्य उचलले होते. स्वातंत्र्यसंपादनासाठी जी भौतिक साधनसंपत्ती, सैन्यबळ किंवा एखादी भव्य मजबूत संघटना असावी लागते तिचा अभाव होता. स्वतः चिपळूणकरांनीच या मर्यादांचा 'आमच्या देशाची स्थिती' या निबंधात उल्लेख केलेला आहे. " शस्त्रसामग्री नाही; राष्ट्रीय ऐक्य नाही, युद्धकलेचे शास्त्र माहीत नाही अशा स्थितीत सर्व साधनांनी संपन्न आणि बलवान अशा परकीय सत्तेशी तोंड देणे म्हणजे पुन्हा १८५७ ची पुनरावृत्ती होणे होय," ही गोष्ट चिपळूणकर जाणून होते. म्हणूनच " सध्याच्या परिस्थितीत राज्यकर्त्यांशी सलोख्याने वागणे हितकारक " असा पोक्त सल्ला त्यांनी दिला आहे. स्वातंत्र्य व लोकप्रभुत्व या पाश्चात्य तत्त्वांचा प्रसार जगभर होत आहे तेव्हा दरम्यानच्या काळात आपल्या देशातील लोकांना आत्मस्थितीचे ज्ञान होणे आवश्यक आहे. त्यासाठी रसना आणि लेखणी ही दोन सहज सुलभ साधने त्यांनी सांगितली. पहिल्या सदराखाली शाळा, व्याख्याने येतात. दुसऱ्याखाली वर्तमानपत्रे, मासिक पुस्तके व ग्रंथ येतात. या साधनांच्या साहाय्याने समाजजागृती करा हाच सद्यःस्थितीत उत्तम उपाय आहे आणि त्यासाठी अथक प्रयत्न केला पाहिजे, असा शेवटी उपदेश केला. [१५७]

संस्कारक्षम उत्तम देशभक्त नागरिक निर्माण करावयाचे असतील तर ते संस्कार मुलांच्या मनावर बालवयातच झाले पाहिजे असे सुप्रसिद्ध क्रांतिकारक जिनजेक्स रूसोने म्हटलेले आहे. चिपळूणकरांनीही राष्ट्रनिर्मितीसाठी राष्ट्रीय शिक्षण देणारी न्यू इंग्लिश शाळा काढली. ध्येयनिष्ठ देशभक्त शिक्षकांना जमवून त्यांना कार्याला लावले. निबंधमाला, काव्येतिहाससंग्रह मासिक आणि केसरी व मराठा ही नियतकालिके व वृत्तपत्रे काढून ज्ञानप्रसार व लोकजागृतीचे कार्य तात्काळ सुरू केले. स्वत: सरकारी नोकरीचे बंधन झुगारून देऊन स्वावलंबनाचा व त्यागाचा आदर्श लोकांपुढे ठेवला. पुढे याच बीजाचा मोठा वृक्ष झाला आणि आपले स्वराज्याचे ध्येय प्राप्त झाले. तेव्हा चिपळूणकरांनी स्वातंत्र्याच्या संपादनाप्रीत्यर्थ मार्गदर्शनच केले नव्हते असे म्हणणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. व्यक्ती ज्या युगात किंवा परिस्थितीत वावरत असते त्या परिस्थितीत जी साधने उपयुक्त ठरतील त्यांची योजना करणे यातच त्या व्यक्तीचा द्रष्टेपणा असतो. तो द्रष्टेपणा चिपळूणकरांच्या ठिकाणी होता म्हणून त्यांनी साध्यसाधनविवेक केला असे म्हणता येते.

अस्मितादर्श राष्ट्रवादाचा जनक

रूसोचा शिष्य म्हणून ओळखल्या जाणारा सुप्रसिद्ध जर्मन राष्ट्रवादी तत्त्वज्ञ जोहान्स जी. हर्डर याचा लोकआत्म्याचा सिद्धान्त आणि चिपळूणकरांचा राष्ट्रवाद यात पुष्कळ साम्य आहे. श्री. हर्डर लोकआत्म्याचे मूळ फार पुरातन काळापासून तो आधुनिक काळापर्यंत जिवंत असलेल्या त्या त्या देशाच्या परंपरेत असल्याचे प्रतिपादन करतो. मॅक्स ह्याँडमन या पाश्चात्य राज्यशास्त्रज्ञाने प्राचीन परंपरेच्या अभिमानापासून स्फूर्ती घेऊन परदास्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न करणाऱ्या राष्ट्रवादी विचारसरणीला " अस्मितादर्श–राष्ट्रवाद " असे नाव दिलेले आहे. चिपळूणकरांच्या राष्ट्रवादालाही अस्मितादर्श राष्ट्रवाद असेच नाव देणे योग्य ठरेल, कारण परंपरेच्या अभिमानातूनच त्याचे स्फुरण झालेले आहे.

भारतात पुनरुज्जीवनवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक राष्ट्रभक्तांची प्रेरणा ही प्राचीन आध्यात्मिक व नैतिक परंपरेतून आलेली आहे. न्या. रानड्यांच्या सामाजिक सुधारणेची तत्त्व-मीमांसा करताना प्रा. गं. वा. सरदार या परंपरेसंबंधी सांगतात, " निष्ठावंत सुधारकाला वास्तवाची पकड जरा सुद्धा सैल होऊ नये म्हणून सदैव दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. पण सध्याचे हे वास्तव आपल्या गतेतिहासातून सिद्ध झालेले असते. हिंदुसमाज हा रूढिप्रिय आहे हे खरे आहे. पण त्याची ही रूढीनिष्ठा, परंपराभक्ती हे एका दृष्टीने त्याचे बलस्थान आहे. आपल्या परंपरेचा रास्त अभिमान असणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे. ज्या अस्मितेतून वा स्वत्वभावनेतून आपल्याला आत्म-विकासाची आणि नवनिर्मितीची प्रेरणा मिळते. ती आपली अस्मिता, आपली स्वत्वभावना, आपल्या ऐतिहासिक परंपरेत गुरफटलेली असते." [१५८] चिपळूणकरांच्या विशाल प्रतिभेने हेच रहस्य ओळखले. ही प्रतिभा केवळ साहित्यकाराची प्रतिभा नव्हती ती एका युगपुरुषाची राष्ट्रभक्ताची प्रतिभा होती. ती द्रष्ट्यापुरुषाची प्रज्ञा होती. म्हणूनच तिच्या सृजनशीलतेतून नवराष्ट्रनिर्मितीचा हुंकार निर्माण झाला. चिपळूणकरांना म्हणूनच अस्मितादर्श राष्ट्रवादाच्या जनकाचा मान दिला जातो.

राष्ट्राभिमानाच्या चित्कळेच्या स्पर्शाचा अद्‌भुत प्रभाव

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने नवे मन्वंतर घडवून आणले. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात, "राष्ट्राभिमानाच्या चित्कळेच्या स्पर्शाने हे सर्व मन्वंतर घडले. १८८२ नंतरच्या वीस वर्षांत

महाराष्ट्रीयांच्या कर्तृत्वाला प्रत्येक क्षेत्रात विलक्षण बहर आला. प्रत्येक क्षेत्रात नवे तेज निर्माण झाले, नवी चित्कळा रूपास आली, नव्या सौंदर्याची झगझगीत किरणे फाकू लागली असा प्रत्यय येतो. लो. टिळक, आगरकर, न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, शि. म. परांजपे, महाराज सयाजीराव गायकवाड, नामदार गोखले, चाफेकरबंधू, वि. का. राजवाडे, खरे, गो. स. सरदेसाई, पारसनीस, पांगारकर, अण्णासाहेब कर्वे, अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल, श्री. कृ. कोल्हटकर, पंडित पलुस्कर, पंडित भातखंडे, पंडित बखले, भाऊराव कोल्हटकर, हरिभाऊ आपटे, केशवसुत, शं. वा. दीक्षित, चिंतामणराव वैद्य, वृत्तपत्र, ग्रंथ, निबंध, इतिहाससंशोधन, शास्त्रसंशोधन, काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा, विनोद, चरित्र, राजकीय जागृती, सामाजिक सुधारणा, धर्मजागृती, अर्थकारण, कला, शिक्षण इत्यादी मानव संस्कृतीच्या सर्व क्षेत्रांत कार्य करणाऱ्या थोर थोर पुरुषांची ती नावे आहेत. यातील काही नावे दोन दोन, तीन तीन क्षेत्रांत ख्यात पावली असून काहींना अखिल भारतीय कीर्ती मिळाली आहे." [१५९]

गेल्या शंभर वर्षांत अनेक अभ्यासकांनी निबंधमालेचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. निबंध वाङमयाचे, अर्वाचीन टीकापद्धतीचे आणि चरित्रात्मक वाङमयाचे जनकत्व चिपळूणकरांना अभ्यासकांनी बहाल केलेले आहे. चिपळूणकर इंग्रजी विद्येला वाघिणीचे दूध समजत असत. इंग्रजी विद्या व राजवटीपासून देशाला काय लाभ झाला हे सांगताना ते म्हणतात, " ज्ञान मिळाले, व्यावहारिक कलांची माहिती झाली आणि विशेष म्हणजे आपली मानसिक उन्नती झाली." मानसिक उन्नतीचे स्पष्टीकरण करताना ते सांगतात, " मानसिक उन्नती म्हणजे देशाभिमान, जात्यभिमान, स्वाभिमान, अनुचित कर्मापासून निवृत्ती, स्वातंत्र्याभिलाष इत्यादींविषयी ज्या मानसिक स्थितीपासून स्फूर्ती होते ती स्थिती असणे हेच देशोन्नतीचे प्रधान साधन होय. तिचा अत्यंताभाव म्हणजे देशाच्या अपकर्षाचा परमावधी होय." [१६०]

यावरून चिपळूणकरांचा इंग्रजविरोध ते परकीय होते म्हणून नव्हता तर ते साम्राज्यवादी होते, त्यांनी देशाला गुलाम केले होते, इथल्या प्रजेला पिळून काढले होते म्हणून होता. त्यांच्यामधील उत्तम गुणांचे ते चाहते होते आणि त्या त्या गुणांची त्यांनी प्रांजलपणे स्तुतीही केलेली आहे हे वरील उताऱ्यावरून लक्षात येईल. म्हणूनच चिपळूणकरांच्या निबंधमालेचा अभ्यास अजूनही लोक करीत आहेत.

राष्ट्रजनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (१८५६–१९२०)

मध्यान्हीच्या सूर्याचा अकाली अस्त

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निर्माण केलेल्या मन्वंतराने महाराष्ट्र खडबडून जागा झाला होता. जिकडे तिकडे राष्ट्रीयत्वाच्या चैतन्याचे तेज पसरले होते. नव्या आशा, नव्या आकांक्षा, नवा जोम, नवा अहंकार निर्माण करण्यात, नव्या जाणिवा निर्माण करण्यात चिपळूणकर यशस्वी झाले होते. अस्मितादर्श राष्ट्रवादाची रणदुंदुभी वाजवीत, स्वाभिमानाची विजयपताका फडकावीत मराठीचा नवा सेनापती, नवा शिवाजी चालला होता. रसना आणि लेखणी या दोन शस्त्रास्त्रांनी राष्ट्रीय जागृती करीत आणि आधुनिक मराठीतील वैचारिक वाङमयाचा एकएक प्रांत सर करीत चिपळूणकरांच्या सैन्याची घोडदौड सुरू झालेली होती. नव्या जोमाचे मिशनरी बाण्याचे देशभक्तीने परिपूर्ण स्वातंत्र्यनिष्ठ धीरवर दोन तरुण सरदार सहायक म्हणून आपल्या मोहिमेत चिपळूणकरांनी सामील

करून घेतले होते. पण अवघ्या बत्तीस वर्षांच्या वयात महाराष्ट्राच्या दुर्दैवाने चिपळूणकरांचे अकाली दुःखद निधन झाले. महाराष्ट्राचा भाग्यविधाता कल्पांतापर्यंत निद्रित झाला. "महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा द्रष्टा, स्वातंत्र्यगंगेचा भगीरथ आणि ज्ञानदानाचा भास्कर दिनांक १७ मार्च १८८२ रोजी अस्तंगत झाला. त्यागी, स्वाभिमानी, दूरदर्शी व कर्तृत्वशाली असे मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर दिवंगत झाले. महाराष्ट्रशारदेच्या कंठातील बहुमोल रत्नमाला अकालीच गळून पडली." [१११] अशा शब्दांत दा. न. शिखऱ्यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. माध्यान्हीच्या सूर्याचा अकाली अस्त झाला.

निश्चयाचे आणि धैर्याचे दोन महामेरू

विष्णुशास्त्र्यांच्या सर्व राष्ट्रीय प्रयत्नांत सहकारी म्हणून कार्यभाग उचलण्याचे दायित्व टिळक आणि आगरकर यांनी स्वीकारले होते. त्यांच्या सहवासात त्यांनी दीड दोन वर्षे घालविली होती. म्हणूनच एवढा मोठा जबरदस्त आघात होऊनही या नव्या तरुणांचे धैर्य खचले नाही. त्यांच्या महत्त्वाकांक्षेला, ध्येयनिष्ठेला तडा गेला नाही. चिपळूणकरांचे मोठेपण जसे त्यांनी पुरस्कारलेल्या अस्मितादर्श राष्ट्रवादात आहे, स्वार्थत्यागपूर्वक निर्माण केलेल्या संस्थांत आहे, त्यांच्या लोकजागृती आणि लोकशिक्षण या ध्येय–धारणेत आहे, तसेच या सर्व कार्यांसाठी त्यांनी मिळविलेल्या या दोन अजोड सहकाऱ्यांत आहे. मालाकारांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेल्या धक्क्यातून सावरण्याच्या उद्योगात असतानाच अवघ्या तीन महिन्यांतच या सहकाऱ्यांच्या निष्ठेच्या कसोटीची वेळ आली. कोल्हापूर प्रकरणी टिळकांना 'मराठ्यां'चे आणि आगरकरांना 'केसरी'चे संपादक म्हणून एकशे एक दिवसांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. दोघेही अवघे सव्वीस सत्तावीस वर्षांचे तरुण, दोघेही विवाहित, प्रपंचाची जबाबदारी असणारे आणि "तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे राहून लोकसेवेचे पहिले पाऊल उचलताच त्यांच्या मस्तकावर खटल्याची कुऱ्हाड घालण्यात आली. पण दोघांचेही धैर्य असामान्य !! अचल !!" [११२] दोघेही निश्चयाचे आणि धैर्याचे महामेरू !

युद्धमय जीवनाचा आधुनिक आदर्श

हे दोघेही देशभक्त पदवीधर तरुण क्रियाशील आणि प्रतिभासंपन्न होते. "दोघेही स्वातंत्र्यवादी आणि जहाल राष्ट्रवादी असले तरी आगरकरांनी उत्तर आयुष्यात राजकारणाचा रस्ता सोडून सामाजिक कार्याचीच धुरा अंगावर घेतली. टिळकांनी प्रथम थोड्याशा अनिच्छेने स्वीकारलेले राजकारण, पुढे आपल्या जीवनाचे ध्येय म्हणून स्वीकारले आणि एकाहून एक मोठी अशी राजकारणातील आवाहने स्वीकारली, खेळविली आणि प्रसंगी त्यासाठी एकापेक्षा एक जबर शिक्षा "अपराजित हृदयाने सोसल्या." ते राजकीय पुढारी बनले व संपादकी हे त्या पुढारीपणाचे एक साधन झाले. लोकजागृतीची चळवळ करण्याचे शस्त्र म्हणूनच त्यांनी "केसरी" आमरण चालविला, त्यांचे सारे जीवनच युद्धमय होते." [११३]

प्रेरणा आणि प्रकृती

श्री. भा. कृ. केळकरांनी एकाकी झुंजणाऱ्या बलदंड झुंजार युद्धनेत्याची उपमा लोकमान्यांना दिली आहे. न्या. रानडे कौतुकाने "सूर्याचा पुत्र" म्हणून संबोधत असत. विष्णुशास्त्री "माझा वाघ आहे" या शब्दात गौरव करीत. श्री. दादासाहेब खापर्डे त्यांना इंजिनात धगधगणाऱ्या भट्टीची उपमा देतात. नामदार गोखल्यांनी "स्वतःचे राज्य स्थापन करण्याची योग्यता असणारा आधुनिक

काळातील राजपुरुष असे " उद्‌गार काढलेले आहेत. लोकमान्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत टणक, तंग, धगधगणारे, पेटविणारे आणि प्रक्षोभक असे होते हे या सर्व उपमांवरून दिसून येते.[११४] लोकमान्यांच्या व्यक्तित्वात प्रखरता आणि दाहकता तर होतीच त्यावरोवर प्रतिभा, विद्वत्ता आणि कार्यकुशलताही होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उद्दिपक झालेले होते. संपर्कात येणारा तरुण देशभक्त होऊन जात असे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान देशभक्त पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात,

" ... We cannot measure giants by our normal yardsticks... When I had not personally met him, how powerfully I was influenced by him. He seemed to be the embodiment of Indian nationalism struggling for freedom. Millions in India were influenced by him in this way and so he moulded the thinking of two generations of our people and undoubtedly, brought them upto that pitch of endeavour and sacrifice which later resulted in India's freedom."[११५]

लो. टिळकांवरील संस्कार

उत्तम शिक्षक म्हणून नावलौकिक मिळविलेल्या व्युत्पन्न, ग्रंथकार, गणिती, वैय्याकरणी, शास्त्रपारंगत अशा गंगाधरशास्त्र्यांच्या देखरेखीखाली टिळकांचे वालपण गेले. गंगाधरपंतांचे गुणही आनुवंशिकतेने त्यांना लाभलेले होते. स्वतःच्या परिश्रमाने, चिकाटीने टिळकांनी त्या गुणांचा विकास केला, संस्कृत ग्रंथाचे अकराव्या वाराव्या वर्षी अर्थ समजून वाचन करण्याची त्यांची तयारी झालेली होती. गणितातही तशीच गती होती. दहा वर्षांच्या वयात मातेचे निधन झाल्यानंतर सोळाव्या वर्षी वडिलांचेही निधन झाले. टिळक एका अर्थाने पोरके झाले परंतु त्यांच्यातील उपजत धैर्यामुळे हे दोन्ही आघात त्यांनी सहन केले. यानंतरच्या काळात सुप्रसिद्ध क्रांतिकारक वासुदेव वळवंत फडके, महर्षी अण्णासाहेव पटवर्धन आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर या तीन थोर पुरुषांच्या सहवासात टिळक आले. या तिघांच्याही व्यक्तिमत्त्वाचा परिणाम लोकमान्यांवर झाला असण्याची शक्यता आहे. चिपळूणकरांचा प्रभाव तर स्पष्टच आहे. ज्या काळात आपल्या निवंधमालेद्वारे चिपळूणकर स्वाभिमान, देशाभिमान व पारतंत्र्याविषयी तिटकारा या भावनांनी भरलेले लेख लिहीत होते, हाच काळ टिळक आगरकरांच्या तारुण्यातील संस्कारक्षम वयाचा होता. प्रा. श्री. ना. वनहट्टी म्हणतात, "त्यांच्या मनात देशसेवेची जी स्फूर्ती उद्‌भवली तिला चिपळूणकरांची वाणी अगदीच कारणीभूत झाली नसेल हे अशक्य वाटते." पुढे याच संदर्भात श्री. वनहट्टी सांगतात, " टिळक आणि आगरकर दोघेही स्वयंसिद्ध स्फूर्तीचे पुरुष होते. तथापि त्यांची स्फूर्ती तत्कालीन वातावरणातून निर्माण झालेली होती. हे वातावरण निर्माण करण्यात चिपळूणकरांचा हात होता."[११६]

साहित्याचार्य वाळशास्त्री हरदास लोकमान्यांचे जागृतिकार्य सांगताना म्हणतात, " लोकमान्य टिळकांच्या जीवनावर तीन महनीय व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाची मुद्रा उमटलेली आहे. वासुदेव वळवंत फडके, अण्णासाहेव पटवर्धन आणि विष्णुशास्त्री या त्या तीन महान व्यक्ती होत. फडके यांच्यापासून स्वातंत्र्यवाद, अण्णासाहेव पटवर्धन यांच्यापासून भारतीय जीवनदृष्टी व विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्यापासून जनशक्तीच्या आवाहनाचा मंत्र या तीन गोष्टी त्यांनी घेतल्या."[११७]

भगवद्गीतेचा सर्वंकष प्रभाव

आनुवंशिकता, कौटुंबिक वातावरण, वडिलांच्याकडून झालेले संस्कार आणि वर उल्लेख केलेल्या त्रिमूर्तींच्या जीवनाचा प्रभाव लोकमान्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात साहाय्यभूत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे टिळकांचा उपजत पिंड ज्ञानोपासकाचा होता. पुढे त्यांच्या संपूर्ण आयुष्यात ज्ञान की कर्म हा संघर्ष अविरत राहिला. त्यांच्यातील कर्मयोग्याने त्यांच्यातील ज्ञानोपासकावर मात केली असली तरी संधी सापडताच त्यांच्यातील ज्ञानोपासकाने आपले अस्तित्व दाखविलेले आहे.[११८] "ओरायन," "आर्टिक होम इन् दि वेदाज" हे ग्रंथ किंवा "वेदांगज्योतिष" या विषयाचा आणि या संशोधनाशी संबंधित अशा विविध विषयांचा त्यांचा व्यासंग त्यांच्या या ज्ञानोपासनेतूनच आलेला होता. त्यांच्या ज्ञानोपासनेचे महत्त्वाचे गमक म्हणजे त्यांनी लिहिलेली गीतेवरील कर्मयोगपर टीका वा "गीतारहस्य" हे होय. त्यांच्या जीवनावर भगवद्गीतेचा सर्वांत अधिक प्रभाव असल्याचे त्यांच्या जीवनासंबंधी लिहिणाऱ्या लेखकांनी सांगितलेले आहे.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे लिहितात, "लो. टिळकांना हे धैर्य, हे बळ कोठून प्राप्त झाले ? गीता, भगवद्गीता, भगवद्गीतारहस्य, स्थितप्रज्ञता हे गीतेचे रहस्य, तीच त्यांनी साध्य करून घेतली होती." एकदा मुरुडकरबुवा हरदास यांनी लोकमान्यांना त्यांच्या जीवनाचे रहस्य विचारले असता ते म्हणाले, "मी जीवनमुक्त कोटीतला नाही किंवा आपण म्हणता तसा मी ब्रह्मनिष्ठ नाही पण लहानपणापासून मनात जेणेकरून धैर्य उत्पन्न होईल अशा गोष्टींचा वारंवार विचार करण्याची मला सवय होती. मंडालेला असतांना मी जी गीता लिहिली तिच्यामुळे मन धैर्यपूरित व उदार झाले. काही काळ ते सुख-दुःखादी द्वंद सोडून निश्चल होई. अशा रीतीने मी आपल्या मनाला हे द्वंद सहन करण्याचे सामर्थ्य आणले." ही निश्चलताच नव्हे, तर टिळकांचे सर्व व्यक्तिमत्त्व गीतेतल्या वेदांताने घडविलेले होते. "ते पराकाष्ठेचे लोकवादी (डेमॉक्रॅट) झाले ते या वेदान्तामुळेच."[११९]

छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांचा प्रभाव

गीताधर्माप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदासस्वामी या ऐतिहासिक महापुरुषांचाही त्यांच्या जीवनावर विशेष प्रभाव दिसून येतो. राष्ट्रीय जागृतीसाठी त्यांनी जे दोन उत्सव महाराष्ट्रात सुरू केले त्यातील एक गणेशोत्सव आणि दुसरा "शिवाजी उत्सव" होता. गणपतीला ते राष्ट्रीय दैवत समजत असत तर शिवाजी महाराजांना राष्ट्रनेता या शब्दाने गौरवीत असत. "शिवाजी उत्सव तर त्यांनी दरवर्षी साजरा करायला सुरुवात केलेलीच होती. पण महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे याकरिताही त्यांचे प्रयत्न चालूच होते. २ जुलै १८९५ च्या शिवाजीवरील लेखात ते म्हणतात, "जगाच्या अर्वाचीन इतिहासात मराठे लोकांचे, महाराष्ट्र देशाचे किंबहुना सर्व हिंदुस्थानाचे नाव ज्याने अजरामर केले त्या शिवाजी महाराजांच्या कृतीबद्दल खऱ्या राष्ट्रीयास अभिमान वाटणे अगदी साहजिक आहे." "स्वराज्य, स्वधर्म म्हणजे काय व तो शेकडो वर्षे नष्ट झाला असता त्याची पुन्हा संस्थापना करण्यात कोणत्या प्रकारचे धैर्य, वीर्य, उत्साह आणि विचार वगैरे अलौकिक गुण संस्थापकाच्या अंगी असावे लागतात हे जो जाणतो त्यास शिवाजी महाराजांचे स्मारक करण्याबद्दल कोणी सुचविले पाहिजे असे नाही''परंतु शिवाजी महाराजांचे स्मारक आम्ही मोठ्या कळकळीने व भक्तीने का करावे याबद्दल याहीपेक्षा बलवत्तर कारण म्हटले म्हणजे आमची आमच्या राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालणाऱ्या गृहस्थाबद्दलची कृतज्ञताबुद्धी होय."[१७०]

देशबांधवांची सेवा हाच मोक्षाचा मार्ग

कॉलेजात शिकत असताना लोकमान्यांचे ध्येयवादी मन पाश्चात्य ग्रंथकारांच्या विचारांचा शोध घेत होते. त्यांनी मिल्, स्पेन्सर वाचले होते आणि ऐहिक निष्ठा म्हणजे केवळ स्वार्थी आत्मनिष्ठ जीवन नव्हे हे त्यांना समजले होते. परंतु त्यापूर्वी त्यांनी समर्थ रामदासांचे साहित्य वाचून काढलेले होते. रामदासांच्या साहित्यातील प्रवृत्तिपर आशय, पाश्चात्य तत्त्वज्ञान वाचत असताना एका वेगळ्या अर्थाने टिळकांना उलगडला असला पाहिजे. स्वत: संन्याशी असूनही लोकसेवेचे ध्येय शिकविणारे समर्थ त्यांना पाश्चात्य तत्त्वज्ञानासारखे वाटले असले पाहिजे. या विचारांचा अत्यंत प्रभाव टिळकांच्या मनावर झाला असला पाहिजे. कारण लोकांच्या सेवेकरिता, राष्ट्रसेवेकरिता त्यांनी जसा आपला ज्ञानोपासनेचा मार्ग वाजूला सारला तसाच लोकसेवेकरिताच वैयक्तिक मोक्षाचा मार्गही त्यांनी कटाक्षाने टाळला. समाजसेवेच्या, देशसेवेच्या ध्येयाचे व्रत त्यांनी जीवननिष्ठा म्हणून स्वीकारले. रामदासांच्या साहित्याने त्यांना ही प्रेरणा दिली असली पाहिजे. १९०८ साली दास नवमीनिमित्त २५–२६ फेब्रुवारी रोजी अनुक्रमे पुणे व सोलापूर येथे जी व्याख्याने दिली त्यातून समर्थ रामदास-स्वामींचे तत्त्वज्ञानच त्यांनी लोकांपुढे मांडले. ते म्हणतात, "या धर्मात असे तत्त्व आहे की, ज्याला मोक्षप्राप्ती पाहिजे असेल त्यास आपल्या देशवांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाही. जे आपल्या देशाकडे पाहत नाहीत, जे का रंजले गांजले त्यास आपले म्हणत नाहीत, आपले हजारो वांधव विपत्तीत असताना जे नाक धरून घरात वसतात ते ढोंगी आहेत, अशा प्रकारची वुद्धी उत्पन्न करणे म्हणजे राष्ट्र जीवंत करणे आहे." [१७१] टिळकांनी आपल्या देशवांधवांच्या आणि मातृभूमीच्या उद्धारासाठी याच तत्त्वांचा पुरस्कार केला आणि आपले सर्वस्व पणाला लावले.

लोकमान्यांची राष्ट्रवादाची कल्पना

प्रबंधाच्या दृष्टीने लो. टिळकांची राष्ट्रवादासंबंधीची कल्पना समजावून घेणे आवश्यक आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी अस्मितादर्श राष्ट्रवादाची कल्पना मराठी वाचकांपुढे हिरिरीने मांडली आणि त्या कल्पनेने अनेकांना विविध क्षेत्रांत कार्य करण्याची प्रेरणा दिली हेही आपण चिपळूणकरां-संबंधीच्या विवेचनात लक्षात घेतलेले आहे. लोकमान्य टिळकांनी चिपळूणकरांच्या कल्पनेला आपल्या चिंतनाचा आधार दिला आणि स्वत:च्या आचरणाने उत्तम राष्ट्रवादी पुढाऱ्याचा आदर्श निर्माण केला. या अस्मितादर्श राष्ट्रवादी मंत्राला सिद्ध आणि सामर्थ्यसंपन्न करण्याचे कार्य टिळकांनी आपल्या तप:पूत, नि:स्पृह, नि:स्वार्थी आणि कर्मयोगी जीवननिष्ठेद्वारा केले. या मंत्राला टिळकांनी आपल्या विद्वत्तेची, चिंतनाची आणि ध्येयनिष्ठेची जोड दिली, तत्त्वज्ञान सांगितले आणि मग साऱ्या भारताला स्वातंत्र्याचा, स्वराज्याचा मंत्र सांगून जहाल, आक्रमक पण वस्तुनिष्ठ व्यवहारवादाची जोड दिली. चिपळूणकरांच्या परंपरेच्या अभिमानावर अधिष्ठित झालेल्या राष्ट्रवादात लो. टिळकांनी विस्तृत तपशील भरला. आपली स्वत:ची राष्ट्रविषयक भूमिका त्यांनी भारतीयांपुढे मांडली, इतकेच नव्हे तर त्या भूमिकेला अनुरूप असे वातावरण निर्माण करून पुढे अखिल भारतीय नेतेपदही त्यांनी भूषविले.

मनुष्यमात्राची स्वातंत्र्यप्रियता हीच राष्ट्रीयत्वाची जननी

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रविषयक भावनेच्या मुळाशी जाऊन तिचा अभ्यास केलेला आहे. राष्ट्रीयत्वाची निर्मिती एका विशिष्ट ऐतिहासिक पार्श्वभूमीवर झाल्याचे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे. परकीयांनी साम्राज्यविस्तारासाठी, सत्तास्वार्थासाठी, स्वकीयांच्या समृद्धीसाठी केलेली आक्रमणे, लूट, जुलूम, दडपशाही आणि गुलामगिरी यातून राष्ट्रवाद प्रतिक्रियेच्या स्वरूपात जन्माला आलेला

आहे. ते म्हणतात, "पृथ्वीतलावर जर कोणतेच राष्ट्र परतंत्र नसते किंवा परतंत्र होण्याची भीतीही कोणास नसती तर राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस मानवी इतिहासात थाराच मिळाला नसता," हे टिळकांचे म्हणणे अगदी वास्तवाला धरून आहे.

राष्ट्रभक्ती प्राचीन परंतु राष्ट्रवाद आधुनिक आहे

भारत हे प्राचीन राष्ट्र आहे ही कल्पना लोकमान्यांनी अनेक ठिकाणी मांडलेली आहे. परंतु प्राचीन राष्ट्रासंबंधीची कल्पना आणि आधुनिक राष्ट्रविषयक कल्पना यात अंतर असल्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. एका व्याख्यानात त्यांनी सांगितले, "हिंदुस्थानात राष्ट्रभक्ती होती परंतु राष्ट्रवाद मात्र नव्हता. प्रत्येक देशातील लोकांचे आपल्या प्रदेशावर प्रेम असते या अर्थाने मातेप्रमाणेच मातृभूमीवरही आपली भक्ती असते. परंतु राष्ट्रवाद ही कल्पना आधुनिक जगतात स्पष्ट होत गेली आणि आपण ती स्वीकारली पाहिजे." टिळक म्हणतात, "आमच्या हिंदुस्थानात पूर्वी छपन्न देश होते असा इतिहास आहे, पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेखाली हे छपन्न देश मोडून त्यांचा एकजीव किंवहुना एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे हे राष्ट्रीय सभेवरून जितके पूर्णपणे व्यक्त होते तितके दुसरे कशावरूनही होत नाही."[१७२] ११ सप्टेंबर १८९४ च्या केसरीत लोकमान्य म्हणतात, "एकराष्ट्रीयत्वाचे बीज आमच्या फलद्रुपी आर्य मनोभूमीवर परक्यांच्या श्रमाने रुजविले जात आहे."[१७३] पुन्हा ३ सप्टेंबर १८९५ च्या केसरीत लो. टिळक म्हणतात, "एक धर्म, एक राजा, एक भाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान अंगे आहेत, पैकी इंग्रज सरकारच्या राजसत्तेखाली शेवटची दोन साधने आपणांस चांगल्या तऱ्हेने प्राप्त झाली आहेत..."[१७४]

परकीय शत्रू एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेची निर्मिती करतात

एकराष्ट्रीयत्वाचे बीज परकीय सत्तेमुळे रुजविले जात आहे हे लो. टिळकांनी निःसंकोचपणे मान्य केलेले आहे. ते लिहितात, "आपसातील क्षुद्र भेद विसरून जाण्याला मुख्य कारण म्हणजे परशत्रूची भीती. त्याचा येथे अभाव असल्यामुळे ह्या अंतर्गत भेदांना फाजील महत्त्व येते व देशातील चांगल्या लोकांच्या बुद्धीही त्यातच सुख मानू लागतात."..."राष्ट्रीय अभिमान प्रदीप्त करण्याला एक परकी शत्रू जशी मदत करतो तशी शेकडो व्याख्याने व हजारो पुस्तके यांनी होत नाही."[१७५]

परकीय सत्तेने भारतीय राष्ट्रीयत्वाच्या विकासाला अप्रत्यक्षपणे हातभार लावलेला आहे असे वस्तुस्थितीवर आधारित त्यांचे मत होते.

एकराष्ट्रीयत्वाच्या निर्मितीसाठी भारतीय समाजरचना पूर्णपणे बदलण्याची किंवा प्राचीन परंपरेचा त्याग करण्याची आवश्यकता नाही

आपली राष्ट्रवादाची कल्पना मांडताना लोकमान्यांपुढे संपूर्ण भारतीय समाज होता. हा समाज धर्म, जाती, पंथ, भाषा, वर्ण, प्रदेश इत्यादी घटकांनी विभागलेला आहे याची त्यांना जाणीव होती. अव्वल इंग्रजीच्या काळातील सुधारकांनी भारतीय समाजातील वर उल्लेखिलेल्या भिन्नतेवरच आक्षेप घेतलेला होता आणि ही भिन्नता जोपर्यंत अस्तित्वात राहील तोपर्यंत भारतीय समाज एकराष्ट्र या पदवीला पोहचू शकणार नाही असे त्यांचे प्रामाणिक मत होते. सर्वांची एकवाक्यता करण्याकरिता एकभाषा, एकधर्म, सर्वांचे एकमेकांशी अप्रतिबंध रोटीबेटी संबंध असावेत, याखेरीज दुसरा मार्गच नाही अशी त्यांची श्रद्धा होती. लो. टिळकांना हा सुधारकांचा सामाजिक सुधारणेचा व राष्ट्रीय ऐक्य घडवून आणण्याचा मार्गच पसंत नव्हता. लोकसमाज म्हणजे यंत्र नव्हे, त्याला

काही परंपरा असतात, इतिहास असतो. तेव्हा झटपट मोडतोड करून त्याला नवा आकार देता येत नाही. लो. टिळक म्हणतात, "कोणतेही राष्ट्र किंवा लोकसमाज यंत्राप्रमाणे पाहिजे तेव्हा नवा बनविता येत नाही." तसेच हेही लक्षात ठेवले पाहिजे की एखाद्या खंडप्राय प्रदेशात हजारो वर्षापासून राहणाऱ्या लोकसमाजात, आचारविचारात अंतर असणे स्वाभाविकच आहे. "ज्या समाजात विचारस्वातंत्र्य आहे त्या समाजात मतभेद असणारच." "मतभेद असूनही विशिष्ट कार्यात सर्व पक्ष एक होणे हे जिवंत राष्ट्राचे लक्षण आहे." असे त्यांचे मत होते. पुढे ते स्पष्टच म्हणतात, "आपआपसात भांडणे व दुही ही चालली असताना परक्यांशी संबंध येण्यावरोबर जे लोक एक होऊ शकतात ते लोक राष्ट्र या संज्ञेस योग्य होत."[१७१]

हिंदुधर्मातील तत्त्वे सुधारणेस प्रतिकूल नाहीत

लोकमान्य टिळक धर्माभिमानी असले तरी धर्मासंबंधी दुराभिमानी कधीच नव्हते. राष्ट्रीयत्वाचा अभिमान धर्माद्वारे जागृत करता येतो असे मत जागतिक इतिहासाच्या अध्ययनाने त्यांचे बनलेले असले पाहिजे. "हिंदुत्व आणि सुधारणा" या लेखात ते म्हणतात, "कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणे होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा ? अर्थात हिंदुत्वाचा आम्हाला धर्माची काही एक परंपरा आहे. त्या परंपरेतील ज्ञान इतर धर्मातील ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे आणि ही परंपरा आम्ही सोडली तर आमचे असे म्हणण्यासारखे आम्हांस सामान्य बंधन काहीच नाही या गोष्टी आम्ही लक्षात बाळगल्या पाहिजेत."[१७२] मूर्तिपूजेला ज्यांचा विरोध आहे त्यांना टिळकांनी सांगितले, "आर्यसमाजवाल्यांची सुधारणा हिंदुत्वाच्या पायावर आहे आणि इतरांची हिंदुधर्माच्या किंवा हिंदुत्वाच्या विरुद्ध आहे... हिंदुधर्मातील तत्वे सुधारणेस प्रतिकूल आहेत असे नाही. तसे असते तर आजपर्यंत हिंदुधर्माने टिकावच धरला नसता व हिंदुराष्ट्रही कायम राहिले नसते. पण सुधारणा व्हायची ती हिंदुत्वाच्या पायावरच झाली पाहिजे नाही तर आपली उन्नती न होता अवनती मात्र होईल."[१७८]

स्वत्व बुद्धी हा राष्ट्रीयतेचा एक निकष

सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक विल् ड्यूराँटचे विचार आणि लोकमान्यांचे विचार परंपरेच्या व स्वत्व बुद्धीच्या संदर्भात पुष्कळच समान आहेत. "विल् ड्युराँट याने म्हटल्याप्रमाणे मी कोण आहे, ही जाणीव मनुष्याला सतत कायम राहणे अवश्य असते. ती क्षणमात्र ढळली तर तो वेडा ठरेल. व्यक्तीच्या ठायी या "मी" च्या जाणिवेचे जे महत्त्व तेच परंपरेच्या जाणिवेचे, स्वत्वाच्या सातत्याचे, पूर्वजांच्या अभिमानाचे, राष्ट्राच्या, समाजाच्या ठायी महत्त्व आहे. लो. टिळकांच्या परंपरेच्या अभिमानाचा हाच अर्थ आहे."[१७९] म्हणूनच हिंदुत्वावर त्यांचा विशेष जोर आहे. धर्ममतांचा त्यांना अभिमान आहे. स्वत्वबुद्धी हीच आपपरभाव ठरविण्याचे मुख्य गमक आहे. म्हणूनच लोकमान्य टिळक म्हणतात, "स्वत्व हेच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा मूळ पाया असून या स्वत्वाच्या सीमेचा परिच्छेद ठरविणे हे काम महत्त्वाचे आहे," असा मूलस्पर्शी निकष टिळकांनी ठरवून दिला आहे. दैनंदिन व्यवहारात "स्व" म्हणजे आपण अशी सर्वसामान्यपणे प्रत्येक व्यक्तीची कल्पना असते. दुसऱ्या टोकाला विश्वकुटुंबवादी धरता येईल. "एकपक्षी दुरान्वित लोक वगळून अलीकडे येऊ लागले असता दुसरेपक्षी आपण व आपले कुटुंब व समाज अशा रीतीने आपली स्वत्वबुद्धी विस्तृत करीत गेले असता राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या परिच्छेदाची बरोबर रेषा कोठे तरी सापडलीच पाहिजे." याचा अर्थ असा की "आपणाकडे म्हणजे नेमके विशिष्ट लोक अशी स्वत्व बुद्धी असल्यावाचून राष्ट्र

या नावाला काही अर्थ राहत नाही. आपुलकीची ही मर्यादा ठरली म्हणजे तिच्या बाहेरचे इतर लोक-समुदाय परक्या राष्ट्रामध्ये मोडतात."[१८०]

वैशिष्ट्यपूर्ण लोकसमुदाय म्हणजे राष्ट्र ✓

" स्वत्वबुद्धी " असल्यावाचून राष्ट्र या नावाला अर्थ राहत नाही हे सांगून लोकमान्य थांबले नाहीत. त्यांनी त्या स्वत्वबुद्धीची लक्षणेही सांगितलेली आहेत. ते म्हणतात, " राष्ट्र म्हणजे समुद्र आणि नद्या यांनी मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणी व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या काही मैल चौरस तुकड्यास राष्ट्र म्हणावयाचे तर सहारा वाळवंटासही राष्ट्र म्हटले पाहिजे किंवा उत्तर ध्रुवाजवळील वर्फाच्छादित प्रदेशासही राष्ट्र म्हणता येईल. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ नाही व त्याप्रमाणे नुसता लोकसमुदाय म्हणजेही राष्ट्र नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. ज्या लोकसमुदायात एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाही, ज्यांचे घटकावयव सामान्य बंधनांनी एकत्र बांधलेले नाहीत अथवा ज्यांच्या अंगात इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचे वैशिष्ट्य वास करीत नाही ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधीही राष्ट्र या संज्ञेस पात्र होत नाही." [१८१]

सर्व राष्ट्रीय घटकांना सूत्रात गोवणारे समानहितत्वाचे तत्त्व

लोकमान्य टिळक परंपराभिमानी होते. त्यांना हिंदुत्वाचा आणि धर्माचाही जाज्ज्वल्य अभिमान होता. त्यांचे आचरणही धर्मनिष्ठ होते परंतु त्यांच्या जीवनाला त्याहीपेक्षा व्यापक असे राष्ट्रीयत्वाचे अधिष्ठान होते. ते स्वतःच म्हणतात, " हिंदुस्थान ही आमची मातृभूमी आणि देवता, हिंदुस्थानवासी हेच आम्हा सर्वांचे बंधुत्वाचे नाते, आणि वस्तुस्थिती लक्षात आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिती सुधारण्याचा, एकनिष्ठपणाने व स्वार्थाकडे लक्ष न देता सतत परिश्रम करणे हाच आमचा धर्म " अशी त्यांची धारणा होती. याच व्यापक भूमिकेतून ते राष्ट्रीय प्रश्नांकडे बघत होते. अखिल भारतीय नेतृत्वाचे उद्दिष्ट कोणते असले पाहिजे हे सांगतांना ते म्हणाले होते, " तसेच ज्या समुदायात किंवा लोकसमूहात (धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा, ज्यांचे घटकावयव सामान्य बंधनांनी बांधलेले) वर सांगितलेल्या प्रकारची बंधने किंवा वैशिष्ट्ये नेहमी जागृत ठेवण्याच्या उद्योगास लागलेले पुढारी नाहीत तो समाजही केव्हा ना केव्हा तरी लयास जाणार हे निश्चित होय. हे काम देशातील पुढाऱ्यांनीच केले पाहिजे व अशा प्रकारचे पुढारी इंग्रजी राज्यपद्धतीत उत्तरोत्तर दुर्मिळ होत चालले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे." [१८२]

संपूर्ण भारत एकराष्ट्र म्हणून संघटित स्वरूपात उभा राहिला पाहिजे ही त्यांची आकांक्षा होती. राष्ट्रनिर्मितीसाठी स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान, पूर्वेतिहासाचे स्मरण या घटकांची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केलेली होती. भारतात भिन्न धर्मीय लोक आहेत आणि त्यांनाही राष्ट्रीय कार्यात सहभागी करून घेणे आवश्यक आहे हे त्यांना मनोमन पटलेले होते. त्या सर्वांना हिंदुधर्मीयांबरोबर देशबांधव म्हणून उभे करता येऊ शकते ते एकाच सूत्राच्या आधारे हे त्यांच्या प्रज्ञेने हेरले होते. ते महत्त्वाचे सूत्र म्हणजे " समानहितत्वाचे " तत्त्व होय.

त्यासंबंधी लोकमान्य टिळक म्हणतात, " राष्ट्रीयत्वाचा मुख्य घटक समानहितत्व हा असून हे जेथे सर्वात अधिक प्रमाणाने साध्य होईल तेथेच परिच्छेदाची रेषा बरोबर पडेल. या कसोटीवरून आपुलकीची राष्ट्रीय मर्यादा परिस्थितिसापेक्ष असते हेही उघड होईल. त्याचबरोबर देशात असा

काही हितविरोध जर निर्माण झाला की ज्याचा निरास कोणत्याही उपायाने होऊ शकत नाही तर त्या संघर्षाचा दुष्परिणाम आपुलकीच्या भावनेवर होईल ही गोष्टही कळून चुकेल." [१८३]

हिंदुस्थानात राहणारे आपण सर्व एक आहोत. पारतंत्र्याची जाणीव आणि राजकीय स्वातंत्र्याची उणीव सर्वांनाच समान जाचक ठरत आहे. त्यामुळे सहवेदना, सहानुभूती, प्रेम, औदार्य आणि सहनशीलता हे गुण राष्ट्रातील लोकांच्या ठिकाणी निर्माण व्हावेत, त्यातून त्यांचे सहजीवन निर्माण व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आपल्या हयातभर याच तत्त्वांना पुढे ठेवून त्यांनी राष्ट्राचे नेतृत्व केले. मुसलमानांचे नेते अलिबंधू लोकमान्यांना आपले राजकीय गुरू म्हणून जाहीरपणे संबोधू लागले. बॅ. जीनांनीही त्यांच्या नेतृत्वाला वंदन केले आणि सहकार्य दिले. याच राष्ट्रवादी भूमिकेमुळे ते ब्राह्मण असूनही " तेल्या तांबोळ्यांचे " पुढारी म्हणून गौरविले गेले. लोकमान्यांनी देशकाल स्थितिसापेक्षता लक्षात घेऊनच आपली राष्ट्रीयत्वाची कल्पना मांडल्याचे आपल्या लक्षात येईल.

महाराष्ट्रातील विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे प्रवर्तक आगरकर

राष्ट्रातील लोकांमध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करून स्वराज्यस्थापनेकरिता लोकांनी निर्भय बनावे यासाठी लोकमान्यांनी आपली बहुमुखी प्रज्ञा पणाला लावली. देह, लेखणी आणि वाणी अक्षरशः चंदनाप्रमाणे झिजविली. एवढेच नव्हे तर त्यासाठी तीनदा तुरुंगवास आणि हद्दपारीची शिक्षाही भोगली. या राष्ट्रजागृतीच्या कार्यात आरंभी त्यांचे अत्यंत निकटचे सहकारी म्हणून आगरकरांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. " खरा लोककल्याणेच्छू व देशाभिमानी पुरुष म्हटला म्हणजे त्याच्या ठायी पराकाष्ठेची निःस्पृहता वागत असली पाहिजे, तो वचनाचा धड असला पाहिजे व कसलीही संकटे आली किंबहुना जीवित संपण्याचा जरी प्रसंग येऊन ठेपला, तरी त्याने डगमगता उपयोगी नाही." [१८४] या चिपळूणकरांनी दिलेल्या दीक्षेप्रमाणेच लोकमान्य टिळक आणि सुधारकाग्रणी आगरकर दोघेही आमरण तंतोतंत वागले.

" आगरकरदर्शन " या निबंधसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत प्रा. मा. दा. अळतेकर म्हणतात, " संमतिवयाचा वाद उपस्थित होण्यापूर्वी टिळक–आगरकर ही जोडी एकमताची, एकविचाराची होती व परंपराप्रिय लोक त्या दोघांनाही सुधारक व नास्तिक समजत. पुढे या संमतिवयाच्या वादाला तीव्र स्वरूप आले आणि पुराणप्रिय लोकांचे पुढारीपण टिळकांनी स्वीकारले व सुधारकांचे नेतृत्व आगरकरांकडे आले." [१८५] " क्रांतितेजाची मूर्ती " या श्री. भा. कृ. केळकरांनी लोकमान्यांच्या जीवनकार्यासंबंधी लिहिलेल्या लेखात देखील हाच मुद्दा मांडलेला आहे. ते म्हणतात, " आत्मनिर्णय, ध्येयनिर्णय या दोन्ही अवस्थेत चिपळूणकर, आगरकर हे लोकमान्यांबरोबर होते."[१८६] याचा अर्थ असा की आत्मनिर्णय आणि ध्येयनिर्णय या दोन तरुण मित्रांनी चिपळूणकरांच्या उपस्थितीतच केलेला होता आणि दोघेही राष्ट्रीय पंढरीचे वारकरी बनलेले होते.

आगरकरांच्या प्रेरणांचे स्वरूप

आगरकरांचे शैक्षणिक जीवन म्हणजे अतिशय खडतर अशी तपश्चर्याच होती. टेंभू, रत्नागिरी, कऱ्हाड, अकोला, पुणे अशी भ्रमंती करीत करीत त्यांचे शिक्षण झाले. कुठे शागिर्दी कर, कुठे कुणाच्या दवाखान्यात कंपाऊन्डर हो, तर कुठे स्तंभ लेखकाची भूमिका कर, कुठे निबंधस्पर्धेत भाग घे, तर कुठे वक्तृत्वस्पर्धेत पारितोषिक मिळव. शिष्यवृत्ती, फेलोशिप्स तर कधी उधार उसनवार करीत आगरकरांचे विद्यार्जन झाले. अध्ययनाचे आणि त्याद्वारे मिळविलेल्या ज्ञानाचे महत्त्वही त्यांना

अनुभवाने समजले होते. या धकाधकीच्या भ्रमंतीत प्रकृतीची आबाळ होऊन प्रकृतिस्वास्थ्यही ते काही प्रमाणात गमावून बसले होते. परंतु त्यांची प्रेरणाही एका श्रेष्ठ अशा देशभक्ताचीच होती. राष्ट्रसेवा करावयाची तर स्वार्थत्यागाची तयारी प्रथम केली पाहिजे हे त्यांनी स्वतःच्या मनाशी निश्चित केले होते. म्हणून एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण होताच त्यांनी आपल्या मातोश्रीला जे सुप्रसिद्ध पत्र पाठविले त्यातून त्यांच्या राष्ट्रीय प्रेरणांचे स्पष्ट दर्शन होते. ते लिहितात, "आपला मुलगा मोठाल्या परीक्षा देत आहे, त्याला आता मोठाल्या पगाराच्या नोकऱ्या मिळतील आणि आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ आई, तू करीत असशील, पण मी आताच सांगून टाकतो की विशेष संपत्तीची हाव न धरता फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व काळ परहितार्थ घालविण्याचे मी ठरवीत आहे."[१८७] हे सर्वकाळ परहित म्हणजे राष्ट्रसेवाच होय. आगरकर टिळकांची प्रेरणा समानच होती.

मूळ प्रेरणा मानवतेची, करुणतेची व भूतदयेची

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धेंनी टिळकांच्या आणि आगरकरांच्या मूळ प्रेरणेत अंतर असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. ते म्हणतात, "करुणा, मानवता हे आगरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे दोन विशेष. आगरकरांची मूळ प्रेरणा मानवतेची, करुणेची, भूतदयेची होती असे दिसते. विष्णुशास्त्री, टिळक, सावरकर यांची प्रेरणा राष्ट्रोद्धाराची, स्वातंत्र्याची होती. दीनदलित जनता, शूद्र, अस्पृश्य, स्त्रिया यांचा उद्धार व्हावा याची आच त्यांना नव्हती असे नाही पण तसे न केल्यास समाज संघटीत होणार नाही, एकजूट साधणार नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात ब्रिटिशांविरुद्ध अखिल भारताची आघाडी उभारता येणार नाही, ही त्यांची मूळ चिंता होती. अखिल जनता जागृत करण्यासाठी त्यांनी आपआपल्या परीने प्रयत्न केले ते राष्ट्रसंघटनेच्या हेतूने. आगरकरही राष्ट्रनिष्ठ व स्वातंत्र्यवादीच होते, पण समाजसुधारणेचा त्यांचा जो आग्रह होता त्यासाठी जी पराकाष्ठेची तळमळ वाटे, तिच्यामागे दया, करुणा ही प्रेरणा फार प्रभावी होती."[१८८]

डॉ. सहस्रबुद्धे यांनी आगरकरांच्या मूळ प्रेरणांचा घेतलेला हा शोध समाजसुधारक आगरकरांच्या प्रेरणांचा आहे. या परिच्छेदातच "आगरकरही राष्ट्रनिष्ठ व स्वातंत्र्यवादीच होते." हे त्यांनीही मान्य केलेले आहे. पण त्यांच्या समाजसुधारणेच्या तळमळीमागील प्रेरणा ही दयेची, करुणेची, मानवतेची होती असे त्यांना सुचवावयाचे आहे. वास्तविक आपल्या समाजाच्या उद्धाराचीच खरी तळमळ त्यांना लागलेली आहे आणि म्हणून ती प्रेरणा वास्तविक राष्ट्रीय आहे. अखिल मानवतेच्या कल्याणाची चिंता करण्याच्या आड खरी राष्ट्रीय प्रेरणा कधीच येत नाही. जोसेफ मॅझिनी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची प्रेरणा अशीच व्यापक होती."

तत्कालीन वातावरणातून प्रेरणांचा उदय

"टिळक आणि आगरकर" या चिकित्सक प्रबंधाचे कर्ते प्रा. श्री. ना. बनहट्टी, टिळक, आगरकर या दोघांनीही स्वयंसिद्ध स्फूर्तीचे पुरुष समजतात. "तथापि त्यांची स्फूर्ती तत्कालीन वातावरणातून निर्माण झालेली असून ते वातावरण निर्माण करण्यात चिपळूणकरांचे लिखाण कारणीभूत झाले होते आणि म्हणूनच १८७६ मध्ये आपला राजकीय विषयावरील निबंध दाखविण्यास आगरकर स्वतः होऊनच चिपळूणकरांकडे गेले. ही हकीकत त्यांच्या प्रेरणेच्या संबंधाचे सूचक आहे."

आगरकरांची जीवनदृष्टी

लोकमान्य टिळकांच्या आणि आगरकरांच्या प्रेरणा समान असल्यामुळे त्यांची जीवनदृष्टीही सारखीच होती. पुढे या दोन थोर देशभक्तांत मतभेद झाले. त्या मतभेदाचे मूळही भारतीय राष्ट्रीय समाज हेच होते. या समाजाच्या उन्नतीच्या मार्गासंबंधीच त्यांच्यात मतभेद निर्माण झालेले होते. "आधी सामाजिक की राजकीय ?" हा वादही राष्ट्रोन्नतीच्या संदर्भात निर्माण झालेला होता. "सुधारणा आणि कलह" या निबंधातून आगरकरांनी आपल्या जीवनदृष्टीचा परिचय दिलेला आहे आणि तो टिळकांच्या जीवनदृष्टीशी तंतोतंत जुळणारा आहे. सुकर्णधार किंवा सेनापतीच नेतृत्व करू शकतात. कारण, "समाजाची स्थिती कशी आहे व समाजात कोणते वळण लावावे, याची चर्चा करून निश्चय करणे हेही एका प्रकारच्या विशेष व्यक्तीचे काम आहे"... "जन्मास आल्यासारखे होईल तेवढे स्वहित साधण्यात व अहोरात्र प्रपंचात गढून असण्यातच ज्यांना जीवितसार्थकता वाटत नाही. सुदैवाने ज्यांना दोन अक्षरे प्राप्त झाली आहेत, विचार करण्याची ज्यास हौस आहे व उद्योग करून ज्ञानसंपादन करण्याचा ज्यांना छंद लागला आहे, प्राणिमात्राची विशेषतः मनुष्याची व त्यातल्या त्यात स्वदेशबांधवांची विपत्ती कमी व्हावी अशी ज्यांना स्वाभाविक इच्छा असून तदनुसार थोडेबहुत तरी वर्तन करण्याची सोय आहे अशांनी सामाजिक विषयांच्या वाटाघाटीत पडणे विशेष श्रेयस्कर होणार नाही."[१८९]

आगरकरांची राष्ट्रीय दृष्टी

आगरकरांच्या जीवनदृष्टीचे यथार्थ दर्शन त्यांच्या "गुलामांचे राष्ट्र" या सुप्रसिद्ध निबंधात घडते. ते म्हणतात, "स्वभूमीत, स्वलोकांत, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडी गोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधी कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहीत तर फक्त शृंखलांतर करतात. भरतखंडात अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षा ते आहे त्या प्रकारचेच गुलाम राहिले तरी हरकत नाही. पण अलीकडील चिन्हावरून आम्ही नवीन खोड्यात आपले हातपाय अडकू न देता ते जुन्या खोड्यातून वातावेताने काढून घेण्यात समर्थ होऊ अशी आशा दिसत आहे. याउपर भवितव्यता काय असेल कोण जाणे."[१९०] या उताऱ्यातून आगरकरांना स्वसमाजावद्दल वाटणारी आत्मीयता, अभिमान, उद्धाराची तळमळ आणि शेवटी राष्ट्रीय आशावाद व्यक्त झालेला आहे. या आगरकरांच्या जीवनदृष्टीत आणि टिळकांच्या किंवा स्वा. सावरकरांच्या जीवनदृष्टीत सारखेपणाच आढळून येतो.

महाराष्ट्रातील क्रांतियुगाचे जनक

राष्ट्रीय प्रेरणा, प्रकृती आणि जीवनदृष्टीप्रमाणे टिळक, आगरकर कार्याला लागले. आगरकरांना मुळातच लिहिण्याची हौस असल्यामुळे सुरुवातीपासून केसरीचे संपादन सुमारे सहा–सात वर्षे आगरकरांकडेच होते. आगरकर ज्या क्षेत्रात वावरत होते त्या क्षेत्राचीही काही बंधने होती आणि ती पाळणे आवश्यकही होते. तरीही लोकोद्धाराच्या जिवंत नि जातिवंत तळमळीने समाजसेवेच्या व देशभक्तीच्या निरपेक्ष हेतूने, आपल्या निर्भीड स्वतंत्र बाण्याने विरोधकांशी एकाकी झुंज देत राहिले. त्यांच्या सुधारणावादी विचारांच्या तीक्ष्ण प्रहारांनी अनेकांना घायाळ केले. अनेकांची झोप त्यांनी उडविली. कधी नव्हे एवढा सामाजिक प्रश्नांचा विचार स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक प्रथमच

करू लागले. राजकीय जागृतीबरोबरच सामाजिक प्रबोधनाची मंगल प्रभात महाराष्ट्रात सुरू होऊन एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. " शक्य असेल ते करणार आणि इष्ट असेल ते बोलणार " असे जीवाच्या आकांताने वजावणाऱ्या आगरकरांना तत्त्वांसाठी अप्रिय पण पथ्यकारक बोलावे लागले. मित्र शत्रू झाले, विरोधक वाढले, खुनाच्या धमक्या दिल्या जाऊ लागल्या आणि एका पाञ्चजन्याच्या हंगामात जिवंतपणी आगरकरांची प्रेतयात्राही निघाली पण आगरकर आपल्या ध्येयनिष्ठेपासून तीळभरही चळले नाहीत. या दुर्दम्य ध्येयवादाने, बुद्धिनिष्ठ व्यक्तिवादाने महाराष्ट्रात मूळ धरले आणि आगरकरांचा संप्रदाय उदयास आला. सुशिक्षितांच्या एक नव्हे तर दोन पिढ्या त्यांच्या बुद्धिवादी विचारांनी प्रभावित झाल्या. सामाजिक क्षेत्रात क्रांतीचे युग या महापुरुषाने प्रवर्तित केले, ते क्रांतियुगाचे जनक ठरले.

विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे प्रवर्तक आगरकर

चिपळूणकरांनी प्रवर्तित केलेल्या स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यांच्या स्वाभिमानाच्या अधिष्ठानातून महाराष्ट्रात या अस्मितेची प्रेरणा निर्माण झालेली होती. परंपरेच्या अभिमानावर अस्मितादर्श राष्ट्रवादाचे पोषण झालेले होते. काही काळ आगरकरांनीही याच राष्ट्रवादाचा पुरस्कार केला असला तरी त्यांच्या राष्ट्रवादाचे अधिष्ठान परंपरेपेक्षा बुद्धिनिष्ठ विवेकवादाचे असल्याचे आढळते. बुद्धिवाद, गतितत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, समता, दया इत्यादी तत्त्वांना धरून सर्व सुधारणा झाल्या पाहिजेत असा आगरकरांचा आग्रह होता. या विचारातूनच जहाल राष्ट्रवादाची निर्मिती व्हावी असेही त्यांचे प्रतिपादन होते. " सुधारणा आणि कलह " या निबंधात ते लिहितात, " मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनी दीक्षा घेतली असेल त्यांनी कोणास न भिता आपल्या मनात जे शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल ते दुसऱ्यास सांगावे आणि तदनुसार होईल तेवढे आचरण करावे हेच उचित आहे." [१९१]

आचार्य जावडेकरांचा अभिप्राय

आगरकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे विवेचन करताना आचार्य जावडेकर लिहितात, " पण महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या इतिहासात कै. आगरकरांचे एक विशिष्ट स्थान आहे. शुद्ध विवेकवादाच्या आधारावर जहाल राष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी १८८० पासून १८९५ पर्यंतच्या काळात केला." [१९२] आचार्य जावडेकरांनी, आगरकरांच्या राष्ट्रवादाचे पुढील सूत्र दिलेले आहे. "मूळ प्रकृती म्हणजे भारतीय आर्यत्व न सांगता, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीने अंगीकार करीत गेलो तरच आमचा निभाव लागणार आहे. ..... ज्या तत्त्वांचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रे अधिकाधिक सुधारत चालली आहेत, त्याच तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्ही आनंदाने तयार झाले पाहिजे." [१९३] आगरकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे अधिष्ठान स्पष्ट करताना आचार्य जावडेकर म्हणतात, " आगरकरांच्या जहाल राजकीय विचारांचा पाया केवळ जनतेचे वाढते दारिद्र्य आणि स्वातंत्र्याची समतेची आणि सत्यनिष्ठेची सार्वत्रिक आकांक्षा हा होता." लोकमान्य टिळकांनी स्वीकारलेल्या जहाल अस्मितादर्श राष्ट्रवादाच्या भूमिकेहून ही भूमिका वेगळी असल्याचे दिसून येते.

रोगापेक्षा औषध जहाल वाटले

अत्यंत तळमळीने आपल्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे आगरकरांनी प्रतिपादन केले, परंतु आगरकरांचा जहाल विवेकनिष्ठ राष्ट्रवाद जाणून घेण्याइतका महाराष्ट्रातील समाज जागृत झालेला

नव्हता. परतंत्र्याच्या रोगाने पछाडलेल्या भारतीय समाजाला आगरकरांच्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे औषध अधिक जहाल वाटले. श्रीमती प्रा. नलिनी पंडितांचाही असाच अभिप्राय आहे. "तत्त्वनिष्ठा मनोधैर्य, स्वार्थत्याग, यावाबतीत पाश्चात्य विचारवंताच्या तुलनेत आगरकर एक रेसभरही कमी नव्हते. त्यांनी व्यक्तिवादाचे आणि बुद्धिवादाचे हे तत्त्वज्ञान युरोपीय विचारवंतांकडूनच उचलले होते. परंतु तत्कालीन सामाजिक परिस्थितीने आगरकरांचा पराभव केला."[१९४] सामाजिक सुधारणेचे जहाल औषध परंपरावादी समाजाला पचले नाही असेही म्हणता येते. अथवा रोगापेक्षा औषधच अधिक जहाल झाले असे परिणामाच्या संदर्भात म्हणता येते.

आगरकरांच्या जीवनकार्याची विद्वानांनी केलेली मीमांसा

महाराष्ट्राचा आधुनिक संत

विवेकनिष्ठ जहाल राष्ट्रवादाचे प्रवर्तक म्हणून आचार्य जावडेकरांनी त्यांचा गौरव केला असल्याचे आपण पाहिले आहे. आगरकरांची जीवनदृष्टी विशाल आणि व्यापक होती. दीन दलितांच्या स्त्रियांच्यासंबंधी त्यांच्या अंतःकरणात अपार सहानुभूती होती. आगरकरांच्या वाङ्मयाचे आणि तत्त्वज्ञानाचे एक अभ्यासक प्रा. मा. दा. अळतेकर म्हणतात, "व्यक्तीला योग्य व्यक्तिमत्त्व येण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळाले पाहिजे.... आगरकर ढोंगाचे मोठे शत्रू होते, ढोंग, लपवा-छपवी, लवाडी या गोष्टी त्यांना बिलकूल पसंत नव्हत्या. त्यांच्या लेखणीच्या जोरदार तडाख्यांनी सर्व ढोंगी लोकांची दाणादाण उडाली आणि याही बाबतीत ते ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम मंडळीच्या पंक्तीत उत्तम शोभून दिसतात. सत्य–निर्भेळ सत्य, निर्भयपणे लोकांपुढे मांडणे हे महाव्रत त्यांनी पत्करले होते. त्यांचे स्वतःचे वर्तन त्या व्रताला अगदी अनुरूप होते. साधी राहणी, अत्यंत स्वार्थत्याग, पूर्ण प्रसन्न आणि निर्मत्सरी वृत्ती, दुःखितांना साहाय्य, उन्मत्तांना तडाखे, अशा प्रकारे त्यांनी आपली जीवित यात्रा संपविली."[१९५] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्रा. अळतेकरांना आगरकरांच्या ठिकाणी संतमहात्म्याचे दर्शन झाले.

क्रांती घडवून आणणारे महापुरुष

जबाबदार राष्ट्रीयत्वाची निर्मिती करावयाची असेल तर शिक्षणाचे संस्कार आवश्यक आहेत हे रूसोप्रमाणे आगरकरांनीही ओळखले होते आणि हे नवे राष्ट्रीय शिक्षण सर्वांना निःशुल्क, सुलभ आणि सर्वत्र उपलब्ध झाले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. शिक्षण सक्तीचे करावे अशी त्यांची ब्रिटिश सरकारकडे मागणी होती. त्यांच्या विवेकनिष्ठ जहाल राष्ट्रवादाचे शिक्षण हे एक महत्त्वाचे लक्षण होते असे म्हणता येते. आचार्य जावडेकरांच्या मते आगरकर हे या क्रांतिकारकांच्या विचारांप्रमाणे क्रांती घडवून आणणारे महापुरुष होते.[१९६]

बुद्धिवादाच्या विशुद्ध भूमिकेतून व्यक्तिवादाचे तत्त्वज्ञान मांडणारा विचारवंत

प्रा. श्रीमती नलिनी पंडित यांनी आगरकरांचा "बुद्धिवादाच्या विशुद्ध भूमिकेतून व्यक्तिवादाचे तत्त्वज्ञान मांडणारा विचारवंत" अशा शब्दांत गौरव केलेला आहे. त्यांच्या मते, "आगरकरांची दृष्टी (लो. टिळकांच्या तुलनेत) अधिक मूलगामी होती. म्हणून समाजजीवनाच्या निरनिराळ्या अंगांतील परस्परसंबंध त्यांना नीट ओळखता आला ..." "कोणत्याही देशाचे कोणत्याही बाबतीत पुढे पाऊल पडण्यात त्या देशातील लोकांमध्ये परस्पर प्रेमभाव असला पाहिजे व ते एकमताने व एकदिलाने वागण्यास तयार असले पाहिजेत याबद्दल कोणाचा मतभेद नाही. परंतु हा स्नेहभाव

राहण्यात व एकमत उत्पन्न होण्यात जातिभेद निर्मूलनाचा प्रश्न राष्ट्रीय चळवळीशी संबंधित असल्याचे त्यांनी दाखवून दिले.[१९७] श्रीमती पंडितांच्या मते आगरकरांचा व्यक्तिवाद त्यांच्या विवेकनिष्ठेशी सुसंगत असून राष्ट्रवादाला पोषकच होता.

गतितत्त्वाची दिशा दाखविणारा सुधारक

श्री. पु. पां. गोखले यांनी " आगरकरांची ओळख " गतितत्त्वाची दिशा दाखविणारा सुधारक या शब्दांत करून दिलेली आहे.

मात्र लोकसत्तेऐवजी बुधजनसत्तेकडे आगरकरांचा कल दिसतो

आगरकर स्वातंत्र्यवादी, समतावादी असले तरी त्यांचा स्वातंत्र्यवाद निरपवाद नव्हता असे प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी आपल्या ' टिळक आणि आगरकर ' या अभ्यासपूर्ण प्रबंधात प्रतिपादन केले आहे. लोकमान्य टिळक आरंभापासून अखेरपर्यंत पूर्ण स्वातंत्र्यवादी आणि लोकशाहीवादी होते. मात्र " लोकशाहीवरील ही निष्ठा आगरकरांच्या ठायी होती की नाही याबद्दल संदेह वाटावयास जागा आहे. मानवी सुधारणेची खरी तत्त्वे ज्यांना कळत नाहीत अशा अडाणी रूढिप्रिय समाजाच्या हाती सत्ता देण्याला त्यांचा विरोध दिसतो."[१९८]

" मनुष्यसुधारणेची अत्यंत परिणत तत्त्वे आज युरोपात दृष्टीस पडत आहेत आणि त्यांचे अनुकरण केल्याखेरीज आपला निभाव लागणार नाही " हे आगरकरांचे महान गृहीत कृत्य होते. त्यामुळे जोपर्यंत या सुधारणेच्या परिणत तत्त्वांचा आपला समाज स्वीकार करणार नाही तोपर्यंत लोकशाही व स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी बाजूस ठेवल्या पाहिजेत असे आगरकरांचे मत होते.[१९९]

आगरकरांच्या विचारांचा कल बुधजनसत्तेकडे असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे स्वकीय समाजाचा अज्ञपणा. एका अर्थाने विचार केला तर आगरकरांचा हा विचार मूलगामीच म्हणावा लागेल. भारतीयांना स्वातंत्र्याचे अधिकार देताना ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी हीच भीती व्यक्त केली होती.

रूढिप्रामाण्यवादाचे कट्टर विरोधक

" रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा " करताना प्रा. गं. बा. सरदारांनी आगरकरांचे वर्णन, "रूढिप्रामाण्यवादाचे कट्टर विरोधक " असे अभिधान दिले आहे. आगरकर युयुत्सु-वृत्तीचे होते हे सांगितल्यानंतर श्री. सरदार म्हणतात, " आपली मूळ प्रकृती म्हणजे ' भारतीय आर्यत्व ' न सोडता आपल्या सामाजिक जीवनात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याची त्यांची (आगरकरांची) प्रतिज्ञा होती. येथील लोकांच्या मनावर जुन्या रूढीतील अनीती व अमानुषता यांच्याबद्दल लोकांच्या मनात त्वेष किंवा तिरस्कार निर्माण केल्याखेरीज ते आपल्या मानेवरील रूढिप्रामाण्याचे जोखड झुगारून देण्यास तयार होणार नाहीत असे आगरकरांचे मत होते. म्हणून निर्भेळ बुद्धिवादाचा त्यांनी आग्रह धरला.[२००]"

विवेकनिष्ठेसाठी एकाकी झुंजणारे आगरकर

तत्त्वज्ञानाच्या अधिष्ठानावर विश्वाविरुद्ध उभे राहण्याची परंपरा भारतात प्रथम निर्माण करणारा महामानव अशा शब्दात डॉ. पु. ग. सहस्रबुद्धेंनी आगरकरांचा गौरव केलेला आहे. त्यांच्या मते "आगरकर पूर्णपणे क्रांतिवादी झाले होते. क्रांतिवाद व पुनरुज्जीवनवाद हे जगातील दोन सनातन पंथ आहेत. सुधारणा दोन्ही पंथांना हवी असते, पण क्रांतिवादी जुन्याची पाळेमुळे खणून तेथे सर्व नवीनाची स्थापना करावी अशा वृत्तीचा असतो. आगरकर याच वृत्तीचे होते." [२०१]

" विवेकाने सांगितलेल्या सत्यासाठी अविरत अविश्रांत झुंजत राहणारे आगरकर हे खऱ्या अर्थाने धीर पुरुष होते."

लोकमान्य टिळकांनी केलेले आगरकरांच्या कार्याचे यथार्थ मूल्यमापन

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी आगरकरांच्या संदर्भात योजलेला 'धीर पुरुष' हा शब्दप्रयोग प्रथम लो. टिळकांनी आगरकरांच्या १९१६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आगरकर विशेषांकाच्या निमित्ताने केलेला आहे. आगरकरांच्या केसरीतील व सुधारकातील राजकीय लेखांची श्रेष्ठता प्रतिपादन केल्यानंतर पुढे लो. टिळक म्हणतात, " या सर्वांचे (निबंधांचे) सूक्ष्म निरीक्षण केले असता असे दिसून येईल की आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते व कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणे देशातील दारिद्र्य, परावलंबिता, चांगल्या पुरुषांचा तेजोभंग, गोऱ्या अधिकाऱ्यांची चरणी व वरणी, व्यापारनाश वगैरे राजकीय व औद्योगिक अवनती पाहून त्यांचे चित्त केशवपनादी चालींच्या निरीक्षणापेक्षाही अधिक संतप्त व दूषित होत असे, व याला मिल्ल आणि स्पेन्सर यांनी प्रतिपादन केलेल्या स्वराज्याच्या तत्त्वाखेरीज दुसरा उपाय नाही अशी त्यांची पक्की खात्री होती." [२०२]

आगरकरांच्या राष्ट्रवादावरील चर्चेचा समारोप

आगरकरांचा समाजसुधारणावाद, त्यांचा विवेकनिष्ठ जहाल राष्ट्रवाद, साहित्यिक आगरकर, निबंधकार आगरकर, वाक्यमीमांसाकार, शास्त्रज्ञ आगरकर, शैलीकार आगरकर अशा विविध विषयांवर आगरकरांसंबंधी अध्ययन करता येण्यासारखे आहे. आगरकर हा विविध प्रबंधांचा विषय आहे. त्यांच्या राष्ट्रवादी विचारांच्या संदर्भात आवश्यक तेवढी चर्चा या ठिकाणी केलेली आहे. आगरकरांचे निबंधलेखन त्यांच्या राष्ट्रीय प्रेरणेतून झालेले असल्यामुळे ते ओजस्वी आणि तेजस्वी तर आहेच पण अतिशय लालित्यपूर्ण आणि उद्बोधकही आहे. या ठिकाणी त्यांच्या विवेकनिष्ठ जहाल राष्ट्रवादाचे मुख्य घटकच शोधण्याचा प्रयत्न होता. विविध विद्वान अभ्यासकांच्या सहकार्याने तो साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आगरकरांच्या राष्ट्रवादाची सूत्रे पुढीलप्रमाणे मांडता येतील

(१) विवेकनिष्ठ जहाल राष्ट्रवादाच्या साहाय्याने त्यांना मनुष्यतेच्या ऐहिकतेचे सुखवर्धन घडवून आणावयाचे असले तरी हे सुखवर्धन केवळ प्रेयोवादी नव्हते, ते श्रेयोवादी कल्याणवादीच होते. (२) करुणा, मानवता व दया या भावनांनी संपन्न अशा विवेकनिष्ठ प्रेरणेचे अधिष्ठान त्यांच्या राष्ट्रवादाला होते. (३) बुद्धिवाद, गतितत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय आणि समता हे त्यांच्या राष्ट्रवादाचे पाच आधार होते. (४) हिंदुसमाज एकात्म, एकरस व्हावा, त्यातील वैषम्य नाहीसे व्हावे, सर्वांना समान वागणूक मिळावी याकरिताच त्यांना स्वातंत्र्य हवे होते. माणसा माणसात भेदभाव राहणार नाही, कुणावरही अन्याय होणार नाही, सामाजिक व्यवहार बलात्कारतत्त्वाने नव्हे तर संमतितत्त्वानेच व्हायला पाहिजेत असे त्यांच्या राष्ट्रवादाचे फलित होते. (५) हे फलित समाज जोपर्यंत सुशिक्षित होणार नाही तोपर्यंत सिद्ध होऊ शकणार नाही अशी त्यांची धारणा होती. लोकशाही आणि स्वातंत्र्य या मूल्यांची प्रतिष्ठा व जपणूक करण्यासाठी समाजात जागृती होणे आवश्यक आहे असे त्यांचे प्रामाणिक मत होते. (६) जोपर्यंत समाजातील धार्मिक व सामाजिक अनिष्ट चालीरीती नष्ट होत नाहीत तोपर्यंत खऱ्या राष्ट्रीयत्वाची निर्मितीच होऊ शकत नाही अशी त्यांची प्रामाणिक श्रद्धा होती. ती श्रद्धा उराशी घेऊन आगरकर एकाकी आयुष्यभर झुंज देत राहिले.

पाश्चात्यांचे शिक्षण परकीय म्हणून त्यांना नको होते, ते जीवनाला उपयुक्त आहे, विकासाला उपयुक्त आहे म्हणून त्यांना हवे होते.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची राष्ट्रीयत्वाची कल्पना

राष्ट्रभक्ती हा राजवाडयांच्या जीवनाचा स्थायीभाव होता

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६३–१९२६) इतिहासाचार्य राजवाडे या नावाने प्रसिद्ध महाराष्ट्रीय इतिहास–वाङ्मय संशोधकांचे अग्रणी. सरदार मेहंदळे यांच्या सहकार्याने १९१० मध्ये पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना केली. मराठयांच्या इतिहासाची साधने जमा करण्यासाठी सर्वत्र अखंड परिभ्रमण आणि जीवाचे रान केले. अत्यंत परिश्रमाने जमा केलेली साधने २२ खंडांत प्रसिद्ध केली. या संपादित केलेल्या खंडांना प्रस्तावना लिहून त्यांनी इतिहासविषयक अनेक नवे सिद्धान्त मांडले. ज्ञानेश्वरीच्या सर्वात प्राचीन प्रतीचे संशोधन, भाषाविषयक संशोधन व प्राचीन साहित्य, समाजशास्त्र, इतिहास या विषयावर मौलिक आणि विपुल लेखन त्यांनी केलेले आहे. राष्ट्रभक्ती हा राजवाडयांच्या जीवनाचा स्थायीभाव होता.

राजवाडयांच्या प्रेरणा

चिपळूणकरांनी प्रवर्तित केलेल्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने प्रभावित होऊन ज्या महाराष्ट्रीय सुशिक्षित तरुणांनी देशभक्तीचा अंगीकार केला त्यांच्यापैकी राजवाडे होते. विष्णुशास्त्र्यांनी राव-बहादूर साने यांच्या सहकार्याने संपादित केलेल्या काव्येतिहाससंग्रहातील बखरीच्या वाचनाने राजवाडयांना राष्ट्रसेवेची प्रेरणा झाली. इ. स. १८९४ साली त्यांनी भाषांतर मासिक सुरू केले. आपल्या मासिकांचे उद्दिष्ट स्पष्ट करताना पहिल्याच अंकात राजवाडे म्हणतात, "अशिक्षितांना अज्ञानामुळे राष्ट्रत्वाची कल्पनाच झालेली नाही. म्हणून (व) शिक्षितांच्या गैरसमजाने त्यासंबंधी खोटचा कल्पना झाल्या आहेत. म्हणून देशाभिमानाचा, धर्माभिमानाचा, भाषाभिमानाचा व आचाराभिमानाचा सर्वत्र सारखा लोप झालेला दिसून येतो. तेव्हा त्याचा प्रतिबंध करण्यासाठी योग्य उपायांची योजना केली पाहिजे."[२०१]

"या मासिकाच्या संपादनात त्यांना शिवराम महादेव परांजपे, दिनकर त्र्यंबक चांदोरकर व हरि नारायण आपटे यांचे साहाय्य होत असे. पण पुण्यातील फडके वाडचात असलेल्या विठ्ठल मुद्रणालयाला १८९७ मध्ये आग लागली व त्या छापखान्यात छापले जाणारे "भाषांतर" बंद पडले. "भाषांतर" मासिकाने तेवढचा तीन चार वर्षांतही चांगली कामगिरी केली."

राजवाडयांचा सशस्त्रक्रांतीकडे असलेला ओढा

राजवाडयांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांकडून अस्मितादर्श राष्ट्रवादाची प्रेरणा घेतलेली होती आणि लोकजागृतीचे कार्यही त्यांनी त्याच हेतूने सुरू केले होते. काही काळ राजवाडयांचा ओढा सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे होता आणि त्या मार्गाला आवश्यक असे वैचारिक लिखाण ते करीत असत. इ. स. १८९७ साली चाफेकर प्रकरण व रॅन्डचा खून झाल्यानंतर महाराष्ट्रातील वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्यावर सरकारची वक्रदृष्टी वळली. या दडपशाहीची झळ राजवाडयांनाही जाणवली होती. परंतु त्यांचे मन मात्र सशस्त्र क्रांतीकडेच ओढले जात होते. या काळात राजवाडयांच्या मनात एक संघर्ष साकार झालेला होता. सशस्त्र चळवळीकडे ओढ पण सरकारच्या दडपशाहीची शक्यता त्यामुळे मनासारखे करता येत नाही. दुसऱ्या विधायक चळवळीच्या मार्गाने जावे तर त्या मार्गावर

श्रद्धा नाही अशी द्विधा मनःस्थिती त्यांची होती. पुढे पुढे दडपशाही आणि शिक्षेची भीती यांचा फारसा संबंधच येणार नाही असे निर्भेळ भूतकालीन ऐतिहासिक संशोधनाचे क्षेत्र त्यांनी आपले जीवनक्षेत्र म्हणून निवडले व त्या कार्याला सर्वस्वाने वाहून घेतले.

इतिहास संशोधनाव्यतिरिक्त प्रचलित व सर्वसामान्य विषयावर 'विश्ववृत्त' 'चित्रमयजगत', 'प्राचीप्रभा', "उषा" इत्यादी मासिकांतून विपुल लेखन केले त्यामागील प्रेरणा देशभक्तीचीच आहे.

इतिहास संशोधनातून राष्ट्रवादाची शिकवण

केवळ तटस्थ आणि त्रयस्थाच्या भूमिकेतून वस्तुनिष्ठ पद्धतीने केलेले शास्त्रीय अध्ययन म्हणजे संशोधन होय अशीच राजवाड्यांची सामान्य कल्पना आहे. परंतु राज्यकर्त्यांचे अथवा परकीय सत्ताधाऱ्यांचे सर्वच ज्ञान आणि संशोधन अनुकरणीय व आदर्श आहे असे त्यांनी कधीच मानले नाही. त्यांनी जशी स्वकीय समाजाच्या सर्व प्रकारच्या गुणदोषांची निर्भीडपणे, निःस्पृहपणे मीमांसा केली व आपल्या प्रतिभाशाली दृष्टीने त्यावर प्रकाश टाकला अगदी त्याच भूमिकेतून परकीयांच्या सिद्धांतांची त्यांनी चिकित्सा केली आणि न्यायाधीशाच्या नीतीने निर्णय दिलेले आहेत. राष्ट्ररचनेच्या दृष्टीने इतिहासाची कामगिरी काय आहे व त्याच्या साधनांचे कार्य कोणते आहे हे सर्वसामान्य वर्गातील लोकांना कळले तर अधिक उपयुक्त ठरेल असे त्यांचे मत होते. "सवब इतिहास म्हणजे राष्ट्राचे सर्व तऱ्हेचे गतकालीन चरित्र व सर्व प्रकारचे वर्तमान चरित्र. म्हणजे वर्तमान असे लक्षण स्वीकारणे अपरिहार्य आहे"[२०४] असे त्यांनी सांगितले आहे.

पाश्चिमात्यांच्या प्रगतितत्त्वाची राजवाडेप्रणीत चिकित्सा

राजवाडे इतिहाससंशोधक असले तरी ते पराकाष्ठेचे राष्ट्राभिमानी होते. पाश्चात्य इतिहासकारांनी स्वकीयांसंबंधी कोटिक्रम करताना "प्रगती" या शब्दाला प्राधान्य दिलेले आहे आणि या प्रगतीच्या बळावर ते स्वतःला शहाणे व पुढारलेले समजत आहेत हे राजवाडे ओळखून होते. त्यांनी "प्रगती" या शब्दाची चिकित्सा करून गतीचे अधम व उत्तम असे दोन प्रकार सांगितले आणि या दोहोंपैकी उत्तम गतीला प्रगती असे संबोधण्यात येत असल्याचे सांगून जो समाज आत्यंतिक नीतिमान, आत्यंतिक बुद्धिमान व आत्यंतिक संपन्नतेकडे प्रवृत्त झालेला असेल त्याला प्रागतिक समजावे असे सुचविले आहे. पाश्चात्य समाजात ज्यांना प्रागतिक म्हणतात त्यांची महत्त्वाची दोन साधने आहेत. (१) युयुत्सुता आणि (२) सुयंत्रव्यवस्था. ही साधने संपादन करणाऱ्या समाजाला प्रागतिक म्हणावयाचे. या दोन साधनांत Morals, Rationalism, Wealth, Constitutionalism, Militarism या पाच घटकांचा समावेश होतो.

चातुर्वर्ण्यात ही आधुनिक तत्त्वे अनुस्यूत आहेत

पुढे राजवाडे सांगतात, "ही व्याख्या भारतवर्षातील लोकांना काही अश्रुतपूर्व नाही. राज्ययंत्र उत्तमोत्तम ठेवून व सैन्याच्या जोरावर अंतःस्थ व बहिःस्थ शत्रूंचा नाश करून धर्म, न्याय, नीती व स्वास्थ्य ह्यांचा लाभ करून घेण्याकरिता चातुर्वर्ण्याची पद्धत भारतीय आर्यांनी काढली हे सुप्रसिद्ध आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी ही पद्धत भारतवर्षात इतकी नामी सुरू झाली होती की, ग्रीस देशात अल्प्लातून (प्लेटो) जो तत्त्ववेत्ता झाला त्याला ती सर्वतोपरी अनुकरणीय वाटली. अल्प्लातूनाने Republic उर्फ सुराज्यनामक जो ग्रंथ लिहिला त्यात अथपासून इतिपर्यंत चातुर्वर्ण्याचेच गोडवे गायिलेले आहेत." [२०५]

भारतीय परंपरेचा अभिमान

अखिल मानवसमाजाचा इतिहास लिहिण्यास कौलिक पद्धतीही उत्तम आहे असे सांगून मानवी समाजाची बहुतेक सर्व उपकुले ऐतिहासिक उर्फ पश्चात्प्रलयकालीन उद्भवली असून त्यांच्या स्थल-कालाचा निश्चित पुरावा हजार पाचशे वर्षांपुरताच मिळतो. " ह्या नियमाला अपवादात्मक असे एकमात्र कुल आज आठदहाहजारवर्षे एकाच स्थलाला चिकटून राहिलेले दिसत आहे. हे भारत-वर्षातील आर्यकुल होय. हे कुल इतर उपकुलांप्रमाणे पश्चात्प्रलयीन नसून पूर्वप्रलयीन कालापासून संस्कृत झालेले आढळते. ह्या थोर कुलाने मानवसमाजातील इतर सर्व उपकुलांची बाल्यावस्थेपासूनची सर्व स्थित्यंतरे पाहिली आहेत." [२०६]

लोक, समाज व राष्ट्र यासंबंधी राजवाडयांची कल्पना

आपल्या प्रकाशित ऐतिहासिक कागदपत्रांच्या खंडांना ज्या प्रदीर्घ प्रस्तावना राजवाडयांनी लिहिलेल्या आहेत. त्यांचे स्वरूप एका मौलिक प्रबंधाचे आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. यातील काही प्रस्तावना म्हणजे राष्ट्रधर्माचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या आहेत. राष्ट्राची अवस्था समाजाला केव्हा प्राप्त होते हे सांगताना राजवाडे म्हणतात, " शहाजीच्या काली महाराष्ट्रदेशातील मराठा समाज राष्ट्र या पदवीला पोहोचला नव्हता. फक्त लोक ही पदवी त्याने आक्रमण केली होती. आपल्या देशाचा सर्व कारभार विशेषत: राजकीय कारभार आपण स्वत: करणारे, ही भावना ज्या समाजातील बहुतम व्यक्तींच्या ठायी प्रादुर्भूत झाली व तत्प्रीत्यर्थ ज्या समाजातील लोक प्राणही खर्चिण्यास सिद्ध झाले तो समाज राष्ट्र या पदवीला पोचला म्हणजे राष्ट्र झाला. ही भावना समाजात जोपर्यंत उद्भूत झाली नाही तोपर्यंत समाज लोक या पदवीतच असू शकतो." [२०७]

गतचरित्राची स्मृती जागृत करणे, राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणे हे इतिहासाचे कार्य

" राष्ट्राच्या सर्व तऱ्हेच्या गतचरित्राचे कालानुक्रमिक व संगतवार स्मरण म्हणजे इतिहास." तो दोन प्रकारचा लेखी व तोंडी. " ज्या लोकांची स्वचरित्राची स्मृती हरपली, ते लोक मृतवत असून पाहावे तेव्हा सदाच मूढावस्थेत असल्यासारखे दिसतात." उदाहरणार्थ हिंदुस्थानातील ज्यांना आदीवासी म्हणून आपण ओळखतो ते आपले भिल्ल, गोंड, कातकरी वनवासी बांधव. " स्मृती जाज्वल्य तऱ्हेने जागृत असली म्हणजे गतचरित्राचा आढावा घेता येतो. आढावा घेता आला म्हणजे आपले राष्ट्रीय गुणदोष कळू लागतात, आणि गुणदोष कळले म्हणजे दोषांचा बीमोड करून गुणांचा परिपोष करण्या-कडे सहज प्रवृत्ती होते. राष्ट्राचा इतिहास म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांच्या संकलित चरित्राची हकीकत. ती लोकांपुढे मांडली असता, सर्व लोकांना समान स्मृती, त्यामुळे ऐक्याची व बंधु प्रेमाची भावना निर्माण होते." [२०८]

पारतंत्र्याचे लोकचरित्रावर होणारे दुष्परिणाम

देश परतंत्र झाला म्हणजे त्यातील लोकांचे जीवन कसे परभृत आणि भ्रष्ट होते याचे दिग्दर्शनही राजवाडयांनी केलेले आहे. ते लिहितात, " कोणत्याही देशावर परराज्य आले म्हणजे त्या देशातील लोकांचे चरित्र नाना प्रकारे संकुचित होते. हा संकोच लौकिक म्हणून जे व्यवहार आहेत त्यात भासू लागतो. सार्वजनिक बोलणे, लिहिणे, सार्वजनिक कृत्ये करणे ह्या सर्व बाबतीत राज्यकर्त्यांच्या भाषेचा व कृत्यांचा संचार होतो. तो इतका उत्कट होतो की देशी भाषेत बोलणे व देशी तऱ्हेने चालणे, गौण, लाजिरवाणे व तिरस्करणीय आहे असे देशातील लोकांपैकी काहींना वाटू लागते व ते स्वदेशातील

चांगल्याही संस्थांना वाईट समजू लागतात. या कुधारकांचा समज असा असतो की राज्यकर्त्यांची भाषा, धर्म, पोषक व इतर संस्था स्वीकारल्या असता आपण राज्यकर्ते निदान राज्यकर्त्याप्रमाणे तरी होऊ. ह्या खोट्या समजावर वहावत हे लोक देश, धर्म व भाषा ह्या तिहींची अवनती करण्यास कारण होतात. असले कुधारक ह्या देशात इ. स. १३१८ पासून १६५६ पर्यंत बहुत निर्माण झाले."

राजवाड्यांचा मराठी बाणा आणि कडवा भाषाभिमान

राजवाड्यांना भारतीय परंपरेचा, भारतीय संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान होता तसाच महाराष्ट्रप्रदेश, महाराष्ट्रधर्म, मराठ्यांचा इतिहास आणि मराठी भाषा यांच्यासंबंधी पराकोटीचा अभिमान होता. पाश्चात्यांच्या भाषेत ग्रंथ लिहिताना या देशभक्तांची व प्रतिभावंतांचीही हेतूचा विपर्यास करून राजवाड्यांनी हजेरी घेतलेली होती. त्यातून न्या. रानडे, श्री. कुंटे, लोकमान्य टिळक आणि सयाजीराव गायकवाडांसारखे थोर पुरुषही सुटले नव्हते. आपले दुःख व्यक्त करताना राजवाडे म्हणतात, " जिवापाड मेहनत करून परभाषेत लिहावे आणि तत्रस्थ लोकांनी फार तर Intelligent म्हणून सर्टिफिकेट द्यावे ह्यात यांना काय अभिमान वाटत असे न कळे ! " हेच ग्रंथ " ह्या लोकांनी मराठीत लिहिले असते तर त्यांच्या अपूर्वतेमुळे परकी लोकांना ते भाषांतर करून समजून घ्यावे लागले असते व मराठीत चार विचारप्रचुर ग्रंथांची भर पडती. मराठीत लिहिले जाते हे ग्रंथ युरोपातील विद्वानांना कळावयास अवधी लागता इतकेच. ह्यापेक्षा मराठीत लिहिण्यापासून जास्त तोटा नव्हता. परंतु मराठीचा संकोच होण्याची चोहोकडून जर सध्या वेळ आलेली आहे तर त्याच्याआड ह्या पुढारी मंडळीने काय म्हणून यावे ?" [१०९]

दुसऱ्या एका ठिकाणी राजवाडे लिहितात, " सध्याच्या काळाचा महिमाच असा आहे की स्वधर्म टाकावा, स्वदेश सोडावा व स्वभाषा विसरावी असे विचारवंतांना व देशाभिमान्यांनाही वाटावे." " ज्याला प्रतिभासंपन्न म्हणता येईल असा मराठीत एकच ग्रंथकार उदयास आला आणि तोही दहा पाच निबंध लिहून भर तारुण्यात मावळून गेला. ह्यापुढे गमाविलेली गोष्ट पुन्हा साधावयाची असेल, बुडालो आहेत त्याहून जास्त बुडावयाचे नसेल तर स्वभाषेला म्हणजे स्वतंत्र विचाराला, म्हणजे स्वदेशाला कायेने, वाचेने व मनाने आपण शब्दशः वाहून घेतले पाहिजे नाही तर प्रसंग कठीण आहे." [११०]

इहवादी तत्त्वज्ञानाचे कट्टर पुरस्कर्ते राजवाडे

इतिहासाचार्य राजवाड्यांना भारतीय संस्कृतीचा, भारतीय परंपरेचा प्रखर अभिमान होता हे आपण पाहिले आहे. स्वधर्म, स्वदेश आणि स्वभाषा हे राष्ट्रीय जीवनाचे आधार असल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारे धक्का लागता कामा नये अशी राजवाड्यांची स्पष्ट भूमिका होती आणि या भूमिकेतून प्राचीन व अर्वाचीन कुधारकांचा त्यांनी निषेध केलेला आहे. स्वधर्माचा, स्वदेशाचा आदर करणारे राजवाडे इहवादी तत्त्वज्ञानाचे कट्टर पुरस्कर्ते होते आणि या तत्त्वज्ञानाच्या आड येणाऱ्या लोकांवर त्यांनी निर्भीडपणे कोरडे ओढलेले आहेत. आपले मानवी समाजातील संस्थांच्या निर्मितीचे विचार मांडताना राजवाडे म्हणतात, " वासना, शरीर व कर्म अशी मानव संस्थांच्या चरित्राची त्रिविध परंपराच आहे. प्रथम कर्म करण्याची वासना उत्पन्न होते. नंतर कर्म ज्याच्या द्वारा करावयाचे ते शरीरयंत्र निर्माण होते आणि शेवटी कल्पिलेले कर्म सिद्ध होण्याच्या मार्गाला लागते. वासना, शरीर व कर्म ही त्रयी जशी नवचक्राच्या भ्रमणाला कारण आहे तशी ती भवचक्राची लहानशी

रूपे व्यक्ती, वर्ग, राष्ट्र, यांच्याही भ्रमणाला कारण होते. ज्या वर्गाच्या किंवा लोकांच्या राज्यवासना अस्पष्ट, त्या वर्गाचे किंवा लोकांचे राज्यशरीर अथवा राज्ययंत्रही अस्पष्ट असावयाचे. ज्यांच्या राज्यवासना स्पष्ट, प्रबळ किंवा व्यवस्थित त्यांचे राज्यशरीर अथवा राज्ययंत्रही स्पष्ट, प्रबळ किंवा व्यवस्थित असते. धर्मयंत्र, शिक्षणयंत्र, समाजयंत्र वगैरे इतर शरीरांचाही हाच प्रकार असतो. तदंतर्गत राज्य, धर्म वगैरे संस्थांच्या शरीरावरून वर्ग, लोक, राष्ट्र इत्यादींच्या वासना व कर्म काय असू शकतात ह्याचा निश्चय करता येतो." [११]

मानवी वासनांचे स्वरूप

मनुष्य जातीने निर्माण केलेल्या संस्थांचे मूळ मनुष्यमात्रांच्या या वासनांतच आहे. या वासनांचे (१) विकारोद्भूत वासना (२) विचारोद्भूत वासना असे दोन प्रकार राजवाडयांनी सांगितले आहेत. या वासनातून प्रपंचाची निर्मिती होते आणि प्रपंचातील प्रसंगांना तत्त्वज्ञानाच्या साच्यात बसविण्याची मानवसमाजाची धडपड नित्य चालली असते.

जसे ज्याचे तत्त्वज्ञान तसा त्याचा प्रपंच

समाज आला कुठून व जातो कोठे या बिकट प्रश्नाचे उत्तर तत्त्वज्ञान देते परंतु ते उत्तर शास्त्रीय प्रमाणांनी समर्थित नसते. आप्तांची वाक्ये, धर्मग्रंथाची प्रमाणे, मनोरचित कल्पना ह्यांच्या जोरावर अदृश्य वातावरणात अनिरुद्ध संचार करून तत्त्वज्ञान शहाणपणाची भूमिका वठविते. जसे ज्याचे तत्त्वज्ञान तसा त्याचा प्रपंच हा सिद्धांतच आहे. राजवाडयांच्या मते, या प्रपंचात, बद्ध, मुमुक्षू, साधक आणि सिद्ध असे चार प्रकारचे लोक असतात. कधी कधी मुमुक्षूच्या मानाने बद्धांची संख्या जास्त असते व कधी कमी असते. बद्धांची संख्या जेव्हा जास्त असते तेव्हा धार्मिक, सामाजिक राजकीय व मानसिक बंधन दास्य अथवा गुलामगिरी समाजात जास्त आविर्भूत होते आणि कमी असेल तेव्हा धार्मिक, सामाजिक, राजकीय व मानसिक स्वातंत्र्य समाजात नांदू लागते. असा या शाखेचा मुख्य सिद्धांत आहे "[१२] हा सिद्धांत श्रीसमर्थ रामदासांनी दासबोधात बऱ्याच विस्ताराने प्रपंचिला आहे. आपल्या इहवादी तत्त्वज्ञानाला वेदांतापेक्षा गीता आणि दासबोध या ग्रंथात प्राधान्य मिळाले आहे असे राजवाडयांचे प्रतिपादन आहे.

निवृत्तिवादाची शिकवण देणारा भक्तिमार्ग

निवृत्तिवादाची शिकवण देणाऱ्या बौद्ध, जैन, महानुभाव इत्यादी धर्म आणि पंथाप्रमाणे सनातन धर्मातून उदयाला आलेला भक्तिपंथही संन्यासमार्गाचा पुरस्कार करणारा आहे असे राजवाडयांचे मत आहे. संतांनी केलेल्या इतर कामगिरीबद्दल आदर बाळगूनही राजवाडयांनी त्यांच्या निवृत्ति मार्गाच्या शिकवणुकीचा कठोर शब्दांत निषेध केला असून आपला इहवादी दृष्टिकोन मांडलेला आहे.

संतांनी राष्ट्रावनती करण्याचे कार्य केले

श्री. राजवाडे लिहितात, " ह्या भक्तिपंथाची स्थापना महाराष्ट्रात तेराव्या शतकात झाली. संताळघांचीही स्थापना झाल्यावर काही काळाने देवगिरी येथील मराठयांचे राज्य नष्ट झाले व यवनांची सत्ता महाराष्ट्रात तीनशे वर्षे अव्याहत चालली. ह्या तीन शतकांत संताळघांचेच प्राबल्य महाराष्ट्रात फार होते. संत म्हटला म्हणजे अत्यंत पंगुपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच होय. संताला खाणे नको, पिणे नको, वस्त्र नको, प्रावरण नको, काही नको, एक विठोबा मिळाला म्हणजे सर्व काही मिळाले. ऐहिक सुखदुःखे, ऐहिक उपभोग, ऐहिक व्यवहार त्यांच्यात मन घालणे संताचे काम

नव्हे, इहलोक हा संताचा नव्हेच. राजा कोणी असो, सारा कोणी घेवो, संताला त्याचे काही नाही. असल्या ह्या संतमंडळीच्या हाती विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीन शतके पंगू बनून राहिले."[२१३]

न्यायमूर्ती रानड्यांनी धर्मक्रांती करणारे क्रांतिकारक म्हणून ज्या संतांचा गौरव केला त्यांना राजवाडे म्हणतात, "ह्या धर्मक्रांतीने धर्मोन्नती होण्याचे एकीकडेच राहून उलटी धर्मावनती, राष्ट्रावनती मात्र झाली. कालांतराने यवनांच्या अमलाखाली पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले, ह्या पंगू संताळ्यांचा त्यांना वीट आला आणि सनातन धर्माकडे, गोब्राह्मण प्रतिपालनाकडे व चातुर्वर्ण्याकडे त्यांनी पुन्हा धाव घेतली. ह्या उपरतीच्या वेळी रामदासस्वामी, रंगनाथस्वामी, मोरया, देव वगैरे सनातन धर्माभिमानी विचारी साधुपुरुष झाले व ते महाराष्ट्रात महाराष्ट्रधर्माचा उपदेश करते झाले."[२१४]

महाराष्ट्रधर्मासंबंधी राजवाड्यांनी केलेली मीमांसा

ज्या महाराष्ट्रधर्माचा आताच उल्लेख केला त्या महाराष्ट्रधर्माची मीमांसा राजवाड्यांनी केलेली आहे. इतिहासाच्या सूक्ष्म आणि तौलनिक अभ्यासाने स्वसंस्कृतीच्या स्वाभिमानाचे महत्त्व राजवाड्यांच्या लक्षात आलेले होते. राजवाड्यांप्रमाणे हिंदुसंस्कृतीचा अभिमान लो. टिळकांनाही होता. परंतु त्यांच्या राष्ट्रीय अस्मितेचे अधिष्ठान प्राधान्याने अध्यात्म हेच होते. राजवाड्यांचे मात्र वर्णाश्रमधर्माची चौकट असणारी इहवादी निष्ठा वाळगणारी हिंदुसंस्कृती हेच अधिष्ठान होते. त्यामुळे महाराष्ट्रधर्मात राजवाड्यांनी एक वेगळा संदर्भ जोडला आहे. राजवाडे म्हणतात, "समर्थांनी नवीन बनविलेल्या महाराष्ट्रधर्म या शब्दाचा नीट अर्थ न कळल्यामुळे न्यायमूर्तींनी रामदासांच्या महाराष्ट्रधर्माची व संतांच्या भक्तिमार्गाची तद्रूपता कल्पिली व एकाच्या गुणाचा आरोप दुसऱ्यावर केला... श्रीमदाचार्यप्रणीत सनातनधर्माच्या कठोर आचाराला कंटाळून त्याच्या विरुद्ध झालेली जी धर्मक्रांती ती संताळ्यांचा भक्तिमार्ग होय. ह्या पंगू भक्तिमार्गाच्या किंचित्विरुद्ध झालेली जी धर्मशुद्धी ती समर्थाच्या प्रवृत्तिपर महाराष्ट्रधर्माच्या साहाय्याने पुनरुज्जीवित झालेला सनातन धर्म होय."

पुढे राजवाडे महाराष्ट्रधर्माच्या परंपरेचे विवेचन करताना म्हणतात, (१) श्रीमदाचार्यप्रणीत सनातनधर्म, (२) संतप्रणीत भक्तीमार्ग व (३) श्रीसमर्थप्रणीत महाराष्ट्र. धर्मोज्जीवित सनातनधर्म अशी खरी परंपरा आहे. प्रवृत्तिपर धर्ममार्गाला सोडून मराठ्यांनी निवृत्तिपर भक्ति मार्गाचा अवलंब केला तेव्हा त्यांची राज्यावनती व निवृत्तिपर भक्तिमार्ग किंचित सोडून प्रवृत्तिपर सनातनधर्माला पुन्हा येऊन मिळण्याचा प्रयत्न जेव्हा केला तेव्हा त्यांची राज्योन्नती झाली असा या परंपरेचा अर्थ आहे.[२१५] रामदासांनी क्षात्रधर्म, सेवाधर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, पुरुषधर्म वगैरे शब्द योजिले आहेत. त्यात धर्म ह्या शब्दाचा अर्थ कर्तव्य असा स्पष्ट आहे. तोच प्रकार महाराष्ट्रधर्म या शब्दाचा आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे सर्व महाराष्ट्राचे सर्व मराठा समाजाचे कर्तव्य असा रामदासांचा आशय आहे. "मराठा तेव्हढा मेळवावा ! महाराष्ट्र धर्म वाढवावा" या वाक्यात रामदासांनी आपला आशय स्पष्ट करून दाखविला आहे.

महाराष्ट्रधर्म म्हणजेच राष्ट्रधर्म

भारतवर्षात मराठा म्हणून जेवढा असेल मग तो महाराष्ट्रात असो किंवा महाराष्ट्राच्या बाहेर असो... तो कुणाच्याही सेवेत असो... तेवढा सर्व एक करून महाराष्ट्रधर्माची व्याप्ती सर्व मराठ-

मंडळात करावी असा रामदासांचा उपदेश होता. महाराष्ट्रधर्मात मराठा जेवढा असेल तेवढ्याचीच व्याप्ती करावी असा रामदासांचा कटाक्ष होता."[२१६] आपले मत मांडण्यासाठी श्री. राजवाडयांनी महाराष्ट्रधर्माचे खालीलप्रमाणे पृथक्करणही केलेले आहे. हिंदुधर्म + धर्मस्थापना + गोब्राह्मण-प्रतिपाल = स्वराज्यस्थापना + एकीकरण + धुरीकरण = महाराष्ट्रातील हिंदुधर्म. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे हिंदवी स्वराज्याची निर्मिती ही महाराष्ट्र धर्मामुळे म्हणजेच वर्णाश्रम धर्मामुळे झाली असे राजवाडयांचे प्रतिपादन आहे. राजवाडयांच्या मते भक्तिमार्ग हा वैयक्तिक मुक्तीचा मार्ग असून महाराष्ट्र धर्म हा राष्ट्रधर्म आहे, नॅशनॅलिझम आहे.

राजवाडयांच्या दृष्टीचा व्यापकपणा

न्या. रानडयांनी लिहिलेल्या मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष (राईज ऑफ मराठा पॉवर) या ग्रंथातील अनेक उपसिद्धान्त राजवाडयांनी अत्यंत मार्मिकपणे योग्य पुरावे देऊन खोडून काढले. संतांनी एकत्र येऊन केलेल्या धार्मिक क्रांतीचे त्यांनी खंडन केले तसेच 'महाराष्ट्रधर्म' या शब्दाचा केवळ 'धर्म' असा केलेला अर्थही त्यांनी चुकीचा ठरवून धर्म याचा अर्थ राजकीय कर्तव्य असा केला. मात्र महाराष्ट्रधर्माच्या अर्थात न्या. रानडयांनी बदल करून 'राष्ट्रधर्म' असा जो शब्द सुचविला त्याचे राजवाडयांनी स्वागतच केले आहे. भारतात सतराव्या शतकात राष्ट्रधर्माचे बीजारोपण झाल्याचे विवेचन करणारे न्या. रानडे हे पहिले भारतीय लेखक व संशोधक असल्यामुळे त्यांच्या ग्रंथाचे मोल असाधारण असल्याचा निर्वाळाही राजवाडयांनी दिलेला आहे.

संतांच्या भाषिक व सांस्कृतिक कार्याची प्रशंसा

राष्ट्राची संताळयांनी अवनती केली अशी सडेतोड टीका करणाऱ्या राजवाडयांनी संतांनी केलेल्या सांस्कृतिक व भाषिक कार्याचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख केलेला असून तो त्यांच्या निकोप दृष्टीचा पुरावा आहे. महाराष्ट्रातील संतांच्या सांस्कृतिक कार्याचे विवेचन करताना राजवाडे म्हणतात, "पडता काळ आला असता राष्ट्रत्वाची प्रधान अंगे जी स्वभाषा, स्वधर्म व स्वाचार यांचे संगोपन व वर्धन करणे हेच परराज्याखाली राष्ट्रत्वाची बीजे कायम रुजत ठेवण्याचे मुख्य इंगित आहे.

त्या वेळच्या कुधारकांचा व राज्यकर्त्यांचा मूळ धर्माला, मूळ भाषेला व मूळ आचारालाच नष्ट करण्याचा विचार होता, तो महाराष्ट्रातील सुधारकांनी, साधूंनी व ग्रंथकारांनी हाणून पाडला. मूर्ती म्हणजे ईश्वराच्या प्रतिमा आहेत, चातुर्वर्ण्यातील हे सर्व लोक देव आणि धर्म यांच्यापुढे सारखे आहेत, एकच परब्रह्म सर्वत्र भरले आहे. या तीन सिद्धांतांचे निरूपण ह्या सुधारक साधूंनी व ग्रंथ-कारांनी योग्य तऱ्हेने केले. ते तिन्ही सिद्धांत आपल्या हिंदुधर्माचे मुख्य स्तंभ आहे. हे त्यांनी नाना-प्रकारांनी लोकांच्या मनावर बिंबविले आणि आपली मातृभाषाही त्यांनी शुद्ध राखली."[२१७]

राजवाडे यांनी मांडलेली मराठयांच्या काळातील मिशनची कल्पना

संस्कृतिस्वाभिमानावर अधिष्ठित अशा "या परंपरागत वर्णाश्रमधर्मात किंवा महाराष्ट्र-धर्मात आधुनिक राष्ट्रनिर्मितीस लागणारी बहुतेक सर्व तत्त्वे असून भगवद्गीता व दासबोधादी समर्थ-वाङ्मय हे या राष्ट्रवादाचे अगर राष्ट्रधर्माचे आधारग्रंथ आहेत. श्री. शिवाजी महाराज ही या धर्मातील आराध्य देवता आणि भगवान श्रीकृष्णाचा प्रवृत्तिपर कर्मयोग आणि शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत व सनातन धर्मनिष्ठा हे त्यांचे परंपराप्राप्त सांस्कृतिक धन आहे."[२१८] "त्यांना सामाजिक सुधारणा इष्ट वाटत असल्या तरी आपल्या संस्कृतीचा पाया पाश्चात्य संस्कृतीपेक्षा अधिक श्रेष्ठ

तत्त्वावर आधारलेला आहे, असे वाटत होते. सर्व जगाला मार्गदर्शक होण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृतीत आहे अशी श्रद्धा निर्माण करण्याचे श्रेय याच संप्रदायाला द्यावे लागते " हीच राजवाडयांनी मांडलेली मराठयांच्या ऐतिहासिक काळातील मिशनची कल्पना होय.

राजवाडयांच्या राष्ट्रवादाचा आगळेपणा

ऐतिहासिक संशोधनाच्या क्षेत्रात एकांतिकपणे ध्येयनिष्ठेने तपःसाधना करीत असतानाही राजवाडयांनी आपल्या राष्ट्रीय बाण्याचा विसर पडू दिला नाही. ऐतिहासिक सामाजिक जीवनासंबंधी शास्त्रीय विवेचन करताना राष्ट्राची प्रतिमा कधीही त्यांनी दृष्टीआड होऊ दिली नाही. मराठयांच्या इतिहाससाधनांचे २२ खंड संपादन करून महाराष्ट्राच्या पितरांचा वारसा त्यांनी नव्या संशोधकांच्या हातात सोपविला. आपल्या निःस्वार्थ, निर्लोभी, निःस्पृह आणि त्यागमय जीवनाने त्यांनी महाराष्ट्रात इतिहाससंशोधकांची परंपरा निर्माण केली तद्वतच मराठयांच्या इतिहासासंबंधी, मराठी संस्कृतीसंबंधी स्वाभिमानही मराठी भाषिकांत निर्माण केला. वर्णाश्रमधर्माची चौकट त्यांनी आपल्या राष्ट्रवादाला आधार म्हणून स्वीकारली असली तरी इहवादाचा त्यांनी हिरिरीने पुरस्कार केला हे विसरता येत नाही. राष्ट्ररक्षण, राष्ट्रविकास आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य हे त्यांच्या राष्ट्रवादाचे साध्य होते. इतिहासाच्या प्रकाशात त्यांनी राष्ट्रीयत्वाची वेगळीच शिकवण महाराष्ट्राला दिली याबद्दल महाराष्ट्र त्यांचा नेहमीच ऋणी राहील.

राजवाडयांच्या कार्याचे समालोचन

इतिहासाचार्य राजवाडे यांनी महाराष्ट्राला ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे मौलिक पाठ दिले आहेत. न्या. रानडयांच्या ऐतिहासिक संशोधनाने प्रभावित होऊन, विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या राष्ट्रवादाची प्रेरणा घेऊन त्यांनी आपले सारे आयुष्य विविध विषयांच्या संशोधनात, त्याकरिता परिश्रमपूर्वक साधने संपादन करण्यात आणि प्रतिभासंपन्न लिखाण करण्यात वेचले. मानवी स्वभाव, सामाजिक घटना, चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, समाजरचना, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र अशा विविध दृष्टिकोनांतून इतिहासावर राजवाडयांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळे विशिष्ट काळात व परिस्थितीत समाज-जीवनातील कोणत्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक प्रवृत्तींना उजाळा मिळाला अथवा काजळी लागली याचे मानचित्र राजवाडयांनी रेखाटलेले आहे.

त्यांच्या दिव्य प्रतिभाशक्तीला आकलन झालेले सिद्धान्त कुणाच्या रागालोभाची पर्वा न करता त्यांनी मांडलेले आहेत.

राजवाडयांची स्पष्टोक्ती व निर्भयपणा आज निःस्पृहपणाच्या अभावी दुर्मिळ झालेला आहे दुसऱ्या एका ठिकाणी महाराष्ट्रातील राजेमहाराजांवर टीका करताना राजवाडे म्हणतात, " राजे निजले आहेत, जहागीरदार डुलक्या घेत आहेत आणि इनामदार झोपा काढीत आहेत. ते जागे होईतो-पर्यंत, जागे झालेल्या मध्यम स्थितीतील जे आपण, त्यांनी राष्ट्राच्या या पितरांचे स्मरण कायम ठेवले पाहिजे. आपले सामर्थ्य अद्यापि जुजवी आहे. तथापि ह्या कर्माच्या प्रीत्यर्थ ते खर्चिले पाहिजे." [२१९] राजवाडयांच्या या आवाहनाला प्रतिसाद देऊन आजीवन संस्थानिर्मितीच्या व संशोधनाच्या कार्याला वाहून घेणारे महामहोपाध्याय द. वा. पोतदारांसारखे ज्ञानतपस्वी पुढे आले.

चौफेर प्रतिभेचा राष्ट्रभक्त

राजवाडयांची प्रतिभा चौफेर होती. इतिहाससंशोधन करता करताच त्यांनी " स्वदेशी ", ' स्वराज्य ', ' राष्ट्रीय सभा ', ' अंत्यजोद्धार ', ' गोखल्यांची इंग्लंडातील कामगिरी ', ' सध्याचे

भारतीय राजकारण' असे तात्कालिक विषयांवर लेखन केले. 'रामदास' व 'कादंबरी' हे त्यांचे दोन निबंध तर आजही मौलिक म्हणून समजले जातात. याशिवाय मराठी छंदप्रकाशन, संस्कृतभाषेचा उलगडा, ज्ञानेश्वरी संपादन, ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण, सुबन्तविचार, तिङन्तविचार, नामादिशब्दव्युत्पत्तिकोश, मराठी धातुकोश, संकीर्ण लेखसंग्रह, राजवाडे लेखसंग्रह भाग १ ते ३ हे साहित्य पाहिले म्हणजे त्यांच्या तपःश्चर्येची आणि विद्वत्तेची जाणीव होऊन या आधुनिक इतिहास-महर्षीपुढे माणूस नतमस्तक होतो. राजवाडचांच्या देशभक्तीचा, इतिहाससंशोधनाचा आणि साहित्य-सेवेचा वारसा चालविणारे खरेखुरे राष्ट्रवादी असे दोन महापुरुष महाराष्ट्रात उदयाला आले. डॉ. श्री. व्यं. केतकर आणि स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर हे ते महापुरुष होत. त्यांच्याच समकालीन अशा थोर राष्ट्रपुरुषांचाही आता विचार करावयाचा आहे.

ज्ञानकोशकार डॉ. केतकरांचा हिंदुराष्ट्रवाद (१८८४–१९३७)

आधुनिक महाराष्ट्राचा बृहस्पती

विष्णुशास्त्री चिपळूणकरानंतर अस्मितादर्श राष्ट्रवादाचा उदय होऊन महाराष्ट्रात एका नव्या युगाचा उदय झाला. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिकक्षेत्रात एक नवे मन्वंतर घडून आले. राष्ट्रीय चळवळींना जोरदार चालना मिळाली आणि स्वदेश, स्वराज्य आणि स्वातंत्र्याचे वारे उभ्या राष्ट्रात खेळू लागले. याच काळात आधुनिक महाराष्ट्राच्या क्षितिजावर एका प्रज्ञावंत ताऱ्याचा उदय झाला. वाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, मालाकार चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, राजवाडे इत्यादी महाराष्ट्रातील महापुरुषांच्या परंपरेचा वारसा घेऊन डॉ. श्री. व्यं. केतकर हा आधुनिक महाराष्ट्राचा बृहस्पती जन्माला आला.

राष्ट्रोद्धारक डॉ. केतकर

डॉ. केतकर हे ज्ञानकोशकार केतकर म्हणून महाराष्ट्रालाच नव्हे तर भारतालाही परिचित असलेले, एक समाजशास्त्रज्ञ म्हणून त्यांचा सर्वदूर लौकिक असला, प्राचीन भारताच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचे ते संशोधक म्हणून विख्यात असले, मराठीतील एक गणमान्य साहित्यिक, समीक्षक आणि वाङ्मयेतिहासकार म्हणून ओळखले जात असले तरी डॉ. केतकरांची मुख्य भूमिका राष्ट्रोद्धारकाचीच होती. किंबहुना त्यांचे विविध क्षेत्रांतील उपक्रम राष्ट्रीय हेतूनेच प्रेरित झालेले होते. आपले राष्ट्र, आपला देश, आपले लोक यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचे स्वातंत्र्य त्यांना प्राप्त व्हावे आणि जगातील एक विकसनशील राष्ट्र म्हणून त्याने जगापुढे यावे इतकेच नव्हे तर अखिल विश्वाचे ऐक्य, विकास आणि कल्याण करण्यासाठी आपल्या राष्ट्राने मार्गदर्शन करावे अशीच डॉ. केतकरांची इच्छा होती. त्यासाठीच त्यांनी आपली सर्व प्रज्ञा, प्रतिभा, पांडित्य, वक्तृत्व आणि सर्व क्रियात्मक शक्ती पणाला लावलेल्या होत्या.

या महापुरुषाने महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या तेवीस विभागांची निर्मिती केली. पहिल्या पाच विभागांचा विस्तृत प्रस्तावना खंड लिहिला. 'प्राचीन महाराष्ट्र' हा प्रतिभेचा साक्षात्कार घडविणारा अपूर्ण ग्रंथ. 'भारतीयांचे समाजशास्त्र', 'The History of caste in India,' 'An Essay on Hinduism its formation and future'... हे त्यांचे इंग्रजी प्रबंध. महाराष्ट्रीयांचे काव्य-परीक्षण, 'गोंडवनातील प्रियंवंदा', 'ब्राह्मणकन्या', 'आशावादी' इत्यादी सात सामाजिक व समाज-शास्त्रीय कादंबऱ्या, 'माझे वारा वर्षांचे काम' हा आत्मचरित्रात्मक ग्रंथ, 'स्त्रीसत्तापराभव' हे नाटक,

'सप्तपदी' हा कवितासंग्रह, 'निःशस्त्रांचे राजकारण', 'संकीर्ण लेख' आदी साहित्य आणि विविध नियतकालिकांतून हजारो पृष्ठांचे केलेले स्फुटलेखन या सर्वांच्या मागे त्यांची राष्ट्रीय दृष्टी आहे. डॉ. केतकरांसंबंधी श्री. श्री. के. क्षीरसागर लिहितात, "डॉ. केतकर हे महापंडित असले आणि त्यांचा ज्ञानकोश हा मराठीतील एक विराट ग्रंथ असला तरी केतकर हे पंडितांकरिता लिहिणारे पंडित नसून सामान्य चौकस वाचकांकरिता लिहिणारे राष्ट्रोद्धारक होते ही गोष्ट विसरून चालणार नाही."[२२०]

डॉ. केतकरांच्या प्रेरणांचे स्वरूप

"स्वातंत्र्याची इच्छा ही मानवी धडपडीला प्रेरणा देणारी धर्माच्या खालोखाल महत्त्वाची भावना आहे" असे विधान सुप्रसिद्ध राष्ट्रवादी विचारवंत लॉर्ड ॲक्टनने आपल्या ग्रंथात केलेले आहे. या स्वातंत्र्याच्या आकांक्षेनेच डॉ. केतकरांच्या असामान्य जीवनातील क्षण नि क्षण कार्यान्वित झालेला आहे. स्वातंत्र्याच्या आणि देशभक्तीच्या भावनांचे बीज बालपणी अमरावतीच्या शालेय जीवनात अंकुरले असले तरी त्यांचा डौलदार वृक्ष मात्र मुंबईच्या विल्सन कॉलेजात युरोपियन प्राध्यापकांच्या वर्गात शिकत असताना झाला असे स्वतः डॉ. केतकरांनीच 'माझ्या आयुष्याला वक्रगती' या आत्मचरित्रपर लेखात नमूद करून ठेवले आहे.

आपल्या मुलाने आय. सी. एस. व्हावे अशी अपेक्षा करणारे वडील निधन पावले. नोकरीनिमित्त वडील भाऊही दुसरीकडे गेला. कॉलेजच्या उंबरठ्यावर असताना वात्सल्याने हात फिरविणारी आई गेली. तिच्या पाठोपाठ तिची उणीव भरून काढणारी वडील बहीणही गेली. कौटुंबिक पाशातून पूर्णपणे मुक्त झालेल्या आणि कुठलेच बंधन नसलेल्या या तरुणाने राष्ट्रनिष्ठा आणि स्वातंत्र्यप्रेम या दोनच निष्ठा उराशी बाळगल्या. स्वा. सावरकरांप्रमाणेच सशस्त्रक्रांतीद्वारे भारताला स्वतंत्र करता येईल, त्याकरिता बॉम्वविद्या हस्तगत करण्याचा हेतू मनात बाळगूनच अमेरिकेत प्रयाण केले. पुढे अमेरिकेतील वास्तव्यात त्यांच्या साधनात बदल घडून आला, परंतु साध्य मात्र देशाचे स्वातंत्र्य हेच राहिले. त्यांच्या ज्ञानार्जनाचे, प्रकांड पांडित्याचे आणि विविध पदव्यांचे उद्दिष्ट देशभक्ती हेच होते.

बलवत्तर राष्ट्रभावना निर्माण करण्याचा ध्यास

ज्ञानकोशकाराच्या राष्ट्रीय जबाबदारीचे विवेचन करताना 'हिंदुस्थान आणि जग' या प्रस्तावनाखंडात डॉ. केतकर म्हणतात, "हिंदूंचे व हिंदुस्थानचे हितसंबंध जितक्या विस्तृतपणे लक्षात आणून देता येतील तितक्या विस्तृतपणे आणून देणे. ज्ञानकोशकारांच्या दृष्टीने सर्व भारतीयांस हिंदूंची एकंदर परिस्थिती ठाऊक पाहिजे."[२२१] दुसऱ्या एका ठिकाणी डॉ. केतकर सांगतात, "केवळ विश्वबंधुत्वाच्या कल्पनेने सर्व हिंदूंचा एकोपा होणे शक्य नाही... आपल्याला जी भावना पाहिजे ती भूमिविषयक भावना होय. संप्रदाय अथवा जात, कूळ, वंश, यासंबंधीचा सर्व विचार बाजूला ठेवून अगदी शुद्ध अशी देशभावना आपणांस हवी आहे... हिंदुस्थान हे माझे राष्ट्र, हिंदुस्थान हा माझा मायदेश, असे मनापासून वदविणारी राष्ट्रभक्ती अथवा देशभक्ती भारतीयांत उत्पन्न करणे हे भारतीय कवींचे, लेखकांचे व मुत्सद्यांचे कर्तव्य आहे. अशा प्रकारची बलवत्तर राष्ट्रभावना उत्पन्न होऊन भारतीयांना आपण सगळे एका समाजाचे अवयव आहोत, रक्ताच्या, ऐतिहासिक परंपरेच्या आणि हिताहिताच्या बंधनांनी आम्ही सर्व एकत्र बांधलेले आहोत, असे जेव्हा वाटू लागेल तेव्हा मग पुढे विश्वबंधुत्वाची कल्पना येथील जनसमूहात पेरून तिचा विस्तार करणे हिताचे

३३६९
निबंध २६०७९
१७/३/९०

होईल,"[२२२] असा ध्यास डॉ. केतकरांनी घेतलेला होता. आधुनिक काळात, "राष्ट्रोद्धाराकरिता अखिल ज्ञानाची व्यवस्था लावणे अवश्य आहे व त्या ज्ञानव्यवस्थेचे साधन ज्ञानकोश आहे. हा सिद्धांत ही केतकरांची राष्ट्रीय विचारातील प्रमुख भर होय."[२२३] असे विधान श्री. के. क्षीरसागरांनी त्यांच्या ज्ञानकोशाच्या राष्ट्रीय प्रयोजनाच्या संदर्भात केलेले आहे.

दृढीकरणाची अल्पता म्हणजे राष्ट्रीय भावनेचा अभाव

हिंदुस्थानातील सहस्रावधी जाती, वर्ण, पंथ, यामुळे अलीकडे द्वैत निर्माण झालेले होते. समाजाचे असंख्य तुकडे पडलेले होते. हे विभाजन म्हणजे केतकरांच्या मते दृढीकरणाची प्रक्रिया अपुरी राहिल्याचे द्योतक, दृढीकरण म्हणजे भावनात्मक ऐक्य. या भावनात्मक ऐक्याची उणीव भारतीय समाजात असल्याचे आणि हा राष्ट्रीयदृष्ट्या मोठा दोष असल्याचे डॉ. केतकरांचे मत होते. हिंदु-समाजात राष्ट्रीयत्वाला पोषक अशी परंपरा असली तरी आधुनिक अर्थाने राष्ट्रीय भावना निर्माण झालेली नाही असे नावीन्यपूर्ण मत त्यांनी निर्भीडपणे मांडले.

मानव्याचे फार मोठे ध्येय ठेवण्यात हिंदूंची झालेली चूक

हिंदुस्थानात राष्ट्रीयत्वाला पोषक अशी हजारो वर्षांची परंपरा असूनही आधुनिक अर्थाने राष्ट्रीय भावना निर्माण होऊ शकली नाही या आपल्या तर्काची पुष्टी करताना डॉ. केतकर म्हणतात, "जातीची कल्पना व त्यानंतर एकदम मानव्याची कल्पना अशा दोनच ऐक्याच्या कल्पना प्राचीन हिंदुलोकांस अवगत होत्या. पृथ्वीवरील सर्व मनुष्यांचा एकच समाज असावा, या समाजात श्रेष्ठ कनिष्ठ असे चार वर्ण असावेत व या वर्णांत ब्राह्मण सर्वांच्या वर असावेत ही हिंदूंची समाजघटनेची कल्पना होती हे त्यांचे सामाजिक ध्येय होते."[२२४]...

फार मोठे ध्येय डोळ्यापुढे ठेवण्यापेक्षा बेताचे ध्येय ठेवणाऱ्याच्या हातून जास्त कार्य घडले आहे या तत्त्वाचा हिंदूंना विसर पडला. हिंदूच एकमेकांचे बंधू नाहीत तर सर्व मानवजातच एकमेकांचे बांधव आहोत, असे वेदांती अद्वैती तत्त्वज्ञान त्यांनी जगाला शिकविले. पण थोर व उदात्त तत्त्वज्ञान व्यवहारात उतरविता आले नाही. दर्शनी संकुचित दिसणारे पण सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने यशस्वी ठरणारे बेताचे राष्ट्रनिर्मितीचे ध्येय हिंदूंनी पुढे ठेवले नाही. त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले, अशी नवी शास्त्रीय मीमांसा प्रथमच हिंदुराष्ट्राच्या संदर्भात डॉ. केतकरांनी मांडली.

आम्हाला राष्ट्रपदवीला पोचविण्यात इंग्रजांचे साहाय्य

राष्ट्रीयत्वाच्या तृष्णेचे मूळ परकीय सत्तेत असते आणि परकीय शासकवर्गाची सामाजिक प्रतिष्ठा, उच्चता, त्याला लाभणारी सामाजिक सुखे आणि दुसऱ्या राष्ट्राशी असणारे त्यांचे बरोबरीचे संबंध इत्यादी डोळ्यांत भरणाऱ्या भेदामुळे ही तृष्णा सतत वाढत जाते आणि शासकवर्ग व प्रजा यातील अंतराने राष्ट्रीयभावनेचा विकास होतो. डॉ. केतकर म्हणतात, "या परकीयांनी सर्व हिंदुस्थानला एका बलिष्ठ सत्तेखाली एकत्रित करून देशातील निरनिराळ्या वंशांना व राष्ट्रकांना पारतंत्र्याच्या सामान्य जाणिवेने आपआपसातील वैर विसरून जाण्यास शिकविले आहे."[२२५]

रिनासन्स आणि रिफार्मेशन या युरोपातील चळवळीतून पाश्चात्य राष्ट्रांची निर्मिती झाली असे सर्वसाधारणपणे सांगण्यात येत असते. डॉ. केतकर म्हणतात, की या चळवळींचा राष्ट्रविकासाला हातभार लागला असेल परंतु ज्या दिवशी युरोपियन समाजाने आपले जात्यवलंबी स्वरूप बदलून ते क्षेत्रावलंबी केले त्या दिवसापासून वाढीला लागलेल्या प्रादेशिक एकतेच्या भावनेतून पाश्चात्य राष्ट्रांची

निर्मिती झाली." प्रदेशमूलक समाजाला एकदा राष्ट्रस्वरूप प्राप्त झाले म्हणजे त्यांच्यात राष्ट्राभिमान वाढत जातो. एकसारखी सत्ता अशा प्रदेशावर असली तर तो समाज राजकीय स्वरूपाचा प्रादेशिक समाज बनतो. इंग्रजांनी आपली सत्ता हिंदुस्थानात स्थापन करून आपला राजकीय स्वरूपाचा प्रादेशिक समाज निर्माण केला व पर्यायाने आपली राष्ट्र म्हणून निर्मिती केली." २२६

डॉ. केतकरांची राष्ट्रविषयक कल्पना

'गटागटांमधील सत्तासंघर्ष' या दृष्टीने समाजशास्त्रज्ञ राष्ट्रवादाकडे बघतात. 'सामाजिक संस्कारांतून निर्माण झालेली गटाची आकांक्षा' हा राष्ट्रवादातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे असे पाश्चात्य समाजशास्त्रज्ञ मानतात. डॉ. केतकरांनी राष्ट्रवादाचा अभ्यास याच व्यापक भूमिकेतून केलेला असल्याचे आपल्याला दिसून येईल. "समाजातील व्यक्तींची संघटित स्थितीत उत्पन्न झालेली कार्यशक्ती ही प्रत्येक व्यक्तीच्या स्वतंत्रपणे कार्य करताना दृग्गोचर होणाऱ्या शक्तीपेक्षा पुष्कळ पटीने अधिक असते. राष्ट्र म्हणजे व्यक्तींची संघटित शक्ती." 'स्वातंत्र्यनाश' याचा अर्थ केतकरांच्या मते, "स्वातंत्र्यनाश म्हणजे नागरिकांच्या सामुच्चयिक हितास अत्यंत उत्कटतेस पोचवावयाच्या संधीचा नाश होय. स्वराज्याची इच्छा म्हणजे सामुच्चयिक हित अधिकाधिक साधता येईल अशा परिस्थितीची इच्छा होय." २२७

राष्ट्रभावना शिक्षणमूलक व विचारमूलक आहे, ती नैसर्गिक नाही

हिंदुसमाजाच्याच नव्हे तर हिंदुसंस्कृतीच्या आणि हिंदूंच्या भवितव्याविषयी विचार करताना राष्ट्रीय भावनेच्या मूलभूत स्वरूपाविषयी डॉ. केतकरांनी सूक्ष्म विचार केलेला आहे. ते म्हणतात, "देशाच्या, धर्माच्या म्हणजेच आचारांच्या एकत्वामुळे ज्या समुच्चयाविषयी एकत्वाची भावना व्यक्त होते त्या समुच्चयाचे हित व्हावे या प्रकारची भावना मनुष्यास क्षुधातृषेसारखी नैसर्गिक नाही. त्या शिक्षणमूलक व विचारमूलक आहेत. व्यक्तीचे हित साधण्यासाठी समुच्चयाची आवश्यकता असते आणि त्या समूच्चयाचे संरक्षण व्हावे म्हणून त्या समुच्चयाच्या ठायी भक्ती उत्पन्न करण्यात येते." २२८

हिंदूंचे समाजवैशिष्ट्य टिकविणे आणि परंपरेचा महान वारसा जोपासणे आवश्यक

परस्परांबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे कार्य कोणत्या सामाजिक वैशिष्ट्यांनी होईल, राष्ट्रीयत्वाच्या भावनेला वृद्धिंगत करण्याचे कार्य कोणत्या परंपरांमुळे शक्य होईल, येत्या पिढ्यांना प्राचीनांच्या कोणत्या सांस्कृतिक संचिताचा अभिमान वाटेल यासंबंधी डॉ. केतकरांनी आपल्या महान परंपरेचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात, "पुढील पिढीस ज्याबद्दल अभिमान बाळगता येईल अशा गोष्टी आपल्या वाङ्मयात थोड्या थोडक्या नाहीत. वेदांचे अतिप्राचीनत्व, उपनिषदांतील गंभीर विचार, जैमिनीच्या शब्दप्रामाण्याहून अनुमानपरंपरा काढण्याची पद्धती, पुराणांत गायिलेल्या पुरुषांची मनोहर चरित्रे, लोकांपुढे ध्येयरूप होतील अशा थोर स्त्री-पुरुषांची चरित्रे, ती समजावून देण्यासाठी उत्पन्न झालेले महाभारतातील नीतिशास्त्र, वाल्मीकीचा काव्यावेश, या सर्व गोष्टी अभिमानास कारण होऊन लोकांची पूज्यताबुद्धी जरी नाही तरी प्रेम हे खास रक्षितीलच." २२९

हिंदूंची अभिनव समाजशास्त्रविषयक विद्याही रक्षणीय आहे

'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीयांनी मांडलेली नुसती कविकल्पना नव्हती तर ती त्यांच्या समाजशास्त्रीय ज्ञानाची परिसीमा होती. भिन्न उपासना, भिन्न पंथ, भिन्न दैवते, भिन्न संप्रदाय आणि जातिवर्ण यांनी संपन्न असलेल्या "विविध राष्ट्रजातींना सर्वत्र संचार करणाऱ्या ब्राह्मणांनी एका

संस्कृतीच्या छत्राखाली आणून सुसंघटित करण्याचा प्रयत्न केला." " तुम्ही आपली स्वतंत्र दैवते माना, पण ती एका व्यापक परमेश्वराची रूपे आहेत अशी दृष्टी स्वीकारा " अशी उदार शिकवण ब्राह्मणांनी या सर्व राष्ट्रजातींना दिली. " अनेक जनव्यापी संस्कृती निर्माण करून त्या संस्कृतींचे आवरण अनेक लोकांवर पसरवून त्यांना एकस्वरूप आणण्याची क्रिया हिंदूंनीच केली. जगास आत्मसदृश करण्याच्या क्रियेत हिंदूंइतके यश कोणासच आले नाही." म्हणूनच डॉ. केतकर अभिमानपूर्वक सांगतात, " जगातील अर्ध्या अधिक मानवी जनतेचे अवरुद्धचाने एकीकरण ज्या भारतीय विद्येने केले ती भारतीय समाजशास्त्रीय विद्या जगातील अत्यंत मननीय अशी समाजशास्त्रीय विद्या होय."[२३०]

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा जाज्वल्य अभिमान

डॉ. केतकर राष्ट्रवादी असले तरी स्वा. सावरकरांप्रमाणेच त्यांना महाराष्ट्रावद्दल आणि मराठी भाषेवद्दल प्रेम आणि अभिमान होता. भारताचे नेतृत्व करण्याचे सामर्थ्य महाराष्ट्राच्या ठिकाणी आहे असा त्यांचा आत्मविश्वास होता. महाराष्ट्राजवळ जी महान ऐतिहासिक परंपरा आहे ती अन्य भारतीयांजवळ नाही असे अभ्यासाने त्यांचे मत बनले होते. भाषा हे संस्कृतीचे महत्त्वाचे गमक असून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात प्रादेशिक भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाषा ही राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे ही जाणीव त्यांच्या अंतःकरणात जागृत होती. स्वातंत्र्य हा फार मोठा भावनांशी संबंधित विषय आणि लोकांच्या भावना एकत्र करण्यात ज्या चळवळी करण्यात आल्या त्या राष्ट्रीय चळवळी होत.

ते म्हणतात, "ज्यांची भाषा एक, त्यांच्या भावना व कल्पना पुष्कळशा सारख्या असतात, मग ते निरनिराळ्या प्रांतांत राहत असले तरी हरकत नाही."... प्रांतिक भाषा ही प्रशासनात, शिक्षणक्षेत्रात, साहित्यनिर्मिती, उच्च शिक्षणाच्या प्रचारास पोषक ठरणारी आहे असे डॉ. केतकरांचे मत होते. १९३१ साली हैद्राबाद येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात त्यांनी मराठी भाषिकांवर जबरीने उर्दू लादण्याच्या निजामाच्या धोरणाचा खरपूस समाचार घेतला आणि समारोप करताना ते म्हणाले, " आपल्या भाषेचे राज्य हेच लोकराज्य होय. लोकराज्य स्थापन करणे लोकसेवा ऊर्फ ईश्वरसेवा होय."[२३१] अनेकांना अतिरेकी वाटणारे हे मराठी भाषेसंबंधी अभिमानाचे उद्‌गार पाहिले म्हणजे मराठी भाषेसंबंधीचा त्यांचा जिव्हाळा दिसून येतो.

डॉ. केतकरांचा दुर्दम्य आशावाद

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ उत्तरोत्तर लोकमत जागृत करून, राष्ट्रीयदृष्टचा संघटित होऊन घटनात्मक पद्धतीनेच चालविली जाईल व त्यातच तिला यश येईल असा आशावाद केतकरांनी व्यक्त केला आहे. सुरुवातीला त्यांचा स्वातंत्र्यसंपादन करण्याचा मार्ग क्रांतिकारकांचा असला तरी पुढे पुढे तो सांसदीय पद्धतीचाच झालेला आहे. 'इतिकर्तव्यता' अर्थात राष्ट्रीय कार्यक्रम हे स्वतंत्र प्रकरण लिहून त्यांनी राष्ट्रधर्मसंस्थापना, राष्ट्रधर्म व राजकीय बल, लोकसत्ता व लोकमत, त्यांच्याकडून अपेक्षा, हिंदुसमाजबलवर्धन, चातुर्वर्ण्यसंस्थापना, आर्थिक भवितव्य, देश्य चळवळ, परराष्ट्रीय राजकारण, अल्पप्रदेशविषयक कर्तव्ये, आर्थिक उन्नतीची विविध अंगे व त्यांची साधना, संघरक्षण, संघसदस्य व शिक्षणपद्धती इतक्या राष्ट्रीय घटकांचा शास्त्रीय पद्धतीने विचार केलेला असून तो मुळातच वाचण्यासारखा आहे.

हिंदुस्थान एक बलसंपन्न राष्ट्र निर्माण करण्याच्या भूमिकेतून डॉ. केतकरांनी हे सर्वसमावेशक व्यापक आणि द्रष्ट्यालाच शोभून दिसेल असे विचारधन महाराष्ट्रातील लोकांपुढे ठेवले आहे. "हिंदुसमाजाला राष्ट्ररूपास जाण्याइतके आत्मविकासाचे सामर्थ्य आहे. पाश्चात्य संस्कृती व हिंदु-संस्कृती यांचे स्वरूपैक्य होत आहे. जागतिक संस्कृती स्थापन होऊन हिंदुस्थान हा तिचा एक भाग होईल. हिंदुसमाजाला हे जे जागतिक समाजामध्ये स्थान मिळणार आहे ते त्यास अगोदर आपले राष्ट्रीयीकरण करूनच मिळवावे लागेल. अशा तऱ्हेचे राष्ट्रीयीकरण करावयाचे म्हणजे हिंदुत्वाचे रूपांतर राष्ट्रीयत्वामध्ये करण्याचा प्रयत्न करणे होय ..सर्व जगाचे सांस्कृतिक ऐक्य हिंदुसमाजाचे सामर्थ्य वाढविले असतानाच घडवून आणणे शक्य आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे."[२३२] असे प्रत्ययकारी उद्‌गार त्यांनी काढलेले आहेत.

राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यासंबंधी केतकरांच्या मौलिक सूचना

डॉ. केतकरांच्या मते या देशात असलेली जातिविशिष्ट समाजरचना नष्ट करण्याची आवश्यकता असून त्या ठिकाणी प्रदेशनिविष्ट राष्ट्रीय समाजाची निर्मिती नव्याने घडवून आणली पाहिजे. त्याकरिता पहिली गोष्ट म्हणजे (१) "एक राजकीय सत्ता, एकच कायदा व न्याय, एकाच प्रकारचे शिक्षण, दळणवळणाची साधने, आचारविचार, पोषाख, चालीरीती, परदेशगमन इत्यादी घटकांच्या-द्वारे प्रादेशिक ऐक्याची निर्मिती केली पाहिजे." यामुळे भावनात्मक ऐक्याची क्रिया वाढण्याची शक्यता आहे. (२) राष्ट्रीय ऐक्य निर्माण करावयाचे असेल तर पारमार्थिक बाबतीत उदारपणाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणे आणि त्या तत्त्वज्ञानाच्या आधारे आम्हाला जगाची महत्त्वाची सेवा करावयाची आहे असा सतत प्रसार केला पाहिजे." (३) "राजकीय व सामाजिक क्षेत्रांत संप्रदाय उपासनादी भेदांचे उच्चाटन करण्याची व्यवस्था केली पाहिजे." (४) "मुसलमान व ख्रिस्ती हे म्लेंच्छ आहेत, नीच आहेत हे आपले मत हिंदुसमाजाने टाकून दिले पाहिजे. समाजाच्या दृष्टीने सर्व-जाती, वर्ग सारखेच आहेत ही भावना नुसती मनात निर्माण होऊनच चालावयाची नाही तर त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात त्या त्या वर्गांना अनुभव आला पाहिजे." (५) "सोवळ्याच्या, विटाळाच्या, स्पर्शास्पर्शाच्या कल्पनांचा त्याग केला पाहिजे. रोटीबेटी संबंधातील निर्बंध आपण काढून टाकले पाहिजे." हे सर्व परिवर्तन घडवून आणताना डॉ. केतकरांनी दिलेला इशारा अतिशय महत्त्वाचा असून प्रत्येक सुधारणावादी हिंदुव्यक्तीने तरी निदान लक्षात ठेवला पाहिजे. डॉ. केतकर म्हणतात, "हे सर्व परिवर्तन किंवा फेरबदल घडवून आणताना मुख्य गोष्ट आपण केली पाहिजे ती ही की, हे सर्व फेरफार जुन्या पुराणसंरक्षणप्रिय लोकांच्या पद्धतीने आपण घडवून आणले पाहिजे म्हणजे एखाद्या जातीचे रूप घेणारा कोणताही नवा संप्रदाय उत्पन्न न करता किंवा कोणत्याही चालू संप्रदायाला उत्तेजन न देता वर निर्दिष्ट केलेले फेरफार झाले पाहिजे."[२३३]

डॉ. केतकरांना अभिप्रेत असलेली हिंदुत्वाची पुनर्घटना

"हिंदुत्वाची पुनर्घटना करणे याचा अर्थ हिंदू या भावनेच्याऐवजी लोकांच्या ठिकाणी भारतीय ही बुद्धी उत्पन्न करणे किंवा हिंदुसंस्कृतीचे रूपांतर भारतीय राष्ट्रधर्मात घडवून आणणे होय." डॉ. केतकरांचा हा विचार अलीकडे मूळ धरू लागला आहे हे अभ्यासकांना विदित आहे. मात्र सुमारे पन्नास वर्षांपूर्वी डॉ. केतकरांनी राष्ट्रीय भावनात्मक ऐक्याच्या संदर्भात तो मांडलेला होता यावरून त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो, तसाच दूरदर्शीपणाही जाणवतो. आपल्याला बऱ्याच प्रमाणात "राष्ट्र-निष्ठ करण्याचे कार्य ब्रिटीशसत्तेने आधीच बजावलेले आहे. सामाजिक विरोधाची भावना नष्ट

करावयाची असेल तर परदेशगमनाच्या प्रवृत्तीला उत्तेजन दिले पाहिजे कारण, सात्मीकरणाची क्रिया घडवून आणून राष्ट्रीय समाज विशाल करता येतो. या दृष्टीने आपले धोरण अमेरिकन लोकांसारखे असले पाहिजे."[२३४]

भारतीय समाजसुधारकांच्या विचारांचे केतकरांनी केलेले परीक्षण

ब्रिटिशांच्या उदारमतवादाचा स्वीकार करताना आपल्या राजकीय, सामाजिक तसेच व्यक्ती व संस्थाविषयक जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्याचा काय परिणाम होईल याचे भान समाज-सुधारकांनी ठेवावयास पाहिजे होते. ते तसे ठेवलेले दिसत नाही असे डॉ. केतकरांचे मत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या उदारमतवादी तत्त्वांचा अंगीकार आपल्याकडील विद्वान सुधारकमंडळींनी चांगल्या उद्देशानेच केला, पण ही उदारमतवादाची तत्त्वे स्वतंत्र राष्ट्रातील समाजाला पोषक ठरणारी होती. भारतासारख्या पारतंत्र्यात असलेल्या देशाला ही तत्त्वे लावता येत नव्हती.

डॉ. केतकर हे कट्टर राष्ट्रवादी असले तरी भौतिकवादी विचारसरणीकडे त्यांचा कल होता. जुन्या धर्मसुधारकांसंबंधी ते म्हणतात, "आपल्या समाजातील धार्मिक लोक आणि धर्मसुधारक आपल्या अनुयायांची मने जगातील नश्वर गोष्टींवरून काढून टाकण्याचा प्रयत्न करीत असत. काही नव्या सुधारकांना समाजघटनेत खरोखरच फेरफार करावयाचा होता परंतु समाजातील व्यंगे काढून टाकण्याच्या बाबतीत उत्तम वैद्य व शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांऐवजी वैदू व न्हावी यांचे काम त्यांनी केले." [२३५]

राष्ट्रधर्म आणि उदारमतवाद यातील अन्तर

राष्ट्रधर्म आणि पाश्चात्यांचा उदारमतवाद यातील अन्तर आमच्या देशातील समाजसुधारकांना समजले नाही असे केतकरांचे मत आहे. ते सांगतात, " आपली संस्कृती व परंपरागत आचार आणि आपले कायदे गृहीत धरून फेरफार करीत जाणे आणि हिंदुत्वाचे क्षेत्र अधिकाधिक विस्तृत करीत जाणे आणि त्याबरोबरच स्वत्वाबद्दलचा अभिमानपणा दृढ ठेवणे हा राष्ट्रधर्म होय. हिंदू या नावाची व्याप्ती अधिक वाढवून त्यात अधिकाधिक लोक घेणे हा राष्ट्रधर्म होय. केवळ ख्रिस्ती व मुसलमान यांशी अधिक चांगले संबंध उत्पन्न करणे हा उदारमतवाद होय. केवळ उदारमतवाद हिंदू या शब्दाची व्यापकता वाढवीत नाही आणि त्यामुळे बाह्य लोकांस घेऊन समाजात पूर्णपणे प्रविष्ट करून देणे त्यास शक्य नाही." [२३६]

मराठी लेखकाने व्यापक भूमिकेतून राष्ट्रीय कर्तव्य बजावले पाहिजे

निरनिराळ्या भौतिक आणि समाजशास्त्रीय ज्ञानाच्या अभावी या देशातील आंग्लशिक्षित वर्ग बौद्धिक परावलंबी आहे याची डॉ. केतकरांना चांगली कल्पना होती. आपल्या देशातील प्राचीन विद्यांच्या क्षेत्रात हे परावलंबित्व अजिबात असता कामा नये असे त्यांचे स्पष्ट मत होते. व्यापारात काही अंशी प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्यावर अवलंबून असणे भाग आहे तथापि बौद्धिक बाबतीत परावलंबित्व धोक्याचे व राष्ट्रास कमीपणा आणणारे आहे. त्यातल्या त्यात जे ज्ञान राष्ट्राच्या हिताशी निकटतेने संबंधित आहे त्यात परावलंबित्व फारच धोक्याचे आहे,"[२३७] असे स्वाभिमानी मत त्यांनी मांडले आहे.

राष्ट्राचे पुढारी होण्याची आकांक्षा ठेवा

परकीय मुसलमान व ख्रिस्ती हे दोन्ही समाज आपल्या राष्ट्रीय जीवनाशी संलग्न करून घ्यावे अशी गांधीजींप्रमाणेच डॉ. केतकरांचीही इच्छा होती. लोकजागृतीच्या आणि घटनात्मक उपायांच्या

साहाय्यानेच देशातील स्वातंत्र्याच्या चळवळी चालविल्या पाहिजे असे मत त्यांनी निःशस्त्रांचे राजकारण या ग्रंथात व्यक्त केले आहे. एका अर्थाने गांधीजींच्या निःशस्त्र लढ्याचा त्यांनी पुरस्कारच केलेला आहे. डॉ. केतकरांना हा मार्ग आदर्शभूत वाटतो. "पराभूत आणि परतंत्र राष्ट्रास आपण या निःशस्त्र उपायांनी स्वातंत्र्य मिळवून दिले म्हणजे जगद्विकासामध्ये हिंदुस्थानने महत्त्वाचे कार्य केले असे होईल आणि 'ब्रह्म तेजो वलं वलं' असे मोठ्या आवेशाने सांगणाऱ्या वसिष्ठांचे शब्द खरे केल्यासारखे होईल. [२३८] या कर्तव्याला मराठी लोकांनी हातभार लावला पाहिजे. ख्रिस्ती, फारशी, यहुदी, मुसलमान लोकांशी विवाहादी शरीरसंबंध केल्याने हिंदूंच्या समाजाचे वल कमी न होता वृद्धिगत होईल. मात्र विवाह करताना शुद्धिसमारंभ व्रात्यस्तोमविधी असे संस्कार करून हिंदुधर्मात परकीय तरुणींना आणले पाहिजे. ख्रिस्ती व मुसलमान समाजांना आपल्यात सामावून घेतले पाहिजे, त्यांच्या धर्मग्रंथांची भाषांतरे आपल्या भाषेत करून घेतली पाहिजेत." पुढे डॉ. केतकर म्हणतात, "ही बाह्यासंबंधी जी कर्तव्ये दिली आहेत ती काही अंशी बाह्यांच्याच उन्नतीसाठी आहेत व काही अंशी बाह्य आणि हिन्दू हे दोन्ही मिळून जे हिंदी राष्ट्र बनते त्या हिंदी राष्ट्राच्या उन्नतीसाठीही आहेत. आमच्यातील सुशिक्षित लेखक मंडळीस केवळ हिंदूंचे अगर महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे पुढारीपण करावयाचे नाही तर सर्व राष्ट्राचे पुढारी व्हावयाचे आहे. या आपल्या आकांक्षेनुसार आपण वर्तन ठेवले पाहिजे." [२३९]

राष्ट्रीय ध्येयाच्या पूर्तीसाठी लेखकांनी आपले विचार स्पष्टपणे व निर्भीडपणे मांडले पाहिजेत

डॉ. केतकरांचा भर राष्ट्रजागृतीवर आहे आणि ही राष्ट्रजागृती देशातील विचारी सुशिक्षित वर्ग करू शकतो असा त्यांचा विश्वास आहे. सार्वजनिक मत किंवा लोकमत कसे निर्माण होते हे सांगताना, डॉ. केतकर म्हणतात, "समाजातील सर्व लोक एकाच विचारी लोकसमूहाकडे शिष्य दृष्टीने पाहू लागले म्हणजे समाजाचे विचारैक्य होते व कवी, नाटककार, निबंधकार व इतर प्रकारचे लेखक जे लोकमत उत्पन्न करतील ते खरेखुरे सार्वजनिक मत होते."... "मात्र या ध्येयाच्या पूर्तीसाठी लोकांनी आपले विचार स्पष्टपणे मांडण्यास शिकले पाहिजे. आपली जी खरी मते व भावना असतील त्यांचे सकारण समर्थन करता येते की नाही हे पाहण्याचाही लोकांनी प्रयत्न केला पाहिजे व आपल्या मतांचे व भावनांचे लोकांकडून परीक्षण होऊ दिले पाहिजे."[२४०]

समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून राष्ट्रवादाचा अभ्यास करणारा भारताचा पहिला देशभक्त

डॉ. केतकरांनी मांडलेल्या राष्ट्रवादी विचारांचा परिचय करून घ्यावयाचा एवढाच या विवेचनाचा उद्देश असल्यामुळे संशोधक, साहित्यिक, इतिहासकार आणि समाजशास्त्रज्ञ इत्यादी पैलूंवर इथे विवेचन करण्यात आलेले नाही. डॉ. केतकरांनी समाजशास्त्रज्ञाच्या भूमिकेतून केलेला राष्ट्रवादाचा विचार महाराष्ट्रालाच नव्हे तर भारतालाही नवा आहे. या देशातील भिन्न भिन्न सामाजिक गटांकडे डॉ. केतकरांनी ज्या राष्ट्रीय दृष्टीतून पाहिले त्या राष्ट्रीय दृष्टीचे इतरत्र दर्शन होत नाही. आपल्या देशातील राष्ट्रीय ऐक्याचे होत असलेले प्रयत्न आणि स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यातील काळात त्यांना आलेली फळे पाहिली म्हणजे डॉ. केतकरांच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाचे महत्त्व चटकन लक्षात येते. गेल्या शंभर वर्षांत जातिभेद नष्ट करण्यासंबंधी अनेक समाजसुधारकांनी वैचारिक आणि संस्थात्मक पातळीवरून प्रयत्न केलेले आहेत. परिणामी आज जातीय भावना वाढीस लागण्याचे व जातिद्वेष व मत्सर यांचे दृश्य आज समाजात दिसत आहे. या देशातील हिंदु-मुसलमानांचे ऐक्य ही एक राष्ट्रीय निकड होती. त्यासाठी न्या. रानडे, गोखले, महात्मा गांधी इत्यादी हिंदुपुढाऱ्यांनी

आयुष्यभर प्रयत्न केले. सर्वात अधिक प्रयत्न गांधीजींनी केले. परिणामी अपयश पदरात येऊन देशाची फाळणी झाली. पाकिस्तान उदयाला आले. अजूनही अल्पसंख्याकांचे भावनात्मक ऐक्य आम्हाला साधता आले नाही.

मुसलमानांप्रमाणेच ख्रिस्ती लोकांनाही डॉ. केतकर म्हणतात त्याप्रमाणे सात्मीकरणाच्या प्रक्रियेत आम्हाला आणता आले नाही. एक राष्ट्रीयत्वाची भावना प्रादेशिकतेवर मात करून पुढे येईल अशी अपेक्षा होती परंतु प्रांतीयतेच्या वादाने मूळ धरलेले आहे. या राष्ट्रापुढील शैक्षणिक, आर्थिक इत्यादी समस्या अजूनही आम्हाला नीट सोडविता आल्या नाहीत. ज्या लोकशाही शासन-प्रणालीचे आम्ही पुरस्कर्ते आहोत त्या लोकशाहीने आमचा कधी नव्हे इतका अधःपात केलेला आहे. या सर्व प्रश्नांच्या संदर्भात पुन्हा एकदा डॉ. केतकरांच्या राष्ट्रीय विचारांचा अभ्यास राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी आणि राजकीय नेतृत्व करण्याची इच्छा असणाऱ्या समाजसेवकांनी केला पाहिजे असे सांगावेसे वाटते. डॉ. केतकरांचे मोठेपण सांगताना वाङ्मयाचे इतिहासकार डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "जगातील साऱ्या सांस्कृतिक चळवळीचे अंतिम ध्येय असलेली, विविधतेला आणि विचारस्वातंत्र्याला भरपूर वाव देणारी जी जागतिक संस्कृती, तिची निर्मिती हिंदूंच्याच समाजविस्तार पद्धतीने शक्य आहे. तेव्हा आपल्या समाजशास्त्रीय विद्येचा श्रद्धापूर्वक प्रचार करून जागतिक संस्कृतीच्या निर्मितीस आणि जगदैक्याच्या प्रस्थापनेस प्रयत्नपूर्वक साहाय्य करणे हे हिंदुसमाजाचे कर्तव्य आहे, हा हिंदुसमाजाचा जीवनहेतू आहे. हिंदुसमाजाला या उदात्त जीवनहेतूची जाणीव करून दिली, हे डॉ. केतकरांचे महान जीवितकार्य आहे. या जीवितकार्यात डॉ. केतकरांचे मोठेपण साठविलेले आहे. डॉ. केतकरांनी हिंदुसमाजाला जागतिक दृष्टीची उदात्त शिकवण दिली. तिची, तिच्या महात्म-तेच्या प्रमाणात, जितकी चर्चा व्हावयास पाहिजे तितकी झाली नाही, मग तदनुसार आचरण करणे तर दूरच राहिले."[२४१]

विचारवंतांच्या उपेक्षेचा मानकरी

भारत हे एक बलशाली वैभवसंपन्न राष्ट्र कसे निर्माण करता येईल आणि जगाच्या कल्याणा-करिता ते उपयुक्त कसे ठरू शकेल यासंबंधीचा विस्तृत आलेख डॉ. केतकरांनी 'हिंदुस्थान आणि जग' या पहिल्या प्रस्तावनाखंडातील 'इतिकर्तव्यता' या पंधराव्या प्रकरणात मांडलेला आहे. हिंदुत्वाचा आणि हिंदुराष्ट्रीयत्वाचाही त्यांना अभिमान असल्याचे स्पष्ट दिसते, परंतु तो अभिमान इतरांना तुच्छ लेखणारा, तिरस्कारातून उदयाला आलेला नाही. स्वा. बॅ. वि. दा. सावरकर आणि डॉ. केतकर यांच्या हिंदुत्वाची तुलना करताना डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "दोघांचीही दृष्टी प्राधान्याने ऐहिक आहे. भेदाचा मुद्दा हा की, केतकरांचा विचारप्रवाह हा मुख्यतः समाजशास्त्राच्या विस्तीर्ण पात्रातून वाहिलेला असून सावरकरांची नजर ही ऐतिहासिक काळातल्या उज्ज्वल व पराक्रमपूर्ण वैभवाशी तुल्यगुण अशा हिंदुत्वाच्या राजकीय वैभवावर मुख्यतः केन्द्रित झालेली आहे... त्यातही (सावरकरांच्या) त्यांच्या काव्यात्म जीवनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या हिंदुत्व दृष्टीला विलक्षण स्फूर्तिदायकत्व आणि नेत्रदीपकत्व प्राप्त झालेले आहे."[२४२] डॉ. देशपांडेंनी डॉ. केतकर आणि सावरकर यांची केलेली तुलना त्या दोन्ही महापुरुषांचे मोठेपण स्पष्ट करणारी आहे यात वाद नाही, पण स्वा. सावरकरांच्या राष्ट्रीय विचारांचा जसा प्रचार व प्रसार झाला, त्यांना जसे लक्षावधी अनुयायी लाभले तसे दुर्दैवाने डॉ. केतकरांच्या बाबतीत घडलेले नाही.

डॉ. केतकर प्रत्यक्ष राजकारणात पडले नाही हे त्याचे एक कारण असू शकते. परंतु 'ब्रह्म तेजो बलं बलं' या मार्गालाही महत्त्व आहे हे नाकारता येत नाही. मात्र या देशभक्त महापंडितांची उपेक्षाच झाली असे खेदाने म्हणावे लागते. हा महापुरुष सर्वसामान्य लोकांना प्रत्यक्ष राजकारणात नसल्यामुळे अपरिचित असू शकतो परंतु राष्ट्रवादाच्या अभ्यासकांनाही तो अपरिचित राहावा याबद्दल आश्चर्य आणि खेद वाटतो. 'आधुनिक भारत' कर्ते आचार्य जावडेकर, 'भारतीय राष्ट्रवादाचा विकास' मांडणारे साक्षेपी ग्रंथकार प्रा. न. र. फाटक, 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास' मांडणाऱ्या श्रीमती नलिनी पंडित आणि 'राष्ट्रवाद' समजावून सांगणारे एस्. वाय. कोल्हटकर यापैकी कुणालाही डॉ. केतकरांच्या राष्ट्रवादी विचारांची दखल घ्यावीशी वाटू नये, त्यांच्या राष्ट्रीय विचारांचा त्यांनी आपल्या ग्रंथात ओझरता उल्लेखही करू नये याचे नवल वाटते. नभांगणात असणाऱ्या अनेक नक्षत्रताऱ्यांची शोधकांनी दखल घ्यावी पण चंद्रालाच वगळाव तसा प्रकार डॉ. केतकरांच्या बाबतीत घडलेला आढळतो.

त्यातही समाधानाची गोष्ट अशी की, म. म. दत्तो वामन पोतदार, वा. म. जोशी, डॉ. इरावती कर्वे, श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. अ. ना. देशपांडे आणि श्री. के. क्षीरसागर यासारख्या प्रथितयश लेखक व लेखिकांनी डॉ. केतकरांचे ऋण मान्य केलेले आहे व त्यांचे माहात्म्यही सांगितले आहे. डॉ. केतकरांनी लोकश्रयी मराठी वाङ्मयावरील लेखात समकालीनांचा उपेक्षित म्हणून महाकवी भवभूतीचा उल्लेख केलेला असून उत्तरकालात तो अतिशय प्रसिद्धीला आला व त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली असे सांगितले आहे, तसेच पुढे डॉ. केतकरांच्या बाबतीत घडण्याची शक्यता आहे. येणाऱ्या पिढ्या डॉ. केतकरांच्या राष्ट्रीय विचारांचे अध्ययन केल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास वाटतो.

स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद
अलौकिकत्वाचा साक्षात्कार घडविणारा महापुरुष

स्वा. बॅ. वि. दा. सावरकर हे एक विश्वविख्यात थोर क्रांतिकारक, एक थोर देशभक्त, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी प्राण पणाला लावणाऱ्या भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांचे मुकुटमणी म्हणून सुप्रसिद्ध आहेत. एक विचारवंत आणि श्रेष्ठ साहित्यिक म्हणूनही त्यांची योग्यता फार मोठी आहे. त्यांची उज्ज्वल स्वातंत्र्याकांक्षा, त्यांचा ज्वलंत ध्येयवाद आणि त्या ध्येयवादासाठी त्यांनी सोसलेला पराकाष्ठेचा छळ, तुरुंगवास आणि केलेला असामान्य त्याग या सर्वांचा परिपाक म्हणजे त्यांचे साहित्यदेखील विलक्षण प्रभावी झालेले आहे. देशाचे स्वातंत्र्य संपादन करणे हे त्यांचे ध्येय, भारतमातेवरील त्यांची नितांत भक्ती, बुद्धिवाद आणि विज्ञाननिष्ठा आणि तितकीच जहाल हिंदुत्वनिष्ठा यांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व बनलेले होते.

आधुनिक भारताचे एक द्रष्टे, राजकीय नेते, मुत्सद्दी, समाजसुधारक, हिंदुराष्ट्रवादाचे उद्गाते, धर्मशुद्धी, भाषाशुद्धी आणि लिपिशुद्धीचे प्रेरक आणि पुरस्कर्ते, राष्ट्रवादी तत्त्वचिंतक, 'वक्ता दशसहस्रेषु' अशी गणना होणारे अत्यंत प्रभावी वक्ते आणि आजीवन हिंदुसंघटक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. स्वा. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील हे विविध विशेष पाहिले म्हणजे त्यांच्या अलौकिकत्वाची कल्पना येते. विसाव्या शतकात आणि भारतात त्यांच्याइतक्या दैवी गुणांनी संपन्न असलेला दुसरा माणूस आढळत नाही. त्यांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठेनेच त्यांना हे अलौकिकत्व, लोकविलक्षण विभूतित्व प्रदान केलेले आहे असे म्हणावे लागते. स्वा. सावरकरांनी ज्या जीवननिष्ठांचा

बुद्धिपुरस्सर स्वीकार केला त्यांच्या प्रचारासाठी नि प्रसारासाठीच आपली प्रज्ञा, प्रतिभा, पांडित्य, पराक्रम, वक्तृत्व आणि असामान्य कर्तृत्व सर्व काही पणाला लावले.

विषयाची मर्यादा

अष्टपैलू नव्हे अष्टादश पैलूंनी संपन्न असे अलौकिक व्यक्तिमत्त्व असलेल्या स्वा. सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचा अभ्यासच या ठिकाणी प्राधान्याने अभिप्रेत आहे. कारण भारतीय राष्ट्रवादाच्या चंद्राच्या ज्या अनेक कला आहेत त्यातली एक महत्त्वाची कला म्हणजे स्वा. सावरकरांचा हिंदुराष्ट्र-वाद आहे. न्या. रानडे, चिपळूणकरांपासून तो डॉ. केतकरांपर्यंतच्या राष्ट्रवादाच्या भिन्न भिन्न विचारप्रणालींचा परिचय आपण करून घेतलेला आहे. प्रत्येकच विचारप्रणालीचे एक काही वैशिष्ट्य आहे आणि या वैशिष्ट्यामुळे त्यांचे स्वतंत्र विवेचन करून राष्ट्रवादाच्या संकीर्ण स्वरूपाचे विवेचन केलेले आहे. राष्ट्रवादाशिवाय इतर अनेक पैलूंवर स्वतंत्रपणे विवेचन करण्याइतके विविध कर्तृत्व आणि ग्रंथनिर्मिती स्वा. सावरकरांची आहे परंतु विषयाच्या दृष्टीने लेखकाने स्वत:वर मर्यादा घालून घेतली आहे. महाकवी सावरकर या स्वतंत्र विवेचनात त्यांच्या राष्ट्रीय कवितांचे विवेचन येणार असल्यामुळे आणि त्या क्षेत्रातही इतर आधुनिक मराठी राष्ट्रीय कवींच्या तुलनेत त्यांचे अलौकिकत्व असल्यामुळे त्यांना विशेष स्थान देण्यात आलेले आहे. या दुहेरी विवेचनामुळे विवेचनात पुनरुक्तीचा दोष येण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु त्याला इलाज नाही, कारण दोन्ही क्षेत्रांतील त्यांचे कार्य अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे.

स्वा. सावरकरांच्या प्रेरणांचे स्वरूप

बालपणापासूनच सावरकरांची बुद्धी ज्वालाग्राही स्वरूपाची असल्याचे दिसते. त्यांच्या ठिकाणी उपजत असणाऱ्या दैवी आणि आनुवंशिक गुणांचा विकास त्यांच्या आईवडिलांनी घडविण्याचे प्रयत्न केले. घराणे सुशिक्षित म्हणून 'केसरी', 'पुणे वैभव', 'गुराखी' या वृत्तपत्रांचे घरात नित्य वाचन चालावयाचे. त्यातील विषयांवर जाणत्या माणसांची चर्चा व्हावयाची आणि बाल विनायकाने त्यातील अक्षर नि अक्षर चौकस बुद्धीने जाणण्याचा प्रयत्न करावयाचा, स्वत: अनुकरण करावयाचे म्हणून तर वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षी 'दुर्गादास विजय' नावाचे ओवीबद्ध महाकाव्य त्यांनी लिहावयाला घेऊन त्याचे काही अध्यायही लिहिले. या काळातच आर्या, पदे, ओव्या, फटके, रचण्या इतकी त्यांची तयारी झालेली होती. निबंधलेखनकलेत त्यांनी पारितोषिके संपादन केलेली होती आणि 'जगद्धितेच्छूत' त्यांची एक कविता छापूनही आली होती. मित्र मेळाव्यासाठी पदे, पोवाडे, संवाद ते लिहू व रचू लागले होते. त्यांच्या वक्तृत्वाचे तेजही नाशिक येथील त्यांच्या शालेय जीवनातील मुक्कामात प्रकट झाले होते आणि त्या वक्तृत्वाचे पारितोषिक म्हणून काही वर्षांकरिता त्यांना 'काळ' पत्राचे अंक मिळावयाला सुरुवात झाली होती. आपल्या ठिकाणी इतरांपेक्षा विशेष कर्तृत्व आहे, असा आत्मविश्वास या कोवळ्या किशोर वयातच त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला होता. आपल्या आठवणी निवेदन करताना स्वा. सावरकर स्वत:च सांगतात, 'या काळात माझी राजकीय महत्त्वाकांक्षा सशस्त्र क्रांतीकडे झपाट्याने झुकू लागली. तिचे पाय माझ्या पोरखेळाच्या पाळण्यात स्पष्ट दिसू लागले. मुसलमानांच्या धार्मिक अत्याचारांचा आणि इंग्रजांच्या राजकीय अत्याचारांचा ते काय आहेत हे स्फुटत: कळण्यापूर्वीच ते आहेत एवढ्याच अस्फुट निश्चिततेने तीव्र तिटकारा येई आणि माझ्या बाळमित्रांसह या भावनेचे उट्टे लुटपुट्या लढाया मारून मी उगवून

घेई."[२४१] हातातल्या छडयांनी 'विलायती' नावाच्या काटेरी रोपट्यांचे पारिपत्य करण्याचे कार्य सावरकर आणि त्यांची मित्रमंडळी करीत आणि त्या विलायतेची सरसकट कत्तल केल्याचे समाधान अगदी सत्तावनच्या क्रांतियुद्धात इंग्रजांची कत्तल उडविणाऱ्या 'बंडवाल्यां' इतके उत्कटपणे आणि त्याहून कितीतरी स्वस्तास आम्हास भोगावयास सापडे. या काल्पनिक राष्ट्रीय सुडाच्या मागोमाग एक खरोखरीच राष्ट्रीय सूड उगविण्याच्या कार्यी आमच्या या बेताच्या तलवारीचे पाणी जोखण्याचा प्रसंगही लवकरच येऊन गुदरला.[२४४] १८९४, ९५ साली मुंबई इलाख्यात हिंदु-मुसलमानांच्या दंगली उसळल्या आणि सावरकरांनी गावातल्या एकुलत्या एका ओसाड मशिदीवर आपल्या बालचमूसह हल्ला चढविला...विशेष महत्त्वाची गोष्ट त्याच काळात शिव छत्रपतींच्या हल्ल्याची धुळाक्षरे आपण वळवीत आहोत ही पूर्ण जाणीव बाल सावरकरांना होती. सावरकरांचे हे अकरा बारा वर्षांचे वय आणि त्यांचे रागद्वेष त्यांच्या प्रेरणा समजावून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

चाफेकर बंधू नि रानड्यांच्या हौतात्म्यापासून घेतलेली प्रेरणा

इ. स. १८९६, ९७ मध्ये पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत बंदोबस्तासाठी असलेल्या आणि त्याप्रसंगी अत्याचार व दडपशाही करणाऱ्या रँड आणि 'आयर्स्ट' या गोऱ्या अंमलदारांच्या वधाचे वृत्त वृत्तपत्रातून वाचल्यानंतरची सावरकरांची प्रतिक्रिया मोठी उत्तेजक आहे. ते लिहितात, "असा सारा देश त्या दिशेने धुंद झाल्यासारखा झाला, मग माझ्यासारख्या स्वदेशास स्वतंत्र करण्यास आधीच तळमळू लागलेल्या आणि शिवाजीच्या आणि पौराणिक वीरांच्या रंगातच रंगून राहिलेल्या युवकाची गोष्ट काय सांगावी ?"[२४५] पुढे चाफेकर बंधू नि रानडे यांना वधाच्या अभियोगात मृत्यु-दंडाची शिक्षा झाली. त्याचा अतिशय प्रभाव अत्यंत संवेदनशील अशा त्यांच्या मनावर पडला. तेजस्वी सावरकरांचे अंतःकरण राष्ट्रभक्तीच्या जाणिवेने पेटले गेले. ते लिहितात, "त्यांच्या प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली ही शत्रुंजयवृत्ती यज्ञकुंडात समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणे असेल तर त्याचे दायित्व माझ्यापुरते मजवरही पडत नाही का ? चाफेकरांचे कार्य कुणीतरी चालविले पाहिजे ना ! तर मग ते मीच का चालवू नये. तो होम मीही का करू नये !"[२४६] आणि त्या आवेगातच अवघ्या वयाच्या पंधराव्या वर्षी स्वा. सावरकरांनी त्यांचे कुलदैवत असलेल्या घरातल्या अष्टभुजा देवीपुढे ती सुप्रसिद्ध शपथ घेतली. "यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन !!!"[२४७] ही भीष्म-प्रतिज्ञा म्हणजे वीर विनायकाची गरुडझेपच होती.

स्वा. सावरकरांची स्फूर्तिदैवते

स्वा. सावरकरांच्या मते त्या काळी भारतात ब्रिटीशनिष्ठ, स्वराज्यनिष्ठ आणि सशस्त्रक्रांति-निष्ठ असे तीन पक्ष होते. पहिल्या दोन्ही पक्षांवर इंग्रजी विद्येचा काही प्रमाणात अनुकूल तर काही प्रमाणात प्रतिकूल असा प्रभाव पडलेला होता. त्यातही ब्रिटिशनिष्ठ पक्ष तर इंग्रजांच्या राज्याला, संस्कृतीला आणि शिक्षणाला ईश्वरी समजत होता. सावरकर लिहितात, "इंग्रजी शिक्षणामुळे महाराष्ट्रातील ह्या क्रांतिनिष्ठ पक्षावर मात्र उलट परिणाम झाला. त्यांच्या इंग्रजी विद्येने ब्रिटीश-निष्ठा न रुजता ब्रिटीशद्वेष रुजला."

पुढे सावरकर म्हणतात, "तथापि हे ध्यानात ठेवले पाहिजे की, ह्या पक्षाची ही सशस्त्र क्रांतिनिष्ठा केवळ अंग्रजी शिक्षणाचे अपत्य नव्हती. अंग्रजी शिक्षण तिला अुपोद्बलक झाले अितकेच

काय ते. तिचे स्फूर्तिदैवत होते, श्रीकृष्ण, श्री शिवाजी, त्यांची भवानी तलवार, मुस्लिम पाच्छाहीला पालथी घालून हिंदुपदपादशाहीला अुभारणारा मराठ्यांचा इतिहास होता तिचा पंचम वेद. त्या काळी अगदी ताज्या असणाऱ्या सत्तावनच्या क्रांतियुद्धातील नानासाहेब, तात्या टोपे, झाशीची राणी प्रभृतींच्या वीरकथा, तेव्हा उघडपणे संकीर्तिल्या जाणे जरी इंग्रजांच्या कडक कटाक्षामुळे अशक्य होते तथापि त्या त्यांच्या कानाकानातून नि मनामनातून कुजबुजल्या जात."[२४८] भगवान श्रीकृष्ण, रक्ताने माखलेली अष्टभुजादेवी, छत्रपती शिवाजी महाराज, मराठे वीरपुरुष, सत्तावनच्या क्रांतियुद्धातील नानासाहेब, तात्या टोपे, झाशीची राणी हे योद्धे, नंतर उदयाला आलेले वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, शि. म. परांजपे आणि ज्यांच्या हौतात्म्यापासून सावरकरांनी स्फूर्ती घेतली ते चाफेकर बंधू आणि त्यांनीच भगवान म्हणून गौरविलेले इटालीचे राष्ट्रजनक देशभक्त क्रांतिकारक जोसेफ मॅझिनी ही सावरकरांची स्फूर्तिदैवते होती. आपल्या या सर्व स्फूर्तिदैवतांची ओळख स्वत: सावरकरांनीच समग्र सावरकर वाङमय व चरित्रखंड पृष्ठ १८१ वर करून दिलेली आहे. [२४९]

शि. म. परांजपे यांचे 'काळ' पत्र आणि 'केसरी' संबंधी अभिप्राय

स्वा. सावरकरांची स्फूर्तिदैवते कोणती होती यासंबंधीचा तपशील यापूर्वीचा मुद्दा मांडताना दिलेला आहे. 'काळ' पत्राचा आपल्यावरील प्रभाव स्पष्ट करताना, सावरकर लिहितात, "काळाच्या इतके सशस्त्र क्रांतीचे समर्थक आणि सूचक दुसरे कोणतेही असे पत्र त्यावेळेस नव्हते. ... ... माझ्या मनात खळबळ माजवून राहिलेल्या भावनेस केसरीहूनही अधिक साहसाने व्यक्तविणाऱ्या त्या 'काळा' विषयी मला फार कृतज्ञता वाटू लागली— त्या वेळेपासून 'काळा' चा लेख असा मी केव्हाही वाचल्यावाचून राहिलो नाही. [२५०] पुढे सावरकर म्हणतात, ··· ··· जर मला माझ्या क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचे गुरुपद कोणास तरी देणेच असेल तर ते मी 'काळा'सच देऊ शकेन, पण ते केवळ क्रांतिकारकांच्या जीवनाच्या स्फूर्तीचे, कृतीचे नव्हे ! कारण क्रांतिकारक संघटनेत आणि लढ्यातील कृतीत मीच माझा गुरु होतो." [२५१] असे आत्मविश्वासयुक्त उद्‌गार स्वत:संबंधी सावरकरांनी काढलेले आहेत.

'केसरी' च्या प्रभावासंबंधी सांगताना सावरकर म्हणतात, "क्रांतिकारकधोरणाची गोष्ट वगळली असता 'काळा' इतकीच नव्हे तर काळाहूनही अनेक पटींनी अधिक अशी 'केसरी' वरही माझी आबाल्य भक्ती होती. काळाप्रमाणेच केसरीच्याही अनेक लेखांची मी परायणे करीत आलो. उभ्या महाराष्ट्राची आणि अंशत: हिंदुस्थानची देखील राजकीय घडण ज्या केसरीने घडविली त्याच्या लिखाणाचा माझ्या घडणीतही अंश नसणे केवळ अशक्य होते." काळकर्त्या परांजप्यांप्रमाणेच लोकमान्यांसंबंधी स्वा. सावरकरांच्या अंत:करणात कमालीची कृतज्ञता होती. आपल्या अंत:करणातील लोकमान्यांसंबंधीच्या भावना व विचार व्यक्त करताना ते सांगतात, "लोकमान्यांच्या अत्यन्त कृतज्ञ आणि अत्यन्त निष्ठावंत अनुयायांहूनही मी कृतज्ञ आणि निष्ठावंत होतो आणि राहिलो याचे हेच निरुत्तर प्रत्युत्तर आहे की मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी लोकमान्यांचे सर्व राजकारण आणि उपदेश आचरण्याची पराकाष्ठा करून त्यांच्या कार्यक्षेत्राच्या पुढच्या प्रत्यक्ष रणक्षेत्रात उतरण्याची हाव धरली आणि धाव घेतली."

लखलखत्या तेजस्वी खड्गाची वज्रप्रायमूठ म्हणजे लोकमान्य

लोकमान्यांचा "गणेशोत्सव, शिवोत्सव, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, सभा, परिषदा या सर्व अनेकमुखी आंदोलनांच्या कार्यक्षेत्रातील जे इंगित तेच आम्ही त्यांनी न सांगताही ओळखून त्या सर्वांचे

अपरिहार्य पर्यवसान ज्यात व्हावयाचेच हे लोकमान्यच काय ते जाणत होते, त्या रणक्षेत्रात आम्ही अचानक उतरणे, हेच त्यांच्या निष्ठावंत अनुयायित्वाचे आमचे प्रमाणपत्र."[३५२] ··· पुढे सावरकर लिहितात, " त्यांच्या दिखाऊ ध्येयांचा सुराज्य–होमरुल–स्वराज्य या पायऱ्या चढत आम्ही त्यांच्या मनोमय खऱ्या उद्दिष्टाच्या, स्वातंत्र्याच्या, ध्येयाची पायरी चढलो. ते जे मनात बोलत, ते आम्ही गर्जलो, ते जेथे थांबत तेथून आम्ही पुढे सरू. ते नेते ते राष्ट्राच्या एक पाऊल पुढे असत. पण त्यांना त्या पुढची पावले निर्बंधपणे टाकता यावी म्हणून आम्ही त्यांच्याही पुढे शंभर पावले जाऊन झुंजून आमच्या राष्ट्राच्या सशस्त्र दळभाराचा मार्ग, निष्कंटक करण्याचे ' Sappers and Miners ' चे ' पुरस्सर पथकाचे ' यत्न केले. ' ··· ते खड्गाची मूठ होते. आम्ही क्रांतिकारक त्यांचे पाते होतो. खड्गाची मूठ जरी पाते होऊ शकत नाही, तरी पण पाते हे मुठीच्याच आधारावर रणकंदनी लवलवते. पाते मुठीच्याच मनोगताचे पारणे फेडीत असते." [३५३] स्वा. सावरकरांच्या घडणीत कोणते घटक प्रभावी होते हे जाणून घेण्याच्या दृष्टीनेच स्वत: सावरकरांनी केलेले, काहीसे दीर्घ वाटणारे निवेदन दिलेले आहे.

स्वातंत्र्य हे साध्य, सशस्त्र क्रांती हेच साधन

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्यांच्याकडून प्रेरणा घेतली होती त्या त्या महापुरुषांच्या जीवन-प्रकाशात त्यांना त्यांच्या साध्याचाही साक्षात्कार झालेला होता. त्यांनी आपले जीवनध्येय निश्चित केले होते आणि कार्यालाही आरंभ केला होता. त्यासंबंधी भूमिका स्पष्ट करताना ते सांगतात, " कोणत्या तरी अत्युच्च, अतिभव्य, अतिदिव्य ध्येयास त्याभोवती त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या दृष्टीसमोर धरल्यावाचून लोकांची मने आकृष्ट होणार नाहीत. ··· ··· महान ध्येयाच्या प्रेमाने उन्मत्त झाल्यावाचून ते उसळून उठावयाचे नाहीत. स्वदेश-स्वातंत्र्य हाच आमचा राजकीय धर्म. ते देशस्वातंत्र्य हीच आमची राष्ट्रीय देवता. आमचा राजकीय देव, आमची ऐहिक उन्नती, आमचा मोक्ष. नेमस्त आणि राष्ट्रीय यांना जे करवते ते करू देऊन त्या त्यांच्या देशकार्याविषयी त्यांचे आभार मानून त्यांना जे करवत नाही ते आपण केले पाहिजे, निर्घोषिले पाहिजे. अर्थात स्वातंत्र्य हेच साध्य, सशस्त्र क्रांती हेच साधन." [३५४]

स्वा. सावरकरांची राष्ट्रराज्याची कल्पना

ज्या समाजाचे, स्वदेशाचे आणि राष्ट्राचे दास्यविमोचन आणि संवर्धनाचे कार्य एक सशस्त्र क्रांतिकारक नेता या नात्याने सावरकरांना राजकारण करावयाचे होते त्या समाजाचे, त्या राष्ट्राचे स्वरूप त्यांच्या दृष्टीने भिन्न भिन्न काळी कसे होते हे ते जाणत होते पण त्यांना उघडपणे बोलता येत नव्हते.

स्वा. सावरकरांच्या इंग्लंडमध्ये लिहिल्या गेलेल्या ' अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर ' या ग्रंथाचा अभ्यास केला असता प्रारंभी तरी सावरकरांची काँग्रेससारखीच भूमिका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण इंग्लंडात शिक्षण घेत असलेले काही मुसलमान तरुण क्रांतिकारक सावरकरांचे सहकारी व मित्र होते. त्यात सय्यद रेझा हे प्रमुख होते. पुढे पुढे त्यांच्याशी सावरकरांचे संबंध तुटक होत गेले. त्याला भारतातील मुसलमानांच्या चळवळी, १९०६ मधील ' मुस्लीम लीग ' या संस्थेची स्थापना आणि इतर परिस्थिती कितपत कारणीभूत झाली यासंबंधी निश्चित अनुमान करता येत नाही. मात्र स्वा. सावरकरांच्या मुसलमानांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात क्रांतिकारक बदल

घडून आला असे म्हणता येते. तो दृष्टिकोन बदलल्यावरोबर मुसलमानांच्या सहकार्याची स्वातंत्र्याच्या लढ्यात अपेक्षा करणाऱ्या आणि त्यासाठी त्यांची मनधरणी करणाऱ्या काँग्रेसकडे वघण्याचा त्यांचा दृष्टिकोनही बदलला असल्यास आश्चर्य नाही. काँग्रेससंबंधी आपले विचार मांडताना ते म्हणतात, " मात्र त्यांनी आपल्यासमोर जे ध्येय ठेवले ते केवळ भौगोलिक राष्ट्रवादाचे (Geographical Nationality), एका भूप्रदेशात किंवा देशात जे राहतात ते लोक धर्मजातिनिरपेक्ष एक राष्ट्र असतात किंवा असले पाहिजेत. युरोपातील फ्रान्सप्रभृती काही देशांच्या आणि विशेषतः ब्रिटनच्या त्या वेळच्या एकराष्ट्रीय स्वरूपावरून देखोदेखी काँग्रेस निर्मात्यांनी राष्ट्राची ही भौगोलिक व्याख्या उचलली आहे."[२५५]

राष्ट्रैक्याची परिणती राज्यैक्यात व्हावी ही प्राचीन काळापासूनची भारतीयांची महत्त्वाकांक्षा

भारत हे एक प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले राष्ट्र आहे, किंवहुना राष्ट्रैक्याची भावना शतकानुशतके या देशाच्या रक्तात मुरलेली आहे असे स्वा. सावरकरांचे प्रांजळ मत आहे. त्यामुळे काँग्रेसने केलेली राष्ट्राची भौगोलिक घटकाला प्राधान्य देणारी व्याख्या सावरकरांना मान्य नसल्याचे दिसते.

सावरकर राष्ट्र आणि राज्यासंबंधी म्हणतात,

" युगानुयुगाच्या भौगोलिक, ऐतिहासिक, धार्मिक नि सांस्कृतिक अशा प्रिय नि आमच्या कोटी कोटी देशबांधवांच्या हिंदुजगतात राष्ट्रैक्याची भावना सहस्रावधी वर्षांपासून रक्तात मुरत आलेली आहे. हे हिंदुजगत ह्या आसेतु हिमाचल भारतभूमीला आपली पितृभूमी, आपली पुण्यभू म्हणून पूजित आले आहे." पुरातन राष्ट्रैक्याची व्याख्या ते पुढीलप्रमाणे सांगतात.

' उत्तरस्यां समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम्
तद्वर्षं भारतं नाम भारती यत्र संततिः '

ही आमची राष्ट्रैक्याची व्याख्या आर्ष आहे, इंग्रजी नव्हे " [२५६] असे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

प्राचीन भारतीयांची आकांक्षा सांगताना सावरकर म्हणतात, " आपल्या ह्या राष्ट्रैक्याची परिणती राज्यैक्यात व्हावी, हे आपले भारतीय राष्ट्र एकछत्री व्हावे अशी महत्त्वाकांक्षा ही प्राचीन काळापासून आमच्या राष्ट्रीय हृदयात सळसळत आलेली आहे. तिच्या प्रेरणेने अखिल भारतखंडावर एकछत्री राज्यसत्ता प्रस्थापून त्याचे राज्यैक्यही साधण्याचे भगीरथ प्रयत्न प्राचीन काळापासून आमची दिग्विजयी सैन्ये नि राजमंडले करीत आली. साम्राज्य संस्था, चक्रवर्तित्व संस्था, राजसूयाश्वमेधादिक यज्ञप्रथा ह्या त्या प्रयत्नाच्याच द्योतक होत. आमच्या इतिहासाची अलीकडची पाने चाळली तरी सुद्धा हेच आढळेल की मुसलमानी पादशाहीस उलथवून पाडून आसिंधुसिंधु हिंदुस्थानात हिंदुपदपादशाही स्थापण्याची प्रबुद्ध महत्त्वाकांक्षा धरून महाराष्ट्रीय पराक्रमाने ते ध्येय मराठीतही आणले होते."[२५७]

हिन्दुराष्ट्र की हिंदी राष्ट्र ?

अखिल भारतीय राष्ट्रसभेचे नाव ऐकताच राष्ट्रैक्याची भावना स्वाभाविकपणे हिंदूंच्या अंतःकरणात निर्माण होत असे. आपल्या मातृभूमीची निष्ठापूर्वक सेवा करणे हे आपले ध्येय आहे असे समजून वहुसंख्य हिंदुपुढारी राष्ट्रीय सभेचे सभासद झाले. त्यातल्या काहींनी हिंदुमुसलमानांचे भारत हे सामुदायिक राष्ट्र आहे अशी भूमिका घेतली व हिंदू हे जातिवाचक नाम समजून व्यापक अर्थाचे

व भौगोलिक राष्ट्रवादाचे निदर्शक असे 'हिंदी राष्ट्र' हे नाव दिले. परंतु हिंदुपुढारी 'या या' म्हणून विनवणी करीत असतानाही या देशातील मुसलमान बांधव हिंदूच्या भावनेने राष्ट्रीय सभेत आले नाहीत. स्वा. सावरकर म्हणतात, "हिंदु मुसलमानांचे सामायिक हिंदीराष्ट्र हे जे काँग्रेसचे ध्येय होते तेच मुळी चुकीचे होते. ते मुसलमानांच्या धर्मनिष्ठेचा नि ऐतिहासिक परंपरेचा उपमर्द करणारे होते. मुसलमानांच्या धर्मशासनाप्रमाणे हिंदुमुसलमानांचे सामायिक 'राज्य' हे वाक्यच मुळी अधर्म्य, पापी, त्याच्या मते जे निर्भेळ मुस्लिम राज्य तेच काय ते धर्म्य, त्यांच्या 'शरियत'ला (शास्त्राला) धरून..."[३५८]

म्हणूनच मुसलमानांनी आपली वेगळी संघटना निर्माण केली. अलिगड शिक्षण संस्थेचा हिंदुद्वेष्टचा मुस्लिम राजनीतीचे केन्द्र असलेल्या अलिगड विद्यापीठाचा पाया घातल्या गेला. भारतीय परंपरेच्या प्राचीन प्रवाहापासून मुसलमानांना वेगळे करण्याचे कार्य धूर्त ब्रिटीश राज्यकर्त्यांनीही आपली सत्ता टिकविण्यासाठी केले. आम्ही या देशाचे भूतपूर्व राज्यकर्ते आहोत, या देशात बहुसंख्य हिंदू असल्याने पुढे मागे त्यांच्या हातात सत्ता आली तर ते हिंदूंचे राज्य होईल, मग आमचे राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक हितसंबंध जोपासले जाणार नाहीत आणि ते जोपासणे म्हणजेच आपले मुसलमान म्हणून वेगळे अस्तित्व कायम ठेवणे आवश्यक हेच विचार बहुसंख्य मुसलमान पुढाऱ्यांनी विभक्त होण्याचे समर्थन करताना प्रकट केलेले आहेत. आपले वेगळे हितसंबंध जोपासण्याच्या मुसलमानांच्या फुटीर वृत्तीला खतपाणी देण्याचे कार्य राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांनी केले असा सावरकरांचा आक्षेप आहे.

हिंदुराष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमी

एकोणिसाव्या शतकाच्या दशकापासून तो विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत काँग्रेसच्या नेत्यांची अशी दृढ कल्पना झाली होती की भारताचे स्वातंत्र्य संपादन करावयाचे असेल आणि भारतीयांचे सर्वांगीण संवर्धन करावयाचे असेल तर त्याकरिता मुसलमान बांधवांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता आहे. किंबहुना त्यांच्या सहकार्याशिवाय ही दोन्ही ध्येये सफल होणार नाहीत अशी त्यांची धारणा होती. या ध्येयाच्या पूर्ततेसाठीच त्यांचे सहकार्य आणि ऐक्य संपादन करण्याच्या हेतूनेच मुसलमानांना आर्जवपूर्वक आवाहन करण्याचे या राष्ट्रीय पुढाऱ्यांचे प्रयत्न सुरू झाले. आधीच त्यांचा संप्रदाय कडवा, हेकेखोर, आक्रमक आणि काहीसा धर्मांध, त्यात त्यांना भारतीय राजकारणात आलेले महत्त्व. त्यामुळे ते शिरजोर होण्याला मदतच झाली. बहुसंख्याक हिंदूंच्या तुलनेत ते अल्पसंख्य आणि अल्पसंख्य म्हणून अधिक संघटित, परंपराप्रिय म्हणून असहिष्णू.

त्यातही ब्रिटीश सरकारचे पक्षपाती धोरण होते. कारण आगळीक मुसलमानांनी केलेली आहे ही वस्तुस्थिती असताना त्यांची सहानुभूती अल्पसंख्य म्हणून मुसलमानांकडेच असावयाची. त्यांनी मुसलमानांनाच प्रत्येकवेळी संरक्षण द्यावयाचे आणि निरपराध हिंदूंना पकडून शिक्षा करावयाची. हा अन्याय हिंदूंनी अनेक वर्षे सहन केला. कारण त्यांना काँग्रेसच्या ध्येयाप्रमाणे या बांधवांचे स्वातंत्र्याच्या लढ्यात सहकार्य हवे होते. परंतु त्याचा परिणाम उलट झाला आणि आततायी, अशिक्षित, आक्रमक आणि शिरजोर मुसलमानांनी अहमदाबाद, मुंबई, दिल्ली, लाटखाना, मलबार, कोहाट, आदी ठिकाणी अनेक दंगली घडवून आणल्या. हजारोंचे बळी गेले. कोट्यवधी रुपयांची संपत्ती नष्ट झाली. लक्षावधी लोक बेघर झाले आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात हे लोक आपल्याला सहकार्य करणार नाहीत असे काँग्रेसमधील हिंदुनेत्यांना वाटू लागले.

सावरकरांची हिंदुमुस्लीम ऐक्यासंबंधीची भूमिका

स्वा. सावरकरांनी हिंदुमुस्लीम ऐक्याच्या प्रश्नाचे ऐतिहासिक भूमिकेतून प्राधान्याने चिंतन केले. त्यांच्यापुढे या जमातीचा आक्रमक शेकडो वर्षांचा इतिहास होता. अल्लाउद्दीन खिलजीपासून तो मोगल घराण्यांची परंपरा त्यांना माहीत होती. त्यांच्या ठिकाणी परधर्मसहिष्णुतेचा अभाव आहे, या देशात आपण राज्यकर्ते म्हणून वावरले आहोत, आपण जेते आणि हे जित आहेत असा अहंकार आहे. सांस्कृतिक दृष्टचा हिंदूंत व आपल्यात अंतर आहे. आपण पराक्रमी आहोत, हे मुसलमान-जमातीचे विशेष सावरकरांनी जाणलेले होते. मानवी इतिहास, निसर्गनियम आणि राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक अनुभव या सर्व घटकांचा सावरकरांनी 'हिंदुमुस्लीम ऐक्याचा प्रश्न' सोडविताना विचार केला, सखोल चिंतन केले आणि शेवटी हिंदुसंघटनेनेच देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटू शकेल, या देशाचा सर्वांगीण विकासही या संघटनशक्तीच्याद्वारेच होऊ शकेल अशी भूमिका मांडणारा आणि या भूमीशी एकनिष्ठ राहणाऱ्या व तिला पुण्यभू मानणाऱ्या सर्वांना सामावून घेणारा स्वा. सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद उदयाला आला. ही हिंदुराष्ट्रवादाची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच त्याचे मूल्यमापन केले पाहिजे.

हिंदुराष्ट्रवादाच्या पुरस्काराचा हेतू

आपल्या देशाचे स्वातंत्र्य आणि त्याची उन्नती आपल्या देशातील बहुसंख्य हिंदूंच्या बळावर आपण करू शकतो. त्याकरिता कुणाच्या मदतीची अपेक्षा करण्याची आवश्यकता नाही असे स्वा. सावरकरांचे विचारांती मत झालेले होते. १८८५ पासून १९२० पर्यंत आणि नंतरही आपल्या जनमान्य पुढाऱ्यांनी हिंदुमुसलमानांचे ऐक्य साधण्यासंबंधीचे प्रयत्न केले आणि ते वऱ्याच प्रमाणात वाया गेले. हे ऐतिहासिक सत्य सावरकरांनी ओळखले होते. स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास, हालअपेष्टा आणि प्रसंगी हौतात्म्य स्वीकारून सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध असणारे लोक प्राधान्याने हिंदू आहेत हे त्यांना दिसून आले होते.

या लोकांनीच इतक्या प्रकारे त्याग आणि बलिदान करण्याचे प्रयोजन काय ? या प्रश्नाचे उत्तर सावरकरांनी शोधले होते. स्वतःचे स्वत्व, स्वाभिमान आणि अस्तित्व कायम राखण्यासाठीच हिंदूंनी या देशात हजारो वर्षे लढा दिल्याचे त्यांना उमगले होते. जिथे हिंदूंचे स्वत्व, स्वाभिमान आणि अस्मिता कायम राहील असा जगात हिंदुस्थान हाच आमचा देश आहे ही जाणीव हिंदुजातीला होती. म्हणून हिंदुसमाज हा महान राष्ट्र म्हणून संघटित झाला, जागृत झाला, स्वावलंबी बनला तर दुर्घट वाटणारे स्वराज्यप्राप्तीचे कार्य केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर तो पार पाडू शकेल, अशी कार्ये अनेकदा या देशातील चंद्रगुप्त मौर्य, यशोवर्मन, शालिवाहन, श्री शिवाजी या महान वीरांनी पार पाडलेली आहेत अशी स्वा. सावरकरांची धारणा होती. " या देशात हिंदुराष्ट्र म्हणून जगणारी हिंदू ही महान जाती आहे. या राष्ट्रजाती गंगेचा मुख्य प्रवाह असून इतर प्रवाह गौण आहेत."

पुढे सावरकर म्हणतात, " आम्हाला कुणावर आक्रमण करण्यासाठी किंवा दहशत घालण्यासाठी हिंदुसंघटना करावयाची नसून ती राष्ट्राच्या हितरक्षणासाठी, हितसंवर्धनासाठी करावयाची आहे. त्यासाठी शीघ्रातिशीघ्र अधिकात अधिक सैनिक भरती केले पाहिजे आणि ते हिंदुजातीच्या लोकांचे, स्वातंत्र्यवीरांचे असले पाहिजे. प्रचंड जागृती करून ही संघटना निर्माण केली पाहिजे. या हिंदुसंघटनेचे स्वराज्य हे ध्येय, प्रगती हे साध्य आणि हिंदुराष्ट्रावर अधिष्ठित संघटना हे साधन

आहे." [२५९] हाताशी असेल त्या साधनाद्वारे, किंवहुना कित्येकदा स्वतःच्या बलाबलाचा विचार न करता पुरस्सर पथकातील सैनिकांच्या भूमिकेतून तत्कालीन पुढाऱ्यांच्या शंभर पावले पुढे धावणारे सावरकर स्वातंत्र्याच्या लढ्यात मुसलमान बांधवांचे सहकार्य मिळविण्याकरिता आवाहन करू शकले असते. परंतु मुसलमानांच्या प्रवृत्तीचा व वर्तनाचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून त्यांनी अभ्यास केला होता. केवळ या देशात त्यांनी जन्म घेतला किंवा निवास केला एवढ्याचसाठी त्यांची निष्ठा या भूमीशी एकरूप होऊ शकेल असे सावरकरांना इतर हिंदुपुढाऱ्यांसारखे वाटत नव्हते. म्हणूनच केवळ हिंदूची संघटना करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते. ते म्हणतात, "हिंदूंच्या स्वत्वाचे रक्षण, हिंदूच्या स्वत्वावरील आक्रमणाला विरोध करणे, विघटित, विस्कळीत हिंदुसमाजाला शक्य होत नाही हा इतिहासाचा दाखला आहे. आणि म्हणून हिंदुसमाज समर्थ बनविण्यासाठी, हिंदूंची संघटना उभारण्याची आवश्यकता आहे. इतर समाजांप्रमाणेच आपले न्याय्य हक्क उपभोगता यावेत म्हणून हिंदुसमाजाने संघटित झालेच पाहिजे." [२६०]

प्रत्येक संप्रदायाला आपल्या धर्ममतांचा प्रसार करण्याची लोकशाहीची कल्पना सावरकरांना मान्य होती. परंतु मुसलमानी प्रचाराचा दोष सांगताना सावरकर सांगतात, " ते हा प्रचार गुंडगिरी, घातपात, नीचता, कत्तली, बलात्कार अशा राक्षसी साधनांनीही करावयास कधी कधी कचरत नाहीत. पूर्वी ख्रिस्तीप्रचारही केव्हा केव्हा असाच होई." [२६१] हिंदुसंघटनेच्या कार्याचाच एक भाग म्हणून बळजबरीने बाटविलेल्या आणि स्वेच्छेने हिंदुधर्मात येणाऱ्यांची विधिवत शुद्धी करून घेणे त्यांनी सुरू केले होते.

हिंदुसमाज संघटित, सामर्थ्यवान, आत्मप्रत्ययपूर्ण झाला की मग त्याच्यावर कुणालाही आक्रमण करण्याचे धैर्य होणार नाही. शुद्धीने न्याय मिळेल अशीच सावरकरांची भूमिका होती. त्यांच्या परधर्मीयांचा विरोध द्वेषावर किंवा तिरस्कारावर आधारलेला नव्हता, परंतु त्यांच्या हिंदुसंघटनेचे ध्येय नकारात्मक आहे असाच काँग्रेसमधील पुढाऱ्यांनी प्रचार केला. उलट सावरकर म्हणत, " मुसलमान बंधूंचा, ख्रिश्चन बंधूंचा किंवा मनुष्य जातीतील कोणत्याही रानटीतल्या रानटी जातीचा देखील आम्ही द्वेष तर काय पण तिरस्कार देखील करीत नाही. त्यातील ज्या व्यक्तींची, व्यक्तिसंघाची अत्याचारी प्रवृत्ती दृष्टीस पडते तिच्या त्या प्रवृत्तीपुरता त्यांचा प्रतिरोध करतो. कारण आमची अशी आशा आहे, निश्चिती आहे की या शुद्धीच्या रूढीनेच हिंदुमुसलमानांच्या शाश्वत आणि लाभदायक ऐक्यास भरभक्कम साहाय्य मिळणार आहे." [२६२]

सावरकरांनी सांगितलेली हिंदुराष्ट्राची लक्षणे

आधुनिक अर्थाने राष्ट्रस्वरूप स्पष्ट करताना राष्ट्रवादी विद्वानांनी जी सर्वसाधारण लक्षणे सांगितलेली आहेत ती हिंदुस्थानला लागू पडणारी आहेत. एकदेश, एकजाती, एकधर्म, एकसंस्कृती आणि एकभाषा ही राष्ट्रीयत्वाची प्रधान लक्षणे आहेत. सावरकर म्हणतात, " थेट ऋग्वेदकाळापासूनच आपल्या या राष्ट्राला सप्तसिंधूचा देश म्हणून परकीय लोक संबोधित असत. सप्तऐवजी हप्त असा उच्चार परकीय लोक करीत असत. तसेच सिंधूचा हिंदू असा उच्चार करीत तेव्हा सप्तसिंधूचा देश तोच आपला हिंदुदेश हिंदुस्थान. तेव्हा हिंदू हे आपले राष्ट्रीय अभिधान आहे. आपले राष्ट्रीय पूर्वज हजारो वर्षांपासून या भूमीत वसाहत करीत आहेत म्हणून ती आपली पितृभूमी आहे. इंग्रजीत या अर्थाचा Father–land असा शब्द आहे. ...धर्मसंस्थापक, ऋषी, अवतार वा प्रेषित

(पैगंबर) जन्माला आले आणि त्या धर्माचा संदेश सांगून गेले. त्यांचे पुण्यपावन निवासस्थान म्हणजे पुण्यभू–' Holyland ' अशी ही आपली पुण्यभू आहे."

स्थिर समर्थ राष्ट्रीयत्वाला प्रथम एक देश, एक क्षेत्र आवश्यक असते. इतर देशाने हेवा करावा अशी नैसर्गिकदृष्ट्या संरक्षणपूर्ण, वैभवसंपन्न विपुल भूमी प्राप्त झालेली असून तिच्यावर प्रेम करणे हे आपल्या पूर्वजांनी धार्मिक कर्तव्य सांगितले आहे... " आपल्या राष्ट्रीय ऐक्याच्या व महनीयतेच्या सुप्त शक्तींना उत्थित करण्यास अधिकच समर्थ ही हिंदुजाती आहे."... हिंदुराष्ट्र-जातींप्रमाणेच आपली हिंदुसंस्कृती जगाने हेवा करावा इतकी महान आहे... " आमचा हिंदूंचा इतिहास हा भिकारडचा शतकांच्या मापाने मोजला जात नाही, एक तर तेथे युगांची आणि कल्पांची मापे वापरावी लागतात." [२१३]

सर्वांचे एक धर्मलक्षण सांगताना सावरकर म्हणतात, " अद्वैती, एकेश्वरवादी, जगदीश्वरवादी, निरीश्वरवादी कुणीही असो तो हिंदू आहे असेच वैदिक, सनातनी, जैन, बुद्ध, शिख किंवा देवसमाजी या सर्व प्रकारच्या धर्ममतांची एकवाक्यता करुन जी काही निर्णायक सत्य तत्त्वे निघाली त्या सत्य तत्त्वांचे सत्य तत्त्वच म्हणजे हा हिंदुधर्म होय. जी जी धर्ममते व धर्मपंथ ' सप्तसिंधू ' म्हणून गाजलेल्या पुण्यभूमीत आणि वैदिककाळामध्ये हिंदुस्थानच्या इतर भागांतील अज्ञात असलेल्या इतर जातीत उत्पन्न झाली व जी वैदिक अथवा अवैदिक परंपरेपासून प्रत्यक्ष उत्पन्न होऊन फैलावत गेली, असली प्रत्येक धर्ममते आणि असले प्रत्येक धर्मपंथ ही हिंदुधर्मात समाविष्ट होतात व त्याचा प्राणभूत भाग बनतात." [२१४] ' हिंदू 'चा आशय अगदी प्राचीन म्हणजे अश्मयुगाशी जुळवून आर्यां-बरोबरच कोलेरिअन किंवा द्रविडियन यांनाही त्यांनी हिंदू हीच संज्ञा दिली आणि या देशातील वनवासी अशा, संतान, कोळी, भिल्ल, पंचम, नामशूद्र आणि इतर अशाच जातींना हिंदूच म्हटले आहे. कारण या सर्वांची ही पुण्यभूमी असून मातृभूमीही आहे.

अन्य देशबांधवांसंबंधी सावरकरांचा दृष्टिकोन

' हिंदू ' शब्दाचा अर्थ विशद करताना सावरकरांनी भारतभूला ज्यांनी ' पुण्यभू ' म्हणून मान्यता दिलेली नाही अशा मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, ज्यू इत्यादी जातींचा समावेश केलेला नाही. मात्र या जातींसंबंधीचे सावरकरांचे धोरण अनुदार नाही. सावरकर म्हणतात, " जे केवळ अत्याचाराने व जबरदस्तीने आमच्या पूर्वजांच्या संसारातून हिसडून नेले गेले, अशा सर्व बंधूंनो ! तुम्ही फक्त अनन्यतेने आपल्या भूमातेवर प्रेम करा व ती केवळ ' पितृभू ' आहे इतकेच न मानता ती ' पुण्यभू 'ही आहे असे माना म्हणजे ' हिंदुसंस्कृती 'च्या कक्षेत अत्यंत प्रेमाने तुमचे स्वागत होईल."[२१५] या देशातील मुसलमान आणि ख्रिस्ती संप्रदायाचे लोक मूळचे अरब किंवा युरोपीय नसून ते हिंदूच होते. धर्मांतराने त्यांचा या नव्या जातीत समावेश झाला. त्यामुळे त्यांच्या निष्ठा जर भारतात असतील तर ते हिंदू या संस्कृतीतच समाविष्ट होतात असे सावरकरांचे प्रांजल मत आहे.

त्यांनी म्हटलेच आहे, " आमचे जे देशबंधू व पुराणकाळचे भाऊबंद असे बोहरी, खोजे, मेमन वा इतर मुसलमान आणि ख्रिस्ती लोक यांना वरील एकमार्ग मोकळा आहे. परंतु हा मार्ग त्यांनी स्वखुशीने व प्रेमाने अंगीकारला पाहिजे परंतु जोपर्यंत त्यांचे मन या मार्गाकडे वेधले जात नाही तोपर्यंत मात्र त्यांना हिंदू म्हणता येत नाही.[२१६] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ' पुण्यभू ' व ' पितृभू ' दोन्ही मानणारे सर्वच या देशाचे राष्ट्रीय नागरिक आहेत असेच सावरकरांचे स्पष्ट मत आहे.

सावरकरांची हिंदुत्वाची व्याख्या

"तो मनुष्य हिंदू होय की, जो सिंधुनदीपासून तो समुद्रापर्यंत पसरलेल्या देशाला आपली 'पितृभू' मानतो. जी जाती सारखे आक्रमण करीत करीत व विस्तार पावत पावत जे जे अंतर्भूत झाले ते ते पचवीत आणि जे जे पचविले, त्याला महनीय स्वरूप देत, अखेर हिंदुजाती म्हणून जगात प्रसिद्ध झाली व ज्या जातीच्या उत्पत्तीचा धागा थेट वेदकालीन सप्तसिंधूशी जाऊन पोचतो त्या जातीचे रक्त ज्यांच्या अंगात खेळत आहे, संस्कृतभाषेत जी आविष्कृत केली गेली व जी एक इतिहास, एक वाङ्मय, एक कला, एक शिल्पशास्त्र, एक कायदा, एक धर्मशास्त्र, एक आचार आणि संस्कार, एक क्रियाकर्म आणि विधिनियम, समान उत्सव आणि समान यात्रा, यांच्या समुच्चयाने जी बनत गेली आहे, अशी या 'हिंदुजाती'ची संस्कृती जो स्वतः मानतो आणि जो सर्वांवर या भूमीला 'या सिंधुस्थानाला' आपली 'पुण्यभू' समजतो, हिच्यातच आपले तत्त्ववेत्ते आणि ऋषी, अवतार आणि धर्मगुरु उत्पन्न झाले असे मानतो व हीच माझी कारुण्यभूमी व तीर्थभूमी आहे अशी निष्ठा ठेवतो तो तो हिंदू होतो."

समान राष्ट्र, समान जाती आणि समान संस्कृती ही हिंदुत्वाची लक्षणे आहेत आणि ही सर्व लक्षणे मोजक्या शब्दांत सांगावयाची म्हणजे अशी की, ज्याला 'सिंधुस्थान' हे केवळ 'पितृभू' वाटते असे नव्हे तर 'पुण्यभू' ही वाटते तो हिंदू. हिंदुत्वाची पहिली दोन लक्षणे जी 'राष्ट्र व जाती' ही पितृभू या शब्दाने व्यक्त होतात व तिसरे अवश्य लक्षण जे 'संस्कृती' हे 'पुण्यभू' या शब्दाने विशेष करून व्यक्त होते .. ही व्याख्या याहीपेक्षा अधिक सुटसुटीत जर करावयाची असेल तर खालीलप्रमाणे एका अनुष्टुपात ती बसविता येईल :

"आसिंधु सिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः ॥"[२६७]

'हिंदू' या संज्ञेची सावरकरांना अभिप्रेत असलेली व्यापकता लक्षात घेतली म्हणजे हिंदुत्व हेच भारताचे राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रीयत्वाने युक्त अशी जी जाती किंवा समाज ज्या भूप्रदेशाच्या आश्रयाने असते, जिथे त्याचे स्वतःचे राज्यशासन असते त्यालाच राष्ट्र हे अभिधान मिळते असा सावरकरांचा राष्ट्रासंबंधीचा अर्थ आहे. इथे केवळ भौगोलिक एकता हा निकष सावरकरांनी मानलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाची पृथगात्मता

स्वा. सावरकरांनी लंडनमधील वास्तव्यातच आपले लक्ष 'हिंदुराष्ट्र' या प्रश्नावर केन्द्रित केलेले होते. त्यांचे या विषयावर वाचन, मनन आणि चिंतन आणि संशोधन सुरू असतानाच ते पूर्णत्वाला पोचण्यापूर्वीच राज्यक्रांतीच्या आरोपाखाली ते पकडले गेले आणि पुढे दोन जन्मठेपेच्या शिक्षा देऊन ब्रिटीश सरकारने त्यांची अंदमानात पाठवणी केली. तिथेही या विषयासंबंधीचे त्यांचे मनन, चिंतन चालूच होते. कारावासातच 'हिंदुत्व' या ग्रंथाची रूपरेखा त्यांनी पूर्ण केली आणि रत्नागिरीच्या बंदिशाळेत चोरूनच या ग्रंथाचे त्यांनी लेखन केले. आपल्या राष्ट्रीय ऐक्याला तडा जाऊ नये या हेतूने सावरकरांनी 'हिंदु' जाती, धर्म आणि राष्ट्र यांच्या उत्क्रांतीच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करून केवळ धर्माधिष्ठित नसलेली अशी "हिंदू" या शब्दाची सर्वांना मान्य होऊ शकणारी व्याख्या सिद्ध केली.

राष्ट्रीय ऐक्य अचूकपणे साधणारा 'हिंदुत्व' या नव्या व्यापक अर्थाचा शब्द त्यांनी प्रचारात आणला. हिंदुराष्ट्राला संजीवनी देणारे महान संशोधन त्यांनी 'हिंदुत्व' या मूळ इंग्रजीत लिहिलेल्या ग्रंथात समाविष्ट केले. "स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुरस्कारलेले 'हिंदुत्वाचे' तत्त्वज्ञान म्हणजे हिंदुराष्ट्रवादाची गीताच होय."[२१८] कारण यापूर्वी हिंदुस्थान हे सांस्कृतिकदृष्ट्या राष्ट्र आहे असे विचार विद्वान संशोधकांनी मांडले होते परंतु आधुनिक अर्थाने 'हिंदुराष्ट्राची' कल्पना राजकीय-दृष्ट्या इतक्या व्यापक दृष्टीने कुणीही मांडलेली नव्हती. ती सावरकरांनी मांडली आणि त्यामुळेच भारताला 'हिंदुराष्ट्रदर्शना'चा लाभ झाला असे म्हणता येते. सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाची हीच पृथगात्मता आहे.

सावरकरांपूर्वी 'हिंदुराष्ट्र' असा शब्दप्रयोग बंगाली देशभक्तांनी केला. इ. स. १८६६ मध्ये श्री. राजनारायण बोस यांनी हिंदुसमाजाच्या पुनरुत्थानाची आपली चैतन्यमय विचारसरणी मांडली. त्यांच्या विचारसरणीने देवेन्द्रनाथ ठाकूर आणि नवगोपाल मित्रासारखे तरुण प्रभावित झाले. पुढे १८७१ मध्ये 'नॅशनल सोसायटी'ची स्थापना केली. एका वार्षिकोत्सवात श्री. राजनारायण बोस यांचे अत्यंत प्रभावी भाषण झाले. त्यावर ख्रिस्ती आणि ब्राह्मण समाजाचे लोक खवळले. त्यांना उत्तर देताना श्री. मित्रा सांगतात, "आमच्या पत्रलेखकाने हिंदूविरुद्ध का आक्षेप घ्यावा हे आम्हाला समजत नाही. कारण हिंदू हे स्वतः राष्ट्र आहेत. तेव्हा या राष्ट्रीय समाजाने स्थापन केलेल्या संस्थेला राष्ट्रीय म्हणणे योग्य आहे." तात्पर्य, "हिंदुराष्ट्र हा शब्द इ. स. १८७१ च्या आसपास वापरण्यात आला."[२१९] (ब्रिटीश पॅरामाऊंटसी ॲन्ड इंडियन रेनेसान्स भाग २, पृ. ४७३ या ग्रंथाच्या आधारे श्री. ज. द. जोगळेकर यांनी प्रकाशित केलेला 'धर्मभास्कर' वर्षारंभ विशेषांक मे. १९८०, पृ. ७४)

अशा प्रकारे समान जीवनाची नि समान निवसनाची युगानुयुगे लोटून हिंदू हे परस्परांशी अगदी एकसंघच होऊन गेलेले आहेत. पण या सर्वांतही महत्त्वाची गोष्ट ही की एक समान पितृभू नि एक समान पुण्यभू या प्रियतम, पवित्रतम नि सर्वात चिरकालिक अशा बंधांनी हिंदू हे एकमेकांशी दुष्पट बांधले गेलेले आहेत, आणि हे दोन्हीही बंध, ती दोन्हीही अधिष्ठाने, आपली भरतभूमी–आपले हे हिंदुस्थान ह्या एकाच–एका देशाच्या ठायी एकरूपता पावत असल्यामुळे हिंदूंची राष्ट्रीय एकता नि एकजातीयता दुष्पट निश्चित ठरत आहे. ..... तर हिंदू हे त्यांच्या उच्चप्रतिष्ठेमुळेच राष्ट्र म्हणून पटावर नोंदले गेलेच पाहिजे.[२२०] हे सर्व विवेचन राज्यशास्त्राला धरून आहे म्हणूनच ते राजकीय आहे आणि नवीन आहे.

हिंदुराष्ट्रवादाचे 'गीता रहस्य' म्हणजे दे. भ. गणेश दामोदर उपाख्य बाबाराव सावरकरांची 'राष्ट्रमीमांसा'

स्वा. सावरकरांचे वडील बंधू देशभक्त ग. दा. उपाख्य बाबाराव सावरकर यांनी 'राष्ट्र-मीमांसा' आणि 'हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप' हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहून हिंदुस्थानात राष्ट्रविषयक चर्चेला १९३४ नंतर जोराने चालना दिली. १९३१ मध्ये बाबाराव सावरकर काशीला असताना त्यांनी हे पुस्तक लिहिले, परंतु त्याचे प्रकाशन मात्र १९३४ साली नाशिक येथे झाले. स्वा. सावरकरांनी पुरस्कारिलेले 'हिंदुत्वाचे' तत्त्वज्ञान म्हणजे हिंदुराष्ट्रवादाची गीता असे म्हटले तर बाबारावांच्या 'राष्ट्रमीमांसा' या राष्ट्रीयत्वासंबंधी आणि राष्ट्रवादासंबंधी साधार शास्त्रीय चर्चा करणाऱ्या

ग्रंथाला हिंदुराष्ट्रवादाचे 'गीता-रहस्य' असेच नाव द्यावे लागेल, इतके ते मूलग्राही आणि विचार-प्रवर्तक आहे विवेचन सोकर्यासाठी या ग्रंथाचे दोन भाग करण्यात आलेले असून 'राष्ट्रमीमांसा' या राष्ट्रवादासंबंधी सर्वसामान्य विवेचन करणाऱ्या भागाला पूर्वार्ध आणि 'हिंदुस्थानाचे राष्ट्रस्वरूप' निर्दिष्ट करणाऱ्या भागाला उत्तरार्ध असे संबोधण्यात आले आहे. पूर्वार्धात देश, जाती, धर्म, संस्कृती, भाषा या राष्ट्रघटकांविषयीची चिकित्सा केलेली असून, पाश्चात्य कोशकर्त्यांनी आणि पाश्चात्य राज्यशास्त्रज्ञांनी केलेल्या 'राष्ट्र' शब्दाच्या परिभाषा दिलेल्या आहेत. पाश्चात्यांच्या व्याख्यांशी भारतीयांच्या राष्ट्रविषयक कल्पनेचे तुलनात्मक विवेचन करून भारतीयांना अभिप्रेत असलेली 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्याही दिलेली आहे. अनेक युरोपीय देशांतील राष्ट्रीयत्वाची सोदाहरण चर्चा करून देश, जाती, धर्म, भाषा आणि संस्कृती या घटकांचे राष्ट्रनिर्मितीतील महत्त्वही स्पष्ट केलेले आहे. उत्तरार्ध मात्र हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप स्पष्ट करण्यात खर्च केलेला आहे.

देशभक्त बाबाराव सावरकरांची हिंदुराष्ट्राची व्याख्या

बाबाराव सावरकरांच्या राष्ट्रविषयक सखोल व्यासंगाची, स्वतंत्र बुद्धीने केलेल्या राष्ट्रीय घटकांच्या चिकित्सेची, त्यांच्या स्वयंभू प्रज्ञेची आणि पाश्चात्य आणि पौरात्य राष्ट्रवादी विचारवंतांच्या तौलनिक अभ्यासाची साक्ष देणारा हा ग्रंथ आहे. नुसत्या राष्ट्र शब्दाची व्याख्या करताना वेबस्टरच्या कोशातील 'राष्ट्र' शब्दाच्या विविध व्याख्या तर सांगितल्याच, शिवाय त्यांना उपलब्ध झालेल्या फाउलर, प्रो. होलकोंबे, बर्गस, ब्लंटली, गेटेल आदी पाश्चात्य ग्रंथकारांच्या व्याख्या त्यांनी दिलेल्या आहेत. त्यातील समान घटकांचा आधार घेऊन या सर्वांचा निष्कर्ष द्यावयाचा असल्यास सर्वांच्या म्हणण्याची सारभूत व्याख्या पुढील शब्दांनी करावी लागेल. "एक देश, भाषा, धर्म व वाङ्मय, इतिहास, परंपरा, चालीरीती, एक जातीयता, हितसंबंधाची एकता, राजकीय एकता, इत्यादी गोष्टींच्या समानतेचे बंधनाने व एकरूपतेने एक राष्ट्रीयता निर्माण होते," अशी समावेशक व्याख्या त्यांनी केली आहे. "देश, जाती, धर्म, संस्कृती व भाषा ही राष्ट्रीयतेची मुख्य पाच अंगे आहेत. ह्याच पाच घटकांपैकी कोणत्याही एका घटकाचा नाश झाला असता राष्ट्रीयता भंग पावते."[२७१] असेही या घटकांचे महत्त्व कथन केलेले आहे.

राष्ट्रधर्माची अपरिहार्यता

बाबारावांनी राष्ट्रीयतेची व्याख्या करून प्रमुख पाच अंगे सांगितली आहेत. त्याचप्रमाणे राष्ट्र-धर्माची अपरिहार्यताही प्रतिपादन केलेली आहे. 'राष्ट्र' हे समूहाचे आवश्यक असे आणि सामाजिक जीवनाला अपरिहार्य असे संघटन असून त्याचे महत्त्व परोपरीने सांगितले आहे. ते सांगताना मानवी स्वभाव, सृष्टिक्रम आणि निसर्ग यांचा सूक्ष्मपणे विचार केलेला आहे. ते लिहितात, 'मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. तो तसा का आहे याचा ऊहापोह येथे करण्याचे कारण नाही.....चोहोबाजूचे दृश्य तेच सत्य पटवीत डोळ्यापुढे सतत उभे आहे. समाजातील घटक असलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या स्वत्वाला चिकटून राहण्याचा हक्क आहे, स्वत्वसंवर्धन करण्याला स्वातंत्र्य आहे, स्वत्वावर प्रेम असणे स्वाभाविक आहे परंतु तो घटक, तो मनुष्य, आपल्या सामान्य स्वत्वावरील प्रेमासाठी दुसऱ्याच्या स्वत्वाचे अतिक्रमण करू लागला, दुसऱ्याच्या स्वत्वाला हानी पोहचवू लागला, दुसऱ्याचे स्वत्व छिनावून घेण्यास प्रवृत्त झाला तर मात्र समाजस्थैर्याच्या अनुल्लंघनीय मर्यादा फोडून तो जात आहे असे समजून त्याच्या अपराधाच्या, कमी अधिक अपराधाच्या स्वरूपाप्रमाणे तो सामान्य दंडापासून

तो वधदंडापर्यंत पात्र ठरू शकतो. तोच न्याय व तीच मर्यादा समाजा–समाजाच्या परस्पर व्यवहाराला-सुद्धा लावली पाहिजे. हे जगामध्ये सर्वमान्य असलेले तत्त्व आहे." [२७२]

राष्ट्रधर्माची अपरिहार्यता

स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याच्या वस्तूचे अपहरण करणारा माणूस स्वतःच्या अन्यायी कृत्यावर सोयीस्करपणे पांघरूण घालतो तोच प्रकार एका समाजाने दुसऱ्या समाजावर केलेल्या आक्रमणाच्या संदर्भातही घडताना दिसतो. हे सांगताना बाबाराव म्हणतात, " जगामध्ये एका धर्ममताचे लोक दुसऱ्या धर्ममतावर, एका जातीचे लोक दुसऱ्या जातीवर, एका देशातील लोक दुसऱ्या देशातील लोकांवर, जेव्हा आक्रमणे करतात तेव्हा त्याला परस्वापहाराचे नाव कधीही देत नाहीत."

बाबाराव पुढे सांगतात, " व्यक्तीव्यक्तीच्या कलहात प्रत्येक देशातील राज्यतंत्रे, न्यायालये स्थापून तत्रस्थ अपराधदंडणाची व्यवस्था करीत आहेत. पण जातीजातीच्या वा राष्ट्राराष्ट्राच्या कलहात सर्व जगावर स्वामित्व गाजवणारे व सर्व जगाकरता न्यायालय स्थापून व निरपेक्षपणे न्याय निवडून अन्यायासाठी अपराध्याला दंडित करणारे जगन्नियामक राज्यतंत्र निर्माण झाले नाही. कधीही निर्माण होणे शक्य नाही. अशी स्थिती आहे म्हणून प्रत्येक जातीने वा राष्ट्राने आपणावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यास स्वतःच शस्त्रहस्त, सावधान व तत्पर राहिले पाहिजे, त्यावाचून गत्यंतर नाही." [२७३] असे सांगून राष्ट्रधर्माची अपरिहार्यता सिद्ध केलेली आहे.

बाबाराव सावरकरांची हिंदुराष्ट्राची संकल्पना

" असा हा सार्वभौम जगद्गुरू हिंदुधर्म त्या अभ्युदय निःश्रेयसरूपी धर्माने–अर्धनारी नटेश्वराने निर्माण केलेली दिव्य हिंदुसंस्कृती. सर्व जगाला बोलावयाला शिकविणारी व मानवी विचार–विवेकाच्या ऐहिक–पारमार्थिक क्षेत्रातील विस्तृतातील विस्तृत व उच्चातिउच्च क्षेत्रसंचाराला शब्द–सामर्थ्य देणारी ही संस्कृतभाषा व तोपासूनच उत्पन्न झाल्यामुळे तेच सामर्थ्य असण्याचा गर्व वाहू शकणाऱ्या सर्व हिंदुभाषा या अद्वितीय धर्म–संस्कृती, भाषेच्या दैवीवरांनी वरान्वित झालेली सनातन देवप्रिय हिंदुजाती आणि या चार अलौकिक चतुष्टयाला शोभणारी निसर्गसुंदर सुजला सुफला असलेली ही आपली मातृभू–हा अतुलनीय हिंदुस्थान हे सर्व, हिंदुसमाजा ! तुझे स्वत्व आहे. या पाच स्वत्वांच्या समष्टिरूपाचे हे हिंदुराष्ट्र तुझे आहे. स्वत्वाला सोडून जाणे हे स्वभावाविरुद्ध आहे." [२७४] वर दिलेला उतारा प्रदीर्घ झालेला असला तरी बाबाराव सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाची कल्पना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व आहे.

सावरकर बंधूंच्या हिंदुराष्ट्रवादाचे तुलनात्मक समालोचन

स्वा. सावरकरांच्या ' हिंदुत्व ' या ग्रंथातील हिंदुराष्ट्रीयत्वासंबंधीचे यापूर्वीच विस्तृत विवेचन केलेले आहे आणि त्यानंतर ' राष्ट्रमीमांसा ' आणि ' हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप ' या ग्रंथातील बाबाराव सावरकरांचे विचार स्थलाभावास्तव संक्षेपाने पण त्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेचा बोध होईल अशा रीतीने मांडलेले आहेत. हिंदुस्थान हा देश, हिंदुजाती, हिंदुधर्म, हिंदुसंस्कृती आणि हिंदुभाषा या हिंदुराष्ट्रपंचकासंबंधी दोघाही सावरकरबंधूंना पराकोटीचा अभिमान आहे. किंबहुना परंपरेच्या अधिष्ठानावरच त्यांच्या राष्ट्रवादाची उभारणी झालेली आहे असेही त्यांच्या टीकाकारांचे अभिप्राय आहेत.

बॅ. सावरकरांचे राष्ट्र हेच अंतिम नैतिक मूल्य

राष्ट्रनिष्ठा, हिंदुत्वनिष्ठा आणि विज्ञाननिष्ठा या तिन्ही निष्ठांचा उत्कट आणि आत्यंतिक संगम बॅ. सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता. या तिन्ही निष्ठा अत्यंत प्रबळ होत्या, इतक्या की त्या एकांतिक वाटाव्या. त्यांच्या विज्ञाननिष्ठेच्या संदर्भात डॉ. विद्याधर पुंडलिक लिहितात, "सावरकरांच्या विचारसृष्टीत विज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. किंबहुना विज्ञान हाच एकमेव धर्म आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तोच त्यांना सनातन धर्म वाटत होता."[२७५] "विज्ञानाला इतके महत्त्व देऊनही बॅ. सावरकरांनी विज्ञानाकडे एक साधन याच दृष्टीने पाहिले आहे. कारण राष्ट्र हे त्यांचे साध्य आहे. डॉ. पुंडलिक लिहितात, "राष्ट्र हेच त्यांनी अंतिम नैतिक मूल्य मानले असल्यामुळे कोणत्याही विचारांचा कस ते नेहमी राष्ट्रहिताच्या कसोटीवर पाहतात. विज्ञान, तंत्रविद्या आणि अद्यावतपणाही त्यांना पाहिजे आहे. तो भारतीय राष्ट्राने 'त्रिखंड विजयी' व्हावे म्हणून .... राष्ट्र म्हणूनच हिंदूंनी जगावयाचे, त्यांनी तसेच जगले पाहिजे, दुसरे सर्व पर्याय या स्पर्धिष्णू जगात आत्मघातक आहेत, हे त्यांचे प्रधान मूल्य असल्यामुळे कोणत्याही प्रकारची उच्च नैतिक मानवतावादी मूल्ये ते अडगळ म्हणून सरळ बाजूला फेकून देतात." [२७६]

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील पृथगात्मता

बॅ. सावरकरांच्या भारतीय परंपरेचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. पुंडलिक लिहितात, "खरे म्हणजे सावरकरांना धर्माच्या किंवा संस्कृतीच्या परंपरेपेक्षाही भारताची पराक्रमाची म्हणजे रणांगणावरील शौर्याची परंपरा फार प्रिय आहे." [२७७] क्षत्रिय परंपरेचे यशोगान करण्यात त्यांनी उदंड उत्साह दाखविला आहे. बॅ. सावरकरांच्या पृथगात्मतेचा उल्लेख करताना डॉ. अ. ना. देशपांडे यांनी सुधारकाग्रणी आगरकरांशी त्यांची तुलना केली आहे. मात्र बुद्धिवादाच्या क्षेत्रातही ते आगरकरांच्या पुढे होते हे त्यांनी सुचविले आहे. ते लिहितात, "सावरकर हे आगरकरांप्रमाणेच कट्टर बुद्धिवादी, दोघांनीही बुद्धिवादाच्या तीक्ष्ण शस्त्राचे जीर्ण रूढीवर निष्ठुर प्रहार केलेले, पण सावरकरांनी ज्या विजिगीषू हिंदुराष्ट्रवादाच्या स्वप्नाच्या सफलतेवर दृष्टी केंद्रित करून क्रांतिकारक स्वरूपाच्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला ते स्वप्न पाहण्यात आगरकर रंगून गेले असते असे मुळीच वाटत नाही... प्राधान्याने भावनेवर पोसलेली हिंदुत्वनिष्ठा आणि भावनेला मुळीच थारा न देणारी विज्ञाननिष्ठा अशा दोन परस्परविरोधी निष्ठा आणि त्याही उत्कट व आत्यंतिक स्वरूपात एकत्र आल्यामुळे सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात वैशिष्ट्यपूर्ण पृथगात्मता आलेली आहे." [२७८]

देशभक्त बाबारावांची राष्ट्रनिष्ठा

बॅ. सावरकरांप्रमाणेच बाबाराव राष्ट्रनिष्ठ असले तरी धर्म, परंपरा, संस्कृती या मूल्यांना त्यांनी प्राधान्य दिलेले आहे. राष्ट्राचा भौतिक विकास त्यांनाही अभिप्रेत आहे पण शुद्ध जडवादी मूल्यांना बॅ. सावरकरांप्रमाणे ते प्राधान्य देत नाहीत ही त्यांच्या राष्ट्रमीमांसेची पृथगात्मता आहे. बाबारावांनी धर्ममीमांसा करताना इस्लाम आणि ख्रिस्ती धर्मांना हिंदुधर्माच्या तुलनेत गौण स्थान दिलेले असून हे धर्म मानवी बौद्धिक तत्त्वजिज्ञासा पूर्ण करू शकत नाहीत असे प्रतिपादन केलेले आहे. किंबहुना हे धर्म बौद्धिक तत्त्वजिज्ञासेची पूर्ती करू शकत नाहीत. यामुळेच त्यांचे अनुयायी उत्तरोत्तर भौतिकवादी होत आहेत असेही मत मांडले आहे. ते लिहितात, "धर्म, संस्कृती आदिक सब झूट आहे. अर्थोत्पत्ती, अर्थप्राप्ती व त्याद्वारा मिळणारे जागतिक सुख हीच काय ती मानवी प्रयत्नशीलतेची केंद्रवर्ती कारणत्रयी आहे. याव्यतिरिक्त बाकी सर्व गोष्टी स्वार्थमूलक हेतुप्रेरित ढोंगे

आहेत." "बौद्धिक जिज्ञासेची खरी परितृप्ती करण्यास सर्वस्वी असमर्थ अशा धर्मनामधारी मतांच्या कक्षेत राहणाऱ्या बुद्धिमान मनुष्यसमाजाची धर्मादिक गोष्टींविषयी अश्रद्धा उत्पन्न होणे हे अगदी साहजिक आहे... सोन पितळ हातात पडलेल्या व सोने म्हणून फसलेल्याने त्या पिवळ्या फसव्या पदार्थाला 'सब झूट' म्हणून फेकून द्यावे हे अगदी साहजिक, स्वाभाविक व योग्य होईल. पण ते दृश्य बघताच हाती सोने असलेल्यानेही 'सब झूट' म्हणत सोनेसुद्धा फेकून देण्याचे मनात आणले तर तो फसल्या मनुष्यासारखा शहाणा न ठरता मूर्ख शिरोमणी ठरेल."[२७९]

धर्मसंस्कृतीचे राष्ट्रदृष्ट्या महत्त्व स्पष्ट करताना बाबाराव सावरकर म्हणतात, "सर्व जगातील राष्ट्राच्या स्वरूपात या ना त्या रूपाने 'धर्म-संस्कृती' या घटकांचा समावेश अपरिहार्यतेने राहणारच. परंतु कदाचित राष्ट्रकल्पनेतील 'धर्म-संस्कृती' चे घटक जगामधून विलुप्त झाले हे कधीही सत्यसृष्टीत न येणारे विधेय घटकाभर शक्य मानले तरी हिंदुस्थानच्या संबंधात 'धर्म-संस्कृती' चे घटक राष्ट्रकल्पनेत अबाधितपणे व अखंडतेने नित्य राहिलेच पाहिजेत. कारण ती 'धर्म-संस्कृती' जगत्कल्याणकारी आहे. तिच्या नाशात आपल्या हिंदुतेच्या श्रेष्ठतमतेचाच केवळ नाश नसून जगाचेही अकल्याण होणारे आहे. तेव्हा 'धर्म-संस्कृती' हे या सनातन व दिव्य हिंदुराष्ट्राचा अविच्छेद्य घटक आहेत व ते तसेच राहिले पाहिजेत. ही गोष्ट हिंदुराष्ट्राच्या प्रत्येक घटकाने, या भारतभूच्या प्रत्येक सुपुत्राने लक्षात ठेवून त्याच्या संरक्षणार्थ उद्यतायुधतेने सतत सिद्ध असले पाहिजे." [२८०] प्रस्तुत उतारा बराच दीर्घ झाला परंतु बॅ. सावरकरांच्या आणि बाबाराव सावरकरांच्या राष्ट्रीय विचारात कोणत्या घटकांना प्राधान्य आहे आणि त्यांच्यातील पृथगात्मता किती आहे हे यावरून सहजगत्या जाणता येते.

हिंदुराष्ट्रवादावर घेण्यात येणारे आक्षेप

बॅ. सावरकर आणि बाबाराव सावरकर यांच्यापूर्वी लोकमान्य टिळकांनी 'हिंदुत्व' या शब्द-संहितेचा उपयोग केलेला असल्याचे दिसून येते. 'हिंदुधर्म आणि सुधारणा' या लेखात, "कोणत्याही सुधारणेचा मुख्य उद्देश म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणे हा होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा ? अर्थात हिंदुत्वाचा." मात्र हिंदुत्वाची संज्ञा उपयोगात आणताना त्यांचा दृष्टिकोन प्राधान्याने धार्मिक व सांस्कृतिक आहे. कारण त्याच परिच्छेदात पुढे टिळक म्हणतात, "आम्हाला धर्माची काही एक परंपरा आहे. त्या परंपरेतील ज्ञान इतर धर्मातील ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे आणि ही परंपरा आम्ही सोडली तर आमचे असे म्हणण्यासारखे आम्हास सामान्य बंधन काहीच नाही." [२८१] बॅ. सावरकरांनी 'हिंदुत्व' हा शब्द टिळकांपेक्षा व्यापक अर्थाने हिंदुजाती वा हिंदुराष्ट्र या अर्थाने उपयोगात आणलेला आहे. दुसऱ्या एका लेखात लोकमान्यांनी स्वत्वभावनेचे राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्व प्रतिपादन केलेले आहे.

लोकमान्यांच्या धर्म, परंपरा, स्वत्व या सर्व घटकांचा राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने अर्थ लावण्याचे कार्य बाबाराव सावरकरांनी आपल्या 'राष्ट्र मीमांसा' द्वारा केलेले आहे. स्वा. बॅ. सावरकरांनी मात्र 'हिंदुत्वाला' राजकीय अर्थ दिला आहे. लोकमान्यांची राष्ट्रीय कल्पना व्यापक हिंदुत्वनिष्ठेवर आधारलेली आहे. विविध वैचित्र्यांनी संपन्न असलेला समाजही 'समान हितत्वा' च्या भूमिकेतून राष्ट्र या पदवीस प्राप्त होऊ शकतो अशी त्यांची समजूत होती. म्हणून जर देशबंधूंच्या अंतःकरणात परस्परांसंबंधी औदार्य, सहानुभूती आणि सहनशीलता वागत असेल तर कितीही जातिवैचित्र्य आणि धर्मवैचित्र्य असले तरी राष्ट्र-ऐक्याला बाध येत नाही. ..... "हिंदु-मुसलमान लोकांनी ज्या नात्याने

एकत्र राहावयाचे आहे ते काही अंशी अमेरिकेत निरनिराळ्या जातींचे निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतील तशा प्रकारचेच असले पाहिजे." २८२

स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतातील भिन्न धर्मीयांना समाविष्ट करून घ्यावे ही प्रथमपासूनच राष्ट्रीय सभेची भूमिका होती. त्याकरिता उदारमतवादी हिंदुपुढाऱ्यांनी हिंदुत्वनिष्ठेला तिलांजली देऊन हिंदी राष्ट्रवादाला जन्म दिला, परंतु ब्रिटिशांनी धूर्तपणाने त्यांना हिंदूंपासून वेगळे ठेवण्यात यश मिळविले. हिंदू राष्ट्रीय नेत्यांनी अनेकदा त्यांचे महत्त्व वाढविण्याचे कार्य केले परंतु राष्ट्रीय लढ्यापासून बहुसंख्य मुसलमान अखेरपर्यंत दूर तर राहिलेच पण ते हिंदूंच्या तुलनेत अल्पसंख्य असूनही आक्रमक, शिरजोर आणि द्वेषानेच वागत राहिले. बॅ. सावरकरांनी म्हणूनच त्यांच्याशिवायही हिंदुसंघटन करण्यासाठी हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार केला.

बॅ. सावरकर मात्र आपल्या हिंदुसंघटनेच्या सिद्धांतावर अखेरपर्यंत अचल राहिले. राजकारणाचे हिंदूकरण आणि हिंदूंचे सैनिकीकरण हा राष्ट्रीय मंत्र अखेरपर्यंत सांगत राहिले. फलस्वरूप त्यांची सत्याग्रही, अहिंसक लढ्याचा पुरस्कार करणाऱ्यांनी 'वॉर मॉंगर', 'ब्रिटिशांचे रिक्रूटिंग ऑफिसर', 'मारो काटों का पंथवाले' म्हणून हेटाळणी केली. स्वातंत्र्याच्या काळात १९६२ साली चीनचे आणि १९६५ मधील पाकिस्तानचे आक्रमण बॅ. सावरकरांच्या शिकवणीची उजळणी करूनच परतवावे लागले. सावरकरांच्या हिंदुसंघटनेच्या ध्येयाकडे गांधीजींचे अनुयायी आणि समाजवादी नेते डॉ. राममनोहर लोहियांसारखे लोक अलीकडे वस्तुनिष्ठपणे पाहू लागले आहेत. बॅ. सावरकरांच्या मृत्यूनंतर दिल्लीत झालेल्या शोकसभेत त्यांची स्तुती करताना डॉ. लोहिया म्हणाले, "त्यांच्या एका ध्येयासाठी मला परम आदर आहे व ते अत्यंत अल्पावधीत साध्य केले पाहिजे. ते ध्येय म्हणजे हिंदुसंघटन. माझे मत असे आहे की, या देशातील हिंदूंनी अत्यंत बलवान झाले पाहिजे आणि मुसलमानांच्या हिताच्या दृष्टीने मी हे म्हणत आहे. देशाच्या हिताच्या दृष्टीने हिंदूंनी अत्यंत बलिष्ठ झाले पाहिजे." २८३ [मसुराश्रम पत्रिका, फेब्रु. १९७८]

हिंदुराष्ट्रकल्पना ही आज ग्राह्य होऊ लागली आहे

स्वा. बॅ. सावरकरांच्या हिंदुसंघटनासंबंधीचा डॉ. राममनोहर लोहियांचा अभिप्राय लक्षात घेतला म्हणजे हिंदुसंघटनेची कल्पना किती मौलिक आणि राष्ट्राला उपयुक्त आहे याची जाणीव चाळीस वर्षानंतर का होईना जाणत्यांना होऊ लागली आहे ही आशाजनक स्थिती आहे. बॅ. सावरकर आणि बाबाराव सावरकर या दोघाही देशभक्त बंधूंबद्दल हिंदुत्वनिष्ठ लोकांच्या मनात आदर असल्यामुळे 'हिंदुमहासभा' आणि 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या संस्थांनी दोघांच्याही हिंदुत्वनिष्ठ तत्त्वज्ञानाचा अंगीकार केला. बॅ. सावरकर सतत सात आठ वर्षे हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव हिंदुमहासभेच्या लोकांवर अधिक असणे स्वाभाविकच होते. मात्र हिंदुस्थानची झालेली फाळणी, भारताला मिळालेले स्वातंत्र्य आणि त्यानंतर लगेच एक वर्षानंतर हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्याकडून झालेली गांधीजींची हत्या या सर्व घटनांचा परिणाम होऊन हिंदुसंघटनेचे ध्येय उराशी बाळगणाऱ्या 'हिंदु महासभा' आणि 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांना बहुजन समाजाच्या आणि राज्यकर्त्यांच्या क्षोभाचे भक्ष्य व्हावे लागले. बाबाराव सावरकरांचे स्वातंत्र्यापूर्वी दोन वर्षे आधी म्हणजे १९४५ मध्ये निधन झाले. मात्र अखेरच्या क्षणापर्यंत त्यांनी गांधीवादी विचारसरणीला प्रखर विरोध केला व आपले हिंदुराष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान लोकांना आग्रहाने सांगितले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि आपले एक जीवनस्वप्न साकार झाले या आनंदात फाळणीचे भयानक दुःख गिळून बॅ. सावरकरांनी पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या सदनावर भगव्या ध्वजाबरोबरच तिरंगा ध्वज लावला आणि स्वातंत्र्योत्सव साजरा केला. परंतु दुसऱ्याच वर्षी गांधीजींच्या वधाच्या अभियोगात एक आरोपी म्हणून त्यांना अटक झाली. त्यांचे धाकटे बंधू डॉ. ना. दा. सावरकर यांनाही गांधीवधोत्तर उसळलेल्या दंगलीचे भक्ष्य व्हावे लागले. पुढे अभियोगातून आरोप निराधार ठरून निर्दोष म्हणून न्यायमूर्तींनी स्वा. सावरकरांची १९४९ मध्ये सुटका केली. त्यानंतर 'अभिनव भारताची सांगता', 'अठराशे सत्तावनची शताब्दी' आणि 'अमृतमहोत्सव' अशा प्रसंगांच्या निमित्ताने या सशस्त्रक्रांतीच्या स्वातंत्र्यसेनानीचे मानसन्मान व सार्वजनिक सत्कार-समारंभ झाले.

'धन्योऽहम ! धन्योऽहम्'

१९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात भारतीय सैन्याची लाहोरच्या दिशेने घोडदौड सुरू झाली. भारतीय सैनिकांच्या पराक्रमाने या पुरुषसिंहाचे स्वप्न साकार झाले आणि मग आता आपल्या आयुष्यात काहीही मिळवावयाचे राहिले नाही अशा समाधानाने बॅ. सावरकरांनी निर्भयपणे मृत्यूच्या शिविरात शिरण्याचे निश्चित केले. "धन्योऽहम् धन्योऽहम् ! कर्तव्यं मे न विद्यते किंचित् धन्योऽहम् धन्योऽहम् प्राप्तव्यं सर्वअद्यसंपन्नम्।"

असे कृतार्थतेचे आणि समाधानाचे उद्‌गार काढीत २६ फेब्रुवारी १९६६ रोजी वयाच्या त्र्यांशीव्या वर्षी या हिंदुहृदयसम्राटाने शांतपणे देह ठेवला. सावरकरांच्या हिंदुराष्ट्राच्या कल्पनेचे १९८० मध्येही चिंतन चालू आहे. ६-४-८० च्या 'तरुण भारत' नागपूरच्या अंकात 'धर्मराज्य, रामराज्य आणि हिंदुराष्ट्र' या शीर्षकाचा श्रीपाद जोशी, पुणे यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखात श्री. जोशी म्हणतात, "राष्ट्र (नेशन) ही संकल्पना राज्य (स्टेट) या संकल्पनेपेक्षा अधिक व्यापक व समावेशक आहे असे मला वाटते. त्या दृष्टीने हिंदुराष्ट्र हा शब्द मला अधिक पुरोगामी वाटतो. राज्यामध्ये केवळ राजकीय जीवनाचाच अंतर्भाव होतो, तर राष्ट्रामध्ये संपूर्ण जीवन व्याप्त होते. भारतात राहणाऱ्या सर्वच लोकांना हिंदुराष्ट्रात समान व सम्मानपूर्ण स्थान असणार हे उघड आहे."[२८४]

भारतीय राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते आणि प्रकांडपंडित डॉ. ब. स. एरकुंटवार म्हणतात, "हिंदूंनीच या देशाचा भार उचलण्यास पुढे आले पाहिजे आणि या राष्ट्राची अंतर्बाह्य तयारीही केली पाहिजे." पुढे ते सांगतात, "इथे हिंदूंच्या व्याख्येत मी तूर्त शिरत नाही. फक्त एवढेच विधान करतो की, कामचलाऊ म्हणून सावरकरी व्याख्या स्वीकरणीय आहे. प्रत्यक्ष कार्याचे मार्गदर्शन तीत नाहीच म्हटले तरी चालेल. अंतरंगतः हिंदू कसा असावा व बहिरंगतः तो कसा दिसावा याचा बोध ती करून देत नसली, तरी ढोबळमान म्हणून तिचा उपयोग आहे."[२८५] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे बॅ. सावरकरांच्या हिंदुत्वविचाराचे मंथन अजूनही विद्वान करीत आहेत. त्यांच्या राष्ट्रवादाच्या संकल्पनेचे परीक्षण करणे हा प्रबंधाचा विषय नाही. त्यांच्या समग्र राष्ट्रीय विचारांची ओळख करून देणे व त्यासंबंधीच्या काही प्रतिक्रिया नोंदविणे एवढेच या विवेचनाचे प्रयोजन आहे.

डॉ. हेडगेवारांचा हिन्दुराष्ट्रवाद

हिंदुपुनरुज्जीवनवादाची पार्श्वभूमी

डॉ. हेडगेवारांच्या हिंदुराष्ट्रवादाचा विचार करताना पुनरुक्तीचा दोष पत्करून देखील तत्कालीन भारतीय सांस्कृतिक इतिहासाचे स्वरूप समजावून घेणे अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक

आहे. पारतंत्र्याच्या काळात भारतात उदयास आलेल्या हिन्दुपुनरुज्जीवनवादाने आणि त्यातून उदयास आलेल्या तात्त्विक आदर्शवादाने दोन प्रकारचे कार्य या देशात केलेले आहे. पहिली गोष्ट म्हणजे भारताच्या विविध प्रदेशांत आणि विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद, राजनारायण बोस, नवगोपाळ मित्रा, देवेन्द्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, स्वामी श्रद्धानंद, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, पंडित मदनमोहन मालवीय, न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, विपिनचंद्र पाल, लाला लजपतराय, भाई परमानंद, महर्षी अरविंद घोष, रवींद्रनाथ टागोर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बा. शि. मुंजे, महात्मा गांधी, डॉ. हेडगेवार, डॉ. शामाप्रसाद मुकर्जी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान राष्ट्रीय नेत्यांची निर्मिती झाली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यातील अनेकांनी आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, हिन्दुमित्रमेळा, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, हिंदू विश्वविद्यालय, सत्यशोधकसमाज, हिंदुमहासभा, भारतधर्म महामंडळ, अखिल भारतीय शुद्धिसभा, ग्रामोद्योग संघ, नई तालिमी संघ, शेडचुलकास्ट फेडरेशन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इत्यादी संस्था अस्तित्वात आणून त्यांच्याद्वारे आधुनिक भारताच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाची नव्याने उभारणी केली. आपल्या अभूतपूर्व संघटनात्मक कार्याने अखिल भारतात सुपरिचित असलेल्या डॉ. हेडगेवारांच्या हिंदुराष्ट्रवादाचे स्वरूप या पार्श्वभूमीवर समजावून घ्यावयाचे आहे.

डॉ. हेडगेवारांच्या व्यक्तिमत्त्वाची थोडक्यात ओळख

तेलंगणातील तेलंगी देशस्थ, ब्राह्मणांची काही घराणी नागपुरात भोसल्यांच्या राजवटीत येऊन स्थायिक झाली. त्यांच्यापैकी हेडगेवाराचे घराणे. हेडगेवारांचे वडील बळिरामपंत वंशपरंपरेने वैदिक, विद्वान, अग्निहोत्री, सामान्य परिस्थती असलेले पण स्वाभिमानी गृहस्थ. बळिरामपंत आणि रेवतीबाई या मातापित्यांच्या पोटी १ एप्रिल १८८९ साली नागपुरातच डॉ. हेडगेवारांचा जन्म झाला. हेडगेवारांचे वय अवघे अकरा बारा वर्षांचे असेल. जिकडे तिकडे प्लेगने कहर केला आणि एकाच दिवशी त्यांच्या आईवडिलांचे प्लेगच्या आजाराने निधन झाले. सारी भावंडे उघडी पडली. वडीलबंधूंच्या आश्रयाने डॉक्टरांचे शालेय जीवन गेले. शालेय जीवनापासूनच छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास यांच्या चरित्राने डॉक्टर प्रभावित झालेले होते. पुढे नागपुरातील एक थोर देशभक्त, टिळकानुयायी आणि हिंदुत्वनिष्ठ नेते डॉ. बा. शि. मुंजे यांच्या सहवासाचा लाभ डॉक्टरांना मिळाला आणि त्यातूनच त्यांच्या राष्ट्रीयजीवनाला सुरुवात झाली. नागपूरच्या नितसिटी हायस्कूलमध्ये शिकत असतानाच त्यांच्यातील स्वदेश आणि स्वातंत्र्यनिष्ठा प्रकट झाली आणि पुढे कलकत्त्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजात विद्यार्थी असताना त्यांनी क्रांतिकारक या नात्याने राष्ट्रकार्याला सुरुवात केली. कलकत्त्यातील सुप्रसिद्ध 'अनुशीलन समिती' या सशस्त्र क्रांतिकारकांच्या संघटनेशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. त्या संघटनेतील अनेक क्रांतिकारकांशी त्यांची मैत्री होती.

लोकमान्यांचा प्रभाव

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकांत लोकमान्यांचे लढाऊ नेतृत्व महाराष्ट्रात उदयास आले. बंगभंगाच्या १९०५ च्या चळवळीत बाबू विपिनचन्द्र पाल यांच्या खांद्याला खांदा भिडवून लो. टिळकांनी ती चळवळ देशव्यापी केली. त्यांच्या चतुःसूत्रीने लोकमान्यांना अखिल भारतीय नेतृत्वाची पदवी प्राप्त झाली. ज्यांच्या सहवासात प्रारंभी देशभक्तीचे पाठ हेडगेवारांनी घेतले ते डॉ. मुंजे विदर्भातील लोकमान्यांचे निष्ठावंत अनुयायी होते. लो. टिळकांचे व्यक्तिमत्त्व धगधगत्या अग्नीसारखे तेजस्वी होते. लो. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेला तरुणांचा एक गट

हिंदुत्ववादी आणि जहाल क्रांतिवादी होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'गुरूणां–गुरुकेसरी' च म्हणून वर्णन करून 'लखलखत्या तेजस्वी खड्गाची वज्रप्राय मूठ' म्हणून जसे लोकमान्यांचे गुरुत्व मान्य केले आहे तोच प्रकार डॉ. हेडगेवारांच्या बाबतीतही घडलेला आहे. कारण त्यांचे मुख्य प्रेरणा-स्थान लो. टिळकच आहेत.

नागपुरातील साक्षेपी विद्वान, पंडित आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. व. स. एरकुंटवार यांनी १५ जुलै १९७३ च्या 'प्रज्ञालोक' [त्रैमासिक] च्या स्वर्गीय गोळवलकर गुरुजींवरील श्रद्धांजलीच्या लेखात हेडगेवारांवरील लो. टिळकांच्या प्रभावासंबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. लोकमान्यांचा डॉ. हेडगेवारांवरील प्रभाव कसा सर्वंकष होता हे सांगताना केसरीतील 'हिंदुत्व आणि सुधारणा' आणि 'इंग्रजी शिकलेल्यांचा एकांगीपणा' या दोन लो. टिळकांच्या लेखांचा आधार म्हणून उल्लेख केलेला आहे. 'हिंदुत्व आणि सुधारणा' या लेखात "हिंदुधर्माचा, हिंदुपरंपरेचा अभिमान धरणे म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान बाळगणे हेच सर्व हिंदूंना सामान्य बंधन आहे." [२८६] "हिंदु-धर्मात राष्ट्रीयत्व नाही हे म्हणणे चूक आहे. केवळ लोकसंख्येच्याच मानाने पाहिले तरीही हिंदूंचा समुदाय मोठा आहे आणि एकदा मोठा समूह ज्या बंधनांनी एकत्र झाला आहे ते बंधन हिंदुत्व हेच होय." [२८७] हे बन्धन दृढ राखले पाहिजे असे लोकमान्यांनी प्रतिपादन केलेले आहे आणि तेच निदान महाराष्ट्रात तरी हिंदुराष्ट्रवादाचे बीज आहे. याच प्रेरणेतून हिंदुराष्ट्रवादाचा उदय झाला. तोच हिंदुराष्ट्रवाद डॉ. हेडगेवारांनी स्वीकारला असे डॉ. एरकुंटवारांचे मत असून ते सामान्यपणे मान्य होणारे आहे.

डॉ. हेडगेवारांनी केवळ हिंदुराष्ट्रवादच लोकमान्यांपासूनच घेतला नाही तर हिंदुसंघटनेच्या कार्याची प्रेरणा आणि संघटनात्मक पद्धती देखील लो. टिळकांपासून स्वीकारली असे डॉ. एरकुंटवारांचे प्रतिपादन आहे. त्याकरिता पुरावा म्हणून त्यांनी दि. २२–८–१९०५ च्या 'केसरी' च्या लेखातील उतारा दिलेला असून तो त्यांच्या तर्काचे समर्थन करणारा आहे. लो. टिळक लिहितात, "अनेक आचारविचारांनी विभक्त व राज्यकर्त्यांनी निःशस्त्र केलेल्या लोकांजवळ केवळ संघशक्तीच उरते. या संघशक्तीचा उपयोग वैधरीतीने राज्यकर्त्यांची धुंदी उतरविण्याकरिता करता येईल तर धैर्याने आणि आत्मविश्वासाने अशा प्रकारचा उद्योग करणे हे हिंदुस्थानविषयी आत्मीयता बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य होय." [२८८]

लोकमान्य टिळकांच्या 'हिंदवी स्वराज्यसंघ' (Home Rule league) या वर्षभर चालणाऱ्या चळवळीत संघाच्या दैनंदिन शाखेचे मूळ आहे असे डॉ. एरकुंटवारांनी आपल्या स्वर्गीय गुरुजींवरील लेखात प्रतिपादन केलेले आहे.

हिंदुमहासभा आणि स्वा. सावरकरांचा प्रभाव

लोकमान्य टिळकांच्या हिंदुत्ववादी आणि जहाल विचारांनी स्वा. सावरकर प्रभावित झालेले होते. लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रवादी विचारांचा आणि संघटनात्मक स्वरूपाचा प्रभाव डॉ. हेडगे-वारांवर असल्याचे आताच आपण पाहिले आहे. डॉ. हेडगेवारांना प्रेरणा लो. टिळकांपासून मिळाली असेल याबद्दल वाद नाही परंतु प्रत्यक्ष कार्यस्फूर्ती लो. टिळकांचेच अनुयायी, सशस्त्रक्रांतीचे मुकुटमणी आणि देशभक्त बॅ. वि. दा. सावरकर यांच्या जीवनापासून घेतली असावी असे वाटते. स्वा. सावर-करांच्या अद्वितीय, असामान्य झुंजार, आत्मप्रत्ययी आणि आक्रमक व्यक्तिमत्त्वाने डॉ. हेडगेवार

प्रभावित झाले असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. स्वा. सावरकरांचे धाकटे बंधू नारायणराव सावरकर हे कलकत्त्याला डॉ. हेडगेवारांचे सहाध्यायी होते. अंदमानातून बॅ. सावरकरांनी डॉ. नारायणरावांना पाठविलेल्या पत्रांची डॉ. हेडगेवार पारायणे करीत असत.

नागपूरचे सुप्रसिद्ध अधिवक्ता आणि सावरकर बंधूंचे जवळचे नातेवाईक आणि हिंदुत्ववादी कार्यकर्ते श्री. विश्वनाथराव केळकर हे डॉक्टरांचे जिव्हाळ्याचे मित्र होते. स्वा. सावरकरांचे ज्येष्ठ बंधू ग. दा. उपाख्य देशभक्त बाबाराव सावरकर श्री. केळकरांकडे हिंदुसंघटनेच्या कार्याच्या निमित्ताने अनेक महिने मुक्कामाला असत आणि डॉ. हेडगेवार त्यांच्या नेहमीच्या बैठकीत वसत असत. चर्चा, विचारांचे आदानप्रदान चालत असे. या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या आणि डॉ. हेडगेवारांचे सावरकर कुटुंबियांशी असलेले संबंध लक्षात घेतले म्हणजे हिंदुमहासभा आणि सावरकरबंधूंचा प्रभाव डॉ. हेडगेवार यांच्यावर होता आणि त्यांच्या कार्यस्फूर्तीला तो उपकारक ठरला असावा असे म्हणता येते. डॉ. हेडगेवारांच्या चरित्रात 'जीवनाची दिशा' या प्रकरणात श्री. पालकरांनीही स्वा. सावरकरांचा आणि त्यांच्या साहित्याचा डॉ. हेडगेवारांवरील प्रभाव स्पष्ट केलेला आहे.[२८९]

स्वा. सावरकरांच्या 'हिंदुत्वा' चा प्रभाव

स्वा. सावरकरांच्या 'हिंदुत्व' या सुप्रसिद्ध ग्रंथाचे हस्तलिखित श्री. विश्वनाथराव केळकर यांच्याकडे रत्नागिरीहून आलेले होते आणि त्याचे वाचन डॉ. हेडगेवारांनी सूक्ष्मपणे केलेले होते. 'हिंदुत्व' या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशक श्री. विश्वनाथराव केळकरच होते आणि नागपुरात १९२३ साली या ग्रंथाचे पहिले प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर दोनच वर्षांनी डॉ. हेडगेवारांनी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या संघटनेची आपल्या मित्रमंडळींच्या सहकार्याने नागपुरातच १९२५ साली वर्ष प्रतिपदेच्या सुमुहूर्तावर निर्मिती केली. महत्त्वाची गोष्ट अशी की या संघटनेचा श्रीगणेशा करण्यापूर्वी डॉ. हेडगेवार, डॉ. नारायणराव सावरकर आणि श्री. विश्वनाथराव केळकर हे तिघेही रत्नागिरीला स्थानबद्धतेत असलेल्या क्रांतिवीर सावरकरांशी हिंदुसंघटनेसंबंधी विचारविनिमय करण्याकरिता जाऊन आले होते. ही घटनाही स्वा. सावरकरांच्या हेडगेवारांवरील प्रभावाची सूचक आहे. प्रारंभी राष्ट्रीय काँग्रेसशी सहकार्य करणारे, राजकीय चळवळीत सक्रिय पुढाकार घेणारे, त्याकरिता प्रसंगी तुरुंगवासाची शिक्षा भोगणारे डॉ. हेडगेवार काँग्रेसच्या उत्तरोत्तर दिसून येणाऱ्या मुस्लिम तुष्टीकरणाच्या प्रवृत्तीने हिंदुत्ववादी विचाराकडे वळले. देशाला स्वतंत्र करावयाचे ही राष्ट्रीय सभेची ध्येयनिष्ठा डॉ. हेडगेवारांच्या ठिकाणी होती. मात्र स्वातंत्र्याचे ध्येय हिंदुसंघटनेच्या मार्गाने आणि हिंदुराष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाने साध्य होऊ शकेल असे सावरकरांच्या विचारामुळे त्यांना वाटू लागले होते.

तात्त्विकदृष्ट्या दोघेही हिंदुराष्ट्रवादी

तात्त्विकदृष्ट्या विचार केला तर स्वा. सावरकरांनी 'हिंदुत्व' या ग्रंथात मांडलेला हिंदुराष्ट्रवाद आणि डॉ. हेडगेवारांचा 'राष्ट्रवाद' यात कोणत्याही प्रकारचे अंतर नाही. कारण दोघांचाही हिंदुत्वाचा मूळस्रोत एकच आहे. हिंदुस्थान हा देश, हिंदुपरंपरा, हिंदुसंस्कृती यांचा दोघांनाही सारखाच अभिमान आहे. स्वा. सावरकर म्हणतात, "आम्हाला कुणावर आक्रमण करण्यासाठी किंवा दहशत घालण्यासाठी हिंदुसंघटना करावयाची नसून राष्ट्राच्या हितरक्षणासाठी, हितसंवर्धनासाठी ती करावयाची आहे. त्यासाठी शीघ्रातिशीघ्र, अधिकात अधिक सैनिक भरती केले

पाहिजे. प्रचंड जागृती करूनही संघटना निर्माण केली पाहिजे. या हिंदुसंघटनेचे स्वराज्य हे ध्येय, प्रगती हे साध्य आणि हिंदुराष्ट्रवादावर अधिष्ठित संघटना हे साधन आहे." [२९०]

अगदी अशाच आशयाचे विचार डॉ. हेडगेवारांच्या टाचणवहीचा आधार घेऊन 'संघाचा संकल्प' या प्रकरणातील पृष्ठ १२९ ते १३१ वर डॉ. हेडगेवारांचे चरित्रकार श्री. पालकर यांनी मांडलेले आहेत. ते लिहितात, "हिंदुसंघटन हे मुसलमानांच्या विरुद्ध आहे ही कल्पना चुकीची आहे. त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या हितसंबंधाशी ज्याचे सारे हितसंबंध निगडित आहेत, जो या देशाकडे भारतमाता या पवित्र दृष्टीने पाहतो व ज्याला या देशाबाहेर कोणताही आधार नाही असा थोर धर्म संस्कृतीने विनटलेला हिंदुसमाज हाच राष्ट्रीय समाज असून तो जागृत व सुसंघटित केला पाहिजे हे त्यांच्या प्रतिपादनाचे दुसरे सूत्र असे." [२९१] यातून दोघांच्याही विचारातील आशय एकच असल्याची खात्री झाल्याशिवाय राहत नाही.

आणखी काही साम्य स्थळे

डॉ. हेडगेवारांचा हिंदुराष्ट्रवाद केवळ तात्त्विकदृष्ट्याच सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाशी समान होता असे नाही तर व्यवहाराच्या दृष्टीनेही त्यात पुष्कळच साम्य होते. श्री. दादुमिया (डॉ. नेने) म्हणतात, "सर्वसामान्य संघवाला व सभावाला (हिंदुसभा) यांच्या तत्त्वनिष्ठेत, बोलण्यात, वागण्यात काहीही फरक नव्हता. संघातच मुळी हिंदुसभेचे पुढारी असत. किती उदाहरणे पाहिजेत ?" [२९२] डॉ. व्ही. पी. वर्मा लिहितात, "Hedgewar was for several years a member of the Hindu–Mahasabha and it was only in 1930 that he served his connection there from. He was a close friend of Savarkar." [२९३]

१९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी वैयक्तिकरीत्या भाग घेतला होता आणि आपली भूमिका मांडताना ते म्हणाले होते, "देशात ज्या चळवळी चालू असतील त्यांची आतून बाहेरून माहिती करून घेणे व त्यांचा उपयोग आपल्या कार्याकडे करून घेणे हे देशस्वातंत्र्यार्थ झटणाऱ्या कोणत्याही संस्थेचे कर्तव्य आहे." [२९४] पुढे हिंदुमहासभेने सुरू केलेल्या भागानगरच्या सत्याग्रहातही वैयक्तिकदृष्ट्या भाग घेण्याची प्रेरणा डॉ. हेडगेवारांनी अनेक स्वयंसेवकांना दिली आणि या सत्याग्रहाला सहकार्य दिले.

सुधारणावादी मतांच्या बाबतीत हेडगेवार लो. टिळकांचे अनुयायी होते

सुरुवातीला तरी काही काळ डॉ. हेडगेवार हे स्वा. सावरकरांच्या सुधारणावादी विज्ञाननिष्ठ-मतांनी प्रभावित झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र लोकमान्य टिळकांच्या धोरणा-प्रमाणे सुसह्य पद्धतीने समाजपरिवर्तन घडवून आणले पाहिजे, लोकांत परिवर्तन घडवून आणताना त्यांच्या केवळ एक पाऊल पुढे असले पाहिजे, याशिवाय अधिक अंतर असता कामा नये हे लोकमान्यांचे धोरण सामाजिक सुधारणेच्या संदर्भात त्यांनी अंगीकारलेले दिसते. हिंदुसंघटना करण्याचे ध्येय असणाऱ्याने लोकसंग्रहाच्या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून चालावयाचे नाही हे त्यांनी ओळखले होते. 'दासबोध' आणि 'गीतारहस्य' हे त्यांचे नित्य पठनातील ग्रंथ होते. बिंदूबिंदूचा सागर होतो तसा व्यक्तीव्यक्तींचा समाज बनतो. व्यक्तीत परिवर्तन घडवून आणले की सामाजिक परिवर्तन आपोआप घडून येईल अशी त्यांची धारणा होती. स्वामी विवेकानंदांचाही प्रभाव त्यांच्यावर होता.

राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात व्यक्तिगत चारित्र्यनिर्मितीला त्यांनी सर्वात अधिक प्राधान्य दिले आणि अशा चारित्र्यसंपन्न तरुणांची संघटना उभारण्याचे कार्य राष्ट्रीय पातळीवर त्यांनी सुरू केले.

देशभक्त ग. दा. उपाख्य बाबाराव सावरकरांचा प्रभाव

इ. स. १९३४ मध्ये देशभक्त बाबाराव सावरकरांनी हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप कसे असावे यासंबंधी मीमांसा आपल्या सुप्रसिद्ध 'राष्ट्र मीमांसा' आणि 'हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप' या ग्रंथाद्वारे केली. स्वा. सावरकरांप्रमाणेच बाबारावांशीही डॉ. हेडगेवारांचे स्नेहाचे संबंध होते. स्वा. सावरकरांच्या हिंदुत्वाने जसे ते प्रभावित झाले तसेच बाबारावांचा 'राष्ट्रमीमांसा' हा ग्रंथ वाचून झाले असले पाहिजे. कारण बाबारावांची 'हिंदुराष्ट्रमीमांसा' भारतीय संस्कृतीच्या तात्त्विक भव्यतेवर अधिष्ठित झालेली आहे.

श्री. शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांना ते गुरुस्थानी समजत. हिंदुत्वाचे चिन्ह म्हणजे शिखा डॉक्टरांनी राखली होती व स्वयंसेवकांनी ती राखावी असे त्यांचे मत होते. जानवे घालणे, संध्या करणे, आईवडिलांच्या श्राद्धदिनी नागपुरात उपस्थित राहणे, घराबाहेर जाताना देवाला नमस्कार करणे, स्नानानंतर पिंजर घेऊन टिळा लावणे, ॐकार काढून पत्राची सुरुवात करणे देवदर्शनाला जाणे, आदी गोष्टी ते कटाक्षाने करीत असत. तसेच संघकार्य हे ईश्वरी कार्य असे म्हणताना सज्जनांचे रक्षण आणि दुष्टांचे निर्दालन करण्याचे भगवान श्रीकृष्णाचे कार्यच संघ करीत आहे असे ते मानत असत व इतरांना तशी शिकवण देत असत. या सर्व त्यांच्या सवयी व वागण्याच्या पद्धती लक्षात घेतल्या म्हणजे डॉ. हेडगेवार हे ईश्वरनिष्ठ आणि श्रद्धावान असे एक साधक होते. त्यामुळे ब्रह्मचर्यव्रताचे नैष्ठिक पालन करणे त्यांना शक्य झाले असे म्हणता येते.

स्वा. सावरकरांच्या आचारात या गोष्टींना स्थान दिसून येत नाही. बाबाराव सावरकरांच्या विचारांचा आणि आचारांचा प्रभाव किती जबरदस्त होता हे त्यांच्या चरित्रातील या अवतरणावरून चटकन लक्षात येईल. बाबारावही ईश्वरनिष्ठ आणि आध्यात्मिक वृत्तीचे, धर्मावर श्रद्धा असणारे, स्वातंत्र्यनिष्ठ देशभक्त होते. डॉ. हेडगेवारही त्यांच्यासारखेच होते. त्यांच्या टाचणवहीतील एकच उतारा नमुना म्हणून सादर करतो. "हिंदुस्थानचा पंचप्राण म्हणजे त्याची हिंदुसंस्कृती म्हणून हिंदुस्थानचे रक्षण करण्याचे म्हणजे हिंदुसंस्कृतीचे रक्षण करणे हे आद्यकर्तव्य ठरते. जर हिंदुस्थानची हिंदुसंस्कृती नष्ट व्हावयाची असेल, हिंदुसमाजाचे निशाणही हिंदुस्थानात उरणार नसेल तर मग त्या राहिलेल्या केवळ जमिनीच्या तुकड्याला हिंदुस्थान तथा हिंदुराष्ट्र हे नाव शोभणार नाही. कारण राष्ट्र म्हणजे केवळ जमिनीचा तुकडा नव्हे." [३९५]

संघटनात्मक दृष्टिकोनातील अंतर

स्वा. सावरकरांच्या हिंदुसंघटनात्मक दृष्टिकोनात आणि डॉ. हेडगेवारांच्या हिंदुसंघटनात्मक दृष्टिकोनात अंतर असल्याचे स्पष्टपणे जाणवते. हिंदूंची संघटना उभारून ती राजकारणाकरिता उपयोगात आणावी अशी स्वा. सावरकरांची भूमिका असावी असे एकंदर त्यांच्या धोरणावरून वाटते. कारण स्वातंत्र्यसंपादन हे त्यांचे प्रमुख ध्येय ठरलेले होते. त्यासाठी हिंदुमहासभा ही संस्था कार्यरत होती. १९४२ च्या कानपूर येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून स्वा. सावरकरांनी हिंदुत्वनिष्ठांसाठी पुढील कार्यक्रम दिला होता. "(अ) हिंदूंचे सैनिकीकरण आणखी शतपट जोराते करावे, त्यासाठी सैन्य, आरमार, विमानदल, दारुगोळ्याचे कारखाने इत्यादींमध्ये अधिकाधिक प्रविष्ट व्हावे. (आ)

स्थानिक स्वराज्य, विधिमंडळे, संरक्षणसमित्या, मंत्रिमंडळ किंवा शक्य ती सत्ताकेंद्रे हस्तगत करण्याचे कार्य हिंदूंनी पुढे चालू ठेवावे... (इ) तुम्ही आपला सर्व उत्साह आणि तुमच्याजवळ असणारे हिंदुसंघटनवाद्यांचे सामर्थ्य हे कोणत्याही पोकळ घोषणानिष्ठ चळवळीत अडकवून ठेवू नका. कारण घोषणेपेक्षा खऱ्या सामर्थ्याचे मूल्य अधिक असते... (ई) अस्पृश्यतानिवारणाचे कार्य हे जितके सुलभ आहे, तितकेच ते हिंदुसंघटनेचे सामर्थ्य वाढविणारेही आहे हे विसरू नका." 'हिंदूंचे सैनिकीकरण आणि राजनीतीचे हिंदूकरण !'[२९६] हेच त्यांच्या संघटनेचे प्रमुख सूत्र होते आणि त्याचे स्वरूप उघड उघड राजकीय होते.

डॉ. हेडगेवारांचा संघटनात्मक दृष्टिकोन

डॉ. हेडगेवारांनाही स्वातंत्र्य हवे होते परंतु साधन म्हणून संघटनेला प्रत्यक्ष कार्यशील करावे असे त्यांचे धोरण नव्हते. लोकजागृती आणि लोकशिक्षण यांच्याद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यावर त्यांचा भर होता. व्यक्ती हा त्यांच्या संघटनेचा केंद्रबिंदू होता. चारित्र्यसंपन्न, अनुशासनबद्ध, एकरस, देशभक्त तरुणांची हिंदुसंघटना निर्माण करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. अशी प्रचंड संघटना देशात उभी करता आली तर स्वातंत्र्याचे आणि सुराज्याचेही ध्येय साध्य करता येईल अशी त्यांची धारणा होती. मात्र देशाच्या निकडीच्या प्रसंगी संघशः नव्हे तर व्यक्तिशः स्वयंसेवकाने राष्ट्रीय कर्तव्य बजावले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता आणि त्याचा वस्तुपाठ काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वतः भाग घेऊन त्यांनीच घालून दिलेला होता. संपूर्ण संघटनेला डॉ. हेडगेवारांनी देशाच्या प्रत्यक्ष लढ्याच्या राजकारणापासून अलिप्त ठेवले. डॉक्टरांनी लोकमान्यांकडून हिंदुत्वाचा अर्थ समजावून घेतला आणि लोकसंग्रहाचे व्यावहारिक तत्त्व स्वीकारले. स्वा. सावरकरांचा हिंदुराष्ट्रवादाचा मंत्र स्वीकारला. देशभक्त बाबाराव सावरकरांच्या समुत्कर्ष निःश्रेयस राष्ट्रवादाचा आदर्श पुढे ठेवला. त्यातील निःश्रेयस अभ्युदयाचे तत्त्व स्वीकारले आणि हिंदुधर्मातील शब्दसंहिता घेऊन स्वतःच्या प्रतिभेने व डॉ. मुंजे, तपस्वी बाबासाहेब परांजपे यांच्या सल्ल्याने हिंदुतरुणांच्या संघटनेचे अभिनव तंत्र निर्माण केले. देशभक्त, ध्येयनिष्ठ, त्यागी आणि कर्मयोगी अशा तरुणांची संघटना निर्माण केली. संघाची दैनिक शाखा, व्यक्तिदोषापासून मुक्त असे गुरुत्वाचे प्रतीक म्हणून प्राचीन भगवा ध्वज, कठोर सैनिकी शिस्त, श्रद्धापूर्वक गुरुपूजन, त्यागवृत्तीला चालना देणारी गुरुदक्षिणा, शस्त्रपूजन, मातृभूमीची शुभ संकल्पात्मक संस्कृतभाषेतील प्रार्थना, परंपरेची जाणीव करून देणारे प्रातःस्मरण, प्रतिज्ञा, शिबिरे, अधिकारी शिक्षावर्ग, त्यातून दिले जाणारे शारीरिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक शिक्षण, भिन्न भाषीय, भिन्न प्रांतीय तरुणांचे शिबिराच्या निमित्ताने एकत्रीकरण, त्यातून जोपासली जाणारी एकराष्ट्रीयत्वाची भावना, या सर्व क्रियाकलापांची निर्मिती केली.

शक्तीचे दृश्य स्वरूप म्हणजे संघ

स्वप्नाळू वृत्तीच्या वयात आकर्षक वाटणारी देशभक्तीची व सर्वस्वाच्या समर्पणाची भावना सुशिक्षित पदवीधरांत निर्माण करण्यात डॉ. हेडगेवार आणि त्यांचे सहकारी त्यांच्या त्यागपूर्ण चारित्र्यसंपन्न जीवनाने यशस्वी ठरले. जीवनव्रती अशा संघप्रचारकांनी सारा भारत पिंजून काढला. देशाच्या कानाकोपऱ्यात संघशाखांद्वारा संघकार्याचे लोण पोचविले. आज संपूर्ण देशात संघस्थाने, संघकार्यालये आणि त्यांच्या जोडीला ग्रंथालये आणि इतर संस्था यांची निर्मिती झालेली आहे. आज सर्व देशभर हजारो संघशाखांचे कार्य चालू असून लक्षावधीच्या संख्येत प्रतिज्ञित स्वयंसेवक आहेत.

डॉ. हेडगेवारांनी लावलेल्या हिंदुसंघटनेच्या या लहानशा रोपट्याचा विशाल वटवृक्ष झालेला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक शक्ती म्हणून तिची आज सर्वच पक्ष दखल घेत आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यात स्व. गोळवलकर गुरुजींचे योगदान

डॉ. हेडगेवारांच्या हिंदुराष्ट्रवादाचा भारतभर विस्तार आणि प्रसार करण्याचे कार्य स्व. गोळवलकर गुरुजींनी केलेले आहे. डॉ. हेडगेवारांनी ज्याप्रमाणे संघटनेला राजकारणापासून अलिप्त ठेवून तिचे संगोपन केले त्याच मार्गाने स्व. गोळवलकर गुरुजींनी अनुसरण केले. स्व. गुरुजींना श्रद्धांजली वाहणाऱ्या लेखात डॉ. ब. स. एरकुंटवार लिहितात, "पू. डॉ. हेडगेवारांचा पिंड राजकारणी नेत्याचा होता. स्व. गोळवलकरांचा मूळ पिंड आध्यात्मिक पुरुषाचा होता. ब्रिटीश सरकारशी संघर्ष नको म्हणून, हिंदुसभेच्या लोकांचा संघाला तिचे स्वयंसेवक दल बनविण्याचा लकडा टाळण्याकरिता म्हणून आणि बाळसे धरून आपले अस्तित्व जोपासण्याकरिता म्हणून म्हणजे धोरण म्हणून अंगीकारलेले 'राजकारणापासून अलिप्त राहण्याचे व्रत' पू. डॉ. हेडगेवारांच्या हयातीत निर्माण झाले ते स्व. गोळवलकरांनी तात्त्विक अधिष्ठानावर आरूढ करून उजळ केले. माणूस घडविण्याचे ध्येय पुढे ठेवणाऱ्याला ही गोष्ट करणे आवश्यकच आहे..."[२९७] स्व. गुरुजींच्या भूमिकेचे अधिक स्पष्टीकरण करताना डॉ. एरकुंटवार लिहितात,

"भगिनी निवेदितेने मुद्दाम दिग्दर्शित केल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद 'Nation making' ची चर्चा न करता 'Man making' चीच चर्चा अधिक करीत. आपल्या राष्ट्राच्या उद्धाराकरिता व उत्कर्षाकरिता विलक्षण तगमगणारा त्यांचा जीव, मनुष्य हा 'Political animal' नसून 'Spiritual animal' आहे या सत्याच्या तीव्रतम जाणिवेने 'Man Making' चाच अधिक ध्यास घेत होता... स्वामी विवेकानंदाच्या परंपरेच्या स्व. गोळवलकर गुरुजींनी हा 'Positive Content' भरण्याचा महान प्रयास चालू केल्यामुळेच त्यांना 'Spiritual animal' या प्रमेयावर आरूढ व्हावे लागले. या प्रमेयावर आरूढ होणाऱ्याला राज्यसत्ता व राजकारण यांना 'पशं मानता है' अशीच धारणा ठेवावी लागते. स्व. गोळवलकर गुरुजींनी 'मला राजकारणात रस नाही' असे सौ. कान्तावेन गोयल यांना जे म्हटले होते ते लक्षात घेण्याजोगे आहे," [२९८]

बाबाराव सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाकडे कल

देशभक्त बाबाराव सावरकर हे आध्यात्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळेच गुरुजींना त्यांचे राष्ट्रीय विचार प्रभावित करू शकले. त्यांनी बाबारावांच्या 'राष्ट्रमीमांसा' या ग्रंथाचा 'We' हा इंग्रजीत अनुवाद केला. या ग्रंथासंबंधीची भूमिका स्पष्ट करताना दिनांक १५ मे १९६३ ला मुंबई येथे केलेल्या प्रकट भाषणात ते म्हणाले, "माझे 'We' हे इंग्रजी पुस्तक कै. बाबाराव सावरकरांच्या राष्ट्रमीमांसा या ग्रंथाची संक्षिप्त इंग्रजी आवृत्ती आहे. या संदर्भात सार्वजनिकरीत्या कै. बाबांच्या ऋणाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे श्रेयस्कर ठरते."[२९९]

मा. स. गोळवलकर गुरुजींची ऐतिहासिक कामगिरी

स्व. गुरुजींच्या राष्ट्रविषयक ऐतिहासिक कामगिरीचे वर्णन करताना डॉ. एरकुंटवारांनी मोठे मार्मिक विवेचन केलेले असून ते स्व. गुरुजींचे संघटनात्मक कार्य विशाल का झाले हे समजण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. डॉ. एरकुंटवार सांगतात, "स्वा. सावरकर 'पितृभू'चा आग्रह धरणारे होते, स्व. गोळवलकर 'मातृभू'चा आग्रह धरणारे होते... 'Positive content' भरण्याचे कंकण बांधू

इच्छिणाऱ्या स्व. गोळवलकर गुरुजींनी मातृभूमिविषयक भक्ती व विशुद्ध राष्ट्रनिष्ठा यांच्या योग्य आग्रहाचा घोशा लावणे ऐतिहासिक कामगिरीचेच होते. त्यातूनच काँग्रेसपक्षाविषयी 'वयं पंचोत्तरं शतम्' व 'जीभ दाताने चाविली। कोणे बत्तीशी पाडिली' ही क्षमावृत्ती व आपुलकी बाळगणे आणि इस्लामच्या सत्काराची दृष्टी ठेवणे त्यांना सुचले."[३००] त्यामुळेच ते संघकार्याचा प्रचंड विस्तार करू शकले. या प्रचंड विस्तारातून आणि संघाने निर्माण केलेल्या विविध कार्यांतून संघशक्तीचा राज्यकर्त्यांना परिचय झाला आणि ही शक्ती आपल्या हातात यावी याकरिता अनेकांनी प्रयत्नही करून पाहिला, परंतु त्यांना त्यात यश आले नाही.

माणूस घडविण्याच्या साध्यामुळे राष्ट्रीय लढ्याकडे दुर्लक्ष झाले

'माणूस घडविणे' हेच प्रामुख्याने साध्य ठरल्यामुळे गुरुजींच्या कार्यकाळात झालेल्या 'चले जाव आंदोलनासारख्या' १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात 'संघा'चे घोरण अलिप्ततेचे राहिले. डॉ. हेडगेवारांप्रमाणे हजारो स्वयंसेवकांनी व्यक्तिगत रूपाने या राष्ट्रीय लढ्यात भाग घेतला व त्याकरिता आवश्यक तो कारावासही सोसला. परंतु 'संघ' ही राष्ट्रीय चळवळीपासून दूर राहणारी; राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करणारी संघटना आहे असे आक्षेप घेण्यात आले. एका हिन्दुत्वनिष्ठ महाराष्ट्रीय माणसाने महात्मा गांधींची हत्या केली. सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारने हिन्दुत्वनिष्ठा बाळगणाऱ्या संघटनांवर बंदी आणली. त्याचा सर्वात मोठा आघात संघाला सोसावा लागला. परंतु पुढे 'संघा'वरील आरोप निराधार ठरल्यावर बंदी उठविण्यात आली आणि पुन्हा संघाचे कार्य जोमाने सुरू झाले.

पुन्हा संघबंदी आणि पुन्हा मुक्तता

पुन्हा अगदी अलीकडे १९७५ च्या आणीबाणीत संघावर बंदी घातल्या गेली पण त्या दिव्यातूनही 'संघ' ही संघटना तावून सुलाखून बाहेर पडली आहे. संघ स्वयंसेवकांच्या निष्ठेचा कस या दोन्ही बंदींच्या काळात लागला. मात्र त्यांच्या देशभक्तीचा प्रत्यय चीनशी झालेल्या युद्धात, पाकिस्तानशी आणि बांगला देशमुक्तीच्या युद्धातही सर्वांना झाला. दुष्काळ, वादळ, पूर अशा राष्ट्रीय आपत्तींच्या काळात संघ स्वयंसेवकांनी केलेले कार्य त्यांच्या विरोधकांनीही गौरविलेले आहे. माणूस घडविण्याचे 'Positive content' चे स्व. गुरुजींचेच सूत्र या भूमिकेमागे आहे. संघाची संघटना हे अनेकांना न उलगडणारे कोडे वाटू लागले आहे. वादळात सापडलेल्या लोकांसाठी लक्षावधी रुपये गोळा केले जातात आणि संपूर्ण गावाची नव्याने निर्मिती केली जाते, पूरपीडितांसाठी नागरिकांचा निधी युद्धपातळीवर उभारल्या जातो आणि अनेक घरांची निर्मिती होऊन बेघरांना ती निःशुल्क वाटली जातात. परकीयांशी झालेल्या युद्धात दुसरी आघाडी सांभाळण्याइतके सामर्थ्य या संघटनेने संपादन केलेले आहे.

डॉ. हेडगेवारांच्या हिंदुराष्ट्रवादाचा आणि संघकार्याचा झालेला विस्तार

सहस्रावधी संघशाखा, लक्षावधी चारित्र्यसंपन्न, राष्ट्रभक्त, अनुशासनबद्ध एकरस स्वयंसेवक, त्यांच्यातून अनेक जीवनव्रती कार्यकर्ते निर्माण होऊन संघनिर्मिती विविध संस्थांमधून विशुद्ध सेवाभावाने कार्य करीत आहेत. त्यामुळे स्वाभाविकपणे संघकार्याचा प्रचंड विस्तार होत आहे. संघाच्या कार्यकर्त्यांनी चालविलेल्या संस्थांमध्ये, विश्व-हिंदु-परिषद, दीनदयाल शोध संस्थान, भारतीय मजदूर संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनसंघ, भारतीय जनता पार्टी, वनवासी कल्याण आश्रम

भारतीय किसान संघ, सहकार भारती, सेवा भारती, विद्या भारती, संस्कार भारती, विवेकानन्द केन्द्र, बाबासाहेब आपटे स्मारक समिती, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, राष्ट्रोत्थान प्रकाशन, भारतीय विचार साधना, माधव प्रकाशन, सुरुचि प्रकाशन, राष्ट्रसेविका समिती इत्यादी प्रमुख आहेत. या विविध संस्थांच्याद्वारे जनसेवा, लोककल्याण, समाज प्रबोधनाचे कार्य संघकार्यकर्ते केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरील अनेक देशांत संथपणे व सातत्याने करीत आहेत. भारतातील विविध भाषांमधून हिंदुराष्ट्रवादी विचारसरणीचे साहित्यही आज निर्माण होत आहे. या संघटनेचा उक्तीपेक्षा कृतीवर अधिक भर आहे. आज हिंदुमहासभेचे नाममात्र हिंदुसंघटन अस्तित्वात असून खरेखुरे हिंदुत्वनिष्ठ असे विशाल संघटन संघकार्याच्या रूपानेच आज देशात उभे आहे आणि हिंदुराष्ट्रवादाच्या भूमिकेतूनच ते कार्य अप्रतिहत सुरू आहे.

विचारवंतांनी व्यक्त केलेली उणीव

लोकमान्य टिळक, आगरकर यांच्या राष्ट्रवादी विचारांत आर्थिक प्रश्नांसंबंधी विवेचन आलेले आहे. डॉ. केतकरांनीही राष्ट्रवादी भूमिकेतून आर्थिक विकासाचे दिग्दर्शन केलेले आहे. आर्थिक विषमतेचे मूळ संपत्तीच्या विषम वाटणीत आहे असे स्वा. सावरकर यांनी प्रतिपादन केलेले आहे. हिंदुराष्ट्रवादी संघकार्यकर्त्यांची हिंदुराष्ट्राच्या आर्थिक विकासाची दृष्टी अजून स्पष्ट झालेली नाही. स्व. दीनदयाल उपाध्याय यांनी त्या दृष्टीने एकात्म राष्ट्रवादाची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केलेला होता एवढेच त्या संदर्भात म्हणता येते. मात्र विचारवंतांना ही या संघटनेतील उणीव वाटते एवढेमात्र निश्चित.

एका व्यावहारिक शंकेचे निरसन

डॉ. हेडगेवार आणि गुरुजी गोळवलकर यांना साहित्यिक म्हणून मान्यता आहे काय ?

डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी या दोन्ही ध्येयवादी, हिंदुत्वनिष्ठ देशभक्तांनी हिंदूंचे एक भव्य संघटन भारतात निर्माण केले असले तरी साहित्यिक म्हणून त्यांना मान्यता देता येईल काय ? हीच ती व्यावहारिक शंका होय. इतर राष्ट्रवादी विचारवंतांनी आपल्या ज्ञानाला, अनुभूतीला ग्रंथनिविष्ट केलेले आहे. तसा प्रकार या व्यक्तींच्या बाबतीत आढळून येत नाही. परंतु संघटनेचे कार्य करताना त्यांनी आपल्या वाणीचा भरपूर उपयोग केलेला आहे हेही नाकारता येत नाही. या दोघांनाही अभिव्यक्तीचे मंत्र व तंत्र चांगलेच अवगत होते. त्याचे प्रत्यंतर त्यांनी हजारो स्वयंसेवकांना पत्राद्वारे केलेल्या मार्गदर्शनांतून आणि हजारो स्थळी, सहस्रावधी प्रसंगी त्यांनी केलेल्या उत्स्फूर्त भाषणांतून आल्याशिवाय राहत नाही. आज गुरुजींच्या भाषणांचे खंड उपलब्ध आहेत.

डॉ. हेडगेवार, श्रीगुरुजी यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कार्य करणारे शेकडो कार्यकर्ते, वक्ते, संघटक, साहित्यिक आणि कलावंत भारतात आणि महाराष्ट्रातही अस्तित्वात आहेत. उदाहरणार्थ, सरसंघचालक श्री. म. द. उपाख्य बाळासाहेब देवरस, श्री. दीनदयाल उपाध्याय, श्री. अटलबिहारी वाजपेयी, श्री. लालकृष्ण अडवानी, प्रो. बलराज मधोक, प्रो. राजेंद्रसिंहजी, श्री. कुप्पू सी. सुदर्शनजी, श्री. एकनाथजी रानडे, श्री. बाबासाहेब आपटे, श्री. द. बा. ठेंगडी, श्री. माधवराव मुळे, श्री. यादवराव जोशी, श्री. भाऊराव देवरस, श्री. नानाजी देशमुख, श्री. भैय्याजी दाणी, श्री. हो. वे. शेषाद्री, श्री. मोरोपंत पिंगळे, डॉ. आबाजी थत्ते यांच्यासारखे अनेक संघकार्यकर्ते अखिल भारतीय स्तरावर कार्य करीत आहेत. महाराष्ट्रात, श्री. नानाराव फडके, श्री. लक्ष्मणराव इनामदार, श्री. रामभाऊ

म्हाळगी, श्री. ब. ना. जोग, प्रा. मा. गो. वैद्य, श्री. विद्याधर गोखले, श्री. देवधर, श्री. ग. वा. बेहरे, श्री. व. मो. पुरंदरे, डॉ. श्री. भा. वर्णेकर, श्री. गो. नि. दांडेकर, श्री. दि. भा. घुमरे, श्री. सुधीर फडके, श्री. राजदत्त, डॉ. वसंत वन्हाडपांडे, श्री. सुरेश देशपांडे, श्री. बलवंत वष्ट, श्री. विजय देशमुख, श्री. मुकुंद पुल्लीवार, विद्या वाचस्पती विष्णूजी क्षीरसागर असे संघटक, कार्यकर्ते, संपादक; लेखक, संशोधक, कलावंत, गायक, कवी, वक्ते कार्यरत आहेत. ही श्रेयनामावली आणखी वाढण्यासारखी आहे. परंतु आरंभीच्या शंकेचे निरसन करण्यासाठी ही उदाहरणे पुरेशी आहेत.

महात्मा गांधींचा राष्ट्रवाद

अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे युगपुरुष महात्मा गांधी

लोकानुरंजन, रणरंगधीर मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाशिवाय रामायणाची किंवा साधूंचे परित्राण आणि दुष्टांचा विनाश करणाऱ्या सुदर्शनधारी योगेश्वर श्रीकृष्णाशिवाय भगवद्गीतेची जशी कल्पनाच करता येत नाही तशीच सत्य, अहिंसेच्या आणि प्रेमशांतीच्या तत्त्वांचा पुरस्कार करून विश्वबंधुत्वाची शिकवण देणाऱ्या युगपुरुष गांधीजींशिवाय आधुनिक भारताची कल्पना करता येत नाही. गेली सुमारे साठ वर्षे भारतातच नव्हे तर भारताबाहेरील देशात गांधीजींचे जीवन आणि त्यांचे जीवनदर्शन सतत चिंतनाचा विषय बनलेले आहे. त्रिखंडावर आपला प्रभाव गाजविणारा विलक्षण महापुरुष अलीकडच्या काळात दुसरा झालेला नाही असे इतिहासकारांनी मान्य केलेले आहे.

मानवतेचा पुजारी

आधुनिक भारताचे एक युगपुरुष, मानवतेचे पुजारी, प्रेमशांतीचा संदेश देणारा महात्मा; सत्याग्रहाच्या क्रांतिमार्गाचा द्रष्टा महापुरुष, सत्य, अहिंसेच्या तत्त्वांचा निस्सीम उपासक, सर्वधर्म समभाव बाळगणारा उदारात्मा, हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यासाठी स्वतःचे प्राण पणाला लावणारा थोर हुतात्मा, एक श्रेष्ठ पक्षसंघटक, मानवधर्मप्रसारक, पददलितांच्या सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीविरुद्ध लढणारा समाजसुधारक, अखिल मानवजातीच्या मुक्तिसंग्रामाचा स्वयंसिद्ध नेता; महान देशभक्त इत्यादी विविध विशेषणांनी त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे. आधुनिक भारत म्हणजे गांधीजींचा भारत असे इतर राष्ट्रांतील लोक समजतात इतके ते मान्यता पावलेले आहेत.

गांधीजींचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

गांधीजी जसे एक महान देशभक्त, सत्याग्रही वीरपुरुष, सत्यसंशोधक होते तसेच ते एक क्रांतिकारक, कुशल संघटक, विचारवंत, लेखक, पत्रकार, राजकीय कार्यकर्ते, मुत्सद्दी आणि धर्मनिष्ठ कर्मयोगी साधकही होते. १९२० नंतर भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे सेनापतिपद त्यांच्याकडे चालत आले आणि त्याबरोबरच काँग्रेसपक्षाचे नेतृत्वही त्यांच्याकडे आले. ते त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत कुणालाही काढून घेता आले नाही. त्यांच्या नेतृत्वाच्या काळातच भारत स्वतंत्र झाला आणि राष्ट्रपिता म्हणूनही लोकांनी त्यांचा गौरव केला आहे. महात्मा गांधींचा केवळ महाराष्ट्रावर नव्हे तर लो. टिळकांप्रमाणे संपूर्ण भारतावरच प्रभाव होता. त्यामुळे त्यांच्याही राष्ट्रवादी विचारसरणीचा परिचय करून देण्याचे ठरविले आहे. इतर राष्ट्रवाद्यांप्रमाणेच गांधीजीही कट्टर राष्ट्रवादी होते परंतु त्यांच्या राष्ट्रवादाची कक्षा अत्यंत व्यापक होती. म्हणूनच त्यांच्या राष्ट्रवादाला अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवाद असे समर्पक नाव दिलेले आहे.

अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचे स्वरूप

पहिल्या प्रकरणात सर्वसामान्य राष्ट्रवादाचे विवेचन करताना ग्रिनबर्ग या पाश्चात्य राष्ट्रवादाच्या अभ्यासकाचे एक वर्गीकरण आलेले आहे. पुनरुक्तीचा दोष पत्करूनही त्याचा उल्लेख विषय आकलनाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे करणे भाग आहे. राष्ट्रवादाच्या पर्यवसानावरून (१) भौतिक राष्ट्रवाद आणि (२) आध्यात्मिक राष्ट्रवाद असे द्विविध वर्गीकरण ग्रिनबर्गने मांडलेले आहे. भौतिक राष्ट्रवादाचे स्पष्टीकरण करताना तो म्हणतो की, ज्या राष्ट्रवादाचे पर्यवसान, राष्ट्राराष्ट्रातील लोकसमूहांत द्वेष, तिटकारा, शत्रुत्व निर्माण करण्यात होते, ज्यातून संघर्षाची ठिणगी पडून युद्धाची निर्मिती होऊन भौतिक संपत्तीचा आणि शेवटी मानवजातीचाही भयंकर संहार होतो तो भौतिक राष्ट्रवाद होय. ज्यातून प्रेमाची, सहकार्याची, सहानुभूतीची भावना विकसित होते, परस्पर बंधुत्वाच्या भावनेवर, समतेवर ज्याचे अधिष्ठान असते व अशाच भावनांचा परिपोष करण्याचे कार्य जो राष्ट्रवाद करतो तो अध्यात्मिक राष्ट्रवाद होय.

अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाची भारतीय परंपरा

पाश्चात्यांचा आध्यात्मिक राष्ट्रवाद समतेच्या व बंधुत्वाच्या तत्त्वावर अधिष्ठित असल्याचे ग्रिनबर्गने सांगितले असल्यामुळे त्याचा उदय फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात झाला असे म्हणता येते. आमच्याकडे या राष्ट्रवादाची परंपरा वेदउपनिषदांइतकी जुनी असल्याचे दिसून येते. "सर्वं खलु इदं ब्रह्म" अथवा "ईशावास्यमिदं सर्वम् यत्किं च जगत्यां जगत्" या यजुर्वेदातील मंत्रांतून व्यक्त होणाऱ्या अद्वैत वेदांताच्या मूल्यविचारांत हाच राष्ट्रवाद आहे हे अधिक विस्ताराने सांगण्याची आवश्यकता नाही. ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेत विवेकानंदांनी केलेले भाषण म्हणजे अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचा पुरावा आहे. स्वामीजी विविध देशांतून त्या परिषदेकरिता आलेल्या प्रतिनिधींना आणि हजारो अमेरिकन स्त्री-पुरुषांना उद्देशून म्हणाले, "परधर्मसहिष्णुता आणि विश्वबंधुत्व ह्यांची ओळख साऱ्या जगास ज्या धर्माने प्रथम करून दिली त्या देशात माझा जन्म झाला ह्याचा मला अभिमान वाटतो. स्वतःच्या राष्ट्रात मतभेदामुळे ज्यांचा छळ झाला व वित्त आणि जीवित यांनाही सुरक्षितता राहिली नाही अशा सर्व धर्मांच्या वा जातींच्या लोकांस ज्या भूमीने आश्रय दिला तीच माझी जन्मभूमी आहे याचा मला अभिमान वाटतो."

हिंदुधर्म सहिष्णू का ?– या प्रश्नाचे उत्तर स्वामी विवेकानंदांसारखेच गांधीजींनी दिलेले आहे. ते सांगतात, "हिंदू धर्म कोई एकांगी धर्म नही है। उसमे संसार के सब पैगम्बरों, या विभूतियों की पूजा के लिए स्थान है। साधारण अर्थ में वह प्रचारक धर्म नही है। बेशक, उसने अनेक जातियों को अपने में समालिया है। परंतु यह क्रिया विकासक्रम के न्याय से अदृश्य रूपमें हुई है। हिंदुधर्म कहता है कि, सब अपनेही विश्वास या धर्म के अनुसार ईश्वर की पूजा करे, इसलिये वह सब धर्मोंके साथ शान्तिसे रहता है।"[३०१] दुसऱ्या एका ठिकाणी गांधीजी म्हणतात,

"For me the road to salvation lies through in cessant toil in the service of my country and of humanity. I want to identify myself with everything that lives. In the language of Gita, I want to live at peace with both friend and foe. So my patriotism is for me a stage on my journey to the land of eternal freedom and peace. Thus it will be seen that for me there are no politice devoid of religion."[३०२]

प रिस्थितीमुळे गांधीजी राजकारणात ओढले गेले

महात्मा गांधींच्या जीवनाचे दोन भाग पडतात. त्यात १९२० पर्यंतचा पूर्वार्ध आणि १९२० नंतरचा १९४८ पर्यंतचा सुमारे २७ वर्षांचा उत्तरार्ध. गांधीजींनी भारतीय राजकारणाची सूत्रे हाती घेतली त्यावेळी त्यांचे वय ५१ वर्षांचे होते. या वयात त्यांच्या आचार-विचारांना परिपक्वता आलेली होती. त्यांच्या श्रद्धा आणि निष्ठांना निश्चित दिशा लाभलेली होती. "सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात गांधीजींचे पदार्पण आपल्या देशाच्या चमत्कारिक परिस्थितीमुळे घडलेले आहे. देशबांधवांपैकी काही जसे इतरांपेक्षा जास्त सुदैवी होते त्याचप्रमाणे तेही होते. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर, " To see England the land of the philosophers and poets the very centre of civilisation" [३०३] एवढ्या सामान्य आकर्षणाने आणि आदराने ते इंग्लंडला गेले. योगायोगाने बॅरिस्टरही झाले आणि स्वतः आणि आपले कुटुंब सुखसमाधानाने राहावे म्हणून त्यांनी पैसा मिळविण्याच्या हेतूने धंदाही सुरू केला.

विलायतेला जाण्यापूर्वीच त्यांचा विवाह झालेला होता. आपल्या धंद्याच्या कामासाठीच ते दक्षिण आफ्रिकेत गेले. लवकरच दक्षिण आफ्रिकेतील सर्व हिंदवासीयांचे ते पुढारी आणि मार्गदर्शक बनले. त्या लढ्यातच त्यांनी सामाजिक अन्याय दूर करण्याचे एक नवे धोरण अमलात आणले. त्यांनी सत्याग्रहाची तत्त्वे शोधून काढली. या लढ्यात त्यांना असे आढळून आले की, "सत्य आणि अहिंसा ही वैयक्तिक आणि कौटुंबिक संबंधातच हितावह आहे असे नव्हे तर आंतर सामाजिक संबंध सुरक्षित राखण्यासही ती फार उपयुक्त अशी शस्त्रे आहेत. " [३०४]

गांधीजींच्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि साहित्य

धर्मश्रद्ध आईवडिलांच्या पोटी गांधीजींचा जन्म झालेला असल्याने बालवयातच त्यांच्यावर चांगले संस्कार झालेले होते. आईवडिलांव्यतिरिक्त ज्या तीन महत्त्वपूर्ण व्यक्तींचा गांधीजींच्या जीवनावर प्रभाव पडलेला होता त्यातील एक भारतीय आणि दुसरे दोघे पाश्चात्य होते. गांधीजींच्या शब्दांतच सांगावयाचे तर "तीन पुरुषोने मेरे जीवनपर बहुत बडा प्रभाव डाला है। उसमे पहला स्थान मैं रायचन्द कवि को देता हूं, दुसरा टॉलस्टाय और तिसरा रस्किन." [३०५] या तिघांप्रमाणेच सुप्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञ थोरो यांचाही गांधीजींवर अतिशय प्रभाव होता. ग्रामोदयाची कल्पना त्यांना 'थोरो' च्या तत्त्वज्ञानातून सुचली असे सांगितले जाते. भारतीय थोर पुरुषांत स्वामी विवेकानंद, न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले आणि लोकमान्य टिळक यांचाही गांधीजींवर प्रभाव होता.

महात्माजींचे ग्रंथवाचन तसे मर्यादितच होते, परंतु जे होते ते मात्र सूक्ष्म व सखोल होते. त्यांनी सर एडविन अर्नाल्डचे भगवद्गीतेचे भाषांतर वाचले होते. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, "भगवद्गीता हा अमूल्य ग्रंथ आहे अशी माझी त्यावेळी समजूत झाली. ती हळूहळू दृढ होत गेली व आज तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मी तिला सर्वोत्तम ग्रंथ समजतो. माझ्या निराशेच्या प्रसंगी त्या ग्रंथाने मला अमूल्य मदत दिली. तिची इंग्रजी भाषांतरे बहुतेक सर्व मी वाचली आहेत. पण एडविन अर्नाल्डचे भाषांतर मला सर्वांत उत्तम वाटले. " [३०६]

याच अर्नाल्डचे 'लॉईट ऑफ एशिया' या नावाचे बुद्धाचे चरित्र गीतेपेक्षाही अधिक आवडीने वाचले असे त्यांनी आत्मकथेत नमूद केले आहे. टॉलस्टायचे 'किंग्डम ऑफ हेवन विदिन यू,' 'गॉस्पेल इन ब्रीफ', 'व्हॉट टू डू' या ग्रंथांचे त्यांचे अध्ययन होते. रस्किनचा 'अन टू धिस

लॉस्ट ' [Un to this last - -] हा सुप्रसिद्ध ग्रंथ त्यांच्या वाचनात होता आणि सर्वोदयाचा विचार त्यांना या ग्रंथावरून सुचला होता. याशिवाय, नर्मदाशंकर, मॅक्समुल्लर, विवेकानंदांचा ' राजयोग ' इत्यादी ग्रंथ त्यांनी अभ्यासिले होते. झरतूष्टाची वचने, ' महंमदाची,' कार्लाइल लिखित प्रशस्ती आणि ' हिरो ॲण्ड हिरो वर्शिप ', ' बायबल', मॅडम ब्लावॅटस्कीचे ' की टू फिलासॉफी ' डॉ. ॲनि बेझंटचे ' थिआसॉफिस्ट आत्मवृत्त ' इत्यादी साहित्यही त्यांनी वाचलेले होते. या सर्वात भगवद्गीतेने ते अधिक प्रभावित झालेले होते. म्हणूनच त्यांनी पुनः पुनः आपल्या जीवनाचे ध्येय ईश्वरसाक्षात्कार हे आहे, मोक्षप्राप्ती आहे, या देहाच्या बंधनातून आत्मा मुक्त करण्याचे शिक्षण म्हणजे माझी देशसेवा आहे, [३०७] असे स्पष्ट केलेले आहे.

गांधीजींची राजनिष्ठा

दक्षिण आफ्रिकेतील नाताळात असताना कोणत्याही सभेला गांधीजी उपस्थित राहिले की ' गॉड सेव्ह दि किंग ' हे इंग्लडचे राष्ट्रगीत भक्तिभावाने म्हणत असत. ते आत्मकथेत लिहितात " ब्रिटीश राजवटीत काही दोष असले तरी एकंदरीत ती राजवट मला चांगली वाटत असे. ब्रिटीश अंमल व ब्रिटीश अंमलदार यांचे एकंदर धोरण प्रजेला हितकारक आहे असे मला त्यावेळी वाटत असे. राजनिष्ठा हे एक ऋण आहे असे समजून मी ते नेहमी फेडीत आलो आहे. " [३०८] (आत्मकथा पृ. [१५८]) इंग्रज लोकांप्रमाणे इंग्रजी साम्राज्यासंबंधीही गांधीजींची राजनिष्ठा होती. नाताळात अचानक झुलू लोकांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड केले. या झुलू लोकांचे हिंदी लोकांशी वैर अथवा भांडण नव्हते तरीही गांधीजींनी इंग्रज अंमलदारांना सहकार्य करण्याची जी तयारी दाखविली आणि हिंदी लोकांचे सुश्रूषापथक उभारून ते कार्याला लागले.

आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण करताना गांधीजी म्हणतात, " पण इंग्रजी साम्राज्य हे जगाचे हित करणारे साम्राज्य आहे असे मला त्यावेळी वाटत असे. माझी राजनिष्ठा हृदयापासूनची होती. "[३०९] पुढे बोअर युद्धातही गांधीजींनी इंग्रज सरकारचीच बाजू घेतली.

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळात गांधीजी भारतात होते आणि इंग्रजांच्या बाजूने लष्करभरती करण्यासाठी स्वतः खेडा जिल्ह्यात प्रयत्न करीत होते. रिक्रूट भरतीसाठी काढलेल्या पत्रकात गांधीजी म्हणतात, " ब्रिटीश राज्याने अनेक अपकृत्ये केली आहेत. त्यामध्ये सर्व प्रजेला निःशस्त्र बनविण्याच्या कायद्याचा इतिहास पाहता तो सर्वात अधिक काळा कायदा दाखवील. हा कायदा रद्द करावयाचा असेल व शस्त्रांचा उपयोग करावयाला शिकावयाचे असेल तर ही सोन्यासारखी संधी आहे. साम्राज्याला संकटकाळी सर्वशक्तीनिशी मदत करणे हा आमचा धर्म आहे, पण मला हेही सांगितले पाहिजे की त्यामध्ये अशी आशाही साठविली आहे की अशी मदत केल्याने आम्हाला आमचे ध्येय अधिक लवकर गाठता येईल... भेद पुसून टाकू शकू."[३१०]

गांधींना झालेला राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा साक्षात्कार

गांधीजींच्या राजनिष्ठेसंबंधी केलेली चर्चा कित्येकांना अप्रस्तुत वाटण्याची शक्यता आहे, परंतु गांधीजींच्या राष्ट्रवादाच्या कल्पनांचे स्वरूप समजावून घेताना ही पार्श्वभूमी अभ्यासकाने यथार्थ मूल्यमापनाच्या दृष्टीने डोळ्यापुढे ठेवणेही आवश्यक आहे. राजनिष्ठेची भावना वयाच्या पंचेचाळीस शेहेचाळीस वर्षापर्यंत गांधीजींच्या अंतःकरणात होती.

इंग्रजी राज्यकर्त्यांचे वास्तव स्वरूप

इंग्रजी साम्राज्याच्या दर्पाची जाणीव गांधीजींना प्रथम आली ती ते जेव्हा भारतात आगबोटीने परत यायला निघाले तेव्हा. आपण झुलू बंडात, बोअर युद्धात इंग्रजांना मदत केली, 'गॉड सेव्ह दि किंग' म्हणून राजनिष्ठा प्रकट केली तरीही इंग्रज माणूस आपण हिंदी म्हणून तुच्छतेने पाहतो हे गांधीजींच्या लक्षात आले. ते स्वतःच लिहितात, "एखाद्या दुसऱ्या इंग्रजाबरोबर बोलणे होई, पण ते 'साहेब सलाम ?' पुरतेच, हृदयाची भेट होत नसे. दक्षिण आफ्रिकेच्या बोटीत काय किंवा दक्षिण आफ्रिकेत काय हृदयाच्या भेटी होऊ शकल्या नव्हत्या. असल्या भेदाचे कारण मला तरी हेच दिसले की, इंग्रजांच्या मते मी राज्यकर्ता आहे आणि हिंदी माणसाच्या मते मी परक्याच्या सत्तेखाली आहे, ह्या जाणिवेचा परिणाम मग तो लक्षात येवो किंवा न येवो, व्हायचा तो होतच होता."[३११] भारतात गांधीजी आल्यानंतर तो वारंवार जाणवू लागला. रौलट ॲक्टच्या निमित्ताने ब्रिटिशांनी केलेल्या दडपशाहीत व क्रूर अत्याचारात तो अधिक स्पष्ट झाला आणि गांधीजींना खऱ्या अर्थाने राष्ट्रीय जाणिवेचा साक्षात्कार झाला.

लोकांना पुरुषत्वहीन बनविण्याचा इंग्रजांचा प्रयत्न

जालियनवाला बाग हत्याकांडानंतर गांधीजींना आपल्या शांत संयमी वृत्तीला नियंत्रणात ठेवणे अशक्य झाले. त्यांना संताप आला तो इंग्रजांचा आणि भारतीयांचाही. ते जसे जुलमी परकीय सत्तेचे निरीक्षण करू लागले तसेच एक भारतीय या दृष्टीने आत्मपरीक्षणही करू लागले. त्यांना अनेक प्रश्न सतावू लागले. कोणत्या दोषामुळे आम्ही पस्तीस कोटी लोक दुबळे बनलो आहोत ? आमच्या देशातून परदेशात वाहून जाणारा संपत्तीचा ओघ आम्हाला का थोपविता येऊ नये ? आमच्या मुलाबाळांना आम्ही कामधंदे का देऊ शकत नाही ? या देशातील तीन कोटी लोक केवळ दिवसातून एकवेळ भोजन घेऊन का जगतात ? दिवसा ढवळ्या लूटमार होते, ती का ? प्लेग, कॉलरा यासारखे साथीचे भयानक रोग इतर देशांतून मुळासहित नष्ट होतात पण भारतातच का ठाण मांडून बसतात ? याचे कारण काय ? ते लिहितात, "अमृतसर कांड की भयंकरताने लोगोंका ध्यान लाहोर की भयंकरता से हटकर अपनी ओर खिच लिया। हालाकि लाहौर में जो कुछ हो रहा था वह अमृतसर से भी अधिक भयंकर था। क्योंकि वहा लोगोंको धीरे धीरे सर्वथा पुंसत्वहीन बना देनेका प्रयत्न किया जा रहा था"[३१२]

इंग्रजांच्या अत्याचाराची व क्रौर्याची जाणीव

त्यानंतर २७-६-१९२० च्या नवजीवनमध्ये गांधीजी विचारतात, "क्या कारण है मदांध सर मायकेल ओडायर, तथा उद्धत जनरल डायर हमे खटमलकी तरह मसल सकते है ? एवं शिमले के एक पादरी महोदय हमारे संबंधमे अशोभनीय बाते लिखते है ! क्या कारण है कि हमारे साथ पंजाब में अन्याय हुआ, खिलापत के प्रश्नपर ब्रिटनके पंतप्रधान ने अपना वचनभंग किया और हम इन दोनो विषयमें निरुपाय जान पडे है। इसका कारण है स्वार्थदृष्टी, देशके लिये स्वार्थत्याग करनेका अभाव, हमारी कायरता, हमारा दम्भ और हमारा अज्ञान, जबतक हम इन बातोपर तिलांजली नही देते तब तक भारतकी वास्तविक उन्नती होना संभव नही."[३१३]

निसर्गाचा नियम राष्ट्राला लागू आहे

राष्ट्रनिर्मिती ही सहज साध्य होणारी, वर्षाकाळी उगवणाऱ्या गवतासारखी गोष्ट नाही. कष्ट आणि त्यागाचे खतपाणी घातल्याशिवाय राष्ट्र-उन्नतीचा वृक्ष फोफावत नाही आणि त्याला स्वातंत्र्याची

फळे येत नाहीत. गांधीजींनी तोच विचार भारतीयांपुढे मांडला आहे. ते म्हणतात, "यातनाकी आगमें तपेविना आजतक किसी भी राष्ट्रका उत्थान नही हो सका है। बच्चे की रक्षा के लिये माता अनेक तरह की यातना सहती है। अंकुर उगने के पहिले बीज को सडने पडता है–मरण से ही जीवनकी उत्पत्ती है। क्या भारत कष्ट सहन द्वारा शुद्धीकरण के इस प्राकृतिक नियमका पालन किये बिना गुलामीसे अपना उद्धार कर सकेगा ?"[३१४] पुढे गांधीजींनी हरिश्चंद्राचे उदाहरण दिलेले आहे.

स्वातंत्र्यासाठी बलिदानाची सिद्धता ठेवा

आमच्या स्वातंत्र्यप्राप्तीला उशीर होण्याचे कारण सांगताना गांधीजी म्हणतात, "यदि हम स्वराज्य लेना चाहते है और अपने को उसके योग्य सिद्ध करना चाहते है तो हमे मृत्युका भय बिलकूल छोड देना पडेगा। स्वराज्य प्राप्तीमें हमें जो विलंब हो रहा है उसका एकमात्र कारण है हम लोगोंमें मृत्यु तथा उससे दुखोंको सहनेकी शक्तीका अभाव."[३१५]

भारत हे प्राचीन काळापासून राष्ट्र आहे

१९०८ साली इंग्लंडमध्ये असताना गांधीजींनी इंडिया हाऊसमधील क्रांतिकारक तरुणांशी राष्ट्रीय प्रश्नासंबंधी चर्चा केली आणि त्या चर्चेवर आधारित 'हिंद स्वराज्य' या नावाची एक पुस्तिका प्रकाशित केली. प्रस्तुत पुस्तिकेत गांधीजींनी आपले राष्ट्रविषयक विचार मांडलेले आहेत. भारत हा कधीच एकराष्ट्र नव्हता या इंग्रजविद्वानांच्या आक्षेपाला उत्तर देताना गांधीजी म्हणतात, "हमको अंग्रेजोंने सिखाया है कि हम एक राष्ट्र नही थे और एक राष्ट्र बनने के लिये सैकडो बरस लगेगे। यह बात बिलकूल बे बुनियाद है। जब अंग्रेज हिंदुस्थानमें नही थे तब भी हम एक राष्ट्र थे। और हमारे विचार एक थें, हमारा रहनसहन एक था। तभी तो अंग्रेजोने यहां एकराज्य कायम किया। भेद तो बादमें उन्होने पैदा किया."[३१६]

आमच्या देशाची निर्मिती निसर्गाने वैशिष्ट्यपूर्णतेने केली नि राष्ट्रीय ऐक्याची भावनाही जोपासली

"एकराष्ट्र का यह अर्थ नही की हमारे बीच अन्तर नही था, लेकीन हमारे बडे लोग पैदल या बैलगाडी में हिन्दुस्थान का सफर किया करते थे। वे एक दुसरे की भाषा सिखते थे। और उनके बीच कोई अन्तर नहीं था। जिन दूरदर्शी पुरुषोंने सेतुबंध रामेश्वर, जगन्नाथपुरी, और हरिद्वारकी यात्रा ठहराई उनका आपकी रायमें क्या ख्याल होगा ? वे मूर्ख नही थे, यह तो आप कबूल करेंगे। वे जानते थे कि ईश्वरभजन तो घर बैठेही होता है। उन्होंनेही हमें सिखाया है कि मन चंगा तो कठौती में गंगा, लेकिन उन्होंने सोचा कि कुदरत ने हिंदुस्थान को एक देश बनाया है। इसलिये उन्होंने अलग अलग स्थान तय करके लोगों को एकता का खयाल इस तरह दिया जैसा दुनियामें और कहीं नहीं दिया गया है।" [३१७]

दैवी शक्तीच्या अधिष्ठानातून महान फळाची प्राप्ती

गांधीजींची परमेश्वरावर नितांत श्रद्धा होती. शुद्ध अंतःकरणाने उपवास व प्रार्थना केल्यास आपल्याला उदात्त अशा महान फळाची प्राप्ती होऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता. केवळ आपल्या देशाच्या कल्याणासाठीच नव्हे तर इतर राष्ट्रांच्या कल्याणासाठीही त्यांनी भारतीयांना उपोषणाचा मार्ग सुचविला होता. उदाहरणार्थ, तुर्कस्थानची एकता आणि अखंडता कायम राहावी आणि ते कार्य यशस्वी व्हावे, त्याकरिता नैतिक सामर्थ्य निर्माण करावे या हेतूने गांधीजींनी भारतीय

जनतेला चोवीस तासांचे उपोषण करावयास सांगितले होते. उपवास व प्रार्थना याद्वारा मिळणाऱ्या दैवी शक्तीवर त्यांची श्रद्धा होती. ते सांगतात, " मेरा यह विश्वास और अनुभव है कि उपवास और प्रार्थना सच्चे दिलसे और धार्मिक वृत्तीसे किये जाय तो उससे महान् फल की प्राप्ति हो सकती है।" पुढे गांधीजी सांगतात, एकलौते पुत्रकी मृत्यु से मा को दुख होता है, उसे खानेकी सुध नही रहती। ऐसी पीडा जब राष्ट्र के किसी व्यक्ति के दुखी होनेपर अन्य सब लोगों को होती है तब राष्ट्र जन्म होता है ऐसा कहा जा सकता है। ऐसा राष्ट्र अमरत्व भोगने योग्य बनता है।" ३१८

मुसलमानांचे वेगळे राष्ट्र निर्माण करा या बॅ. जिनांच्या मागणीला गांधीजींचे उत्तर

भारत हे एक राष्ट्र आहे यावर गांधीजींची श्रद्धा होती, तसेच प्राचीन परंपरेने हे राष्ट्रीयत्व भारताला लाभले आहे यावर त्यांचा विश्वास होता. मुसलमानांचे आक्रमण आणि आगमन होण्यापूर्वी भारत एक राष्ट्र होते असे मत १५ सप्टेंबर १९४४ च्या पत्रातून त्यांनी मांडलेले आहे. ते बॅ. जिनांना लिहितात, " मैं इतिहास में ऐसा कोई उदाहरण नहीं पाता जहां धर्मांतरितो एवं उनके वंशजोने अपने मूल समाज से पृथक राष्ट्र होने का दावा किया हो। यदि भारत इस्लाम के आगमन के पूर्व भी एक राष्ट्र था तो वह उसके काफी सारे पुत्रोंद्वारा धर्मांतरण के बाद भी एकराष्ट्रही रहेगा।" ३१९

गांधीजींचा जाज्वल्य मातृभाषाभिमान

भारतीय धर्माचा, भारतीय परंपरेचा, भारतीय संस्कृतीचा आणि भारताच्या उज्ज्वल राष्ट्रीयत्वाचा गांधीजींना अभिमान होता हे आतापर्यंतच्या विवेचनावरून सहज लक्षात येण्यासारखे आहे. आपपर-भाव हे राष्ट्रीयत्वाचे जसे एक लक्षण आहे तसेच स्वभाषेबद्दलचा अभिमान हे राष्ट्रीयत्वाचे गमक आहे. गांधीजी अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे अन्य भाषा–भाषिकांचा द्वेष करण्याची वृत्ती त्यांची नव्हती, किंवा इतर भाषा व भाषिकांना त्यांनी हीन लेखले नाही. मात्र आपल्या मातृभाषेचा त्यांना पराकोटीचा अभिमान होता आणि प्रत्येक भारतीयाला तो असावा अशी त्यांची शिकवण होती. १५ ऑक्टोबर १९१७ मध्ये भागलपूर येथे झालेल्या विद्यार्थ्यांच्या संमेलनाचे गांधीजी अध्यक्ष होते. त्याप्रसंगी राष्ट्रीय जीवनातील मातृभाषेचे महत्त्व सांगताना अत्यंत कळकळीने ते म्हणाले, " हमने मातृभाषा का अनादर किया है। इस पापका कडुवा फल हमें जरूर भोगना पडेगा। मातृभाषा का अनादर माँ के अनादर के बराबर है। जो मातृभाषा का अपमान करता है वह स्वदेशभक्त कहलाने के लायक नहीं। बहुत से लोग कहते है कि हमारी भाषा में ऐसे शब्द ही नहीं जिनमें हमारे ऊँचे विचार प्रकट किये जा सकते नही। किन्तु यह कोई भाषा का दोष नही। भाषा को बनाना और बढाना हमारा अपना कर्तव्य है।"

ज्ञानाकरिता आंग्लराजभाषेवर अवलंबून असणाऱ्यांना गांधीजींचा सवाल

इंग्रजीचा पुरस्कार करणाऱ्या लोकांसाठी युक्तिवाद करताना गांधीजी म्हणतात, " सारी जनता को नये ज्ञान की जरूरत है। सारी जनता अंग्रेजी नहीं समझ सकती। यदि अंग्रेजी पढनेवालाही नया ज्ञान प्राप्त कर सकता है तो सारी जनता को ज्ञान मिलना असंभव है।" ३२०

इंग्रजी राष्ट्रभाषा होण्याच्या योग्यतेची नाही

एखाद्या भाषेला राष्ट्रीय भाषा म्हणून स्वीकारावयाचे असेल तर त्या भाषेने पुढील किमान अटी पूर्ण केल्या पाहिजेत असे गांधींचे मत होते. (१) शासकीय कर्मचाऱ्यांना ती सहज समजली पाहिजे. (२) तिच्याद्वारे सर्व भारतीयांचे परस्परातील धार्मिक, आर्थिक व राजकीय कामकाज

शक्य झाले पाहिजे. (३) ती भाषा जास्तीत जास्त भारतीय बोलत असले पाहिजे. (४) ती सर्वांना सुलभतेने उपयोगात आणता आली पाहिजे. (५) क्षणिक व अस्थायी अवस्थेत जोर देण्याची तिच्यावर आवश्यकता असता कामा नये. राष्ट्रभाषेच्या या पाच लक्षणांपैकी एकही लक्षण इंग्रजी भाषेत नाही, म्हणूनच ती राष्ट्रभाषा होऊ शकत नाही.[३२१] गांधीजींनी म्हणूनच 'हिंदी' या राष्ट्रभाषेचा पुढे आयुष्यभर प्रचार केला.

राष्ट्रीय शिक्षणाची गांधीजींची कल्पना

राष्ट्रीय शिक्षणाने विद्यार्थ्यात चारित्र्यनिर्मिती झाली पाहिजे, त्यांच्या ठिकाणी शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमता असली पाहिजे. खेळ खेळताना त्याने देशी खेळांना प्राधान्य दिले पाहिजे यावर गांधीजींचा कटाक्ष होता. ते लिहितात, " आजीविका का साधन शरीर है। और पाठशाला चरित्रनिर्माणकी जगह है। जिस विद्यार्थी के पास शरीरसंपत्ती नही वह क्या कर सकेगा। जैसे दूध कागज के बर्तन में नही रह सकता वैसे ही शिक्षारूपी दूध का विद्यार्थीयोंके कागज जैसे शरीरसे निकल जाना संभव है। शरीर आत्माका निवासस्थान होने के कारण तीर्थ जैसा पवित्र हैं। उसकी रक्षा करनी चाहिये।... मुझे लगता है कि गेंदवल्ला या बॉलबैट इस गरीब देशके लिये ठीक नही। हमारे देशमें निर्दोष और कम खर्चवाले बहुतसे खेल है।" [३२२]

गांधीजींचा स्वराज्याचा आणि स्वातंत्र्याचा अर्थ

" इंग्रजांच्या उपस्थितीशिवाय आमचे पृथक अस्तित्व असणे, त्यात कुणाची भागीदारी असलीच तर ती स्वेच्छापूर्वक असणे आणि इंग्रजांनी आम्हाला बरोबरीचे समजून बरोबरीच्या नात्याने संबंध ठेवणे आणि आपल्या असहाय अवस्थेतून मुक्त होणे याचे नाव मी स्वराज्य असे समजतो." [३२३]

गांधीजींच्या स्वप्नातील भारत

" मैं एक ऐसे भारत के लिये काम करूंगा जिसमे गरिबसे गरीब भी यह महसुस करे की यह देश उसका है। और उसके निर्माण में उसकी जोरदार आवाज है। ऐसे भारत में मैं काम करूंगा जिसमें ऊंच नीच वर्गो का भेद नही होगा। जिसमें सभी जातियां मेल मिलाप के साथ रहेगी। छुआछूत और नशेबाजी के लिये कोई स्थान नही होगा। स्त्रियो और पुरुषोंके समान अधिकार होंगे। हम शेष दुनियाके साथ शांती के संबंध कायम करेंगे। न शोषण करेंगे और न शोषण होने देंगे, और इसलिये हमारी सेना इतनी कम होगी जिसकी कोई कल्पना नही कर सकता। ऐसे तमाम हितोंका जो लाखो भोले भाले लोगोंके हितोके विरुद्ध नही है उदारता के साथ आदर किया जायेगा। व्यक्तिगत तौरपर मैं स्वदेशी और विदेशी के भेद घृणा करता हूँ। यह है मेरे स्वप्नोंका भारत।" [३२४]

गांधीजींना अभिप्रेत असलेल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ

गांधीजींनी स्वदेशी भावनेला आपल्या जीवनात महत्त्व दिलेले होते. निर्भयतेच्या भावनेच्या विकासाशिवाय मुक्ती संभवत नाही असे त्यांचे प्रतिपादन होते. गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी ज्या निर्भयतेचा पुरस्कार केला ती निर्भयता अभिव्यक्तीतही लेखकांनी दाखविली पाहिजे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. ते लिहितात, " हम भारतीय मक्कारोंकी कोम नही है। हम शिक्षित, शिष्ट और सभ्य लोक है। मैं अपने समाचारपत्रोंके लेखक बंधुओंसे कहता हूँ जो आपको कहना है खुल्लमखुल्ला कहिये। यह हमारा कर्तव्य है। इस प्रकार साफ बात कहने और अपने कार्य का समर्थन सचाईसे करनेपर यदि सरकार हमे दंड दे तो ठीक है उसे दण्ड देने दीजिए। यदि परिणाम अधिक से अधिक

खराब होते भी आप क्या कर सकते है ? ज्यादा से ज्यादा यह होगा कि वे हमारे शरीरों को ले लेंगे । बहुत अच्छा यदि वे हमारे शरीरों को ले लेंगे तो हमारी आत्माएं मुक्त हो जायगी " । ३२५

भौतिक प्रगती आणि आर्थिक विकासासंबंधी गांधीजींचा राष्ट्रीय दृष्टिकोन

भारतातील इंग्रजी सत्ताधीशांच्या नावाने लिहिलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, " स्वराज्य का अर्थ है कम से कम इतना अधिकार प्राप्त करना जिस से राष्ट्र अस्तित्व के लिये महत्त्वपूर्ण भारतीय उद्योग की रक्षा हो सके, और आर्थिक अस्तित्व को खतरा पहुँचानेवाले आयातों को बन्द किया जा सके । कृषि और चरखा राष्ट्ररूपी शरीर के दो फेफडे है । किसी भी किंमत पर उनके क्षय को बचाना नितान्त आवश्यक है । ..... " ३२६

भारत हे खरेखुरे आध्यात्मिक राष्ट्र व्हावे

गांधीजींनी आपल्या स्वप्नातील भारताची प्रतिमा स्पष्ट केलेली असून स्वराज्याचा अर्थही विशद केलेला आहे. परंतु केवळ भौतिक समृद्धीने नैतिक प्रगती घडून येणार नाही असे त्यांनी स्पष्टपणे बजावले होते. गांधीजी म्हणतात, " परमेश्वर और माया दोनों को एक साथ नहीं रखा जा सकता यह अत्यन्त महत्त्वपूर्ण आर्थिक सत्य है । हमने दो में से एक को चुनना होगा । " हमारा राष्ट्र सच्चे अर्थ में आध्यात्मिक राष्ट्र उसी दिन होगा जब हमारे पास सोने की अपेक्षा सत्य का भान्डार होगा, धन और शक्ती के प्रदर्शन की अपेक्षा निर्भयता अधिक होगी और अपने प्रति प्रेम की अपेक्षा दुसरों के प्रति उदारता अधिक होगी।" ३२७

या विवेचनाच्या आरंभी अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचे जे स्वरूप आपण पाहिले होते अगदी त्याच प्रकारचे राष्ट्रवादाचे समर्थन गांधीजींनी केले असल्याची खात्री पटते.

गांधीजींची रामराज्याची कल्पना

अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवाद स्वराज्यात फोफावला पाहिजे अशी गांधीजींची इच्छा होती. राष्ट्राबरोबरच अनेक ठिकाणी राज्याची अथवा स्वराज्याची चर्चा केलेली आहे. आपले स्वराज्य आदर्श असले पाहिजे. त्यातील कारभार नीतीने, न्यायाने आणि धर्माने चालला पाहिजे याकरिता त्यांनी रामराज्याची कल्पना लोकांपुढे मांडली. यंग इंडियाच्या २९–९–१९२९ च्या अंकात रामराज्याचे स्पष्टीकरण करताना म्हणतात, " मी जेव्हा रामराज्य असे म्हणतो तेव्हा मला हिंदुराज्य अभिप्रेत नसते, माझे रामराज्य हे ईश्वरी राज्य किंवा देवाचे राज्य असते. माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर कधी अस्तित्वात असेल किंवा नसेलही परंतु रामराज्याचा प्राचीन आदर्श खऱ्या लोकशाहीचा आदर्श आहे यात मुळीच शंका नाही. त्या राज्यात अगदी तळागाळातील नागरिकाला ताबडतोब न्याय मिळत असे. ..... रामराज्यामध्ये कुत्र्यालाही न्याय मिळाल्याचे वर्णन कवीने केले आहे." २–१–१९३४ च्या ' हरिजन ' मध्ये गांधीजी सांगतात, " रामराज्य म्हणजे शुद्ध नैतिक अधिकारावर आधारलेले जनतेचे सार्वभौम राज्य होय." ३२८

राष्ट्रगीत, राष्ट्रीय झेंडा आणि राष्ट्रीय घोषणा

कोणतेही राष्ट्र म्हटले की त्याला स्वतःचे असे स्फूर्तिदायक राष्ट्रगीत असते, एक राष्ट्रीय ध्वज असतो आणि त्याच्या स्वतःच्या काही राष्ट्रीय घोषणा असतात. गांधीजींनी या घटकांचाही आपल्या राष्ट्रीय विचारांत सावरकरांच्या नंतर प्रामुख्याने विचार केलेला आहे. पाश्चात्यांच्या अनेक सुप्रसिद्ध ' स्फूर्तिदायक राष्ट्रगीतांची ' उदाहरणे देऊन, बंगाली राष्ट्रीय कवी श्री. बंकिमचंद्रांच्या ' वंदे-

मातरम्' या गीताची राष्ट्रगीत म्हणून प्रशंसा केलेली आहे. ते म्हणतात, "इतर राष्ट्रांच्या राष्ट्र-गीतांहून हे गीत अतिशय मधुर आहे आणि त्यातील विचारही उत्तम आहेत. दुसऱ्या राष्ट्राच्या गीतात इतर राष्ट्रांसंबंधी वाईट विचार व्यक्त केलेले असतात तसा प्रकार या गीतात नाही. या गीताचा मुख्य हेतू आहे केवळ स्वदेशाभिमानाची निर्मिती करणे, भारत मातेच्या सर्व गुणांचा आदर करणे. हे गीत मुळात बंगालीत असले तरी अधिक संस्कृतप्रचुर आहे, मात्र यातील संस्कृत-भाषा समजायला अवघड नाही." [३२९]

भारताचा राष्ट्रध्वज

राष्ट्रगीताप्रमाणेच हिंदुस्थानच्या राष्ट्रध्वजासंबंधीची कल्पना गांधीजींनी १४-४-१९२१ च्या यंग इंडियात पुढीलप्रमाणे मांडली.

"हिंदुमुसलमानांचे ऐक्य केवळ दोघांच्याच ऐक्याचे प्रतीक नाही तर भारतातील विविध धर्मांच्या लोकांचे प्रतीक आहे... माझी सूचना अशी आहे की, ध्वजाची पृष्ठभूमी श्वेत, हरित आणि लाल अशा तीन रंगांची असावी. श्वेत सर्व धर्मांचा पण संख्येत कमी असलेल्या भारतीयांसाठी, दुसरा हिरवा मुसलमानांसाठी आणि सर्वात खाली लाल रंग हिंदूंसाठी. सर्वात जो शक्तिसंपन्न आहे तो अल्पसंख्याकांकरिता ढाल बनून कार्य करील. साधा श्वेत रंग शुद्धीचा आणि शांतीचा द्योतक आहे. आमचा झेंडा शुद्धी आणि शांतीचा द्योतक नसला तर तो व्यर्थ आहे. तसेच जे न्यूनतम आहे ते अधिकतमाच्या समान आहे हे दर्शविण्याकरिता तीनही रंगांचे पट्टे समान कल्पिले आहेत.... राष्ट्ररूपात भारत केवळ चरख्यासाठीच जगू किंवा मरू शकतो.... म्हणून झेंड्यावर मध्यभागी चरखा असणे आवश्यक आहे."[३३०] सर्वधर्मसमभाव व प्रादेशिक राष्ट्रीयतेचा पुरस्कार करण्यासाठी गांधीजी सभासंमेलनाच्या समारोपप्रसंगी तीन राष्ट्रीय घोषणा करीत असत. त्यातून त्यांचा राष्ट्रीय दृष्टिकोन दिसून येतो. त्या तीन घोषणा पुढीलप्रमाणे असत.

(१) "वन्दे मातरम्, भारत माता की जय
(२) हिंदुमुसलमानोंकी जय
(३) अल्लाह ओ अकबर "[३३१]

गांधीजींचे सत्याग्रहाचे शस्त्र

आपल्या कल्पनेप्रमाणे गांधीजींनी राष्ट्रसेवा केली. राष्ट्राच्या मुक्तीसाठी, स्वातंत्र्याच्या लढ्या-साठी त्यांनी एक अभिनव शस्त्र शोधून काढले. या शस्त्रालाच सत्याग्रहाचे शस्त्र असे संबोधण्यात आले. या शस्त्रासंबंधी गांधीजींची कल्पना थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येईल. गांधीजी परमेश्वर म्हणजेच सत्य व सत्य म्हणजेच परमेश्वर समजत असत. त्यांच्या सत्याग्रहाचा तोच प्रमुख आधार होता. "मानवाच्या जीवनास व कृतीस जिवंत स्फूर्ती धर्मातून मिळते. परंतु धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे तर प्राप्त कर्तव्ये स्वेच्छेने व जाणीवपूर्वक करीत राहणे असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता. सत्याची साधना करावयाची तर त्यासाठी अहिंसेचा मार्गच स्वीकारला पाहिजे. कारण अहिंसा सत्याचा आत्मा आहे. इतकेच नव्हे तर त्याचे मधुर फळ आहे. सत्य व अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व त्यांची फारकत करणे शक्य नाही."[३३२]

गांधीवाद आणि मार्क्सवाद यातील भेद आणि साम्य

आचार्य जावडेकरांनी गांधीवादाची मार्क्सवादाशी तुलना करताना गांधीवादाचे वैशिष्ट्य आणि श्रेष्ठत्व दाखविले आहे. ते लिहितात, "केवळ सत्याचा आग्रह एवढ्या एकाच वृत्तीवर भर

दिला तर महात्मा गांधी यांच्याप्रमाणे कार्ल मार्क्स व लेनिन हेही सत्याग्रही होते असे म्हणावे लागेल. कारण तेही सत्यासाठी, सर्वहितासाठी व सर्वोदयासाठीच लढले असे म्हणता येईल, पण सत्याग्रही वृत्ती किंवा सर्वोदयनिष्ठा यात सत्याच्या 'साध्या' इतकाच अहिंसेच्या साधनावरही भर द्यावा लागतो. सत्याग्रही हा क्रांतिकारक असतो तसाच तोही क्रांती अहिंसेने करू इच्छितो. म्हणून सत्याग्रह व सर्वोदयवाद, यात क्रांतिवृत्ती आणि अहिंसावृत्ती या दोहोंचाही अंतर्भाव होतो. म. गांधींच्या जीवनाचा हाच खरा संदेश आहे.

गांधीजी आणि महाराष्ट्र

म. गांधीजी जन्माने आणि भाषेने गुजराथी असले तरी त्यांचा महाराष्ट्राशी अतिशय निकटचा संबंध आला. गांधीजींच्या अध्यात्मनिष्ठ राजकारणाचे गुरू भारतसेवक नामदार गोखले हेच होते असे स्वत: गांधीजींनीच सांगितले आहे. महाराष्ट्रातील प्रागतिक, राष्ट्रीय आणि सशस्त्र संप्रदायापेक्षा गांधीजींचा सत्याग्रही संप्रदाय तात्त्विक दृष्टचा भिन्न असला तरी त्या तिन्ही संप्रदायांतील श्रेष्ठ तत्त्वे त्यात अंतर्भूत झालेली असल्याचे आचार्य जावडेकरांचे मत आहे. प्रा. नरहर कुरुंदकर यांचाही असाच अभिप्राय आहे. ते लिहितात, "गांधींच्या राजकारणाचा वारसा गोखल्यांचा नसून टिळकांच्या राजकारणाचा वारसा आहे, ही बाब आचार्य जावडेकर सोडल्यास इतरांनी लक्षात घेतलेली दिसत नाही."[३३४] साबरमतीनंतर गांधीजींच्या आयुष्याचा बहुतेक काळ महाराष्ट्रात सेवाग्राम येथे गेला त्यामुळे सेवाग्राम हेच भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक चळवळीच्या सूत्राचे केंद्र बनले.

गांधीजींना गुरुस्थानी मानणाऱ्या आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होणाऱ्या आचार्यांची संख्या महाराष्ट्रात अधिक आहे. आचार्य कालेलकर, आचार्य विनोबा भावे, आचार्य जावडेकर, आचार्य शंकरराव देव, आचार्य स. ज. भागवत, आचार्य दादा धर्माधिकारी, साने गुरुजी, मामासाहेब देवगिरीकर, आचार्य सहस्रबुद्धे ही नावे सहज सांगण्यासारखी आहेत. एक जीवननिष्ठा म्हणून या विचारवंतांनी गांधीवादाचा स्वीकार केलेला आहे. त्यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील साहित्यात एक गांधीयुग अस्तित्वात आलेले असून कथा, कादंबरी, कविता, निबंध, चरित्र, इतिहास इत्यादी विविध प्रकारचे साहित्य निर्माण झालेले आहे. मात्र राष्ट्रवादापेक्षाही हे साहित्य मानवतावादाकडे अधिक झुकलेले आहे. डॉ. दि. का. गर्दे सांगतात, " गांधीजी कट्टर राष्ट्रवादी असले तरी त्यांनी मानव्यावर भर दिला त्या दृष्टीने ते आंतरराष्ट्रीयतेचे पुरस्कर्ते होते. राष्ट्रवाद आक्रमक, विधायक अथवा व्यावर्तक (Exclusive) नसावा तर विधायक व मानवतापोषक असावा. आपल्या देशाचे स्वातंत्र्य मिळवीत असता इतरांचे शोषण होऊ नये, आपला देश स्वतंत्र झाल्याने त्याला जगाच्या संपन्नतेत व संस्कृतीत भर टाकता यावी, आपल्या राष्ट्राच्या त्यागाने मानवजात जगावी व सुखी व्हावी, तिच्यात वंशद्वेषाला थारा राहू नये असे त्यांना वाटे." [३३५] या सर्व शिकवणीतच गांधीजींच्या अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचे रहस्य आहे. सश्रद्ध, आस्तिक, धार्मिक, सनातनी, वर्णाश्रमाला महत्त्व देणाऱ्या एका राजकीय नेत्याचे हे राष्ट्रवादी विचार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद

आधुनिक भारताचा भीम

भारतीय घटनेचे एक शिल्पकार आणि पददलितांचे स्वयंभू नेते म्हणून डॉ. भीमराव रामजी आंबेडकर उपाख्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भारतात लौकिक आहे. महाभारतातला भीम

जसा आपल्या बांधवांवर झालेल्या अन्यायाने पेटून उठला होता आणि त्या अन्यायाला जवाबदार असणाऱ्या स्वकीयांवरही ज्याने आपल्या वज्रप्राय गदेचे निर्मम प्रहार केले होते, उच्चारलेल्या प्रतिज्ञांची पूर्ती केली होती तशीच कृती दलित बांधवांचा कैवार घेणाऱ्या या आधुनिक भारतातील भीमानेही केलेली आहे. मात्र परकीयांशी संघर्षाचा प्रसंग आला असता कौरव आणि पांडव जसे एकशेपाच म्हणून उभे राहिले तसेच राष्ट्रीय हितासाठी सवर्ण भारतीय लोकांबरोबर आपल्या पदलित अनुयायांना घेऊन बाबासाहेब उभे राहिले आहेत म्हणूनच राष्ट्रवादी पुढाऱ्यांतच त्यांचा समावेश करावा लागतो.

माणसाच्या मूल्यमापनाची भारतीयांची पद्धती

माणसाचे राष्ट्रीय दृष्टीने मूल्यमापन करण्याची भारतीयांची पद्धती आहे. तिचा उल्लेख करून आचार्य अत्रे म्हणतात, "गेल्या पन्नास वर्षांमध्ये तरी माणसाचे मूल्यमापन राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने करण्याची हिंदुस्थानच्या जनतेला सवय जडलेली आहे. त्यामुळे अराष्ट्रीय राजकारणाचा जो पुरस्कार करतो त्याला लोक पायाखाली तुडवितात. मनुष्य कितीही विद्वान असो, कर्तृत्ववान असो किंवा चरित्र्यसंपन्न असो, त्याची राजकीय मते जर राष्ट्रीय चळवळींच्या विरुद्ध असतील तर लोक त्याच्या विद्वत्तेकडे कर्तृत्वाकडे किंवा चारित्र्याकडे ढुंकूनही पाहावयास तयार होत नाहीत." [331] या लोकस्वभावाला धरूनच भारतात डॉ. आंबेडकरांचे मूल्यमापन झाले असा आचार्य अत्र्यांच्या हा लिहिण्याचा आशय आहे.

सामान्य लोकांना आंबेडकरांचे झालेले दर्शन

सामान्य भारतीयांना आंबेडकरांचे आरंभी दर्शन कसे झाले हे सांगताना आचार्य अत्रे सांगतात, "आंबेडकर हे हिंदुधर्माला, काँग्रेसला आणि गांधींना शिव्या देतात, वेद, पुराणे आणि मनुस्मृती जाळून टाका असे म्हणतात, आणि हिंदुधर्म सोडून आपण दुसऱ्या धर्मात जाणार असे मधून मधून सांगतात एवढेच काय ते त्यांच्याबद्दल सामान्य माणसाला ठाऊक आहे." [332]

आंबेडकरांच्या उत्तुंग बावळी व्यक्तिमत्त्वाचे कालखंड

अभ्यासकांच्या मते, १९१८ ते १९२८ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आरंभीचा तयारीचा कालखंड होय. निष्णात कायदेपंडित आणि अर्थशास्त्रज्ञ म्हणून ते याच कालखंडात ओळखले गेले. महाडचा सत्याग्रह व अस्पृश्यांसाठी नागरी सवलती यासाठी या काळातच त्यांनी चळवळ केली. १९२८ ते १९३६ या दुसऱ्या कालखंडात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळावेत म्हणून घटनात्मक लढा दिला. पुणेकरार आणि धर्मांतराची घोषणाही त्यांनी केली. १९३७ ते १९४६ या कालखंडात मुंबई विधिमंडळात विरोधी पक्षाचे पुढारी, व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, कामगारखाते मंत्री ही पदे त्यांनी भूषविली. १९४६ ते १९५१ या कालखंडात भारताच्या घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी घटनानिर्मितीत महत्त्वाची कामगिरी बजावली व स्वतंत्र भारताचे विधिमंत्री म्हणून त्यांनी कार्य केले. शेवटच्या पाचव्या कालखंडात म्हणजे १९५१ ते १९५६ मध्ये मतभेदांमुळे मंत्रिपदाचा राजिनामा देऊन ते बाहेर पडले. विरोधी पक्षाचे पुढारी म्हणून त्यांनी संसदेत कार्य केले आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या हजारो अनुयायांसह त्यांनी हिंदुधर्माचा त्याग करून बौद्ध धर्मात प्रवेश केला आणि त्यांचे निर्वाणही त्याच वर्षात घडले. [333]

आंबेडकरांचे तीन गुरू आणि तीन दैवते

गौतमबुद्ध, महात्मा कबीर आणि महात्मा फुले हे आपले तीन गुरू असल्याचे बाबासाहेबांनीच स्वतः सांगितले आहे. त्याचप्रमाणे विद्या, स्वाभिमान आणि शील ही त्यांची तीन दैवते ते स्वतःच सांगतात. " अशा प्रकारे माझे तीन गुरू आणि तीन उपास्य दैवते आहेत. त्यांचा मी बनलो आहे. या पदाला मी पोचलो हे त्यांच्याच शक्तीमुळे होय. मी मात्र केवळ कारण आहे. त्यांचा मी बनलेला एक पुतळा आहे. तेव्हा त्यांचे अनुकरण करा. " ३३९ असा संदेश डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना दिला आहे.

दर्शनीय वादळी व्यक्तिमत्त्वाचा महापुरुष

आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व भव्य आणि भरदार होते. उंच पुरे, भरदार छाती, विशाल भाव व भेदक डोळे यांनी पाहणारा दीपत असे. " आंबेडकर हे वादळी मनोवृत्तीचे होते. जरा काही मनाविरुद्ध घडले तर त्यांचा रागाचा पारा चढे. ..... आंबेडकरांचा उग्र चेहरा नि अखंड अभ्यासूवृत्ती हे गुण सलगीला पोषक नव्हते ..... हट्टीपणा आणि लवचिकपणा यांचे विचित्र मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेले होते. त्यांची विनोदबुद्धी जागृत होती." ३४०

डॉ. आंबेडकर हे कुटुंबवत्सल असले तरी स्वतःला मात्र ते असंग समजत असत. सतत दौरे, अखंड अभ्यास, आणि सार्वजनिक कामासाठी भेटीगाठी यामुळे त्यांना वेळ मिळत नसे. " त्यांना ग्रंथांचे आणि उत्तमोत्तम कपड्यांचे वेड होते. त्यांचे एक लाख पुस्तके असलेले स्वतःचे प्रचंड ग्रंथालय होते. त्यामुळे ते वाचन, चिंतन आणि लेखन यात बहुतेक वेळ खर्च करीत. त्यांचे कर्तृत्व, सचोटी, प्रकांड पांडित्य, अपार त्याग हे गुण त्यांच्या अनुयायांत श्रद्धा व भक्ती निर्माण करीत." ३३४ महाराष्ट्राच्या परंपरेचा डॉ. आंबेडकरांना अभिमान होता. महाराष्ट्राची परंपरा ज्यांना टिकवायची आहे त्याने विद्याभ्यास, प्रामाणिकपणा, कर्तव्याची जाणीव, राष्ट्रीय हिताची दृष्टी आणि उत्तम वक्तृत्व संपादन केले पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. कारण प्रजातंत्रासाठी हे गुण मोलाचे आहेत असे ते सांगत असत. १४२

आधुनिक भारतवर्षाचे महर्षी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे ज्ञानमहर्षी होते. त्यांच्यासारखी ज्ञानलालसा आणि तपःसाधना केलेले पुरुष बोटावर मोजण्याइतकेच आढळतील. पाश्चिमात्य विद्यापीठांच्या सर्वोच्च पदव्यांनी ते विभूषित होते. विविध शास्त्रांचे त्यांचे सखोल अध्ययन होते. विधी, अर्थ, राज्य आणि समाज या चारही शास्त्रांत ते पारंगत होते. प्राध्यापक म्हणून जीवन जगण्याची त्यांची आकांक्षा होती, पण कर्तव्यबुद्धीनेच त्यांना राजकारणाच्या रणधुमाळीत शिरावे लागले. 'अस्पृश्य कोण व कुठले?' 'रानडे, गांधी आणि जिना,' 'पाकिस्तानसंबंधी विचार,' 'काँग्रेस आणि गांधी,' 'राज्य आणि अल्पसंख्याक' आणि 'बुद्ध अँड हिज धम्म' हे त्यांचे गाजलेले ग्रंथ. श्री. धनंजय कीर म्हणतात, " विश्वभूषण आंबेडकरांच्या अलौकिक जीवनाने भारतात एक नवीन प्रेरणाकेंद्र जन्मास आले आहे. "

डॉ. आंबेडकरांचे सामाजिक विचार

विविध मानवशास्त्रांच्या अध्ययनाने त्यांची अशी खात्री पटली होती की बहुसंख्याक सवर्ण हिंदूंच्या हितासाठीच चातुर्वर्ण्यावर आधारित हिंदूंचे समाजशास्त्र अस्तित्वात आले आणि त्यांनी

पददलितांना हजारो वर्षे गुलामासारखे वागविले. ब्राह्मण पुरोहितांचे समाजातील वर्चस्व, चातुर्वर्ण्याधिष्ठित जातिभेदमूलक समाजव्यवस्था, स्त्री आणि शूद्रांचे दास्य, पुनर्जन्माची व पापपुण्याची कल्पना, ईश्वरवाद आणि आत्मवाद या सर्व तत्त्वांनी हिंदुसमाजात विषमतेचे पोषण केले. ही सर्व तत्त्वे मानवतेचा द्रोह करणारी आहेत अशी डॉ. आंबेडकरांची समजूत होती. ते म्हणतात,..... "एकीची भावना जातिभेद उत्पन्न होऊ देत नाही ... ... स्वराज्याविषयी इतकी तळमळ वाटत नाही... ... कारण हरेक जातीला वाटते की स्वराज्य आले तर न जाणो दुसऱ्या एका जमातीच्या हाती सत्ता जाईल व तसे झाले तर आपला घात होईल. तेव्हा परक्यांच्या हाती सत्ता आहे हे ठीक अशी भावना होते." [३४३] ते म्हणतात, " ज्या धर्मात मला नीच दर्जा देण्यात आला आहे तो माझा धर्म मी कसा मानू ? ही दुष्ट पद्धत चालू राहणार असल्यास मंदिरप्रवेशाचा उपयोग काय ?" [३४४]

जातिसंस्था हे हिंदुसमाजाच्या अवनतीचे मूळ

जातिसंस्था हे हिंदुसमाजाच्याच नव्हे तर हिंदुराष्ट्राच्याही अवनतीचे मूळ आहे असें आंबेडकरांचे मत होते. हिंदूंच्या काही चालीरीती, धर्मश्रद्धा नि विचार यात सारखेपणा दिसला तरी विविध जातींमुळे ते एकसंघ असे बनलेले नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने राष्ट्र या अभिधानास पात्र नाहीत. "हिंदु-समाज हा जातींचा समूह आहे. हिंदूंच्या हानीचे मूळ जातिभेदात आहे. जात पाळण्याचा धर्म शिकविणारी हिंदूंची धर्मशास्त्रेच त्यांची खरी शत्रू आहेत. ....." [३४५]

मी हिंदू म्हणून मरणार नाही

हिंदुधर्मात दिल्या जाणाऱ्या विषमतेच्या वागणुकीने ते पेटून उठत असत. हिंदुसमाजाचे घटक असल्यामुळे दुबळेपणा आणि अवनती यांची आपण शिकार झालो आहोत असे ते अनुयायांना सांगत असत. हिंदुधर्माशी असलेला संबंध तोडा आणि वागणूक, दर्जा, संधी यांची समता असलेला दुसरा धर्म निवडा असे आग्रहाने सांगत असत. स्वतःविषयी ते म्हणत, " दुर्दैवाने मी अस्पृश्य जातीत जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही परंतु मरताना मी हिंदू म्हणून मरणार नाही." [३४६]

एक महान प्रॉटेस्टंट हिंदुनेता

हिंदुधर्मातील सुधारक मंडळींचे डोळे उघडावे यासाठी आंबेडकरांची ही धर्मासंबंधीची अतिशय कडवट प्रतिक्रिया होती. धनंजय कीर या आंबेडकरांच्या चरित्रकाराचे मत असे आहे की, "हिंदुसमाजाचे पुनरुज्जीवन घडविण्याचा डॉ. आंबेडकरांचा हेतू होता. आंबेडकरांचे जीवितही हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनातील एक महत्त्वाची अवस्था आहे असे विचारवंत मानीत आणि ' एक महान प्रॉटेस्टंट हिंदु नेता ' असे आंबेडकरांचे वर्णन करीत." [३४७]

पददलितांचे पहिले क्रांतिकारक नेते

" हिंदुधर्म आणि हिंदुसमाज यांच्याविरुद्ध आंबेडकरांनी पुकारलेले बंड धरणीकंपासारखे हादरे देणारे होते. ..... त्याचे स्वरूप बुद्धापासून सावरकरांपर्यंतच्या क्रांतिकारकांनी ज्याप्रकारे बंड पुकारले त्या बंडाहून वेगळे होते. कारण गेल्या पंचवीसशे वर्षांत आंबेडकर हे पददलित समाजामध्ये जन्मलेले पहिले महान क्रांतिकारक नेते होते " असे धनंजय कीरांचे प्रतिपादन आहे. आंबेडकरांच्या क्रांतीचे स्वरूप सांगताना श्री. कीर म्हणतात, " हिंदुसमाजाची शुद्धी करून त्याची पुनर्रचना ही स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयीवर अधिष्ठित असावी असे आंबेडकरांच्या क्रांतीचे उद्दिष्ट होते. थोडक्यात सामाजिक लोकशाहीवर ती पुनर्रचना अधिष्ठित व्हावयास हवी होती. जर हिंदूंनी

त्यांची तत्त्वे आचरणात आणली असती तर त्यांचा समाज स्वतंत्र, बलिष्ठ, तेजस्वी, आणि गतिमान झाला असता." ३४८

देशद्रोह करणाऱ्यांचे पातक मानवद्रोह करणाऱ्यांवर

आपल्या समाजाशी सवर्ण हिंदूंनी वागताना समान सामाजिक हक्क नाकारून एक प्रकारे मानवद्रोह केला असा डॉ. आंबेडकरांचा स्पृश्य हिंदूंवर आक्षेप आहे. स्पृश्य समाजाने हा मानवद्रोह केला म्हणूनच या देशाला गुलाम व्हावे लागले. पुढे डॉ. आंबेडकर सांगतात, " परकीयांना साह्य करून त्यांचे राज्य या देशावर प्रस्थापित करण्यास कोणत्या वर्गाने पुढाकार घेतला असेल तर तो अस्पृश्य वर्गानेच होय. त्यांच्या साहाय्याशिवाय महाराष्ट्रात तरी मोगली सत्ता टिकली नसती व इंग्रजी सत्ता तयार झाली नसती किंवा स्थिरावली नसती. अस्पृश्यांनी देशद्रोह केला ही गोष्ट वाईट झाली असेल पण त्याचे पातक ज्यांनी मानवद्रोह केला त्यांच्यावर आहे. या मानवद्रोहाची परंपरा नष्ट झाल्याशिवाय देशद्रोहाची परंपरा नष्ट होणार नाही." ३४९

लाजिरवाणे गुलामीचे जिणे जगण्याची परंपरा

भारत हे जगातील सर्वात प्राचीन असे राष्ट्र आहे आणि अनेक आक्रमणे होऊनही ते अजून, सन्मानाने जगत आहे या इतिहासकारांच्या विधानाला आक्षेप घेऊन आंबेडकर म्हणतात, की शत्रूचा पराभव करून स्वाभिमानदर्शक जीवन जगणे आणि पराभव पत्करून दुसऱ्यांच्या दास्याखाली जीवन कंठणे या जगण्याच्या दोन परी आहेत. स्वातंत्र्ययुक्त जीवनाची सर गुलामगिरीच्या जीवनाला कशी येणार ? ऐतिहासिक काळात " हिंदुसमाज हा अनेक वर्षे जगला आहे तो केवळ गुलामांचे राष्ट्र म्हणून जगला आहे. त्या जगण्यात कीर्ती व प्रौढी आहे असे ज्यांना वाटत असेल त्यांनी ती पाहिजे तर गावी. आम्हाला तरी त्या जगण्याची लाज वाटते." ३५० स्वा. सावरकरांची ' सहा सोनेरी पाने ' वाचणाऱ्याला डॉ. आंबेडकरांच्या या विवेचनात विपर्यास वाटल्याशिवाय राहणार नाही.

डॉ. आंबेडकर आणि ब्रिटीश राजनिष्ठा

इंग्रजी सत्ता या देशात स्थिर करण्याचे कार्य आमच्या जमातीने केले. इंग्रजांच्या बाजूने लढून; रक्त सांडून पेशवाईचा अन्त आम्ही केला. खडर्याच्या निर्णायक लढाईमध्ये इंग्रजांना विजय मिळाला तो केवळ महारवीरांच्या साहाय्यामुळेच होय. असे सांगताना ज्यावेळी इंग्रजांनी आंबेडकरांच्या मागण्यांना प्रतिसाद दिला नाही तेव्हा त्यांच्या राजनिष्ठेला धक्का बसल्याचे दिसते कारण ते म्हणतात, " ज्या सरकारशी आम्ही पूर्ण इमानाने वागलो ते सरकारच आता आमच्यावर उलटले आहे. वास्तविक या देशामध्ये इंग्रजांचे राज्य आम्ही आणले हे ऐतिहासिक सत्य आहे. ..... ज्यांना आम्ही राज्य मिळवून दिले तेच आता आम्हावर लाथा झाडण्यास सिद्ध झालेले आहे." आंबेडकरांचे हे विचार त्यांची ब्रिटीश राजनिष्ठा व्यक्त करणारे आहेत. याच लेखात आंबेडकर म्हणतात, " मी आजपर्यंत सरकारविरुद्ध वागलो नाही. मी काँग्रेसला मिळून त्यांच्या लढचात सामील झालो नाही किंवा कोणत्याही दंग्यात भाग घेतला नाही. ..... परंतु सरकारला त्याची जाणीव राहिली नाही." ३५१ हे आंबेडकरांचे भाषण १९४१ चे आहे. याचाच अर्थ असा की हा पश्चात्ताप होईपर्यंत आंबेडकर हे राजनिष्ठ होते. हिंदुस्थानात अस्पृश्य हा एक स्वतंत्र महत्त्वाचा निराळा घटक असून व तशी ब्रिटिशांची मान्यता असूनही " व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळात अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी सरकारकडून घेण्यात आला नाही त्याअर्थी ब्रिटीश सरकारने अस्पृश्य समाजाचा विश्वासघात केला हे स्पष्ट होते." ३५२ हे आंबेडकांचे उद्गारही त्यांच्या राजनिष्ठेवर प्रकाश टाकणारे आहेत.

आंबेडकरांचा ध्येयवाद

आपल्या जमातीवरील राष्ट्रद्रोहाचे समर्थन, मानवद्रोहाचे निमित्त सांगून आंबेडकरांनी केलेले आहे. स्वतःच्या ब्रिटीश राजनिष्ठेची कबुलीही त्यांनी दिली आहे. स्वातंत्र्यलढ्यापासून जातीय दंगलीपासून अलिप्त राहिल्याचे सांगून, इंग्रजी राज्यात शांतता नांदविण्याचा प्रयत्न केल्याचेही मान्य केलेले आहे. तरीही आंबेडकर ध्येयवादी आहेत हे मान्य करावे लागते. आपली भूमिका मांडताना १९४५ च्या कानपूर येथील भाषणात ते म्हणाले, "देशाकरिता पुष्कळ लोक आहेत. अस्पृश्याकरिता आमच्याशिवाय कोणी नाही. मी तर हेच काम करीत राहीन. ज्या कार्यात आठ कोटी पददलित पिळल्या गेलेल्या लोकांचा उद्धार आहे ते खरेखुरे स्वराज्य मिळविण्याचे कार्य आहे." आपल्या ध्येयनिष्ठेसंबंधी काँग्रेस वर्किंग कमेटीच्या एका सदस्याशी बोलताना ते म्हणाले, "माझी भूमिका काय आहे हे या देशात अनेकांना यथार्थपणे समजले नाही हे मला माहीत आहे. माझी भूमिका स्पष्ट करावयाची मला संधी घेऊ द्या. अध्यक्ष महाराज, मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की जेव्हा जेव्हा माझे वैयक्तिक हित नि देशाचे हित यात संघर्ष निर्माण झाला तेव्हा तेव्हा मी देशाच्या हिताला प्राधान्य दिले.... मी दुसऱ्या एका अशा निष्ठेला बांधला गेलो आहे की तिला मी कधीही अंतर देऊ शकत नाही. ती निष्ठा म्हणजे माझा अस्पृश्यवर्ग.... जेव्हा अस्पृश्यांचे हित व देशाचे हित यामध्ये संघर्ष निर्माण होईल त्यावेळी माझ्यापुरते मी सांगतो की अस्पृश्यांच्या हितालाच मी प्राधान्य देईन." ३५३

आंबेडकरांच्या राष्ट्रकार्याची प्रेरणा

आत्यंतिक वर्गीय प्रेरणेतून आंबेडकरांना परिस्थितीने राष्ट्रीय प्रेरणेत समाविष्ट करून घेतले. दुसरे जागतिक महायुद्ध इंग्रजांचे खच्ची झालेले मनुष्यबळ व आर्थिक बळ, ४२ ची क्रांती, सुभाषबाबूंची आझाद हिंद सेना, 'नाविकांचे बंड' आणि मित्रराष्ट्रांची निवड या अनेक कारणांनी ब्रिटिशांना भारत स्वतंत्र करावा लागला. ज्या बहुजन स्पृश्यांच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून आंबेडकर राजनिष्ठ झाले होते, इंग्रजांना सहकार्य करीत होते तेच आंबेडकर आपल्या अनुयायांच्या हितासाठी उगवत्या स्वातंत्र्याला साक्षी ठेवून तडजोडीला तयार झाले, घटनासमितीत आले आणि पुढे काँग्रेसच्या मंत्रिमंडळात विधिमंत्री झाले. आंबेडकरांच्या ध्येयधोरणात परिस्थितीने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. वर्गीय प्रेरणा राष्ट्रीय प्रेरणा झाल्या. लिंकनच्या लोकशाहीची व्याख्या सांगून ते म्हणू लागले, "सवर्ण हिंदूंशी जरी काही वाद असले तरी मातृभूमीच्या रक्षणासाठी देहत्याग करण्यासही तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट प्रकट केले होते. राष्ट्रकार्य करण्याची आच आणि जनता यांच्या अभिमानातून आणि प्रतिष्ठेतून त्यांना प्राप्त झाली होती," ३५४ असे डॉ. कुबेरांचे मत आहे.

राष्ट्रवादासंबंधी आंबेडकरांचे विचार

ज्यावेळी एक अल्पसंख्य जमात दुसऱ्या बहुसंख्य जमातीच्या वर्चस्वाखाली पददलिताचे जिणे जगत असते आणि प्रतिक्रियेच्या स्वरूपात अल्पसंख्य जमात संघटित होऊन त्या बहुसंख्य समाजापासून विभक्त होण्याकरिता बंड पुकारते तेव्हा 'अल्पसंख्याकांचा राष्ट्रवाद' अस्तित्वात येतो. आंबेडकरांचा जमातीच्या हक्काचा लढा, त्यांची वेगळ्या दलितीस्थानची मागणी ही या राष्ट्रवादातूनच उदयाला आलेली होती. या पददलितांच्या कल्याणासाठीच आंबेडकरांनी या अल्पसंख्याकांच्या राष्ट्रवादाचा समर्थपणे पुरस्कार केला होता. पुढे सारे चित्रच बदलले आणि बाबासाहेब व्यापक अर्थाने राष्ट्रनिष्ठ बनले. राष्ट्रवादाच्या सामर्थ्यासंबंधी ते सांगतात, "मानवी इतिहासात राष्ट्रवाद ही एक अत्यंत

प्रभावी शक्ती असल्याचे आता सर्वमान्य झाले आहे... मोठमोठी साम्राज्ये उलथून पाडण्याची शक्ती त्यात असल्याने त्याला गतिमानता असते. राष्ट्रवाद ही एकीची सामुदायिक भावना आहे. ती ज्यात निर्माण होते त्यांना आपण आप्तेष्टच आहोत असे वाटते."[३५५] दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात, "राष्ट्राशी संबंधित असा राष्ट्रवाद हा सामाजिक ऐक्याच्या दृढ भावनेवर आधारित असला पाहिजे. आंतरराष्ट्रीय वादाशी संबंधित राष्ट्रवाद हा मानवी बंधुतेवर आधारला असला पाहिजे, तसेच राष्ट्रवाद हा कोणत्याही जमातीला वा देशाला जुलूम वा धोका वाटता कामा नये."[३५६] परंपरेने आलेल्या आपल्या राष्ट्रवादाचे स्वरूपही यापेक्षा भिन्न नाही.

राष्ट्रवादाची व्यापक कल्पना

राष्ट्रगट आणि राष्ट्रीयत्व यातील अंतर स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात, "राष्ट्रगट म्हणजे बंधुभावाची जाणीव. पण बंधुभावाने एकत्रित आलेल्या लोकांची स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्वाबाबतची तीव्र इच्छा म्हणजे राष्ट्रीयत्व. जातीयवाद सार्वजनिक जीवनाची दृष्टी नष्ट करतो म्हणून तो राष्ट्रविरोधी असतो असे त्यांचे मत होते. वर्णवर्चस्व, जातीवर्चस्व, जन्माने निर्माण होणारे श्रेष्ठ-कनिष्ठत्व जो राष्ट्रवाद खपवून घेतो तो बहुसंख्याक लोकांचा राष्ट्रवाद असून भारतात त्याच राष्ट्रवादाचे प्राबल्य होते असे ते सांगतात. भारतीय राष्ट्रवादाच्या नावाखाली होणारा सर्व प्रकारचा जुलूम त्यांना मान्य नव्हता. त्यांच्या दृष्टीने तो राष्ट्रवाद नसून ते ढोंग होते.

मोडली मांडण्याचा नि बुडाली काढण्याचा ध्यास

ब्रिटीश पंतप्रधान ॲटली यांनी भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली तेव्हा डॉ. आंबेडकरांना जबरदस्त धक्का बसल्याचे धनंजय कीरांनी चरित्रात नमूद केलेले आहे. अस्पृश्य समाजाची त्रिशंकू-सारखी स्थिती ब्रिटिशांनी केली आणि विश्वामित्राप्रमाणे तारण्यासाठी आंबेडकर धडपडू लागले. निराशही झाले. काँग्रेस पुढाऱ्यांनी या स्वाभिमानी प्रकांड पंडिताला घटना समितीत निमंत्रित केले. भारतीय घटनेचा खर्डा तयार करणाऱ्या समितीने अध्यक्षपद त्यांना दिले आणि मोडली मांडण्याचा नि बुडाली काढण्याचा ध्यास घेऊन त्यांनी ते पद स्वीकारले. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हे कार्य केले. एका थोर राष्ट्रीय नेत्याच्या रूपात लोक त्यांच्याकडे पाहू लागले. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने केलेल्या प्रचंड स्वागताला नि जयजयकाराला उत्तर देताना सत्यवादी ध्येयनिष्ठ आंबेडकर म्हणाले, "मी घटना समितीत आलो तो दलित वर्गाचे हित साधण्यासाठी आलो. घटना समितीने माझी निवड घटना लिहिण्यासाठी नेमलेल्या लेखनसमितीवर केलेली पाहून मला आश्चर्य वाटले. याविषयी मी घटना समितीचा ऋणी आहे. भारतीय जनतेला उद्देशून ते म्हणाले, "पक्षाचे मत राष्ट्रहितापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारतीयांचे स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात येईल, आणि कदाचित ते कायमचे नष्ट होईल. तरी रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी चढण्याचा निर्धार केला पाहिजे."[३५७]

घटनात्मक नीतीचे पालन करण्याचा संदेश

अतिशय परिश्रमाने आणि त्यागाने मिळालेले स्वातंत्र्य आपण डोळ्यात तेल घालून राखले पाहिजे. स्वातंत्र्याचे रक्षण करणे हे प्रत्येकाने आपले कर्तव्य मानले पाहिजे असे ते सांगत असत. १९५० मध्ये सिद्धार्थ कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढे बोलताना ते म्हणाले, "इंग्रज लोक राज्य करीत त्यावेळी आपण इतर पक्षांशी फटकून वागलो पण आता इंग्रज नाहीसे झाले आहेत. तेव्हा आपण

इतर पक्षांशी सहानुभूतीने वागण्याचे धोरण ठेवले पाहिजे व त्यांच्याबरोबर तहनामा, वाटाघाटी वगैरे प्रकारांनी संबंध राखले पाहिजे.[३५८] त्याच वर्षी त्रिवेंद्रम येथे भाषण करताना ते म्हणाले "सरकार व जनता या उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीती यांचे पालन करणे आवश्यक आहे. हे संकेत व नीती पुढीलप्रमाणे आहे. "सरकार बनविण्याच्या पद्धतीविषयी आदर, कायद्याचे पालन, स्वतंत्र विचार करण्याची सवय व बहुसंख्याकांच्या नियमांचे पालन."[३५९]

जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि भारतीय संस्कृतीबद्दलचा आदर

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन शब्दांत त्यांनी आपल्या जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले असून त्याची मुळे बौद्ध धर्मात आहेत, राज्यशास्त्रात नाहीत असे स्पष्टीकरण केले. बुद्ध धर्मातील 'प्रज्ञा, करुणा आणि समता' ही तीन तत्त्वे मला आवडतात असे त्यांनी वारंवार प्रतिपादन करून त्यांचा अंगीकार करा अशी शिकवण दिली आहे. आपल्या राष्ट्रीय वृत्तीचा परिचय देताना ते म्हणाले, "जो धर्म या देशातील प्राचीन संस्कृतीला धोका देईल किंवा अस्पृश्यांना अराष्ट्रीय बनवील असा धर्म मी केव्हाही स्वीकारणार नाही कारण या देशाच्या इतिहासात विध्वंसक म्हणून स्वतःच्या नावाची नोंद करून घेण्याची माझी इच्छा नाही."[३६०]

बुद्ध, गांधीवाद आणि मार्क्सवाद

तात्त्विकदृष्ट्या विचार केला तर आंबेडकर हे गांधीवादाच्या जवळ असल्याचे दिसून येते. कारण रंगूनच्या भाषणात ते म्हणाले, "मार्क्सवाद आणि साम्यवाद यांनी जगाचे सर्व धर्म हादरून टाकले आहेत. बुद्ध हाच मार्क्सवादाला उत्तर आहे. रशियन साम्यवादाचा उद्देश रक्तरंजित क्रांती घडवून आणणे हा आहे. बुद्धप्रणीत साम्यवाद हा रक्तहीन क्रांती घडवून आणतो."[३६१] गांधीजींच्या अहिंसेवर आधारित सत्याग्रही क्रांतीचा तोच हेतू आहे.

राष्ट्राचे दुर्दैव

आपले मौलिक विचार सांगायला, आपल्या आठ कोटी अनुयायांना सुयोग्य मार्गदर्शन करायला धर्मांतरानंतर आंबेडकर या जगात राहिले नाहीत. त्यामुळे भारताची फार मोठी हानी झाली आहे. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा साधा सरळ विषय नाही. तो त्यांनी म्हटल्याप्रमाणेच गतिमान आहे. आंबेडकरवादी साहित्यिक व विचारवंत त्याचा अर्थ लावीत आहेत.

वेदांती राष्ट्रवादाचे आधुनिक आचार्य प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज मोहोड (१८८१–१९१५)

जगात सद्गुणी आणि सत्कृत्ये करणारी अनेक माणसे असतात पण त्यांची पारख करून त्यांचा मोठेपणा जगाच्या प्रत्ययाला आणून देणारी माणसे दुर्मिळ असतात अशा आशयाचे महाकवी भासाचे सुभाषित आहे. अशा दुर्मिळ पारखी माणसांत गुलाबराव महाराजांचे पट्टशिष्य श्री. बाबाजी महाराज पंडित आणि नागपूरचे आचार्य कृ. मा. घटाटे यांचा समावेश करावा लागेल. अध्ययन अध्यापनाच्या व्यवसायात नसलेल्या घटाटेंनी मराठी विषयात एम्. ए. झाल्यानंतर विदर्भातील मधुराद्वैत संप्रदायाचे आचार्य, समन्वय महर्षी प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज आणि त्यांचे साहित्य [३६२] हा आपल्या शोध प्रबंधासाठी विषय निवडला आणि 'गुलाबराव महाराजांची विचार संपदा' हा मौलिक शोधप्रबंध लिहून आचार्य ही सन्माननीय पदवी संपादन केलीच पण बाबाजी महाराज पंडितांनी प्रकाशित केलेल्या महाराजांच्या वाङ्मयाचे संपादन करून अभ्यासकांना ज्ञानाचे एक नवे दालनही उपलब्ध करून दिलेले आहे. त्यांच्या प्रयत्नामुळेच या सत्पुरुषाच्या राष्ट्रीय विचारांचा परिचय झाला.

विज्ञानयुगातील महान चमत्कार !

विदर्भातील माधान येथील मोहोड पाटील कुळात श्री. गोंदूजी आणि सौ. अलोकाबाई या दांपत्याच्या पोटी ६ जुलै इ. स. १८८१ साली महाराजांचा जन्म झाला. महाराज सात आठ महिन्यांचे असताना त्यांच्या डोळ्यांत चुकीचे औषध घातल्या गेले आणि त्याचा परिणाम होऊन कायमचे अंधत्व त्यांच्या नशिबी आले. बालवयातच महाराजांच्या मातापित्यांचे निधन होऊन ते पोरके झाले. आजोबांनी त्यांना वाढविले. आरंभी गावातील पंतोजीजवळ तोंडी हिशेब, पाढे एवढेच महाराजांचे शिक्षण झाले. पण ईश्वरभक्ती, संतवाङ्मयाचे श्रवण, पठन, मनन यांच्या बळावर आंग्लशिक्षणाचा, कुलपरंपरेचा कोणताही संस्कार नसताना संत ज्ञानेश्वर माऊलींच्या साक्षात्काराने महाराजांना प्रज्ञेचा प्रकाश दिसला आणि आपल्या व्यासंगाने, चिंतनाने त्यात भर घालून भजनकीर्तने करतानाच महाराजांनी विविध विषयांवर ग्रंथनिर्मितीही केली. चर्मचक्षूंपेक्षा महाराजांच्या अंतदृष्टीचे अचाट सामर्थ्य जगाच्या प्रत्ययाला आले आहे. महाराज त्याकाळच्या प्रथेप्रमाणे वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी विवाहबद्ध झाले. शंकराचार्य, येशुख्रिस्त, ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद या महापुरुषांप्रमाणेच म्हणजे वयाच्या अवघ्या चौतिसाव्या वर्षी इ. स. १९१५ मध्ये जीवन ग्रंथाला पूर्णविराम दिला. एवढ्या अल्पकाळातही अशिक्षित, जन्मांध, अशा या सत्पुरुषाने गुरुकृपेच्या व अंतःस्फूर्तीच्या सामर्थ्याच्या बळाने धर्म, इतिहास, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, भक्तिमार्ग, भौतिकशास्त्रातील सिद्धांत, साहित्य, संगीत, व्याकरण, काव्य, मानसशास्त्र, मानसायुर्वेद, आदी विविध विषयांवर मराठी, हिंदी, संस्कृत इत्यादी भाषांत गद्यपद्यात्मक स्वरूपाच्या एकशे तीस ग्रंथांची रचना केलेली आहे. हे विविध विषय मांडताना आधुनिक शास्त्रांचे अध्ययन, चिकित्सक पद्धतीने करून मौलिक सिद्धांतही महाराजांनी मांडलेले आहेत. याशिवाय महाराजांनी नवीन नावंग भाषेची निर्मिती केली. १२३ नवीन मात्रावृत्तांची योजना केली आहे. त्यांच्या विविध काव्यसंपदेत २,५०० अभंग, २,५०० पदे, १,२५० गीते, १,००० श्लोक आणि २३,००० ओव्या यांचा समावेश आहे. त्यांच्या एकूण साहित्याची पृष्ठसंख्या सुमारे ६,००० वर आहे. महाराजांच्या वाङ्मयाचा अफाट पसारा पाहून साहित्यसम्राट न. चिं. केळकर म्हणाले, "महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा ज्ञानकोश झाला आहे."[३१३] म्हणूनच गुलाबराव महाराज म्हणजे आजच्या विज्ञानयुगातील महान चमत्कार आहे. ते एक अलौकिक महापुरुष होते असे म्हणावे लागते.

महाराजांच्या प्रेरणांचे स्वरूप आणि जीवनदृष्टी

इ. स. १९०१ साली महाराजांना ज्ञानेश्वर माऊलीचा साक्षात्कार झाल्याचा उल्लेख यापूर्वीच आलेल आहे. महाराजांनी या साक्षात्काराचा उपयोग जनकल्याणासाठीच केला. 'आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासि । बोलिले जे ऋषी । साच भावे वर्तावया ॥" अशी तुकारामांप्रमाणे महाराजांची भूमिका होती. गुरूच्या अनुग्रहाचे वर्णन " माझा सद्गुरू करुणाघन । आळंदीपति कल्याण निधान । जेणे आपुलिया नामाचा मंत्र देऊन । कृतार्थ केले मजलागी ।" (नित्यतीर्थ ओवी ८) ..... महाराजांचे व्यक्तिमत्त्वही वैचित्र्यपूर्ण होते. ते मधुराभक्तीचे आचार्य असल्याने स्वतःला ज्ञानेश्वरकन्या व श्रीकृष्णाची पत्नी म्हणवून घेत असत. असे म्हणवून घेणे निराळे व तसे वर्तन करणे निराळे. महाराज सांगतात, "ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपती । सौभाग्य संपत्ती नित्य मज ।" असे सांगून महाराज मंगळसूत्र, कुंकू व बांगड्या अशा स्त्रीवेषात वावरत असत. पुढे त्यांनी कात्यायनी व्रताचा आरंभ केला.[३१४] वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, व्यास, वाल्मीकी, शुकादी महर्षींची महाकाव्ये यातील

धर्म, नीती, शास्त्र आणि जीवनविषयक विचार आधुनिक विज्ञानाच्या, भौतिक शास्त्रांच्या व मानवशास्त्राच्या प्रकाशात पारखून जसाचा तसा महाराजांनी स्वीकारला असे त्यांच्या ग्रंथावरून आढळते. महर्षी, स्मृतिकार, आचार्य, शंकराचार्य, ज्ञानेश्वर तुकारामांसारखे प्राकृत ग्रंथनिर्माण करणारे सत्पुरुष यांनी सांगितलेल्या जगाच्या कल्याणाच्या मार्गावर महाराजांनी डोळसपणे वाटचाल केलेली आहे. ते स्वतः म्हणतात,

" तैसी प्रति कालि माझारी । मजही स्मृती धर्माधिकारी ।
होय येथ म्हणता निर्धारी । अविश्वास कां किजे ?"[३१५]

" ज्ञानदेवांच्या मुखातून मिळालेल्या आज्ञेनुसार श्रीकृष्णभक्तीची स्थापना करण्याचा मी प्रयत्न करीत असतो," असे महाराज आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात. ' संप्रदाय सुरतरू ' या ग्रंथाच्या बाविसाव्या अध्यायात " वेद, स्मृती, पुराणे, संतवचने यांचा समन्वय करून भक्तीचे शास्त्रशुद्ध स्वरूप सिद्ध करण्याचा माझा प्रयत्न आहे " असे ते सांगतात. आपले कार्य धर्मशिक्षण देण्याचे आहे हे स्पष्ट करताना महाराजांनी आपल्या जीवननिष्ठेचा परिचय दिला आहे. १. कोणाचे नाव न घेता हिंदुधर्माला भलत्याच रीतीने वळण देणाऱ्यावर सप्रमाण टीका करणे, २. प्रतिपाद्य मतांचा अभ्यास करून प्रचार करणे, ३. पारलौकिक अभ्यासांचा नियम करणे, ४. पारलौकिक धर्मावर दृढश्रद्धा ठेवणे, आपद्धर्म समजावून घेणे. ५. मधुराद्वैत मतानुसार भक्तिमार्गाची स्थापना करणे इत्यादीचा प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे. हे सांगताना शेवटी ते म्हणतात, " आर्यांचे म्हणणे योग्य आहे हे सिद्ध करण्याशिवाय मला व आपणप्रभृती माझ्या हितचिंतकांना दुसरे कोणतेही स्थान नाही. सांख्य योग, वेदान्त जे काही असेल ते आमचे हेच. मीही या कामात कधीही टाळाटाळी करीत नाही. " [३१६] साधुबोध या ग्रंथात उपदेश करताना महाराज म्हणतात, " धर्माचा निर्विकार पद्धतीने विचार करणारा शूद्रवर्गात सृष्टिमध्ये मी एकटाच आहे असे तू पक्के समज. " [३१७] हे सर्व लक्षात घेतले म्हणजे महाराजांच्या जीवनकार्याची निश्चित कल्पना येते.

अद्वैत वेदान्त, वर्णाश्रम धर्म, कर्मयोग, भक्तिमार्ग, ज्ञानयोग या सनातन मार्गांनी आत्मोद्धार करणे हेच महाराजांचे अध्यात्म आहे. सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व आहे ही त्यांची व्यापक श्रद्धा आहे. अखिल मानवजातीचे कल्याण हाच त्यांचा धर्म आहे; म्हणून कोणत्याही धर्मसंप्रदायाचा महाराज द्वेष करीत नाहीत. मात्र सनातन वैदिक धर्मावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. जिथे कुठे मतभेदांचा प्रश्न असेल त्या ठिकाणी महाराजांनी समन्वयाची भूमिका घेतल्याचे आढळते. म्हणूनच श्री. गोळवलकर गुरुजींनी आणि कामगारसंघटक श्री. द. वा. ठेंगडी यांनी त्यांना ' समन्वय ' महर्षी [३१८] अशी सार्थ पदवी दिली आहे.

ज्ञानासंबंधीची महाराजांची कल्पनाही अतिशय व्यापक आहे. ईश्वराच्या व्यापक स्वरूपाचे ज्ञान म्हणजेच विशुद्ध निर्विकार ज्ञान आणि त्याव्यतिरिक्त ज्ञान म्हणजे प्रापंचिक ज्ञान विज्ञान. ज्या ज्ञानात स्वार्थ असतो ते सर्वांचे कल्याण साधू शकत नाही. अशीही महाराजांची धारणा आहे. ज्या धारणेमुळेच महाराजांनी मोठमोठ्या वंदनीय राष्ट्रपुरुषांना आपल्या टीकेचे लक्ष्य बनविले असल्याचे दिसून येईल. आपण शूद्रवर्णाचे आहोत ही जाणीव कायम ठेवून महाराजांनी राष्ट्राला मार्गदर्शन करणाऱ्या नेत्यांचे सिद्धान्त तपासले आहेत. त्यांच्या सिद्धांतांनी सामाजिक राष्ट्रीय जीवनाची कशी हानी केली आहे हे देखील निर्भीडपणे आणि शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करून दाखविले आहे. एका अर्थाने प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे अतिशय कठीण कार्य महाराजांनी केलेले आहे.

इतिहासाच्या अभ्यासासंबंधी काही सूचना

अलीकडील काळात इतिहाससंशोधनाची वृत्ती वळावत चाललेली आहे. प्राचीन ग्रंथांचे, साधनांचे आधुनिक पद्धतीने संशोधन, उत्खनन आणि त्या आधारे भूतकाळासंबंधी काही सिद्धांत बांधणे या गोष्टीला महाराजांचा विरोध नाही. पण हे संशोधन करताना संशोधकांनी इतिहासाच्या लेखनातील मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत आणि प्राचीन आर्यांच्यासंबंधी अभ्यास करताना प्राचीन संकेतांकडे दुर्लक्ष होणार नाही यासंबंधी काळजी घेतली पाहिजे असे महाराजांनी सुचविले आहे. ही काळजी घेतली नाही तर अनेक अपसमज, अपसिद्धांत निर्माण होतात आणि त्याचे अनिष्ट परिणाम पिढ्यान्-पिढ्या लोकांना भोगावे लागतात अशी मार्मिक सूचना केली आहे. [३६९]

एक देशक्षोभकारक उपपत्ती

आर्य लोक बाहेरून भारतात आले व त्यांनी येथील लोकांना जिंकून त्यांना दस्यू म्हणजे दास केले, शूद्र केले. या उपपत्तीमुळे संपूर्ण देशात आर्य, अनार्य, असा वाद निर्माण झाला. आपले, परके या भावनांना खतपाणी मिळाले. राष्ट्रीय ऐक्याऐवजी विघटनाची प्रवृत्ती निर्माण झाली. भारतीय लोकांत फुटिरता निर्माण करण्याला पाश्चात्यांचे हे संशोधन उपयुक्त ठरले पण अजाणतेपणाने आपल्या संशोधकांनीही त्यांच्या स्वरात स्वर मिळविला. मुळात जर्मन पंडित मॅक्समुलर यांनी आर्य हा वंश असल्याची उपपत्ती मांडली आणि मग अनेक युरोपीय पंडितांनी त्या उपपत्तीचा पाठपुरावा केला. प्राच्यविद्येचे आणि इतिहासाचे संशोधन करणाऱ्या लोकमान्य टिळकांनीही वंशाची कल्पना प्रमाण मानून आर्य वंशाची एक शाखा उत्तर ध्रुवावरून भारतात आली असे प्रतिपादन केले. महाराजांनी या संशोधनावर आणि 'आर्य' या वंशवाचक संज्ञेवर आक्षेप घेऊन आर्य याचा अर्थ ज्ञान-संपन्न, पूज्य, श्रेष्ठ, सुसंस्कृत, धर्माचरण करणारा माणूस असे अनेक पुरावे देऊन सिद्ध केले आहे.[३७०] शेवटी महाराज म्हणतात,

"आर्य लोक बाहेरून आले ही उपपत्ती अलीकडे निघाली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण आर्यांचे असून शूद्रवर्ण हा येथील मूळच्या दस्यू लोकांचा आहे. ही उपपत्ती मानणारे देशाचे पुढारी (लो. टिळक) म्हणवितात. परंतु त्यांच्या या उपपत्तीमुळे शूद्रांचा व ब्राह्मणांचा कायमचा द्वेष राहण्याची पाळी आली आहे. आर्यांनी आम्हाला कायमचे गुलाम करून ठेवले असा समज या उपपत्ती-मुळे शूद्रांच्या मनातून कधीही नष्ट होणे शक्य नाही. कितीही सवलती दिल्या तरी कायमचा कलह राहतो. शिवाय आम्हाला गुलाम करण्यासाठीच वेदांचा अधिकार दिला नाही ही समजूत या उपपत्ती-मुळे दृढ होण्याचा संभव आहे. शूद्रवर्ण हा आर्यांपैकी नाही असे म्हणणे देशक्षोभकारक आहे." [३७१]

हा वंशसिद्धांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही नाकारला हे आपण लक्षात घेतले पाहिजे. [३७२] गुलाबराव महाराज म्हणतात, "ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारी वर्ण आर्यांचेच अंतर्गत प्रकार आहेत. इतकेच नव्हे तर सर्व जगात सर्व धर्मांच्या अगोदर एक आर्य धर्मच होता. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कृतयुगात एकच हंसवर्ण होता. परंतु पुढे कालांतराने मानवातील सत्त्वप्रवृत्ती कमी कमी होत जाऊन विकारांचा प्रभाव वाढत गेला, धर्माचरण व संस्कारांचा लोप होऊन पौड्रक, यवन, शक, चीनी, खशवगैरे समाज मूळ क्षत्रिय असून देखील म्लेंच्छ झाले. म्लेंच्छ हा शब्दही जातिवाचक नसून ज्याला शुद्ध उच्चार करता येत नाही तो म्लेंच्छ. या संस्कारहीनतेमुळेच क्षत्रियांपासून म्लेंच्छांपर्यंत सर्व जाती निर्माण होत होत्या." [३७३]

ब्राह्मणांनी आपले वर्णवर्चस्व अबाधित राखण्यासाठी ती विद्या इतरांपासून चोरून ठेवली या स्वामी विवेकानंदांच्या मताचाही अनेक पुराव्यांनी महाराजांनी समाचार घेऊन हे विधानही कसे द्वेषपूर्ण आहे हे दाखवून दिले आहे.

वैदिक राष्ट्रकल्पनेचे श्रेष्ठत्व

पाश्चिमात्यांनी मांडलेल्या राष्ट्रकल्पनेपेक्षा वैदिकांची राष्ट्रकल्पना कशी श्रेष्ठ आहे हे अनेक उदाहरणांनी स्पष्ट केले आहे. महाराज रूढ अर्थाने राष्ट्राभिमानी नाहीत पण आपल्या राष्ट्राच्या ठिकाणी एखादे आदर्श वैशिष्ट्य असल्याचे निर्विकार मनाने ते मांडल्याशिवाय राहत नाहीत.

जगातील धर्मपंथ कसे असहिष्णू आहेत हे सांगितल्यावर राष्ट्रकल्पनेचे श्रेष्ठत्व सांगताना महाराज म्हणतात, "ख्रिश्चन धर्मात अशी कल्पना आहे की ख्राईस्ट हा इतर राष्ट्रांतील अनीतिमान ख्रिश्चन असला तरी त्याला उद्धरून नेईल. पण नीतिमान इतर राष्ट्राला बुडवून टाकील. ही कल्पना आपल्यामध्ये नाही. आपल्या धर्मात चांगला कोणत्याही ठिकाणी असला तरी त्याचा उद्धार होतो व वाइटाचा नाश होतो असे आहे. देवदैत्यांचा लढा नेहमीच चालला आहे पण असुरकुलात उत्पन्न झालेल्या प्रल्हादाचे ईश्वराने रक्षण केले... बळी या राजाचे देव दास झालेत. विभीषण दैत्यवंशीय असून रामाने रावणाचा वध करून त्याला लंकेचे राज्य दिले... ते स्वतःच्या घशात टाकले नाही, कारण आपल्याकडे घशात टाकण्याची कल्पना नाही. चांगले राज्य ठेवून वाईट राज्य नाहीसे करावे असे आहे. आपल्यातील राष्ट्रीय कल्पना higher आहे हे म्हणणे अभिमानाचे नाही तर निःपक्षपातीपणाचे आहे.... जो देश जिंकला गेला त्या देशातलाच जर एखादा मनुष्य चांगला असला तर त्याला 'home rule' देण्याची रीती पूर्वी होती."[३७४]

आर्यधर्माचे श्रेष्ठत्व

महाराज म्हणतात, "इतर धर्मात जे नाही ते आर्यधर्मात आहे. इतर धर्मात जे आहे ते आर्यधर्मात आहे; आर्यधर्मात जे नाही ते इतर कोठेही नाही, इतर धर्मीयांनी आर्यधर्म मोडण्याची खटपट केली पण आर्यधर्मीयांनी तसा प्रयत्न कधीही केला नाही. म्हणूनच आर्यधर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ, सर्वव्यापक, सर्व समावेशक व सर्वमूळस्वरूपाचा असल्याने तोच जगातील सर्व धर्मांच्या गुरुस्थानी आहे. जगत्कारणाकडे नेणारा तोच धर्म आहे.... ब्रह्म हेच एक जगत्कारण, असा सिद्धांत आर्यांनी मांडला... हेच तत्त्वज्ञान भगवद्गीतेत श्रीकृष्णाने सांगितले. म्हणून गीता ग्रंथ जगाचे Bible (बायबल) होणार असे मी भविष्य करतो.[३७५]... भगवद्गीतेसारखे शास्त्र त्रिभुवनात नाही." वेद अपौरुषेय आहेत यासंबंधी मार्मिक विवेचन महाराजांनी केलेले आहे.

हिंदु-मुसलमानांची जातीय समस्या त्यासंबंधीचे महाराजांचे विश्लेषणही चिंतनीय आहे. ते म्हणतात, "राजकीय द्वेषामुळे व व्यावहारिक दुर्गुणामुळे हिंदु-मुसलमानांच्या लढाया झाल्यात, परंतु धार्मिक द्वेष हिंदु-मुसलमानात कधीच राहू शकत नाही. आम्ही त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नाही म्हणून त्यांनी आमच्या धर्मात हात घालू नये असे हिंदूंना वाटते. हिंदूंच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूंनी उगे राहावे म्हणजे हिंदूत्व नाहीसे करावे काय ?"[३७६]

हिंदुधर्म आणि इस्लामधर्म यांचे विस्तृत तुलनात्मक विवेचन करून त्यातील विविध साम्यस्थळे दाखवून व्यापक अशा हिंदु-धर्माशी मुसलमानांच्या धर्माचा सहज समन्वय होतो,[३७७] असे मत महाराजांनी मांडलेले असून ते त्यांच्या उदारमताचे द्योतक आहे. "मुसलमान व हिंदूंचा धर्मद्वेष

तरी धर्मद्वेषाने पडलेला नसून हिंदूंना जीवापेक्षा पलीकडे वाटणारी जी बायकांची अब्रू ती घेतल्यामुळे पडला आहे असे टॉडकृत राजस्थानच्या इतिहासावरून दिसते."[३७८]

या सर्व विवेचनावरून महाराजांच्या वेदांती राष्ट्रीयदृष्टीचा परिचय होतो. याशिवाय महाराजांनी, नीती, तत्त्वज्ञान, भौतिकशास्त्रे, शिक्षण, साहित्यशास्त्र, मानसशास्त्र, आयुर्मानसशास्त्र इत्यादी विविध शास्त्रांची आधुनिक सिद्धांतांच्या आधारे विस्तृत चर्चा केली आहे. डार्विनच्या उत्क्रांतिवादाचे समीक्षण करून त्याचे शास्त्रीय पद्धतीने महाराजांनी खंडन केलेले आहे.[३७९] तसेच स्पेन्सरच्या मताचेही खंडन केलेले आहे.[३८०] आर्य संस्कृतीचे विश्वव्यापकत्वही अनेक पुरावे देऊन स्पष्ट केलेले आहे. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन, श्री. अप्रबुद्ध आणि डॉ. ब. स. येरकुंटवार, म. म. बाळशास्त्री हरदास या राष्ट्रीय तत्त्वचिंतकांच्या विचारांत आणि महाराजांच्या विचारांत बरेच साम्य असल्याचे आढळते. आपल्या प्राचीन वैदिक परंपरेचा यथार्थ अभिमान बाळगून आध्यात्मिक पातळीवर भारतीयांचे श्रेष्ठत्व किती विविध क्षेत्रांत होते हे या समन्वयमहर्षी प्रज्ञाचक्षू सत्पुरुषाने सांगून राष्ट्राची सेवाच केलेली आहे असे प्रांजळपणे म्हणता येते.

ऽऽ

राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता

विषयप्रवेश

राष्ट्रवादाचा विशिष्ट कालखंडातील विशिष्ट साहित्यप्रकारावरील प्रभाव हाच प्रबंधाचा मुख्य विषय असल्यामुळे त्यासंबंधीच्या कल्पना स्पष्ट करणे विवेचनाच्या सोयीसाठी आवश्यक आहे. या ठिकाणी आधुनिक मराठी कवितेवरील राष्ट्रीय प्रभावाची चिकित्सा करताना राष्ट्रवादासंबंधीच्या, त्याच्या प्राचीन परंपरेसंबंधीच्या कल्पना पुन्हा एकदा पार्श्वभूमी म्हणून स्पष्ट होणे आवश्यक आहे. प्रो. हेराल्ड लॉस्कीच्या मते एकोणविसाव्या शतकात राष्ट्रवाद फोफावला आणि सर्व जगात त्याची लागण झाली. ही एवढी पुनरावृत्ती करण्याचे महत्त्वाचे कारण असे आहे की, एकोणविसाव्या शतकात जेव्हा इंग्रजी राजवट भारतात आली त्यावेळी राष्ट्रवादाचा वा राष्ट्रीयत्वाचा भारतीयांना परिचय झाला. तत्पूर्वी राष्ट्रवाद ही काय चीज आहे हे या देशातील लोकांना माहीत नव्हते. म्हणजेच राष्ट्रवादाची शिक्षा दीक्षा आम्हाला ब्रिटिशांनी दिली असे काही आधुनिक अभ्यासकांचे मत आहे. या मताचा पुरस्कार करणारे पाश्चात्य विद्वान आहेत तसेच एतद्देशीय विद्वानही आहेत यासंबंधी पहिल्या प्रकरणात विवेचन आलेले आहे. परंतु या विचाराला अशास्त्रीय, अनैतिहासिक आणि अज्ञानजन्य मानणारेही लोक या देशात असून आपल्या अभ्यासपूर्ण शास्त्रीय पुराव्याद्वारे उत्तर देऊन आक्षेपकांना निरुत्तर करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. तेव्हा आधुनिक मराठी काव्याची परंपरा मांडताना त्या विचारांचा परामर्ष घेणे आवश्यक आहे, कारण त्याशिवाय राष्ट्रवादाचा प्रभाव नीटपणे अभ्यासता येणार नाही अशी माझी एक अभ्यासक या नात्याने धारणा आहे.

राष्ट्रभावना आणि देशाभिमान यांचा परस्परसंबंध

समूह भावना– राष्ट्रभावनेसंबंधी विस्तृत विवेचन मी पहिल्याच प्रकरणात केलेले आहे. इथे विवेचनाच्या दृष्टीने शास्त्रज्ञांनी निरनिराळ्या पातळ्यांवरून केलेले विवेचन विषय स्पष्ट होण्यापुरतेच करण्याचे ठरविले आहे. राष्ट्रीय भावनेचे वर्णन 'ए स्टेट ऑफ माईंड' एक मानसिक अवस्था असे बहुतेक मानसशास्त्रज्ञांनी केलेले आहे. परंतु मानसशास्त्रज्ञ या भावनेच्या मुळाशी जाऊन पोचले आहेत. त्यांना प्राण्यांच्या ठिकाणी असणाऱ्या समूहभावनेत या भावनेचे मूळ आढळून आलेले आहे. प्रो. डब्ल्यू. बी. पिल्सबरी या मानसशास्त्रज्ञाने आपल्या मताच्या प्रतिपादनासाठी जीवजगतातील एक पुरावाच सादर केलेला आहे. प्रो. पिल्सबरी म्हणतात, 'ही समूहभावना प्राण्यांत संकटकाळी विशेष क्रियाशील झालेली दिसते. एका परीक्षण नलिकेत, एखाद्या द्रव पदार्थात तरंगत असलेले सूक्ष्म जंतू [बॅक्टेरियाज] या द्रवात हळूहळू सोडलेल्या एखाद्या मारक द्रवापासून

दूर जात जात पुन्हा एकत्र गोळा होतात. राष्ट्रातील मानवी घटकही संकटकाळी अशीच एकजूट करून प्रतिकारासाठी उभे राहतात. युरोपियन राष्ट्रांच्या निर्मितीचा इतिहास पहिला की ही घटना ठळकपणे लक्षात येते. परकीय आक्रमण किंवा परकीय सत्ता ही समूहजाणीव चटकन निर्माण करू शकते."[२] तात्पर्य, समूहजाणीव ही नैसर्गिक असून ती सर्वच प्राणिमात्रांत आढळते.

सहज प्रवृत्ती आणि राष्ट्रीय भावना

काही मानसशास्त्रज्ञांनी या समूहभावनेचे मूळ प्राण्यांच्या ठिकाणी असणाऱ्या उपजत वृत्तीत असल्याचे सांगितलेले आहे. या उपजत वृत्ती मानवाच्या ठिकाणीही असतात. इतरांचे, सूचनांचे अनुकरण, सहानुभूतीची भावना, सत्ता गाजविण्याची आणि कुठली तरी सत्ता मान्य करण्याची वृत्ती आणि विविध इच्छा या उपजत वृत्तीशीच संबंधित असतात. मानवी मनातील या उपजतवृत्ती आणि विचार यांच्या साहचर्यातून स्थायी वृत्तीचा उदय होतो. ही स्थायी भावनाच पुढे समूहभावनेत परिवर्तित होते. यावरून मॅक्डुगल या मानसशास्त्रज्ञाने असा निष्कर्ष काढला की राष्ट्रनिष्ठेत परिवर्तित ही समूहभावना प्राचीन असल्यामुळे राष्ट्रभावनाही मानवाइतकीच प्राचीन असली पाहिजे. मॅक्डुगलच्या या मताचे अनेकांनी समर्थन केलेले आहे.

राष्ट्रीय भावनेचे मानसशास्त्रीय स्वरूप

मॅक्डुगलच्या मतांशी काही मानसशास्त्रज्ञ सहमत झाले नाहीत. त्यांनी ती कल्पना अशास्त्रीय म्हणून नाकारली. त्यांच्या मते राष्ट्रभावना ही सहज वा उपजतप्रवृत्तीशी संबंधित असली तरी राष्ट्रभावनेशी तिचे जवळचे नाते नाही. कारण सहजप्रवृत्ती ही एका विशिष्ट राष्ट्राची मालमत्ता नसून सर्वच मानवजातीचा ठेवा आहे. उलट राष्ट्रीय भावना ही एक समाजनियंत्रित संश्लेषणात्मक भावना आहे. ती एक सातत्य राखणारी भावना आहे. तिची प्रत्येक पिढीत पुनर्निर्मिती करावीलागते. शिक्षणाद्वारे ती भावना एका मनातून दुसऱ्या मनात संक्रमित करता येते, परंतु वर्तणुकीचा शाश्वत प्रकार असे तिचे स्वरूप नसते. डब्ल्यू एरेनस्टाईन या जर्मन मानसशास्त्रज्ञाच्या मते व्यक्तीला समूहाशी जोडणारा जो दुवा असतो त्याच्या जाणिवेवर राष्ट्रातील घटकांचे संबंध आधारित असतात. आपले कुटुंब आणि आपले मित्र यांच्याविषयी व्यक्तींच्या मनात ज्या स्नेहभावना असतात त्यांचाच विस्तार होऊन राष्ट्रीय भावनेचा उदय होतो. [३]

प्राण्यांच्या जाणिवेच्या तुलनेत मानवी जाणिवेचे वैशिष्ट्य

राष्ट्रीय भावनेचे मूळ उपजतप्रवृत्ती, समूहभावना आणि स्थायी प्रवृत्ती यांच्याशी संबंधित असले तरी ते इतर प्राण्यांच्या तुलनेत वेगळे असते. स्नेहभावनेचा विस्तार राष्ट्रभावनेत परिवर्तित होतो इत्यादी मानसशास्त्रज्ञांनी केलेले तर्क आपण पाहिले. परंतु एवढ्याने त्या भावनेचे वैशिष्ट्य खरेखुरे स्पष्ट होत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की काही भावना मानवांशी व इतर प्राण्यांशी संबंधित व सारख्या असल्या तरी 'राष्ट्रीयत्व' ही गोष्ट केवळ मानवांशीच निगडित आहे. मानवी जीवन व इतर प्राणिसृष्टी यात अत्यंत महत्त्वाचा भेद असा आहे की, इतर प्राणिसृष्टीची जाणीव ज्ञानशक्ती (Consciousness) त्या सृष्टीच्या शारीरिक गरजा भागविण्यापुरतीच व त्यांच्यावर शरीराचे व सृष्टीचे नियंत्रण करणारी असते. हे शारीरिक व सृष्टीचे नियंत्रण उल्लंघून जाण्याची त्यांची शक्ती नसते. परंतु मानवी जाणिवेचे वैशिष्ट्य असे की ती विविध शारीरिक गरजा भागवूनही अफाट स्वरूपात शिल्लक राहते, त्यामुळेच इतर प्राण्यांच्या तुलनेत किती-

तरी पटीने त्याची वास्तविक जाणीव अफाट तर असतेच परंतु त्याच्या शारीरिक जाणिवेचे आणि सृष्टीचे नियंत्रण काही प्रमाणात असले तरी त्याची जाणीव ही इतकी विशाल व अफाट असते की तो शारीरिक व सृष्टीचे नियंत्रण अत्यंत अल्पप्रमाणात बाळगतो. किंबहुना शारीरिक आणि सृष्टीच्या नियंत्रणावर मात करण्यातच मानवजातीच्या विकासाचा इतिहास साकार झालेला आहे. मानवी जीवनाचा विविध क्षेत्रांतील जो प्रचंड विकास झालेला आहे, त्याने या अनंत-सृष्टीची विविध रहस्ये शोधून काढण्याचा ध्यास घेतलेला आहे हे त्याच्या या जाणिवेचे वैशिष्टय आहे. " मनुष्याच्या स्वभावातच जीवनाचे अंतिम ध्येय समजावून घेण्याची अनिवार तृष्णा असते आणि या अनिवार तृष्णारूपी जिज्ञासेपासूनच तत्त्वज्ञानाचा जन्म होतो. [४]" हे लो. टिळकांचे उद्‌गार या त्यांच्या अफाट जाणिवेचाच प्रत्यय देतात. हा मानवाचा वेगळेपणा व विशालपणा त्याच्या राष्ट्रीय भावनेच्या बाबतीतही असल्यामुळे त्याचे स्वरूप केवळ जीवशास्त्रीय, केवळ मानसशास्त्रीय नाही तर ते अंतःसृष्टीमुळे आध्यात्मिकतेकडे वळलेलें आहे.

राष्ट्रवादाचे भौतिक अधिष्ठान

राष्ट्रवाद ही एक मानसिक अवस्था आहे हे सर्वांना मान्य आहे. या भावनेचे भौतिक अधिष्ठान देश हा घटक आहे. लोकसमूहाचे कोणत्या ना कोणत्या भूमीशी, भूभागाशी जिव्हाळ्याचे नाते असल्याचे दिसून येते. या भूमी वा देशाच्या ममत्वातून, त्याच्याबद्दलचा अभिमानही त्या त्या लोकसमूहाच्या ठिकाणी असल्याचे दिसून येते. या भूमीशी मानवाने जोडलेले नाते मातेचे, पित्याचे, तीर्थाचे, पावित्र्याचे, एखाद्या सजीव सगुण मूर्तीचे वा देवतेचे असते. मुळातील भौतिकतेचे उन्नयन होऊन तिच्या ठिकाणी दैवीशक्तीचे दर्शन तिच्या सुपुत्राला होते आणि मग तो देश त्याचे सर्वस्व होतो. राष्ट्रभावनेचे अधिष्ठान असणारी ही देशाभिमानाची भावना अतिशय प्राचीन असल्याचे उपलब्ध पुराव्यावरून निःशंकपणे म्हणता येते. सुप्रसिद्ध इतिहासकार आणि राष्ट्रवादाचे जागतिक कीर्तीचे अभ्यासक डॉ. स्नॉयडर आपल्या ' व्हेरॉयटिज ऑफ नॅशनालिजम् ' या ग्रंथात म्हणतात, " देशाभिमानाची भावना मानवाच्या समूहजीवनाइतकी पुरातन आहे. इजिप्शियन मेसोपोटोमियन, ग्रीक, रोमन इ. लोकांमध्ये ती आढळते. होमर या दंतकथात्मक अंध ग्रीक कवीने " आपल्या देशाकरिता मरण्यात एक प्रकारचे दिव्य समाधान व धन्यता आहे, [५]" असा उद्‌गार काढला होता. श्री. स्नॉयडरचे हे विधान देशाभिमानाच्या भावनेचा संदर्भ या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. कारण देशाभिमानाची भावना ही मानवाइतकीच प्राचीन असेल तर भारतीयांनी राष्ट्रवाद ब्रिटिशांपासून दत्तक घेतला या युक्तिवादाला अर्थ राहत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीयांची देशविषयक धारणा अत्यंत प्राचीन असून ती आजतागायत कायम आहे.

प्राचीनांच्या काव्यातून आढळणारी देशभक्तीची भावना

देशाभिमानाच्या भावनेच्या संदर्भातील श्री. स्नॉयडर यांचे मत इतर देशांच्या वाङ्मयाच्या दृष्टीने अधिकृतपणे स्वीकारता येईलच असे म्हणता येत नाही. परंतु भारतातील सर्वात प्राचीन असे वैदिक साहित्य त्या मताचा पाठपुरावा करणारे आहे. म. म. बाळशास्त्री हरदास यांच्या ' वेदांतील राष्ट्रदर्शन ' या द्विखंडात्मक ग्रंथात आणि १९७८ मध्ये प्रकाशित झालेल्या डॉ. व. स. येरकुंटवार यांच्या 'नवयुगाची बीजाक्षरे ' या ग्रंथात विपुल प्रमाणात पुरावे अभ्यासकाला आढळून येतील. या ग्रंथाचा आधार घेऊनच श्री. स्नॉयडरच्या मताचा मी पाठपुरावा केलेला आहे. या ग्रंथातील काही मोजकीच उदाहरणे देऊन माझा मुद्दा स्पष्ट करता येईल. वैदिक मंत्रातून केवळ मातृभूमीची भावनाच

तत्कालीन महर्षींनी व्यक्त केली नाही तर आपला राष्ट्रनिर्मितीमागील हेतूही त्यांनी ग्रंथित केलेला आहे. उदा. हा मंत्र पाहा,

" भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदः तपो दीक्षा मुपसे दुरग्रे ।
ततो राष्ट्रं बलमोजश्च जातम् तदस्मै देवा उपसं नमस्तु ॥ "[६]

या अथर्ववेदातील ऋचेद्वारे ऋषी सांगतो, " जगत् कल्याणाच्या उदात्त हेतूने स्वर्विद ऋषींनी आपल्या उग्र तपाचरणाद्वारे राष्ट्र, बल आणि ओजाची निर्मिती केली." अगदी आधुनिक अर्थाने 'राष्ट्र' कल्पनेचा विचार केला तर तेजस्वी व बलशाली असे लोकच खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मिती करू शकतात आणि हजारो वर्षे आपले अस्तित्व कायम ठेवू शकतात.

वैदिकांच्या आकांक्षांचे प्रकटीकरण

वैदिक काल आणि स्मृतिकाल हे संस्कृत साहित्याचे सुरुवातीचे दोन कालखंड. कालखंडात वीरगीते, आख्याने, दैवतकथा, पुराणकथा, इतिहास इ. अनेक रूपाने साहित्यनिर्मिती होत होती. वैदिकांच्या राष्ट्रनिर्मितीमागील प्रेरणा लोककल्याणाची होती हे आपण पाहिले आहे. राष्ट्र बलवान आणि ओजस्वी होण्याकरिता त्या राष्ट्राच्या लोकसमुदायात संघशक्तीचे जागरण होणे आवश्यक असते. निश्चित अशा आकांक्षांनी संपन्न असा समाजच राष्ट्रनिर्मिती करू शकतो. ऋग्वेदातील विविध ऋचांमधून या संघभावनेचे आविष्कार दिसून येतात. उदा.

" सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ॥
समानो मन्त्रः समितिः समानी समानं मनः सह चित्तमेषाम् ।
समानं मंत्रं अभिमंत्रये वः समानेन वो हविषा जुहोमि ॥
समानी व आकूतिः समाना हृदयानि वः
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति "[७]

(ऋग्वेद मंडल १० सू. १९१)

(" मित्रहो, तुम्ही देखील एकत्र होऊनच कार्य करा. परस्परात विचारविनिमय करण्यासाठी संवाद करीत जा. पूर्वकाळी देव ज्याप्रमाणे एकत्र येऊन हविर्भागाचा स्वीकार करीत तसे तुम्ही एकमेकांचे विचार समजावून घ्या. तुमच्या सर्वांच्या मनातील उद्देश एकसारखाच असू द्या. तुमची सर्वांची सभा एका जागीच करा. त्यामुळे तुमचे मन वा कृती एकसारखीच राहतील. म्हणून तुम्हा सर्वांना मी आता एकाच मंत्र सांगतो. तुमचा विचार आणि योजना एकच असू द्या. तुमची अंतःकरणे एकसारखी, एकाच भावनेने परिपूर्ण असू द्या. तसेच तुमचे मनही सारखे एकाच ध्येयाकडे लागलेले असू द्या, म्हणजे तुम्हाला पाहिजे असेल ती गोष्ट सहज साध्य होईल. ")

प्राचीन भारतीयांच्या जीवनाचा आदर्श

प्रत्येक व्यक्तीने आपल्या राष्ट्रीय जीवनाचा आदर्श म्हणून दैनंदिन जीवनात दोन श्लोक म्हणावेत. त्यांच्या आशयाचे चिंतन सतत मनाशी करावे अशी त्यांची अपेक्षा होती. ते श्लोक पुढीलप्रमाणे आहेत.

" काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः ॥

अपुत्राः पुत्रिणः सन्तु पुत्रिणः सन्तु पौत्रिणः
अधनाः सधनाः सन्तु जीवन्तु शरदः शतम् ॥ "८

सहभोजनाच्या प्रसंगी आपल्या राष्ट्रीय आकांक्षा व्यक्त करणारा श्लोक राष्ट्रीय एकात्मकतेचे दर्शन घडवितो. ती प्रार्थना पुढीलप्रमाणे आहे.

" ॐ सहनाववतु सह नौ भुनक्तु
सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः "

देशाभिमानाच्या उत्कटभावनेतून आविष्कृत झालेले वैदिक गीत

आपल्या मातृभूमीबद्दल वैदिक काळातील ऋषींना किती आदर होता आणि तिचे त्यांनी परोपरीने कसे स्तोत्रगायन केले होते याची कल्पना अथर्ववेदातील पृथ्वीसूक्तातील मंत्र वाचल्यानंतर चटकन येते. एकूण ६३ मंत्रांत हे सूक्त रचलेले आहे. मातृभूमीबद्दल त्यांना किती आत्मीयता आणि अभिमान होता हे त्यातील चारसहा मंत्रांतूनही स्पष्ट होण्यासारखे आहे. ते मंत्र पुढीलप्रमाणे आहेत.

" यामा श्विना व विमातां विष्णु सस्यां विचक्रमे .....
..... माता पुत्राय मे पयः । ९
... गिरयस्ते पर्वता हिमवन्तः । अरण्यं ते पृथिवि स्यो नमस्तु । .....
..... अजीतोऽ हतो अक्षतो ऽ ध्यष्ठां पृथिवी महम् "

" हे भारतभूमी ! तुझा तो नगाधिराज हिमालय, तुझी ती रम्य अशी घनदाट विशाल अरण्ये आणि त्यातील विविध रंगांनी नटलेली सृष्टी मला नेहमीच हर्ष देते. ज्या आमच्या मायभूच्या संरक्षणाचे कार्य दक्षतेने सर्वदा देवेन्द्र करतो अशी ही सौख्यदायक मायभूमी मला अतिशय प्रिय आहे."

सकाळी उठल्याबरोबर अगतिकतेने भूमातेला पदस्पर्श करावा लागतो याची मनोमन खंत वाटून भूमीवर पहिला पदन्यास करण्यापूर्वी पुढील प्रार्थना सर्वांनी करावी असे ऋषी सांगत असत.

" समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडले

विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे "[४१०] कारण " माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः" " मी पृथ्वीचा पुत्र आहे व पृथ्वी माझी माता आहे हे नाते कदापि विसरू नये. यासाठीच ही प्रार्थना होती."

देवांनी हेवा करावा असे आमच्या मातृभूमीचे भाग्य आहे

हे सांगताना एक वैदिक ऋषी म्हणतो,

" गायन्ति देवाः किल गीतकानि
धन्यास्तु ये भारतभूविभागे
स्वर्गापिवर्गस्यच हेतुभूते
भवन्ति भूयः पुरुषाः सुरत्वात् "[११]

" जे भारतात जन्म पावतात त्यांच्या सहभाग्याची स्तुतिस्तोत्रे देवही गात असतात. या भूमीमध्ये पशू, पक्षी, कृमी, कीटक इतकेच काय पण वृक्ष पाषाण होऊन राहणेही परम भाग्याचे आहे. अशा

स्थितीत कर्म करून नराचा नारायण होण्याचे साधन असलेले हे मनुष्यशरीर प्राप्त होणे केवढे भाग्याचे असेल !" किती पराकोटीचा अभिमान या भूमीच्या पुत्रांना आहे हे या वरील श्लोकावरून स्पष्टपणे दिसून येते.

या भूमीचे एक आगळे वैशिष्ट्य आहे

जगातील इतर भूमीपेक्षा या भूमीचे एक आगळे वैशिष्ट्य आमच्या प्राचीनांनी आवर्जून सांगितले आहे. किंबहुना या वैशिष्ट्यामुळेच तर वृक्षपाषाणाच्या स्वरूपातही राहण्याची गोष्ट ते परमभाग्याची समजत होते. हा पुराणकर्ता म्हणतो, या भूमीत मनुष्य म्हणून जन्म घेणे हे भाग्याचे वाटण्याचे मुख्य कारण आमची भूमी केवळ मातृभूमी, पितृभूमी, अथवा पुण्यभूमीच नाही तर तिचे महत्त्व यापेक्षाही आम्हाला अधिक आहे.

"अथापि भारतं वर्षं जम्बुद्वीपे विशेषतः
यतो हि कार्यभूरेषा अतोऽन्या भोगभूमयः"[१२]

("या सर्व विश्वात जम्बुद्वीपातील भारतवर्षाचे एक वेगळेच वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. कारण इतर सारे भूप्रदेश हे केवळ भोगभूमी असून एकटा भारतवर्ष कर्मभूमी आहे.") या पुराणवाङ्मयातील श्लोकांचे प्रतिबिंब पंधराव्या शतकातील श्री. एकनाथ महाराजांसारख्या वीतराग आणि अहंकार-शून्य पुरुषाच्या,

"भरतखंडी नरदेह प्राप्ती । हे तो परम भाग्याची संपत्ति ।
तेथे विवेकू परमार्थी । त्याचा वश मी परमात्मा" [१३]

या ओवीत प्रगट झालेले आहे. नाथांच्या या ओवीच्या संदर्भात डॉ. व. स. येरकुंटवार म्हणतात "त्यात प्राचीनतम परंपरा जशी प्रतिबिंबित झाली आहे तशीच जीवनाचे साध्य–साधन व भूमीशी असलेला त्याचा घनिष्ठ संबंध समाविष्ट झाला आहे. भारतीयांच्या शास्त्रीय राष्ट्रवादाची कुपीच ही ओवी आहे. तिचे मूळ पौराणिक वाङ्मयात लख्ख दिसते."[१४]

व्यास वाल्मीकींची प्राचीन आर्ष महाकाव्ये

इ. स. पूर्व ८०० ते इ. स. ८०० च्या दरम्यानच्या काळाला वैदिक व लौकिक यांचे 'संधियुग' असे नाव आहे. याचाच अर्थ असा की इ. स. पूर्व ५०० च्या काळात महाभारत व रामायण या दोन श्रेष्ठ मौखिक महाकाव्यांची निर्मिती अनुक्रमे महर्षी व्यास आणि महर्षी वाल्मीकींनी केली. डॉ. द. भि. कुळकर्णी आपल्या 'महाकाव्य स्वरूप व समीक्षा' या प्रबंधात महाभारतासंबंधी लिहितात; "महाभारत हे संस्कृतातीलच नव्हे तर जगातील सर्वात श्रेष्ठ आणि सर्वात दीर्घ महाकाव्य होय. महाभारत हा निव्वळ काव्यग्रंथ नाही. इतिहास, तत्त्वज्ञान, विविध विद्या, कला, धर्मपुराण या साऱ्यांचे ते माहेरघरच आहे. तो भारतीय संस्कृतीचा अद्भुत कोश आहे. तो पाचवा वेद आहे."[१५] महाराष्ट्रात भागवतधर्माच्या मंदिराचा पाया घालणारे आणि महाभारतरूपी कमळातील पराग अशा गीतेवर देशीकार लेणे चढविणारे ज्ञानेश्वर, महाभारताची थोरवी आपल्या ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातच श्रोत्यांना मोठ्या अभिमानाने निवेदन करतात.

"म्हणउनि महाभारती जे नाही । ते नोहेचि लोकी तिही ।
येणे कारणे म्हणिपे पाही । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय"

कौरवपांडवांची युद्धकथा सांगण्यासाठीच महाभारताचा जन्म झाला. वीरगीते आणि वीरगाथा या स्वरूपातच महाभारत सुपरिचित आहे. व्यासांचा जय, त्यात भर घालून वैशंपायनाने केलेले भारत आणि पुढे सौतीने त्याचा विस्तार करून आजच्या स्वरूपातील महाभारत अस्तित्वात आले असे सांगितले जाते. सूत, चारण, पुरोहित, तत्त्ववेत्ते आणि पौराणिक इत्यादी अनेकांनी त्यात विविध प्रकारे भर घालून त्याचे आजचे विराट व वैचित्र्यपूर्ण स्वरूप अस्तित्वात आलेले आहे असेही सांगितले जाते.

महाकाव्य हे राष्ट्रीयत्वाचे प्रधान अंग आहे

व्यासांच्या महामतीने निर्माण केलेले हे वाग्धन आमच्या राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे. नुसत्या संस्कृत साहित्यातच या महाकाव्याच्या आधारे रचना करणारे सुमारे २७ सुप्रसिद्ध ग्रंथकार आहेत. त्यात भारवी, माघ, श्रीहर्ष यांची महाकाव्ये मिळविली म्हणजे ही संख्या ३० वर जाते. महाभारताप्रमाणेच रामायण हे महाकाव्यही राम रावण युद्धकथेवर आधारलेले आहे. प्राचीन परंपरेचा रामायण महाभारताशी असलेला संबंध स्पष्ट करताना डॉ. ग. त्र्यं. देशपांडे म्हणतात, "भारताचे प्राणभूत वाग्धन म्हणजे वेद. वेदातील सर्वज्ञान आणि प्रेरणा व्यास वाल्मीकींनी आत्मसात केल्या आणि महापुरुषांच्या चरित्रगायनाच्या स्वरूपात त्यांना नवीन उजाळा देऊन त्यांनी वेदार्थाचे उपबृंहण केले."[१६] ... "भगवान रामचंद्राच्या रूपाने वाल्मीकींनी आपल्यासमोर आदर्श राष्ट्रनेता उभा केला. "कोन्वस्मिन् सांप्रतं लोके गुणवान् कश्च वीर्यवान् । धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवान्को दृढव्रतः" असे चित्र उभे केले तर व्यासांनी राष्ट्रीय जीवनातील संघर्षाचे स्वरूप उकलून दाखविले."[१७]

लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीय महाकाव्ये म्हणूनच रामायणाचा आणि महाभारताचा गौरव केला आहे. इतकेच नव्हे तर या महाकाव्यांना भारतीयांच्या राष्ट्रीयत्वाचे प्रधान अंग मानलेले आहे. ते लिहितात, "देशातील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरुषांचे उदात्त चरित्र लोकांस सांगून त्यांचे वंशजात शौर्य, अभिमान, सत्यनिष्ठा, धर्मबुद्धी वगैरे गुण जागृत करणारे प्राचीन काव्य जेथे जेथे उपलब्ध आहे तेथे तेथे ते राष्ट्रीयत्वाचे प्रधान अंग मानले गेले आहे." ... "राष्ट्राचा अभ्युदय होण्यास अनेक कारणे लागतात हे निर्विवाद आहे पण राष्ट्रातील सर्व लोकांत एकसमयावच्छेदेकरून आनंद, ज्ञान, ईर्षा किंवा उत्साह देणारे प्राचीन महाकाव्यासारखे दुसरे साधन मिळणे कठीण."[१८]

लोकमान्य टिळक महाकाव्याचे राष्ट्रीय महत्त्व सांगूनच थांबले नाहीत, त्यांनी महाकाव्याची संस्कृत श्लोक रचून लक्षणेही सांगितली आहेत. लो. टिळक म्हणतात, "महाकाव्यात थोर राजवंशातील दिव्य कर्म करणाऱ्या, वैभवसंपन्न, प्राचीन अशा नायकांचे चरित्रकथन केलेले असावे. त्यात अद्भुत अर्थाच्या धर्मार्थकामकथा असाव्यात. महाकाव्याची कथा शीलवर्धक असावी. तिच्यातून पवित्र जीवनक्रम सूचित व्हावा. सूक्ष्म अर्थ, न्याय, रोमहर्षक प्रसंग व महान आशय यांनी महाकाव्य नटलेले असावे."[१९] राष्ट्रीय उत्थानाची प्रेरणा देणारे वाङमय लोकमान्य टिळकांनी सांगितल्याप्रमाणे 'शीलचारित्र्यवर्धन' करणारेच असले पाहिजे असा अभिप्राय डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी दिलेला आहे. अशा वाङमयासंबंधी सांगताना डॉ. देशपांडे म्हणतात, "दैवी संपत्तीला जागृत करून धृत्युत्साह समन्वित असे राष्ट्रीय सात्त्विक कार्यकर्ते समाजात निर्माण करण्याचे सामर्थ्य ज्या वाङमयात आहे त्या वाङमयाला राष्ट्रीय जीवनात चिरंतन स्थान आहे. एवढेच नव्हे तर ते वाङमय म्हणजे उत्थानशील वर्धिष्णू राष्ट्राच्या आत्म्याचा वाग्रूप आविष्कार आहे हे स्पष्ट आहे."

उत्तरकालीन कवींना प्रेरणा देण्याचे महाभारत आणि रामायणाचे कार्य

महाभारत आणि रामायणानंतरचा काळ म्हणजे इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून तो इसवी सनाच्या सातव्या आठव्या शतकापर्यंतचा काळ भाष्यकाल म्हणून ओळखल्या जातो. "या काळातच अश्वघोष, बुद्धघोष, कालिदास, भास, कुमारदास, भारवी, माघ, भवभूती इत्यादी महाकवी उदयाला आले. याकाळातच भारतात सातवाहन सम्राटांनी व नंतर गुप्त सम्राटांनी राज्य केले. प्रथम चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, द्वितीय चंद्रगुप्त या सम्राटांची कारकीर्द राष्ट्राला सर्वच दृष्टीने अत्यंत उपकारक ठरली." जैन, बौद्ध व वैदिक यांच्यातील संघर्ष क्षीण होऊन त्यांच्यात समन्वयाची भावना उदित झाली. याच काळात संस्कृत साहित्यात, रामायण महाभारतातील कथानकांवर आधारित महाकाव्ये, काव्ये, नाटके यांची विपुल निर्मिती झाली. कालिदासाची विक्रमोर्वशीय, अभिज्ञान शांकुतल ही नाटके महाभारतावरच आधारित आहेत. याशिवाय क्षेमेश्वर, त्रिविक्रमभट्ट, क्षेमेन्द्र, कांचनपंडित, भट्ट-नारायण, कुलशेखर नीतिवर्मन, राजशेखर, वत्सराज, रामचन्द्र अशा कितीतरी कवींनी महाभारतावर ग्रंथ लिहिलेले आहेत. याच कालखंडात रामायणावर सुमारे चाळीसच्या वर कवींनी संस्कृतात काव्य-नाटकांची निर्मिती केली असल्याची नोंद डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी आपल्या प्रबंधात दिलेली आहे. आपल्या अंगच्या अलौकिक थोरवीनेच ही दोनीही मौखिक महाकाव्ये अनेक संस्कृत साहित्याचे उपजीव्य ग्रंथ बनल्याचे डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी म्हटलेले आहे ते यथार्थ आहे. [१०]

महानुभाव व संत साहित्यावरील रामायण व महाभारताचा प्रभाव

सुमारे दहाव्या अकराव्या शतकात संपूर्ण भारतातच प्रादेशिक भाषांचा उदय झाला आणि सुमारे बाराव्या शतकापासून तो इ. स. अठराव्या शतकापर्यंत प्राचीन मराठीत विपुल आणि गुणसंपन्न साहित्य निर्माण झाले. सुरुवातीचा वीरगाथाकाल सोडला तर या कालखंडाला भक्तियुग असेही नाव दिले जाते. नाथ, शैव, वैष्णव, लिंगायत, दत्त, शाक्त, वारकरी, महानुभाव आदी पंथांची निर्मिती याच काळात झाली. महानुभावांनी आपल्या पंचकृष्णात गोपालकृष्णाला पहिले स्थान दिले. त्यामुळे श्रीकृष्णचरित्रावर शेकडो गद्य, पद्य साहित्य मराठीत निर्माण झाले. मराठी संतांनी आपल्या भक्ति-काव्यातून सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही प्रकारच्या भक्तिभावनेला स्थान दिल्यामुळे आणि संतकवी प्राधान्याने सगुणोपासक असल्यामुळे त्यांनी भगवान रामचन्द्रप्रभू आणि भगवान श्रीकृष्ण या दोन रामायण आणि महाभारतातील अवतारी पुरुषोत्तमांची चरित्रे गायिली. उत्तरेत सूर, तुलसी, कबीर, जायसी, यांनी भक्तीची पताका फडकाविली. दक्षिणेत पंप, पोन्न, कंबन, यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला, पूर्वेला जयदेव, गौरांगचैतन्य प्रभू, विद्यापती, चंडीदास यांनी उपासनामार्गाची शिकवण दिली. पश्चिमेला ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास यांनी त्याचप्रकारे कार्य केले तर गुजराथेत व राजस्थानात अनुक्रमे नरसीभगत आणि मीराबाई यांच्या भक्तिगीतांनी लोकांना वेड लावले. सीता, द्रौपदी आणि रुक्मिणी या नायिकांच्या सुमारे आठ स्वयंवरकथा अस्तित्वात आहेत. महाभारतावर आधारित एकूण पंधरा काव्ये उपलब्ध आहेत तर रामायणावर बारा काव्ये. याशिवाय लक्षावधी ओळींची स्फुट कविता अस्तित्वात आहे. [११] या रचनांपैकी अनेक रचना अत्यंत लोकप्रिय आहेत. ज्ञानेश्वरांची "हा ग्रंथ गुरुवतीचा ठावो। येथोनि रसा जाला आवो रसालपणाचा" ही सुप्रसिद्ध ओवी सार्थ झालेली आहे. प्रपंच आणि परमार्थ साधण्याचे साधन म्हणून संतांनी या चरित्रांचे गायन केले.

गीतेवर भाष्य करताना ज्ञानेश्वर म्हणतात,

साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र । संसार जिणेतेहे शस्त्र ।
आत्मा अवतरवी वै ते मंत्र । अक्षरे इये ॥ [२२]

[ज्ञाने. अ. १५ ओ. ५७७]

आत्मविस्मृती, अज्ञान हेच मनुष्याच्या अधोगतीचे, करंटेपणाचे कारण आहे. रामायण, महाभारताच्या चंद्रसूर्यप्रकाशात या अज्ञानांधकाराचा नाश करण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला, नाथांनी केला, रामदासांनीही केला. ज्ञानेश्वर म्हणाले,

" एथ अविद्यानाशु हे स्थळ । तेणे मोक्षोपादान फळ ।
या दोही केवळ । साधन ज्ञान ॥हे इतुलेचि नानापरि निरुपिले ग्रंथ विस्तारी " [२३]

[ज्ञाने. अ. १८ ओ. १२४३, ४४]

संतांनी राष्ट्र नेत्यांची निर्मिती केली काय ?

शुद्ध भौतिकवादी दृष्टिकोनातून राष्ट्रीय विकासाला महत्त्व देणाऱ्या अनेक विद्वानांना वरील शीर्षक वाचून लेखकाच्या भावडेपणाची खात्री होईल. कारण संत हे परमार्थाला प्राधान्य देणारे; निवृत्तिवादाची कास धरणारे होते. आपल्या साहित्यातून त्यांनी लोकांना निवृत्तिवादच शिकविला. अशा या संतांनी राष्ट्रनेत्यांची निर्मिती केली हे कसे काय शक्य आहे ? परंतु सूक्ष्म विचार केला असता संतांनी राष्ट्रीय कार्य बजावले असे निःशंकपणे म्हणता येते. नुसत्या महाराष्ट्राचा प्रश्न घेतला तरी तेराव्या शतकापासून झालेली इस्लामी आक्रमणे ही एकेरी नसून ती दुहेरी होती. ती जशी राजकीय सत्ता आणि भौतिक समृद्धीसाठी आक्रमणे होती तशीच ती धर्मावरही आक्रमणे होती. केवळ संपत्ती लुटून नेऊन त्यांचे समाधान होत नव्हते तर बळजबरीने येथील लोकांचे धर्मपरिवर्तन करण्यात त्यांना एकप्रकारचा पुरुषार्थ वाटत होता. रामायण महाभारतातील आदर्श नायकांनी प्रतिकूल परिस्थितीशी लढा देताना आपले स्वत्व कायम राखले होते. " परित्राणाय साधूनाम् । विनाशाय च दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय । संभवामि युगे युगे ॥" हा योगेश्वर कृष्णाने गीतेतून दिलेला संदेश त्यांना माहीत होता. स्वधर्माचरण म्हणजे वर्णाश्रमधर्माप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला आलेले नियम, कर्तव्य अशीच त्यांची धारणा होती. हाच गीताप्रणीत कर्मयोग होता. त्याचे आचरण निष्कामपणे करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. स्वधर्मरूपी यज्ञाकडे दुर्लक्ष करू नका. केवळ भौतिक भोगांच्या पाठीमागे लागून प्रमत्त व्हाल तर मग पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.

'राईज ऑफ दि मराठा पावर' या सुप्रसिद्ध ग्रंथात न्या. मा. गो. रानडे यांनी संतांच्या चळवळीतूनच छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व उदयाला आले असे जे म्हटले आहे त्यातले रहस्य हेच आहे. आधुनिक काळातील राष्ट्रीय नेत्यांच्या जीवनाकडे बारकाईने पाहिले तर ते काहीसे विरक्तच वाटतील. राष्ट्राच्या महान कार्यासाठी ही वैयक्तिक प्रापंचिक आसक्ती त्यांना सोडावीच लागली. ही सारीच नेतेमंडळी एक दोन अपवाद सोडले तर देवनिष्ठ आणि धर्म-निष्टच होती, त्यांच्या प्रेरणांचे अधिष्ठान आध्यात्मिकच होते. संतांनी केलेल्या कार्यासंबंधीचा अभिप्राय डॉ. ग. त्र्यं देशपांडे यांनी राष्ट्रीय साहित्याच्या संदर्भात दिला असल्यामुळे एकूण राष्ट्रवादी काव्यपरंपरेच्या दृष्टीने समजावून घेणे महत्त्वाचे ठरेल.

संतांचा धर्म

संतांना अभिप्रेत असलेल्या धर्माची कल्पना स्पष्ट करताना डॉ. ग. त्र्यं. देशपांडे म्हणतात; " संतांनी धर्माचे प्रतिपादन केले तो धर्म समाजाचे धोरण आणि कल्याण करणारा धर्म होता. तो एखादा पंथ नव्हता. भक्तीचे स्वरूप विहित कर्ममय होते, निष्क्रिय नव्हते. प्रत्येक, संताने धर्म आणि पंथ तसेच खरा भक्त आणि दांभिक यांच्यातील फरक स्पष्ट दाखवून कुपंथ आणि दिखावू भक्त यावर कडक टीका केली आहे. समाजाच्या अवस्थेचे निदान करून संतांनी आपल्या अधःपातास आपणच कारण आहोत हे दाखविले. त्यांनी समाजाचे दोष दाखवून देऊन ते काढून टाकून बलिष्ठ व्हावयाचा मार्ग दाखवून दिला. कोणाचीही–राज्यसत्तेचीसुद्धा–तमा न बाळगता समाजातील सर्व स्तरांच्या जीवनाचे त्यांनी सूक्ष्मतेने विश्लेषण केले व ज्या निर्भयतेने त्यांनी त्यांच्यावर प्रहार केले तेवढी निर्भयता आणि सूक्ष्म दृष्टी क्वचितच अन्यत्र दिसेल. त्यांनी प्रत्यक्ष राजकारण केले नसले पण उत्तम राष्ट्रनेते त्यांनी निर्माण केले यात शंका नाही. "[२४] न्या. रानडे, लो. टिळक, महात्मा गांधी या नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीकरिता लोकांना उद्युक्त करताना संतांच्याच पद्धतीचा उपदेश केलेला असल्याचे आढळून येईल.

स्वामी विवेकानंदांचा अभिप्राय

वर निर्देश केलेले तीनही महापुरुष गृहस्थाश्रमी होते. त्यांच्या तुलनेत स्वामी विवेकानंद ब्रह्मचारी सन्यासी होते. मात्र स्वतःचा प्रपंच त्यांनी सोडला असला तरी राष्ट्राचा प्रपंच त्यांनी सोडला नव्हता. त्यांचा धर्म केवळ उपासनेचा नव्हता त्यांच्या धर्मातराजकीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच बाजूंचा विचार होता. प्राचीन स्मृतिकारांनी, रामायण, महाभारताची निर्मिती करणाऱ्या महाकवींनीही धर्माचे स्वरूप अधिक व्यापकपणे मांडलेले आहे. त्या धर्माचे महत्त्व सांगताना स्वामीजी म्हणतात, "We have seen that our vigour, our strength nay our national life is our religion."[२५] दुसऱ्या एका प्रसंगी स्वामीजी त्या धर्माचे व्यापकत्व सांगतात, " The life of this nation, is religion, its language, religion and its ideal religion, and your politics, society, municipality, plague–prevention work and famine–relief work all these things will be done as they have been done all along here viz. only through religion. Otherwise all your frantic yelling and be wailing will and nothing. "[२६] यावरून स्वामीजींची आणि संतांची वेगळी भूमिका नव्हती याचा प्रत्यय येईल.

संत वाङमयाचे एक साक्षेपी अभ्यासक प्रा. गं. बा. सरदार महाराष्ट्र संत मंडळीच्या कार्यासंबंधी आपला अभिप्राय देताना म्हणतात, " ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्त्वज्ञान दिले, नामदेवाने भक्तीची पताका फडकाविली, एकनाथांनी तत्त्व आणि तपशील, विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला. ज्ञानाशिवाय भक्तीला डोळसपणा नाही. आचाराशिवाय तिच्यातील जडता नाहीशी होत नाही. म्हणून तुकारामांनी आपल्या अभंगातून समाजकंटकांची यथोचित संभावना करून चिरंतन नीतिमूल्यांची जोपासना केली आणि ज्ञानेश्वरप्रणीत भागवत धर्माच्या देवालयावर कळस चढविला, ... वारकरी संतांप्रमाणेच रामदासांची विचारसरणीही अध्यात्मनिष्ठच होती..... समर्थांनी महाराष्ट्र धर्माद्वारे ब्राह्मण क्षत्रियांना आपले गतवैभव परत मिळविण्याची स्फूर्ती दिली. त्यासाठी राजनीती आणि व्यवहारधर्म यांना त्यांनी आपल्या वाङमयात

अग्रस्थान दिले. तसेच सामर्थ्य, संघटना, समयज्ञता, चतुरस्रता, प्रतिकार इत्यादी गुणांचा त्यांनी सतत पाठपुरावा केला." [२७].....

पंडित कवींचे साहित्य आणि कार्य

वामन पंडित, रघुनाथ पंडित या दोन कवींच्या नावांवरून त्यांनी ज्या प्रकारचे काव्य लिहिले त्या सर्वच कवींना पंडित कवी म्हणण्याचा प्रघात पडला. परंतु या दोन पंडितांचा अपवाद सोडल्यास इतर कवी व्युत्पन्न होते. आख्यानकाव्याचे विवेचन करताना डॉ. के. ना. वाटते यांनी त्यांना कला-कवीच म्हटले आहे. याचे प्रमुख कारण असे की यांची काव्यनिर्मिती संस्कृतातील विदग्ध काव्याच्या अनुकरणातून झालेली होती. चातुर्य, नागरपणा, सुसंस्कृतपणा, कलाभिज्ञता, पांडित्य या गुणांचा वाचक असा हा 'विदग्ध' शब्द असून हे सारेच गुण आपल्या काव्यातून प्रकट करण्याचा हे आख्यानक कवी प्रयत्न करीत होते. त्यांचा स्वाभाविक ओढा कलेकडे असला तरी त्यांचा पिंड श्रद्धावान भगवद्भक्तांचाच होता असे दिसून येते. संतांच्या काव्यापेक्षा त्यांच्या काव्याचे स्वरूप काहीसे भिन्न होते यात शंका नाही. परंतु ते पूर्णतः भिन्न नव्हते. किंबहुना ते भिन्नत्व बहिरंगाचे होते अंतरंग सारखेच होते. त्यांच्या काव्याची मूळ बैठक परमेश्वरभक्तीची व परमार्थाचीच होती. परमेश्वराची चरित्रे स्वतः गाऊन स्वतःचा आणि स्वजनांचा उद्धार करावा अशीच त्यांची स्पष्ट भूमिका होती.

महाभारत, रामायण, भागवत यातील निरनिराळी आख्याने हेच त्यांच्या काव्याचे विषय होते. आपल्या काव्याच्या विषयासाठी लौकिक जीवनाकडे ते वळले नाहीत. 'जेणे वाढे उत्कट भक्ती। तो तो विशेष लिहिला ग्रंथी।' हे मुक्तेश्वरांचे उद्गार किंवा 'हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितो भावे। वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावे।' हे मोरोपंतांचे उद्गार त्यांच्या काव्यरचनेमागील हेतू स्पष्ट करणारे आहेत. जनतेच्या उद्धारासाठी भारतकथा निवेदन करून भक्तिभावाकडे लोकांची मने वळविणे हा मुक्तेश्वराचा हेतू होता तोच हेतू मोरोपंतांचाही होता, महानुभाव पंथीय नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर, पं. दामोदर हे कवी घेतले किंवा वामन पंडित, रघुनाथ पंडित, सामराज, विठ्ठल आदी पंडित कवी घेतले तरी सर्वांनी हाच हेतू डोळ्यांसमोर ठेवला होता. संसारमुक्ती, ईश्वरभक्ती यावरोवरच लोकरंजनाच्याद्वारे शीलचारित्र्यवर्धन अशा उद्देशाने त्यांनी आपली कविता लिहिली होती. म्हणून संतकाव्याप्रमाणेच तिलाही लौकिक पठनाचे अधिष्ठान मिळाले. लोकशिक्षण आणि लोकजागृती हे दुहेरी कार्य पंडितांच्या आख्यान कवितेनेहि केले. संतकाव्यातील उत्स्फूर्तता आणि भक्तीचा उत्कट जिव्हाळा त्यात नसला तरी रसोत्कटता आणि कल्पना विलास मुळातच असल्यामुळे पंडितांचे काव्य ही राष्ट्रीय भूमिकाच पार पाडीत होते. गीताप्रणीत राष्ट्रधर्मच शिकवीत होते.

शाहिरी वाङ्मय अर्थात राष्ट्रीय काव्य : विषयाचे महत्त्व

आपल्या राजकीय राष्ट्रीयत्वाचे काही ठळक पुरावे सामान्यपणे भारताच्या आणि प्राधान्याने महाराष्ट्राच्या इतिहासाद्वारे आपण पाहिलेले आहेत. या पुराव्याद्वारे व्यक्त होणाऱ्या राष्ट्रीय भावनांची प्रचीती ज्या साहित्यातून प्रामुख्याने येते त्या साहित्याचे नाव शाहिरी वाङ्मय आहे. या शाहिरांच्या कृपेमुळेच आमच्या ऐतिहासिक पूर्वजांच्या पराक्रमाचा इतिहास आम्हाला आज उपलब्ध झालेला आहे. राष्ट्रीय जीवनाचे एक महत्त्वाचे अंग म्हणून लोकमान्य टिळकांनी महाकाव्याला उल्लेखिलेले आपण पाहिले आहे. श्रेष्ठ दर्जाचे कथाकाव्य म्हणून महाकाव्याचा लौकिक आहे. परंतु या महाकाव्याला

साहित्य पुरविण्याचे कार्य शाहिरी वाङमयाद्वारेच झालेले असते. प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, " प्राचीन महाकाव्याचा कर्ता एकच कवी नसून शतकानुशतके ज्या लोककथा, पोवाडे त्रुटित गीते निरनिराळ्या काळांत लिहिल्या गेली त्यांचे संकलन या महाकाव्यात आढळते." [२८] हे विधान मान्य केले तर राष्ट्रीय काव्य म्हणून शाहिरी वाङमयाचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे चटकन लक्षात येते.

ऐतिहासिक काव्याचे उगमस्थान

डॉ. शं. गो. तुळपुळे महाराष्ट्र सारस्वताच्या पुरवणीत पोवाड्याचा जुन्यात जुना उल्लेख ११०० मधील महिकावतीच्या बखरीत सांगतात. पोवाडे म्हणजे शाहिरांनी गायिलेली आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाची स्फूर्तिदायक गीते. श्री. न. चि. केळकर म्हणतात, " राष्ट्रीय किंवा ऐतिहासिक कवने हाही आधुनिक कवितेचा एक केवळ अपूर्वच विशेष आहे. जुन्या महाराष्ट्र सारस्वतात ऐतिहासिक म्हणता येईल असे कवित्व अतिशय थोडे सापडते. समर्थांची काही जोरदार स्फुट प्रकरणे, अनंत फंदीचे माधव काव्य व नारायणराव पेशव्यांच्या वधावरील इतिहास-ग्रंथात छापलेले एक काव्य हीच काय ती महाराष्ट्राची प्राचीन ऐतिहासिक कविता. यापैकी शेवटी उल्लेखिलेली दोन काव्ये अपुरीच आहेत." [२९] परन्तु प्रा. म. ना. अदवंतांच्या मते, ऐतिहासिक काव्याचा उगम शाहिरी वाङमयात आहे. दुसरे असे की शाहिरी वाङमय हे यथार्थपणे ऐतिहासिक काव्य म्हणता येईल काय ? यावद्दल त्यांनी संदेह व्यक्त केलेला आहे. ते म्हणतात, " तत्कालीनांनी तत्कालीन घटनेविषयी लिहिलेल्या काव्याला ' ऐतिहासिक ' हे नाव कितपत देता येईल हा प्रश्नच आहे. ती त्या काळची राष्ट्रीय कविता होती. त्या काळातील राष्ट्रीय घटना व राष्ट्रीय पुरुषांचे पराक्रम तिने वर्णन केले. पण तिला आज आपण ज्या अर्थाने ऐतिहासिक कविता हे नाव वापरतो त्या अर्थाने त्या कवितेला ' ऐतिहासिक ' असे संबोधता येणार नाही. त्या काव्यातील घटना आज आपल्याला ' ऐतिहासिक ' आहेत. त्या काळी त्या शाहिरांच्या डोळ्यांसमोरच घडत होत्या हे विसरून चालावयाचे नाही. पण काही असले तरी आज आपणाला आपल्या ऐतिहासिक किंवा राष्ट्रीय कवितांचा उगम पाहावयाचा झाल्यास शाहिरी काव्याकडेच वळावे लागेल." [३०]

पोवाड्यांची स्थितिकालसापेक्षता

विशिष्ट काळात आणि परिस्थितीत पोवाड्यांची निर्मिती झाल्याचे दिसून येईल. पोवाड्यांची निर्मिती अनेकदा उत्स्फूर्तपणे झाल्याचे दिसून आले असले तरी ही उत्स्फूर्तता परिस्थितिजन्य होती असे म्हणता येते. प्रा. म. ना. अदवंत म्हणतात, " पोवाडे हे बहुधा राष्ट्राच्या अभ्युन्नतीच्या काळीच उदयाला येत असतात. ज्या वेळी राष्ट्रात भोवताली पराक्रमाला बहर आलेला असतो, रणशिंग जोमाने फुंकले जात असते, म्यानातून तलवारी बाहेर काढून, भाले बर्च्या सरसावून शत्रूशी सामना देण्यासाठी उत्साहाने वीर बाहेर पडत असतात, त्याच वेळी त्यांचे पराक्रम गाण्यासाठी शाहिरांच्या डफावर थाप पडते. त्यामुळे मराठी शाहिरांचा उदय शिवकालात झाला आणि त्यांच्या कवनांना बहर पेशवेकालात आला तर त्यात नवल काहीच नाही." [३१]

पोवाड्यांची परंपरा

मराठी शाहिरांचा उदय शिवकालात झाला याचा अर्थ सुमारे सतराव्या शतकापासून ही पराक्रमाची गाणी मराठी शाहिरांनी लिहिली. पोवाड्यांबरोबर वीर गाथांची निर्मिती करण्याचे कार्य गद्य स्वरूपात बखरी करीत होत्या. या बखरींनी मराठी गद्याची परंपरा संपन्न केलेली होती. या

बखरींचेही ऐतिहासिक पोवाड्यांसारखेच महत्त्व होते. परंतु वाचण्या-लिहिण्याचे ज्ञान असणाऱ्या लोकांपुरतेच त्यांचे क्षेत्र मर्यादित होते. त्या मानाने पोवाड्यांचे गायन हे शेकडो लोकांमध्ये होत असल्यामुळे त्याच्या प्रभावाचे क्षेत्रही पुराण, प्रवचन, कीर्तनापेक्षाही अधिक व्यापक असणे स्वाभाविक होते. " हल्ली जुन्यात जुन्या उपलब्ध पोवाडा 'अफ्झुलखानाचा वध' हा अगीनदास किंवा अज्ञानदास नावाच्या शाहिराने लिहिलेला आहे. हाच पोवाड्याचा पहिला नमुना म्हणून सांगता येईल. पानिपतच्या युद्धापासून खडकी अष्टीपर्यंतच्या लढाईत अनेक ऐतिहासिक घटनांवर व पराक्रमी पुरुषांवर पोवाडे रचले गेले. पोवाडे रचणाऱ्या शाहिरांत रामजोशी, अनंतफंदी, होनाजीबाळा, परशराम, प्रभाकर, सगन, पठ्ठे बापूराव ही नावे विख्यात आहेतच पण त्यांच्याच बरोबरीने घ्यावी लागतील अशी ' रायासटवाजी ', रंगराव, लहरी मुकुंदा, अशी किती तरी नावे पुढे येतात." [३२]

मराठ्यांची खरी गाणी म्हणजे पोवाडे

शाहिरी वाङ्मयाचे मान्यवर टीकाकार श्री. वर्दे पोवाड्यासंबंधी म्हणतात, " मराठ्यांचे राज्य, मराठ्यांचा स्वभाव व मराठ्यांचे गुणदोष यांचे पोवाडे, हे प्रतिबिंब होते. मराठ्यांच्या स्वभावातील ताठरपणा व वीर्य; सहज बेफिकिरी, वीररसप्रधान पोवाड्यांत दिसून येते. पोवाडे राजकारणी उलाढालीचा इतिहास सांगतात, राजपुरुषांचे वर्णन करतात आणि वीर पुरुषांची मर्दुमकी गातात. शाहिरांची गाणी हीच मराठ्यांची खरी गाणी आहेत, असा उद्गार महाराष्ट्र सारस्वतकार भावे यांच्या तोंडून निघाला." [३३]

अच्युतराव कोल्हटकर यांनी या काव्याला ' मराठी काव्याची पहाट ' असे म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे. [३४] पोवाड्यासंबंधी आपला अभिप्राय व्यक्त करताना डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " राष्ट्राभिमानाचे पोषण करण्यात ऐतिहासिक आणि वर्तमानकालीन व्यक्तींवर आणि प्रसंगावर रचलेल्या पोवाड्यांनीही पुष्कळच हातभार लावलेला आहे." [३५]

राष्ट्रीय कविता या दृष्टीने पोवाड्यांची योग्यता

मराठे वीरपुरुष आणि मुत्सद्दी यांनी शत्रूशी घेतलेली झुंज, गाजविलेले पराक्रम, रचलेली कारस्थाने व त्यांचे घडलेले बरे वाईट परिणाम यांचे पोवाड्यांतून चित्रण केलेले आढळते हे आपण पाहिले आहे. हजारो लोकांच्या शिक्षणाचे आणि जागृतीचे कार्य करणारे एक साधन असे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी पोवाड्यांचे विवेचन केलेले आहे ते यथार्थ आहे.

पोवाड्यांतील राष्ट्रपुरुष शिवाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांनी मुसलमानांच्या गुलामगिरीतून दक्षिणेची मुक्तता केली आणि लोकांना स्वराज्य व स्वातंत्र्य मिळवून दिले. आपल्या हिंदुपदपादशाहीची मुद्रा त्यांनी

' प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते '

अशा आलेखाची केली. या स्वराज्याची सर्वत्र वृद्धी होवो आणि ते सर्वांना कल्याणकारक व्हावे, केवळ मराठ्यांनाच नव्हे असा त्या आलेखाचा स्पष्ट आशय आहे. म्हणूनच समर्थ रामदासांनी " शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप । शिवरायाचा आठवावा साक्षेप भूमंडळी असे गौरवपूर्ण उद्गार काढलेले आहेत. मराठ्यांनी शिवाजीचे पोवाडे गाण्यात आश्चर्य नाही. "

राजकवी भूषण आपल्या शिवबावनीत म्हणतो,

" काशी की कला जाती मथुरा मशिद भई
शिवाजी न होते तो सुन्नत होती सब की "

छत्रसाल बुंदेला आणि शिवाजी महाराजांचे संबंध किती निकटचे होते हे सांगतानां सूर्यनारायण सक्सेना म्हणतात, " छत्रसालाचे साहाय्यक व इतर स्वातंत्र्यप्रेमी शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने भारले होते. इतकेच नव्हे तर शिवाजी महाराजांना ते आपला पुढारी मानीत. छत्रसाल निवडक सहकाऱ्यांबरोबर रायगडावर शिवाजी महाराजांना जाऊन भेटले. विचारविनिमय झाला. मध्यभारतात विद्रोहाची योजना तयार झाली. शिवाजी महाराजांनी स्वहस्ते कुंकूमतिलक लावून छत्रसालास तलवार भेट दिली, पुढील उपदेश करून रवाना केले.

" करो दे को राज उतारे
हम तुम तो कबहु नही न्यारे "

आणि हाच पूर्वापार असलेला संबंध लक्षात घेऊन महंमुदखान बंगष पठाणाच्या मगरमिठीत सापडलेल्या ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्या छत्रसालाने पहिल्या बाजीरावाला शंभर दोहे लिहिलेला खलिता पाठविला व त्यात शेवटी लिहिले,

" ज्यों बीती गजराजपै सौ बीती अब जाय ।
बाजी जात बुन्दल की, राखै बाजीराव "

बाजीरावाने महान पराक्रमाने छत्रसालाची मुक्तता केली. त्याने बाजीरावास आपला दत्तक पुत्र मानले. " ३६

गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांनी शिवाजी उत्सव नामक एक प्रदीर्घ काव्य लिहिलेले आहे. त्यातही त्यांनी शिवाजी महाराजांच्या राष्ट्रीय कार्याचा उचित गौरव केलेला आहे. सर्व भारतीयांना एकत्र आणून हिंदवी स्वराज्य स्थापन करणे ही त्यांच्या कार्यामागची विशाल प्रेरणा होती. ती टागोरांनी पुढील पंक्तीत व्यक्त केलेली आहे

" कोन दूर शताब्दे कोन ओ खॅं तो
दिनोशे नहि जाने आजि
मराठार कोन शैल्ये अरण्णे
अन्धोकोर बोशे हे राजा शिवाजी
तोबो भालो उद्भाषियां ए भावना
तोडित प्रोभावत एशे शिलो नामी
एक धर्मो राज्य पाशे खंडो छिन्नो । बिखिजो भारत बंधे दिनो आमी "

पुढे गुरुदेव म्हणतात, अशा या पुण्यपावन शिवाजीच्या नावाचा सर्व दिशांनी एकत्रित येऊन जयघोष करावा,

" मराठिर साथे, आजि हे बंगाली
एक कंठ बोले " जयभू " शिवाजी
पश्चिम – पूरब दक्षिण वो बामें
एकत्र करुक भोग एक साथे
एकरि गौरव, एक पुण्य नामे. ।" ३७

हे गुरुदेव टागोरांनी गायिलेल्या शिवाजी महाराजांच्या पोवाड्यातील चरण वाचले म्हणजे मराठ्यांच्या भूमिकेसंबंधी संशय राहत नाही. या अर्थानेच मराठी शाहिरी वाङमय हे राष्ट्रीय वाङमय आहे.

मराठी पोवाड्यांचे शरीर मराठी असले तरी आत्मा भारतीय आहे

मराठी मन, मराठी मनगट, मराठी पोषाख, मराठी भाषा, मराठ्यांची सुखदुःखे यामुळे मराठ्यांचे पोवाडे प्रादेशिक वाटत असले तरी मराठ्यांच्या जीवनाचे अधिष्ठान भगवद्गीता हेच आहे. ज्ञान आणि भक्तियुक्त निष्काम कर्मयोग हाच त्यांचा धर्म आहे. निरक्षर शाहीरदेखील त्याला अपवाद नाहीत. मराठे सरदार आणि सैनिकांनी या गीताधर्माप्रमाणेच वेळोवेळी वर्तन केलेले आहे.

' नर जन्मामधी नरा करुन घे नर नारायण गडी । तरीच हे सार्थक मानव कुडी ' किंवा ' वा काय घालिसी संसृतिचा पिंगा । या मानव देही भज रे श्रीरंगा ' [३८] असे म्हणणारा सोलापूरकर रामजोशी, ' लंडे गुंडे हिरसे तट्टू ' यांची संगत धरु नको ' अशी सावधानीची सूचना देणारा आणि ' बिकट वाट वहिवाट नसावी । धोपट मार्गा सोडू नको ' असे नैतिक व व्यवहारी शिक्षण देणारे फटके गाणारा शाहीर अनंतफंदी त्याच मार्गाचा आहे. रामजोशी आणि अनंतफंदी हे जसे शाहीर होते तसेच ते पौराणिक कीर्तनकार म्हणूनही सुप्रसिद्ध होते. ते उच्चवर्णीय होते असे कदाचित कुणी म्हणेल परंतु परशराम हा जातीने शिंपी असलेला शाहीर म्हणतो,

" पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा ।
रुची मनाची गायन करूनी अळवावे गोविंदा ।
चैनीखातर आम्ही राया पडलो नाही या फंदा ।
सुई दोऱ्याला हयात असो द्या तोचि इनाम मोकासा
निज कर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग पैसा ।" [३९]

जातीने नंद गवळी असलेला होनाजी, श्रीकृष्णाची ' घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठी लवकरी वनमाळी उदयाचळी मित्र आला ' ही ' अमर ' भूपाळी गातो. पुराणातील उपदेशपर कथा रचून समाजाला होनाजीनेही नीतिबोध केलेला आहे. श्रीकृष्णाची तुळा केली ती कथा होनाजीने सांगितलेली आहे.

" ब्रह्मादि वंदिती ज्या यदुकुलभूषणा ।
अनायासे लाधला आम्हा प्रति न करतांची साधना ।" [४०]

पंढरीच्या विठ्ठलाचे वर्णन रामजोशी, परशराम, होनाजी या सर्वांनीच केलेले आहे. प्रभाकरानेही पांडुरंगाचे मोठे बहारदार वर्णन करून आपल्या भक्तिभावना व्यक्त केल्या आहेत.

" चंद्रभागेच्या तिरी विटेवर कटिकर ठेवुनी उभा ।
भक्तांचा कैवारी सांवळा त्रैलोक्याचा सुभा .....
धर्माघरि जी काढी हाताने उच्छिष्ट पत्रावळी
तीच मूर्त ही विटेवर नटली घनःशाम सावळी "

सारांश, शाहीर मूळ भारतीय प्रवाहापासून रेसभरही चळले नव्हते. त्यांचा पिंड गीता, भागवत यातील तत्त्वज्ञानावरच पोसला होता. त्याच्या पोवाड्यांतील भावनांचे आवाहनही राष्ट्रीय आणि

वैश्विक स्वरूपाचे होते. त्यात प्रादेशिक संकोचितता नव्हती. पराक्रमाची परंपराच त्यांना प्रेरक ठरली होती. म्हणूनच मराठ्यांचे पोवाडे हे राष्ट्रीय काव्य आहे.

राष्ट्रीय साहित्याची व्यापकता व स्वरूप

साधनरूप साहित्य

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून राष्ट्रीय साहित्याची परंपरा आपण जाणलेली आहे. निरनिराळ्या अभ्यासकांनी या साहित्याला भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून वेदांती कविता, तत्त्वदर्शनात्मक काव्य, मौखिक महाकाव्ये, पुराणे, अभिजात महाकाव्ये, वीरगाथा, भक्तिकाव्य, पंडिती आख्यानक काव्ये आणि शाहिरी वाङमय अशी विविध नावे दिलेली आहेत. रचनेचा प्रकार म्हणून त्यात भिन्नता निश्चितच आहे परंतु या सर्व निर्मितीच्या मागे लोकरंजनाबरोबरच सामाजिक उद्‌बोधनाचा मुख्य हेतू आहे याकडे दुर्लक्ष करता येत नाही. आशयाच्या दृष्टीने विचार केला तर राष्ट्रीय साहित्य या व्यापक संज्ञेत या सर्वांचा समावेश करावा लागेल.

प्राचीन काव्ये आमच्या राष्ट्रीय अभिमानाची प्रतीके आहेत

विविध प्रकारच्या घटनाप्रसंगांनी, क्रियाप्रतिक्रियांनी, निसर्गाशी केलेल्या लढ्यांनी तसेच मानवामानवातील संघर्षांनी मानवजीवनाचा इतिहास व्यापलेला आहे. मानवाने उपभोगलेल्या, अनुभवलेल्या आणि त्यापासून संपादन केलेल्या ज्ञानाचे वर्तमानासाठी व भविष्यासाठी मार्गदर्शक होणारे नीलचित्र (ब्लू प्रिंट) साहित्याच्या रूपाने सुरक्षित ठेवलेले आहे. त्यामुळे इतिहास, वंश, परंपरा, धर्म, संस्कृती, जन्मभूमी, निसर्ग यासारख्या अभौतिक आणि भौतिक घटकांचे त्याचे स्मरण ताजे राहिलेले आहे. या सर्व संचितांशी 'आम्ही' ही राष्ट्रीय जाणीव जोडण्याचे कार्य यापूर्वीच माणसाने केलेले आहे. या सर्व घटकांबद्दल जिव्हाळा निर्माण होण्याचे हे एक कारण आहे. आपल्या छायाचित्राकडे आपण पाहतोच, पण ते इतरांनीही बघावे अशी आपली इच्छा असल्यास ते सुरक्षित चौकटीत काही काळ टिकेल या हेतूनेच करून ठेवतो. ते सर्वांना दिसावे अशा ठिकाणी लावतो. त्याला जपत असतो. राष्ट्रीय जाणिवेचा स्पर्श झालेल्या सर्वच वस्तूचे असेच आपल्याला महत्त्व वाटते, त्यात एक वेगळीच आत्मीयता निर्माण होते.

इष्टम् लालित्येन योजयेत्

आमच्या पूर्वजांनी साहित्याकडे राष्ट्रीय अभ्युदयाचे एक महत्त्वाचे प्रभावी साधन म्हणून पाहिलेले आहे असे दिसते. शुद्ध कलावादी किंवा शुद्ध आनंदात्मक असा त्यांचा दृष्टिकोन नसावा असे उपलब्ध पुराव्यावरून वाटते. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास साधावयाचा हे प्राचीन काळातील लोकांचेही ध्येय होते असे दिसते. त्यांच्या त्या काळच्या कल्पनेप्रमाणे त्यांनी मानवी मनाचा, मानसशास्त्राचा अभ्यास करून काही सिद्धान्त बांधले होते. काही त्याच्या वर्तनाचे आडाखे ठरविले होते. मानवाच्या आवडीनिवडी, त्याच्या सहज प्रवृत्ती, संस्काराने त्यात होणारे परिवर्तन इत्यादींचे त्याचे आकलन सूक्ष्म होते असे म्हणता येते. मानवी शरीराप्रमाणेच मानवी मनाची, त्याच्या बुद्धीची आणि त्याच्या ठिकाणी असणाऱ्या या अदृश्य अशा आचारशक्तीची त्यांना चांगली जाण असली पाहिजे असे वाटण्याइतपत पुरावा उपलब्ध आहे. आमची पुराणे हा मूर्तिमंत पुरावा आहे. "पुराणाच्या द्वारे होणारे हे कार्य श्रीमद्‌भागवत अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडते." [४१]

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थाची जोड व्यक्तीला लावण्यात त्यांचा असाच हेतू असला पाहिजे. व्यक्तीचा आणि समाजाचा भौतिक आणि आध्यात्मिक असा दुहेरी विकास झाला पाहिजे हा उद्देशही त्यांनी डोळ्याआड केला नाही. या पुरुषार्थांची शिकवण देण्यासाठी त्यांनी प्रामुख्याने ललित साहित्याची योजना केलेली आहे, पुराणे म्हणजे तर पुरुषार्थाचे, नीतिधर्माचे शिक्षण देणारे प्रचंड कथाभांडारच आहे, रामायण, महाभारत ही महाकाव्ये म्हणजे आदर्श जीवनाचे पाठ देणारे धर्मग्रंथच आहेत. हे सर्वच साहित्य हेतुप्रधान आहे. हे सर्व साहित्य दुहेरी गुणधर्माचे आहे. एका अर्थाने ते रोगहारक औषधाचे कार्य करते. मानवी विकारांना मुरड घालायला मदत करते तर दुसऱ्या बाजूने ते शक्तिवर्धकाचे कार्य करते. " अध्यात्म हे भवरोगनाशक असे औषध म्हणूनच त्यांनी तयार केले. योग्य अनुपानासह त्याच्या 'मात्रा' 'काम आणि अर्थ' यांच्या तावडीतून सुटण्यासाठी धर्माच्या साहाय्याने दिल्या." सनातन वैदिक परंपरेचा हा एक विशेष आहे.

भारतीय साहित्य प्राधान्याने धर्मपरायण पण प्रवृत्तिप्रधान आहे. ते कमालीचे हेतुनिष्ठ आहे. याचा अर्थ ते शुद्ध प्रचारकी थाटाचे आहे असा होत नाही. आमचे प्राचीन ऋषी, मुनी, महाकवी, सूत हे नुसतेच प्रतिभासंपन्न नव्हते तर ते समाजोद्धारक असे द्रष्टे पुरुष होते. त्यांच्यापुढे व्यक्तिविकास आणि विकासावरोबरच राष्ट्रीय उत्कर्षाचे ध्येयही होते. त्यांना मानवी स्वभावाचे उत्तम आकलन होते. आधुनिक मानसशास्त्राचे प्रचाराचे तंत्र त्यांनी हस्तगत केले असावे असे म्हणायला जागा आहे.

प्रचार म्हटला की पुढे पुढे परिणामशून्यता यायला वेळ लागत नाही. उलट सहजगत्या कानावर पडणाऱ्या गोष्टींचा प्रभाव मनावर चटकन होतो. त्या त्या विषयाचे ग्रहण सहज होते. पाठ्यपुस्तकातील कवितांपेक्षा एखाद्या कवीची भावगीताची ध्वनिमुद्रिका ऐकणाऱ्याचे चित्त आकर्षित करून जाते. एवढेच नव्हे तर तेच गीत लवकर स्मरणात राहते. हे मनाचे खेळ या प्राचीन कवींना अवगत असल्यामुळे त्यांनी भारतीय समाजशास्त्रज्ञांचा आदर्शच आपल्यापुढे ठेवला. समाजाला असणारे व्यवहारशास्त्र धर्माशी सांगड घालून आणि 'इष्टम् धर्मेन योजयेत्' या न्यायाने शिकविले तसेच व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाला पोषक असणारे नीतिशास्त्र, शीलचारित्र्यवर्धनाचे सिद्धांत ललित कथांच्या माध्यमातून सांगितले. हे करतानाही 'इष्टम् धर्मेन योजयेत्' प्रमाणेच 'इष्टम् लालित्येन' योजयेत् अशीच त्यांची भूमिका होती.

' भले भले चकले '

'इष्टम् लालित्येन योजयेत्' ही भूमिका आमच्या प्राचीन संस्कृत आणि मराठी कवींनी इतक्या बेमालूमपणे पार पाडली की कलावादी रसिक या कवींना शुद्ध कलावादी समजू लागले. महाकवी व्यास आणि वाल्मीकींची गोष्ट सोडा पण पाणिनी, वररुची, पतंजली यांनी निर्माण केलेली महाकाव्ये अश्वघोष, भास, कालिदास, भारवी, माघ, भवभूती, श्रीहर्ष यांनी निर्माण केलेली काव्यनाटके, बाण, कल्हण, बिल्हण, गुणाढ्य, दंडी आणि विशाखादत्त यांचे साहित्य कलात्मकतेच्या कसोट्यांना पुरेपूर उतरणारे नाही असे कोण म्हणेल ? साहित्यनिर्मिती ही आमच्या संतांची साधना होती, तो एक वाग्यज्ञ होता. त्यांच्या आराध्य अशा शब्दब्रह्माची ती पूजा होती. त्यांचा परमेश्वरही त्रिगुणात्मक होता. तो केवळ सत् नव्हता, केवळ चित् नव्हता तर सत्चित् आनंदघन होता. आनंदघनता त्या ईश्वराचा एक प्रमुख विशेष होता. म्हणूनच साधनरूप साहित्य असूनही, बोधवादाची भूमिका असूनही कलाकृतीच्या सौंदर्याकडे त्यांनी अजिबात दुर्लक्ष केले नाही. त्यांनी अनेक टीकाकारांना व कलावादी समीक्षकांना चकविले आहे.

लोकमान्य टिळकांसारख्या महापुरुषांचे प्रशस्तिपत्र

लोकमान्यांसारख्या राष्ट्रपुरुषाने या राष्ट्रीय साहित्याचे सामर्थ्य ओळखले होते. त्यांच्या काळात विविध प्रकारचे वैचारिकच नव्हे तर ललित साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकांना त्यांनी उत्तेजनच दिले होते. राष्ट्रजागृतीचे एक साधन म्हणूनच ते प्राचीन साहित्याकडे वघत होते. महाभारतासंबंधी अभिप्राय देताना ते लिहितात, " देशातील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरुषांचे उदात्त चरित्र लोकांस सांगून त्यांच्या वंजशात शौर्य, अभिमान, सत्यनिष्ठा, धर्मबुद्धी वगैरे गुण जागृत करणारे प्राचीन काव्य जेथे जेथे उपलब्ध आहे तेथे तेथे ते राष्ट्रीयत्वाचे प्रधान अंग मानल्या गेले आहे. राष्ट्राचा अभ्युदय होण्यास अनेक कारणे लागतात हे निर्विवाद आहे. पण राष्ट्रातील सर्व लोकांत एक समयावच्छेदेकरून आनंद, ज्ञान, ईर्षा किंवा उत्साह देणारे प्राचीन महाकाव्यासारखे दुसरे साधन मिळणे कठीण. " ४२

संतांचा भक्तियोग

संतसाहित्य म्हणजे भक्तिमार्गी साहित्य, पारमार्थिक साहित्य अशीच अनेक टीकाकारांची धारणा असल्यामुळे राष्ट्रीय परंपरेशी त्याचा संबंध जोडणे त्यांना विसंगत वाटते. धर्म, भक्ती यासंबंधीच्या निष्ठा त्याकाळच्या सर्वसामान्य जीवनापासून भिन्न नव्हत्या तर त्या लोकसमुदायाच्या जीवनाचा तो अभंग भाग होता. संत त्या जीवनाचेच प्रतिनिधी होते. परकीयांची आक्रमणे आणि त्यामुळे समाजजीवनावर ओढवणारे संकट त्यांनीही ओळखले होते. संत जरी शुद्ध पारमार्थिक जीवनाला महत्त्व देणारे असले आणि प्रत्यक्ष समाजकारणात उतरलेले नसले तरी समाजकारण, राजकारण करणाऱ्यांना त्यांचे कार्य परस्परपूरक, पोषक आणि साहाय्यक ठरणारे होते हे लक्षात घेतले पाहिजे. कोणत्याही समाजात असे दोन वर्ग असल्याचे आढळून येते. या संदर्भात श्री. अप्रबुद्ध यांचा अभिप्राय लक्षात घेण्यासारखा आहे. ज्ञानेश्वरीच्या हेतूसंबंधी चर्चा करताना ते म्हणतात, "... अमृतानुभव हा ग्रंथ स्वात्मानुभवाची परिणती सांगण्याकरिता आहे. भावार्थदीपिकेचा हेतू याच्या अगदी उलट आहे. महाराष्ट्रावर पुढे जी आपत्ती आली तिची कल्पना निवृत्तिनाथांसारख्या अनेक प्रज्ञावंतांना आली होती. श्री. निवृत्तिनाथांचा विशेष हाच की या परिस्थितीतून राष्ट्र टिकवावयाचे असेल तर काय केले पाहिजे हे त्यांनी अचूक ओळखले आणि या कार्यास स्वतःला आणि भावाला वाहून घेतले." जगाच्या नकाशावरील काही राष्ट्रांचे अस्तित्व कसे पुसल्या गेले याची एका पाश्चात्य ग्रंथाच्या आधारे मीमांसा करताना अप्रबुद्ध म्हणतात, "एकतर बहुजन समाजाचा बुद्धिभेद होऊन ते (लोक) निष्ठाहीन बनतात आणि दुसरे मनुष्य या नात्याने राष्ट्रघटकांचा अत्यंत अधःपात होतो अशा संकटातून राष्ट्र पार पाडून न्यावयाचे म्हणजे मुख्य दोन गोष्टींची आवश्यकता असते. मनुष्य या नात्याने माणसाचा अधःपात होऊ द्यावयाचा नाही आणि राष्ट्राच्या मूळ धारणांवरची निष्ठा समाजातल्या काही वर्गात तरी अढळ राखावयाची... महाराष्ट्र संतांनी जर काही केले असेल तर हे केले. समाजसुधारणा, धर्मसुधारणा इत्यादी त्यांना चिकटविलेल्या गोष्टी नुसत्या असत्यच नव्हे तर त्यांना नालायक ठरवून त्यांचा उपमर्द करण्यासारखा आहे."४३

राष्ट्रीय कवितेसंबंधी विद्वान टीकाकारांच्या व्याख्या

विशिष्ट भूप्रदेशातील व्यक्ती आणि समाजासंबंधी असलेल्या म्हणजेच पर्यायाने संपूर्ण राष्ट्रीय जीवनाला आधारभूत असलेल्या सनातन (शाश्वत) निष्ठांची जोपासना करणे, देशातील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरुषांचे आदर्श, उदात्त, चरित्र लोकांना कथन करणे, त्या चरित्राद्वारे त्यांच्या वंशजात

शौर्य, विविध प्रकारचा अभिमान, सत्यनिष्ठा, धर्मबुद्धी वगैरे राष्ट्रीय गुण विकसित करुन राष्ट्र बलशाली व संपन्न बनविणे आणि एकाच वेळी सर्व लोकांना ज्ञान, उत्साह, आनंद व ईर्षा प्रदान करणे हे प्राचीन राष्ट्रीय काव्याचे महत्त्वाचे कार्य लो. टिळकांनी स्पष्टपणे सांगितले आहे. राष्ट्रीय कविता हे एक साधन आहे. राष्ट्रीय उत्कर्ष, राष्ट्रीय अस्मिता अस्तित्वात राखणे हे तिचे साध्य आहे. तेव्हा 'साध्य' सदैव डोळ्यांपुढे ठेवूनच साधनाची निर्मिती करावयाची असते. कालानुरूप आणि परिस्थितीनुरूप साधनांत बदल घडवून आणावाच लागतो. साध्याच्या सिद्धीकरिता ते आवश्यक असते. बदलत्या काळाच्या संदर्भात मग राष्ट्रीय काव्याच्या परिभाषाही बदललेल्या आढळतात, त्यात विषयांची व्याप्ती वाढल्याचेही आढळून येते.

श्री. न. चिं. केळकरांचे विचार

१९२१ मध्ये बडोदे येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय पदावरून केलेल्या भाषणात नव्या काव्याच्या वाढत्या अभिरुचीसंबंधी केळकर म्हणतात, "जुन्या काव्यात समाजाच्या राष्ट्रीय आकांक्षांना प्रोत्साहन देईल असे काहीच नव्हते. नवीन राष्ट्रीय कविता सामान्य लोकांनाही आवडावयाला हे एक प्रमुख कारण झाले आहे"... त्याच भाषणात पुढे श्री. केळकर म्हणतात, "काव्य हे काही नुसते विद्वज्जनांच्या विनोदाचे किंवा परमेश्वराला प्रसन्न करण्याचे साधन नाही. बहुजन समाजाच्या सुखदुःखांचा त्यांच्याशी जिव्हाळ्याचा संबंध आहे. हे लक्षात घेऊन आधुनिक कवींनी आपली वाणी राष्ट्राच्या सुखदुःखाचे वर्णन करण्याकडे लावली पाहिजे. देशाच्या दुःस्थितीचे किंवा पूर्वजांच्या प्रतापाचे ज्यात वर्णन आहे अशी कविता लोकांना आवडू लागली आहे.... आधुनिक कवितेचे राष्ट्रीयत्व लोकांच्या चित्तात विशेष ठसून त्या मानाने तिची लोकप्रियता वाढली. राष्ट्रीय दृष्टीने आधुनिक कवितेची उपयुक्तता लोकांना आता पटली आहे आणि त्यामुळे लौकिक पठनाचे अधिष्ठानही मिळून जनतेच्या अंतःकरणात तिची स्थापना होईल, अशी उमेद वाटते."[४४]

श्री. न. चिं. केळकरांचा वरील अभिप्राय राष्ट्रीय कवितेकडे बघण्याच्या टीकाकारांच्या दृष्टीत बदल झाल्याचे स्पष्ट करणारा आहे. विद्वानांचे विनोदन किंवा परमेश्वरभक्ती करण्याचे कविता हे साधन नसून राष्ट्रातील बहुजन समाजाच्या सुखदुःखाचे प्रकटीकरण हेच तिचे कार्य. रसिकमान्य, उपयुक्त आणि लौकिक पठनाचे अधिष्ठान असणारी कविता ही राष्ट्रीय कविता होय. पूर्वजांच्या प्रतापाचे वर्णन करणे हा प्राचीन राष्ट्रीय कवितेचा विशेष केळकरांना मान्य आहे. थोडक्यात सांगावयाचे तर बदलत्या परिस्थितीप्रमाणे राष्ट्रीय कवितेत झालेला बदल केळकरांनी मांडलेला आहे.

श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांची राष्ट्रीय कवितेच्या संदर्भातील भूमिका

राष्ट्रीय कवितेसंबंधीची माडखोलकरांची भूमिका गतिमान असल्याचे आढळते. 'आधुनिक कवि पंचक' या प्रबंधात कवी विनायकांच्या 'यापुढे' या कवितेवर भाष्य करताना ते म्हणतात, "राष्ट्राचे अंतःकरण, राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राचे विकार ज्या कवितेत आविर्भूत झालेले असतात ती राष्ट्रीय कविता. सामान्य जनतेच्या आशा अपेक्षांशी, विचारविकारांशी समरस झालेल्या ज्याच्या अंतःकरणातून राष्ट्रभावनांच्या लहरी उसळू लागतात तो राष्ट्रकवी."

राष्ट्रकवीचे कार्य सांगताना याच विवेचनात माडखोलकर म्हणतात, "काव्य, जातिवंत काव्य कवीच्याही हृदयाला हलवील असे काव्य सामान्य जनांच्या अंतःकरणात, वासनाकामनांत, हसण्या-रडण्यात भरलेले असते. ते काव्य ओळखून त्या काव्याचे रहस्य आकळून त्याचा ओघ आपल्या वाणीतून वाहता ठेवणे हे राष्ट्रकवींचे कर्तव्य आहे."[४५]

माडखोलकरांच्या विचारांचे थोडक्यात सार

राष्ट्रीय कवितेसंबंधीची 'आधुनिक कविपंचकातील' कल्पना, १९१३ मधील 'काव्यविचार'-मध्ये लिहिलेल्या लेखात अधिक स्पष्ट, काटेकोर आणि चिकित्सक स्वरूपात अवतरली आहे. राष्ट्राचे अंतःकरण, भावना आणि विकार ज्या कवितेमधून आविर्भूत झालेले असतात ती राष्ट्रीय कविता असे तिचे स्वरूप 'कविपंचका'त सांगितले आहे. त्यात त्यांनी परंपराभिमान, प्रदेशाभिमान आणि स्वातंत्र्याचा अभिमान सांगणाऱ्या कवितांना राष्ट्रीय कविता हीच पदवी दिली आहे. सर्वश्रेष्ठ अशी अस्सल खरीखुरी राष्ट्रीय कविता निर्माण करण्याचे श्रेय माडखोलकरांनी स्वा. सावरकरांच्या प्रतिभेला दिलेले आहे. ध्येयदर्शित्व, भव्योदात्त प्रतिभा, पांडित्य आणि पौरुष, राष्ट्रीय ध्येयवाद, आत्मप्रत्ययाचे ओज, आशयाची विशालता, सहानुभूतीची व्यापकता आणि क्रांतदर्शित्व या सर्व गुणांनी सावरकरांची कविता संपन्न असल्याने तशी भावना लिहिणारे कवी आढळत नाहीत असा काहीसा निराशावादी सूर काढला आहे. याचा अर्थ असा की महाराष्ट्रातील कवींनी राष्ट्रीय कविता निर्माण केलेली आहे पण स्वा. सावरकरांच्या राष्ट्रीय कवितेच्या तुलनेत ती अत्यंत गौण आहे; नगण्य आहे.[४६]

प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचे विचार

वाङ्मयेतिहासकार, विचारवंत आणि टीकाकार म्हणून डॉ. अ. ना. देशपांडे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. त्यांनी आपल्या वाङ्मयेतिहासात राष्ट्रीय कवितेची काही महत्त्वाची लक्षणे सांगितली आहेत. ते म्हणतात, "देशभक्तीला पोषक अशा भावनांचा व विचारांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने प्रचार करण्यावरच राष्ट्रीय कवितेचा प्राधान्याने भर असतो."

पूर्वीपेक्षा आजच्या राष्ट्रीय कवितेचे क्षितिज विस्तारले आहे याचा डॉ. देशपांडे यांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे. या संदर्भात आपले विचार मांडताना ते म्हणतात, "आजची राष्ट्रीय कवितेची भूमिका पुष्कळच व्यापक झालेली आहे. पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत त्वेष आणि स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा एवढेच तिचे आज मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच प्रकारच्या विषमतेविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध ती आता बंड पुकारू लागली आहे आणि कृत्रिम भेदातीत अशा समतेचा आणि मानवतावादाचा पुरस्कार करण्यात ती उदंड उत्साह दाखवू लागली आहे." [४७]

राष्ट्रीय पोवाड्यांसंबंधी डॉ. अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय

आधुनिक शाहिरांनी रचलेल्या राष्ट्रीय पोवाड्यांसंबंधी डॉ. देशपांडे म्हणतात, "आंग्लसत्तेच्या काळातसुद्धा आधुनिक मराठी शाहिरांनी आपल्या स्फूर्तिदायक वाणीने महाराष्ट्रीयांची राष्ट्रभक्ती प्रज्वलित केलेली आहे."[४८]

विशुद्ध राष्ट्रीय कवितेचे स्वरूप दिग्दर्शन करणारे प्रा. भ. श्री. पंडित

आधुनिक मराठी कवितेचे एक व्यासंगी रसिक टीकाकार म्हणून प्रा. भ. श्री. पंडितांचा लौकिक आहे. भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून त्यांनी आधुनिक मराठी कवितेचे रसिकांना दर्शन घडविले आहे. राष्ट्रीय कवितेच्या आशयासंबंधी आणि अभिव्यक्तीसंबंधी त्यांनी केलेले चिंतन वैशिष्ट्यपूर्ण आहे. राष्ट्रीय कवितेत ज्यांचा समावेश करता येईल असे पोवाडे आणि मेळ्यातील पदे यांना प्रा. भ. श्री. पंडितांनी वेगळा निकष लावलेला आहे. या कवितेचे स्वरूप तात्कालिक म्हणून क्षणजीवी आणि

सौंदर्यदृष्टचाही दुय्यम असते असे त्यांचे मत आहे. ते म्हणतात, "मेळयातील पदे ही तात्कालिक विषयावर व पोवाडे हे बहुधा गतकालीन इतिहासावर असल्यामुळे त्याचे स्वरूप चिरस्थायी नसते. शिवाय त्याचे प्रसाधनही बेडौल असते. निर्मळ राष्ट्रीय कवितांची बाब तशी नाही. त्यातील वीर-विभूतिपूजन, राष्ट्रभक्ती, अन्यायप्रतिकार, पारतंत्र्यघृणा इत्यादी गोष्टी कोणत्याही काळी व कोणत्याही देशात पटतील अशाच असतात. त्यामुळे या प्रकारच्या कविता वाङ्मयीन स्वरूपाच्या व चिरंजीवी असतात."

डॉ. वा. भा. पाठकांचे राष्ट्रीय काव्यासंबंधीचे विचार

आधुनिक मराठी काव्याचे अन्तःप्रवाह 'साक्षेपाने शोधणाऱ्या' डॉ. वा. भा. पाठकांनी देखील राष्ट्रीय कवितेच्या स्वरूपासंबंधी विस्तृत विवेचन केलेले आहे. डॉ. वा. भा. पाठकांचा विचार डॉ. अ. ना. देशपांडे आणि प्रा. भ. श्री. पंडित यांच्या विचारांशी सुसंवादी असाच आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी वाढविलेली राष्ट्रीय कवितेची व्याप्ती डॉ. वा. भा. पाठकांनी अधिक विस्तारली आहे. व्यक्ति-स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि मानवतावादांचा पुरस्कार करणारी कविता ही राष्ट्रीय कविता म्हणून ओळखली गेली पाहिजे. ते म्हणतात, "गतेतिहासाच्या आधारे" पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ' असा सन्देश देणे, देशातील पारतंत्र्याचा निषेध करून स्वातंत्र्यास्तव क्रांतिदेवीचा जयघोष करणे ही राष्ट्रीय कवितेची अंगे होत असे म्हटल्यास अनुचित होणार नाही. समाजव्यवस्थे-तील अन्यायावर व रूढींवर प्रहार करणे आणि व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोनातून मानवतावादाचा पुरस्कार करणे हे गुण ज्या कवितांतून दिसून येतात त्यांचाही विचार राष्ट्रीय कवितेबरोबरच करणे इष्ट होईल. सामाजिक प्रगती आणि राष्ट्रीय उन्नती या गोष्टी एकमेकांना पूरकच होतात. किंबहुना त्या परस्परांवर अवलंबून असतात. म्हणूनच सामाजिक क्रांतीची घोषणा ज्या गीतांतून केली जाते त्यांनाही राष्ट्रीय कवितेचा दर्जा प्राप्त होतो. यापुढे केशवसुतांपासून तो मर्ढेकरांपर्यंत ज्यांनी सामाजिक समतेचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि मानवतावादाचा व्यापक दृष्टिकोनातून भावनात्मक विचार केला त्यांच्या कवितांचे वैशिष्टय लक्षात येईल." ४९

श्री. कृ. ब. निकुंब यांचा राष्ट्रीय कवितेसंबंधीचा अभिप्राय

आधुनिक मराठी काव्यविषयक निबंधात 'कवी विनायक जनार्दन करंदीकर' यांच्या काव्याच्या आधारे श्री. निकुंब यांनी चर्चा केलेली आहे. "विनायकाची कविता म्हणजे तत्कालीन महाराष्ट्राचे प्रतिबिंब होय. ..... महाराष्ट्राच्या तत्कालीन राजकीय जीवनाचे उद्ध्वस्त स्वरूप विनायकांनी वारंवार वर्णन करून दाखविले आहे. ही स्थिती अतिशय निराशाजनक होती. ..... वर्तमानकाळाची ही अशी भग्नस्थिती चित्रित करणे हा विनायकांच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या कवितेचा एक भाग आहे. पूर्व वैभवाचे उद्गान करणे आणि पूर्वजांच्या पराक्रमाचे संस्मरण करणे हाही त्यांच्या कवितेचा तितकाच महत्त्वाचा विशेष होय. ..... पूर्वकालासंबंधीची ही गौरवाची भावना विनायकांच्या लेखनात इतक्या शिगेला जाऊन पोचते की तिला जवळ जवळ विभूतिपूजनाचेच स्वरूप प्राप्त होते. ..... या जाणिवांमुळे भविष्यकाळाबद्दल वास्तवाधिष्ठित असा विश्वास विनायकांना वाटत नाही. ज्याला भूतकाळाबद्दल अभिमान असतो, ज्याचे वर्तमानाचे आकलन यथार्थ असते आणि ज्याची भविष्यकाळावर श्रद्धा असते त्यालाच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कवी असे म्हटले पाहिजे." ५०

राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात श्री. निकुंब यांचा दृष्टिकोन वास्तवतावादी आहे असे म्हणता येते.

प्रा. म. ना. अदवंतांनी केलेली राष्ट्रीय कवितेची चिकित्सा

श्री. कृ. ब. निकुंब यांच्यापूर्वी प्रा. म. ना. अदवंतांनी राष्ट्रीय कवितेच्या स्वरूपासंबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. 'राष्ट्रीय कविता ही त्या त्या समाजाचे प्रतिबिंब असते.' या प्रि. वा. ब. पटवर्धनांच्या विधानाचा आधार घेऊन श्री. कृ. ब. निकुंब यांनी चर्चा केलेली आहे. प्रा. म. ना. अदवंतांनीही विनायकाच्या कवितेचे परीक्षण करताना श्री. पटवर्धनांच्याच विधानाचा आधार घेतलेला आहे. राष्ट्रीय कवितेच्या निर्मितीची प्रेरणा स्पष्ट करताना प्रा. अदवंत म्हणतात, " लो. टिळकांचे राजकारण, शिवाजी उत्सव, मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करण्याचे उद्योग इत्यादी अनेक प्रयत्नांतून महाराष्ट्राची अस्मिता व त्यांचा देशाभिमान जागृत करण्याचा जो प्रयत्न होत होता त्याचेच हे प्रतिबिंब विनायकांच्या कवितेत पडलेले आहे असे म्हणावेसे वाटते. जागृत महाराष्ट्राच्या भावनांना तोंड फोडण्याचे कार्य विनायकांच्या कवितांनी केले हे या कवितेचे महत्त्व." ५१

राष्ट्रीय कविता आणि इतिहास यांचा संबंध

इतिहास आणि काव्य भिन्नभिन्न मनोवृत्तींतून निर्माण होत असले तरी या दोन मनोवृत्तींना जोडणारा दुवा म्हणजे पूर्वजांचा अभिमान होय. असे प्रा. अदवंत यांचे मत आहे. ते म्हणतात, "त्याच अभिमानातून इतिहासकार आपल्या राष्ट्राचा इतिहास लिहिण्यास प्रवृत्त होतो व कवी आपल्या वीर पुरुषाचे पोवाडे गाण्यास तयार होतो. दोघेही भूतकाळात वावरत असतात. पण चिकित्सक नजरेने एक सत्याचे कण हुडकत असतो आणि दुसरा त्याच कणाच्या आधारावर कल्पनाशक्तीच्या साहाय्याने मोठमोठे इमले उभवीत असतो. अशा वेळी पूर्वजांचे पराक्रम ऐकून तरी लोकांनी घोर निद्रेतून जागे व्हावे व स्वतःची दुःस्थिती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा या उत्कट इच्छेने लोकांच्या डोळ्यांसमोर भूतकाळ व वर्तमानकाळ ही दोन्ही चित्रे रंगवून 'हे चित्र पाहा व ते चित्र पाहा' असे त्यांना जणू बजावीत असतो. आणि त्यावरोबरच 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' असे प्रेरक सूर काढून जनतेच्या मनात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी कवी इतिहासाकडे वळतो व 'दिव्य पूर्व' लोकांच्यापुढे रंगवतो. इतिहास व काव्य यांचा असा संबंध आहे." ५२

पोवाडे ही त्या काळचो राष्ट्रीय कविता होय

इतिहासाशी कवी आपले नाते पूर्वजांच्या अभिमानाच्या माध्यमातून जोडतो आणि मग पूर्वजांच्या अभिमानाची गाणी गाता गाताच वर्तमानकालातील विपन्नावस्थेसंबंधीही गीते गात असतो. राष्ट्रीय कविता या प्रक्रियेतूनही निर्माण होते असे प्रा. अदवंतांनी दाखविले आहे. श्री. अदवंत यांनी पोवाड्यांची गणना राष्ट्रीय कवितेतच केलेली आहे. ते म्हणतात, " शाहिरांनी लिहिलेल्या पोवाड्यांना यथार्थपणे ऐतिहासिक काव्य म्हणता येईल की नाही याची शंका आहे. एक तर ती तत्कालीन कवींनी तत्कालीन घटनांविषयी व तत्कालीनांनी वीरांच्या पराक्रमाविषयी लिहिलेली कवने आहेत. तत्कालीनांनी तत्कालीन घटनेविषयी लिहिलेल्या काव्याला 'ऐतिहासिक' हे नाव कितपत देता येईल हा प्रश्नच आहे. ती त्याकाळची राष्ट्रीय कविता होती. त्या काळातील राष्ट्रीय घटना व राष्ट्रीय पुरुषांचे पराक्रम तिने वर्णन केले." ५३

श्री. ज. ग. करंदीकरांचा दृष्टिकोन

'भारतीय राष्ट्रगीत' ८९ या ग्रंथाचे लेखक श्री. ज. ग. करंदीकर म्हणतात, " ज्याला आदर्श राष्ट्रगीत म्हणता येईल अशा गीतांमध्ये, त्या राष्ट्राचे केवळ स्वातंत्र्यगान नसून शिवाय राष्ट्राची

निसर्गशोभा, त्या राष्ट्राची उज्ज्वल पूर्वपरंपरा, प्रचलित परिस्थिती व भविष्यकाळासंबंधी आशावाद यांचा उल्लेख असतो." ५४

डॉ. प्र. ल. गावंडे यांचे विचार

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या वाङ्मयातून प्रतीत होणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करताना डॉ. प्र. ल. गावंडे यांनी स्वातंत्र्यवीरांच्या राष्ट्रीय काव्याचाही चिकित्सक अभ्यास केलेला आहे. त्यांच्या राष्ट्रीय काव्याचे पृथगात्मक विशेष सांगताना, डॉ. गावंडे म्हणतात, " आत्मप्रत्यय, विशालता आणि ध्येयदर्शित्व हे सावरकरांच्या स्वातंत्र्यनिष्ठा वा राष्ट्रीय कवितेचे पृथगात्मक विशेष आहेत. ..... त्यांची राष्ट्रीय कविता केवळ विलाप करणारी नाही, तरी ती प्रोत्साहक, कृतिप्रेरक आणि ध्येयदर्शी आहे. सावरकरांचा ध्येयवाद आशयात आणि अभिव्यक्तीत साठवून ती प्रकट झाली आहे." ५५

स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता ही अस्सल राष्ट्रीय कविता असून आत्मप्रत्ययाने आणि हौतात्म्याच्या वृत्तीने तिचे तेज सहस्रपटीने वाढलेले आहे. आत्मप्रत्यय, विशालता, ध्येयदर्शित्व, उत्तेजकता, कृतिप्रेरकता, स्वातंत्र्यनिष्ठा, वीरविभूतिपूजन, निसर्ग आणि इतिहास यांनी सिद्ध केलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गावरील विश्वास, मातृभूमीचे ऋण फेडण्याच्या भावनेतून देशभक्ती आणि हौतात्म्यातून राष्ट्राच्या पराक्रमाला खरेखुरे तेज चढते या सिद्धान्तावर विश्वास आणि मानवहिताचा व्यापक अर्थ या सर्वच अंगांनी त्यांची राष्ट्रीय कविता संपन्न असल्याने ती सर्व अंगे असलेली कविता म्हणजे राष्ट्रीय कविता म्हणता येते.

हिंदी भाषी साहित्यिकांनी केलेला राष्ट्रीय कवितेचा विचार

मराठी साहित्यिकांप्रमाणेच हिन्दी भाषी साहित्यिकांनीही राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात विस्तृत आणि विपुल चर्चा केलेली आहे. ही चर्चा केवळ स्फुट लेखनाइतकी सीमित नाही तर प्रबंधाच्या स्वरूपात आज उपलब्ध आहे. ' हिन्दी साहित्य में राष्ट्रीय काव्य का विकास ' हा डॉ. क्रांतिकुमार शर्मा यांचा प्रबंध, ' हिन्दी कविता में राष्ट्रीय भावना ' हा डॉ. विद्यानाथ गुप्ता यांचा प्रबंध, ' हिन्दी की आधुनिक राष्ट्रीय कविता ' हा डॉ. विनयमोहन शर्मा यांचा प्रबंध व ' राष्ट्रीय काव्य ' हा शैलकुमारी गुप्ता याचा प्रबंध ही श्रेयनामावली सुप्रसिद्ध आहे. याशिवाय 'वीर' काव्याच्या संदर्भातही राष्ट्रीय कवितेची चर्चा करणाऱ्यांत डॉ. टीकमसिंह तोमर, डॉ. उदयनारायण तिवारी, हे लेखक प्रमुख आहेत. डॉ. सुधींद्र, डॉ. केसरी नारायण शुक्ल, डॉ. श्रीकृष्णलाल, डॉ. भोलानाथ तिवारी या विद्वानांनी राष्ट्रीय काव्यासंबंधी विवेचन केलेले आहे.

आचार्य विनय मोहन शर्मा यांचे विचार

राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात आचार्य विनय मोहन शर्मा यांच्या विवेचनाला हिन्दी साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रीय कवितेसंबंधी मूलभूत चर्चा त्यांनी केलेली असल्यामुळे अनेक हिन्दी प्रबंधलेखकांनी तिचा आधार घेतलेला आहे. श्री. क्रांतिकुमार शर्मांनी मोठ्या आदरपूर्वक आचार्य विनयमोहन शर्मा यांची राष्ट्रीय काव्यविषयक मते आपल्या प्रतिपादनासाठी उद्धृत केलेली आहेत. ते लिहितात.

" राष्ट्राच्या पराधीनतेच्या काळात राष्ट्रीय कवितेत दोन प्रवृत्ती आढळून येतात. (१) अतीत का चिन्तन, परीक्षण तथा नवीनीकरण, (२) अराष्ट्रीय परिस्थिती को नष्ट करने की प्रवृत्ती."

डॉ. विनयमोहन शर्मा यांच्या प्रतिपादनाचा आशय थोडक्यात असा सांगता येईल. विपत्तीच्या काळात राष्ट्रीय भावनेला अधिक उधान आल्याचे दिसून येते. मात्र राष्ट्रीय जाणीव कोणत्याच युगात पूर्णतः नष्ट होणारी नाही. ज्या वेळी ही भावना समूळ नष्ट होते त्या वेळी ते राष्ट्रही मृत होते. राष्ट्र-संकटात या भावनेला भरती येते आणि जेव्हा राष्ट्र संकटात नसेल तेव्हा ही भावना शांत सागरा-सारखी अगाध व गंभीर असते. या काळातील राष्ट्रीय कविता वैभवाचे चित्रण करणारी आणि आनंदाची गीते गाणारी असते. राष्ट्रीय काव्याचे आणखी दोन भेद पुढीलप्रमाणे करता येतात. (१) "संकट मुक्त काल में राष्ट्रीयता की अभिव्यक्ति और प्रेरणा, (२) स्वतंत्र निर्माणोन्मुख राष्ट्रीयता की झलक." ५६

डॉ. क्रांतिकुमार शर्मा यांनी केलेला राष्ट्रीयतेचा अर्थ

डॉ. विनय मोहन शर्मा यांच्या मूलभूत विवेचनाच्या आधारेच डॉ. क्रांतिकुमार शर्मा यांनीही राष्ट्रीय भावनेचा शोध घेतलेला आहे.

"किसी भी देश की राष्ट्रीय भावना तभी पूरी मानी जा सकती है जब वहा वीरों का उदय हो, जो देश के लिये अपने प्राणों का उत्सर्ग करने के लिए तैयार हो और यह मर-मिटने का तथा बलिदान का संकल्प उत्कट अनुराग की उपस्थिति में ही संभव है। कैसा भी उच्च विवेक एवं विचार क्यों न हो जबतक उसमें अनुराग न हो वह प्रेरणा नहीं दे सकता। देश के लिये मर-मिटने की भावना जिस उत्कट अनुरागद्वारा बढती है वही भक्ति है। राष्ट्रीयता का जन्म देशभक्तों के आधारपर होता है और उसका पूर्ण विकास भी देशभक्ति के रूप में प्रतिफलित होता है। राष्ट्र के कणकण के प्रति अहेतुक अनुराग देशभक्ति है।"५७

हिंदीचे सुप्रसिद्ध साहित्यिक माखनलालजी चतुर्वेदी यांच्या शब्दात राष्ट्रीय कवितेचा अर्थ

डॉ. क्रांतिकुमार शर्मा यांच्या प्रबंधाला प्रस्तावना लिहिताना हिन्दीचे गणमान्य साहित्यिक आणि देशभक्त स्व. माखनलालजी चतुर्वेदी यांनी राष्ट्रीय कवितेसंबंधी पुढील अभिप्राय दिलेला आहे. "मेरे विचार से राष्ट्रीयता उस पौधे का नाम है जो पराधीन देश में ही नही पनपता। वह स्वाधीन देशमें भी उतनाही या उससे अधिक हरियाता है। ..... मेरे विचार से राष्ट्रीय कविता के तीन स्वरूप मालूम होते है। एक तो वह स्वरूप है कि राष्ट्र में घटी घटनाओं पर उत्तेजित होकर कभी कुछ लिख दे। दुसरे वह स्वरूप जो राष्ट्र का संचालन करने के लिये कभी कुछ लिखने के लिये बाध्य हो और उसकी कविता के कारण राष्ट्र में बेचैनी फैले और उसका तिसरा स्वरूप वह है कि वह सारे राष्ट्र की कविता एक जगह परेडसी करने एकत्रित हो। जो कविता सबसे ऊंची उठकर बोल सके वह उस देश की राष्ट्रीय कविता मानी जानी चाहिये। पहिली परिभाषा के उदाहरण में बहुत से कवि आ जाते है, दुसरी कविता के उदाहरण में ठाकूर रवीन्द्रनाथ को उपस्थित किया जा सकता है और तिसरे प्रकार के उदाहरण में कवि कुलगुरु कालिदास उपस्थित हो सकते है। कौन कह सकता है कि इन कवियों की कविता राष्ट्रीय नहीं है– वह राष्ट्र का प्रतिनिधित्व नहीं करती ? इसलिये राष्ट्र को उकसानेवाली तथा माधुर्य और एकता का प्रतिनिधित्व करनेवाली कविता को राष्ट्रीय नाम नहीं दिया जा सकता है अन्यथा और कौनसा नाम दिया जा सकता है ?" ५८

राष्ट्रीय भावनांची विविधता आणि व्याप्ती

ज्या कवितेला आपण राष्ट्रीय कविता म्हणून ओळखतो तिचे भावनात्मक स्वरूप, विविध रंग; गंधाच्या फुलांनी नटलेल्या, विविध प्रकारच्या सुमधुर फळांनी लगडलेल्या आणि विविध नैसर्गिक

सौंदर्याने बहरलेल्या, तीर्थस्थाने असलेल्या एखाद्या भव्य अशा उद्यानासारखे आहे. या विविध भावना; देश या तत्त्वांशी निगडित आहेत म्हणूनच देशभक्तीचा उत्कट आविष्कार करणारी, देशातील लोकांच्या सामान्य सुखदुःखाची अभिव्यक्ती, सुवर्णाक्षरांनी रंगलेल्या गौरवमय भूतकाळाचे, त्यातील वीर विभूतिपूजनाचे दर्शन घडविणारी, वर्तमानाचे यथार्थ आकलन आणि भविष्यासंबंधी उत्कट श्रद्धा यांचे सजीव चित्रे रेखाटणारी, स्वधर्माचा, स्वसंस्कृतीचाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान व्यक्त करणारी, राष्ट्रात ऐक्यभावनेची निर्मिती करणारी, स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा आणि पारतंत्र्याची तीव्र चीड व्यक्त करणारी, विविध स्वरूपाच्या विषमतेविरुद्ध आणि न्यायासाठी बंड करण्याला प्रवृत्त करणारी, राष्ट्रातील विविध तत्त्वांसंबंधी अंतःकरणात उत्कट भक्ती आणि श्रद्धा निर्माण करणारी, देशातील कोट्यावधी लोकांत आत्मविश्वास, विशालता आणि बंधुत्वाचे नाते निर्माण करणारी, खचलेल्या परिस्थितीत ध्येयदर्शित्वाचा यथोचित संदेश देऊन संपूर्ण राष्ट्राला स्फूर्ती देणारी, दैवी संपत्तीने संपन्न असे धैर्य आणि उत्साह धारण करणारे राष्ट्रीय कार्यकर्ते निर्माण करण्याचे अचाट सामर्थ्य असणारी, व्यक्तीलाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राला उत्थानशील, कार्यतत्पर आणि स्वाभिमानी बनविणारी कविता राष्ट्रीय कविता होय. प्रदेश, भाषा, पंथ, जाती, व्यक्ती, रीतिरिवाज या सर्व घटकांच्या वर उठून समान हितत्वाच्या प्रश्नावर संघटित व प्रतिकारक्षम होण्याची तीव्र जाणीव निर्माण करणारी, राष्ट्र, देश, देव, धर्म आणि मानवी कल्याणाकरिता प्रसंगी आत्मोत्सर्ग करण्याला उद्युक्त करणारी कविता म्हणजे राष्ट्रीय कविता होय. या सर्व प्रकारच्या भावनांची, विचारांची, श्रद्धांची आणि आदर्शमूल्यांची अभिव्यक्ती करणारी कविता राष्ट्रीय कविता म्हणूनच ओळखली गेली पाहिजे. भारतीय जीवनधारणा ज्या आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांवर अधिष्ठित आहे त्या मूल्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम असणारे ललित किंवा ललितेतर काव्यही राष्ट्रीय कविता म्हणूनच ओळखले गेले पाहिजे, कारण त्या राष्ट्राचे जगणे वा मरणे त्याने स्वीकारलेल्या मूल्यावरच अवलंबून असते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे राष्ट्रीय भावना व्यापक, विविधांगी आणि राष्ट्रीय जीवनाशी सर्वस्पर्शी अशी आहे.

∫∫

३

आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा पहिला कालखंड
इ. स. १८५० ते १८७४

पूर्वजस्मृतिकालखंड

यापूर्वीच्या विवेचनात आधुनिक मरातील राष्ट्रीय कवितेच्या परंपरेसंबंधी आणि स्वरूपासंबंधी विचार करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय कवितेच्या स्वरूपासंबंधी विद्वान अभ्यासकांनी सांगितलेल्या लक्षणांचा आणि मांडलेल्या विविध मतांचा साधार परामर्श घेऊन काही सर्वसामान्य लक्षणे ठरविण्याचा नम्र प्रयत्न केलेला आहे. कोणत्याही साहित्यप्रकाराचा अभ्यास करण्याच्या ज्या विविध पद्धती रूढ आहेत त्यांपैकी कालसापेक्ष दृष्टीने अभ्यास करण्याची एक पद्धत असून ऐतिहासिकदृष्ट्या तिला महत्त्वाचे स्थान आहे. विशिष्ट कालखंडातील विशिष्ट साहित्य प्रकाराच्या स्वरूपाचे आणि प्रवृत्तीचे विवेचन करणे या पद्धतीने शक्य होते. या कालसापेक्ष पद्धतीने परिवर्तनाचे, विकासाचे वा अपकर्षाचे आलेख काढता येतात, तसेच काही निष्कर्षही मांडता येतात. कालसापेक्षपद्धतीने अभ्यास करताना आपल्या सोयीसाठी विशिष्ट कालखंडाच्या सीमा निश्चित करून घ्याव्या लागतात. तशाच त्यांच्या मर्यादांचीही जाणीव ठेवावी लागते. एखादा कालखंड प्रदीर्घ असू शकतो तर एखादा लहान असू शकतो. आधुनिक मराठी साहित्याची मीमांसा अनेकांनी कालसापेक्ष पद्धतीने केलेली आहे. वाङ्मयेतिहासकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री. वि. ल. भावे, श्री. ल. रा. पांगारकर, प्रा. रा. श्री. जोग, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित आणि डॉ. वा. भा. पाठक या विद्वान अभ्यासकांनी या पद्धतीने अभ्यास करून सामाजिक जीवन आणि साहित्य, साहित्यिक, यासंबंधीचे मौलिक निष्कर्ष मांडलेले आहेत. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा अभ्यास करताना ही पद्धत उपकारक ठरण्यासारखी आहे. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचे एकोणविसाव्या शतकाच्या प्रारंभापासून तो स्वातंत्र्यातील कालापावेतो सरळ पाच कालखंड पाडता येतात.

(१) पूर्वजस्मृतिकालखंड इ. स. १८५० ते १८७४
(२) राष्ट्रीय जागृतीचा कालखंड इ. स. १८७४ ते १९०५
(३) राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाचा आणि कृतीपरतेचा कालखंड अर्थात राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग– १९०५ ते १९२२
(४) राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा आणि गांधीजींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला कालखंड १९२२ ते १९३५
(५) मानवतावादी राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद आणि व्यक्तिवाद या संमिश्र वैचारिक प्रभावातून काव्यनिर्मिती करणारा कालखंड अथवा राष्ट्रीय कवितेच्या ओहटीचा कालखंड १९३५ ते १९५०

पूर्वजस्मृतिकालखंडाची वैशिष्ट्ये

आधुनिक राष्ट्रीय मराठी कवितेचा पहिला पूर्वज कालखंड हा सुमारे चोवीस वर्षांचा व सर्वांत मोठा असा कालखंड आहे. एकूण मराठी कवितेच्या संदर्भात अनेक टीकाकारांनी तमोयुग किंवा अंधारयुग म्हणून या कालखंडाचा उल्लेख केलेला आहे. परंतु या कालखंडाला राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान आहे. काही अभ्यासकांनी इ. स. १८१८ या ब्रिटीश सत्तेच्या आरंभकालापासून या कालाची गणना केलेली आहे. ही आधुनिक मराठी साहित्याच्या कालखंडाची पूर्वसीमा मानायला हरकत नसावी, असे प्रा. रा. श्री. जोगांचे मत आहे. परंतु आरंभीचे बहुतक काव्य रूपांतरित किंवा अनुवादित असल्याने त्याची पूर्वसीमा १८५० मानणे योग्य ठरणारे आहे. ही पूर्वसीमा निश्चित केल्यानंतर प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, "तशीच या कालखंडाची उत्तरसीमा म्हणून इ. स. १८७४ धरण्यात वाङ्मयीन दृष्टी ही अर्थातच निर्णायक ठरली आहे. पुढील वाङ्मयनिर्मितीला स्फूर्ती, चालना, उत्तेजन वा वळण देण्यास फार मोठ्या प्रमाणात कारण झालेली चिपळूणकरांची निबंधमाला ही १८७४ साली सुरू झाली. ही मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने एक क्रांतिकारक घटनाच समजावयास पाहिजे. ही निबंधमाला मराठी वाङ्मयाच्या पुढील कालखंडाचे आरंभस्थान व या पहिल्या कालखंडाची उत्तर सीमा ठरते."[१]

जाणत्यांना आलेली भोवळ

या कालखंडाला पूर्वजस्मृतिकालखंड हे नाव देण्यामागे एका विशिष्ट राष्ट्रीय परिस्थितीचे आकलन आहे. इंग्रजांनी केलेला मराठ्यांचा पराभव सर्वसामान्य लोकांना आश्चर्यमुग्ध करणारा होता. जाणत्यांना तर या प्रहाराचा फटका इतका जबरदस्त जाणवला होता की, त्या भोवळेतून ते स्वत:ला सावरू शकले नव्हते. ज्यांनी पूर्वीचे स्वातंत्र्यातील वैभव अनुभविले होते त्यांची प्रतिक्रिया स्वाभाविकपणेच भिन्न होती. सर्वसामान्य लोकांच्या सुखदु:खाची अभिव्यक्ती करणारे लोकशाहीर प्रभाकर दातार बदललेल्या स्थितीने दु:खी होऊन पिळवटलेल्या आर्त वाणीने विपरीताचे प्रकटीकरण करीत होता.

"कुंकवा वाचून कपाळ । मंगळसूत्रा वाचून गळा ।
तसा सैन्य समुदाय उदासीन रंग दिसे वेगळा ।
विपरित आला काळ, मेरूला गिळिले मुंग्यांनी,
पंडितास जिंकिले समेमधि मदांध भग्यांनी"

दुसरा याच कालातला लोकशाहीर परशुराम शिपी म्हणतो,

"मोठ मोठे उमराव धारकरि जबर चहूकडे दरारा
राज्यापरि पिंजऱ्यात कोंडले मायेणीचा चंदीचारा."

इंग्रजी राज्यामुळे सारा समाज ढवळून जी प्रचंड उलथापालथ झाली ती या शाहीराला जाणवली. तो हृदयद्रावक वर्णन करतो,

"नाही विलायत कोणि पाहिली या मुलखावर जरब कशी ?
एक चपराशी चकती पाहून रयत थरथरी बकरि जशी ?"[२]

अशी सामान्य माणसांची इंग्रजी राज्यासंबंधीची प्रतिक्रिया होती. जे जाणते होते ते इंग्रजी राजवटीने दीपून गेले होते.

पूर्वजस्मृतीचे स्वरूप

आपण आपले भौतिक स्वातंत्र्य गमावले असून परक्यांच्या ओंजळीने पाणी पिण्याचे आपल्या नशिबी आलेले आहे याची जाणीव त्यातल्या काही मोजक्या मंडळींना होती. ही मंडळी अत्यंत तळमळीने ज्ञानार्जनाच्या उद्योगाला लागली. विविध प्रकारचे ज्ञान संपादन करण्याचा, त्याचा संग्रह करण्याचा आणि लोकशिक्षणाच्या हेतूने त्याचा प्रसार करण्याचा विडाच या मंडळींनी उचलला. या काळात निघालेल्या नियतकालिकांची 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानोदय', 'ज्ञान प्रसारक', ज्ञानदर्शन', 'ज्ञानसंग्रह', 'विविध ज्ञानविस्तार' इत्यादींमधील 'ज्ञान' या शब्दाला या काळात अतिशय प्राधान्य आले होते असे दिसते. बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ मध्ये 'दर्पण' हे पहिले मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्र सुरू केले. 'दिग्दर्शन' नावाचे पहिले मराठी मासिक काढण्याचे जनकत्वही बाळशास्त्री जांभेकरांकडेच जाते.

दर्पणच्या दुसऱ्या अंकात बाळशास्त्री जांभेकर लिहितात, " ही शक्ती आपल्या देशात पूर्वी असल्याचा इतिहासात दाखला नाही. सर्व जगामध्ये पाश्चात्य राष्ट्रांची जी प्रगती झाल्याचे आपणाला दिसते त्याचे प्रमुखकारणे म्हणजे वृत्तपत्रे. ज्ञानप्रसाराचे आणि लोकजागृतीचे हे अद्भुत साधन आहे. ज्ञान आणि विज्ञान यांचा पुरस्कार करणे, सार्वजनिक नीतिमत्ता सुधारणे, जनतेला त्यांची कर्तव्ये सांगणे; राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीला लगाम घालणे हे सामर्थ्य वृत्तपत्राच्या अंगी आहे. ज्या देशात वृत्तपत्रांना लोकांच्या मनावर परिणाम करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले आहे ते देश खचित धन्य होत." [३] बाळशास्त्र्यांच्या विद्वत्तेप्रमाणे त्यांचा देशाभिमानही त्यांच्या परिच्छेदातून दिसून येतो. राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीची जाणीवही त्यांना असल्याचे जसे दिसून येते त्याप्रमाणे देशाकरिता पुढारी लोकांनी करावयाच्या कर्तव्याची जाणीव त्यांनी दिलेली आहे. बाळशास्त्री जांभेकर हे सुधारणावादी होते असे मानणारे ते परंपरापूजक नव्हते असें सांगण्याचा प्रयत्न करतात, परंतु मराठी काव्यपरंपरेला उजाळा देण्यासाठी बाळशास्त्री जांभेकरांनी विविध विषयांवरील ग्रंथनिर्मितीबरोबरच इ. स. १८४५ मध्ये 'ज्ञानेश्वरी' ची पहिली छापील पोथी पाठभेदांसह संपादून बहुजनांच्या हातात प्रथम ठेवली. भारतीय शिलालेख आणि ताम्रपटांचे संशोधनही या आद्य इतिहाससंशोधकानेच केले.

इ. स. १८४० साली निघालेल्या 'ज्ञानचंद्रोदय' या मासिकाने 'कृष्णलीलामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ क्रमशः छापावयास घेतला होता व नंतर 'गीता,' प्राकृत वामनी श्लोक, मोरोपंती आर्या, तुलसीदासाचा दोहा, मुक्तेश्वराची ओवी, यासह सादर करावयास घेतली होती. [४] यानंतरचा पूर्वजस्मृतीला उजाळा देण्याचा उपक्रम परशुराम बल्लाळ उपाख्य परशुराम तात्या गोडबोले (१७९९–१८७४) यांनी इ. स. १८५४ मध्ये महाराष्ट्रीय रसिकांना 'नवनीत' या प्राचीन काव्याच्या निवडक संग्रहाच्या रूपाने केला. प्रा भ. श्री. पंडित परशुरामपंत तात्यांच्या उपक्रमाचे महत्त्व विशद करताना म्हणतात, " तात्यांनी प्राचीन मराठी कवींच्या काव्याचे मंथन करून महाराष्ट्राच्या जनांना 'मधुर-काव्यामृताचा' आस्वाद चाखविला. नवनीत काढण्याच्या त्यांच्या या बहुमोल व उपयुक्त नीतीमुळे प्राचीन व अर्वाचीन मराठी कवितेचा सांधा बेमालूम रीतीने सांधला गेला." [५] म्हणून तर कालाला पूर्वजस्मृतिकाळ म्हणावयाचे.

पूर्वज-स्मृतिकालखंडाला उपकारक ठरणाऱ्या काही संस्थांचे व नियतकालिकांचे कार्य

माऊंट स्टचुअर्ट एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने मुंबईत १८२२ मध्ये 'बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक अँड सोसायटी' ही संस्था निर्माण झाली. त्यामुळे विविध विषयांवरील ग्रंथांची निर्मिती झाली. एतद्देशीय

पंडितांबरोबरच मेजर कँडी, टॉमस आर्स्किन पेरी, जार्ज, जर्विस, जेम्स फॅरिश ही पाश्चात्य विद्वान मंडळीही कार्य करीत होती. ग्रंथलेखनात व्यंकोबा नाईक, रघुनाथकृष्ण जोशी, स. का. छत्रे; बाळशास्त्री जांभेकर, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, हरि केशवजी पाठारे यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

त्या काळातील साहित्यनिर्मिती

पुढे १८४० पासून या संस्थेच्या पुनर्घटनेने तिचे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' बनले. इंग्रजी ग्रंथांची मराठी भाषांतरे या काळातच होऊ लागली. नव्या व्यवस्थेनुसार भाषांतरकारांचा एक वर्गच निर्माण करून त्यांच्या परीक्षा घेऊन त्यातून उत्तम प्रकारे उत्तीर्ण होणाऱ्याला हे भाषांतराचे काम सोपविण्यात आले. या परीक्षेत पहिल्या प्रथम उत्तीर्ण होण्याचा सन्मान कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी संपादन केला. नंतर अनेक शास्त्री मंडळींनी या परीक्षेत यश संपादन करून भाषांतराचे कार्य पार पाडले. १८५५ मध्ये 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' हे पद अस्तित्वात आले. या विद्याधिकाऱ्याच्या कारकिर्दीत संस्कृतातील महाकाव्ये व नाटके यांची भाषांतरे, काही काल्पनिक, सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्या, 'राजा शिवाजी' किंवा 'पोवाडा, छत्रपती शिवाजी राजे भोसले' यासारखी काव्ये' काही इंग्रजी नाटकांचे अनुवाद यांची निर्मिती झाली.

ज्ञानचंद्रोदय

'मराठी ज्ञानप्रसारक', 'विविध ज्ञानविस्तार' व 'सर्वसंग्रह' या नियत कालिकांच्याही काही प्रती विद्याखात्याद्वारे घेण्यात येत असत. त्यामुळे लेखनकलेला उत्तेजन मिळाले. १८४० साली पांडुरंग-बापू जोशी पावसकर यांच्या 'ज्ञान चन्द्रोदय' या मासिकाचा आवर्जून पुन्हा उल्लेख करणे आवश्यक आहे. या मासिकाने सुमारे साडेतीन वर्षे काही संस्कृत सुभाषिते व त्यांचे गद्य भाषांतर, विक्रमचरित, ज्ञानदेवकृत हरिपाठ, राधाभुजंग, मुक्ताबाईचे अभंग, कृष्णलीलामृत, नलदमयंती आख्यान, रामजन्माचे श्लोक, सीतास्वयंवर, केकावलि, बाळक्रीडेचे अभंग, सुदामचरित्र वगैरे प्राचीन काव्य प्रसिद्ध केले. 'गीतार्थ बोधिनी' नावाचा अनेक कवींच्या गीतानुवादासह मूळ श्लोक देणारा ग्रंथही या मासिकातून प्रसिद्ध झाला. अशा प्रकारे पूर्वज स्मृतीला जिवंत करण्याचे महत्त्वाचे कार्य 'ज्ञान चन्द्रोदयाने' केलेले आहे.[१]

दक्षिणाप्राइझ कमिटी

डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी ही संस्था कर्नल टीफेंच व कॅप्टन हार्ट या युरोपियन गृहस्थांच्या प्रोत्साहनाने १८४९ मध्ये मुंबईत अस्तित्वात आली. तिने शास्त्रीय ज्ञानाची भाषांतरित पुस्तके निर्माण करून ज्ञानप्रसाराचे कार्य केले. इ. स. १८५१ मध्ये 'दक्षिणा प्राईझ कमिटी' स्थापण्यात आली. या कमिटीने काव्ये, कादंबरी, चरित्रे, नाटके यांच्याकरिता निवडक विषय देऊन स्पर्धात्मक पद्धतीने बक्षिसे जाहीर करून साहित्यनिर्मिती करून घेतली. गणेशशास्त्री लेले आणि म. मो. कुंटे यांची श्री छत्रपती महाराजांवरील महाकाव्ये या प्रयत्नातूनच निर्माण झालेली आहेत.

सर्वसंग्रहाचे कार्य

'ज्ञान चन्द्रोदय', 'नवनीत' यांच्याप्रमाणेच प्राचीन मराठी वाङ्मयाकडे लक्ष वेधण्याचे कार्य माधव चंद्रोबा डुकले यांच्या इ. स. १८६० मधील केवळ जुन्या मराठी काव्यप्रकाशनासाठी वाहिलेल्या 'सर्वसंग्रह' नावाच्या मासिकाने केले.

प्राचीन काव्याचे पुनरुज्जीवन करणारी प्रमुख शास्त्री मंडळी

प्राचीन कवितेच्या संपादनाचे आणि प्रसिद्धीचे कार्य प्रामुख्याने बाळशास्त्री जांभेकर, 'ज्ञान-चंद्रोदयकार, पांडुरंग बापू जोशी पावसकर', 'नवनीत' कार परशुराम तात्या गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे 'सर्वसंग्रहकार' माधव चंद्रोबा डुकले, गणेशशास्त्री लेले, विठोबा अण्णा दप्तरदार, भास्कर दामोदर पाळंदे, दादोबा पांडुरंग तर्खडकर, हरी केशवजी पाठारे, गर्दे, खांडेकर या सर्व शास्त्री पंडित मंडळींनी केलेले आहे. तर्खडकर, दप्तरदार, पाठारे, गर्दे व खांडेकर यांनी जुन्या भक्तिगीतांची परंपरा पुनरुज्जीवित केली. या सर्व मंडळींनी केवळ शुद्ध भक्तिकाव्यच प्रसिद्ध केले नाही तर श्लोक-केकावली, आर्याकेकावली, गीतामृत शतपदी, गीता पंचदशी, यासारखी विविध प्रकारची काव्ये आणि ज्ञानेश्वरांपासून तो तुकोबा रामदासांपर्यंतच्या संतांचे काव्य, पदे व भजने यांची प्रसिद्धी केली. आपल्या प्राचीन परंपरेचे संचित घेऊनच ते नेणीवपूर्वक राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या कार्याला लागले होते. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेची पायाभरणी या अव्वल इंग्रजीतील पंडित कवींनीच केलेली होती.

ऐतिहासिक पुरुषांचे चरित्रगायन

प्राचीन भारतीय काव्याचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य या कालखंडातील पंडित कवींनी प्रामुख्याने केले. त्याकरिता भारतीय वेदांत, रामायण, महाभारत ही आर्ष महाकाव्ये, संस्कृत अभिजात महाकाव्यांतील आख्याने आणि भक्तिभावपूर्ण ओव्या, अभंग, आर्या, पदे, यांची त्यांनी निवड केली. रामदासांच्या परंपरेतील नारायण उपाख्य हंसराज यांनी वेदांती कवितांची रचना केली. तसेच परशुरामपंत तात्या गोडबोल्यांनी बालबोधामृत, नामार्थदीपिका आणि मराठ्यांच्या इतिहासा-वरील सोप्या स्फुट कवितांची रचना केली. रामायणावर आधारित सीताराम, सीताविरह–कल्पना; सीतापरित्यागवगैरेसारखी स्फुट रचना किंवा 'कुरुक्षेत्र', 'भारतीय नरसिंह' इत्यादी महाभारतातील रचना ही उदाहरणेही याविषयी देता येतील. कृष्णशास्त्री चिपळूणकरांची 'पद्यरत्नावली' म्हणजे मेघदूताचा सुन्दर अनुवादच असून कालिदासाचे मराठीत आगमन त्यामुळे घडून आलेले आहे.

या प्राचीन भारतीय प्रवाहाबरोबरच ऐतिहासिक वीर पुरुषांचे चरित्र गायन करणारी कविताही याच काळात निर्माण झाली. अशा प्रकारची कवितानिर्मिती करण्याचे कार्य म. मो. कुंटे, ग. स. लेले, कृष्णाजी नारायण आठल्ये, गोविंद वासुदेव कानेटकर, वासुदेव वामनशास्त्री खरे यांनी केलेले आहे. या कवींनी निर्माण केलेली काव्ये केवळ स्फुट स्वरूपाची नाहीत तर महाकाव्य, आख्यानकाव्य, अशा स्वरूपाची प्रदीर्घ आहेत. या काव्यामागील निर्मितीच्या प्रेरणेत 'दक्षिणा प्राइझ कमिटीला' महत्त्वाचे महत्त्वाचे स्थान असले तरी कवीला वर्ण्य विषयाबद्दल जोपर्यंत जिव्हाळा वाटत नाही तोपर्यंत अशी हेतुपूर्वक प्रदीर्घ रचना करणे संभवत नाही हे लक्षात घ्यावे लागते. या प्रदीर्घ ऐतिहासिक चरित्र-गायनाबरोबरच इंग्रजीतील वाल्टर स्कॉटसारख्या कवीच्या राष्ट्रीय काव्याचे अनुवाद करण्याचा प्रयत्न काही आंग्लशिक्षित कवींनी केलेला आहे. त्यात प्रामुख्याने हरिकेशवजी, महादेवशास्त्री कोल्हटकर, मोरो गणेश लोंढे, एकनाथ गणेश भांडारे, बजाबा रामचंद्र प्रधान, डॉ. कीर्तीकर आणि विष्णु मोरेश्वर महाजनी प्रभृती कवींचा समावेश करावा लागेल. या सर्वांनीच केवळ इंग्रजी राष्ट्रीय काव्याचे अनुवाद केलेले असले तरी पाश्चात्य स्फुट काव्याचे भरपूर अनुवाद केलेले आहेत. म्हणून इंग्रजी काव्यातील प्रवाह मराठी कवितेत आणण्याचे या कवींचे कार्यही ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या अनेक पंडितांनी स्वदेशप्रेमाने रसरसलेली स्कॉट, बायरन, टेनिसन यांची

कविता वाचली असेलही परंतु त्या प्रकारच्या काव्याचा अनुवाद करण्याची प्रेरणा सर्वांनाच झालेली दिसत नाही. एखादाच महादेवशास्त्री कोल्हटकरांसारखा ' स्वदेश प्रीती ' या कवितेत सांगून जातो,

' नष्टात्मा कोणि असा असेल काहो कुठे जगामाजी
वदला न कधी जो की ही आहे जन्मभूमिका माझी ।'

हे उद्‌गार अर्थात स्कॉटच्या अनुवादातून आलेले असले तरी महादेवशास्त्री कोल्हटकरांना संस्कृत साहित्यातून आढळणारा मातृभूमीच्या नावाचा गौरव अगदीच अपरिचित असेल असे म्हणता येत नाही. मात्र मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासापासून प्रेरणा घेऊन, राष्ट्रीय हेतूने काव्य लिहिण्याची परंपरा मराठीत सर्व प्रथम आणणारे श्री. महादेव मोरेश्वर कुंटे यांच्या ' राजा शिवाजी ' या अपूर्ण महाकाव्याकडे आता वळावयाचे आहे.

' आधुनिक मराठीतील पहिले राष्ट्रीय आणि वीररसपूर्ण काव्य राजा शिवाजी '

आधुनिक मराठी कवितेवर इंग्रजी कवितेचे कलम करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य करण्याचे श्रेय वाङ्मयेतिहासकारांनी हरीकेशवजी पाठारे, महादेवशास्त्री कोल्हटकर, विष्णू मोरेश्वर महाजनी या विद्वानांना दिलेले असून त्यांना इंग्रजी कवितेचे अग्रदूत म्हणून गौरविलेले आहे. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचे अग्रदूत होण्याचा बहुमान 'राजा शिवाजी' या (हिरॉईक एपिक) वीररसात्मक काव्याचे कर्ते श्री. महादेव मोरेश्वर कुंटे यांचाच म्हणावा लागेल. आधुनिक कवितेच्या इतिहासकारांनी आधुनिक मराठीतील राष्ट्रीय काव्याचे उद्‌गाते म्हणून कवी विनायक जनार्दन करंदीकर उपाख्य कवी विनायकांचा गौरव केलेला आहे. राष्ट्रीय कवितेच्या निर्मितीत विनायक कवींचे कार्य आणि स्थान वैशिष्टचपूर्ण आहे. यासंबंधी मतभेद असूच शकत नाही. परंतु एक ' महाकाव्य ' राष्ट्रीय हेतूने मराठीत लिहिण्याचे आणि त्यासंबंधी वाङ्मयविषयक आपला अभिनव दृष्टिकोन मांडण्याचे कार्य आधुनिक मराठी कवितेत सर्व प्रथम श्री. कुंटचांनीच केलेले असल्यामुळे आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेच्या जनकत्वाचा मान त्यांनाच देणे उचित ठरेल. श्री. कुंटचांच्या ' राजा शिवाजी ' या काव्याचा आणि त्या काव्याला श्री. कुंटचांनी लिहिलेल्या १९ पानी प्रस्तावनेचा विचार बहुतेकांनी आधुनिक मराठीतील महाकाव्यरचनेच्या म्हणजेच स्वरूपाच्याच दृष्टीने केलेला आहे.

श्री. महादेव मोरेश्वर कुंटचांचा जीवनवृत्तांत (१८३५–१८८८)

श्री. कुटचांचे घराणे कृष्णाकाठच्या क्षेत्र माहुलीचे. त्यांचा जन्म १८३५ मध्ये झाला. बालवयातच कुंटचांचे वडील वारल्यामुळे आणि घरात अठराविश्वे दारिद्रच असल्यामुळे प्राथमिक शिक्षणही त्यांना माधुकरी मागूनच घ्यावे लागले. वडिलांचे नियंत्रण नसल्यामुळे व भटकण्याची भरपूर संधी मिळाल्याने कुंटे बालवयात हूड आणि उनाड मुलांच्या संगतीत रमले. पुढे हायस्कुलातील शिक्षणासाठी कोल्हापुरास आल्यानंतर आणि न्या. मा. गो. रानडे, विठ्ठल नारायण वैद्य यांच्यासारखे पुढे नावलौकिकास चढलेले सहाध्यायी असूनही मुळातल्या हूडवृत्तीने मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांना तीनदा नापास व्हावे लागले. मात्र परिस्थितीने आणि अनुभवाने त्यांना बरेच काही शिकविले आणि इ. स. १८५९ मध्ये ते मॅट्रिक झाले. पुढील शिक्षण मात्र त्यांनी अतिशय चिकाटीने घेतले आणि १८६४ मध्ये श्री. कुंटे पदवीधर झाले. पदवीधर होताच श्री. कुंटचांना सिंधमध्ये कराची येथील सरकारी हायस्कूलमध्ये मुख्याध्यापकाची नोकरी मिळाली. कराचीनंतर श्री. कुंटे कोल्हापूर आणि पुणे येथे मुख्याध्यापक म्हणून राहिले. काही दिवस मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजात संस्कृतचे प्रोफेसर

म्हणून आणि अहमदाबादच्या कॉलेजचे कार्यकारी प्राचार्य म्हणूनही त्यांनी कार्य केले. या ज्या अतिशय जबाबदारीच्या जागांवर कार्य करण्याची इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना संधी दिली याचा अर्थच असा आहे की श्री. कुंटे त्या काळात विद्वान व सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते.

श्री. कुंटे नुसते मुख्याध्यापकच नव्हते तर त्यांना इतर व्यवसायांचेही ज्ञान होते. पुण्यातच त्यांनी स्वतःचा शीसवी पेन्सिलीचा कारखानाही काढलेला होता. 'राजा शिवाजी' या अपूर्ण महाकाव्याव्यतिरिक्त श्री. कुंटे यांनी 'मन' हे तत्त्वचिंतनात्मक औपरोधिक शैलीचे काव्य लिहिलेले असून 'राजाराम महाराज' या नावाचे दुसरे एक काव्यही त्यांनी लिहिलेले आहे. 'आर्यसंस्कृतीची स्थित्यंतरे' या त्यांच्या इंग्रजी ग्रंथाला इटलीच्या विद्वत्परिषदेचे पारितोषिकही मिळाले होते. 'बालविवाह निषेधात्मक वाद' नावाचे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केलेले होते आणि 'षड्दर्शन चिंतनिका' मासिकाचे स्वतः कुंटेंनी संपादन केलेले होते. या सर्व त्यांच्या कर्तृत्वावरून ते भाषांवर प्रभुत्व असणारे, विविध विषयांचा दांडगा अभ्यास असणारे आणि अनुभवसंपन्न व्यक्तित्वाचे गृहस्थ होते यासंबंधी खात्री पटते. श्री. कुंटेंच्या 'राजा शिवाजी' ला दक्षिणा प्राईज कमिटीने पारितोषिक देऊन गौरविले होते हेही येथे लक्षात ठेवले पाहिजे.

श्री. कुंटेंच्या काळातील सामाजिक आणि राजकीय वातावरण

इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळी श्री. कुंटे यांचे वय बावीस वर्षांचे होते. ते मॅट्रिक झाले त्यावेळी या स्वातंत्र्ययुद्धाची आग कुठे विझली होती तर कुठे धुमसत होती. जिथे धुमसत होती तिथे तिचे चटके संबंधितांना जाणवत असले पाहिजे. युद्धात भाग घेणाऱ्या बंडखोर शिपायांना पकडून शिक्षा देण्याचे प्रकार चालूच असले पाहिजे. एरवी सरकारी नोकरीत असलेल्या या विद्वान पंडिताने तत्कालीन इतर सुशिक्षितांप्रमाणे इंग्रजी शासनासंबंधी गौरवाचे तर राहोच पण नुसते सहानुभूतीचेही शब्द काढलेले दिसून येत नाहीत. 'राजा शिवाजी' या सहा भाग लिहून अपूर्ण राहिलेल्या महाकाव्याला १९ पानांची विद्वत्तापूर्ण दीर्घ इंग्रजी प्रस्तावना लिहून आपले राष्ट्रीय अंतःकरण लोकांसमोर उघडे केलेले आहे.

महाकाव्यासंबंधीची श्री. कुंटेंची भूमिका

'राजा शिवाजी' संबंधी आपली भूमिका स्पष्ट करताना श्री. कुंटे म्हणतात,

"The ambition of the author is to paint the feelings as they were evolved at the time of Shivaji oppressed by the Mohamedans the Marathas had gone mad. Some of them were forcibly circumcised, their religious feelings were outraged in the Durbar Hall and on public streets. Their leaders were mercilessly imprisoned or killed. From these circumstances, the feeling of opposition to the Mohamedans had became so strong among them that they were almost insitinctively impelled to consider the Mohamedan as a pious, christian considers satan. But satan is invisible. His mischiefs are done clan destinely "[७]

श्री. कुंटेंच्या या अवतरणातील सूचकता जाणकारांना अधिक स्पष्ट करून सांगण्याची आवश्यकता नाही. केवळ शिवछत्रपतींच्या कार्याचा गुणगौरव करणे किंवा एका ऐतिहासिक वीरपुरुषाचे चरित्रगायन करणे एवढाच मर्यादित हेतू त्यांच्या काव्यलेखनामागे नव्हता तर 'मध्ययुगात

मोगली सत्तेविरुद्ध आणि संस्कृतीविरुद्ध भारताच्या पश्चिम किनाऱ्याने जी यशस्वी टक्कर दिली, ज्या टकरीतून एक विशिष्ट संस्कृती अस्तित्वात आली, तुकाराम, रामदास या संतांनी जिला मनोबल दिले आणि आणि ज्या मनोभूमीवर महाप्रतापी शिवरायाने स्वराज्याचा गडकोट उभारला ते सारे महाराष्ट्रीय आंदोलन सामान्य मराठी माणसांसाठी, सामान्य मराठी भाषेतून साकार करावे अशी अचाट महत्त्वाकांक्षा श्री. कुंटे यांनी मनात धरली होती."[८] थोडक्यात श्री. कुंटचांना राष्ट्रधर्म-निर्मितीची प्रक्रिया सांगावयाची होती. आपण आज पारतंत्र्यात आहोत हे ब्रिटिशांच्या नोकरीत असतानाही त्यांना जाणवत असलेच पाहिजे. या आपल्या हेतूसंबंधीचा आणखी एक पुरावा श्री. कुंटचांनीच मांडलेला आहे, तो त्यांचा राष्ट्राभिमान स्पष्ट करणारा आहे.

मराठचांच्या इतिहासाचा अभिमान हा तो पुरावा

भारतीयांचा पराभव झाल्यामुळे ब्रिटीश लोक सर्वच क्षेत्रात आपल्याहून वरचढ आहेत अशी पराभूत, न्यूनगंडाची भावना या देशातील आंग्लशिक्षित लोकांच्या मनात घर करून राहिली होती. ही भावना अधिक घट्ट करण्याचे कार्य ग्रँड डफसारख्या ब्रिटीश इतिहासकारांनी अधिक परिणामकारक पद्धतीने केले होते. या अशा इतिहासलेखनाच्या संदर्भात, ७ मे १८९५ च्या केसरीत पुढील विचार मांडण्यात आले होते. "इसापनीतीतील सिंहाचे चित्र काढणाऱ्या चित्राऱ्याप्रमाणे इंग्रजांनी आमचे इतिहास लिहावे व आम्ही ते श्रुतिप्रमाण मानून त्यांचे पठन–पाठन करण्यातच संतोष मानवा ही आमच्या परावलंबनाची सीमा नव्हे काय ?"[९]

राष्ट्रीय बाण्याच्या केसरीने १८९५ मध्ये जो विचार मांडला तोच विचार १८६९ च्या आपल्या काव्याच्या प्रस्तावनेत श्री. कुंटचांनी सुमारे पंधरा वर्षे आधी मांडला हे लक्षात घेतले पाहिजे. श्री. कुंटे लिहितात,

"The history of Shivaji cannot be studied from Elphistone's History or Murray's British India. It requires to be studied from Ramdasa's writings and Tukarama's utterances."

छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रीय नेत्यांबद्दल श्री. कुंटे यांच्या अंतःकरणात अतिशय आदर आणि अभिमान आहे. त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधी ग्रँडडफसारख्या इतिहासकारांनी केलेली विधाने व त्यांना लावलेली विशेषणे सहन होत नाहीत. विपर्यस्त इतिहासासंबंधी शंका व्यक्त करताना ते म्हणतात, "It is generally belived that Shivaji treacherous'ly murdered Afzulkhan. The particulars are given, I suspect as they are found in Mohamedan history."

यातून श्री. कुंटचांच्या राष्ट्रीय वृत्तीचा परिचय होतो. श्री. कुंटचांना आपल्या अंतःकरणातील सुप्त अशा राष्ट्रीय भावना 'राजा शिवाजी' च्या माध्यमातून व्यक्त करावयाच्या होत्या असे म्हणता येते. आपल्या भूमिकेचे अधिक स्पष्टीकरण करताना श्री. कुंटे लिहितात, "What are the National feelings of the Marathas on the subject is the question I want to answer." [१०]

कोल्हापूरच्या हायस्कुलातील श्री. कुंटचांचे एके काळचे सहाध्यायी व आधुनिक महाराष्ट्राचे जनक न्या. मा. गो. रानडे यांनीही मराठचांच्या इतिहासासंबंधी संशोधनात्मक निबंध इंग्रजीतून

लिहायला सुरुवात केली होती. आपले विचार मांडताना न्या. म्हणाले होते, " मराठ्यांचा उदय हा डोंगरदऱ्यांत अकस्मात उद्भवणारा वणवा नव्हे. तो महाराष्ट्रधर्माने पूर्वनियोजित होता. हा बहुजनसमुदायाचा उठाव होता. ते नुसते धार्मिक स्वरूपाचे नसून ते राष्ट्रीय उत्थान होते. आणि महाराष्ट्र धर्माच्या भावनेने भारलेल्या या समाजाने एकतेच्या भावनेने या देशात पाश्चात्य लोक येईपर्यंत कार्य केले." [११] अगदी हाच विचार श्री. कुटचांनी जरा वेगळ्या पद्धतीने मांडलेला आहे. येथे आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की हा पूर्वनियोजित बहुजनसमाजाचा उठाव होता, तो साकार करण्यासाठी त्यांच्या अभिरुचीला रुचेल असे 'महाकाव्य' लिहिण्याची आकांक्षा श्री. कुटचांनी निर्भीडपणे व्यक्त केलेली होती. श्री. कुंटचांच्या काव्याचे अंतरंग त्यांच्या या प्रस्तावनेइतकेच बोलके आहे.

श्री. कुंटचांची काव्याची व्याख्या

मनुष्याची वाणी ही समाजसापेक्ष वस्तू आहे. तिचा जन्मच मुळी सामाजिक जीवनासाठी, विनिमयाचे एक साधन म्हणून झालेला आहे. मानवी जीवनाच्या विकासात वाणीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुंटचांच्या मते 'काव्य' हे समाजसापेक्ष आहे. म्हणूनच श्री. कुंटचांनी इंग्रजीत कवितेची पुढीलप्रमाणे व्याख्या केलेली आहे. " Poetry, in the largest sense given to it, is that which charms the feelings without offending the understanding "[१२] " काव्य म्हणजे बुद्धीचा अवमान न करता भावनेला आवाहन करणारे लेखन असा त्यांच्या व्याख्येचा आशय आहे." 'एपिक' अथवा महाकाव्याचा विषय म्हणजे एका राष्ट्राच्या उत्थानाचा, प्रगतीचा आणि ऱ्हासाचा विषय असला पाहिजे. या महाकाव्यातून राष्ट्राची अस्मिता प्रगट होऊन राष्ट्रनायकासंबंधी एक प्रकारची अभिन्नता निर्माण झाली पाहिजे आणि सर्वसामान्य वाचकांचे भाविक पातळीवरून रंजन करण्याचे सामर्थ्य त्या महाकाव्यात असले पाहिजे. म्हणून त्यात वत्सल; अद्भुत या रसांसह सर्व रसांना स्थान असले पाहिजे असे श्री. कुंटचांनी सांगितले आहे.

मराठ्यांच्या राष्ट्रीय उत्थानाचे व प्रगतीचे चित्र काढण्याची महत्त्वाकांक्षा श्री. कुंटचांनी बाळगली होती याचा उल्लेख सुरुवातीलाच इंग्रजी अवतरणात केलेला आहे. श्री. कुंटचांच्या काव्यासंबंधी प्रा. रा. श्री. जोग यांनी दिलेला अभिप्राय जितका मार्मिक तितकाच वस्तुनिष्ठ आहे. ते म्हणतात, " मराठी काव्यविचारात नवीन इंग्रजी विचारांचा प्रवेश करून देणारे हे पहिलेच विवेचन होय. श्री. कुंटचांच्या काव्यातील आचारापेक्षा त्यांचा हा विचारच अधिक मोलाचा वाटतो. परंतु हा इंग्रजीमधून व्यक्त झाला यामुळे आणि आचारातील विक्षिप्तपणामुळे या विचाराकडे दुर्लक्ष झाले." [१३]

श्री. कुंटचांच्या महाकाव्याचे अंतरंग

इंग्रजीतून विचार मांडण्यात दोन प्रकारची सोय होती. एक सोय अशी की इंग्रजी राज्यकर्त्यांना आपला मनोदय समजावा आणि दुसरी म्हणजे आंग्लशिक्षित विद्वानांनी त्या विचारांची दखल घ्यावी. त्यामुळेच विद्यापीठांतून मराठी भाषेच्या अध्ययनाचा आग्रह धरणाऱ्या न्यायमूर्ती रानडचांनी आपले इतिहासावरील निबंध इंग्रजीत लिहिले. श्री. कुंटचांची प्रस्तावनाही केवळ नवीन काव्यविचारांचाच आरंभ नव्हे तर आधुनिक मराठी काव्यातील राष्ट्रीय विचारांचाही तो आरंभ आहे हे विसरता येत नाही.

'राजा शिवाजी' या महाकाव्याची सुरुवात देवी शारदेच्या स्तवनाने झालेली आहे. महाकाव्याची निर्मिती करण्याचा आपला प्रयत्न म्हणजे एक मोठेच धाडस आहे. कवी म्हणतो,

'मनोरंजने शारदे ! देवि पावे
दयाळे ! कृपाळे ! मला धैर्य द्यावे
चढाया पहातो जिथे वाट नाही
जिथे शक्ति माझी न चालेचि काही'

आपल्याला कोणत्या स्वरूपाचे काव्य रचावयाचे आहे हे सांगताना श्री. कुंटचांनी आदर्श म्हणून प्रमुख प्राचीन राष्ट्रीय कवींचीच नावे घेतलेली आहेत. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे काव्य मराठीत असूनही महाराष्ट्रातल्या एकाही कवीला श्री. कुंटचांनी स्थान दिलेले नाही ही गोष्ट त्यांच्या राष्ट्रीय जाणिवेची द्योतक आहे. श्री. कुंटे म्हणतात,

'सवे रंगशी कालिदासादिकांच्या
मला प्रेर गे, दास मी होय साचा
जसा थोर वाल्मीकि साधी रसांते
तसे काव्य यावे रचायास माते !'

श्री. कुंटे 'कालिदासादिकांच्या' पदाने सर्व संस्कृत महाकवींचा उल्लेख करतात आणि 'जसा' या पदाने काव्य रचण्याचे सामर्थ्य मागताना मात्र श्री. कुंटचांनी मिल्टानिक पद्धतीच्या उपमेचा उपयोग मोठचा मार्मिकपणे केलेला आहे.

या राष्ट्रीय काव्याची अधिष्ठात्री देवताही देशाभिमानी आहे. श्री. कुंटे सांगतात,

"नसे अन्य कोणी पुरा शक्त वाटे
मला लाव गे ! देवि ! निर्विघ्न वाटे
तुला थोर मानी शिवाजी भवानी
तुझे रूप तू देवि ! देशाभिमानी."

देवी सरस्वतीची सृजनशील आणि संहारक अशी दोन्ही रूपे कवीला अभिप्रेत आहेत. त्या दोन्ही रूपांची प्रार्थना श्री. कुंटचांनी केलेली आहे. येथे स्वा. वि. दा. सावरकरांच्या 'मूर्ति दुजि ती !' या कवितेची स्मृती होते. मात्र श्री. कुंटचांची मनःस्थिती शांत होती. आपल्या महाकाव्याचा विषय मांडतानाच, स्वदेशी सुकल्याणकर्त्या शिवाजी महाराजांचा उदय कसा झाला हे सर्व मला सविस्तर सांग अशी पुन्हा शारदेला विनवणी केली आहे.

"कसा सोडवी देश राजा शिवाजी ?
कसे मांडिले राज्य हिंदू समाजी ?
स्वदेशाभिमाने कसे राव राणे ?
कसे नाशिले म्लेंच्छ सर्वस्वहर्ते
स्वदेशी निघाले सुकल्याणकर्ते
कसे ? सर्व हे सांग माते ! मला गे !"

सहा भागांतील कथानकाचा आटोप

श्री. कुंटचांच्या ' राजा शिवाजीचे ' सहा भागच लिहून झाले. अपेक्षित असे पुढचे सहा भाग निर्माणच झाले नाहीत. या पहिल्या सहा भागांतील पहिल्या तीन भागांत तत्कालीन महाराष्ट्रात राष्ट्रीय जागृती कशी झाली ? मुसलमानी आक्रमकांनी कसा धुमाकूळ घातला, महाराष्ट्र देश, मराठचांचा स्वभाव, शिवाजी महाराजांचा संसार, त्यांचे प्रारंभीचे राजकारण आणि पन्हाळचाच्या पायथ्याशी विजापूरकर मुसलमानांवर मराठी लोकांनी चढविलेला हल्ला एवढा विस्तृत कथाभाग आलेला आहे. श्री. कुंटचांना ज्या राष्ट्रधर्मनिर्मितीची प्रक्रिया सांगावयाची होती ती सांगण्यात ते यशस्वी झालेले आहेत. पुढच्या तीन भागांत बहिर्जी नाईक, पिलाजी, नूरजानी, शिवाजी महाराजांचा सोयराबाईंसमवेत रांगण्यास प्रवास, मुधोळकराचा वध, वाडीकराचा पराभव आणि शेवटी शिवाजी शहाजी या पितापुत्रांची भेट ही प्रकरणे आलेली आहेत. राष्ट्रीय काव्य या दृष्टीने पहिल्या तीन प्रकरणांतच कवीचे सामर्थ्य प्रत्ययास येते.

राष्ट्रीय अहम् जागृतीचे सफल चित्रण

इस्लामी आक्रमणाच्या आघाताने मराठी माणसे हवालदिल झाली होती. दैनंदिन जीवन सुखाने; समाधानाने जगणे त्यांना अशक्य झाले होते. या सत्ताधीशांची लोकांनी इतकी दहशत घेतली होती की चार लोकांना दिवसा एकत्र जमून आपले सुखदुःख निवेदन करणेही कठीण झाले होते. या समान संकटाने अठरापगडजातीचे लोक सहानुभूतीने, आत्मीयतेने एकत्र येऊन विचार करू लागले होते. या लोकांतील सशक्त तरणेबांड गडी पेटून उठले होते. या परिस्थितीतून त्यांच्यातील ' अहम् ' जागृत झाला होता. तो व्यक्तीपुरता मर्यादित न राहता व्यापक झाला होता. राष्ट्रीय उत्थानाचे मूळ याच जाणिवेत असते. त्याचे सफल चित्रण श्री. कुंटचांनी केलेले आहे. लोक गुप्तपणे एकत्र जमून विचार-विनिमय करीत होते. श्री. कुंटे वर्णन करतात,

त्यांची अवस्था कशी होती ?

" किती बैसले हात टेकोनि माथा
किती प्रार्थिती फार देवा समर्था
किती अंतरी घोर दुःखे जळाले
कुणाच्या मुखांचेहि पाणी पळाले. "

पिलाजी नावाचा सशक्त तरुण मराठा या परिस्थितीने पेटून उठला होता, तोच या सर्वांना हिंमत देत होता, त्यांच्यात पौरुष जागवीत होता. तो त्यांना मराठी चालरीत शिकवीत म्हणाला,

" न भ्यावे, अशी चाल पक्की मराठी."

शेवटी सत्तेपुढे शहाणपण चालत नाही हाच सिद्धांत खरा होता. सत्ताधारी उन्मत्त झाले होते. कवी वर्णन करतात,

" किती क्लेश पाहू ! मुसलमान माजे
लुटी देवळे, देह हा फार लाजे
धरी ब्राह्मणा, त्रास होतो मना हा
चिरी गाय, काटा शरीरी उठे हा."

" बुडे आमचा देश हा दुःख डोही
मुसलमान माजे न चालेचि काही .....
असे आमचा देश या हिंदु लोकी
कसे चोर आम्हीचि ! देशा ! विलोकी."

सर्वसामान्य अशा मराठी माणसांचा प्रतिनिधी असलेला एक तरुण पुढाकार घेऊन हिंमत देताना समर्थांचेच सूत्र सांगतो.

सदा सर्वदा देव सन्निध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे । तो म्हणतो,

" किती काल हिंदू इथे नांदले हे
उठी, सांग लोका जगी सत्य आहे. .....
मराठेच किंवा कुणी राज्य केले ?
असे आमचे राज्य, हे कोण आले."
" असे देह तो होणेचि नाही
मरू भांडता हो ! असो वासना ही
जरी कोसळे सर्व आभाळ खाली
तरी घाबरू का ? महादेव पाळी."

स्वदेशाबद्दलची आणि स्वदेशाभिमानाची कल्पना पहिल्या प्रकरणातच कवींनी मांडलेली आहे.

" स्वदेशाभिमाने, सुसंसार सारा
मनी भक्ति, देही भरे युद्ध वारा
चलाखी करी सर्व कामे कराया
पटाईत पक्का शिकारी शिराया "

श्री. कुंटघांनी मांडलेली मराठ्यांच्या स्वराज्याची कल्पना

" स्वदेशी असावे स्वदेशीय राजे,
स्वधर्म, स्वशास्त्र स्वदेशी विराजे,
स्वनाथे, प्रजेला जपावे, भजावे
प्रजेने स्वनाथा, मुसल्मान जावे...
स्वदेशी असावी स्वदेशीय रीती
जनांच्या मनाला खरी मान्य होती
खरे शास्त्र आहे, पहा स्पष्ट हे का
स्वदेशास रक्षूं, धरा हाचि हेका."

महाराष्ट्र धर्म म्हणजेच गीताधर्म असा बाणा राखा

" मनीं वागवावी कथा ती गितेची
मरुं झुंजता चाल ही क्षत्रियांची
जरी फौज नाही कराया चढाया
तरी धैर्य आहे, लढूं या मरू या ! "

" रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग अंतरबाह्य जग आणि मन "

या तुकाराम महाराजांच्या अभंगातील उक्तीचा प्रत्यय शिवाजी महाराजांच्या वैयक्तिक जीवनात श्री. कुंटे यांनी दाखविला आहे. देशभक्ताला सांसारिक सुखाला पाठ दाखवावी लागते. स्वदेशाभिमान हाच त्यांचा बाणा असतो हे आपल्या लाडक्या पत्नीला सोयरा बाईला शिवाजी महाराज समजावून सांगतात,

" नव्हे गर्व काही, नव्हे ही बढाई
नव्हे लोभ जो चालवी ही लढाई
स्वदेशाभिमाने, दिला आज माना
रुचे हाचि कित्ता मराठ्या जनांना."

'राजा शिवाजी' या महाकाव्यात श्री. कुंटयांनी म्हटल्याप्रमाणे वीररसात्मक अनेक प्रसंग आहेत. तसेच शृंगारिक प्रसंगही आहेत.

ग्रामीण जीवनातील नैसर्गिक लावण्याने मुसमुसलेल्या आणि दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून आत्महत्येला प्रवृत्त होऊन सुंदर देह नदीच्या जलात झोकून देणाऱ्या पोवाराच्या मुलीचे चित्रही तितकेच देखणे आहे.

युद्धाचा प्रसंग, शिवाजी शहाजी यांच्या भेटीचा प्रसंग असे कित्येक प्रसंग रंगविण्यात कुंटयांची प्रतिभा कुठेही उणी पडत नाही. पहिल्या तीन प्रकरणांनंतरच्या चित्रणात थोडा विसंगतीचा दोष जाणवतो इतकेच. परंतु एक अपूर्ण असे राष्ट्रीय काव्य म्हणून त्याचे स्थान आधुनिक मराठी कवितेत वैशिष्ट्यपूर्ण आहे. यासंबंधी मतभेद होऊ नयेत. 'राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता' या प्रबंधविषयाच्या दृष्टीने या काव्यनिर्मितीमागील प्रेरणा राष्ट्रीय स्वरूपाची आहे किंवा नाही हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून 'राजा शिवाजी' हे काव्य राष्ट्रीय प्रेरणेतूनच लिहिले गेले आहे असे निश्चितपणे म्हणता येते. कवींची भूमिका आणि काव्यांतर्गत पुरावे यातून जो सुसंवाद दिसून येतो तो वरील मताला पोषक असाच आहे.

टीकाकारांचे अभिप्राय

आधुनिक मराठीतील टीकाकारांनी श्री. कुंटे यांच्या काव्यासंबंधी, त्यांनी काव्याला लिहिलेल्या इंग्रजी प्रस्तावनेसंबंधी आणि त्यांच्या व्यक्तिविशेषासंबंधी आपले अभिप्राय दिलेले आहेत. श्री. कुंटयांच्या 'राजा शिवाजी' वरील डॉ. ह. कि. तोडमल यांचा अभिप्राय ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. ते या काव्यासंबंधी म्हणतात, " राजा शिवाजी काव्यापासूनच मराठीत ऐतिहासिक खंडकाव्याची परंपरा निर्माण झाली. मराठी काव्याच्या भाषेतील कृत्रिमपणाला ओहटी लागली आणि पौराणिक आख्यानकाव्ये मागे पडली. सामान्यतः अर्वाचीन मराठी खंडकाव्यांचा आणि विशेषतः ऐतिहासिक खंडकाव्यांचा आद्यप्रणेता म्हणून म. मो. कुंटे यांना मानाचा मुजरा करायलाच हवा."[१४]

श्री. कुंटे यांनी ऐतिहासिक खंडकाव्याची परंपरा निर्माण केली. याचा अर्थ त्यांनी 'वीर विभूतिपूजन' हे ज्या राष्ट्रीय कवितेचे एक महत्त्वाचे गमक त्या राष्ट्रीय कवितेचीही परंपरा निर्माण केली. 'राजा शिवाजी' पासून प्रेरणा घेऊन १८७० ते १८८० या दशकात जोरवेकरांचे 'शिवराज लीला', जुवेकरांचे 'पद्यरूप कृष्णकुमारी चरित्र', ए. अ. जोशी (कमरकर) यांचे 'शिवाजी महाराज यास दादोजी कोंडदेवकृत उपदेश', गो. वा. कानिटकरांचे 'श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध' इत्यादी ऐतिहासिक काव्ये लिहिल्या गेली. श्री. कुंटयांच्या 'राजा शिवाजी'ने प्रभावित होऊन

ऐतिहासिक काव्याप्रमाणेच शिवचरित्रकार कवींचीही परंपरा मराठीत निर्माण झाली. गणेशशास्त्री लेले, के. ल. जोरवेकर, आ. मो. छत्रे, वा. भा. भावे, कृ. भि. पळनिटकर, अ. श. हर्डीकर, कृ. ब. वत्सराज, के. स. रिसबूड, व्यं. वि. दीक्षित (वाटवे), नरहरीबुवा फलटणकर, एक बी. ए. इत्यादी सुमारे पंधरा कवींनी शिवकथेचे गायन केलेले आहे. या सर्वांच्या निर्मितीमागे कुंटचांची दृष्टी नसली तरी एक धीरोदात्त राष्ट्रनायक रेखाटण्याची त्यांची धडपड होती हे विसरता येत नाही.

प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, "राजा शिवाजींच्या कर्त्यांनी कवितेचे ध्येय राष्ट्रीय पाहिजे आणि ती (कविता) बालवृद्धांस समजली पाहिजे हे दोन आदर्श समोर मांडले आहेत."[१५]

प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी कुंटचांचे 'राजा शिवाजी' हे काव्य मागे पडण्याचे कारण 'कालबाह्यता' असे सांगितले आहे. श्री. कुंटचांच्या काव्यदृष्टीसंबंधी डॉ. कुलकर्णी म्हणतात, "केशवसुतांची भावकाव्यप्रधान, व्यक्तिप्रधान काव्यदृष्टी अवतरण्याआधी तितकीच मूलगामी परंतु तिच्याशी संपूर्ण विरोधी अशी एक काव्यदृष्टी अर्वाचीन काळात मराठीत मांडली गेली. महादेव मोरेश्वर कुंटे यांनी प्रस्तुत कार्य केले... आपण जे राजा शिवाजी लिहीत आहोत ते एका कवीने एकेकटचा रसिकासाठी लिहिलेले काव्य नाही, एका संस्कृतीने बहुजन समाजासाठी लिहिलेले काव्य आहे अशी त्यांची धारणा होती... कवींच्या आत्माविष्कारकल्पनेचा त्याग करणारी कुंटे यांची काव्यदृष्टी."[१६]

प्रा. रा. श्री. जोगांप्रमाणेच डॉ. द. भि. कुलकर्णींनी श्री. कुंटचांच्या स्वतंत्र काव्यदृष्टीचे महत्त्व ओळखले आहे. ती समाजनिष्ठ आहे असाच त्यांचा अभिप्राय आहे. 'राजा शिवाजी आणि त्याची प्रस्तावना' या लेखातून डॉ. वा. ल. कुलकर्णी यांनी आपले विचार मांडलेले आहेत. ते सांगतात, 'कुंटचांचे म्हणणे असे की महाकाव्याचा संबंध एखाद्या संपूर्ण राष्ट्राचा उदय, विस्तार आणि ऱ्हास यांच्याशी असतो. सर्वच रसांचा परिपोष महाकाव्यात होतो. ..... थोडक्यात ते महाकाव्य म्हणजे सदर राष्ट्र ज्या ज्या गोष्टीसाठी ओळखले जाते त्या त्या गोष्टीचे जणू मूर्तीकरणच असते."[१७]

श्री. कुंटचांच्या महाकाव्याची राष्ट्रीय बाजू येथे डॉ. वा. ल. कुलकर्णी यांनी मांडलेली आहे. आतापर्यंत कुंटचांसंबंधीचे टीकाकारांचे अभिप्राय आपण पाहिलेले आहेत. श्री. कुंटचांची स्वतंत्र अशी काव्यदृष्टी सर्वांना अभिनव वाटणारी आहे. त्यांच्या अभिरुचीबद्दलच्या कल्पनेतील नावीन्यही बहुतेकांना मान्य आहे. परंतु श्री. कुंटचांनी ज्या आकांक्षेने हे महाकाव्य लिहिले त्या त्यांच्या राष्ट्रीय आकांक्षेची टीकाकारांनी फारशी दखल घेतलेली दिसत नाही. बहुतेकांनी ऐतिहासिक खंडकाव्य, महाकाव्य, रचनापद्धती अशा स्वरूपाचाच विस्तृत विचार केलेला आहे.

या संदर्भात श्री. न. चिं. केळकरांचा अभिप्राय बोलका आहे. ते म्हणतात, "अर्वाचीन ऐतिहासिक महाकाव्य लिहिण्याचा अग्रमान कुरुंदवाडकर, गणेशशास्त्री लेले व माधवराव कुंटे यांच्याकडे जातो. त्यापैकी कुंटचांचे काव्य चांगले साधले आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वग्रहदूषित प्रतिकूल टीकेमुळे हे काव्य चांगले असूनही मागे पडले ते कायमचेच मागे पडल्यासारखे दिसते."[१८] श्री. केळकरांचा हा अभिप्राय प्राधान्याने अंतरंगाकडे संकेत करणारा आहे. काहीही असले तरी प्रतिकूल टीकेच्या आणि योग्य प्रसिद्धीच्या अभावी श्री. कुंटचांना न्याय मिळू शकला नाही हे सत्य आहे. आधुनिक काळातील पूर्वजस्मृतीला सर्व प्रथम उजाळा देऊन, आधुनिक ऐतिहासिक खंडकाव्याचा प्रारंभ करून आणि त्याचबरोबर आधुनिक मराठीतील राष्ट्रीय काव्याचा भक्कम पाया घालण्याचे अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य श्री. कुंटचांनी केलेले आहे.

पूर्वज स्मृतिकालखंडातील आणखी काही राष्ट्रीय कवी–राष्ट्रीयतेचा क्षीण प्रवाह

आधुनिक मराठीतील राष्ट्रीय काव्याचा श्रीगणेशा जाणीवपूर्वक श्री. कुंटे यांनी आपल्या 'राजा शिवाजी' या काव्याने केला. श्री. कुंटचांनी 'राजा शिवाजी' हे काव्य लिहून आधुनिक मराठीतील खंडकाव्याची आणि ऐतिहासिक खंडकाव्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे ऐतिहासिक कार्य केलेले आपण पाहिले. केवळ राष्ट्रीय काव्याची निर्मिती करूनच श्री. कुंटे थांबले नाहीत, त्याशिवाय त्यांनी समाजनिष्ठ अभिरुचीची नवी दृष्टीही महाराष्ट्राला दिली. श्री. कुंटचांचे हे ऋण महाराष्ट्रातील वाङ्मयेतिहासिकारांनी व टीकाकारांनी मान्य केलेले आहे.

श्री. कुंटचांपासून प्रेरणा घेऊनच राष्ट्रीय काव्याची, ऐतिहासिक खंडकाव्याची आणि 'बीर विभूतिपूजनाच्या' कथाकाव्याची परंपरा महाराष्ट्रात रुजली आणि पुढे अनेक काव्ये लिहिल्या गेलीत.

श्री. कुंटचांपासून प्रेरणा घेऊन किंवा देशातील सामाजिक, राजकीय वातावरणाने उत्तेजित होऊन किंवा अंत:स्फूर्तीने प्रभावित होऊन राष्ट्रीय कविता लिहिणारा एक वर्ग आधुनिक मराठीत अस्तित्वात आला. मात्र हा प्रवाह अत्यंत क्षीण स्वरूपाचा होता असे म्हणावे लागते. या प्रवाहाचे स्वरूप एखाद्या लहानशा झिरप्यासारखे होते. सामान्यत: उगमाजवळचा कोणताही प्रवाह असाच क्षीण असतो पण त्यातील पाणी मात्र जिवंत झऱ्याचे, तसेच स्वच्छ व निर्मळ असते. या प्रवाहामुळे शेते, बागा ओलावल्या जात नाहीत किंवा प्रचंड धरणे बांधून मोठमोठे विद्युत्प्रकल्पही उभारले जात नाहीत अथवा आगनावाही चालत नाहीत, तरीही या प्रवाहाची अस्तित्वपूर्ण जाणीव मनाला बराच काही दिलासा देऊन जाते. तहानेने व्याकूळ झालेल्या जीवाला तजेला देण्याचे कार्य हे झिरपे करू शकतात. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेच्या प्रवाहाचे प्रारंभीचे स्वरूप असेच आहे. नाही म्हणायला श्री. कुंटचांनंतर 'वीरविभूतिपूजनाचे' कार्य मराठी कवितेत सातत्याने झालेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावर लिहिल्या गेलेल्या सुमारे पंधरा काव्यांचा उल्लेख श्री. कुंटचांच्या संदर्भात केलेला आहे. गणेशशास्त्री लेल्यांचे 'कृष्णाकुमारी' गो. वा. कानिटकरांचे 'श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध', वामन दाजी ओकांचे 'थोरले माधवराव पेशवे यांचा मृत्यू', वासुदेवशास्त्री वामनशास्त्री खरे यांचे 'यशवंतराय महाकाव्य' ही काव्ये कुंटचांच्या अनुकरणाने झालेली आहेत. श्री. कानिटकरांच्या 'श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा वध' या काव्यासंबंधी अभिप्राय देताना न्या. मा. गो. रानडे म्हणतात, " This poem is chiefly written after the model which has become popular, since the author of Shivaji wrote his work." [१९]

ही बहुतेक काव्ये याच पहिल्या कालखंडातील असून त्यातली काही महाकाव्ये म्हणून ओळखली जाणारी आहेत. या काव्यांची बहुतेक टीकाकारांनी ऐतिहासिक काव्ये म्हणून संभावना केलेली आहे. राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिकोनातून त्या काव्यांच्या विषयाकडे व कथानायकाकडे पाहिल्यास त्यातून पूर्वजस्मृतीचेच वर्णन प्रामुख्याने केलेले आढळेल.

वारसा हक्क सांगणाऱ्या सवतीच्या पोरांचा दुसवास

या कालखंडातील नवशिक्षितांची किंकर्तव्यमूढ अवस्था झालेली होती. ज्यांच्यात थोडाफार प्रमाणात अस्मितेचा अंगार होता त्यांच्या अभिव्यक्तीला नव्या काव्यदृष्टीने नीरस ठरविले होते. इंग्रजी कवितेच्या अनुकरणामुळे भावगीतात्मक रचनेकडे कवींची अधिक ओढ होती. ही भावगीतेही

व्यक्तिजीवनातील सामान्य सुखदुःखाच्या भावनांची अभिव्यक्ती करणारी खरीखुरी आत्मनिष्ठा म्हणून ओळखली जाणारी असावीत असा समज प्रबळ होऊ लागला होता. सामाजिकता, राष्ट्रीयता असा व्यापक आशय अथवा व्यापक सुखदुःखांच्या भावनांना आविष्कृत करणाऱ्या काव्याला गौणत्व आलेले होते. वारसा हक्क सांगणाऱ्या सवतीच्या पोरांचा दुसवास व्हावा तशी अवस्था या काळातील राष्ट्रीय कवितेची झालेली होती. राष्ट्रीय आणि सामाजिक जीवन हे देखील मानवी जीवनाचे एक अंग आहे. व्यक्तिजीवनावरोवरच त्याच्याशी निगडित असणाऱ्या या जीवनालाही प्राधान्य आहे. किंबहुना व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला या जीवनाचे अधिष्ठानही आवश्यक आहे हे विसरले जात होते. आशयापेक्षा अभिव्यक्तीलाच अधिक महत्त्व आलेले असे. विचार, चिंतन, तत्त्वप्रतिपादन, ध्येय-निष्ठा, प्रबोधन यांना दुय्यम स्थान प्राप्त झालेले असे. कवितेवर प्रासंगिक, प्रचारकी, सौंदर्यहीन असे शिक्के मारले जात असत आणि अशी कविता उपेक्षित म्हणून निकालात काढली जात असे.

पारतंत्र्याबद्दलची खंत

पंडित, नवशिक्षित, स्वतंत्रपणे रचना करणारे आणि लोककवी असे चार प्रकार त्याकाळी कवींचे होते. दादोबा पांडुरंग, लक्ष्मण शास्त्री हळबे, विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि जोतिराव फुले या सुप्रसिद्ध समाजसुधारकांचा या लोककवींतच समावेश करावा लागेल. इतर कवीही केवळ काव्यनिष्ठ कधीच नव्हते. त्यांची निर्मिती ही हेतुपूर्वकच होती. लोकशिक्षण व लोकजागृती हेच त्यांचे उद्दिष्ट होते. महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्रालाच पारतंत्र्याची जाणीव होऊ लागली होती. थोड्यांनाच तीव्रतेने आलेली दैन्यावस्था जाणवत होती. 'नारायणराव पेशवे' या काव्यात त्यासंबंधी गो. वि. कानिटकर (१८५४–१९१८) सहज लिहून जातात,

"बुडाली मराठी–बुडे पेशवाई !
महाराष्ट्र ते काळचक्रात जाई ॥ ४ ॥
फिरुनि तो शिउवा तुज ना दिसे
तुजसि लागुनि जाईल बा पिसे.....
विगत वैभव जे तव भूमिचे !
स्मरुनिया करि सेवेस तूं तिचे !

तत्कालीन ऐतिहासिक काव्ये लिहिण्यामागील प्रेरणाच या ठिकाणी कवीने व्यक्त केलेली आहे. 'संमोह लहरी' या चिंतनपर काव्यातही कानिटकरांनी भारतमातेचा गौरव केलेला आहे. ते म्हणतात,

"अनेक असती प्रभो ! क्षितितलावरी देश जे !
पुराण समयी कशी भरत भूमिमध्ये सजे !"

दुर्दैवाने आज सती भारतीची कशी अवस्था झालेली आहे हे सांगताना कानिटकर लिहितात,

"अनन्त उदरी हिच्या धन भरोनिया राहिले
तरी करुनि उद्यमा वरति पाहिजे काढिले
अम्हा म्हणति आळशी परकिलोक ते हासती,
अहर्निश म्हणोनि ही रडतसे सती भारती ॥ ११० ॥"

महान पूर्वजांबद्दल बोलताना कवीचे अंतःकरण अभिमानाने भरून येते. तो म्हणतो,

"कुठे कपिल बादरायण, पतंजली जैमिनी
कणाद बुध गौतम प्रखर बुद्धिशाली मुनी
पवित्र कवि आद्य जो चरित राघवाचे करी
रसज्ञ भवभूतिसे, मधुर कालिदासापरी ॥ १११ ॥"

'स्वातंत्र्याची योग्यता' या कवितेतून स्वातंत्र्याचे महत्त्व कानिटकरांनी परोपरीने सांगितले आहे. 'पंचतुंड नररुंड' या अण्णासाहेब किर्लोस्करांनी लिहिलेल्या पदाच्या चालीवर ही कविता आहे. कानिटकर लिहितात,

"स्वातंत्र्याच्या साठी झाला सिद्ध न जो नर मरणाला
धिक् धिक् त्याचे जीवित, आला प्राणि कशाला जन्माला
स्वातंत्र्याविण दुःखद ऐसे जीवन लोकी कशाला ?"[२०]

गो. वि. कानिटकरांप्रमाणेच वासुदेव वामनशास्त्री खरे (१८५८–१९२६) यांनी आपल्या 'यशवंतराय' महाकाव्यात स्वकीयांच्या भूतकालीन वैभवाचा व पराक्रमाचा जसा गौरव केलेला आहे तसेच स्वदेशभक्ती व स्वातंत्र्याचे स्तोत्र गायिले आहे. देशभक्तांनी, स्वतंत्र राष्ट्र उदयाला यावे अशी आकांक्षा मनात बाळगणाऱ्यांनीच माझ्या काव्याचे वाचन करावे असे स्पष्ट निवेदन केलेले आहे. ते म्हणतात,

"मद्देश–बंधुजन जे असतील मानी
साधु स्वदेश–हित हे झटती इमानी ॥
औदार्य धैर्य गुण हे प्रिय ज्यास होती ।
घेवोत ते रसिक मत्कवितेस हाती ॥ ३ ॥
व्हावे स्वतंत्र, उदया निजराष्ट्र यावे ।
सन्मान उच्च पद ही स्व–जनी वरावे ॥
आचंद्र–सूर्य निज कीर्ति रहावि मागे
ज्याच्या प्रशस्त मनि हेतु असाच वागे ॥ ४ ॥"

कोणताही महान देशभक्त असला आणि कोणत्याही राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती करणारा कवी असला तरी यापेक्षा दुसरी कोणती अपेक्षा करील ? सारे देशभक्तांचे सायास, प्रयत्न आणि त्याग व बलिदान याच राष्ट्रीय उद्देशाने होत असतात असा जगातील स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या देशभक्तांचा अनुभव आहे. जातीय अभिमानही राष्ट्रीयत्वाच्या अभिमानाचा एक घटक आहे. हिंदु-जाती ही राष्ट्रजाती मानल्या गेलेली आहे. या जातीची एक राष्ट्रीय संस्कृती आहे. या संस्कृतीचे गुणगान करणे हे राष्ट्रीय कवीचे कर्तव्य समजले जाते. देशभक्त खऱ्यांनी विक्रमादित्याच्या उज्जयिनीच्या वैभवाचे वर्णन करताना लिहिले आहे. तसाच मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याचे प्रतिनिधी अशा पेशव्यांचा गौरवही आलेला आहे.

"यवन राज्य तमें जग घेरिले, म्हणूनि हिंदु महा भय पावले ।
उगवती रविसे भट पेशवे, पळति शत्रु तयां नच राहवे ॥ ४ ॥"[२१]

अशा पेशव्यांच्या पुण्याची पारतंत्र्याच्या काळात झालेली अवस्था पाहून कवीला दुःख वाटते. तो म्हणतो,

" अतुल वैभव, शास्त्र कलागुण, सकल जाति पुण्यातुन लोपून "

सांस्कृतिक पुनरुज्जीवन आणि राष्ट्रीय जाणीव

या पूर्वजस्मृतिकालखंडात दोन प्रवृत्ती स्पष्टपणे आढळतात. त्यापैकी एक प्रवृत्ती म्हणजे जुन्या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आपल्या प्राचीन साहित्याचे भाषिक अनुवाद करणे, आपल्या आध्यात्मिक परंपरेचे जागरण करणे आणि दुसरी प्रवृत्ती म्हणजे एके काळी भोगलेल्या वैभवाचे, ऐश्वर्याचे, स्वातंत्र्याचे गुणगान करणे. याच कालखंडातील काही कवींची रचना शुद्ध धार्मिक स्वरूपाची आहे. आध्यात्मिक आणि नैतिक शिकवण लोकांना देणे त्यांना आवश्यक वाटते, अशा कवींत कवी हंसराज (१७९८ ते १८५५), नवनीतकार परशुरामपंत तात्या गोडबोले (१७९९–१८७४), यांचा समावेश करावा लागेल. कवी हंसांनी वेदांतासारख्या आध्यात्मिक विषयावर सुबोध मराठीत ओवीबद्ध रचना केलेली असून ती " अर्वाचीन मराठी कवितेतील " वेच्यांत दिलेली आहे. नवनीतकारांची काव्यरचना हे सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे ठळक उदाहरण आहे. प्राचीन काव्यांतील वेचे संपादित करण्याचे कार्य त्यांनी केलेच परंतु रामायण, महाभारतावर आधारित काव्यरचना करूनही त्यांनी हे सांस्कृतिक कार्य केलेले आहे. दारिद्र्याचे भीषण परिणाम वर्णन करताना परशुराम तात्या लिहितात,

" दारिद्र्य लज्जेचे कारण, लज्जा करी तेजाचे हरण,
निस्तेज पुरुषास अपमान । पदोपदी होतसे,
अपमान निर्वेदा उठवी, निर्वेद शोकाते पेटवी,
शोक बुद्धीते आटवी । निःशेषणे " [२२]

मूळ संस्कृतातील नीतिविषयक विचारांचे हे पुनरुज्जीवनच होते. प्राचीन भारतीय विचारांत समृद्धीलाच महत्त्व होते. दारिद्र्य हे करंटेपणाचे लक्षण समजले जात होते.

सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा प्रभाव या काळातील विठोबा अण्णा दप्तरदार (१८१३–१८७३) या भक्त कवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवीवर विशेष होता असे म्हणता येते. गजेंद्रचंपू, सुश्लोकराघव, हेतुरामायण, भक्तिपदे, कटाव या सर्व रचना पाहिल्या म्हणजे त्यांचे पुनरुज्जीवनवादी स्वरूप स्पष्ट होते. या कवींतच कृष्णशास्त्री चिपळूणकर (१८२४–१८७८), राजा सर टी. माधवराव (१८२८–१८९१), भास्कर दामोदर पाळंदे (१८३२–१८७४), गणपतराव हरिहर कुरुंदवाडकर (१८३८–१८९९), पांडुरंग गोविंदशास्त्री पारखी (१८४४–१९११) या कवींचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. कृष्णशास्त्री चिपळूणकरांची पद्यरत्नावली, मेघदूत अनुवाद व राजा सर टी. माधवरावांच्या नीतिविषयक आर्या, राष्ट्रीय वृत्तीचा परिचय देणाऱ्या आहेत. राजा सर टी. माधवराव सांगतात,

" जेथे अनीती वाढे, नय धर्म बुडे तशांत काय मजा ।
एतद्विध राष्ट्राला प्रबळ क्षयरोग लागला समजा ॥ १८ ॥" [२३]

भास्कर दामोदर पाळंदे यांनी भारतीयांचा प्रेरक व राष्ट्रीय ग्रंथ 'गीतेचे' ओवीबद्ध भाषांतर केले. त्याचप्रमाणे ' रत्नमाला ' नावाचा ईश्वरभक्तीपर ग्रंथ लिहून भर घातली. याच काळातील पांडुरंग व्यंकटेश चिंतामणी पेठेकरांचे (१८५१–१८७९) 'गंगावर्णन' हे सुप्रसिद्ध काव्य पुनरुज्जीवनवादीच

म्हणावे लागेल. चिंतामणी पेठेकरांनी दक्षिणेतील गोदावरी दक्षिण गंगा म्हणून निवडली. पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारतीय संस्कृतीची सर्वांत प्राचीन अशी साक्षीदार असा गंगेचा गौरव केलेला आहे. लोकमाता गंगेची स्तुती करताना चिंतामणी पेठेकरही लिहितात,

" ..... गंगे ! तुझ्या तळवटाचि पूर्वकाली
राज्ये असंख्य बहु थोर बलाढ्य झाली."

पवित्र गंगा ही भारताच्या प्राचीन इतिहासाची आणि संस्कृती व वैभवाची साक्षीदार आहे. तशीच परकीयांनी केलेल्या आक्रमणाची, विध्वंसाची, जुलुमाची आणि अत्याचारांचीही साक्षीदार आहे. आपआपसातील कलहामुळे पृथ्वीराज चव्हाण आणि जयचंद राठोड यांच्यात वैर निर्माण झाले. स्वकीयांचा काटा काढण्याची बुद्धी जयचंदाला झाली आणि त्याने शहाबुद्दीन घोरीच्या साहाय्याने पृथ्वीराजाचा काटा काढला. मग त्याच घोरीने दिल्लीचा चिंधी चोळा केला आणि जयचंदाचे कनोजही राजरोस लुटले. त्या वेळच्या हाहाःकाराचे वर्णन अंगावर शहारे आणणारे आहे. पराक्रम आणि पराभव अशा दोन्ही प्रकारच्या वर्णनांना राष्ट्रीय साहित्यात स्थान आहे. चिंतामणी पेठेकर लिहितात,

" जसे वृक क्षीण क्षुधेने । पडून बाहेर निजग्रतेने ॥
करून विध्वंस बहूसभोती । पीडा जनाते अनिवार देती ॥
तशा इथे म्लेंछ मतानुगामी । केल्या महादुष्कृति ज्या करांनी ॥
त्यांच्यातले क्रौर्य बघून सर्व । होती पशू क्रूर हि भग्न गर्व ॥"



पूर्वज स्मृतिकालखंडातील लोककवींचे राष्ट्रीय काव्य

चिंतामणी पेठेकरांसारखे कवी 'गंगावर्णना' सारखे दक्षिणा प्राईज कमिटीने चारशे रुपये देऊन गौरविलेले काव्य लिहिण्यात पुरुषार्थ समजत. त्याच काळात विनायक कोंडदेव ओक (१८४०–१९१४), बजाबा रामचन्द्र प्रधान (१८३८–१८८६), शिवराम रामकृष्ण नित्सुरे (१८५९–१८७८); नारायण धोंडदेव खांडेकर (१८४७), विठ्ठल भगवंत लेंभे (१८५०–१९२०), विष्णू मोरेश्वर महाजनी (१८५१–१९२३), कान्होबा रणछोडदास कीर्तिकर (१८४९–१९१९) हे कवी इंग्रजी व संस्कृत काव्याचा अनुवाद करीत होते. इंग्रजी भावकाव्याची परंपरा मराठीत स्थिर करण्याचा प्रयत्न करीत होते. यातील बहुतेक आंग्लविद्याविभूषित असून सुधारणावादी विचारसरणीचा पुरस्कार करणारे होते. अनेक पाश्चात्य विचारांनी प्रभावित झालेले होते. परंतु यांच्याच समकालीन अशा पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, मोरो गणेश लोंढे, गंगाधर रामचन्द्र मोगरे, एकनाथ गणेश भांडारे, कृष्णाजी नारायण आठल्ये आदिकवी आंग्लविद्याविभूषित असूनही आपल्या राष्ट्रीय वृत्तीचा परिचय देणारे होते. यातील कृष्णाजी नारायण आठल्ये आणि गंगाधर रामचंद्र मोगरे यांनी 'व्हिक्टोरिया' महाराणीची स्तुतीपर कविता लिहिलेली असली तरी ती प्रासंगिक अशी हीरक महोत्सव प्रसंगाची निर्मिती आहे. गणमात्रा जुळणाऱ्या कवीला प्रासंगिक काही पद्यरचना आप्त स्वकीयांच्या प्रेमासाठी करावीच लागते, अशी ती निर्मिती आहे. त्यात अंतःस्फूर्तीचा भाग अजिबात नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

'महाराष्ट्र भाषा चित्र मयूर' अशी पदवी संपादन करणाऱ्या कृष्णाजी नारायण आठल्ये (१८५२–१९२७) यांची पद्यपुष्पांजलीतील कविता त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीची साक्ष पटविणारी आहे.

सुखदुःख, उन्नती, अधोगती, स्वातंत्र्य, पारतंत्र्य ही चक्रनेमिक्रमाने येतात, तो निसर्गनियम आहे हे सांगताना कवी म्हणतो,

" घरा फिरुनि ये बरा दिवस मागुती यामिनी
वसंत ऋतु, संपता उठति मेघ सौदामिनी
..... तसेच कधि राष्ट्र ही व्यसन सागरी सापडे
प्रयत्न करता तशात ही सुयंत्र फासा पडे ॥ २ ॥"

कृष्णाजी आठल्यांनी भारताच्या राष्ट्रीय जीवनातील एका महत्त्वपूर्ण घटनेचा उल्लेख केलेला आहे. ती घटना म्हणजे आधुनिक भारताचे राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी यांची, ब्रिटीश पार्लमेंट-मध्ये भारतीय जनतेचे प्रतिनिधी म्हणून झालेली नियुक्ती. या नियुक्तीचा कवीला अतिशय आनंद झालेला आहे. कवी लिहितो,

" झाला आनंद देशी सकल बुधवरा वाटले पर्व मोठे,
.....दादा धन्य तुम्ही स्वदेश–चरिती कीर्तिध्वजा लावली !
केली आर्यजनास कल्पतरुची बैसावया सावली
होऊनी उपकारबद्ध दुरुनी जोडोनिया अंजली !
प्रेमे कोकिल अर्पितो सविनये ही पद्यपुष्पांजलि "

कृष्णाजी आठल्यांनी 'भीमकर्मा राघोबा' या नावाचे काव्य लिहून १७६१ मधील पानिपताच्या पराभवाचे मोठे हृदयद्रावक वर्णन करून पूर्वजस्मृतीचा परिचय करून दिलेला आहे.

कृष्णाजी आठल्यांप्रमाणेच मोरो गणेश लोंढे (१८५४–१९२०) यांनी 'बोधसुधा', 'बोधशतक', 'बोधमाला'[१४] या नावांनी ओळखली जाणारी कविता लिहिलेली असून त्यातून राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशा गुणांचे विवेचन केलेले आहे. लोंढ्यांप्रमाणेच एकनाथ गणेश भांडारे (१८६३–१९१६) यांच्या काव्यातूनही राष्ट्रीय वृत्तीचा परिचय होतो. 'राष्ट्रसभा' 'कीर्ति मंदिर' 'आर्य मातेचा शोक' अशासारख्या कवितांतून भांडाऱ्यांनी आपल्या राष्ट्रीय भावनेचा परिचय दिलेला आहे. स्वदेश जननीवर प्राणपणाने प्रेम करणारे सर्वोच्च असा चतुर्थ पुरुषार्थ संपादन करतात असे त्यांनी सांगितले आहे. ते लिहितात,

" ज्यांची स्वदेश जननीवर भक्ति फार
तन्मंगला निशिदिनी झटली अपार
सत्कीर्तिची प्रिय असे भगिनी गिरा ती
ज्यांची असे चिर तदुन्नति थोर भक्ती" ॥ १५ ॥

'आर्य मातेचा शोक' या कवितेत भांडारे यांनी पूर्वजांच्या स्मृतीचे मोठे नाटचमय चित्रण केलेले आहे. पूर्वीचे पराक्रमी, वैभवसंपन्न, उत्तमोत्तम गुणांनी युक्त माझे पुत्र आज दिसत नाहीत हे सांगताना 'आर्यमाता' म्हणते,

" सिंहासदृश शूर धीट मम ते सत्पुत्र गेले कुठे ?
ज्यांना पाहुनि पारणे सकल या नेत्रद्वयांचे फिटे ।
गेले होऊनि सर्व ते अति बली देशाभिमानी खरे ।
काळाच्या जबडचात तेहि पडता आता न कोणी उरे "[१५] ॥ ११ ॥

गंगाधर रामचंद्र मोगरे (१८५७–१९१५)

भांडाऱ्यांप्रमाणेच काव्यनिर्मिती मोगऱ्यांनी केलेली आहे. मोगरे पुनरुज्जीवनवादी वृत्तीचे आहेत. महाकवी बाणाच्या 'कादंबरी'चे 'अभिनव कादंबरी' हे आर्यावृद्ध काव्य आणि वृंदा ही काव्ये त्यांच्या या वृत्तीची द्योतक आहेत. दीर्घ काव्याप्रमाणेच स्फुट काव्यलेखनही मोगऱ्यांनी केलेले आहे. त्यांच्या 'सह्याद्रि', 'शिकंदराची स्वारी' या कवितांतून देशाभिमानाची भावना उत्कटतेने व्यक्त झालेली आहे. देशाभिमानाच्या जोडीलाच अतिरेकी वाटावा असा मातृभाषाभिमानही मोगऱ्यांच्या कवितेचा विशेष आहे. जन्मभूमी, जन्मदात्री आणि जन्मभाषा यांच्याबद्दलचा अभिमान राष्ट्रीय वृत्तीचे अविभाज्य अंग आहे. भाषेला आणि भूमीला आम्ही माता म्हणूनच ओळखतो. जन्म देणाऱ्या मातेपेक्षाही कवीला मातृभाषा श्रेष्ठ वाटते.

"माता तशी स्वभाषा सेवाया होय आपणा उचित
किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित ॥"

कारण सांगताना कवी म्हणतो,

"दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ
मातेशिवाय जन्महि जाय न भाषेशिवाय एक पळ ॥"

मातृभाषेबद्दलचा अभिमान व्यक्त करणाऱ्या तुरळक कविता या कालखंडात आढळतात. त्यात मोगऱ्यांचे स्थान सर्व श्रेष्ठ आहे.

वामन दाजी ओक (१८४५–१८९७)

मोगऱ्यांप्रमाणेच वामन दाजी ओकांनी दीर्घ आणि स्फुट काव्यनिर्मिती केलेली असून 'कादंबरी-सार', 'कृष्णाकुमारी', 'श्री. मन्माधवनिधन', 'गणपती निधन' या कवितांतून स्पष्ट होते. पूर्वजस्मृतीचे दर्शन या काव्यातूनही घडते. 'राजे लोकास दोन हिताचे शब्द' सांगताना ओक म्हणतात; दीनांचे रक्षण करा ! गृहकलह सोडा ! कारण तोच राज्य बुडविणारा शत्रु आहे,

"म्हणुनी कथितो त्याते टाका, यश मिळवा महा ।"[२६]

'महाराष्ट्र कवी' या नावाने सुपरिचित पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी (१८५६–) हे आंग्ल उच्च विद्याविभूषित एफ्. आर. जी, एस. जे. पी. रावबहादूर आदि पदव्यांनी सुशोभित, इतिहास-संशोधक, गॅझेटिअरचे संपादक, अनेक सभासंमेलनांचे पदाधिकारी म्हणूनही विद्वद्जनांत त्यांचा लौकिक होता. संस्कृत आणि मराठी भाषेवर इंग्रजीप्रमाणेच त्यांचे प्रभुत्व होते. परंतु त्यांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे या अव्वल इंग्रजीच्या काळातील ते एक 'महाराष्ट्र कवी' होते. राष्ट्रीय कविता असे सार्थ अर्थाने जिला नाव देता येईल अशी कविता पूर्वजस्मृतिकाळात पु. बा. जोशी यांनीच लिहिलेली आहे.

वीरविभूतिपूजन, पूर्व वैभवाचे स्मरण, देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रीयबाणा, स्वसंस्कृती अभिमान या सर्व विशेषांनी युक्त अशी पु. बा. जोशी यांची कविता आहे. 'समाधि शतावली', 'राजे प्रतापवंत विठ्ठलसुंदर', 'परिषदाभिनंदन', 'परिषद प्रहसन', 'भरतभूमीचे भावी स्वराज्य व तत्प्रीत्यर्थ आंग्लजन व हिंदीजन यास 'विनंती,' भारतस्थ तरुणास विनंती' आणि त्यांचे सुप्रसिद्ध 'भारत वर्षिणी' हे काव्य इत्यादी कविता त्यांच्या राष्ट्रीय कवितेची उदाहरणे म्हणून देता येतील. त्यांचे 'भारत वर्षिणी' हे काव्य तर देशस्थितीवर लिहिलेले असून 'देशाभिमानी' व्हा असा

उपदेशच तरुणांना केलेला आहे. हा उपदेशही 'हिंदमाता' आपल्या पुत्रांना करीत असल्याचे दाखविले आहे.

"समुचित उपाय योजा प्राप्त कराया स्वराज्य निज देशी।
दे मातृभूमिसेवा पुण्य तसे दे न पंढरी, काशी ॥
उत्तम उपाय म्हणजे दहन करावे अनिष्ट भेदांचे ॥
राष्ट्रैक्यास विघातक भेदच रिपु भारती स्वराज्याचे ॥"

"परिषदाभिनंदन" या कवितेत साहित्यिकांना अभिवादन करताना कवी प्रथम स्वातंत्र्याचाच उल्लेख करतो.

"स्वातंत्र्य ज्यांस अमृतासम गोड भासे
देशाभिमानरवि यद्हृदयी प्रकाशे ॥"

याच कवितेत भारतीय स्त्रियांच्या वैधव्याचे, भारतीयांच्या अज्ञानाचे आणि दारिद्र्याचे कवीने विवेचन केलेले आहे.

जातीयवादाचे पोषण करण्याचे कार्य या देशातील जातीय परिषदांनी केलेले असून अशा परिषदा ह्या राष्ट्रीय एकतेच्या मार्गातील जबरदस्त अडथळे आहेत. त्यासाठी स्वजातिहितापेक्षा स्वदेशहितभावनांचा परिपोष करण्याचे कार्य राष्ट्रहिताचे आहे असे सांगून त्यांनी त्या संदर्भात अत्यंत कळकळीने विचार मांडलेले आहेत. कवी म्हणतात,

"स्वजाति हित भावना जर दुणावली सज्जनी।
स्वदेशहित कल्पना मग न वाढ घे तन्मनी ॥"

मातृभूमीबद्दलची उत्कट भक्तिभावना व्यक्त करताना कवी म्हणतात,

"जळो। वाणी वर्णी जननमहिते जी न वदनी
जळो। तद–सद्विद्या प्रियतम न ज्याते स्वजननी"

छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी म्हणजे आमच्या त्यांच्याविषयीच्या श्रद्धेचे प्रतीक, तिचा भंग झालेला पाहून कवीच्या अंत:करणाला अतीव वेदना झाल्या. ज्याने राष्ट्र निर्माण केले, स्वराज्य आणि स्वातंत्र्य उपभोगायला दिले त्याच्या समाधीची अशी उपेक्षा व्हावी याचीच खंत कवीच्या मनास लागते. तो म्हणतो,

"महाराष्ट्री ज्याने निजजन–सुसत्ता बसविली
अम्हा स्वातंत्र्याची अभिरुचि जयाने कळविली
नृपाची त्या भग्ना शिव ! शिव ! समाधी निरखिता
मराठ्यांच्या चित्ती नुपजत कशी ही विषमता ?"

'राजे प्रतापवंत विठ्ठल सुंदर' या पेशवाईतील साडे–तीन शहाण्यांपैकी एका लढवय्या सरदाराची व थोर मुत्सद्याची कथा सांगताना कवी म्हणतो,

"भारतवर्षी कितितरी असली हल्ली खुशामती स्वजनीं
दास्य प्रियतम ज्यांते परक्यांच्या लागतात जे भजनीं"

' भारतभूमी भावी स्वराज्य ' या कवितेत कवी देशातील जाणत्या लोकांना विचारतो,

" परवश काय रहावें दास बनावे सदैव आर्यांनी
स्वामित्व आदरावे भारतभूमीत गौरकायांनी ?"
" स्वातंत्र्य ही सुधा जरि आंग्लांपुरतेच काय ते अमृत ?
भारतजनप्रसंगी होते स्वातंत्र्य काय विषयुक्त ? ।।"

कवींची सर्व भिस्त तरुणांवर आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय विकास तरुणांवरच अवलंबून आहे हे सांगताना ' भारतस्थ तरुणांस विनंती ' या प्रदीर्घ कवितेत कवी म्हणतो,

" भावी राष्ट्रोन्नतीची आशा तरुणांवरी असे सारी
भारत भाग्य रवीच्या उदयाला योग्य तेच सहकारी ।।
..... भारत भक्त परायण दिसता निःस्वार्थ निश्चयी तरुण
भारत भाग्य रवीचा उदया पावेल भारती अरुण ।।"

लोकजागृती आणि लोकशिक्षण याकरिता देशभक्तीने प्रेरित होऊन कवीने ही गीते लिहिली आहेत. आपल्या देशात ऐक्य निर्माण व्हावे, देश स्वतंत्र व्हावा, त्याचा सर्वांगीण विकास व्हावा या हेतूनेच हे लिखाण झालेले आहे. कवीलाही या गोष्टीची जाणीव आहे. आपण केलेले उद्‌बोधन कदाचित काही लोकांना रुचणार नाही अशांना उद्देशून नम्रपणे कवी म्हणतो,

.... माझी ही प्रणती करून विनती आहे स्वबंधूंप्रती
देशाची प्रगती हवी तरि वरा राष्ट्रैक्यता संप्रती ।।"

समारोप-न्यून गंडाचा प्रभाव

आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा पहिला कालखंड इ. स. १८५० ते १८७४ हा अभ्यासाच्या सोयीसाठी निश्चित केलेला होता आणि एकूण प्रवृत्तीसंबंधी अनुमान बांधून त्याला पूर्वजस्मृतिकालखंड असे नाव दिले होते. या कालखंडाची उत्तर मर्यादा १८७४ ही निश्चित केलेली असली तरी यात समाविष्ट करण्यात आलेले अनेक कवी १८७४ नंतरही काव्यनिर्मिती करीत होते आणि काही तर विसाव्या शतकाच्या दोन दशकांनंतरही जीवित होते असे इतिहासावरून म्हणता येते. वस्तुस्थिती अशी आहे की कोणत्याही कालखंडासंबंधी अगदी काटेकोरपणे विभागणी करणे जवळजवळ अशक्य आहे. या ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो असा की, या कालखंडातील प्रवृत्तीला प्राधान्य देण्यात आलेले आहे. सामान्यपणे या कालखंडातील कवींनी आपल्या पराक्रमी पूर्वजांच्या स्मृतीला उजाळा देण्याचे कार्य केले.

डॉ. वा. भा. पाठकांनीही आपल्या ' आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह ' या प्रबंधातून आरंभीच्या राष्ट्रीय कवितेसंबंधी अभिप्राय देताना पुढीलप्रमाणे लिहिले आहे. " इंग्रजी राज्याच्या सुरुवातीस राष्ट्रीय कवितेचे स्वरूप पुष्कळसे परावलंबीच होते. इंग्लंडमधील कवींनी देशाभिमानाने प्रेरित होऊन जी कवने लिहिली त्यांचीच भाषांतरे वा रूपांतरे त्यावेळच्या कवींनी केली..... ..... इंग्रजी अंमलात होऊन गेलेल्या आरंभीच्या मराठी कवींवर या न्यूनगंडाचा परिणाम झाला होता." [१७]

लोक कवींची परंपरा

श्री. वा. भा. पाठकांचा उतारा काही अंशी वस्तुस्थितीचे कथन करणारा आहे. पारतंत्र्याच्या परिस्थितीतून निर्माण झालेला न्यूनगंड हे जसे देशाभिमान नसल्याचे कारण आहे तसेच इंग्रजी साहित्याच्या आणि काव्याच्या अभ्यासामुळे जी नवी वाङ्मयीन दृष्टी आली, जी नवी अभिरुची

निर्माण झाली तिनेही देशाभिमानासारख्या वृत्तीची, राष्ट्रीय भावनांची अवहेलना केली. कविनिष्ठ दृष्टी, आत्मनिष्ठ भावगीतात्मक काव्यनिर्मिती ही पाश्चात्यांच्या समृद्धीच्या काळातील निपज होती. पारतंत्र्याच्या काळात त्यांच्या अभिरुचीचे कलम आमच्या सुशिक्षितांनी केले. सौंदर्याच्या मूल्याला अधिक प्राधान्य मिळाले. आशयापेक्षा अभिव्यक्तीला महत्त्व आले.

वस्तुनिष्ठ अभिव्यक्ती करतानाच आपल्या भावनांची अभिव्यक्ती आपल्या कथानायकाद्वारे करीत होते आणि त्यांचे मूल्यमापन मात्र भावगीतात्मक अभिरुचीच्या निकषावर करण्यात येत होते. प्रा. भ. श्री. पंडितांनी इंग्रजी राजवटीतील परंपरा सांगताना लोक कवींची चवथी परंपरा सांगितली आहे, आणि या परंपरेत समाजसेवकांचा समावेश केलेला आहे. त्यांची भूमिका मांडताना पंडित म्हणतात, "असंख्य देशबांधवांचे दुःख, दैन्य, दास्य व चरित्र पाहून त्यांचे अंतःकरण कळवळत होते. त्यांची पद्यरचना ही त्या कळवळचाचा शाब्दिक आविष्कार आहे. त्यांचे वाङमय हे खरेखरे लोकाभिमुख वाङमय आहे."[२८]

प्रा. पंडित समाजसेवकांना लोककवी समजतात, त्यांची निर्मिती ही अंतःकरणाच्या कळवळचाची समजतात. तिला लोकाभिमुख वाङमय म्हणून गौरवितात याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. देशभक्ती वा समाजसेवा हे एक अग्निदिव्य आहे. हा सतीने करावयाचा अग्निप्रवेश सर्व सामान्यांना जमणे शक्य नाही. याचा अर्थ ज्यांना हे शक्य नाही त्यांनी समाजसेवक वा देशभक्त होऊच नये असा करणे न्यायाचे ठरणार नाही. आपला सांसारिक व्याप, नोकरी आणि व्यवसाय सांभाळूनही त्यांनी व्यक्त केलेली आपली स्वदेशप्रीती, समाजबांधवांबद्दलची कळकळ, त्यांच्या सुधारणेसाठी केलेली अभिव्यक्तीदेखील लोककवीच्याच मोलाची आहे असे म्हटले पाहिजे. नुसती राष्ट्रीय कर्तव्यासंबंधीची जाणीवही बरेच काही करून जाते.

या कालखंडातील पुनरुज्जीवनवादी, संस्कृत काव्यापासून प्रेरणा घेणाऱ्यांची, संस्कृतसाहित्यावर आधारित रचना करणाऱ्यांची कविता ही अशीच बोधवादी आहे. प्राचीन सांस्कृतिक नीतिमूल्ये त्यांनी या काव्यातून मांडलेली आहेत ती एका अर्थाने अस्मिता जागृत करणारीच आहेत. कवी हंस, परशुरामपंत तात्या गोडबोले, दप्तरदार, राजा सर टी. माधवराव, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कुरुंदवाडकर, पाळंदे, पारखी, चिंतामणी, पेठेकर यांनी हे कार्य या कालखंडात केलेले आहे. परंपरेचा वीर-विभूति-पूजनाचा, इतिहासाचा, देशाचा अभिमान हादेखील राष्ट्रीय अस्मितेचाच भाग आहे. हे कार्य या कालखंडात कुंटे, लेले, कानिटकर, खरे, आठल्ये, मोगरे, लोंढे, भांडारे, ओक आणि पु. बा. जोशी या कवींनी बजावले आहे.

लोककवी असा ज्यांचा गौरवपूर्ण उल्लेख प्रा. भ. श्री. पंडितांनी केलेला आहे ते दादोबा, पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग, लक्ष्मणशास्त्री हळबे, विष्णुबुवा ब्रह्मचारी, महात्मा ज्योतिराव फुले, विष्णुशास्त्री पंडित, बेरड, माटे, माडगावकर नित्सुरे हे सर्व लोककवी समाजसुधारक होते.

इंग्रजी काव्यापासून अनेकांनी प्रेरणा घेतली हे मान्य केले तरी इंग्रजीचे अनुवाद करण्याचे कार्य प्रामुख्याने ज्या कवींनी अव्वल इंग्रजीच्या काळात केले त्यांनी इंग्रजांच्या राष्ट्रप्रेमाचे आणि स्वातंत्र्य प्रेमाचे स्तुतिस्तोत्र गाणारी गीते मराठीत अनुवादित केली नाहीत. त्यांनी एक तर कथाकाव्ये निवडली किंवा भावगीतात्मक रचनांचा अनुवादासाठी स्वीकार केला. त्यात वि. को. ओक, प्रधान महाजनी, कीर्तिकर, खांडेकर, लेंभे हे कवी प्रमुख होते.

ऽऽ

राष्ट्रीय जागृतीचा कालखंड इ. स. १८७४ ते १९०५

पार्श्वभूमी– राष्ट्रवादाची गीता सांगणाऱ्या विष्णूचा अवतार

आधुनिक कवितेला राष्ट्रीयत्वाचे भान आणण्याचे कार्य पहिल्या पूर्वज स्मृतिकालखंडाने केले. जेथे काहीच उगवण्याची आशा नव्हती तेथे जलवृष्टी होताच अंकुर दिसले. नवी प्रेरणा, नवा उत्साह निर्माण झाला, असे या पहिल्या कालखंडाच्या स्वरूपासंबंधी म्हणता येते. या नव्याने निर्माण झालेल्या उन्मेषांना वाढविण्याचे, फुलविण्याचे, क्रियाशीलतेत परिवर्तित करून जोमदारपणाने डोलविण्याचे कार्य एका महापुरुषाने केले. आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान उद्दामपणाने आविष्कृत करण्याचे, प्रचंड जनजागरणाचे क्रांतिकारक कार्य ज्या तेजस्वी महापुरुषाने केले त्याचे नाव विष्णुशास्त्री चिपळूणकर.

राजकीयदृष्ट्या पराभूत झालेल्या, आत्मग्लानीच्या विकाराने ग्रासलेल्या, या देशातील नव्या आंग्लशिक्षितांना समाजपुरुषात सारे दोषच दिसत होते. अनुकरणीय, आदर्श, समाजधारणेला उपयुक्त, पोषक असे काही पूर्वसंचित या देशातील लोकांजवळ आहे असे वाटतच नव्हते. राज्यकर्त्यांच्या तुलनेत आपण मागासलेले, ज्ञानविज्ञान, शास्त्र, कला यांचा परिचय नसणारे, अज्ञानी, अशिक्षित, स्वाभिमानशून्य, भयगंडाने आणि न्यूनगंडाने पछाडलेले, जुन्या बुरसटलेल्या चालीरीतींना धर्म समजणारे, समाजरचनेच्या कालबाह्य चौकटीला चिकटून राहणारे दूधखुळे असाच सूज्ञांना साक्षात्कार होत होता. या आत्मद्रोही, स्वत्वशून्य मरगळलेल्या मनोवृत्तीचे मलिन सावटच सर्वत्र दिसून येत होते. ज्यांच्या ठिकाणी थोडाफार जोम होता त्यांचा आवाज फारसा ऐकूच जात नव्हता. अशा प्रतिकूल परिस्थितीत चिपळूणकरांच्या तेजस्वी निबंधमालेचा उदय झाला. आपल्या लेखणीच्या अचूक वर्मी भिडणाऱ्या धारदार आघातांनी हे 'बहुता दिसांचे मातलेले बंड' या मराठीच्या शिवाजीने कणखरपणाने मोडून काढले.

कर्तृत्ववान देशभक्तांचा निर्माता

उत्कट राष्ट्रीय जाणिवेने पेटून बौद्धिक आणि भावोत्कट तळमळीने लेखन करणारा त्यांच्या बरोबरीचा एकही लेखक त्या काळी महाराष्ट्रात नव्हता. राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झालेला, या भूमीतील मातीच्या कणाकणांशी नाते जोडून तिच्या श्रेष्ठत्वाचे गुणसंकीर्तन करणारा बृहस्पती मराठीत दुसरा कुणीच नव्हता. स्वदेश, स्वातंत्र्य, स्वधर्म आणि स्वभाषा या चतुर्विध अस्मितेच्या मंत्रांनी तेजस्वी बनविलेली अमोघ अस्त्रे त्यांनी संपादन केलेली होती. वक्तृत्वाने संपन्न अशी ओजस्वी ओघवती वाणी, तिच्या सुप्त प्रवाहात दडलेली उपरोध, उपहास, वक्रोक्ती विडंबनादी

जलचरे, वैऱ्याच्या काळजाचा ठाव घेणारी शास्त्र, तर्क, युक्तिवाद, ऐतिहासिक उदाहरणे आणि विविध दृष्टांतांनी तीक्ष्ण झालेली धारदार शस्त्रे चिपळूणकरांच्या शैलीने सज्ज केलेली होती. अशा सर्व प्रभावी सरंजामानिशी चिपळूणकर विरोधकांवर तुटून पडले होते आणि या सांस्कृतिक मोहिमेत त्यांनी अभूतपूर्व विजय संपादन केला होता. कर्तृत्ववान, स्वाभिमानी, देशभक्त अशी विद्वानांची, बुद्धिवंतांची, साहित्यिकांची, कलावंतांची, उद्योजकांची आणि समाजधुरीणांची नवी पिढी निर्माण करण्याचे कार्य या विष्णूने केले. हे कार्यही केवळ वयाच्या वत्तिसाव्या वर्षी पूर्ण करून त्यांचा अवतार संपला.

अस्मितादर्श राष्ट्रवादाचे स्फूर्तिदायक तत्त्वज्ञान, राष्ट्रीय शिक्षण संस्था, राष्ट्रीय वृत्तपत्रे; तेजस्वी मराठी निबंध वाङ्मय, आधुनिक टीकात्मक वाङ्मय, चरित्र वाङ्मय, प्राचीन इतिहासाचे व साहित्याचे संशोधन, मराठीभाषाविकास, अशा विविध क्षेत्रांत नव्याने भक्कम पायाभरणीचे कार्य महाराष्ट्राच्या या महाविष्णूने केलेले आहे. चिपळूणकरांपासून प्रेरणा घेऊन, त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन देशसेवा, समाजसेवा, इतिहाससंशोधन, विज्ञानसंशोधन, शास्त्रज्ञ, निबंधकार, कादंबरीकार, नाटककार, कवी, कलाकार, खेळाडू आणि चित्रकार अशी विविध क्षेत्रांत कर्तबगारी गाजविणारी एक संपूर्ण पिढीच उदयाला आली. तृतीय कविसंमेलनप्रसंगी केलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी चिपळूणकरांसंबंधी दिलेला पुढील अभिप्राय मार्मिक आहे. ते म्हणतात, " विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेच्याद्वारे सतत सात वर्षे स्वाभिमानाचे बीजारोपण केल्यावर हा आत्मविश्वास परत येऊ लागला व अभिनव कल्पनांची काव्ये निर्माण करण्यास समर्थ अशी कवींची मनोभूमी तयार होऊ लागली. यानंतर लवकरच केशवसुतांची कविता प्रगट झाली. ! "

आधुनिक मराठी कवीचे कुलगुरु केशवसुत (१८६६–१९०५)

या कालखंडातील पहिले श्रेष्ठ कवी म्हणजे केशवसुत. आधुनिक मराठी कवितेच्या जनकत्वाचा ज्येष्ठ मान आधुनिक मराठीच्या भाष्यकारांनी त्यांना दिला असून कवी कुलगुरु म्हणूनही टीकाकारांनी मुक्तकंठाने गौरव केलेला आहे. केशवसुत उपाख्य कृष्णाजी केशव दामले मूळचे रत्नागिरीकडचे. प्राथमिक शिक्षण कोकणातच आटोपल्यानंतर ते पुण्याच्या सुप्रसिद्ध न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये दाखल झाले. शिक्षक म्हणून आगरकर टिळकांचा आणि मित्र म्हणून हरिभाऊ आपटे, वा. ब. पटवर्धन यांच्यासारख्या मित्रांचा सहवास त्यांना लाभला. पुणे शहरातील तेव्हाच्या राष्ट्रीय चळवळींच्या वातावरणाचे, विशेषत: न्या. रानडयांच्या उदारमतवादाचे आणि आगरकरांच्या सुधारणावादी विचारसरणीचे गाढ संस्कार केशवसुतांच्या मनावर व काव्यावर झालेले स्पष्टपणे दिसतात. शालान्त परीक्षेनंतर काही वर्षे किरकोळ नोकऱ्या करून शेवटी केशवसुत शिक्षणाच्या क्षेत्रात शिरले व ते अखेरपर्यंत त्याच क्षेत्रात होते. १९०५ साली हुबळी येथे वयाच्या अवघ्या एकोणचाळिसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. केशवसुतांची मनोवृत्ती अत्यंत संवेदनशील आणि आत्मकेंद्रित अशी होती. त्यामुळे त्यांनी आत्मनिष्ठ कवितांची प्राधान्याने निर्मिती केली. केशवसुत आत्मतृप्त आणि आत्मकेंद्रित असले तरी युगधर्मापासून मुक्त राहू शकत नव्हते. राष्ट्रात आणि आजूबाजूच्या समाजात आढळणारी सुखदुःखे त्यांच्या संवेदनशील अंत:करणाला स्पर्शून गेली. त्यातून त्यांच्या राष्ट्रीय आणि सामाजिक आशयाच्या कवितांची निर्मिती झाली. इ. स. १८८५ पासून १९०५ पर्यंत म्हणजे सुमारे वीस वर्षे त्यांनी केवळ काव्यलेखन केले. त्यांच्या स्वतंत्र, भाषांतरित आणि रूपांतरित अशा कवितांची संख्या सुमारे १३२ आहे.

राष्ट्रीय कविता आणि इलियटचा सिद्धान्त

सुप्रसिद्ध पाश्चात्य महाकवी जॉर्ज इलियट म्हणतो की, " राष्ट्रीय कविता ही खऱ्या अर्थाने लोककविता असते. लोकांच्या सुखदुःखाचे, त्यांच्या जीवनाचे यथातथ्य प्रतिबिंब तिच्यात पडलेले असते. अशी कविता लोकवाणीपासून जीवनस्फूर्ती घेते आणि उलट तिलाही जीवनस्फूर्ती देते. त्याचप्रमाणे लोककविता ही तिच्या जाणिवेचा अत्युच्च विंदू, तिची श्रेष्ठ शक्ती आणि अतिशय नाजूक संवेदनक्षमता प्रदर्शित करते." त्याचे मूळ शब्द पुढीलप्रमाणे आहेत. " The poetry of people takes its life from the people's speech and in turn gives life to it, and represents its highest point of consciousness, its greatest power and its most delicate sensibility." [२]

लोककविता किंवा राष्ट्रीय कवितेचे स्वरूप असे परस्परसापेक्ष, परस्परपोषक आणि परस्परावलंबी आहे. तिचा जनजीवनाशी अतिशय जिव्हाळ्याचा संबंध आहे. ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, " एकंदर समाजाच्या राष्ट्रीय भावना जी उद्दीपित करू शकेल, तीच खरी राष्ट्रीय कविता." [३] या सर्व पार्श्वभूमीवर आता केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितांचा अभ्यास करावयाचा आहे.

केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितांची सामाजिक व राजकीय पृष्ठभूमी

प्रारंभी टिळक आगरकरांनी चिपळूणकरांचे अनुयायित्व स्वीकारलेले असले तरी पुढे त्यांच्यात वैचारिक मतभेद होऊन दोघांचेही मार्ग काही बाबतीत भिन्न झाले. या सामाजिक, राजकीय पृष्ठभूमीसंबंधी टीकाकारांत फारसे दुमत दिसत नाही. या दोन्ही धारा राष्ट्रीयत्वाशी निगडित आहेत, हे देखील विसरता येत नाही. प्रत्यक्षात तिचे स्वरूप काय आहे हे केशवसुतांच्या कवितांच्या आधारे पाहू या !

केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितांची ओळख

राष्ट्रीय भावनांचे स्पष्ट, स्वच्छ आणि स्वतंत्र प्रतिबिंब ज्या कवितांतून पडलेले आढळते अशा केशवसुतांच्या मोजक्याच कविता आहेत. केशवसुतांची पहिली कविता १८८५ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतरच्या वर्षी 'एका भारतीयांचे उद्‌गार, आणि 'जयाजी शिंदे व तुकोजी होळकर' या दोन राष्ट्रीय कविता त्यांनी लिहिल्या आहेत. 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' (१८८७), ' गोष्टी घराकडील मी वदता गडचारे ' (१८८७), 'आगबोटीच्या काठाशी ..... एका तरुणीस' (१८८७), अशा तीन कविता आहेत. ' रा. रा. बळवंत अप्पाजी दाते यास ' (१८८९), ' दोन बाजी ' (१८९५) आणि ' कवितेचे प्रयोजन ' अशा तीन कविता आढळतात. शेवटच्या कवितेचा काल दिलेला नाही पण ती सुमारे १९०० च्या सुमारास लिहिली असली पाहिजे, असा अभ्यासकांचा तर्क आहे. तेव्हा सामान्यपणे आठ कवितांतून केशवसुतांच्या अंतःकरणातील राष्ट्रीय भावनांचे दर्शन घडते.

' एका भारतीयाचे उद्‌गार '

ही खरीखुरी राष्ट्रीय कविता आहे. कारण देशाच्या पारतंत्र्याविषयीची तीव्र जाणीव आणि त्याचबरोबर स्वातंत्र्याची उत्कट लालसा या कवितेतून केशवसुतांनी व्यक्त केलेली आहे. या कवितेतील सूचकताही महत्त्वाची आहे. मावळतीला दिसणारी कांती पाहून कवीला पाश्चात्यांच्या ऐश्वर्याची जशी जाणीव होते तसेच आपला वैभवाचा दिवस मावळल्याची खंतही त्यांच्या मनाला पोखरीत

असल्याचे दिसते. पारतंत्र्य माणसाला आंधळे आणि बहिरे बनविते. पारतंत्र्याचे दुःख व्यक्त करताना केशवसुत म्हणतात,

" आनंदाचे समयि मजला पारतंत्र्य स्मरून
वाटे जैसे असुख, तितुके अन्य वेळी गमे न !
पाहोनीया विष जरि गमे उग्रसे पाहूनी ते !
अन्नामध्ये शतपट गमे उग्रसे पाहूनी ते !"

पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वतंत्र झालेला आमचा देश राष्ट्रीय पदवीला केव्हा पोहचेल याचाच ध्यास कवीला लागला आहे. कवी कळवळून परमेश्वराला विचारतो,

" देवा ! केव्हा परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ?
केव्हा आम्ही सुटूनि सहसा पंजरातूनि देवा !
राष्ट्रत्वाला फिरूनि अमुचा देश येईल केव्हा ?"

' गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून '

या कवितेतील केशवसुतांचे कविमित्र म्हणजे सुप्रसिद्ध कवी रे. टिळक हेच असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. देशासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या मित्राची स्मृती या कवितेत आहे. बंधनाचे सनातन तत्त्वज्ञानही कवीने या कवितेत सांगितले आहे. देशाची शोचनीय स्थिती हाच त्या मित्रांच्या चर्चेचा विषय आहे. कवी म्हणतो,

" देशाविषयी गोष्टी बोलत येथे
बसलो, विसरुनि कितीकदा निद्रेते,
श्वासीं अमुचे – श्वास मिळाले तेव्हा
अश्रूंमध्ये अश्रु गळाले तेव्हा !"

' बळवंत आपाजी दाते '

ही कविता म्हणजे कवीच्या देशभक्त मित्रावर त्याने रचलेली एक स्फुटविलापिका आहे. दाते यांचे राष्ट्रप्रेम, वक्तृत्व आणि त्यांनी तरुणांना केलेले आवाहन, त्यांच्या अंतःकरणातील राष्ट्रभावना व्यक्त करणारे आहे.

" हे आम्ही उटलो ! चला तर पुढे ! देशार्थ कार्यी मरू "

अशा पंक्तींनी नाट्य निर्माण करण्यात केशवसुत यशस्वी झाले आहेत. " गोष्टी घराकडिल मी वदता गडघारे ! ही कविता एक सुंदर स्मृतिचित्र आहे. त्यात आपल्या धाकटया बंधूकडून केलेली देशभक्तीची अपेक्षा एवढाच तीत राष्ट्रीय आशय आहे. कवि म्हणतो,

" बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तू देशकारण करू झटशील काय ?
बापू ! जनात दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्य देव मनसा भजशील काय ?"

राष्ट्रभावनांची अभिव्यक्ती करणारे एक दोन श्लोक 'आगबोटीच्या काठाशी समुद्राच्या शोभेकडे पाहत उभ्या असलेल्या एका तरुणीस' या कवितेत आलेले आहेत. 'कुणाला गुलाम करण्याचे कार्य आक्रमकांनी केल्यास आपण त्यांची जहाजे बुडवून टाकू' असे नायक नायिकेला सांगतो.

पूर्व वैभवाचे स्मरण आणि वीर विभूतिपूजन करून देणाऱ्या जयाजीराव शिंदे व तुकोजीराव होळकर' आणि 'दोन बाजी' या कविता आहेत. पहिलीत दोन संस्थानिकांना वाहिलेली श्रद्धांजली आहे. दुसरीत पहिल्या आणि शेवटच्या बाजीरावाची तुलना आलेली असून विरोधाने त्यातील आशय उत्कट झालेला आहे. 'कवितेचे प्रयोजन' ही कविता कवीचे राष्ट्रीय कर्तव्य कथन करणारी आहे. कवीदेखील राष्ट्र कार्य करू शकतो. कविता, "गाण्याने कवीचा प्रभाव तुमची वर्धिष्णुता घेईल.

स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यास पुढच्या साक्षी कवी होइल !
..... प्रेते ही उठवील जी निजरवे, ती तो तुतारी करी,
आता नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?
..... आशा प्रेम तसेच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल
गेले वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल !"

सामाजिक क्रांतीचा आशय सांगणाऱ्या केशवसुतांच्या कविता

'तुतारी', 'स्फूर्ती', 'नवा शिपाई', 'उत्तेजनाचे शब्द', 'गोफण केली छान' या सामाजिक क्रांतीचा आशय सांगणाऱ्या मानवतावादी आणि उदारमतवादी तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कवितांना 'राष्ट्रीय कविता' म्हणून स्थान दिले पाहिजे असे काही टीकाकारांचे मत आहे.

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "राष्ट्रीय कवितेची भूमिका पुष्कळच व्यापक झालेली आहे. केवळ पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत त्वेष व स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा एवढेच तिचे आज मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध ती आता बंड पुकारू लागली आहे आणि कृत्रिम भेदातीत अशा समतेचा आणि मानवतावादाचा पुरस्कार करण्यात ती उदंड उत्साह दाखवू लागली आहे."[४]

अशाच आशयाचे विचार डॉ. वा. भा. पाठक यांनीही मांडलेले आहेत. श्री. न. चिं. केळकर म्हणतात, "केशवसुतांचे 'तुतारी' हे जोरदार कवन राष्ट्रीय कवितेचा उगम धरायला हरकत नाही. हे कवन विशेषतः सामाजिक स्थितीवर असून त्यातील विचार नवीन व बाणेदार आहेत."[५] प्रा. रा. श्री. जोगांनी केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितांची चर्चा करून 'विनायक, सावरकर, गोविंद, तिवारी' ही अर्वाचीन राष्ट्रीय कवींची परंपरा सांगितली आहे आणि राष्ट्रीय कविता इतरांनीही समृद्ध केल्यासंबंधीचे आपले मत नोंदविले आहे.

राष्ट्रीय कवी म्हणून केशवसुतांचे मूल्यमापन

केशवसुतांचे एक साक्षेपी टीकाकार प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'समग्र केशवसुत' या ग्रंथात केशवसुतांच्या कवितांचा विचार करताना मोठे मार्मिक विधान केलेले आहे. ते म्हणतात, "केशवसुतांच्या कवितेत आरंभी आरंभी राष्ट्रभक्तीचे सूर आहेत परंतु पुढे पुढे निःस्तब्ध वातावरणात ते विरले आहेत...[६] केशवसुतांनी पुणे सोडल्यानंतर राष्ट्रीय कवितेला हात लावला नाही." प्रा. भ. श्री. पंडितांचे हे विधान वस्तुनिष्ठ निरीक्षणावर व सत्यावर आधारलेले आहे असे वाटते. कारण याच

वातावरणात कवी विनायक राष्ट्रीय काव्य लिहीत होते पण केशवसुत मात्र त्यापासून परावृत्त झालेले होते. त्यांची पहिली स्वदेशप्रेमाची ऊर्मीच पूर्ण लोपली होती असे म्हणावे लागते.

'केशवसुत स्मृती ग्रंथात' 'केशवसुतांचे क्रांतिकारकत्व' या नावाचा लेख प्रा. म. ना. अदवंतांनी लिहिला आहे. केशवसुतांच्या कवितेच्या मर्यादा सांगताना ते म्हणतात, "केशवसुत हे आगरकरांप्रमाणेच प्रगतिशील वृत्तीचे होते हे खरे असले तरी तेवढ्यावरून आगरकरांच्या एकंदर लिखाणात जो सर्वांगीण सर्वस्पर्शी क्रांतिवाद मांडलेला आढळून येतो त्याचे केशवसुतांच्या कवितेत दर्शन होते असे म्हणता येत नाही."[७] प्रा. म. ना. अदवंतांच्या या उताऱ्यात केशवसुतांच्या क्रांतिकारकत्वावर झगझगीत प्रकाश टाकलेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, राष्ट्रीय भावनेचे उष्ण वारे केशवसुतांच्या प्रकृतीला सोसणारे नसण्याची शक्यता आहे. आगरकर आणि केशवसुत यांच्यातील अंतर मुळात परिस्थितिजन्य नव्हते तर ते मनोवृत्तिजन्य होते. त्यामुळे त्यांना ओजस्वी राष्ट्रीय कवितांची निर्मिती करता आली नाही असे म्हणणे भाग पडते.

श्री. माडखोलकरांचा परखड अभिप्राय

केशवसुतांसंबंधी श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांचा अभिप्रायही मोठा बोलका आणि परखड आहे. ते म्हणतात, "ते देशाभिमानी होते यात शंका नाही पण दुर्दैव, प्रमाथी प्रणयविकाराने त्यांचे जीवन आणि काव्य इतके ग्रासून टाकले होते की, खग्रास ग्रहणाच्या वेळी चंद्राच्या सुंदर बिंबाच्या ठिकाणी जसे त्याचे रक्तकमल वर्तुल तेवढे दिसावे तशी त्यांच्या देशाभिमानाची अवस्था झालेली आहे... स्वातंत्र्य आणि समता यांचा पुरस्कार केलेला आहे खरा परंतु बव्हंशी तो स्त्रीविशिष्ट आहे."[८] प्रस्तुत उतारा केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितांवर प्रकाश टाकणारा आहे. केशवसुतांकडेच आधुनिक मराठीच्या कवी कुलगुरुचे श्रेष्ठ पद आले व त्यांचे संप्रदाय आणि शिष्यपरंपराही अस्तित्वात आली. त्यामुळे पुढच्या काव्याचे स्वरूपही बरेच ठरीव साच्याचे झाले.

रे. नारायण वामन टिळक (१८६२–१९१९)

वयाने केशवसुतांपेक्षा चार वर्षांनी वडील, केशवसुतांचे समकालीन कवी आणि मित्र, प्रासादिक काव्यरचना करणारे प्रथितयश कवी म्हणून रे. ना. वा. टिळक महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. धर्मशीलवृत्तीचे, गृहजीवनाचा गोडवा गाणारे, प्रेमरूपी ईश्वराची उपासना करणारे आणि फुलामुलांकरिता कविता लिहिण्यात उत्साह दाखविणारे म्हणूनही ते गौरविले गेले आहेत. एका अर्थाने ही सारी त्यांच्या कवितांची वैशिष्ट्येच आहेत. केशवसुतांप्रमाणेच रे. टिळकही ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यापूर्वी चिपळूणकरांनी प्रवर्तित केलेल्या अस्मितादर्श राष्ट्रवादाच्या जागरणाच्या वातावरणातच वावरत होते. 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' ही केशवसुतांची राष्ट्रीय कविता टिळकांना उद्देशूनच लिहिलेली आहे. यावरून रे. टिळकांच्या ठिकाणी राष्ट्रभक्तीचा उत्कट संचार झालेला होता. ज्या काळात केशवसुतांच्या मनात धर्मांतराचे विचार येत होते त्याच काळात रे. टिळकांचे मन ख्रिस्ती धर्मचिंतन करीत होते. पुढे केशवसुत सावरले आणि रे. टिळकांनी मात्र धैर्याने पत्नी लक्ष्मीबाईंसह धर्मांतर केले. दीक्षित झाल्यानंतर या कवी पतिपत्नींनी काव्यावरोवरच 'ख्रिस्ती भक्तिगीते, ख्रिस्तपर अभंग आणि ख्रिस्तायन' हे महाकाव्य धर्मनिष्ठेने आणि धर्मप्रचाराच्या हेतूने लिहिलेले आहे. रे. टिळकांचे वैशिष्ट्य असे की ते जसे कवी म्हणून विख्यात होते तसेच उत्तम वक्ते, कीर्तनकार, नट, शिक्षक, धर्मोपदेशक आणि गद्यलेखक म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांनी कथा आणि

नाटके लिहिली. त्यांची 'यशवंतराव महाराज', 'देवीचा प्रसाद', 'गणपतिस्तव', 'वनवासी फूल', 'बापाचे अश्रू', 'सुशीला', 'स्फुटकविता', सुबोधगीता, अभंगावली, गणपतिमेळ्याची पदे, गोरक्षणावरील पदे, उपासनेचे अभंग, इत्यादी विविध प्रकारची काव्यरचना प्रसिद्ध आहे.

रे. टिळकांची द्विविध निष्ठा

रे. टिळकांनी निर्माण केलेल्या गद्य आणि काव्यवाङ्मयाचे विषय लक्षात घेतले म्हणजे त्यांच्या अंत:करणात तरुण वयात, राष्ट्रीय भावनांचा कल्लोळ उसळलेला होता असे म्हणता येते. 'आनंदराव अर्थात स्वदेशी पाश', 'गोविमोचन', 'गणपतिमेळ्यातील पदे, 'विरकन्या' ' या रचना सहज पुराव्यादाखल म्हणून सांगता येतील. धर्मांतरापूर्वी त्यांनी नागपूर येथे केलेले 'ऋषी' मासिकाचे संपादनही त्यांच्या सनातनी व राष्ट्रीय वृत्तीवर प्रकाश टाकणारे आहे. मुख्य म्हणजे केशवसुतांच्या तुलनेत उत्कृष्ट अशी राष्ट्रीय गीते रे. टिळकांनी रचलेली असून तो त्यांच्या उत्कट देशभक्तीचा पुरावा आहे. धर्मांतरानंतर मात्र रे. टिळक काही प्रमाणात राजनिष्ठ आणि बऱ्याच प्रमाणात ख्रिस्तनिष्ठ झाले. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर नव्हे अथवा संस्कृतिपरिवर्तन नव्हे असे काही कवितांमधून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला तरीही त्यांची निष्ठा द्विधा झालेली असल्याचे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

रे. टिळकांच्या काही प्रमुख राष्ट्रीय कवितांची ओळख

केशवसुतांप्रमाणेच काही मोजक्या पण प्रभावी कवितांतून रे. टिळकांनी आपल्या राष्ट्रभक्तीचा परिचय दिला आहे. 'माझ्या जन्मभूमीचे नाव', 'स्वदेशभक्ती', 'माझ्या जन्मभूमीस', 'प्रियकर हिंदीस्तान', 'ब्राह्मण किंवा महार', 'खरे पुढारी', 'सखी स्वतंत्रते' आणि काही 'फुट अभंग' इत्यादींचा त्यात समावेश करता येईल. रे. टिळकांच्या एकूण काव्यसंभारात या कवितांची संख्या अक्षरश: बोटावर मोजण्यासारखीच आहे. परंतु केशवसुतांचा आणि कवी विनायकांचा अपवाद सोडला तर रे. टिळकच अधिक राष्ट्रीय वृत्तीचे आढळतील. इतर बहुतेक कवींची राष्ट्रीय भावना प्राधान्याने पातळच असल्याचे दिसून येईल. मातृभूमीबद्दलचे उत्कट प्रेम व्यक्त करणारी, 'माझ्या जन्मभूमीचे नाव' ही कविता अगदी शंभर नंबरी राष्ट्रीय कविता आहे. 'सामर्थ्य नामी तुझ्या आर्यभूमी तसे पाहिले मी न कोठे तरी' या मातृभूमीविषयीच्या उत्कट अभिमानाने ओथंबणाऱ्या अंतिम चरणाने त्यांनी वारंवार आपल्या अंत:करणातील मातृभूमीबद्दलचा पूज्यभाव प्रकट केला आहे. भारतमातेच्या भौतिक, अभौतिक अशा संपन्नतेची आणि सौंदर्याची पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही देशाशी तुलना होऊ शकत नाही असे कवीने वारंवार सांगितले आहे. कवी म्हणतो,

"तू कामधेनू ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला !
या वैभवाला तुझ्या पाहुनीया मला स्फूर्ति नृत्यार्थ होते जरी"

वीर विभूतिपूजनाची उत्कट भावना ही रे. टिळकांनी या कवितेतून व्यक्त केली आहे.

"माते ! महात्मे तुझे तत्त्ववेत्ते, तुझे शूर योद्धे तुझे सत्कवी !
श्रेणी तयांची सदा माझिया गे मना पूजनी आपुल्या वाकवी !
त्यांची यशें ज्या नव्या सद्गुणांना मला अर्पिती ध्येय ते गे जरी !
सामर्थ्य नामी तुझ्या आर्यभूमी असे पाहिले मी न कोठे तरी !"

कवीने भारतीय सारस्वताला महासागराची दिलेली भव्य उपमा आणि स्वतः त्या महासागरातला एक लहानसा 'मीन' समजण्याची कल्पना त्यांच्या नम्र आणि विनयाची द्योतक आहे. 'आई ! गुरुस्थान अंती जगाचे' असा भूमातेसंबंधीचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि शेवटी तिच्याबद्दलची अपार कृतज्ञता व्यक्त करून कवीने हे मातृभूमीचे स्तोत्र संपविले आहे.

'प्रियकर हिंदीस्थान' या कवितेचा आशयही वरील कवितेसारखाच आहे. उपमान देण्याला एकही देश योग्य नाही असा एकमेवाद्वितीय आपला देश असल्याचे कवीने सांगितले आहे. राष्ट्रीय ऐक्याचा पुरस्कार करणारी 'ब्राह्मण किंवा महार' या शीर्षकाची रे. टिळकांची कविता विचारांनी नावीन्यपूर्ण आहे. केशवसुतांच्या नव्या शिपायाचा त्वेष अथवा आवेश तीत नाही किंवा त्यांच्या कवितेसारखे विश्वप्रीतीचे, प्रेषिताचे आवाहनही तीत नाही. तिथे आहे केवळ धर्मशीलतेतून विकसित झालेली कृतज्ञतेची, विनम्रतेची, सेवाभावाने आणि भूतदयेने, बंधुप्रेमाने ओसंडून वाहणारी राष्ट्रीय भावना. या भूमीचे पुत्र सारेच माझे बांधव आहेत, बंधुत्व हाच त्यांच्या आणि माझ्यातील अखंड दुवा आहे असे कवीने प्रतिपादन केलेले आहे. कवी म्हणतो,

"हिंदभूमि माझी जननी आले हीच्या कुशींतुनी
हिरेच अवघे माझे ते; मन्मन त्या मोहून जाते,
मलात पडले, खनीत दडले, मुकुटी जडले
अवघे उचलून घेईन मी, जन्मभूमी सेवाधर्मी !"

'माझ्या जन्मभूमीस' या अप्रकाशित कवितेतून जन्मभूमीबद्दलचे उत्कट प्रेम आणि तिच्या कामी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी कवीने व्यक्त केलेली आहे. हे जन्मभूमी तुझी आणि माझी ताटातूट करण्याचे सामर्थ्य प्रत्यक्ष काळाच्या ठिकाणी देखील नाही आणि या जन्मी ताटातूट झालीच तर पुढल्या जन्मी मी तुझ्याच उदरी आल्याशिवाय राहणार नाही असा आत्मविश्वास कवीने व्यक्त केला आहे. रे. टिळक म्हणतात,

"तुजसाठी मी खाईन कोंडा, पांघरीन चिंध्या माते
वैभव किंवा सुख जे म्हणती, मिळवीन मी मातीते...
...खरे करिन मी जन्मुन माझे तुझे जन्मभूमी नाते
घडो एवढे हेच याचितो अनन्य भावे देवातें !"

'स्वदेशभक्ती' ही टिळकांची एक वैशिष्टचपूर्ण कविता आहे. "तुम्ही आता ख्रिस्ती झाला तरी पूर्वीसारखीच तुमची देशभक्ती कायम राहील काय ?" या प्रश्नाचे उत्तर रे. टिळकांनी या कवितेत आपल्या देशबांधवांना देऊन आश्वासित केलेले आहे. ते सांगतात,

"ख्रिस्त यशोरत झालो तरि मी सोडि न जन्मधरेला !
प्राण प्रियतर दुजे न माझे साच तुम्हाहुन भाऊ
एकभूमिची सर्व लेकरे आपण कोठे जाऊ ?"

स्वातंत्र्याशिवाय सर्व जग शून्य आहे असा आशय सांगणारी 'सखी स्वतंत्रते !' ही रे. टिळकांची कविताही महत्त्वाची आहे. 'आधुनिक कवी पंचकात' टिळकांच्या राष्ट्रीय कवितेसंबंधी ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, 'टिळक ख्रिस्ती होते परंतु महाराष्ट्रीय होते. मराठी मनाची आवडनिवड; मराठी हाडाचे गुण हे जितके केशवसुत विनायकांच्या कवितेत उतरले आहेत तितकेच टिळकांच्याही

कवितेत उतरले आहेत."[९] म्हणूनच भारतबाह्यनिष्ठा बाळगणाऱ्या आपल्या ख्रिस्ती बांधवांना त्यांनी रोकडा सवाल विचारला आहे आणि खडसावले आहे,

" बांधारे गाठोडी व्हारे चालते । जया नावडते हिन्दभूमी
हात जोडितो मी प्रेमावीण कोणी । नका ख्रिस्त वाणी खोटी करू ।"

'खरे पुढारी' ही देखील रे. टिळकांची वैशिष्ट्यपूर्ण कविता आहे. पाऊणशे वर्षांपूर्वी पारतंत्र्याच्या काळात देखील निःस्पृह, बाणेदार, त्यागी, कुशल संघटक अशा सत्याग्रही पुढाऱ्यांची उणीव लोकांना भासत होती हे या कवितेतून प्रगट झालेले आहे. भारतमाता करुणाघन परमेश्वराची प्रार्थना करीत आहे अशा नाट्यपूर्ण पद्धतीने हे गीत रचलेले आहे.

" खरे पुढारी कधी जन्मती हिन्द
म्हणे ईश्वरा–
सांगरे बापा करुणाकरा !
वीर्यवंत नर उदार हृदये, सत्व धीर जे खरे
मनाने सिद्ध वाणीने करे !"

'लोकमित्र !' अशी एक कविता आहे. त्या कवितेतून जनसेवा हीच ईश्वरसेवा अशी उदात्त भूमिका कवीने मांडलेली आहे.

" जनसेवा ही ईश्वर सेवा । याविण दुसरा हेतु न ठावा
प्रेम आणखी देव दिसावा एक सदा ज्याते "

'खरे जाणतो मीच माझे बल', 'बोंबाबोंब', 'माझी चिलीम' या कवितांतून ही राष्ट्रभावनांची अभिव्यक्ती झालेली आहे. 'माझे बळ' मध्ये कवीने आपल्या आध्यात्मिक बळाचा साक्षात्कार घडविला आहे. 'बोंबाबोंब' हे गीत 'तुतारी' ची स्मृती करून देणारे आहे. आशावाद, मातृभूमीवरील प्रेमही या कवितांतून व्यक्त झालेले आहे.

" मी मर्त्य, मी मृत्युला जिंकणारा ! जगीं धूळ, मी दिव्यता उज्ज्वल
बोला हवे ते, मला काय त्याचे ! पुरे जाणतो मीच माझे बल !

रे. टिळकांच्या शंभर टक्के राष्ट्रीय वृत्तीची साक्ष

राज्यकर्त्यांच्या ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूनही रे. टिळकांची देशभक्ती व राष्ट्रनिष्ठा केशवसुतांपेक्षा अधिक जाणवते. म्हणूनच डॉ. वा. भा. पाठक म्हणतात, " रे. टिळकांच्या धर्मांतरामुळे त्यांच्या उत्कट राष्ट्रीय भावनांचे महत्त्व केव्हाही कमी होत नाही."[१०] प्रा. भ. श्री. पंडितांचा अभिप्रायही काहीसा तसाच आहे. ते म्हणतात, " टिळकांनी धर्मांतर केलेले होते हे खरे पण त्यांना आपल्या मातृभूमीचा, साधुसंतांचा आणि साहित्याचा विलक्षण अभिमान होता." दुसऱ्या एका ठिकाणी पंडित सांगतात, " टिळकांच्या शंभर टक्के राष्ट्रीय वृत्तीची साक्ष देण्यास 'माझ्या जन्मभूमीचे नाव' ही त्यांची एकच भावनिर्मल कविता पुरे आहे. हे दोन्ही अभिप्राय अतिशय बोलके असून टिळकांच्या रांष्ट्रीयत्वाचा पुरावा ठरणारे आहेत. परंतु रे. टिळकांना दुरभिमानी म्हणणारेही आहेत, कारण 'प्रियकर हिंदीस्तान' या देशभक्तीपर कवितेतच,

" प्रिय जन्मभूमि, तूं ख्रिस्त रूप हो, सोड गडे अभिमान "

अशा पंक्ती आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे 'ख्रिस्तायन' या ओवीबद्ध महाकाव्यातील कवीच्या आत्मनिवेदनात्मक पुढील ओव्या अधिक बोलक्या आहेत."

" हिंदुभूमी ख्रिस्ताधीन । कधी नयनी मी पाहीन
निदिध्यास रात्रंदिन । करी मन्मन हा वापा ।।६४।।"

ही दोन्ही अवतरणे रे. टिळकांच्या द्विविध निष्ठेचा पुरावा म्हणून सांगता येण्यासारखी आहेत. खरोखरच रे. टिळकांना अंतःकरणापासून असे वाटत असेल तर ते त्यांच्या शंभर टक्के राष्ट्रभक्तीला उणेपणा आणणारे आहे. माडखोलकर म्हणतात, " खरोखरी, ख्रिस्तीधर्माविषयीच्या दुरभिमानामुळे टिळकांचा देशाभिमान हा किती संकुचित आणि विकृत होऊन गेलेला होता याची पुरेपूर जाणीव हा अध्याय वाचल्यावर मनाला होते."[११] प्रा. म. वि. राजाध्यक्षांना हे अभिप्राय मान्य नाहीत. ते म्हणतात, " केशवसुतांप्रमाणेच टिळकांच्या देशाभिमानासंबंधी ही शंका घेतली आहे. विशेषतः त्यांच्या राजनिष्ठेच्या कवनामुळे तिला बळकटी प्राप्त होते. रानड्यांसारख्या देशभक्तातही ती दिसते. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासातील त्या पहिल्या पायरीवर ती आज वाटते तेवढी विरळ नाही. तिच्या आणि टिळकांच्या धर्माच्या आधारावर पारतंत्र्याचे प्रेम त्यांना चिकटविणे अन्यायाचे होईल." [१२]

श्री. माडखोलकरांनी टिळकांचा देशाभिमान संकुचित व विकृत होऊन गेला होता असे विधान केलेले आहे. टिळकांनी जाणीवपूर्वक सनातन हिंदुधर्माचा त्याग करून परधर्माचा स्वीकार केला होता आणि नव्याने परधर्माचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीला त्या धर्माचा अभिमान अर्थातच उत्कटत्वाने वहावा लागतो, अधिक कडवेपणा धारण करावा लागतो आणि रे. टिळक नुसते दीक्षित नाहीत ते ख्रिस्ती धर्माचे प्रचारकही होते व त्या प्रचाराच्या हेतूने ते कीर्तन, भजन, पुराण या लोकप्रिय हिंदुपद्धतींचा उपयोगही करीत असत. म्हणून त्यांचा पूर्वीचा धर्माभिमान आणि राष्ट्राभिमान शबल झाला तर आश्चर्य नाही. हे सर्व मान्य करूनही केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेच्या तुलनेत त्यांच्या राष्ट्रीय कविता अनेक दृष्टीने सरस व उत्कट आहेत.

रे. टिळकांच्या राष्ट्रीय कवितेचे ठळक विशेष

एखादा वाचक जेव्हा एखादी कविता वाचतो तेव्हा त्या कवितेतील भावनांचा त्याच्यावर प्रभाव पडतो. त्याला कवीची जीवनदृष्टी त्या काव्यातूनच आढळते. आपल्या अंतःकरणातील विशिष्ट भावनांचा उत्कट आविष्कार काव्यातून आढळतो किंवा नाही हेच बघायचे असते. काव्यात देशभक्ती काव्यमय रीतीनेच प्रकट झालेली आहे किंवा नाही एवढेच बघायचे असते. या निकषावर रे. टिळकांची राष्ट्रीय गीते श्रेष्ठ ठरणारी आहेत. केशवसुतांप्रमाणेच त्यांना पारतंत्र्याबद्दल खंत आहे. मातृभूमीसाठी, स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याची सिद्धता आहे. सर्व भारतीयांना बंधुप्रेमाने एकत्र आणण्याची, त्यांना संघटित करण्याची कळकळ आहे. श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्च, नीच, स्पृश्यास्पृश्य असा भेदभाव विसरून सर्वांना अंतःकरणाशी कवटाळण्याची तळमळ आहे. भारतीय परंपरेचा, भारतीय वैभवाचा, पराक्रमाचा आणि सांस्कृतिक संचिताचाही त्यांना पराकोटीचा अभिमान आहे. आपल्या मातृभूमीच्या ठिकाणी रे. टिळकांना झालेला दैवी सामर्थ्याचा साक्षात्कार विलोभनीय आहे. प्रत्यक्ष कृती न करता नुसत्या 'बोंबा' ठोकणाऱ्यावर त्यांनी ताशेरे झाडलेले आहेत. ध्येयनिष्ठ, निःस्पृह, त्यागी, सत्यवादी पुढारी निर्माण होऊन त्यांनी देशाला मार्गदर्शन करावे अशी आपली अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या भूमीवर ज्यांचे प्रेम नाही, निष्ठा नाही त्यांनी या भूमीचा त्याग करावा असा निर्वाणीचा इशाराही त्यांनी दिला आहे. भावना, कल्पना आणि शब्दयोजना यांचे

संयोजन उत्तम प्रकारे त्यांच्या राष्ट्रीय गीतांतून झालेले आहे. राष्ट्रीय भावनांचा उत्कट आविष्कार करणारी रे. टिळकांची कविता राष्ट्रीय नाही असे कोण म्हणेल ?

राजकवी चंद्रशेखर (१८७१-१९३७)

चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे हे मूळचे नाशिकचे, परंतु त्यांचे बरेचशे आयुष्य बडोदे संस्थानात गेले. वयाने चन्द्रशेखर माधवानुज, विनायक, तांबे कविप्रभृतींच्या बरोबरीचे होते. परंतु या कवींवर जसे इंग्रजी काव्याचे कमी अधिक संस्कार झालेले आढळतात तसे चन्द्रशेखरांवर आढळत नाहीत. तसा इंग्रजी काव्याशी चन्द्रशेखरांचा चांगलाच परिचय होता आणि काही इंग्रजी कवितांचे त्यांनी अनुवादही केलेले आहेत. तरीही त्यांचा पिंड प्राचीन भारतीय अभिजात साहित्यावरच पोसलेला असल्याचे दिसून येते. म्हणून त्यांच्या काव्याचे वळणही जुन्या अभिजात पंडिती काव्याचे वाटते. व्यक्तिस्वातंत्र्य, आत्मनिष्ठा, यथार्थता इत्यादींच्या गोंडस नावाखाली केवळ स्वतःच्या सुखदुःखांना, वासनाविकारांना कुरवाळीत बसणे, त्यांचा उघडा नागडा आविष्कार करणे त्यांना असंस्कृतपणाचे वाटत असे.

कवी चन्द्रशेखरांचा पिंड प्राधान्याने वैचारिक कवींचा असल्याचे दिसते. त्यांच्या कवितेत भावनांनाही स्थान असले तरी त्या भावनेचे रूपांतर ते चिंतनात करीत असतात. नवविचारप्रवर्तनाकडे त्यांची प्रवृत्ती नाही तर सर्वसामान्य उपयुक्त असे रूढ विचार समजावून सांगण्याचीच त्यांची प्रवृत्ती आहे. टीकाकारांची प्रासंगिकता हा त्यांच्या कवितेचा एक विशेष सांगितला आहे. त्यांचा अभिजात वाङ्मयाकडे असलेला कल लक्षात घेऊनच प्रा. रा. श्री. जोगांनी त्यांच्यासंबंधी पुढील अभिप्राय दिलेला आहे. ते लिहितात, " अर्वाचीन कवितेच्या जमान्यात जुन्या पद्धतीने काव्य लिहिणाऱ्या सर्व कवींत त्यांचे स्थान पहिले होते आणि निरपेक्षपणे प्रस्तुत काळातील समग्र काव्याचा विचार केला तरीही ते बरेच वरचे व स्वतंत्र आहे यात संदेह नाही." [१३] कवी चन्द्रशेखरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केशवसुत तांब्यांसारखे ते काव्यदेवतेचे एकनिष्ठ उपासक होते. उत्कृष्ट प्रकारचे काव्य हे समाधी अवस्थेतून निर्माण होते अशी त्यांची श्रद्धा होती.

चंद्रशेखरांची कविता

चन्द्रशेखरांनी स्फुट कवितेबरोबरच ' काय हो चमत्कार !', ' उघड गुपित ', ' किस्मतपुरचा जमीनदार ', 'रंगराव हर्षे ', ' चिन्तोपंत उदास ', ' गोदागौरव ', ' सोमनाथ ' (अपूर्ण), 'खडर्याची लढाई' इत्यादी कथाकाव्येही लिहिलेली आहेत. त्यातली काही विनोदप्रचुर आहेत. चन्द्रशेखरांचे नाव सर्वतोमुखी झाले ते त्यांच्या 'काय हो चमत्कार !' या अप्रतिम अद्भुत कथाकाव्यामुळे. बहुसर्गात्मक 'सोमनाथ' हे ऐतिहासिक आणि अद्भुत रम्य काव्य लिहायला त्यांनी प्रारंभ केला होता. त्याचे काही सर्ग लिहूनही झालेले होते पण ते शेवटी अपूर्ण राहिले आणि मराठी वाचक एका अभिजात ऐतिहासिक महाकाव्याला मुकला. ' खडर्याची लढाई ' हे चन्द्रशेखरांचे ऐतिहासिक खंडकाव्य अमुद्रित स्वरूपात आहे इतर सर्व व्याप सांभाळून स्वयंस्फूर्तीने सावकाश या काव्यांची ते निर्मिती करीत होते पण त्याला अपूर्ण सोडून चन्द्रशेखरांना जावे लागले. या खंडकाव्याव्यतिरिक्त ' आद्य शंकराचार्य ', 'स्वामी विवेकानन्द,' ' स्वामी रामतीर्थ ' या महापुरुषांच्या काव्याचे सुबोध अनुवाद चन्द्रशेखरांनी केलेले असून त्यांना राष्ट्रीय कवितांच्या सदरात स्वीकारले पाहिजे.

चन्द्रशेखरांच्या ज्या कवितांचा निखळ राष्ट्रीय कविता म्हणून उल्लेख करता येईल अशा, ' स्वदेश प्रीती ', ' इतिहास ', 'माधवनिधन ', ' कविता रति ', ' हिन्दवंदना ', ' महाराष्ट्र दर्शन ',

'इंद्राचे स्तोत्र', 'गोदागौरव', 'सोमनाथ' आणि 'खर्ड्याची लढाई' या कविता आहेत. रसोत्कट काव्यनिर्मिती करणाऱ्या कवीबद्दल त्यांना केवळ प्रेमच नव्हते तर परम आदर होता. एका कवितेत ते म्हणतात,

"स्वकृतिने परि जो जन भारती। सजवितो जणु की दुसरी रती,
त्यजुनि अन्य विचार तयास मी। कवि म्हणोनि सदा शिरसा नमीं ॥"

राष्ट्रीय कविता असो अथवा सामाजिक कविता असो अखेर तिचे अभिव्यक्तीचे माध्यम शब्द हेच आहे. हे माध्यम अंतरिक्षासारखे निःसीम असल्यामुळे तिला अमुक एक असा विषय वर्ज्य नाही. त्यामुळे तिच्या विषयांना मर्यादाच घालता येत नाही असे त्यांचे प्रतिपादन आहे. ते म्हणतात,

"शब्द ब्रह्मचि अंतरिक्ष सम ते सीमा तयाला नसे
जागो जाग विलास त्यातूनि तुझा नाना परी होतसे ॥"

केशवसुतांनी ज्याप्रमाणे 'कवितेचे प्रयोजन' सांगून कवीची राष्ट्रीय जीवनातील उपयुक्तता सिद्ध केलेली आहे तशीच 'कविसंदेश' या कवितेतून चंद्रशेखरांनीही प्रकट केलेली आहे. चंद्रशेखर सांगतात,

"ज्या काव्याने लोकी तुडुंबुनी स्वाभिमान राहील,
ज्या काव्याने त्यांच्या देही देशाभिमान वाहील;...
...ज्या काव्याने मोठे मोठे प्रतिबंध तेहि फोडून
ती संघशक्ती घो घो वाहे सीमा स्वकीय सोडून ॥" (–कवि संदेश)

चंद्रशेखरांनी राष्ट्रीय कवितेचे प्रयोजनच या ठिकाणी मोठ्या मार्मिकपणे आणि सूचकतेने सांगितले आहे. स्वाभिमानाची निर्मिती, राष्ट्राभिमानाचे पोषण, संघशक्तिप्रपात आणि राष्ट्रीय ऐक्य या सर्व घटकांचे पोषण करणारी कविता चंद्रशेखरांना राष्ट्रीय कविता म्हणून अभिप्रेत आहे. कवी खराखुरा राष्ट्रमित्र असतो हे कीर्ती आणि प्रीती, या कवितेतून चंद्रशेखरांनी सांगितले आहे. चंद्रशेखर सांगतात,

"बहुजनांचिये जीवनैक तो। बहुमनांचिये दर्पनैक तो
प्रकृत वस्तुचे शब्द चित्र ही। कवि बलाढ्यसा राष्ट्रमित्रही ॥"

खरा राष्ट्रीय कवी बहुजन समाजाच्या जीवनाशी एकरूप होतो. त्यांची सुखदुःखे त्यांच्या आशा आकांक्षा तो काव्यातून व्यक्त करतो. त्या बहुमनांचे स्वच्छ प्रतिबिंब त्याच्या काव्यातून दर्पणात रूप दिसावे तसे दिसते म्हणूनच कवी समर्थ असा राष्ट्रमित्र आहे. "लोकांची कविता ही लोकवाणीपासून जीवनस्फूर्ती घेते आणि उलट तिलाही जीवनस्फूर्ती देते." इलियटने लोककवितेसंबंधीचा सांगितलेला सिद्धांतच चंद्रशेखरांनी वेगळ्या स्वरूपात मांडलेला आहे असे वाटते. आदर्श राष्ट्रीय कवीचा नमुनाच चंद्रशेखरांनी सादर केलेला आहे.

राष्ट्रभक्तीचा आविष्कार चंद्रशेखरांच्या अनेक कवितांतून झालेला दिसून येतो. कवीने युगधर्माला पाठ फिरवू नये, त्याने आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव विसरू नये हे समजावून देण्यासाठीच 'इतिहास' हे सुप्रसिद्ध नाट्यगीत लिहिले असून ते अद्भुतरम्य आहे. १८९६ मध्ये लिहिलेल्या या कवितेत व्यक्तिस्वातंत्र्य, आत्मनिष्ठा यांच्या नावाखाली समाजात बोकाळलेल्या स्वैराचाराला आणि स्त्रैणतेला जबरदस्त तडाखा दिला आहे. इतिहासपुरुष तरुण कवींना म्हणतो,

"म्हणुनि स्त्रैण रसाचा वाहे ज्या माजी पूर त्या कविता,
संगीत नाटकेही जळोत, कादंबऱ्या मुला आता।
रे ! तरुण देशबांधव झाले ना शक्तिहीन तव सारे
वाचून पुस्तके ही ? तूं ही धरितोस मार्ग तो कारे ?...

त्यापेक्षा ऐतिहासिक पराक्रमी पुरुषांची चरित्रे तू वर्णन कर.

"घे ही पूर्ण चरित्रे वीररसाने उचंबळो आली
ह्यांच्या सुकाव्य माला स्वदेश हितचिंतकास तूं घाली" (– इतिहास)

स्वातंत्र्याचा नि राष्ट्रप्रेमाचा उमाळा

स्वातंत्र्याचे प्रेमही चंद्रशेखरांनी अतिशय सूचकतेने अनेक कवितांतून प्रकट केलेले आहे. 'इतिहास', 'कवि संदेश', 'कवितेची विलास स्थले' इत्यादी कविता उदाहरण म्हणून सांगता येतील. एका कवितेत चंद्रशेखर सांगतात,

"लोकांच्या दुष्कृतिचा दैन्याचा करिसि जेवि कंटाळा
तैसा स्वातंत्र्याचा प्रेमा निस्सीम बाळगी बाळा।"

'स्वदेश प्रीती' ही उघड उघड अनुवादित कविता असून मूळ कवितेच्या पंक्तीही त्यांनी तिच्या शीर्षस्थानी दिलेल्या आहेत परंतु अनुवादासाठी त्यांनी नेमक्या राष्ट्रीय कवितांची निवड करून आपले राष्ट्रप्रेम व्यक्त केलेले आहे. ही कविता चंद्रशेखरांनी १८९८ मध्ये अनुवादित केलेली आहे. मुळातच 'स्कॉट'चे ते राष्ट्रगीत आहे. चंद्रशेखर म्हणतात,

"जिवंतमृत भूवरी कुणि असेल काहो असा ?
महाकुलकलंक जो सकल मानवांही तसा।
स्वदेश–निज–जन्मभू–कधि न बापुडा जो स्मरे,
मनीहि अथवा न घे कधि तदीय नामाक्षरे।"

मातृभूमीबद्दल प्रेम नसलेला माणूस कितीही विद्वान, वैभवसंपन्न, कीर्तिमान असला तरी तो

"जिता मृतचि तो असे विमल कीर्तिला पारखा
रजामधुनि जन्मला, पुढतिही रजांचा सखा"

असे जळजळीत उद्‌गार कवीने काढले आहेत.

भारतीयत्वाचा म्हणजेच आर्यत्वाचा पराकोटीचा अभिमान चंद्रशेखरांना असून तो त्यांच्या अनेक कवितांतून उत्कटत्वाने व्यक्त झालेला आहे. कवी म्हणतो,

"तृणास जरि येथल्या कुणि अनार्यता लाविली
बसेल हृदयास ह्या तरिहि डागणी तावली
अहो। हृदयशून्य तो पशुहि आर्य देशी नसे
असेच परिसावया धरुनि लालसा मी असे॥" (– हिंदवंदना)

जीवीचा जिवलग महाराष्ट्र

दिवसभर आजीच्या अंगाखांद्यावर खेळणारे मूल आई दिसताच तिच्याकडे जितक्या उत्कटतेने झेपावते तितक्या उत्कटतेने चंद्रशेखर महाराष्ट्र माउलीकडे झेपावलेले दिसतात. चरितार्थासाठी महाराष्ट्रापासून दूर अशा बडोद्यात त्यांना आयुष्य घालवावे लागले. त्यामुळेही असेल परंतु त्यांच्या

महाराष्ट्रावद्दलच्या भावना विलक्षण उत्कट आहेत. स्वत:च्या कुटुंबातील जिवलग व्यक्तींइतकेच किंबहुना त्याहून अधिक प्रेम चंद्रशेखरांनी महाराष्ट्रावर केलेले आहे. महाराष्ट्र हा एक भौगोलिक प्रदेश आहे हे चंद्रशेखर विसरले आहेत. त्यांना महाराष्ट्राचा सजीव मूर्तिमंत साक्षात्कार झालेला आहे. ते म्हणतात,

" सचेतन सुमूर्तिमान मज पुढे महाराष्ट्र हा
द्वितीय मम जीव हा हृदय हा जिव्हाळाचि हा,...
किती दिवस भेटलो नहि मदीय राष्ट्रा ! तुला
खरेच । न विचारिले कुशल ही सुराष्ट्रा ! तुला "

महाराष्ट्र हे महंत राष्ट्र !, महान राष्ट्र ! गुणी जनांचे राष्ट्र ! म्हणून ते सर्वांना वंदनीय आहे हे सांगताना कवी म्हणतो,

" तुझ्यास्तव शरौघही हृदय वज्र साहील हे
परी दुखवलास तूं कुसुम तो न राहील हे !
असे अदय–अंतके–हृदय भेदिले, छेदिले
तरी प्रणय तत्त्व हे तुजसि मी दिले ते दिले "

चंद्रशेखरांच्या ' गोदागौरवात ' ही हीच मातेबद्दलची उत्कटता आहे.

पारतंत्र्यासंबंधी चंद्रशेखरांनीही आपल्या कवितेतून मीमांसा केलेली आहे. ते म्हणतात,

" एकी रुसली दुही धुमसली, अवयव पोटासह लढले,
सुविवेकाचे तुझे बिघडले ' सह्या ' म्हणुनी असे घडले "

' हिंदवंदना ', ' कवितेची विलास स्थले ', 'धनाभिनंदन', 'कुंजकुंजन', 'वसंत माधव' या कवितांतून मातृभूमीबद्दलची उत्कट भक्ती प्रकट झालेली आहे. तशी ' हिन्द वन्दना ' ही कविता ' महाराष्ट्र दर्शन' या कवितेसारखीच प्रासंगिक कविता आहे. १९१२ मध्ये करमणुकीचा दिल्ली दरबार विशेषांक निघाला. त्याकरिता चंद्रशेखरांनी ती कविता लिहिली असली तरी तिच्यातील भारत मातेसंबंधीच्या कवीच्या भावना जिवंत आणि शाश्वत आहेत. कवी म्हणतो,

" अये भुवनसुंदरी ! दिससि गे जशी जानकी "

हे सौंदर्याचे वर्णन केल्यावर कवी आपली अभिलाषा बोलून दाखवितो. तो म्हणतो,

" तुझ्या उदरि जन्मलो, मज नसे पुन्हा जन्मणे
परं च असले तरी जननि हिंद हो ! मी म्हणे !" [हिन्दवंदना]

' कवितेची विलासस्थले ' या कवितेत अनेक चित्रे कवीने रेखाटली आहेत. त्यातील एक नाट्यपूर्ण चित्र, देशभक्तपुत्राच्या भेटीला येणाऱ्या म्हातारीचे आहे. ती काकुळतीने तुरुंगाधिकाऱ्यास म्हणते,

" पाहू द्या मज, भेटवा कुणि तरी माझी मला वासरें !
सारे थोर, निरपराध, शिणती माझी दशा पाहूनी
देवा ! दे मजला सुखे मरण दे ह्या पारतंत्र्याहुनी !"

म्हातारीच्या रूपाने भारतमाताच आपल्या देशभक्त पुत्रांना भेटायला आल्याचे रूपकात्मक चित्रण कवीने केलेले असून ते उत्कट आहे.

चंद्रशेखरांनी केलेल्या विभूतिपूजनात अनेक राष्ट्रीय महापुरुष आहेत. श्रीकृष्ण, श्रीरामा-सारख्या अवतारी विभूती, शिवाजी महाराज, समर्थ रामदास, थोरले बाजीराव पेशवे, भाऊसाहेब पेशवे, रघुनाथराव दादा या प्राचीन आणि ऐतिहासिक महापुरुषांवरोबरच, न्या. रानडे, लो. टिळक; f ववेकानंद, स्वामी रामतीर्थ, भगिनी निवेदिता, महात्मा गांधी इत्यादी आधुनिक स्त्री-पुरुष नेते; मंडळी आहे. एक राष्ट्रीय नेता विशाल जनसागराला लढ्याचे आवाहन करताना म्हणतो,

" खेळे रक्त नसानसात अमुच्या ह्या हिंद मातेतले,
गीतेचे अमृता समान घुटके आम्ही सदा घेतले,
जर्यानी पटका अजिक्य भगवा झेंडा स्मरा हो स्मरा !
नेता छत्रपती, स्वराज्य जनिता, राजा शिवाजी स्मरा !"

पंचवटी व तपोवन पाहिल्यावर श्रीरामाचे, श्री हनुमंताचे कवीला स्मरण होते. 'गोदागौरवा 'तील टाकळीचे दर्शन होताच कवीला समर्थ रामदास आणि त्यांची शिकवण आठवते. 'ओढे' या कवितेत सरदार रंगरावाचे स्मरण आहे. शांती अहिंसेच्या सत्याग्रही मार्गाने लढा देणाऱ्या गांधीजींचा चंद्रशेखरांनी धर्मवीर म्हणून गौरव केलेला आहे. इंग्रजी शासनाची अत्याचाराची वृत्ती कथन करताना उपहासाने कवी म्हणतो–

" जेथे वीर बलाढ्य शस्त्रधर ते निःशस्त्र बंधूवरी
क्रूर श्वापदसे तुटोनि पडती, की वन्य मारेकरी ॥"

'माधवनिधन' ही चन्द्रशेखरांनी न्या. रानडे यांच्या दुःखद निधनावर लिहिलेली भावोत्कट विलापिका आहे. आणखीही उदाहरणे देण्यासारखी आहेत. पण विस्तारभयास्तव ती देणे योग्य ठरणारे नाही.

चंद्रशेखरांसंबंधी टीकाकारांचे अभिप्राय

'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायाने चन्द्रशेखरांसंबंधी टीकाकारांचे अभिप्राय परस्पर विसंगत आहेत. प्रा. रा. श्री. जोग चन्द्रशेखरांच्या संपूर्ण कवितेसंबंधी म्हणतात, " अपूर्व वस्तुनिर्मिती करण्याचे सामर्थ्य चन्द्रशेखरांच्या प्रतिभेत नसले, तरी दुसरीकडून विषय मिळाल्यास सजावट करून तो रसिकांपुढे ठेवण्याचे कसब त्यांच्या अंगी भरपूर होते." [१४] हे सर्वच अभिप्राय त्यांच्या सर्वसामान्य काव्यासंबंधी स्थूलमानाने आहेत. प्रा. भ. श्री. पंडितांनी मात्र चन्द्रशेखरांच्या निष्ठांसंबंधी मोठे मार्मिक विधान केलेले आहे. ते म्हणतात, " त्यांच्या कवितासंग्रहात ईशनिष्ठा, 'देशनिष्ठा', राजनिष्ठा, प्रीतिनिष्ठा, बांधवनिष्ठा इत्यादी निष्ठांचे मोठे विलोभनीय दर्शन घडते." [१५] प्रा. पंडितांनी सांगितलेल्या भिन्न भिन्न निष्ठा एकाच राष्ट्रनिष्ठेत सामावणाऱ्या आहेत. कारण चन्द्रशेखर खऱ्या अर्थाने राष्ट्रकवी आहेत.

चन्द्रशेखरांची पृथगात्मता

श्रेष्ठ अशा राष्ट्रीय कवीला साजेसे गुण चन्द्रशेखरांच्या सौजन्यशील राष्ट्रवादी व्यक्तिमत्त्वात होते. दुर्दैवाने आयुष्यभर त्यांना कारकुनी करावी लागली तरी त्यांची आंतरिक ओढ प्रेमाचीच होती. 'जरी आर्यमाय खाटिक करातून मुक्त करणे' अशी राज्यकर्त्यांसाठी कठोर भाषा राष्ट्रभक्तीशिवाय मुखातून बाहेर पडत नाही. क्रांतिकारकांचे आणि राष्ट्रभक्तांचे गुणगान त्यांनी काव्यातून केलेले आहे. चन्द्रशेखर विनायकासारखेच अस्मितादर्श राष्ट्रवादाने प्रभावित झालेले कवी आहेत. आपली उत्कट देशभक्ती त्यांनी काव्यमय रीतीनेच व्यक्त केलेली आहे. चन्द्रशेखरांच्या काव्यगुणासंबंधाने

सर्व टीकाकारांत एकमत आहे. राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती करण्यात त्यांच्या कवितेने आपल्या सौम्य प्रकृतीप्रमाणेच उत्साह दाखविला आहे.

कवी माधवानुज (१८७२–१९१६)

माधवानुज उपाख्य काशिनाथ हरी मोडक हे चंद्रशेखरांच्या समकालीन कवी. मोडकांचे मूळ घराणे पडघवलीचे. माधवानुज हे शरीरप्रकृतीने नाजूक असले तरी व्यवसायाने मात्र डॉक्टर होते. शिक्षणासाठी घर सोडून अनेक वर्षे नातेवाइकांकडे राहावे लागल्यामुळे वृत्तीने जबाबदार आणि प्रकृतीने गंभीर झाले असल्याल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ' सुख आणि शांती ' सारखी तत्त्व-चिंतनात्मक ग्रंथनिर्मिती करणाऱ्या आणि तशीच काव्यनिर्मिती करणाऱ्या वडील बंधू माधवराव मोडकांचे त्यांच्या संवेदनशील मनावर नक्कीच संस्कार झाले असले पाहिजेत. किंबहुना त्यांच्याकडूनच काव्याद्वारे लोकजागृतीचा आणि लोकशिक्षणाचा तसाच बोधवादाचा वारसा त्यांनी स्वीकारला असावा. कारण वडील बंधूंचे हे सांस्कृतिक ऋण त्यांनी त्यांचे नाव धारण करून विनम्रपणे फेडलेले दिसते. वास्तविक माणसाची खरी अस्मिता त्याच्या नावातच असते, परंतु आपले काशिनाथ हे नाव बाजूला सारून ' माधवानुज ' हे नाव धारण करण्यात कवीने पर्यायाने त्यांचा बौद्धिक वारसा मान्य केलेला आहे.

ध्येयाच्या मार्गाने चालणारा समर्थ साधक असे माधवानुजांचे सार्थ वर्णन करावे लागेल. माधवानुजांचे त्यांच्या समकालीन असलेल्या केशवसुत, रे. टिळक, हरिभाऊ आपटे प्रभृतींशी स्नेहाचे संबंध होते आणि हे संबंधही त्यांच्या काव्यवृत्तीच्या विकासाला पोषक ठरणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. माधवानुज व्यवसायाने डॉक्टर असले तरी त्यांचे वाचन चौफेर होते. मराठी, इंग्रजी, बंगाली आणि संस्कृत या भाषांमधील साहित्याचा त्यांचा चांगलाच व्यासंग होता.

माधवानुज हे ध्येयवादी कवी होते. राष्ट्रभक्ती हा त्यांच्या ध्येयवादाचा विशेष म्हणावा लागेल. ' धन्य कोण ?' या कवितेत ते सांगतात,

" जो अन्यायास्तव आत्मयज्ञ करितो तो धन्य लोकी निका "

या ध्येयनिष्ठेप्रमाणे प्रत्यक्षात जगता येत नाही याची माधवानुजांना खंत वाटत होती. ध्येयवाद नेहमीच स्वप्नसृष्टीसारखा विलोभनीय असतो. तो व्यवहारात आणायला लागल्यावर त्याचे वास्तव स्वरूप जाणवायला लागले. माधवानुज त्यांच्या ' तेव्हा आणि आता ' कवितेत म्हणतात,

" विद्वत्ती मोठी, मिळवूनी देश हितासाठी
तनुमन धन अपुले, वाहूनि घ्यावे म्हणूनि भले
आशा केली व्यर्थची गेली, धिक्, मज मूढाला "

वर्तमानकालीन आशय असलेल्या ऐतिहासिक कविता

चंद्रशेखरांप्रमाणेच माधवानुज आपल्या काळातील युगधर्मापासून अलिप्त राहू शकले नाहीत. राजकीय आणि सामाजिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्यावरही पडलेला आढळतो. वस्तुनिष्ठ काव्य लिहिणाऱ्या अभिजात कवीला आधुनिक वातावरणाकडे पाठ फिरविता येत नाही. त्याचे मुख मात्र आदर्शाच्या बाजूने वळलेले असते. सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. पारसनिसांचा सहवास माधवानुजांना घडला. त्यातून ऐतिहासिक प्रसंगावर काव्य निर्माण करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांच्या ऐतिहासिक कवितांची शीर्षके ऐतिहासिक व्यक्तीशी, स्थळांशी, प्रसंगांशी आणि शस्त्रांशी संबंधित

आहेत. 'पर्वती', 'सज्जनगड', 'भवानी तलवार', 'कुबडी तीर्थ' आणि 'छत्रसालशिवाजी भेट' ही कवितांची शीर्षके उदाहरणादाखल सांगता येतील. मात्र या कविता निखालस ऐतिहासिक नाहीत. त्यातून माधवानुजांनी वर्तमानकालीन आशय भरलेला आहे.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि पारतंत्र्याचे दुःख

१८९३ मध्ये लिहिली गेलेली 'पर्वती', १८९६ मधील 'भवानी तलवार' किंवा त्याच वर्षी लिहिलेली 'सज्जन गड' या केवळ ऐतिहासिक कविता नाहीत. त्या कविता लिहिताना त्यामागे गतवैभवाची स्मृती आहे. पारतंत्र्याची खंत आहे. उदाहरणार्थ, पुण्याच्या 'पर्वती' चे दर्शन होताच तिच्या पेशवेकालीन वैभवाचे, तिच्या परिसरात झालेल्या राजकीय उलाढालीचे व लढायांचे कवीला स्मरण तर होतेच पण तात्काळ सद्यःस्थितीचे भान येताच उदासही वाटते. कवी म्हणतो,

"हे ! पर्वती देवी ! समशेर घेऊनि ठार ! करुनि रिपुभार तदिय शिर कमला !
वाहिली तयांनी चरणी तव विमले !
उल्हासा वाटला खास । सकल चित्तास ! पाहुनी तुजसी !
परि उदास आता हाय ! अम्हा तूं दिससी !

अशीच खंत 'भवानी तलवार' या कवितेतही कवीने व्यक्त केली आहे. सुरुवातीला शिवरायाच्या हातात असताना तिने गाजविलेल्या पराक्रमाचे वर्णन केलेले असून शेवटी कवी म्हणतो, "परंतु आज दैवगती विचित्र आली आहे हेच खरे !"

"हीन दशा तुज आली साची
होसी दासी परकीयांची । राहुनि म्यानी"

'सज्जन गड' या कवितेतही समर्थांनी छत्रपती शिवाजी महाराजांना केलेला उपदेश प्रारंभी कवीने वर्णन केलेला आहे. शेवटी कवी सांगतो,

"आर्यावर्ती फिरुनी जरी ! ऐसा कोणी अवतारी !
होईल दैवा समजा तरी ! दैन्य लयाला गेले !"

या अशा पारतंत्र्याचे दुःख व्यक्त करणाऱ्या कविता वाचल्या म्हणजे नैराश्याने कवीचे अंतःकरण ग्रासले असावे असे वाटू लागते. परंतु हे नैराश्य तात्कालिक आहे असे त्यांच्या 'गीता', 'पोवाडे'; 'आशा' यासारखी गीते वाचून वाटते. १८९३ मध्ये लिहिलेल्या 'आशा' या कवितेत माधवानुज सांगतात,

"आर्यावर्त सुरम्य देश अमुचा पावो सदा उन्नती
शत्रूची सगळ्या तदीयचि पडो मृत्यूमुखी आहुती
इच्छा होउनि पूर्णहीन जरि ये मध्यंतरी आपदा
द्याया धीर मनास ये झडकरी धावूनि आशे तदा" (–आशा)

वीर विभूतिपूजन

वीर विभूतिपूजनाची आवड माधवानुजांनाही आहे. 'सज्जनगड', 'कुबडी तीर्थ', 'छत्रसाल आणि शिवाजी भेट', 'कुणीकडे', 'पोवाडे' या कविता उदाहरणादाखल सांगण्यासारख्या आहेत. 'छत्रसाल आणि शिवाजी भेट' हे उत्कृष्ट ऐतिहासिक नाट्यगीत आहे. या वीररसपूर्ण कवितेची

सुरुवात शिवाजी महाराजांच्या गुणवर्णनाने होते. शिवाजी महाराज भेट म्हणून छत्रसालाला आपल्या हातातील तलवार देतात आणि मग उपदेश करतात. तो उपदेश म्हणजे राष्ट्रधर्म आहे. तो राष्ट्रधर्म एका राष्ट्रीय नेत्याने जनतेला सांगावा असा दुहेरी आहे, सूचक आहे. उदाहरणार्थ, शिवाजी महाराज सांगतात,

" जो दे स्वदेशास जगी न मान । नीचाहुनी नीच तयास जाण
की जन्मला तो अवनीस भार। ते व्यर्थ त्याचे जगणे असार "

किंवा " स्वातंत्र्य संपादन वा कराया । करीत जा यत्न सदैव राया
कारण– स्वातंत्र्य नाही तर सर्व नाही । स्वातंत्र्य ही वस्तु अमोल पाही "

स्वातंत्र्य संपादन करावयाचे तर आधुनिक काळात कोणते साधन वापरावे हे माधवानुजांनी शिवाजीच्या मुखानेच सांगितले आहे.

" निर्माण आधी कर संघशक्ति । सामर्थ्य संघी स्मर ही सदुक्ति."

१९०० मध्ये लिहिलेल्या ' भगवद्गीता ' या कवितेतून आणि 'पोवाडे' या कवितेतून वीर विभूतिपूजन आलेले आहे. स्वत्वशून्य, दुबळचा, निराश झालेल्या मनुष्याच्या ठिकाणी पुरुषार्थ निर्माण करण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय पोवाडयात असते असा आशय ' पोवाडे ' या कवितेत आहे. पोवाडे म्हणजे मराठयांची राष्ट्रगीते होत असे कवी म्हणतो.

ही राष्ट्रीय कविता वाचली म्हणजे लो. टिळकांच्या अस्मितादर्श राष्ट्रवादाचा जबरदस्त प्रभाव असल्याचे लक्षात येते. कारण त्यातील स्वातंत्र्याच्या लढयाचे तत्त्वज्ञान आधुनिक वाटते.

वर्तमानकालाचे यथातथ्य प्रतिबिंब

तत्कालीन राजकारणाचे प्रतिबिंब जसे माधवानुजांच्या कवितेत आढळून येते तसेच तत्कालीन सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे प्रतिबिंबही आढळते. आताच उल्लेख केलेल्या ' छत्रसाल शिवाजी भेट ' 'पोवाडे', किती पर्वती दूर राहीली', 'कुणीकडे' इत्यादी कवितांतून राजकीय जीवनाचे प्रतिबिंब पडले असल्याचे आढळते. ' गुढीपाडवा ', ' कावळयांची काव ' यांचा समावेशही त्यात करता येईल. उदाहरणार्थ, ' गुढीपाडवा ' या कवितेत कवी सांगतो,

" असे आपुला देश दुःखी बुडाला । कळेना कुठे सौख्य भानू दडाला
.... घुसा पार्लमेंटात जा हक्क मागा । खरी आपुली जी स्थिती तेथ सांग ॥"

राजकारणाप्रमाणेच सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांनाही माधवानुजांनी आपल्या काव्यातून वाचा फोडलेली आहे. मात्र त्यांची भूमिका बंडखोरीची नसून ती भूतदयावादी आहे. 'तेव्हा आणि आता', 'रूढीचा प्रभाव', 'पर्जन्याप्रत', 'दुष्काळ', 'दगड फोडताना', 'मुलांचा कोंडमारा', 'गाय विकत देताना', 'गुरांचा वाडा' इत्यादी कविता सांगता येण्यासारख्या आहेत.

त्यातही ' दुष्काळ ', ' दगड फोडताना ' आणि ' मुलांचा कोंडवाडा ' या कविता तर थेट अंतःकरणाला जाऊन भिडणाऱ्या आहेत.

अशा दुष्काळी परिस्थितीत संपूर्ण दिवसभर तुटपुंज्या मजुरीने, खडी फोडण्याचे अतिशय कष्टाचे काम करणाऱ्या, अशक्त, थकलेल्या, अगतिक स्त्रीचे अतिशय करुणाजनक असे चित्र माधवानुजांनी रेखाटलेले आहे. ती स्त्री निर्जीव दगडाला उद्देशून म्हणते,

" पटकन दगडा फुट फुट .....
शक्ती न आता अंगी उरली । गात्रे सगळी विकल जाहली !
तुज येऊ दे आता करुणा । अन्नदायका जड पाषाणा !"

राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याच्या जोडीला आर्थिक स्वातंत्र्याची जोड असलीच पाहिजे. जोपर्यंत आर्थिक स्वातंत्र्याची द्वारे सर्वांना मोकळी होणार नाहीत तोपर्यंत राजकीय स्वातंत्र्याचा खराखुरा अर्थ लक्षातच येणार नाही. विकल्या जाणारा माणूस राजकीय स्वातंत्र्य उपभोगू शकत नाही असा विचार या कविता वाचून मनात येतो.

माधवानुजांच्या काव्यासंबंधी टीकाकारांची मते

माधवानुजांच्या राष्ट्रीय कवितेसंबंधी टीकाकारांचे अभिप्राय नाहीत तर माधवानुजांच्या इतर विषयांवर लिहिलेल्या कवितेला धरून हे अभिप्राय आहेत. उदाहरणार्थ, प्रा. रा. श्री. जोग आणि कुसुमाग्रजांचा हा अभिप्राय वाचा. " माधवानुजांची कविता साधी, सरळ व संथ आहे. कित्येक समकालीनांच्या काव्यात आढळणारे भवातांडव त्यांच्या कवितेत दिसत नाहीत. सामान्यांच्या कक्षेत असलेल्या विषयाभोवती ती सामान्य पातळीवरून गुंजारव करताना आढळते." [१६] पर्यायाने ती लोककविता असल्याचे या टीकाकारांनी मान्य केलेले आहे. सामान्यांची सुखदुःखे, सामान्यांच्या आशा आकांक्षा व्यक्त करणे हेच राष्ट्रीय कवितेचे कार्य आहे. त्यामुळे त्या कवितेचा सामान्यता हा दोष तिचा एक महत्त्वाचा गुण ठरलेला आहे. मुळात माधवानुजांची काव्यनिर्मितीच हेतुप्रधान आहे आणि हेतुप्रधान कविता बोधवादाचा पुरस्कार करणारी असणे अपरिहार्य आहे.

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, 'माधवानुजांची कविता लाक्षणिक स्वरूपाची असून तिचा तो स्पृहणीय विशेष आहे." पारतंत्र्याच्या दडपशाहीच्या काळात, परकीय सरकारच्या नोकरीत असणारा राष्ट्रभक्त, कुटुंबवत्सल माणूस उघड उघड आपल्या अंतःकरणातील स्फोटक विचार बोलून दाखविणार नाही. त्याला लाक्षणिकतेचाच आधार घ्यावा लागेल तसा माधवानुजांनी घेतलेला आहे. पुढे माडखोलकर लिहितात, 'काहींच्या कवितेचे बहिरंग जुने असले तरी विचारांचे नावीन्य, सुधारणावादित्व आणि देशाभिमान हे गुण तिच्यात विपुल आढळतात. माधवानुजांच्या कवितेतील काव्यगुणांसंबंधीचा माडखोलकरांचा अभिप्रायही अतिशय मार्मिक आहे. ते म्हणतात, " केळीच्या कोवळ्या पानावर देवपूजेसाठी ठेवलेल्या कुंदाच्या ओंजळभर फुलांसारखी आहे. ..... रंग साधा पण शुभ्र, सुवासही बेताचा, शुचिता हेच त्यांचे गुणसर्वस्व." [१७]

माधवानुजांची राष्ट्रीय कविता या शुचित्वातूनच आविर्भूत झालेली आहे. राष्ट्रपूजा हेच तिचे कार्य, हे कार्य तिने अतिशय चांगल्या प्रकारे बजावलेले आहे. राष्ट्रीय कवितेच्या निर्मात्यांत माधवानुजांचे स्थान चंद्रशेखर, रे. टिळक यांच्या बरोबरीचे आहे एवढे मात्र निश्चित. उत्कट भावना, साध्या पण समर्पक कल्पना आणि अर्थपूर्ण शब्दयोजना यांनी ती रसिकमान्य झाली आहे.

दत्त, रेंदाळकर, गोविंदाग्रज आणि बालकवी

कवी माधवानुजांकडून राष्ट्रकवी विनायकांकडे वळण्यापूर्वी राष्ट्रीय जागृतीच्या या कालखंडात ज्यांचा प्रामुख्याने समावेश करता येईल अशा आधुनिक मराठीतील काही नामांकित कवींच्या राष्ट्रीय कवितांची ओळख करून घ्यावयाची आहे. दत्त, रेंदाळकर, गोविंदाग्रज आणि बालकवी या चार कवींपैकी दत्त हे सर्वात वयाने वडील होते. दत्तांची कविता तशी इतरांच्या तुलनेत अल्प असली तरी ती चंद्रशेखर, माधवानुज यांच्या कवितेच्या पंक्तीत बसण्याइतकी प्रौढ आणि प्रगल्भ आहे.

कवी दत्त (१८७५–१८९९)– कवी दत्त उपाख्य दत्तात्रय कोंडो घाटे हे त्या काळातले पदवीधर कवी होते. दत्तांना काव्याप्रमाणेच संगीताचाही छंद होता आणि सतारवादनातही ते चांगलेच कुशल होते. बडोद्यालाच ते नोकरीत होते आणि कवी चंद्रशेखरांचे ते मित्र होते. दत्त हे मराठ्यांच्या परंपरेचे अभिमानी आहेत तसेच वृत्तीने राष्ट्रभक्त आहेत. एखाद्या उमलणाऱ्या कळीसारखीच दत्तांची अवस्था होती. त्यांचे काव्यकमल विकसत असतानाच वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी प्लेगने त्यांचे अकाली निधन झाले. संवेदनशील अंतःकरणाचे कवी दत्त आपल्या काळातील युगधर्मापासून वेगळे राहू शकत नव्हते. त्यांच्या देशभक्तीचे आणि राष्ट्रीय भावनांचे दर्शन ज्या कवितांतून होते अशा मोजक्या सप्त सुरासारख्या सातच कविता आहेत. 'जननी आर्यभूमी', 'मित्रा विहंगा', 'वर्षप्रतिपदा', 'स्वतंत्रतेस', 'मावळचास आमंत्रण', 'दिवाळी' आणि त्यांची चिरंतन स्मृतीत असणारी 'निज नीज माझ्या बाळा' कविता ह्या त्या सात कविता आहेत.

स्वातंत्र्याचा उदो उदो करणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांना सवाल

'स्वतंत्रतेस' ही दत्तांची कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. सुरुवातीला दत्तांनी स्वातंत्र्यदेवतेची निर्भय विमुक्त अशा मानसमंदिरात विहार करणारी देवता म्हणून स्तुती केलेली आहे.

"बांधी ज्यास न शृंखला, न कधि जे कोणा उगा भीतसे
ऐसे मानस मात्र मंदिर तुझे स्वातंत्र्य देवी ! असे !"

शेवटच्या कडव्यात दत्तांनी राज्यकर्त्यांना मार्मिक सवाल केलेला आहे, कारण इंग्रज हे स्वतः स्वातंत्र्यदेवतेचे निस्सीम उपासक म्हणून ओळखले जातात.

"ज्यांना त्वद्गुण ठाउके निजगृहीं त्वद्भक्त जे गाजती
येथे तेच तुझ्या वधार्थ उठती ही नीति गे कोणती ?"

'मावळचास निमंत्रण', 'मित्रा विहंगा', 'दिवाळी' ह्या लाक्षणिक अर्थाने लिहिलेल्या दत्तांच्या राष्ट्रीय कविता आहेत. आपल्या पराक्रमी मावळे गडघांना शत्रूशी लढण्यास शिवाजी महाराजांचे निमंत्रण गेल्याची कल्पना 'मावळचास निमंत्रण' या कवितेत मांडून, स्वातंत्र्याच्या लढचात सामील व्हा असे सुचविले आहे. या नाटचगीतात शेवटी कवी म्हणतो;

"लढाया चला सोडुनी सर्व काज
रणी दाखवा शत्रुला शौर्य ओज !"

पारतंत्र्य पशुपक्षांनाही दुःखद घाटते हे 'मित्रा विहंगा'। या कवितेत सांगितले आहे. एका पक्षाला कवी सुंदरशा पिंजऱ्यात ठेवण्याचा प्रयत्न करतो परंतु पिंजऱ्यात बंदिस्त होताच पक्षाचे डोळे भरून येतात, तो दीनवाणा बघतो, चडफडतो, कवी त्याचे दुःख ओळखतो आणि त्याला मुक्त करतो. तो म्हणतो,

"पारतंत्र्याचे दुःख मला ठावे
मीच तुजला पंजरी कसे न्यावे !"

'वर्षप्रतिपदा' या कवितेतूनही लाक्षणिक अर्थाने पारतंत्र्याची खंत कवीने व्यक्त केली आहे.

१८९८ मधील 'दिवाळी' या कवितेचा पूर्वार्ध शरदाच्या समृद्धीचे वर्णन करणारा असून कवितेचा शेवट मात्र पुण्यातील प्लेगच्या साथीत गोऱ्या सैनिकांनी केलेल्या अत्याचारांनी काळवंडलेला आहे. कवी सांगतो,

" वसे भीषण अंधार जरि मनात
दीप लावावा कासया मग जनात ?
देश बुडला दुःखात आपुला गे !
कसा उत्सव मग गोड मना लागे ?"

भारतमातेचे नितांत सुंदर स्तोत्र

" जननी आर्यभूमि " ही कविता म्हणजे सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम् " अशा भारतमातेचे भावोत्कट नितांत सुंदर स्तोत्र आहे. १८९८ मध्येच हे विभास रागातील रचलेले गीत, रवीन्द्रनाथ टागोरांच्या बंगाली गीताचा शब्दशः केलेला सुरस आणि सरस अनुवाद आहे हे संपादकांनी लिहिलेल्या टिपेमुळेच लक्षात येते. अंतःकरणात राष्ट्रीय भावना असल्याशिवाय अनुवादासाठी अशा गीताची निवडच होऊ शकत नाही.

" अयि भुवन मनमोहिनी, जननी ।
नील सिंधुजल धौत चरण तल । अनिल विकंपित श्यामल अंचल,
अंबर चुंबित भाल हिमालय । धवल मुकुट हा मस्तकी निर्मल ॥"

ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे चित्र

भारताच्या ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे चित्र दत्तांनी ' निज नीज माझ्या बाळा ! ' या सुप्रसिद्ध अंगाई गीतातून रेखाटलेले आहे. एक दरिद्री माता आपल्या लाडक्या तान्हुल्याला अंगाई गातानाच परिस्थितीची जाणीव करून देत आहे. तुझ्यासाठी मी केवळ दारिद्र्याची रास हेच धन ठेवले आहे. मात्र शेवटी त्याला सत्यनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा बाळगण्याचा उपदेश करून ही कविता संपविली आहे. दत्ताच्या अंतःकरणातील नैतिकतेचा, सत्यनिष्ठेचा आणि ईश्वरनिष्ठेचा परिचय या अंगाईगीतातून उत्कटतेने होतो.

कवी एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (१८८७–१९२०)

कवी रेंदाळकर कोल्हापूरजवळील रेंदाळ या गावचे. त्यांचे दुय्यम शिक्षण कागल येथे झाले. प्राथमिक शिक्षक म्हणूनही रेंदाळकरांनी काही दिवस नोकरी केली पण काव्यदेवतेच्या उपासनेसाठी अधिक ज्ञानार्जन करावे या आकांक्षेने त्यांनी सांगलीच्या संस्कृत पाठशाळेत व्याकरण, भाषा, व्युत्पत्तिशास्त्र इत्यादी विषयांचे सखोल अध्ययन केले. बंगालीचेही त्यांना ज्ञान होते. त्यामुळे बंगाली साहित्याचे ते अभ्यासक होते. इंग्रजी भाषा आणि साहित्यही त्यांनी अभ्यासिलेले होते. रेंदाळकरांनी संपादक म्हणूनही नावलौकिक संपादन केलेला होता. गद्य आणि पद्य लेखन करणारे रेंदाळकर असल्यामुळे ' मर्मविचार ', ' मासिक मनोरंजन ', ' करमणूक ' इत्यादी दर्जेदार मासिकांत सहसंपादक म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केलेले आहे. मराठीतील निर्यमक रचनेचे पुरस्कर्ते म्हणून त्यांचा लौकिक झाला.

रेंदाळकर उत्कृष्ट अनुवादक म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांनी इंग्रजी, संस्कृत आणि बंगाली कवितांचे सफाईने अनुवाद केलेले आहेत पण एवढ्या त्यांच्या संभारात त्यांची राष्ट्रीय कविता अगदीच नगण्य आहे. ' उघडी नयन ' हा रेंदाळकरांच्या निवडक कवितांचा प्रातिनिधिक संग्रह आहे. त्यात राष्ट्रीय म्हणून ज्यांना नाव देता येईल अशा पाच सहाच कविता आढळतात.[१८]

स्थिर निष्ठेचा अभाव

रेंदाळकरांच्या ठिकाणी स्थिर अशी निष्ठाच नव्हती असे अभ्यासकांचे मत आहे. पण स्थिर निष्ठा नसली तरी त्यांचा पिंड कवीचा होता. त्यामुळे त्यांच्या हातून काही राष्ट्रीय कवितांची निर्मिती झाली. 'भारत माता', 'भारत भूमी', 'द्रौपदी', 'धर्महानीचे भय' यासारख्या कवितांतून त्यांनी आपल्या राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती केलेली आहे. त्यांची विनायकासारखी स्थिर निष्ठा असती तर त्यांनी अनेक राष्ट्रीय कवितांची निर्मिती केली असती.

रेंदाळकरांनाही माधवानुजांसारखे भारताच्या प्राचीन परंपरेचे व वैभवाचे आकर्षण आहे. त्यांच्या 'भारतभूमी' आणि 'भारतमाता' या दोनही कवितांतून जशी त्यांची राष्ट्रभक्ती आढळते तशीच परंपराभक्तीही आढळते. 'भारत माता' हे भारतमातेचे स्तोत्रच आहे. कवी म्हणतो,

"धन्य धन्य भारत माते ! तुझ्या यशोगानी
असो एक भावे माझी निरत सदा वाणी !
.....तुझे नाम गावे भावे स्तोत्र तुज वहावे
तुझ्या कीर्तनी भक्तीने अश्रुंनी नहावे !"

याच कवितेत रेंदाळकरांनी पारतंत्र्याची खंतही व्यक्त केली आहे. ते म्हणतात,

"ती ही भारतभूमि–सांप्रत किती हीन स्थिती पावली ?
सारेही जन हासते वघुनिया ती ते अवज्ञा भरे !
उत्कर्षस्थिति केधवा पुनरपी लाभेल देवा ! तिला ?"

असा दु:खदायक प्रश्नही विचारलेला आहे.

रेंदाळकरांची 'द्रौपदी' ही सुप्रसिद्ध कविता लाक्षणिक आहे. द्रौपदीनिमित्ताने भारतीय स्त्रियांचे दास्यच कवीला लोकांसमोर मांडावयाचे आहे. त्यामुळे आशयघनता या दृष्टीने आणि भेदक लाक्षणिक या दृष्टीनेही ती कविता अतिशय प्रभावी ठरलेली आहे. अन्याय, अत्याचार, षंढपणाने सहन करणाऱ्या दुबळ्या, पौरुषहीन, भेकड, विचारसरणीचे रेंदाळकरांनी 'द्रौपदी'त वाभाडेच काढले आहेत. कवी म्हणतो,

"जी नीती तुजला विवस्त्र करण्या थोडी न संकोचते
पण्य स्त्री गणि तूज शुद्ध चरिते ! नि:शंक जी लोटते
धिक् ! धिक् ! नीतिस त्या कशास असली शास्त्रे तरी जन्मली ?
की जी शील अनाथ पुण्य सतिचे रक्षावया लाजली !"

आजही लोक विवस्त्र करून स्त्रियांची धिंड काढायला मागे पुढे बघत नसल्याचे पाहतो आणि मग मानवी मन महाभारताच्या काळापासून फारसे बदलले नसल्याचा अनुभव येऊन जातो. धर्म, न्याय, सुनीती यांच्या नावावर स्त्रियांवर अजूनही हे अत्याचार केले जात असल्याचे कवीने सांगितले आहे.

स्त्रीस्वातंत्र्याचा कैवार रेंदाळकरांनी आणखी काही कवितांतून घेतलेला असून तो त्यांच्या राष्ट्रीय कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. स्त्रीस्वातंत्र्याचा आशय मांडणाऱ्या त्यांच्या सर्वच कविता ओजस्वी आहेत. राष्ट्रीय कवितेचे इतर विषय माधवानुज, चंद्रशेखर यांच्याप्रमाणेच

त्यांनी मांडलेले आहेत. मात्र त्यातून फारशी उत्कटता जाणवत नाही. रचनाकौशल्याकडे असलेला कल, निष्ठेचा अस्थिरपणा, संपादनाच्या जबाबदारीचे कठीण कार्य आणि गद्य लिखाण करण्याकडे प्रवृत्ती त्यामुळे वैचारिकतेलाच प्राधान्य मिळाले आणि भावनांचा स्वाभाविकपणे संकोच झाला. पण युगधर्माप्रमाणे फूल ना फुलाची पाकळी या न्यायाने राष्ट्रीय कवितेचे क्षेत्र समृद्ध करण्यात त्यांचाही सहभाग आहे.

कवी गोविंदाग्रज (१८८५–१९१९)

' राजहंस माझा निजला ' या करुणरम्य हृदयद्रावक गीताचे कवी म्हणून कवी गोविंदाग्रज प्रथम महाराष्ट्राला परिचित झाले. प्रतिभासंपन्न काव्याचे निर्माते, ' प्रेमाचे शाहीर ', ' कल्पनेचे कुबेर ' म्हणून आणि सुप्रसिद्ध मराठी नाटककार त्याचप्रमाणे विनोदी निबंधकार म्हणूनही गडकऱ्यांचा लौकिक आहे. केवळ गडकऱ्यांचाच स्मृतिदिन महाराष्ट्रात साजरा केला जातो. अशी योग्यता असणाऱ्या या कवीने राष्ट्रीय कवितेचे दालन संपन्न व समृद्ध करावयास पाहिजे होते परंतु त्यांच्याकडून ते कार्य घडलेले दिसून येत नाही. राष्ट्रकवी म्हणून गडकऱ्यांची प्रतिमा रे. टिळक, चंद्रशेखर, माधवानुज यांच्या तुलनेत धूसर आहे असे म्हणावे लागते.

गोविंदाग्रजांच्या वाग्वैजयंतीच्या ११ माळेतील राष्ट्रीय काव्यरत्नांची ओळख थोडक्यात करून घ्यावयाची आहे. तशी वाग्वैजयंतीची जडणघडण, कलाकुसरपूर्ण आहे. मात्र त्यात खऱ्याखुऱ्या रत्नांची आणि नकली मण्यांची भेसळ झालेली आहे. वास्तविक गोविंदाग्रजांच्या काव्यलतेला ज्या वातावरणात पहिला बहर आला ते पुण्याचे वातावरण देशभक्तीच्या वाऱ्यांनी आणि राष्ट्रीय भावनांनी सळसळत होते. स्वराज्य, स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वातंत्र्य इत्यादी राष्ट्रीय विचारांचे रोपटे ज्या शिक्षणसंस्थेत रुजले नि फोफावले त्याच शिक्षणसंस्थेच्या फर्ग्युसन कॉलेजात गडकरी विद्यार्थी होते तिथे असतानाच, आठ विभागांत शाहिरी धर्तीचा रचलेला 'पानिपताचा फटका' हे गीत होय प्रेरणाही राष्ट्रीय वृत्तीमुळेच गडकऱ्यांना झाली हे निर्विवाद आहे.

निदान प्रारंभी तरी गोविंदाग्रजांचा पिंड राष्ट्रीय वृत्तीचा होता असे या फटक्याप्रमाणेच त्यांनी लिहिलेल्या सुप्रसिद्ध ' महाराष्ट्र गीता ' वरूनही वाटते. परंतु जसजसे आपण उत्तरार्धाकडे वळतो आणि गडकऱ्यांचा लौकिक वाढलेला आढळतो तसतशी त्यांची ही राष्ट्रीय वृत्ती क्षीण होत गेल्याचे स्पष्टपणे जाणवते. गडकऱ्यांनी राष्ट्रीय कविता लिहिणाऱ्या काही कवींच्या जीवनाकडे बघूनही कदाचित त्या मार्गाचा त्याग केला असावा. कारण स्वा. सावरकर, कवी गोविंद हे त्याच काळात कविता लिहीत होते. कवी गोविंदाची अवस्था त्यांनी जाणली असावी. या खडतर मार्गावरून आपल्याला चालता येणार नाही, असे त्यांना वाटले असावे. इतर कवींनी लाक्षणिक अर्थाने जशा कविता लिहिल्या तशा ' प्रेमकवितां'प्रमाणे राष्ट्रीय कविता लिहिणे त्यांना अशक्य नव्हते. तितकी प्रतिभेची झेप त्यांच्याजवळ होती पण गडकऱ्यांना त्या मार्गाने जावयाचे नव्हते. त्यामुळेच अगदीच अल्प अशी राष्ट्रीय कविता त्यांच्या हातून लिहिल्या गेली असावी.

गोविंदाग्रजांची राष्ट्रीय कविता

गोविंदाग्रजांची राष्ट्रीय कविता ऐतिहासिक स्थल, काल, व्यक्ती आणि प्रसंगांशी प्राधान्याने निगडित आहे. आपआपसातील कलह हा राष्ट्रघातक ठरतो हा हितबोध करण्यासाठी गोविंदाग्रजांनी 'पानिपतचा फटका' प्रामुख्याने लिहिला आहे. भाऊसाहेब पेशवे, दत्ताजी, जनकोजी यांच्या

पराक्रमाचे वर्णन करून कवीने वीर विभूतिपूजनही साधले आहे. पानिपतच्या युद्धाचा प्रसंग मराठ्यांचा अभिमानाचा विषय आहे. म्हणूनच पानिपतच्या फटक्याच्या प्रारंभी गोविंदाग्रज म्हणतात,

" कौरव पांडव-संगर तांडव द्वापर-काली होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलीत लढले पानपती "

शेवटी कवी सांगतो,

" कधी रडकथा, निजदेशाची वाचूनि ऐसा हा फटका-
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका ! "

कारण,

" पुरे पुरे हे राष्ट्रविघातक परस्परातील वैर अहो
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरी घ्या हो ! "

भाऊसाहेब पेशव्यांनी मल्हाररावांना पाठविलेला निरोप अगदी निर्वाणीचा आहे. तो नाट्यमय पद्धतीने कवीने सांगितला आहे. भाऊसाहेब पेशव्यांचा बाणेदारपणा त्यातून प्रकट झालेला आहे.

" देशकार्य हे व्यक्तीचे नच सक्ति नको, भक्तीच हवी
आसक्ती सर्वांची असता मिळवू आतां कीर्ती नवी ॥"

फटक्यातील अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत पण विस्तारभयास्तव तो मोह आवरावा लागतो.

'महाराष्ट्र गीत' हे गोविंदाग्रजांचे अपूर्ण असे खंडकाव्य आहे. चंद्रशेखरांच्या 'महाराष्ट्र दर्शना'प्रमाणे त्यात जिव्हाळा आढळत नाही, परंतु प्रदेशचित्रण, भौतिकचित्रण, मराठ्यांचा इतिहास, मराठी बाणा यांचे दर्शन गोविंदाग्रजांनी शाहिरी ढंगाने केलेले असल्याने आकर्षक झालेले आहे. महाराष्ट्राला लावलेली विशेषणे गडकऱ्यांच्या मर्मज्ञतेची साक्ष देणारी आहेत. उदा.

" मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा ! ...
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा...

या प्रत्येक ओळीतून मराठी माणसाचा स्वाभिमान गडकऱ्यांनी प्रकट केला आहे. या गीतातूनही बाजीप्रभू देशपांडे, नरवीर तानाजी, इत्यादी महाराष्ट्रातील वीरांचे पूजन गडकऱ्यांनी केलेले आहे.

'कृष्णाकाठी कुंडल' हे देखील गोविंदाग्रजांचे संकल्पित पण अपुरे राहिलेले ऐतिहासिक खंडकाव्य आहे. शिवाजी महाराजांच्या काळातील स्वामिनिष्ठ अशा एका बारगिराची ही प्रेमकथा आहे.

" रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया
या देहाला, नाव साजणी, रायबागचा राया ॥"

पुढे या बारगिराला वीरगती प्राप्त होते त्यावेळी नायिका दुःखाने विलाप करताना म्हणते,

" शिववांच्या शिरपेचासाठी-बोली ठरली होती
तोडून मंगलसूत्र जिवाचा देणे माणिक मोती ॥"

या पंक्तीतून कवीने देशाकरिता तळहातावर शीर घेऊन लढणाऱ्या पराक्रमी वीराच्या मागे त्यांच्या विधवांची अशीच अवस्था होत असल्याने त्यांनीही राष्ट्रासाठी फार मोठा त्याग केलेला असतो हे मार्मिकपणे सुचविलेले आहे. पण खंडकाव्य अपूर्ण राहिल्याने ते प्रभावी ठरत नाही.

'वीरमरणाला शोभण्याजोगे गाणे' आणि 'पाचदेवींचा पाळणा' ही काव्येही ऐतिहासिक घटनांवर आधारलेली आहेत पण दोन्ही काल्पनिक असून दोन्ही अपूर्ण आहेत.

वर्तमानकाळातील राष्ट्रीय संदर्भ सांगणाऱ्या काही कविता

'लोकमान्यास भारतवर्षाचा आशीर्वाद' ही कविता लो. टिळक चिरोलवरील खटल्यानिमित्ताने इंग्लंडला गेले त्या घटनेवर आधारित आहे. कवीने लो. टिळकांजवळ 'भवानी तरवार' आणण्या-संबंधी आग्रह धरला आहे.

दुसरी कविता नामदार 'गोपाळ कृष्ण गोखले' यांच्या निधनप्रसंगावर लिहिलेली विलापिका आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की गोविंदाग्रजांची ही कविताही अपूर्ण राहिली आहे.

राजकीय आणि सामाजिक कविता– ज्या कवितांतून तत्कालीन सामाजिक नि आर्थिक अशा राष्ट्रीय जीवनाचे दर्शन घडते त्यांनाच राष्ट्रीय कवितेची पदवी देता येते. गोविंदाग्रजांच्या 'दसरा'; 'स्मशानातले गाणे', 'गरिबीचे गाणे' अशा तीन कविता आहेत. 'दसरा' ही कविता म्हणजे केशव-सुतांच्या 'तुतारीची' वेगळी प्रतिकृती आहे. 'स्मशानातले गाणे' ही कविता म्हणजे एक चमत्कृतीच आहे. 'गरिबीचे गाणे' किंवा 'एक प्रसंग' ही दुष्काळाचे भीषण परिणाम सांगणारी कविता आहे. परंतु हे गीतही अपूर्ण राहिलेले आहे.

टीकाकारांचे अभिप्राय– राष्ट्रीय कवी म्हणून गडकरी ओळखले जात नाहीत तर प्रेमाचे शाहीर म्हणून ते काव्यसृष्टीत ओळखले जातात आणि ते स्वाभाविकच आहे. तरीही प्रा. भ. श्री. पंडित गडकऱ्यांचा गौरव करताना म्हणतात, "गडकऱ्यांचा मनःपिंड याच युगात घडला असल्यामुळे त्यांना पारतंत्र्याचा तिटकारा होता आणि स्वदेश, स्ववांधव, स्वभाषा, गतेतिहास आणि जुने वाङमय व ते निर्माण करणारे संतमहंत यांचा अभिमान होता. गडकऱ्यांच्या साहित्यात निव्वळ कलाविलास नाही. त्यात भावनांची खळबळ आहे, रसाची उत्कटता आणि अभिमानाचा पीळ आहे. त्यात उच्च विचार-सरणी आणि उदात्त ध्येयवाद आहे आणि म्हणून ते तोलात व मोलात भारी आहे." [२०] डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "प्रगमनशील विचारांची आणि उदात्त मानवतावादाची जी बैठक केशवसुतांच्या कवितांना लाभलेली दिसून येते तिचा गडकऱ्यांच्या कवितांत अभावच प्रतीत होतो." [२१]

गडकऱ्यांच्या ठिकाणी केशवसुतांप्रमाणेच आरंभी राष्ट्रीय भावनेचा उदय झालेला होता. परंतु पुढे केशवसुतांप्रमाणेच त्यांची ती भावना लुप्त झाली असली पाहिजे. गोविंदाग्रज ज्या काळात फर्ग्युसन कॉलेजात होते त्याच काळात एक दोन वर्षे मागे पुढे स्वातंत्र्यवीर सावरकरही होते. चाफेकर बंधूंना फासावर चढविल्यावर त्यांनी चाफेकरांवर 'फटका' रचला होता आणि गडकऱ्यांप्रमाणेच 'पानिपताच्या' युद्धावर पुढे महाकाव्य लिहिण्याचा संकल्पही केला होता. आरंभी शृंगारिक आणि प्रणयप्रधान वाटणाऱ्या सावरकरांच्या 'कमला' या खंडकाव्याचा उत्तरार्ध राष्ट्रीयत्वाच्या भव्योदात्त भावनेने व्यापलेला आहे. उलट 'कृष्णाकाठी ..... कुंडल' हे खंडकाव्य लिहिणाऱ्या गडकऱ्यांनी त्याला इष्काच्या लावणीची कळा आणली आहे. याचा अर्थ असा की ऐतिहासिक विषयावर रचना करणाऱ्या या दोन्ही कवींच्या वृत्तीतच जमीन अस्मानाचे अंतर आहे.

कवितेच्या संदर्भात केशवसुतांचे शिष्यत्व स्वीकारणाऱ्या गडकऱ्यांनी गुरूकडून आत्मनिष्ठा आणि वैयक्तिक प्रेमाची अभिव्यक्ती हे दोन विशेष स्वीकारले. श्री. कृ. कोल्हटकर या गुरूंकडून सुधारणावाद आणि विनोद या दोन विशेषांचा अंगीकार केला आणि गडकरी नाटकाकडे वळले. गडकऱ्यांसंबंधीचा

माडखोलकरांचा अभिप्रायही मार्मिक आहे. ते म्हणतात, " गोविंदाग्रज हे कलोपासक होते. केशवसुतांप्रमाणे निसर्गोपासक नव्हे. कल्पकता, तज्जन्य अतिरंजन आणि तदुद्भूत कृत्रिमता हे त्यांच्या कवितेचे विशेष सांगता येतील." [२२] गोविंदाग्रजांजवळ उत्कट संवेदनशीलता आणि अचाट कल्पकता हे दोन्ही गुण कवी विनायकाच्या तुलनेत अधिक असूनही त्यांना त्यांच्या तोडीची तर सोडाच पण चन्द्रशेखर, माधवानुजांच्या तोडीचीही राष्ट्रीय कविता ते लिहू शकले नाहीत. ज्या कविता त्यांनी लिहायला घेतल्या त्यातील काही त्यांना पूर्ण करता आल्या नाहीत याचेही रहस्य हेच आहे. हे सर्व मान्य केले तरी त्यांच्या काही ऐतिहासिक कविता राष्ट्रीय भावनेच्या स्पर्शाने उजळून निघाल्या आहेत आणि त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे.

बालकवी (१८९०–१९१८)

विश्वात्मक सौंदर्यासाठी निसर्गाशी तादात्म्य पावणारा, निसर्गाचा चंडोल म्हणून गौरविल्या जाणारा, चेतनगुणोक्तीने निसर्गालाही सुमूर्त, सजीव करणारा भावकवी म्हणून बालकवींचा लौकिक आहे. ठोंबरे हे मूळचे खानदेशातील. बालकवींना बालवयातच कविता करण्याचा नाद लागला. त्यांच्यावर काव्याचे संस्कार करण्याचे कार्य त्यांच्या वडील भगिनी 'जीजीं' नी केले. पुढे बालकवींना शिक्षणाच्या निमित्ताने नगर, पुणे येथे जावे लागलें. नगरला त्यांना कवी रे. टिळक पती–पत्नीचा प्रेमळ सहवास लाभला आणि त्यांच्या काव्यशक्तीला बहर आला. संस्कृतचे पंडित, कवी, कीर्तनकार रामचन्द्र कृष्ण वैद्य उपाख्य कवी वनवासी यांचाही सहवास बालकवींना लाभला.

बालकवींचे वडीलबंधू श्री. अमृतराव हे देशभक्त होते. त्यांचा क्रांतिकारकांशी जवळचा संबंध होता. त्यामुळे घरातील वातावरण राष्ट्रीय स्वरूपाचे होते.

बालकवी आणि गोविंदाग्रज या दोघांच्याही वृत्तीत काही बाबतीत कमालीचे साम्य आहे. निसर्गप्रेम, मानवप्रेम हे दोघांच्याही काव्याचे विषय. एक प्रेमाचा शाहीर तर दुसरा निसर्गाचा चन्डोल ! दोघांनीही संध्या व अरुण रागाचे गोफ वळले, दोघेही भूतकाळात रमले, दोघांचाही कल सुधारणावादाकडे होता, दोघांनाही कल्पकतेचे देणे लाभले होते. दोघांनीही केशवसुतांचे अनुयायित्व स्वीकारून तुतारी संप्रदायाला अनुरूप अशा सामाजिकता असणाऱ्या कविता लिहिल्या. दोघांवरही महाराष्ट्रातील काव्यरसिकांनी अपार प्रेम केले. एकाच्या 'राजहंसा' ने तर दुसऱ्याच्या 'फुलराणी'ने रसिकमनांची पकड घेतली. दोघांनीही अल्पवयातच या जगाचा निरोप घेतला, दोघांनी आपल्या अंतःकरणातील राष्ट्रीय भावनांची प्रारंभीच अभिव्यक्ती केली. गोविंदाग्रजांकडून बालकवींकडे जाणे म्हणजे एका भव्य उद्यानाकडून दुसऱ्या भव्य उद्यानाकडे जाण्यासारखे आहे पण या उद्यानातील काही फळझाडांचीच ओळख आपल्याला करून घ्यावयाची आहे.

बालकवींच्या राष्ट्रीय कविता

गोविंदाग्रजांनी जशी ऐतिहासिक कविता लिहिली त्याच स्वरूपाची कविता बालकवींनी लिहिलेली आहे. 'वीर मराठा' आणि 'दौलतरावांची मंजुळा' ही उघड उघड ऐतिहासिक काव्ये आहेत. 'जीर्ण दुर्ग' ही कविताही ऐतिहासिक स्वरूपाची असली तरी ती लाक्षणिक स्वरूपाची आहे. 'जीर्णदुर्गा'च्या वर्णनातून बालकवींनी वीरविभूतिपूजन केलेले आहे आणि त्यातून स्वातंत्र्याची उत्कट जाणीवही प्रकट केलेली आहे. सामान्यतः मनुष्य स्थितिशील आणि अल्पसंतुष्ट असतो असेही या कवितेतून बालकवींनी सुचविलेले आहे. बालकवींचा हा दुर्ग महाराष्ट्रातला नाही, तो नर्मदेच्या काठावरील प्राचीन काळातील दुर्ग आहे. कवी म्हणतो,

" दुर्ग भयंकर जीर्ण पसरला पुढती, जो गत काली
शूर साहसी नरसिंहांनी अपुली वसती केली !
जीव नव्हे संसार अर्पिला स्वातंत्र्यास्तव ज्यांनी,
त्या वीरांचा वास जाहला गतकाली या स्थानी ॥"

'माझा भारत', 'आर्यांची अवनती', 'राष्ट्रगायत्री' आणि 'राष्ट्रसेवा' या बालकवींनी लिहिलेल्या राष्ट्रीय कविता आहेत. 'माझा भारत' या कवितेतून बालकवींचे उत्कट राष्ट्रप्रेम प्रकट झालेले आहे. न्यायी अशा परमेश्वराने पृथ्वीवरील राष्ट्रांना वेगवेगळा न्याय का द्यावा ? काहींना वैभव-संपन्न करावे तर भारतासारख्या देशाला दरिद्री का करावे हे कवीला गूढ वाटते. मात्र आईचे सर्वात अधिक प्रेम दुबळ्या नि अशक्त मुलावर असते तसेच भारताच्या बाबतीत कवीचे आहे. माझा देश कितीही दरिद्री असला तरी माझे प्रेम तीळमात्र कमी होणार नाही, उलट ते वाढतच जाईल, असा आशय बालकवींनी व्यक्त केला आहे. कवी म्हणतो,

" आहे हा हतभाग्य दीन दुबळा संत्रस्त दुःखी जरी,
दारिद्र्याचे जरि अस्थिपंजर उरे त्या तच्छरीरावरी,
त्याला पाहुनिया भिऊन दुसरे कोणी पळाले दुरी
या दुःखी परि प्रीति वाढत असे माझी तरी त्यावरी "

बालकवींनी भारतासंबंधीचा आपला आशावादही याच गीतातून व्यक्त केलेला आहे. कवी म्हणतो,

" नाही भारत दीन दुर्बल जरी माझा मला अप्रिय,
मी न्यायप्रिय देव वारिन पहा आता तयाचे भय ! "

परंतु ही कविता अपूर्णच आहे. 'आर्यांची अवनती' या कवितेतील आशयही वरच्या कवितेसारखाच आहे. पाश्चात्यांच्या अनुकरणाने नि शिक्षणाने आमचे राष्ट्राभिमान, देशभक्ती, पौरुष, हे सर्व तेजस्वी गुण लोपलेले असून एवढे मोठे 'राष्ट्र हे हमालांचे' राष्ट्र बनलेले आहे असा जळजळीत उपहास केला आहे. कवी म्हणतो,

" हमालांचे जरि राष्ट्र असे कोठे, हिंद भूमी तो देश मला वाटे ॥
आंग्लविद्येच्या अध्ययनामाजी, अहा सुकते तारुण्य कळी ताजी
तेज गेले, सामर्थ्य नष्ट झाले, दीन दुर्बळ विज्ञान घरा आले "

ही कविताही बालकवी पूर्ण करू शकले नाहीत. त्यांची 'राष्ट्रसेवा' ही कवितादेखील अपूर्ण आहे. पाश्चात्यांच्या शिक्षणाचा दुष्परिणाम आमच्या देशवासीयांवर होऊन आम्ही आमच्या धर्मसंस्कृतीचे निंदक कसे बनलो आहोत हे कवीने या कवितेत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कवी म्हणतो,

" मना दैन्य दौर्बल्य हे पाहवेना । मना हिंदभूमी व्यथा साहवेना ।
भरे घोर अज्ञान हे दुर्विकारी । मना राष्ट्र शिक्षांजने या निवारी ॥"

'तेजोगीत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'धर्मवीर' या बालकवींच्या कवितेची आधुनिक मराठी कवितेच्या बहुतेक टीकाकारांनी दखल घेतलेली आहे. सत्यधर्माची प्रत्यक्षात वाटचाल करण्याकरिता द्यावयाचा लढा अशी या प्रदीर्घ कवितेची मध्यवर्ती कल्पना असल्याचे कवीनेच सांगितले आहे. सर्व जगाला विश्वधर्माची शिकवण देण्याचे महत्त्वाचे कार्य या देशाने

केलेले आहे असेही कवीने सूचित केलेले आहे. काही टीकाकारांनी केशवसुतांच्या 'तुतारीचे' अनुकरण म्हणूनही या गीताचे वैशिष्ट्य कथन केलेले आहे. ते काहीही असले तरी भारताविषयीचा उत्कट अभिमानच कवीने प्रकट केला आहे. 'वयम् अमृतस्य पुत्राः' या चालीवर कवी म्हणतो.

"तेजाची आम्ही वाळे, सत्यरूप आम्ही सगळे
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदीस्थानी !"

वरवर वाचन केले असता 'धर्मवीर' ही सामाजिक आशय सांगणारी आवेशपूर्ण कविता वाटते. ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, "त्यांचा 'धर्मवीर' हा तुतारी इतकाच तेजस्वी वाटतो." [२३]

प्रा. रा. श्री. जोगांचा अभिप्रायही काहीसा प्रतिकूल असाच आहे. ते म्हणतात, "तुतारी वाङ्मयातील सर्वात अयशस्वी कविता हीच असेल." [२४] या कवितेतील बालकवीचे अवसान त्यांना उसने वाटले आहे.

प्रा. रा. श्री. जोगांनी मांडलेले मत ग्राह्य समजायला पाहिजे. बालकवींनी ज्या ऊर्मीतून 'माझा भारत', 'आर्याची अवनती', 'राष्ट्रगायत्री', 'राष्ट्रसेवा', 'वीर मराठा' यासारख्या कविता लिहिल्या ती ऊर्मी धर्मवीर लिहिताना आढळत नाही. बालकवींचा प्रत्यक्ष कवी विनायकांशी संबंध येऊनही ते राष्ट्रीय भावनेच्या अभिव्यक्तीपासून दूर गेले आणि 'धर्मवीर'च्या वेळी तर त्यांचे अवसान उसने वाटले. डॉ. द. भि. कुळकर्णी म्हणतात, "बालकवींच्या प्रतिभेला बालवृत्तीचे एकच द्वार होते. कुठल्याही अनुभवाला त्यांच्या काव्यसृष्टीत प्रवेश करावयाचा असो त्याला बालरूपच धारण करावे लागे... बालकवींच्या प्रतिभेचा व काव्यसृष्टीचा हा गुणधर्म लक्षात घेणे नितांत आवश्यक आहे. [२५]

बालकवींच्या प्रतिभेची आणि काव्यसृष्टीचीही डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी सांगितलेली मर्यादा मार्मिक आहे. कारण ही मर्यादा लक्षात आली म्हणजे बालकवींच्या राष्ट्रीय कविता का अपूर्ण राहिल्या, संवेदनशीलता असूनही त्या अधिक उत्कट का होऊ शकल्या नाहीत याचे उत्तर मिळते. काव्यातून विश्वसौंदर्याचा साक्षात्कार घडविणे, तो साक्षात्कार घडविताना माधुर्य व सौकुमार्य यांची कास धरणे हेच त्यांचे डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी म्हटल्याप्रमाणे सामर्थ्य होते. हे सामर्थ्य राष्ट्रीय कवितांची निर्मिती करण्यास पुरेसे पडणारे नसल्याने त्यांच्याकडून अधिक राष्ट्रीय कवितांची निर्मिती होऊ शकली नाही. राष्ट्रीय कवितेच्या वेगवान, पावन प्रवाहात प्रवेश करून तरंगण्याची संधी चालून आलेली असतानाही केशवसुत, गोविंदाग्रज यांच्याप्रमाणेच बालकवीही काठाशी बसून चार तांबे डोक्यावर घेऊन स्नान करून मोकळे झाले. त्यांचा राष्ट्रीय कवितेशी आलेला संबंध असा आहे. या संदर्भात डॉ. अ. ना. देशपांडे यांचा अभिप्राय मार्मिक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपाचा आहे. ते म्हणतात, "त्यांच्या काळी महाराष्ट्रात जी महत्त्वाची सामाजिक व राजकीय आंदोलने गाजली, ज्यांनी महाराष्ट्रातील लोकांच्या जीवनाला नवे क्रांतिकारक वळण लावले त्यापासून बालकवी आणि त्यांचे काव्य जवळ जवळ अलिप्तच राहिले." [२६]

राष्ट्रकवी विनायक (१८७२–१९०९)

प्रास्ताविक– आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचे युग 'राजा शिवाजी' कर्त्या म. मो. कुंटयांनी सुरू केले असले तरी राष्ट्रीय कवी म्हणून वाचकांना विनायकांचीच ओळख आहे. राष्ट्रीय कवितेचे

देण्याची बुद्धी होते ! अंतःकरणात अशा वेळी उठणाऱ्या क्षणिक स्फूर्तीच्या लहरी सदोदित थरारत्या राखणे ' कवितेचे प्रयोजन ' असते." [२७] हे रहस्य विनायकांच्या प्रतिभेने ओळखले होते. म्हणूनच परंपरेचा गौरव करणाऱ्या ' महाराष्ट्र लक्ष्मी ', ' यापुढे ! ', 'शिवसंदेश', 'दसऱ्याचे सोने', ' दसरा ', 'शिवगीते' यासारख्या कविता त्यांनी लिहिल्या. 'महाराष्ट्र लक्ष्मीत' शेतीचा व्यवसाय करणारे मावळे शेवटी मराठे वीर बनले, अशा पुत्रांच्या मातेचे महाराष्ट्र लक्ष्मीचे यशोगीत गाण्यात आनंद वाटतो, असे कवीने म्हटले आहे. ' पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ' असा आशावादही व्यक्त केलेला आहे. 'हतभगिनीतही' ' होती ती सिंहासनी, भाग्यशालिनी धनी विजयिनी' असे पूर्व वैभवाचे स्मरण आहे. ' जी खनी प्रसवली मणी, या परी जनी बहुगुणी भारी ' असे वर्णन 'या पुढे' या कवितेतूनही आलेले आहे. ' वैभवाची चंचलता ' ही कविताही परंपरेच्या गौरवाचे उदाहरण म्हणून सांगता येण्यासारखी आहे. ' वैभवे नटल्या जयाच्या सौख्य शाला विशाला ' हे वर्णनही तसेच आहे. अशी अनेक उदाहरणे सांगण्यासारखी आहेत. पूर्ववैभवाच्या व पूर्वपरंपरेच्या गौरवाबरोबर ते वैभव नष्ट झाल्याची खंतही विनायकांनी तितक्याच प्रभावीपणे व्यक्त केलेली आहे. 'दसरा', 'दसऱ्याचे सोने', 'हतभागिनी', 'या पुढे' आणि 'प्रोफेसर छत्र्यांचा केसरी' यासारख्या कवितांतून ही खंत आणि पारतंत्र्यासंबंधीची जाणीव विनायकांनी प्रकट केलेली आहे.

' या पुढे ' या कवितेची सुरुवातच,

" कोठचा शिवाजी राजा निजधर्माचा अभिमानी या पुढे "

अशी काहीशी निराशाजनक झालेली आहे. शेवटी कवी म्हणतो,

ऐश्वर्य लयाला गेले । जडले दारिद्र्य कपाळी–यापुढे !
हास्याचे दिन मावळले । आसवे लोचनी आली–यापुढे !

'हतभागिनी' मध्येही पारतंत्र्याची खंत आहे. कवी सांगतो,

"..... कारटी करंटी तिथे, निपजली भुते ! मातृशोणिते –
कल्याण काय नेणती, नित्य भांडती, आपसात ती,
परांवश झाली – स्वत्वाला विसरली ! "

अशा अनेक प्रकारे पारतंत्र्याचा विषाद विनायकांनी व्यक्त केलेला असून त्याची अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत. पण विस्तारभयास्तव अधिक देता येत नाही. उदा. ' प्रोफेसर छत्र्यांचा केसरी ', 'कवी आणि पोपट', 'दसऱ्याचे सोने' या कवितांत ही उदाहरणे आहेत तेव्हा त्यांची केवळ नोंद घेतो.

मातृभूमीबद्दलचे उत्कट प्रेम

एके काळच्या अत्यंत वैभवसंपन्न आणि महाप्रतापी वीरांची परंपरा असलेल्या भारताबद्दल विनायकांच्या अंतःकरणात प्रेम आहे. भारताप्रमाणेच महाराष्ट्रही त्यांना तितकाच प्रिय आहे. 'हतभागिनी' हे चित्र भारतमातेचेच आहे. प्रोफेसर छत्र्यांचा 'केसरी'तील केसरी म्हणजेही ब्रिटिशांच्या गुलामीत असणारा भारत आहे. ' तू विपिनाचा सार्वभौम अधिकारी ' असे भारतालाच उद्देशून कवीने उद्‌गार काढलेले आहेत. ज्या महाराष्ट्र मातेच्या अंगाखांद्यावर खेळलो आणि वाढलो ती ' महाराष्ट्र लक्ष्मी ' कवीला पूजनीय वाटल्यास आश्चर्य नाही. विनायकांनी आपल्या अनेक स्फुट कवितांतून मातृभूमीबद्दलचे प्रेम व्यक्त केलेले आहे. 'प्रो. छत्र्यांच्या केसरी'त कवी म्हणतो,

" निःशंकपणे नरनारी, करितात तुझ्यावर स्वारी,
ये अशी तुला लाचारी, तव कर्णाची निर्भय घरुनी
पाळी, लवविती तुज मुलीबाळी "

ही कविता लाक्षणिक अर्थाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

वर्तमानकालीन घटनांचे प्रतिबिंब

तत्कालीन अनेक राष्ट्रीय घटनांचे प्रतिबिंब विनायकांच्या कवितेत पडलेले असल्यामुळे ती खरीखुरी लोककविता झालेली आहे. ' शिवराजदर्शन ' ' मातृभूमीचे लेणे ' आणि ' गणेशपूजन ' या कविता लाक्षणिक स्वरूपाच्या असून सद्यःस्थितीचे यथातथ्य दर्शन घडविणाऱ्या आहेत. मातृभक्तीच्या लेण्यात लो. टिळकांवरील जनतेची भक्ती आणि श्रद्धा व्यापकपणे प्रकट झालेली आहे. गणेशपूजनमध्ये गणेशोत्सव, पुण्यातील प्लेग, इंग्रज सैनिकांचे अत्याचार, चाफेकर बंधूंनी केलेले इंग्रज अधिकाऱ्यांचे वध, चाफेकर बंधूंना झालेली फाशी, या सर्वच घटनांचे प्रतिबिंब त्या कवितेत पडलेले आहे.

प्रयत्नवाद सांगणारी क्रियाशील आशावादी गीते

' हतभागिनी ', ' या पुढे ', ' दसऱ्याचे सोने ' या कवितांतून नैराश्याचे सूर आळविल्याचे अनेक टीकाकारांनी म्हटलेले आहे. वास्तविक मानवी मनाचे वैचित्र्यपूर्ण खेळ ज्याला माहीत आहे त्यालाच आशानिराशेचा, उन्हाचा नि पावसाचा खेळ असे म्हणता येईल. निखळ निराशावाद विनायकांनीही कुठेच आणलेला नाही. विनायक स्वतः प्रयत्नवादी तसेच आशावादी आहेत. ' यत्न तो देव जाणावा ' या सिद्धान्तावर विनायकांची दृढ श्रद्धा आहे. कधी कधी प्रसंगवशात निराशा, माणसाच्या मनाचा ताबा घेते हे खरे असले तरी ती खऱ्या कर्मयोग्याची प्रकृती नव्हे. कारण विनायक लो. टिळकांचे अनुयायी आहेत. टिळकांच्या तत्त्वज्ञानाचे संस्कार त्यांच्या मनावर पक्के आहेत. ' शिवसंदेश ' ही त्यांची कविता गीताधर्म सांगणारी आहे. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या मुखी कवीने घातलेले उद्‌गार पुरेसे बोलके आहेत. तो म्हणतो,

" साहेना परबंधनात पडली माझी महाराष्ट्रभू,
केला यत्न, निमित्त केवळ तया मी; साह्य झाला प्रभू ! "

' शिवदर्शन ' या कवितेतही विनायक हेच सांगतात,

किंवा गणेशपूजनमधल्या

" पुष्प एक वाहून टाकिले आहे चाफ्याचे
दुसरे मिळवावयास जाऊ करूं उद्यमाला । "

या पंक्तीतूनही प्रयत्नवादच प्रकट झालेला आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे विनायकांनी गीताधर्म-प्रणीत निष्काम कर्मयोगाचे तत्त्वज्ञान सांगणारी आशावादाची गाणीच अधिक गायिली आहेत.

नैराश्यापेक्षा निष्क्रियतेवर रोष– विनायकांचा मुख्य रोख आहे नैराश्यापेक्षाही निष्क्रियतेवर. काहीही प्रयत्न न करता केवळ बडबड करणाऱ्यांवर त्यांनी शब्दांचे आसूड ओढलेले आहेत. लोकांच्या निष्क्रियतेचा त्यांना संताप आलेला दिसतो. ' शिवसंदेश 'मधील शिवाजी महाराजांच्या मुखी जी वचने त्यांनी घातली आहेत तीमधूनही त्यांचा हा संताप व्यक्त होतो. शिवाजी महाराज म्हणतात,

" स्वातंत्र्यास्तव कां उगाच करिता हा आरडा ओरडा
देशाचा अभिमान सर्व तुमचा माते दिसे कोरडा ॥ "

'दसरा' या कवितेतील उपहास तर अत्यंत जळजळीत आहे. ज्या पराक्रमी वीरांनी राष्ट्राला वैभव दिले, स्वातंत्र्य दिले आणि एक परंपरा निर्माण केली त्यांचे वंशज म्हणण्याला आम्ही खरोखर योग्य आहोत काय ? असा कवीने सवाल केला आहे. तो म्हणतो,

"आम्ही हिरे तयांचे कुळी । जैसी ज्योतीला काजळी ॥"...

पुढे कवी म्हणतो,

"आम्ही झालो घरकोंबडे । विणितो शब्दजाल कोरडे
शब्दांचे वादळ 'कृतीविण' फिके पडे
आमचेच वर्तन अम्हा नित्यशा नडे"

दुसऱ्या कवितेत विनायक म्हणतात,

"स्ववांधवांचे गळे नृपास्तव
कापिती, जे नीच मती
त्यांना बढती मिळते जगती ॥"

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे निष्क्रियतेवर, नेभळघा वृत्तीवर आणि स्वार्थी वृत्तीवर विनायकांनी टीका केलेली आहे. लोकजागृती करावयाची तर कधीकधी त्यांच्या डोळ्यांत अंजन घातलेच पाहिजे हा त्यामागील विनायकांचा हेतू आहे.

राष्ट्रभक्तांचा देवदुर्लभ गौरव– केवळ देशभक्तच या गौरवाचे खरेखुरे वाटेकरी आहेत असे विनायकांचे मत आहे. १९०८ साली प्रो. शि. म. परांजपे तुरुंगात वारल्याची अचानक अफवा पसरली ग यावेळी विनायकांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रभक्तांचा गौरव करणारे सुंदर पद रचले.

"देवघरासम पूज्य मानिती देशभक्त बंधनस्थले,
देशभक्त ज्या चढे सुळावर जयस्तंभ ते उभारले,
अंगारा लाविती चितेचा देशभक्त जीवरी जळे !
देशभक्त यश गाउन कवी धन्य जाहले भले भले !"

'देशभक्तांचा अपूर्व सोहळा' वर्णन करताना कवी म्हणतात,

"देशभक्ता प्रासाद बंदिशाला
शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत दे अमरता उदंड !"

देशभक्तांचे सामर्थ्य अचाट असते असे एका स्फुट कवितेत विनायकांनी सांगितले आहे. ते म्हणतात,

"स्वदेश भक्तांच्या नावाने
सजली कारागृहे स्मशाने
अवलोकन करणे नयनाने–सार्थक जन्माचे ॥"

अशी अनेक उदाहरणे देता येण्यासारखी आहेत.

पारंपरिक निष्ठापूजन

लोकमान्यांच्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने पुनरुज्जीवनाची प्रक्रिया संपूर्ण भारतात जोराने सुरू केली. त्या आधीचे पुनरुज्जीवनाचे स्वरूप बरेच मंद होते. या पुनरुज्जीवनाचे प्रवर्तन पारंपरिक निष्ठा-

पूजनातून होत असल्याने त्यांनी 'सार्वजनिक गणेशोत्सव' आणि 'शिवाजी उत्सव' यांना चालना दिली. सिद्ध विनायक, बुद्धिहेरंब, विघ्नहर्ता गजाननाचे पूजन सामाजिक ऐक्याला उपकारक ठरले तर 'शिवाजीच्या उत्सवाने' स्वाभिमानाची भावना लोकांत निर्माण झाली. शिवाय शिवाजी नुसता इतर राजांसारखा सत्ताधीश नव्हता तर धर्म, न्याय, नीतीने चालणारा असा युगपुरुष होता. त्याचे जीवनही पारंपरिक निष्ठांनीच संपन्न झालेले होते. स्वत: लोकमान्यही या निष्ठांचे मूर्तिमंत प्रतीकच होते म्हणूनच विनायकांनी आपल्या राष्ट्रीय कवितांत पारंपरिक निष्ठापूजनाला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे.

ईशपूजा– ईशपूजन अनेक कवींनी केलेले आहे. केशवसुत नि मर्ढेकरही त्याला अपवाद नाहीत. स्वत: विनायकही ईश्वर निष्ठच होते. गणपतीच्या मेळ्यातील पदे त्यांनी रचली त्याचप्रमाणे; 'ईशस्तवन', 'दत्तदर्शन', 'गणेशपूजन', 'परापूजा', 'सत्य दिव्यशान्त', 'गाण्याचे गाणे'; 'आर्या', 'आत्म्याचे मंदिर', 'विश्वांगस्थल', 'विश्वकारागार', 'भोग मुक्ती' यासारखी कविता, पदे लिहून पारंपरिक निष्ठापूजन केलेले आहे. या निष्ठापूजनातूनच त्यांनी राष्ट्रीय जागृतीही केलेली आहे. 'गाण्या'चे गाणे या कवितेतील एकच उदाहरण देतो.

" वास करावा ऐशा स्थानी । फलपुष्पांची गावी गाणी
यत्न करावा जेणे ध्यानी । ईशरूप बाणे "

'गणेशपूजन' या कवितेतील लाक्षणिक पंक्ती सर्वपरिचित आहेत.

धर्म–नीती–न्याय या आदर्शांची शिकवण

'धर्म' या जीवनव्यापी तत्त्वावर विनायकांची अत्यंत निष्ठा होती म्हणूनच

" धर्म असे जगताची वंद्य माउली
मनुजावर करि तो सुरवृक्ष–साउली "

असे धर्माचे यथार्थ वर्णन विनायकांनी केलेले आहे. 'ध्यास तो भास' हे विनायकांचे कथाकाव्य तर धर्मतत्त्वाची शिकवण देणारे उत्कृष्ट उदाहरण आहे. दुसऱ्या एका कवितेत विनायक सांगतात,

" जन्मभूमि ही मातृदेवता । स्वधर्म अपुला तात–
संरक्षावे निशिदिनी त्याते । शिर घेऊन करात !"

धर्माभिमानी स्त्रीपुरुषांचा विनायकांनी आपल्या राष्ट्रीय कवितांतून वारंवार गौरव केलेला आहे. त्याचप्रमाणे नीतिमान देशभक्तांनाही गौरविले आहे.

" सज्जन जे निज देशहिताला तनुमनधन अर्पिती
यशोगायनी त्यांच्या व्हावी विनायकाला रती " किंवा
" परनारी जननीसम गौरवीपरी । भूलोकी ऐसा जन कोणता असे ?"

असे उदात्त नीतीचे उदाहरण दिलेले आहे. जिथे आस्तिकता, धर्म आणि नीती ही तत्त्वे वास करतात तिथे न्याय हटकून असतोच. या न्यायाचे तत्त्वही पारंपरिक निष्ठापूजनात विनायकांनी अनेक ठिकाणी सांगितले आहे.

विनायकांची ऐतिहासिक कथाकाव्ये

पारंपरिक निष्ठापूजन आणि वीर विभूतिपूजन असे दुहेरी कार्य विनायकांनी ऐतिहासिक कथाकाव्ये लिहून साधले आहे. 'अहल्या', 'पन्ना', 'पद्मिनी', 'राणी दुर्गावती', 'संयोगिता'

'तारा', 'कृष्णाकुमारी' आणि 'वीरमती' या ऐतिहासिक स्त्रियांवर रचलेली ही आठ कथाकाव्ये म्हणजे पारंपरिक निष्ठापूजनाची आदर्श अशी सजीव चित्रेच आहेत. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की विनायकांनी ही गीते १९०५ सालीच लिहिली आहेत. या कथागीतांकडे विनायक वळले तो केवळ अद्‌भुत रम्यतेच्या, सौंदर्यपूजनाच्या किंवा भूतकाळात रमण्याच्या हेतूने नव्हे तर महत्त्वाच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या जाणिवेने हे लक्षात घेतले पाहिजे. ही गीते लिहून विनायकाला स्त्रीदाक्षिण्य दाखविता आले आणि ऐतिहासिक काळाबद्दल वाटणारे गूढ आकर्षणही काही प्रमाणात पूर्ण करता आले असेल पण तो त्यांच्या या कथाकाव्याच्या निर्मितीमागील हेतू नव्हता हे खास ! ही गीते लिहिण्यामागे विनायकांची राष्ट्रीय दृष्टी होती. देश, धर्म, स्वातंत्र्य, नीती, न्याय इत्यादी निष्ठांसाठी, त्यागासाठी आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्या रमणींची निवड विनायकांनी आपल्या 'बोधवादी' म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या या गीतांसाठी केली हे विसरता येत नाही.

विनायकांनी हेतुपूर्वक या कथाकाव्यांची निर्मिती केली. १९०५ साली आपले मित्र गोविंद पांडुरंग देवधर यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात विनायक लिहितात, "काही विशिष्ट हेतूने मी काही उपाख्याने लिहिली आहेत व ती अशा क्रमाने प्रसिद्ध होत आहेत. १ जुलै–'व्यास तो भास', १ ऑगस्ट 'गणिकोद्धार', ३ सप्टेंबर 'वीरमती' ४ ऑक्टोबर–'मोहानंतर', ५ नोव्हेंबर 'स्वत्व रक्षण'. हल्लीच्या लोकस्थितीत काही विशेष बोध काव्याद्वारा व्हावयास पाहिजे आहे असे मी समजतो. तिकडे माझ्या बहुतेक कविबंधूंचे अलक्ष दिसते. ती उणीव दूर व्हावी म्हणून या उपाख्यानांचा जन्म आहे...अशा काही कथा माहीत असल्यास मला कृपेने कळवा."[२८]

एखाद्या प्रेषिताचा आव आणून मला अमूक अमूक घडवून आणावयाचे आहे असे विनायकांनी म्हटलेले नाही पण या कथाकाव्याची निर्मिती करण्यामागे त्यांची निश्चित भूमिका होती हे वरील अवतरणावरून स्पष्ट होते. विनायकांच्या या कथाकाव्यामागील भूमिका स्पष्ट करताना कवी ना. के. बेहरे म्हणतात, देशातील स्त्रियांनी भारतमातेच्या मुक्ततेसाठी आपल्या पतींना व पुत्रांना इतिहास-प्रसिद्ध रमणींप्रमाणे आनंदाने जाण्याची आज्ञा द्यावी व वीरमाता, वीरपत्नी व वीरकन्या स्वतःला म्हणवून घ्यावे, त्यांना आपल्या प्रेमाच्या मोहात न गुंतवता आपण त्यांना यश चिंतावेच परंतु त्याशिवाय वनेल तो कार्यभाग आपणही उचलावा, या उद्देशानेच विनायकांनी या जुन्या सर्वपरिचित ऐतिहासिक गोष्टी गोड चालीत व नीटनेटक्या शब्दांत गुंफून सादर केल्या आहेत."[२९]

बोधवादाची गाणी

'अहल्याबाई होळकर' या गीताला विनायकांनी पुढील छोटेसे प्रास्ताविक जोडलेले आहे. "खालील गाणे प्रसिद्ध शूर व साध्वी स्त्री श्रीमती अहल्याबाई होळकर याजवर रचिले आहे. या देवी अहल्येचे ऐतिहासिक वृत्त सर्वश्रुतच आहे. आपल्या देशात भूषणभूत झालेल्या या स्त्रीरत्नांचा इतिहास आपल्या मुलीबाळींच्या तोंडी बसावा म्हणून प्रस्तुत गाणे रचिले आहे." विनायकांची पन्ना सांगते,

"धर्म असे सेवकाचा स्वामीचे रक्षण
त्यासाठी करावें की जीवितही अर्पण"

विनायकांची 'पद्मिनी' अशीच कर्तृत्ववान आणि चतुर आहे.

"करि चातुर्ये जी बंधमुक्त नाथाला
पद्मिनी असे ती पात्र धन्यवादाला"

राणी 'दुर्गावतीचे' चरित्र गाताना विनायक म्हणतात,

"वीर शालिनी धन्य धन्य ती राणी दुर्गावती
सत्कीर्तिध्वज जिचा फडकतो आजवरी भारती"

लंपटमती पुरुषांचा पराभव आणि नाश अटळ असतो असे राणी दुर्गावतीच्या कथेतच कवीने सांगितले आहे.

"स्त्री भूषण–जीवन–संसाराचे खरे
परि, परिमित सेवन तिचे करावे बरे
अतिलुब्ध न व्हावे तीच्या ठायी नरे,
स्त्रीच्या ठायी दलपत सम जो होतो लंपट मती
जीवित्वाला–सर्वस्वाला–मुकतो तो शेवटी ॥"

पुरुषवेष परिधान करून पतीच्या सहाय्यार्थ लढणारी 'संयोगिता,' आपल्या वडिलांना विचारते,

"धर्म जनक हा जन्म भूमिका मातृदेवता
तया कां यवन करी अर्पिता ?...
करण्यास्तव निजदेश धर्म संरक्षण । संगरी करावे जीवितही अर्पण
नरजन्म सफलता अन्य नसे याहून."

राष्ट्रीय वीर रमणींवरील विनायकांनी रंगविलेली बोधवादी कथाकाव्ये आणि त्यातील अनेक बोधवचने आपण पाहिली आहेत. मात्र या कथाकाव्यांसंबंधी प्रो. वा. ब. पटवर्धन यांनी दिलेला अभिप्राय मोठा मार्मिक असल्याने तो सांगितल्याशिवाय विनायकांच्या हेतूची पूर्तताच होत नाही. प्रो. पटवर्धन म्हणतात, "महाराष्ट्रातील पुरुषांपेक्षा स्त्रियांवरच त्यांच्या आशेची भिस्त अधिक असेल. कदाचित पुरुष चुकले, भुलले तर भुलोत बेटे, त्यांना ताळ्यावर आणायला, त्यांचे डोळे उघडायला महाराष्ट्रातील स्त्रिया तरी स्वतःचे ओज, स्वतःचे शील आणि स्वतःचे स्वत्व सांभाळून राहोत ही त्यांची उत्कट इच्छा असेल." [३०]

कथाकाव्ये आणखी एका अर्थाने महत्त्वाची आहेत. समाजात संस्कृतीची परंपरा जोपासण्याचे आणि संवर्धनाचे कार्य प्रामुख्याने स्त्रियांनीच केलेले असल्याने विनायकांची कथाकाव्ये त्या कार्याला पूरक अशीच आहेत आणि शिवाय रंजकही आहेत.

विनायकांच्या राष्ट्रीय कवितेचे कलात्मक स्वरूप

एखादी शीलचारित्र्यसंपन्न युवती कमनीय सौंदर्याची असेल तर तिचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावी ठरू शकते. आशयघन, बोधवादी कवितेचेही तसेच आहे. तिला कलेचे वावडे नसते. उत्तम प्रकारची राष्ट्रीय कविता आशय आणि कलात्मकता या दोन्ही अंगांनी संपन्न असते, कारण अशी कविताच वाचकांच्या मनाची पकड घेते आणि त्याला प्रभावित करते. राष्ट्रीय भावनांचे जागरण, पोषण आणि उन्नयन करणे हे राष्ट्रीय कवितेचे महत्त्वाचे कार्य असले तरी तिच्या अभिव्यक्तीचे अंगही तितकेच कलात्मक आणि आकर्षक असावे लागते. किंबहुना राष्ट्रीय कविता तिच्या आविष्कारामुळेच प्रभावी ठरते. अंतःकरणात उत्कट राष्ट्रभक्तीची भावना असल्याने त्यांच्या राष्ट्रीय कवितेची अभिव्यक्तीही जोरकस आणि प्रभावी झालेली आहे. विनायकांची कथाकाव्ये देखील

अतिशय जिवंत, रसरशीत आणि आशयसंपन्न आहेत. सरलता, उत्कटता, अर्थगर्भता, सूचकता आणि शब्दयोजकता यामुळे ती चटकन् वाचकांच्या अंतःकरणाची पकड घेतात. लौकिक जीवनातील सुख-दुःखांचे, आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब त्या कवितांत पडलेले असल्याने त्यांच्या आस्वादकांचे क्षेत्रही व्यापक आणि विशाल आहे.

विनायकांच्या काव्यगुणांसंबंधी विद्वान समीक्षक प्रा. म. ना. अदवंत म्हणतात, "विनायकांच्या प्रतिभेला कथात्मक निवेदनाचे माध्यम विशेष मानवते. सहज शैली व बोधप्रधानता या प्रकारच्या काव्याला अनुकूल आहे. त्यांच्या शैलीतील नाटचालाही याच प्रकारच्या काव्यात विशेष अवसर मिळतो व कल्पनाविलासालाही अधिक वाव मिळतो."[३१] प्रा. कृ. ब. निकुंब यांचा अभिप्रायही प्रा. अदवंतांसारखाच आहे. ते म्हणतात, "त्या त्या व्यक्तीच्या चरित्रातील निवडक घटना विनायक सफाईने सजीव करतात. तिच्या कर्तृत्वाचा अंतःकरणपूर्वक गौरव करतात. ती ती चरित्रलेखा गतिमानपणाने अगदी एखाद्या चलचित्रपटाच्या आवेगाने सलगपणे उभी करतात... गतिमानते-बरोबरच त्यांच्या निवेदनात विलक्षण सहजताही आहे."[३२] श्री. ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, "केशवसुतांच्या वाणीतील ओज आणि आवेश हे गुण जर त्यांच्या समकालीनांतील अन्य कोणत्या कवीच्या वाणीत प्रत्ययाला येत असतील, तर ते फक्त विनायकांच्या."[३३] आधुनिक मराठी काव्याचे मर्मज्ञ टीकाकार प्रा. रा. श्री. जोग म्हणतात. "केवळ पूर्ववैभवाच्या स्मरणावरच त्यांनी केव्हाच भर दिला नाही. त्यापुढील कित्येक राष्ट्रीय कवींच्या शब्दांच्या जंजाळातून जी तळमळ व्यक्त होत नाही, ती विनायकांच्या साध्या पण हृदयास भिडणाऱ्या शब्दांमधून प्रत्ययाला येते. शब्दजंजाळाकडे विनायकांचे केव्हाच लक्ष नव्हते."[३४] डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "टिळकभक्तीपर कविता पुष्कळच लिहिल्या गेल्या, पण विनायकांच्या कवितेत स्वाभिमानी राष्ट्रावादाचा जसा स्पष्ट व आवेशपूर्ण आविष्कार झालेला आहे तसा त्या कवितांतून झालेला नाही."[३५] असाच अभिप्राय प्रा. भ. श्री. पंडितांनीही दिलेला आहे.

या सर्व नामवंत टीकाकारांचे विनायकांच्या राष्ट्रीय कवितेच्या कलात्मकतेसंबंधीचे अभिप्राय एकत्र लक्षात घेतले म्हणजे कलात्मकतेची विनायकांची बाजू गुणसंपन्न आहे असे निःशंक म्हणता येते. अनेकदा बोधवादी कविता नीरस, रटाळ, शाब्दिक जंजाळात गुंतणारी असते परंतु विनायकांच्या बोधवादी कवितेच्या संदर्भात हा तर्क सपशेल खोटा ठरतो.

राष्ट्रीय कविता या दृष्टीने मूल्यमापन

'आधुनिक चारण अथवा शाहीर' असा गौरवपूर्ण किताब बहाल करणारे प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, "..... विनायक कवींना आधुनिक राष्ट्रीय कवितेचे प्रणेते असे समजण्यात येते. पूर्वजांच्या वैभवाचे व पराक्रमाचे गायन, ऐतिहासिक व्यक्तींचे चरित्रवर्णन, आजच्या दुःस्थितीबद्दल शोक आणि नवीन पराक्रमाला प्रोत्साहन इत्यादी गोष्टी राष्ट्रीय काव्य या शब्दांनी आज व्यक्त होतात. विनायक कवींनी इतर गोष्टी केल्या तरी नवीन पराक्रमाला प्रोत्साहन देणे त्यांच्याकडून थोडेच झाले."[३६] या अभिप्रायाचे स्वरूप समतोल व मार्मिक असले तरी ज्या विशिष्ट राष्ट्रवादी विचारसरणीचा स्वीकार करून तिचा आपल्या काव्यातून पुरस्कार केला त्यासंबंधी उल्लेख आढळत नाही. पण प्रा. पंडित आणि डॉ. अ. ना. देशपांडे यांनी विवेचन करताना त्या प्रभावाचे विवेचन केलेले आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "वैभवशाली आणि पराक्रमी पूर्वजांच्या-बद्दल अभिमान जागृत करून जनमनात राष्ट्राभिमानाची ज्योत चेतविणाऱ्या विनायकांनी आपल्या

कवनाद्वारे जो प्रयत्न केला तो टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाशी पूर्णपणे जुळणारा असाच होता." [३७] विनायकांवरील 'केसरी' आणि 'काळ' या वृत्तपत्रांचा प्रभाव सांगताना प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, "या दोन्ही पत्रांचा विनायकांच्या मनावर विलक्षण असर पडला होता. लोकमान्यांनी आरंभिलेल्या गणेशोत्सव आणि शिवजयंती या सार्वजनिक उत्सवांत ते जातीने भाग घेत असत व या उत्सवांतील मेळ्यासाठी त्यांनी पदे लिहिली आहेत." [३८] प्रा. ना. के. बेहरे यांनीही "विनायकाला ही झालेली स्फूर्ती लोकमान्य टिळकांच्या सिंहगर्जनांनी झाली हे उघड आहे," [३९] असा प्रा. पंडितांसारखाच अभिप्राय दिलेला आहे.

हे तीनही अभिप्राय लक्षात घेतले म्हणजे वर्तमानाकडे विनायकांचे लक्ष नव्हते किंवा स्वातंत्र्याच्या चळवळीची त्यांना माहिती नव्हती हा प्रा. कृ. व. निकुंबांचा आक्षेप तितकासा योग्य वाटत नाही. नवीन पराक्रमाला प्रोत्साहन देण्याचे कार्य विनायकांकडून होऊ शकले नाही अशा आशयाचा जो अभिप्राय प्रा. रा. श्री. जोगांनी दिलेला आहे आणि त्याचा पाठपुरावा करण्यासाठी स्वा. सावरकर आणि कवी गोविंद यांची उदाहरणे दिलेली आहेत ती योग्य असली तरी विनायकांना न्याय देणारी ठरत नाहीत. कारण विनायक हे राष्ट्रीय भावनांची उत्कटतेने अभिव्यक्ती करणारे कवी आहेत आणि स्वा. सावरकर व कवी गोविंद सशस्त्र क्रांतीचे राजकारण करणारे जहाल राष्ट्रवादी नेते आणि कवी आहेत. दोघांच्याही व्यक्तिमत्त्वातील हे अंतर लक्षात घेणे आवश्यक आहे.

विनायक ज्या काळात राष्ट्रीय भावनांनी रसरसलेली राष्ट्रीय कविता लिहीत होते त्याच काळात त्यांचे समकालीन अनेक कवी आत्मनिष्ठेच्या आकर्षक वर्तुळात भ्रमण करीत होते. सौंदर्यपूजनाच्या नावाखाली स्त्री-पुरुषप्रणयाची आणि गूढगुंजनाची स्वप्निल गीते गात होते. राष्ट्रजागृतीचे कार्य करण्याच्या हेतूने काव्याचे साधन घेऊन विनायकच खंबीरपणाने एकटे पुढे आले म्हणून या संदर्भातच त्यांचे कालकर्तृत्व आणि मोठेपण ठरविले पाहिजे आणि मान्य केले पाहिजे.

इंग्रजीवरून रूपांतरित केलेल्या नाटकात विनायकांनी एक पद रचलेले असून ते त्यांनी १९०७ सालच्या जळगाव येथील कविसंमेलनात एका खाजगी बैठकीत म्हणून दाखविले होते. त्या पदातून विनायकांनी आपल्या काव्यासंबंधी अभिमानाचे व आत्मविश्वासाचे उद्‌गार काढलेले आहेत. ते त्यांच्यावरील आक्षेपांचाच संपूर्ण निरास करणारे आहेत. विनायक म्हणतात,

"धिग् धिग् जो देशाचे । गाई गीत अपयशाचे ।
मी निज देश यशोगानी । वाहिली असे सदा वाणी ।
माझी प्रोत्साहक गाणी । पडता ओझरती कानी ।
स्फुरती वीरांचे बाहू । म्हणति स्त्रिया रणि जाऊ." [४०]

ऽऽ

राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाचा आणि कृतीपरतेचा कालखंड
अथवा
राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग (१९०५ ते १९२२)

प्रास्ताविक

राष्ट्रीय जागृतीच्या दुसऱ्या कालखंडाकडून राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाच्या आणि कृतीपरतेच्या कालखंडाकडे आता वळायचे आहे. एका अर्थाने लोकमान्यांच्या विचारांच्या प्रभावाचाही हा कालखंड आहे. भारतीय असंतोषाचे जनक, तेल्यातांबोळ्यांचे पुढारी आणि अखिल भारतीय नेतृत्वाची पदवी लो. टिळकांना याच कालखंडात मिळाली आहे. परकीय ब्रिटीश सत्तेचे जुलुमी, अन्यायी, अत्याचारी आणि खुनशी स्वरूपही भारतीय जनतेला याच कालखंडात प्रतीत झालेले आहे. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी शक्तीला धक्के देण्याचे, या सत्तेविरुद्ध प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाल्याचे, दृश्यही याच कालखंडात दिसून आलेले आहे.

या कालखंडाची राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी

इ. स. १९०४–१९०५ या काळात रशिया जपान युद्ध होऊन झारच्या साम्राज्यवादी रशियाचा चिमुकल्या जपानने केलेला पराभव ही महत्त्वाची घटना आहे. जपानच्या या विजयाने सर्व आशियातील देशांत उत्साहाची आणि चैतन्याची लाट उसळली. भारतासारख्या पारतंत्र्यात असलेल्या देशालाही स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची हिम्मत आली आणि आत्मविश्वासही वाढला. १९०५ नंतरच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या राजनीतीत आणि धोरणात आमूलाग्र परिवर्तन झाले. मवाळांची अर्जविनंत्यांची नीती जहालांना मान्य नव्हती. ब्रिटिशांच्या न्यायी बुद्धीवर त्यांचा विश्वासच राहिला नाही.

बंगभंगाच्या ब्रिटिशांच्या कृतीने सारा देश पेटून उठला

लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी जाहीर करताच देशात आधीच खदखदत असलेल्या असंतोषाच्या आगीत तेल पडले. संपूर्ण देशात बंगभंगाविरुद्ध चळवळ सुरू झाली. बंगालमधील बारिसाल येथे भरलेल्या परिषदेतील निःशस्त्र लोकांची डोकी ब्रिटीश अधिकाऱ्यांनी फोडून काढली. या चळवळीच्या निमित्ताने लो. टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार ही आपली चतुःसूत्री देशापुढे ठेवली. स्वदेशी व्रत, परदेशी कपड्यांचा त्याग, नोकऱ्यांचे राजिनामे, सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार असा असहकार आणि विरोध सुरू झाला. सुशिक्षित तरुण उघड उघड राजद्रोहाकडे आणि सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही सशस्त्र क्रांतिकारकांची गुप्त

संघटना अस्तित्वात आली. महाराष्ट्रात, 'अभिनव भारत' आणि पंजाबमध्येही अशीच गुप्त संघटना अस्तित्वात आली. दिल्ली, उत्तरप्रदेशही त्यात सामील झाले. बॉम्बचे आणि पिस्तुलांचे आवाज देशात घुमू लागले, भूपेंद्रनाथ दत्त, बारिन्द्र घोष, खुदीराम बोस, प्रफुल्लकुमार चाकी, सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा इत्यादी क्रांतिकारक त्यात सहभागी झाले होते.

राजद्रोहाचे खटले आणि दडपशाही

इ. स. १९०७ मध्ये इतिहासप्रसिद्ध सुरत काँग्रेस जहाल आणि मवाळांच्या भांडणाने गाजली, विभागली गेली आणि जहाल गटाचे नेतृत्व पूर्णपणे लो. टिळकांकडे आले. १९०८ मध्ये किंग्ज फोर्डच्या वधाच्या अभियोगात वंगवीर खुदीराम बोस आणि प्रफुल्ल चाकी हे फासावर गेले. सशस्त्र क्रांतिकारकांना दडपून टाकण्यासाठी ब्रिटीश सत्तेने देशभक्तांच्या अटकेचे, झडत्यांचे आणि जप्तीचे शस्त्र उगारले. वृत्तपत्रांवरील निर्बंधाचे निमित्त करून राजद्रोहाच्या खटल्यात टिळकांना हद्दपारीची व सहा वर्षांची काळ्या पाण्याची कठोर शिक्षा ठोठावली. लाला लजपतराय यांना हद्दपार करण्यात आले. चिंदबरम् पिल्ले, बाबू अरविंद घोष, बाबू बिपिनचंद्र पाल यांनाही शिक्षा झाल्या. पुन्हा देशात संतापाची लाट उसळली. मुंबईच्या गिरणी कामगारांनीही लोकमान्यांच्या शिक्षेचा निषेध करण्यासाठी उत्स्फूर्तपणे दोन दिवस संप करून आपला असंतोष प्रकट केला.

स्वराज्याच्या अमर मंत्राची घोषणा

१९०९ चा मोर्लेमिंटो सुधारणा कायदा, पहिले जागतिक महायुद्ध, १९१० मध्ये मुस्लिम लीगची स्थापना, १९१४ मध्ये लोकमान्यांची मुक्तता, सावरकर बंधूंवरील खटले आणि शिक्षा, युद्धात ब्रिटिशांना सशर्त सहकार्य देण्याची टिळकांची घोषणा, टिळकांचा मुस्लिम पुढाऱ्यांशी १९१६ मध्ये लखनऊ करार, होमरुलची प्रसिद्ध चळवळ, 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या अमर मंत्राची घोषणा, रशियन राज्यक्रांती, शेतकरी कामगारांचे लोकसत्ताक राज्य अस्तित्वात आले. १९१९ मध्ये रौलट अँक्टचा वापर व दडपशाही, १३ एप्रील जालियनवाला बाग हत्याकांड, चिरोल केस, टिळकांचे इंग्लंडहून आगमन आणि निधन, गांधीजी देशाचे नेते झाले.

अस्सल राष्ट्रीय कवितेचा कालखंड

या कालखंडाची राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी आतापावेतो विस्तृतपणे आपण पाहिलेली आहे. या कालखंडातील एकूण वातावरण क्षोभदायक आणि स्फोटक स्वरूपाचे आहे. अंतःकरणात विशिष्ट राजकीय वा सामाजिक परिस्थितीमुळे क्षोभ होणे वेगळे आणि त्या आवेगाचे निश्चयात रूपांतर होऊन त्याचे कृतीत रूपांतर होणे वेगळे. पारतंत्र्यासंबंधी चीड भारतीय जनतेच्या अंतःकरणात पूर्वीही होतीच पण ती प्रथमच कृतीच्या द्वारे याच कालखंडात व्यक्त झाली. हजारो व्याख्यानांनी व सहस्रावधी लेखांनी जी जागृती झाली नसती ती सशस्त्र क्रांतिकारकांच्या एका बलिदानाने करून दाखविली. आपल्या दिव्य त्यागाने, हौतात्म्याने या कालखंडातील भारताला त्यांनी नवसंजीवन दिले. नव्या अस्मितेचा, नव्या शक्तीचा साक्षात्कार याच कालखंडात भारतीयांना झाला. संपूर्ण देशातील ही अभूतपूर्व जागृती पाहूनच 'एक वर्षात स्वातंत्र्य' संपादन करण्याचा आपला अपूर्व संकल्प याच कालखंडात महात्माजींनी जनतेला बोलून दाखविला.

याच काळात ब्रिटीश सत्तेला भूकंपासारखे शेकडो धक्के बसले आणि या बसणाऱ्या धक्क्यांतून सावरण्यासाठी आणि आपली सत्ता टिकविण्यासाठी दशहतवादापासून, जुलूम, अत्याचार भेदनीती-

पर्यंतचे सर्व उपाय त्यांनी अधिक प्रमाणात याच कालखंडात अमलात आणले. स्वातंत्र्याच्या आंदोलनापासून भारतीयांनी परावृत्त व्हावे यासाठी झडत्या, जप्त्या, दंड, सक्तमजुरी, हद्दपारी, काळेपाणी, फाशी असे एकापेक्षा एक भयंकर दहशतवादी दडपशाहीचे उपायही अत्यंत निर्दयपणाने अमलात आणले. नवे नवे कायदे करून विचार, लेखन, भाषण, कृती आदी स्वातंत्र्यांचीही मुस्कटदाबी केली, अनेक प्रकारचे निबंध आणून विविध प्रकारचे साहित्य जप्त करण्यात आले. या सर्व दडपशाहीचा परिणाम दुहेरी स्वरूपाचा झाला. या परिस्थितीतही काहींची काव्यनिर्मिती अव्याहत सुरू राहिली. तर काहींची अजिबात बंद झाली. मात्र या कालखंडातील सर्वच प्रकारच्या साहित्याचा, काव्याचा दर्जा असामान्य असाच असल्याचे दिसून येते. जिला शंभर नंबरी अस्सल राष्ट्रीय कविता म्हणता येईल अशा कवितेची निर्मिती प्रामुख्याने याच कालखंडात झाली. महाकवीची प्रतिभा असलेल्या कवींचा साक्षात्कार भारतीयांना आणि जगालाही याच कालखंडात झाला.

राष्ट्रकवी 'बी' उपाख्य नारायण मुरलीधर गुप्ते
(जन्म १८७२ मृत्यू १९४७)

टीकाकारांचा काव्यसापेक्ष दृष्टिकोन

'बीं' चे पहिले रसिक टीकाकार वा. ना. देशपांडे, 'फुलांच्या ओंजळीला' विस्तृत, विद्वत्तापूर्ण आणि रसोद्ग्राही प्रस्तावना लिहिणारे आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. म. वा. धोंड, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित या सर्वांनी 'बीं' ना कलावंत, तत्त्वज्ञ, सौंदर्यवादी, 'अभिजात कवी' अशाच शब्दात गौरविले आहे. 'बीं' च्या काव्यदृष्टीच्या आधारेच या टीकाकारांनी हे मत मांडलेले आहे. परंतु 'बीं' च्या काव्यसृष्टीचा विचार जसा त्यांच्या काव्यदृष्टीच्या आधारे करता येतो तसाच तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आधारेही करता येतो. आणि तसा विचार केला तर 'बीं'च्या काव्यात एक नवे परिमाण असल्याची व त्यांची कविता प्राधान्याने वस्तुनिष्ठ का झाली याची साक्ष पटू शकते.[१]

कुसुमावतीबाई देशपांडे यांनी सांगितलेले सूत्र

व्यक्तिमत्त्वाच्या आधारे काव्याचा अभ्यास करण्याचे एक मार्मिक सूत्र कुसुमावतीबाई देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे सांगितलेले आहे. (१) "कलावंताची जीवनाकांक्षा ही त्याची सर्वात प्रभावी शक्ती असून ती त्याच्या सर्व क्रियाशीलतेचे मूळ आहे. या प्रभावी जीवनाकांक्षेच्या शक्तीतून, त्याच्या जीवन जगण्याच्या धडपडीतून त्याचे ज्ञान, कला, शक्ती, धर्म, ईश्वर आणि त्याची सौंदर्यविषयक कल्पना या साऱ्यांची निर्मिती होते." [२] (२) "ही जीवनाकांक्षा युगधर्मापासून वेगळी राहू शकत नसल्यामुळे त्या युगधर्माचे तत्त्व समजावून घेऊनच तिचे मूल्यमापन केले पाहिजे."[३]

'बी' हे स्वातंत्र्यवादी कवी आहेत

जरा सूक्ष्मपणे 'बीं' च्या जीवनाचा व काव्याचा विचार केला तर 'बीं' ची स्वातंत्र्य हीच जीवनाकांक्षा होती असे निश्चितपणे म्हणता येते. 'बी' हे स्वातंत्र्यवादी कवी आहेत हे आचार्य अत्र्यांनीही प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. "मात्र हे स्वातंत्र्य आपल्या राष्ट्रापुरते किंवा समाजापुरते आकुंचित स्वरूपाचे स्वातंत्र्य नाही." अशी अत्र्यांनी त्याला पुस्ती जोडली आहे. 'बी' च्या कवितांचा अभ्यास केला असता कोणत्याही समकालीन कवींच्या काव्याचा सुतरामदेखील संबंध

नाही " असेही अत्र्यांनी विधान केलेले आहे... " अत्रे हे कोल्हटकरी संप्रदायाचे पायिक असल्यामुळे कोल्हटकरी सौंदर्यवादी टीकासंप्रदायापासून ते मुक्त नसावेत असे वाटते." ४

'बीं' च्या जीवनाची ओझरती कहाणी

'बीं' चा ओझरता जीवनपट पाहिला तरीही 'बीं' च्या जीवनाकांक्षेची साक्ष पटते. वकील होऊन स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याची आकांक्षा, आईवडिलांच्या अकाली निधनाने नष्ट झाली. साधे मॅट्रिकही होता आले नाही. वयाच्या अवघ्या सोळा सतराव्या वर्षीच महसूल खात्यात कारकुनी करण्याचे नशिबी आले. सर्व भावंडांत वडील असल्याने धाकटया सात वहीण भावंडांच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतच्या विविध जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. त्यांचे स्वतःचेही दोन विवाह झाले होते. हे सर्व असले तरी संवेदनशील, बुद्धिनिष्ठ मध्यमवर्गीय माणूस युगधर्मापासून अलिप्त होणे शक्य नव्हते. ते तरुण वयातच राष्ट्रीय जीवनाशी समरस झालेले होते. त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा अतिशय महत्त्वाचा पुरावा म्हणजे 'बेरार समाचार'च्या संपादक मंडळाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आणि सतत दहा बारा वर्षे टोपण नावाने आणि निनावी असे केलेले गद्यलिखाण. ते लिखाण व पत्रव्यवहार कालौघात नष्ट करणे. दुसरा पुरावा म्हणजे 'मासिक मनोरंजना' कडून कवितेचा मोबदला न स्वीकारणे आणि नाव प्रसिद्ध करू नये अशी संपादकाला घातलेली अट. आपल्या लेखनस्वातंत्र्यावर बंधने येऊ नयेत आणि तसेच सरकारी रोषाला पात्र होऊन कुटुंबाची परवड होऊ नये यासाठी 'बीं' नी ही खबरदारी घेतली असावी असे वाटते. ५

अडखळत, विराम घेत झालेली सुमारे पन्नास कवितांची निर्मिती

'बीं' ची पहिली कविता प्रणयपत्रिका १८९१ मध्ये प्रसिद्ध झाली. १९११ ते १९२२ या अकरा वर्षांत ३३ कवितांची निर्मिती झाली. १९२२ ते १९२८ या सहा वर्षांत ५ कवितांची निर्मिती झाली. पुढे निर्मितीला विराम. पुन्हा १९४६ मध्ये अकरा वर्षानंतर १० कविता. त्यातही मूळ निर्मितिकाळ गुप्तच आहे. अर्थात ही निर्मिती अखंड ओघवती नाही, ती अडखळत विराम घेत झालेली आहे. ६

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी

कोणत्यातरी टीकाकाराने 'बीं'ना केशवसुतांच्या संप्रदायात टाकले असल्याचे विधान 'बीं'च्या वाचनात आले. त्या संदर्भात वा. ना. देशपांडे यांना उद्देशून त्यांनी लिहिले, " केशवसुत व माझ्यात कोणतेही साम्य नाही... माझी 'डंका' ही कविता एकमेकांची अनुकरणे नव्हते... माझ्या कवितेचा आधार वेदान्त आहे हे म्हणणे चुकीचे आहे. काही आधार असेल तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी हा एवढा एकच आधार आहे."७

'बीं'च्या राष्ट्रवादी वृत्तीचा परिचय देणाऱ्या काही कविता

त्यांची अपुरी असलेली 'खुळा' ही कविता राष्ट्रवादी वृत्तीचा पाठपुरावा करणारी आहे. 'चाफा' ही गूढ गुंजनात्मक कविताही प्रतीकात्मक वाटते. त्यातला मुखस्तंभ नायक क्रांतिकारक वाटतो. 'बंडवाला' या रूपांतरित कवितेचा नायक बादशहाविरुद्ध गुप्तपणे कट करून बंड करणारा आहे.८

" मत्त यवन किंकरत्व–चिन्ही रतितव, मज संप्रती,
शहाचा गुन्हेगार बोलती."

हा देखील राष्ट्रवेडयांचाच एक प्रकार आहे. गुप्त मंडळया स्थापन करून त्यांच्याव्दारे क्रांती घडवून आणणाऱ्या दहशतवादी सशस्त्र देशभक्तांचे चित्र या कवितेतून 'बीं'नी रेखाटलेले आहे. नावही त्या कवितेच्या आशयाला साजेसे 'बंडवाला' असेच आहे.

'थोरातांची कमला' या खंडकाव्याचा मुख्य उद्देश आमच्या राष्ट्रीय जीवनाचे, त्यातही वैयक्तिक जीवनातील पावित्र्याचे दर्शन घडविणे हाच आहे. प्राणापेक्षा मोलाच्या काही गोष्टी मानवी जीवनात आहेत. त्यांची जपणूक करणे हे राष्ट्रीय संस्कृतीचे कार्य आहे. शील, चारित्र्य, पावित्र्य या महत्त्वाच्या मानवी मूल्यांचे दर्शन घडविणारी अतिशय प्रभावी, सौंदर्यपूर्ण आणि रसाळ अशी ही शोकपर्यवसायी कथा आहे.

'बीं'च्या काव्याचे प्रयोजन : तेजोबल वाढविणे

'बीं'ना आपल्या परंपरेचे भान आहे. त्यामुळे 'महाराष्ट्र कविपरंपरा खंड न पडला तिला जरा' हे सांगताना त्यांना अभिमान वाटतो. सृष्टिचक्र तोल जाऊन भलतीकडे जाऊ नये आणि त्याने दीर्घ काल सतत वाटचाल करावी.

" आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय
स्थलाकडे त्या जाताहे हे विश्व चक्र निर्भय " —(फुलांची ओंजळ)

असाच कवीचा प्रयत्न आहे. या विश्वचक्राची वाटचाल सहज सुलभ व्हावी, परिश्रमाची प्रचंडता पाहून अनुत्साह उपजू नये यासाठी कवी सतत प्रयत्नशील असतो.

" काव्य रसामृत यास्तव कारुण्याने निर्मुनि कवि
मृदु मधुरोज्ज्वल गीते गाऊनि तेजोबल वाढवी ।।"

उज्ज्वल भविष्यकाळाची निर्मिती करणे—

" भूतकाळाचे वैभव किंवा सांप्रतची हीनता
प्रकर्ष भावी समोर दावी कवी समय जाणता.
" हताश जे झाले स्वजन चैतन्याचे संचरणे
करणे त्यांच्या देहात भाग्य हे थोडयांना प्राप्त ।।" (कविवंदन)

'बीं'ची जीवनाकांक्षा ही आत्मकेन्द्रित आणि आत्मलक्षी नाही. ती विशाल राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाल्यामुळे तिचे स्वरूप आध्यात्मिक झालेले आहे. जिये कुठेही आध्यात्मिकता येते तिथे तिच्या मागोमाग सौंदर्यही येते. म्हणूनच प्रतिभेच्या सामर्थ्याचे दर्शन घडविताना 'बी' सांगतात,

" ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणक्षमता
अंतरंग ओथंबून ओसंडे ती सुंदरता
केवळ सौंदर्याची स्फुरणे प्रस्फुरणे दिव्य
जिव्हार हेच स्वानंदाचे सौंदर्याचे काव्य ।।" (कविवंदन)

'बीं'ची जीवनाकांक्षा शुद्ध पारमार्थिक स्वरूपाची असल्यामुळे तिचे नाते परतत्त्वाला स्पर्श करणाऱ्या ज्ञानेश्वरांशी जुळलेले आहे. ध्येयाच्या उदात्ततेमुळे त्या सौंदर्याचे स्वरूपही अम्लान, अक्षुण्ण, अक्षय, नित्यनूतन, चिरतरुण असे बनलेले आहे. या व्यापक जीवनाकांक्षेला,

" स्वदेशाच्या गौरवात आपुला होय गौरव
यातना, हाल जे त्याचे, आपला तोच रौरव

शक्तीच्या चालका रामा ! पुरवी मनकामना
सत्यं–शिवं–सुंदरम्–दे आनंद वन भुवना " (भारतीय जीवन)

' बीं ' च्या अम्लान अखंड परंपरेचे स्वरूप

अर्वाचीन परंपरेचा आपला संबंध नाही असे ' बीं 'नी म्हटले आहे. आपला संप्रदाय भिन्न असून तो क्रांतिकारकांचा आहे. याचा अर्थ असा नव्हे की ' बीं 'ना परंपराच नाही. ' बीं 'ची परंपरा खरीखुरी राष्ट्रीय परंपरा आहे. ती वाल्मीकी, व्यास, कालिदास आणि भास या महाकवींशी भिडलेली आहे. मराठीत ही परंपरा प्रथम ज्ञानेश्वरांनी आणली तर त्यांनी त्यांचा उत्साहाने ' डंका ' वाजविला आहे. " त्या वडघा बंडवाल्यात ज्ञानेश्वर नामे पहिला " असे सांगितले आहे. आणि शेवटी,

" आम्ही त्या दिलजानांचे–साथी, ना मेलेल्यांचे,
हे डंके झडती त्यांचे । ऐकोत कान असलेले ।
तेजाचे तारे तुटले ।।" (डंका)
" असे विषय गायाचा एकच अक्षयचा त्याचा
क्षात्र वृत्ति उत्पन्न, विवर्धन, रक्षण करण्याचा ।।" (प्रभात पोवाडा)

कवी म्हणतात,

" तप्तान्तःकरणा निववावे । पतितांचे उद्धार करावे
जानपदाभ्युदयार्थ झटावे । साधक व्हावे ।
प्रगतीच्या आड न यावे ।।" (यमदूतास)

या पंक्तीवरून ' बीं 'च्या काव्यपरंपरेची स्पष्ट ओळख होते. या परंपरेच्या वैशिष्टचामुळे ' बीं 'ची कविता केवळ कलात्मक, केवळ सौंदर्यवादी किंवा तत्त्वचिंतनात्मक होऊ शकली नाही असे म्हणता येते.

राष्ट्रीय कवी म्हणून निरपवाद ओळख करून देणाऱ्या ' बीं ' च्या काही प्रमुख कविता

सामाजिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि अतिशय गाजलेल्या ' डंका ', ' दीपज्योतीस ', ' तीव्र जाणीव ', ' जादू ', ' यमदूतास ' या ' बीं 'च्या कविता प्राधान्याने राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती करणाऱ्या कविता आहेत. त्यांच्या विषयातील विविधता ही राष्ट्रीय जीवनातील विविधतेचा प्रत्यय आणून देणारी आणि राष्ट्रीय जीवनातील प्रश्नांना प्राधान्य देणारी आहे. यावर उल्लेखिलेल्या कवितांव्यतिरिक्त ' गिरिगान ', ' आशादेवी ', ' प्रभात पोवाडा ', ' क्षणभर ', ' भगवा झेंडा ', ' ह्यात काय संशय ', ' भारतीय जीवन ', ' दोन मी ', ' आम्ही ', ' बंडवाला ', ' प्रतिमाभंग ', या कविता त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीची शंभर टक्के साक्ष पटविणाऱ्या आहेत. याशिवाय ' विचार तरंग ', फुलांची ओंजळ ', ' पूर्ण की अपूर्ण ', ' गाविलगड ' या कवितांतूनही त्यांचे राष्ट्रीय विचार व्यक्त झालेले आहेत. एकूण कवितांच्या संख्येत या गीतांचा विचार केला तरीही राष्ट्रकवी ही पदवी ' बीं ' ना देणे यथार्थ ठरते. आता ' बीं ' च्या राष्ट्रीय भावनांचे विचारांचे स्वरूप समजावून घ्यावयाचे आहे.

' बीं ' च्या काव्यातील पुनरुज्जीवनाची कल्पना

सामान्यपणे परतंत्र देशात राष्ट्रीय पुनरुज्जीवनाची प्रवृत्ती अस्तित्वात असते. नवराष्ट्रनिर्मिती-करिता या पुनरुज्जीवनाची नितांत आवश्यकता असते. त्याकरिता कवीला पूर्वपरंपरेचे आणि पूर्व-वैभवाचे स्मरण करावे लागते. राष्ट्रीय अस्मिता जागृत करण्याकरिता कोणत्याही राष्ट्राला भूतकाळा-

कडेच वळावे लागते. कवींनी सद्यःस्थितीची पूर्ण जाणीव ठेवून भविष्यकाळाची आशावादी स्वप्ने या राष्ट्रीय पुनरुज्जीवनाच्या आधारेच रंगविली. ' बीं 'ना महाराष्ट्राच्या तेजस्वी आणि भव्य परंपरेचा सार्थ अभिमान आहे. ' कमला 'काव्यात तो त्यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे,

" नरनारी रत्नांचा आकर महाराष्ट्र देश
बलविद्या चापल्य शील शोभेचा अधिवास,
इहामुत्र कोणाहि विघातक रोधक सत्तेस
लवला नाही लेश कधी हा तेजस्वी देश." (कमला)

' भारतीय जीवन ' या कवितेत महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे ही कल्पना वेगळ्या रीतीने ' बीं ' नी मांडली आहे. ते लिहितात,

" विपन्नकालीं देशाच्या अग्रभागी सदास्थित
राहिला हा महाराष्ट्र, आज राहिल निश्चित !" (भारतीय जीवन)

' स्वैरगीत ' या गीतात, " भेसुरतेला सांग मराठा भ्याला केव्हा तरी ?" असा मराठ्यांच्या निर्भयतेचा कवीने गौरव केला आहे.

धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील दंगल मोडून काढणारा तेजाचा दिव्य तारा कवीला आठवतो. " या बडघा बंडवाल्यात 'ज्ञानेश्वर' माने पहिला " (डंका) असा ज्ञानेश्वरांचा गौरवपूर्व आठव होतो. महाराष्ट्र आणि छत्रपती शिवाजी महाराज हे अद्वैत कवीला विसरताच येत नाही. कवी म्हणतात,

" महाराष्ट्र भूमंडन कंकण बांधुन विजयाचे
राय शिवाजी आला, वंदू चला चरण त्याचे !
स्थापायाला स्वराज्य, दंडायाला मत्तांला
मदत करी तुळजा, हा राजा अवतारी झाला ॥" (प्रभात पोवाडा)

भारत हा परमेश्वर, महाराष्ट्र ही त्याचीच लहान प्रतिमा

भारत आणि महाराष्ट्र या दोहोंतील अद्वैत स्पष्ट करताना कवीने मोठी रम्योदात्त कल्पना केलेली आहे. कवी म्हणतात,

" प्रतिमा पूजने होती ईश्वरप्रति अर्पण
महाराष्ट्र मिषाने हो भारताचेच पूजन." (भारतीय जीवन)

भारतीय अस्मितेचे स्फुरण

' आम्ही ' या कवितेत भारतीय अस्मितेचे दर्शन कवीने घडविले आहे. कवी म्हणतात,

" श्रीरामात पहा प्रताप अमुचा, ऐश्वर्य कृष्णीं पहा,
रुद्रीं उग्र कठोरता, सदयता बुद्धांत साक्षात् पहा,
ते आम्हींच महंमदास दिधली खैरात पैगंबरी,
तें कारुण्यहि आमुंचेच उठवी जें ख्रिस्त मेल्यावरी ॥" (आम्ही)

भारतीय संस्कृतीचे महिमानही कवीला आकर्षित करून जाते

' दोन मी ' या कवितेत,

" जीवन-संजीवनी त्याग ही, राष्ट्र असो संपन्न नसो
ना तरि त्याचा विनाश मनि हें अक्षयतेचे तत्त्व ठसो ॥" (दोन मी)

हिंदुराष्ट्रजातीबद्दलचा 'बीं' चा अभिमान

वर्तमानकालीन भारताच्या सेक्युलर, धर्मनिरपेक्ष विचारसरणीच्या काळात हिंदुजातीचा व हिंदुत्वाचा अभिमान बाळगणे म्हणजे सनातनीपणा, प्रतिगामीपणा, सांप्रदायिकता अशी विशेषणे स्वतःला लावून घेणेच होय. 'बीं' नी मात्र राष्ट्रजाती म्हणून हिंदूंचा अगदी निःसंकोचपणे व. निर्भयपणे पुरस्कार केला आहे. हिंदुराष्ट्रजातीचा गौरव 'बीं' च्या राष्ट्रीय भावनेचा एक भाग होता 'प्रभात पोवाडा' या कवितेत ते लिहितात,

"नुरो पैरवी पृथ्वी वरती हिंदूंची काही
जणू मनसुबा असा करी ही सालिम दुनियाही,
...समूळ बुडावा हिंदू मर्जी असेल देवाची
राजी आम्ही करून जाऊ करणी मर्दांची" (प्रभात पोवाडा)

'बीं' चा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद

परंपरेचा अभिमान, पूर्वजस्मृती, वीरविभूतिपूजन, हिंदुराष्ट्रजातीचा सार्थ अभिमान, तसेच हिंदुसंस्कृती आणि तत्त्वज्ञान यांच्यासंबंधीची अस्मिता यामुळे 'बी' अस्सल राष्ट्रवादी आहेत. परंतु ज्या परंपरा राष्ट्राला हानिकारक अशा परंपरांचा त्यांनी कटाक्षाने निषेधच केलेला आहे. हिंदुजातीचा अभिमान 'बीं' ना असला तरी वर्णव्यवस्थेचा, जातीजातींतील श्रेष्ठकनिष्ठतेचा, जन्माधिष्ठित उच्चनीचतेचा, अस्पृश्यतेसारख्या अनिष्ट रूढींचा त्यांनी धिक्कारच केलेला आहे. त्यांच्या राष्ट्रवादाचे स्वरूप जसे अस्मितादर्श आहे तसेच ते विवेकनिष्ठही आहे. त्यांच्या या राष्ट्रीय विचारांचे साम्य स्वा. सावरकरांच्या राष्ट्रीय विचारांशी आहे असे म्हणता येते. 'दीपज्योतीस' या कवितेत अनिष्ट रूढीने विधवेच्या ठिकाणी असलेल्या नैसर्गिक अशा प्रसव, जनन या शक्तीलाच प्रतिबंध केलेला आहे. त्या अबलेला उद्देशून कवी म्हणतो,

"वाढा आणि जगा" निसर्ग म्हणतो सृष्टीस भूतात्मिका,
डोळ्यांनी उघड्या पहात असता होशी गुन्हेगार का ?" (दीपज्योतीस)

'बीं' नी केलेले हे 'आवाहन' व्यक्तीला तसेच समाजालाही उद्देशून आहे. त्यामागे त्यांचा केवळ समाजसुधारणावाद नाही तर विवेकनिष्ठ राष्ट्रवादच आहे. 'जादू' या कवितेत 'बीं' ची आंतरिक तळमळ स्पष्ट झालेली आहे. पारतंत्र्य, विषमता, दारिद्र्य, या सर्वांचा सोक्षमोक्ष करणारी 'जादू' कवीला मिळाली तर पाहिजे आहे. नागड्या उघड्या राष्ट्रबांधवांना अंगभर कपडावस्त्र देणारी; त्यांना पोटभर शुद्ध निर्मळ पाणी देणारी जादू पाहिजे आहे. रूढींच्या बंधनात सामान्य तर सोडाच पण धुरीणही कुचंबत पडलेले पाहून कवीला खेद वाटतो. ते तळमळीने उद्गारतात,

"चिरडुनि तिजला (रूढीला)
यशोध्वजेला । दिगंतरी रोवील अशी । जादू कोठे मिळेल कशी !" (जादू)

'तीव्र जाणीव' या सुप्रसिद्ध कवितेत 'बीं'च्या विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचे सारगर्भ दर्शन घडते. किंबहुना 'बीं'च्या राष्ट्रीय विचारांचे प्रातिनिधिक स्वरूप स्पष्ट करणारी ही कविता आहे. या कवितेवरील 'बीं' नी दिलेली टीपही महत्त्वाची आहे. 'बी' लिहितात, "सुशिक्षित असलेल्या प्रत्येक राष्ट्रास शांततेचे संग्राम प्रत्यही करावे लागतातच. या उद्याच्या स्थितीत आमच्या समाजाची काय वाट होईल" (मासिक मनोरंजन, नोव्हेंबर १९१७) अध्यात्मतेजाने संपन्न, सर्वांत प्राचीन

अशी, जगाला पावनता, उदारता, सत्प्रेरणा शिकविणारी, आर्यांनी निर्मिलेली भारतीय संस्कृती हा आमच्या अभिमानांचा विषय आहे. परंतु जन्माने व्यक्तीचे अधिकार, श्रेष्ठ कनिष्ठता ठरविणारी ही समाजरचना कालबाह्य झालेली असून आमच्या अभिमानाचा खोटेपणाच सिद्ध करणारी नाही काय ? असा कवींनी प्रश्न विचारला आहे. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद, अस्पृश्यता, स्त्रियांचे अज्ञान आणि दास्य, आमची राजकीय आणि बौद्धिक गुलामी या प्रश्नांकडे आम्ही केव्हा लक्ष देणार ? असा खडा सवाल कवीने विचारलेला आहे. आपल्याला ज्या बलाढ्य शत्रूंशी लढा द्यावयाचा आहे याची जाणीव किती लोकांना आहे ? 'बीं'ची गुलामगिरीची कल्पना अतिशय व्यापक असून तीत सर्व प्रकारच्या पारतंत्र्याचा समावेश आहे. ते सांगतात,

" ते आहेत गुलाम ! दूर करिती जे रंजले गांजले !
ते आहेत गुलाम ! जे निजजनद्रोही सदा रातले !
ते आहेत गुलाम ! जे कचरती सोसावया साकडी,
तैशा शाप शिव्याहि सत्य कथनी प्रीतीचिया आवडी ।।" (तीव्र जाणीव)

'यमदूतास' या कवितेत भारतीयांच्या 'दास्य' वृत्तीचा धिक्कार केलेला आहे.

'दासोऽहं हा जपता मंत्र । लोटुनि गेला काळ अनन्त
तृप्तता न झाली संप्राप्त, दोष कोणाचा ? हा दासोऽहं वृत्तीचा ।।" (यमदूतास)

'बीं'चा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद पुस्तकी स्वरूपाचा नाही, त्यात विज्ञाननिष्ठा, वास्तवता आणि व्यवहारवाद यांचा समन्वय झालेला आहे. परंपरा या समन्वयाच्या मार्गात येत असेल तर तिचाही 'बीं'नी अधिक्षेप केलेला आहे. 'आशादेवी' या कवितेत, ते स्पष्टपणे सांगतात.

" होते कार्य न हो, तरीहि पडल्या काळात या कष्टद
गाणे पूर्व परंपरादि महती हे शुद्ध हास्यास्पद ।।" (आशादेवी)

आधुनिक विज्ञानातील सर्वच गोष्टी आमच्या वेदांत आहेत आणि प्रेमशांतीच्या मार्गानेच आमचे ध्येय साध्य होईल असे विचार मांडणाऱ्यांनाही कवी विचारतात,

" शान्ति प्रेम समत्व पाठ नसते गाऊंचि द्या आजला
जे का मोहन मंत्र बद्ध असती माझे कवी त्यांजला ।।" (आशादेवी)

'बीं'ना आमच्या वेदांत सर्व काही आहे म्हणणाऱ्यांचे आत्मवंचक विचार मान्य नाहीत. तसेच गांधीजींचे स्वातंत्र्यलढ्याचे नवे तंत्रही मान्य नसावे असे वाटते. त्यांच्या वास्तव व्यवहारवादात गांधीजींचा साधनशुचिता सांगणारा आदर्शवाद बसत नसावा असे वाटते. कारण पुढच्याच ओळीत ते म्हणतात,

" आहे हा व्यवहाररूप अखिल व्यापार जो जो दिसे,
हे आहे जर मान्य, कायम ठसे त्याचे घडावे कसे ?
निर्मावे जग अन्यथा, त्यजुनिया वस्तुस्थितीला सदा
राष्ट्रात्मा अति पंगु पोकळ बने तेणे, नसे फायदा ।।" (आशादेवी)

'भगवा झेंडा' या कवितेतही 'बीं'नी वर्तमानकालीन परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे. ते प्रगतीवादी आहेत. ते म्हणतात,

" प्राक्कालाची प्रगति परता तेवढी मात्र घ्यावी...." (भगवा झेंडा)

'बीं'च्या व्यवहारवादाला प्रयत्नवादाची आणि भविष्यातील आशावादाची जोड आहे. ते याच कवितेत स्पष्ट सांगतात,

" आपोआप घडेल इष्ट समयी ते कार्य हे बोलणे
आहे भ्रामक ! युक्त काय सगळे काळावरी टाकणे ?
भागीदार कृतीत मानव असे काला निसर्गासवे,
आणा त्यास समीप एकवटुनी यत्न प्रयत्नोत्सवे ।।" [तीव्र जाणीव]

'आम्ही' या कवितेतही 'बीं'नी आपला भविष्यकालीन आशावाद अत्यंत समर्पकपणे मांडलेला आहे. ते लिहितात,

" होते सृष्टि नवी, कलेवर जुने टाका, तुम्ही व्हा तसे,
हे ना होय तरी मरा ! न तुमची कोणास पर्वा असे !" (आम्ही)

आपल्या ध्येयाची स्पष्ट जाणीव देताना कवी म्हणतात,

" झेंडा बंडास्तव उभविला भव्य गेल्या पिढीने
स्वोत्पन्नांच्या करि निरवुनी जाय ती साभिमाने
जेथे जेथे कटु विषमता आणि अन्याय गाजे
तेथे तेथे झगडुनि जना बंध निर्मुक्त कीजे ।।" (भगवा झेंडा)

'प्रतिमाभंग' या कवितेत यवनांनी भारतीय शिल्पांचा, मूर्तींचा केलेला विध्वंस पाहून कवीला अतोनात दुःख होते पण त्यापेक्षाही मोठे दुःख अखंड भारताचे भव्य शिल्प उद्ध्वस्त होताना होते. 'बीं' ची त्यासंबंधीची प्रतिक्रिया अतिशय तीव्र आणि स्फोटक आहे. ते विचारतात,

" हा विध्वंस समोर एक, दुसरे अद्यापिही चालता–
राष्ट्रात्मा खवळोन जाय न कसा विच्छेद हे साहता !"

'दोन मी' या कवितेत 'बीं' नी आपला निर्वाणीचा निर्धार व्यक्त केलेला आहे. ते म्हणतात,

" देश असो माझा मी त्याचा सर्वस्वार्पण करीन मी
निर्वाणीही कधी न होईन देशाचा बेमान हरामी ।।" (दोन मी)

समारोप

आधुनिक मराठीच्या 'राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाच्या कालखंडातील एक महत्त्वाचे राष्ट्र• कवी म्हणून 'बीं' च्या काव्याचा अभ्यास करण्याचा हा यथाशक्ती प्रयत्न केलेला आहे. 'बीं' चा पिंड देशभक्ताचा होता हे त्यांच्या कवितांवरून स्पष्ट होते. त्यांच्या अंतःकरणातील राष्ट्रप्रेम, त्यांच्या विविध कवितांतून उत्कटतेने व्यक्त झालेले आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे नाते स्वा. सावरकरांच्या कवी गोविंदांच्या कवितेशी जुळणारे आहे. राष्ट्रीय विचारांची बैठक समान आहे. माझ्या मते हे साम्य केवळ तार्किक स्वरूपाचे नाही. लोकमान्य टिळक, काळकर्ते परांजपे, जोसेफ, मॅझिनी आणि मील्लप्रभृती उपयुक्ततावादी तत्त्वज्ञ यांचा प्रभाव स्वा. सावरकरांच्या राष्ट्रीय विचारांवर जसा झालेला आढळतो तसाच प्रकार 'बीं' च्या बाबतीतही घडलेला असावा असे वाटते. 'तीव्र जाणीव' या सुप्रसिद्ध कवितेच्या शेवटी 'बीं' नी स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांच्या व्यापक व्याख्या करून

कवितेचा अतिशय प्रभावी शेवट केलेला आहे. राष्ट्रैक्य, दास्यमुक्तता, समता आणि लोकसत्ता ही मॅझिनीची चतुःसूत्री होती. या मॅझिनीच्या स्वातंत्र्यसूक्तांचा साकल्याने प्रभाव या कवितेत जाणवतो. 'बीं' नी तशाच आशयाच्या श्लोकांची रचना केलेली आहे. मॅझिनीचे विचार मांडताना स्वा. सावरकर लिहितात, " नुसती इटली स्वतंत्र होऊन काय उपयोग ? आपण स्वतंत्र होताच दुसऱ्यांना स्वतंत्र केले पाहिजे... आपण एकमेकांच्या मुक्ततेबद्दल जबाबदार आहोत, जर आपण आपल्या इतर मानवी बंधूंस परवशतेत व अज्ञानात तसेच मरू देऊ, तर परमेश्वराचा द्रोह केल्याचे महत्पाप आपल्या माथी बसेल."[९] 'बी' हाच आशय खालील ओळींतून तितक्याच प्रभावीपणे नमूद करतात–

" ठेवू कृत्रिम भेद कायम, कुणा अस्पृश्य मानू जरी
स्वातंत्र्यास अपात्र आपण ठरू घेऊनि पापा शिरी...
ते स्वातंत्र्य खरे न फक्त अपुली जे तोडिते बंधने
अन्यांच्या पदशृंखलास बघते निष्कंप ऐशा मने
या त्या आपण वागवू निजपदी त्यांच्या सवे प्रत्यही
तोडू त्यास समग्र एक करुनी आकाश पाताळही !"[१०] (तीव्र जाणीव)

इ. स. १९१७ मध्ये लिहिलेल्या या कवितेतील आणि स्वा. सावरकरांच्या प्रस्तावनेतील हे साम्य केवळ योगायोगाने आलेले असेल काय ? 'बीं' च्या राष्ट्रीय कवितांचा अभ्यास केल्यानंतर तसे वाटत नाही. स्वा. सावरकर 'महाराष्ट्र भाट', 'मराठी शाहीर' म्हणूनही ओळखले जातात. 'बीं' ची 'प्रभात पोवाडा' ही कविता भारतीयांनी सैन्यात शिरावे या पार्श्वभूमीवर लिहिलेली असल्याचे 'फुलांची ओंजळ' च्या प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. परंतु त्याच काळात सशस्त्र क्रांतिकारकांनी; हिंदुतरुणांनी मोठ्या संख्येने सैन्यात शिरावे, शस्त्र संचलनाचे व युद्धाचे आधुनिक शिक्षण घ्यावे असा प्रचार चालविलेला होता. 'बी' म्हणतात,

" काळ बदलला, ध्येय बदलले, पूर्व पुण्य फळले,
'अभिनव भारत' जन हो ! आता जन्माला आले ।
नव्या उमेदी नवे जिव्हाळे नव्या मराठ्यांचे.
नवे भरोसे, नवे कवन हे नव्या उमाळ्याचे "

'बीं' चा हा नवा उमाळा अर्थातच राष्ट्रवादाचा असल्यामुळे समकालीन स्वातंत्र्यशाहिरांच्या परंपरेत वसण्याचा मान आपणही 'बीं' ना दिला पाहिजे. त्यांनी सूचित केलेली आधुनिक परंपरा मान्य केली पाहिजे.

'बीं' च्या कवितेतील काव्यात्मक सौंदर्याचे मूल्यमापन

समकालीन राष्ट्रीय विचारांच्या जागृतीचे एक अत्यंत प्रभावी साधन म्हणून 'बीं' नी आपली बहुतेक राष्ट्रीय कविता लिहिलेली आहे हे सामान्यपणे आतापावेतो केलेल्या विवेचनावरून मान्य व्हावे. 'बीं' च्या काव्यातील आशयासंबंधी आपले मत नोंदविताना, डॉ. वा. भा. पाठक म्हणतात, " जीवनाकडे बी कवींनी आशादायक दृष्टीने पाहिले आहे. प्रेम आणि शांती या साधनांद्वारे जीवन-विकास घडवून आणावा ही त्यांची तळमळ आजच्या काळातही उद्बोधक ठरेल."[११]

आधुनिक मराठी कवितेचे एक साक्षेपी रसिक अभ्यासक प्रा. भ. श्री. पंडित 'बीं' ना 'विचार कवी' अशी पदवी देतात. ते लिहितात, "त्यांच्या ठिकाणी विचार इतके प्रबळ होते की

त्यांच्या भावकाव्यात, कथाकाव्यात व प्रेमकाव्यातही त्यांनी आपले डोके वर काढलेले आहे." [१२] प्रा. पंडितांनी 'बीं'च्या काव्याच्या आंतरबाह्य सौंदर्याचे मूर्तिमंत चित्र उभे केलेले आहे.

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " सामाजिक अन्यायावद्दलच्या प्रक्षोभाच्या आगरकरांच्या आविष्कारात जी भव्यता व विशालता आढळते ती जरी केशवसुतांच्या कवितेत आढळत नसली तरी ती या कालखंडातल्या सर्वच कवींपैकी केशवसुतांमध्ये त्या क्षोभाची तीव्रता सर्वात अधिक प्रमाणात आढळून येते. या प्रक्षोभाचे अत्यंत उदात्त आणि संयत स्वरूप 'बीं'च्या कवितेत प्रत्ययाला येते."[१३] श्री. देशपांडे यांचा अभिप्राय लक्षात घेतला म्हणजे केशवसुतांचा मोठेपणा व्यक्त करताना त्यांनी 'बीं'ना न्याय दिला नाही असेच वाटते.

प्रा. रा. श्री. जोगांनी मात्र 'महाराष्ट्राविषयीचा त्यांचा अभिमान 'प्रभात पोवाडा' या त्यांच्या सर्वात दीर्घ अशा कवितेतून प्रकट झालेला आहे."[१४] असे गुणग्राहक विधान केलेले आहे.

या सर्व टीकाकारांनी 'बीं'च्या काव्यसौंदर्याविषयीची विविध मते मांडलेली आपण पाहिली आहेत. 'फुलांची ओंजळ' या 'बीं'च्या काव्यसंग्रहाला सत्कार म्हणून पुरस्कार लिहिताना आचार्य अत्रे म्हणतात, " खरे सांगावयाचे म्हणजे 'बी' हे कवींचे कवी आहेत. अनेक कवींना स्फूर्ती पुरविण्याइतके चैतन्य व तेज त्यांच्या कवितेत काठोकाठ भरलेले आहे."[१५] पुढे अत्रे म्हणतात, " कलावंत, तत्त्वज्ञ, सौंदर्यवादी कवी या नात्याने आधुनिक मराठी कवींमध्ये 'बी' यांचे स्थान फारच मानाचे आहे."[१६]

आचार्य अत्र्यांनी 'बीं'च्या कवितेचे गुणविशेष सांगितले आहेत ते 'बीं'चा गुणगौरव करण्याच्या हेतूने सांगितले असले तरी त्यात अतिशयोक्ती नसून वास्तवताच आहे हे अनेक टीकाकारांच्या मतांचा आशय लक्षात घेता मनावर ठसते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे 'बीं'च्या व्यापक, वैज्ञानिक, तात्त्विक आणि चिकित्सक अशा राष्ट्रीय विचारांचा भार वाहूनही त्यांच्या कवितेच्या अंगभूत सौंदर्यात कुठेही उणेपणा आलेला नाही. याउलट 'येथे कवणे कवणा शृंगारिले ?' असा ज्ञानेश्वरांनी विचारलेला प्रश्न रसिकांपुढे उभा राहावा इतका समसमा संयोग घडून आलेला आहे. इतका विवेक आणि काव्यविलास साधलेला क्वचितच आढळतो. श्रेष्ठ राष्ट्रीय कवी म्हणून त्याचप्रमाणे ऐश्वर्यसंपन्न तेजस्वी अभिजात काव्यनिर्माते म्हणून त्यांचे स्थान मराठी सारस्वतात चिरंतन राहणारे आहे.

राष्ट्रकवी – भास्कर रामचंद्र तांबे (जन्म १८७४ – मृत्यू १९४१)

राष्ट्रीय भावना हाच 'बी' आणि 'तांबे' यांच्यातील समान दुवा

राजकवी तांबे हे 'बीं'च्या समकालीन असे थोर कवी. आधुनिक मराठी कवितेच्या समीक्षकांनी तांब्यांचा उल्लेख अभिजात सौंदर्यवादी भावकवी असाच केलेला आहे. जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी यासंबंधी तांब्यांनी विस्तृत चर्चा केलेली असून त्यातून त्यांचे चिंतन आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान प्रकट झालेले आहे. 'बीं'चे चिंतन प्रामुख्याने काव्यातून व्यक्त झालेले आहे तर तांब्यांचे चर्चेतून. 'बीं'च्या तुलनेत तांबे अधिक भावनोत्कट असून व्यक्तिगत आणि कौटुंबिक भावनांची अभिव्यक्ती करण्यात त्यांच्या प्रतिभेने उदंड उत्साह दाखविला आहे. रे. टिळकांप्रमाणे सफल, सुखी वैवाहिक जीवनातील तृप्ततेचा माधुर्ययुक्त आविष्कार तांब्यांनी अनेक गीतांतून

उत्कटतेने केलेला आहे. 'बीं'नी तसा तो केला नाही. भिन्न प्रकृती आणि प्रवृत्ती धर्मानुसार त्यांच्यात अधिक उणा भेद असला तरी राष्ट्रकवी म्हणून दोघांत वरेच साम्य आहे. किंबहुना समाज राष्ट्रीय भावना हाच त्यांच्यातील समानत्वाचा दुवा आहे.

जीवनाकांक्षा आणि युगधर्मातील साम्य

'तांबे' आणि 'बी' यांच्यात जीवनाकांक्षा आणि युगधर्म या दोन्ही घटकांत साम्य आढळते. महाराष्ट्राबाहेर राहूनही तांबे राष्ट्रीय भावनेपासून अलिप्त राहू शकले नाहीत. कौटुंबिक हिताकरिता प्रथम श्रेणीत मॅट्रिक उत्तीर्ण होऊनही त्यांना नोकरीच पत्करावी लागली. महाविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय 'बीं' प्रमाणेच बाजूला सारावे लागले. कौटुंबिक बंधनामुळेच मातृभूमीची सेवा करता आली नाही याची तीव्र खंत 'मातृभूमीप्रत' या कवितेतून तांब्यांनी व्यक्त केली आहे."[१७]

जीवनकार्याचा संक्षिप्त आलेख

भास्करराबांचे मूळ घराणे कोकणातील खेटकुई या गावचे. त्यांचे पूर्वज गोविंदपंत बुंदेल्यांबरोबर उत्तर हिंदुस्थानात गेले व तिकडेच स्थायिक झाले. तांबे यांचा जन्म झाशी संस्थानात मुगावली येथे १८७४ मध्ये झाला. त्यांचे वडील रामचंद्रराव सुभायतीत कारकून होते. प्रारंभीचे शिक्षण झाशीलाच झाले. याच काळात संगीताचे, हिंदी काव्याचे आणि वैदिक वाङ्मयाचेही संस्कार तांब्यांच्या बालमनावर झाले. हायस्कूलचे शिक्षण देवास येथील श्री. काशिनाथपंत लेल्यांकडे झाले. पुढे शिक्षण सोडून त्यांना कुठे हायस्कुलात शिक्षक, कुठे राजकुमारांचे शिक्षक, कुठे पोलिटिकल एजन्सीत वकील म्हणून, न्यायाधीश म्हणून, कुठे परीक्षांचे रजिस्ट्रार म्हणून विविध जबाबदारींची कामे करण्यात आणि संस्थानी सेवेत आपले आयुष्य घालवावे लागले. निरनिराळ्या पदांवर असताना त्यांनी दाखविलेले बुद्धिवैभव, सौजन्य, सत्यप्रीती, स्वाभिमान, निर्भीडपणा, करारीपणा, स्पष्टवक्तेपणा आणि निस्पृहता इत्यादी गुणांमुळे त्यांनी केवळ कीर्तीच संपादन केली नाही तर सन्मानही मिळविले."[१८]

तांब्यांची काव्यविषयक भूमिका

प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " तांबे कलावादी खरे परंतु त्यांची कला रंजनाबरोबर उन्नयनासाठी आहे." [१९] डॉ. वा. भा. पाठक लिहितात, " तांब्यांच्या विचारांचा पिंड पौरस्त्य संस्कृतीतील संग्राह्य तत्त्वचिंतनाने कसा परिपुष्ट झाला होता याची प्रतीती त्यांच्या जीवनविषयक कविता वाचल्या म्हणजे येते." [२०] डॉ. द. भि. कुलकर्णी सांगतात, " तांब्यांनी भारतीय जीवनमूल्ये स्वीकारली. त्यामुळे त्यांची काव्यविषयक मते व कविताही त्याच धर्तीवर उतरल्या." [२१] आपल्या आयुष्यासंबंधी तांबे नम्रपणे निवेदन करतात, " The life of most ordinary Person, whose world is his little home, ... who bears his daily burden quietly for feeding the little mouths that prate round him and finds joy and compensation for all his toils in their smiling faces and shining eyes and considers himself blessed only in them."[२२]

काव्यस्वरूपासंबंधी तांब्यांचा अभिप्राय– कला ही कलावंताची स्वतंत्र निर्मिती आहे, ती केवळ वास्तवाचे अनुकरण नव्हे हे सांगताना तांबे म्हणतात, " Poetry is not the imitation, the photograph of nature, not because is ignores nature, but because it

idealises it."[२३] कवीच्या अंत:करणाला जाऊन भिडणारा कोणताही विषय काव्यरूप घेऊ शकतो असे तांबे म्हणतात. कला आणि नीतिविषयक आपले विचार मांडताना तांबे लिहितात, "Poetry is most useful because it springs up in perfect uselessness... poetry feels, knows, sheds blessing... Poetry is real and ideal both."[२४]

कलात्मक सौंदर्यात उणेपणा येऊ न देताही कला उपयुक्त ठरू शकते. 'रामायण', 'महाभारत' ही महाकाव्ये अशा थोर आदर्शांचे दीपस्तंभच आहेत. तांब्यांनी मोठ्या भक्तिभावाने रामायणकर्त्या आद्यकवी वाल्मीकींना विनम्र अभिवादन केले आहे. माझ्या मते, आपल्या प्राचीन वाङ्मयाच्या अभ्यासाने तांब्यांना राष्ट्रगीते गाण्याची प्रेरणा झाली असावी.

तांब्यांच्या काव्यातील राष्ट्रीय भावनांचे स्वरूप व परिस्थितिवाद

'प्रेम प्रतीतिधर्मी सौंदर्यवादी भावकवी' अशीच सामान्यपणे तांब्यांची प्रतिमा मराठी जनमानसात आहे. परंतु प्रेम, भक्ती इत्यादी स्वरांप्रमाणेच राष्ट्रीय कविता हा देखील त्यांच्या काव्यातील एक सूर आहे. इंग्रजांच्या कृपाछत्राखाली जीवन जगण्याची पाळी ज्या संस्थानिकांवर आलेली होती त्यांच्यापैकी एका किंवा दुसऱ्या संस्थानिकाच्या सेवेत तांब्यांना आयुष्य घालवावे लागले. अशा परिस्थितीमुळे आपल्या ठिकाणच्या राष्ट्रीय भावनांची तांब्यांना मुक्तपणे अभिव्यक्ती करता आली नसल्यास नवल नाही. परिस्थितिवादाचा हा प्रभाव पंडितांनीही मान्य केला आहे. ते लिहितात, "या प्राप्त परिस्थितीमुळे तांब्यांनी राष्ट्रीय वृत्तीचा उद्दाम आवेग हेतुपुरस्सर दाबला असावा... परंतु इतकी अल्प राष्ट्रीय कविता लिहून देखील तिच्यात तांब्यांनी आपल्या प्रतिभेची प्रखरता प्रकट केली आहे."[२५]

पुनरुज्जीवनवादी परंपरापूजक तांबे

तांब्यांना आपल्या प्राचीन राष्ट्रीय परंपरेचा पराकोटीचा अभिमान आहे. परंपरेचा उत्कट अभिमान हे पुनरुज्जीवनवादाचे आदितत्व आहे. वर्णाश्रमधर्म, यज्ञसंस्था, प्रकाशपूजन यासारख्या परंपरांवर उत्कट श्रद्धा असणारे तांबे राष्ट्रीय कविता लिहायला स्वाभाविकच सरसावले. भारतातील अनेक महापुरुषांनी या पुनरुज्जीवनाच्या अमृत जलाचे सिंचन करून राष्ट्रवादाला जोमदारपणा आणला आहे. टागोरांशी तांब्यांचे साम्य दाखवितानाही तांब्यांच्या परंपरेच्या पूजनाचा उल्लेख श्री. के. क्षीरसागरांनी केलेला आहे. ते लिहितात, "दोघेही पुनरुज्जीवनवादी, अद्वैतवादी, आनंदनिष्ठ कलावादी, गेयता व रागदारी यांचे दोघांनाही सारखेच आकर्षण, दोघांच्याही काव्यांत भावनानिष्ठ गूढवाद आणि दोघांचीही प्रतिमासृष्टी वैदिक संस्कृतीशी निगडित."[२६]

पूर्ववैभवाचे स्मरण– मृतवत, चैतन्यहीन राष्ट्रीय जीवनाला चेतना आणण्याचे कार्य पूर्ववैभवाचे स्मरण करीत असते. 'चिरंजीव कोण ?' 'जय वाल्मीकी', 'सरस्वतीचे स्तोत्र', 'कलेचे हृद्‌गत', 'भैरव', 'जय रतिपतिवर', 'सखये या स्थानी' यासारख्या कवितांतून तांब्यांनी पूर्ववैभवाचे स्मरण केलेले आहे. खरे चिरंजीव तेच–

"मानूनिया केवळ देशमाता
माया तिला वंदुनि मात्र लोकी..."
"... शाला स्वभू केलि गुणा शिकाया
काया विनाशी झिजवावयाच्या !" (चिरंजीव कोण ?)

तांब्यांनी पूर्ववैभवाच्या स्मरणात 'श्रीरामाला' रामपण देणाऱ्या वाल्मीकींची स्तुती केली आहे. ते म्हणतात,

"अधनांचे धन, अबलांचे बल। अमंगलांचे श्रेयो मंगल...
हात दिला तू किती बुडत्यांना। धीर दिला तू किती बुडत्यांना
उरीं लाविले किती पतितांना। जय भवनाविक पतितोद्धारण॥"

(–जय वाल्मीकी)

'सखये या स्थानी' या कवितेतही पूर्ववैभवाचे स्मरण तांब्यांनी केलेले आहे.

वीर विभूतिपूजन

आपल्या महान राष्ट्रीय पूर्वजांच्या विविध क्षेत्रांतील पराक्रमांचे गुणगान करणे, त्यांच्या विभूतिमत्त्वाचे संकीर्तन करणे अथवा त्यांच्या अलौकिक त्यागपूर्ण हौतात्म्याला अभिवादन करणे, त्यांच्याबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त करणे या सर्व गोष्टी वीरविभूतिपूजनात समाविष्ट होतात. तांब्यांच्या 'चिरंजीव कोण?' 'जय वाल्मीकी', 'कृष्णयोगीश', 'झांशीवाली', 'लोकमान्यास', 'उखळात दिले शिर! काय अता!' 'अब तुम जयजयकार करो!' 'देशद्रोह की राजद्रोह' या सर्व कवितांचा समावेश वीरविभूतिपूजन विभागात करता येण्यासारखा आहे.

वेल्हाळ कांतागृहि सोडूनीया। तोडोनिया जे धन मोहजाला
ज्याला रुची अन्न असे त्यजोनी। यजोनि तेजा निज देशकार्यी

(चिरंजीव कोण?)

छत्रपती शिवाजी, महाराणा प्रताप, तानाजी, बाजीप्रभू देशपांडे हे सर्व वीरपुरुष चिरंजीव आहेत म्हणूनच त्यांचे पूजन केले पाहिजे.

'जयवाल्मीकीत' वाल्मीकी बरोबरच प्रभूरामचंद्राचे, 'कृष्ण योगीश' मध्ये भगवान श्रीकृष्णाचे विभूतिपूजन आहे. 'झांशीवाली' ही कविता तर वीरविभूतिपूजनाचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. वीरांबरोबरच वीरांगणांचेही पूजन या देशाने केलेले आहे. तांबे लिहितात,

"रे हिंदबांधवा, थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी
ती पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली" (–झांशीवाली)

'राजराजेश्वरा' या विशेषणाने लोकमान्यांचा गौरव करणारी विलापिका, तांब्यांनी लोकमान्य टिळकांच्या मृत्युप्रसंगी लिहिली असून ती अतिशय उत्कट अशी झाली आहे.

"व्याप संताप सोसूनि सारा, वैरियांचाहि साहूनि मारा,
लाथ हाणोनिया हो सुखाला; कष्टविले सदा की जिवाला॥"

या आरंभीच्या कडव्यातून लोकमान्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. 'उखळात दिले शिर! काय अता!' 'राजा! समजन हा गुजराथी!' 'कृष्ण योगीश', 'वाटले नाथहो' आणि 'अब तुम जयजयकार करो!' या कवितांतून तांब्यांनी महात्मा गांधींचे पूजन केलेले आहे. 'देशद्रोह की राजद्रोह' ही तांब्यांची कविता सुप्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक सरदार भगतसिंह यांच्या धाडसाचे भारतमाता कौतुक करते आहे अशी कल्पना करून लिहिली आहे. भारत माता म्हणते,

"शिरार्थ याच्या लाविले बक्षिस तुम्हि हजार
खडा पहारा करिन मी! होईन आधी ठार!

राज्य शासना मुकल्यासाठी । पतित वध्य या चुकल्या साठी
जोगिण होइन । झोळी घेईन । वनवासी वनिरानी राहिन "[२७]

(–देशद्रोह की राजद्रोह)

पारतंत्र्याची तीव्र जाणीव

पारतंत्र्याची तीव्र जाणीव हा तांब्यांच्या राष्ट्रीय कवितेचा तिसरा महत्त्वाचा विशेष आहे. इंग्रज राजवटीने आणलेल्या आर्थिक गुलामगिरीचे व दारिद्र्याचे चित्र तांब्यांनी 'घटोत्कच माया', 'पाडवा', 'साम्राज्यवादी', 'अर्जी ऐका हो सरकार', 'तृणाचे पाते' यासारख्या कवितांमधून रेखाटलेले आहे. अन्योक्ती, उपरोध, उपहास यांच्याद्वारे व कधी रूपकांच्या आश्रयाने ही अभिव्यक्ती झालेली आहे.

'घटोत्कच माया पसरली हिन्द देशी या' या ध्रुवपदाने या 'घटोत्कच माया' या कवितेची सुरुवात झालेली आहे. आम्ही तुमचे रक्षक व हितकर्ते आहोत, असे इंग्रज लोकांना भासवीत असत.

"मंत्रे या साखर पेरोनी, नजर बंदीची करुनी करणी ।।"

(घटोत्कच माया)

साम्राज्यवाद्यांचे दांभिक, स्वार्थी आणि राक्षसी स्वरूप सांगताना कवी म्हणतो,

....." त्रिभुवन या न पुरे खादाडचि गिधाड
कळवळतो वखवखला बापूडा उपाशी !"

दीन दलितांना छळणाऱ्या बलोद्धतांना 'तृणाचे पाते' या कवितेतून इशारा दिला आहे.

सामाजिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तांब्यांच्या 'रे अज्ञात सखे जन !' 'कळा या लागल्या जीवा' आणि 'पंजरी पाखरू फडफडते' या कविता या राष्ट्रीय स्वरूपाच्या आहेत असे डॉ. सौ. आशा सावदेकरांचे मत आहे. त्या म्हणतात, "त्यांच्यातील 'कारा' तांब्यांच्या दडपलेल्या राष्ट्रीय भावनांची असावी. संस्थानिक बंध आणि मानसिक दुबळेपणा यांचाच तो तुरुंग असावा."[२८]

"पंजरी पाखरू फडफडते, आदळी पंख शिर आपटते
वर्तमान तुझि अजस्र कारा; कुठुनि निघाया न दिसे थारा ।।"

(..... पंजरी पाखरू फडफडते)

कठोर आत्मपरीक्षण आणि पश्चात्तापाची जाणीव

मातृभूमीसंबंधीच्या तांब्यांच्या भावना किती उत्कट होत्या, देशासाठी आपल्याला काहीच करता आले नाही याची वेदना किती तीव्र होती हे त्यांच्या 'मातृभूमीप्रत' या सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय कवितेतून स्पष्ट होते. आपले आयुष्य संस्थानांच्या आणि साहेबांच्या सेवेत गेले आणि आपण देश-सेवकांची व्यर्थ निंदा केली इत्यादी दोषांची जाणीव होऊन त्यांना गहिवर येतो आणि ते डबडबल्या डोळ्यांनी दाटलेल्या गळ्याने मातृभूमीला विचारतात,[२९]

....." आहाहा ! सुत ते असिव्रत जई त्वत्सेवनी पाळिता
धैर्याचे गिरि ते कधीं न डगले आकाश ही फाटता,
नेता त्यास दिगंतरास फुटला आई, उमाळा तुला—
डोळे तूं पुसशील का निज, यमे नर्कास नेता मला ?"

वर्तमानाचे यथार्थ प्रतिबिंब

तांब्यांच्या राष्ट्रीय कवितेत वर्तमानाचे यथार्थ प्रतिबिंब नाही असा सूर काही गणमान्य रसिक टीकाकारांनी काढलेला आहे. " गेल्या २०–२५ वर्षांत महाराष्ट्रात ज्या राजकीय चळवळी झाल्या त्यांचा संसर्ग किंवा उपसर्ग तांबे यांच्या कवितेला पोचलेला दिसत नाही." [३०] असे ग. त्र्यं. माडखोलकरांचे मत आहे. वास्तविक १९०२ ते १९०३ या दोन वर्षांत 'घटोत्कच माया', 'चिरंजीव कोण ?' ' हा आणि तो ' राष्ट्रीय कविता लिहिल्या आणि त्यानंतरच्या कालखंडात ' मातृभूमीप्रत ', ' रुद्रास आवाहन', 'उखळात दिले शिर ! काय !', 'प्रतिज्ञा', 'कोण रोधील', 'तृणाचे पाते', 'मरणात खरोखर जग जगते', ' अशांचे कोण करिल तरि काय ?' या कविता राष्ट्रीय नाहीत व त्यात वर्तमानाचे प्रतिबिंब नाही असे कोण म्हणेल ? 'पाड सिंहासने दुष्ट ही पालथी ओढ हत्तीवरून मत्त नृप खालती । मुकुट रंकास दे करटि भूपा प्रती । झाड खट् खट् तुझे खड्ग क्षुद्रा !' प्रा. मायदेवांच्या मते, "जगातील विषमता एकदाची नाहीशी व्हावी म्हणून कवी रुद्रास बोलावीत आहे." [३१] जुलूम, अत्याचार, छळ आणि निरपराधांची हत्या करणारी दानवी शक्ती रुद्राने नाहीशी करावी असे तांब्यांना सुचवावयाचे असावे. भूपाचा मुकूट हे राजसत्तेचे प्रतीक असून ती जुलुमी सत्ताच रुद्राने बल प्रयोगाने काढून घ्यावी आणि सत्तेचा दुरुपयोग केला तर मुकूट जाऊन हातात करंटी येते एवढाच आशय तांब्यांना अभिप्रेत असला पाहिजे.

' मरणात खरोखर जग जगते ' ही कविता विविध ज्ञानविस्तारच्या ' विविध काव्यमाला ' या ग्रंथात 'मातेस्तव व्हा सिद्ध मराया ' या शीर्षकाने अंतर्भूत झालेली [३२] असल्यामुळे तीत वर्तमानाचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले आहे. अमरपण हवे असेल तर ध्येयाकरिता प्रसंगी देहविसर्जनाकरिता सिद्ध असले पाहिजे हे तत्त्व तांब्यांनी सांगितले आहे.

..... " यज्ञ करा स्वातंत्र्य मिळाया
सर्वस्वाचे दान करा, या
मातेस्तव व्हा सिद्ध मराया ॥"

हा आदेश देणारा पहिला पाठ पुरेसा बोलका असून तो वर्तमानकाळाचे प्रतिबिंब दर्शविणारा आहे.

१९२० ते १९२२ या दोन वर्षांच्या भारतीय राजकारणाच्या वादळी कालखंडात 'अशांचे कोण करिल तरी काय ?' 'कोण रोधील ?' 'प्रतिज्ञा', 'रुद्रास आवाहन', 'उखळात दिले शिर काय अता'; 'वाटले नाथ हो !' इत्यादी उत्तमोत्तम राष्ट्रीय कवितांची तांब्यांनी निर्मिती केलेली आहे. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या अभिनव लढ्याला अनुसरून लिहिलेली 'उखळात दिले शिर ! काय अता !' ही कविता मार्मिक आहे.

" दुबळ्यांचे बळ केवळ दुस्तर
करील सहसा 'दिव्य' भयंकर
बलोद्धतांची मोडिल कंबर
जग चकित होऊ द्या हे बघता ॥"

असे वर्णन करून सत्याग्रहाचे महत्त्व प्रतिपादन केलेले आहे. प्रा. भ. श्री. पंडितांच्या मते गांधीजींच्या मताशी प्रतिकूल असणाऱ्या स्वामी सत्यदेव परिव्राजक [३३] यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन लिहिलेली ' अशांचे कोण करील तरि काय ?' ही कविता कोणत्याही फकिरी वृत्तीच्या, निःस्पृह, बाणेदार देशभक्ताचे व्यक्ति–चित्र वाटावे इतकी असाधारणीभूत उतरली आहे.

" अशांचे कोण करिल तरि काय ?
वस्त्र हवे ज्या लाज झाकण्या ! अन्न डकलिण्या काय !"
(– अशांचे कोण करिल तरि काय)

राष्ट्राकरिता सर्वस्वाचे बलिदान करायला सिद्ध होणाऱ्या देशभक्ताचे मनोगत 'प्रतिज्ञा' या 'मालकंस' रागातील भावोत्कट कवितेत व्यक्त झालेले असून तिच्यात वर्तमानाचे यथातथ्य प्रतिबिंब पडलेले आहे.

" धुळीलाहि जाऊ मिळोनी सुखे
घरालाहि होऊ सुखे पारखे ...
उपाशी मरूं दूर देशांतरी, वनी रानि हिंडू पिशाच्यापरी "

ज्या राष्ट्राजवळ आत्मिक बळ असते ते राष्ट्र फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून नव्याने उदयाला येते. भारतीयांचा भविष्यकाल अत्यंत उज्ज्वल आहे.

असा ऊर्जस्वल आशावाद तांब्यांनी 'कोण रोधील ?' या वीररसपूर्ण कवितेत मांडला आहे.

" या भविष्याचिया दिव्य कारागिरा
कोण रोधील ? दे कोण कर सागरा ?"

तांब्यांच्या दिव्य प्रतिभेला दिसलेली भारतमाता कशी आहे पाहा !

" तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनी
लखलखे भरतभू जननि बघ विजयिनी !
प्रणय, नय सत्य हे सज्ज गण रक्षणीं
बघ भविष्याचिया दिव्य त्या मंदिरा !"
(– कोण रोधील ?)

१९२२ सालीच स्वतंत्र भारताचे भव्य स्वप्न तांब्यांच्या राष्ट्रीय भावनेत वरील स्वरूपात साकार झाले ! तांब्यांच्या दुर्दम्य आशावादाचे हे भव्य चित्र आहे.

'वाटले नाथ हो तुम्ही उतरता खाली !' या कवितेतही वर्तमानाचे यथार्थ प्रतिबिंब पडलेले आहे. १९२०–२१ च्या असहकार चळवळींच्या काळात गांधीजींनी 'एक वर्षात स्वराज्य' अशी जनमानसाला उत्तेजित व आकर्षित करणारी घोषणा करून आबालवृद्धांना स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्याचे आवाहन केले.

" हुंबरडा फोडी आर्त महात्मा जेव्हा,
आघात झेलिले घोर उरावर तेव्हा ... "

तांब्यांच्या या कवितेत जसा गांधीजींचा स्पष्ट उल्लेख आहे तसाच उल्लेख 'कृष्ण योगीश' आणि 'राजा ! समजन हा गुजराथी' [३४] या कवितेतूनही आलेला आहे.

तांब्यांच्या राष्ट्रीय काव्यातील दुर्दम्य आशावाद

'वाटले नाथ हो तुम्ही उतरता खाली' या एका निराशाजनक राष्ट्रीय कवितेचा अपवाद केला तर त्यांच्या बहुतेक राष्ट्रीय कविता आशावादी आहेत. त्यांच्या काव्यातील आशावादाचे साम्य तांब्यांच्या काव्याशी जुळणारे आहे. 'कोण रोधील ?' 'प्रतिज्ञा', 'घनतमी शुक्र बघ !' 'मरणात

खरोखर जग जगते', 'अशांचे कोण करील 'तरि' काय ? 'मावळत्या सूर्याप्रत' इत्यादी कवितांतून त्यांचा आशावाद स्पष्टपणे जाणवतो.

"फूल हसे काटयात बघ कसे ! काळया ढगि बघ ! तेज रसरसे
तीव्र हिमांतुन वसंतहि हंसे । रे उघड नयन कळ पळे दुरी !"
(घन तमी शुक्र बघ राज्य करी !)

" निःसत्व गाई करंटाच गाणी स्वतःच्या स्थितीची–बहाणे करी
कोणा न साधे कुटी ही भविष्या रचाया हवे सत्त्व कारागिरी "
(– तरुणास संदेश)

'कोण रोधील ?' या कवितेतील 'बघ भविष्याचिया दिव्य त्या मंदिरा' हा तांब्यांचा दुर्दम्य आशावादच आहे.

तांबे यांच्यावरील गांधीवादाचा प्रभाव– गांधीवादी विचारसरणीचा प्रभाव तांब्यांच्या काव्यावर असल्याचे प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. वा. भा. पाठक आणि प्रा. म. शं. वाबगावकर या टीकाकारांचे मत आहे. "महात्मा गांधींचे यंग इंडिया हे साप्ताहिक तांब्यांचे अत्यंत आवडते होते. त्यातील सत्य, अहिंसा आणि शान्ती या त्रयीचे तत्त्वज्ञान तांब्यांना अतिशय प्रिय होते."[३५] असे सांगून पंडितांनी आपल्या मताचे समर्थन केलेले आहे.

श्री. पाठक आणि श्री. वाबगावकर यांनी पंडितांसारखीच मते मांडलेली आहेत. १९२० ते ते १९२२ या काळात राष्ट्रीय काँग्रेसचे पुढारी आणि असहकाराच्या मार्गाने स्वातंत्र्याची चळवळ चालविणारे राष्ट्रीय नेते म्हणून गांधीजींचा लौकिक होता. तेव्हा त्यांच्या विचारसरणीचा उणा अधिक प्रभाव राष्ट्रीय कवींवर होणे स्वाभाविकच होते. पण तांब्यांवरील हा प्रभाव प्रा. पंडित म्हणतात तसा सखोल नव्हता आणि जीवनभर नव्हता हे लक्षात घेतले पाहिजे. कारण 'प्रतिज्ञा' आणि 'कोण रोधील ?' या कवितांचा आशय सत्याग्रही, निःशस्त्र अहिंसक प्रतिकार सुचविणारा नाही तर उघड उघड सर्वस्वाचा त्याग करण्याचा, बलिदानाचा आहे. 'उखळात दिले शिर काय ? अता' ही गांधीवादाचे समर्थन करणारी कविता आहे. 'वाटले नाथ हो !' या कवितेने भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचा भ्रमनिरास झाल्याचे सूचित होते. गांधीजींवरील दोन्ही अपूर्ण कविता वर केलेल्या तर्काचा पाठपुरावा करणाऱ्या आहेत.

तांब्यांच्या काव्यात प्रलयकारी रुद्र, गुरगुरणारा नरसिंह, सुदर्शनधारी श्रीकृष्ण ही शस्त्रधारी दैवतेच सदैव आढळतात. 'बलोद्धतांची कंबर मोडणारे' बळ दुबळ्यांच्या ठिकाणी देखील असावे असे त्यांचे प्रतिपादन आहे. डॉ. सौ. आशा सावदेकर म्हणतात, "चिलया, प्रल्हाद, हरिश्चंद्र यांचाच आत्मा 'मोहनी अवतरे' अशा धारणेमुळे केवळ गांधीवाद न सांगता 'तूं वांझ न गे माझी माता !' (उखळात दिले शिर काय अता ?) असा चिरकालिक भावनेवर भर देणारा विचार त्यांना सुचतो ही विचारसरणी केवळ गांधीवादी नाही. त्यात तत्कालीन आशाआकांक्षांचे प्रतिबिंब जरूर आहे.[३६] म्हणून तांब्यांवर प्रभाव असलाच तर पुनरुज्जीवनवादाचा आहे, वैदिक राष्ट्रवादाचा आहे असे म्हणता येते.

तांब्यांच्या काव्यातील सामाजिकता

राष्ट्रीय जाणीव ही मुळातच अत्यंत व्यापक अशी जाणीव आहे. ती जशी राजकीय जीवनाला व्यापून असते तशीच राष्ट्राच्या सामाजिक जीवनालाही व्यापून असते. राष्ट्रीय चारित्र्याशी सुसंगत

असणाऱ्या मूल्यांचा सामाजिक जीवनात पुरस्कार करणे आणि घातक असणाऱ्या गोष्टींचा धिक्कार करणे हे राष्ट्रीय कवीचे कर्तव्यच असते. कालबाह्य, जीर्ण, समाजघातक रूढी, परंपरा यांचा उच्छेद करणे, सामाजिक अन्यायाला वाचा फोडणे हेही कवीचे कार्य असते. तांब्यांनी हे कार्य उत्तमप्रकारे पार पाडले आहे. ' शान्तिनिवास ', ' निःशब्द आत्मयज्ञ ', ' कळा ज्या लागल्या जीवा ', ' पाडवा ', ' ये पाहाटचा वर तारा ', ' चल ', ' जळो ज्ञान विज्ञान गडचा ', बघुनि तया मज होय कसेसे ', ' ते कांत यापुढे !' ' हिंदु विधवेचे मन ', ' नदि तिरी उभी ती ', ' भयचकित नमावे तुज रमणी ' या कविता सामाजिक जाणिवेचा पुरस्कार करणाऱ्या म्हणून उल्लेखनीय आहेत.

" मायेने मारितो त्या स्थळी भाऊ बहिणीला
बाप कापतो गळा मुलीचा, गिळी स्वमांसाला !" (शान्तिनिवास)

किंवा " विकतील तूज दादा आई
गृहशून्य, गृहि न या राही
येथे सुख पळभर नाही... सोड ही मनोहरकारा !"

तांब्यांच्या राष्ट्रीय कवितेवरील टीकाकारांचे अभिप्राय

तांब्यांनी राष्ट्रीय कविता लिहिल्या असल्या तरी मराठी काव्यरसिकांना तांब्यांचा जो परिचय आहे तो ' रोमँटिक भाव कवी ', प्रेमप्रतीतिधर्मी सौंदर्यजीवी भावकवी, किंवा काहींनी म्हटल्याप्रमाणे अभिजात कवी असाच अधिक आहे. सुप्रसिद्ध राष्ट्रवादी साहित्यिक शि. म. परांजपे ' जसे लोक तसे त्यांचे देव ' हे समीकरण मांडतात तसेच जसे कवी तसे त्यांचे टीकाकार असेही समीकरण मांडता येऊ शकते. जी जी भावना, जो जो उमाळा कवींच्या कवितेत प्रकर्षाने असेल त्या भावनांची टीकाकारांना दखल घ्यावीच लागेल. प्रा. रा. श्री. जोग, प्रा. वा. गो. मायदेव आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे तिघेही रसिक आणि सृजनशील टीकाकार आहेत परंतु एक राष्ट्रीय कवी म्हणून त्यांनी तांब्यांच्या काव्याचे मूल्यमापन केल्याचे आढळत नाही.

" काव्य रसोत्कट वाच्यार्थ प्रतिपादक आणि अल्पाक्षरत्वाने संपन्न असावे, त्यातही रसोत्कटतेला अधिक प्राधान्य द्यावे, ही तांब्यांची काव्यविषयक कल्पना, परमेश्वरावर दृढनिष्ठा, दुर्दम्य आशावाद आणि सामान्य विषयावरोबरच असामान्य विषयांची त्यांना असणारी ओढ "[३७] हे तांब्यांच्या कवितेचे विशेष वा गो. मायदेवांना आढळले आहेत. तांबे राजकीय चळवळीपासून अलिप्त राहिले असल्यामुळे राष्ट्रीय कवी म्हणून माडखोलकर त्यांना मान्यता द्यावयाला तयार नाहीत. पण राष्ट्रीय चळवळीपासून अलिप्त असणे एवढाच निकष लावला तर दोनचार मराठी कवी सोडून कोणत्याही कवीला राष्ट्रीय कवी म्हणून गौरविता येणार नाही आणि कवींनी राष्ट्रव्यापी भावनांची उपेक्षा केल्याचे पातक त्यांच्या मस्तकी बसेल.

राष्ट्रीय कवितांची निर्मिती करणारे एक प्रमुख मराठी कवी म्हणून तांबे यांचे प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. अ. ना. देशपांडे, डॉ. वा. भा. पाठक, श्री. कृ. व. निकुंब, डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. म. शं. वाबगावकर, श्री. ह. रा. दिवेकर, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. सौ. आशा सावदेकर या टीकाकारांनी योग्य मूल्यमापन केलेले आहे. त्यातही पहिले श्रेय प्रा. पंडितांनाच दिले पाहिजे. तांब्यांच्या राष्ट्रीय कवितांचे रसग्रहण करताना " प्रासंगिक कविता रूक्ष किंवा शुष्क होणे हे त्या कवीच्या प्रतिभादौर्बल्याचे गमक समजले पाहिजे." उदा. स्वा. सावरकरांच्या बहुतेक राष्ट्रीय कविता प्रसंगनिष्ठ

आहेत पण त्या रुक्ष किंवा शुष्क वाटत नाहीत. किंबहुना प्रासंगिकता त्यांच्या रसोत्कटतेला पोषकच ठरलेली आहे. " तांब्यांच्या जीवनावरोबर त्यांची कविता विकसित होत गेली आणि देशात उद्भवलेल्या घनघोर प्रसंगांनी वेळोवेळी जी घरे निर्माण केली त्यांच्या खुणा त्यांच्या काव्यात ठिकठिकाणी आढळतात,"[३९] असा डॉ. वा. भा. पाठकांचा अभिप्राय आहे.

" आधुनिक कवितेला तांब्यांनी जाणीवपूर्वक काहीही दिले नाही," या प्रा. रा. श्री. जोगांच्या तांब्यांवरील आक्षेपाला उत्तर देताना डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. " आधुनिक मराठी कवितेला भारतीय संस्कृतीचा व काव्यपरंपरेचा आधार तर दिलाच शिवाय विविध विरोधी घटकांचा समन्वय साधून पुनरुज्जीवनवाद, अभिजातवाद त्यांनी मराठीला दिला हीच तांब्यांची थोरवी." [४०] आता भारतीय धारणेला ती पारंपरिक म्हणून विचारशून्यतेचा शिक्का मारावयाचा असल्यास तो भाग वेगळा. प्रा. वाबगावकरांनी भारतीय धारणेचे कवी म्हणूनच तांब्यांचा गौरव केलेला आहे.

डॉ. आशा सावदेकर म्हणतात, " त्यांच्या राष्ट्रीय कवितांत अंतःप्रेममूलक साधारणीभूत भावना आहे." त्रिकालाबाधित आहे. म्हणूनच तांब्यांचे राष्ट्रीय काव्य " त्रिकालाबाधित, व्यक्तिनिरपेक्ष, कालनिरपेक्ष आणि शाश्वत भावनांनी युक्त आहे." [४१] हे डॉ सावदेकरांचे मत तांब्यांच्या राष्ट्रीय कवितांना खराखुरा न्याय देणारे असेच आहे. भारतीय अस्मिता हाच तांब्यांच्या राष्ट्रीय कवितेचा मुख्य आधार आहे व तो लोकमान्यांच्या राष्ट्रवादाशी सुसंगत आहे.

इतर कवींच्या तुलनेत मूल्यमापन

अगदी सुरुवातीलाच 'बीं'च्या राष्ट्रीय कवितेशी तांब्यांच्या कवितेचे तात्त्विकदृष्ट्या नाते असल्याचे नमूद केलेले आहे. केशवसुत व तांबे हे दोघेही रोमँटिक वृत्तीचे राष्ट्रीय कवी असले तरी तांबे जितक्या राष्ट्रीय कविता लिहू शकले तेवढ्या केशवसुतांना लिहिणे शक्य झाले नाही आणि केशवसुत सामाजिक क्रांतीच्या कवितांची जितकी प्रभावीपणे निर्मिती करू शकले तसे तांब्यांना जमले नाही.

तांब्यांच्या राष्ट्रीय कवितेची तुलना कवी विनायकांच्या कवितेशी करता येण्यासारखी आहे. परंतु तांबे आणि विनायक यांचा कालखंड वेगळा आहे. लो. टिळकांच्या काळातच तांब्यांनी काव्यरचनेला सुरुवात केलेली असली तरी त्यांच्या राष्ट्रीय कवितेच्या बहराचा कालखंड १९२० ते १९२३ या दोन तीन वर्षांचाच प्रामुख्याने आहे. त्यामुळे ध्येय, धोरण, राजकीय, सामाजिक परिस्थिती यात खूप बदल झालेले आहेत.

तांबे गांधीजींच्या कालखंडात प्राधान्याने वावरले तर विनायक लोकमान्यांच्या. तांब्यांच्या तुलनेत विनायकांच्या राष्ट्रीय भावना अधिक तीव्र आहेत. तांब्यांचीच स्वतःची म्हणून काही खास वैशिष्ट्ये आहेत. त्यांची जितकी गीते महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या तोंडी आहेत तितकी त्यांच्या समकालीन कोणत्याही कवींची नाहीत. तांब्यांच्या राष्ट्रीय कविता व्यक्तिगत भावनेपासून अलिप्त असल्यामुळे आणि साधारणीभूत राष्ट्रीय भावनांचीच त्यांच्यात विशेषत्वाने अभिव्यक्ती झालेली असल्यामुळे मराठीतील राष्ट्रीय समूहगीतांचे स्थान त्यांना प्राप्त झालेले आहे.

स्वातंत्र्य कवी गोविंद (जन्म १८७५–मृत्यू १९२६)–कालमाहात्म्य

गेल्या तीस बत्तीस वर्षांत अनेकांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचे सोहळे साजरे झालेले आहेत, होत आहेत पण या युगात " जन्मशताब्दी हुकलेला तेजस्वी साहित्यिक स्वातंत्र्य कवी गोविंद " अशा

शीर्षकाचा लेख श्री. बाळ जेरे यांच्यासारख्या लेखकाला लिहावा लागला. काळानेच ज्यांचे राष्ट्रीय कर्तृत्व सुवर्णाक्षरांनी कोरून ठेवलेले आहे त्या स्वातंत्र्य शाहीर कवी गोविंदांच्या वाटचाला ही उपेक्षा आलेली आहे. आपल्या लेखाच्या प्रारंभीच श्री. बाळ जेरे लिहितात, " महाराष्ट्रात राम जोश्यानंतर भारतीय परवशतेच्या काळात जे कवी होऊन गेले त्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपवाद वगळता स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्यावाचून ' देशाचे स्वातंत्र्य ' या एकाच विषयावर काव्यनिर्मिती करणारा एकही कवी निर्माण झाला नाही, असे म्हटले असता वास्तविक कोणावरही अन्याय होण्याचे काही एक कारण नाही." [४२]

महाकवीचा प्रांजळ अभिप्राय

श्री. वाळ जेऱ्यांचे वरील विधान आधुनिक काव्याच्या इतिहासाला धरूनच आहे व ते सत्य आहे. कवी गोविंदांच्या शेवटच्या आजारात त्यांचे सांत्वन करण्यासाठी महाकवीची योग्यता असणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी काढलेले पत्रातील उद्‌गार कवी गोविंदांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकणारे आहेत. ते लिहितात, " ..... एका राष्ट्राच्या विचारास आणि तेजास आपल्या फुंकराने पुन्हा प्रज्वलित करता आले, इतके कार्य देखील तुम्हा आम्हासारख्या क्षुद्र फुंकणीचे जीवित सफल करण्यास पुरेसे आहे. असलेल्या परिस्थितीत तुम्ही इतके करू शकलात हे महत्कृत्यच झाले··· ··· यज्ञीय अग्नी प्रज्वलित करण्यास जो निःश्वास समर्थ झाला तो सफल झाला. ····· आपण केलेल्या कायिक, वाचिक, मानसिक राष्ट्रसेवेविषयी साभिमान कौतुक करणारा आपलाच कृतज्ञ मित्र !" [४३]
(स्थानबद्धता–रत्नागिरी दि. ३–२–१९२६– स्वा. सावरकर)

लाव्हारसासारखी अंगार झोकणारी कविता

आपल्या ज्वलंत राष्ट्रगीतांनी महाराष्ट्र पेटविणारा पहिला मराठी राष्ट्रकवी म्हणून वाङ्मयेतिहासकारांनी गोविंदांचागौरव केला आहे. गोविंदांची राष्ट्रीय कविता तैलबिंदूसारखी प्रसरणशील आहे. तिने महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात शिरकाव केलेला आहे. देशभक्तीची, स्वातंत्र्यप्रेमाची; उद्दाम, ऊर्जस्वल आणि पराकाष्ठेची रसरशीत भावना चेतविणाऱ्या गोविंदांच्या कवितांना ज्वालामुखी पर्वतातून बाहेर पडून आसमंतातील गावेच्या गावे बेचिराख करणाऱ्या ' लाव्हा ' रसाची यथार्थ उपमा श्री. वा. ना. देशपांडे यांनी दिलेली आहे. [४४]

थोडक्यात जीवनकार्याचा परिचय

कवी गोविंदांचे मूळ घराणे नगर जिल्ह्यातील कण्हेर पोखरी या गावचे. गोविंदांचा जन्म ९ फेब्रुवारी १८७४ मध्ये नाशिक शहरी झाला. ज्या दरेकर घराण्यातील शूर पुरुषांनी तलवारी गाजवून आपली कर्तबगारी दाखविली होती त्याच घराण्यातील शेवटच्या पुरुषाला त्र्यंबकरावांना हातात कवची घेऊन गवंड्याचे काम करावे लागले. वयाच्या चवथ्या–पाचव्या वर्षीच वडिलांचे अकाली निधन झाले. मोलमजुरी करून वंशाचा दिवा प्रज्वलित करण्याचा प्रयत्न त्यांच्या मातोश्रींना करावा लागला. आठव्या नवव्या वर्षी गोविंदराव प्राथमिक शाळेत जाऊ लागले. आजाराचे निमित्त होऊन गोविंदाचे कंबरेपासूनचे सर्व शरीरच लुळे पडले ते कायमचे. परिणामी शाळा गेली. वाढत्या वयाबरोबर मानसिक व बौद्धिक विकास झाला. आईला मदत करण्याच्या हेतूने शोभिवंत जाळीचे कातरकाम आत्मसात करून लग्नमौंजीत बागा पुरविण्याचे काम ते करू लागले. कबुतरे पाळणे, पांढरे उंदीर पाळणे, पतंगा बनविणे, या व्यवसायातही त्यांचे बालपण गेले. तमासगिरांच्या सहवासात

त्यांच्या प्रतिभेला लावणीचे धुमारे फुटले. 'हौशिने करा मशि गेंद गेंद, घडवा हो बाजूबंद' हा त्यांनी रचलेल्या पहिल्या लावणीचा पहिला चरण. पुढे नाशिकला सावरकरबंधू अध्ययनाच्या निमित्ताने आल्यानंतर कवी गोविंदांचा त्यांच्याशी परिचय झाला व या परिचयाचे रूपांतर पुढे मैत्रीत, देश-भक्तीत आणि राष्ट्रवादी विचारधारणेत झाले. स्वा. सावरकरांच्या मार्गदर्शनामुळे गोविंदांचे विविध प्रकारचे मराठी ग्रंथांचे वाचन झाले.

स्वातंत्र्य पांडुरंगाचा अहोरात्र ध्यास

संत तुकारामांप्रमाणे स्वातंत्र्य पांडुरंगाचा ध्यास कवी गोविंदांना लागला. रूपकांच्या व वक्रोक्तींच्या साहाय्याने त्यांनी मेळ्यातील पदे रचली. छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास; सावरकरांना पूज्य वाटणारा क्रांतिकारक आयरिश देशभक्त; जोसेफ मॅझिनीची शिकवण राष्ट्रकवी गोविंदांनी स्वीकारली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेल्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे 'अभिनव भारताचे' सदस्यत्व कवी गोविंदांनी स्वीकारले. इतकेच नव्हे तर या संस्थेच्या नाशिक शाखेची संपूर्ण जबाबदारी या पंगू माणसाने स्वीकारली. राष्ट्रकार्याचे महत्त्व लक्षात घेऊनच 'बोधपर पुरातन मौज', 'काळाराम', 'यमाचा दरबार !', 'अफझलखानाच्या वधाचा पोवाडा', 'शिवाजीचा दरबार', 'प्रतापराव गुजराची मरणास प्रार्थना' यासारख्या सुप्रसिद्ध कविता त्यांनी लिहिल्या. इ. स. १९०० पासून स्वातंत्र्य शाहिरांनी काव्यनिर्मिती करायला सुरुवात केली. सावर-करांनी स्थापन केलेल्या सन्मित्र मेळ्याकरिता गीते, पदे, संवाद रचण्याचे कार्यही सावरकरांबरोबर स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद आणि त्यांचे सहकारी बर्वे करू लागले.

स्वातंत्र्यशाहीर गोविंदांच्या कवितेच्या नशिबी आलेला अज्ञातवास

१९०८ साली द्वेशाने जळफळणाऱ्या इंग्रजी सत्तेने त्यांच्या डोळ्यात सलणाऱ्या लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या अभियोगात गोवून सहा वर्षांची काळ्या पाण्याची व हद्दपारीची शिक्षा दिली. ही शिक्षा भोगण्यासाठी त्यांची मंडालेच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. क्रांतिकारक मात्र सुडाच्या भावनेने पेटले. लंडनच्या इंडिया हाऊसमधून पिस्तुलाची पार्सले भारतात तशीच नाशिकलाही येऊन पोहचली. याच वर्षी मेळ्यातील 'स्वातंत्र्य गीतांचे संपादन' केल्याचे निमित्त शोधून स्वा. सावरकरांचे वडील बंधू देशभक्त बाबाराव सावरकर यांना ब्रिटीश सरकारने जन्मठेप काळ्या-पाण्याची क्रूर शिक्षा ठोठावली व त्यांची अंदमानात रवानगी केली.

या दडपशाहीला उत्तर देण्याचे नाशिकच्या अभिनव भारताच्या शाखेने ठरविले आणि अनंत कान्हेरे, अण्णा कर्वे आणि विनायक देशपांडे या कवी गोविंदांच्या सहकाऱ्यांनी १९०९ मध्ये नाशिकचा जुलमी कलेक्टर जॅक्सनचा वध केला. या अभियोगातील वर उल्लेखिलेले तिघेही वीर फासावर गेले. उरलेले श्री. सोमण आणि वामनराव जोशी यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. सबळ पुराव्याच्या अभावी सूत्रधाराची भूमिका बजाविणारे कवी गोविंद सुटले. मात्र फासावर गेलेल्या व जन्मठेपेची शिक्षा झालेल्या अभियुक्तांच्या नातेवाइकांचा सरकारने विविध प्रकारे भयानक छळ केला. कित्येकांच्या इस्टेटी जप्त झाल्या. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या, कित्येकांना अत्याचाराला बळी पडावे लागले. धीर सुटलेले बिचारे सामान्य नातेवाईक लोक, या सर्व प्रकाराला कारणीभूत तुमची कविता आहे, तुमचे विचार आहेत म्हणून गोविंदांना शिव्याशाप देऊ लागले. तशाही स्थितीत करता येईल तितकी मदत या पंगू माणसाने केली. या परिस्थितीमुळे या राष्ट्रभक्त संवेदनशील कवीच्या अंतःकरणावर विलक्षण ताण पडला. त्यातच ते आजारीही पडले. स्वातंत्र्य कवी गोविंदांची

प्रतिभाच अंतर्धान पावली. त्यांच्या राष्ट्रीय कवितेने अज्ञातवास पत्करला. या काळात म्हणजे सुमारे सहा वर्षे गोविंदांनी एकही कविता लिहिली नाही. केवळ आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन आणि चिंतन यात त्यांनी वेळ घालविला. मानवी दु:खावर ईश्वरचिंतनाशिवाय दुसरा कोणताच रामबाण उपाय नव्हता. कवी गोविंदांनी त्याचाच आश्रय घेतला.

प्रतिभा देवीचे पुन्हा दर्शन

इ. स. १९१४ साली लोकमान्यांची तुरुंगातून सुटका झाल्यावर दोन वर्षे निघून गेली. लो. टिळकांच्या षष्टचब्दीप्रीत्यर्थ कवी गोविंदांनी कविता करावी असा मित्रांनी आग्रह धरला. त्यांच्या प्रकाशित अप्रकाशित कवितांचे त्यांनी रात्र रात्र गायन केले तेव्हा कवी गोविंदांनी 'टिळकांच्या भूपाळीने' नवपर्वाची सुरुवात केली. प्रतिभा देवीचे पुन्हा दर्शन झाले. 'सरस्वतीची भूपाळी', 'हिंदुधर्म परिषदेस', 'जिजाबाईचा झोका', 'प्रतापराव गुजरांची मरणास प्रार्थना', 'वीर तानाजीच्या स्त्रीचा विलाप', 'भारत प्रशस्ती', 'हिंदभू वांछिते', 'श्रीकृष्ण जन्मोत्सव' आणि 'मुरली' या प्रदीर्घ कविता याच कालखंडातल्या आहेत.

सुंदर मी होणार– याच कालखंडात त्यांनी 'पक्षीदूत' हे खंडकाव्य लिहायला घेतले. १९२३ पासून त्यांच्या आधीच आघाताने खंगलेल्या देहात क्षयासारख्या रोगाने वास्तव्य केले. सतत तीन वर्षे अनेक हालअपेष्टा भोगून ते रोगाशी झगडत होते. मरणापूर्वी पंधरा दिवस आधी त्यांनी आपली सुप्रसिद्ध 'सुंदर मी होणार!' ही कविता लिहिली. आपल्या कवितासंग्रहाच्या पैशांचा विनियोग सार्वजनिक संस्था आणि आपल्या म्हाताऱ्या आईसाठी करण्यात यावा या दृष्टीने संपूर्ण व्यवस्था करून वयाच्या अवघ्या त्रेपन्नाव्या वर्षी दि. २८–२–१९२६ ला ते 'सुंदर' होऊन या जगातून देवाकडे गेले.

राष्ट्रकवी गोविंदांची सुंदर कवितेसंबंधीची कल्पना– कवी गोविंदांनी आपली उत्कृष्ट कविते-संबंधीची कल्पना 'सुंदर कविता' लिहून पुढीलप्रमाणे मांडलेली आहे.

"ती वीरा कविता मधुरतर मधुरा प्रभुसम सुंदरा !
शृंगाराला दूरि सारी ! हास्यरसाला नांगिकारी ! परिवीररसा
स्वीकारी ! देशा तारुनि जी ठरली जनि !
बल–साजिरा, गुण गोजिरा, करुणा करा !"

देश, देव, धर्म आणि लोक यांना मातृपितृवत मानणारी आणि पृथ्वीवरील दुष्टांची प्राणमाला गळघात घातलेली धर्मवीर, देशभक्तांना प्रेरणा देणारी, परमेश्वरासमान कविताच राष्ट्रकवी गोविंदाना सुंदर वाटते.

राष्ट्रकवी गोविंदांच्या कवितेचे कूळ– राष्ट्रकवी गोविंदांच्या कवितेचे कूळ शोधण्याचा प्रयत्न केला तर भगवान श्रीकृष्णाच्या गीतोपनिषदात असल्याचे आढळून येईल. ते लिहितात,

"तव मुरली मोहन गीत । निर्जिवा करी जीवंत ।
षंढास समर पंडित । रणधीर रिपुसि भयभीत ।
अबलासि करिल बलशालि शालि । हरि वाजिव गीतामुरली !" (–मुरली)

खऱ्या कवीचा अवतार स्फूर्तीची राष्ट्रगीते गाण्याकरिता आहे

संत कवींनीही राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनेच आपली कविता लिहिली हे सांगताना कवी म्हणतो,

" तुक्याचा प्रेमळ वीणा । गहिवरवी अंतःकरणा ।
करुणेच्या घेऊनि ताना । उठवी हरिला ॥
प्रभु रामदास तो आला । राष्ट्राचा जादूवाला
मावळा मंत्रिला सगळा । भालेवाला !" (... शिवाजी)

दुसऱ्या एका कवितेत कवीचे राष्ट्रीय कार्य सांगताना म्हणतात,

" गा कवे ! स्फूर्तिची राष्ट्रगीते नवी
लोक हृदयांतरी वीर रस नाचवी
नाचवी तरुण ते चमकवी तेच ते
' हिंदभू ' वांछिते विगत स्वातंत्र्य ते ॥"

(–हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्यते)

राष्ट्र स्वातंत्र्यासाठी प्रतिभा, प्रज्ञा पणाला लावणारा कवी

महाकवी सावरकरांचा अपवाद करता राष्ट्रस्वातंत्र्याचा ध्यास घेणारा आणि त्याकरिता आपली प्रतिभा, प्रज्ञा, वाणी, लेखणी आणि सर्व शारीरिक सामर्थ्य वेचणारा दुसरा कवी महाराष्ट्रात झाला नाही. राष्ट्रस्वातंत्र्य हाच एकमेव त्यांच्या काव्याचा विषय आहे. त्यांची ' सुंदर कविता '

" गेली अरिकरि निज प्रभुता ।
म्हणुन स्फुंदत जी उद्‌गारत । परमेश्वरा ।"

अशा स्वरूपाची आहे. परवशतेच्या तीव्र जाणिवेतून राष्ट्रस्वातंत्र्याचा ध्यास राष्ट्रकवी गोविंदांना लागलेला आहे. मराठ्यांच्या पराक्रमी परंपरेचे त्यांचे भान सुटत नाही.

" ज्याही रणीं रडविले, तुडविले देशरत्न हर रिपु ठका ।
ऐका त्या बलवंत मराठ्या शूर गड्यांचा तुम्ही फटका "

असे सांगतात पण वर्तमानकाळ त्यांना अतिशय खेदजनक वाटतो. आधुनिक ब्राह्मण आणि क्षत्रियांची अवस्था सांगताना ते म्हणतात, भूतलावरील देशशत्रूंना आणि शरीरांतर्गत सहा भूतांना शराने व शापाने जाळणारा ' तो ब्राह्मण आता खाई परक्या लाथांचा मार ' ' रजपूत परी त्या परवशतेचे भूत पछाडी ', ' तो शूर मराठा पाहि तयाचे खाई न कुत्रें हाल !' (... गणेश स्तवन) या स्वातंत्र्यासाठीच ते प्रभू रामरायाला ' स्वातंत्र्य सकल सुखनिधी 'ची मागणी करतात. अमेरिका, जपान, इटली इत्यादी देश स्वतंत्र झाले, ' मग आर्यभूच का पारतंत्र्यकर्दमी फसविली – राम ?' भगवान रामचंद्राप्रमाणेच भगवान श्रीकृष्णालाही ते बोलावतात,

" परतंत्र मायभू झाली । हरि वाजवी गीता मुरली ॥' (... मुरली)

दुसऱ्या एका कवितेत, परमेश्वराचा धावा करताना ते म्हणतात,

–– हा देश कशाचा साचा । हा देश दास्य नरकाचा
नरकामधि सापडलो । नरकरूप होऊन गेलो ॥"

(... धाव रे धाव भगवंता !)

पारतंत्र्याच्या परिस्थितीची चीड लोकांना यावी हा हेतू

पारतंत्र्याच्या परिस्थितीची लोकांना चीड यावी म्हणूनच ' नरकवास ', ' उपहास ', ' उपरोध ', ' प्रार्थना ' इत्यादींचा आश्रय कवीने घेतला आहे. दुसऱ्या एका कवितेत ते सांगतात,

" घरोघरी कुदशेचे झडती महाऽकांत चौघडे ! ग ! माते !
धाके धाके आर्य इंदिरा नाचे नीचा पुढे !!"

(... स्वतंत्रता देवीची भूपाळी)

हे लिहिण्यामागेही चीड यावी हाच हेतू आहे.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून राष्ट्रीय कवितांची निर्मिती

कवी गोविंद केवळ भावकवी नव्हते तर ते एक राष्ट्रभक्त विचार कवी होते असे त्यांच्या काही ऐतिहासिक स्त्रियांवर लिहिलेल्या कवितांवरून वाटते. या कविता एका मानसशास्त्रीय भूमिकेतून स्वातंत्र्य कवी गोविंदांनी लिहिलेल्या असल्याचे जाणवते. स्वातंत्र्याचा लढा हे सतीचे वाण असून त्याकरिता तरुणांना प्रभावित करणे, त्यांच्याद्वारा लढा चालविणे व यश संपादन करणे, कवीला आवश्यक वाटते. घाडसी, त्यागी, शूर तरुणांना या लढ्यापासून स्त्रियांनी परावृत्त करू नये यासाठी ही वीरमातांची, वीरांगणांची गीते कवी गोविंदांनी लिहिली आहेत. उदाहरणार्थ, वीर माता जिजाबाई म्हणते

" भूभक्तीचे प्रबल दुग्ध पाजीन । मी वीर तुला बनवीन ।
रिपुरक्ते भू तुझ्या करीं न्हाणीन । स्वातंत्र्य घरी आणीन ।।"

(...जिजाबाईचा झोका)

नरवीर तानाजीची वीर पत्नी म्हणते,

" अजुन नाही झाली अपुली मायभू स्वतंत्र
कुठे शत्रु बुडले सांगा मृत्युसागरात ..."

(... नरवीर तानाजी यांच्या स्त्रीचा वीरोचित विलाप)

स्वातंत्र्यभक्ती– स्वातंत्र्यवीर महाकवी सावरकरांच्या कवितेला जसे आत्मबलाचे अधिष्ठान आहे तसेच अधिष्ठान स्वातंत्र्यकवी गोविंदांच्या कवितेलाही आहे. जिजामाता स्वातंत्र्य घरी आणवीन म्हणते, तर तानाजीची वीर पत्नी अपुरे राहिलेले पतीचे कार्य पूर्ण करण्याचे आश्वासन देते. अशा रीतीने आत्मबलाचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेम यांच्या उत्कट लालसेतूनच स्वातंत्र्यकवी गोविंदांनी ही राष्ट्रीय कविता लिहिली आहे. ' भारत प्रशस्ती ', ' राष्ट्रसंत प्रतिज्ञा ', ' श्रीकृष्ण जन्मोत्सव ', ' वेदांताचा पराक्रम ', ' देवा ! तारि हिंदुस्थान ।' यासारख्या कवितांमधून त्यांच्या उत्कट राष्ट्रभक्तीचे दर्शन घडते. ' प्रतापराव गुजरांची मरणाला प्रार्थना ', ' नरवीर तानाजीच्या स्त्रीचा विलाप ', ' स्वतंत्रता देवीची भूपाळी ', ' स्वतंत्रतेचा पण ', ' हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य ते ।' ' गणेशस्तवन ' यासारख्या कवितांतून त्यांच्या अंतःकरणातील उत्कट स्वातंत्र्यप्रेमाची जाणीव होते. " दास्यहर, एक्यधर, लोकगण, गणपते " अशा विघ्नहर्त्याला आवाहन करून कवी म्हणतो,

" पौरुषाचे पुरे येऊ द्या स्फुरण ते ।
हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य ते ।।"

(हिन्दभू वांछिते विगत स्वातंत्र्य ते)

दुसऱ्या एका कवितेत, पारतंत्र्य संहरणि शांकरी मातेला कवी आवाहन करतो,

स्वतंत्रता देवता बलिदानाशिवाय प्रसन्न होत नाही याची कवीला जाणीव आहे. या स्वतंत्र-देवतेला वश करणारा पुरुष पराक्रमी, त्यागी असला पाहिजे हे सांगताना कवी म्हणतो,

" रिपुरक्ते भिजवुनि पाणि । घाली तुझी जो वेणी ।
तूं होसि तयाची राणी । स्वातंत्र्य कुसुमि त्या पुजुनी ।।"
(... स्वतंत्रतेचा पण ।)

स्वातंत्र्यासाठी ' राष्ट्रसंत ' प्रतिज्ञा करून प्रयत्नाला लागतात. ते म्हणतात,

" आम्ही स्वराष्ट्र संत । करु राष्ट्र भू स्वतंत्र ।
... मरणास सेवु सतत । जननास घेऊ अमित ।
सोसून सर्वस्वांत । करु राष्ट्र भू स्वतंत्र ।।" (...राष्ट्रसंत प्रतिज्ञा)

या स्वातंत्र्याची व्यापक अनुभूती स्वातंत्र्यवीर गोविंदांना आलेली आहे. म्हणूनच ते म्हणतात,

" वदवे ना आम्हा जे वाचे । जे परी नाचे स्वांती सकलांचे ।।"

भिक्षां देहि वृत्तीने स्वातंत्र्याचा लाभ होणार नाही. त्यासाठी युद्धालाच सिद्ध झाले पाहिजे असा त्रिकालाबाधित सिद्धांत ते सांगतात.

" रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना । असा भूतकालीन सिद्धान्त जाणा ।
स्वराज्येच्छुने पाहिजे युद्ध केले । रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?"
(... रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले)

प्रखर राष्ट्रभक्ती– ज्या स्वातंत्र्याचा ध्यास स्वातंत्र्यकवी गोविंदांनी घेतला होता ते स्वातंत्र्य त्यांच्या अत्यंत आवडत्या महान राष्ट्राचे होते. मातृभूमीसंबंधी गोविंदांना पराकोटीचा आदर आणि अभिमान होता. या मायभूमीच्या मुक्तीसाठीच त्यांच्या राष्ट्रसंतांची प्रतिज्ञा होती. या राष्ट्रासाठीच ते परमेश्वराची करुणा भाकतात.

" जीव आमुचे देशपदावर आम्ही केले दान !
ह्या जीवांचा जीव देऊनी दे ह्याला जीवदान ! देवा तारी हिंदुस्थान "
(– देवा ! तारी हिंदुस्थान !)

या कवितेप्रमाणे ' श्रीकृष्ण जन्मोत्सव ', ' हिंदभू वांछिते विगत स्वातंत्र्य ते ', ' सुंदर मी होणार !' ' भारतप्रशस्ती ' यासारख्या कविता त्यांची प्रखर राष्ट्रभक्ती सिद्ध करणाऱ्या आहेत. ' भारत-प्रशस्ती' ही प्रदीर्घ कविता सोळा कडव्यांची असून एक एक कडवे म्हणजे स्वतंत्र अशी स्फुट कविता वाटावी एवढे मोठे असल्यामुळे त्या सोळा कविताच वाटतात. चंद्र सोळा कलांनी प्रकाशतो तशी भारतमाता सोळा कलांनी प्रकाशित झालेली आहे. या कवितेची सुरुवात अनन्वय अलंकाराने स्वातंत्र्यकवी गोविंदांनी केलेली आहे. " भास्वर तुजसम भास्वर तूच भारता !" भारतासंबंधी असलेला अभिमान व्यक्त करताना कवी म्हणतो,

" समर शूर, दानशूर ज्ञानशूर तू ।
दैत्यार्दन यवनार्दन म्लेंच्छार्दन तूं ।।
शत्रुंजय मृत्युंजय मदनंजय तू ।
सत्प्रियकर खलभयकर नतशुभकर तूं ।।
जगदर्जिक्य, जगदवद्य, जगदमर्त्य तूं ।।"

पूर्व परंपरेचा अभिमान– राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्यभक्ती या दोन महत्त्वाच्या विशेषांप्रमाणे पूर्व परंपरेचा अभिमान हा राष्ट्रीय कवितेचा एक प्रमुख विशेष आहे. 'भारतप्रशस्ती', 'श्रीकृष्ण जन्मोत्सव'; 'मुरली', 'वेदांताचा पराक्रम', 'गणेशस्तवन', 'हिंदभू वांछिते', 'महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदेकरिता स्वागतपर गीत', 'आम्ही स्वराष्ट्र संत' इत्यादी कवितांमधून पूर्व–परंपरेचा अभिमान उत्कटतेने व्यक्त झालेला आहे. 'भारत प्रशस्ती'चा अर्धाअधिक भाग या पूर्व–परंपरेच्या गौरवाने व अभिमानाने व्यापलेला आहे. अनेकांनी या देशाला आपले बनविण्याचा प्रयत्न केला. आपल्या दर्शनकारांचे आणि महर्षींचे गुणगान करून ते सांगतात,

> "श्रीमद्रामायणा' 'भारता' अखंड स्वागत ते तुमचे
> तुम्ही ! आरसे आर्य मनाच्या धर्माच्या प्रतिबिंबाचे !"
> (– महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषदेकरिता स्वागतपर गात)

दुसऱ्या एका कवितेत, "पराक्रमी वेदांत ! आमुचा पराक्रमी वेदांत !
पराक्रमी वेदांत ! हो ! हा अनुभव धादांत !!"
(– वेदांताचा पराक्रम)

पूर्ववैभवाचे स्मरण

पूर्वपरंपरेच्या अभिमानाप्रमाणे पूर्ववैभवाचे स्मरणही कवी गोविंदांना तीव्रतेने होते. किंबहुना या वैभवाच्या स्मरणामुळे पारतंत्र्याची तीव्रता आणि दुःखही अधिक असल्याचे आपण पाहिले आहे. 'श्रीकृष्ण जन्मोत्सव', 'वेदांताचा पराक्रम', 'भारतप्रशस्ती', 'गणेशस्तवन' या कविता त्या दृष्टीने बघण्यासारख्या आहेत. 'भारतप्रशस्ती' या कवितेत ते सांगतात, "जगज्जेति परचक्रे अमित मोडिली ... ... भारतीय देव कुशल दास्य नाशनी !" (– भारत प्रशस्ती !) दुसऱ्या एका कवितेत

> "अटकेला झेंडा नेला । रिपु फटका फटका दिधला !
> दिल्लीचा स्वामी झाला ! तो शूर मराठा !" (– गणेशस्तवन)

पूर्ववैभवाचे स्मरण करताना ज्या आर्य जातीने हे वैभव भोगले आणि यश संपादन केले त्या आर्य जातीचा अभिमानही स्वातंत्र्यकवी गोविंदांच्या कवितेतून व्यक्त झालेला आहे.

वीर विभूतिपूजन

महाकवी सावरकरांच्या खालोखाल महापुरुषांच्या पराक्रमाचे गुणगान आणि पूजन राष्ट्रकवी गोविंदांनीच केलेले आहे असे म्हणता येते. त्यात देवदेवता आहेत, अवतारी पुरुष आहेत, संत महंत, धर्मसंस्थापक आणि पराक्रमी राष्ट्र–पुरुषांचा समावेश आहे. नररत्नांना जसे स्थान आहे तसेच वीर मातांना आणि वीरांगणांनाही स्थान आहे. 'प्रभु रामरायाची प्रार्थना', 'गणेशस्तवन', 'मुरली', 'श्रीकृष्ण जन्मोत्स', 'राष्ट्रसंत प्रतिज्ञा', 'जिजाबाईने बालशिवाजीस दिलेला झोका', 'भारत–प्रशस्ती', 'अफझुलखानाचा पोवाडा', 'शिववाचा दरवार', 'शिवाजी', 'यमाजा दरबार', 'प्रतापराव गुजरांची मरणास प्रार्थना', 'जावळीचे चंद्रराव मोरे संवाद', 'नरवीर तानाजी यांच्या स्त्रीचा वीरोचित विलाप', 'मराठ्यांच्या पराक्रमाचा फटका', 'सरस्वतीची भूपाळी', 'वसंत गेला' आणि 'लोकमान्य–टिळकांची भूपाळी' यासारख्या अनेक कवितांमधून गोविंदांनी वीर विभूति-पूजन केलेले आहे. स्वातंत्र्याकरिता, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या देवतांनाच स्वातंत्र्यकवी गोविंदांनी साभिप्राय विशेषणे वापरून आवाहन केलेले आहे. विघ्नहर्त्या गजाननाला ते म्हणतात,

" दास्यहर ऐक्यधर, लोकगण–गणपते
वारिता होय वा ! भक्तजन संकटे ! "
(– हिन्दभू वांछिते विगत स्वातंत्र्य ते !)

भगवान श्रीरामचंद्राला तर " हे घनःश्याम श्रीराम मदात्माराम ।
स्वातंत्र्य सकल सुखनिधी समर्पुनि कधी पुरविशिल काम ! "

श्रीकृष्णाच्या ' गीता मुरली ' चे वर्णन कवी गोविंदांनी कसे केले आहे ते बघण्यासारखे आहे.

" तव मुरली मोहन गीत । निर्जिवा करी जीवंत
षंढास समर पंडित । रणधीर रिपुसि भयभीत
अबलासि करिल बलशाली शालि । हरि वाजिव गीता मुरली ॥"
(– मुरली)

वीर विभूती पूजनकरतानाही गोविंदांच्या राष्ट्रीय विचारांचे क्षितिज केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यात ' भारतीय वीरसिंह संघाचे ' पूजन आहे.

" तो विक्रम, तो प्रताप, चन्द्रगुप्त तो !
पुष्यमित्र, यशोधर्म, श्री अशोक तो !
छत्रपती, छत्रसाल, पृथ्वीराज तो !
सिंह संघ अगणित वर्णवे न तो " (– भारत प्रशस्ती)

छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

छत्रपती शिवाजी महाराज आणि लोकमान्य टिळक यांच्या विभूतिमत्त्वाचे गुणगान करताना स्वातंत्र्यकवी गोविंदांच्या वाणीला भरते आलेले आहे. ही दोन्ही महाराष्ट्राची आज दैवते झालेली आहेत. कवी गोविन्दांच्याच शब्दात सांगावयाचे तर शिवाजी महाराज म्हणजे 'महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य यज्ञातील स्फूर्तिरूप तीर्थप्रसाद', तो महाराष्ट्रातील प्रत्येक सुपुत्राने सेवन करून पुनः तशा यज्ञाची मुहूर्तमेढ रोवण्यास बद्धपरिकर व्हावे. एका कवितेत शिवाजी महाराजांच्या आगमनाचे वर्णन करताना म्हणतात,

" वीरश्रीची जिवंत दीप्ती, धर्माची अन्तःस्फूर्ती ।
शत तोफांची सलामि झडू द्या आले श्रीमान छत्रपती ॥"
(– महाराष्ट्रीय– हिन्दुधर्म परिषदेकरिता–स्वागत गीत)

' शिवाजी ' या कवितेत,

" देशाचा पालनवाला । तो शिवाजी राजा झाला ।
धर्माचा पालनवाला । तो शिवाजी राजा झाला ।"

' शिवबाचा दरबार ', ' जिजाबाईने बाल शिवाजीस दिलेला झोका ', ' अफझुलखानाचा पोवाडा ', ' जावळीचे चंद्रराव मोरे, संवाद ', ' मराठ्यांच्या पराक्रमाचा फटका ' या कवितांमधून शिवाजी महाराजांचे वीर विभूतिपूजन प्रामुख्याने आलेले आहे. शिवाजी महाराजांबरोबर त्यांचे जीवास जीव देणारे लढवय्ये सहकारीही आलेले आहेत. बाजीप्रभू देशपांडे, नरवीर तानाजी, पुरंदरचा वीर मुरारबाजी, प्रतापराव गुजर इत्यादींचेही स्मरण व पूजन गोविंदांनी केलेले आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे दैवत म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. स्वातंत्र्यकवी गोविंदांना लोकमान्यांसंबंधी विलक्षण आदर आणि भक्ती असल्याचे त्यांच्या कविता वाचून जाणवते. लोकमान्यांवर अनेक कवींनी कविता लिहिल्या आहेत पण कवी गोविंदांनी लिहिलेल्या 'भूपाळी' ची सर एकाही कवितेला यावयाची नाही. आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने ही कविता अप्रतिम आहे. 'लोकमान्यांसारख्या धीरोदात्त राष्ट्रपुरुषाचे यथार्थ दर्शन घडविण्याचे सामर्थ्य कवी गोविंदांच्या वाणीत आहे. 'जयजय टिळका, अपर समर्था धीरा धी भास्करा' अशी सुरुवात असलेली एकोणवीस कडव्यांची अमरभूपाळी कवी गोविंदांनी आळविली आहे. कल्पनावैभव व अलंकारसौंदर्य या दृष्टीनेही ही कविता अजोड आहे. उदाहरणार्थ,

" कार्य कुशलता, नीतिचतुरता, श्रीहरिची जन्मते
टिळक मिष, श्रीहरिची जन्मते "
... " तव अनुशासन जन संजीवन, सिंहासन तुज नसे ...
सार्वभौम भूपाल परी तू जनादराचा असे ..."
" असंख्य तलवारीचे मुजरे झडावेच तुजपुढे ...
मुक्या मनाने किती उधळावे शब्दांचे बुडबुडे
तुझ्यावर शब्दांचे बुडबुडे ।
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥"

शेवटी कवीने त्या जगन्नियंत्या परमेश्वराला कृपाप्रसाद मागताना प्रार्थना केली आहे,

" कुशल असो हा, विजयी असो हा, टिळक जगन्नायका
प्रभु या एका खांबावर उभि महाराष्ट्रद्वारका ।"

वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब

ऐतिहासिक वीरपुरुषांवर आणि ऐतिहासिक नाट्यपूर्ण प्रसंगांवर काव्य करण्याचे कार्य आधुनिक महाराष्ट्रातील अनेक कवींनी केलेले आहे. परंतु वर्तमानाचे यथार्थ प्रतिबिंब महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्याच काव्यातून प्राधान्याने आढळते. आपल्याला उघडपणे स्वातंत्र्यासंबंधीचे; राष्ट्रजागृतीसंबंधीचे विचार बोलता येत नाहीत. खुनशीपणाने सरकार दडपशाहीला सिद्ध झालेले आहे अशा स्थितीत शिवरामपंत परांजप्यांच्या रूपकाच्या, अन्योक्तीच्या पद्धतीनेच कार्य करणे शक्य होते. कवी गोविंदांनी त्याकरिता ऐतिहासिक आणि पौराणिक कथाप्रसंग संवादरूपाने मांडलेले आहेत. उदा. 'शिवाजी व दादोजी कोंडदेव यांना संवाद', 'शिववाचा दरबार' (संवाद), 'जिजाबाईचा झोका', 'नरवीर तानाजीच्या पत्नीचा वीरोचित विलाप', 'प्रतापराव गुजरांची मरणास प्रार्थना', 'अफझुलखानाचा पोवाडा', 'पुरातन मौज', 'काळाराम', 'रावण बिभीषण संवाद', 'मोक्ष पुराण' अथवा 'सेवा योग', 'ब्राह्मण', 'तोंडपुजे', 'देवा तारि हिंदुस्थाना', 'डोळे उघडाना'; यासारख्या कवितांतून वर्तमानाचे प्रतिबिंब पडलेले आहे. राष्ट्रकवी गोविंदांच्या अन्योक्तीच्या शैलीचे रावण बिभीषण संवाद हे एकच उदाहरण पुरेसे ठरणारे आहे. बिभीषण रावणाला प्रश्न विचारतो,

... " लंघून महासिंधूला । जाऊन आर्य देशाला
तो देश सांग भूपाला । अन्याये कां तूं हरिला ?
... दाबुनी आर्य भूमीका ? तेथील गांजिसी लोका ?" त्यावर रावण उत्तरतो,

" लाधेल पराक्रम ज्यास, । तो असंख्य जिंकिल देश !
तेथिल लोकास । बनवील आपुले दास ॥"

आधुनिक लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा अर्थ

भारतीय संविधान अस्तित्वात येण्यापूर्वीच राष्ट्रकवी गोविंदांनी सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याची मागणी केली आहे. ते म्हणतात,

" राष्ट्र स्वातंत्र्य द्या हिंदभूला नवे । धर्म स्वातंत्र्य ते हिंदभूला हवे ।
ज्ञान स्वातंत्र्य ती प्रार्थुनी मागते । हिंदभू वांछिते ' सकल ' स्वातंत्र्य ते !"

' सकल ' या एका शब्दात आधुनिक जगातील सर्व स्वातंत्र्यांचा समावेश आलेला आहे. स्वातंत्र्याप्रमाणेच समताधर्माचाही व्यापक अर्थ कवी गोविंदांनी सांगितला आहे. या समतातत्त्वाचे वैशिष्ट्य असे की ते तत्त्व संपूर्णपणे भारतीय आहे, कवी म्हणतो,

" समता धर्म श्री वेदांचा, उपनिषदांचा, सूत्रांचा ।
समता धर्मच श्री गीतेचा, योगांचा स्मृति शास्त्रांचा !

पुढे कवी म्हणतो

" गुलामगिरिचा न्हास हवा कां ? शरण रिघा मग समतेला !
स्वातंत्र्याचा स्वर्ग हवा का ? शिरी धरा मग समतेला !"

म्हणूनच ते ' ब्राह्मण ' या कवितेत म्हणतात,

" तो असो विप्र वा क्षात्र । हो वैश्य शूद्र, अतिशूद्र ।
जो सज्ज जनांचे भद्र साधायाला । तो हिंदवी ब्राह्मण ठरला !"

पुरुषत्वाची अट सांगताना राष्ट्रकवी गोविंद म्हणतात,

" निजराष्ट्राच्या स्वहितार्थ । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो, !
निजधर्माच्या प्रीत्यर्थ । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो !
तो मनुज असो स्त्री–जात । जो अचाट करि पुरुषार्थ । पुरुष तो "

(– पुरुष कोण ?)

आर्थिक विषमतेचे भान

सामाजिक व राजकीय समतेबरोबरच आर्थिक समताही कवीला अभिप्रेत आहे. या आर्थिक विषमतेची फळे म्हणजे दारिद्र्य, दैन्य, लाचारी, दुर्भिक्ष ! शेतकऱ्याची दुर्दैवी कहाणी सांगताना कवी म्हणतात,

" अर्ध उपाशी या कुणब्याशी वालि न जनही कुणि जाणा
केविलवाणे झालो आम्ही ऐका आमुची ही दैना ! ..."

(शेतकऱ्याची दुःखद कहाणी)

कठोर आत्मपरीक्षण

वर्तमानकाळाच्या यथार्थ प्रतिबिंबाप्रमाणेच आपल्या राष्ट्रीय जीवनाचे स्वामी विवेकानंदांनी जसे कठोर आत्मपरीक्षण केले तसेच आत्मपरीक्षण करून राष्ट्रकवी गोविंदांनी आपल्या राष्ट्रीय जीवनाचा शोध घेतला आहे. कवी म्हणतो,

" कलहाचे नाचे भूत समतेचा झाला अंत
पडलेच ज्ञान बंदीत । हे सत्य करी आकांत "

(– मुरली)

दुसऱ्या कवितेत भारताच्या पुरुषार्थहीन जीवनाचे विदारक चित्र उभे केलेले आहे.

" या भरत–भूमिचे ठायीं । उरला न अतां कोणीही । पुरुष तो !!
नपुंसके पूर्ण भरली ही । उरला न अतां कोणीही । पुरुष तो "

(– पुरुष कोण ?)

टीकाकारांचा दृष्टिकोन

अशा या अत्यंत कठोर, सडेतोड, निर्भीड आत्मपरीक्षणामुळेच स्वातंत्र्यकवी गोविंदांची कविता अत्यंत स्फोटक झालेली आहे. तिला श्री. वा. ना. देशपांडे यांनी दिलेली. ज्वालामुखी पर्वतातून बाहेर पडून आसमंतातील गावेची गावे बेचिराख करणाऱ्या लाव्हा रसाची उपमा ' खरोखर यथार्थ आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " क्रांतीला आवश्यक आणि पोषक असे जनमत उद्दीपन घडवून आणण्यात काव्य साहाय्य करू शकते काय ? या प्रश्नाचे अस्तिपक्षी समर्थन करणाऱ्यास गोविंदांची कविता निश्चये करून अत्यंत उपयोगी पडू शकते."[४५] श्री. ग. त्र्यं. माडखोलकर तिच्या स्वरूपाचे रौद्रभीषण सौंदर्य सांगताना म्हणतात, " त्यांची कविता एरव्ही कितीही सदोष असली, तरी तिचे विद्युत्स्फुरण मात्र अनन्य सुंदर आहे आणि या लोकोत्तर स्फुरण गुणांमुळेच अभिनव भारताचे उद्गायन गोविंदांना करता आले. त्यांचे स्थान केवळ कवीत नाही, तर क्रांतिदेवतेच्या उद्गायकांत आहे. शारदेच्या परिवारात नाही, तर महाकालाच्या रुद्रगणात आहे."[४६] दुसऱ्या एका ठिकाणी डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " सावरकर वगळल्यास स्वातंत्र्याचा इतका ध्यास घेणारा दुसरा कवी मराठीत झालाच नाही."[४७] प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, "परिणामावरून काव्याची योग्यता ठरवावयाची असेल तर गोविंद कवींची कविता निःसंशय उच्च होती..." सारांश, महाराष्ट्रवाङ्मयात कविलोकांत शाहीर म्हणून कवी गोविंदांची जागा पहिली आहे यात शंका नाही. राजस्थानच्या इतिहासात चांदभाटाला जो मान आपण द्यावा तोच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात गोविंदांना देणे योग्य होईल."[४८]

रसरसणाऱ्या भावनांनी आणि भव्योदात्त कल्पनांनी युक्त असे काव्य

राष्ट्रीय भावनांचे उद्गान करणाऱ्या या कवीचे प्रतिभासामर्थ्यही अचाट होते असेच म्हणावे लागते. विद्या, व्युत्पन्नता, पांडित्य आणि बहुश्रुतता यांच्यापासून दूर असलेल्या पण एका तेजस्वी महाकवीच्या संपर्कात आलेल्या या कवीने आधुनिक कवितेच्या प्रांतात स्वतःचे नाव अजरामर केलेले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सहवासात आल्यानंतर कवी गोविंदांचा पुनर्जन्म झाला हे मान्य पण असे अनेक लोक त्याकाळी सावरकरांच्या सहवासात आले. त्यातील श्रेष्ठ कवी होण्याचे भाग्य कवी गोविंदांच्याच तेवढे वाट्याला आले याचे कारण प्रतिभेचे जोमदार बीज गोविंदांच्या ठिकाणी मूळातच होते हे आहे. विचार, भावना, कल्पना आणि भाषा–प्रभुत्व या सर्व काव्यघटकांनी समृद्ध अशी त्यांची कविता आहे. या काव्यगुणांच्या जोडीला नादमाधुर्य, लयबद्धता यांची जोड मिळाली आहे. प्रचारकी स्वरूपाची वाटणारी गोविंदांची राष्ट्रीय कविता प्रसाद, ओज आणि माधुर्य या त्रिविध गुणांनी संपन्न असून तिचे स्वतःचे एक आगळे सौंदर्य आहे.

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " ईश्वरनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा या दोन्ही उदात्त वृत्तींचा अत्यंत उत्कट स्वरूपात सुंदर संयोग जीत सहज साधलेला आहे अशा 'सुंदर मी होणार !' या कवितेत गोविंदांच्या कवित्वशक्तीचे सारे मनोज्ञ गुण विशेष व्यक्त झालेले आहेत. ही कविता म्हणजे चिरंजीव स्वरूपाचे एक दिव्य संजीवनगीत आहे." [४९] प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " राष्ट्रवादी कविपरंपरेत विनायक दामोदर सावरकर व गोविंद त्र्यंबक दरेकर हे अग्रेसर होत." 'सुंदर मी होणार !' या कवी गोविंदांच्या 'आत्मनिष्ठ' भाव कवितेसंबंधी प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " हे जगातील वाङ्मयात ज्यास तोड नाही असे करुण-कोमल सहजोद्गार !" [५०] प्रा. नि. शं. ठकार म्हणतात, " वासांसि जीर्णानि' चा एवढा सुंदर काव्याविष्कार तोही एका आजन्मपीडित व पंगू कवीकडून झालेला अन्यत्र दुर्लभ आहे. 'प्रभु सुंदरा समसुंदरा' अशी ही कविता मराठी कवितेचे एक चेतोहर लेणे आहे." [५१]

मूल्यमापन– गोविंदांची कविता म्हणजे सतीचे वाण

अलीकडे कलावादी टीकाकारांचा एक नवा वर्ग अस्तित्वात आलेला आहे. त्या वर्गाला केवळ कलात्मक मूल्येच मान्य आहेत. कवी गोविंदांची कविता ही मूल्यनिष्ठ कविता आहे. ती स्वयं-केंद्रित, व्यक्तिनिष्ठ आभासनिष्ठ आणि जीवनविन्मुख नाही तर जीवननिष्ठ आणि राष्ट्रनिष्ठ आहे. या कवितेसाठी त्यांना वनवास भोगावा लागला. हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, शिव्याशाप ऐकावे लागले. ती कविता नव्हती, सतीचे वाण होते. या देशातील स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रनिष्ठ कोटचवधी अंत:करणातील आकांक्षा या कवितेतून आविष्कृत झालेली होती. म्हणूनच बाळ जेरे म्हणतात, "बंदि-शाळेतल्या एकलकोंडीतल्या अंधेराच्या निविडतेत, फाशीच्या दोरावरील आंदोलनात, रक्तपातात; हातघाईत, प्राणांच्या बलिदानात त्या कवितेतील चरणा चरणांचे भयंकर रूपांतर प्रत्ययाला येत असतानाही तिचा त्याग करणाऱ्या वीरांनी तिला कृतार्थ केली. ··· ती गोविंदांची कविता न राहता हौतात्म्यांच्या वीर नि:श्वसितांचे थोरपण पावली." [५२] गोविंदांचा गौरव करताना महाकवी सावरकर म्हणाले, " कै. कवी गोविंद यांचे काव्य वाचून पाहता कवि गोविंदांना स्वातंत्र्यशाहीर म्हणण्यापेक्षा स्वातंत्र्यभाट किंवा स्वातंत्र्यकवी असेच म्हणणे मला सयुक्तिक दिसते." [५३]

भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य असणारी अमर राष्ट्रीय कविता

स्वातंत्र्यकवी गोविंदांची राष्ट्रीय कविता ही भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्य असणारी अमर अशी कविता आहे. तिचे मोठेपण तिच्या मुळाशी असणाऱ्या प्रखर राष्ट्रनिष्ठेत, ज्वलंत देशभक्तीत आहे. तिच्यातून प्रकट झालेली राष्ट्रनिष्ठाही मानवतावादी भूमिकेला स्पर्श करणारी व्यापक अशी आहे. म्हणूनच तिच्यातून सत्यं, शिवं, सुंदरम्चा साक्षात्कार होतो. श्री. कृ. व. निकुंब कवी गोविंदांच्या कवितेचे वैशिष्टय सांगताना म्हणतात, " देशभक्तीची प्रेरणा आणि राष्ट्रीय वृत्तीचे पोषण हे त्यांच्या कवितेचे प्रमुख उद्दिष्ट आहे." [५४] राष्ट्रभावना, राष्ट्रीय विचार एखादा प्रतिभासंपन्न कवी किती लालित्यपूर्ण, प्रभावी आणि प्रासादिक शैलीने व्यक्त करू शकतो आणि त्यातून स्वाभाविकपणे फुललेले आणि चैतन्याने रसरसून संजीवक ठरलेले काव्य कसे चेतोहर असू शकते याचा आदर्शपाठ म्हणजेच राष्ट्रकवी गोविंदांची चिरंजीव राष्ट्रीय कविता होय. स्वातंत्र्यकवी गोविंदांचे आधुनिक राष्ट्रीय कवीतील स्थान पहिल्या ओळीत आहे, असे नि:शंकपणे म्हणता येते.

महाकवी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर (१८८३–१९६६)

लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचा आधुनिक काळातील युगपुरुष

स्वातंत्र्यवीर सावरकर हा आधुनिक भारतातील एक चमत्कार आहे. या राष्ट्रभक्ताचे जीवन उत्तमोत्तम अशा विविध गुणांनी संपन्न झालेले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही गुण आनुवंशिक असले तरी काही गुण अर्जित केलेले होते. केवळ मराठी माणसालाच नव्हे तर प्रत्येक भारतीय माणसाला आदर आणि अभिमान वाटावा असे सावरकरांचे राष्ट्रीय कर्तृत्व होते. स्वातंत्र्यनिष्ठा, विशुद्ध देशभक्ती, पुरुषार्थप्रवण उदात्त ध्येयवाद, त्याग, सेवा, तपस्या, बुद्धिमत्ता, राजकारणपटुता, धैर्यशीलता, निःस्पृहता, प्रतिभासंपन्नता, मानवता, नेतृत्व, वक्तृत्व आणि द्रष्टेपणा अशा विविध गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार झालेले होते. अद्ययावतपणा, विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद आणि हिंदुत्व-निष्ठा यांची जोड या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला मिळाल्यामुळे ते वादपटु आणि तर्ककठोर झालेले होते. थोडक्यात सांगावयाचे तर लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचा आधुनिक काळातील युगपुरुष असेच नाव सावरकरांना द्यावे लागेल.

भारतीय क्रांतिकारकांचे कुलपुरुष वीर सावरकर

परकीय राज्यकर्त्यांच्या पराक्रमाने दिपून गेल्यामुळे आपल्या अस्मितेचे विस्मरण झालेल्या भारतीयांना जागृत करण्याचे कार्य स्वदेशात आणि परदेशात करणारे स्वा. सावरकर हे पहिले विद्यार्थी होते. तरुणांच्या अंतःकरणात देशभक्तीची आणि स्वातंत्र्यप्रेमाची ज्वाला प्रज्वलित करून त्यांना आत्मसमर्पणासारख्या त्यागाला प्रवृत्त करणारे, क्रांतिकारकांचे खरे कुलपुरुष स्वा. सावरकरच होते. सावरकर अनेक क्षेत्रांत पहिले म्हणून गाजलेले आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सशस्त्र क्रांतीची चळवळ संघटित करणारे पहिले स्वातंत्र्य सेनानी सावरकरच होत. परदेशी कपडयांची निर्भयपणे होळी करणारे पहिले राजकीय विद्यार्थी नेते म्हणजे सावरकरच ! संपूर्ण हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हेच राजकीय चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट आहे असे बेडरपणे बजावणारे पहिले राजकीय पुढारी म्हणजे सावरकर ! स्वातंत्र्याच्या चळवळीखातर प्रथम मुंबई विद्यापीठाची व पुढे लंडन येथील बॅरिस्टिरीची पदवी नाकारल्या गेलेले पहिले पदवीधर सावरकर हेच आहेत. प्रत्यक्षात प्रकाशित होण्यापूर्वी ज्यांचे वाङमय ब्रिटीश शासनाने राजहृत [जप्त] केले असे जगातील पहिले एकमेव साहित्यिक म्हणजे सावरकर. सशस्त्र क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन करून इंग्रजी सत्तेला शह देणारा आणि पकडले गेल्यानंतर समुद्रात उडी घेऊन स्वतःची मुक्तता करण्याचा प्रयत्न करणारा पहिला भारतीय देशभक्त म्हणजे सावरकर. हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात ब्रिटीश न्यायालयाची अधिसत्ता नाकारणारा, बंडखोर नेता, पन्नास वर्षांच्या काळेपाणी आणि जन्म-ठेपेची रक्त गोठवून टाकणारी शिक्षा झालेला व अंदमानच्या अग्निदिव्यातून सहीसलामत बाहेर पडलेला राष्ट्रभक्त म्हणजे सावरकर ! कारागृहात लेखनसाहित्य उपलब्ध नसताना काटे, खिळे यांच्या साहाय्याने तुरुंगाच्या भिंतीवर महाकाव्ये लिहिणारा पहिला आधुनिक जगातला महाकवी म्हणजे सावरकर ! उत्कट, सरस, भव्योदात्त काव्यसंपदेबरोबर अत्यंत ओजस्वी, विचारप्रवर्तक आणि शैलीदार गद्याची निर्मिती करणारे श्रेष्ठ असे निबंधकार, सावरकर ! भारतीय समाजाला शृंखले-प्रमाणे जखडणाऱ्या सात बेडयांना सुधारणेच्या हातोडयाने तोडणारे समाजसुधारक सावरकरच ! इतिहासलेखक सावरकर आणि 'हिंदुत्वाचे' राष्ट्रीय तत्त्वज्ञान सांगणारेही सावरकर ! कादंबरीकार, चरित्रकार, आत्मचरित्रकार आणि नाटककार म्हणून मराठी वाङमयात स्वतःची विशेष मुद्रा

उठविणारे साहित्यिक सावरकर ! हिंदुत्व, हिंदुराष्ट्रवाद, हिंदुसंघटन आणि हिंदूंचे सैनिकीकरण यांच्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे हिंदुत्वनिष्ठ भारतीय नेते सावरकर ! लक्षावधींच्या जनसागराला आपल्या ओजस्वी, अमोघ आणि अस्खलित वक्तृत्वाने चेतविणारे महान वक्ते सावरकर ! असे विविध प्रकारचे कर्तृत्व असणारे सावरकर हे व्यक्तित्व होते. प्रस्तुत विवेचन महाकवी सावरकर या विषयासंबंधाने करावयाचे असल्यामुळे आता आपल्या मूळ विषयाकडे वळू या !

मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे

स्वा. सावरकरांनी स्वत:संबंधी केलेले हे विधान आहे. त्यांचे संपूर्ण विधान असे, " मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे, पण परिस्थितीने मला राजकारणी पुरुष बनविले आहे. " सावरकरांचे हे उद्‌गार त्यांच्या कवितांचा अभ्यास करताना अधिक चिन्त्य वाटतात. या उद्‌गारातून सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील " नैसर्गिक काव्यवृत्ती आणि परिस्थितीने त्यांच्या काव्याला आलेला घाट, प्राप्त झालेला आशय, मिळालेले विषय आणि अभिव्यक्तीची त्यांनी स्वीकारलेली पद्धती इत्यादी गोष्टीही ध्वनित होतात."[५५] स्वा. सावरकरांवर विद्वत्तापूर्ण प्रबंधलेखन करणाऱ्या संशोधक आणि चिकित्सक डॉ. गावडे यांचे हे विधान आहे. परंतु या किंवा अशा विधानांवरून सावरकरांच्या कलेसंबंधी किंवा कलात्मक अभिरुचीसंबंधी झटपट निष्कर्ष काढणे धोक्याचे आहे. सावरकरांसारखेच काव्यात्म वृत्ती असणारे अनेक कवी त्यांच्या समकालीन होते.

आधुनिक कवींचे कुलगुरू म्हणून गौरविले गेलेले केशवसुत, त्यांचे चेले म्हणून मिरविणारे गोविंदाग्रज, रेंदाळकर, बालकवी हे सर्वच नैसर्गिक काव्यवृत्ती असणारे काव्यात्म मनोवृत्तीचे कवी होते पण सावरकरांसारखी विषयाची, आशयाची, कल्पकतेची आणि अभिव्यक्तीची उंची कुणालाही गाठता आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. सावरकरांनी निर्माण केलेली राष्ट्रीय कविता सोडाच पण त्यांनी लिहिलेली स्फुट कविताही तिचे अलौकिकत्व सिद्ध करणारी आहे. ' जगन्नाथाचा रथोत्सव ' ही एकच कविता तुलनेकरिता पुरेशी ठरणारी आहे. सावरकरांच्या काव्यवृत्तीसंबंधी न. चिं. केळकरांनीही मोठे मार्मिक विधान केलेले आहे. ते म्हणतात, " सावरकरांची काव्यवृत्ती ही नैसर्गिक होती हे निर्विवाद ! केवळ नैसर्गिकच नव्हे तर असामान्य कोटीतील होती."[५६] सावरकरांचे हे असामान्यत्व त्यांना सामान्य कवित्वापासून विभक्त करणारे आहे. डॉ. गावडे म्हणतात, " त्यांच्यातील राजकारणी पुरुषाने त्यांच्यातील कवीवर मात केली." श्री. गावडयांचे हे विधान अर्धसत्य आहे. राजकारणी म्हणण्यापेक्षा राष्ट्रभक्त व ध्येयनिष्ठ सावरकरांनी कलावंत कवीवर मात केली. पण ही अशी मात केल्यामुळेच सावरकर महाकवींच्या पदवीला पोहचू शकले हेही तितकेच खरे आहे. कारण केवळ महाकाव्य रचणे हे महाकवीच्या प्रतिभेचे उद्दिष्ट असूच शकत नाही. सावरकरांचेही तसे उद्दिष्ट नव्हते. सावरकरांनी केवळ काव्याच्याच नव्हे तर स्वत:च्या जीवनासंबंधी साध्यसाधनविवेक अनेकदा केलेला असून त्यांच्या वृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे.

महाकवी सावरकरांची काव्यसंपदा

आज समग्र सावरकर वाङ्मय वाचकांना उपलब्ध झालेले आहे. या वाङ्मयाचा खंड सातवा " काव्य-नाटक विभाग " म्हणून १९६५ मध्ये प्रसिद्ध झालेला असून त्यात सावरकरांची संपूर्ण कविता संग्रहीत झालेली आहे. " आज उपलब्ध असलेल्या सावरकरांच्या कवितांवरून काव्यचरणांची गणना केली तर ती १०,४४५ या संख्येहून अधिक वाढेल हे निश्चित." केवळ संख्यात्मक दृष्टयाही

सावरकरांची कविता इतर कवींच्या तुलनेत विपुल आहे. आपल्या बालवयातील काव्यनिर्मितीचा उल्लेख स्वत: सावरकरांनीच केलेला आहे. ते लिहितात, "आई असतानाच सरासरी आठव्या वर्षाच्या संधीस कवितेची 'धूळपाटी' मी पहिल्याने हाती घेतली. घरी श्रीधरकृत हरिविजयादी पोथ्या पाहून मला वाटले आपणही एक 'महाकाव्य' ग्रंथ लिहिला पाहिले... अकराव्या बाराव्या वर्षाचे वेळी ओव्या, फटके, आर्या मी कितीतरी रची आणि कितीतरी पाठ करी." [५७]

बालवयातच सावरकरांनी अर्वाचीन कवींच्या काव्याचा, शाहिरी आणि बखर वाङ्मयाचा अभ्यास केला होता. प्राचीन कवींत मोरोपंत त्यांचा अत्यंत आवडता कवी होता. वडिलांजवळ त्यांनी 'इलियट'चा अभ्यास केलेला होता. सावरकर आपल्या कवितेच्या छंदासंबंधी सांगतात; "पंतांच्या आर्या पाठ करून वाचून केवळ श्रुतिगतीच्या साच्यावर विसंबून मी असे... आर्या नसल्या तरी फटके, ओव्या, पदे ही रचून वर्तमानपत्रात गुपचूपपणे छापण्यास धाडण्याचेही साहस मी करू लागलो. होता होता एक दिवस माझा 'स्वदेशीचा फटका' खरोखरीच छापून आला."[५८] इ. स. १८९८ मध्ये लिहिलेल्या या फटक्यात भारताचा हजारो वर्षांचा ऊर्जस्वल भूतकाळ त्याच्या विविध तपशिलांसह सावरकरांनी सादर केलेला आहे. "देवी भागवताची पोथी वाचून देवाच्या भक्तांची चरित्रे थेट राणाप्रताप शिवाजीपर्यंत कथन करणारा दुर्गादास विजय नावाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिण्यास त्यांनी बालवयातच आरंभ केला. पहिल्या उपक्रमाचे चार पाच अध्याय तीन चारशे ओव्यांचे रचले. [५९] सावरकरांनी स्फुट काव्यलेखन केलेले आहे तसेच महाकाव्यनिर्मितीच्या भूमिकेतून 'कमला', 'गोमांतक', 'विरहोच्छवास' आणि 'महासागर' ही खंडकाव्येही निर्माण केलेली आहेत.

सावरकरांना पूजनीय वाटणाऱ्या देवतांचे व महापुरुषाचे स्वरूप

ध्येयनिष्ठ सावरकरांना पूजनीय वाटणाऱ्या दैवतांचे आणि त्यांना प्रेरणा देणाऱ्या महापुरुषांचे दर्शन त्यांच्या आत्मचरित्रातून घडते. त्यांचे पहिले दैवत म्हणजे रक्ताने माखलेली शस्त्रधारी अष्टभुजादेवी होती. आईवडिलांच्या ठिकाणीही सावरकरांची कमालीची भक्ती होती. नाशिक येथील विद्याध्ययनाच्या काळात स्वत: सावरकरांनीच आपल्या राष्ट्रीय दैवतांचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे. या दैवतात शिवाजी महाराज, बंडवाले नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, सेनापती तात्या टोपे, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू आणि रानडे, लो. टिळक, शि. म. परांजपे; आणि इटलीचे देशभक्त जोसेफ मॅझिनी यांचा समावेश आहे.[६०]

महान जीवित ध्येयाची आणि साधनांची निश्चिती

राष्ट्रकवी सावरकरांपासून क्रांतिकारक सावरकरांना वेगळे करता येण्यासारखे नाही याची जाणीव वरील त्यांची प्रेरक दैवते पाहिली म्हणजे सहज लक्षात येते. वयाच्या अवघ्या चौदाव्या पंधराव्या वर्षीच सावरकरांनी आपले जीवनध्येय निश्चित करून प्रत्यक्ष कार्याला आरंभही केल्याचे त्यांच्या जीवनचरित्रावरून आढळते. ते लिहितात, "कोणत्या तरी अत्युच्च अतिभव्य अतिदिव्य ध्येयास त्याभोवती त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या दृष्टीसमोर धरल्यावाचून लोकांची मने आकर्षण होणार नाहीत. ...देशस्वातंत्र्य हेच आमचे ध्येय, स्वदेशस्वातंत्र्य हाच आमचा राजकीय धर्म.... आमची राष्ट्रीय देवता." [६१]

वयाच्या पंधराव्या वर्षी घेतलेली प्रतिज्ञा

चाफेकर, रानड्यांचे बलिदान अनेक सुशिक्षित तरुणांना माहीत होते पण त्यांच्या बलिदानापासून प्रेरणा घेऊन "माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धास शत्रूस मारीत चाफेकरांसारखा

मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन! ... यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरे मरे तो झुंजेन !!!" [१२] अशी प्रतिज्ञा करणारे किती तरुण निघतील ? ही प्रतिज्ञा म्हणजे महाकवी सावरकरांच्या जीवनातील एक महान राष्ट्रीय संकल्प आहे. त्यांच्या महाकवित्वाचा तो एक अविस्मरणीय सर्ग आहे.

वीर विभूतिपूजनाचा पहिला कालखंड

१८९४ ते १९०५ हा महाकवी सावरकरांच्या काव्यनिर्मितीचा पहिला कालखंड आहे. तारुण्य-सुलभ उत्साह, महत्त्वाकांक्षी हृदय आणि उत्कट जोमदार भावनोत्कटता या काळातील त्यांच्या काव्यातून आढळते. 'स्वदेशीच्या फटक्या' मागोमाग अतिशय स्फोटक म्हणून गाजलेला 'चाफेकर नि रानडे' यांच्यावरील 'फटका' सावरकरांनी लिहिला व प्रकाशित केला. प्रकाशित केला म्हणण्यापेक्षा तो मेळ्यांमधून गायला गेला. त्या कालखंडातच नाशकाजवळची 'लेणी पाहून', 'सायंकाळी रानात चुकलेले कोकरू पाहून', 'नारो शंकराचे देवालय', 'टिळक स्तवन', 'केतकर प्रशस्ती', 'श्री शिवगीत', 'वृषोक्ती', 'श्री शिवाजी महाराजांची आरती', 'विश्वात आजवरी शाश्वत काय झाले ?' 'शिववीर', 'प्रे. क्रूगर यांचा मृत्यू' आणि 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' इत्यादी सुप्रसिद्ध कवितांची निर्मिती झाली. सिंहगडाचा व श्रीवाजी देशपांडे यांचा असे गाजलेले पोवाडेही याच काळातले. चाफेकरांच्या पोवाड्यात म्हणतात, "म्याले नाही काळाला ही झटावया जनकार्याते ? वचकावे मी काय म्हणोनी स्तवण्यासी त्या आर्याते ?"

महाकवीचा साक्षात्कार घडविणारा कालखंड

१९०५ ते १९२२ हा सावरकरांच्या राष्ट्रीय कवितांचा कालखंड म्हणजे त्यांच्या विकसित व्यक्तित्वाचाही कालखंड आहे. या कालखंडात क्रांतिकारकांचे मुकूटमणी म्हणून सावरकर ओळखले गेले आहेत. ते एका महान स्वातंत्र्यसेनानीच्या रूपात जगापुढे उभे राहिले आहेत. पन्नास वर्षांच्या दोन जन्मठेपांची शिक्षा भोगण्यासाठी काळघा पाण्यावर जाणारे सावरकर याच कालखंडातले आहेत. या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विविध पैलूंमुळे काव्य निर्माण करणारे सावरकर महाकवींच्या योग्यतेचे आहेत असे सांगण्याचा यात हेतू नाही. वस्तुस्थिती अशी आहे की याच कालखंडात सावरकरांनी जी काव्यनिर्मिती केलेली आहे ती पाहिली म्हणजे त्यांची योग्यता महाकवीची आहे असे वाटते.

पुरुषार्थाचा प्रकर्ष दर्शविणारी सावरकरांची खंडकाव्ये

सावरकरातला अनुकरणशील रचनाकार या कालखंडात अंतर्धान पावलेला आहे. 'महाराष्ट्र भाट' म्हणून गौरविलेला सावरकरातला आधुनिक शाहीर 'लोककवी' या कालखंडात लोपला आहे. आर्या, फटके, ओव्या, पदे, दिंडी यांच्यासारखी रचना करणारा कुशल शिल्पकार आणि उत्कट रसरसलेली गीते लिहिणारा गीतकार अस्तंगत झालेला आहे. आपल्या महाकवितुल्य प्रतिभासामर्थ्याने आधुनिक मराठीच्या काव्यप्रदेशाला उजळून टाकणारा, आपल्या कोटिकोटी किरणांनी साहित्य-गगनाला प्रकाशित करणारा भास्करासारखा महाकवी याच कालखंडात प्रकट झालेला आहे. त्यांचे काव्य वाचताना व्यास, वाल्मीकी, कालिदास, भवभूती, होमर, मिल्टन, ज्ञानेश्वर या महाकवींची स्मृती व्हावी असे भव्योदात्त जीवनदर्शन महाकवी सावरकरांनी घडविले आहे. मराठीतील अजोड,

अमर, स्फूर्तिदायक, ओजस्वी, तेजस्वी आणि राष्ट्रीय भावनेने रसरसलेली सावरकरांची राष्ट्रीय कविता याच कालखंडात निर्माण झालेली आहे.

नुसत्या ऐकलेल्या शिक्षेच्या धसक्याने मी मी म्हणणाऱ्यांची जीवनाकांक्षा (करपून) जावी. अंदमानच्या काळ्यापाण्याचे नाव ऐकून आणि तुरुंगात होणाऱ्या अत्याचारांच्या कहाण्या ऐकून रात्रंदिवस आत्महत्येचे विचार डोक्यात थैमान घालावेत, एकवेळ नरक परवडला पण अंदमान (नको असे एकमुखाने बंद्यांनी म्हणावे त्या कारावासात सावरकरांना महाकाव्य रचण्याची प्रेरणा झाली आहे. पण केवळ प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी रचना केली किंवा महाकाव्य (रचण्याचे संकल्प (सोडले म्हणून त्यांना महाकवीची पदवी द्यावी असे कुणीही म्हणणार नाही. मात्र महाकवीने घडवावे असे भव्यदिव्य जीवनदर्शन जर कवितेत घडत असेल तर त्यांना महाकवीचे पद निःसंकोचपणे बहाल केले पाहिजे. या भयानक कारावासात मानवी पुरुषार्थाचा प्रकर्ष दर्शविणारे महाकाव्य लिहिण्याचा संकल्प स्वा. सावरकरांनी केला आणि आपल्या खंडकाव्याच्या रूपाने काही प्रमाणात तो साकार केला आहे. महाकाव्याचे आणखी सर्ग त्यांना उत्तर आयुष्यात लिहिता आले नाही म्हणून त्यांचे महाकवीचे पद त्यांना देऊ नये असे म्हणणारे काही टीकाकार मराठीत आहेत. परंतु सावरकरांनी महाकाव्यांची निर्मिती करताना जी प्रतिमेची उंची दाखविली, जी आशयाची उत्तुंगता प्रकट केली आणि कल्पनेची जी भव्योदात्तता दाखविली असे एकतरी उदाहरण आधुनिक मराठीत दाखविता येईल काय? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येणारे आहे. नगाधिराज हिमालयाची सर कोणत्याही डोंगरांना येणे शक्य नाही.

स्फुट काव्यरचनेबरोबर 'कमला', 'गोमांतक', 'विरहोच्छ्वास' आणि 'महासागर' ही खंडकाव्ये तुरुंगातच सावरकरांनी रचली आहेत. शिक्षेमुळे होणारे आत्यंतिक शारीरिक श्रम आणि आजूबाजूला मरगळलेल्या मनाची अनेक माणसे, भविष्याच्या धुक्यामुळे धूसर झालेला जीवनमार्ग यांचे मानसिक ताण सोसूनही सावरकरांनी आत्मिक बळाने उत्साह खेळविला आणि मिळेल त्या आणि जुळेल तशा साधनांच्या साहाय्याने काव्यरत्नमाला गुंफल्या. लेखणीची जागा कधी खिळ्याने तर कधी घायपाताच्या काट्याने घेतली आणि कागदाची जागा तुरुंगाच्या भिंतींना नाइलाजाने द्यावी लागली. जगाच्या इतिहासात असे काव्यलेखन क्वचितच कुणी केले असेल. काव्यनिर्मिती-प्रमाणेच या काव्यांच्या प्रसिद्धीचा इतिहासही त्यांच्याइतकाच अद्‌भुतरम्य असून तो आता सर्वांना विदित झाला आहे.

'कमला'– कमलेत मुकुंद, मुकुल आणि कमला यांची राष्ट्रभक्तिपूर्ण कथा आहे. यौवनाने मुसमुसलेल्या आणि सुखाने रसरसलेल्या, सहवासासाठी पहिल्याने एकत्र आलेल्या वीराला, देशाच्या रक्षणासाठी हव्याहव्याशा मिठीतून सुटून रणांगणाकडे धावावे लागते. भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे असे सांगणाऱ्या उदात्तवीरांचे चित्रण 'कमला' या खंडकाव्यात सावरकरांनी केलेले आहे. यौवनाच्या वासंतिक बहराचे वर्णन विविध रंगी, विविध गंधाने फुललेल्या आणि चांदण्या रात्रीच्या प्रियकराच्या स्पर्शाने धुंद झालेल्या 'फुलबागे'चे वर्णन वाचताना महाकवी कालिदासालाही सावरकरांनी मागे टाकले आहे असे वाटते. पति–पत्नीच्या पहिल्या–वहिल्या संगमोत्सुक भेटीचे शृंगारिक वर्णन जितके चेतोहर आहे तितकेच त्यांच्या विरहाचे वर्णनही बहारदार आहे. संगमोत्सुक उत्कटतेच्या क्षणी रेशमी बंधनातून नायकाला मुक्त करण्यात दाखविलेले कौशल्य महाकवीलाच शोभणारे आहे. संभोग शृंगारातील उत्तानउन्मादाला दिव्यत्व, पावित्र्य, मांगल्य आणि उदात्तता यांची कलाटणी देण्याचे

कौशल्य महाकवीच्या प्रतिभेशिवाय साधणेच शक्य नाही. किंबहुना महाकवित्वाचा मानबिंदू ठरावा असाच तो वर्णित प्रसंग आहे. जगातील कोणत्याही उदात्त नायकाशी तुलना करता येईल असा हा सावरकरांचा नायक आहे. मुकुंदाच्या रूपात स्वत: सावरकरच उभे आहेत असे त्या चित्रणाशी त्यांच्या जीवनाशी तुलना करू बघताना वाटते.

'गोमांतक'– या खंडकाव्याची कथा म्हणजे ख्रिस्ती राज्यकर्त्यांच्या राजवटीतील, पारतंत्र्यातील हिंदूंच्या भयानक छळाची, अत्याचाराची, बलात्काराची कथा आहे. ख्रिस्ती राज्यकर्त्याप्रमाणे त्यांचे गोव्यातील पोर्तुगीज, 'अन्तोनी' सारखे धर्मगुरू किती असहिष्णू आणि धर्मपिसाट होते, बळाने, बलात्काराने, कत्तलीने जाळपोळ करून धर्मप्रसार करण्यात कसे सोकावले होते याचे भीषण चित्र या काव्यात सावरकरांनी प्रत्ययकारी रेखाटलेले आहे. या खंडकाव्यासंबंधी समग्र सावरकर वाङ्मयाच्या संपादकांनी मोठे मार्मिक विधान केलेले आहे. ते लिहितात, 'गोमांतक' हे केवळ काव्य नसून एक अचूक वर्तविलेले, भविष्यच ठरले आहे ! महाकवीची दिव्य प्रतिभा असणारा महाकवीच असे भविष्य करू शकतो. कारण आता गोमांतकात घडत असलेली शुद्धि-आंदोलने, शुद्धिसमारंभ; पोर्तुगिजांच्या राजसत्तेचा उच्छेद, तेथे आज स्थापन (झालेला) होणारा स्वतंत्र भारताचा महत्त्वाचा नौदलतळ, इत्यादी घटना या काव्यात ४२ वर्षांपूर्वीच वर्णिलेल्या आणि वर्तविलेल्या वाचून आजच्या ह्या घटना म्हणजे त्या वर्णनाची केवळ छायाचित्रेच भासावीत इतके आश्चर्यकारक सादृश्य त्यात आहे. द्रष्ट्या कवीचा शब्दन् शब्द असा खरा ठरत आहे !" [१३]

महासागर– या खंडकाव्यातील कथानायक मराठा आहे. आपल्या नौकेवर बसून सागराला स्तोत्रांजली समर्पण करीत तो आपली युद्धनौका हाकारीत आहे. लवकरच त्याला आंग्ल शत्रूची एक रणतरी दिसू लागून तिच्याशी युद्ध करण्याचा प्रसंग येत आहे. हे दोनच प्रसंग व्यक्तविणारे वैनायक वृत्तातील स्तबक या काव्यातील आहे. " पानिपतच्या संकल्पित महाकाव्यात घालण्यासाठीच सावरकरांनी 'महासागर' नावाचे आंग्ल मराठ्यातील सिंधुयुद्ध वर्णन करणारे काही सर्ग लिहिले. [१४] अशी संपादकीय टीप आहे. सागरी युद्धाचे वर्णन करणारी कविता मराठीत सावरकरांपूर्वी कुणीच रचल्याचे आढळून येत नाही. मात्र 'महासागर' चा अपुरेपणा सतत जाणवत राहतो.

विरहोच्छ्वास !– (विरहाचे सुस्कारे)

या खंडकाव्यातील कथानक 'कमला' काव्याचा नायक मुकुंद याचा मित्र मुकुल याचे आहे. हिंदुपदपादशाहीच्या रक्षणासाठी लढताना मुकुलची त्याला साहाय्य करणाऱ्या त्यांच्या शूर पत्नी प्रेमलेची चुकामूक होते. मुकुल ससैन्य मुसलमानाच्या हाती सापडतो. त्याला एकटघालाच मृत्युदंडाची अपेक्षा करीत काळ कोठडीत कुजत पडावे लागते. त्याने स्वधर्मद्रोह करावा या हेतूने त्याचा शत्रू छळ करीत असतात. त्याला ते कधी मृत्यूची भीती दाखवितात तर कधी प्रेमलेच्या भेटीचे आमिष दाखवितात. परंतु अत्यंत कठोरपणे तो आपल्या निष्ठेला चिकटून राहतो. मात्र या वीर कर्तव्याकरिता धारण केलेला कठोरपणा काही वेळा मनातून नाहीसा होतो. मग पत्नीचा विरह त्याला असह्य होतो असे चित्रण यात केलेले आहे. ध्येयनिष्ठेमुळे कर्तव्यकठोरतेमुळे प्रसंगी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध झालेला माणूसही मानवी स्वभावधर्मापासून भिन्न राहू शकत नाही असा मानसशास्त्रीय आशय या खंडकाव्याच्या रूपाने महाकवीच्या प्रतिभेने चित्रित झालेला आहे. येथेही मुकुलच्या रूपात ब्रिटिशांच्या बंदिशाळेत पन्नास वर्षांकरिता अडकविले गेलेले, पत्नीच्या सहवासापासून दूर असलेले स्वातंत्र्यवीर सावरकर डोळ्यापुढे उभे राहतात.

केवळ राष्ट्रासाठीच काव्यनिर्मिती

स्वा. सावरकरांच्या राजकीय, राष्ट्रीय संघर्षाचे प्रतिबिंब या सर्वच नायकांत अगदी स्पष्टपणे पडलेले आहे. उदात्त जीवनदर्शन आणि द्रष्टेपणा ही महाकवीची गमके मानली तर सावरकरांना महाकवीची पदवी देणे योग्यच ठरते. प्रा. अनंत काणेकर म्हणतात, " फार मोठा राष्ट्रीय कवी हा मानवतेचाच फार मोठा राष्ट्रीय कवी असतो. आयर्लंडचा एक मोठा कवी यीटस यांच्यासंबंधी बोलताना इंग्लंडचा एक महाकवी टी. एस. इलियट म्हणतो की, " As he become more and more Irish he became more and more universal." "मोठा राष्ट्रीय कवी या अर्थाने साऱ्या मानवतेचा आणि सर्व काळाचाच मोठा कवी होतो." [१५] मराठी भाषेत असा मान केवळ स्वा. सावरकरांनाच देता येतो. कारण सावरकरांनी भारतासाठी आणि केवळ भारत राष्ट्रासाठीच सर्व काही लिहिले आहे.

हिंदुराष्ट्रवादी राजकीय नेतृत्वाचा कालखंड

१९२२ ते १९३७ हा कालखंड म्हणजे सावरकरांच्या काव्याचा तिसरा आणि अखेरचा कालखंड होय. त्यांच्यातला महाकवी जागा आहे पण त्याला आता जागृतीची प्रचाराची विशेष ओढ लागली आहे. या कालखंडातला काही भाग स्थानबद्धतेत म्हणजे वेगळ्या अर्थाने नजरकैदेतच गेला असल्याने प्रत्यक्ष राजकारणापासून त्यांना अलिप्त राहावे लागले आहे. राष्ट्रचिंतन, समाजचिंतन, धर्मचिंतन, बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठा या साऱ्यांचा परामर्श याच कालखंडात सावरकरांनी घेतलेला आहे. स्थानबद्धतेतून मुक्त होताच हिंदुराष्ट्रनिर्मितीचे अंगीकृत कार्य त्यांनी स्वीकारले. 'हिंदूंचे एकता गान' आणि 'अखिल हिंदुध्वजगीत' याच काळात त्यांनी रचले. 'शास्त्रगीत', 'सूतक युगाचे फिटले','मला देवाचे दर्शन घेऊ द्या', 'संत रोहिदास', 'जा झुंज', 'ऐक भविष्याला भव्य भीषणाला', 'दीपावली-पूजन' इत्यादी प्रेरणादायक राष्ट्रीय कविता याच काळातल्या. मात्र अंतःकरणाला जाऊन थेट भिडण्याचे कार्य त्यांच्या गद्य लिखाणाने आणि त्यांच्या ओजस्वी, तपःपूत, ओघवती अशा आवेशपूर्ण वाणीनेच केलेले आहे.

स्वातंत्र्याच्या भावनेचा उत्तुंग आविष्कार

स्वातंत्र्यनिष्ठा ही सावरकरांच्या जीवनकार्याची प्रबळ आणि मूल प्रेरणा आहे. स्वातंत्र्य हे त्यांचे सर्वस्व आहे. त्यांच्याप्रमाणेच राष्ट्राचेही सर्वस्व आहे ते आपल्या 'स्वातंत्र्याच्या स्तोत्रा' त म्हणतात, " स्वतंत्रता राष्ट्राचे मूर्तिमंत चैतन्य असून राष्ट्रीय नीती आणि संपदेची नियामक शक्तीही आहे. आदित्याचे प्रखर तेज आणि उदधीचे गांभीर्यही या स्वतंत्रतेच्या ठिकाणी आहे." म्हणून तर

" हे अधमरक्त रंजिते, सुजन पूजिते ! श्री स्वतंत्रते !"

पुढे ते प्रतिज्ञाच सांगतात,

" तुजसाठि मरण ते जनन
तुजवीण, जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण "

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात. ..... " स्वातंत्र्यसंगरात सर्वस्वार्पण करणारे ते स्वतः स्वातंत्र्यवीर असल्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्यविषयक कवितांना उत्कट स्वानुभूतीचे आणि अपार आत्मप्रत्ययाचे असाधारण तेज प्राप्त झालें आहे."[१६] श्री. धनंजय कीर म्हणतात, "The parent thought of his poetry is the worship of the goddess of freedom." [१७]

महाकवी सावरकरांच्या स्वातंत्र्यभावनेची विविध रूपे त्यांच्या सिंहगडाच्या पोवाड्यात, श्री. बाजी देशपांडे यांच्याही पोवाड्यात दिसून येतात. त्यांच्या दृष्टीने शिवाजी ही स्वातंत्र्याची देवता होती. ती अंगात संचरून स्वदेशस्वातंत्र्याच्या कर्मक्षेत्री झुंजण्याची आणि जिंकण्याची शक्ती भारतीयांच्या ठिकाणी यावी या हेतूनेच त्यांनी शिवाजीवर अनेक कविता लिहिल्या. यातून स्वातंत्र्याचे स्तोत्रच गायिले आहे. 'स्वदेशीचा फटका', 'विश्वात आजवरी शाश्वत काय झाले ?' 'सांत्वन', 'माझे मृत्युपत्र', 'सप्तर्षी', 'मरणोन्मुख शय्येवर', 'हिंदसुंदरा', 'ती !', 'मूर्ति दुजी ती', 'सायंघंटा', 'हा भगतसिंह ! हाय हाय !' 'प्रे. क्रुगरचा मृत्यू !' इत्यादी कविता उदाहरणे म्हणून सांगता येतील. 'माझे मृत्युपत्र' या कवितेत म्हणतात,

"ते ध्येय दिव्य निज मातृविमोचनाचे
तो उग्र निश्चय ही ते उपदेश साचे" (– माझे मृत्युपत्र)

पारतंत्र्याचे भीषण परिणाम सांगताना महाकवी सावरकर म्हणतात

"देश गेला ध्वजा गेली गेला धर्म ही दुर्यशे
गेले राज्य तथा राष्ट्री गेले काय वदा नसे !!" (गोमांतक–पृष्ठ २८०)

अत्युत्कट राष्ट्रप्रेम

राष्ट्राबद्दलचे अमर्याद प्रेम सावरकरांच्या ठिकाणी होते. स्वातंत्र्याइतकीच राष्ट्रालाही त्यांची निष्ठा वाहिलेली होती. महाकवी सावरकरांचे भावविश्व त्रिमुखी दत्तात्रेयासारखे होते. स्वातंत्र्य-निष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि हिंदुत्वनिष्ठा या त्रिविध निष्ठांनी त्यांचा पिंड बनलेला होता. विशेष म्हणजे या तिन्ही निष्ठा सारख्याच प्रबळ होत्या आणि त्यांची सरमिसळ त्यांच्या अनेक कवितांमधून आढळते. जुळ्या भगिनींप्रमाणे कधी दोन एकत्र आढळतात तर कधी तिन्ही एकत्र येतात. 'स्वदेशीचा फटका', 'चाफेकर आणि रानडे यांच्यावरील फटका', 'सिंहगडचा आणि श्री. बाजी देशपांडे यांचे पोवाडे !', 'स्वतंत्रतेचे स्तोत्र', 'हिन्द सुंदरा ती', 'प्रियकर, हिंदुस्थान', 'सांत्वन', 'माझे मृत्युपत्र', 'सागरास', 'पहिला हप्ता', 'सप्तर्षी', 'सायंघंटा', 'मूर्ति दुजी ती', 'मृत्यु-शय्येवर', 'आमुचा स्वदेश हिंदुस्थान', 'पाण्यातली आग ती', 'भू मातेस', 'प्रतिज्ञा घ्या', इत्यादी स्फुट कविता उदाहरणादाखल देता येतील. याशिवाय 'कमला', 'गोमांतक', 'विरहोच्छ्वास' आणि 'महासागर' या खंड काव्यांतूनही देशभक्तीची भावना उत्कटतेने प्रकट झालेली आहे.

देशभक्ती हीच देवभक्ती

'देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जिवलगांच्या तुटी' या संत वचनाप्रमाणे देशाचे सख्यत्व सावरकरांनी निरपवाद स्वीकारलेले होते. किंबहुना देश आणि देव हे अद्वैत मानून भक्ती करणारे कवी गोविंदासारखेच तेही आधुनिक मराठीतील राष्ट्रोपासक कवी होते. एखादा देवलसी माणूस ज्या समर्पणाच्या भावनेने ईश्वराकडे पाहील त्याच भावनेने सावरकर देशाकडे बघत होते. 'माझे मृत्युपत्र' या कवितेत 'मातृभूमीच्या' स्वातंत्र्यासाठी 'हवी' होण्याचे भाग्य आम्हाला लाभले असे उद्गार या महाकवीने काढलेले आहेत. परंतु 'हवी' होणे ही केवळ कविकल्पना नाही तो त्यांच्या महान जीवनकार्याचा एक आवश्यक भाग आहे. आत्मप्रत्ययाच्या या सामर्थ्याने या महाकवीची प्रतिभा मातृभूमीचे पूजन कसे करते ते पाहा !

" हे मातृभूमि ! तुजला मन वाहियेले
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले
तूतेचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूचि अनन्य झाला ।।
त्वत्स्थंडिली ढकलिले प्रिय मित्र संघा
केलें स्वये दहन यौवन-देह-भोगां
... दीप्तानलात निज-मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनि अम्ही ठरलो कृतार्थ ।।" (– माझे मृत्युपत्र)

महाकवी सावरकरांच्या देशभक्तीचा उदय काल्पनिक अथवा भोळ्याभावडया श्रद्धेतून झालेला नसून तो जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या कर्तव्यनिष्ठेच्या व्रतातून झालेला आहे. इतर कवी आणि सावरकर यांच्यातील हे अंतर लक्षात घेण्यासारखे आहे. याच कवितेत महाकवी सांगतात,

" की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने ।
लब्ध प्रकाश इतिहास निसर्ग-माने-
जे दिव्य-दाहक म्हणूनि असावयाचे
बुद्धचाचि वाण धरिले करिं हे सतीचे ।।" (– माझे मृत्युपत्र)

१९०८ साली लंडन येथे लिहिलेल्या 'प्रियकर हिंदुस्थान' या कवितेतून अस्मिता ओसंडून वाहते आहे ही कविता वाचताना सुप्रसिद्ध उर्दू कवी महंमद इक्बाल यांच्या 'सारे जहांसे अच्छा हिंदोस्ता हमारा' या राष्ट्रीय कवितेची स्मृती झाल्याशिवाय राहत नाही. आमचा देश हे आमच्या देवाचे पवित्र देवालय आहे अशी भावना दुसऱ्या एका कवितेत महाकवी सावरकरांनी व्यक्त केलेली आहे. ते म्हणतात,

" आमुचा स्वदेश हिंदुस्थान !
आम्हा हिंदूंचा तो केवळ, होय जीव की प्राण
देवालय हे पवित्र आपुल्या देवाचे सुमहान " (– आमुचा स्वदेश हिंदुस्थान)

एका ठिकाणी या देशाचे अनन्यत्व सांगताना ते म्हणतात,

" एकची देश हा अपुल्या प्रेमाचा
एकची छंद जीवाच्या कवनाचा " (– हिंदूंचे एकता गान)

महाकवी सावरकरांच्या उत्कट राष्ट्रभक्तीचा परिचय देणारे 'सागरास' हे एक अमरगीत आहे. शेकडो देशभक्तिपर कविता ज्यावरून ओवाळून टाकाव्या असे हे आधुनिक मराठी काव्याचे लेणे आहे. या एका गीतानेही कवी म्हणून सावरकर अमर ठरले असते. भावनेची उत्कटता, कर्तव्यनिष्ठा, कृतज्ञता आणि मातृभूमीच्या विरहाची आत्यंतिक व्याकुळता या गीतातून व्यक्त झालेली आहे. हजारो मैल पसरलेला विशाल सागर, त्याच्या पलीकडे असलेली मातृभूमी, तिच्या वियोगाच्या कल्पनेने अस्वस्थ झालेले मन, शेवटी सागरालाच आत्मकथन करू लागले.

" ने मजशी ने परत मातृभूमीला ।
सागरा प्राण तळमळला !"

बरोबरीची माझी श्रेणी असतानाही मला तिकडे जावे लागले आणि म्हणूनच कविवर्य रवीन्द्रनाथांना हा बहुमान प्राप्त झाला. कदाचित मी तिकडे न जाता कविकक्षेत असतो तर तो मलाच लाभला असता. एका भारतीय कवीला हा बहुमान मिळाला यातही मला आनंदच आहे. भारतमातेने तिच्या विमोचना-स्तव जो यज्ञ चालविला होता त्याच्या पूजनार्थ एक गुलाबाची कळी वाहिली (माझ्या रूपाने) व दुसरी तिने केसात खोवली (रवीन्द्रनाथांच्या रूपाने). केसात खोवलेली कळी खुलू शकली. तिच्या गौरवात गुलाबाच्या फुलांच्या जातीचाच गौरव झालेला आहे. रवीन्द्रनाथांच्या गौरवात अखिल भारतीय कवींचा गौरव आहे. यज्ञाच्या अग्नीत जळणारे हे दुसरे पुष्प त्या पहिल्या पुष्पाचे अभिनंदन करीत आहे." या निवेदनावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही.

वाङ्मयविषयक ध्येयवाद

काव्यात्म ध्येयनिष्ठजीवन, बलवत्तर राष्ट्रभक्ती, महाकवीची प्रतिभा आणि महाकवीचा आत्मप्रत्यय असूनही सावरकरांच्या हातून संपूर्ण महाकाव्याची निर्मिती होऊ शकली नाही याबद्दल काही कलावादी टीकाकारांनी हळहळ व्यक्त केलेली आहे. 'कर्त्याचे राजकीय जीवन', 'लेखन-साहित्याची उणीव', 'काव्याचे जहाल राजकीय विषय', 'चिकाटीचा अभाव' 'प्रतिभेला दडपून टाकणारा भारदस्तपणा', काव्यसाधनेपेक्षा कार्यसाधनेला त्यांनी दिलेले अधिक महत्त्व इत्यादी वाङ्मयबाह्य घटकांमुळे त्यांना महाकाव्य पूर्ण करता आले नाही असे मत व्यक्त केले आहे. आणि शेवटी परिस्थितीपेक्षाही कवीच जबाबदार असल्याचा निष्कर्ष प्रा. जोग आणि डॉ. गावडे यांनी काढलेला आहे. एका अर्थाने ते बरोबरही आहे. कारण काव्यसाधनेपेक्षा कार्यसाधनेला त्यांनी दिलेले महत्त्व हा निष्कर्ष अधिक खरा आहे. आणि त्याचे मूळ सावरकरांच्या वाङ्मयविषयक ध्येयवादात आहे. आपल्या प्राणप्रिय निष्ठांच्या पूर्तीसाठीच सर्वस्व वेचावे अशी सावरकरांची जीवनासंबंधी कल्पना होती. केवळ कलाविलास, कला-आस्वाद आणि कलानंदाची अनुभूती घेत रमणे सावरकरांच्या जीवननिष्ठांना मान्य नव्हते.

बॅट नको बंदूक हवी !

सावरकरांचा वाङ्मयविषयक ध्येयवाद इतर साहित्यिकांच्या तुलनेत अगदी वेगळा होता. नगरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेला १९३८ मध्ये सावरकरांनी भेट दिली त्यावेळी संघस्वयंसेवकांना उद्देशून ते म्हणाले, " जगाच्या बाजारात आज तरी कवितेपेक्षा तलवारीला जास्त मान आहे ! हे विसरू नका !" याच व्याख्यानात सावरकर पुढे म्हणाले, " एकवेळ आमच्या तरुण लोकांत लेखक, कवी नसले तरी चालतील, वाङ्मयावर व्याख्याने न झाली तरी चालतील, पण आमची लढाऊ वृत्ती फिरून फोफावली पाहिजे...बॅट नको बंदूक हवी !"[९०]

साहित्याचे ध्येय काय असावे ?

साहित्याची परिस्थितिसापेक्षता सांगताना १९३७ साली बडोदे साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून बोलताना सावरकर म्हणाले, " साहित्यासंबंधीची माझी भावना थोडी विशिष्ट स्वरूपाची आहे. साहित्य हे राष्ट्राच्या बुद्धीचे, सामर्थ्याचे शौर्याचे प्रतीक आहे अशी माझी भावना आहे."[९१] वाङ्मय हे साधन आहे, साध्य नव्हे असा सावरकरांचा वाङ्मयविषयक ध्येयवाद होता. १५ एप्रिल १९३८ रोजी बाविसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात आपली साहित्यविषयक भूमिका मांडताना ते म्हणाले, " ध्येयाचा प्रश्न आला की, त्यात लहरीचा, हौशीचा, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षा कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यत: अनुस्यूत असणार. अर्थात जीवनाच्या

सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच त्या जीवनाचे जे एक उपांग सारस्वत, त्याचीही व्याख्या, त्याचेही ध्येय असले पाहिजे. ... घरात आई मरणान्तिक वेदनांनी अंथरुणात खिळली असता, एखादा बहकलेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रमू शकला तर त्यास कलावंत म्हटले तरी कुलदीपक काही म्हणता यावयाचे नाही !" याच भाषणात शेवटी ते म्हणाले, "तुम्ही सूज्ञ, विज्ञ, आहात म्हणून मी तुम्हालाच विचारतो, की साहित्यासाठी जीवन आहे की जीवनासाठी साहित्य ? जर आपले राष्ट्रीय साहित्य... हे राष्ट्रीय जीवनाचे एक उपांगच काय ते असेल तर राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता, मुख्य साधन असले पाहिजे."[९२]

जसे राष्ट्र तसे साहित्य

याच भाषणात सावरकरांनी तरुणांना, साहित्यिकांना 'लेखण्या मोडा, बंदुका उचला !' असा धक्कादायक संदेश दिला. आज राष्ट्राला साहित्यिक नकोत, सैनिक हवेत ! असे कळकळीने आवाहन करताना ते म्हणाले, "तरुण हो ! आमच्या दुर्बळ पिढीच्या देखोदेखी सुनिते नि कादंबऱ्या लिहिण्याकरिता लेखण्या सरसावू नका. तर जपान, इटली, जर्मनी, इंग्रज, आयरिश तरुणांच्या देखोदेखी आधी बंदुका सरसावा ! आज राष्ट्रीय शस्त्रबल हे मुख्य कर्तव्य, राष्ट्रीय साहित्य हे तिय्यय् ! ... जे राष्ट्र खुरटे, दुबळे त्याचे साहित्यिक खुरटे नि दुबळे असणार, त्यांच्या साहित्यालाही कशी आग लागते ते तक्षशीलेला विचारा, नालंदेला विचारा ! ... युगधर्म ओळखून शिवाजीने सरस्वतीच्या संरक्षणार्थच सरस्वतीकडे काही काळ पाठ फिरवून शुंभ निशुंभ-मर्दिनीचीच उपासना केली, लेखणी टाकून भवानी उचलली म्हणून आज महाराष्ट्र सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे."[९३] महाकवी सावरकरांचा हा ध्येयवाद लक्षात घेतला म्हणजे त्यांनी महाकाव्य लिहिण्याला का दुय्यम स्थान दिले याची संगती लागते.

गीताप्रणीत तत्त्वज्ञानाचा स्वीकार व आचरण

महाकवी सावरकरांचे जीवन गीताप्रणीत तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेले होते. 'रहस्यकार आणि उपयुक्ततावाद' या लेखात अनेक उदाहरणे देऊन श्रीकृष्णाने आचरलेल्या उपयुक्ततावादाचे त्यांनी समर्थन केलेले आहे.[९४] म्हणूनच 'सकल गुरूचा गुरुवर भगवान श्रीकृष्णजी' असे त्यांनी 'सप्तर्षी' कवितेत वर्णन केलेले आहे.

महाकवीचे आणखी काही गुणविशेष

महाकवी सावरकर आणि सामान्य कवी यांच्यात एक मोठे अंतर आहे. सामान्य कवीचे दुःख वैयक्तिक, कौटुंबिक तर कधी सामाजिक असते त्याकरिता ते तत्त्वज्ञानाचा आधार घेतात, परंतु सावरकरांसारख्या महाकवीचे वैयक्तिक दुःखही राष्ट्रीय स्वरूपाचे होते. राष्ट्रकार्यासाठी त्यांनी जीवनात दुःखे ओढवून घेतलेली होती. अशा दुःखांना वेगळी उदात्तता येते. 'मरणोन्मुख शय्येवर'; 'माझे मृत्युपत्र', 'सांत्वन', 'आत्मबल', 'सायंघंटा', 'पहिला हप्ता', 'सप्तर्षी', 'मूर्ति दुजी ती' या कवितांतून व्यक्त झालेली वेदना नुसती व्यक्तिगत नाही. ती साऱ्या देशभक्तांची आहे. म्हणूनच ती उदात्त आणि व्यापक आहे. राष्ट्रीय ध्येयाच्या पूर्तीचा विचार मनात बाळगून सावरकरांनी आपल्या काव्यविषयांची निवड केली. डॉ. द. भि. कुळकर्णी त्यांच्या खंडित महाकाव्यासंबंधी म्हणतात, "खरोखरी सावरकरांची प्रतिभा सर्वंकष होती. राजकीय नेतृत्व, समाजसेवक, तत्त्वचिंतक व वाङ्मयसेवक या साऱ्या भूमिकांना पुरून उरेल अशी त्यांची प्रतिभा होती. महाकाव्यात शोभून दिसतील अशा खडतर अद्भुतरम्य व भव्योदात्त घटनांचा अनुभव त्यांना होता."[९५]

आपल्या महाकाव्याला अनुरूप आणि आपल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाला शोभेसे स्वतंत्र असे अर्थ व नामसदृश असे नवे 'वैनायक वृत्त' निर्माण केले. काहींना या वृत्तासंबंधी सावरकरांचे कर्तृत्व स्वतंत्र वाटत नाही. जुन्या 'धवल चंद्रिका' या नावाच्या जातिवृत्तालाच सावरकरांनी नवे नाव नोंदविले असे वाटते. परंतु तुरुंगात काव्याभिव्यक्तीच्या ओघात त्यांना ही जाती स्फुरली आणि समर्थपणाने त्यांनी ती उपयोगात आणली. हजारो ओळींच्या काव्यनिर्मितीने तिचे एका अर्थाने पुनरुज्जीवनच त्यांनी केलेले असल्यामुळे ती त्यांचीच निर्मिती आहे असे श्री. ना. ग. जोशी आणि डॉ. मालशे यांचे मत आहे.

समारोप

(१) आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेला महाकाव्याच्या योग्यतेला चढविण्याचे कार्य सावरकरांच्या कवितेने केलेले आहे. सावरकरांसारख्या युगपुरुषाने या कवितेला जन्माला घालून राष्ट्रीय काव्याचे स्थान अजरामर केले आहे. (२) सर्वांगपूर्ण विकसित अशी राष्ट्रीय कविता निर्माण करण्यात सावरकर यशस्वी झाले आहेत. सावरकरांची कविता आणि त्यांचे महान व्यक्तित्व अनेक कवींना प्रेरणादायक ठरलेले आहेत. (३) नव्या धर्तीच्या पोवाडयांची निर्मिती करून एक नवी शाहिरांची परंपरा महाराष्ट्रात सावरकरांनी निर्माण केली. (४) त्यांच्या खंडकाव्यापासून प्रेरणा घेऊन अनेकांनी राष्ट्रीय खंडकाव्याची रचना केलेली आहे. (५) सावरकरांच्या बहुतेक कविता प्रासंगिक आहेत, परंतु सावरकरांसारख्या महाकवीच्या जीवनातील ती प्रासंगिकता असल्यामुळे त्यात अनेकदा नाटचात्मकता आलेली आहे. या प्रसंगाची पार्श्वभूमी राष्ट्रीय ध्येयवादाची असल्यामुळे त्या त्या प्रासंगिक गीतांना चिरंजीवित्व लाभले आहे. ही प्रासंगिक गीते कलात्मक सौंदर्याच्या दृष्टीनेही अनन्यसाधारण उतरली आहेत. उदाहरणार्थ, 'तारकास', 'स्वतंत्रतेचे स्तोत्र', 'सागरास', 'सप्तर्षी', 'सांत्वन', 'माझे मृत्युपत्र', 'मूर्ती दुजी ती', 'आत्मबल', ही गीते त्या दृष्टीने बघण्यासारखी आहेत.

(६) प्रचार गीतांचे प्रवर्तक म्हणून सावरकर आणि कवी गोविंद यांची नावे सांगता येतील. मेळयातील गीते त्यांनी लोकप्रिय केली. 'ध्वजगीत', 'एकता गीत', 'शस्त्र गीत', 'संचलन गीत' यांची निर्मिती केली. (७) सावरकरांची तुलना आधुनिक मराठीतील कोणत्याही कवीशी करता येण्यासारखी नाही. त्यांची तुलना महाकवी रवीन्द्रनाथ टागोरांसारख्या देशभक्त व काव्यात्म अंतःकरणाच्या राष्ट्रीय कवींशीच करता येईल. कारण टागोरांप्रमाणेच सावरकरांनीही काव्याबरोबर कादंबरी, नाटक, निबंध, कथा, चरित्र, आत्मचरित्र, इतिहास, वाङमयटीका, भाषाशुद्धी, समाज-सुधारणा, लिपीशुद्धी यासारख्या विविध स्वरूपाची वाङमयनिर्मिती केलेली आहे. प्रभावी राष्ट्रनिष्ठेमुळे त्यांनी आपल्या साहित्यिक क्षेत्राला मर्यादा घातली.

विदर्भाचे एक रसिक राष्ट्रकवी श्री. रा. बोबडे म्हणतात,

"कालेच ना गुणे ही जो ठरे आद्यकवी महा।
कवीत महाराष्ट्राच्या आज त्या सम अन्य हा॥" [९१]

राष्ट्रकवी दु. आ. तिवारी

वीरांच्या पराक्रमाचे पूजक राष्ट्रकवी दु. आ. तिवारी (१८८७–१९३९) परिचय

राष्ट्रीय कवितेचे एक प्रमुख प्रणेते म्हणून आधुनिक मराठीत दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांचे नाव अजरामर झालेले आहे. राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितेचे विपुल लेखन करणारे एक

राष्ट्रकवी म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. स्वातंत्र्य कवी गोविंद आणि महाकवी सावरकर यांच्यानंतर मराठी माणसाला आपल्या संग्रामगीतांनी आकर्षित करणारे तिवारी हेच लोकप्रिय राष्ट्रकवी आहेत. कवी गोविंदांच्यानंतर लौकिक पठनाचे अधिष्ठान प्राप्त झालेली राष्ट्रीय कविता म्हणजे तिवारींची 'मराठ्यांची संग्रामगीते'. उत्तर भारतातून महाराष्ट्रातील खानदेशात जळगाव येथे येऊन स्थायिक झालेल्या परदेशी जमातींपैकी ते एक होते. जन्माने कान्यकुब्ज ब्राह्मण, मातृभाषा हिन्दी व व्यवसायाने प्राथमिक शिक्षक असलेल्या या प्रतिभासंपन्न कवीला राष्ट्रप्रेमाचे आणि राष्ट्रभक्तीचे बाळकडू लाभलेले होते. मराठ्यांच्या पराक्रमाच्या इतिहासाने तिवारी अतिशय प्रभावित झालेले असले आणि शिवकाल ते पेशवेकाल यातील पराक्रमी पुरुषांची शौर्यगाथा त्यांनी ओजस्वी शब्दांत कथन केलेली असली तरी ते शुद्ध ऐतिहासिक पुरुषांचे चरित्रकथन नाही हे लक्षात घेतले पाहिजे. ही चरित्रे निवडताना, प्रसंग निवडताना, घटना निवडताना आणि त्यांचे चित्रीकरण करताना तिवारींनी राष्ट्रीय दृष्टिकोन डोळ्याआड केलेला आढळत नाही.

अगा जे झालेचि नाही

व्यक्ती असो की साहित्य असो त्याला स्थलकालाची स्वत:ची अशी एक पार्श्वभूमी असते. युगधर्म आणि सभोवतालचे वातावरण यापासून कवी अलिप्त असणे अशक्य ठरते. तसेच त्या त्या वातावरणाचा अधिक उणा प्रभावही व्यक्तिसापेक्ष असतो कारण त्या त्या वातावरणाची प्रतिक्रिया एखाद्याच्या अंत:करणात अतिशय तीव्र होऊ शकते तर एखाद्यात सौम्य व एखाद्यात तर तिचा मागमूसही नसतो. कलावंताप्रमाणे कलारसिक वा टीकाकारही याला अपवाद असू शकत नाही. तिवारींच्या राष्ट्रीय कवितेत, शुद्धकलावाद्यांना प्रासंगिकता, प्रचार, बोधवाद आणि तात्कालिक भावनांचे दर्शन होईल आणि कलात्मक सौंदर्याची उणीव जाणवेल तर राष्ट्रवादी टीकाकारांना ती कविता उत्स्फूर्त, भावोत्कट आणि रसोत्कट वाटेल.

तेव्हा अनेकदा 'अगा जे झालेचि नाही त्याची वार्ता पुसशी काई' असा प्रश्न टीकाकारांच्या संदर्भात मनात येतो. तिवारींची राष्ट्रीय कविता लोकजागृती, लोकशिक्षण, राष्ट्रीय भावनांचे पोषण व्हावे या हेतूनेच लिहिलेली असल्यामुळे त्यांचाच प्राधान्याने त्यांच्या कवितेच्या संदर्भात विचार झाला पाहिजे. "दुर्गाप्रसाद तिवारी स्वत:च्या कविता आवेशाने आणि ओजस्वितेने गाऊन दाखवीत असत आणि त्या ऐकताना त्यांच्या रसिक श्रोत्यांना चेव येई," [१७] असे वर्णन प्रा. भ. श्री. पंडितांनीच केलेले आहे. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी 'आधुनिक राष्ट्रीय किंवा ऐतिहासिक कविपंचकात, विनायक, सावरकर, गोविंद, माधव यांच्याबरोबर श्री. तिवारी [१८] यांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

विपुल काव्यलेखन

राष्ट्रकवी तिवारींनी मराठीतील राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितेचे दालन समृद्ध केल्याचे श्रेय डॉ. अ. ना. देशपांडे यांनी नि:संकोचपणे दिलेले आहे. कारण ज्या 'मराठ्यांच्या संग्राम गीतांमुळे' (१९२०) आणि 'झाशीची संग्राम देवता' (१९२५) या दोन काव्यसंग्रहांमुळे ते सर्व महाराष्ट्राला सुपरिचित आणि प्रिय झाले आहेत त्याशिवायही खंडकाव्ये लिहून त्यांनी लौकिक संपादन केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारी असलेल्या भूषण कवीची हिंदीतील 'शिवबावनी' आणि 'शिवराजभूषण' यांचे 'शिवप्रताप' आणि 'शिवराज भूषण' हे सुंदर मराठी अनुवाद. 'मनोहर लीला', 'महाराणा प्रतापसिंह', 'मान्यांची यमुना' आणि 'नंदिनी' ही

ऐतिहासिक खंडकाव्ये, 'प्रसन्नराधा' हें सामाजिक खंडकाव्य तसेच 'राधा–माधव' हे पौराणिक खंडकाव्य अशी सहा खंडकाव्ये त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या 'काव्य कुसुमांजली' या काव्य-संग्रहातील 'जिजाबाईचा पुत्रविरह', 'कुमुदवती', 'निर्वाणीची वाणी', 'देवगिरी' अशासारखी राष्ट्रीय दृष्टिकोनाची साक्ष देणारी कवने उल्लेखनीय आहेत. प्रस्तुत विवेचनात त्यांच्या सुरुवातीच्या 'मराठचांच्या संग्रामगीतांचा' आणि 'झाशीची संग्राम देवता' या दोन काव्यांचाच प्राधान्याने विचार करावयाचा आहे.

काव्यहेतू

वीरांच्या पराक्रमांचे पूजक असलेल्या राष्ट्रकवी तिवारी यांनी आपल्या काव्याचे प्रयोजन अनेक संग्राम गीतांतून स्पष्टपणे मांडलेले आहे. पावन पुरुषांची स्मृतिचित्रे गाणे आणि परवशतेच्या काली उत्साह निर्माण करणे हे त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे प्रयोजन आहे.

" पावन पुरुषांची आई
जान्हवी प्रपाते गाई
जी स्मृतिचित्रे उत्साही
त्यातूनी नाद ये हाची–धन्य जननी जनकोजीची "

किंवा

" मर्दानी लढवय्यांनी केलेल्या मर्दुमकीची
मर्दानी गीते गाता मर्दानी चालीवरची "...
" कड कडे डफावरी थाप मर्दानी शाहीराची
देशाच्या आपत्काली, शर्तीची युद्धे झाली
गा शाहीरा । या काली विजयश्रीची "
" घोड दौड संताजीची "

अथवा

" शौर्य स्थानावरि येता, वीरांची चरिते गाता
रोमांचित होते कविता । उचित वीर हा कवितेला, "
–" गडकरी पुरंदर वाला "



झाशीच्या संग्रामदेवतेचे चरित्र गातानाही राष्ट्रकवी तिवारी सांगतात, "पोवाडे गावे वाटे स्वातंत्र्याच्या हिरकणीचे", "ही इतिहासाची पाने, वाचवती ना नयनाने । भिजताती अश्रु जलाने । स्फुरवी परि शाहीराला शेवटची संगर लीला !" असे यथार्थ वर्णन केलेले आहे.

मराठ्यांची संग्राम गीते

शिवकालापासून ते दुसऱ्या बाजीरावाच्या कालात पेशवाई लयाला जाईपर्यंतच्या इतिहासातील काही निवडक ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना घेऊन त्या भावोत्कटतेने आणि नाटचपूर्ण शैलीने या संग्रामगीतांत रंगविल्या आहेत. यातील बहुतांश गीते वीररसपूर्ण असून वीर विभूतिपूजनाच्या भूमिकेतून गायिलेली आहेत. केवळ वीररसपूर्णच गीते तिवारींनी लिहिली आहेत असे नसून त्यांची काही गीते तर करुणोदात्तरसाने संपन्न आहेत. राष्ट्रीय भावनांचे पोषण करताना 'शीलचारित्र्य वर्धन' करण्याचे धोरण तिवारींनी हेतुपूर्वक सांभाळलेले दिसते. 'हिंदूचा हिंदुस्थान !' 'लववेना शिर माते !' 'गारदी कटोनी मेला', 'कल्याणी कल्याणाची', 'स्वराज्य आणि पुत्रप्रेम', 'मुसलमान बंधुंची हिंदुभगिनी', 'कीर्तिचा ध्वज मळवीला', 'विजयाच्या द्वारी अडला',

'भाऊ भाऊ', 'फिरविशी कसा जरि पटका', 'विश्वास सोडुनि गेला' इत्यादी गीते उदाहरणादाखल सांगता येतील.

'हळदी घाटाचे युद्ध' आणि 'रक्तात मिळाले रक्त!' ही सुप्रसिद्ध राजस्थानच्या इतिहासातील घटनांवर आधारलेली गीते आहेत ती त्यांच्या सर्वसंग्राहकतेची द्योतक आहेत. 'एक काळ ऐसा होता' या निरनिराळ्या काळांतील परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या चार गीतांतून (१) जुना भारत काळ, (२) श्री. छत्रपतींच्या वेळचा मराठी काळ, (३) पेशवाईचा काळ आणि (४) पेशवाई बुडाल्यापासून तो श्री. विष्णुशास्त्र्यांपर्यंतच्या काळाचे विवेचन आहे. भारताच्या भाग्याचे चित्र कसे कसे बदलत गेले याचा एक चित्रपटच या गीतांतून साकार झालेला आहे. "केवळ देशाकरिता आणि दास्य हेच ना त्वद्ध्येय।" या दोन गीतांतून भारताच्या तत्कालीन वर्तमानाचे, पारतंत्र्याच्या जाणिवेचे आणि प्रखर राष्ट्रवादाचे चित्र तिवारींनी रेखाटले असून एकूण पंचेचाळीस गीते या संग्रहात आहेत.

झाशीची संग्राम देवता

आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे संग्रामपूर्ण धीरोदात्त, वीररसात्मक दहा प्रदीर्घ गीतांतून केलेले वर्णन अप्रतिम आहे. 'देणार नाही कोणाशी आवडते माझी झाशी!' या गीताने सुरुवात झालेली या संग्रामदेवतेची पूजा, 'मर्दानी झाशीवाली', 'फेकला तटाहुन घोडा' 'पळविला वीर विदुलेने', "राणीचा रणकल्लोळ" इत्यादी गीतांतून समर्थपणे बांधलेली आहे. संपूर्ण मराठी भाषेत झाशीच्या राणीवर इतकी ओजस्वी आणि तेजस्वी कविता अजून निर्माण झालेली नाही. 'फेकला तटाहुन घोडा' हे गीत तर महाराष्ट्राच्या सुशिक्षित आबालवृद्धांच्या तोंडी आजही आढळेल. या झाशीच्या संग्रामदेवतेचे गुणगान करताना कवीच्या वाणीला विलक्षण ओजस्विता आलेली आहे. ते लिहितात,

"रण कुशल वीरांनी, कौशल्य गाईले जीचे
गुणवंत ग्रंथकारांनी, ग्रंथिले समरगुण जीचे
पोवाडे गावे वाटे, स्वातंत्र्याच्या हिरकणीचे...
भारतास भूषण झाली, मर्दानी झाशीवाली"

दुसऱ्या एका गीतात कवी लिहितो,

"ती राष्ट्राची भव्येच्छा स्वार्थैक-वृत्तिला चिरडी
ती देशाची संस्फूर्ती। उसन्या हिंमतीला रगडी
ती स्वातंत्र्याची शक्ती दास्याची दाबी नरडी"...

आणि म्हणून प्रा. म. ना. अदवंत म्हणतात, "झाशीची संग्रामदेवता हे काव्य म्हणजे लक्ष्मीबाईच्या पराक्रमाचा नाट्यपूर्ण इतिहास आहे." "तिचे पोवाडे नामर्दाला मर्द करतील व मृताच्या अंगी चैतन्य आणतील" असे जे ना. के. बेहरे यांनी प्रस्तावनेत उद्गार काढले आहेत ते काव्य वाचत असताना, सार्थ वाटतात असे म्हटल्यावाचून राहवत नाही. [११]

वीर विभूतिपूजन

'झाशीची संग्रामदेवता' आणि 'मराठ्यांची संग्रामगीते' या दोन्ही काव्यांचा प्रधान आशय आहे वीर विभूतिपूजन. या वीर विभूतिपूजनात सर्वांना स्थान आहे. 'लववेना हे शिर माते'

म्हणणारा बालशिवाजी, 'घेतला सूड जनकाचा' सांगणारा पराक्रमी बाणेदार व पितृनिष्ठ तरुण शिवाजी आहे, पावनखिंडीचा गाझी आहे, बेभान लढणारा नरसाळा आहे, पुरंदरचा मुरारबाजी आहे, संताजींची घोडदौड आहे, महाराणा प्रताप आहे, भाऊसाहेब पेशवे आहेत, बहादूर जनकोजी आणि वडगावावरचा वीर महादजी आहे, इब्राहिमखान गारदी आहे, तशीच झाशीची संग्रामदेवता आहे. 'द्या करी जरा समशेर म्हणणारी' स्वामिनिष्ठ सावित्रीबाई ठाणेदारीण आहे. 'कल्याणाची कल्याणी आहे', 'शाहूची यवनी माता' आहे. तशीच पतीला त्याच्या तोंडावर ठणकाविणारी 'कीर्तीचा ध्वज मळविला' असे सांगणारी व पतीच्या शवावरोबर निग्रहाने सती जाणारी साध्वी लक्ष्मीबाई मेहेंदळे आहे.

'हिंदूंचा हिंदुस्थान' हे व्यापक राष्ट्रीय सत्य सांगणारा राष्ट्रपुरुष आहे तर 'जय जय रघुवीर समर्थ' गर्जना करीत, 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्र धर्म जागवावा' असे सांगणारे समर्थ आहेत. महाराणा प्रताप आणि त्यांचा धाकटा बंधू शक्तीसिंह यांची अद्भुतरम्य भेट आहे तर चुलत भावाच्या 'भाऊसाहेब पेशव्यांच्या निधनाने दुःखित होऊन 'भाऊ! भाऊ!' असा शोक करीत प्राणत्याग करणारे नानासाहेब पेशवे' आहेत. आपल्या पाठिराख्या पराक्रमी बंधूंच्या निधनानेच नानासाहेब पेशवे खचले आहेत. रणचंडी स्वातंत्र्यलक्ष्मीचे वर्णन करताना कवी म्हणतो,...'हचू रोज 'आंग्ल नरवीर झाशीच्या तटावर शीर आपटून झाला जेर; हिंदीत बोलला बोली– 'मर्दानी झांशीवाली.'

राजस्थानच्या इतिहासात मानसिंग आणि राणाप्रताप यांचे हळदीघाटाचे युद्ध प्रसिद्ध आहे. राष्ट्रकवी तिवारींनी राणा प्रतापाचे केलेले वर्णन वीरश्रीयुक्त आहे.

"राजस्थानचा राणा, स्वातंत्र्य जयाचा बाणा,
तो भीम कर्म करताना, यज्ञकुंड गमले शुद्ध"
... 'हळदी घाटाचे युद्ध'

"विजापूरच्या दरबारात तू सुलतानाला सलाम केला नाहीस, असे ऐकते!" या वीरमाता जिजाईच्या प्रश्नास उत्तर देताना बाल शिवाजी म्हणतो, "देवदेवता, देवळे, गोब्राह्मण यांना नष्ट करणारे; न्यायनीतीची, धर्माची चाड नसणारे, प्रजेला दुःखी करणारे, असे म्लेंच्छ,

"हा घोर मांडिला ज्यांनी
त्यांचिया पुढे जावोनी
देशाभिमान सोडोनी
प्रेमाच्या मंगल माते! लववेना हे शिर माते!"

मी मात्र त्या हिंदुद्वेषी तख्तापुढे कधीही नतमस्तक होणार नाही!' 'घेतला सूड जनकाचा' हे शिवाजी महाराजांच्या पितृभक्तीचे आणि पराक्रमाचे चित्रण करणारे ओजस्वी काव्य आहे. शर्थीने पावनखिंड लढविणारा आणि अखेरच्या क्षणी धनी गडावर पोचला की नाही म्हणून डोळ्यात प्राण आणून प्रतीक्षा करणारा गाझी बाजीप्रभू देशपांडे, संगरी धडाने लढणारा पुरंदरचा गडकरी मुरारबाजी, औरंगजेबाच्या लढाऊ सैन्याला ज्यांनी सळो की पळो करून सोडले ते संताजी घोरपडे ही सर्वच गीते वीरश्रीयुक्त आहेत.

पेशवेकालीन पराक्रमावर आधारित गीतांची रचनाही अतिशय प्रभावीपणे झालेली आहे. वसईच्या वेढ्याच्या प्रसंगावरील मोहरा इरेला पडला, सुरजमल जाटाला दाती तृण धरून शिद्यांच्या आश्रयाने जगणाऱ्या प्रसंगावर आधारलेले 'कुंभेरीची भंवेरी' हे मल्हारराव होळकरांचा पराक्रम सांगणारे गीत, १७६१ पानिपतच्या रणसंग्रामावर आधारित 'गारदी कटोनी मेला!', 'भाऊवर गर्दी झाली', 'धन्य जननी जनकोजीची' ही गीते अप्रतिम भावपूर्ण आणि पराक्रमाने रसरसलेली आहेत. पेशव्यांच्या तोफखान्याचा लढवय्या सरदार इब्राहिमखान गारदी याला फितविण्याचा अबदालीने प्रयत्न केला असता त्या स्वामिनिष्ठ सेवकाने तो बाणेदारपणाने ठोकरून लावला आणि मराठ्यांच्या बाजूने लढत लढत आपला देह धारातीर्थी ठेवला. राष्ट्रकवी तिवारी त्याच्या शीलाचा गौरव करताना सांगतात,

"निज राष्ट्र हिताच्या साठी
व्हाया सकलांच्या गाठी
परवा न जिवाजी मोठी
हे दावाया सकलांना गारदी कटोनी मेला"

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत. विस्तारभयास्तव ती येथे देता येत नाहीत.

राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेम

राष्ट्रकवी तिवारींची कविता ही प्राधान्याने वीर विभूतिपूजन करणारी, इतिहासकाळात रमणारी आणि रमविणारी कविता असली, प्राधान्याने वीर रसाचे चित्रण करणारी असली तरी ती राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेम या दोन निष्ठांनी संपन्न आहे. इतिहासकालातील वीरांची चरित्रे गाताना तिचे राष्ट्रनिष्ठेचे आणि स्वातंत्र्यप्रेमाचे अधिष्ठान कायम आहे. किंबहुना या निष्ठा अधिक प्रबल करण्यासाठीच त्यांच्या कवितेचा अवतार आहे. म्हणूनच त्यांचा बालशिवाजी आईस सांगतो

"क्षोपेत देश बंधूंच्या दुःखाने दचकून उठतो!!!
बोलते भवानी 'ऊठ?' बोलते जन्मभू 'ऊठ?' घर समशेरीची मूठ!"
(लववेना हे शिर माते)

'घेतला सूड जनकाचा' या गीतात, 'तळहातावर शिर घ्यावे आपुल्या जन्मभूसाठी' असे म्हटले आहे. आपण आपल्या सर्व निष्ठा देशाला, राष्ट्राला अर्पण केल्या पाहिजेत असे एका गीतात कवीने कळकळीने सांगितले आहे, तो म्हणतो,

"संसारचि देशासाठी काहीच न अपुल्या साठी
हे ध्येय असे आर्यांचे, तत्पुत्र म्हणविणारांचे"

स्वातंत्र्याच्या प्रेमाप्रमाणेच पारतंत्र्याची जळजळीत जाणीवही या गीतातून तितक्याच तीव्रतेने व्यक्त झालेली आहे. राष्ट्रकवी तिवारी सांगतात,

"कारागृहि पडली आई पाहते दीन वदनाने
भाळास लावुनी हात न्हाते ती अश्रुजलाने
तोडून कडकड बेड्या फेकाव्या निज हस्ताने..."
(दास्य हेच ना त्वद्ध्येय)

पूर्वपरंपरेचा गौरव आणि सद्यःस्थितीची जाणीव

राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्यप्रेम या विशेषांबरोबरच कवी विनायकांप्रमाणे पूर्वपरंपरेचा गौरव आणि सद्यःस्थितीची दुःखद जाणीवही तिवारींच्या काव्यातून व्यक्त झालेली आहे. भूतकाळ वैभव-संपन्न कसा होता हे सांगताना,

" सोन्याचा कोठे धूर ? तर भारत – खंडामध्ये ।
रत्नांच्या कोठे खाणी ? तर हिंदुस्थानमध्ये ॥"

(एक काळ ऐसा होता)

पूर्वपरंपरेचा जाज्वल्य अभिमान तिवारींना आहे. ते लिहितात,

" जन्मभूमिसाठी सांगा । जातील मृत्यूच्या द्वारी ॥"

(एक काळ ऐसा होता)

हिंदुजातीचा गौरव हे परंपरेच्या अभिमानाचे एक गमक. त्यासंबंधी सांगताना,

" परधर्माचे ना द्वेष्टे । निज धर्माचे अभिमानी ।
ना गुलाम करितिल कोणा । राखतील अपुलें पाणी ।
अपहार न ठावा ज्यांना । व्यवहार नीतीचे ज्ञानी ॥"

(एक काळ ऐसा होता)

सद्यःस्थितीची दुःखद जाणीव

पूर्व वैभवसंपन्न इतिहास, भव्योदात्त परंपरा या पार्श्वभूमीवर परवशतेची जाणीव अधिक तीव्रतेने होते असे, तिवारी सांगतात,

" घेवोनी उत्कंठेने । वाचावा गत इतिहास
भिजवावी त्याची पाने । सोडावा दीर्घोच्छ्वास "

(एक काळ ऐसा होता भाग २ रा)

परवशतेने आम्ही अंतर्बाह्य गुलाम झालो याचे दुःख व्यक्त करताना तिवारी सांगतात, " आमच्या देशातील विद्वद्रत्नांची परक्यांनी निंदा करावी व त्यांचा ग्रंथही न बघता आम्ही त्याला मान्यता द्यावी हे आमच्या बौद्धिक म्हणजेच मानसिक गुलामगिरीचे द्योतक आहे. " राज्याला मुकलो जैसे । बुद्धीला मुकलो तैसे । सांगितले कोणी जैसे । मानावे तैसे चित्ता – एक काळ ऐसा होता ।"

(– एक काळ ऐसा होता)

वर्तमानकालाचे यथार्थ प्रतिबिंब

' हिंदुंचा हिंदुस्थान ', ' महाकाली तोफ '; ' एक काळ ऐसा होता ', ' केवळ देशासाठी '; ' दास्य हेच ना स्वद्धयेय ।' या गीतांतून वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब पडलेले आहे. वीर विभूतिपूजन करणाऱ्या कित्येक गीतांतूनही वर्तमानकाळाची जाणीव कवीने दिली आहे. उदा. " बाह्मण ब्राह्मणेतर वा मुसलमान, हिंदुजन । पारशी, शीख वा बौद्ध । बहु धर्म श्रद्धावान । आम्ही भारत भू-पुत्र अंतरात जाणू खूण ॥"

अस्मितादर्श राष्ट्रवादी भूमिका

केवळ ऐतिहासिक वीर पुरुषांचे पोवाडे गावे व नावलौकिक मिळवावा ही राष्ट्रकवी तिवारी यांची भूमिका नव्हती. छत्रपतीकालीन भूषण कवीचाच त्यांचा बाणा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर

आणि लोकमान्य टिळक यांनी पुरस्कारिलेल्या राष्ट्रवादाचे ते सच्चे अनुयायी होते. भारतीय परंपरेवर आणि संस्कृतीवर चिखलफेक करणाऱ्या तथाकथित सुधारकांवर त्यांनी आपल्या काव्यातून टीका केली आहे. चिपळूणकरांसंबंधी गौरवपूर्ण उल्लेख करताना म्हणतात, 'जोवरी विष्णुशास्त्र्यांनी लेखणी उचलली नव्हती ! लेखणी कशाची छे हो । स्वाभिमान दीपज्योती । जोवरी लोकमान्यांची । निश्चयात मूर्ती होती । निजपूर्वज वंचक तो ची । आपुली खाच उंदरांची । भरण्यासाठी स्वत्वाची । दिसले काव्य विक्रीकरिता । एक काळ ऐसा होता ॥"

(एक काळ ऐसा होता)

काव्यसौन्दर्य

राष्ट्रकवी तिवारींची संग्रामगीते वीररसपूर्ण असून त्यांनी त्यांची रचना सुपरिचित अशा उद्धव जातीत केलेली आहे, सामान्यतः ही जाती करुणरसाला अनुकूल समजली जाते परंतु तिवारींनी तीत वीरकाव्ये लिहून तिची वीररसाची उपयुक्तता सिद्ध केलेली आहे. शाहिरी पोवाड्यांच्या पद्धतीचे निवेदन, प्रसंग, घटना, व्यक्तिदर्शन यातील नाट्याभिव्यक्तीचे अचाट सामर्थ्य यामुळे ही गीते प्रासादिक आणि ओजस्वी उतरली आहेत. संग्रामगीतांच्या १९५४ पर्यंत आठ आवृत्त्या निघाल्या ही एकच गोष्ट त्या काव्याची लोकप्रियता सिद्ध करणारी आहे. शाळा, सभा, मेळे, गणेशोत्सव, कथा, कीर्तने यातून ही संग्रामगीते गायिली जातात. राष्ट्रीय कीर्तनकाराला तिवारींच्या गीतांशिवाय कीर्तनात रंगच भरता येत नाही इतके त्यांचे महत्त्व आहे.

तिवारींच्या कवनांची भाषा सरळ, सोपी व जोरदार असून वीररसाला पोषक अशी प्रभावी आहे. राष्ट्राभिमान, देशप्रेम आणि वीर विभूतिपूजन तेजस्वीपणाने करण्यात तिला अतीव उत्साह आहे. राष्ट्रातील लोकांच्या अंतःकरणात राष्ट्रप्रेम निर्माण करण्यास त्या काळी ही गीते उपयुक्त ठरली आहेत. म्हणूनच डॉ. वा. भा. पाठक म्हणतात, " देशाकरिता प्राणार्पण करणाऱ्या वीरांच्या वीरवृत्तीची चित्रे तत्कालीन परतंत्र भारतातील तरुण तरुणींना स्फूर्तिदायक व ओजस्वी वाटली. राष्ट्रीय भावनेच्या प्रसाराचे कार्य वरील गीतांनी केले." [१००]

वक्तृत्वाचे आकर्षक अंग व अनुप्रासांची लय

कवी तिवारींच्या शैलीचा एक विशेष असा की तिला वक्तृत्वाचे एक आकर्षक अंग आहे. त्यामुळे तिच्यात जोरकसपणा आलेला आहे. या वक्तृत्वाला म्हणी आणि वाक्प्रचारांची जोड असून स्वाभाविक येणाऱ्या अनुप्रासाने त्यात एक प्रकारची लय व गोडवा आलेला आहे.

" दोघांचे भांडण लाभ तिसऱ्याचा ' ही म्हण ठावी
ना तुला न मजला पोळी श्वानाला घालावी
नीच-वृत्तीने परहस्ती जन्मभूमी केवी द्यावी ?"

दोन मराठी म्हणी अगदी सहजतेने जशा या ओळीत (... हिंदुंचा हिंदुस्थान) आल्या आहेत; त्याप्रमाणेच,

" दुर्दैव हासले विकट । विसकटला सेना शकट
राहिला न कोणी निकट । असहाय अशा त्याकाळी "

(..... भाऊवर गर्दी झाली)

असे अनुप्रासही आलेले आहेत.

काव्याच्या संदर्भात रसिकसापेक्षता मान्य केली म्हणजे सर्वांचेच अभिप्राय सारखे असतील असे म्हणता येणार नाही. कवी माधव आणि श्री. तिवारी यांच्यासंबंधीचा प्रा. म. ना. अदवंत यांचा अभिप्राय रसिकसापेक्षतेचा मुद्दा स्पष्ट करणारा आहे. ते म्हणतात, " मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमाने ओथंबलेले प्रसंग घेऊन त्यावर वीररसपरिप्लुत रचना करण्याचे कार्य या दोन्ही कवींनी परिणामकारक रीतीने केले आहे."[१०१]

प्रा. जोगांनी म्हटल्याप्रमाणे, " त्यांच्या काव्यात राष्ट्रीय भावनेची उत्कटता गुदमरून गेली असेल, स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्यासारखी मान्यताही त्यांना मिळाली नसेल किंवा महाकवी सावरकरांची विशाल दृष्टीही त्यांच्या ठिकाणी नसेल."[१०२] पण राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन वीर विभूतिपूजन करण्याचे आणि त्यायोगे राष्ट्रीय शील आणि चारित्र्यसंवर्धनाचे कार्य विनायक, सावरकर, गोविंद आणि कवी माधव यांच्याबरोबर तिवारींनी केलेले आहे आणि ते लोकदरबारी रुजू झालेले आहेत. राष्ट्रकार्यातील संकटे सोसणारे सावरकरांसारखे महाकवी अपवाद म्हणून समजले पाहिजे. सर्वांनाच ते सामर्थ्य, ते धैर्य नसते, पण अंतःकरणातील राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय पितरांचे पूजन करून व्यक्त करणे तिवारींना शक्य होते ते कार्य चांगल्या प्रकारे केले आणि म्हणूनच राष्ट्रकवी म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे. कवी माधवांच्या योग्यतेची राष्ट्रीय कविता तिवारींनी लिहिली असून तिचे राष्ट्रीय कवितेतील स्थान अक्षय आहे.

युगायुगांचे संदेश देणारे राष्ट्रकवी माधव (१८९२–१९५८)

तत्कालीन चळवळींचा काव्यमय प्रतिध्वनी

कवी माधव उपाख्य माधव केशव काटदरे हे प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे राष्ट्रीय कवी पंचकातील एक राष्ट्रकवी आहेत. कवी 'बी' आणि 'माधव' यांच्या जीवनात काही प्रमाणात साम्य आहे.

राष्ट्रकवी माधवांची अभिव्यक्ती 'बीं'च्या तुलनेत बरीच प्रत्यक्ष स्वरूपाची आणि राष्ट्रकवी तिवारींप्रमाणे वीर विभूतिपूजनाची आहे. 'बीं' सारखीच अवांतर स्फुट कविता माधवांनी लिहिली असून ती त्यांच्या 'ध्रुवावरील फुले', 'फेकलेली फुले' या काव्यसंग्रहात आलेली आहे. राष्ट्रीय कविता 'कवि माधव यांची कविता' या संग्रहात आलेली असून तीही मोजकीच आहे. 'महायुद्धाच्या काळांत जे कवी खडघा सुरात राष्ट्रीय कवने गात पुढे सरसावले त्यांच्या स्फूर्तीचा उगम लोकमान्य टिळकांच्या स्वराज्याच्या चळवळीत होता. अर्थात ही कविता तत्कालीन चळवळीचा एका परीने काव्यमय प्रतिध्वनीच असून तिच्यात पूर्व वैभवाची स्मृती, प्रचलित राजकीय कल्पना आणि त्या चळवळीच्या प्रवर्तकांविषयीचा आदर यांच्या छटांची सरमिसळ झालेली होती,[१०३] हे श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांचे विधान माधवांच्या कवितेच्या संदर्भातही खरे आहे.

नव्या जुन्या राष्ट्रीय परंपरेचे नाते

नव्या जुन्या राष्ट्रीय कवितेशी परंपरेचे नाते जोडणाऱ्या कविता माधवांनी लिहिलेल्या आहेत. 'कवी विनायक यास' या नावाची कविता लिहून आधुनिक मराठीतील आपला आदर्श राष्ट्रीय कवी म्हणून विनायक जनार्दन करंदीकरांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. परवशतेचे बन्ध तोडणारा राष्ट्रीयत्वाचा खंदा शाहीर अशा शब्दात प्रारंभीच वर्णन करून,

" परंपरा जी शाहीरांची । अखण्ड पुढती चालायाची
प्रेरक तिज तव गीते साची । स्फूर्तिदायका ! कवि विनायका !
राष्ट्रद्रोहा खाक करोनी । राष्ट्रहृदी ऊर्जस्वल गाणी ।
वाचायाची तुझी निशिदिनी । दिव्य गायका ! कवि विनायका !"

(–कवि विनायक यास)

असे आपले या परंपरेशी असलेले नवे नाते स्पष्ट केले आहे.

या नव्या परंपरेप्रमाणेच चालवितो शाहीरगिरी ' या कवितेत आपल्या प्राचीन राष्ट्रीय काव्यपरंपरेचा संबंध असुरपतीचा आचार्य असलेला कविकुलगुरू उशना (शुक्राचार्य) यांच्याशी असल्याचे सांगितले आहे. कारण,

" सुर झाले सारे अमर । लाघताच त्या शाहीर
अखण्ड चाले परंपरा–व्यास तिच्यातिल दिव्य हिरा
भारत वीरा अमर करी । चालवुनी शाहीरगिरी ।"

(–' चालवितो शाहीरगिरी ।')

राष्ट्रीय कविता ही संजीवनी मंत्रासारखी अमरत्व देणारी शक्ती आहे असे येथे कवीने सुचविले आहे. राष्ट्रीय कवितेच्या अद्‌भुत सामर्थ्यांची ही कल्पना अभिनव अशीच आहे.

काव्यप्रयोजन

आपल्या नव्या जुन्या राष्ट्रीय कवितेच्या परंपरेप्रमाणे आपल्या काव्याचे प्रयोजनही माधवांनी अगदी निःसंदिग्ध शब्दांत मांडलेले आहे.

" युगा युगांतुनि जायाची । चैतन्या उधळित साची ।
युगा युगांचे संदेश । युगा युगा करणे ज्ञात,
सुप्तांना जागृती देणे, आणि शवांना उठविणे,
व्रत उज्ज्वल हे सदा हिचे । जगताला जगवायाचे ।"

(– आमची शाहीरगिरी)

लोकशिक्षण, लोकजागृती आणि त्यांच्या ठिकाणी चैतन्याची निर्मिती हेच त्यांच्या कवितेचे प्रयोजन आहे. राष्ट्रीय कवितेची उपयुक्तता स्पष्ट करताना माधव म्हणतात, " जोपर्यंत राष्ट्रघातकी दुष्टजन नष्ट झाले नाहीत आणि राष्ट्रभक्तांचे कष्ट कमी झाले नाहीत. राष्ट्रातून अनीतीचे जहर नष्ट होऊन दीन दुबळ्यांना आपल्या व्यथा मुक्तपणे व्यक्त करता येत नाहीत तोपर्यंत ही शाहीरगिरी अखंड चालणार आहे." पुढे कवी म्हणतो,

" दास्यशृंखला जोवरती जित जनता पदि खळखळती
अविरत तोवरि जगावरी, चालणार शाहीरगिरी ।"

आधुनिक काळात राष्ट्रीय कविता लिहिण्याकडे कवींचा ओढा नाही याची माधवांना खंत वाटते. ती आपली खंत त्यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केलेली आहे.

" कितिक साधु, नृपाल, किती सती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ?"

राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितांचा परिचय

राष्ट्रकवी माधवांनी लिहिलेल्या ऐतिहासिक राष्ट्रीय कवितेचे स्वरूप चतुर्विध आहे. आपल्या राष्ट्रीय शाहीरगिरीची प्राचीन आणि अर्वाचीन परंपरा सांगणाऱ्या तीन कविता त्यांनी लिहिल्या आहेत. राष्ट्रीय कवितेची प्रेरणा, प्रयोजन आणि परिणाम यासंबंधीच्या कल्पना त्यांनी 'चालवितो शाहीरगिरी', 'आमची शाहीरगिरी' या दोन कवितांतून मांडलेल्या आहेत. 'कवी विनायक यांस' ही कविता त्यांचा आधुनिक काळातील आदर्श राष्ट्रकवी म्हणून त्यांनी विनायकाचा गौरव करण्यासाठीच लिहिलेली असून त्यातून त्यांची विनायकांबद्दलची पूज्य बुद्धी आणि भक्ती स्पष्ट होते. 'अग्रहायण आणि आर्यांचे मूलस्थान' या कवितेतून 'आर्टिक होम इन् दि वेदाज' या लोकमान्य टिळकांच्या आर्यांच्या मूळ मूलस्थानासंबंधीचा जगप्रसिद्ध सिद्धांत सांगितलेला असून प्रज्ञावान टिळकांसंबंधीचा अभिमान आणि आदर कवीने व्यक्त केलेला आहे.

आमच्यातील राष्ट्रीय भावनेचा अभाव सूचित करण्यासाठी 'कवि किती कवनी परि वर्णिती?' ही सुप्रसिद्ध कविता आलेली आहे. देशभर जागृती करीत फिरणारे समर्थ रामदास स्वामी; जनहितासाठी यावनी सत्तेचा नाश करून हिंदवी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज; धर्मवीर संभाजी, धैर्यमूर्ती राजाराम आणि साध्वी अहल्याबाई होळकर या राष्ट्रीय स्त्रीपुरुषांचे पुण्यस्मरण आहे. 'सन्त तुकारामांवर' स्वतंत्र कविता माधवांनी लिहिलेली आहे. 'मस्तानी' ही कविताही ऐतिहासिक स्वरूपाचीच आहे. राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविणारे 'भारत लक्ष्मी' हे आशावादी राष्ट्रगीत आहे. इतर ऐतिहासिक राष्ट्रीय कवितांतून आणि पोवाड्यांतून माधवांनी केलेले वीर विभूतिपूजन आलेले आहे. 'शिवराजस्तव' या कवितेतून छत्रपती शिवाजी महाराजांचे विभूतिमत्त्व साकार झालेले असून 'छत्रपतीचे पत्र' दिल्लीपती औरंगजेबाला उद्देशून लिहिलेले आहे. त्यातून तत्कालीन भारताचे चित्र कवीने रेखाटलेले आहे. 'शाहूचा उमराव', 'कान्होजीराव आंग्रे यांचा बारा चौकाचा पोवाडा', 'सर्खेल–सबळ आंगरे' आणि 'आंग्र्यांचे आरमार' यातून मराठ्यांच्या आरमारांचे आणि त्यांच्या लढाऊ सरदार आंग्र्यांचे गुणवर्णन आलेले आहे.

कवी माधवाचा ओढा शिवकालापेक्षा पेशवेकालाकडे अधिक असल्याचे आढळून येते

कारण आंग्रे यांच्याबरोबरच 'तारापुरचा संग्राम' [चिमाजी आप्पा आणि वसईचा पाडाव]; 'पानपतच्या मैदानावर', 'पानपतचा सूड', 'जिवबादादा बक्षी', 'सवाई माधवरावाचा मृत्यू'; 'गोकलखां', 'रावबाजीचे राज्यदान' या सर्व ऐतिहासिक प्रसंगांत पेशवाईतील व्यक्तींचे विभूतिपूजन प्रामुख्याने घडते. 'सवाई माधवरावांचा' मृत्यू ही विलापिका आहे आणि 'नाथ तू अनाथ जनांचा' ही चंद्राला उद्देशून केलेली प्रार्थना वर्तमानकालाचे प्रतिबिंब स्पष्ट करणारी आहे. राष्ट्रकवी तिवारींच्या तुलनेत विचार केला असता हे वीर विभूतिपूजन मोजके आणि आटोपशीर स्वरूपाचे वाटते. मात्र आहे त्या चित्रणातून त्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्य प्रतीत झाल्याशिवाय राहत नाही.

ऐतिहासिक प्रतिभेचे राष्ट्रीय कवी

मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान बाळगून व त्या इतिहासातील निवडक प्रसंगांवर वीररसपूर्ण कविता करण्याचे कार्य राष्ट्रकवी माधवांनी केलेले आहे. तिवारींप्रमाणेच माधवांची प्रतिभाही वीररसप्रधान काव्याला अनुकूल असल्याचे त्यांच्या 'तारापूरचा संग्राम', 'जिवबादादा बक्षी'; 'पानपतचा सूड', 'गोकलखां' यासारख्या सुप्रसिद्ध कवितांवरून स्पष्ट दिसते. डॉ. वा. भा. पाठक

म्हणतात, " ऐतिहासिक प्रसंगांवर व व्यक्तींवर यथोचित पोवाडे रचून माधव कवींनी मराठ्यांच्या स्फूर्तिदायक इतिहासाचे दिग्दर्शन मराठी रसिकांस घडवून ऐतिहासिक राष्ट्रीय कवितेचे एक विशिष्ट अंग सुशोभित केले आहे." १०४

वीरविभूति पूजन

राष्ट्रकवी तिवारींप्रमाणेच माधवांनीच आपल्या कवितेत वीर विभूति पूजनाला प्राधान्य दिलेले असून तो त्यांच्या राष्ट्रीय कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. प्रा. म. ना. अदवंत यांनी म्हटल्याप्रमाणे " पूर्वजांचे पराक्रम गाणाऱ्या शाहिरांची राष्ट्राला दोन वेळा गरज असते. एक अत्यंत उन्नतीच्या काळी लोकांना रिझविण्यासाठी व एक अत्यंत अवनतीच्या काळी लोकांना स्फूर्ती देण्यासाठी "१०५ माधवांच्या काळी राष्ट्राची स्थिती पारतंत्र्याने अवनत झालेली होती. त्यामुळे वीरांच्या पराक्रमाची गाणी गाऊन लोकांच्या ठिकाणी पुरुषार्थ जागृत करणे महत्त्वाचे होते. ते महत्त्वाचे कार्य सावरकर, कवी गोविंद, तिवारी, विनायक, यांच्याप्रमाणेच कवी माधवांनीही केलेले आहे. लोकमान्यांचे विभूतिपूजन करताना माधव लिहितात,

" भारतीय विद्वद्वर्य आचार्यांचा आचार्य
तिलकाचार्य सरे पुढती राखाया पूर्वज – कीर्ती "
(अग्रहायण आणि आर्यांचे मूलस्थान !)

ऐतिहासिक महापुरुषांत सर्व प्रथम समर्थ रामदासांचा गौरवपूर्ण उल्लेख माधवांनी केलेला आहे.

" नरपती चरणी करिती नती
फिरुनि देशभरी करि जागृती
उचित नाम ' समर्थ ' तथा प्रती " (–' कवि किती कवनी परि वर्णिती ।)

समर्थांनंतर ' कवि किती कवनी परि वर्णिती ', ' शिवराजस्तव ' आणि ' छत्रपतीचे पत्र ' या तीन गीतांतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गुणगौरव केलेला आहे. शिवाजी महाराज अवतारी पुरुष होते अशी माधवांची श्रद्धा आहे. ते म्हणतात,

" खराच अवतार तूं शिवनृपा ! शिवाचा जगी,
कधीहि भगवद्विरा नच ठरेल ती वाउगी " (– शिवराजस्तव)

धर्मवीर संभाजीचाही त्यांच्या धार्मिक हौतात्म्यासाठी गौरव केलेला आहे.

" धरुनि धिंड चमूंतुनि काढिली । नयन फोडुनि जीभहि काटिली ।
तरिहि धर्मिच शंभु धरी मती–" (–'कवि किती कवनी परि वर्णिती ')

वसईचा किल्ला शर्थीने जिंकणारा चिमाजी आप्पा या भीम पराक्रम करणाऱ्या वीराचेही पूजन माधवाने केलेले आहे.

" खाडी मधल्या माडी माजी । सूत्रधार रणधीर चिमाजी "
(– तारापूरचा संग्राम)

' शनिवार वाड्यापुढे ' आणि ' पानपतच्या मैदानावर ' या दोन कवितांमधून महाप्रतापी भाऊसाहेब पेशवे, मराठ्यांचा अभिमन्यू जनकोजी, समशेर बहादूर, इब्राहिमखान गारदी यांचा गौरवपूर्ण उल्लेख आलेला आहे. ' पानपतचा सूड ' या गीतातूनही वीर विभूतिपूजन केलेले आहे.

तारापूरच्या संग्रामाप्रमाणेच माधव कवींच्या राष्ट्रीय कवितेची खरी ओळख 'शनिवार वाड्यापुढे', 'जिववादादा बक्षी' आणि 'गोकलखां', 'बापू गोखले' या सुप्रसिद्ध गीतांनी महाराष्ट्राला झालेली आहे. 'शनिवार वाड्यापुढे' मधून पेशवाईतील पराक्रमी पुरुषांच्या चरित्राची झलक माधवांनी चलचित्रपटासारखी दाखविली आहे. मराठ्यांचे शौर्य, साहस, प्रसंगावधान आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचा परिचय निजामावरील स्वारीच्या वेळी, शिद्यांचे सेनाध्यक्ष जिववादादा बक्षी यांच्या व्यक्ति-चित्रणाने घडविण्यात माधवांच्या प्रतिभेचे सामर्थ्य पणाला लागले आहे. नवशिका आणि काहीसा कचदिल असा बाबूराव फडके जरिपटक्यासह पळतो आहे आणि पेशव्यांच्या सैन्याचा मोड होण्याचा प्रसंग गुदरला आहे अशा वेळी,

" कोण हा महाराष्ट्राच्या इभ्रतीचा पाठीराखा
रोधिले पुढुनि मार्गाला । अडविला पलायनवाला । हिसकिले
जरिपटक्याला । थुंकुनी मुखावर बोले !" (जिववादादा बक्षी)

या प्रसंगातील नाट्य आणि जिववादादाचे चित्र आधुनिक राष्ट्रीय कवितेत बेजोड आहे. 'बापू गोखले' या पेशव्यांच्या पराक्रमी सरदाराचे 'गोकलखां' हे चित्रही असेच चिरतरुण आणि चिरस्थिर आहे. बापू गोखल्यांच्या युद्धकौशल्याचे आणि बाणेदारपणाचे तसेच त्यांच्या असीम धैर्याचे वर्णन माधवांनी परोपरीने केलेले आहे. त्यातील या दोन ओळी नमुन्यादाखल देतो.

" कापरे सुटे अंगाला शत्रूच्या बघता ज्याला,
गृध्रांचा त्यावरि डोळा । चित्तीं न परी गडबडला !"
(– 'गोकलखां लढनेवाला !")

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'गोमांतक' या खंडकाव्याचा अपवाद करता आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेत माधवांनीच मराठ्यांच्या समुद्रावरील पराक्रमाचे वर्णन केलेले आढळेल. 'मराठ्यांची संग्राम गीते' लिहिणाऱ्या तिवारींना किंवा विनायकालाही मराठ्यांच्या आरमाराच्या पराक्रमाचे आणि त्यांच्या सामुद्रिक सेनाध्यक्षाचे कर्तृत्व आकर्षित करू शकलें नाही. माधवांनी मात्र 'शाहूचा उमराव' कान्होजी आंग्रे याच्यावर बारा चौकांचा प्रदीर्घ पोवाडा लिहून 'सर्वेल सबळ आंगरे' तुळाजीराव यांचे चरित्रचित्रण व 'आंग्र्यांच्या आरमाराचे' वैशिष्ट्य कथन केलेले आहे.

" जे जे आंग्र्या म्होर गेले । ते ते त्याने ठार केले । असा आंग्रा कान्होजीराव "
किंवा " फिरंगी 'पुतळे आगीचे' ते 'सर्खेलाच्या भये
गोठ्यामध्ये लपुनि बैसले वार्ता त्यांची नये ।" (– 'सर्खेल सबळ आंगरे')

पूर्वपरंपरेचा गौरव आणि सद्यःस्थितीची विदारक जाणीव

वीर विभूतिपूजनाप्रमाणेच पूर्व परंपरेचा गौरव माधवांच्याही कवितेत ठिकठिकाणी आढळतो. तिवारींच्या संग्रामगीतांतही पूर्वपरंपरेचा गौरव आलेला असून तो भूतकाळात नेऊन रमविणारा आहे. माधवांच्या कवितेत पूर्वपरंपरेच्या गौरवाबरोबरच सद्यःस्थितीची विदारक जाणीव आहे. काही-तरी गमावल्याची खंत आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजींच्या परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख करताना,

" सुनाम तव ऐकता तनुत होय संवेदना
चढे रुधिर बिन्दुंना स्फुरण लाधुनी चेतना !"

असे उद्‌गार काढणारे माधव 'शनिवार वाड्यापुढे' या कवितेत मात्र एक वृद्धा म्हणते,

" मिळविली धुळिस सुल्तानी – ज्या महाराष्ट्र वीरांनी
त्यांचीच वंशजा असुनी, भाळी या रडणे आले !!!"

असे गौरवापाठोपाठ विषादाचे उद्‌गार काढलेले आहेत, ते सद्यःस्थितीची विदारक जाणीव देणारेच आहेत.

पूर्वपरंपरेचा गौरव आणि पूर्ववैभवाचे स्मरण त्यांच्या 'शिवराजस्तव', 'छत्रपतीचे पत्र', 'तारापूरचा संग्राम', 'पानपताचा सूड', 'शाहुराजाचा उमराव', 'सर्खेल सबळ आंगरे' 'जिवबादादा बक्षी', 'गोकलखां' इत्यादी कवितांतून आलेला आहे.

पारतंत्र्याची खंत माधवांनी अनेक ठिकाणी व्यक्त केली आहे.

" शस्त्राचा झाला न्यास । परवशता घाली पाश" (– शनिवारवाड्यापुढे)

किंवा " हा शेवटचा उच्छ्वास श्री स्वतंत्रता देवीचा–
..... निष्प्राण होऊनी पडला – गोकलखां लढनेवाला; "
किंवा " कोणीही पदी तुडवावे – आर्यांना नुरला मान ।
कचराच मानिती सारे – आर्यांचे तत्त्वज्ञान
आर्यांच्या आकांक्षांचा घडि घडि होय अपमान " (–'नाथ तू अनाथ जनांचा')

राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रीय आशावाद

या राष्ट्रीय भावनांचे दर्शन माधवांच्या 'भारत लक्ष्मी', 'चालवितो शाहीरगिरी' आणि 'आमची शाहीरगिरी' या गीतांतून प्रकर्षाने घडते. चालवितो शाहीरगिरी या कवितेची सुरुवातच,

" साधायाला व्यक्ति हित । राष्ट्राचा करिती घात ।
पद त्यांच्या देऊन शिरीं । चालवितो – शाहीरगिरी "

असा इशारा दिला आहे. 'दास्याचा दावेदार । महाराष्ट्र पूर्वापार' राष्ट्रभावनांची तीव्रता माधवांच्या या कवितांतून स्पष्ट जाणवते. मराठे आपल्या बुद्धिबळाने भारताचे भाग्य निर्माण केल्याशिवाय राहणार नाहीत असा राष्ट्रीय आशावादही त्यांच्या काव्यातून डोकावला आहे.

" सात समुद्रापलीकडे जरि सात पहाऱ्यात
भारत लक्ष्मी असली तरिही येईल ती तेथ ।
नसे काल तो दूर, तयांच्या ऐका या हाकां ।
स्वागत त्याचे करावया तर चला पुढे ठाका ।" (– 'भारत लक्ष्मी')

काव्यसौंदर्य

आधुनिक राष्ट्रीय कवितेत काव्यसौंदर्याच्या बाबतीत माधवांची कविता कवी गोविंदांच्या जवळपास येते. प्रा. भ. श्री. पंडितांनी माधवांच्या काव्याची तुलना अनंततनयांच्या कवितेशी केलेली आहे तर प्रा. म. ना. अदवंतांनी तिची योग्यता तिवारींच्या कवितेबरोबर ठरविली आहे. माडखोलकरांना तर ती अद्वितीय वाटली आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी काव्यदृष्ट्या तिची योग्यता श्रेष्ठ ठरविली असून तिचे साम्य कवी गोविंदांच्या कवितेशी असल्याचे सांगितले आहे. मराठ्यांच्या इतिहासातून नाट्यप्रसंगांची निवड करणे, त्या नाट्यप्रसंगांतून वावरणाऱ्या वीर पुरुषांची जिवंत व्यक्तिचित्रे रेखाटणे, घटनाप्रसंगाचे योग्य पार्श्वभूमीसह सजीव चित्रण करणे, यात माधवांच्या

प्रतिभेने विलक्षण सामर्थ्य प्रकट केले आहे. रचनाचातुरी, रेखीवपणा, भाषाप्रभुत्व आणि कल्पनासौंदर्य या गुणांनी माधवांची कविता अप्रतिम ठरलेली आहे. मात्र कलात्मकतेच्या हव्यासापायी भावनोत्कटतेचा काहीसा संकोचही घडून आलेला असल्याने ती रसोत्कटतेत कवी गोविंद आणि कवी तिवारी यांच्या काव्यापेक्षा डावी ठरली आहे. श्री. वा. ना. देशपांडे यांनी "कविता जितक्या रसरशीत आहेत तितकीच त्यांची रचनाही अतिशय सफाईदार आहे."[१०६] असा अनुकूल अभिप्राय दिलेला असून तो माधवांच्या काव्यगुणांची प्रशंसा करणारा आहे.

काव्यगुणाच्या दृष्टीने, त्यांच्या 'तारापुरचा संग्राम,' 'जिवबादादा बक्षी'; 'शनिवारवाड्यापुढे'; 'पानपतचा सूड'; 'मस्तानी', 'रावबाजीचे राज्यदान'; 'हिरवे तळ कोकण'; 'सन्त तुकाराम' या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. माधवांच्या ठिकाणी असणाऱ्या काव्यगुणामुळेच राष्ट्रीय नसलेली त्यांची अवांतर कविताही सरस व रचनासौष्ठवपूर्ण आहे. वीरश्रीयुक्त गीते गाणाऱ्या या कवीने 'गोपूकाका', 'तात्या पंतोजी' आणि 'पंतांचा पराक्रम' इत्यादी हास्यरसात्मक कविताही तितक्याच सफाईने रचल्या आहेत.

भाषासौंदर्याच्या बाबतीतही माधवांचे स्थान गडकऱ्यांच्या बरोबरीचे आहे. गडकरी जसे संस्कृत शब्दांच्या जोडीला फारशी शब्द चपखल बसविण्यात आणि भाषेचे ओज आणि सौंदर्य वाढविण्यात निष्णात आहेत तसेच माधवही आहेत. 'मस्तानी'ने प्रथमच बाजीरावाला पाहिले त्या प्रसंगाचे चित्र रेखाटताना

" सोनेरी किरणात तियेच्या चमकावित भाला
दिल्दर्या, दिल्पाक मोहरा दख्खनचा आला !"

असे वर्णन केलेले आहे. पुढे

" बेमालुम मुलुखात दिलाच्या शिरुनि अकस्मात
गाऊ लागला गझल मुशाफर वासंतिक वात "

असे शब्द आलेले आहेत.

'हिरव्या तळ कोकणाचे' निसर्गसौंदर्य वर्णन करताना कोकणाच्या अभिमानाबरोबरच भाषा प्रभुत्वाचे सामर्थ्य विशेषत्वाने प्रकट झालेले आहे.

अलंकारवैभव

अलंकारवैभवाच्या बाबतीत गडकऱ्यांच्या कवितेशी तिचे साम्य आहे. राष्ट्रीय भावनेचा योग्य परिपोष करण्यासाठीच उचित अलंकाराचा योग्य उपयोग माधवांनी आपल्या कवितेत केलेला आहे. शनिवारवाड्याचे हे काव्यमय वर्णन वाचा !

" बोलोत कुणी हा 'वाडा' – सत्य न परि त्यांची वाचा !
हा जातिवन्त पोवाडा – पेशवे धुरंधर यांचा !
हा मूर्तिमंत इतिहास – या महाराष्ट्र देशाचा !"

अशी अनेक उदाहरणे देऊन माधवांच्या अलंकारवैभवाचे दर्शन घडविणे सहज शक्य आहे. पण विस्तारभयास्तव ती देण्याचा मोह आवरला पाहिजे.

काव्यगायनासंबंधी कोलरिजचा अभिप्राय

राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात श्री. तिवारी यांच्या कवितेने जे कार्य केलेले आहे तेच माधवांच्या राष्ट्रीय कवितेने केलेले आहे. 'उद्धवा शांतवन कर जा!' ही जाती काही राष्ट्रीय गीतांत माधवांनीही वापरली आहे. ही गीते खड्या सुरात म्हटली जाताना त्या वेळच्या श्रोत्यांच्या भावना पेटून उठत होत्या. वर्डस्वर्थ आपल्या काव्याचे गायन खड्या स्वरात करताना त्याच्या काव्यातील विविध अर्थच्छटा त्यांच्या श्रोत्यांना प्रतीत होत असल्याचे कोलरीजने लिहून ठेवले आहे. तेच कार्य तिवारी, माधवांच्या राष्ट्रीय कवितेने केले आहे.

टिळकभक्त राष्ट्रकवी जयकृष्ण केशव उपाध्ये (जन्म १८८३ मृत्यू १९३८)

परिचय– कवी टेकाडे, बेहरे आणि बोबडे यांच्याहून वयाने वडील पण या नागपूरस्थ कवींच्या वर्तुळात अनेक वैशिष्ट्यांनी प्रसिद्ध असलेले श्री. जयकृष्ण केशव उपाध्ये यांचाही राष्ट्रकवी म्हणून उल्लेख केला पाहिजे. श्री. बोबडे आणि श्री. टेकाडे यांचे श्री. उपाध्ये यांच्याशी मैत्रीचे संबंध होते व काव्यवाचनासाठी अनेकदा ते एकत्र जमत असत. इ. स. १९२०, १९२१ मध्ये नागपुरात झालेली व गाजलेली कविसंमेलने यांच्याच प्रयत्नाने गाजली होती. कवी बोबडे यांच्या वागीश्वरीच्या संपादनातही उपाध्यांचे सहकार्य होते व त्यांच्या कविताही 'वागीश्वरी'तून प्रसिद्ध झाल्या आहेत. श्री. उपाध्ये हे लोकांच्या स्मरणात विशेष आहेत ते त्यांच्या 'चाल चलाऊ भगवद्गीते'मुळे. श्री. उपाध्ये हे मैफिली कवी होते. हवे त्यांच्यात ते सहज मिसळत असल्याने त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. प्राचीन संतवाङ्मयाच्या अभ्यासावर उपाध्ये यांचा विशेष भर होता. श्री. उपाध्ये हे बोबडे; तांबे यांच्यासारखेच आस्तिक होते. काही काळ त्यांनी वर्ध्याच्या हनुमान गडावर पुरश्चरणही केले होते आणि ज्ञानेश्वरीचा त्यांचा व्यासंग सूक्ष्म आणि सखोल होता. त्यामुळेच त्यांच्या 'पोपट पंची' (१९२९) या कवितासंग्रहात अनेक सुंदर सुंदर उत्कट भक्तिगीते आलेली आहेत.

उपाध्यांची टिळकभक्ती

उपाध्यांनी आपल्याच कवितांची विडंबने आणि 'चालचलाऊ भगवद्गीता' लिहिल्यामुळे ते विनोदी कवी म्हणूनही सुपरिचित होते, परंतु देशभक्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. या देशभक्तीचे मूळ त्यांच्या लोकमान्य टिळकांच्या ठिकाणी असणाऱ्या निस्सीम भक्तीत होते. लोकमान्य हे त्यांच्यासाठी जिते जागते आधुनिक दैवत होते आणि म्हणूनच त्यांनी महिपती ताहराबादकर या कवीप्रमाणे ओवीबद्ध असे लोकमान्य चरितामृत (१९२४) नावाचे अतिशय रसाळ आणि सुबोध काव्य लिहिले आहे. त्या काव्याचा पूर्वार्ध प्रकाशित झालेला असून उपलब्ध आहे पण अतिशय प्रभावी उतरलेला उत्तरार्ध अजून हस्तलिखित स्वरूपात व अप्रकाशित आहे. लोकमान्य चरितामृत (प्रथम खंड) हे उपाध्यांचे काव्य खूप प्रदीर्घ नाही, पण राष्ट्रीय महापुरुषांच्या वाङ्मयीन पूजेचा तो एक नमुना आहे, तसाच चरित्रात्मक काव्याचाही उत्तम नमुना आहे. या काव्याद्वारे उपाध्ये यांनी वीर विभूतिपूजनाचे महत्त्वाचे कार्य साधले आहे. या काव्याव्यतिरिक्तही त्यांनी लोकमान्यांवर स्फुट कविताही लिहिल्या आहेत. या सर्वांतून त्यांच्या अनन्य टिळकभक्तीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.

काव्यविषयक भूमिका

श्री. बोबडे आणि उपाध्ये यांच्या काव्यविषयक भूमिकेत बरेच साम्य आहे. दोघेही अभिजातवादी आहेत. दोघांचाही राष्ट्रभक्तीकडे ओढा होता. दोघेही काव्य हे लोकरंजनाचे, लोकशिक्षणाचे

आणि लोकजागृतीचे साधन समजत असत. हास्य, वीर, भक्ती, शृंगार व करुण या रसांनी युक्त कविता करणारे होते. उपाध्यांची " वसवे न घरी रणि जाऊ दे ! यज्ञकुंड भडकले चहूकडे । त्यात उडी मज घालू दे ।" ही कविता त्या काळी अतिशय लोकप्रिय झालेली होती. उपाध्ये हे राजकीय चळवळ करणाऱ्या नागपूरकर पुढाऱ्यांच्या बैठकीतील एक सक्रिय कार्यकर्ते होते.

राष्ट्रप्रेम

श्री. उपाध्ये यांच्या राष्ट्रप्रेम व्यक्त करणाऱ्या मोजक्याच कविता आहेत. मात्र त्यातूनही त्यांची राष्ट्रभक्ती आणि स्वदेशाभिमान यांचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. पारतंत्र्याच्या काळातच उपाध्यांनी स्वतंत्र भारताचे स्वप्न पाहिले होते. त्यांचा स्वतंत्र भारत कसा असेल याची त्यांनी आपल्या प्रतिभेने कल्पना केलेली आहे.

" स्वतंत्र हिंदुस्थान । स्वतंत्र हिंदुस्थान
स्वतंत्र हिंदुस्थान । गर्जे स्वतंत्र हिंदुस्थान ॥ ध्रु. ॥"

अशा ध्रुव पदाने सुरुवात असलेले स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत गाताना उपाध्ये सांगतात,

" स्वतंत्र हिंदुस्थान । जाणतो एकचि मंत्र महान
बंधु बंधु सारेच हिंदु जन । कोणि न थोर लहान " (–स्वतंत्र हिंदुस्थान)

स्वातंत्र्य, समता आणि एकता यांचा मंत्रच स्वतंत्र भारताच्या या गीतात उपाध्यांनी सांगितला आहे. दुसऱ्या एका कवितेत भारताच्या शिवकालातील भाग्योदयाचे चित्र रेखाटले आहे. कवी सांगतो,

" सौभाग्य तिलक लावी हिंदभू आज भाळी
स्वातंत्र्य मंदिराची स्वामिनी पूर्ण झाली " (– भारत भाग्योदय)

स्वातंत्र्याचा ध्यास आणि पारतंत्र्याची खंत

स्वातंत्र्याचा ध्यास आणि पारतंत्र्याची खंत या एकाच चित्राच्या दोन बाजू आहेत किंबहुना पारतंत्र्याची खंत वाटल्याशिवाय स्वातंत्र्याचा ध्यासही लागत नाही. उन्हात गेल्याशिवाय सावलीचे सुख जसे कळत नाही तसेच पारतंत्र्याची तीव्र जाणीव झाल्याशिवाय स्वातंत्र्याची आकांक्षाच उदयाला येत नाही. कवी म्हणतो,

" साम्राज्यी ह्या तमाच्या उमजति न दिशा मार्ग कोठे दिसावा
अंधारे व्याप्त सारे जगत गमत ते अंतिचा घे विसावा "... (– संगम)

दुसऱ्या कवितेत कवी म्हणतो,

" मुख करुनी केविलवाणे, कां गाशि सदा रडगाणे । भारता
' मी दीन पंगु दुर्दैवी ' का भाषा वदनी यावी ? भारता !"

(– तरुण भारतास)

वीर विभूतिपूजन

पारतंत्र्यपंकातून बाहेर पडण्याची प्रेरणा वीरविभूतिपूजनातून राष्ट्रकवी मिळवीत असतात. यापूर्वी ' लोकमान्य चरितामृताचा ' उल्लेख आलेला आहेच, त्याशिवाय ' जगन्मोहिनी ', ' आनंद आला आनंद ', ' द्रौपदीचा धावा ', ' गीत राघव ', ' भारत भाग्योदय ' या गीतांतून भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुणगान

कवीने केलेले आहे. भगवान श्रीकृष्णाच्या मुरलीला 'जगन्मोहिनी' असे अभिधान दिले आहे. भगवंताच्या मुरलीचे सामर्थ्य सांगताना कवी म्हणतो,

" कर्तव्याच्या पथा लागला ज्या नादे जीव
पुनः तीच रे । जगन्मोहिनी मुरली वाजीव !"

(– जगन्मोहिनी)

'आनंद' मासिकातील गोष्टी, चित्रे, कविता मुलांना दाखवितानाही त्यांना आपल्या भारतातील महापुरुषांचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. ते लिहितात,

" बघा बघा किती चित्रे नामी
शिवाजी राजे समर्थ स्वामी
शूर झाशीची राणी लक्ष्मी
टिळक आणि अरविंद – "

'भारत भाग्योदय' या कवितेत छत्रपती शिवाजी महाराजांचे पूजन कवीने केलेले आहे. 'त्या घोर विषम काळी, शिवमूर्ति प्रकट झाली', शिवप्रभूच्या रूपाने श्रीहरीचे कारुण्य, हिंदभूमीचे पुण्य मूर्तिमान झाले, मूढता नष्ट झाली, स्वत्वास तेज चढले, लोक शक्तिशाली झाले. शक्ती, युक्ती, भक्ती, त्या पुण्यकाली जागृत झाल्या, दुर्जनांचा काळ शिवप्रभूच्या रूपाने उभा राहिला आणि मग;

" मस्तके मस्तवाल ठेचिली ठायि ठायि
हिंदभू मुक्त केली घुमविला धन्यवाद "

(– भारत भाग्योदय)

लोकमान्य टिळकांवर लिहिलेली विलापिकाही वीर विभूतिपूजनाचे उदाहरण आहे.

" गुण विमल तुझे निशिदिनी मनि आठवती । करू काय हृदय पिळवटती
तुज वाचुनिया निराधार जग वाटे । दुःस्थितीचे रुतती काटे "

(– तव विरह विकल करि बाळा)

संस्कृत कवी जयदेवाच्या 'गीत गोविंदा' च्या धर्तीवर उपाध्यांनी 'गीत राघव' हे काव्य रचलेले आहे. ते कवी जयदेवाच्या कृतीप्रमाणेच 'कोमलकान्त पदावलीने' संपन्न असून वीरविभूतिपूजनाचे कार्यही त्यातून झालेले आहे.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा गौरव

कवी बोबडयांप्रमाणेच उपाध्यांनाही पूर्ववैभवाचे स्मरण होताना दिसते. ते भारताला म्हणजे भारतीय जनतेला उद्देशून म्हणतात,

" अंतर्मुख करुनी दृष्टी कर्तृत्व पूर्वीचे पाहि । भारता
ऐश्वर्य आपुले स्मर ते ज्या जगात तुलना नाही । भारता
करि आत्मनिरीक्षण जेणे, हे दैन्य लयाला जाई । भारता "

(– तरुण भारतास)

भगवद्गीतेच्या आरतीत कवी सांगतो

" स्वत्वाची स्मृति नुरली स्थिरता गडबडली ।
ऐशा समयी माते धावुनि तू आली ।।"

परंपरेच्या गौरवात हिंदुजातीचा गौरवही अभिप्रेत आहे. त्यांच्या 'हिंदुसंघटन' (ओव्या) आणि 'तो हिंदु कशाचा ?' (ओव्या) या दोन्ही कविता वाचण्यासारख्या आहेत. उपाध्यांनी अन्वयव्यतिरेक पद्धतीने हिंदुजातीचे, हिंदुधर्माचे व हिंदुपरंपरेचे अभिमानपूर्वक विवेचन केलेले आहे. ते लिहितात;

" चहूकडूनि हिंदुत्वावर । बैसता दिसे भडिमार ।
काहीच करीना प्रतिकार । तो हिंदु कशाचा ?"

वर्तमानाचे प्रतिबिंब

परंपराभिमान व पूर्ववैभवाचे स्मरण याप्रमाणेच तत्कालीन वर्तमान परिस्थितीचे प्रतिबिंब कवी बोबडे यांच्याप्रमाणेच उपाध्यांच्या राष्ट्रीय कवितेत पडलेले स्पष्टपणे दिसून येते. 'जगन्मोहिनी', 'द्रौपदीचा धावा', 'हिंदुसंघटन', 'तो हिंदु कशाचा ?', 'तरुण भारतात', 'तव विरह विकल करी बाळा', इत्यादी कविता वाचण्यासारख्या आहेत. 'लोकमान्यचरितामृत' म्हणजे तर मूर्तिमंत वर्तमान-काळच. लोकमान्यांच्या चरित्राच्या साहाय्याने वर्तमानच सजीव झालेला आहे. 'जगन्मोहिनी' या या कवितेत कवी सांगतो;

" सांप्रतकाली ती वनमाली ! मंजुळ नाद–सुधा
श्रवणी प्याया हृदयी भराया । उत्सुक ही वसुधा–कारण "

(– जगन्मोहिनी)

माझ्या मते 'द्रौपदीचा धावा' ही रूपकात्मक कविता असून त्या कवितेतून भारतीय जनतेचे दर्शन त्यांना घडवावयाचे आहे. जालियनवाला बागेतील १९१९ चे हत्याकांड, पंजाबातीलच गदर क्रांति-कारकांचे इंग्रज सरकारने केलेले शिरकाण आणि 'वीरनवाली' सारख्या महिलांवर इंग्रजांनी केलेले बलात्कार, दडपशाही, इत्यादींचे दर्शनच या कवितेतून द्रौपदीच्या द्वारे घडवावयाचे आहे. दुबळा मुका वृद्ध गुरुजनवर्ग, हीनदीन लाचार तरुणवर्ग अशा भारताच्या स्थितीचे चित्रच कवीने रेखाटले आहे असे वाटते. कवी सांगतो;

" ही वीर्य, पराक्रम, धैर्य, कला, चातुर्य स्वस्थ बसली । सारीच संकटी फसली
सर्वत्र दिसे अंधार, नसे आधार, थार देई । घे धाव येई गे आई !"

(– द्रौपदीचा धावा)

सामाजिकता

वर्तमानाचे प्रतिबिंब उपाध्यांच्या सामाजिक विचारांच्या स्वरूपातही पडलेले आहे. उपाध्ये हे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वत्रयी मानणारे लोकशाही वृत्तीचे कवी होते. श्रेष्ठकनिष्ठता; स्पृश्य–अस्पृश्यताही ते मानत नसत. भेदाचे भूत गाडून टाकावे असा त्यांचा सामाजिक विचार होता. ते सांगतात;

" कायावाचामने । स्वये वर्तूनि हिंदुपणे । भेदाचे भूत ओंगळवाणे टाकावे गाडूनी
वरिष्ठ कनिष्ठादि भेद । हे तो नसती जन्म सिद्ध ।
त्यांचा करोनी उच्छेद । बंधुभावे असावे ॥"
" सुवर्ण करीना लोहास । त्या केसे म्हणासे परीस ।
अस्पृश्यांकरी ना स्पृश्य तो हिंदु कशाचा ?"

(– तो हिंदु कशाचा ?)

राष्ट्रीय आशावाद

उपाध्यांनी अनेक ठिकाणी भारताच्या तत्कालीन पारतंत्र्यातील परिस्थितीचे विदारक चित्रण केलेले असले तरी त्यांचा आशावाद मात्र जसाचा तसा कायम आहे. ईश्वरावर प्रगाढ निष्ठा आणि कर्ममार्गावर, प्रयत्नावर अविचल श्रद्धा, लोकशाही आणि धर्मतत्त्वांवरील विश्वास यामुळे त्यांच्या काव्यात आशावाद सर्वत्र भरलेला आहे. 'संगम' या काव्यात आलेला निसर्गसंग्राम संपविताना कवी सांगतो.

" ऐश्वर्याते निशेच्या हळुहळु गळती लागुनी या प्रकारे
झाला तो तेजोनिधीचा पथ सुगम जया व्यापिले अंधकारे ।"

टीकाकारांचे अभिप्राय

प्रा.'भ. श्री. पंडितांनी बोबडे आणि उपाध्ये या जोडीवर परीक्षणात्मक लेख लिहिला असून त्यांना दोघांमध्ये बऱ्याच गोष्टीत साम्य आढळले आहे. ते लिहितात, " या कविमित्रांची कविता संख्येने अल्प आहे पण गुणाने महान आहे. या दोघांनीही शृंगार, वीर व हास्य या तीन रसांनी युक्त असलेली कविता लिहिली आहे." [१०७] डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " या विनोदप्रवणतेप्रमाणे त्यांच्या कवित्वाला देशभक्तिपरता व ईश्वरभक्तिपरता असेही आणखी दोन उज्ज्वल पैलू आहेत. त्यांनी लिहिलेले लो. टिळकांचे लोकमान्य चरितामृत प्रथम खंड (१९२४) हे ओवीबद्ध चरित्र निस्संशय मनोवेधक आहे." [१०८]

समारोप

प्रा. भ. श्री. पंडित आणि डॉ. अ. ना. देशपांडे या दोघांचेही अभिप्राय बहुतेक सारखे आहेत. प्रा. अदवंतांना त्यातून थोड्या फार राष्ट्रीय वृत्तीचा आविष्कार आढळला. माझ्या मते उपाध्ये बोबडयांच्या इतकेच क्रांतिवादी अशा जहाल विचारांचे आहेत. बोबडयांच्या राष्ट्रीय वृत्तीचा कल वेदान्ती असल्याने त्यात प्राचीन आचार विचारांना अधिक प्राधान्य आहे. उपाध्ये लो. टिळकांचे कट्टर अनुयायी आणि भक्त असल्यामुळे ते जितके जहाल तितकेच हिंदुत्वनिष्ठ आहेत. ' कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ' हा प्राचीन ऋषींचा सन्देश त्यांनाही मान्य आहे. पण त्यांचा ओढा सुधारणावादाकडे आहे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाहीच्या तत्त्वांचा त्यांनी आपल्या राष्ट्रीय कवितेतून पुरस्कार केला आहे. सामाजिक भेद नष्ट व्हावेत, स्पृश्यास्पृश्यवाद नाहीसा व्हावा, जन्माच्या आधारावर माणसाचे श्रेष्ठकनिष्ठत्व न ठरविता ते त्याची विद्वत्ता, कर्तृत्व, दानत आणि त्याग यांच्या निकषांवर ठरवावे असे त्यांचे विचार आहेत. लोकमान्यांना मान्य असलेले जशास तसे धोरण राजकारणात असावे या मताचे उपाध्ये आहेत. त्यांचा राजकीय चळवळीकडे कल आहे. पण नव्या नेतृत्वासंबंधी आदर नाही. उपाध्यांची कविता वर्तमानाचे दर्शन घडविणारी राष्ट्रीय कविता आहे. बोबडयांप्रमाणे उपाध्येही अभिजातवादी कवी असून विविध प्रकारच्या भावसौंदर्याने आणि रचनासौंदर्याने त्यांची गीते चांगली वठली आहेत. भाषाप्रभुत्व हा दोघांचाही विशेष आहे. त्यामुळे कलात्मक दृष्टीनेही उपाध्यांची कविता सुंदर आहे. राष्ट्रवादी विचारांनी ती गुदमरून गेलेली नाही, उलट ती अधिक ओजस्वी आणि प्रसन्न झाली आहे.

अभिजात राष्ट्रकवी बोबडे (जन्म १८८९–१९३४)

परिचय– राष्ट्रकवींच्या मालिकेत आनंदराव टेकाडे आणि प्रो. ना. के. बेहरे या द्वयांना जसे स्थान आहे तसेच स्थान ज. के. उपाध्ये आणि श्रीनिवास रामचंद्र बोबडे या जोडीलाही आहे. हे

चारही कवी एकाच कालखंडात काव्यलेखन करीत होते. व्यवसाय, शिक्षण, प्रकृती यामुळे आणि भिन्न अभिरुचीमुळे त्यांच्यात जे अंतर पडले असेल तेवढेच, बाकी या सर्वांची वाढ एकाच सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वातावरणात झाली. गर्भश्रीमंत घराण्यात जन्माला आलेले, विधिशाखेचे पदवीधर असलेले, श्रीनिवास रामचंद्र बोबडे व्यवसायाने अधिवक्ता होते आणि निष्णात कायदेपंडित म्हणून त्यांचा लौकिकही होता. परंतु रसिकता हा त्यांचा स्थायीभाव होता. रसिकता आणि राष्ट्रप्रेम या दोन विशेषांनी त्यांचा पिंड बनलेला होता. श्रीनिवास बोबडयांच्या ठिकाणी असलेली रसिकता राजकवी तांब्यांच्या जातीची होती. मात्र तांब्यांसारखे ते शुद्ध कलावादी मुळीच नव्हते.

तांब्यांना संस्थानिकांच्या पदरी आयुष्य घालवावे लागले. त्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीवर स्वाभाविकपणे बंधने आली. तसा प्रकार कवी बोबडे यांच्या बाबतीत घडलेला नाही. स्वतंत्र व्यवसायामुळे त्यांच्या अभिव्यक्तीतही अधिक मोकळेपणा दिसून येतो. जितक्या रसिकतेने तांब्यांनी शृंगारगीते लिहिली तितक्याच रसिकतेने श्री. बोबडे लिहू शकले असते असे त्यांनी लिहिलेली शृंगार गीते वाचून वाटते. शृंगार गीतांप्रमाणेच ईश्वरविषयक गीतेही श्री. बोबडे लिहू शकत होते परंतु कवी म्हणून आपला विशेष नावलौकिक व्हावा अशी आकांक्षाच श्री. बोबडयांना नव्हती. त्यामुळे त्यांची कविता संख्येने अल्प आहे. त्यांच्या संपूर्ण गीतांची संख्या सुमारे ८५ च्या जवळपास जाईल. त्यात सुमारे २५ कविता राष्ट्रीय या सदरात येण्यासारख्या आहेत.

जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी– "स्वत:च्या जीवनास परिपूर्ण व सौंदर्यमय करण्याचे एक साधन या दृष्टीनेच ते काव्याचा व्यासंग ठेवीत असत,"[१०९] असे त्यांच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत कवी अनिल उपाख्य आ. रा. देशपांडे यांनी नमूद केलेले आहे. बोबडे आपल्या जुन्या वेदान्ती मताप्रमाणे प्रवृत्तिवादी, जीवनवादी दृष्टीचे आणि काव्याला, जीवनाला पूर्णता आणणारे एक साधन समजणारे होते. जीवनप्रधान नि काव्यगौण असा महाकवी सावरकरांसारखा त्यांचा दृष्टिकोन होता. पुष्कळ वेळा रसिक रसास्वादातून त्यांना काव्यस्फूर्ती होत असे. सावरकरांच्या 'कमला' काव्याचे कौतुक करण्यासाठी लिहिलेली 'कमला' ज्याचे त्याला निवेदन, ही अतिशय सुंदर कविता हे त्यांच्या रसिकतेचे व काव्यविषयक दृष्टिकोनाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. श्री. दि. वा. फडणवीस म्हणतात, "सावरकरांच्या कमला काव्यावर त्यांनी रचलेले गीत हे दहशतवादी क्रांतिकारकांच्या पूजेचेच गीत आहे."[११०]

हिंदवासिजन जागविण्याचा हेतू

मातृभूमीचे स्तवन करणे कवीला आपले कर्तव्य वाटते. या कर्तव्याबरोबरच लोकाभिरुचीला वळण लावणे आणि हिंदवासीयांत राष्ट्रीय जागृती करणे यासाठी गाणी गुंफून सादर करण्यात त्याला आनंद आहे. कवी म्हणतो,

"स्व–राज्य गाने । भारु जनमने । स्वराज्याविणे व्यर्थ जिणे
ह्या मंत्राने । भरु भू–गगने । हिंदवासिजन जागवू या ।।"

राष्ट्रीय काव्याचे विषय कोणते आहेत याची राष्ट्रकवी बोबडयांना पूर्ण जाणीव आहे. 'पोवाडे' या कवितेत त्यांनी त्या विषयांची कल्पना पुढीलप्रमाणे दिली आहे.

"पोवाडे स्वातंत्र्याचे पोवाडे स्वराज्याचे
पोवाडे नररत्नांचे पोवाडे राज मुकुटांचे"

बोबडयांनी आपल्या राष्ट्रीय कवितेतून या विषयावरच थोडी पण प्रभावी गीते लिहिली आहेत.

राष्ट्रभक्तीची भावना– राष्ट्रभक्तीच्या भावनेचे प्रगटीकरण बोबडयांच्या 'भारतवर्ष गुण गान', 'जयजय भारत वर्ष', 'जय हिंद भूमी', 'संदेश' आणि 'मातेस' या कवितांमधून झालेले आहे. भारतवर्षाचे गुणगान करण्यात कवीला आपल्या वाणीचे सार्थक वाटते. कवीला भारतमाता ही वीररसाची मूर्तिमंत मूर्तीच वाटते. तो म्हणतो,

" वीर रसाची सुंदर मूर्तिच ही भारत देवी
या देवीच्या यशोगायनी वाणी धन्य करावी " (– भारतवर्ष गुणगान)

दुसऱ्या कवितेत भारतवर्षावरोवर महाराष्ट्र देशाचाही जयजयकार केलेला आहे.

" जय जय भारतवर्ष जय जय महाराष्ट्र देश
धन्य पुण्यभू नांदला जेथे शिवाजि नरेश " (– जयजय भारतवर्ष)

भारत मातेची गाणी गाण्यात कवीच्या अंतःकरणाला हर्ष होतो. तो म्हणतो;

" या कविरायांनो । या या । हिंदभूमि गुण गाऊ या ॥ धृ ॥
हिंदभूमि गुणी । प्रेरुनी वाणी । गुंफुनि गाणी गाऊ या ।
तत्पद गायनि । क्षणभर रमुनी । आनंदाने नाचू या ॥"

दुसऱ्या एका कवितेत कवीचा भारतभूमीबद्दलचा मातृभाव उत्कटतेने व्यक्त झालेला आहे.

" सदाशिवे देवि नमोऽस्तु माते
सुवर्णभूमी तुझिया पदाते
तुझाच हा बालक मातृदेवी
तुझ्या पदी सादर शीर्ष ठेवी." (– मातेस)

पारतंत्र्याचे दुःख– राष्ट्रभक्तीच्या भावनेमुळेच पारतंत्र्याचे दुःख कवीला जाणवते. 'मातेस'; 'विजयोत्सव', 'गडि मर्द मराठा वीर', 'पोवाडे'; 'हरहर महादेव' या कवितांतून ही दुःखाची जाणीव प्रगट झालेली आहे. 'मातेस' या कवितेत पुढील खेदपूर्ण उद्‌गार काढले आहेत.

" लक्ष्मी तुला त्यजुनि दूर निघोनि गेली
देवी सरस्वतिहि आजच रुष्ट झाली " (– मातेस)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या काळी 'हरहर महादेव' हा मराठ्यांचा मंत्र होता. पण आता, " या मंत्राची जादू सरता सरली पुण्याई 'सकलही', वीरांचे विक्रमही सरले विभव लया जाई " अशी स्थिती झाली असल्याचे दुःख व्यक्त केले आहे. 'विजयोत्सव' या कवितेत पारतंत्र्यात असलेल्या भारताची कशी अन्नान्नदशा झालेली आहे त्याचे चित्र रेखाटले आहे. दुसऱ्या एका कवितेत कवी सांगतो

" संपले दिवस शूरांचे । संग्राम धीर वीरांचे
ते दिवस मुलुखगीरीचे । ते दिवस मराठे मर्दांचे " (–गडि मर्द मराठा वीर)

पारतंत्र्याचे विशेष दुःख कवीने 'पोवाडे' या गीतातून उत्कटपणे व्यक्त केलेले आहे. तो लिहितो";

"गोऱ्यांची सत्ता चाले अधिकारी टोपीवाले
शौर्यास नसे अवकाश हा दीन दरिद्री देश " (– पोवाडे)

स्वातंत्र्याची उत्कट आकांक्षा

देशात अवदसा आल्याने त्याची हीन दशा झाली याची खंत कवीला वाटते. स्वातंत्र्याची आकांक्षा आणि त्या आकांक्षेने प्रेरित होऊन केले जाणारे कर्तव्यच तारक ठरणारे आहे ही जाणीव कवीने अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे. 'स्वातंत्र्यसमर', 'ज्योति,' '!!' दोन उद्गारवाचक चिन्ह असलेली अनामिक कविता' इत्यादी कविता त्या दृष्टीने वाचण्यासारख्या आहेत. 'स्वातंत्र्य समर' या कवितेत कवी म्हणतो, स्वातंत्र्याचे समर म्हणजे मातृभूमीच्या उद्धाराची लढाई आहे.

"हे स्वातंत्र्याचे समर पारतंत्र्याशी
हे देशभक्तिचे निकर देशशत्रूशी
ही स्वत्वाची जुलुमावर धीट चढाई
ही मातृभूमिच्या उद्धारार्थ लढाई" (–स्वातंत्र्यसमर)

दुसऱ्या एका कवितेत छत्रपतीचा हा महाराष्ट्र आहे असा गौरवपूर्ण उल्लेख कुणीतरी करताच लोकांना स्फुरण चढेल आणि

"तेजोभास्कर वीर वृंद जमुनी गाईल उच्च स्वरीं
ते स्वातंत्र्य–पवित्र मंत्र तरि तो पेटेल ज्योति स्वये" (–ज्योति)

केवळ स्वातंत्र्याचा ध्यास धरून चालायचे नाही, त्याकरिता आत्मयज्ञास तरुणांनी सिद्ध झाले पाहिजे असे कवीला वाटते. तो म्हणतो,

"राष्ट्रोद्धारार्थ हिंदी तरुण सजुनिया आत्म यज्ञास आता
कर्तव्याची अपेक्षा करिति परि तया पाहिजे कोण नेता!" (!!)

पूर्ववैभवाचे आणि पराक्रमी परंपरेचे स्मरण

पारतंत्र्याच्या गर्तेतून राष्ट्राला बाहेर काढण्याचे कार्य राष्ट्राचा इतिहास, संस्कृती, परंपरा करीत असते. खचलेल्या राष्ट्रीय मनाला सामर्थ्य देण्याचे, सावरण्याचे आणि पराक्रमाचे स्फुरण देण्याचे कार्य परंपरा करीत असते. श्री. बोबडयांच्या काही ओजस्वी गीतांतून या परंपरेचे व पूर्व-वैभवाचे अतिशय प्रभावी चित्रण आलेले आहे. 'भारतवर्ष गुणगान', 'पंढरी', 'पंजाबी भाई', 'दोन उद्गारवाचक चिन्हे', 'ज्योती', 'गडि मराठे वीर', 'पोवाडे' या कविता त्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. 'कुंकुम' यासारख्या अतिशय परिचित अशा वस्तूत बोबडयांच्या प्रतिभेला आपल्या महान परंपरेचे कसे दर्शन घडते ते बघा!

"आर्य संस्कृति आर्यांची श्रुति स्मृति रहस्य ते
ललाटी गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुम शोभते
एक पत्नीत्व रामाचे सीतेचे शील गौरव
ललाटीं गृहलक्ष्मीच्या शुभ कुंकुम वैभव!" (–कुंकुम)

भारतवर्षाचा भूतकाल कसा वैभवसंपन्न होता हे सांगताना कवी म्हणतो,

"एक काळ तो झाला जेव्हा वैभवगिरि शिखरावरती
निज तेजाने विश्व समस्तहि हिंद प्रकाशित होती" (– भारत वर्ष गुणगान)

मराठ्यांचा पराक्रमाचा अभिमान तर कवीला पराकोटीचा आहे. तो लिहितो, वारूवर स्वार होऊन मराठे मुलुखगिरीवर निघाले म्हणजे,

" सूर्योदय कावेरीचा सूर्यास्त सिंधु तीराचा ।
मराठ्यानंच जंग लढावा । मराठ्यानंच जय मिळवावा "

(–गडिमर्द मराठा वीर)

अशा अनेक उदाहरणे देऊन हा मुद्दा स्पष्ट करण्यासारखा आहे.

हिंदुजातीचा अभिमान– हिंदुजातीचा अथवा आर्यत्वाचा कवीला अत्यंत अभिमान आहे. तो लिहितो,

" जोवरी एक तरि बिंदु हिंदु रक्ताचा
तोवरी सर्वदा हिंद देश हिंदूंचा "

वीर पुरुषांच्या पराक्रमाचे पूजन

वीर पुरुषांच्या पराक्रमाचे पूजन करण्यात, त्यातही मराठ्यांच्या पराक्रमाचे संकीर्तन करण्यात त्यांना अवसान चढते. 'भारतवर्षाचे गुणगान', 'जय जय भारतवर्ष', 'पंजाबी भाई'; 'हरहर महादेव'; 'गडि मर्द मराठा वीर'; 'संदेश' या कविता नुसत्या वाचल्या तरी वरील विधानाचा प्रत्यय येईल. ऐतिहासिक राष्ट्रपुरुष म्हणून शिवाजी महाराजांचा उल्लेख अनेक गीतांतून आलेला आहे. गदर पार्टीच्या पंजाबी क्रांतिकारकांनी राष्ट्राकरिता केलेले बलिदान 'पंजाबी भाई' या कवितेतून बोवडघांनी कथन केलेले आहे. ते लिहितात,

" प्राणांच्या आहुति देऊनी समर पेटविले
जय बोला जय स्वतंत्रतेचे सुवर्णयुग आलें "

ही संपूर्ण कविता मुळातून वाचण्यासारखी आहे. शेवटी कवी आपल्या पंजाबी भाईंना आश्वासन देतो.

" महाराष्ट्र पंजाब ठाकिता ठोकुनि दंड रणी
कृतांत काळा खेचुनि आणू शरणसहज चरणी !"

'हरहर महादेव' या महामंत्राचा उद्गाता समर्थ रामदास आणि त्या हाकेने गर्जणारा वीर शिवाजी याचे स्मरण 'हरहर महादेव' या गीतात आहे.

आधुनिक काळातील एकच एक वीर पुरुष कवी बोवडघांच्या पुढे आलेला असून तो महाकवीच्या स्वरूपात त्यांना दिसला आहे. स्वा. सावरकरांनी लिहिलेल्या 'कमला' काव्याचे कौतुक करण्यासाठी लिहिलेली अप्रतिम कविता ही देखील वीर विभूतिपूजनाचा आणि सौंदर्यपूजनाचा एक आदर्श नमुना आहे. कवी म्हणतो,

" श्लोकात कालिदासाच्या उपमाच जशी दिसे
नव्या मराठी काव्यात 'कमला' काव्य हे तसे
भुयारात तुरुंगाच्या बैसुनिया सख्या ! तिथे
तुज जीवंत काव्याची रसरम्य अशी फुले
सुवासमत्त पाहुनी निर्मिता, मन हे भुले "

पुढे कवी म्हणतो, " कालेच ना गुणेही जो ठरे आद्यकवी महा
कवीत महाराष्ट्राचा आज त्या सम अन्य हा !"

('कमला' – ज्याचे त्याला निवेदन)

समकालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब

श्री. आनंदराव टेकाडयांइतके नसले तरी बऱ्याच प्रमाणात समकालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब कवी बोबडयांच्या राष्ट्रीय कवितेत यथार्थपणे पडलेले आहे. आताच ज्या दोन कवितांचा उल्लेख केला त्या 'पंजाबी भाई' आणि 'ज्याचे त्याला निवेदन' या दोन्ही कविता तत्कालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब प्रकट करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. परंतु या कवितांपेक्षाही 'विजयोत्सव' ही त्यांची कविता गाजलेली आहे. पहिल्या महायुद्धात विजयी होताच इंग्लंडने हिंदुस्थानातही विजयोत्सव साजरा केला त्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कविता खूपच बोलकी आणि स्फोटक आहे. देशातली माणसे अर्धपोटी, उपाशी अन्नाशिवाय तडफडून मरत आहेत.

"पोटास लागति कळा अमुच्या भुकेने। हे नाच रंग तुमचे विजयोत्सवाने ..."

पारतंत्र्यातील गांधीजींच्या नेतृत्वाखालील सत्य, अहिंसा, शांती, असहकार, सत्याग्रह लढ्याचे; ठरावाचे, शिष्टाईचे, मागण्यांचे, राजकारण व धोरण कवीला मान्य नाही. या सर्व चळवळीत कवीला पौरुषाचा, शौर्याचा कुठेच आढळ होत नाही. 'पोवाडे' या सुप्रसिद्ध कवितेतून त्यांनी तत्कालीन राजकीय परिस्थितीचे चित्रण केलेले आहे. तो विचारतो,

"लोपले शौर्य वीरांचे पोवाडे गावे कवनाचे ?"

तत्कालीन राजकीय सामाजिक स्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो,

"हे दिवस पूर्ण सौख्याचे हे दिवस आरामाचे
हे दिवस लेखणीचे स्वराज्य भीक मागायाचे
हे दिवस वक्तृत्वाचे ठराव पास करण्याचे
यांच्यावर गाऊनि गाणी। शिणवु का वाणी ?
भूमीला भार पोवाडे गावे कोणावर ?" (– पोवाडे)

कवीला या काळात जिकडे तिकडे स्वार्थ बोकाळलेला दिसतो. विकणे व विकत घेणे हेच या काळाचे लक्षण दिसते. म्हणून आनंदराव टेकाडयांप्रमाणेच बोबडे म्हणतात,

"स्वार्थ परायण वैश्यवृत्तिच्या प्रचंड कलहात
अनमोलाच्या मोलाची परि बोलू नको मात"

राष्ट्रीय आशावादाचे दर्शन

या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही कवीचा आशावाद कायम आहे. त्यांच्या या आशावादाला तांब्यांप्रमाणेच ईश्वरी श्रद्धेचे भक्कम अधिष्ठान आहे. अनेक कवितांमधून त्यांच्या अंतःकरणातील राष्ट्रीय आशावाद प्रगट झालेला असून भारताचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे भाकित त्यांनी केलेले आहे. स्वार्थ, मत्सर, द्वेष यांना चिकटून बसणाऱ्यांना काही भविष्य आहे ? त्यावर कवी म्हणतो,

"गेली, ज्योति विझूनिया तरि पुनः पेटेल ती आतुनी
मंत्राचा सगळा प्रभाव, परि हा ! नाहीत होते कुणी !" (– ज्योति)

दुसऱ्या एका गीतात कवी सांगतो,

"निद्रेची रजनी सरली
आशेने वृत्ती भरली
होईल उदय निमिषात। हे चंडोलाचे गीत"

टीकाकारांचा दृष्टिकोन– बोबडयांच्या पहिल्या आवृत्तीचे प्रस्तावना– लेखक कवी अनिल त्यांच्या राष्ट्रीय कवितांसंबंधी लिहितात, " बोबडे यांच्या राष्ट्रीय कविता वीररसपूर्ण आणि जोमदार तितक्याच समतोलही आहेत." [१११] प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " उपाध्ये, बोबडे या नागपूरच्या कविमित्रांची कविता संख्येने अल्प आहे पण गुणाने महान आहे. या दोघांनीही शृंगार, वीर व हास्य या तीन रसांनी युक्त असलेली कविता लिहिली आहे." [१] प्रा. पंडितांनी बोबडयांच्या साम्राज्य विजयोत्सव या एका कवितेचा त्वेषपूर्ण कविता असा उल्लेख केला आहे...

बोबडयांच्या कवितेच्या दुसऱ्या आवृत्तीचे संपादक श्री. दि. वा. फडणवीस म्हणतात की; " सशस्त्र क्रांतीशिवाय भारत स्वतंत्र होऊ शकणार नाही या गोष्टीवर बोबडयांचा ठाम विश्वास होता. परंतु बोबडयांना अभिप्रेत असलेले वीरांचे, राजपुरुषांचे जग नष्ट झाले होते. जुन्या जगाला कवटाळून असलेल्या बोबडयांना त्या नव्या जगाशी सुसंवाद साधता येत नव्हता... बोबडे स्थितिवादी होते... त्यांचा बदलाला विरोध होता... जुने जग पुन्हा येईल म्हणून डोळे लावून बसलेले बोबडे शेवटी निराश होऊन वैय्यर्थ्याच्या भूमिकेवर आले... धिग् मानवा व्यर्थ ताठा तुझा म्हणून मानवालाच धिक्कारू लागले."[११३]

समारोप

बोबडयांच्या काव्यगुणांसंबंधी सर्वच टीकाकारांनी अनुकूल अभिप्राय दिला असून त्यांच्या प्रतिभागुणांची स्तुती केली आहे. " सरस, सुंदर, समर्पक, सुसंस्कृत आणि कलापूर्ण शब्द, कला आणि प्रसादयुक्त प्रसन्नता "[११४] असे बोबडयांच्या काव्यगुणांचे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी वर्णन केलेले असून त्यांचा अभिजातपणा सिद्ध करणारे आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितांबाबतीत दिलेले अभिप्राय जुजबी स्वरूपाचे आहेत. बोबडयांनी भक्तिरसपूर्ण कविताही लिहिलेली आहे हे विसरता येत नाही बोबडे स्थितिवादी म्हणून निराशावादी हे समीकरणही बरोबर नाही. श्री. दि. वा. फडणीसांनी दिलेले उदाहरण निराशावादाचे नाही तर वेदान्ती मताचे आहे. बोबडे हे तत्त्वनिष्ठ असे प्रवृत्तीपर वेदांती होते. केवळ सुखवादी नव्हते. प्रपंचवादाची शिकवण देणारे समर्थ रामदास, " मनां पाहतां सत्य हे मृत्युभूमी । जिता बोलती सर्वही जीव मी मी । "[११५] असे सांगतात. बोबडयांनी तसेच वास्तववादी उद्‌गार काढलेले आहेत. खऱ्या अर्थाने बोबडे हे अभिजातवादी राष्ट्रकवी आहेत हे केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होणारे आहे.

गायक राष्ट्रकवी आनंदराव टेकाडे (१८९०–१९६४)

प्रास्ताविक

जुन्या मध्यप्रदेश वऱ्हाडात गायक राष्ट्रकवी म्हणून गाजलेले आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांनाही राष्ट्रकवी ना. के. बेहरे यांच्याप्रमाणेच कलावादी टीकाकारांनी उपेक्षेने वागविले असे खेदाने म्हणावे लागते. आपल्या हजारो श्रोत्यांना देशभक्तीपर गीतांनी अक्षरशः डोलावयास लावणारे राष्ट्रीय कवी म्हणून त्यांचा लौकिक होता पण वाङ्मयेतिहासकारांनी आणि कलावादी समीक्षकांनी त्यांची पाहिजे तेवढी दखल घेतली नाही. विपुल काव्यनिर्मिती आणि लोकप्रियता या दोन्ही वैशिष्ट्यांनी संपन्न असणाऱ्या या कवीसंबंधी टीकाकारांनी फारसे अनुकूल असे लिहिताच आले नाही.

वास्तविक राष्ट्रीय विचारांचा, चळवळींचा आणि भावनांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे लोकरंजनाबरोबर लोकजागृती आणि लोकशिक्षण देण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य परकीय सत्तेचे

द डपण असतानाही या कवीने निर्भय आणि निर्भीडपणे केलेले आहे. परंतु प्रासंगिक, प्रचारकी, सवंग अशी शेलकी विशेषणे लावून टीकाकारांनी सर्वसामान्य वाचकांची आणि रसिकांची दिशाभूल केलेली आ हे असे खेदाने म्हणावे लागते. पाश्चात्य व संस्कृत वाङमयाचे अभ्यासक आणि रसिक आस्वादक माननीय लोकनायक मा. श्री. अणे यांच्यासारख्या विद्वानाने "आनंदरावांनी स्वातंत्र्यप्रेमाने गायिलेली गीते ही वाचकांवर परिणाम करणारी अशीच आहेत."[११६] असा निःसंदिग्ध अभिप्राय दिलेला आहे.

उत्स्फूर्त राष्ट्रीय गीते रचणारा आणि खणखणीत सुरात गाणारा कवी

राष्ट्रकवी टेकाडे यांनी सुमारे १९१० च्या आसपास काव्यरचना करण्यास सुरुवात केली १९०५ ते १९२०, २२ हा कालखंड म्हणजे भारतातील राष्ट्रीय चळवळींचा कालखंड असल्याचे या कालखंडाच्या प्रास्ताविकात आहेच. लोकमान्य टिळकांच्या राजकीय चळवळीचे एक केन्द्र नागपूरही होते. सुरत काँग्रेस गाजविण्यात नागपूरकरांचा मोठा वाटा होता. त्यामुळे नागपुरात राष्ट्रीय जागृती फार मोठ्या प्रमाणात झालेली होती. लोकमान्यांचे उजवे हात असणारे श्री. दादासाहेब खापर्डे या विदर्भाचेच. लोकमान्यांचे अनुयायी असणारे तपस्वी बाबासाहेब परांजपे, डॉ. बा. शि. मुंजे आणि बॅ. नरकेसरी अभ्यंकर, लोकनायक अणे हे नागपूर विदर्भातलेच.

आनंदगीत भाग १ ते ४ या चारही भागांत राष्ट्रकवी टेकाडयांच्या राष्ट्रीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुमारे एकशे दहा (११०) कविता आलेल्या आहेत. उत्स्फूर्तता आणि राष्ट्रीय भावनेची उत्कटता असल्याशिवाय इतक्या विपुल प्रमाणावर काव्यनिर्मिती होणेच शक्य नाही. याच कालखंडातील स्वा. सावरकर, कवी गोविंद, कवी ना. के. बेहरे यांचा अपवाद करता इतकी विपुल राष्ट्रीय कविता संपूर्ण महाराष्ट्रात कोणत्याही कवीने लिहिलेली आढळत नाही.

पहिल्या महायुद्धाच्या काळात उदयास आलेल्या कवींत अग्रपूजेचा मान

आधुनिक मराठी कवितेचे अभ्यासक आणि रसोद्ग्राही टीकाकार म्हणून विख्यात असलेले ग. त्र्यं. माडखोलकर यांनी राष्ट्रकवी टेकाडे यांच्या कालखंडासंबंधी आणि त्यांच्या काव्यकर्तृत्वासंबंधी मोठा मार्मिक अभिप्राय दिलेला असून राष्ट्रीय कवितेच्या विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने उद्धृत करावासा वाटतो. ते लिहितात, " टेकाडे यांच्या स्फूर्तीचा उगम लोकमान्य टिळक यांच्या स्वराज्याच्या चळवळीत होता. अर्थात ही कविता तत्कालीन चळवळीचा एका परीने काव्यमय प्रतिध्वनीच असून तिच्यात पूर्ववैभवाची स्मृती, प्रचलित राजकीय कल्पना आणि त्या चळवळीच्या प्रवर्तकाविषयीचा आदर यांच्या छटांची सरमिसळ झालेली होती."[११७]

राष्ट्रकवी म्हणून पुढे आलेले तिवारी, टेकाडे, बेहरे, बोबडे, उपाध्ये, माधव, अनंततनय, राधारमण, साधुदास, अज्ञातवासी, गोविंद पौत्र, वीर वामनराव जोशी, ग. त्र्यं. माडखोलकर हे सर्व कवी या वातावरणातच तयार झालेले होते. 'बी', 'तांबे', 'माधवानुज' यांच्यावरही या वातावरणाचा प्रभाव पडलेला होता.

स्वतंत्र प्रबंधाचा विषय होण्याची योग्यता असलेला कवी

राष्ट्रकवी टेकाडे यांचा विपुल आणि विविध काव्यसंभार लक्षात घेतला म्हणजे माझ्यासारख्या अभ्यासकाला त्याचे भव्यत्व जाणवल्याशिवाय राहत नाही. राष्ट्रभक्ती हा जसा त्यांच्या कवितेचा विषय आहे तसाच राधाकृष्णभक्ती त्यांच्या कवितेचा विषय आहे. त्यांची देशभक्ती जितकी उत्कट होती तितकीच त्यांची राधाकृष्णभक्तीही उत्कट होती.

कवीची राष्ट्रीय भूमिका

राष्ट्रकवी टेकाडे यांनी आपली राष्ट्रीय भूमिका अनेक कवितांमधून मांडलेली आहे. त्यांच्या भूमिकेच्या दृष्टीने 'माझी कविता'; 'कवीचा संदेश'; 'प्रबोधन', 'आत्मकथन'; 'आनंदाचे साम्राज्य'; 'स्फूर्ती' आणि 'अभिनंदन' इत्यादी कविता लक्षात घेण्यासारख्या आहेत. 'कवीचा संदेश' या कवितेत आपल्या तत्त्वनिष्ठेचा परिचय दिला आहे. तत्त्वनिष्ठ मनुष्यच वंदनीय ठरतो. व्यक्तीला फारशी किंमत नसते हे सांगताना,

" तत्त्वाचा वन्दा जीव । मूर्तीला कोण विचारी
तत्त्वावर निष्ठा नाही तो मनुज म्हणावा कैचा ?"

स्वत:च्या काव्यासंबंधी कवी म्हणतात,

" ही मर्दपणाची गाणी । परिसावी शूर मर्दांनी
शाहीर मर्द ही वाणी । बोलती कंठ नादांनी–" (– कवीचा संदेश)

'आत्मकथन' या कवितेत आपल्या काव्यप्रेरणेचे रहस्य कथन केलेले आहे. ते लिहितात,

" ग्रासी घोर भयाण दास्य रजनी विक्राळ जै भारता,
जै त्या मुक्त करावयास प्रकटे बालार्क तेजस्विता,
बालत्वी जइ अंतरे –अ– समयी श्री शारदा मंदिर
घेई जन्म तई फणीन्द्र पुरि हा आनंद – गीत स्वर !" (– आत्मकथन)

परमेश्वरावर कवीची नितांत श्रद्धा आहे. कारण;

" अधिष्ठान जगदीशाचे – साधु विचारात
अधिष्ठान जगदीशाचे – लोक रंजनात
अधिष्ठान जगदीशाचे – ' देश चिंतनात " (–देशभक्ताचे आगमन)

या व्यापक भूमिकेतून त्यांनी काव्यनिर्मिती केली आहे.

देशभक्तीची उत्कट भावना

देशभक्ती हा कवी टेकाडे यांच्या राष्ट्रीय कवितेचा स्थायीभाव आहे. या देशभक्तीच्या भावनेतूनच त्यांच्या राष्ट्रीय कवितांचा जन्म झालेला आहे. 'आनंद कंद ऐसा हा हिन्द देश माझा' हे सुप्रसिद्ध गीत त्यांच्या उत्कट देशभक्तीचेच प्रतीक आहे. या भारतभूमीबद्दल कवीला असलेला पराकोटीचा अभिमानही याच गीतातून प्रकर्षाने प्रकट झालेला आहे. जन्मभूमी, पितृभूमी, पुण्यभूमी अशा स्वरूपात मातृभूमीचे दर्शन झालेले आहे. पृथ्वीराज; महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी, लो. टिळक; यांच्यासारख्या स्वातंत्र्यवीरांना याच भूमीने जन्माला घातले आहे. म्हणूनच शेवटी कवी म्हणतो;

" जगी या विना कुणीही । स्मरणीय अन्य नाही
थोरात थोर समजा । हा हिन्द देश माझा !"

(– हा हिन्द देश माझा)

अशाच भारतासंबंधीच्या उत्कट भावना वेगळ्या वेगळ्या संदर्भात कवीने अनेक गीतांतून व्यक्त केलेल्या आहेत. कधी 'हिन्द भूमीचे सौभाग्य' वर्णिले आहे, तर कधी 'हिन्द भूमीचे ध्येय' कथन केलेले आहे. कधी तिला विनम्र भावे वंदन केलेले आहे, कधी स्वतंत्र भारताचे भव्योदात्त चित्र

रेखाटलेले आहे. त्या दृष्टीने ' भारत भूमिवंदन '; ' नवभारतास ', ' आमचा देश ', ' स्वतंत्र भारत ' या कविता अतिशय प्रभावी अशा उतरल्या आहेत. ब्रिटीश राज्यकर्त्यांची ' फोडा आणि झोडा 'अशीच नीती असल्याने भारत हा एक बहुराष्ट्रीय असा खंडप्राय देश आहे. पंथ, धर्म, प्रदेश, भाषा, जाती; इतिहास या सर्वांत भिन्नता आहे असे सांगून ऐक्य नष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आर्य–अनार्य; स्पृश्य अस्पृश्य, ब्राह्मण–ब्राह्मणेतर हे वाद त्यातूनच उदयाला आले. कवी ' हिन्द भूमीचे ध्येय ' या कवितेत म्हणतो;

" जरि अठरा धान्ये असली। एक जीव त्यांचा होई
वंचना आपली अशि ही। करू नये राज्यकर्त्यां ही।"

(– हिन्द भूमीचे ध्येय)

भारताच्या वैभवाचे वर्णन करताना कवी म्हणतात,

" करि खडा पहारा रात्रंदिन हिमधर
कर जोडुनि किंकर आज्ञांकित सागर " (– नव–भारतास)

' नवा हिन्द ' या कवितेत ते सांगतात, जगाने विकल्प सोडून नव्या भारताकडे नव्या दृष्टीने बघावे. कारण

" अंतर्बाह्यी गतकालाचा हिन्द नसे – आजला,
तयाचा पुनर्जन्म जाहला !"
" स्वातंत्र्याचे निशाण त्याने उभारिलेले दिसे–
जगा ! मग उमज सत्य हे कसे !"

भारतासारखीच महाराष्ट्राचीही उत्कट भक्ती कवीच्या ठिकाणी आहे. किंबहुना ती तुल्यबल अशीच आहे. त्या दृष्टीने ' धन्य महाराष्ट्र ', ' माझा महाराष्ट्र ' या कविता अतिशय प्रभावी उतरल्या आहेत. ' माझा महाराष्ट्र ' या गीतातील कवीचा अभिमान तर अतिरेकाला गेला आहे. जगात आम्ही कुणाचे नाही. आमचेही कुणी नाही इतकी ऐकांतिक अशी महाराष्ट्रनिष्ठा आहे. कवी म्हणतो;

" हा गडी मराठा महाराष्ट्रीचा मराठीच राहो " (– माझा महाराष्ट्र)

दुसऱ्या एका गीतात 'मराठमोळा' शब्द कानावर पडताच आपुलकी, आनंद, अभिमान आणि चैतन्याने अंतःकरण फुलून येते, बाहू स्फुरण पावतात, कारण

" महाराष्ट्र शिवबाचा ! हा महाराष्ट्र भाऊचा ! हा महाराष्ट्र टिळकाचा "

(– मराठमोळा)

असे तत्काळ जाणवते. दुसऱ्या एका कवितेत

" ही भूमि महाराष्ट्राची। खनि शूर मर्दांची। सर्वत्र ख्याति ही साची
ही परंपरा साजरी। राही अजवरी। उज्ज्वला भारी "

(– आजच्या महाराष्ट्रास)

पारतंत्र्याची दुःखद जाणीव

कवी टेकाडयांची राष्ट्रभक्ती जितक्या उत्कटतेने प्रकट झालेली तितक्याच उत्कटतेने राष्ट्र पारतंत्र्यात असल्याची दुःखद जाणीवही प्रकर्षाने प्रकट झालेली आहे. या जाणिवेच्याही भिन्न भिन्न छटा त्यांच्या काव्यातून दिसून येतात. ' अक्षम्यपाप ', ' आत्मकल्याण ', ' बन्दिवान तलवार '; ' तल-

वारीचे गीत', 'दुर्दैवी–स्वातंत्र्य', 'स्मृति पिशाचिनी', 'सीमोल्लंघन', 'भ्रमिष्ठ आत्मा', 'देश-द्रोही', 'बंडखोर', 'असे का ?', 'नवस', 'भिकारीण', 'राघो भरारी', 'महाराष्ट्रा तुझी सत्यकथा', 'हिंदभूमीचे सौभाग्य', इत्यादी कवितांतून पारतंत्र्याची खंत व्यक्त झालेली आहे. आज आपण जसे पारतंत्र्यात आहोत तसेच एका काळी शिवाजी महाराजही होते परंतु त्यांनी स्वतःच्या प्रयत्नाने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली असे ..... 'आत्मकल्याण' या कवितेत सांगितले आहे. जो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अपहार करतो त्याला शेवटी नष्ट व्हावे लागते कारण असा स्वातंत्र्य–अपहार करणे हे 'अक्षम्य पाप' आहे. 'स्वातंत्र्य हराया जाई। तोची नामशेष होई"

"आधिच मानव जन्मापासुनि सृष्टि–नियम बंधनी राही
जीवन स्वातंत्र्याते हरणे दुजे पाप जगि नाही" (– अक्षम्य पाप)

हे पाप भारताच्या स्वातंत्र्याचा अपहार करून इंग्रजांनी केले असे कवीला वाटते. पारतंत्र्याने मानवाच्या सर्व सद्गुणांची माती होते हे सांगताना कवी म्हणतो,

"किती पारतंत्र्य कष्टाचे। भूवरी। किती पारतंत्र्य दुःखाचे भूवरी।
किती पारतंत्र्य हालाचे। भूवरी।" (– असे का –)

स्वातंत्र्याचा ध्यास

पारतंत्र्याच्या या जाणिवेमुळेच कवीला स्वातंत्र्याचा ध्यास लागला. त्याची स्वातंत्र्याची आकांक्षा अधिक बलवत्तर झाली. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्यास सिद्ध झाले पाहिजे. स्वातंत्र्य ही दुर्मिळ वस्तू आहे. त्यागाशिवाय, कष्टशिवाय तिची प्राप्ती होणे अशक्य आहे, असे कवीने वारंवार सूचित केलेले आहे. 'भारतास सन्देश', 'हिंदभूमीचे ध्येय', 'आजच्या महाराष्ट्रास', 'डंका'; 'नवस'; 'नवभारतास', 'पुढचे पाऊल', 'स्वातंत्र्यगीत', 'प्रबोधन'; 'आम्ही', 'भारत भूमि-वंदन' या कवितांतून हा स्वातंत्र्याचा ध्यास उत्कटत्वाने प्रगट झालेला आहे. त्यातही 'भारतास संदेश'; 'प्रबोधन', 'पुढचे पाऊल', 'स्वातंत्र्य गीत', या राष्ट्रीय गीतांमधून तो ध्यास विशेषत्वाने प्रगट झालेला आहे. स्वातंत्र्याच्या निशाणासंबंधी कवी सांगतो,

"हे निशाण स्वातंत्र्याचे। हे निशाण रणमर्दाचे।
हे निशाण नव तेजाचे। ठाकले जिथे एकदा। जीव संपदा।
तेथली होई। मग कुणी कुणाचा नाही।" (– निशाण)

मराठी माणसाला पारतंत्र्यात राहणे अशक्य होते. त्याचे तेजस्वी अंतःकरण पेटून उठते.

"सावळा मावळा गडी। फेकितो कुडी। म्हणा तिज उडी
स्वातंत्र्य समर कुंडात। दरकार कशाची मुळी ठेविना। आपुल्या हृदयात।"
(– गडी मावळा)

दुसऱ्या एका कवितेत भारताला जागृत व्हायला कवी सांगत आहे. कवितेची सुरुवातच "भारता ! ऊठ रे ऊठ ! झोपशी असा किती काळ !" या ध्रुवपदाने झाली आहे.

पूर्वज स्मृती आणि पूर्ववैभवाचे स्मरण

श्री. टेकाडे यांच्या 'भगवा झेंडा', 'गडी मावळे', 'पूर्वस्मृति', 'भारत भूमीचे दुर्दैव'; 'आर्यांची शांति', 'निशाण', 'धन्य महाराष्ट्र', 'राज्याभिषेक'; 'जन्मोत्सव'; 'स्वातंत्र्याचे निशाण'; 'स्मृति पिशाचिनी', 'आजचा महाराष्ट्र', 'लाकडी तलवार' या विविध गीतांतून

भारताच्या पूर्ववैभवाचे आणि पूर्वजांच्या भव्य दिव्य स्मृतीचे दर्शन कवीने घडविले आहे. या पूर्वज-स्मृतीमागे, पूर्व वैभवाच्या स्मरणामागे, परंपरेच्या गौरवामागे ते गमावल्याची एक दुःखद जाणीव आहे. एका गीतात कवी सांगतो,

" तुम्हीच का मराठे वीर । काळासि जाति सामोर
उपजविति शत्रुला घोर, सांगतो पुन्हा आठवा ।
पूर्व वैभवा । आजच्या काली । मति दिसे भ्रष्टुनी गेली ।"
(– आजचा महाराष्ट्र)

लोकजागृतीनेच देशाचा उद्धार होईल हे सांगताना कवी म्हणतो,

" गत विभव–स्मृति स्मरणी ती । जीवना बुडवी जलडोही
..... जागृतीच तव यापुढती । मनिषेची पूर्ति करील !" (– प्रबोधन)

राष्ट्रपुरुषाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण आणि पूजन

राष्ट्रपुरुषांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण आणि पूजन हा कवी टेकाडयांच्या कवितेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. या राष्ट्रपुरुषांत ऐतिहासिक आणि अर्वाचीन कालखंडातील स्त्री–पुरुषांचा समावेश आहे. ऐतिहासिक राष्ट्रपुरुषांत छत्रपती शिवाजी महाराजांना अग्रस्थान असून आधुनिकांत लोकमान्यांना महत्त्वाचे स्थान कवीने दिलेले आहे. ' तारिले महाराष्ट्राला ', 'जन्मोत्सव'; ' राज्याभिषेक ', ' बालशिवाजी '; ' धन्य महाराष्ट्र ' या गीतांतून शिवप्रभूचे कृतज्ञतापूर्वक स्तवन केलेले आहे. शिवाजी महाराजांबरोबरच त्यांचे गुरू दादोजी कोंडदेव, ' म्हातारी ' या शीर्षकाचे रामदासस्वामीवरील गीत, ' हा कोण ?' मधील नरवीर तानाजी आणि ' धन्य महाराष्ट्र गडी मावळे ' यातून पेशवे घराण्यातील वीर पुरुषांचे पूजन आहे. पौराणिक काळातील राष्ट्रपुरुषांत भगवान श्रीराम, भगवान श्रीकृष्ण आणि वीरतनय ' अभिमन्यू ' यांचे चरित्र टेकाडयांनी गायिले आहे. ' वीरतनय ' ही वीर अभिमन्यूच्या जीवनचरित्रावर असलेली कविता तर मध्यप्रदेश वन्हाडातील पाठ्यपुस्तकांत समाविष्ट करण्यात आलेली होती आणि बालांच्या ठिकाणी वीरवृत्ती निर्माण करण्याचे कार्य या कवितेने केलेले आहे.

' लोकमान्य टिळक ' हे कवी टेकाडयांचे आधुनिक दैवत आहे. ' हिन्दभूमीच्या तिलका, तुझ्या परि तूंच !' ' जयोऽस्तु तिलकस्य ', ' तिलकस्मृती '; ' पुढचे पाऊल ' या कवितांतून टिळकांचे गुणानुकीर्तन आलेले आहे. ' हिन्द भूमीचा आत्मा म्हणूनी बोलती वचनाला ', हे ' तुझ्यापरि तूच ' या गीतांतील लोकमान्यांसंबंधी काढलेले उद्‌गार, किंवा,

" नरवीरा मांगल्य निधाना । काय तुला द्यावे
तुज वरुनी ब्रह्मांड गमे हे ओवाळून टाकावे ।।"

हे ' हिन्द भूमीच्या तिलका !' या गीतांतील उद्‌गार टिळकांबद्दलचा अतीव आदर व्यक्त करणारे आहेत. वीर विभूतिपूजनाची आपली भूमिका मांडताना शिवाजी महाराजांच्या त्रिशत सांवत्सरिक जयंतीच्या उत्सवप्रसंगी लिहिलेल्या ' जन्मोत्सव ' या गीतात कवी म्हणतो,

" असेल जेथे दिसेल तेथे तेज पौरुषाचे
सहज धर्म हा तेथे रमणे काया मन वाचे ।।" (– जन्मोत्सव)

पृथ्वीराज सिंह, शिवाजी, लोकमान्य टिळक या स्वातंत्र्यवीरांप्रमाणेच राष्ट्रकवी टेकाडयांनी महात्मा गांधींचाही राष्ट्रपुरुष म्हणून उल्लेख केलेला आहे. 'फकीर'; 'सूर्यास्त'; 'अद्भुत-रणसंग्राम' या कवितांमधून गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

" या हिन्दभूमिच्या पोटी । हा येई कोण फकीर ?"

असा कुतूहलजनक प्रश्न विचारून दुसऱ्या एका कवितेत,

" हा प्राण हिंदभूमीचा । जयघोष स्वातंत्र्याचा ।
मुखे करीत चालला साचा । स्वातंत्र्य दुर्ग घ्यावया "

पुढे 'हे रण बहुनवलाचे' असे सांगून " कसले न शस्त्र त्या जवळी । दुर्मती न ठावि मुळी
समभाव चित्त त्या जवळी । आत्म्याचे बल एकले, हृदयी पूजिले "

असे वर्णन केलेले आहे. या महापुरुषांशिवाय 'स्वातंत्र्याचे निशाण' या प्रदीर्घ गीतातस्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या अनेक देशभक्तांना अभिवादन केलेले आहे. 'वीरवामन'; 'आरसा'; 'अमरशुक' ही गीते अनुक्रमे वीर वामनराव जोशी, बॅ. नरकेसरी अभ्यंकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक आद्य सरसंघचालक डॉ. केशवराव हेडगेवार यांच्यावर रचलेली आहेत.

टेकाडयांच्या विलापिका

या वीर विभूतिपूजनातच त्यांनी लिहिलेल्या देशभक्त जितेंद्रदास यांच्यावरील 'देवपणा'; भारतसेवक गोखल्यांच्या निधन प्रसंगावर लिहिलेली 'राष्ट्र पुरुषांचा स्वर्गवास'; 'देशबंधू चित्तरंजनदास यांचा स्वर्गवास', लोकमान्य टिळकांच्या निधनावर लिहिलेली 'अमर व्हा !' या सर्व विलापिकांचा समावेश केला पाहिजे. राष्ट्रकवी तिवारी यांच्याप्रमाणेच कवी टेकाडयांनी वीर विभूतिपूजनात अपूर्व उत्साह दाखविला आहे.

प्रचलित राजकीय कल्पनांचे प्रतिबिंब

कवी टेकाडयांच्या काळातील प्रचलित राजकीय कल्पनांचे स्वच्छ प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून आढळते. टेकाडयांच्या अनेक राष्ट्रीय कवितांचा अर्थ त्या त्या कवितांची पार्श्वभूमी माहीत असल्याशिवाय लागत नाही अशी काही टीकाकारांची त्यांच्यासंबंधी तक्रार आहे. परंतु पार्श्वभूमी माहीत नसली तरीही कवितेला एक सार्वकालिक अशी पार्श्वभूमी असल्याचा काही कवितांतून प्रत्यय येतो. उदाहरणार्थ, १९२० च्या नागपूर काँग्रेसच्या अधिवेशनासाठी लिहिलेले व अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी स्वत: टेकाडयांनी गायिलेले 'राष्ट्रगंगेचे हे गीत'– एक राष्ट्रीय गीत ठरले.

" हे राष्ट्र रूपिणी गंगे । घेई नमस्कार माझा ", अशी त्याची सुरुवात आहे.
" स्वतंत्रतेची मूर्ति त्रिभुवनि म्हणूनि तुझी कीर्ती
घ्यानि आण सामर्थ्य आपुले, स्वयंप्रकाशिनि गंगे
स्वातंत्र्य मिळविण्या समर्थ तुझी तूंच अभंगे !"

यातील राष्ट्रीय भावना समजावून घेण्यासाठी पार्श्वभूमीची आवश्यकता पडत नाही. 'अक्षम्य पाप'; 'आत्मकल्याण', 'देशभक्ताचे आगमन', 'संग्राम', 'सूर्यास्त', 'पुढचे पाऊल', 'आरसा'; 'तो कोण', 'बंडखोर', 'देशद्रोही', 'शिलेदार', 'कलदार' या अशाच कविता आहेत. 'सूर्यास्ता'चे रूपक ब्रिटीश साम्राज्याचा अस्त सूचित करणारे आहे. देशद्रोही ब्रिटीश सरकारचे

गृह मंत्रिपद स्वीकारणाऱ्या संधिसाधू नेत्याचा धिःकार आहे. एक वर्षात स्वराज्य ही महात्म्याची प्रतिज्ञा खोटी ठरली आहे. 'डंका' या कवितेत

"इच्छिले पूर्ण होणार।
ठाकला हात सामोर। डंक्यास थाप देणार।
इतक्यात बीज कडकडूनी। डंकाच फुटोनी जावा!"

असे पर्यायाने सूचित केले आहे. टिळकसूर्याचा अकाली अस्त झाल्यावर गांधीजींच्या रूपाने चंद्रोदय झाला असे कवीला वाटले. कवी म्हणतो,

"हा अता घडीने जरा। तिमिर पंजरा। खचित भेदील...
असताच वदनी हे बोल। काय हे नवल घडे नवलाचे" (– तो कोण?)

भावी स्वातंत्र्यासंबंधीचा आशावाद

टेकाडे तांब्यांसारखेच आस्तिक आहेत. त्यांना दैवीशक्तीचे साहाय्य होणार असा विश्वास आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेतून राष्ट्रीय आशावादाचे प्रेरक स्वर उमटले आहेत. 'प्रबोधन'; 'स्वातंत्र्याचे निशाण'; 'नवा हिन्द', 'राष्ट्र गंगेस', 'संजीवन', 'अमर व्हा' इत्यादी गीते उदाहरण म्हणून सांगता येतील. शिवछत्रपतीसारखा पराक्रमी नेता उदयाला येईल आणि

"त्याच गतीने पारतंत्र्य – तम विनाश होईल।
स्वातंत्र्याचा मांगल्याचा शुभ दिन येईल" (– जन्मोत्सव)

असा आशावाद व्यक्त झाला आहे.

टीकाकारांचे अभिप्राय

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "राधा–कृष्णप्रेमाप्रमाणेच देशकारण आणि पूर्वेतिहासाचा अभिमान हेच विषय वरचेवर आळविलेले आहेत..."[११८] प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, "आनंदरावांच्या कवितेत देशकारण, पूर्वेतिहासाचा अभिमान व राधाकृष्णप्रेम या तीनच विषयांची पुन्हा पुन्हा उजळणी झाली आहे. तिचे वळणही जुने आहे."[११९] प्रा. भ. श्री. पंडित, बहुजन समाजात टेकाडयांच्या कवितेला मान्यता मिळाली असे गौरवाने सांगतात.

समारोप

पहिले दोन अभिप्राय सारखे आहेत. त्यांच्या कवितेत देशकारण आहे एवढे त्यांना मान्य आहे. डॉ. वा. भा. पाठकांनी मात्र "लोकांच्या विचारसागराला राष्ट्रीय प्रेमाची चांगलीच भरती आणली"[१२०] असा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. हे सर्व अभिप्राय लक्षात घेऊनच मी सुरुवातीलाच टेकाडयांना उपेक्षित म्हणून उल्लेखिले आहे. टीकेची व्यक्तिसापेक्षता लक्षात घेऊनही टेकाडयांना टीकाकारांनी योग्य तो न्याय दिला नाही असे खेदाने म्हणावे लागते. कारण आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून टेकाडयांच्या राष्ट्रीय कवितेचे महत्त्व वाचकांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही असे वाटते. प्रसाद, ओज, गेयता आणि नाट्य हे त्यांच्या काव्याचे विशेष आहेत. स्वभावोक्ती सरलोक्तीबरोबरच रूपकात्मकता आणि सूचकताही त्यांच्या काव्यात आहे. त्यांच्या काव्याचा सर्वात आगळा विशेष म्हणजे तत्कालीन राजकारणाचे जिवंत प्रतिबिंब त्यांच्या काव्यातून प्रकर्षाने प्रगट झालेले आहे. एक राष्ट्रकवी म्हणून त्यांची योग्यता निःसंशय तिवारी तांबे यांच्याबरोबरीची आहे.

आधुनिक मराठीचे उपेक्षित राष्ट्रकवी ना. के. बेहरे (जन्म-१८९०-१९५८)

भूमिका

श्री. दु. आ. तिवारी यांची जशी आधुनिक मराठीच्या टीकाकारांकडून जाणता अजाणता उपेक्षा झाली तोच प्रकार विदर्भाचे एक ज्येष्ठ कवी प्रो. ना. के. बेहरे यांच्याबाबतीत घडलेला आहे. १. मोत्यांची माळ (१९३०), २. हिंदुत्वदीपिका, ३. स्मरणी, ४. हिंदुधर्मप्रकाश हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. ' मुलांची गाणी ' नावाचे एक चिमुकले पुस्तक १९२० सालीच या कवीने प्रसिद्ध केले. त्यात असलेल्या गीतांची संख्या ६५ आहे. ' मोत्यांची माळ ' या त्यांच्या कवितासंग्रहात सुमारे ३०७ कविता आहेत. ' हिंदुधर्म प्रकाश ' या लहानशा काव्यासंबंधी प्रा. भ. श्री. पंडित सांगतात, " या लहानशा काव्यात त्यांनी ' देश हाच देव ' आणि त्याची सेवा हाच धर्म ही विचारसरणी मांडली आहे."[१२१] त्यांनी रचलेल्या सात आठ खंडकाव्यांपैकी केवळ एकच प्रसिद्ध झाले असले तरी त्यांनी विपुल काव्यलेखन केले हे सिद्ध होते. परंतु विदर्भातील या निःस्पृह वाणेदार ध्येयनिष्ठ कवीला काव्यक्षेत्रात उपेक्षित म्हणूनच वावरावे लागले.

उपेक्षितांचे अंतरंग

काव्यनिर्मितीप्रमाणेच प्रो. बेहऱ्यांनी स्फुट गद्य लिखाणही विपुल केलेले असून ते निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहे. (१) ' जीवनरहस्य ', (२) ' सीतावनवास ', (३) ' पिंझारो ', (४) ' अहल्योद्धार ', (५) ' युद्धसंसार ', (६) ' हिन्दु कोण ?' (७) ' १८५७ ', (८) ' थोरल्या बाजिरावांचे चरित्र ' इत्यादी त्यांचे साहित्य प्रकाशित झालेले असून त्यातून त्यांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता, अध्ययनशीलता, विविध विषयांचा व्यासंग आणि प्रभावी शैलीचा परिचय होतो. त्यांनी श्री. तिवारींच्या ' झाशीची संग्राम देवता ' या कवितेला लिहिलेली प्रस्तावना किंवा केशवसुतांच्या कवितेच्या चौथ्या आवृत्तीला १९३८ साली ' केशवसुतांचा काळ व कवी ' ही प्रदीर्घ अशी सव्वीस पृष्ठांची रसोद्ग्राही प्रस्तावना, ' काव्य चर्चा 'तील विनायकाची कविता हा लेख, ही त्यांच्या रसिकतेची तशीच त्यांच्यातील टीकाकाराची ओळख करून देणारी आहेत.

असे विविध प्रकारचे गद्य पद्य लिखाण करूनही टीकाकारांनी व वाङ्मयेतिहासकारांनी त्यांची उपेक्षाच केली असे खेदाने म्हणावे लागते. प्रो. बेहरे लिहितात, " नागपूर हे मराठीचे पूर्वेकडील माहेरघर असले तरी मुंबई पुण्यासारखा मराठीचा प्रसार इकडे नाही. यामुळे पुण्या मुंबईसारखी ' परस्परं प्रशंसंति ' या स्वरूपाची काव्यमंडळे व चर्चामंडळे यांचे या प्रांतात दुर्भिक्ष ! उभ्या आयुष्यात दहावीस बारक्या स्फुट कविता लिहिणारा पुणेकर त्यामुळे सहज महाकवी ठरतो व कवींच्या नामावळीत त्याचे नाव नित्य प्रामुख्याने झळकू लागते. विद्वत्ता, व्यासंग, देशसेवा, लोकजागृती आणि ग्रंथलेखन यांच्याशी त्याचे कायमचे वाकडे असले तरी हरकत नाही. किंबहुना, अशी फारकत असल्याशिवाय मनुष्य कवी होऊ शकतच नाही असा तिकडे समज पसरला आहे."[१२२]

चरित्रात्मक परिचय

प्रो. ना. के. बेहरे यांचा जन्म हुशंगाबाद जिल्ह्यातील टेंभुर्णी या गावी १८९० मध्ये झाला. मात्र त्यांचे शिक्षण जुन्या मध्यप्रदेश वऱ्हाडची राजधानी असलेल्या नागपूर येथेच झाले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी ते बी. ए. च्या वर्गात गेले. वयाच्या एकोणविसाव्या वर्षी त्यांनी बी. एस्. सी. ची पदवी घेतली. खाजगीरीत्या ' तत्त्वज्ञान ' हा विषय घेऊन ते एम्. ए. झाले. एक बुद्धिमान विद्यार्थी

म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यामुळे सरकारी नोकरीची आणि शिक्षकाच्या व्यवसायाची आलेली संधी त्यांनी स्वीकारली. भंडारा, वर्धा, जबलपूर, नागपूर येथील सरकारी विद्यालयांचे मुख्याध्यापक; सरकारी महाविद्यालयाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी चांगला सावलौकिक संपादन केला. उत्कृष्ट वक्ते, कवी, ग्रंथकार आणि प्रशासक म्हणूनही विदर्भात ते सुपरिचित होते. सुदृढ सशक्त कसलेले शरीर; शिक्षकाच्या व्यवसायाला शोभणारा निर्व्यसनीपणा आणि कर्तव्यनिष्ठा यामुळे त्यांचे व्यक्तित्व अतिशय प्रभावी होते.

कवीचे आत्मनिवेदन

देशभक्ती, निःस्पृहपणा, निर्भयपणा आणि समाजहिताकरिता त्याग करण्याची सिद्धता या दुर्मिळ गुणांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विशेष धार आलेली होती. 'मोत्याची माळ'च्या प्रस्तावनेत त्यांनी केलेले आत्मनिवेदन त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर अधिक प्रकाश टाकणारे आहे. ते लिहितात, "परकीय सत्तेच्या रुपेरी शृंखलेने माझ्या लेखणीला कधीच अटकाव केला नाही आणि तसा प्रसंग येईल त्या दिवशी लेखणी न थांवता शृंखलाच ताडकन तुटेल असा माझा आत्मविश्वास आहे. त्यानंतर दोनच वर्षांनी हे भविष्य खरे ठरले. सोलापूरच्या लष्करी अमलात फाशी गेलेले चार हुतात्मे मलाप्पा धन शेटी, शिंदे, कुर्बान हुसेन व सारडा आणि उत्तर हिंदुस्थानात फाशी गेलेले तीन हुतात्मे राजगुरु, सुखदेव व भगतसिंग अशा या सात नरसिंहांनी देशासाठी स्वप्राणांचा लीलेने त्याग केला. त्या प्रसंगाला अनुलक्षून मी ह्या सात सुप्रसिद्ध हिंदी स्वातंत्र्यसिंहांवर जी 'सप्तर्षी' कविता लिहिली व जी पुढे 'चित्रमय जगत' मासिकात प्रसिद्ध झाल्यामुळे मला वीस वर्षांनी नोकरी, पगार व पेन्शन या सर्वांना कायमचे मुकावे लागले."[११३]

प्रो. बेहऱ्यांची राष्ट्रीय कविता

कालखंडाच्या दृष्टीने विचार केला असता बेहरे हे स्वातंत्र्य कवी गोविंद आणि महाकवी सावरकर यांच्या कालाच्या पुढे येतात पण ज्या वयात त्यांनी कविता करायला सुरुवात केली तो काळ १९२० पूर्वीचा आहे. कारण 'विरोधाभास' या नावाची पहिली कविता बेहऱ्यांनी ५ सप्टें. १९१० रोजी लिहिली. त्यावेळी त्यांचे वय वीस वर्षांचे होते. 'मोत्यांची माळ' या कवितासंग्रहात 'सप्तर्षी' ही सुप्रसिद्ध कविता सोडून सुमारे ७८ राष्ट्रीय कविता आलेल्या आहेत. या सर्व कवितांतून बेहऱ्यांचा राष्ट्रीय दृष्टिकोन आणि त्यांचे राष्ट्रप्रेम प्रकट झालेले आहे. बेहऱ्यांच्या राष्ट्रीय कवितेचा आणखी एक राष्ट्रीय विशेष असा की त्यांच्यातून वर्तमानाचे यथातथ्य प्रतिबिंब पडलेले आहे. श्री. तिवारी आणि कवी माधव प्रामुख्याने राष्ट्रीय भूतकाळाची गौरवगीते गाताना दिसतात. तिवारी भूतकाळात रमतात तर कवी माधव पारतंत्र्याच्या वर्तमानाच्या जाणिवेने अस्वस्थ होतात. प्रो. बेहरे भूतकाळाकडे विशेष वळत नाहीत. वीर विभूतिपूजनाचे त्यांना आकर्षण असले तरी वर्तमानाचे भान त्यांचे कधीच सुटत नाही आणि पारतंत्र्याची खंत त्यांना जाणवली तरी ती त्यांच्या आशावादात परिवर्तित होऊन जाते.

राष्ट्रीय कवितेसंबंधी प्रो. बेहरे यांची भूमिका

'राष्ट्रीय कविता' या विभागाला प्रस्तावना लिहिताना प्रो. बेहऱ्यांनी आपले राष्ट्रीय कवितेसंबंधीचे अवलोकन आणि स्वतःच्या कल्पना अगदी निःसंदिग्धपणे मांडल्या आहेत. राष्ट्रीय कविता चाकोरीबद्ध होत आहेत हे सांगताना ते म्हणतात, "मराठी राष्ट्रीय कवितेची चाकोरी ठरली आहे. जुन्या ऐतिहासिक पोवाड्यांच्या रेषेत एक चाक चालते व दुसरे काँग्रेसच्या राजकीय चळवळीतून

पुढे सरकते. राष्ट्राच्या सर्वांगीण चळवळींचा इतिहास त्यामुळे या चाकोरीबाहेरील सृष्टीस पडतो व म्हणूनच तो काव्यात फारसा दृग्गोचर होत नाही."[१२४]

कवी स्वतःच कर्मवीर असला पाहिजे

राष्ट्रीय काव्याच्या संदर्भात जसे बेहऱ्यांनी आपले सडेतोड विचार मांडले आहेत तसेच राष्ट्रीय कवीसंबंधीच्या त्यांना अभिप्रेत असणाऱ्या कल्पनाही त्यांनी मांडल्या आहेत. त्यांच्या मते " राष्ट्रीय कवीची दृष्टी व्यापक असावी. राष्ट्रसंघटनेचे भिन्न भिन्न प्रश्न मग ते राजकीय असोत, सामाजिक; औद्योगिक वा धार्मिक असोत ते कवीच्या व्यापक दृष्टीतून व सृष्टीतून सुटता कामा नये. भूतकाळाच्या ऐतिहासिक अभ्यासाने तीव्र झालेली त्याची दृष्टी वर्तमान जगाच्या पलीकडे भविष्यसृष्टीत दूरपर्यंत पोहोचण्याइतकी भेदक झाली पाहिजे. त्यांच्या विचारांना आचारांचा पाठिंबा हवा आणि त्याचे ध्येय प्रत्यक्ष सृष्टीत उतरवण्याचा तो शक्य तेवढा प्रयत्न करीत असला पाहिजे. तो स्वतः कर्मवीर असला तरच तो दुसऱ्या कर्मवीरांची अशी मंदिरे चित्रित करू शकेल. इतरांपेक्षा त्याचे कार्यक्षेत्र भिन्न असते एवढेच !" [१२५]

फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रणेता, रूसो आदर्श

भारतीय राष्ट्रवादाचे आदर्श हे बेहऱ्यांना वंदनीय आहेत. ' शिवजयंती उत्सवावर, ' ही, ११ कडव्यांची प्रदीर्घ लिहिलेली कविता उदाहरणादाखल सांगता येईल. पण आधुनिक राष्ट्रवादाचे प्रणेते जीन जेक्स रूसो त्यांना आदर्श वाटतात किंबहुना कवीने रूसोचा आदर्श आपल्यापुढे ठेवावा आणि राष्ट्रसेवा करावी असे त्यांचे प्रतिपादन आहे. ते लिहितात, " रूसो या फ्रेंच क्रांतिकारक तत्त्वज्ञाचा महामंत्र समता, बंधुता व स्वतंत्रता हे ' त्रि – ता – ल –' ध्येय कवीने आपल्या डोळ्यांसमोर ठेवावयास पाहिजे." [१२६]

लोकमान्य टिळकांचा आदर्श

छत्रपती शिवाजी महाराज, रूसो या महान राष्ट्रपुरुषांप्रमाणे आधुनिक भारताचे राष्ट्रजनक लोकमान्य टिळक यांचाही आदर्श म्हणून बेहऱ्यांनी स्वीकार केलेला आहे. ' कवीचे तत्त्वज्ञान ' या पाचव्या ' मोत्याच्या सरातील '; ' कर्तव्यपथ ' ही कविता टिळकांचा आदर्श स्पष्ट करून सांगणारी आहे. लोकमान्यांनी 'गीता-रहस्या ' तून सांगितलेला ' निष्काम कर्मयोग ' हेच त्यांचे जीवनध्येय आहे. ते म्हणतात,

" ... ... मी आपुल्या कर्तव्याशी, निशिदिनी करिन संवाद
स्वर्गी वा नरकीं गेलो, त्याचा ना मोद न खेद " (– कर्तव्यपथ)

काव्यविषयकध्येय

' श्री. आनंदराव टेकाडे यास ' या कवितेत बेहऱ्यांनी आपली काव्यविषयक भूमिका मांडली आहे. ते सांगतात,

" लोक जागृती व्हावी लोकीं, पूजा स्वातंत्र्याची
निशाण समता, मंत्र बंधुता, गंधाक्षत धर्माची
सत्याचा तो दीप तळपतो अनाद्यंत कालात
प्रकाश त्याचा तेजस्वी परि सुखद आणि शांत ॥ "

(– श्री. आनंदराव टेकाडे यांस)

दुसऱ्या एका कवितेत आपले राष्ट्रीय ध्येय कवीने स्पष्टपणे सांगितले आहे.

" ध्येय एक अमुचे आज । सांगण्यास नाही लाज ।
धर्म पंथ नाना वेष । सर्वांचा एकच देश ।"

राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्य प्रेम

सुमारे १७ कवितांमधून प्रो. वेहऱ्यांनी आपले राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्य–प्रेम उत्कटतेने व्यक्त केलेले आहे. भारतमातेचा गौरव करताना त्यांच्या प्रतिभेला काव्याचा बहर येतो. ' सुवर्ण भूमि '; ' आम्ही हिन्दी लोक व आमचा देश ', ' हिंदभूमि ', ' हिन्द देवतेस ', ' हिन्दुंचा हिन्दुस्थान '; ' माय-भूमी ' या कवितांतून त्यांनी राष्ट्रप्रेमाचा परिचय दिला आहे. सेवास्वधर्माची शिकवण देणारी आमची ही सुवर्णभूमी आहे हे सांगताना कवी म्हणतो,

" सुखाचा लेश ना लाभे, तरी सेवा स्वधर्माची
करावी, मंत्र हा सांगे सदा भूमी सुवर्णाची "

किंवा; " तू हिंदभूमी । मज मातृभूमी
तू पितृभूमी । तशि देव भूमी
तू कर्मभूमी तशि धर्मभूमी
माते ! तुला मी म्हणुनी नमामी " (– हिन्द भूमि)

अशी कितीतरी उदाहरणे देऊन कवीला मातृभूमीबद्दल वाटणारे उत्कट प्रेम स्पष्ट करता येण्यासारखे आहे. पण स्थलाभावी ते देणे शक्य नाही. मातृभूमीच्या प्रेमाइतकेच स्वातंत्र्याचेही प्रेम उत्कट आहे. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करायची त्याची सिद्धता आहे. कवी म्हणतो,

" काळाला पुरुनी उरला गाठाया स्वातंत्र्याला
आज सतीचे घे वाण – हिंदूंचा हिंदुस्थान ! " (– हिंदूंचा हिंदुस्थान)

स्वातंत्र्याचा व्यापक अर्थ कवीला अभिप्रेत आहे. तो म्हणतो,

" स्वातंत्र्य स्वैर नाही । शिस्तीत जन्म घेई
हा हक्क जन्मसिद्ध । आम्ही जगी स्वतंत्र ।" ... ...
(– झालो जरी स्वतंत्र)

याशिवाय ' जयजयकार !', ' साम्राज्यवाद्यास !', ' सीमोल्लंघन ' यासारख्या कवितांतून स्वातंत्र्यप्रेम व्यक्त झालेले आहे.

वीर विभूतिपूजन

इतर राष्ट्रकवींनी केलेल्या वीर विभूतिपूजनाप्रमाणेच श्रीराम, श्रीकृष्ण या अवतारी पुरुषां-प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज, पहिला बाजी, गुरुगोविंदसिंह यांचे पूजन कवीने आदरपूर्वक केलेले आहे. देवाचे पुण्यस्मरण राष्ट्राचे मरण चुकविते अशी कवीची श्रद्धा आहे. ' श्री शिवजयंती उत्सव ' या ११ कडव्यांच्या प्रदीर्घ कवितेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध गुणांचे वर्णन केलेले आहे. तिसऱ्या कडव्यात कवी सांगतो,

" शिवराय येता उदया । देशाची पलटे काया
डंका झडवा शिववाचा । मार्ग पुसा स्वातंत्र्याचा !"

राष्ट्राच्या पितरांचे स्मरण करण्यामागील हेतू सांगताना कवी म्हणतो,

" पुण्यश्लोक झाले गेले । स्मरण रूप आता उरले
दीप जागते राष्ट्राचे । मेरू खऱ्या आधाराचे "

पौराणिक आणि ऐतिहासिक वीरांप्रमाणेच आधुनिक काळातील राष्ट्रपुरुषांचे पूजन कवीने केलेले आहे. त्यात क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, भारतसेवक गोखले, सुधारकाग्रणी आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, डॉ. ॲनी बेझंट, महात्मा गांधी इत्यादी राष्ट्रभक्तांचा समावेश आहे.

कारण, " स्वदेश जो जो उद्धरतो । ठसा जगावर उमटवि तो ! "

असा कवीच्या अंतःकरणात या महापुरुषांसंबंधी आदरभाव आहे. लोकमान्यांच्या बाबतीत म्हणतात,

" देशभक्त सारे थोर, मेरु परि एकच वीर ।
... ... टिळकांचे श्रवता नाव । उचंबळो भक्ती भाव "

(– टिळक जयंती)

डॉ. ॲनी बेझंट बाईंनीही भारतात होमरूलची चळवळ सुरू केली व त्यांना अटक करण्यात आली त्या प्रसंगावर रचलेल्या कवितेत बेहरे लिहितात,

" अंधारे भरल्या जगात चमके । पाश्चात्य तारा नवी
जोराने करि गर्जना मृदु जरी । वृत्ती किती हालवी "

(– नवा तारा – डॉ. बेझंट बाईस)

महात्मा गांधींवर 'बंडवाला' ही सुमारे पंधरा कडव्यांची प्रदीर्घ कविता असून 'धीर संन्याशी', 'सुताचे सर' या कवितांतूनही गांधीजींचे विभूतिपूजन बेहऱ्यांनी केलेले असून ते तांब्यांपेक्षा सरस आहे.

" हा बुद्ध सत्य – शांतीचा
हा ख्रिस्त आत्मत्यागाचा
पैगंबरसत् – शक्तीचा
हा स्वतः जगाचा, जगत तयाचे, बंडखोर आला " (– बंडवाला)

'गोखले गेले' ही गोखल्यांच्या निधनावर १९१५ मध्ये लिहिलेली विलापिका आहे. तशीच 'अवतार समाप्ती' ही लोकमान्यांच्या निधनावर लिहिलेली प्रसिद्ध विलापिका आहे. याशिवाय 'आगरकरास!' 'केशवसुतास !' 'गोविंदाग्रजास !' यासारख्या कवितांमधून त्या त्या महापुरुषांचा गौरव केलेला आहे.

पूर्वपरंपरेचा गौरव आणि हिंदुजातीचा अभिमान

'आम्ही शिक्षक', 'आम्ही हिन्दी लोक', 'हिन्द भूमी', 'हिन्द देवतेस', 'हिंदूंचा हिंदुस्थान', 'मायभूमी' या कवितांमधून राष्ट्रप्रेमाप्रमाणेच पूर्ववैभवाचे स्मरण, पूर्वपरंपरेचा गौरव आणि हिंदुजातीचा अभिमान कवीने व्यक्त केला आहे.

वर्तमानकाळाचे प्रतिबिंब

महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्यानंतर खऱ्या अर्थाने वर्तमानकाळाचे प्रतिबिंब प्रो. बेहरे यांच्याच कवितेत प्रामुख्याने आढळते. प्रो. बेहरे ज्या राष्ट्रीय कालखंडात वावरत होते त्याचे प्रतिबिंब उत्कटत्वाने त्यांच्या कवितेत पडलेले आहे. लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय कार्य,

त्यांची अवतार समाप्ती, गोखल्यांचा उदयास्त, आगरकरांचे राष्ट्रीय व सामाजिक कार्य, डॉ. ॲनि बेझंटबाईंची होमरूलची चळवळ, महात्मा गांधींचा उदय आणि त्यांच्या सत्याग्रही चळवळीचे स्वरूप, पहिले जागतिक महायुद्ध, 'रशियन राज्यक्रांती', रौलट ॲक्ट आणि भारतीयांचा असंतोष दडपून काढण्यासाठी अमृतसरच्या जालियनवाला बागेत इंग्रजांनी केलेली भारतीयांची कत्तल, सायमन कमिशन, क्रांतिकारकांचे बलिदान, प्रमुख राजकीय घटनांचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून अगदी ठळकपणे आढळते. 'युरोपात चमके वीज नवी दुंदुभी काळास न भी' असे सांगून रशियन क्रांतीचे, सूचकतेने वर्णन बेहऱ्यांनी केलेले आहे. कवी म्हणतो,

"दाढांमध्ये 'झार' रगडला, वाट दावण्या ती कैसरला।
भूप्रदेशही उत्सुक झाला – फुलू द्या तुमचा नूर" (– सीमोल्लंघन)

इंग्रजांचा उपहास करताना कवी म्हणतो,

"उदार असती इंग्रज भारी, लव नच इच्छा स्वार्थाची
आमुच्यासाठी कष्ट सोसती, दगदग करिती राज्याची!"
(– दिवाण की दिवाणे)

अशी अनेक उदाहरणे देता येण्यासारखी आहेत.

सामाजिक आणि आर्थिक प्रश्न

भारताच्या राष्ट्रीय जीवनातील सामाजिक आर्थिक प्रश्नाकडे महाकवी सावरकर, स्वातंत्र्यकवी गोविंद आणि 'बी' यांनी लक्ष पुरविले आहे. प्रो. बेहऱ्यांच्या राष्ट्रीय कवितांत या आधुनिक विषयावरील कविता आलेल्या आहेत. 'शूद्रास', 'राहिल अस्पृश्यता कोठूनी', 'सीमोल्लंघन', 'हा का महार दूर', 'सोवळे हिंदू' इत्यादी कवितांतून अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी चर्चा कवीने केली असून अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा झाला पाहिजे असे विचार कवीने मांडले आहेत.

"अस्पृश्यांना बंदन करणे, वन्दन हे प्रभुचे चरणाचे
अस्पृश्यांना दूर लोटता दार दूर हो मोक्षाचे."

'परकीय सर्व वंद्य अस्पृश्य हिंदी निंद्य' हा न्याय कवीला मान्य नाही. 'जन्मा येणे दैवा हाती करणी जग हासवी। गाणे व्यर्थची कुलथोरवी' असे सांगून कुलाभिमानाचा गर्व बाळगणाऱ्यांना कवीने फटकारले आहे.

सामाजिक सुधारणाही कवीला अभिप्रेत आहे. मात्र सुधारणा करताना आमच्या हजारो वर्षांच्या कल्याणकारी परंपरांना आम्ही मुकणार तर नाही ना याचे भानही ठेवणे आवश्यक असल्याचे कवीने सांगितले आहे. 'युगांतर' या कवितेत कवी म्हणतो,

"सुधारणाही करू आमुची परंपरा राखुनी।
स्वधर्मी भाव पुरा ठेवुनी"

'सुधारणा', 'शेतकरी' यासारख्या कवितांमधून भारतातील आर्थिक विषमतेचे आणि प्रामुख्याने दरिद्री अज्ञानी शेतकऱ्याचे चित्र रेखाटलेले आहे. असंघटित, अज्ञानी, अशिक्षित आणि दरिद्री असा हा शेतकरी कर्जबाजारी असतो. याउलट स्थिती संघटित कामगारांची असते.

"संघ निघाले। विजय पावले। मजुरांची वाढे मजुरी।
भुका राहिला शेतकरी" (– सुधारणा)

दुसऱ्या एका कवितेत,

" चांदी पिकता शेतात, कापूस पाही विलायत । सोने पिकवी शेतात ।
धान्य दुजी चाले वाट ।"

मराठी बाणा व मातृभाषेचा अभिमान

महाकवी सावरकरांसारखाच प्रो. बेहरे यांचा भाषाभिमान उत्कट आहे. त्यांनी मातृभाषेसंबंधी काढलेले अभिमानाचे उद्‌गार बघा !

" मराठी आमुची माता महाराष्ट्रास ही प्राण
मराठा होतसे वेडा करी जीवास कुर्बान ... ... "
(– मराठीची प्रार्थना)

आशावादी दृष्टिकोन

देशाचे पारतंत्र्य, दारिद्र्य, अज्ञान यांची जाणीव कवीला आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि सत्ता यांची हाव असणारे पुढारी देशाचा अधःपात घडवीत आहेत यांची जाणीवही कवीला आहे. म्हणूनच ते एका ठिकाणी म्हणतात,

" स्वराज्य देऊ नकोच देवा ! घोटाळा तो माजेल ।
स्वदेश तारु घोर तुफानी जहाल बुडगे नेतील "

मात्र अशाही प्रतिकूल परिस्थितीत त्यांचा राष्ट्रीय आशावाद अदम्य असाच आहे. एका कवितेत ते लिहितात,

" हिन्द राष्ट्र मृत कसचे, उच्च ध्येय धरि पुढचे
सुपठण इतिहासाचे हेच शिकविते !" (– हिन्द देवतेस)

मानवतावादी राष्ट्रवाद

प्रो. बेहऱ्यांची राष्ट्रीय कविता अस्मितादर्श राष्ट्रवादाकडून मानवतावादी राष्ट्रवादाकडे वळली आहे. गांधीवादी दृष्टिकोन म्हणजे मानवतावादी राष्ट्रवाद म्हणता येईल. या राष्ट्रवादाचा पुरस्कार प्रो. बेहरे यांनी समर्थपणे आपल्या गांधीजींवर लिहिलेल्या कवितेतून केलेला आहे. गांधीजींचे तत्त्वज्ञान सांगताना कवी म्हणतो,

" सेवीं मानव–जाति नित्य सकला आनंद शांती तया
तैशी आभरणे सतेज मिळतीं, स्वर्गीय शोभा जया,"

भारतीयांच्या राष्ट्रीय जीवनात अस्मितादर्श राष्ट्रवादाची जागा पुढे मानवतावादी राष्ट्रवादाने घेतल्याचे स्पष्ट दिसते. मात्र त्याच्या प्रारंभीच्या पाऊलखुणा बेहऱ्यांच्या गांधीजींवरील कवितांतून प्रथमच आढळतात. हे बेहऱ्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

काव्यसौंदर्य

प्रो. बेहऱ्यांच्या मते, " वाङमयाचे ध्येय कला नसून ज्ञानदान, लोकजागृती, ध्येयदर्शन हेच होय. संदेश सांगण्याच्या चातुर्याला कला हे नाव देता येईल. पक्वान्न सेवन करण्याकरिता बनविण्यात येते. ते करताना जो सुग्रणपणा लागतो त्याला कला म्हणता येईल. पण खाणाराचे पोट भरावे हाच एक पक्वान्न करण्याचा प्रधान हेतू असतो असे म्हणणे भाग आहे. लोक पोटभर जेवले म्हणजे यजमानाला आशीर्वाद देतात आचाऱ्याला देत नाहीत... उपदेशाची थोरवी हेच वाङमयाच्या श्रेष्ठतेचे

एकच एक माप होय."[१२७] (भूमिका पृष्ठ १४, १५) वाङमयाची अंगे उपांगे यासंबंधी चर्चा करताना, " ज्ञान हा वाङमयाचा देह होय. राष्ट्रातील विविध आंदोलनांशी समरसता हा वाङमयाचा जीव वा आत्मा होय आणि कला त्याचा पोषाख होय ! वाङमयाचे अंग कोणते व उपांगे कोणती हे यावरून लक्षात येईल."[१२८] (भूमिका पृष्ठ १५, १६) ही वाङमयविषयक प्रो. बेहऱ्यांची भूमिका लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय कवितेतील कलात्मकता उणी असल्याची तक्रार करणे योग्य वाटत नाही.

या आपल्या वाङमयविषयक भूमिकेतूनच त्यांच्या राष्ट्रीय नव्हे तर एकूण सर्वच काव्याचा प्रसाद हा मुख्य गुण आहे. वाचकांना चटकन आशय समजेल अशाच साध्यासोप्या शब्दांचा उपयोग त्यांनी अभिव्यक्तीसाठी केलेला आहे. विषयवैचित्र्य, नादमाधुर्य, भावनात्मकता आणि अद्यावतता हे त्यांच्या राष्ट्रीय काव्याचे काव्यदृष्ट्या विशेष सांगता येतील. ' सुतांचे सर ' यासारख्या कवितांतून

" चंचलाच धनुकली । पिंजण्यास घेतली । मेघखंड खंडुनी पेळू केले
...चरका मग फिरविला । गडगडाट बोलिला । मेळखंड कातुनी सूत केले
तेच तंतु लोंबले । भूलोकी पातले । गांधी ते वंदुनी धन्य झाले ।" (सुताचे हार)

अशा काही अचाट कल्पनाही आहेत.

टीकाकारांचे अभिप्राय

" बेहऱ्यांच्या राष्ट्रीय कवितांत स्पष्टोक्ती असल्याचे प्रा. रा. श्री. जोगांना मान्य आहे पण त्यांच्या कवितेत ओज व तेज गोविंद व सावरकर यांच्या तुलनेत नाही."[१२९] असे जोगांनी सांगितले आहे. प्रा. भ. श्री पंडितांनी टेकाडे व बेहरे या दोन्ही कवींची समकालीन, सारख्या प्रवृत्तीचे आणि समान अभिव्यक्तीचे सामर्थ्य असणारे कवी म्हणून उल्लेख केलेला आहे. " या दोघांनीही तत्कालीन राजकारणावर कविता लिहिल्या आहेत. त्यांना ऐतिहासिक महत्त्व आहे, परंतु त्यातील विषय आता जुने झाल्यामुळे त्यात आकर्षण उरले नाही."[१३०]

डॉ. अ. ना. देशपांडे बेहरे यांच्यासंबंधी लिहितात, ' सप्तर्षी ' या राजकीय कवितेमुळे मोठ्या पगाराची नोकरी सोडण्याची पाळी आल्यामुळे आधुनिक मराठीतल्या या दुसऱ्या केशवसुतांच्या राष्ट्रीय कवितेचा त्या काळी बराच बोलबाला होता.[१३१] डॉ. वा. भा. पाठकांनी आपला अभिप्राय देताना म्हटले आहे, " आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे इ. कवींनी शाहिरी थाटाच्या कविता लिहून अगोदरच प्रक्षुब्ध झालेल्या लोकांच्या विचारसागराला राष्ट्रीय प्रेमाची चांगली भरती आणली."[१३२]

समारोप

टीकाकारांचे हे सर्व अभिप्राय लक्षात घेतलें म्हणजे ते भिन्न भिन्न दृष्टिकोनातून देण्यात आलेले असल्याचे लक्षात येते. कधी कधी एका टीकाकाराच्या अभिप्रायाचीच सर्वत्र पुनरुक्ती झाल्याचेही आढळते. विशिष्ट हेतूने ग्रंथलेखन करणाऱ्यांचे हे अभिप्राय अस्पष्ट ओझरते म्हणून त्रोटक व उपेक्षात्मक असण्याची शक्यता असते. त्यामुळे ते बेहऱ्यांना योग्य न्याय देऊ शकले नाहीत. प्रा. बेहऱ्यांच्या राष्ट्रीय कवितेच्या बाबतीत तेच घडले आहे. भारताच्या धामधुमीच्या राजकीय चळवळीचे प्रतिबिंब जिच्यात प्रकर्षाने पडलेले आहे, राष्ट्रवाद आणि मानवतावादी राष्ट्रवाद–गांधीवाद, यांचेही दर्शन जीतून घडलेले आहे आणि जागतिक विचारांची चाहूल स्पष्टपणे जीत व्यक्त झालेली आहे अशी बेहऱ्यांचीच राष्ट्रीय कविता आहे व एक राष्ट्रकवी म्हणून त्यांचे स्थान श्रेष्ठ आहे.

लो. टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाचे सच्चे गायक 'राधारमण' (१८७८ ते १९२२)

लो. टिळकांच्या राष्ट्रवादी परंपरेतील शेवटला दुवा

आधुनिक भारताच्या इतिहासात प्रस्तुत कालखंड हा अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घडामोडींचा आहे. जीवनातील सर्वच क्षेत्रांवर लो. टिळकांचा उणा अधिक प्रभाव असल्याचे इतिहासकारांनी नमूद करून ठेवले आहे. होमरूलच्या चळवळीनंतर महाप्रतापी टिळकसूर्य हळूहळू अस्तगिरीकडे वाटचाल करीत होता आणि सौम्य, शीतल नि निग्रही असा गांधीचंद्र आकाश उजळीत वर येत होता. टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाने महात्मा गांधीही प्रभावित झालेले होते. लो. टिळकांच्या जहाल राष्ट्रवादाचा प्रभाव प्रा. शि. म. परांजपे, इतिहासाचार्य राजवाडे, हरिभाऊ आपटे यांच्याप्रमाणेच महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्यावर विशेष झाल्याचे आढळून येईल. कवी राधारमण उपाख्य कृष्णाजी पांडुरंग लिमये यांचाही या थोर कवी-वरोवर उल्लेख करावा लागेल. आपल्या काव्याच्या माध्यमातून त्यांनी टिळकांचा जहाल स्वाभिमानी राष्ट्रवाद हिरिरीने मांडला म्हणून त्यांच्या परंपरेतील शेवटचा दुवा असे त्यांचे वर्णन करावे लागेल. राष्ट्रकवी राधारमण, स्वातंत्र्यकवी गोविंदासारखेच राष्ट्रभक्तीने झपाटलेले कवी होते. संस्कृत, मराठी, इंग्रजी साहित्याचा त्यांचा सखोल व्यासंग होता. अभिजात रसिकता त्यांच्या ठिकाणी होती. अत्यंत प्रभावशाली असे व्यक्तिमत्त्व त्यांना लाभले होते. राष्ट्रीय वृत्तीचे यशस्वी शिक्षक म्हणून त्यांचा महाराष्ट्रात लौकिक होता. साने गुरुजी, कै. नारायण काळे यांच्यासारखे कवी, साहित्यिक शिष्य लाभले होते. मात्र प्रा. अ. ना. देशपांडे म्हणतात त्याचप्रमाणे 'टिळकभक्ती ही त्यांच्या जीवनाची स्थिर वृत्ती होती.' [१३१] या स्थिर वृत्तीनेच त्यांना पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या जागेचा राजिनामा द्यावा लागला. निमित्त झाले लो. टिळकांच्या शिक्षेच्या प्रसंगावर काव्यनिर्मिती करण्याचे पण राधारमण आपल्या तत्त्वनिष्ठेपासून, टिळकभक्तीपासून रेसभरही हटले नाहीत. पुढे दापोलीच्या मिशनरी शाळेत त्यांना आपले उर्वरित आयुष्य घालवावे लागले, इतके ते आपल्या निष्ठेशी एकरूप झालेले होते.

राधारमणांची काव्यनिर्मिती

राधारमणांनी आपले 'भस्मासुर' या नावाचे काव्य १८९२ मध्ये लिहिले असले तरी त्यांच्या स्फुट काव्याची सुरुवात 'कालचक्र' या काव्याने झालेली आहे. राधारमणांनी खंडकाव्यांची निर्मिती अधिक केलेली आहे. १९०५ मध्ये महाकाव्याच्या धर्तीवर वीर विभूतिपूजनाच्या हेतूने लिहिलेले 'फडणीस काव्य', 'मोरोपंतांचा प्रभुद्रोह', 'आर्यमालाविलाप', 'महाराष्ट्र वीरादर्श' आणि 'जहाल आणि मवाळ' ही सारीच खंडकाव्ये आहेत. प्रदीर्घ काव्यरचना करण्यात राधा-रमणांच्या पंडिती प्रतिभेला उल्हास वाटत असे. राधारमणांनी स्फुट कविताही लिहिलेली असून ही सर्व काव्ये 'समग्र राधारमण' या काव्यसंग्रहात आज उपलब्ध आहेत.

फडणवीस काव्य

नाना फडणवीस स्मारक समितीने प्रथम पुरस्कार देऊन गौरविलेले फडणवीस महाकाव्य १० सर्गांचे आहे. वीरविभूतिपूजनाच्या उदात्त भूमिकेतून राधारमणांनी या काव्याची रचना केलेली असून हा देखील त्यांच्या टिळकभक्तीचाच विशेष आहे. वीर विभूतिपूजनाचे महत्त्व सांगणारा पुढील श्लोक त्यांच्या हेतूची साक्ष देणारा आहे.

" मदन रिपु शरीरा भूषवी जेवि भूती
निज – जन – हितकारी तेवि राष्ट्रा विभूती
भजन पुजन त्यांचे राष्ट्र भाग्योन्नतीस
प्रमुख निपट वाटे हेतु विद्वन्मतीस ॥"

लो. टिळकांच्या जीवनातील घटनाप्रसंगावरील काव्ये

१९०७ मध्ये लिहिलेले 'मोरोपंतांचा प्रभुद्रोह', १९०९ 'आर्यमाता विलाप' आणि 'जहाल आणि मवाळ' ही तिन्ही खंडकाव्ये लोकमान्य टिळकांच्या जीवनातील घटनाप्रसंगांशी तशीच त्यांच्या जीवन–आदर्शांशी निगडित आहेत. पहिले त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला प्रथम भरला त्या प्रसंगावर आहे. दुसरे १९०८ साली त्यांना झालेल्या शिक्षेवर आधारित असून तिसरे त्यांच्या जहाल राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान सांगणारे आहे. या काव्यांनी त्यांच्या अर्ध्याहून अधिक कवितेचा विभाग व्यापलेला आहे. या काव्याव्यतिरिक्त त्यांनी स्फुट काव्यलेखन केलेले असून त्यातील बहुतेक कविता राष्ट्रीय स्वरूपाच्या आहेत.

महाराष्ट्र वीरादर्श

त्यांच्या इतर काव्यांप्रमाणे 'महाराष्ट्र वीरादर्श' हे काव्यही सुबोध सरळ असून त्यात मराठ्यांच्या शौर्याचे वर्णन आलेले असल्याने ते वीररसपूर्ण झालेले आहे. स्वराज्यप्राप्तीसाठी उत्सुक असणाऱ्या तत्कालीन महाराष्ट्रातील लोकांना आपल्या पूर्वजांच्या शूरवृत्तीचे नि पराक्रमाचे स्मरण करून देणारे असे उद्‌बोधक व आनंददायी स्वरूपाचे आहे. या काव्याचे पाच स्तबक असून प्रत्येकात २१ श्लोक आहेत. महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे या काव्यातून वर्णन आले आहे. 'महाराष्ट्र दर्शन' हे काव्यदेखील वीर विभूतिपूजनाचा तसाच पूर्वजांच्या पराक्रमाचा एक नमुना आहे.

ईश्वरनिष्ठेचे अधिष्ठान

तांब्यांसारखेच राघारमण कमालीचे आस्तिक होते, याची साक्ष त्यांनी रचलेल्या विविध गणपतिस्तोत्रांवरून पटते. आपल्याला ते मंगलमूर्तीचे व शारदेचे भक्त समजतात. काव्यस्फूर्तीची प्रेरणाही विघ्नहर्त्यापासूनच प्राप्त होते अशी त्यांची विनम्र श्रद्धा आहे. ते लिहितात,

श्रीमन्मंगल मूर्ते वाग्देवी जीवितेश हे तूं तें
साष्टांग नमन करितो पुरवी तू प्रणत भक्त–हेतूते

कविताकृती सतीसारखी असावी

राघारमण हे अभिजात परंपरेचे कवी होते. अभिजात कवीच्या आदर्शवादातूनच ते काव्य-निर्मितीकडे वळले होते. रसिकांचे अंतरंग वेधून घेणारी कविता असावी. तिने आपल्या अभिव्यक्तीचे प्रदर्शन करताना औचित्य आणि संयम बाळगला पाहिजे. रसभंग होणार नाही यासंबंधी काळजी घ्यावी. सतीसारखी कविता असावी असे राघारमणांचे काव्यासंबंधीचे मत होते.

उत्कट राष्ट्रभक्तीची अभिव्यक्ती

'टिळकभक्ती ही राघारमणांच्या जीवनाची स्थिरवृत्ती होती' याचा दुसरा अर्थ राघारमण हे हाडाचे राष्ट्रभक्त होते. म्हणूनच त्यांच्या काव्याचा प्रमुख विषय राष्ट्रभक्ती हाच आहे. 'फडणीस काव्यात' कोकणातील लोकांचा राष्ट्रभक्तीचा वारसा सांगताना कवी म्हणतो,

" विद्या कला साहस देशसेवा
या सद्गुणांचा बहुमूल्य ठेवा
जेथे जनांच्या वसतो सुखाने..." (– फडणीस काव्य)

राष्ट्रभक्तीच सर्वस्वाचा त्याग करण्याची शिकवण देते हे नाना फडणिसांच्या रूपाने राघारमणांनी दाखविले आहे.

" देती स्वदेशार्थ शरीर वित्त
विवेक विद्यानय बुद्धि चित्त
अजूनही त्यास्तव लोक ' नाना '
नामाश्रवे डोलवितात माना ॥" (– फडणीस काव्य)

' महाराष्ट्र वीरादर्श ' या काव्यातही मराठ्यांच्या राष्ट्रभक्तीचा कवीने मोठ्या गौरवाने उल्लेख केलेला आहे. राष्ट्रोन्नतीसाठी सर्वस्वाचे बलिदान करणे हे मराठ्यांचे ब्रीद असून तेच ब्रीद शिवाजी महाराजांनी आपल्या मराठे वीरांना शिकविले.

" कन्यापुत्र कलत्र, जीव नलगे वित्तादिकांची कथा,
गेले वेचुनि धन्य जे चढुनिया राष्ट्रोन्नतीच्या पथा,
राष्ट्रा नित्य महापदावरि जिही जागा दिली रोकडी !
ऐसे कोण सुधन्य लोक जगती ? आम्ही मराठे गडी ! "
(– महाराष्ट्र वीरादर्श)

आपल्या राष्ट्रासाठी हौतात्म्य पत्करणे म्हणजे भगवद्गीतेत सांगितलेला दिव्य विभूतियोग रचणे होय असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुखाने कवीने सांगितले आहे.

" जन्मापासुनि, जन्मभूमि जननी ज्यांही सदा सेविली
प्रेमाच्या सलिले मलास हरुनी ती निर्मला राखिली
प्राणांचा निधि ही तदुन्नति पदीं ज्यांही सुखें वेंचला
त्याही दिव्य विभूति योग रचिला राष्ट्रीय–गीतेतला."
(– महाराष्ट्र वीरादर्श)

स्वातंत्र्याची तळमळ आणि पारतंत्र्याची खंत

राष्ट्रभक्तीच्या भावनेशी संलग्न अशी प्रबळ भावना म्हणजे स्वातंत्र्यभावना आहे. ही स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा मानवाला क्रियाशील बनविणारी आहे. लोकमान्य टिळकांच्या जीवनातील घटनेवर आधारित ' मोरोपंतांचा प्रभुद्रोह ' हे काव्य त्यांच्या अटकेसंबंधीच्या परिस्थितीतून निर्माण झालेले आहे. ब्रिटीश साम्राज्यसत्तेने लोकमान्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आणि त्यांना तुरुंगात डांबले या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीच 'आर्यमातेचा विलाप ' या काव्याची निर्मिती झालेली आहे. पारतंत्र्याचे विषारी शल्य त्यातून व्यक्त झालेले आहे. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी मोल द्यावे लागते. हे मोल देण्याची ज्यांची सिद्धता असते त्यांनाच स्वातंत्र्य प्रसन्न होते असा आशय सांगणारे, लोकमान्यांच्या स्वाभिमानी जहाल राष्ट्रवादाची शिकवण देणारे, 'जहाल' आणि 'मवाळ' असे हे काव्य आहे. या भावनेची अभिव्यक्ती करताना ज्यांनी ही पारतंत्र्याची परिस्थिती निर्माण केली त्या इंग्रजी-सत्तेसंबंधी चीड, तिटकारा आणि आणि प्रसंगी त्वेषही प्रकट झालेला आहे. दास्य हे कुणालाच गोड वाटत नाही असा सर्वसामान्य सिद्धान्त सांगताना कवी म्हणतो,

" पराजिता जागृति दे उसासे
कोणासही दास्य न गोड भासे "

आंग्लभूपतीला भारतमाता प्रश्न विचारते, अशी कल्पना कवीने केलेली असून देशभक्ती करणे तसेच मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा प्रयत्न करणे हा गुन्हा कसा ? असा तिच्या प्रश्नाचा आशय आहे.

" प्रेमा बाळ मदीय लाल करितो निःसीम माझ्यावरी
हा त्याचा अपराध की ? अनय का ? दुर्वृत्ति का ? हो तरी "

(आर्यमाता विलाप)

पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा गौरव

' समग्र राधारमण ' काव्याला प्रस्तावना लिहिताना स. ज. भागवतांनी राधारमणांच्या काव्याचा तो एक महत्त्वाचा विशेष सांगितला आहे. त्यांच्या प्रतिपादनाचा भावार्थ असा की पूर्वजांच्या कर्तृत्वाचा अभिमान मिरविणे हा पुनरुज्जीवनवादी राष्ट्रीय वृत्तीचा महत्त्वाचा विशेष असून राधारमणांच्या काव्यात तो विशेषत्वाने जाणवतो. ' फडणवीस काव्य ', ' महाराष्ट्र वीरादर्श ' ही या विशेषाची मूर्तिमंत उदाहरणे आहेत. ' फडणीस काव्याचा ' पहिला सर्ग आणि तिसरा सर्ग यातील अनेक उदाहरणे परंपरेचा गौरव करण्यासाठीच आलेली आहेत.

वीर विभूतिपूजन

पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा गौरव ही स्वाभिमानी राष्ट्राची जशी अपरिहार्य अंगे आहेत तसेच वीरविभूतिपूजन हेही महत्त्वाचे आणि प्रधान अंग आहे. राधारमणांनी आपले ' फडणीस काव्य ' या एकमेव हेतूनेच लिहिलेले आहे. याच भूमिकेतून ' आर्यमाता विलाप ', ' महाराष्ट्र वीरादर्श ', ' मोरोपंतांचा प्रभुद्रोह ' आणि ' जहाल आणि मवाळ ' या सर्व काव्यांची निर्मिती झालेली आहे.

महापुरुषांच्या निधनानंतर लिहिलेल्या विलापिका

ह्या विलापिका म्हणजे विभूतिपूजनाचाच प्रकार आहे. राष्ट्रभक्तीचे ते एक लक्षण आहे. राष्ट्रभक्तांबद्दल वाटणारा जिव्हाळा, प्रेम, आदर, कृतज्ञता इत्यादी भावनांचे दर्शन या विलापिकांच्याद्वारे कवीने घडविले आहे. पुण्य-श्लोक अण्णासाहेब पटवर्धन, न्या. मा. गो. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले या राष्ट्रनेत्यांचे कृतज्ञतापूर्वक गुणगान या विलापिकांतून केलेले असून त्यांच्या निधनाने राष्ट्राची महान हानी झालेली असल्याचे सूचित केलेले आहे.

वर्तमानकाळाचे प्रतिबिंब

राधारमणांची कविता ही वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब दाखविणारी किंबहुना वस्तुस्थिती सांगणारी कविता आहे. महाकवी सावरकर आणि कवी गोविंद यांच्या कवितेत जसे तत्कालीन राजकीय सामाजिक घटनाप्रसंगांचे साद पडसाद बघायला मिळतात तसाच प्रकार राधारमणांच्या काव्याचा आहे.

राष्ट्रीय आशावाद

राधारमणांची दैवते प्रयत्नवादी, पराक्रमप्रवण आणि निष्ठावान असल्याने त्यांची कविता राष्ट्रीय आशावादाने परिपूर्ण आहे. परिस्थितीचे आघात सोसून खंबीरपणाने पुढे जाण्याचे किंबहुना परिस्थितीची आव्हाने स्वीकारण्याचे कार्य त्यांच्या दैवतांनी केलेले आहे. प्रभू रामचन्द्र, भगवा

श्रीकृष्ण, छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास, नाना फडणीस आणि लो. टिळक ही ती दैवते. परिस्थितीवर विजय मिळविणे हे त्यांचे उद्दिष्ट म्हणूनच त्यांच्या कवितेत दुर्दम्य आशावाद आहे. त्याचा एकच नमुना देतो. भारतमातेच्या मुखानेच कवीने आपला आशावाद सांगितला आहे.

" विश्वास आत्मगत जो दृढ नित्य पूत
तो सिद्धिचा सकल संमत अग्रदूत;
त्या मानसी दृढ धरा स्मरुनी अजाला
येईल निश्चित दया तुमची तयाला " (– आर्यमाता विलाप)

या आशावादाला ' भगवंताचे अधिष्ठान ' असल्याने तो अभंग ठरलेला आहे.

टीकाकारांचे अभिप्राय

राधारमणांनी आपली काव्यनिर्मिती सहेतुक केलेली असल्यामुळे आणि त्यांचा ओढा राष्ट्र-भक्तीकडे असल्यामुळे त्यांच्या कवितेला प्रचारकतेचा वास केवळ कलावादी टीकाकारांना येणे स्वाभाविक आहे. परंतु मानवी जीवनातील विविध जाणिवांप्रमाणेच राष्ट्रभक्ती ही एक प्रभावी जाणीव आहे आणि प्रेमाकरिता जसा माणूस वाटेल तो त्याग करायला सिद्ध असतो तसाच राष्ट्रभक्ती या मूल्यासाठी सर्वस्वाचा त्याग माणूस करतो हे इतिहासाने आणि अनुभवाने सिद्ध झालेले आहे. या मूल्यांसाठी अनेकांनी अत्यंत नाजूक असे कौटुंबिक पाशही झुगारून दिल्याची लक्षावधी उदाहरणे आहेत. ज्याच्याकरिता जगावे आणि ज्याच्याकरिता मरावे असे हे मूल्य आहे.

प्रा. रा. श्री. जोगांनी राधारमणांच्या टिळकभक्तीचे महत्त्व लक्षात घेऊन तिचा संबंध कवीच्या स्थिर वृत्तीशी लावला आहे. आचार्य स. ज. भागवत राधारमणांच्या समग्र काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, " राधारमणांच्या एकंदर काव्यरचनेचा निम्याहून थोडा अधिक भाग टिळकांच्या स्वाभिमानी उद्‌गायनात खर्ची पडलेला असल्यामुळे राधारमणांना टिळकांच्या जीवनादर्शाचे महाराष्ट्र काव्यक्षेत्रातील प्रामाणिक प्रतिनिधी मानले पाहिजे." [१३३] आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या पहिल्या भागात डॉ. अ. ना. देशपांडे यांनी स. ज. भागवतांचाच अभिप्राय उद्‌धृत करून मान्यता दिलेली आहे.

काव्यस्वरूप व समारोप

संस्कृत साहित्याचे सखोल संस्कार राधारमणांच्या वाणीवर झाल्यामुळे तिच्यात संस्कृतचे प्राचुर्य तर आहेच पण ती अर्थभारवती व ओजस्वी झालेली आहे. यमक अनुप्रासात्मकतेमुळे ती नादमधुर, भावपोषक आणि श्रवणीय झालेली आहे. ह. कि. तोडमलांनी, " त्यांची भाषा कलावती वाणी आहे." [१३४] असा जो अभिप्राय दिला आहे तो समर्पक आहे. नित्याचे अलंकार त्यांनी आपल्या काव्यसुन्दरीच्या अंगावर घातलेले आहेत. त्यामुळे ती आल्हाददायी झालेली असून तिचे स्वरूप एखाद्या राजकन्येसारखे आहे. अक्षर गणवृत्तावर त्यांचे विलक्षण प्रभुत्व आहे. राष्ट्रभक्तीने संपन्न अशा त्यांच्या कवितेचे अंतर्बाह्य स्वरूप त्यांच्याच शब्दांत,

" सुवर्णे गुणे जी हरी अंतरंग । कधीही रसाचा करी जी न भंग
सदा सेविता शुद्ध जी भाव दावी । कवीची कृती ती सतीशी वदावी "

असे विलोभनीय आहे.

कवी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१८७१–१९३४)

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे सुप्रसिद्ध नाटककार आणि विनोदी निबंधकार म्हणून महाराष्ट्राला विशेष परिचित आहेत. कल्पनारम्य नाट्यसृष्टीचे आणि आधुनिक विनोदी निबंधाचे ते जनक म्हणून ओळखले जातात. साहित्याचे टीकाकार, कादंबरीकार आणि आत्मचरित्रकार म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. मराठी पाचव्या आणि इंग्रजी चौथ्या इयत्तेत असताना कोल्हटकरांनी किशोरवयातच नाटके लिहिल्याचे त्यांच्या चरित्रावरून दिसते. कोल्हटकर हे कवीही होते आणि त्यांच्या स्फुट कविता 'गीतोपायन' या पुस्तकात समाविष्ट आहेत कोल्हटकरांचा कवी म्हणून जो लौकिक आहे तो त्यांच्या सुप्रसिद्ध 'महाराष्ट्र गीता' मुळे. या महाराष्ट्र गीतासारखीच गीते अनेक कवींनी लिहिलेली आहेत. उदा. कवी विनायकांचे, 'महाराष्ट्र लक्ष्मी', ल. रा. पांगारकरांचे 'महाराष्ट्र महोदय', दत्तोपंत तुळजापूरकरांची 'महाराष्ट्र–भूपाळी' आणि 'महाराष्ट्र गीत' ही गीते, गडकऱ्यांचे 'श्रीमहाराष्ट्र गीत' अशा अनेक गीतांच्या तुलनेत कोल्हटकरांचे 'महाराष्ट्र गीत' अतिशय ओजस्वी, आशयसंपन्न आणि सरस आहे.

मराठी परंपरा, पूर्व वैभव, पूर्वजांचा पराक्रम, मराठी बाणा आणि महाराष्ट्रधर्माचे मर्म सांगणारे अत्यंत उत्स्फूर्त आणि ओजस्वी असे हे गीत आहे. या गीताची सुरुवात

"बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश–हा !"

अशी झालेली असून, शेवटची कडवी अशी आहेत,

"विक्रम– वैराग्य एक जागि नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म–राजकारण समवेत चालती
शक्ति–युक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ।"

थोडक्यात हे मराठीचे, महाराष्ट्राचे अमरस्तोत्र आहे.

लो. टिळकांचा गुणगौरव करणारे आणि त्यांच्यावर विलापिका लिहिणारे काही कवी

१९२० पर्यंत भारतीयांचे राष्ट्रपुरुष लो. टिळकच होते. अनेक त्यांना भगवान 'तिलक' म्हणूनही संबोधित असत. पण अचानक या प्रतापी सूर्याचा अकाली अस्त झाला आणि राष्ट्राला अंधारल्यासारखे वाटले. म्हणूनच डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "टिळकभक्ती हा अनेक काव्यांचा विषय झालेला आहे. टिळकांच्या निधनानंतर वाटलेला शोकभाव व्यक्त करण्याकरिता आणि त्यांचा गुणगौरव गाण्याकरिता कित्तीतरी कवींनी कवितालेखनाच्या माध्यमाचा उपयोग केलेला आहे."[१७५] डॉ. देशपांडे यांचे प्रस्तुत विधान लोकांचा लोकमान्यांप्रती असलेला परम आदर आणि आत्यंतिक प्रभाव सिद्ध करणारे आहे. लोकमान्यांना 'अकरावा अवतार' म्हणून गौरविणारे केशवकुमार, 'संगीत टिळक–चरित्र' आळविणारे कवी शं. ब. नाचणे, अभंग रचना करून 'संक्षिप्त टिळक चरित्र' गाणारे कवी रा. ह. पतकी, 'हिंदुस्थानचा देदीप्यमान तारा' म्हणून गौरविणारे कवी वा. म. आठल्ये, 'कमलावर' (लो. तिलकांजलि काव्य) आणि 'अस्तोदय' (टिळकविलापिका) ही दोन्ही काव्ये रचणारे शं. शा. काळे, 'राष्ट्रतिलक' म्हणून स्मृतिसुमने वाहणारे कवी क. कृ. जोशी, 'तुटलेला तारा',

लिहून लाक्षणिक अर्थाने दुःख व्यक्त करणारे कवी तारकानाथ, याशिवाय 'तिलक शोकगीत' गाणारे रा. वा. दाते, 'टिळकांचा पोवाडा' गाणारे माधवात्मज, 'तिलक कुसुमांजली' आदरपूर्वक अर्पण करणारे मु. ग. मिरजकर, 'टिळकनिधन दुःखोद्‌गार' प्रकट करणारे कवी गो. रा. मोघे, 'तिलकांजलि' वाहणारे ल. ग. लेले, 'टिळक गीतपंचक' कर्ते भा. रे. शेंदूर्णीकर, 'महाराष्ट्र नृपवृत्त' कथन करणारे कवी कृ. भि. पळनिटकर, 'श्रीतिलक महाकाव्य' रचयिते कवी मयुरी अशी अनेक टिळकविषयक काव्ये लिहिली आहेत ती त्यांचे विभूतिमत्त्व सिद्ध करणारी आहेत. त्यानंतरच्या काळातही लो. टिळकांचा प्रभाव कायमच आहे.

ऽऽ

६

राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा–कालखंड
(१९२२ ते १९३५)

प्रास्ताविक– लो. टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीने स्वातंत्र्याचा संदेश सामान्य लोकांपर्यंत पोहचविला. बहिष्कार, कायदेभंग, वंगभंग, होमरूल इत्यादी चळवळींनी लोकांमध्ये इंग्रजी राजवटीविरुद्ध असंतोष निर्माण केला म्हणून ते भारतीय असंतोषाचे जनक ठरले. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील सुशिक्षितवर्ग जागृत झाला. बहुजन समाजालाही लो. टिळक हेच आपले हितकर्ते आहेत असे वाटू लागले. त्यामुळे सुधारणावादी लोकांनी ' तेल्या तांबोळ्यांचे पुढारी ' म्हणून त्यांचा उपहासही केला. टिळकांच्या काळात जी कार्यकर्त्यांची पिढी उदयास आली ती प्रामुख्याने सुशिक्षित मध्यमवर्गीय समाजातून आलेली होती. १९२० साली लो. टिळकांचे निधन झाल्यानंतर राष्ट्रीय सभेचे आणि भारताचेही नेतृत्व गांधीजींकडे आले.

विधायक कार्याची महाराष्ट्राची परंपरा– स्वराज्याच्या चळवळीबरोबरच गांधीजींनी विधायक कार्यालाही सुरुवात केली आणि त्यांच्या कार्यपद्धतीमुळे बहुजन समाजातील लोक राष्ट्रीय चळवळीत समाविष्ट झाले. पुढे त्यातूनच बहुजन समाजातील नेतृत्वही उदयास आले असे सांगितले जाते. परंतु या विधायक कार्याच्या परंपरेचे श्रेय महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना दिले पाहिजे, असे प्रतिपादन गांधी जन्मशताब्दीनिमित्त प्रकाशित झालेल्या गांधीगौरव ग्रंथाचे परीक्षण करताना डॉ. सुरेश डोळक्यांनी केले आहे. त्यांच्या विस्तृत विवेचनाचा थोडक्यात भावार्थ असा की, गांधीजींचे नेतृत्व अस्तित्वात येण्यापूर्वीच राष्ट्राकरिता त्याग करण्याची उत्कट भावना, स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाहीच्या तत्त्वांचा पुरस्कार, अस्पृश्यतानिवारण, स्त्रीशिक्षण आणि त्यांच्या दास्यमुक्तीची चळवळ, सत्यनिष्ठा, चारित्र्यनिर्मिती, स्वदेशी, स्वावलंबन, बहिष्कार, साधनशुचिता या तत्त्वांचा पुरस्कार करणारे महापुरुष महाराष्ट्रात निर्माण झालेले होते. बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. मा. गो. रानडे, लो. टिळक, आगरकर, नामदार गोखले, सार्वजनिक काका, महर्षी वि. रा. शिंदे, अण्णासाहेब कर्वे इत्यादी नावे त्या संदर्भात उल्लेखनीय आहेत. डॉ. डोळके पुढे म्हणतात, " कदाचित सार्वजनिक काका, फुले, रानडे, गोखले व त्यांच्याच तालमीत तयार झालेले कर्वे, शिंदे प्रभृतींचे सत्यपूत सेवामय जीवन डोळ्यांपुढे असल्यामुळेच महात्माजींना साबरमतीच्या काठावर सत्याग्रहाश्रम काढण्याची स्फूर्ती झाली असावी."[१]

गांधीजींचे अपूर्वत्व– जुन्याच विधायक कार्याची परंपरा चालविण्यात गांधीजींचे कर्तृत्व नाही तर विविध स्तरांतील कार्यकर्त्यांना संघटित करून त्या सर्वांचा उपयोग स्वातंत्र्याच्या आणि विधायक कार्यासाठी करून घेण्याच्या लोकोत्तर कर्तृत्वात आहे. गांधीजींनी मानवतावादी स्वरूपाच्या राष्ट्र-

वादाचा स्वीकार करून लोकांना प्रभावित केले आणि स्वतःच्या आदर्श जीवनाने लोकांना राष्ट्रीय कार्याचे धडे दिले. डोळक्यांच्या शब्दांत सांगावयाचे तर "व्यक्तिधर्म आणि समाजधर्म, आत्मदर्शन आणि सामाजिक उद्धार, नैतिक सामर्थ्य आणि भौतिक प्रगती, धर्म आणि राजकरण, सामाजिक आणि राजकीय यात गांधीजींच्या दृष्टीने फरकच नव्हता. गांधीजींनी या सर्वांचे एकरूप रसायन कार्यान्वित केले की त्यामुळे व्यक्तीला आणि समाजाला स्वतःचा सर्वांगीण व सर्वस्पर्शी उद्धाराचा एक नवाच युगधर्म गवसला."[२] ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेऊनच या कालखंडाला गांधीजींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला कालखंड असे ही नाव दिलेले आहे.

या कालखंडातील काही महत्त्वाच्या राष्ट्रीय घटना– चंपारण्यातील सत्याग्रहाने भारतीयांना गांधीजींच्या कार्याचा परिचय झाला. रौलट ॲक्ट, जालियनवाला बाग हत्याकांडानंतर, गांधीजींनी राष्ट्रव्यापी अशी असहकाराची चळवळ केली. चौरी चौरा हत्याकांडात हिंसेचा अतिरेक झाल्याचे लक्षात येताच गांधींनी पूर्ण चळवळच स्थगित केली. कार्यकर्त्यांना आलेली निराशा, गांधीजींना अटक, शिक्षा, पुढे त्यांचे आजारपण, सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी संपूर्ण देशभर निदर्शने, निदर्शकांवर अत्याचार, लाठीहल्ले, लाला लजपतराय लाठी हल्ल्यात जखमी झाले, एका आठवड्यानंतर लालाजींचे निधन, संपूर्ण देशात लोकसंतप्ततेची उठलेली लाट, क्रांतिकारकांनी केलेली प्रतिशोध घेण्याची सिद्धता इत्यादी घटनाही महत्त्वाच्या आहेत. १९२९ चा काँग्रेसने केलेला संपूर्ण स्वराज्याच्या मागणीचा ठराव, पुढे १९३० ची पुन्हा देशव्यापी कायदेभंगाची चळवळ, दांडीमोर्चा, मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, करबंदीची मोहीम, देशातील लक्षावधी लोकांना झालेली अटक, अनेकांचा छळ, तुरुंगवासाची शिक्षा, शेवटी गांधी इर्विन करार, गोलमेज परिषदेसाठी गांधीजींची विलायतवारी आणि १९३५ मधील सुधारणा कायदा इत्यादी प्रमुख घटना सांगता येण्यासारख्या आहेत.

सायमन कमिशनविरोधात निदर्शने केल्याचे निमित्त करून ब्रिटीश शासनाने केलेली दडपशाही, सशस्त्र क्रांतिकारकांनी दहशतवादाच्या मार्गाने त्या दडपशाहीला दिलेले चोख उत्तर, काकोरीजवळ सशस्त्र क्रांतिकारकांनी रेल्वेत घातलेला दरोडा, युरोपियन पोलिस सुपरिंटेंडेंट सँडर्सचा वध, दिल्ली असेंब्लीवर आणि व्हाईसरॉयच्या खास गाडीवर बॉम्बफेक, रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्लाखा, राजेंद्र लाहिरी, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव व बटुकेश्वरदत्त इत्यादी क्रांतिकारकांना फाशी, अनेकांना आजन्म काळ्या पाण्यांच्या शिक्षा, पुढे चंद्रशेखर आझादाचे हौतात्म्य इत्यादी लहान मोठ्या प्रक्षोभक राष्ट्रीय घटनांनी हा कालखंड व्यापलेला आहे.

राष्ट्रीयतेच्या चैतन्याची अमर गाथा गाणारे सेनापती बापट (१८८०–१९६७)

पांडुरंग महादेव उपाख्य सेनापती बापट हे कवी बापटांपेक्षा महान त्यागी राष्ट्रभक्त म्हणून अधिक ओळखले जातात. सशस्त्र क्रांतिकारक, मुळशी पेठ्याच्या सत्याग्रही लढ्याचे सेनापती, एक तत्त्वचिंतक आणि समाजसेवक म्हणूनही सेनापती बापटांचा लौकिक आहे. वास्तविक महाकवी सावरकरांचे एक क्रांतिकारक सहकारी म्हणून बापटांना त्यांच्याच कालखंडात स्थान द्यावयाला हवे. परंतु बापटांची काव्यनिर्मिती नंतरची असल्याने प्रस्तुत कालखंडात त्यांना पहिले स्थान देण्यात आले आहे. स्वा. सावरकरांप्रमाणेच बापटांचे जीवनही साहसी नि अद्भुतरम्य अशा विविध प्रसंगांनी संपन्न आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर हे सेनापती बापटांचे जन्मग्राम. प्राथमिक शिक्षण पारनेर येथेच आटोपून पुढील शिक्षणाकरिता अहमदनगर आणि पुण्याला त्यांना राहावे लागले. बापट

मॅट्रिकला संस्कृतची दुसरी 'जगन्नाथ शंकर शेट' ही शिष्यवृत्ती घेऊन उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य झाले. पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून बापट पदवीधर झाल्यावर एम्. ए., एल्एल्. बी. च्या अभ्यासासाठी त्यांनी मुंबई गाठली. १९०२ मध्येच सर्वस्वाचा त्याग करून राष्ट्रसेवा करण्याची बापटांनी शपथ घेतलेली होती आणि त्या काळच्या रूढीप्रमाणे बापट विवाह-बद्धही झालेले होते. मुंबई विद्यापीठाने बापटांना मुजुमदार शिष्यवृत्ती दिली. त्यामुळे एम्. ए. सोडून ते मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी स्कॉटलंडच्या एडिंबरो येथील इंजिनियरिंग कॉलेजात दाखल झाले आणि बापटांच्या जीवनात परिवर्तन घडून आले. देशभक्तीची शपथ घेतलेल्या या क्रांतिकारकाने प्रथम वर्षभर कॉलेजच्या क्विन्स क्लबात बंदुकीच्या नेमबाजीचे शिक्षण घेतले. काही सहकारी मित्रांच्या आग्रहाने 'भारताची सद्यःस्थिती' आणि 'भारतातील ब्रिटीश सत्ता,' या दोन विषयांवर जाहीरपणे अभ्यासपूर्ण निबंधवाचन केल्याचे निमित्त होऊन त्यांची मुजुमदार शिष्यवृत्ती गेली. बापटांनी इंजिनियरिंगचा अभ्यास सोडला व ते 'इंडिया हाऊस'मध्ये आश्रयाला आले व स्वा. सावरकरांचे सहकारी झाले. बापट हे अत्यंत जहाल विचारांचे देशभक्त. एकदा लॉर्ड मोर्लेला पिस्तुलाने ठार मारण्याचा विचार त्यांच्या डोक्यात आला. बाँब तयार करण्याचे शिक्षण पूर्ण होताच संपूर्ण ब्रिटीश पार्लमेंट उडवून देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. या दोन्ही प्रसंगी सावरकरांनी त्यांना त्या प्रयत्नापासून परावृत्त केले. त्यानंतर मात्र बाँबच्या ग्रंथासह आणि काही शस्त्रांसह बापटांची हिंदुस्थानात रवानगी करण्यात आली. भारतात आलेल्या बापटांनी प्रथम लोकमान्य टिळकांची भेट घेतली आणि त्यांच्याशी विचारविनिमय करणार एवढ्यात टिळकांनाच राजद्रोहाच्या निमित्ताने शिक्षा झाली व त्यांना मंडाले येथे नेण्यात आले. त्यानंतर आपल्या क्रांतिकार्यासाठी बापट कलकत्त्याला गेले आणि माणिकतोळा येथील कार्यालयात बंगाली क्रांतिकारकांना त्यांनी मार्गदर्शन केले. बाँबची कृती समजावून देऊन त्यांचे स्फोटही घडविले. परंतु धोरणासंबंधी मतभेद होताच ते पारनेरला आले व संसारी जीवन व्यतीत करू लागले.

थोड्याच दिवसांत कलकत्त्याच्या क्रांतिकारकांना ब्रिटीश सरकारने अटक केली व बापटांच्या अटकेचे वारंट काढले. ही वार्ता कळताच बापट अज्ञातवासात जीवन कंठू लागले. पुढे १९१२ साली बापट पकडल्या गेले व त्यांना कठोर कारावासाची शिक्षा झाली. १९२१ पासून मूळशी पेठ्याच्या लढ्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. याच आंदोलनात त्यांना सेनापती ही पदवी मिळाली.

राजकीय चळवळीत सुमारे सतरा वर्षे सेनापती बापटांनी तुरुंगवास भोगलेला आहे. समाजसेवा आणि स्वच्छतेच्या भूमिकेतून त्यांनी नगरस्वच्छतेचे कार्य स्वतःसाठी स्वयंस्फूर्तीने लावून घेतले. झाडू घेऊन ग्रामसफाई करणे हा त्यांच्या जीवनाचा एक भाग बनला. झाडू मारणे, स्वदेशी कपड्यांची गाढी ढकलणे, प्रभात फेऱ्या काढून लोकजागृती करणे, सत्याग्रह करणे, व्याख्याने देणे इत्यादी कार्यांत त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी स्वयंस्फूर्तीने भागानगर सत्याग्रहात जसा भाग घेतला तसाच 'चले जाव' च्या क्रांतियुद्धातही भाग घेतला. ते गोवामुक्ति आंदोलनातही आघाडीवर राहिले आणि अस्पृश्यांना पंढरपूरच्या मंदिराची दारे खुली व्हावीत म्हणून स्वर्गीय साने गुरुजींसोबत त्यांनी पंढरपूर येथे सत्याग्रह केला व तो यशस्वी झाला. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर झालेल्या आंदोलनात ते सेनापतीच्या भूमिकेत पुन्हा पुढे आले. देशासाठी, स्वातंत्र्यासाठी आणि अन्यायाच्या प्रतिकारार्थ सेनापतींनी आपले उभे आयुष्य खर्ची घातले.

बापटांची काव्यसंपदा– सेनापती बापटांनी विपुल काव्यनिर्मिती केलेली आहे. जगन्नाथ शंकर शेट शिष्यवृत्ती मिळालेले बापट हे शीघ्र कवी होते. त्यांचे काव्यमय आत्मचरित्र 'मुलांची मागणी' आणि 'दीन होम' या दोन भागांत आलेले असून अनुक्रमे २८७ आणि १७१ मिळून ४५८ अनुष्टुपात रचले गेले आहे. 'चैतन्यगाथा' या शीर्षकाने प्रकाशित झालेल्या आणि प्रामुख्याने राष्ट्रीय विषय असलेल्या कवितांची संख्या ७९ आहे. याशिवाय 'गीताहृदय' या काव्याच्या सुमारे ४५६ ओव्या आहेत. 'गीता समश्लोकी' ही सेनापतींनी लिहिली आहे. महर्षी अरविंदांच्या 'सावित्री' या सुप्रसिद्ध काव्याचे खंडकाव्यात रूपांतरही बापटांनी केलेले आहे. आरंभीच्या क्रांतिकालात लिहिलेली 'स्वतंत्रता सप्तशती' आणि 'क्रांतिगीता' या दोन्ही रचना त्यांनी आपल्या हाताने नष्ट केल्याचे आत्मचरित्रात नमूद केलेले आहे.

बापटांनी मराठीप्रमाणेच संस्कृत, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांतही काव्यरचना केलेली असून उपनिषदातील तत्त्वज्ञान सांगणारी इंग्रजी कविता " Holy Song " या शीर्षकाने प्रसिद्ध आहे. सहस्रावधी श्लोकांच्या संख्येने त्यांची काव्यरचना अस्तित्वात आहे. त्यांच्या काव्यनिर्मितीसंबंधी श्री. द. म. सुतार म्हणतात, " अनेकविध कार्यांत त्यांचे हात गुंतलेले असताना त्यांचे चिंतन सतत चाले. तसेच तुरुंगाच्या बाहेर असतील तेव्हा त्यांचे चिंतन त्यांच्या वाणीवाटे व्याख्यानाच्या रूपाने प्रगट होई आणि तुरुंगाच्या काळात त्यांचे विचार पद्याचे रूप घेऊन साकार होत." [३]

बापटांच्या काव्यामागील प्रेरणा आणि प्रवृत्ती– स्वत:च्या जीवनासंबंधी बापट आत्मचरित्रपर कवितेत सांगतात,

" चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते
मदर्थ हरिचे कष्ट पाहुनी प्रेम दाटते ।" (– आत्मचरित्र)

प्रस्तुत पंक्तीवरून हरिभक्तीने बालवयापासूनच बापटांचे अंत:करण व्यापलेले होते. प्रगाढ ईश्वरनिष्ठा हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. डेक्कन कॉलेजात अध्ययन करीत असताना राष्ट्रभक्तीची दीक्षा देण्याचे कार्य व्यायामशिक्षक भिडे गुरुजींनी केले आणि भवानी तलवारीची शपथ घेऊन सारे जीवन राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी देण्याची बापटांनी प्रतिज्ञा घेतली. त्या विधीचे वर्णन त्यांनीच पुढीलप्रमाणे केले आहे.

" अहा तो विधि दुर्वर्ण्य ! मंगली अति मंगल
हरिक्रिया तो तो देही मधुरा शांति निश्चल "

राष्ट्रभक्तीच्या निश्चयाचे श्रेयही बापटांनी श्रीहरीलाच दिलेले आहे.

या हरिभक्तीलाच बापटांनी राष्ट्रभक्तीत परिवर्तित केले. 'हरीच्या चरणी' या अभंगात ते सांगतात, " संतांच्या पद्धतीने देवाची उपासना करू लागलो पण मनाला शांती मिळेना,

यातना देशाच्या दूर करावया । जीव होमावया सांगे हरी ॥
हरीचे सांगणे आदरीले रंगे । तेणे जाला अंगे शांतीमय ॥"
(– रत्नागिरी तुरुंगातील कविता अभंग ४१; पृष्ठ १६५)

स्वधर्मनिष्ठ आईवडिलांना बापट गुरूंच्या स्थानी समजत असत. लोकमान्यांचा प्रभावही बापटांनी प्रांजलपणे मान्य केलेला आहे. ते लिहितात,

" मी प्रयत्नपुरुषार्थ – भुकेला । यत्नवादी गुरुचा लघु चेला !" (–लोकमान्य)

दुसऱ्या एका स्थळी ते म्हणतात, " विनागुरु, विनाग्रंथ श्रेष्ठपंथ कळेना। नाही सर्वज्ञा कोणा। नारायणा वाचून ।।" म्हणूनच सेनापतींनी अनेकांना गुरूचे स्थान दिलेले होते. एका तुरुंगातील पत्रात लिहितात, " माझ्या कल्पनेप्रमाणे माझ्या अगण्य गुरूंपैकी विशेष आवडीचे गुरू ज्ञानेश्वर, तुकाराम; रामतीर्थ यांच्या अवतारसमाप्तीप्रमाणे माझी समाप्ती व्हावी असे भालपट्टी लिखित आहे."[४]

सेनापतींचे अनन्यसाधारण राष्ट्रप्रेम– सेनापती बापटांच्या अनेक कविता त्यांच्या राष्ट्रभक्तीने रसरसलेल्या आहेत.

" हिंद-भू भक्ति मला प्यारी
माझि ही खुबसुरत नारी " (– माझी प्यारी)

अशा शब्दांत त्यांनी आपल्या राष्ट्रप्रेमाचे वर्णन केलेले असून या देशभक्तीरूप वधूचा हात धरूनच ते नाचत आहेत. त्यांच्या दृष्टीने देशार्थ सर्वस्व समर्पण हाच खरा धर्म. ते लिहितात,

" खरा धर्म देशार्थ हा जीव द्यावा।
खरा धर्म विश्वार्थ हा जीव द्यावा
खरा धर्म दुष्टासि दुर्दंड द्यावा
खरा धर्म नेई जना मोक्ष गावा ।।" (– खरा धर्म)

देशभक्ती हे वेड आहे याची जाणीव बापटांना आहे. एका ठिकाणी ते म्हणतात,

" देश–देश देश देश काय हे असे ?
जाणत्यासि कैसे हे लागते पिसे ?
विद्यासुख सोडितसे। आप्त मित्र टाकितसे ।
देह बळी देत असे। काय अशी देशमयी वृत्ती ही असे ।।" (–देशपिसे)

एका ठिकाणी भगिनींना उद्देशून ते म्हणतात,

" भक्ति उज्ज्वल बाणली राष्ट्रभूची। नसे चिंता त्या लाडक्या वधूची।
वृद्ध पितरा बालका लाडकीतें, निरखी हरिकरि देश चाकरी तें !"
(– भगिनीस विनंती)

देश आणि देव यांचे अद्वैत त्यांच्या अनेक कवितांतून आढळते. ते लिहितात,

" नका देवाते विसरू। नका देशाते विसरू
देश हिंदुस्थान माझा। देव हिंदुस्थान माझा "

उत्कट राष्ट्रभक्तीचा उदय क्रियाशक्तीची निर्मिती करणारा आहे असा बापटांनी आपला अनुभव सांगितला आहे. ते म्हणतात;

" उगवता मनीं राष्ट्रभक्ति। रम्य हो स्वये क्रियाशक्ती "

या आत्मप्रत्ययाचा साक्षात्कार सर्व भारतवासीयांना व्हावा यासाठी त्यांची सर्व धडपड आहे. ते काकुळतीला येऊन लोकांना म्हणतात,

" देशाचा संसार माझे अंगावरी। ऐसे थोडे तरी वाटू द्या हो।
" वाटू द्या हो थोडे तरी प्रत्येकासी। माझी कासाविसी याचसाठी "

दुसऱ्या एका ठिकाणी सांगतात

" देश देश ऐसा सोस कधी घ्याल
कधी मोक्षमार्गावरती वाटसरू व्हाल !" ॥ ध्रु ॥ (–देशभक्ति)

या कवितांशिवाय, ' मुलास बोध ', ' खरा धर्म ', ' भगिनीला विनंती ', ' सर्वांचा संसार '; ' कवीस विनवणी ', ' हिन्दू ', ' देशभक्ती ', ' देशपिसे ', ' राष्ट्रभक्तीचा उदय ', ' देशदेव ', ' माझी प्यारी '; ' खरा मार्ग ', ' हरीच्या चरणी ', इत्यादी कवितांतून बापटांनी आपल्या अन्तःकरणातील देशावद्दलचे उत्कट प्रेम व्यक्त केलेले आहे. त्यांच्या राष्ट्रभक्तीची तुलना स्वातंत्र्यकवी गोविंद आणि महाकवी सावरकर यांच्या राष्ट्रभक्तीशीच करता येते.

पारतंत्र्याचा तिटकारा आणि स्वातंत्र्याचा ध्यास– इतर राष्ट्रकवींप्रमाणेच बापटांनाही पारतंत्र्याचा तिटकारा आहे. पारतंत्र्याचे दुःख त्यांनी आपल्या अनेक कवितांतून उत्कटतेने प्रकट केले आहे. एका अभंगात ते म्हणतात,

" हीन पराधीन जिणे । देश तेणे दुःखार्त
तया करावया स्वतंत्र । योग्य मंत्र योजावे ।" (– हरीच्या चरणी)

दुसऱ्या एका ठिकाणी म्हणतात,

" सर्वांचीच अवदशा । दास्य जोवरी स्वदेशा
देशावरी परसत्ता । राहणार मदमत्ता " (– हरीच्या चरणी)

' हरीच्या चरणी ' या शीर्षकाखाली रचलेल्या अनेक कवितांमधून देशाच्या पारतंत्र्यासंबंधीची खंत तीव्रपणे व्यक्त झालेली आहे. पारतंत्र्यातील भारतमातेचे दुःख पाहून सेनापतीच्या अंतःकरणाला झालेल्या वेदना आणि त्यांनी केलेली आत्मनिर्भर्त्सना त्याबरोबरच देशभक्तांना कळकळीचे आवाहन त्यांच्या ' येणार कोण बोला ?' या सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवितेतून व्यक्त झालेले आहे. ते विचारतात,

" आईवरी विपत्ति आम्ही मुले कशाला ?
बंदीत मायभू ही आम्ही खुले कशाला ?
रक्ताळले शरीर भडका जिवात झाला ।
आईस सोडवाया येणार कोण बोला ? ॥" (– येणार कोण बोला !)

दुसऱ्या कवितेत म्हणतात,

" तत्त्व देशस्वातंत्र्याचे । राहो हृदयीं नित्याचे
त्याचे प्रकाशे चालावे । त्याचे प्रकाशे बोलावे ॥" (–हरीच्या चरणी)

देशाची पारतंत्र्यातून मुक्तता करणाऱ्याला विश्वभक्त म्हणून ओळखले पाहिजे असे सेनापती बापट सांगतात.

" देश परतंत्र । तया करावा स्वतंत्र ।
तंत्र करी युक्त । तोचि खरा विश्वभक्त "

वीरांनी सदासर्वदा खलसत्तेचा प्रतिकार करावा असे बापट सांगतात.

" सोडू नका खलसत्ता प्रतिकार । करा जयजयकार स्वातंत्र्याचा "

दास्यमुक्तीसाठी हौतात्म्य स्वीकारण्याची सिद्धता हवी

स्वातंत्र्य ही सहजासहजी आणि झटपट मिळणारी गोष्ट नाही. त्याच्या प्राप्तीकरिता प्रसंगी सर्वस्वाचा त्याग करून मृत्यूशी मित्रता जोडण्याची तयारी ठेवली पाहिजे. एखादी मौल्यवान वस्तू संपादन करावयाची असल्यास तिचे योग्य मोल देऊनच ती घेतली पाहिजे. सेनापती सांगतात,

" न दास्यांतुनी मुक्ति देशासि जो, मृत्यु नाही अम्हा मित्रसा भासत
न दास्यातुनी मुक्ति जो होमकुंडी, हजारो न घेती उडी हांसत ॥"
(– माझा महाराष्ट्र)

दुसऱ्या एका कवितेत आत्मसमर्पणाची सिद्धता सांगताना बापट सांगतात,

" हा येथ फास "–पाट ही येथ फास दोरी
हे आर्य–माय ! आई ! जातो फिरुनी या या
येतो त्वरें फिरुनी होऊनि देहधारी " (– पाश मंत्रावर)

अशा अनेक कवितांतून बापटांनी हे स्वातंत्र्याचे स्तोत्र आळविले आहे.

पूर्वपरंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण– राष्ट्रभक्ती, पारतंत्र्याचा तिटकारा आणि स्वातंत्र्याचा ध्यास या विशेषांबरोबरच बापटांच्या राष्ट्रीय कवितेतून पूर्वपरंपरेच्या अभिमानाचे दर्शन घडते. साने गुरुजींच्या शब्दांत सांगावयाचे तर, " सेनापतींना पूर्वपरंपरेप्रमाणेच भारताचा अभिमान वाटतो आणि महाराष्ट्राचाही वाटतो. महाराष्ट्राने भारताचा भार अधिक प्रमाणात घ्यावा असे त्यांना वाटते. शिवबाचा महाराष्ट्र, वीरांचा व संतांचा महाराष्ट्र मागे राहू नये म्हणून त्यांची कासाविशी होत असते. महाराष्ट्राने आघाडीवर राहिलेच पाहिजे. त्यासाठी त्याग करावा." [५]

" हिंदराष्ट्र हे सत्वर व्हावें खरे खरे राष्ट्र
राष्ट्रकारणी पुढे असावा थोर महाराष्ट्र ॥"

महाराष्ट्राबद्दलच्या बापटांच्या अशा आशाआकांक्षा होत्या. महाराष्ट्राची झुंझार परंपरा सांगताना बापट सांगतात,

" मराठे अम्ही श्री शिवाजी प्रभूचे । अम्ही पांग फेडूच ह्या आर्यभूचे
असे पंगु का आमुची राष्ट्र–माता । अम्ही जाणतो वर्म हे पूर्ण आता "
(– निरोप सहावा)

क्षात्रधन महाराष्ट्रासंबंधी आपला अभिमान व्यक्त करताना बापट म्हणतात,

" माझा महाराष्ट्रजन । महाथोर क्षात्रधन
क्षात्रधन हे देशाचे । महाराष्ट्र असे साचे "
(– क्षात्रधन महाराष्ट्र (अभंग)

क्षत्रिय मराठ्यांप्रमाणेच सेनापतींना मराठी संतांचाही अभिमान आहे. ' क्षात्रधन–महाराष्ट्र ' या कवितेत म्हणतात,

" माझ्या महाराष्ट्री सन्त । किती जाले जातिवंत ··· ···
माझा शिवरायाचा । महाराष्ट्र हा समर्थ दासांचा " (–हरीचा धर्म)

अशा प्रकारे भारत, महाराष्ट्र आणि त्यातील संतपुरुष यांच्यासंबंधीचा अभिमान बापटांनी समर्थपणे व्यक्त केला आहे. महाराष्ट्र जगला तर देश जगेल आणि महाराष्ट्र मेला तर देश मरेल असा आत्म-गौरवपर श्लोक सेनापतींनी लिहिला आहे. ते म्हणतात,

" महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्या–विना राष्ट्रगाडा न चाले ॥"

चैतन्यगाथेतील आणि रत्नागिरी तुरुंगात लिहिलेल्या अनेक कवितांतून परंपरांचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण आलेले आहे. रसिकांनी ते मुळातून वघायला हवे !

वीर विभूतिपूजन

सेनापती बापटांचे संपूर्ण आयुष्यच स्वातंत्र्यलढ्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यात व्यतीत झाले आहे. आस्तिक, श्रद्धावान पण चिंतक बापटांच्या पराक्रमी जीवनाची प्रेरणाच मुळी श्रीहरी आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यसंभारात श्रीहरीविषयक कवितांची संख्या विपुल आहे. 'हरि स्मरणी', 'हरीची योजना', 'हरिकृतिसप्तक', 'हरिनीतिसप्तक', 'हरिदयाष्टक'; 'हरिवेडदशक', 'हरिदास्यपंचक', 'हरीपाशी मागणी', 'हरीची सुई', 'हरिभजन'; 'श्रीहरीचे शांतिशास्त्र' अशा अनेक कविता आलेल्या आहेत. त्यातून त्यांची प्रबल हरिनिष्ठा व्यक्त होते. एकनाथ, नामदेव, तुकोबा यांच्या गायेत शोभून दिसतील असे शेकडो सरस अभंग आधुनिक भारताच्या या सेनापती संताने लिहिले आहेत. केवळ छंद-विशेष म्हणून हे अभंग बापटांनी लिहिले नाहीत तर त्यामागे त्यांच्या श्रीहरीच्या भक्तीची उत्कटता आहे. 'हरिस्मरणी' या काव्यात पृथ्वी वृत्तात त्यांनी अनेक श्लोक लिहिले आहेत.

"हरी तनुमनादिकी करित ही तुझी चाकरी
जशी शिकविशी तशी तुज कळे वरी ना वरी" (-हरिस्मरणी श्लोक ११)

छत्रपती शिवाजी महाराज हे तर महाराष्ट्राचे ऐतिहासिक दैवत आहे. वीर विभूतिपूजनात त्यांना नेहमीच महाराष्ट्रीय कवींनी स्थान दिलेले आहे. मुळशी पेठ्याच्या सत्याग्रहामुळेच बापटांना सेनापती ही पदवी लोकांनी दिली. तुरुंगातून सत्याग्रहींना केलेल्या आवाहनात बापटांनी शिवाजी महाराजांची व मराठे वीरांची सत्याग्रही वीरांना आठवण करून दिली आहे. ते म्हणतात,

"शिवरायाचे तुम्ही मराठे तुमचा शिवराय
प्रतापशाली आहे तुमचा निःसंशय काय" (- निरोप पाचवा)

शिवछत्रपतीबरोबर समर्थ रामदासांचेही पूजन बापटांनी अनेकदा केलेले आहे.

"श्री समर्थकृति वंदूनी मनीं। या चला धृति वरुनिया क्षणीं" (-गूही गूही)

आधुनिक काळातील महापुरुष म्हणून लोकमान्य टिळकांचे विभूतिपूजन बापटांनी आदरपूर्वक केलेले असून ते त्यांच्या 'लोकमान्य', 'लोकमान्य जयत्विह' आणि 'अभंग गीता' या रचनांमधून आलेले आहे. 'लोकमान्य' या कवितेत ते सांगतात,

"लोकमान्य ! तुमच्या करणीने। स्थैर्य धैर्य सुभगा सरणीने
लोकमानस विनम्र जहाले। 'लोकमान्य' पद अर्पित कालें" (-लोकमान्य)

राष्ट्रीय आशावाद

श्रीहरिनिष्ठेमुळे सेनापती बापटांच्या राष्ट्रीय कवितेत सर्वत्र आशावाद आणि प्रयत्नवाद यांचाच प्रत्यय येतो. परमेश्वरावर निष्ठा असणारा माणूस दैववादी बनतो असा तर्क भौतिकवादाचा पुरस्कार करणारे लोक मांडतात. तो बरोबर आहे की चूक याचा निर्णय करण्याचे हे स्थळ नव्हे. परंतु ईश्वरावर आत्यंतिक निष्ठा बाळगणारे बापट जसे कार्यवादी तसेच आशावादीही आहेत. ते एका अभंगात लिहितात,

" जातिवंत संतजन । त्यांचे कुळीचे हे जन ।
महाराष्ट्रीय या देशा । सोडवितील ही आशा " (-क्षात्रधन महाराष्ट्र अभंग)

दुसऱ्या एका कवितेत स्वतंत्र भारताचे लोकशाही समाजवादाचे चित्रच त्यांनी रेखाटले आहे.

" पूर्ण लोकसत्ता राष्ट्री साम्य विभवभोगी
पुढे शक्य सोडवि आधी राष्ट्रभूमि देवी ।" (-इष्ट मालिका श्लोक ५)

वर्तमानाचे प्रतिबिंब

सेनापती बापटांच्या राष्ट्रीय कवितेत भारताच्या तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि वैचारिक जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब पडलेले आढळते. सेनापतींचा पिंडच चिंतनशील, अध्यात्मप्रवण, देशभक्त कवीचा आहे, त्यामुळे त्यांच्या काव्यात भावनात्मकतेपेक्षा चिंतनाला, वैचारिकतेला प्राधान्य मिळालेले आहे. साने गुरुजींनी सेनापतींच्या प्रकृतीचे मोठे मार्मिक वर्णन केलेले आहे. ते सांगतात, " सेनापती म्हणजे मला शिवाजी, रामदास व तुकाराम यांची त्रिमूर्ती वाटते. सेनापती म्हणजे लोकमान्य, महात्माजी व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे अपूर्व असे मधुर मिश्रण वाटते. भक्ती, ज्ञान व सेवा यांची ही त्रिपदा गायत्री आहे."[१] मला मात्र महात्मा गांधी आणि सेनापती बापट यांच्या प्रकृतीत विलक्षण साम्य दिसते. आत्यंतिक ईश्वरनिष्ठा, सत्याग्रह, अहिंसा, स्वातंत्र्यनिष्ठा, राष्ट्रभक्ती, हरिजनोद्धार, अस्पृश्यतानिवारण, हिंदु-मुस्लिम ऐक्याचा आग्रह, ग्रामसफाई, मानवतावादाचे ध्येय, अध्यात्मप्रवणनैतिक जीवनाचा पुरस्कार, संयम, स्वावलंबन, निग्रह आणि साम्यवादाचे आकर्षण हे या दोनीही महापुरुषांत असल्याचे दिसून येते.

ज्या मुळशी पेठ्याच्या सत्याग्रहाने बापटांना सेनापती ही पदवी लाभली त्या सत्याग्रहाचे वर्णन त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केले आहे. या धरणाखाली बावन गावच्या बारा हजार लोकांच्या जमिनी जाणार होत्या. त्या लोकांची अन्नान्नदशा होणार होती. उद्योगधंद्यासाठी विजेची आवश्यकता सेनापतींनाही मान्य होती, परंतु त्यामुळे गरिबांचे संसार उघळले जाणार होते.

" बिजली युग हे ह्हावी बिजली, परि भाकरी
बारा हजार दीनांची काढणे न परी बरी " (-आत्मचरित्र)

यासाठी सेनापतींचा सत्याग्रह होता.

स्वातंत्र्याच्या लढ्यात सर्वांना सहभागी करून घेतल्याशिवाय आपण यशस्वी होणार नाही असे सेनापतींना वाटत होते. राष्ट्रीय ऐक्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. त्यांच्या अनेक कविता या ध्यासातून निर्माण झाल्या आहेत. राष्ट्रीय ऐक्याचा पुरस्कार करताना ते म्हणतात,

" मुस्लीम – हिंदू एकता ' अस्पृश्य ' हिंदू – एकता
या भारती सर्वैकता ह्हाया श्रमूं प्रेमी खरे " (-भारती गाडा, पृ. २०१)

या राष्ट्राला संजीवन देण्याचे कार्य विद्यासंपादनाद्वारेच होऊ शकते म्हणून भारतीयांना विद्यासंपन्न करा असा सेनापतींचा उपदेश होता. ते सांगतात,

" देश भारत हा भार जगा झाला । तया विद्या द्या जीव यावयाला ।
नसे औषध मुळि इच्याविणे काहीं । जीव आणाया हिंद-राष्ट्र-देहीं ।।" (-विद्या)

सेनापतींनी स्त्रियांनाही राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव दिली आहे. ' भगिनीस विनंती ', ' कन्या ', ' गतधवेस दीपावलि भेट ', ' ब्रह्मचर्य आणि विवाह ' इत्यादी कवितांतून त्यांनी आपल्या स्त्री-

सुधारणाविषयक कल्पना मांडल्या आहेत. निष्क्रियता, आळस, करंटेपणा, याने राष्ट्र विकास घडणार नाही. राष्ट्राचे दैन्य, दारिद्र्य नष्ट केले पाहिजे, त्यासाठी समर्थ रामदासांची शिकवण लोकांनी अंगी बाणवली पाहिजे असे त्यांनी सांगितले आहे.

"दैन्या तोंडी माती पडो हाचि ध्यास । लागला चित्तास टिळकांच्या
टिळकांच्या जीवी दास–शिकवण । शिको सर्व जन हेचि बुद्धि " (–दैन्य हाक)

हिंसा, अहिंसा, सत्य, धर्म यासंबंधी सेनापतींची मते निःसंदिग्ध आहेत. सेनापतींच्या काळात शांती, सत्य, हिंसा, अहिंसा या नीतितत्त्वांसंबंधी देशात खूप मंथन चालले होते. सेनापतींनी आपला निर्णय दिला,

" लागले वेड हे कोणा । अहिंसा–शब्द–घोकणी
न बुद्ध ख्रिस्त गांधीजी । अहिंसक असे कुणी
दुष्ट जे कपटी क्रूर अहिंसा–सत्य पालकां
सज्जना छळिता ती ते दंडिय सज्जन सेवका " (–प्रेमकथा श्लोक ६४ते६९)

मार्क्सच्या साम्यवादी विचारांचा काव्यातून फार मोठ्या प्रमाणात प्रचार करण्याचे कार्यही सेनापतींच्या कवितेनेच केलेले आहे. त्यांनी भौतिकवादी वेदान्ती स्मृतिकार म्हणून मार्क्सचा गौरव केलेला आहे. ' मजूर आणि भांडवलदार ', ' न्याहारीचे गाणे ', ' प्रेमकथा ', ' विरोध विकासवाद इत्यादी ', ' श्रमयुग ', ' साम्यवाद ' इत्यादी कवितांमधून साम्यवादाचे स्वरूप, तत्त्वज्ञान आणि त्यांचे वेदान्ताच्या आधारे महत्त्वही प्रतिपादन केले आहे.

" साम्यवाद शिकवी साम्य । त्याज्य त्या वर्ग वैषम्य
त्या इष्ट समाजी सत्ता । सर्वत्र समाजी मत्ता " (– साम्यवाद)

सेनापती म्हणतात,

" थोर ऋषी प्रयोगाचे – थोर प्रेम मनी मम
सचित करिते माते पाहता नास्तिक क्रम " (–प्रेमकथा)

दुसऱ्या एका कवितेत ते म्हणतात,

" तू ' भारतीय मी, भारतीय मी ' हा पहिला घेई ध्यास
कृषका ! हो साम्यवादी । मजुरा ! हो साम्यवादी " (– पहिला ध्यास)

साम्यवादी तत्त्वज्ञान मानवजातीला कल्याणकारक आहे परंतु त्यात एक मोठा दोष बापटांना दिसतो. ते तत्त्वज्ञान धर्म आणि ईश्वर मानत नाही हा मोठा दोष त्यांना दिसतो. विश्वकुटुंबवादाचा पुरस्कार करणारा रशिया हा राष्ट्रवादाचा विरोधक आहे हे मत सेनापतींनी खोडुन काढले आहे.

" साम्यवादा देश नाही । मूर्ख बुद्धि सर्वथा ही
जा पुसे रुसिया साम्यपूजका होवो कां रूस दास ?" (– पहिला ध्यास)

अशा प्रकारे वर्तमानकालीन सर्वच विचारांचे, चळवळींचे व घटनांचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यातून पडलेले आढळते.

आधुनिक टीकाकारांचे अभिप्राय– प्रा. भ. श्री. पंडितांनी सेनापती बापटांना प्रचारकवी असे नाव दिले आहे विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञान आमजनतेत प्रसृत करण्याच्या कामी कवितेचा उपयोग

करणारे कवी असा त्यांचा अभिप्राय आहे. " बापटांची कविता ही बरीचशी फकिराच्या खडचा ' सवाला ' सारखी आहे."[७] डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " उदंड व उत्कट हरिभक्ती आणि देशभक्ती या उदात्त भावनांतून त्यांचे सगळे पद्यलेखन उदयास आलेले आहे. वीर, करुण, अद्‌भुत भक्ती आदी रसांचा जिवंत साक्षात्कार घडविणारे जीवन त्यांच्या पद्यलेखनापेक्षा निस्संशय अनेक परींनी थोर आहे आणि त्यामुळेच ते स्वतः महाकाव्याचा विषय शोभण्यासारखे आहेत हा साने गुरुजींनी त्यांचा केलेला गौरव यथार्थ आहे."[८] साने गुरुजी त्यांच्या काव्यसंग्रहाला ' प्राणमय पुस्तक ' असे संबोधतात. त्यांच्या मते सेनापतींचे काव्य म्हणजे, " चैतन्याची ही गाथा आहे. महाराष्ट्राला अमृतस्पर्श करणारी ही गीता आहे. या पुस्तकातील ओळ न ओळ पवित्र आहे."[९] सोनोपंत दांडेकर म्हणतात, " त्यांच्या काव्यात उत्कटता, तळमळ, राष्ट्रभक्ती दिसते याचे कारणही हेच आहे की त्यांना जगास संदेश देणे आहे... काव्य या दृष्टीने बघू लागल्यास त्यांच्या काव्यात राष्ट्राकरिता तळमळ हा गुण विशेष दिसतो."[१०]

समारोप– टीकाकारांचे, रसिकांचे अभिप्राय लक्षात घेतल्यानंतर त्यांची सर्व कविता राष्ट्रीय भावनेच्या तळमळीतून उदयाला आलेली असल्याचे सर्वांनीच मान्य केलेले आहे. काहींनी प्रचारकाव्य म्हणून तिचे वर्णन केले आहे. परंतु सेनापतींची कविता ही सावरकरांच्या कवितेप्रमाणेच त्यांची वाङ्मयमूर्ती आहे. राष्ट्रीय तत्त्वचिंतनाचा भाग तिच्यात अधिक असल्याने तिचे स्वरूप समर्थांच्या दासबोधासारखे झालेले आहे. हरिभक्ती म्हणजेच राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यप्राप्ती म्हणजेच मोक्ष असे त्यांच्या या राष्ट्रभावनेचे स्वरूप आहे. राष्ट्रधर्म, महाराष्ट्रधर्म, गीताधर्म आणि अध्यात्म या साऱ्यांना त्यांनी काव्यविषय बनविले आहे. स्पेंगलरचा राष्ट्रवाद, मार्क्सचा विश्वकुटुंबवाद आणि योगी अरविंदांच्या " दिव्य जीवना "चे त्यांचे अनुवाद हे त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे द्योतक आहेत. स्पेंगलर आणि मार्क्स काव्यातून मांडण्याचे कार्य मराठीत तरी अपूर्वच आहे. हा तत्त्वज्ञानी ऋषी प्रामुख्याने राष्ट्रभक्त म्हणूनच श्रेष्ठ प्रकारचा राष्ट्रकवी आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचाही अभिप्राय असाच आहे. ते लिहितात, " बापटांच्या कवितांमध्ये काव्यगुणापेक्षा विचारघनताच मुख्य आहे आणि हे विचार आध्यात्मिक तत्त्वज्ञानावर आधारलेले विश्वजीवन व राष्ट्रजीवन यासंबंधी आहेत."[११] (उपोद्‌घात–पृष्ठ १)

भावनाप्रधान देशसेवापरायण राष्ट्रकवी– साने गुरुजी (१८९९–१९५०)

अल्प जीवनपरिचय

राष्ट्रसेवेसाठी संपूर्ण जीवन अर्पण करणाऱ्या आधुनिक मराठी कवींच्या पंक्तीत बसण्याचा मान या महाराष्ट्राच्या दुसऱ्या पांडुरंगानेही मिळविला आहे. पांडुरंग सदाशिव उपाख्य सानेगुरुजी हे सेनापती बापटांप्रमाणेच राष्ट्रभक्त आणि साहित्यिक होते. भावनाप्रधान साहित्यिक आणि समाजवादी कार्यकर्ते म्हणून त्यांचा सर्वदूर लौकिक होता. आपल्या भावोत्कट व ध्येयवादी कादंबऱ्यांनी व विविध ग्रंथांनी साने गुरुजींनी मराठी साहित्यात स्वतंत्र व मानाचे स्थान संपादन केले होते. सद्‌भावनांचा आणि सद्विचारांचा परिपोष करण्याकरिताच जणू त्यांनी कादंबरीचे माध्यम हाताळले होते. त्यांची ' शामची आई ' ही कादंबरी अतिशय गाजली. या कादंबरीमुळेच गुरुजी महाराष्ट्रातील आबालवृद्धांना परिचित झाले. तिची अनेक भाषांतून भाषांतरेही झाली असून आचार्य अत्रे यांनी तिच्यावर बोलपटही काढला. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या स्वातंत्र्याच्या लढ्यात गुरुजींनी स्वतःला झोकून

दिले त्यामुळे त्यांना अनेकदा तुरुंगवासही भोगावा लागला. साने गुरुजींचे एक वैशिष्ट्य असे की त्यांनी आपले संपूर्ण साहित्य मुलांना, विद्यार्थ्यांना उद्देशून लिहिलेले असून ते मुलांसारखेच निर्व्याज, प्रेमळ आणि प्रांजळ आहे. आचार्य अत्रे म्हणूनच त्यांना 'महाराष्ट्राचे बालविकासी फूल'[१२] असे संबोधतात.

गुरुजींना प्रौढांच्या सहवासापेक्षा मुलांचा सहवास अधिक आवडत होता. देशभक्त, कळकळीचे समाजसेवक, उत्तम शिक्षक, संपादक, लेखक, वक्ते आणि कवी म्हणून ते सुपरिचित होते. बालपणापासूनच गुरुजींना 'वाल्ट व्हिटमन' या अमेरिकन कवीच्या कवितांचे विशेष आकर्षण होते. व्हिटमनने आपल्या काव्यसंग्रहाला "Leaves of grass" (तृणपर्णे) असे नाव दिलेले आहे. गुरुजींना ते नावही विशेष आवडले होते. म्हणून त्यांनी आपल्या काव्यसंग्रहाला 'पत्री' (१९३५) असे विनयपूर्ण नाव दिले आहे. या कवितासंग्रहाव्यतिरिक्त गुरुजींनी 'सत्याग्रही' या नावाचे राष्ट्रीय स्वरूपाचे एक खंडकाव्यही लिहिलेले आहे. १९३० च्या कायदेभंगाच्या सत्याग्रहाच्या आंदोलनातला एक देशभक्त तरुण सत्याग्रही तुरुंगात मरण पावतो आणि रात्रीच्या वेळी तो मृत पुत्र दिव्य वेष परिधान करून आपल्या घरी येऊन आई-वडिलांची समजूत घालतो असे या राष्ट्रभक्तिपर खंडकाव्याचे थोडक्यात कथानक आहे. साने गुरुजींचा पिंड कलावंतापेक्षा तळमळीच्या देशभक्ताचा होता हे त्यांच्या उण्या पुऱ्या एक्कावन वर्षांच्या जीवनावरून कळून येण्यासारखे आहे. रचनेचे तंत्र व भाषा या दृष्टीनेही त्यांच्या कलाकृतींना टीकाकारांनी दोषपूर्ण ठरविले आहे. मात्र त्यांचे सर्वच लिखाण तळमळ, व्यासंग, त्यागी वृत्ती आणि शुचिता यांनी संपन्न आहे. साने गुरुजींच्या काव्याचा एक लक्षणीय विशेष असा की त्यांची सर्व कविता महाकवी सावरकर, सेनापती बापट यांच्याप्रमाणे तुरुंगात लिहिल्या गेली आहे. गुरुजींनी काव्य लिहिले असले तरी खऱ्या अर्थाने ते काव्य जगले.

देवभक्ती आणि देशभक्ती– सेनापती बापट आणि साने गुरुजी यांच्या राष्ट्रीय कविता देवभक्ती आणि देशभक्तीने संपन्न आहेत. सेनापतींनी श्रीहरीची कास धरली आहे तर साने गुरुजींनी श्रीरामाला आळविले आहे. स्वार्थत्यागी, राष्ट्रसेवापरायण, निरहंकारी आणि साधुवृत्तीच्या गुरुजींनी मनोविकासासाठी आणि अंतःशुद्धीच्या तळमळीने प्रभुरामचंद्राची करुणा भाकलेली असून त्यांचीही भक्तिगीते अतिशय उत्कट आणि रसाळ उतरली आहेत. हीच उत्कटता, आर्तता, तळमळ आणि साधुता त्यांच्या देशभक्तिपर गीतांतून व्यक्त झालेली आहे. सेनापतीप्रमाणेच त्यांच्या देवाची जागा देशाने घेतली आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितांची संख्या बरीच असली तरी त्यातल्या २६ कविता प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. साने गुरुजींच्या राष्ट्रीय भावनांचे प्रतिबिंब या कवितांतून प्रकर्षाने पडलेले आहे. आपल्या प्रभुरामचंद्रांजवळ ते पुढीलप्रमाणे मागतात.

"शिरु दे मनात जोम । शिरु दे मतीस तेज
करण्यास मातृ-सेवा । उठू देच जेवि वीज" (– येबो वसंत वारा)

उत्कट राष्ट्रप्रेम– 'भारतमाता' 'मनमोहन मूर्ति तुझी माते', 'भारत सेवा', 'बलसागर भारत होवो', 'भारतमाता माझी लावण्याची खाण', 'देशासाठी मरू!', 'दिव्य मी स्वर्ग निर्मिन', 'एकच वेड', या कवितांतून गुरुजींचे उत्कट राष्ट्रप्रेम व्यक्त झालेले आहे. गुरुजींच्या राष्ट्रप्रेमाला अनेक आयाम आहेत. त्यांची भारतमाता लावण्याची खाण आहे. सकल जगाची माउली आहे. ती सर्व राष्ट्राच्या गुरुस्थानी आहे म्हणून तिच्याबद्दल त्यांना नितांत आदर आहे. नितांत अभिमान आहे. साने गुरुजी म्हणतात,

" प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण
भारत माता माझी लावण्याची खाण ।"

(भारत माता लावण्याची खाण)

दुसऱ्या कवितेत सांगतात.

" मनमोहन मूर्ति तुझी माते ।
सकल जगाची माय माउली गोड असे किती नाते ।"

(– मनमोहन मूर्ति तुझी माते)

आणखी एका कवितेत भारतमातेची श्रेष्ठता आणि ज्येष्ठता सांगताना म्हणतात,

" थोर भारता मार्गदर्शका । तूच आमुचा सद्गुरु हो
वदती सारी राष्ट्रे सद्गद् जय बोला जय बोला हो ।"

(– स्वातंत्र्यानंदाचे गाणे)

अशा या भारतमातेच्या उदरी जन्माला आल्याबद्दल गुरुजींना कृतार्थता वाटते. ते आपले भाग्य सांगताना म्हणतात,

" बहु भाग्याने बहु पुण्याने झालो तव संतान
तव सेवा मम हातुन होता हरपो माझा प्राण " (– भारतमाता)

दुसऱ्या एका ठिकाणी म्हणतात,

" जरी देह पडला माझा तरिहि मी फिरून
इथे जन्म घेइन आई निश्चये करून
तुझी धूळ आई प्रेमे लाविती-स्व-भाळी
– इथे जन्मलो मी म्हणूनी प्रेम-नीर ढाळी "

त्याच कवितेत परमेश्वराजवळ इच्छा व्यक्त करताना म्हणतात,

" देश देव सेवेसाठी सर्व मी करीन
चित्त वित्त जीवन माझे सर्व हारवीण ।।" (– माझी एकच इच्छा)

मातृभूमीच्या चिंतनाशिवाय, तिच्या भाग्योदयाशिवाय दुसरा विचारच गुरुजींच्या अंतःकरणाला शिवत नाही. ते म्हणतात,

" एक मात्र चिंतन आता एकची विचार
भाग्य पूर्ण होईल कधी हिन्द भूमि थोर ।।" (– माझी एकच इच्छा)

किंवा " मातृभूमि ! माझ्या चित्ता एक वेड लागे
मायभूमि ! चिंतनी तव गे जीव नित्य जागे !" (– एकच वेड)

भारतमातेप्रमाणेच महाराष्ट्राचाही गुरुजींना अभिमान आहे. भारतमातेचे गुणगान करतानाच ते म्हणतात,

" माझ्या महाराष्ट्र भूमित मोठे ।
प्रतापी पुन्हा वीर निर्मि प्रभो
घाबो यशोगंध देवा दिगंतात
माझा महाराष्ट्र भाग्ये सजो ।" (–भारतमाता माझी लावण्याची खाण)

पारतंत्र्याची दुःखद जाणीव नि स्वातंत्र्याचा ध्यास– उत्कट राष्ट्रप्रेमाप्रमाणेच पारतंत्र्याची दुःखद जाणीव गुरुजींच्या 'प्रभु ! भारतीचे वैभव कोठे गेले ?', 'गाऊ मी कसले गान ?', 'माझी एकच इच्छा' इत्यादी कवितांतून व्यक्त झालेली आहे. ते परमेश्वरालाच कळवळून प्रश्न विचारतात,

"प्रभु ! भारतीचे वैभव कोठे गेले ? राष्ट्र हे दिसे मेलेले"
(– प्रभु भारतीचे वैभव कोठे गेले ?)

त्यांना भारताचे दृश्य कसे दिसते ?

"या भूमिमध्ये मरणाचा डर भरला ।
बाजार किड्यांचा झाला ।" (– प्रभु भारतीचे वैभव कोठे गेले)

भारतमातेची अवस्था पाहून ते निराशावादाचे सूर आळवू लागतात,

"अन्नास माय मोताद । घेई न तिची कुणी दाद ।
सुत घालित वसती वाद । पोट का भरे वाऱ्याने ?"

राष्ट्रीय आशावाद– भारतमातेची अवस्था पाहून निराशावादाचे सूर आळविणारे गुरुजी समर्थ रामदासांच्या प्रयत्नवादाची कास धरतात. त्यामुळे निराशेचे आलेले मळभ कुठल्या कुठे उडून जाते. मायभूमीला स्वतंत्र करणे हेच आपले जीवितकार्य आहे असा विश्वास मनात बळावतो. त्या विश्वासातूनच 'माझी एकच इच्छा', 'स्वातंत्र्याचे अम्ही शिपाई !', 'स्वातंत्र्य दिव्य दर्शन', 'आमचे कार्य', 'स्वातंत्र्य', 'तुफान झालो', 'स्वातंत्र्यानंदाचे गाणे', 'स्वातंत्र्य दिव्यदर्शन', 'भारतसेवा', 'बलसागर भारत होवो !', ऊठ दे झुगारून बेडी' यासारखी स्वातंत्र्याचा ध्यास घेणारी आशावादी गीते लिहून जातात. 'आमचे कार्य' या सुप्रसिद्ध कवितेत ते म्हणतात,

"आम्ही मांडू निर्भय ठाण । देऊ हो प्राण
स्वातंत्र्य सुधेचे निज जननीला घडवू मंगल पान ।" (– आमचे कार्य)

आपला आशावाद व्यक्त करताना साने गुरुजी म्हणतात,

"स्वातंत्र्याची लाविन ज्योत । स्फूर्तीचा मी निर्मिन स्रोत
तेजाचा मी सोडीन झोत । दैन्य दवडीन" (– दिव्य मी स्वर्ग निर्मिन)

दुसऱ्या एका गीतात ते म्हणतात,

"ही मुक्त माय होईल । वैभवे दिव्य शोभेल
जगतास शांति देईल । तो सोन्याचा दिन येवो," (–बलसागर भारत होवो)

उत्कट भव्य करता यावे म्हणून परमेश्वराजवळ मागणे मागतात,

"दे स्फूर्ति आम्हाला दिव्य । कृति करू दे उत्कट भव्य ।
स्वातंत्र्य येऊ दे नव्य । हसवावी अस्मद्वदने" (– गाऊ मी कसले गाणे)

स्वातंत्र्याचा ध्यास आणि निर्धार साने गुरुजींनी अनेक कवितांतून व्यक्त केलेला आहे.– स्वातंत्र्याचा निर्धार व्यक्त करताना ते सांगतात,

"झालो तुफान करू हासत देह दान
स्वातंत्र्य आणू अथवा मरुं हीच आण" (तुफान झालो)

नुसत्या निर्धाराने स्वातंत्र्याची प्राप्ती होत नाही. त्यासाठी प्रसंगी बलिदानाला सिद्ध असले पाहिजे. मौल्यवान वस्तूला किंमत मोजावीच लागते हे सांगताना गुरुजी म्हणतात,

" प्राण अर्पावे । स्वातंत्र्य सौख्य मिळवावे ।" (– स्वातंत्र्य)

दुसऱ्या एका गीतात म्हणतात,

" व्हा सिद्ध तुम्ही प्राणार्पण करण्याते ।
त्यागाविण काही न मिळते ।
... डोळ्यात विजेचे तेज । लखलखो तुमचिया आज
त्या स्वतंत्रता देवीच्या शुभ शरिरी " (– स्वातंत्र्य दिव्य दर्शन)

साने गुरुजींना हौतात्म्याचे आकर्षण आहे.– ' देशभक्त किती ते मरती ', ' भारतमाता माझी लावण्याची खाण ', ' प्रतिज्ञा ' या कविता त्या दृष्टीने वाचण्यासारख्या आहेत.

" प्राण पुष्प माझे माझ्या मातृभूमि कामी
जरी येई उपयोगाला कितिक होई नामी ॥" (माझी एकच इच्छा)

किंवा " निज प्राण घेऊनिया ते करात । चला आणु स्वातंत्र्य देवी घरात
नको दास्य आता पुरे पारतंत्र्य । उठा रे उठा होऊ आज स्वतंत्र ॥ "
(– प्रतिज्ञा)

स्फूर्ति गीते– राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, आशावाद या प्रकारच्या कवितेबरोबरच साने गुरुजींनी काही स्फूर्तिगीतेही लिहिली आहेत. या गीतांतून राष्ट्रकार्यासाठी पुढे येण्याचे आवाहन गुरुजींनी केलेले आहे. ' जारे पुढे व्हारे पुढे ', ' राष्ट्र पताका ', ' ऊठ दे झुगारून बेडी ' ही गीते त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. कवी राष्ट्रभक्तांना आवाहन करताना म्हणतात,

" माते स्वहातें लेववी । स्वातंत्र्य – लक्ष्मीचे चुडे
सत्पुत्र धर्मा आचर । जारे पुढे व्हारे पुढे !", (– जा रे पुढे व्हारे पुढे)

थोर भारतीय परंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण– थोर भारतीय परंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण साने गुरुजींच्या काही राष्ट्रीय कवितांतून आढळते. कवी गोविंद आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या किंवा दुर्गाप्रसाद तिवारी आणि कवी माधव यांच्या तुलनेत ते अल्प आहे. एका कवितेत ते म्हणतात, " तुझी संस्कृती अनंत, रुचिरा निर्मल, अमरा ती !"
(– ऊठ झुगारून देई बेडी)

दुसऱ्या एका गीतात ते सांगतात,

" ही राजर्षींची भूमी । ती ऋषीश्वरांची भूमी
ती वीरांची ही भूमी – " (– प्रभु भारतीचे वैभव कोठे गेले ?)

असे अभिमानाचे उद्‌गार काढतात. भारतमातेचे पूर्वीचे वैभव गेल्याचे दुःखही गुरुजींना होते. ते कळवळून म्हणतात,

" ती थोर संस्कृती गेली ।
ती गजान्त लक्ष्मी गेली ।
पुरुषार्थ सत्वता गेली । उरली ती स्मृतीची चिन्हे ॥"

वीर विभूतिपूजन– साने गुरुजींनी पतितपावन, दीनोद्धारक, सज्जनतारक श्रीरामाचे गुणवर्णन अनेक कवितांतून केले आहे. भगवान श्रीराम अनेक राष्ट्रीय कवींचे दैवत आहे. या भूमीला भूषणभूत ठरलेले श्रीराम त्यांना आठवतात. "श्रीरामांनी भूषविली ही भूमी सत्त्वाढ्य हरिश्चंद्रांनी"

तसेच "शिबी, मांधाता, राजे येथे झाले
श्री शिव, बाजी गाजी, रणशार्दूल, इथे खेळले खेळ !"

दुसऱ्या एका कवितेत "मेवाडच्या रण शार्दूला उठा, उठा शिवराया हो।"

(– स्वातंत्र्यानंदाचे गाणे)

असे कवीने आवाहन केलेले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात बलिदान करणाऱ्या देशभक्तांचे पूजनही गुरुजींनी केलेले आहे.

"धैर्यमूर्ति उज्ज्वल कीर्ती देशभक्त किती ते मरती
त्यागराशी मंगल मूर्ती। देशभक्त किती ते मरती !"

(– देशभक्त किती ते मरती)

'स्वातंत्र्यानंदाचे गाणे', 'देशभक्त किती ते मरती', 'खरा हुतात्मा' या कवितांतून वीर विभूति-पूजन गुरुजींनी केलेले आहे. आधुनिक काळातील वीर विभूती म्हणून साने गुरुजींनी गांधीजींचे आदरपूर्वक पूजन केलेले आहे. 'महात्माजीस' आणि 'खरा हुतात्मा' या दोन्ही कविता महात्माजींना उद्देशूनच गुरुजींनी लिहिल्या आहेत. गांधीजींच्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त करताना गुरुजी म्हणतात,

"तुम्ही जीवन देतसां नव तसा उत्साह आम्हां मृता
राष्ट्रा जागविलें तुम्ही प्रभु खरे पाजूनियां अमृता
तुम्ही दृष्टि दिली, तुम्ही पथ दिला, आशाहि तुम्ही दिली
राष्ट्रा तेजकळा तुम्ही चढविली मार्गी प्रजा लाविली" (– महात्माजीस)

दुसऱ्या कवितेत ते म्हणतात,

"क्लेशाने हसतो न धीर खचतो हासेल फासावरी
ध्येयप्राप्ति करावयास पशुता ती ना कधी आदरी...
...ऐसा एक जगात आज मजला गांधी महात्मा दिसे॥" (– खरा हुतात्मा)

तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब– पारतंत्र्यातील परिस्थितीचे प्रतिबिंब साने गुरुजींच्या 'येवो वसंत वारा', 'मयसभा राहिली भरून', 'प्रभू भारतीचे वैभव कोठे गेले ?' 'भारत सेवा', 'तुफान झालो', इत्यादी कवितांमधून पडलेले आढळते. आजूबाजूच्या राष्ट्रीय जीवनातील विषमता, भेदभाव; उघडा नागडा स्वार्थ, दंभ, नीचता, क्रूरता यांचे विदारक चित्र त्यांनी रेखाटले आहे. अन्याय, अज्ञान; दारिद्र्य या सर्वांनी वेढलेले लोक मुक्त कसे होतील याची गुरुजींना काळजी लागली आहे. ते कळवळून सांगतात,

"जोवरी बंधु पोटभरी ना खाती। ना वस्त्र तदंगा वरती
जोवरी त्यांना स्वपरमत्त रडविती। शतमार्गांनी नागविती" (– भारत सेवा)

ही परिस्थती जोवर बदलत नाही तोपर्यंत भारत खऱ्या अर्थाने राष्ट्र या पदवीला पोचणार नाही. आपल्या अंतःकरणातील भावनांची ताजी 'पत्री' अशा रीतीने गुरुजींनी राष्ट्रदेवतेच्या चरणी वाहिली आहे.

टीकाकारांचे अभिप्राय आणि समालोचन– मराठी काव्याचे सुप्रसिद्ध टीकाकार प्रा. भ. श्री. पंडित यांनी गुरुजींचा, विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञान आमजनतेत प्रसृत करणारे 'प्रचार कवी' म्हणून उल्लेख केलेला आहे. ते पुढे म्हणतात, " साने गुरुजी गद्याचे थोर आचार्य आहेत पण त्यांच्या 'पत्री' तील पद्यात तोल व ताल यांचा आढळ होत नाही."[१३] साने गुरुजींच्या 'पत्री' या काव्य-संग्रहाच्या नावाचे प्रयोजन स्पष्ट करताना, आचार्य भागवतांनी लिहिले आहे की, 'पत्री' या नावाने काव्याची सहजस्फूर्तता, कवीची शालीनता आणि भक्ती स्पष्ट होते. अमेरिकन तृणपर्णात भारतीय भक्ती मिसळली की 'पत्री' तयार होते."[१४] डॉ. अ. ना. देशपांडे यांनी साने गुरुजींच्या कवितेचे ईश्वरभक्तिपर व देशभक्तिपर असे दोन वर्ग केलेले आहेत. भक्तिपर कवितेची विशेषता सांगताना देशपांडे सांगतात, "स्वार्थत्याग, सेवापरायणता व निरहंकार साधुवृत्ती हे त्यांचे स्वभावविशेष या भक्तिपर कवितांत स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहेत. . . अशीच आर्तता, अशी उत्कटभक्ती तशीच अभिजात शालीनता त्यांच्या देशभक्तिपर कवितांत उमटली आहे."[१५]

साने गुरुजींच्या कवितेच्या संदर्भात डॉ. वा. भा. पाठकांनी मोठे गौरवपूर्ण उद्‌गार काढलेले आहेत. ते म्हणतात, " सावरकरांच्या वा कवी गोविंदांच्या कवितेतील आवेशाचे आणि स्फूर्तीचे प्रत्यंतर गुरुजींच्या कवनातून पाहावयास मिळते !"[१६] कलाकृतीच्या रचनातंत्राचा अभाव, रसवैचित्र्याचा अभाव, पाल्हाळिकपणा, अतिहळवेपणा, अतिरिक्त बोजडता, वृत्तयोजनेची उदासीनता आणि भाषेचा विस्कळीतपणा हे रचनादोष भ. श्री. पंडित, डॉ. अ. ना. देशपांडे आणि डॉ. वा. भा. पाठक या सर्वांना मान्य आहेत.

राष्ट्रकल्याणाची तळमळ लागलेला सेवापरायण कवी– गुरुजींच्या राष्ट्रीय कवितांचा भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून अभ्यास केला असता त्यांचे हळवे, भावनाप्रधान, राष्ट्रकल्याणाची तळमळ असणारे निःस्वार्थी सेवापरायण व्यक्तिमत्त्व तीत प्रतिबिंबित झाल्याचा प्रत्यय येतो. त्यांची देशभक्तिपर कविता, डॉ. वा. भा. पाठक म्हणतात त्याप्रमाणे 'स्वानुभूत वासाच्या' दानातूनच आविष्कृत झालेली असल्याने ती उत्कट आणि प्रत्ययकारी आहे, तिच्या परीने ती प्रभावीही आहे. महाकवी सावरकर, स्वातंत्र्यकवी गोविंद किंवा सेनापती बापट यांच्या कवितेप्रमाणे वीर रसाचा ओजस्वी आविष्कार करणारी प्रक्षोभक नाही ही वास्तवताही मान्य करायला हवी. गुरुजींचा आदर्श आणि गुरुजींचा पिंड यांचा विचार केला तर त्यांच्या राष्ट्रीय कवितेत ओजो गुणाचा लोप का दिसतो याचे उत्तर सापडते. प्रेमाचा, समर्पणाचा, त्यागाचा, सेवेचा आणि वात्सल्याचा वर्षाव करणारे मातृत्वधर्मी असे गुरुजींचे व्यक्तिमत्त्वही होते. तळमळ, आर्तता, उत्कटता, हळवी भावुकता त्यांच्या ठिकाणी असली तरी वीरवृत्तीला साजेसा उत्साह, रणावेश, बंडखोरपणा, आक्रमकता आणि झुंजारपणा त्यांच्यात औषधालाही नव्हता. शिवाय सत्य, अहिंसा, प्रेम, सेवा, शांती या तत्त्वाचे उपासक आणि नैतिकशक्तीद्वारा शत्रूचेही हृदय परिवर्तन करण्याचे प्रयोग करणारे ईश्वरनिष्ठ गांधीजी त्यांचे आदर्श नेते होते. साने गुरुजींनी आपल्या काही राष्ट्रीय कवितांमधून हौतात्म्याची सिद्धता प्रकट केलेली आहे याबद्दल वाद नाही. परंतु त्यांची हुतात्म्याची कल्पना आणि सावरकरादी क्रांतिकारकांची कल्पना यांच्यात अंतर आहे.

देशासाठी अपार कष्ट सोसून या देशभक्ताने शेवटी स्वतः मृत्यूचे चुंबन घेतले.

आपआपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे काव्य हे साधन हाताशी घेऊन लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्याचे कार्य राष्ट्रीय कवींनी केलेले आहे. साने गुरुजी हे एक आदर्श राष्ट्रभक्त होते. त्यांच्या

कवितेपेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक भव्योदात्त होते. एखाद्या महाकाव्याचा विषय व्हावा अशा उदात्त नायकासारखे ते जीवन जगले. त्यांच्या कवितेपेक्षाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने महाराष्ट्रातील लक्षावधी तरुणांना त्यांनी राष्ट्रभक्तिप्रवण केले. तीच कळकळ, तीच तळमळ त्यांच्या सेवापरायण राष्ट्रगीतांतून व्यक्त झालेली असून एक थोर राष्ट्रकवी म्हणून त्यांचे स्थान अक्षय आहे.

भ्रांत हिंदपुत्रांना जागृत करून 'महाराष्ट्र धर्म' शिकविणारा राष्ट्रकवी माधव ज्यूलियन
(जन्म २१ जाने. १८९४ मृत्यू २९ नोव्हें. १९३९)

प्रास्ताविक– डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन उपाख्य माधव ज्यूलियन हे या कालखंडातील प्रमुख कवी आहेत. राजकवी चन्द्रशेखरांना काव्यक्षेत्रातील गुरु मानून १९१० सालापासूनच माधवरावांनी काव्यनिर्मितीला प्रारंभ केला असला तरी कवी म्हणून १९२० नंतरच ते ओळखल्या जाऊ लागले. १९१८ मध्ये एम्. ए. झाल्यानंतर 'एम्. ज्यूलियन' व 'दिल्जू' या टोपण नावांनी त्यांनी आपल्या कविता प्रसिद्ध केल्या. १९२० ते १९२३ च्या दरम्यान पुण्यास अभ्यासाच्या नि व्यवसायाच्या निमित्ताने वास्तव्य करणाऱ्या आणि दर रविवारी चहाकरिता एकत्र जमून काव्यवाचन व काव्यचर्चा करणाऱ्या तरुण कविमंडळींनी १९२३ मध्ये आपल्या मेळाव्याला 'रविकिरण मंडळ' असे नाव दिले.

जीवनकार्याचा परिचय– वास्तविक प्रणयप्रतीतिधर्मी तांब्यांप्रमाणेच माधव ज्यूलियन हे 'प्रणय-पंढरीचे वारकरी' म्हणून मराठी रसिकांना परिचित आहेत. तांब्यांनी सफल प्रेमाची गीते गायिली तर माधवरावांनी प्रेमविषयाला मराठी–काव्यात प्रतिष्ठा मिळवून दिली. प्रत्यक्ष राजकारणापासून दोघेही अलिप्त होते. आत्मनिष्ठ भावकवी म्हणून दोघांचाही लौकिक होता परंतु युगधर्माने प्रभावित होऊन दोघांनीही राष्ट्रीय कविता लिहिल्या आहेत. केशवसुत, तांबे, 'बी' या कवींच्या तुलनेत विचार केला असता माधवरावांनी लिहिलेल्या केवळ राष्ट्रीय कवितांची संख्या अधिक आहे. काव्यनिर्मितीच्या दृष्टीने विचार केला असता माधवरावांची कविता विपुल आणि विविध आहे. 'विरहतरंग', 'सुधारक' आणि 'नकुलालंकार' ही तीन खंडकाव्ये, 'गज्जलांजलि', 'स्वप्नरंजन' व 'तुटलेले दुवे' हे तीन स्फुट काव्यसंग्रह, 'उमरखय्यामच्या रुबाया', 'द्राक्षकन्या', 'मधुलहरी' या संग्रहांतील अनुवादित कविता, काही अरबी, फारशी व संस्कृतातील अनुवाद आणि इंग्रजी कवितांचे अनुवाद इतकी काव्य-संपदा माधवरावांच्या नावावर प्रसिद्ध आहे.

इतर कवींप्रमाणे डॉ. माधवराव पटवर्धन हे महाराष्ट्राला केवळ कवी म्हणून परिचित नाहीत तर ते 'फार्शी मराठी कोशाचे' निर्माते, विद्वान कोशकार, छंदोरचना प्रबंधकार, मराठी भाषेच्या शुद्धीकरणाच्या आंदोलनातले एक झुंजार वृत्तीचे आणि 'घडाडीचे पक्षकार', एक प्रथितयश 'काव्य-चिकित्साकार', तांब्यांच्या कवितासंग्रहाचे संपादक, फारशी व इंग्रजी भाषासाहित्याचे नामवंत प्राध्यापक, काव्यसंमेलनाचे आणि १९३६ मध्ये जळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, नेमस्तवादी राजकीय विचारांचे पुरस्कर्ते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही तत्त्वांचे निष्ठावंत समाजसुधारक अशा विविध नात्यांनी ते सुपरिचित आहेत.

रोमँटिक वृत्तीच्या, संवेदनशील अन्तःकरणाच्या आणि बाणेदार स्वभावाच्या या माणसाचा जीवनमार्ग नियतीने खाचखळग्यांनी भरून टाकलेला होता. आई–वडिलांच्या स्वाभाविक अन् नैसर्गिक प्रेमापासून वंचित झालेल्या या कुमाराला तारुण्यात तथाकथित प्रेमप्रकरणाचे भक्ष्य व्हावे लागले. फर्ग्युसनसारख्या महाविद्यालयातून बडतर्फ व्हावे लागले, पण माधवराव हिंमत हारले नाहीत.

आपल्या मार्गावर अचल राहिले आणि ज्या समाजाने त्यांची अवहेलना केली त्यालाच या महापुरुषापुढे नम्र व्हावे लागलें. मर्ढेकरांनी, माधवरावांच्या आयुष्याचे व स्वभावधर्माचे अतिशय प्रत्ययकारी चित्र कवितेतून रेखाटलेले आहे. ते लिहितात,

" फक्त तूझी स्वाभिमानी चाल बेडर वृत्तिची,
पीळ पायीं हिम्मतीचा, टाप इच्छा शक्तिची
बंडली तेजस्विता अन् अंतरीची मर्दता,
फेस तोंडी-हासलेली आत्मश्रद्धा शुद्धता !" १७

(– वा. सी. मर्ढेकर-माधवराव पटवर्धन)

राष्ट्रीय भावनांच्या प्रत्ययाच्या दोन स्मृती– प्रेमकवितांच्या प्रेरणांचा उगम आणि राष्ट्रीय कवितेच्या प्रेरणांचा उदय एकाच ठिकाणी असावा असे माधव ज्यूलियनांच्या जीवनकथेवरून वाटते. बडोद्याच्या विद्यालयात संस्कृत सोडून फारशीच्या अध्ययनात तल्लीन झालेल्या, कौमार्य ओलांडून नुकत्याच युवावस्थेत पदार्पण करणाऱ्या या युवकाने इराणचा फारशी कवी 'बहार' याची देशप्रेमाने ओथंबलेली कविता वाचली आणि त्याचे चित्त थरारले. हृदय उचंबळून आले. 'बहार' संबंधीच्या प्रेमाने आणि अभिमानाने प्रभावित होऊन त्याने 'बहार' चा गौरव करणारी फारशीतच कविता लिहिली. तिच्या पुढील पंक्ती गं. दे. खानोलकरांनी दिलेल्या आहेत.

" अय् बहारे तीझ दिल् अय् शाइरे शीरीन सखुन्
इन् तिझारत मी कुनम् नव नघ्मई आवाझ कुन "

" ज्याचे हृदय कोमल व शब्द गोड आहेत, अशा 'बहार' कवे ! मी तुझी वाट पाहत आहे. एक नवीन गाणे म्हण. तुझी कविता इराणच्या जखमा बऱ्या करते. तुझ्या तुतारीने स्वातंत्र्य येते आणि जुलूम पळतो. ... ... १८ देशभक्तीपासून उत्पन्न होणारी तुझी कविता हृदयाला विरघळवते."

स्वातंत्र्याचा आणि राष्ट्रीय भावनेचा प्रत्यय माधव ज्यूलियनांना आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य 'बहार' या हजारो मैल दूर असलेल्या एका इराणी कवीने केले आहे. त्याची स्मृती आताच कथन केलेली आहे. याच १९०७ ते १९०९ च्या काळात भारतात क्रांतिकारकांच्या चळवळीने जोर पकडला होता. या क्रांतिकारकांच्या गुप्त चळवळीचे लोण बडोद्यापर्यंत पोहोचलेले होते आणि माधवरावांचे काही कुस्तीगीर मित्र चळवळीत सहभागी झाल्यामुळे माधवरावही त्यात सामील झाले होते. " एक दिवस काही रासायनिक द्रव्यांच्या साहाय्याने बाँब तयार करण्याचा प्रयत्न करीत असताना माधवरावांचे दोन्ही हात भाजले. ते त्यांना एक मोठे दुखणेच झाले होते. आठ पंधरा दिवस हातांनी त्यांना अंथरुणावर लोळविले. " या घटनेवर भाष्य करताना गं. दे. खानोलकर म्हणतात, " राजकारणात प्रारंभीच हे असे हात भाजून निघाल्यामुळे पुढे केव्हाही त्यांनी ते त्यात घातले नाहीत."१९ या काळात खाडिलकरांच्या सुप्रसिद्ध 'कीचकवध' नाटकाचे माधवराव भक्त बनले. त्यांचे मित्र मराठे यांना ते कीचक बनवीत आणि आपण स्वतः भीमाची भूमिका करीत असत. २० माधवरावांच्या राष्ट्रीय कवितेचे मूळ या त्यांच्या युवावस्थेतील दोन घटनांत आहे असे म्हणता येते.

माधवरावांच्या राष्ट्रीय जाणिवेचे स्वरूप– माधव ज्यूलियन एक प्रतिभासंपन्न भावकवी म्हणून ओळखले जात असल्यामुळे त्या दृष्टीनेच प्रामुख्याने त्यांच्या काव्याचा समीक्षकांनी अभ्यास केलेला आहे. आत्मनिष्ठ भावकवीचाही भोवतालच्या समाजाशी नानाप्रकारांनी अनुबंध साधलेला असतो.

माधव ज्युलियनांचा तसा तो साधलेला होता आणि म्हणूनच "समकालीन इतर कवींशी तुलना केल्यास पटवर्धन सर्वात जास्त आत्मनिष्ठ नि सर्वात जास्त समाजसम्मुख कवी होते असे विरोधाभासात्मक विधान करता येईल" [२१] असे उद्‌गार समग्र माधव ज्यूलियन खंड पहिल्याच्या प्रस्तावनेत श्री. दा. न. गोखले यांनी काढलेले आहेत.

ही सामाजिक जाणीव राष्ट्रीय स्वरूपाची आहे. चंबळेच्या तीरावर 'भ्रांत तुम्हा कां पडे'; 'देवाची समाधी', 'फटकळ अभंग', 'आव्हान', 'मेलो तरी मेलो', 'शिवप्रताप', 'मराठा बाणा', 'रसिकास', 'तेथे चल राणी' यासारख्या कवितांतून आणि काही सुनीतांतून व्यक्त झालेली आहे. राजस्थानात चम्बळेच्या तीरावर कोटा हे संस्थान आहे. तेथील दसऱ्याच्या स्वारीचे आणि रावणवधाचे दृश्य पाहून कवी प्रभावित होऊन म्हणतो,

"हाती मशाल घेऊनी निजराष्ट्र भक्तीची
दारे कुठे उठा पहा येथील मुक्तीची" (– चम्बळेच्या तीरावर) (उर्वरित कविता)

'आव्हान' या कवितेत ते सांगतात,

"धजे तो जगे, पात्र तो जीविताला
उठा वीर हो, दाखवा हात घाई
जगे मात्र जो बापुडा दीनदास्ये
न त्याचे कवी गौरवे गीत गाई ॥" (– आव्हान) (गज्जलांजली)

स्वतःला हीन लेखणाऱ्या हीनगंडाने पछाडलेल्या हिन्दुपुत्राला ते विचारतात,

"हिन्द पुत्रांनो, स्वतःला लेखिता का बापडे
भ्रांत तुम्हा का पडे ?
वाघिणीचे दूध प्याला, वाघबच्चे फाकडे–भ्रांत तुम्हा का पडे ?
... दृष्टि राष्ट्राची हवी स्वार्थातही जी नेहमी
उन्नतीची घे हमी,
जो अहिन्दी त्याजला ठेवा दुरी, चारा खडे, भ्रांत तुम्हा का पडे ?"
(– भ्रान्त तुम्हा का पडे) (गज्जलांजली)

आषाढी एकादशीच्या दिवशी पांडुरंगाला उद्देशून लिहिलेल्या फटकळ अभंगातूनही माधवरावांच्या राष्ट्रीय जाणिवेचे स्वरूप स्पष्ट होते. ते पांडुरंगाला म्हणतात,

"माझ्या एकट्याचा कशाला उद्धार ? राहिला संसार करोडांचा"
(– फटकळ अभंग) (उर्वरित कविता)

पांडुरंगाने आपल्या लाखो वारकरी भक्तांना नवा सेवाधर्म शिकवावा असे सांगताना म्हणतात,

"जनतेच्या कामी निथळू द्या घर्म हेच धर्मकर्म नीट जाणा
विठोबा रखमाई पहा कोट्यवधी, महाराष्ट्रामधी त्यांना भजा,
क्षितिजा भिडवा कर्तृत्वाची सीमा । पंढरी 'महिमा त्यात आला'"
(फटकळ अभंग) (उर्वरित कविता)

राष्ट्रासाठी त्याग करणाऱ्या देशभक्तावद्दलची कृतज्ञताबुद्धी माधवरावांच्या ठिकाणी जागृत आहे. राष्ट्रासाठी स्वतःचे उष्ण रक्त सांडणाऱ्यांचे वंशज सुखासीन झालेले पाहून कवीला दुःख वाटते. तो म्हणतो,

" देई सिंचुनि आपुले रुधिर जो राष्ट्रास संजीवन
कंठी जीवित शान्तिहीन खपुनी घोरांमध्ये भीषण,
त्यांचे भङ्गुनि राष्ट्र जात असता त्याच्याच का वंशजे!
व्हावे मत्त सुखासवे ? मन कसे त्या पामराला भजे !"

(– तुटलेले दुवे–सुनीत ८५)

माधव ज्यूलियनांची ध्येयासक्ती दुर्दम्य होती. ध्येयपूर्तीसाठी प्राणदान करण्याची त्यांची तयारी होती. ते एका अभंगात म्हणतात,

" मेलो तरी मेलो । मरण न चुके
मन माझे भुके । ध्येयासाठी ।" (– मेलो तरी मेलो – ७४)

राष्ट्रप्रेम– माधव ज्यूलियनांच्या राष्ट्रीय जाणिवेचे दर्शन जसे त्यांच्या राष्ट्रीय कवितेतून घडते तसेच त्यांच्या राष्ट्रप्रेमाचे आणि महाराष्ट्रप्रेमाचे दर्शनही त्यांच्या कवितेतून घडते. 'केवळ माय-भूमीसाठी', 'भ्रांत तुम्हा का पडे ?' 'चम्बळेस' या कवितांमधून भारतप्रेमाचे दर्शन घडते, तर 'महाराष्ट्र गीत', 'आमची मायबोली' आणि तुटलेल्या दुव्यातील काही सुनीतातून, मराठ्यांची मायबोली मराठी व महाराष्ट्र भूमीचा अभिमान त्यांच्या या कवितांतून व्यक्त झालेला आहे. सुप्रसिद्ध पाश्चात्य राष्ट्रकवी थॉमस मूर यांच्या 'Pro Patria Mori' या कवितेचा 'केवळ मायभूमीसाठी' हा स्वैर अनुवाद असला तरी त्यातून माधवरावांचे राष्ट्रप्रेम व्यक्त झाले आहे. राष्ट्राकरिता हौतात्म्य स्वीकारणाऱ्या देशभक्तांचे भव्योदात्त जीवन या कवितेत रेखाटले आहे. तो देशभक्त म्हणतो,

" ज्याची भक्ति कृतीमध्ये उतरली भोगून दुःखे अती
देह त्यागुन जो तुझ्यास्तव इथे, जायी दुरी साम्प्रती ।।"

(केवळ मायभूमीसाठी) (उर्वरित कविता)

भारतभूमीची कूस धन्य करणे हे तिच्या प्रत्येक सुपुत्राचे कर्तव्य आहे असे कवीला वाटते. एका कवितेत ते म्हणतात,

" हे देवि हिन्द, शक्ति दे भाटास या तुझ्या
गाईन वैभवा तुझ्या, मन होय मोकळे ।।"

महाराष्ट्राचा गौरव करताना माधव ज्यूलियनांच्या वाणीला कमालीचा उल्हास येतो. महाराष्ट्राच्या अभिमानाने त्यांचे अंतःकरण भरून येते. 'मराठ बाणा', 'शिवप्रताप', 'महाराष्ट्र गीत' आणि 'आमची मायबोली' या त्यांच्या कविता मुळातूनच वाचण्यासारख्या आहेत. त्यातील एखाद दुसरे कडवे उद्धृत करून त्यांच्यातील राष्ट्रभावनेची आणि काव्यगुणाची कल्पना येऊ शकत नाही. 'मराठ बाणा' वर्णन करताना सांगतात,

" महाराष्ट्र हा कृष्ण पाषाण देही, परी लोह पाणीहि अंगात या
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा, मान्जरा, वैनगंगा तया ।।"

शेवटच्या कडव्यात म्हणतात,

" मराठीस अन्याय कोठेही झाला, स्वदेशी विदेशी कुणी गांजिले
मराठी कसा मी न संताप माझा धडाडे जरी तीव्र दुःखानिले ?
मराठी जनांचेच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्र देशी तरी–
प्रसादे तुझ्या कोणती व्यक्त आशा करू अन्य हे वन्द्य वागीश्वरी ?"

(– मराठ बाणा) (स्वप्नरंजन)

'महाराष्ट्र गीता 'त म्हणतात,

" महाराष्ट्र जन्म पावे धन्य धन्य स्वदेश ।
येई शिव निवाराया सारे दास्याचे क्लेश ।।" (– स्वप्नरंजन)

'शिवप्रताप' या सुप्रसिद्ध कवितेत पुन्हा मराठीबाणा कवीने कथन केलेला आहे. ते म्हणतात,

" भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा
मराठी आमुची बोली गनीमी आमुचा बाणा
मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्य बंधारा
कशाचा पारतंत्र्याला दऱ्या खोऱ्यात या थारा ?" (– शिवप्रताप)
(गज्जलांजली)

मायबोलीचा अभिमान व्यक्त करताना त्यांच्या गाजलेल्या कवितेत म्हणतात,

" मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्न धर्मानुयायी असू
पुरी बाणली बन्धुता अंतरंगी, हिच्या एक ताटात आम्ही बसू
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू, तसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी
जगन्मान्यता हीस अर्पू प्रतापे हिला बैसवू वैभवाच्या शिरीं ।।"
" आमुची मायबोली " (– स्वप्नरंजन)

अशी कितीतरी उदाहरणे देऊन माधव ज्यूलियनांची राष्ट्रभक्ती आणि महाराष्ट्राभिमान सांगता येण्यासारखा आहे. पण इतर महत्त्वाच्या मुद्यांकडे वळणे त्यांच्या राष्ट्रीय कवितेच्या अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

पारतंत्र्याची खंत आणि स्वातंत्र्याची उत्कट इच्छा– अलिप्ततावादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कवीला राष्ट्रीय भावनेपासून अलिप्त राहताच आले नाही. पारतंत्र्याची खंत आणि स्वातंत्र्याची उत्कट इच्छा सदैव त्यांच्या अंतःकरणात वास करून होती आणि प्रसंगविशेषी काव्याच्या माध्यमातून ती प्रकटही होत होती. 'स्वातंत्र्य देवतेला निवेदन', 'क्षात्रधर्म', 'भ्रांत तुम्हा का पडे'? 'पुरे झाले देवा', 'अल्लाहु अक्बर', 'पश्चिमेच्या मारुतीचे उच्छ्वास', तुटलेल्या दुव्यातील ८४, ८९; ९१, ९५ ही सुनीते आणि 'फटकळ अभंग' इतक्या कवितांमधून या उभयविध भावनांचे दर्शन घडते. या दोन्ही भावना विविध अर्थछटांनी संपन्न आहेत. पारतंत्र्याची खंत व्यक्त करताना कधी त्या जीवनाबद्दलची त्यांना घृणा आहे. कधी स्वतःच्या दुबळेपणाची जाणीव आहे तर कधी विघटनकारी तत्त्वांचा त्यात निषेध आहे. स्वातंत्र्याची भावनाही विविधांगी आहे. काही उदाहरणे देऊन हा मुद्दा विशेष प्रकारे स्पष्ट करता येईल. पश्चिमेच्या मारुताचे उच्छ्वास ही कविता बघा. 'फटकळ' अभंगात कवी पंढरीच्या पांडुरंगाला सांगतो,

" पुरे झाली देवा, आजवर शोभा, मार आता तोवा भक्तांना या
युगे अठ्ठावीस परवश जिणे, जणू मिरविणे प्रेत यात्रा
कोणीही कोठून यावे झोडपावे, त्यास निष्ठा भावे सेवितोच "
(– फटकळ अभंग ५)– उर्वरित कविता

पारतंत्र्यामुळे महाराष्ट्रात राष्ट्रबांधवच मला दिसत नाहीत असे कवी म्हणतो.

" देवा जन्म दिला कशास्तव महाराष्ट्रात या रे मला
कोठेही मज राष्ट्रबन्धु न दिसे, मी एकला एकला ॥"

दुसऱ्या एका सुनीतात ते म्हणतात,

" स्वातंत्र्यात मिळेल भाकर सुखे सर्वांस जेवायला
ओवाळीन जिवास त्यावरुनि मी राष्ट्रार्थ जो भागला "
(– सुनीत ८५)– तुटलेले दुवे

या स्वातंत्र्याची शिकवण देणाऱ्या देशभक्तांची कवीला आठवण झाल्याशिवाय राहत नाही. तो आपल्या नेत्यासंबंधी गौरवपूर्वक सांगतो,

" गोपाळ एक आमुचा नेता ' सुधारक '
त्याचा 'सुधार्क' तीव्र तो क्षयरोगमारक
स्वातंत्र्य, न्याय, सत्य या वन्दा त्रिमूर्तिला
घ्याता वृथा कशास हो पाषाण– ठोकळे ?"
(– चम्बळेच्या तीरावर) (– उर्वरित कविता)

प्राचीन परंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण– माधव ज्यूलियन सुधारणावादी विचार-सरणीचे होते आणि आपले समाजसुधारणाविषयक विचार त्यांनी काव्यातून मांडलेलेही आहेत. पण त्याचबरोबर ते प्राचीन परंपरेचे अभिमानीही होते हे विसरता येत नाही. त्यांच्या अनेक कवितांतून प्राचीन परंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण प्रकट झालेले आहे. ' कुणी काय बांधिले ?' 'इन्शाल्ला', ' वादळाची रात ', ' महाराष्ट्र गीत ', ' छत्रपती संभाजी राजे यांच्यावरील सुनीत ', 'ते स्वातंत्र्य कुठे ?' असे सांगणारे सुनीत, ' शिवप्रताप ', 'क्षात्रधर्म', 'भ्रांत तुम्हा का पडे ?' या कविता सांगता येण्यासारख्या आहेत. ' वादळाची रात ' हे नाट्यगीत प्राचीन परंपरेचा अभिमान सांगणारे आहे. या गीताचा नायक क्षत्रिय कुळातला आणि धर्माभिमानी आहे. बहिणीवर बलात्कार करून तिला बाटविणाऱ्या आणि सात हजाराच्या मनसबदारीचे प्रलोभन दाखवून त्यालाही भ्रष्ट करणाऱ्या विधर्मीय सत्ताधीशाला सुडाने पेटून तो नायक ठार करतो आणि शेवटी भ्रष्ट झालेल्या बहिणीचा प्राण घेऊन स्वत:ही आत्महत्या करतो असे या गीताचे थोडक्यात कथानक आहे. तो आपल्या बहिणीला विचारतो,

" खाल्ली आईबापे खंत । झाला अपमान अन्त ।
अन् तू शृंगारी जिवंत । ताई केवी ?
— कुळ प्रेमाहून थोर । देश कुळाहून थोर ।
धर्म देशाहून थोर । केव्हाही गे ।
आईबापे गेली जेथ । वैरी धाडिला मी तेथ ।
आता तू मी समवेत । जाऊ वर !" (– वादळाची रात– स्वप्नरंजन)

धर्मासाठी बलिदान करणाऱ्या धर्मवीर छत्रपती संभाजीची भग्नसमाधी पाहून कवीला दुःख होते आणि त्या आवेगात हे सुनीत त्याच्या मुखातून बाहेर पडते. तो म्हणतो,

" तू केलास सजीव धर्म सहुनी प्राणान्त दुःखे स्वतः
राजातील दधीचि होउनि कसा केलास आत्मक्रतू "

(– तुटलेले दुवे– सुनीत ८३)

' क्षात्रधर्म ' या कवितेत पराक्रमी परंपरेबद्दल सांगतात,

" जन्माला शार्दुल वंशी स्वत्व जाणा, आचरा
धूर्तता ये घेऊनी का जंबुकाचे कातडे ?" (– क्षात्रधर्म) – गज्जलांजली

आणखी एका कवितेत अशीच परंपरा सांगताना म्हणतात,

" अडाणी मावळे काळे शिपाई शूर पायीचे
उभे हे खांब पोलादी मराठी हिन्दुशाहीचे
अशांचा म्होरक्या सर्जा म्हणू द्या त्याजला चुळवा,
परंतु शत्रुचा पाया खणूनी हा करी धुळवा ।।"

(– शिवप्रताप) – गज्जलांजली

परंपरेचा अभिमान सांगताना शूर दत्ताजी शिंद्यांची आठवण होते,

" जो बचेंगे तो लढेंगे । शूर दत्ताजी वदे,
स्वामीकार्यी जीव दे !" (–भ्रान्त तुम्हा कां पडे ?) –गज्जलांजली

अशी आणखीही उदाहरणे देऊन पूर्ववैभवाचे स्मरण सांगता येण्यासारखे आहे, परंतु आता दुसऱ्या मुद्याकडे वळू.

वीरविभूतिपूजन– राष्ट्रीय महापुरुषांच्या कार्यापासून प्रेरणा घेण्याचे कार्य पिढ्यान्पिढ्या चालत असते याची जाणीव माधव ज्युलियनांना आहे म्हणूनच अनेक कवितांद्वारा त्यांनी महापुरुषांना गौरविले आहे. " कुणी काय बांधिले ?" यात शहाजहान, छत्रपती शिवाजी महाराज आणि साध्वी अहल्याबाई होळकर यांचा उल्लेख आहे. असेच उल्लेख ' मराठवाणा ', ' महाराष्ट्र गीत ', ' शिवप्रताप ', ' छत्रपती संभाजी महाराजांवरील सुनीत ' यात आहे. छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचे मावळे झुंझार सैनिक आणि धर्मवीर संभाजी यांचा गुणगौरव आहे. तुटलेल्या दुव्यातील ७१ क्रमांकाच्या सुनीतात स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्या वीरांची पावनस्मृती आहे. ' अनामिक वीराची समाधी ', ९३ क्रमांकाच्या सुनीतातील राष्ट्राचा कोसळणारा डोलारा सावरणारे ' देशभक्त ' आणि ' कोण त्याला ना स्तवी ' अशा कीर्तिमान राष्ट्रभक्तांचे स्मरणही कवीने आदराने केलेले आहे. ' खरा शूर ' आणि ' पुरुषाची छाती ' या दोन कवितांमधून सर्व सामान्यातील पराक्रमी वृत्तीचे पूजन केल्याचे आढळून येते. दीन दुबळ्यांच्या रक्षणासाठी स्वतःच्या प्राणाचा उत्सर्ग करणारे हे वीर आयुष्यात कधीतरी येऊन जातात त्याचाही गुणगौरव माधव ज्युलियनांनी केलेला आहे.

अर्वाचीन काळातील राष्ट्रधर्माचे प्रणेते न्या. माधव गोविंद रानडे, सुधारकाग्रणी आगरकर, महात्मा गांधी, रवीन्द्रनाथ ठाकूर, वैजनाथ राजवाडे, इतिहासाचार्य राजवाडे, ज्ञानकोशकार, समाजशास्त्रज्ञ डॉ. श्री. व्यं. केतकर, कविवर्य रे. नारायण वामन टिळक आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील

नव्या तुर्कस्थानचे निर्माते 'केमालपाशा' यांचे गुणकीर्तन कवीने केलेले आहे. १९२० नंतरच्या भारताच्या राजकीय चळवळीचे सूत्रधार महात्मा गांधी यांच्यावर 'महात्मा काय करिल एकला ?'; 'दोन विभूती', 'महात्मा' आणि 'सिंहाचा पाडाव' अशा चार कविता माधव ज्युलियनांनी लिहिल्या आहेत. लोकमान्य टिळकांच्या राजकीय, सामाजिक विचारांशी त्यांचे तात्त्विक मतभेद असल्यामुळे या राष्ट्रपुरुषाचा कुठे ओझरता उल्लेखही त्यांच्या राष्ट्रीय कवितेत आढळत नाही. मात्र कवीने शिवाजी महाराजांना महात्मा पदवीने गौरविले आहे. "सदा वंद्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्र सम्राट शिवाजी प्रभू, तथा पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न का संत माता महाराष्ट्र भू" (– मराठबाणा), सत्यप्रीती अहिंसा यांचा झेंडा घेऊन रंजल्या गांजल्याची सेवा आणि राष्ट्र-मुक्तीची चळवळ करणारा महात्मा भूतदयेचा सागर आहे परंतु त्याला प्रगती द्रोह्यांनी घेरले आहे. कवी म्हणतो;

"हे प्रगती द्रोही फण्ड गुंड मातले
— हुल्लड होशी मित्र दाविती अत्याचारे गळा–
महात्मा काय करिल एकला ?"
(– महात्मा काय करिल एकला ?) (– स्वप्नरंजन)

वीर विभूतिपूजन करणाऱ्या 'पुरुषाची छाती' आणि 'खरा शूर' या कविता खूप गाजलेल्या आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील पण वर नमूद केलेल्या कविता मुळातूनच वाचण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय परिस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब– माधव ज्यूलियनांच्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा विविध राष्ट्रीय परिस्थितीचे प्रतिबिंब त्यांच्या राष्ट्रीय कवितेत यथार्थतेने पडलेले आढळते. नागरी विभागातील विशिष्ट वर्ग चैनीचे, सुखाचे आणि ऐश्वर्याचे जीवन जगतो. या वर्गाच्या ऐश्वर्याची निर्मिती कुणी केली ? पुढे तो म्हणतो,

"धंदेवंत कुबेर राष्ट्रिय अशा शक्तीस जे साधक ?
शेती उत्तम, का बरे मग तिथे दारिद्र्य हे तिष्ठते ?" (–सुनीत क्र. ७४ – तुटलेले दुवे)

कवीची स्वातंत्र्याची अपेक्षा अगदीच माफक आहे. तो म्हणतो,

"स्वातंत्र्यात मिळेल भाकर सुखे सर्वास जेवायला
ओवाळीन जिवास त्यावरुनि मी राष्ट्रार्थ जो भागला ॥" (– सुनीत ८५ – तुटलेले दुवे)

आर्थिक विषमतेप्रमाणेच सामाजिक विषमताही जाचक असल्याचे काही कवितांतून कवीने सांगितले आहे. तो म्हणतो;

"श्रेष्ठता जन्मेच का ये ? जातिदर्पाला त्यजा,
हिन्दुतेला या भजा
नेमका का भेद भासे ? साम्य सारे का दडे ?" (– भ्रान्त – गज्जलांजली)

दुसऱ्या कवितेत कवी म्हणतो,

" चोखा का न शिरु शके ? प्रभु न तत्स्पर्शे उरे पावन ।
पीराला नवशी कसा द्विज ? अहो ! सर्वत्र नारायण ।।"

निरनिराळ्या कारणाने स्त्रियांचा कुटुंबात होणारा छळ आणि पतीकडून लहान सहान चुकांमुळे होणारी मारहाण पाहून कवी म्हणतो,

" दावावे अबलेस तू बळ तुझे मुर्दाड मर्दा पहा
द्यायाचा तिज हात तो उलट तूं भार्येवरी टाकिशी ?
सुल्तानी सगळी घरातच तुझी अन् आर्य पत्नीप्रती ।।" (– भ्रष्टा ! स्वप्नरंजन)

' इन्शाल्ला ' या कवितेतून धर्मवेडघा मुसलमानांच्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांच्या फुटीर वृत्तीचे मूळ कवीने सांगितले आहे. तो म्हणतो,

" हिंदुस्थान न राष्ट्र, खास तुमची ही भोग भूमी असे
ऐशाराम मिळे इथे खचित तो त्या शाम–रुमी नसे ।।" (– इन्शाल्ला – स्वप्नरंजन)

हा देश बलवान करावयाचा असेल तर लंगोटीने लाजेचे रक्षण करणाऱ्या, संशयी, दीन, मूढ, सोशिक दिसणाऱ्या मागासलेल्या अज्ञबांधवांना जागृत करावे लागेल. या देशात अनेकदा राज्यक्रांत्या होऊनही त्यांचा एकादशी आणि पाडवा चुकला नाही. म्हणून कवी म्हणतो,

" रे ऊठ द्विज हो । मनूतिल नव्या हो क्षत्रिय ब्राह्मण ।
शेते तू कसशी नि तूं पिकविशी धान्य स्वकष्ट श्रमे ।
आता नांगरुनी समाज पिकवी राष्ट्रैक्य तू विक्रमे ।।"
(– तुटलले दुवे –सुनीत ९२)

कायदा पाळा गतीचा असा संदेश– माधव ज्यूलियन सुधारणावादी वाटत असले तरी ते खऱ्या अर्थाने धर्मनिष्ठ आणि तितकेच हिंदुत्वनिष्ठ आहेत. त्यांच्या सुधारणावादाला राष्ट्रवादाचे अधिष्ठान आहे. ' अल्ला हु अक्बर ' म्हणजे ' ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे ' या शीर्षकाच्या कवितेत म्हणतात,

" धर्मात साची ही राष्ट्र भक्ती
दात्री यशाची ही संघशक्ती
सर्वत्र होवो राष्ट्रीय संकर
घ्यायेत स्वदेशम् । अल्ला हु अक्बर ।।" (अल्ला हु अक्बर गज्जलांजली)

हिंदुत्वनिष्ठ अशा राष्ट्रनिष्ठेमुळेच सीमोल्लंघनाच्या दिवशी पथसंचलनाला गणवेषात, रांगेने शिस्तीत जाणारे संघाचे स्वयंसेवक पाहून त्यांच्या अंतःकरणातील भाव उचंबळून येतात. ते म्हणतात,

" सीमोल्लंघन हे असे नव पिढी आता कराया निघे
राष्ट्रदृष्टि नवीन ठेवुनि पुन्हा स्वत्वास जिंकुनि घे ।। "
(तुटलेले दुवे सुनीत ८७)

शेवटी या पायिक शूरांबरोबरच व्योमसंचारिणी अशा युवतीही पुढे आल्या पाहिजेत असे त्यांनी सांगितले आहे.

राष्ट्रनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि हिंदुत्वनिष्ठा असूनही कवीची राष्ट्रवादाची कल्पना व्यापक आहे. महाकवी सावरकरांना जसा मॅझिनी हा गुरू वाटला किंवा प्रे. ऋगरच्या मृत्यूवर त्यांना विलापिका लिहावीशी वाटली तशीच तुर्कस्थानचा नेता "केमालपाशा" याचे गौरवगीत माधव ज्यूलियनांनी उत्साहाने गायिले आहे. त्यावरून त्यांचा राष्ट्रवाद हा मानवतावादी असल्याचे दिसून येते. ते 'केमाल पाशा' या कवितेत म्हणतात.

"स्वराष्ट्रतत्त्व दाविशी, न धर्म भावना पिशी
रणी अरीस दापिशी, परी न रक्त हावरा
... कवी नवीन हिन्दु मी, कुठे कमाल तू रुमी ?
परंतु लोकशाहिचा सदा शुभेच्छू मी खरा ॥" (– केमाल पाशा)

केमाल पाशाप्रमाणेच ॲबिसिनियाचे, जपानचे आणि रशियाचेही कौतुक या कवीने केलेले आहे. राष्ट्राचा उत्कर्ष साधायचा असेल तर गतीचा कायदा पाळला पाहिजे असे निःसंदिग्धपणे कवीने सांगितले आहे.

"कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला,
थांबला तो संपला !
धावत्याला शक्ति येई आणि रस्ता सापडे ॥" (भ्रान्त तुम्हा कां पडे – गज्जलांजली)

महाराष्ट्र धर्माचा पुरस्कार– भौतिकशास्त्रातील गतीचा नियम सांगणाऱ्या या कवीने विज्ञानाचा पुरस्कार केलेला आहे. त्याची दृष्टी पारलौकिकापेक्षा ऐहिकाकडे अधिक आहे. म्हणूनच ते म्हणतात,

..." काळ साधे जो यशस्वी क्रांतिकार्यी जाहला
कीर्तिला तो पावला,
खेचु काळालाच पाही जो प्रयत्ने मानवी । कोण त्याला ना स्तवी ?"
(गज्जलांजली – कोण त्याला नास्तवी)

समर्थ रामदासांच्या "महाराष्ट्र धर्माला" अभिप्रेत असलेला प्रपंचवाद, कर्मप्रतिष्ठाप्रणीत प्रयत्नवाद पटवर्धनांनी आपल्या कवितांतून अनेक ठिकाणी सांगितलेला आहे. 'भ्रांत तुम्हा का पडे ?' 'पुरुषाची छाती', 'महाराष्ट्र गीत' आणि 'आवाहन' यासारख्या कवितांतून तो ठसठशीतपणे मांडलेला आहे. किबहुना हा महाराष्ट्र धर्म म्हणजे माधवरावांचा प्रेरणादायी, स्फूर्तिदायक राष्ट्रीय आशावाद आहे. त्यांच्या 'आव्हान' मधील या पंक्ती पुरावा म्हणून सांगता येतील.

"नका अल्पसंतुष्ट राहू, प्रभू व्हा
भिकारी न व्हा, मात्र नावेच साई
जया ध्येय चित्ती, तसे तेज अंगी
तयाच्या यशाला न कोठे मनाई –" (आव्हान, गज्जलांजली)

कविता आणि कवी यासंबंधी माधव ज्यूलियनांचा दृष्टिकोन

माधव ज्यूलियत हे केवळ कवी नव्हते तर एक श्रेष्ठ काव्यसमीक्षक होते, काव्यसंपादक होते, त्यामुळे कविता आणि कवी यासंबंधी त्यांनी अनेक ठिकाणी आपले विचार मांडलेले आहेत. 'माझ्या

आयुष्याचा माझ्या लेखनावर परिणाम ' या लेखामध्ये पटवर्धनांनी स्वच्छ निर्वाळा दिला आहे की; " मी जे लिहितो ते मनापासून लिहितो, प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनेक अनुभूतींचा उपयोग करून लिहितो; माझी कृती आत्मप्रकटीकरणासाठी आहे हे सारे खरे, तथापि ती आत्मचरित्रपर नाही हेही तितकेच खरे आहे."[२२] कवीसंबंधी आपली भूमिका मांडताना माधवराव म्हणतात, " कवी हा मूलतः पौराणिक, ऐतिहासिक वा काल्पनिक, प्राचीन व स्वकालीन कथा सांगणारा आणि स्वतःची वा इतरांची सुखदुःखे सहानुभूतीने वर्णन, मनोरंजन करणारा म्हणजे एका दृष्टीने प्रतिष्ठित तमाशेकारच होय." [२३]

काव्य आणि जीवन यासंबंधी माधवराव पटवर्धनांचे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात, " कविता ही ज्या जीवनाची छबी आहे ते जीवन केव्हाही अधिक महत्त्वाचे व प्रेय असणार... कविता हे उधाणलेल्या भावनेला पाट काढून देण्याचे साधन आहे. कविता रचणे हे ध्येय होऊ शकत नाही." [२४] कलाकृतीचे नियम सांभाळून मग काव्याद्वारा शिकविले तरी हरकत नाही असे ते म्हणत. " कवी टीकेचे कोरडे ओढील, प्रगतीपर व बंडखोर स्वातंत्र्याचे पवाडे गाईल व उद्बोधक सिद्धान्तही मांडील... कविता ही तात्त्विक चर्चेहून अधिक परिणामकारण होण्याचे कारण ती सावेश असून इंद्रियगोचर वर्णनाने प्रत्यक्ष अनुभूतीचा भाग करून देते हे होय आणि अनुभूतीहून अधिक परिणामकारक काहीच नाही." [२५]

मराठी वाङमय राष्ट्रीय आणि प्रातिनिधिक स्वरूपाचे असावे अशी माधव ज्यूलियनांची अपेक्षा होती.

विकसनशील व्यक्तिमत्त्वाचा कवी

माधवराव पटवर्धनांचे कवी आणि काव्यविषयक विचार वाचले म्हणजे ते एक विकसनशील व्यक्तिमत्त्वाचे कवी होते यासंबंधी खात्री पटते. ' तुटलेल्या दुव्यातील ' त्रेचाळीसाव्या, १९२२ च्या सुनीतात,

" माझ्या आन्तर जीवनास न शके काढू कुणी बाहिर
स्वातंत्र्याप्रिय आत्मनिष्ठच सदा मी अद्रिवत सुस्थिर !"

असे म्हणणारा हा कवी आपल्या उत्तर आयुष्यात व्यापक, उदार अशा जाणिवेने समाजाचा विचार करताना दिसतो. रंजल्या गांजल्या कष्टकरी लोकांना सुखी कसे करता येईल याचा त्याला ध्यास लागतो आणि १९३६ साली जळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषण करताना त्यांच्यातला राष्ट्रभक्त प्रकट झालेला आहे. कलेपेक्षा समाज आणि राष्ट्र यांचे हित कशाने होईल याचाच प्रामुख्याने ते आपल्या भाषणातून विचार करताना आढळतात. साहित्यिकांना आणि हजारो श्रोत्यांना उद्देशून ते म्हणतात, " धर्मनिष्ठा, भाषाप्रेम आणि देशभक्ती ही मिळून एखाद्या लोकसमाजाच्या, एखाद्या राष्ट्राच्या ऐक्याची त्रिवेणी वाहत राहते...वस्तुतः स्वभाषाभक्ती नि स्वदेशभक्ती ही स्वधर्माचीच अंगे आहेत पण आता काही सुशिक्षित लोकांना धर्म या शब्दाचीसुद्धा घाण येऊ लागली आहे." [२६] या उद्गारावरूनही त्यांच्या विकसनशील व्यक्तित्वाचा प्रत्यय येतो.

टीकाकारांच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन

माधव ज्यूलियन यांच्या काव्यासंबंधी आणि व्यक्तिमत्त्वासंबंधी तसेच त्यांच्या काव्याच्या ऐतिहासिक कार्यासंबंधी टीकाकारांनी भिन्न भिन्न मते प्रकट केलेली आहेत. प्रा. भ. श्री. पंडितांना

त्यांच्या काव्यात तत्त्वपर, ध्येयपर व भक्तिपर अशा कविता आढळतात.[२७] बाळकृष्ण अनंत भिडे त्यांच्या शृंगारिक कवितांवर तुटून पडले आणि "या शृंगारिक कवनांचे भयानकत्व काव्यप्रतिभेच्या दीप्तीने दुणावले आहे."[२८] असा प्रतिकूल अभिप्राय देते झाले. भिन्न भिन्न रुचीच्या लोकांना एक गूढ गुंजनाचा अपवाद करता पटवर्धनांचे काव्य आवडण्यासारखे असून चंद्रशेखर किंवा तांबे यांच्यासारखे आयुष्य त्यांना लाभले असते तर ते महाकवित्वाची पदवी संपादन करू शकले असते, अशा आशयाचा अभिप्राय सुप्रसिद्ध काव्यसमीक्षक प्रा. रा. श्री. जोगांनी दिला आहे.[२९]

माधव ज्यूलियनांची जीवनकथा लिहिणारे गं. दे. खानोलकर यांनी पुढील उद्‌गार काढले आहेत. "जो कालखंड हा संग्रह व्यापतो, तो अनेक क्रांतिकारक घटनांनी भरलेला कालखंड लक्षात घेता पटवर्धनांसारख्या संवेदनशील, क्षोभसुलभ, प्रज्ञावंत व विचारवंत कवीची प्रतिभा त्याने विशेषशी प्रस्फुरित झालेली दिसत नाही."[३०] अ. ना. देशपांडे यांनी "पटवर्धनांच्या कवितेने आधुनिक मराठी कवितेची केलेली सेवा मौलिक आणि महत्त्वाची आहे."[३१] असा अभिप्राय दिला आहे.

रविकिरण मंडळाचे एक सदस्य आणि पटवर्धनांचे मित्र सुप्रसिद्ध साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर त्यांच्या चिकाटी, स्वत्वाची विलक्षण चाड आणि मतपरिवर्तनशीलता[३२] या तीन विशेषांचे महत्त्व प्रतिपादन करतात. डॉ. वा. भा. पाठकांच्या मते महाराष्ट्र प्रेम व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन आणि व्यापक राष्ट्रीयत्वाचा दृष्टिकोन हे विशेष माधव ज्यूलियनांच्या कवितांतून दिसून येतात.[३३] श्री. द. न. गोखले यांनी पटवर्धनांच्या राष्ट्रीय आणि सामाजिक कवितांची विस्तृत चर्चा केलेली आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे विशेष सांगताना ते म्हणतात, "चौफेर वाचन, तल्लख बुद्धिमत्ता समाजनिरीक्षणाची प्रवृत्ती आणि समाजहिताची कळकळ या गुणांमुळे ही विविधांगी सामाजिकता त्यांच्या कविमनात वाणली असावी."[३४]

माधवराव पटवर्धन वाङ्मयदर्शनकार श्री. सु. रा. चुनेकर यांनी आपल्या प्रबंधात पटवर्धनांच्या कवितेतील 'सामाजिकता' या मुद्याची चर्चा करताना, प्रभावी समाजनिष्ठा, पतितांविषयीची सहानुभूती, डोळस धर्मनिष्ठा, राष्ट्रीय ऐक्य, समता, सामर्थ्यसंपादन, हिंदुत्वनिष्ठा, मराठवाणा आणि प्रयत्नवाद या विशेषांचे दिग्दर्शन केलेले आहे. शेवटी ते म्हणतात, "पटवर्धनांच्या अनेक कवितांतून ही प्रखर राष्ट्रीय दृष्टी दिसते. त्यात व्यापकता आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व संपूर्ण जाणण्याच्या दृष्टीने त्यांना महत्त्वही आहे पण अशा कवितांतून अनुभूतीचे वैशिष्ट्य फारसे आढळत नाही. या कवितेतील विचार काव्यात्मकतेच्या पातळीला पोहोचू शकत नाहीत."[३५]

समारोप– विषयाची अभिरुची आणि व्यक्तिसापेक्षता हे दोन घटक लक्षात घेतले तर मतमतांतराबद्दल आक्षेप घेण्याचे कारण उरत नाही. पटवर्धनांची कविता कलात्मकतेत, उणी असेलही पण राष्ट्रीय आशयाच्या दृष्टीने ती त्यांच्या समकालीन कवींत संपन्न आहे. राष्ट्रीय भवितव्यासंबंधीची तीव्र जाणीव आणि राष्ट्रीय उत्कर्षाची तळमळ असल्याशिवाय अशी कविता निर्माण होत नाही. पटवर्धनांच्या कवितेने राष्ट्रीयत्वाची जाणीव सर्वस्पर्शी आणि व्यापक करण्याचे ऐतिहासिक कार्य तर बजावलेच पण भ्रांत हिंदपुत्रांना जागृत करून गांधीजींच्या प्रभावाच्या काळात नव्याने 'महाराष्ट्र धर्म' शिकविला.

राष्ट्रीय भावनांची सौम्य आणि संयमित अभिव्यक्ती करणारे कवी गिरीश

परिचय– कवी गिरीश उर्फ शंकर केशव कानेटकर (जन्म–१८९३–मृत्यू–१९७३) हे आधुनिक मराठीतील प्रथितयश कवी आणि रविकिरण मंडळाचे एक सन्मान्य सदस्य म्हणून महाराष्ट्राला

सुपरिचित आहेत. 'काव्यकला' हा टीकात्मक लेखसंग्रह, 'मराठी नाटयछटा' हा विवेचनात्मक प्रबंध आणि 'परिमळा' हा स्फुट लेखांचा संग्रह हे गद्यलिखाणही त्यांनी केलेले आहे. अध्ययन, अध्यापन आणि प्रामुख्याने काव्यलेखन या त्रिविध कार्यात गिरीशांनी आपली उभी हयात वेचलेली आहे. मराठीचे उत्तम विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक आहे. सांगलीच्या विलिग्डन कॉलेजातून ते सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री. गिरीश संवेदनशील अंतःकरणाचे भावकवी असले तरी स्वतःच्याच सुखदुःखांना सदोदित कुरवाळणारे आत्मनिष्ठ कवी नाहीत. त्यांचा पिंड सत्त्वशील; सुसंस्कृत कर्तव्यदक्ष व सदाचारसंपन्न शिक्षकाचा असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांचा ओढा आदर्शवादाकडे अधिक आहे. समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि ईश्वरनिष्ठा या त्रिविध निष्ठांनी त्यांचे भावजीवन संपन्न आहे. या संदर्भात त्यांची तुलना भा. रा. तांब्यांशीच करता येईल. पण त्यांच्यात आणि तांब्यांत एक महत्त्वाचा फरक आहे. तांबे बोधवादाच्या आहारी कधीच गेले नाहीत. गिरीशांनी मात्र आपल्या अनेक स्फुट कवितांतून बोधवादाचा उघड उघड पुरस्कार केलेला आहे.

स्फुट आणि दीर्घ अशा दोन्ही प्रकारची विपुल काव्यरचना त्यांनी केलेली असून १९५३ पासून त्यांचे काव्यलेखन अव्याहत सुरू आहे. 'कांचनगंगा', 'फलभार', 'मानसमेघ', 'चंद्रलेखा', 'कांचनमेघ आणि सोनेरी चांदणे' हे त्यांचे स्फुट कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'अभागी कमल', 'कला', 'आंवराई', 'अनिकेत' आणि 'प्रीतिसंगम' ही त्यांची खंडकाव्ये गाजलेली आहेत. विधवा स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीच त्यांचे 'अभागी कमल' हे खंडकाव्य अस्तित्वात आलेले आहे. भाव कवी म्हटला की प्रणयभावनेला प्राधान्य हे आलेच. परंतु गिरीशांच्या काव्यात तसे आढळत नाही. राष्ट्रीय क्षेत्रातील गणमान्य व्यक्ती, संस्था आणि स्वकीय लोक यांच्याबद्दलचा जिव्हाळा आणि आदर त्यांच्या अनेक सुनीतांतून प्रकट झालेला आहे. गिरीशांच्या सौम्य संयमशील मनःप्रकृतीप्रमाणेच त्यांची काव्यप्रकृतीही सौम्य आणि संयमशील आहे. त्यांच्या नावातील प्रलयंकारी रुद्राचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडत नाही. ईश्वरनिष्ठा, सामाजिकता, निसर्गप्रेम, संगीताचा प्रभाव आणि जानपदजीवनदर्शन अशा विषयांना त्यांनी आपल्या काव्यात प्राधान्य दिलेले आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्तीही त्यांनी केलेली आहे. या लेखात या शेवटच्या विशेषाचेच विवेचन केले आहे.

कवीची भूमिका– गिरीश हे प्राधान्याने समाजनिष्ठ कवी आहेत. ही समाजनिष्ठा त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचा पुरावा आहे. त्यांच्या समाजनिष्ठेचा पुरावा त्यांच्या 'कांचनमेघ' या कवितासंग्रहातील 'मनीषा' या कवितेतून स्पष्ट झालेला आहे.

"गतिमान नदासम मी व्हावे
फोफावत पुढती नित जावे ॥"

या पंक्तींनी कवितेची सुरुवात झालेली आहे. कवीने निसर्गाकडून सर्व प्रकारच्या समृद्धीची अपेक्षा केलेली आहे. नंतरच्या कडव्यात कवी म्हणतो,

"कष्टून कष्टून क्षणाक्षणाने
वृत्ति मिळविली जी अभिमाने,
करून मानवा तिची तर्पणे,
पराविया सुखि विरमावे !" (–कांचन मेघ)

'पराविया सुखि विरमावे' ही वृत्ती राष्ट्रीय भावनेचे मूळ आहे. म्हणूनच त्यांच्या हातून थोड्या प्रमाणात का होईना राष्ट्रीय कविता लिहिल्या गेलेली आहे.

राष्ट्रभक्ती– स्वदेशप्रेम, राष्ट्रभक्ती हा राष्ट्रीय भावनेचा केन्द्रबिन्दू आहे. 'धन्य राष्ट्र'; 'मानसमेघ', 'उद्याचा हिन्दवी वीर', 'होमकुंड' यासारख्या कवितांमधून ही राष्ट्रभक्तीची भावना व्यक्त झालेली आहे. आपल्या राष्ट्रासाठी मरणाची भीती झुगारून देऊन संघर्ष करण्यात तरुणांना आनंद वाटेल असे भाव 'धन्य राष्ट्र' या कवितेतून व्यक्त झालेले आहेत. कवी म्हणतो,

"माय भूमिच्या प्रतिष्ठेस जे। जुलुमी गर्वे देतिल धक्का
पाताळी त्या खेचूनी खाली। वदति वाजवू विजयी डंका;
वीरश्रीने असल्या भरुनी। तेजस्वी हृदये तरुणांची
देशासाठी उठली सारी। भिती झुगारुन झणि मरणाची ॥"
"धन्य राष्ट्र ते! धन्य राष्ट्र ते! धन्य पुत्रिका धारा तीर्थी–
मायभूमीच्या कल्याणास्तव। धावुनि, देती जे आत्माहुति ॥"

(– धन्यराष्ट्र–मानसमेघ)

भारत स्वतंत्र झालेला असून राष्ट्रसंघातील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने मानाचे स्थान भारताला मिळालेले आहे असे स्वप्न कवीला पडते. तो आनंदाने उद्गारतो,

"जगन्मान्य राष्ट्रांमध्ये हिंद माता विराजे, अहा! आज उच्चासनी"

(–उद्याचा हिंदवी वीर–मानसमेघ)

स्वातंत्र्याची उत्कट लालसा व पारतंत्र्याची तीव्र जाणीव– राष्ट्रभक्तीप्रमाणेच स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची तीव्र जाणीव कवीने अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे. 'हतभागिनि गे!' 'स्मृतिनष्ट रामराज्य', 'शनवारवाडा', 'होमकुंड', 'स्वतंत्रते!', 'स्वातंत्र्य-मंदिर', 'झुंजारप्रणती' या कविता त्या दृष्टीने वाचण्यासारख्या आहेत. हे स्वतंत्रते! हे महात्मते! तुझ्यासाठी आम्ही किती सोसले आहे. कवी म्हणतो,

"स्वतंत्रते नमोऽस्तु ते। नमोऽस्तु ते स्वतंत्रते।
... ... ज्वलंत ओठ बोलले। ज्वलंत हात पेटले।
ज्वलंत रक्त सांडले। सुपूजनार्थ देवते।"

(–स्वतंत्रते!–चन्द्रलेखा)

४२ च्या स्वातंत्र्याच्या लढ्यात साम्राज्यशाहीच्या इमानदार रक्षकांनी निःशस्त्र स्वातंत्र्यसैनिकांवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या आणि त्यामुळे एक तरुण तात्काळ ठार झाला आणि दुसरा मांडीला गोळी लागून गंभीर जखमी झाला. त्याला उचलायला येणाऱ्या त्या गोळीबार करणाऱ्यांना तो बाणेदार वीर म्हणाला,

"मी स्वतंत्र भारत मातेचा पूत
मज शिवू नका। ते हात भ्रष्ट जहाले।" (होमकुंड–चन्द्रलेखा)

पारतंत्र्यातील भारतमातेला पाहून होणारे दुःख व्यक्त करताना कवी म्हणतो,

"हतभागिनी गे! पाहुनी कोठे
... टाकू तृप्तीचा सुसकारा? ॥ धृ.
सुजला सुफला ओदनवतीला। खाया मिळती सदैव गारा ॥"

(– हतभागिनि गे–चंद्रलेखा)

परंपरा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण– राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची खंत या विशेषांपेक्षाही गिरीशांचे अंतःकरण राष्ट्रीय अभिमानाने आणि पूर्ववैभवाच्य स्मरणाने विशेष प्रभावित होते. राष्ट्रीय अभिमानाचा संबंध प्रत्यक्षपणे एखाद्या ऐतिहासिक वास्तूशी, एखाद्या स्थळाशी अथवा एखाद्या स्मृतीशी निगडित असल्याने तो अधिक चेतन, अधिक सजीव असतो. 'स्मृतिनष्ट रामराज्य', 'शनवारवाडा'; 'विक्रम नगरीस', 'मानस मेघ' 'शनवारवाड्याचे स्वप्नरंजन', 'प्रेरक माता', 'गरिबांची माय', या कविता या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. 'स्मतिनष्ट रामराज्य' या कवितेची सुरुवात,

"साम्राज्य केवढे विस्तरले चहुंकडे,
शोभले किती नद सरिता डोंगर, कडे," (– स्मृतिनष्ट रामराज्य)

अशा वैभवाच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या ओळींनी झालेली आहे. 'शनवारवाडा' पाहून दुःखाने त्याचे ऊर फाटते तर पेशव्यांच्या आणि त्यांच्या पराक्रमी सरदारांच्या पराक्रमाने अंगावर मूठभर मास चढते, छाती अभिमानाने फुलून येते. पण विनाशाचे दुःख व्यक्त करताना, कवी म्हणतो,

"इथे झेंडा मराठ्यांचा उडे वाऱ्यावरी स्वैर।
हिरीरी वीर भाऊची, मनीचा त्वेष चेतुन,
हटाने नाचवी घोडे कुरुक्षेत्रात चौखुर॥" – शनवारवाडा (कांचनमेघ)

अशाच परंपरेच्या अभिमानाच्या व पूर्ववैभवाच्या स्मृती 'मानस मेघ'; 'विक्रम नगरीस'; 'शनवारवाड्याचे स्वप्नरंजन' या कवितांतून आलेल्या आहेत.

वीर विभूतिपूजनाची आवड– परंपरेच्या अभिमानाची जाणीव आणि पूर्ववैभवाचे स्मरण गिरीशांना असल्याचे आपण पाहिले आहे. या विशेषाप्रमाणेच महापुरुषांना विनयपूर्वक अभिवादन करण्यात आणि त्यांच्या पराक्रमाचे गुणसंकीर्तन करण्यात गिरीशांनी उत्साह दाखविला आहे. देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, निःस्वार्थी सेवा, त्याग आणि तपस्या, पुरुषार्थ आणि झुंजारपणा या गुणांनी संपन्न असणाऱ्या महाभागांचे ते पूजक आहेत. 'सेनापतीस', 'मावळ्यांचें गाणे' 'देवी अहल्याराणीचे जीवन मंदिर', 'उद्याचा हिन्दवी वीर', 'होमकुंड', 'झुंजार प्रणती', 'सूर्यमालेतील सूर्य', 'गुरुदेव रवीन्द्र', 'महर्षी कर्वे', 'स्मृतिपूजा', 'पायातल्या दगडाचे सूक्त' या कविता उदाहरणादाखल सहज सांगता येतील. भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले आणि राजकारणातील त्यांचे शिष्य 'महात्मा गांधी' यांच्यावर कवीने विलापिका लिहिल्या आहेत. याशिवाय 'अस्थिविसर्जन' या कवितेतून गांधीजींचे माहात्म्य कथन केलेले आहे. 'सेनापतीस' या कवितेत सेनापतीचा प्रभाव वर्णन केलेला आहे.

"राष्ट्राचा इतिहास तू घडविला, तूं दाविता या बला
शौर्ये धावुनि हे रणात अपुली देतील रक्ताहुती॥"

सुधारणावादाचा पुरस्कार– सुधारणावादाचा पुरस्कार करताना त्यांनी स्त्रियांचा कैवार घेतलेला आहे. 'परित्यक्ता', 'वियोगिनीचे पुण्यस्मरण' यासारख्या कवितांतून स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली आहे. स्त्रियांचे प्रश्न, आर्थिक प्रश्न, देशाचे दारिद्र्य अशा विविध विषयांना त्यांच्या प्रतिभेने स्पर्श केलेला आहे. अशा कवितेतून वर्तमानाचे प्रतिबिंब पडलेले आढळून येईल.

आशावादी गीतांची निर्मिती– गिरीशांनी काही आशावादी गीतांची निर्मिती केलेली आहे, ती त्यांच्या बोधवादी भूमिकेला साजेशीच आहे. 'उद्याचा हिन्दवी वीर', 'निशाण रोवणी' यासारख्या कवितांतून त्यांचा राष्ट्रीय आशावाद प्रकट झालेला आहे. 'उद्याचा हिन्दवी वीर' या कवितेत राष्ट्रनिष्ठ, बलसंपन्न, आत्मविश्वासपूर्ण अशा भारतीय वीरपुत्राचे चित्र रेखाटलेले आहे. १९४१ साली लिहिलेल्या या कवितेत भगव्या झेंड्याची प्रतिमा कवीने उभी केलेली असून तो त्यांच्या हिंदुत्व-निष्ठेचा पुरावा आहे. दुसऱ्या कवितेत ते म्हणतात,

"चल निशाण धर हे करी। पुढे चल नेटाने वरि वरि ॥ ध्रु ॥
... करितिल खालुन दुर्दम मारा, भिडतिल पाठीस बाण भरारा,
कच खाऊ न रति भरी। पुढे चल नेटाने वरि वरी ॥"

(निशाण रोवणी – कांचन मेघ)

समारोप– कवी गिरीशांच्या राष्ट्रीय कवितांचे स्वरूप थोडक्यात असे आहे. ओजस्विता आणि उत्कटता या गुणांचा अभाव असल्याचे मत डॉ. अ. ना. देशपांडे आणि प्रा. रा. श्री. जोग यांनी काव्यपरीक्षण करताना मांडलेले आहे, तर आजच्या व्यापक अर्थाने त्यांना राष्ट्रीय कवी म्हणायलाही ते तयार नाहीत. त्यांची गाणी त्यांना क्रांतीचीही वाटत नाहीत. "त्यांचा सुधारणावाद आहे, क्रांतिवाद नाही व तो केशवसुतांकडून परंपरेने आलेला आहे."[३६] डॉ. अ. ना. देशपांड्यांना त्यांच्या सामाजिक अन्यायावरील कविता त्वेषातून, उत्कट तळमळीतून निर्माण झालेल्या वाटत नाहीत. त्यांच्या मागे सहानुभूती आणि दयेची प्रवृत्ती त्यांना दिसते.[३७] मात्र डॉ. अ. ना. देशपांडे यांनी गिरीशांच्या राष्ट्रीय कवितांचा एक महत्त्वाचा विशेष सांगितलेला आहे. त्यांच्या मते, "भारतीय जीवनाला गदगदा हलवून सोडणाऱ्या अलीकडच्या काही घटनांचे या संग्रहातील बऱ्याच कवितांतून जे पडसाद उमटले आहेत, त्यातून ऐकू येणारा सूर नवा वाटणारा आहे."[३८] हा सूर हिंदुत्वनिष्ठेचा आहे. हा सूर सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारा आहे. हा सैनिकीकरणाला उत्तेजन देणारा आहे. '४२ ची क्रांती', 'आझाद हिन्दसेना', 'स्वातंत्र्यदिवस', पंधरा आगस्ट १९४७, 'गांधी वध' या घटनांना त्यांनी काव्यातून स्थान दिलेले आहे. राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यप्रेम, परंपरेचा अभिमान, पराक्रमी पूर्वजांबद्दल आणि आधुनिक महापुरुषांबद्दलचा अभिमान, आदर आणि भक्ती त्यांच्या कवितांतून व्यक्त झालेली आहे. राष्ट्रीय काव्यातील त्यांची भूमिका सैन्याधिकाऱ्याची नाही, ती प्रत्यक्ष लढणाऱ्या सैनिकाचीही नाही, ती आहे त्यांचा मार्ग निष्कंटक करणाऱ्या पुरस्सर पथकातील साध्या सैनिकाची !

आधुनिक महाराष्ट्राचे शिवशाहीर–यशवंत (जन्म १८९९–मृत्यू १९८५)

महाराष्ट्राचे शिवशाहीर– रविकिरण मंडळाचे सदस्य म्हणून महाराष्ट्राला परिचित असलेल्या माधव ज्यूलियन आणि कवी गिरीश यांच्या राष्ट्रीय कवितांचा परिचय करून घेतल्यावर या मंडळाचे तिसरे सन्माननीय सदस्य यशवंत दिनकर पेंढारकर उपाख्य कवी यशवंत यांच्या राष्ट्रीय कवितेच्या अभ्यासाकडे वळायचे आहे उणी पुरी पाच तपे स्थिर, निष्ठापूर्वक, सातत्याने काव्यलेखन करणाऱ्या यशवंतांना रविकिरण मंडळाचे सदस्य असलेल्या वि. द. घाटयांनी 'सह्याद्री'ची उपमा दिलेली असून ती जशी अर्थपूर्ण आहे तशीच मार्मिकही आहे. यशवंतांच्या काव्यतपस्येला मानाचा मुजरा करणाऱ्या श्री. बालशंकर देशपांडे यांनी "अविचल, विशाल नि कणखर सह्यगिरीसारखे यशवंतांचे व्यक्तिमत्त्व सामर्थ्यसंपन्न असल्याचे"[३९] सांगितले आहे. "दैनंदिन जीवनातली लहान-

सहान सुखदुःखेसुद्धा ते विलक्षण उत्कटतेने अनुभवू शकतात, त्या अनुभूतीचा रसपूर्ण आविष्कार करण्यात ते सिद्धहस्त आहेत. ते स्वभावतः आत्मनिष्ठ भावकवी आहेत." [४०] असा निःसंदिग्ध अभिप्राय वि. स. खांडेकरांनी 'पाणपोई' या यशवंतांच्या निवडक कवितासंग्रहातील प्रस्तावनेत दिला आहे. 'छत्रपती शिवराय' हे यशवंतांचे महाकाव्य म्हणजे त्यांच्या काव्ययशोमंदिरावरचा सुवर्णकलश आहे. या महाकाव्यामुळे भावकवी यशवंत आधुनिक महाराष्ट्राचे शिवशाहीर म्हणून पुढे आलेले आहेत.

विकसनशील व्यक्तिमत्त्वाचा राष्ट्रकवी– समर्थ रामदासांच्या पुण्यपावन स्मृतींनी ओळखल्या जाणाऱ्या चाफळपासून अल्पशा अंतरावर असलेल्या कृष्णेच्या खोऱ्यातील तारळे गावी दि. ९ मार्च १८९९ रोजी यशवंतांचा जन्म झाला. चाफळ येथे माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांना शिक्षणासाठी लहानपणीच घर सोडून सांगलीला यावे लागले. यशवंतांच्या सुदैवाने त्यांना कवी साधुदास (मुजुमदार) यांच्यासारख्या प्रेमळ गुरूंच्या हाताखाली अध्ययन करण्याची संधी लाभली. प्रवेशपरीक्षेपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची उत्कट इच्छा असूनही परिस्थितीमुळे त्यांना घेता आले नाही. शिक्षण खात्यात कारकून म्हणून ते नोकरीला लागले. श्री. साधुदासांच्या मार्गदर्शनाखालीच यशवंतांनी आपल्या काव्यनिर्मितीला सुरुवात केली. रामदास स्वामींच्या चाफळ खोऱ्यातील संस्कार यशवंतांच्या मनावर झालेले होते. कृष्णा कोयनेच्या पवित्र तेजस्वी जलावर आणि त्यांच्या परिसरात घडलेल्या ऐतिहासिक महापुरुषांच्या वीरगाथांवर त्यांचा पिंड पोसलेला होता. राजकीयदृष्ट्या तो काळ लोकांच्या स्वातंत्र्यविषयक भावना जागृत करण्याचा होता. रामदासांच्या दासबोधाचे व मनाच्या श्लोकाचे खडे बोल आणि दुसरीकडून लोकमान्य टिळकांच्या केसरीचे आवाहन यांनी प्रभावित होऊन 'मराठ्यांच्या स्वातंत्र्य लक्ष्मीस' मुजरा करण्याची प्रेरणा यशवंतांना झाली.

काही काळानंतर सांगलीहून नोकरीच्या निमित्ताने पुण्यास आल्यानंतर त्यांच्या काव्यलेखनाला पुणेकर मंडळींच्या सहवासात वेगळे वळण लागले. कविवर्य माधव ज्युलियन, कवी गिरीश; प्रा. श्री. बा. रानडे यांच्यासारख्या कवींच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या सहकार्याने आणि प्रोत्साहनाने त्यांच्या काव्य प्रतिभेचा अधिक विकास झाला. त्यांच्या काव्यविषयाचे क्षितिज विस्तृत झाले. राष्ट्रीय लढ्यातील अपयशामुळे राष्ट्रीय भावनेच्या उभारीला धक्का बसला. परिणामी यशवंत कौटुंबिक तसेच व्यक्तिगत सुखदुःखाची अभिव्यक्ती करू लागले. त्यांची सुप्रसिद्ध 'आई' ही कविता याच प्रेरणेतून लिहिल्या गेली. एक यशस्वी भावकवी म्हणून यशवंतांनी लौकिक संपादन केला. विपुल आणि विविधतापूर्ण अशी काव्यनिर्मिती करण्यात यशवंत रमले असे दिसते तरी यशवंतांची राष्ट्रीय जाणीव अंतर्यामी सतत जागृत असल्याचे त्यांच्या नंतरच्या काळात लिहिलेल्या राष्ट्रीय आणि सामाजिक चिंतनपर कवितांवरून स्पष्ट दिसते.

आयुष्याच्या उतरणीवर असताना मातृभूमीचे ऋण फेडण्याच्या उदात्त भावनेतून त्यांनी तेरा हजार सातशे ओळींचे 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य निर्माण करून आपल्या राष्ट्रीय वृत्तीचा ठसठशीत पुरावाच सादर केलेला आहे. १९३३ मध्ये लिहिलेली प्रारंभीची 'अन्य नको वरदान।' ही कविता त्यांच्या या विकसनशील व्यक्तिमत्त्वाचा ढळढळीत पुरावा आहे. यशवंत म्हणतात,

" नरकी पिचती बन्धु-भगिनी
सजती त्यांच्या जें उद्धरणी
द्याच तयास्तव स्फूर्ति मन्मनी
गाया प्रेरक गान
प्रभो, मज अन्य न को वरदान।"

यशवंतांची काव्यसंपदा– 'यशवंती' (१९२१); 'यशोधन' (१९२९); 'भावमन्थन' (१९३०); 'यशोगन्ध' (१९३४); 'यशोनिधी' (१९४१); 'यशोगिरी' (१९४४); 'ओजस्विनी' (१९४६); 'पाणपोई' (१९५१) हे त्यांच्या स्फुट कवितांचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'जयमंगला' (१९३१); 'वंदिशाळा' (१९३२), 'काव्यकिरिट' (१९४०), आणि 'झाशीची राणी लक्ष्मीबाई' यांच्यावरील 'गीतायन' ही त्यांची खंडकाव्ये आहेत. 'महाराष्ट्राच्या मर्यादा पुरुषोत्तमाचे चरित्र गाऊन आपण शूचिर्भूत व्हावे.'[४१] 'ग्रामदेवतेच्या आणि मातृभूमीच्या ऋणातून मुक्त व्हावे' या प्रेरणेने 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य (१९६८) यशवंतांनी लिहून प्रसिद्ध केलेले आहे. या साहित्यसंपदेशिवाय काही गद्य आणि बाल वाङ्मयही यशवंतांनी निर्माण केलेले आहे. आवाजाची देणगी नसतानाही आर्त पण खणखणीत गंभीर शब्दोच्चारांना लयबद्धतेची जोड देऊन भावपूर्णतेने ठसकेबाज काव्यगायन ऐकविणारा कवी म्हणूनही यशवंतांचा महाराष्ट्रात लौकिक आहे.

मातृभूमीबद्दलचे उत्कट प्रेम– मातृभूमीबद्दलचे उत्कट प्रेम हे राष्ट्रीय कवितेचे एक प्रमुख लक्षण आहे. वैयक्तिक सुखदुःखाबरोबर राष्ट्रीय सुखदुःखांचा विचारही यशवंतांच्या आत्मपरतेने केलेला आहे. 'माझा महाराष्ट्र' या १९२५ मध्ये लिहिलेल्या कवितेत त्यांनी मातृभूमीच्या मुक्तीच्या प्रयत्नात साहाय्य करता येत नाही याबद्दलची खंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात,

" नकाशा पुढे पाहता भारताचा महाराष्ट्र आधी भरे लोचनी
असे हीच माझी अहा मायभूमी असे बोल येतात तोंडातुनी
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी, पडे प्रश्न, आयास केले किती
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ती तदा हाय पस्तावते मन्मति "

" अंतःकरणात राष्ट्रभक्ती असूनही पोटाच्या पाठीमागे लागल्यामुळे मातृभूमीच्या मुक्ततेसाठी चाललेल्या प्रयत्नांना हातभार लावणे अशक्य असणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या, प्रत्येक कामगाराच्या नि कारकुनाच्या मनात कधी ना कधी हे विचार येतातच येतात."[४२] 'अजिक्य भारत खंड', 'स्वातंत्र्य लक्ष्मीस मुजरा'; 'मायभूमीस अखेरचे वंदन' या राष्ट्रीय कवितांतून यशवंतांचे मातृभूमीवरील उत्कट प्रेम व्यक्त झालेले आहे. महाराष्ट्र भूमीबद्दलचा अभिमान व्यक्त करताना कवी म्हणतो,

" असे शास्ता जनांचा मी परी माई तुझा भाट
दिपावे विश्व वाणीने, तुझा येथे न तो थाट " (–स्वातंत्र्य लक्ष्मीत मुजरा)

'वंदिशाळा' या खंडकाव्यात, पहिल्या जागतिक महायुद्धात ब्रिटिशांकडून लढावयास परदेशात जाणाऱ्या 'संजीव' या देशभक्त सैनिकाचे भारतमातेबद्दलचे उत्कट प्रेम यशवंतांनी प्रकट केलेले आहे. हे राष्ट्रगीत वाचताना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'सागरा प्राण तळमळला' या सुप्रसिद्ध राष्ट्रगीताची स्मृती झाल्याशिवाय राहत नाही. गीतांचा प्रारंभ,

" वंदन तुज मायभूमि ! हे अखेरचे
न कळे तव दर्शन कधि फिरून व्हायचे !"

या ध्रुवपदाने झालेला आहे. देशभक्त सैनिक आपल्या अंतःकरणातील भक्तिभाव व्यक्त करताना म्हणतो,

" आचवलो जननीच्या सौख्य कारणा
आचवलो तेवि तुझ्या क्लेश वारणा
काय म्हणू परि समाप्ति ही तुला रुचे !
वन्दन तुज मायभूमि हे अखेरचे
... परि तुझी न भेट मला व्हायची पुढे
ह्या शल्ये हे तुटते मात्र आतडे ..." (–वंदन तुज मायभूमि हे अखेरचे)

पारतंत्र्याबद्दलची खंत– मातृभूमीच्या उत्कट प्रेमाप्रमाणेच पारतंत्र्याबद्दलची खंत राष्ट्रकवी यशवंतांनी अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे. 'सागराचे उचंबळणे', 'इशारा', 'बंदिवान गरुड', 'अंधार', 'गुढी पाडवा', 'वेलीच्या नवअंकुरा', 'शिवनेरी', 'बंदिशाळा', 'शेतकीतील सुख', 'कृष्णकुमारीचा आत्मयज्ञ', इत्यादी कवितांतूनही पारतंत्र्याची खंत उत्कटपणे व्यक्त झालेली आहे. 'वेलीच्या नव अंकुरा' या रूपकात्मक कवितेत कवी म्हणतो,

" त्यांची संगती ती कशास तुजला स्वातंत्र्य भोगेच्छुला
दास्याचा जहरीपणा हिणवितो अत्युग्र हालाहला " (– वेलीच्या नव अंकुरा)

दुसऱ्या एका कवितेत कवी म्हणतो,

" हे तळमळते हृदय काय कोणाचे
पाहून दैन्य देशाचे
हे स्फुरताती सहस्र बाहू काय
पाहूनी दास्य रत माय ....." (– सागराचे उचंबळणे)

'शारदेला वन्दन' करताना पारतंत्र्याच्या स्थितीचे दुःख व्यक्त करताना म्हणतात,

" चोहीकडोनी जरी पारतंत्र्यी
असे लागली आग देहाप्रति "

सतराव्या शतकातील परवशतेचे भयानक चित्र कवी यशवंतांनी 'छत्रपती शिवराय' या महाकाव्यात रेखाटलेले आहे. राजमाता जिजाबाईला ही परवशता कशी जाणवत होती हे सांगताना शिव शाहीर म्हणतो,

" तळतळाट हा काय भोवतो मूक दीन अबलांचा
लिलाव होतो भर बाजारी ज्यांच्या शील धनाचा ?" ४३
(–हिन्दोला – 'छत्रपती शिवराय)

१९२३ मध्ये लिहिलेल्या 'गुलामाचे गाऱ्हाणे' या कवितेतून परवशतेची तीव्रता प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे.

" हाकावया जो बैसला । सत्तामदे जो झिंगला
माया दयेची आर्द्रता नाही तयाच्या अन्तरी ॥" (–गुलामाचे गान्हाणे)

स्वातंत्र्याची उत्कट लालसा– पारतंत्र्यासंबंधीची खंत आणि स्वातंत्र्याची लालसा ही एकाच राष्ट्रीय भावनेची छायाप्रकाशासारखी रूपे आहेत. किंबहुना व्यक्ती आणि तिची पडछाया असे या भावनांचे स्वरूप आहे. ' स्वातंत्र्य लक्ष्मीस मुजरा ', 'समर्थांच्या पायाशी', 'देहाचा पूल', ' तुरुंगाच्या दारात ', ' वेलीच्या नव अंकुरा ', ' मांडवी ', ' अजून ', ' इशारा ', ' सागराचे उचंबळणे ', ' या आम्हाला सुळी ', ' सत्य न मरते दळ भारे ', ' आत्माहुती ' अशा अनेक कवितांतून स्वातंत्र्याची आकांक्षा कवीने व्यक्त केलेली आहे. राष्ट्रसंत रामदासांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या चाफळचे संस्कार कवीला स्वातंत्र्याच्या चित्‌शक्तीचे स्तोत्र वाटतात.

" स्वातंत्र्याच्या चित्‌शक्तीच्या ह्याच खऱ्या सन्दुका
नमितो तव पादुका समर्था, नमितो तव पादुका ॥"

(– समर्थांच्या पायाशी)

' बंदिवान गरुड ' या कवितेत स्वातंत्र्याचीच आकांक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे.

" जन्मजात तू व्योमविहारी
जखडुनि पडसी परि गिरीकुहरी
वद्ध होइ तव कर्तबगारी
स्थिती ही हृदय विदारी । गरुडा, घेशिल केवि भरारी ?"

मराठा माणूस हा स्वातंत्र्यप्रिय आहे हे ' देहाचा पूल ' या कवितेत सांगितले आहे.

" ते स्वतःच्याच रुधिराने लिहिति लेख निज नशिबाचा
स्वातंत्र्य साधनी देती मोबदला ते जीवाचा ॥" [४४] (– देहाचा पूल)

स्वातंत्र्याकरिता किंमत मोजावीच लागते. स्वातंत्र्याचा मार्ग हा कंटकाकीर्ण मार्ग आहे म्हणून तो स्वातंत्र्याच्या उपासकांनी सोडायचा नसतो आणि शेवटी जुलुमी सत्ता शरीरालाच बंदिस्त करू शकते. आत्मा हा मुक्तच असतो. १९२२ मध्ये लिहिलेल्या कवितेत कवी म्हणतो,

" वाढु दे कारागृहाच्या भितीची उंची किती मन्मना नाही क्षिती ।
भिन्तीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडुनि ? मुक्त तो रात्रंदिनी ।"

(– तुरुंगाच्या दारात)

अशा कितीतरी पंक्तीतून ही स्वातंत्र्याची लालसा प्रकट झालेली आहे.

प्राचीन परंपरेचा अभिमान आणि पूर्वपरंपरेचे, पूर्ववैभवाचे स्मरण

परंपरेचा अभिमान आणि पूर्ववैभवाचे स्मरण हा राष्ट्रीय भावनेचा प्राण आहे. वर्तमान-काळातील प्रतिकूल परिस्थितीत प्रेरणा देण्याचे कार्य या सांस्कृतिक अभिमानाने केलेले आहे. मातृभूमीबद्दल प्रेम असणारा, स्वातंत्र्याची लालसा बाळगणारा माणूस परंपरेच्या अधिष्ठानावरूनच जीवन जगत असतो. या परंपरेच्या शोधात पाश्चात्यांना ग्रीक, रोमन लोकांपर्यंत धाव घ्यावी लागली. भारतीयांच्या सुदैवाने त्यांना सहस्रावधी वर्षांची भव्योदात्त परंपरा लाभली आहे. ' माझा महाराष्ट्र ', ' स्वातंत्र्य लक्ष्मीस मुजरा ', ' देहाचा पूल ', ' अजिंक्य भारतखंड ', ' मांडवी ',

'समर्थांच्या पायाशी', 'यशवंती', 'अजिक्य तारा पाहून', 'जलदुर्ग आणि तारा'; 'शिवनेरी'; 'आमचा धर्म', 'शारदा वंदन', 'सत्य न मरते दळ भारे', 'बाणा' 'शिलंगण' इत्यादी कवितांमधून परंपरेच्या अभिमानाचे आणि पूर्ववैभवाचे अगदी सहजगत्या दर्शन घडते. आमच्या परंपरेत तत्त्वज्ञानापासून राजकारणापर्यंत सर्वच विषय येतात. "भितीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडुनी मुक्त तो रात्रंदिनी।" असे सांगून आत्मस्वातंत्र्याची परंपरा कवी सांगून जातो. 'जशास तसे' हे व्यावहारिक तत्त्वज्ञान सांगणारी आमची परंपरा आहे. आत्मा अमर असल्याने आम्ही अमृताचे पुत्र आहोत. त्या परंपरेचा गौरव सांगताना कवी म्हणतो,

"आम्हाला चिल्खतासाठी त्वचा प्रल्हाद बाळाची
कशा रूपातही येवो अम्हा भीती न काळाची
खलांनो चालवा जिव्हा, जिव्हारी भोसका बाण
खलांचे घाव झेलाया अम्ही हे मांडिले ठाण!" (– खलांनो।)

पूर्वजांचा अभिमान सांगताना कवी म्हणतो.

"जिजाऊच्या स्वतेजाचा, शिवाजीचा स्वशौर्याचा
मराठ्यांच्या दराऱ्याचा, तसा तो स्वाभिमानांचा" (–महाराष्ट्र लक्ष्मीस मुजरा)

वीर विभूतिपूजन– महाराष्ट्र कवी यशवंतांनी लिहिलेले 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य वीर विभूतिपूजनाचे भव्योदात्त उदाहरण आहे. या महाकाव्याला पुरस्कार लिहिताना भारताचे माजी संरक्षण मंत्री मा. यशवंतराव चव्हाण म्हणतात, "आज आम्हा सर्वांना आनंद होत आहे की, आमच्या पिढीतील श्रेष्ठ कवी शिवरायाची महापूजा आपल्या महाकाव्याने बांधीत आहेत." [४५] छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल यशवंतांच्या अंतःकरणात पराकोटीची भक्ती असल्याचा प्रत्यय हे महाकाव्य वाचत असताना येतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील सर्व घटना-प्रसंगांचे अत्यंत जिवंत चित्रण यशवंतांनी केलेले आहेच पण त्यांच्या सहकारी मराठा सरदारांचे, वीर बाजी, तानाजी येसाजी, फिरंगोजी, नेताजी, प्रतापराव या सर्वांचे चित्रणही तितकेच प्रभावी करून वीर विभूतिपूजन केलेले आहे. इतर स्फुट कवितांतून यशवंतांनी वीर विभूतिपूजन मोठ्या उत्साहाने केलेले आहे. 'मराठ्यांच्या महालक्ष्मीस मुजरा' करताना पुन्हा छत्रपती शिवराय आले आहेत. 'माण्डवी' आणि 'समर्थांच्या पायाशी' या कवितांतून राष्ट्रसंत समर्थ रामदासांची पूजा यशवंतांनी केलेली आहे. नरवीर तानाजी मालुसऱ्यांच्या स्मृतीला 'यशवंती' या काव्यातून अभिवादन केलेले आहे. 'देहाचा पूल', 'आत्मार्पण', 'संभाजीचा पश्चात्ताप', 'आत्माहुती' या कवितांतून हे वीर विभूतिपूजन आलेले आहे. 'कृष्ण कुमारीचा आत्मयज्ञ', 'पार्वतीबाईची निराशा' या कवितांतूनही हे विभूतिपूजन आढळते. रजपुतांच्या इतिहासातील आत्मयज्ञ करणारी बाणेदार कृष्णकुमारी म्हणते,

"माते मारिल हाल हाल करून की म्लेंच्छ कामी कुणी
त्या पेक्षा असल्या स्वतंत्र निधनी का क्लेश मानू मनी?"

'बंदिवान गरुड', लोकमान्य टिळकांवरील विलापिका, 'तो कर्मयोगी', 'चालली युवती निःशंकमना।' 'द्या आम्हाला सुळी', 'माळावरील समाधी', 'सैनिकास', 'अढळ सिंहासन', 'गाऊ त्यांना आरती', 'मानवता किल्ल्याची ऐतिहासिक पर्वे' या सर्व कवितांतून आधुनिक

काळातील वीर पुरुषांचे पूजन केलेले आहे. 'तो कर्म योगी' या कवितेतून महात्माजींचे पूजन यशवंतांनी केलेले असावे असे वाटते. ते या कर्मयोग्याची व्याख्या करताना म्हणतात,

"शिक्षेने शरपंजरी निजविता मानी मना अल्पसे,
ऐसा धीर उदार थोर नर जो तो 'कर्म योगी' असे" (–तो कर्मयोगी)

'वंदिवान गरुड' ही कविता क्रांतिकारकांचे कुलपुरुष महाकवी स्वातंत्र्यवीर सावरकरांना उद्देशून लिहिलेली दिसते. 'गाऊ त्यांना आरती' ही यशवंतांची कविता सार्वत्रिक विभूतिपूजनाचे आदर्श उदाहरण आहे. ही संपूर्ण कविताच उद्धृत करण्यासारखी काहे.

"... देश ज्यांचा देव त्याचे दास्य ज्यांचा धर्म हो। दास्य मुक्ति ध्येय हो
आणि मार्कण्डेयसे जे जिकिती काळाप्रती। गाऊ त्यांना आरती।"

राष्ट्रीय परिस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब– यशवंतांच्या अनेक स्फुट कवितांतून राष्ट्रीय परिस्थितीचे यथार्थ प्रतिबिंब पडलेले आहे. देशाच्या दास्यमुक्तीचा प्रयत्न करणाऱ्यांचा 'सागराचे उचंबळणे' या कवितेत गौरव केलेला आहे. स्वातंत्र्याचे ध्येय आपण अजून गाठू शकलो नाही यासंबंधीची खंत 'मांडवीच्या पुनर्भेटीत' आहे. 'इशारा 'मध्ये साम्राज्यवाद्यांना गंभीर परिणामाची धमकी दिलेली आहे. ज्या ज्या ठिकाणी दारिद्र्य, दुर्भिक्ष, अन्याय, जुलूम, छळ आणि शोषण आहे तिथे तिथे साम्राज्यवादी शक्तीचे वर्चस्व आहे असे समजावे 'फडकते तुझे तेथेच निशाण' या कवितेत सांगितले आहे. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सागराच्या उद्दाम लाटांशी झुंजण्याची तयारी दाखविली पाहिजे. बलिदानाला सिद्ध झाले पाहिजे असा संदेश 'हा अफाट सागर पुढे' यातून दिला आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती भारतालाही अतिशय जाचक ठरत आहे याची जाणीव 'भास्करा का तुज भवती खळे' या कवितेत आहे. 'अंधार'; 'भंगतो अडसर आज' या दोन्ही कवितांतून निराशेचा सूर आलेला आहे. 'युगंधराचे पालुपद' या सुप्रसिद्ध कवितेतून यशवंतांनी आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे चित्र रेखाटलेले आहे.

सामाजिक आणि आर्थिक समस्यांचे दर्शन– राष्ट्रीय कवितेचे क्षेत्र अलीकडे व्यापक झालेले असून सामाजिक आणि आर्थिक जाणिवांनाही त्यात प्राधान्य आलेले आहे. आर्थिक मागासलेपणा, दारिद्र्य आणि सामाजिक प्रश्न आमच्या राष्ट्रीयत्वाशी निगडित आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न आणि पददलितांचे प्रश्न या सर्वांचा समावेश राष्ट्रीय जाणिवेच्या अंतर्गत केला पाहिजे असे विचार राष्ट्रवादी तत्त्वचिंतक मांडत आहेत. 'गुलामाचे गाऱ्हाणे', 'लिलाव', 'करदा', 'रिपु साचे मानवतेचे' इत्यादी कवितांतून आर्थिक बाजू यशवंतांनी मांडलेली आहे. दारिद्र्य माणसाला लाचार बनविते, शोषण माणुसकीला पारखे करते. 'बंदिशाला' या खंडकाव्यातील गुणीलेचा संसार दारिद्र्यानेच उद्ध्वस्त झाला असे दाखविले आहे.

"जिणे नव्हे हे बंदिवास हा। जग हे बंदिशाळा"

असे अत्यंत कटू उद्गार गुणीलेने जगाबद्दल काढलेले आहेत.

ध्येयदर्शी आशावादी राष्ट्रीय गीते– महाराष्ट्र कवी यशवंतांच्या प्रतिभेची वळणे सांगताना प्रा. रा. श्री. जोगांनी, "यशवंतांची पहिली स्फूर्ती राष्ट्रीय काव्याची होय. राष्ट्रीय म्हणण्यापेक्षा महाराष्ट्रीय म्हणणेच अधिक योग्य होईल."[४१] असे मत मांडले आहे. या सुरुवातीच्या काळात

प्रेम या विषयाने त्यांच्या मनोभूमिकेत प्रवेश केला नव्हता, असे सांगून जोग म्हणतात, " रविकिरण मंडळातील व्यक्तींशी संबंध आल्यावर व पुढे मंडळाच्या स्थापनेनंतर मात्र प्रेम, त्यातील निराशा; सामाजिक अन्याय, विशेषत: स्त्री जातीवर पुरुषाने किंवा समाजाने चालविलेला जुलूम इत्यादी सामाजिक सुधारणेच्या कल्पना त्यांच्या काव्यात येऊ लागल्या." [४७] प्रा. रा. श्री. जोगांच्या मताप्रमाणेच, "स्वत:च्या भोवतालच्या संतापदायक गोष्टींना अनुलक्षून त्यांनी त्राग्याचे व औदास्याचे सूर काढले आहेत यातही संशय नाही पण ते निराशावादी आहेत असे मात्र नाही," [४८] असा सूर प्रा. भ. श्री. पंडितांनी लावला आहे.

यशवंतांच्या बहुतेक कविता आत्मपरतेतून उत्स्फूर्त झाल्याचे सांगून डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " पुन्हा ही आत्मपरता एक प्रकारच्या कडवट निराशेने ग्रासून टाकलेली आहे." [४९] मात्र या सर्व टीकाकारांनी यशवंतांनी राष्ट्रीय कविता लिहिली हे आवर्जून सांगितले आहे. ग. त्र्यं. माडखोलकरांनी तर आत्मपर राष्ट्रीय कविता लिहिणारा कवी म्हणून [५०] त्यांचा गौरव केलेला आहे.

रविकिरण मंडळातील कोणत्याही कवीपेक्षा सर्वात अधिक ध्येयदर्शी आशावादी राष्ट्रीय गीते यशवंतांनीच लिहिलेली आहेत. समर्थांनी सांगितलेल्या " वन्हि तो चेतवावा रे। चेतवीताचि चेतते। केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे।" या उक्तीचे मर्म यशवंतांच्या या ध्येयदर्शी राष्ट्रीय कवितांतून व्यक्त झालेले आहे. ' यश:श्री पायिची दासी ' या १९२२ मध्ये लिहिलेल्या कवितेपासून तो १९४५ साली लिहिलेल्या ' द्या आम्हाला सुळी ' या कवितेपर्यंतच्या अधिकउण्या दोन तपांतील काळात अनेक ध्येयदर्शी कविता लिहिल्या गेल्या आहेत. ' अढळ सिंहासन ', ' सत्य न मरते दळभारे '; ' गाऊ त्यांना आरती '; ' चौघडयाचे घडे ', ' अन्य नको वरदान '; ' विमानातून पुष्पवृष्टी '; ' सरितेचे चरित ', ' आत्मार्पण ', ' देवास आव्हान '; ' हा अफाट सागर पुढे '; ' बाणा '; ' आत्माहुती ' अशा कितीतरी कवितांची नावे देता येतील.

दुसऱ्या एका कवितेत,

" स्मरोनी आत्मकर्तव्या प्रयत्नांची करी रास
स्वये चोखाळितो वाटा तयाचा देवही दास।" (– यश:श्री पायिची दासी)

अशा प्रकारचा प्रयत्नपूर्ण आशावाद सांगितलेला आहे.

" डिवचुनि पाहि खुशाल दैवा, डिवचुनि पाहि खुशाल।"

असे आव्हान करणारा आशावादी कवी नैराश्याच्या आहारी कसा जाईल ?

सामान्यांच्या अंत:करणातील राष्ट्रीय भावनांचे उद्‌गाते यशवंत

त्यांच्या राष्ट्रीय कवितांच्या बाबतीत असे म्हणता येईल की त्या कवितांतून सर्वसामान्य मराठी माणसाच्या राष्ट्रीय भावनांना त्यांनी काव्यबद्ध केलेले असून त्यांची ओजस्वी अभिव्यक्ती केलेली आहे. अनेक ध्येयदर्शी आशावादी कवितांची निर्मिती त्यांनी केलेली आहे. 'छत्रपती शिवराय' लिहून ते महाराष्ट्र शाहीर झालेले आहेत.

" नेटके काही घडेना काय हेतू जीवना, या विचारी मन्मना
बोधितो की, ' एवढी होवो तरी रे सत्कृती ' गा तयांची आरती ।।"

या सरळ हेतूने त्यांनी राष्ट्रीय कवितांची निर्मिती केली आहे. आपल्या प्रतिभेच्या सरळ सामर्थ्याची आणि राष्ट्रीय आकांक्षेची नम्र जाणीव रसिकांना देताना म्हटले आहे,

" पान्थ सेवा साधनी हे व्हावयाते गार पाणी ।
मृत्तिकेचे मात्र माझे कुंभ, ही माझी नवाई ॥"

राष्ट्रकवी काव्यविहारी

राष्ट्रीय भावनेच्या ' स्फूर्तिलहरी ' जनजागृती–करणारे कवी–काव्य विहारी

(जन्म १८९४ मृत्यू १९७५)

जीवनचरित्र– प्रथम मामलेदारीतील मामले आणि नंतर न्यायमंदिरातून न्यायनिवाडघाचे अत्यंत किचकट कार्य करणाऱ्या आणि गोविंदाग्रजांप्रमाणेच केशवसुतांचे शिष्यत्व पत्करणाऱ्या, काव्य-विहारी उपाख्य धोंडो वासुदेव गद्रे यांचा जन्म, नाटककार देवलांच्या हरिपुरात १८९४ मध्ये झाला. प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण हरिपूर आणि सांगली येथे संपवून इन्टरच्या वर्गातील शिक्षणासाठी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात ते दाखल झाले. बी. ए. करिता त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजची निवड केली. तो इ. स. १९१५ चा काळ होता.

पदवीधर झाल्यानंतर एल्एल्. बी. च्या अध्ययनासाठी १९१७ मध्ये ते मुंबईला गेले आणि १९१९ मध्ये वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होऊन मामलेदार म्हणून नोकरीत शिरले. सुमारे आठ वर्षे मामलेदारीचे कार्य केल्यानंतर मध्यंतरी तीन वर्षे सांगलीच्या विलिग्डन महाविद्यालयात ते मराठीचे निर्वेतन प्राध्यापक म्हणून कार्य करीत होते. बुधगाव संस्थानात सबजज्ज म्हणून त्यांची पुढे नेमणूक झाली आणि या न्यायदानाच्या कार्यात ह्यांची हयात गेली. या न्याय मंदिराद्वारेच त्यांना जगातील वास्तवाचे यथार्थ दर्शन झाले. त्यांची सामाजिक आणि राष्ट्रीय जाणीवही याच काळात विकसित झाली आणि त्या जाणिवेची अभिव्यक्ती करण्यासाठी त्यांनी अतिशय प्रभावी असे काव्याचे माध्यम निवडले.

काव्यविहारी यांच्या १९१३ नंतरच्या कवितांचे विशेषतः राष्ट्रीय कवितांचे विवेचन एवढ्याच मर्यादित अर्थाने त्यांच्या काव्याचा अभ्यास या ठिकाणी अभिप्रेत आहे. विशेष अभिनंदनीय गोष्ट अशी की राष्ट्रीय आणि सामाजिक कवितांनीच काव्यविहारी प्रसिद्ध आहेत. किंबहुना तोच त्यांच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे.

राष्ट्रीय जाणिवेचा शोध– काव्यविहारींनी केशवसुतांचे शिष्यत्व स्वीकारले असले तरी केवळ सामाजिक सुधारणाविषयक विचारातच त्यांनी स्वतःला बंदिस्त केलेले दिसून येत नाही. केशवसुतांच्या तुलनेत त्यांचे राष्ट्रीय विचार अधिक जाणीवपूर्वक आणि अधिक आशयपूर्ण आहेत. केशवसुतांसारखी काव्यविषयक प्रयोजनाची धरसोड काव्यविहारीत आढळत नाही. ' आशा प्रेम तसेच वीर्य कवनी तो आपुल्या गायिल ' हा केशवसुतांचा नंतरचा विचार आहे. काव्यविहारींनी मात्र प्रारंभीच आणि अगदी उघड उघड मांडलेला आहे. १९३६ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'स्फूर्तिलहरी' या काव्यसंग्रहात आणि १९५० साली प्रसिद्ध झालेल्या ' स्फूर्तिनिनादा ' तही तो प्रभावीपणे आलेला आहे. ' स्फूर्ति-देवतेस ' या सुप्रसिद्ध कवितेत ते म्हणतात,

" आळसलेले जे कोणी, असतील भारतवासी
झिंगुनिया झोपेत सदा विसरति उद्योगासी
आयुष्याचे मोल किती कधी न कळले ज्यांना
कर्तव्या प्रवृत्त करी, तू निजल्या जीवांना " (स्फूर्तिदेवतेस)

पुढे ते आपल्या प्रतिभादेवतेला सांगतात,

" खेळू दे राष्ट्रात नव्या जागृतीचे चैतन्य
उत्कर्षाने होऊ दे । राष्ट्र आमुचे धन्य ।।" (स्फूर्तिदेवतेस)

" काव्यविहारींच्या बोधजड लेखणीने कलात्मकतेची बूज राखलेली दिसत नाही." [५१] असे काव्यविहारींच्या काव्याच्या संदर्भात विधान करणाऱ्या डॉ. अ. ना. देशपांडयांनी काव्यविहारींची काव्याची, सौंदर्याची कल्पनाच लक्षात घेतली नाही असे नाइलाजाने म्हणावे लागते. ' सौंदर्य म्हणजे ' या शीर्षकाच्या कवितेत ते सांगतात, ' सुंदरता वारुणी नव्हे, जग हैवान कराया." आपली सौंदर्याची कल्पना रसिकांना सांगताना ते म्हणतात,

" पावित्र्याते नमविते जे दुनियेला पायीं
जयाभोवती मोहकता अविरत गुंगत राही,
फिकट ज्यापुढे तारांचे तेजस्वी ऐश्वर्य
' मेल्याला जीवंत करी ' तेच खरे सौंदर्य " (– सौंदर्य म्हणजे)

दुसऱ्या एका कवितेत ते म्हणतात,

" लोपली कर्तव्य निष्ठा माजली वाचाळता
जाहिराती देशभक्ती भूल पाडी भारता
मायदेशा जोवरी ही गांजिते दुरितावली
स्वस्थता चित्तास नाही गोड कविता कोठली ?" (–गोड कविता)

या कवितेतून काव्यविहारींची ज्वलंत राष्ट्रीय जाणीव व्यक्त झालेली आहे. राष्ट्रकवी तांब्यांनी जशी स्वतःची निर्भर्त्सना करून अन्तःकरणातील राष्ट्रभक्तीचे प्रकटीकरण केलेले आहे तसेच ' त्याग देवतेस ' या कवितेत काव्यविहारींनीही केलेले आहे.

" मेलेल्या अन्नाचे भक्षक
राष्ट्रहिताचे स्वार्थी वंचक
क्षुद्र त्यांतला मी ही कीटक ।।" (–" त्याग देवतेस ")

पारतंत्र्याची खंत आणि स्वातंत्र्याची उत्कट लालसा– पारतंत्र्याची खंत केशवसुतांच्या काव्यातूनही जाणवते पण सामाजिकतेच्या संदर्भात तिचे स्वरूप अस्फुट आणि बरेचसे त्रोटक आहे. स्वातंत्र्याची लालसाही केशवसुतांनी व्यक्त केलेली आहे पण ती देखील चुटपुटती स्पर्शून जाणारी आहे. काव्यविहारींच्या या दोन्ही जाणिवा अत्यंत तीव्र तितक्याच विस्तृत आणि सुस्पष्ट आहेत. या दोन्ही जाणिवा म्हणजे एकाच राष्ट्रीय जाणिवेची दोन रूपे आहेत. त्यांचे नाते अग्नी आणि धूर अशा साहचर्याचे आहे. पारतंत्र्याची खंत व्यक्त करताना काव्यविहारी बहुधा प्रसंगांचा आश्रय घेतात तर स्वातंत्र्याची उत्कट लालसा व्यक्त करताना प्रतीकांचा उपयोग करताना दिसतात. उदा., ' हरिणीप्रत ', ' पाळीव पोपटास ', 'दोन पतंग', 'विहंगम', 'उंबरातले किडे', 'खार आणि घार' या कविता या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत.

पारतंत्र्याची खंत व्यक्त करताना ते परिस्थितीची भेदकता अधिक स्पष्ट करतात. ' दसरा ' या कवितेत ते म्हणतात;

" त्या दसऱ्याच्या मंगल राती
दुबळ्या राष्ट्रासाठी नसती
जोवर नाही तुमचे तुम्ही तोवरि विसरा दसरा ।।" (–दसरा)

१९२९ साली लिहिलेल्या ' पाळीव पोपटास ' या कवितेतून पारतंत्र्याची खंत व्यक्त झालेली आहे. वेड्या पोपटा ! तो धनी डाळिंबाचे दाणे तुझ्यापुढे केव्हा टाकतो ? तो बोलेल तसा तू बोलतोस; त्याला पाहून नाचतोस तेव्हाच ना ? पण,

" पिंजऱ्यात मेले किती अभागी पोपट या जगती ।
हे डाळिंबाचे दाणे वेड्या ! घात तुझा करिती ।।" (–पाळीव पोपटास)

'पाखरास' या कवितेतील पक्षाला उद्देशून ते म्हणतात;

तू स्वतंत्रतादेवीचा लाडका प्रजाजन आहेस. 'मानवा मिळे का भाग्य तुझे कधी काळी ?' अशी कळवळून पृच्छा करतात. पुढे सांगतात,

" समतेची तत्त्वे बोलुनिया मोठाली
दुबळ्यास तुडविती बलिष्ठ पायाखाली ।।"

दुसऱ्या एका कवितेत,

" आर्तांचे चित्कार किती जाती रोज विरून ।
आक्रंदन परि दुबळ्यांचे जगी ऐकती कोण ?" (–खार आणि घार)

अशी साम्राज्यवाद्यांची शिकार झालेल्या पारतंत्र्यातील जनतेची स्थितीच वर्णन केलेली आहे.

त्या पारतंत्र्याचा परिणाम आमच्या राष्ट्रीय जीवनावर कसा झालेला आहे हे सांगताना काव्य-विहारी म्हणतात,

" भ्याड झालो आज आम्ही हिंदभूची लेकरे
संकटाचे नाव आम्हा ऐकता धडकी भरे
वीर्य गेले, शौर्य गेले, भीरुता बोकाळली
स्वस्थता चित्तास नाही गोड कविता कोठली ?" (– गोड कविता)

'मान्यांच्या मुलास', 'विहंगम', 'खार आणि घार', 'बंदिवान', 'देशासाठी', 'दोन पतंग', 'प्रभु चरणी'; या कविता पारतंत्र्याची खंत आणि स्वातंत्र्याची लालसा या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. कवीने 'प्रभुचरणी' या शेवटी आलेल्या कवितेत परमेश्वराजवळही एकच मागणी केलेली आहे.

" जीवनार्थ या जगात
खपती जे बंधनात
लाभू दे ! चिरवांछित मुक्तता तयाला " (– प्रभुचरणी)

'स्फूर्ति निनाद' या कवितासंग्रहात १९४२ च्या चले जावच्या क्रांतिलढ्याचे वर्णन करणाऱ्या ' क्रांती देवतेस', 'देशासाठी', ' राजवाडा आणि तुरुंग', 'आजचे युग' यासारख्या देशभक्तिपर कविता आहेत. काव्यविहारींचे 'वीरमाता' हे कथाकाव्यही देशभक्त मातापुत्रांची कथा सांगणारेच आहे.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि पराक्रमी परंपरेचा गौरव– काव्यविहारींच्या काव्यात स्वातंत्र्याच्या लालसेबरोबरच पूर्ववैभवाचे स्मरण आलेले आहे. दुबळ्या राष्ट्रीय जीवनात संजीवन ठरणारे असे हे स्मरण आहे. उदा.

" भारत भूमी एका काळी
सुवर्ण भूमी म्हणूनि गाजली ॥" (– दसरा)

दुसऱ्या कवितेत कवी म्हणतात,

" हिंदभूच्या संस्कृतीची आणि धर्माची ध्वजा
फडकली आणि तियेने धन्य केले पूर्वजा
विस्मृती आम्हा तियेची हाय ! झाली आजला " (– गोड कविता)

अशी पूर्ववैभवाचे गुणवर्णन करणारी अनेक अवतरणे देण्यासारखी आहेत. भारताच्या पूर्ववैभवाचे स्मरण करीत असताना पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान व्यक्त केल्याशिवाय कोणत्याही राष्ट्रीय कवीचे समाधान होत नाही.

वीर विभूतिपूजन– काव्यविहारींनी इतर राष्ट्रीय कवींप्रमाणेच वीर विभूतिपूजन आपल्या काव्यातून केलेले असले तरी महाराष्ट्राबाहेरील वीर पुरुषांना त्यात स्थान नाही. छत्रपती शिवाजी महाराज, पानिपत व उद्गीरचा वीर भाऊसाहेब पेशवे, यांनाच महत्त्वाचे स्थान आहे. ' मान्यांच्या मुलास ' या कवितेत शहाण्णव कुळीच्या मराठे वीरांची नामावली आलेली आहे. साम्राज्यात भेद माजले असतानाही छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, हे सांगताना कवी म्हणतो,

" साम्राज्य भेद माजले,
परि शिवरायाच्या बले
ते अविंधही लोळले " (– कृष्णेच्या पुलावरून)

किंवा, " उद्गीर, पानिपत रणतीर्थे त्रिकाळ
त्यावरी शत्रुला गमले कर्दन काळ ॥" (– मान्यांच्या मुलास)

या ऐतिहासिक महापुरुषांच्या पूजनानंतर आधुनिक काळातील देशभक्तांचे पूजनही कवीने केलेले आहे. आधुनिक काळातील अनेक देशभक्तांचे स्मरण ' त्याग देवतेस ' या कवितेत कवीने केलेले आहे. अनेक निःस्वार्थी पुण्यात्म्यांनी या भारतमातेची सेवा केलेली असून,

" गजान्त लक्ष्मी झुलते दारी
देशास्तव लाथाडुनि सारी
कष्ट भोगिती कारागारी
त्याग वृत्ती ही अंगिकारुनी दिपविलेस जगताला ।" (–त्यागदेवतेस)

पारतंत्र्याच्या कालात न्यायाधीश म्हणून कार्य करताना देशभक्त क्रांतिकारकांचा नामोल्लेख कवीने टाळला असणे स्वाभाविक आहे. मात्र ' मनास ' या कवितेतून महात्मा गांधींचा लक्षात येईल अशा स्वरूपात उल्लेख कवीने केलेला आहे. गांधीजी आणि त्यांचे तत्त्वज्ञान यासंबंधी कवीच्या अंतःकरणात पूज्यबुद्धी असल्याचे त्यांच्या या कवितेत स्पष्ट होते. परिस्थितीने भांबावलेल्या मनाला धीर देताना कवी म्हणतो,

" सत्य, दया, शांतीचे सागर,
आज यातना भोगिती खरतर
कठिण काळ हा सरेल सत्वर
पाहूच खचित त्या भाग्य दिना ।"

' राजकन्या हिन्दीया ' या हिन्दुमुसलमानांच्या ऐक्याच्या संदर्भात लिहिलेल्या कवितेतही गांधीजींच्या विचारांची स्पष्ट छाप आहे.

राष्ट्रातील सामाजिक आर्थिक विचारांचे वर्तमानकालीन प्रतिबिंबही काव्यविहारींच्या कवितेत पडलेले आहे– त्यांच्या ' दसरा ', धर्ममार्तंड ', ' दुर्जनास ', ' जाईच्या फुलास ', ' पाळीव पोपटास '; ' बंदिवान '; ' आजचे युग ', ' उपदेश करणाऱ्यास ', ' आज आणि उद्या ', ' जगाचा न्याय ', ' अभागी अबले ', ' कृष्णेच्या काठी ', या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. ' कृष्णेच्या काठी 'मध्ये विधवेचे जीवन जगणाऱ्या व दुष्टांच्या वासनेला बळी पडणाऱ्या अबलेची ' आत्महत्या ' चित्रित केलेली आहे. ' जाईच्या फुला ' या कवितेतून अस्पृश्यतेच्या म्हणजेच सामाजिक विषमतेच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. लोकांच्या अज्ञपणाचा फायदा घेऊन लुबाडणाऱ्या धर्ममार्तंडांची हजेरी घेतली आहे. पारतंत्र्यातील आर्थिक विषमता स्पष्ट करताना कवी म्हणतो,

" हाय ! वितभर पोटासाठी
गुरांसारखे बांधव खपती
किती रावती अर्घ्या पोटी
किती उपाशी मरुनी जाती
दारिद्र्याचा वणवा पेटे । तयात जळती जिवंत प्रेते " (– दसरा)

' अस्पृश्यता ' नाहीशी करण्यासाठी कवी म्हणतो, " उकीरडयाच्या शेजारी जाईचा वेल वाढला असला तरी त्याची फुले पतित ठरत नाहीत " म्हणून

" सुखवाया तुज प्रती । प्राणांची आहुती । देईन मी संप्रती
पर्वा नाही जरी जगाने । धिक्कारियले मला ।" (–गोड जाईच्या फुला)

राष्ट्रीय आशावाद– काव्यविहारींच्या कवितेतून सर्वत्र राष्ट्रीय आशावादाचे दर्शन घडते. या राष्ट्रीय आशावादाच्या स्फूर्तिलहरींनी त्यांच्या कवितेत वेगळे चैतन्य ओतलेले आहे. ' उदयकाल '; ' हताश तरुणास '; ' कृष्णेच्या पुलावरून ', ' मनास ', ' आज आणि उद्या ', ' धार आणि खार ', ' बंदिवान ', अशा अनेक कवितांतून हा आशावाद प्रकट झालेला आहे. पारतंत्र्याच्या काळोखात कलहाची पिशाच्चे उन्मादाने या भूमीवर नाचलीत परंतु स्वातंत्र्याच्या सूर्योदय होणार हे बघताच ती दशदिशांना निघून गेली. आता,

" रम्य उदय काल अहा । येई भारतावरी " असे कवी सांगतो. (–उदयकाल)

ध्येयाचे अत्युच्च शिखर गाठताना अनेक दुर्धर संकटांना तोंड द्यावे लागते म्हणूनच कवी हताश तरुणास उद्देशून म्हणतात,

" मार्गावर विघ्ने असली । भिववितील तुज मोठाली
बेगुमान तुडवुनि सारी । जायाचे तुजला " (– हताश तरुणास)

' मनात ' या कवितेत असाच आशावाद आला आहे.

" काल चांदणे सुंदर फुलले । आज गगन मेघांनी भरलें
निर्दाळोनी ढग हे काळे । झळकेल उद्या नभि चंद्र पुन्हा ।
भिऊ नको मुळी हो मना ।।" (– मनास)

समालोचन– काव्यविहारींच्या राष्ट्रीय कवितांचा परिचय आपण करून घेतला आहे. प्रा. भा. शं. भणग्यांनी त्यांना ' केशवसुतांचे निष्ठावंत चेले ' [५२] म्हणून गौरविले आहे. मला तर शिष्याने गुरूवर मात केल्याचे दिसून येते. कारण केशवसुतांपेक्षा कितीतरी अधिक राष्ट्रीय जाणीव काव्यविहारींच्या ठिकाणी आहे. स्फूर्तिलहरींच्या प्रस्तावनेत कवीने मराठी कवितेसंबंधी आपले परखड विचार बोलून दाखविले आहेत. " भोवतालची भयानक परिस्थिती विसरून फक्त प्रेम आणि विरह यांचेच चाळे मराठी कविता आज बहुतांशी करतांना दिसते... त्यामुळे मराठी कविता म्हणजे आज चेष्टेचा विषय होऊन राहिली आहे."[५३] काव्यविहारी हे राष्ट्रवादी आहेतच पण त्यांचा राष्ट्रवाद मानवतावादी आहे. म्हणूनच ते एका कवितेत म्हणतात;

" विश्वप्रेमी माझी वृत्ती । हृदयी बाणे निसर्ग प्रीती "

देशप्रेमाची गाणी गाताना त्यांना उल्हास वाटतो. ते म्हणतात,

" संक्रमणाच्या दुर्धर काळी । अचेतनाला चेतविणारी ।
उज्ज्वल गाणी गावी असली । त्या गाण्यांनी जीव रंगतो ।।" (–सारंगीवाला)

म्हणूनच राष्ट्रीय कवींच्या सुरात सूर मिसळताना त्यांना आनंद वाटतो. ते म्हणतात,

" भारताचे अमित भाट । उल्हासुनि अंतरात । सुस्वागत गीत गात
काव्यविहारी तयात मिळवी तान आपुली ।" (– उदयकाल)

रविकिरण मंडळाचे आणखी काही कवी– ' माधव ज्यूलीयन '; ' गिरीश ' आणि ' यशवंत ' या रविकिरण मंडळाच्या नामवंत सदस्यांनी लिहिलेल्या राष्ट्रीय कवितांचा विस्तृत परिचय करून घेतल्यावर मंडळाच्या अन्य सदस्यांनी लिहिलेल्या राष्ट्रीय कवितेचा थोडक्यात परिचय देण्याचे ठरविले आहे प्रो. श्री. बा. रानडे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी मनोरमाबाई यांनीही काव्यनिर्मिती केलेली असून त्यांच्या उभयतांच्या कविता ' श्री. मनोरमा ' या कवितासंग्रहात प्रसिद्ध झालेल्या आहेत. चार सहा सुधारणावादी कविता सोडल्या तर दोघांच्याही कवितांत निसर्ग आणि प्रेम या विषयांनाच प्राधान्य मिळालेले आहे.

द. ल. गोखले, नाटचछटाकार दिवाकर आणि वि. द. घाटे हे आणखी रविकिरण मंडळाचे सदस्य. शंकर काशिनाथ गर्गे उपाख्य नाटचछटाकार दिवाकर कवी म्हणून रसिकांना परिचित नाहीत तर काव्यात्मक गद्यलेखनामुळे कथाकार, नाटचछटाकार, नाटिकालेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. करुण आणि हास्य या दोन रसांना त्यांनी आपल्या साहित्यातून आळविले असून मानवी जीवनाचे भेदक आणि वास्तव दर्शन घडविण्यातच त्यांच्या प्रतिभेने उत्साह दाखविला आहे. दिवाकरांच्या निधनानंतर वि. द. घाटे हे रविकिरण मंडळाचे सदस्य झाले. कवी दत्तांप्रमाणेच राष्ट्रीय म्हणून संबोधता येतील अशा कविता घाटयांनी लिहिलेल्या आहेत. त्यांची ' नवलाख दिवे तुझ्या घरी ' ही मातृभूमीच्या प्रेमाने रसरसलेली कविता सुप्रसिद्ध असून त्यांच्या अंतःकरणातील राष्ट्रभक्तीच्या भावनेचा परिचय देणारी आहे. श्री. द. ल. गोखले यांनीही पन्नास पाऊणशे कविता लिहिलेल्या असल्या आणि त्यापैकी काहीतून राष्ट्रीय भावनांचा आढळ होत असला तरी नाव

घेण्यासारखी अशी त्यांची एकही कविता नाही, त्यामुळे रानडे पतिपत्नीप्रमाणेच राष्ट्रीय काव्य-निर्मिती करणाऱ्यांत त्यांचे स्थान गौण आहे.

ग. त्र्यं. माडखोलकर हे देखील रविकिरण मंडळाचे सन्माननीय सदस्य होते. माडखोलकर हे बालवयातच विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेतून पुरस्कार केलेल्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने प्रभावित झालेले होते. या राष्ट्रवादाला विवेकवादाची आणि व्यवहारवादाची आणि प्रखर क्रियाशीलतेची जोड देऊन लोकमान्य टिळकांनी त्याचा हिरिरीने पुरस्कार केला. स्वतःच्या ध्येयवादाने तो आक्रमक व आचारशील बनविला. त्याचाही अतिशय प्रभाव माडखोलकरांच्या बालमनावर झाला. त्यामुळेच रविकिरण मंडळाच्या कोणत्याही सदस्यापेक्षा माडखोलकर हे प्रखर राष्ट्रवादी म्हणून ओळखले जातात.

मालाकार चिपळूणकर, टिळक आणि काळकर्ते परांजपे या थोर नेत्यांच्या विचारांनी माडखोलकरांच्या अंतःकरणातील देशभक्तीच्या अंकुराला धुमारे फुटले. त्याच सुमारास आयर्लंडमधील देशभक्तांच्या 'सिनफेन' पक्षाच्या चळवळीने तरुण माडखोलकरांचे लक्ष वेधून घेतले. त्या चळवळीची माहिती मिळवून त्यांनी केसरीत एक लेखनमाला लिहिली.

याच काळात माडखोलकरांनी 'प्रार्थना', 'वाग्देवतेस', 'पानिपतचे रणकंदन', 'कालचा महाराष्ट्र' यासारख्या अस्सल राष्ट्रीय कवितांची निर्मिती करून ते कवी म्हणूनही पुढे आले. 'पानिपतचे रणकंदन' आणि 'कालचा महाराष्ट्र' यासारख्या कविता पोवाडेवजा असून त्या प्रदीर्घ आहेत. त्यातून स्वातंत्र्याकांक्षी महाराष्ट्राचा अभिमान, पूर्वपरंपरेचा गौरव आणि भावी स्वातंत्र्याची आकांक्षा व्यक्त झालेली आहे. 'कालचा महाराष्ट्र' या प्रदीर्घ कवितेत माडखोलकर म्हणतात,

"नाही ! दास म्हणोनि शक्य जगणे नाही महाराष्ट्र हा !
स्वातंत्र्यास्तव संगरी झगडणे ही एक याची स्पृहा ॥
...स्वातंत्र्याविण जे जिणे विफळ ते तेव्हा तुला वाटले
स्वातंत्र्योत्कट दिव्य भाव तव ते सारेच का आटले ?
जावो, वैभव ते अशाश्वत तुझे गेले लयाला जरी,
बुद्धिभ्रंश पुढे असा तव महाराष्ट्रा ! न व्हावा परी
त्याचे विक्रम वैभव स्मरण हे चित्ता तुझ्या चेतवो ।
स्वातंत्र्योत्कट भाव जागृत करो ! तेजस्विता द्योतवो ।
बुद्धिभ्रंश अशेष लोपुनि महाराष्ट्रा ! पुन्हा विस्मित
होवो पाहुनि विश्वमंडल तुझे शार्दूलविक्रीडित ॥"

मात्र अशा मोजक्याच राष्ट्रीय कविता लिहून माडखोलकरांनी काव्याच्या क्षेत्राला नमस्कार केला आणि राष्ट्रीय विचारांच्या अभिव्यक्तीसाठी अधिक जिवंत, अधिक प्रभावी आणि उपयुक्त अशा वृत्तपत्रलेखनाकडे ते वळले. लोकमान्यांनी ज्या लोकजागृती आणि लोकशिक्षणाच्या हेतूने राष्ट्रीय लेखन केले त्याच हेतूने ग. त्र्यं. माडखोलकरांनीही केलेले आहे.

सोज्वळ राष्ट्रगीते गाणारे कवी मायदेव

(जन्म १८९४ मृत्यू १९६९)

आयुष्यभर मराठीचे अध्ययन, अध्यापन करणाऱ्या प्राध्यापक मायदेवांनी विपुल काव्यलेखन केलेले आहे. इ. स. १९१० पासून मायदेवांची काव्यनिर्मिती सुरू आहे. प्रारंभी त्यांनी 'वनमाली'

या टोपण नावाने काव्यलेखन केले असले तरी नंतर त्यांनी वा. गो. मायदेव या नावानेच आपल्या कवितांना प्रसिद्धी दिलेली आहे. त्यांचा ' भावतरंग ' हा पहिला कवितासंग्रह १९२९ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'भावनिर्झर' (१९३८), 'भावविहार' (१९४९), आणि 'भाव परिमल' (१९६०) असे चार स्फुट कवितांचे त्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्यांनी 'गरिबांची गोष्ट' आणि 'सुधा'ही खंडकाव्ये अनुक्रमे १९३१ आणि १९४० मध्ये लिहिली आहेत. शिशुगीतातील ' अभिनय गीत ' या स्वरूपाचा जो काव्यप्रकार आहे त्या गीतांची निर्मिती करून तो रूढ आणि लोकप्रिय करण्याचे महत्त्वाचे कार्य मायदेवांनी केलेले असून तेच मराठी काव्यातील त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य समजण्यात येते. ' अभिनयगीत ', ' शिशुगीत ' आणि बाल विहार ' या काव्यसंग्रहातून त्यांची शिशुगीते आलेली आहेत. याशिवाय 'किलबिल', 'क्रीडागीत', 'छंदगीत' इत्यादी गीतेही मायदेवांनी लिहिलेली आहेत.

श्री. मायदेव जसे कवी आहेत तसेच ते काव्यसंपादक म्हणूनही परिचित आहेत. 'तांब्यांची कविता' आणि 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची कविता' या दोन्हीही थोर कवींच्या काव्याचे संपादन श्री. मायदेवांनीच केलेले आहे. ' सावरकर काव्यसमालोचन ' या ग्रंथाचे संपादनही मायदेवांचेच आहे. खंडकाव्ये आणि शिशुगीते लिहिणाऱ्या मायदेवांचा पिंड हा राष्ट्रीय कवीचा आहे याबद्दल त्यांची कविता वाचताच खात्री पटते. स्वातंत्र्यशाहीर गोविंदांप्रमाणे मायदेवांनी ओजस्वी गाणी गायिलेली नसली, किंवा विनायकांप्रमाणे तेजस्वी राष्ट्रगीतांची निर्मिती केलेली नसली तरी त्यांच्या प्रकृतिधर्माप्रमाणे त्यांनी राष्ट्रीय कविता निर्माण केलेली आहे. त्यांची बहुतेक राष्ट्रीय गीते अंतःकरणाच्या तळमळीतून व्यक्त झालेली आहेत. गरुडाप्रमाणे आकाशाचा तळ शोधण्यासाठी झेप घेणे सर्वच विहंगमांना शक्यच नसते पण त्यांच्या त्यांच्या पंखातील बळाप्रमाणे ते आकाशात विहार करताना आढळतातच. सौम्य प्रकृतीच्या मायदेवांनी म्हणूनच सोज्वळ अशा राष्ट्रगीतांची निर्मिती केलेली आहे.

राष्ट्रप्रेम– ' राष्ट्रप्रेम ' अथवा ' देशभक्ती ' हा कवी मायदेवांच्या राष्ट्रीय जाणिवेचा स्थायी-भाव आहे. त्यांच्या अंतःकरणातील देशभक्तीचीच विविध रूपे म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय कविता. या राष्ट्रप्रेमाचे एक विलोभनीय रूप म्हणजे त्यांची स्वातंत्र्याची उत्कट लालसा. मायदेवांचे राष्ट्रप्रेम त्यांच्या ' महाराष्ट्रगीत ', ' आर्यभूस्तोत्र ', ' जयशाली बना ', ' ध्वज ', ' ध्वज गीत ' आणि ' राष्ट्रध्वज ' या कवितांतून उत्कटपणे व्यक्त झालेले आहे. महाराष्ट्राच्या मातीचा कवीला अतिशय अभिमान आहे. तो जन्मभूला नमन करताना म्हणतो,

" नमन महाराष्ट्रभूमि करितसो तुला
तुझिया सम तूच धन्य माय निस्तुला " (– महाराष्ट्र गीत)

कवीला जितका अभिमान महाराष्ट्रभूमीबद्दल आहे तितकेच प्रेम भारतमातेबद्दल आहे. नगाधिराज हिमालय, गंगासागर, सिंधुसागर यासारखे अर्णव आणि गंगा, सिंधू, नर्मदा आणि गोदावरी यासारख्या लोकमाता नद्या हेच काही माता भारतीचे केवळ वैभव नाही तर कवी सांगतो,

" व्यास वाल्मिकी शुकादि धन्य जाहले मुनी
धर्म, राज केशवादि एथिचेच वानुनी
शाक्य शंकरादि जीस पूत करिति बोधुनी
त्याच आर्यभू ऋणास फेडणार जन्मुनी " (– आर्यभूस्तोत्र)

स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा– राष्ट्रप्रेमाप्रमाणेच स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा त्यांच्या अनेक गीतांतून प्रकट झालेली आहे. कधी ती रूपकांच्या आश्रयाने व्यक्त होते. कधी नाटचगीतांच्या माध्यमातून साकार होते तर कधी परमेश्वराजवळ प्रार्थना करताना आढळते. साम्राज्यशाहीची जाचक जुलमी बंधने असूनही ही स्वातंत्र्य–अभिलाषा विविध प्रकारे मुखर झालेली आढळते. 'जयशाली बना', 'सूर्योदय', 'व्हेसुव्हियस जागा झालेला पाहून', 'चल सोड', 'शृंखलेस', 'निर्धार', 'स्वतंत्र हिंदुस्थान', 'प्रार्थना', 'भूमिगताचे उद्‌गार', '१९४२ चे चिमूरबंदी व त्यांचा संदेश' या मायदेवांच्या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. स्वातंत्र्याचा भोक्ता भूमिगत क्रांतिवीर म्हणतो,

" कोणि काहिही म्हणोत चित्ति ठेवि निश्चित ।
बंध मोचनी त्वदीय मी मरेन अच्युत ।
तोडिल्या तुझ्या न हाय, या अजुन शृंखला ।
दर्शनास यावया म्हणून धीर ना मला " (– भूमिगताचे उद्‌गार)

'व्हेसुव्हिअस' ज्वालामुखी जागा झाल्याचे ऐकून कवी म्हणतो,

" असा जागृत कधि तरि होईल येथे ज्वालामुखी ?
आत्मा येथे नित्य जळजळे । आग सारखी वरी उफाळे
... ये ये । धावे, अग्निदेवते ॥ "

या रूपकातून क्रांतीची हाकच कवीने दिलेली आहे.

पारतंत्र्यात मातृभूमी पाहून,

" जननिचे साकडे । प्राण करि कोरडे
बघुनिया तडफडे । वत्स हा किति तरी ॥" (प्रार्थना)

फासावर जाणारे ४२च्या 'चले जाव' आंदोलनातील चिमूरचे राजबंदी संदेश देताना सांगतात,

" देशभक्ति दीप नका टाकू मालवून
मुक्त मातृभूमी करा प्राणही वेचून
या विना न काही आम्हा कुणा मागायाचे " (– १९४२ चे चिमूर बंदी)

अशी अनेक अवतरणे देऊन स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची खंत व्यक्त केलेली स्थळे सांगता येतील पण विस्तारभयास्तव दुसरा मुद्दा पाहू.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान– राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा या राष्ट्रीय जाणिवेच्या महत्त्वाच्या विशेषांप्रमाणेच पूर्ववैभवाचे स्मरण हा देखील राष्ट्रीय कवितेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. या विशेषाचे म्हणावे तसे दर्शन मायदेवांच्या राष्ट्रीय कवितांतून फारसे घडत नाही. 'झेंडा उंच धरु' या गीतात, 'सुवर्णभूमी अमुची म्हणती' असा उल्लेख आलेला आहे. 'महाराष्ट्र भूमीचा जयजयकार करताना तिच्या समृद्धीचे वर्णन कवीने केलेले आहे. तो म्हणतो,

" तव पर्वत विन्ध्य सह्य शक्ति वितरिती
गोदाकृष्णादि नद्या स्फूर्ति अर्पिती " (– महाराष्ट्र गीत)

पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान व्यक्त करतानाही फारसा उत्साह मायदेवांच्या प्रतिभेने दाखविला नाही. 'महाराष्ट्र गीत', 'आर्यभूस्तोत्र' यासारख्या मोजक्याच कवितांतून तो प्रकट झालेला आहे.

वीर विभूति पूजन– वीर विभूतिपूजनात मायदेवांना विशेष आवड आहे. 'ध्वज', 'ऊठ बाळ', 'महाराष्ट्र गीत', 'सत्याग्रही वीरास', 'आर्यभूस्तोत्र', 'स्वयंसेवक', 'पन्नागीत'; 'मंगल दिन आला' या गीतांतून हे विभूतिपूजन मायदेवांनी केलेले आहे. या वीरात अखिल भारतीय वीर आहेतच पण वीरांगणांनाही स्थान आहे. प्राचीन आणि ऐतिहासिक वीरांप्रमाणेच आधुनिक काळातील देशभक्तांनाहि प्राधान्य मिळालेले आहे.

ज्या वीरांगनांना कवीने अभिवादन केलेले आहे त्यात–
" द्रौपदी मदालसा शकुंतला रघुप्रिया
इंदु,राधिका मिरा जिजादिका जिथे स्त्रिया "

या सर्वांचा समावेश आहे. राष्ट्रासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे आधुनिक काळातील,

" लाल, बाल, पाल, मालवीय, गांधि, गोखले
अहर्निशी मनात चिंतितील जेथिचें भले "

असे प्रमुख देशभक्त आहेत. मायदेव महाराष्ट्राचे असले तरी त्यांना लोकमान्यांचा जितका अभिमान आहे तितकाच गांधीजींचाही आहे. लोकमान्य टिळकास 'नरवर पंचानना, कानि ये अजुन तुझी गर्जना' विझलेले राष्ट्र चेतविणारा महाप्रतापी पुरुष म्हणून गौरविलेले आहे. महात्मा गांधींचे पूजन करताना,

" नव्या युगातिल शांति अस्त्र हे
कोण तयाची धारा साहे
योजिल जरि न कुणी निर्भये
तरि मिळविल मोक्ष पदालाही ।।"

असे त्यांच्या शांतीचे गोडवे गायिले आहेत.

सामाजिक आणि आर्थिक समतेचा पुरस्कार– सामाजिक आणि आर्थिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या फार थोड्या कविता मायदेवांनी लिहिल्या आहेत. सामाजिक विषमतेचे दर्शन दलित बांधवांच्या चित्रणातून घडते. 'दलितांचे अंतरंग' या एकुलत्या एका कवितेतून ते व्यक्त झालेले आहे.

" मायेने लावि उरी । नाहि नाहि अम्हां कैवारी
आमुचाच झिडकारी म्हणुन फुटे ऊर ।।"

अशी स्वकीय धर्मबंधूंबद्दलची वेदना व्यक्त झालेली आहे. आर्थिक विषमतेचे दर्शन मात्र 'देशाचा बळी'तील भिकारी म्हातारा, 'देवदर्शन', 'स्वाभिमानी उपाशी मुलगा', या कवितांतून घडते. स्वाभिमानी उपाशी मुलगा, बाणेदारपणाने म्हणतो, " आधी मला काम द्या । मग भाकर द्या ।" 'द्रौपदीचा धावा' ही संपूर्ण स्त्रीजातीच्या दुःखांना वाचा फोडणारी कविता आहे.

" धाव धाव भगवंता तूच अता धाव
तुझीया ह्या बहिणीला तूंच अता पाव ।"

कारण डोळे असूनही या कौरवसभेत सर्वच आंधळे झालेले आहेत. सिंहासारखे पराक्रमी असणारे माझे पतीही गायीसारखे दुर्बल झालेले आहेत. " लज्जा जाता स्त्रीने कशास ठेवायाचे प्राण ?" असा तिचा सवाल आहे. आजची परिस्थिती लक्षात घेतली म्हणजे या उद्गारातील कारुण्य अधिक तीव्रतेने जाणवते. उपेक्षित असलेल्या कुष्ठ रोग्यांचे दुःख मायदेवांनी आपल्या ' सांगा आम्ही जावे कुठे ?' ' लोटा मला पाण्यात ' यासारख्या कवितांतून मांडलेले आहे. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा प्रश्नही ' स्वयंसेवक ' या कवितेतून मांडलेला आहे.

समालोचन– मायदेवांची राष्ट्रीय कविता सामान्यपणे सौम्य प्रकृतीची, देशप्रेमाची, राष्ट्रीय वाण्याची आणि समस्यांचे निवेदन करणारी आहे. तिच्यात बंडखोरीचा त्वेष नसला, ओजस्विता नसली तरी तिच्यात एक सुसूत्र विकासाचा क्रम आहे. ती परंपरानिष्ठ राष्ट्रवादाकडून विवेकनिष्ठ राष्ट्रवादाकडे आणि त्यातून पुढे मानवतावादी राष्ट्रवादाकडे वळली आहे. स्वातंत्र्यासाठी झालेले संघर्ष जसे मायदेवांनी पाहिले तसे स्वातंत्र्याचे ध्येय पूर्ण झाल्याचे दृश्यही त्यांनी पाहिले. त्यांनी स्वतंत्र भारतावर गाणी गायिली आहेत. ' स्वातंत्र्याचा झेंडा ' उंच धरला आहे. आपल्या 'नवयुग' या कवितेतून त्यांनी विश्वकुटुंबवादाचा पुरस्कार केलेला आहे. मायदेवांच्या कवितेसंबंधी प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, " सामान्य माणसास सृष्टीविषयी वाटणारे प्रेम स्वतःही प्रकट करणारा, सामाजिक; राष्ट्रीय व तात्त्विक गंभीर विचारांनाही पारखा नसणारा व सारे साध्या पण परिणामकारक नेमक्या शब्दांनी व्यक्त करणारा कवी असे मायदेवांचे वर्णन करता येईल." [५४] विशेष म्हणजे रविकिरण मंडळातील प्रमुख तीन कवींबरोबर रा. श्री.जोगांनी मायदेवांचा गौरपूर्ण उल्लेख केलेला आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "त्यांनी काही राष्ट्रीय कविताही लिहिल्या आहेत पण त्यातही ओज प्रतीत होत नाही." [५५] हे खरे आहे त्यांच्या कवितात ओज नसेल, तेज नसेल पण राष्ट्रप्रेम आहे. राष्ट्रासंबंधी व राष्ट्रीयप्रश्नांसंबंधी जिव्हाळा आहे व त्या जिव्हाळ्यातून त्यांची सोज्वळ राष्ट्रीय कविता निर्माण झालेली आहे.

परंपराभिमानी टिळकभक्त अनंततनय
(जन्म १८७९ मृत्यू १९२९)

काव्यपरिचय– अनंततनय उपाख्य दत्तात्रय अनंत आपटे हे केशवसुतांच्या कालखंडातील कवी परंतु त्यांची कविता काव्यरसिकांपुढे आली ती १९१५ नंतर. त्यामुळे रविकिरण मंडळाच्या कालखंडात त्यांचा समावेश केलेला आहे. अनंततनयांच्या कवितेचा अभ्यास केल्यानंतर पहिली गोष्ट लक्षात येते ती ही की, ते सरकारी नोकरीत असूनही अन्तःकरणाने आणि आचरणाने देशभक्त होते. त्यांचा जन्म १८७९ मध्ये झाला आणि १९२९ मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या तेहतिसाव्या वर्षी त्यांचे अल्पवयात अकाली निधन झाले. परंतु या अपुऱ्या आयुष्यातील सोळा सतरा वर्षांच्या काळात त्यांनी केलेली काव्यनिर्मिती पाहिली म्हणजे ते खऱ्या अर्थाने कवी होते याची खात्री पटते. ' पंचायतन स्तवराज ' आणि ' शिव-स्तुती ' या काव्यनिर्मितीने त्यांनी प्रारंभ केला. संस्कृत काव्याच्या प्रभावामुळे त्यांनी सहाही ऋतूंचे वर्णन करणारे नव्या पद्धतीचे ऋतुसंहार काव्य लिहिले आणि परंपरेच्या अभिमानाने ' महाराष्ट्र तात्पर्य ' कथन केले. (१९०१)

अनंततनयांनी निर्माण केलेली स्फुट रचना त्यांच्या ' हृदयतरंग भाग १ ' (१९१५), ' हृदय-तरंग भाग २ ' (१९२०), ' हृदयतरंग भाग ३' (१९२७) या तीन संग्रहांत आलेली आहे. अनंत-

तनय हे लोकमान्यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाने अत्यंत प्रभावित झालेले होते. त्यांच्या काव्यातून जो परंपराभिमान आढळतो तोही टिळकांच्या भक्तीतूनच आलेला असल्याचे दिसून येते. त्यांच्या टिळक भक्तीचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे त्यांनी ओवीबद्ध रचलेला ' टिळक विजय ' पूर्वार्ध (१९२८) हा होय. भगवद्गीता आणि भगवान कृष्ण ही लोकमान्यांची जागृत दैवते म्हणूनच अनंततनयांनी ' झोपाळ्यावरची गीता ' रचली आणि ' महाराष्ट्र भगवद्गीता ' ही मराठी वाचकांना काव्यरूपाने कथन केली. एवढी विपुल काव्यनिर्मिती अल्पकाळात करूनही अनंततनयांचे नाव केवळ ' गरीब गोवऱ्यावाली ' या कवितेमुळे महाराष्ट्राला परिचित झालेले आहे. वास्तविक 'गरीब गोवऱ्यावालीच्या' दुःखाला वाचा फोडणे हे अनंततनयांच्या सर्वस्पर्शी राष्ट्रीय जाणिवेचे एक अंग आहे. पण कलोपासनेच्या आहारी गेलेल्या टीकाकारांना त्यांच्या राष्ट्रीय काव्याची ओळख पटलेली नव्हती असे खेदाने म्हणावे लागते. केशवसुतांच्या काव्यात राष्ट्रीय भावना बीज रूपाने आढळते असे राष्ट्रीय जाणिवेच्या संदर्भात रा. श्री. जोगांसारख्या रसिकमान्य टीकाकाराला समर्थन करून सांगावे लागले. अनंततनयांच्या बाबतीत अशा समर्थनाची आवश्यकता नाही. त्यांची कविता ' तांबे ', ' बी ' यांच्या कवितेसारखीच खरीखुरी राष्ट्रीय कविता आहे.

राष्ट्रप्रेम– ज्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने लोकमान्य टिळक प्रभावित झालेले होते आणि आपल्या लेखणीने, वाणीने आणि कर्तृत्वाने प्रचार करीत होते त्यांचा परिणाम अनंततनयांच्या संवेदनक्षम अशा कविमनावर खोल झालेला होता. ' राष्ट्रदेवो भव ' अशीच लोकमान्यांसारखी त्यांची निष्ठा होती त्यामुळेच भारतमातेची स्तुतिस्तोत्रे त्यांनी पुन्हा पुन्हा गायिली आहेत. ' राष्ट्रीय प्रार्थना '; 'भारतवर्षाची प्रशस्ती ', ' भारतभूमिभाग ', ' भरत भूकृत ईशवंदन ', ' भारत संदेश ' या कविता पुराव्यादाखल सहज सांगता येण्यासारख्या आहेत. किंवहुना त्यांच्या विशुद्ध राष्ट्रप्रेमाची ती जिवंत प्रतीके आहेत. भारतातील पर्वत, नद्या, वनश्री, पशुपक्षी यांची विविधता आणि विपुलता लक्षात घेऊन कवी म्हणतो,

" ती सारी सुकृती सदैव दिसती की अन्य कार्यी रत !
बापा ! काय वृथाच ते वदति जे 'सत्वाढ्य' हे भारत ॥" (–राष्ट्रीय प्रार्थना)

भारतात जन्माला येणे ही परमेश्वराची कृपाच कवीला वाटते. तो म्हणतो,

" भारतात जनु त्यांतहि नरतनु कामधेनु की जणू दुसरी
दुर्लभ असली मजला दिधली अनुग्रहचि हा खरोखरी " (–सरित्सिधु)

या ओळी वाचल्या की 'दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभं' या प्राचीन वचनाची स्मृती होते.

स्वातंत्र्याची आकांक्षा– उत्कट राष्ट्रप्रेमाबरोबर स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्यासंबंधीची दुःखद जाणीवही कवीने अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे. ' लोकमान्यास भूमातेचा निरोप '; ' पुण्यपुरीचा शिष्टमंडळास निरोप ', 'परतंत्र कोण ?' 'जागृत जागृती', 'क्षयी चंद्रास', 'हे डाग कसे निघतील', 'एका आसन्नमरण पक्षाचे उद्गार', 'केवळ स्वराज्यासाठी', यासारख्या अनेक कवितांतून अनंततनयांनी ही स्वातंत्र्य–आकांक्षा स्पष्टपणे बोलून दाखविली आहे. १९१७ साली लोकमान्य टिळक शिष्टमंडळासह इंग्लंडला गेले त्या प्रसंगाने आलेल्या दोन्ही गीतांतून ही स्वातंत्र्याची आकांक्षा प्रभावीपणे प्रकट झालेली आहे. भारतमाता लोकमान्यांना उद्देशून पुढील निवेदन करते.

" दास्यमुक्त व्हावे मी हा हेतु बा धरोनी ।
आंग्लदेशि गेले जे जे पुत्र पूर्वि कोणी
सुगम मार्ग ठेवीयेला करुनिकी तयांनी
सार्थ सिद्ध सहजी सहजी साध्य तुला व्हाया " (लोकमान्यास भूमातेचा निरोप)

दुसऱ्या एका कवितेत,

" जाच भयंकर बंदी दुर्धर जो जो कोणी योजितसे ।
मनुज तयातुनि मुक्त व्हावया पथ बहुयत्नी काढितसे ।।" (–जागृत जागृती)

एका रूपकात्मक कवितेतून पारतंत्र्याची जाणीव कवीने करून दिली आहे.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान

अनंततनयांच्या राष्ट्रीय कवितेचा फार मोठा भाग पूर्ववैभवाचे स्मरण आणि पूर्वजांच्या पराक्रमाच्या अभिमानाने व्यापलेला आहे. ' राष्ट्रीय प्रार्थना ', ' भारतवर्षाची प्रशस्ती ', ' भारत संदेश ' या राष्ट्रप्रेमाने निर्माण झालेल्या कवितांतून जसा परंपरेचा गौरव आढळतो तसाच तो परंपरा आम्ही गमावून बसल्याचा पश्चात्तापही आढळतो. एका काळी आम्ही ' सत्त्वाढय ' म्हणून ओळखले जात होतो पण आज आमची अवस्था काय झाली आहे ? कठोर आत्मपरीक्षण करून कवीने आत्मनिर्भत्सनाही केलेली आहे. तो म्हणतो,

" नाही धैर्य तसे न शौर्य लवही आम्ही नरुपी पशु
ठावा द्वेष तसाच मत्सर पुरा अन्योन्य शत्रू असू ।" (भारतवर्षाची प्रशस्ती)

मात्र या आत्मग्लानीतून सावरण्याचाही मार्ग परंपरापूजन हाच आहे, हे कवीला माहीत आहे. महाराष्ट्राचा अभिमान आणि परंपरा सांगताना पुण्याचे स्मरण कवीला होते. पुण्याचे वैभव, पुण्याचे भाग्य आणि पुण्याचा पराक्रम सांगताना कवीच्या वाणीला स्फुरण चढते. तो अभिमानाने गाऊ लागतो.

" शाहिस्त्यावरती गेला, येथुनीच शिवभूपाल ।।
बाजि ही छत्रसालाची, राखण्या बाजि बल्लाळ ।।"
(– पुण्यपुरीचा शिष्ट मंडळास निरोप)

" ऐसे धर्मसमाज राष्ट्र घटना चातुर्य चिंतामणी " असे आमचे पूर्वज होते म्हणून त्यांचा गौरव करण्यात कवीला आनंद होतो. ' ध्वजारोपण ', ' प्रसंग ', ' वज्राघात ', ' महाराष्ट्र विदुला ', ' ईक्षण ', ' गोखलकाँ बापू हैं ', ' माझे कुंडल ' या कवितांतूनही पूर्ववैभवाचे व परंपरेचे स्मरण कवीने परोपरीने केलेलें आहे. किंबहुना ' परंपराभिमान ' हे त्यांच्या राष्ट्रीय जाणिवेचे व्यवच्छेदक लक्षण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटू नये.

वीर विभूतीपूजन– या परंपराभिमानाचा एक महत्वाचा घटक म्हणजे वीर विभूतिपूजन । ज्यांची कीर्तिध्वजा काळावर विजय मिळवून अविरत फडकत आहे असे भगवान रामकृष्णादी अवतारी महापुरुष या विभूतिपूजनात आहेत. ' ध्वजारोपण ' या कवितेत कवी सांगतो,

" केल्या श्रीहरिच्या ध्वजेहि सुकृती रामध्वजे सारख्या...
...होता श्री शिवराजकार्य कुशली, धर्माभिमानी तसा
निष्ठावंत तसाच ईशचरणी की शूरही पार्थसा ।" (–ध्वजारोपण)

भारतीय इतिहासपुरुषापेक्षा महाराष्ट्रीय वीर पुरुषांना कवीने अधिक प्राधान्य दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास, पहिला बाजीराव, चिमाजी आप्पा, भाऊसाहेब पेशवे, नानासाहेब पेशवे, थोरले माधवराव पेशवे, बापू गोखले या पराक्रमी वीरांचे पूजन कवीने केलेले आहे. 'भरतभूमि भाग्य', 'पुण्यपुरीचा शिष्टमंडळास निरोप' या कवितांतून या उपरनिर्देशित वीरांचे पूजन आलेले आहे. बापू गोखल्यांच्या पराक्रमाचे वर्णन करणाऱ्या 'गोखलका बापू है।" आणि 'महाराष्ट्र विदुला' या दोन कविता आहेत. अष्टीच्या रणसंग्रामाचा उल्लेख करुन कवी म्हणतो,

" अष्टीचे रण संग्रामी शेवटचा करुन हात
शत्रूस चारिली धूळ, शौर्याने केली मात
कीर्तिचा उजळिला दीप, परि पडता भीषण रात ॥" (–गोखलका बापू है !)

'महाराष्ट्र विदुले 'त बापू गोखल्यांच्या काकूचे, वीर धोंडोपंत गोखल्यांच्या पत्नीचे अत्यंत बाणेदार आणि ओजस्वी चरित्र आलेले आहे. अनंततनयांच्या विभूतिपूजनात पौराणिक, ऐतिहासिक वीर विभूतिपूजनाप्रमाणेच आधुनिक काळातील राष्ट्रीय वीर पुरुषाचेही दोन प्रकारे विभूतिपूजन आलेले आहे. त्यातील एक प्रकार हयात असणाऱ्या वीर राष्ट्रपुरुषांचा आहे आणि दुसरा निधन पावलेल्या राष्ट्रपुरुषांचा आहे. या निधन पावलेल्या राष्ट्रपुरुषांचे पूजन विलापिकेच्या स्वरूपाचे असून त्यात श्रद्धांजलीचा महत्त्वाचा भाग आहे, मात्र त्या श्रद्धांजलीतून त्या त्या महापुरुषाचे जीवनदर्शन घडविलेले आहे. लोकमान्य टिळकांवरोबरच " बाल पालनी गांधी अशी ही त्रिमूर्ति सांप्रत कलिमाजी " असे महात्मा गांधी आणि विपिनचंद्र पाल यांचेही पूजन आलेले आहे.

राष्ट्रपुरुषांच्या महत्त्वाच्या विलापिका– राष्ट्रपुरुषांच्या विलापिका हा अनंततनयांच्या विभूति-पूजनाचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे यापूर्वीच सांगितले आहे. भारतमहर्षी दादाभाई नवरोजी, नामदार गोपाळकृष्ण गोखले, महर्षी अण्णासाहेब पटवर्धन आणि ह. ना. आपटे यांचा समावेश या विलापिकांतून आहे.

आर्थिक व सामाजिक विषमतेचे दर्शन– 'बी', तांबे, मायदेव यांच्या राष्ट्रीय कवितांमधून राष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेचे जितके तीव्र आणि सर्वस्पर्शी दर्शन घडते तसे आणि तितके अनंततनयांच्या राष्ट्रीय कवितांमधून घडत नाही. 'दुष्काळातील माय लेकरु' यासारख्या कवितेत,

" खाती सगळी आनंदाने मी परि उपवासी
अन्नाविण हे बाळ तडफडे दया न कवणासी ॥"

असे दुष्काळातील मायलेकरांचे हृदयद्रावक चित्र त्यांनी रेखाटले आहे. सकाळ–संध्याकाळ माळराना-वरील गोवऱ्या वेचून उदरनिर्वाह करणाऱ्या अगतिक, असहाय अशा गरीब गोवऱ्यावालीचे चित्र आर्थिक विषमतेचे विदारक दर्शन घडविणारे आहे.

" हात जोडित्ये पदर पसरत्ये पायी लोळण घेत्ये
नको नको वा ! नको मला तूं लाथाडू दीनेते ।
—फरफर ओढित नेले तिजला पाटीसह त्या दुष्टे
अधिकाऱ्यांचे कसे निर्मिले चित्तगूढ हे मोठे ॥" (–गरीब गोवऱ्यावाली)

' अस्पृश्यता ' किंवा ' सामाजिक विषमता ' यासंबंधीचे चित्रण कवीने केलेले आढळत नाही.

वर्तमानकालाचे प्रतिबिंब– वर्तमानकालीन राजकीय आणि सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब अनंततनयांच्या अनेक कवितांतून पडलेले स्पष्टपणे आढळते. ' भारत वर्षाची प्रशस्ती ', ' जागृत जागृती ', ' परतंत्र कोण ', ' राष्ट्रपुरुषांवर लिहिलेल्या विलापिका ', ' क्षयी चंद्रास ', ' ध्वजारोपण ', ' मकर संक्रमणाचा तिळगूळ ', ' औक्षण ' इत्यादी कविता ह्यादृष्टीने बघण्यासारख्या आहेत. भारताचे तत्कालीन दारिद्र्य आणि उद्याचे काय याची गरिबांना पडलेली चिंता वर्णन करताना कवी म्हणतो,

" असह्य दुष्ट दुर्भिक्षाने सतत गांजियेली
विविध दुःखभारे तैसी सदा व्यापिलेली ॥"

(– लोकमान्यास भूमातेचा निरोप)

आशावादी दृष्टिकोन– अनंततनयांची राष्ट्रीय कविता आशावादाने परिपूर्ण आहे. 'ध्वजारोपण ' वज्राघात ', ' महाराष्ट्र विदुला ', ' जागृत जागृती ' या कवितांमधून त्यांच्या आशावादाचे दर्शन घडते. राजगुरू समर्थ रामदासांचा ' यत्न तो देव जाणावा ' हा संदेश कवीने ' ध्वजारोपण ' या कवितेत पित्याच्या तोंडी घातलेला आहे.

" कर्तव्यी रति वाढवी विपुलशी छेदोनिया आळसा
देशाचा अभिमान तूं धरि परी वागे न उन्मत्तसा ॥"

(– ध्वजारोपण)



' वज्राघात ' या कवितेतही

" कर्तव्याची शपथ चला घ्या त्यजा आळसाला
गिळोनी दुःखभार सगळा "

असा संदेश दिला आहे. आत्यंतिक गाढ निराशेतून आशेचा उदय होतो असे प्रतिपादन ' निराशेची आशा ' या लेखात लोकमान्य टिळकांनी केलेले आहे. तोच आशय टिळकभक्त अनंततनय कवींनी आपला आशावादी दृष्टिकोन सांगताना पुढीलप्रमाणे मांडला आहे.

" आत्यंतिक जी गाढ निराशा जन्म देतसे आशेला
निबिड घोरशा तिमिरामाजीं प्रकाश सुखवी नयनाला ॥" (–जागृत जागृती)

समालोचन– अनंततनयांच्या राष्ट्रीय कवितेचे विशेष आपण पाहिले. त्यांच्या राष्ट्रीय कवितेला ' स्वातंत्र्याचा इतका ध्यास ' लागलेला होता की महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांवर लिहिलेल्या आणि महर्षी राष्ट्रपितामह नवरोजींवर लिहिलेल्या विलापिकांतूनही प्रकट झाल्याशिवाय राहिला नाही. त्यांच्या कवितेवर अभिप्राय देतांना रा. श्री. जोग म्हणतात, "त्यांच्या कवितेने सर्वच विषय हाताळले, ईशभक्तिपर रचलेली त्यांची काव्ये कोणाच्याच लक्षात राहिलेली नाहीत. त्यांनी लिहिलेली राष्ट्रीय कविताही पृथगात्म न ठरता त्याच मार्गाने गेली."[५६] ' हृदयतरंग ' पुस्तक २ या अनंततनयांच्या कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिताना श्री. नि. चापेकरांनी त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचा आवर्जून उल्लेख केला आहे. अनन्य प्रेमवृत्ती ईश्वरभक्तीप्रमाणे देशाकडे मातृभूमीकडे वळली की, " लागलीच त्या वृत्तीस स्वाभिमान, देशाभिमान... विभूतिपूजा इत्यादी नावे प्राप्त होतात. अनंततनयांची ही स्वाभिमानाची, ऐतिहासिक परंपराभिमानाची व विभूतिपूजेची वृत्ती अत्यंत उत्कट, तेजस्वी व ओजस्वी आहे." [५७] जोगांच्या आणि चापेकरांच्या अभिप्रायात त्यांच्या काव्यदृष्टीइतकेच दोन

टोकांचे अंतर आहे. मात्र चापेकरांनी अनंततनयांना न्याय दिला आहे. कवीची जुन्या नव्यासंबंधीची भूमिका ' नवे आणि जुने ' या त्यांच्या कवितेत आली आहे. ते म्हणतात,

" नवे न किमपी नवे नच खरे निराधार ते
जुन्याच जठरातुनी नियत जन्म ते पावते ।।"

जुने बीज पेरल्याशिवाय नवतरूचा उदयच होत नाही. परंपराभिमानाचे आणि राष्ट्रवादाचे प्रकटीकरण करण्यात अनंततनयांच्या प्रतिभेने उत्साह दाखविला आहे हे खरे आहे.

पारतंत्र्याच्या दुःखाने व्यथित होऊन नैराश्याची गाणी गाणारे गो. ल. आपटे
(जन्म १९०७ मृत्यू १९७८)

परंपराभिमानी, आशावादी टिळकभक्त अनंततनयांच्या राष्ट्रीय कवितेच्या अभ्यासानंतर ' आपटयांची पाने ' कर्ते कवी गो. ल. आपटे यांच्या राष्ट्रीय कवितांचा परिचय करून घ्यावयाचा आहे. १९३७ मध्ये प्रकाशित झालेल्या ' आपटयांची पाने ' या कवितासंग्रहात राष्ट्रीय म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल अशा केवळ सहा सात कविता आहेत. आचार्य अत्र्यांनी जी विडंबनगीतांची परंपरा निर्माण केली त्या परंपरेशी गो. ल. आपटे संबंधित आहेत कारण त्यांनी काही विडंबनगीते लिहिली आहेत. राष्ट्रीय कविताएवढाच आपल्या अभ्यासाचा विषय असल्याने या ठिकाणी केवळ त्यांच्या राष्ट्रीय कवितांचाच तेवढा परामर्श घ्यावयाचा आहे.

स्वातंत्र्यप्रेम आणि पारतंत्र्याची खंत– राष्ट्रप्रेमाची भावना कवी गो. ल. आपटयांच्या ठिकाणी असली तरी तिची उत्कट अशी अभिव्यक्ती निदान ' आपटयांची पाने ' या संग्रहात आढळत नाही. राष्ट्रीय कवितेचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे स्वातंत्र्यप्रेम त्यांच्या सर्वच कवितांतून आढळते पण तेही पारतंत्र्याची खंत करण्यातच प्रकट झालेले आहे. ' भगवा झेंडा ', ' आता काय त्याचे ' ' पुण्याची पर्वती ' यासारख्या कवितांतून ही पारतंत्र्याची खंत अतिशय प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे विषाची तीव्रता ही प्रत्यक्षात विषाच्या दर्शनाने होण्यापेक्षा अन्नातील त्याच्या दर्शनाने विशेष होते तोच प्रकार स्वातंत्र्याच्या प्रेमापेक्षा पारतंत्र्याच्या जाणिवेचा आहे. हीच पारतंत्र्याची खंत गो. ल. आपटयांनी वारंवार व्यक्तकेलेली आहे. ते,दुःखाने सांगतात,

" स्वातंत्र्याच्या सर्वस्वाचे निशाण प्यारे असे
ते अता दिसावे कसे ?" (– भगवा झेंडा)

या पारतंत्र्याची खंत व्यक्त करताना दुसऱ्या एका कवितेत कवी सांगतो,

" कुठे चौघडा आजला गर्जणारा ?
यशाचे पवाडे मुखे बोलणारा ।।" (– आता काय त्याचे ?)

पारतंत्र्यात असणाऱ्यांना, गुलामांना कोण मान देतो ? अशी ही तीव्र खंत आहे. दुसऱ्या एका कवितेत तर त्या पारतंत्र्याच्या वातावरणाची भयानकता कवीने मोठ्या खेदाने व्यक्त केलेली आहे. तो म्हणतो,

" पर्वती । इला बोलती । सांगणे आले ।
की नशिबाचे ते धागे तडतड तुटले ।।" (–पुण्याची पर्वती)

पूर्ववैभवाचे स्मरण, पूर्वज पराक्रमाचा अभिमान– ही पारतंत्र्याची खंत अतिशय दुःखदायक होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या पूर्वजांच्या नेत्रदीपक वैभवाचे स्मरण. हे स्मरण जुन्या

निशाणाच्या जुन्या एखाद्या स्थळाच्या किंवा प्रसंगाच्या रूपाने होताना आढळते. त्या वैभवाचे स्मरण करणारा ' भगवा झेंडा ' कवीला आपली कथाच निवेदन करतो,

" भगवा झेंडा किती ठिकाणी डौलाने नाचला
तो अता कुठे हरपला ?" (– भगवा झेंडा)

दुसऱ्या एका कवितेत गेलेल्या वैभवाची खंत करताना कवी म्हणतो,

" जुन्या वैभवाचे खरे गोड अश्रू
अतां लोपले, राहिले दीन अश्रू " (– अतां काय त्यांचे)

जी गोष्ट वैभवाची तीच पूर्वजांच्या पराक्रमाची म्हणूनच कवी म्हणतो,

" शिवरायाच्या जित्या जिवाचे वैभव ते जागते
अहह । ते दिसावे कुठे ?" (–भगवा झेंडा)

वीर विभूतिपूजन– वीर विभूतिपूजन हे राष्ट्रीय कवितेचे अविभाज्य अंग आहे. पूर्ववैभवाचे स्मरण आणि पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान जिथे आहे तिथे वीर विभूतिपूजन येणे अपरिहार्यच आहे. या विभूतिपूजनात महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सरदार आहेत,

" कुठे बैसला राज्यकर्ता शिवाजी ?
असे झोपला आजला शूर बाजी ?" (–आता काय त्याचे)

वीरविभूतिपूजनात आधुनिक काळातील दोन राष्ट्रपुरुषांना कवीने स्थान दिलेले आहे. हे विभूतिपूजनही त्यांच्या निधनानंतर श्रद्धांजलीच्या स्वरूपात लिहिल्या गेलेल्या विलापिकेच्या स्वरूपाचे आहे. त्या विलापिकेतून त्यांच्या गुणांचा गौरव कवीने केलेला आहे. लो. टिळक या राष्ट्रपुरुषाच्या अकाली निधनाचा परिणाम सांगताना कवी म्हणतो,

" तारा कोसळूनी पडे सहजची अंधार हा माजला
गेले फूल गळूनि तो सहजची हा बाग कोमेजला ।।"

यातील दोन्ही प्रतीके भव्य आहेत. एक फूल गळून पडताच सारा देशरूपी बागच कोमेजला असा आशय आहे. नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे पूजनही कवीने केलेले आहे. ते त्यांचे व्यक्ति–विशेष सांगताना म्हणतात,

" ज्याने देह खरोखरी झिजविला देशास तारावया,
होताही गणिती, प्रभुत्वहि असे त्या आंग्लभाषेवरी ।।" (गोपाळकृष्ण गोखले)

निराशावादाची कृष्णछाया– कवी गो. ल. आपटयांच्या राष्ट्रीय कवितेच्या पानावर निराशावादाची कृष्णछाया सर्वत्र पडलेली आढळते. पारतंत्र्याची खंत सर्वच राष्ट्रीय कवींच्या काव्यात आढळते परंतु ते खचलेले आढळत नाहीत. आपटयांच्या कवितेत असा आशावाद कुठेच आढळत नाही. ' पुण्याची पर्वती ' पाहून कवी म्हणतो,

" स्वातंत्र्याचा कळस हरपल्याचे दुःख होते."

गो. ल. आपटयांनी या कविता लिहिण्यापूर्वी स्वातंत्र्याच्या लढ्यातील पुढाऱ्यांना आलेले अपयश क्रांतिकारकांना आलेले अपयश, भारतीय जनतेची गुलामगिरीची मनोवृत्ती, शांतता, सत्य अहिंसा या तत्त्वांना प्राधान्य देऊन असहकार, सत्याग्रह, स्वदेशी चळवळ या साधनांनी लढा देण्याची

गांधीजींसारख्या पुढाऱ्याची वृत्ती या सर्व परिस्थितीमुळेही हा निराशावाद बळावला असेल काय ? १९७५ च्या आणीबाणीच्या स्वातंत्र्य काळातील विरोधी पक्षाचे पुढारीही असेच निराशावादी बनले होते. आपटयांनाही तत्कालीन परिस्थितीने निराशावादी बनविले असणे स्वाभाविक आहे. त्या काळातील राष्ट्रीय कवितेची निर्मिती लक्षात घेतली तरी हे लक्षात येते. कारणे काहीही असोत; आपटयांची कविता राष्ट्रीय निराशावादाची शिकार झालेली आहे असे म्हणावे लागते.

महाराष्ट्राच्या ऊर्जस्वल अस्मितेने प्रभावित होऊन राष्ट्रप्रेमाची उत्कट गीते गाणारे अज्ञातवासी (जन्म १८९६)

जीवनपरिचय– महाकवी स्वा. सावरकर, स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद, राष्ट्रकवी विनायक स्वातंत्र्यकवी बी, राष्ट्रकवी माधव यांच्या मालिकेतच ज्यांचे स्थान आहे असे 'अज्ञातवासी' उपाख्य दिनकर गंगाधर केळकर (१८९६) हे महाराष्ट्र रसिकांना सुपरिचित आहेत. राष्ट्रनिष्ठेप्रमाणेच त्यांची काव्यनिष्ठाही अविचल असल्यामुळे काव्याव्यतिरिक्त इतर वाङ्मयप्रकाराकडे ते वळले नसावेत. महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद यांच्याप्रमाणेच ते स्वतंत्र बाण्याचे राष्ट्रकवी आहेत. स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या या कवीने आपल्या व्यवसायाचे क्षेत्रही स्वतंत्रच निवडले, त्यामुळे तांबे, अनंततनय यांच्यासारखी पश्चात्ताप करण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही. दुय्यम शिक्षणानंतर काही काळ मुंबईच्या विल्सन कॉलेजात शिक्षण घेऊन ते स्वतंत्र व्यवसायात म्हणजे व्यापारात शिरले. त्या व्यवसायात काही काळ घालविल्यानंतर पुणे लष्कर येथे त्यांनी चष्म्याचे दुकान थाटले आणि जीवनचरितार्थाचे स्वतंत्र साधन संपादन केले.

वयाच्या सतराव्या अठराव्या वर्षापासून म्हणजे इ. स. १९१५ पासून त्यांनी काव्यनिर्मितीला आरंभ केला. त्यांची बहुतेक कविता पुण्यालाच निर्माण झाली असून 'अज्ञातनाद' १९२४ आणि आणि 'अज्ञातवासींची कविता' (१९३३) हे त्यांच्या स्फुट कवितांचे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

अज्ञातवासींचा ध्येयवाद– राष्ट्रकवी विनायक, बी, तांबे, कवी माधव हे ज्या अर्थाने ध्येयवादी होते त्याच अर्थाने अज्ञातवासीही. ध्येयवादी असल्याचे त्यांच्या राष्ट्रीय कवितेच्या अभ्यासावरून जाणवते. अज्ञातवासींनी ज्या कालखंडात काव्यलेखन केले आणि त्यांच्याभोवती काव्यनिर्मिती करणारे जे कवी होते ते सारे "रविकिरण मंडळ" समकालीन होते. अज्ञातवासी हे 'भावकवी' तांब्यांचे स्वतःला शिष्य समजत असूनही त्यांची राष्ट्रीय कविता रविकिरण मंडळाचे कवी, तांबे "बी" यांच्यापेक्षा संख्येनेच नव्हे तर गुणानेही अधिक आहे. प्रा. रा. श्री. जोगांनी म्हटल्याप्रमाणे "रविकिरण समकालीन असूनही केशवसुतांपेक्षा कवी विनायकांशीच त्यांचे नाते लागण्याचा संभव अधिक आहे."[५८] कारण उघड आहे. राष्ट्रकवी विनायक जसे लोकमान्य टिळकांच्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने प्रभावित झालेले होते तसेच 'अज्ञातवासी' ही प्रभावित झालेले आहेत.

काव्यासंबंधी अत्यंत हळुवार भावना अज्ञातवासींच्या ठिकाणी आहे. काव्य कुणाचेही असो मग ते त्यांच्या आवडत्या तांब्यांचे असो किंवा केशवसुत शूराचे असो त्यांच्या दृष्टीने तो दौलतीचा साठा आहे. आनंदाचे निधान आहे. सौख्याचे कुंभ पण एवढयानेच त्यांचे समाधान होत नाही. काव्याचे सामर्थ्य सांगताना ते सहजपणे आपला ध्येयवाद कविता, गीतातून बोलून दाखवितात, त्यांना काव्य हे नव्या युगाच्या निर्मितीचे साधन वाटते. शेवटी ते सांगतात,

" शांतीचें साम्राज्य यामधे
स्फूर्ति आणि चैतन्य यामधे
अभ्युदयाची वाट यामधे
प्राशू अमृत घटा घटा ।।" (– कविता)

'अमृतत्त्व' आणि 'अभ्युदय' या ध्येयाने प्रेरित झालेला कवी 'कलेप्रत' या कवितेत सांगतो,

" हवे खरे सोन्याचे नाणे
घडती कसलेही दागिने ।।" (कलेप्रत)

श्रेयाच्या मार्गावर वाटचाल करणारा कवी शब्दांना म्हणतो,

" असे शक्ति, सामर्थ्य जे अंतरी
तयाने तुम्हा भारुनी टाकितो
अता लाडक्यांनो ! कुठे ही चला
चमत्कार साऱ्या जगा दावितो ।।" (शब्दांनो)

हे सामर्थ्य अर्थातच राष्ट्रनिष्ठेचे आहे, मातृभक्तीचे आहे, ध्येयवादाचे आहे म्हणूनच शब्द शक्तिमान झालेले आहेत. 'एके काळी' या कवितेत पूर्वजांच्या पराक्रमाचे व ऐश्वर्याचे वर्णन केल्यानंतर 'काळ'च कवीला दरडावून सांगतो,

" मान खालती घालु नको, ते नको सूर रडवे
पराक्रमी पुरुषाने गाणे छाती ठोक गावे ।।" (– एके काळी)

छातीठोकपणे गाणे ध्येयवादीच गाऊ शकतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अज्ञातवासींचे काव्य आत्मनिष्ठ नाही. ते प्राधान्याने वस्तुनिष्ठ आहे. प्रबोधनासाठीच अज्ञातवासी यांनी काव्यनिर्मिती केलेली आहे. राष्ट्रीय भावनांची, विचारांची जागृती हेच तिचे प्रयोजन आहे आणि ते कार्य तिने अतिशय समर्थपणे केलेले आहे. त्यांची कविता म्हणूनच रसिकसापेक्ष आहे. 'रसिकास' या कवितेत ते रसिकांनाही 'नव्या युगाचे पाईक म्हणतात,

" ह्या नव्या युगाचे पाइक तुम्ही थोर
या चला झट्‌ बांधण्या नवे मंदिर
स्वातंत्र्य देवता उभी सचित समोर
मी वाजविणार नगारा ।।" (– रसिकास)

उत्कट राष्ट्रप्रेम– महाराष्ट्राच्या ऊर्जस्वल अस्मितेची गाणी गाण्यात अज्ञातवासींच्या प्रतिभेने अतिशय उल्हास दाखविला असला तरीही त्यांच्या त्या सर्व गीतांमागील मुख्य प्रेरणा राष्ट्रप्रेमाची आहे. राष्ट्र हेच दैवत आहे अशी लो. टिळकांची धारणा होती. तीच धारणा अज्ञातवासींची आहे. " ध्यास मायभूमि, तुझा लागला मदंतरी " असा प्रारंभ असलेल्या 'मायभूमी' या कवितेत कवी म्हणतो,

" तन मन तुज जननी, होय मुक्त अर्पुनी
देह पडो तव भजनीं, आसपूर्ण ही करी ।।" (– मायभूमी)

दुसऱ्या एका कवितेत भारताची महती गाऊन त्याचे भवितव्य उज्ज्वल असल्याचे कवीने सांगितले आहे.

" देश आपुला वैभवशाली
दीनांचा गरिबांचा वाली
भविष्य उज्ज्वल लिहिले भाली
चोहिकडे यश दुमदुमते .....।।" (– आपले निशाण)

पारतंत्र्याची तीव्र खंत आणि स्वातंत्र्याची लालसा– पवित्र दैवत असलेली आपली मातृभूमी पारतंत्र्यात असल्याची तीव्र खंत कवीने अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे. ' कोटि हिऱ्यांचे तेज इथे ' ही कविता कवीच्या अन्तःकरणातील वेदना प्रकट करणारी आहे. कवितेची सुरुवात

" कोटि हिऱ्यांचे तेज जिथे
लोपुन गेले–हे स्थळ ते ।।"

पुढे कवी म्हणतो,

" भाग्य हीन हे माझ्या देशा ।
कळा हीन हे माझ्या देशा
वंदिवान तूं–तुझिया आशा
कथितो वारा इथे इथे ।।" (कोटि हिऱ्यांचे तेज इथे)

' फेका फेका भाला ', 'अस्वलास वेसणखाशी', 'जित', यासारख्या रूपकात्मक व प्रतीकात्मक कवितांमधूनही ही पारतंत्र्याची खंत तीव्रतेने कवीने व्यक्त केली आहे. अस्वल हा प्राणी स्वभावाने हिंस्र आहे पण दरवेशाने का एकदा युक्तिप्रयुक्तीने वेसण घातली की मग तो त्याच्या पूर्णपणे आज्ञेत वागतो. वेसणीत जशी ही जादू आहे तशी पारतंत्र्यातही आहे. कवी सांगतो,

" तो पशूहि न धरी खंत
विसरला आपुली जात
तन्मय हो त्यातच चित्त
हे जनावरच गुलहौशी ।।" (अस्वलास वेसण खाशी)

गुलामगिरीच्या आहारी गेलेल्या माणसाचा स्वाभिमान नष्ट होतो आणि मग त्याची अवस्था जनावरासारखीच होते असे यातून कवीला सुचवावयाचे आहे.

पूर्व-वैभवाचे स्मरण– पूर्ववैभवाचे स्मरण, पारतंत्र्याची जाणीव अधिक तापदायक करीत असते. देशभक्ताला तर ती अत्यंत वेदनादायक ठरते. दोन काळांतील अंतर त्याला सहज जाणवते. पूर्ववैभवाचे स्मरण करून देणाऱ्या अनेक कविता अज्ञातवासींनी लिहिल्या आहेत. 'एके काळी', ' घ्या राया वन्दन', 'कालचा मराठा', 'पर्वती', 'उलटल्या उरात कटयारी', 'मैना', 'आपले निशाण', 'खडकीची लढाई' इत्यादी कविता त्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत.

" नवलाख झुले लष्कर, तळपे, भाला वरच्यावर
दिसते एकच वर अंबर
खाली सैन्याचा सागर
नाही नजर ठरत त्यावर
जरिपटका डौलात डोलतो भरजरि हत्तीवर ।।" (नवलाख झुले लष्कर)

अशी कितीतरी उदाहरणे देऊन हा मुद्दा स्पष्ट करता येईल.

पूर्वजांच्या पराक्रमाचा यथार्थ अभिमान– पूर्ववैभवाच्या स्मरणावरोबरच पूर्वजांच्या पराक्रमाच्या अभिमानाने कवीचे अंतःकरण फुलून येते. ' नवलाख झुले लष्कर ' या कवितेत पेशव्यांच्या ऐश्वर्याचे वर्णन करताना कवी म्हणतो,

" जरिपटका डौलात डोलतो भरजरि हत्तीवर
हौदा सोन्याचा सुन्दर
वरती मोत्यांची झालर
भाऊ–दक्षिणचा भास्कर
स्वर्गाचे सौंदर्य लोटले ह्यातर सैन्यावर ।।" (नवलाख झुले लष्कर)

लोकमाता गौतमीच्या निर्मळ जलावर ज्याचा पिंड वाढला तो मराठा कसा तर,

" धार पिऊन जागला मराठा आग पीत ये पुढे
मृत्यूला कवटाळित तिकडे घोरपडीवर चढे ।।" (कालचा मराठा)

पूर्वजांचा पराक्रम सांगताना, पेशव्यांच्या पुणे दरबाराचे स्मरण कवीला होते.

" फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फेरी
तळपती तिखट तल्वारी ।।
केवढी ! पुण्याची भिती !
पहा कापती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी ।।" (पुणे दरबारी)

याशिवाय 'मराठेशाहीतील एक प्रसंग', 'कमला', 'गोदातटी', 'कोटि हिऱ्याचे तेज इथे', 'खडकीची लढाई' या कविताही पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान प्रकट करणाऱ्या आहेत.

वीर विभूतिपूजन– अज्ञातवासींनी केलेले वीर विभूतिपूजन त्यांच्या व्यापक राष्ट्रीय जाणिवेचा परिचय करून देणारे आहे. कारण या विभूतिपूजनाला धर्म, जाती आणि पंथाच्या जशा मर्यादा नाहीत तशा प्रदेशाच्याही मर्यादा नाहीत. मानवजातीच्या सुखात भर घालणाऱ्या कोणत्याही महापुरुषाला अभिवादन केले पाहिजे असे त्यांचे धोरण दिसते. त्यामुळेच भगवान रामकृष्णापासून तो आधुनिक काळातील महात्मा गांधींपर्यंत सर्वांनाच त्यांनी अभिवादन केले आहे. हे विभूतिपूजन चतुर्विध स्वरूपाचे आहे. त्यात अवतारी पुरुष आहेत, ऐतिहासिक पराक्रमी पुरुष आहेत, राष्ट्रभक्त आहेत, तसेच समाजसेवकही आहेत. कवी म्हणतो,

" पार्थ शूर पण, अडला होता
कृष्ण पढवि मग भगवद्गीता
उठ पुढे हो । उजळी भारता
सैन्य असे मागेच खडे ।।" (– जगताची धाव पुढे)

मराठी माणूस जसा गोपालकृष्णाला विसरत नाही तसा अखंड अपुले छत्र धरणारा पंढरीचा श्रीहरी विसरत नाही. ऐतिहासिक काळातील वीर विभूतींमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान एखाद्या दैवतासारखे आहे. 'एकेकाळी', 'चौघडा', 'कोटि हिन्यांचे तेज इथे' या कवितांतून शिवाजी महाराजांचे पूजन आलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा महिमा गाताना कवी म्हणतो,

"तो शिवनृपती : आमुच्याच रे। हाडा मासाचा
पुन्हा एकदा उघडा पाने इतिहासचि वाचा ॥" (चौघडा)

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर मराठे सरदारांचे, श्रीमंत पेशव्यांचे पूजन करण्यात कवीने उल्हास प्रकट केला आहे. "म्हैसूरचा वाघ टिपू सुलतान असो, इंग्रजी बावटा धारण करणारा फिरंगी सरदार असो किंवा दिल्लीच्या तख्ताचे थोर सरदार असोत सर्वांना पुण्याचा धाक होता, दरारा होता कवी मोठ्या अभिमानाने सांगतो,

"... ... ... वाकती थोर सरदार
दिल्लीचे वीर
पुणे दरबारी
तळपती तिखट तलवारी ॥" (पुणे दरबारी)

ग्वाल्हेरीचा वाघ महादजी शिंदे यांच्या पराक्रमाने स्फुरण येऊन कवी म्हणतो, "थोर मर्दशिंदा येथे ताठ उभा आहे। जयशाली भगवा झेंडा उंच फडकताहे ! तिखट शत्रु थरकापोनी दूर दूर राहे
अभिमाने त्याच्या पुढती लवे शीर माझे ॥" (– महादजीचे ग्वाल्हेर)

शेवटच्या खडकीच्या लढाईत आपल्या पराक्रमाची शर्थ करणारा मराठा वीर बापू गोखले कवीला आठवतो. 'लढे एकटा थोर गोखला' असे उद्गार सहज कवीच्या मुखातून बाहेर पडतात. आंग्लवीर व्हयू रोज याने ज्या झांशीच्या रणरागिणीचे कौतुक केले, त्या लक्ष्मीबाईचेही पूजन कवीने केले आहे,

"इथे पडे परम पवित्रा पराक्रमी राणी
इथे स्वर्ग या भूवरती खेचून जी आणी ॥" (– झाशीच्या राणीचे स्मरण)

ऐतिहासिक काळातील महापुरुषांप्रमाणेच आधुनिक काळातील राष्ट्रपुरुषांना कवीने अभिवादन केलेले आहे. ज्या अस्मितादर्श राष्ट्रवादाने कवी प्रभावित झालेला आहे, तो राष्ट्रवाद भारताला शिकविणारा 'गीता रहस्यकार', लोकोत्तर देशभक्त, लोकमान्य टिळक योद्धा म्हणूनही कवीला आदरणीय आहे. कवी सांगतो,

"त्या योद्धयाला अमुचे वंदन
वंदनेच होऊ ही पावन
स्मरणांतहि पावित्र्य विलक्षण
चैतन्य दिले जे तेच उरे ॥" (– लोकमान्य)

सुधारकाग्रणी देशभक्त गोपाळराव आगरकरांचे पूजन एका सुनीताद्वारे कवीने केलेले आहे. कवी म्हणतो,

"तुझा निश्चय मात्र निश्चल खरा, तूं संकटे सोसुनी
राने तोडुनी मंगलप्रद नवी केली पुन्हा पेरणी ॥" (– आगरकर)

टिळक आगरकरांप्रमाणेच राजर्षी सयाजीराव गायकवाड आणि भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे या महापुरुषांनाही त्यांच्या कार्याचा गौरव करून कवीने यथोचित पूजन केलेले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय तत्त्वज्ञान कवीला कितपत मान्य होते यासंबंधी निश्चित सांगणे कठीण आहे. परंतु एक थोर राष्ट्रीय विभूती म्हणून गांधीजींना त्यांनी पूज्यभावाने त्रिवार वन्दन केलेले आहे. 'महात्मा गांधीजी' आणि 'महात्मा' या कवितांतून हे विभूतिपूजन आलेले असून कवी अभिमानाने म्हणतो, संपूर्ण जगात गांधीजींसारखा एकतरी महात्मा पुरुष दाखविता येईल काय ?

"मातृदेशाचे चित्र मूर्तिमंत
बघा अपुलेही हृदय असे ह्यात
जीव त्याचा जीवात गुंतला हे
थोर ह्याहून जगतात कोण आहे ?" (– महात्मा)

अज्ञातवासींनी इटालीच्या म्याँक्स्वेनी या स्वातंत्र्यवीराला वन्दन केलेले आहे. प्रदेश दूर आणि भिन्न असले तरी 'पराधीनता' हे समान नाते आपल्या दोघांत आहे असे कवी म्हणतो.

" माझ्या घरी माय माझी उदासी तशी ती तुझीही असे आजला
चित्ती अहोरात्र हे शल्य माझ्या, तसे ते सख्या जाळिते ही तुला ॥"
(–म्याँक्स्वेनी)

ऐतिहासिक काळातील घटनाप्रसंगांची विलोभनीय जिवंत चित्रे

राष्ट्रकवी तिवारींच्या 'मराठ्यांच्या संग्राम गीतात' आणि कवी माधवांच्या ऐतिहासिक कवितांत ज्याप्रमाणे ऐतिहासिक घटनाप्रसंगांचे चित्रण केलेले आढळते तसेच अज्ञातवासींच्या कवितांतून आढळते. 'मराठेशाहीतील एक प्रसंग', 'नवलाख झुले लष्कर', 'सरदार धन्य एवढा', 'खडकीची लढाई', 'पुणे दरबारी', 'उलटल्या उरात कटयारी' या कवितांतून काळ आणि प्रसंग जिवंतपणे उभा करण्यात अज्ञातवासींच्या कलेने सर्वस्व पणास लावले आहे. भल्या पहाटे वाघिणीची तलवारीने शिकार करून वाघिणीचे प्रचंड धूड पाठीवर बांधून मराठा सरदार गड चढतो आहे. कवितेची सुरुवात,

" धडाधडा झडे चौघडा, गडावर चढे मर्द फाकडा "

या ध्रुवपदाने झाली आहे. पुढे

" हातातील तलवार ठिबकते
पाठीवर वाघीण नाहते
करील 'कौतुक ती मन' वदते
चालला शिपाई खडा ॥" (– सरदार धन्य एवढा)

मराठ्यांच्या 'नवलाख लष्कराचे' वर्णनही अंतःकरणात अभिमानाची भावना निर्माण करणारे आहे. अज्ञातवासींनी रेखाटलेली मराठ्यांच्या पराक्रमाची, गतकाळाच्या वैभवाची विलोभनीय जिवंत चित्रे पाहून, कवी भा. रा. तांबे म्हणतात, " हे गतकालाचे उठावदार चित्र, हे आम्हा मराठ्यांचे वैभव कवीने आपल्या कुंचल्याने आमच्यासमोर रेखाटताच जर मराठ्यांचा हात मिशीवर गेला नाही तर तो मराठाच नव्हे, दोगलाच म्हणावयाचा." [५९]

वर्तमानकाळाचे प्रतिबिंब– अज्ञातवासींच्या राष्ट्रीय कवितेत वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब पडलेलेही स्पष्टपणे आढळते. 'मायभूमी', 'हीच ती लढाई', 'एकेकाळी', 'आजचा मराठा', 'चंद्रावरील

डाग', 'माझ्या जगा !', 'कोटि हिऱ्यांचे तेज इथें' या कविता त्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. 'आजचा मराठा', त्याची वर्तमानकालातील परिस्थिती निवेदन करताना कवी सांगतो,

" ना मिती, खपावे किती, सतत शेतात,
दे पीक न धरणीमाय उभ्या वर्षात ।।" (– आजचा मराठा)

अशी आणखीही उदाहरणे देण्यासारखी आहेत पण विस्तारभयास्तव मोह आवरला पाहिजे.

आर्थिक व सामाजिक विषमता– वर्तमानकाळातील परिस्थितीतच देशातील आर्थिक व सामाजिक विषमतेचे दर्शन घडते. केवळ मराठ्यांच्या गतवैभवाची गाणीच कवीने गायिली नाहीत तर वर्तमानकालीन त्याच्या दुर्दैवाची गाणीही त्याने गायिली आहेत. 'भविष्यात', 'सावकारा', 'हे धना !', 'देवापाशी गरिबांचे मागणे' आणि 'दारिद्र्य उरावर घोर' या कवितांतून आर्थिक विषमतेचे चित्र कवीने रेखाटले आहे.

" अन्नावाचून तडफडतो जरि
काही न वाटे त्याचेही परि
लज्जेस्तव ते वस्त्र शरीरी
करणे वरचे वरी ।।" (– भविष्यास)

आर्थिक शोषण करणाऱ्या सावकाराला उद्देशून लिहिलेल्या कवितेत,

" घे ओढून पूर्णपणे रक्त सावकारा
अस्थीचे वेष्टन, पण राहु दे उदारा ।।" (– सावकारा)

सर्व जग अर्थाचे गुलाम आहे हा आशय सांगताना 'धना !' या कवितेत कवी म्हणतो,

" हे धना । तुझा जगी जयजयकार
दास तुझे जग करि सत्कार ।।" (– धना ।)

सत्ता आणि संपत्ती यांच्या फेऱ्यात सापडलेल्या व्यक्ती जगात कोणतेही पातक करू शकतात हे 'उलटल्या उरात कटयारी' या कवितेतून सांगितले आहे. देवधर्मापासूनच आजपर्यंत दूर ठेवलेल्या हरिजन बांधवांना हृदयाशी लावा आणि मानवतेवरील हा कलंक निपटून काढा असा उपदेश केला आहे.

" पापाचे कर क्षालन । झाले ते गंगापंण
वेचू नको आता क्षण । बंधु तुझे रंजले ।।" (हरिजन)

राष्ट्रीय आशावाद– अस्मितादर्श राष्ट्रवादावर ऊर्जस्वल गाणी गाणाऱ्या अज्ञातवासींच्या कवितेत नैराश्याचा सूर असल्याचे प्रा. रा. श्री. जोगांनी आपले मत मांडले आहे. ते म्हणतात; " राष्ट्रीय काव्यात प्रोत्साहक काव्याचा एक पंथ आहे. तसा हताश झालेल्या व त्यामुळे अधिक उत्कट दुःख व्यक्त करणाऱ्या कवींचाही एक आहे. त्यामधील विनायक हे पहिले कवी होत. अज्ञातवासी विनायकांना जवळ आहेत ते या अर्थाने."[१०] ही विधाने करताना 'खडकीची लढाई' या कवितेतील ओळी पुराव्यादाखल त्यांनी सादर केल्या आहेत. कवितेचा प्रारंभच

" अतां यापुढे अखंड रात
चोहिकडून सगळाच घात ।।"

अशा आत्यंतिक निराशेनेच झालेला आहे. कवितेच्या शेवटी कवी सांगतो,

" पडे रायगड ह्या खडकीवर
बुडे पलिकडे हताश भास्कर
शेवटचा हा प्रसंग खडतर
मर्दुमकीचा अंत जयात ॥"

परंतु याच कवितेत कवी निराशावादाला झटकून टाकण्यासाठी म्हणतो,

" खिन्न न हो पण माझे भारत
असे रात्र तोवरि हे चालत "

याचा कसा विसर पडेल. प्रतिकूल परिस्थितीत मोठमोठ्या पराक्रमी माणसांच्या मनात निराशेची छाया डोकावून जाते. क्षणकाल ते विचलित झाल्यासारखे वाटतातही पण पुन्हा आशावादाची कास धरून प्रयत्नाच्या दैवताची पूजा बांधतात. महाकवी सावरकर, कवी गोविंद यांच्यासारख्या प्रोत्साहक कविता करणाऱ्या राष्ट्रीय कवींच्या अंतःकरणातही निराशा डोकावली होती पण ती क्षणिक बाब होती. त्यांची प्रकृती ही आशावादीच होती. राष्ट्रकवी विनायक किंवा त्यांच्या परंपरेतले म्हटले जाणारे अज्ञातवासी हे खऱ्या अर्थाने आशावादाची गीते गाणारे राष्ट्रीय कवी आहेत.

तांब्यांसारख्या चिकित्सक रसिक कवीनेही त्यांच्या कवितेसंबंधी अभिप्राय देताना, " ही महाराष्ट्राच्या नव उज्ज्वल भविष्याची भावना, ही प्रबल अशा अज्ञातवासींच्या मनात इतकी जाज्वल्य आहे की त्यांचे सारे हृदय ती व्यापून टाकते."[११] तिचा प्रत्यय–

" पंख कापले परंतु पाहे अवघड घडही उडू
साधून घे हकनाक वैर हा भवती गोतावळा
अंतरि त्याच्या सूर्य म्हणतसे ' आलो उदया चला ' ॥" (– उद्याचा मराठा)

किंवा " हा निजलेला दक्षिण
जातिवंत केसरी पण
उगवणार लवकर दिन
नव्या युगाला स्वातंत्र्याचे हा बांधिल तोरण ॥" (पर्वती)

या पंक्ती त्यांचा राष्ट्रीय आशावाद व्यक्त करणाऱ्या आहेत. केवळ दोन कवितांतील चार सहा पंक्ती म्हणजे अज्ञातवासींच्या आशावादाचा पुरावा म्हणता येणार नाही पण त्यांच्या ' सोन्याची द्वारका ', ' भविष्यास ', ' देवी आशे ', ' जगताची धाव पुढे ', ' एके काळी ', ' प्रत्यक्ष उभा हा बेडर चोर ', ' घ्या राया वंदन ', ' येणार घटी ज्या ', ' भविष्य ये जन्मास ' या विविध कवितांमधून त्यांचा आशावाद पल्लवित झालेला दिसून येतो.

समालोचन– राष्ट्रीय जाणिवेने आणि राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेली अज्ञातवासींची कविता काव्यगुणांनीही संपन्न आहे. तिच्यात घरंदाज मराठा कुटुंबातील पाणीदार रेखीव किशोरीचे नैसर्गिक नागर सौंदर्य आहे. प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, ... " जीवनासंबंधीचे काही सामान्यच पण महत्त्वाचे विचार आणि भावना व त्यांचे जोरदार भाषेमध्ये प्रकटन या दोन विशेषांमुळे अज्ञातवासींची कविता सामान्य कवितेपेक्षा वरच्या दर्जाची ठरते."[१२] प्रा. भ. श्री. पंडित, माडखोलकर व अज्ञातवासी यांची

तुलना करून म्हणतात, " अज्ञातवासींच्या कवितांत मराठेशाहीतील वातावरण मूर्त झालेले आहे.... त्यांच्या कवितांचा आरंभ चटकदार असतो पण पुढील डोलारा मुद्दाम चढविल्यासारखा वाटतो.[१३]"

डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " ती कविता प्राधान्याने राष्ट्रीय कवितेच्या परंपरेत मोडणारी आहे ... त्यांच्या प्रतिभेचे खरे वैभव मात्र त्यांच्या मायभूमिविषयक कवितांतून प्रकट झालेले आहे,... महाराष्ट्राविषयी तर त्यांना अनन्यसाधारण भक्ती आहे."[१४] राष्ट्रप्रेमाच्या भावनेतून साकार झालेली अज्ञातवासींची कविता सर्वच रसिक टीकाकारांनी वाखाणलेली असल्याचे आपण त्यांच्याच शब्दांतून पाहिले आहे. प्रा. रा. श्री. जोगांनी ' अज्ञातवासींच्या ' नावाप्रमाणेच ती ' अज्ञातवासात ' गेली म्हणून शंकाही बोलून दाखविली आहे. लोकमान्य टिळकांचा अस्मितादर्श राष्ट्रवाद हा व्यवहारी तसाच आक्रमक असा राष्ट्रवाद होता. गांधीजींच्या काळात त्याचे स्वरूप पार बदलून गेले. त्यामुळेच त्यांची कविता अज्ञातवासी झाली असावी. काहीही असले तरी अज्ञातवासींची राष्ट्रीय कविता मराठी राष्ट्रीय कवितेचे तेजस्वी, ओजस्वी, पाणीदार आणि रसरशीत असे रेखीव व आकर्षक लेणे आहे. ते ते काळावर कोरले गेले आहे. आपल्या सौंदर्याने ते रसिकांना सदैव आनंद, उत्साह आणि स्फूर्ती देत राहील.

राष्ट्रीय आशावादाची उत्स्फूर्त गीते गाणारे वा. भा. पाठक

(जन्म १९०५ – मृत्यू १९७९)

जीवनपरिचय– डॉ. वामन भार्गव पाठक यांचा महाराष्ट्राला प्रथम परिचय झाला तो कवी म्हणूनच. ' आशा–गीत ' (ओढणी व इतर कविता) या १९३३ साली प्रकाशित झालेल्या त्यांच्या स्फुट कवितांच्या काव्यसंग्रहाने मराठी रसिक त्यांना ओळखू लागले. पुण्याला महाविद्यालयात अध्ययन करीत असतानाच एक अभ्यासू व्यासंगी असे वाङमयाचे विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता. विद्यापीठाच्या परीक्षेतही उत्तम यश त्यांनी संपादन केलेले आहे. ' टीका आणि टीकाकार ' आणि ' आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह ' (१९६४) या व्यासंगी अभ्यासपूर्ण आणि पांडित्य-पूर्ण ग्रंथांनी वा. भा. पाठकांना विद्वान म्हणून लौकिक मिळवून दिला आहे. पुण्याच्या नवरोजी वाडिया महाविद्यालयातून मराठीचे प्राध्यापक म्हणून ते सेवानिवृत्त झालेले आहेत.

काव्यविषयक दृष्टिकोन– ' खेडयातील पहाट ' आणि ' सावळया ' या बालवीरांचे ओजस्वी स्वभावदर्शन घडविणारे ' शिवराज आणि बालवीर ' हे नाटयगीत या दोन कवितांनी त्यांचा कवी म्हणून मराठी मुलुखात परिचय झालेला आहे. प्रा. नि. शं. ठकार त्यांच्या काव्यप्रेरणेला ' रविकिरणी प्रेरणा ' [१५] असे नाव देतात, ते बरोबर वाटत नाही कारण स्वतःच्या काव्यप्रेरणे-संबंधी कवीनेच जर स्पष्टीकरण केले असेल तर ते अधिक वास्तव मानायला पाहिजे. कवीने स्वतः निवेदन केल्यानंतरही टीकाकारांना त्यासंबंधी आपला वेगळा अभिप्राय देण्याचे विचार-स्वातंत्र्य आहेच. ' आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह ' शोधताना ' जीवनविषयक तत्त्वज्ञान ' या प्रकरणात स्वतःचा जीवनविषयक दृष्टिकोन मांडताना ते म्हणतात, " माझ्या बहुसंख्य कवितांची निर्मिती सभोवतालच्या परिस्थितीशी आपण जुळते कसे घ्यावे किंवा त्या परिस्थितीला तोंड कसे द्यावे या विचारामुळेच घडून आलेली आहे." [१६] त्यातून कवीची जीवनाकडे गांभीर्याने बघण्याची दृष्टीच प्रतीत होते. ' आवाहन ', ' हे दीप लागले चोहिकडे ' यासारख्या कवितांतून त्यांचा ध्येयवाद प्रकट झालेला आहे.

" स्वबले पण दास्यातून – जे आले वर धावून
सुयशाचे ध्वज रोवून – दिगंत गेले उजळून
उदात्त चरिते वीरांची स्फूर्तीची उत्साहाची
ती दाउन निज राष्ट्राला, संजीवन अर्पायाला
...देशोद्धारास्तव तूर्ण – ये तरुणा सरसावून " (– आवाहन)

' आवाहन 'मधून कवीचा राष्ट्रीय ध्येयवाद, त्याचा काव्यविषयक दृष्टिकोन आणि त्याचे जीवन-विषयक तत्त्वज्ञान या सर्वच घटकांचा उलगडा या कवितेतून सहज स्पष्ट होतो.

" उदात्त चरिते वीरांची गावी – स्वधर्मनिष्ठा राखावी "

या ओळी वाचल्या म्हणजे लो. टिळकांच्या अस्मितादर्श राष्ट्रवादाचा किती जबरदस्त प्रभाव पाठकांच्या मनावर आहे याची कल्पना येते.

राष्ट्रभक्ती– अंतःकरणात राष्ट्रभक्ती असल्याशिवाय अशी कविता, अशी आवाहने, कवीकडून प्रकट होत नाहीत. तरुण वय मुळातच स्वप्नाळू असते, ही स्वप्ने विविध प्रकारची असतात. राष्ट्रभक्ती हे पाठकांचे स्वप्नरंजन नाही. आपल्या प्रेयसीलाही त्यांनी आपल्या ध्येयवादाची स्पष्ट जाणीव दिली आहे. प्रेमापेक्षा मायभू हे मूल्य अधिक उदात्त आहे हे सांगताना कवी म्हणतो,

" अविरत जरि बाले येसि दृष्टीसमोर
नकळत वदनाची दाविसी चंद्रकोर
...मज परि नित लागे ध्यास मन्माय भूचा
अवसर मज कोठे, गे तुला गावयाचा ?" (– तू आणि मायभू !)

' मनोज्ञ शृंगाराचा नमुना ' हे प्रा. श्री. म. माटघांनी या प्रेमगीताचे केलेले वर्णन अतिशय अन्वर्थक आहे. ' आवाहन 'मध्ये तरुणाला उद्देशून ते म्हणतात,

" जन्मभूमि ती पूज्य तुझी – खचली परवशतेमाजी
सावध होउन तर तरुणा – धाव तिच्या तू उद्धरणा ॥"

' स्वप्नात काय पाहिले ? ' या चमत्कृतिपूर्ण कवितेतही विक्रमशाली महाराष्ट्रभूमीचे पाच खंडांपेक्षा मोल असल्याचे कवीने अभिमानाने सांगितले आहे. आणखीही काही कवितांतून मातृभूमीचे उत्कट प्रेम कवीने व्यक्त केलेले आहे.

स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची खंत– उत्कट राष्ट्रप्रेमाचा आविष्कार आणखी दोन प्रकारांनी होत असतो. 'जन्मभूमि ती पूज्य तुझी खचली परवशते माजी' ही पारतंत्र्याची दुःखदायक खंत आणि तिच्या स्वातंत्र्याची उत्कट लालसा कवी आपल्या काव्यातून व्यक्त करीत असतो. जुलुमी साम्राज्यवादी शासनामुळे या भावनांच्या अभिव्यक्तीवर स्वाभाविकपणेच बंधने येतात. अशावेळी कवीला अनेकदा प्रतीकांचा आश्रय घ्यावा लागतो. लाक्षणिकतेचा आधार घ्यावा लागतो. अनेकांनी पिंजऱ्यातील पक्षाचे, जाळ्यात अडकलेल्या वनराजाचे प्रतीक घेऊन पारतंत्र्याची खंत व्यक्त केलेली आहे. ' निवडुंगाचे गाणे ', ' तीव्र उन्हाळा ', ' अजून आहे फुटावयाचे सख्या पुढे तांबडे ! ' या कविता पारतंत्र्याची खंत प्रकट करणाऱ्या लाक्षणिक कविता आहेत. सृष्टीचे खरेखुरे थोर राजे म्हणजे वड आणि पिंपळ हे वृक्ष. त्यांचे देव म्हणूनच आम्ही रक्षण करतो परंतु आमच्या सृष्टीच्या राज्यात परकीय शिरतात.

" आमुच्या राज्यी शिरुनी करितो तांडव भयंकर
दुबळघा माना अमुच्या त्यावर चालविती शस्त्रे थोर ।।" (– निवडुंगाचे गाणे)

साम्राज्यवादी सत्ताधीशांचा निःशस्त्र अशा प्रजेवरील अत्याचारच कवीने या कवितेतून दाखविला आहे. सर्वच हा अत्याचार सहन करीत नाहीत. काही 'स्ववले पण दास्यातुन–जे आले वर घावून' असे तेजस्वीही असतात. पण जे तेजस्वी नसतात त्यांनाही त्या पारतंत्र्याचे दुःख जाणवत असतेच असते.

" स्वजन' म्हणूनी निमुटपणे ते सहन करावे मनी
परकीयांचे पाय पुसावे पोटासाठी जनी ।।"

(– अजून आहे फुटावयाचे सख्या पुढे तांबडे)

स्वातंत्र्याला ग्रहण लागू नये म्हणून आपल्या पूर्वजांनी कसे प्रयत्न केले, कसे दिव्य केले त्याचे स्मरण राष्ट्रीय जाणीव असणाऱ्या कवीला झाल्याशिवाय राहत नाही. तो सांगू लागतो,

" अशी दिव्ये करायाला वराया मृत्यु वीरांचा
पुन्हा हा शूर सह्याद्री कधी लोकी उठायाचा ?"

स्वातंत्र्यासाठी आत्मयज्ञ करणाऱ्या देशभक्तांचे दर्शन कवीला आधुनिक काळातही घडते. मातृभूमीच्या पायातील शृंखला तोडण्यासाठी स्वतःच्या पायात शृंखलांची भूषणे मिरविणाऱ्या देशभक्तांना बंदिशाळेत वर्षोगणती कुजत पडण्याचे भयंकर दिव्य करावे लागते. पण आपल्या उदात्त ध्येयाने, पवित्र त्यागाने त्या बंदिशाळेचे ते पावन तीर्थात रूपांतर करतात. कवी म्हणतो,

..." ही ध्येय शून्य सृष्टी, द्यायास दिव्य दृष्टी
गीता धनंजयाला ती धन्य बंदिशाला
..' गीता रहस्य ' ' बाला '
' कमला ' ' विनायकाला '
दे स्फूर्ति गावयाला–ती धन्य बंदिशाला ।।" (– ती धन्य बंदिशाला)

अशा प्रकारे स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची खंत कवीने अनेक कवितांतून व्यक्त केलेली आहे.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान– राष्ट्रकवी विनायक, अनंततनय, काव्यविहारी, अज्ञातवासी यांच्याप्रमाणेच वा. भा. पाठक यांनाही परंपरेचा आणि त्यातही मराठ्यांच्या परंपरेचा जाज्वल्य अभिमान असल्याचे दिसून येते. 'स्वप्नात काय पाहिले', 'पूर्व-स्मृती', 'सदरेतील पैजेचे विडे' या कविता परंपरेच्या अभिमानानेच निर्माण झालेल्या आहेत. 'शिवराय आणि बालवीर' हे चिमुकल्या सावळघाच्या तेजस्वीपणाचे स्वभावचित्र रेखाटणारे गाजलेले नाट्यगीत प्रामुख्याने पूर्वजांच्या पराक्रमाच्या अभिमानातूनच निर्माण झालेले आहे. त्या बाल-वीराच्या मुखातून दटावणीच्या सुरात बाहेर पडलेले,

" खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधडघा !
उडविन राई राई एवढघा ।।"

असे झणझणीत इशाऱ्याचे शब्द, त्यातील जरब, तडफ आणि आवेश तर, अत्रे म्हणतात त्याप्रमाणे तरुणालाही लाजविणारा आहे. महाराष्ट्राची आणि महाराष्ट्राच्या शूर वीरांची यशोगीते गाण्यात

कवीला अतिशय अभिमान वाटतो. 'स्वप्नात काय पाहिले !' या कवितेत कवीने महाराष्ट्राची महानता परोपरीने व्यक्त केलेली आहे. भारतभूमीच्या वैभवाने आणि यशाने सारे जग दिपून गेले आणि या भारतभूमीला विकत घेऊ या ईर्षेने पूर्वेचे आणि पश्चिमेचेही देश आपल्या सर्व सामर्थ्यानिशी भारतात आले. त्यांनी एक एक प्रांत विकत घेतला. पुढे ते महाराष्ट्रभूकडे वळले आणि आश्चर्याने मुग्ध झाले. कवी वर्णन करतो,

" मग चढाओढ लागली, किंमत त्याची वाढली
पाची खंडावरती त्याची तुलना तो चालली ॥" (– स्वप्नात काय पाहिले !)

मराठ्यांच्या राजवटीतील नाट्यपूर्ण जिवंत चित्रे– कवी माधव, कवी अज्ञातवासी यांच्याप्रमाणे किंवा कवी दुर्गाप्रसाद तिवारी यांच्याप्रमाणे अगदी मोजक्याच पण अविस्मरणीय अशा प्रसंगांची नाट्यपूर्ण जिवंत चित्रे रेखाटण्यात पाठकांची प्रतिभा यशस्वी ठरलेली आहे. 'शिवराज आणि बालवीर' यातील नाट्य अखिल महाराष्ट्राला परिचित आहे. 'सदरेतील पैजेचे विडे' अशीच नाट्यपूर्ण कविता आहे. औरंगजेबाच्या कैदेतून छत्रपती शिवाजी महाराज सुखरूप निसटून गेले ही वार्ता बा दशहाला कळताच त्याने दरबारात, त्यांना मार्गात पकडण्यासाठी सरदारांच्या पुढे पैजेचे विडे ठेवले. एका मराठा सरदाराने तो पैजेचा विडा उचलण्याचा प्रयत्न करताच शिवाजी महाराजांबद्दल अभिमान बाळगणारा एक तरुण सरदार त्या मराठा सरदारावर भर दरबारात चालून गेला. अर्थात त्या तेजस्वी तरुणाची लगेच दरबारातच आहुती पडली पण त्याचे 'सदरेत विडे पैजेचे उचलणार आपण कोण ?' हे उद्‌गार मात्र अजरामर ठरले. मुळात ही काल्पनिक कथा आहे पण तिचे नाट्यपूर्ण चित्र रेखाटण्यात कवी अतिशय यशस्वी झाला आहे.

वीर विभूतिपूजन– कवी माधव, काव्यविहारी आणि अज्ञातवासी यांच्या पावलावर पाऊल ठेवून पाठकांनीही वीर विभूतिपूजन केलेले आहे. लो. टिळकांच्या राष्ट्रवादाने प्रभावित झालेला आणि पुण्यासारख्या एके काळच्या छत्रपती शिवाजी महाराज आणि पेशव्यांच्या पराक्रमाने आणि राजधानीने गाजलेल्या नगरात निवास करणाऱ्या या कवीने वीरचरिते गायिली असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. 'शिव प्रभूचे गान', 'संभाजी', 'पूर्वस्मृती', 'शिवराज आणि बालवीर', या कविता वीर विभूतिपूजनाची उदाहरणे म्हणून सांगण्यासारख्या आहेत. बोह्याच्या चालीवर 'शिवप्रभूचे गान' गाताना कवी म्हणतो,

" महाराष्ट्र नामा साजे शिव प्रभूची जोड
दिवसाला नाही जैसी सूर्याविचून तोड ॥" (– शिवप्रभूचे गान !)

छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरच त्यांचे सोबती ताम्हाजी बाजीही येतात तसे त्यांच्यानंतरचे त्यांच्याच ध्येयाने प्रेरित झालेले अनेक मराठेवीर कवीला पूजनीय वाटतात.

" स्वधर्माचा तिन्ही लोकी पुन्हा राखावया मान
पुढे येईल संभाजी करावया मान कुर्बान ॥"

उत्तरेत आणि दक्षिणेतही मराठ्यांचा दरारा निर्माण करणारे थोरले बाजीराव, चिमाजी आप्पा, नानासाहेब, रघुनाथरावदादा, भाऊसाहेब, विश्वासराव या सर्वांची स्मृती कवीला होते. मराठ्यांच्या राज्याला ग्रहण लागण्याची वेळ आली त्यावेळी मराठी राज्य वाचविणारे थोरले माधवराव, बापू गोखले यांचेही कवीने भक्तिभावाने पूजन केलेले आहे.

" स्वराष्ट्राची अकाली जी कला या लागली वेस
धडाडी माधवाची तो तिला तारेल सावेश
सजे स्वातंत्र्य भानू जो बुडाया पश्चिमाब्धीत
धजे बापू स्वदेहाचे कराया दान यज्ञात ॥" (पूर्वस्मृती)

वर्तमानकालाचे प्रतिबिंब– ' आशा–गीता'त राष्ट्रप्रेम आहे, स्वातंत्र्याची उत्कट लालसा आहे, पारतंत्र्याची खंत आहे. पूर्वजांचे स्मरण आहे, वीर विभूतींचे चरित्रगायन आहे तसेच वर्तमानकालाचे यथार्थ प्रतिबिंब पडलेले आहे. ध्येयनिष्ठेने प्रेरित झालेला कवी राष्ट्रीय प्रश्नांपासून अलिप्त राहूच शकत नाही. राष्ट्रातील सामाजिक, आर्थिक प्रश्न त्यांच्या दृष्टिपथातून सुटूच शकत नाहीत. वा. भा. पाठकांची कविता मुळातच चिंतनातून निर्माण झालेली, सभोवतालच्या सामाजिक प्रश्नांना प्रतिसाद देणारी कविता आहे. ' धनवंतास ', ' शांतिपाठ आणि आक्षेप ', ' निर्वाणीचा सवाल ' या कवितांतून आर्थिक विषमता आणि उदारमतवादी तत्त्वज्ञान यांची अभिव्यक्ती कवीने केलेली आहे. ' धनवंतास ' या कवितेतून नोकरीतून काढून टाकल्याने निराधार, निर्वासित झालेल्या एका दरिद्री माणसाचे चित्र रेखाटले आहे. ' निर्वाणीचा सवाल ' या कवितेतही परमेश्वराकडेच दरिद्री माणसाने तक्रार केलेली आहे. तो म्हणतो; " हे परमेश्वरा ! तू आपले नंदनवन अधिकाधिक शोभिवंत आणि वैभवसंपन्न कर पण त्यासाठी आमच्या गरिबांच्या झोपड्या जाळण्याची आवश्यकता काय ?"

" निर्वाणीचा सवाल देवा मोक्ष न दे मज कधी
परंतु का शिर असे तुडविसी तुझ्या ठेविता पदीं ?" (– निर्वाणीचा सवाल)

तांबे, माधव ज्यूलियन, अनंततनय यांच्याप्रमाणे गांधीजींचा गुणगौरव करणारी व विभूतिपूजन करणारी गीते वा. भा. पाठकांनी लिहिल्याचे आढळत नाही. नाही म्हणायला तात्त्विक विचारांकडे कवीचे अंत:करण सतत ओढ घेताना दिसते. ' ओढणी ' या नावाने केलेली अभंगांची रचना हा त्यांच्या सात्त्विक आणि भाविक वृत्तीचा ढळढळीत पुरावा आहे.

राष्ट्रीय आशावाद प्रकट करणारी गीते– पारतंत्र्याची प्रतिकूल परिस्थिती, राष्ट्रीय लढ्यात पुढाऱ्यांना आलेले अपयश, त्यांच्या राजकीय मतातील विसंगती आणि त्यातून निर्माण होणारी मनाची अस्वस्थता असतानाही पाठकांनी राष्ट्रीय आशावादाची गीते गायिली आहेत. गीताप्रणीत कर्ममार्गावर त्यांचा विश्वास आहे. महाराष्ट्रधर्माचे आचरण करणाऱ्या मराठ्यांच्या परंपरेवर त्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच त्यांना ' हे दीप लागले चोहीकडे ! ' असा आशादायक साक्षात्कार होतो. ' अजून फुटावयाचे सख्या तांबडे ! ' याची जाणीव त्यांना आहे. पण तांबडे फुटल्याशिवाय राहायचे नाही, स्वातंत्र्याचा सूर्योदय पूर्वेच्या क्षितिजावर होणारच यासंबंधी त्यांच्या मनात तीळमात्र संशय नाही. ते मर्द मराठ्याला आवर्जून सांगतात,

" अंधार कशाचा बोल पडे ?
हे दीप लागले चोहिकडे ॥"

सूर्य नियमित प्रकाशत असतो, पराक्रमी माणसाला कालांतराने का होईना पण यश मिळत असते. निराशा, अंधार त्याच्यासाठी नसतो हाच आशावादाचा आशय या गीतात आहे.

" निर्भयता निज चित्तात धरी । जा कर या दिव्यातून फेरी ॥ ध्रु. ॥"

दुसऱ्या एका कवितेत कवी म्हणतो,

" थोर वावटळ उठली भूवर । स्थिरचर पाहे उडू नभावर !
त्यात निर्भये तू स्वारी कर । बघ नंदनवन ते कसे तरी ।
जा कर या दिव्यातुनी फेरी ॥" (– निर्भय हो !)

समालोचन :– वा. भा. पाठकांच्या 'आशा गीता'तील राष्ट्रीय आशावादाचे स्वरूप आपण जवळून न्याहाळले आहे. 'आशागीताला' प्रस्तावना लिहिली आहे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि टीकाकार आचार्य अत्रे यांनी. ते म्हणतात, " वर्तमानासंबंधी समाधान, भविष्यासंबंधी आशा हे जसे पाठकांच्या काव्याचे उज्ज्वल गुण आहेत तसेच भूतकालासंबंधी विशेषतः महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासावद्दल जळजळीत अभिमान हेही त्यांच्या काव्याचे एक चित्ताकर्षक वैशिष्टय आहे."[१७]

डॉ. अ. ना. देशपांडे श्री. पाठकांना, 'पृथगात्म प्रतिभेचे व चिंतनशील प्रकृतीचे एक सत्कवी' समजतात. मात्र अनेक मनोज्ञगुणांचे आल्हादकारी दर्शन घडविण्याचे सामर्थ्य असूनही पाठकांची कविता लोकप्रिय का होऊ शकली नाही यासंबंधी खंत व्यक्त करतात.[१८] आचार्य अत्र्यांनी त्यांच्या सर्वच प्रमुख वैशिष्टयांची नोंद केलेली असून महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाचा जळजळीत अभिमान असल्याचेही प्रामुख्याने नमूद केलेले आहे. हा अभिमान प्रामुख्याने अस्मितादर्श राष्ट्रवादाच्या जाणिवेतून आल्यामुळेच त्यांची सर्व राष्ट्रीय कविता ओजस्वी व प्रसाद गुणांनी युक्त अशी झालेली आहे. ती रसिकसापेक्ष आहे आणि आशावाद हा त्यांच्या काव्याचा स्थायीभाव आहे. मराठीतील राष्ट्रीय कवितेत त्यांच्या कविता अल्प असूनही त्यांना जे महत्त्वाचे स्थान आहे ते या वैशिष्टयामुळेच !

स्वातंत्र्यसंग्रामात स्वत:ला झोकून देणारे राष्ट्र शाहीर कुंजविहारी
(जन्म १८९६–मृत्यू १९७९)

जीवनपरिचय– राष्ट्र शाहीर कुंजविहारींचे पूर्ण नाव हरिहर गुरुनाथ सलगरकर कुलकर्णी असे होते. अक्कलकोट तालुक्यात सलगर हे कुळकर्णी यांचे वतनाचे गाव आहे. त्यांचे वडील पोलीस खात्यात नोकरीला असून जुन्या निजाम स्टेटमध्ये त्यांची नोकरी होती. ही बदलीची नोकरी असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील अंबलगे या गावी इ. स. १८९६ मध्ये कुंजविहारींचा जन्म झाला. त्यांच्या दुर्दैवाने अवघ्या वयाच्या बाराव्या वर्षीच काळाने त्यांचे पितृछत्र हिरावून घेतले. त्यामुळे पुन्हा सर्व कुटुंबाला सलगर या गावी यावे लागले. कुंजविहारींचे शिक्षण 'अक्कलकोट' येथे झाले. घरच्या परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागले. १९१० मध्ये म्हणजे वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी सोलापूरच्या गिरणीत अवघ्या दहा रुपयांवर नोकरी धरावी लागली.

नाशिकचे प्रख्यात स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद यांच्या काव्यापासून कुंजविहारींनी केवळ काव्यनिर्मितीचीच नव्हे तर राष्ट्रभक्तीचीही प्रेरणा घेतली. त्यांच्या लेखनाचा आरंभ प्रथम गद्यलेखनाने झाला. हा काळ सामान्यपणे १९१२ ते १९२० चा असावा. या काळात महाराष्ट्रात 'कुंजविहारी' या नाटकाचे प्रयोग होत असत. सोलापूरला हे नाटक कुंजविहारींनी पाहिले आणि तेच टोपण नाव धारण करून ते कविता करू लागले. बालवयापासूनच कुंजविहारी लोकमान्यांच्या राष्ट्रवादाने प्रभावित झालेले होते. कारण त्यांचा पिंड केवळ कवीचा नव्हता तर क्रांतिकारक देशभक्तांचा होता. सोलापूरचे प्रख्यात देशभक्त डॉ. अंत्रोळीकर, हुतात्मा मल्लाप्पा धनशेट्टी व 'कर्मयोगीकार' राजवाडे हे त्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील सहकारी होते. त्यांच्या समवेतच देशसेवेचे असिधाराव्रत कुंजविहारींनी पत्करले.

१९२० सालीच लिहिलेल्या त्यांच्या कवितेत ध्येयवादाचा स्पष्ट उल्लेख आहे. "ध्येय एक• निश्चित झाले। मी सेवक या राष्ट्राचा ॥" या प्रखर ध्येयवादामुळेच ते प्रत्यक्ष स्वातंत्र्यसंग्रामात वारंवार उतरले. अनेकदा त्यांना कारावास भोगावा लागला आणि दंडही भरावा लागला. पुढे उदर-निर्वाहाचे साधन त्यांच्याजवळ उरले नाही. मात्र आपल्या राष्ट्रभक्तीच्या ध्येयापासून कोणतेही प्रलोभन त्यांना परावृत्त करू शकले नाही. १९२६ मध्ये कुंजविहारी यांचा 'गीत गुंजारव' या नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. १० मेळघांची पदे आणि ४२ कविता अशी एकूण ५२ गीते या संग्रहात असली तरी त्या काव्यातील राष्ट्रीयत्वाच्या प्रक्षोभक विचारांमुळे राष्ट्रभक्त जनतेने त्याचे स्वागत केले.

कुंजविहारींचे मराठी भाषेवर जसे प्रभुत्व होते तसेच उर्दूमध्येही त्यांनी काव्यनिर्मिती केलेली असून १९२८ साली 'अर्जी' या नावाने ती प्रकाशित झालेली असून पंडित नेहरू आणि सरोजिनी नायडू यासारख्या राष्ट्रभक्त नेत्यांना नि रसिकांना ती आवडली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. कुंजविहारींच्या निवडक कवितांचा संग्रह १९७२ मध्ये शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केला. या कवितांचे संपादन श्री. ज. शा. देशपांडे यांनी केलेले आहे.

राष्ट्रप्रेम आणि पारतंत्र्याची खंत– राष्ट्रप्रेम हा कुंजविहारींच्या कवितेचा स्थायीभाव. महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंदांप्रमाणेच त्यांनी राष्ट्रभक्तिपर गीते लिहिलेली आहेत. आपल्या 'नमो मायभूमी' या कवितेत ते म्हणतात,

"आम्हा देव तूं। धर्म तू मायभूमी।
आम्हा स्फूर्ति तू। किर्ति तू मायभूमी ॥" (– नमो मायभूमी)

पारतंत्र्याची खंत कुंजविहारींच्या अंतरंगाला सदैव पोखरीत होती. स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष भाग घेऊ लागल्यानंतर 'भारतास', 'गोंधळ', 'नोकरशाहीची आरती' या राष्ट्रीय कवितांची त्यांनी निर्मिती केली. पारतंत्र्याची चीड आणि स्वातंत्र्याची उत्कट लालसा व्यक्त करताना ते म्हणतात,

"स्वातंत्र्य जयांचे गेले। ते जिवंत असुनी मेले ॥" (– भारतास)

स्वातंत्र्याचा हा मार्ग कंटकाकीर्ण आहे याची कुंजविहारींना जाणीव होती म्हणूनच 'सवाल' या कवितेत ते एक ऐतिहासिक सत्य कथन करतात,

"स्वातंत्र्याची नौका जाते रक्त नदीतूनि पैलतिरी।
सर्व जगाच्या इतिहासाची एकवाक्यता असे खरी ॥" (सवाल)

कुंजविहारींच्या या पंक्ती वाचल्या म्हणजे स्वातंत्र्यसेनानी देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या "तुम मुझे खून दो। मैं तुम्हे आझादी दूंगा।" या सुप्रसिद्ध वचनाची स्मृती होते. देशभक्तांच्या अंतःकरणाची केवळ भावनाच नव्हे तर भाषा देखील किती सारखी असते याची प्रचीती येते.

प्रासंगिक राष्ट्रीय कविता आणि वर्तमानाचे प्रतिबिंब– कुंजविहारींनी स्वातंत्र्यलढ्यातील अनेक प्रसंगांवर कविता लिहिल्या आहेत. काही टीकाकारांच्या मते त्या प्रासंगिक म्हणून त्यांना फारशी किमत नाही. परंतु महाराष्ट्रातील तत्कालीन लोकांना कुंजविहारी स्वातंत्र्यशाहीर म्हणून जे परिचित झाले ते त्यांनी लिहिलेल्या मुळशीच्या सत्याग्रहाच्या प्रसंगावरील 'मुळशीचा पाळणा' आणि 'भेटेन नऊ महिन्यांनी' या राष्ट्रभक्तिपर कवितांनी, मुळशीच्या लढ्याचे सूत्रधार होते

क्रांतिवीर सेनापती बापट. त्यांच्या कार्याचा आणि देशभक्तीचा गौरव करण्यासाठी कवीने १९२१ साली ही सुप्रसिद्ध कविता लिहिली.

१९२१ मध्येच महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या चळवळीला अचानक हिंसक वळण लागले आणि गोरखपूरजवळील चौरी चौरा हत्याकांड घडले. त्या हत्याकांडाला जबाबदार असणाऱ्या सत्याग्रहींवर ब्रिटीश सरकारने खटले भरले व राजद्रोही अशा १९ देशभक्तांना फासावर लटकविले. या प्रकाराने सारा भारत हादरून गेला. या खटल्यातील फासावर जाणाऱ्या सत्याग्रहीला कुणीतरी प्रश्न विचारला, " अब कब मिलोगे ?" त्यावर " नौ महिने के बाद ।" असे त्याने मार्मिक उत्तर दिले. या प्रसंगावरच १९२३ मध्ये कुंजविहारींनी आपली सुप्रसिद्ध " भेटेन नऊ महिन्यांनी " ही करुण रसपूर्ण परंतु आशावादी कविता लिहिली.

" मनी धीर धरी शोक आवरी जननी ।
भेटेन नऊ महिन्यांनी "

अशा पंक्तींनी या कवितेची सुरुवात झालेली आहे.

" लाडका बाळ एकुलता ।
फाशीची शिक्षा होता । कवटाळुनी त्याला माता ।
अति आक्रोशे वदती केविलवाणी ।
भेटेन नऊ महिन्यांनी " (– भेटेन नऊ महिन्यांनी)

फाशीवर जाणारा तो तरुण आईला सांगतो, " आई ! तुझे ऋण फेडल्याशिवाय आता जात असलो तरी नऊ महिन्यांनी येऊन मी तुझ्या उदरी पुन्हा जन्म घेऊन तुझ्या ऋणातून मुक्त होईन !"

दुसऱ्या एका कवितेत कवी म्हणतो, ' तयाला तुरुंग भिवविल किती ?' ' तरुण भारतास ' या त्यांच्या गाजलेल्या कवितेत तो देशभक्त तरुण म्हणतो, ' देशासाठी मरु दहादा !' सत्याग्रहाची चळवळ असो, कायदेभंगाची चळवळ असो किंवा १९४२ चा ' चलेजाव 'चा स्वातंत्र्य लढा असो कुंजविहारी अग्रेसर राहिले आहेत आणि म्हणूनच राष्ट्रीय जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या सर्वच राष्ट्रीय कवितांमधून पडलेले आहे. राष्ट्रीय लढ्यात प्रत्यक्ष भाग घेऊन त्या अनुभूतीने कविता लिहिणाऱ्या बोटावर मोजण्यासारख्या कवींत कुंजविहारींचे स्थान आहे.

वीर विभूतिपूजन– कुंजविहारींना वीर विभूतींसंबंधी पूज्यभाव होता. या वीरांपासून प्रेरणा घेऊनच ते स्वतः स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते. छत्रपती शिवाजी महाराज, तानाजी, बाजी, ही तर त्यांची दैवते. वर नमूद केलेल्या कवितांप्रमाणेच त्यांच्या वीर विभूतिपूजनाच्या कविताही लोकप्रिय झालेल्या आहेत. ' नरवीर तानाजी ' वरील शाहिरी कविता ' मराठा गडी यशाचा धनी ' या शीर्षकाने लिहिली. ही कविता,

" शिवरायाचा सिंह सिंहगडी पडला समरांगणी
मराठा गडी यशाचा धनी "

या ध्रुवपदाने या कवितेची सुरुवात झालेली आहे. मराठे वीरांबद्दलचा आणि मातृभूमी महाराष्ट्राबद्दलचा भक्तिभाव व्यक्त करताना कवी म्हणतो,

" सद्भाव महाराष्ट्राचा हे औषध अमरत्वाचे
मर्दानी श्रद्धा बीज असे खडकावर उगवायाचे
कुंजविहारी वंदि तयाला वाक्सुमने वाहुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥"

मध्ययुगीन पराक्रमी महापुरुषांप्रमाणेच अर्वाचीन काळातील क्रांतिकारक देशभक्तांचेही पूजन कुंजविहारींनी केलेले आहे. ' मुळशीच्या पाळण्यात ' सेनापती बापट आहेत. 'टाक पुढं पाऊल' ही १९४२ च्या चले जाव लढ्याचे झुंजार सेनानी महात्मा गांधी यांच्या जीवनावर आहे. 'अर्जी'मधील कवितांतूनही वीरविभूतिपूजन आलेले आहे. ' वन्दे मातरम् ' या सुप्रसिद्ध कवितेतूनही स्वातंत्र्यवीराग्रणींना वन्दन केलेले आहे. या कवितेतून त्यांचा कडवा राष्ट्रीय बाणाच प्रत्ययाला येतो. ते अंतःकरणातील राष्ट्रीय भावना प्रकट करताना म्हणतात,

" जेथे रानफुला समान फुलती स्वातंत्र्य वीराग्रणी
जेथे प्राण तृणासमान गणिती सद्धर्म संरक्षणी।
सत्याचा अभिमान बागवि सदा पाषाणही जेथला
माते मी लवतून मान, मुजरा प्रेमे सदा वाहिला " (– वन्देमातरम्)

स्वराज्यसुखाचा सोहळा पाहण्याचे भाग्य– सुदैवाने कुंजविहारींना त्र्यांशी वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभल्याने त्यांना स्वराज्यसुखाचा सोहळा पाहण्याचे भाग्य लाभले. ज्या स्वातंत्र्याकरिता आपण त्याग केला ते स्वातंत्र्य ' याच देही याच डोळा ' बघण्याचे भाग्य लाभले म्हणून त्यांनी आपल्या अंतःकरणातील आनंदाच्या भावना प्रकट करण्यासाठी ' स्वराज्य सोहळा ', ' स्वराज्य सुख ' आणि ' स्वराज्य नारायण ' अशा शीर्षकांच्या कविता १९४७ मध्ये लिहिल्या. १९५० मध्ये गणराज्याची स्थापना झाल्यानंतर कुंजविहारींनी ' सुराज्य झाल्याविना ' ही कविता लिहिली. त्यांनी राज्यकर्त्यांना बजावले,

" स्वराज्य आले म्हणुनि भारता गर्व वाहसी वृथा
सुराज्य झाल्याविना व्रताची कधी न हो सांगता ॥"

स्वातंत्र्यदिनावर मराठीत रचल्या गेलेल्या मराठी कवितांमध्ये कुंजविहारी यांची 'स्वराज्य नारायण' ही कविता सर्वोत्कृष्ट ठरेल असे मत ' आहुती ' चे संपादक ज. शा. देशपांडे यांनी मांडलेले आहे.[१९] १९५७ मध्येही कुंजविहारी यांनी ' बंडखोर क्रांती ' आणि ' प्रतापगडवासिनी ' या दोन राष्ट्रीय कवितांची निर्मिती केलेली आहे.

काव्यस्वरूपासंबंधी कवीची धारणा– कुंजविहारींच्या कवितेवर स्वातंत्र्यकवी गोविंदांचे, तसेच महाकवी सावरकरांचे संस्कार दाट झाल्याचा प्रत्यय येतो. सावरकरांपासून त्यांनी शाहिरी पद्धतीच्या रचनेचा स्वीकार केला असे म्हणता येते. कारण ' नरवीर तानाजी ' वरील त्यांचे काव्य सावरकरांच्या 'सिंहगडाच्या' पोवाड्यासारखेच आहे. कुंजविहारींची बरीचशी कविता शाहिरी धाटणीची वाटते. स्वतः कुंजविहारीही ही गोष्ट मान्य करतात असे त्यांच्या काव्यांतर्गत पुराव्यावरून म्हणता येते. साहित्यसम्राट न. चि. केळकरांनी कवितेचे शाहिरी कवितेशी फार साम्य असल्याचा उल्लेख केलेला आहे.

टीकाकारांचे अभिप्राय आणि समालोचन– कुंजविहारींच्या व्यापक राष्ट्रवादाच्या भूमिकेमुळे आधुनिक कवितेचे एक नवोदित टीकाकार प्रा. नि. शं. ठकार म्हणतात, " राष्ट्रभक्तीकडून कवीची

वृत्ती आत्मशक्तीकडे, अध्यात्माकडे वळली आहे. ... ... कुंजविहारींचे अध्यात्मही समाजवादी व पुरोगामी आहे." ते पुढे म्हणतात, "समकालीन राष्ट्रीय आंदोलनाचे पडसाद ज्या एका मराठी शाहिराच्या काव्यात उमटलेले आहेत ते म्हणजे कुंजविहारी होत." [७०]

'आहुती' चे संपादक श्री. ज. शा. देशपांडे समालोचन करताना म्हणतात, "कुंजविहारी यांचीही राष्ट्रीय कविता आहे. ती सत्प्रवृत्तीची सात्त्विक रसाची प्रसादपूर्ण मंदाकिनी आहे. कुंजविहारी हे सामान्यजनांचे खरेखुरे कवी होत." [७१] कवी कुंजविहारी यांच्या निधनानंतर त्यांच्यावरील मृत्युलेखात सोलापूरचे सुप्रसिद्ध कवी आणि लेखक डॉ. वि. म. कुळकर्णी यांनी म्हटले आहे, "कविवर्य कुंजविहारी यांची जीवनयात्रा, सुखदुःखाच्या संमिश्र धाग्यांनी गुंफलेली होती. तरी तिच्यावर उज्ज्वल स्वातंत्र्यभक्तीची व राष्ट्रप्रेमाची जरतार सदैव शोभत होती. ते एक धगधगते अग्निकुंड होते." [७२]

राष्ट्रीय भक्तीने भारलेल्या मनाने केलेली रसनिर्मिती असेच त्यांच्या काव्याचे स्वरूप आहे. महाकवी सावरकर, स्वातंत्र्यकवी गोविंद, कवी माधव, अज्ञातवासी या कवींच्या काव्यांतील ओजोगुण त्यांच्या काव्यात नसेलही पण त्यांचे जीवन तर ओजोगुणाने संपन्न होते. म्हणून गिरणी कामगारांसारखे दैन्य उपभोगूनही निराश न होता त्यांनी राष्ट्रीय आशावादाची गाणी गायिली. आपली वैयक्तिक दुःखे, आर्थिक दैन्य यांना त्यांनी हृदयात कोंडून ठेवून स्वदेशाभिमानाची गाणी गायिली. म्हणूनच 'स्वातंत्र्य-संग्रामात स्वतःला झोकून देणारे राष्ट्र शाहीर' या शब्दांनीच त्यांचा गौरव केला पाहिजे.

विकसनशील राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते कवी ग. ह. पाटील
(जन्म १९०६)

कवी गणेश हरी पाटील बालगीते आणि जानपद गीते लिहिणारे म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. 'बालशारदा' आणि 'रानजाई' हे त्यांचे अनुक्रमे बालगीत आणि जानपदगीतसंग्रह आहेत. विविध विषयांवरील त्यांची स्फुट कविता 'लिंबोळ्या' या कवितासंग्रहात आलेली असून त्या संग्रहातच पाटलांची राष्ट्रीय कविताही आलेली आहे. कवी पाटील व्यवसायाने अध्यापक असल्याने आणि अगदी बालवयापासूनच राष्ट्रभक्तीचे संस्कार असल्याने त्यांची राष्ट्रीय कविता प्राधान्याने बोधवादी नि चिंतनशील स्वरूपाची आहे. ती बरीचशी अभंग छंदात रचली गेलेली आहे, हे आणखी तिचे एक वैशिष्ट्य सांगता येईल.

पाटलांच्या कवितेची आणखी काही वैशिष्ट्ये– अलीकडचा काळ हा मानवतावादी राष्ट्रवादाचा आहे. पाटलांच्या राष्ट्रवादाचे स्वरूप विकसनशील आहे. सर्वसामान्य राष्ट्रवादाकडून ते मानवतावादाकडे म्हणजेच व्यापक अशा राष्ट्रवादाकडे वळलेले आहेत. इतर कवींप्रमाणेच त्यांच्या राष्ट्रीय कवितांतही प्रखर ध्येयवाद आलेला आहे. 'एकच' या लाक्षणिक अर्थाने लिहिलेल्या कवितेत पाटील सांगतात, "ही एक चेतनेची ठिणगी। लाविल आग जागोजागी ॥" लहानशा 'पणती' चा प्रभाव सांगण्यासाठीच ही कविता आहे. ध्येयवादाप्रमाणेच, राष्ट्रप्रेमही, 'इंफाल' सारख्या कवितांतून व्यक्त झालेले आहे. नेताजी सुभाषचन्द्र बोस यांच्या आझाद सेनेच्या पार्श्वभूमीवर 'इंफाल'ही राष्ट्रप्रेम व्यक्त करणारी उत्कृष्ट कविता आहे. तो सैनिक म्हणतो,

"स्वातंत्र्य रवीला द्यायाला अर्घ्य हे। रक्ताला आहे बोलावित रक्त हे !
ही हाक कुणाची ? मातेची हाक ही
ऐकून संचरे मनी–चेतना नवी ॥"

आणखीही काही कवितांतून राष्ट्रप्रेम व्यक्त झालेले आहे. स्वातंत्र्याची लालसा आणि पारतंत्र्याची खंत पाटलांच्या 'स्वातंत्र्य म्हणजे ईश्वराचे दान', 'फार मोठी आम्हा लागलीसे भूक', 'आक्रोश किंकाळ्या ऐकल्या मी', 'आता हवे बंड करावया', 'कोटि कोटि आम्ही उभे अंधारात' अशा कितीतरी कवितांतून व्यक्त झालेली आहे. त्यागाशिवाय बलिदानाशिवाय स्वातंत्र्याची अपेक्षा करणे व्यर्थ आहे हे सांगताना कवी म्हणतात,

"कोणता तूं केला आजवरी त्याग । जीवनाचा याग मातेसाठी ?
काय ही पायीच्या तोडतील बेडया । कल्पना ही वेडया सोड खुळी
स्वातंत्र्य म्हणजे ईश्वराचे दान । याचकाची दीन भिक्षा नोहे ॥"

राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्राप्ती व्हावी यासाठी कवीने भगवद्गीताप्रणीत कर्ममार्गाचाच उपदेश केलेला आहे. तो म्हणतो,

"आचराया हवा तोच कर्मयोग । पारतंत्र्य रोग हरावया !"

पारंपरिक सामाजिक जुन्या मूल्यांची जपणूक आणि त्यांचा आदर हे पाटलांच्या राष्ट्रीय कवितेचे आणखी एक वैशिष्टय आहे. कवी म्हणतो,

"जुन्याचा धरुन हात तू नवीन । पाऊल जपुन टाक पुढे
... जाऊ द्या जुने ते मरणालागुनी । कृतघ्न ही वाणी बोलसी का ?
जुनेच देईल तुज तांब्या दोरी । घेऊन शिदोरी पुढे चाल ॥"

वीर विभूतिपूजन करण्यातही पाटलांच्या राष्ट्रीय कवितेने उत्साह दाखविला आहे. प्राचीन आणि अर्वाचीन अशा दोन्ही कालांतील विभूतींचे पूजन त्यांनी केलेले असले तरी प्राधान्य मात्र अर्वाचीन काळातील गांधीजींना दिलेले आहे. गांधीजींवर त्यांच्या नऊ कविता आहेत. 'महात्मा', 'वसुंधरेवर', 'खरा तू मानव', 'पाऊला पुरता नाही हा प्रकाश', 'भयाण काळोखी एककृश मूर्ती', 'युगायुगाचा तो जाहला महात्मा' या त्यांच्या कविता आशयपूर्ण आहेत. कवीने गांधीजींना दिलेली दधीची ऋषीची उपमा खरोखरीच सार्थ आहे.

"आपुल्या अस्थीचे निर्मुनिया वज्र । पारतंत्र्य वृक्ष संहारिला"

वर्तमानकालीन घटना, प्रसंगांचे चित्रण पाटलांच्या कवितेतून आढळते. उदा. 'जगातले सामर्थ्य', 'नांदू द्या तुमची साम्राज्ये सुखात' या कविता सांगता येतील. राष्ट्राचे विभाजन करणाऱ्या बॅ. जिनांवर लिहिलेली 'अरे कुलांगारा करंटया कारटया ?' ही त्यांची कविता प्रसिद्ध आहे. राष्ट्रीय कविता लिहिणारे कवी म्हणून पाटलांच्या कवितेकडे टीकाकारांनी पाहिले नसल्याने त्यांच्या कवितेवर अभिप्रायही उपलब्ध नाहीत. आपल्या अंतःकरणातील व्यापक अशा मानवतावादी राष्ट्रवादाची अभिव्यक्ती करण्यात पाटलांनी यश संपादन केलेले आहे. अभंगासारख्या गतिमान छंदात, प्रासादिक स्वरूपात पण उत्कटत्वाने राष्ट्रीय भावना व्यक्त करण्यात सेनापती बापटांनंतर पाटीलच पुढे आलेले आहेत.

पतिव्रतेच्या शीलरक्षकाची चरित्रकथा गाणारे कवी या. मु. पाठक

(जन्म–१९०५)

कवी या. मु. पाठकांनी 'पिंपळपान', 'फुले नी मुले' या कवितासंग्रहांतून आपली स्फुट कविता प्रकाशित केलेली आहे. त्यांनी विपुल कवितालेखन केलेले असून ते निरनिरनिराळ्या नियत-

कालिकांतून प्रसिद्धही झालेले आहे. परंत, आधुनिक मराठीतील एक नामवंत कवी म्हणून पाठकांचा जो नावलौकिक आहे, तो त्यांनी (१९२९) साली लिहिलेल्या 'शशिमोहन' या चिरनूतन अशा सामाजिक खंड काव्यामुळे. बंगालमधील सत्य घटनेवर पाठकांनी या प्रतिभासंपन्न खंडकाव्याची निर्मिती केलेली आहे. "सिल्हट जिल्ह्यातील एका खेडेगावात फैजअल्ली नावाचा दुराचारी श्रीमंत जमीनदार राहत होता. त्याने बलात्काराने अनेक स्त्रियांना भ्रष्ट केले होते. अखेर तो एका पवित्रा नामक षोडश वर्षीय स्त्रीवर तिचा पती घरी नसता, रात्री बलात्कार करण्याच्या प्रयत्नात असतो तेव्हा शेजारी राहणारा अठरा वर्षांचा शशिमोहन दे नामक युवक पवित्रेला मुक्त करण्यासाठी पुढे येतो व काठीने झोडपून त्याला ठार करतो. शशिमोहनवर खुनाचा आळ येतो पण कोर्टातील ज्यूरी त्याला एक मताने निर्दोष ठरवितात व न्यायाधीश त्याला निरपराध म्हणून सोडून देतात" असे थोडक्यात या खंड काव्याचे गतिमान कथानक आहे.

पाठकांच्या काव्यनिर्मितीमागील मुख्य प्रेरणा उघड उघड वीर विभूतिपूजनाची आहे. राधा-रमणांनी म्हटल्याप्रमाणे 'निज जन हितकारी तेवि राष्ट्रा विभूति।' 'शशिमोहन दे' यांचा पराक्रम असाच हितकारी आहे. पाठक सांगतात,

"आठवा पवित्रा पवित्र साध्वी खरी।
साठवा शशीची प्रतिमा हृदयांतरी।
पाठवा वासना फैजाला यमपुरी।
प्रलय बरा होऊ द्या, जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या पण
पतिव्रता पावित्र्य वेदवत ठेवा नित राखून॥"

अन्याय, अत्याचार, जुलूम, दुबळ्यांवरील बलात्कार यांच्या विरोधात खंबीरपणे प्रतिकार करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. हे कर्तव्यच 'शशिकुमार दे' ने बजावले आहे. या व्यापक अशा राष्ट्रीय भावनेचे चित्रण या खंडकाव्यात आहे. त्याबरोबरच विविध घटनाप्रसंगांची चित्रे रेखाटण्यात कवीने अतिशय कौशल्य दाखविले आहे. घटना प्रत्यक्ष अनुभवली नसतानाही केवळ कल्पनेच्या साहाय्याने, निरागस किशोरीसुलभ पवित्रेचा स्वच्छंद जलविहार, तिच्यावर पाळत ठेवणाऱ्या फैजलचे मस्तवाल चाळे, त्याचा हेतू लक्षात येताच पवित्रेची उडालेली धांदल आणि भीती, त्याने दिलेली बलात्काराची धमकी, फैजलचे कपटकारस्थान आणि शेवटी तिला एकटी घरात गाठून केलेला बलात्काराचा पाशवी प्रयत्न, अचानक झालेले दे बाबूंचे साहाय्य इत्यादी जिवंत चित्रे पाठकांच्या प्रतिभेने समर्थपणे रेखाटली आहेत.

बंगालची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी योग्य प्रकारे पाठकांना निर्माण करता आली नाही. त्यामुळे काव्याच्या प्रभावीपणात जरा उणेपणा आला असे मत डॉ. ह. कि. तोडमल यांनी मांडलेले आहे.[७३] काव्यसौंदर्याच्या दृष्टीने ते काही प्रमाणात खरे असले तरी कथानिवेदन व व्यक्ति-चित्रण अतिशय प्रभावी असे झालेले आहे. नायिका पवित्रेची करुणोदात्त कथा, तिच्या दुर्दैवाने तिला भोगावी लागलेली व्यथा आणि शेवटी तिची संकटमुक्ती हे या काव्यातील कथानकाचे टप्पे लक्षात घेऊन डॉ. अ. ना. देशपांडे यांनी 'शशिमोहन' या काव्याच्या शीर्षकासंबंधी आक्षेप घेतलेला आहे. एका अर्थाने तो बरोबर आहे. कारण संपूर्ण कथानक पवित्रेचेच आहे. परंतु काव्यहेतूचा संदर्भ लक्षात घेतला असता पाठकांनी दिलेल्या शीर्षकाचे समर्थन करता येते. शशिमोहन आपल्या मित्राला सांगतो;

" दुष्ट हनन मजकडून झाले अबलांच्या रक्षणी
नरधर्म पाळला भीति कुणाची मला ?
कां फुकाच भ्यावे वीराने मृत्युला ?"

हा आशयच कवीला या काव्याद्वारे जनतेपर्यंत पोचवावयाचा आहे. पातिव्रत्याच्या मूल्याचे रक्षण हे भारतीय समाजजीवनाच्या स्थिर अभंगतेचे एक गमक आहे. पाश्चिमात्य समाजात या मूल्याची फारशी बूज बाळगली जात नाही. पण आमचे जीवन अजूनही पातिव्रत्याच्या पवित्रतेने संपन्न आहे आणि म्हणूनच त्या मूल्याचे रक्षण करणारे खंडकाव्य राष्ट्रीय काव्यदृष्टीने प्रभावी ठरलेले आहे.

मराठवाड्यातील काही राष्ट्रीय कवींची ओळख

दासगणू उपाख्य नारायण दत्तात्रेय सहस्रबुद्धे (जन्म १८६७ मृत्यू १९६२)

देवभक्त आणि देशभक्त दासगणू महाराज– राष्ट्रीय कवितेच्या विशाल रत्नाकरात मराठवाड्यातील राष्ट्रीय कवितेची गोदावरी आणून सोडण्याचे कार्य ज्या कवींनी केले त्यात दासगणू महाराज हे पहिले आणि प्रमुख आहेत. वास्तविक आधुनिक महिपती, छोटे दासोपंत म्हणून गौरविले जाणारे, दासगणू महाराज हे प्रामुख्याने आधुनिक काव्यातील भक्तिपरंपरेचे एक प्रमुख प्रणेते संत कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. परंतु या सत्पुरुषाने अस्मितादर्श राष्ट्रवादाने प्रभावित होऊन राष्ट्रीय कवितांची निर्मिती केलेली आहे. त्यावरोबरच पौराणिक कथांवरील खंडकाव्ये, ऐतिहासिक व राष्ट्रीय पुरुषांवरील पोवाडे, स्फुट पदेही त्यांनी लिहिली आहेत. त्यांच्या ओव्यांची संख्या पाऊण लाख आणि पदांची संख्या सुमारे दहा हजार आहे.

दासगणूंची राष्ट्रभक्ती ' भक्तलीलामृत'; 'सवाई माधवरावांचा रंगोत्सव', 'टिळकांचा पोवाडा', 'मिठाचा पोवाडा', 'उसाचा पोवाडा' यासारख्या साहित्यातून व्यक्त झालेली आहे. शाहिरांनी केलेले पुण्याच्या वैभवाचे वर्णन वाचून ते पुणे बघायला गेले आणि पारतंत्र्यातील पुणे पाहून उद्‌गारले,

" ही अशी दशा का केलीस नारायणा ?...
फंदि, प्रभाकर, जोशी बुवांनी स्वराज्य रंगासी लुटिलें ।
दास गणूला परवशतेच्या बेरंगा बघणे आले ।।" ७४

भक्तलीलामृताच्या चवथ्या अध्यायात संत देवनाथ महाराजांनी सवाई माधवराव पेशव्यांच्या वाड्यात कीर्तन केल्याचा प्रसंग दासगणूंनी रंगविला आहे. त्या प्रसंगी कीर्तनातून राजनीतीचे व व राष्ट्रप्रेमाचे, राष्ट्ररक्षणाचे व राष्ट्रविकासाचे धडे दासगणूंनी दिलेले आहेत. दासगणूंच्या त्या ओव्या पुढीलप्रमाणे आहेत.

" स्वराज्य प्राण राष्ट्राचा । स्वराज्य हाच मोक्ष साचा ।
स्वराज्य पाया धर्माचा । त्यावीण अवघे वोखटे ।। ११० ।।
स्वराज्य सुखाची खाणी । स्वराज्य वैभव नभीचा वासरमणी ।
स्वराज्य हाची चिंतामणी । चिंतीले फळ देणारा ।।

स्वराज्य या कल्पनेतून स्वराष्ट्राचीच कल्पना दासगणूंना मांडावयाची आहे. राष्ट्रीय ऐक्याचे महत्त्व सांगताना ते म्हणतात;

" एकीचे राहो सरोवर । त्यास पाट फोडू नका ।
एकी स्वराज्याची जीवन कळा । एकी स्वधर्माचा पुतळा ।
एकी व्यापाराचा मळा । आहे धनत्तर बागाईत ॥"

राष्ट्रोद्धाराची दासगणूंची कल्पना आणि विशिष्ट कार्यकर्ते– लोकस्थितीत सुधारणा घडवून आणून राष्ट्रोद्धाराचे कार्य चार प्रकारच्या पुरुषांनी केले पाहिजे असे दासगणूंनी सांगितले असून ते त्यांच्या समाजहित दृष्टीचे आणि प्रतिभेचे द्योतक आहे. दासगणूंनी सांगितलेले चार पुरुष म्हणजे; (१) साधुसंत, (२) भौतिकशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते, (३) उज्ज्वल ध्येयदृष्टी असणारे ग्रंथकार; कवी, कलावंत आणि (४) स्वदेशासाठी प्राणाहुती देण्यास सिद्ध असणारे तलवार बहाद्दर वीर; साधूंनी धर्मश्रद्धा व एकी वाढवावी, भौतिकशास्त्रवेत्त्यांनी राष्ट्र बलवान करावे, तत्त्ववेत्त्यांनी तत्त्वज्ञान द्यावे, कवी, ग्रंथकारांनी सत्यासत्याची अभिव्यक्ती करावी आणि वीर म्हणजे तर स्वातंत्र्याचे शाहीर त्यांनी देशसेवेचा आदर्श निर्माण करावा या चार प्रकारच्या विभूतींची परमेश्वराने निर्मिती करावी अशी प्रार्थना दासगणूंनी केलेली आहे." ७५

दासगणू महाराजांनी धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला, त्यासाठी 'माणिक प्रभू', 'साईबाबा', 'नानावली', 'शेख महंमद' इत्यादींची आख्याने रचिली आहेत. अस्पृश्यतेची धार कमी करण्याचा आणि जातिभेदातील कर्मठपणा नाहीसा करण्याचा प्रयत्न केला. " महाराजांनी भरल्या पाणी । काय विटाळे स्वर्धुनी ॥" असे उद्‌गार काढले. आर्थिक शोषण, सावकारी पाश व अज्ञान ही राष्ट्राला लागलेली कीड आहे असे त्यांनी अनेक कवितांतून सांगितले आहे. गुलामगिरीचा वारंवार धिक्कार केलेला आहे. 'गुलामगिरी नरकाहुनि नरक खरी ।' किंवा 'ज्यांचे मनी न स्वदेश प्रीति । तो जंताहुन नीच अती । त्या मूढाचे निश्चिती तोंड कदापि पाहू नये !" म्हणूनच चिं. नी. जोशी यांनी त्यांना संतकवीप्रमाणेच राष्ट्रीय कवीचीही पदवी दिलेली आहे ती यथार्थ आहे. ७६ त्यांच्या राष्ट्रीय कवितेची अनेक उदाहरणे देता येण्यासारखी असली तरी विस्तारभयास्तव मोह आवरणे क्रमप्राप्त आहे.

सकलकलाकोविद यशवंतराव कोरेकल
(जन्म १८८५)

माहूरचे भक्त कवी विष्णुदास, नांदेडचे दासगणू महाराज यांच्यानंतर यशवंतराव कोरेकल यांचे नाव श्रेष्ठ कवी म्हणून मराठवाड्यात घेतले जाते. इंग्रजी, उर्दू, फारशी, मराठी इत्यादी विविध भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. उत्तम हार्मोनियम वादक, गायक म्हणूनही त्यांचा लौकिक होता. कोरेकलांनीही दासगणूंप्रमाणेच विपुल काव्यनिर्मिती केलेली असून त्यांची काही काव्यनिर्मिती राष्ट्रीय स्वरूपाची आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितांतून राष्ट्रभक्ती, स्वदेशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, पूर्ववैभवाचे स्मरण इत्यादी विशेष आढळतात. 'धन्य धन्य ती देशभक्ती', 'बा माझ्या भारता', 'विरोध', 'जागा हो जागा हो', 'तो हिंद माझा असे' यासारख्या कवितांतून त्यांची राष्ट्रभक्ती प्रकट झालेली आहे. धन्य धन्य देशभक्ती या कवितेत कवी सांगतो,

" देशापायी सुखहि त्यजिती लोक कार्यार्थ अंती
प्राणज्योति निज विझविली धन्य ती धन्य भक्ती ॥" ७७

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत. स्वदेशप्रेमाप्रमाणेच पारतंत्र्यावद्दल खंतही त्यांनी व्यक्त केलेली आहे. 'दीपावली', 'भाऊबीज', 'सणे लोपली' या कविता उदाहरणे म्हणून सांगता येतात, स्वातंत्र्याच्या आंदोलनात कुटुंबातील पुरुष मंडळीतील कुणी तरी तुरुंगात असल्याने दीपावली; भाऊबीज कशी करावी ? असा प्रश्न पडला आहे.

"गेले बंधु सत्याग्रही । आनंदोनी कारागृही ।।"

किंवा "बद्ध कारागारी भ्राता । भाऊबीज कैशी आता ।" [७८]

असे बहुजनांचे दुःख कवीने व्यक्त केलेले आहे.

'स्वातंत्र्य', 'मावळा महाराष्ट्राचा', 'ते पूत मायेचे', 'जागा हो जागा हो ।' यासारख्या कवितांतून परंपरापूजन, 'पूर्ववैभवाचे स्मरण व परंपराभिमान कवीने व्यक्त केलेला आहे. स्वदेशीचे व्रत लोकांनी अंगीकारावे म्हणून गांधीजींनी सांगितलेले चरख्याचे व खादीचे माहात्म्य 'खादी देवी' या कवितेत व्यक्त केलेले आहे. [७९] स्वतःच्या नोकरीच्या मर्यादा सांभाळून आपल्या थोडक्या का होईना पण राष्ट्रीय कविता निर्माण करून यशवंतराव कोरेकलांनी एक राष्ट्रीय कर्तव्य बजावले आहे. ज्या मार्गाने जाण्याचे अनेक कवींनी नाकारले त्या मार्गाने जाण्याचे धैर्य कोरेकलांनी निश्चितच दाखविले आहे. कलात्मकदृष्ट्या त्यांच्या कविता सामान्य आहेत.

विष्णू बाळकृष्ण जोशी (जन्म १८८९)– मराठवाड्यातील साहित्याचे इतिहासकार श्री. चिं. नी. जोशी यांनी काव्यालंकारभूषण या पदवीने गौरविलेले वि. बा. जोशी हे आणखी एक आध्यात्मिक आणि भक्तिभावनांची अभिव्यक्ती करणारे कवी. अध्यात्म, भक्तिभावना यांच्या जोडीला राष्ट्र-भक्तीही श्री. जोशी यांच्या ठिकाणी असल्याचे आढळते. टिळकांचे पक्षपाती असणारे जोशी गांधीजींचे आणि गांधीवादी तत्त्वज्ञानाचे कट्टर विरोधक वाटतात. परंपरेचा अभिमान, वीर विभूतिपूजन आणि राष्ट्रप्रेम हे त्यांच्या काव्याचे आणि पोवाड्यांचे विषय आहेत. प्राचीन पद्धतीची, संस्कृतप्रचुर अशी त्यांची काव्यरचना आहे. त्यांच्या 'द्विज सभासद', 'दांभिक पुढारी', 'सुधारणावादी पदवीधर' यांच्यावरील कविता तीव्र उपहासाने युक्त आहेत.

उदा. "हंसाकुमारि डॉक्टर मैना नर्सेस इंदु–मिस् सरला
कवयित्री–साळुंका एम्. ए. सौदामिनी शुका तरला" (– द्विज सभासद)

किंवा दांभिक पुढाऱ्यांचे चित्र बघा !

"जो तो कधी पुढारी मीच महात्मा खरेच मम बोल !
तोल न परि सांभाळी । धर्म रहस्यासि मानुनी फोल" (– दांभिक पुढारी)

श्री. जोशींनी 'लोकमान्य तिलक स्मृती' वर श्लोकवद्ध रचना केलेली आहे. 'मातृभूमिवंदन' ही त्यांची राष्ट्रभक्तीने परिपूर्ण कविता आहे. (१) 'श्रीदुर्गा तोफ', 'दौलताबाद', (२) 'राष्ट्राला भूषण झाले', (३) 'खादी हे भूषण ठरवा', (४) 'निजधर्म लयाला गेला आणि (५) 'एक काळ येईल ऐसा' हे पाच पोवाडे त्यांच्या राष्ट्रभावनेचे द्योतक आहेत. 'विरोधक बक महात्मा' ही त्यांची कविता गांधीजींचा उपहास करणारी आहे. त्या कवितेच्या केवळ दोनच ओळी नमूना म्हणून देतो,

"थोर महात्मा त्यागी समतावादी पुढे सरे बगळा
बोले उपवासी मी !! न कळत मासा गिळी जरी सगळा"

देशभक्तिपर पोवाडे हीच श्री. जोशी यांची कविता असून राष्ट्रभावनेची द्योतक आहे.

भारताचे दैन्य पाहून दुःखी होणारे राष्ट्रकवी दे. ल. महाजन
(जन्म १८९६ मृत्यू १९६७)

दासगणू महाराजांच्या नांदेडचे आणि त्यांचीच वाङ्मयीन परंपरा चालविणारे देवीदास लक्ष्मण महाजन हे एक राष्ट्रीय कवी आहेत. महाजनांच्या कवितेचे वळण पंडिती स्वरूपाचे असले तरी केशवसुती वळणाची त्यांना जाण असल्याचे दिसते.

इंग्रजी पाचव्या इयत्तेनंतर माध्यमिक शिक्षण संपवून महाजन बाहेर पडले. परंतु या काळातच, संस्कृत, मराठी, फारशी आणि इंग्रजी या भाषांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले होते. मराठी व संस्कृत ग्रंथ वाचनाची बालवयापासूनच आवड आणि संत दासगणूंचा सहवास यामुळे धार्मिक वृत्तीचे प्राबल्य वाढले आणि स्वाभाविकपणेच ते भक्तिमार्गाकडे वळले. त्यांनी अभंग, पदे, आर्या, ओव्या अशी रचना तर केलीच पण दासगणू महाराजांप्रमाणे कीर्तनाकरिता स्वतंत्र आख्यानेही रचली. एक श्रेष्ठ कवी, रससिद्ध कीर्तनकार आणि प्रभावी वक्ते म्हणून महाजन मराठवाड्यात ओळखले जाऊ लागले. 'मातृहृदय', 'मातृदास्य-विमोचन' ही काव्ये आणि 'महाजनांची कविता' (१९३१) आणि 'काळोखातील कविता' या दोन स्फुट कवितासंग्रहांतून त्यांची थोडीफार राष्ट्रीय कविता आलेली आहे.

दे. ल. महाजनांवर दासगणू महाराजांचे संस्कार होतेच पण त्याचबरोबर लो. टिळकांच्या राष्ट्रवादाचे विशेष संस्कार होते. त्यामुळेच भक्तिमार्गाकडे ओढा असूनही त्यांनी राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती केलेली आहे. राष्ट्रप्रेम हा महाजनांच्या राष्ट्रीय कवितेचा पहिला महत्त्वाचा विशेष आहे. 'भारत भू माय', 'जागृती', 'राष्ट्रप्रेम' यासारख्या कवितांतून त्यांची मातृभूमिभक्ती साकार झालेली आहे. " ऊठ ऊठ जागृत हो त्वरित हिंद माते !" असे कवीने आवाहन केलेले आहे. 'रूढीरूपी शवसम वसन' झुगारून देण्यासंबंधीही बोध केला आहे. तर "राष्ट्रभावना मरून गेली किती शतकांपासूनी । चाटिता काय वर्ण घेऊनी ?" असा सनातनी मंडळींना रोकडा सवाल केला आहे. 'विटंबना', 'आता कुठे', 'ऐसे जिणे कशाला', 'केवढे आश्चर्य हे !' यासारख्या कवितांतून पारतंत्र्यासंबंधीचे दुःख महाजनांनी उत्कटतेने व्यक्त केलेले आहे. काही ठिकाणी कवीने लाक्षणिकतेचाही आश्रय घेतलेला आहे. पारतंत्र्याने आम्ही स्वाभिमानशून्य, निःसत्त्व झालो हे सांगताना कवी म्हणतो,

" ना स्वाभिमान अंगी ऐसे जिणे कशाला ?
प्रेतापरी जळो हे प्राणाविणे कशाला ?
गेली स्वधर्म सत्ता, गेली समस्त मत्ता
आम्ही मनुष्य आहो हे सांगणे कशाला ?" (– ऐसे जिणे कशाला)

दुसऱ्या एका कवितेत कवी सांगतो,

" वेळ येता मायभूमी वायकांनी रक्षिली
वीर तेथे षंढ झाले केवढे आश्चर्य हे ?"

महाजनांच्या 'सिंहगड', 'आता कुठे ?' या कवितांतून वीर विभूतिपूजन आलेले आहे. 'मातृहृदय', 'बालहत्या' आणि 'बालविधवा' यांच्यासंबंधी महाजनांनी आपल्या भावना प्रकट केल्या आहेत. प्रो. लेल्यांनी म्हटल्याप्रमाणे, 'महाजनांची कविता ही 'महाजनांची कविता' आहे.' [८०] यासंबंधी वाद नाही. भारताचे दैन्य पाहून दुःखी होणारे आणि ते दुःख काव्याद्वारे प्रकट करणारे ते कवी आहेत.

एक महत्त्वाची गोष्ट अशी की महाजनांच्या राष्ट्रीय कवितेवर नैराश्याचे दाट सावट पडलेले आहे. महाजनांनाही त्या वेगुण्याची जाणीव आहे. ते म्हणतात,

" भरला पूर्ण निराशावाद जरी त्या मध्ये प्रसंगाने
होउनि रस परिपोषहि चाले अर्थौघ फार वेगाने "

महाजनांच्या मनात आधुनिक सुधारणावाद व सनातनी परंपरावाद असा संघर्ष असला पाहिजे असे मत त्यांचे रसिक टीकाकार चिं. नी. जोशी यांनी मांडलेले आहे. ते म्हणतात, " त्यांचा विचारही त्यास डाचतो पण एखाद्या दडपणाखाली गुदमरून गेलेल्या माणसाप्रमाणे त्यांचा उच्चार मात्र त्याजकडून प्रस्फुटतेने होत नाही."[८१] त्यांच्या निराशावादाचे हेही एक कारण आहे. मात्र त्यांच्या राष्ट्रीय भावना उत्कट आणि जिवंत आहेत. भाषाप्रभुत्व व कल्पकता या गुणांनी कविता संपन्न आहे.

डॉ. ना. गो. नांदापूरकरांची राष्ट्रीय कविता
(जन्म १९०१ मृत्यू १९५९)

डॉ. ना. गो. नांदापूरकरांनी काही राष्ट्रीय कविता लिहिलेल्या आहेत. नांदापूरकर हे संस्कृत आणि मराठीचे पदवीधर असून मराठीचे एक यशस्वी प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक आहे. वीर विभूतिपूजनाच्या भूमिकेतून नांदापूरकरांनी तीन ऐतिहासिक खंडकाव्ये लिहिलेली असून अजून ती प्रकाशित झालेली नसल्याचे चिं. नी. जोशींनी आपल्या ग्रंथात नमूद केलेले आहे.

नांदापूरकरांची खंडकाव्ये–(१) 'अर्गळची राणी' हे नांदापूरकरांचे पहिले ऐतिहासिक खंडकाव्य अर्गळ प्रांताच्या राणीवर रचलेले आहे. अयोध्येच्या नबाबाने अर्गळ प्रांत जिंकून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्याने राणीला पकडण्याचा प्रयत्न केला पण पराक्रमी राणीने त्याच्याशी लढा देत शेवटी सैन्याच्या व राजाच्या साहाय्याने नबाबाचा पराभव केला अशी थोडक्यात कथा आहे. (२) 'कलावती' कलावती या खंडकाव्याची कथाही ऐतिहासिक असून ती रजपुतांच्या इतिहासातील आहे. चितोडहून परत येणाऱ्या अल्लाउद्दीनच्या कानावर कलावतीच्या सौंदर्याची कीर्ती गेली. त्याने तिच्या नवऱ्याजवळ तिची मागणी केली पण राणीने ती झुगारून देऊन युद्धाला आमंत्रण दिले. युद्धात राजा विषारी बाणाने जखमी झाल्यानंतरही राणीने अल्लाउद्दीनचा पराभव करून त्याला पिटाळून लावले. स्वतःच्या मुखाने राजाच्या जखमेतील विष शोषून घेतले व मृत्यू स्वीकारला. राजानेही तिच्या पाठोपाठ आत्महत्या केली अशी ही वीर करुण रसाची कथा आहे. (३) टंकसंस्थानच्या सुलतान राजाच्या एकुलत्या एक पराक्रमी कन्येची, 'तारा' ची ही कथा आहे. मुसलमान सरदाराकडून पराभूत झालेल्या सूरतानाने अज्ञातवासात तिला युद्धकलेचे शिक्षण दिले. पित्याचे राज्य जिंकून देणाऱ्या रजपुताशी विवाहबद्ध होण्याचा तिने पण केला व तो पूर्ण केला असे थोडक्यात 'तारा' या खंडकाव्याचे कथानक आहे.

'वाग्विलास' या काव्यसंग्रहातील 'राघोबाची भरारी', 'कर्तव्यानंतर', 'भवानी समशेर', 'लक्ष्मीपूजन' या राष्ट्रीय कविता आलेल्या आहेत. 'अस्पृश्यांचा टाहो' या सामाजिक विषमतेवर टीका करणाऱ्या कवितेसंबंधी चिं. नी. जोशी म्हणतात, " बुद्धिवाद बिनतोड आहे पण त्यात जिव्हाळा दिसत नाही."[८२] इतर कवितांमधून राष्ट्रप्रेम, ध्येयवाद, परंपरेचा गौरव, वीरविभूतिपूजन यांचे दर्शन घडते. अभिजातता, रसिकता, रसोत्कटता आणि कल्पकता ही त्यांच्या राष्ट्रीय कवितांची वैशिष्ट्ये सांगता येतील.

गांधीवादाने प्रभावित होऊन राष्ट्रीय कविता लिहिणारे दुर्गादयाळ दीक्षित
(जन्म १९०१)

राष्ट्रकवी दुर्गाप्रसाद तिवारींसारखीच मराठी ही मातृभाषा नसलेले पण त्यांच्याप्रमाणेच मराठीवर मातृभाषेवत प्रेम करणारे दुर्गादयाळ दीक्षित हे मराठवाड्यातील कवी आहेत. हायस्कूल मधील शिक्षणाकरिता दुर्गादयाळ पुण्याला आले असताना राष्ट्रीय वातावरणाने प्रभावित होऊन मॅट्रिक न होताच त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. दुर्गादयाळांचे चित्त प्रपंचातूनही उडाले. आयुष्याची दहा बारा वर्षे त्यांनी अज्ञातवासात काढली. त्या काळात त्यांनी लेखनवाचनात वेळ घालविला. त्याच काळात त्यांना काव्यनिर्मिती करण्याची प्रेरणा झाली आणि हिंदी आणि मराठीत त्यांनी विपुल काव्यरचना केली. काव्याप्रमाणेच त्यांनी सामाजिक कादंबऱ्यांची आणि निबंधांचीही निर्मिती केलेली आहे. दीक्षितांवर गांधीजींच्या विचारसरणीचा चांगलाच प्रभाव पडला असावा असे त्यांचे साहित्य वाचून वाटते. दुर्गादयाळांचा एक विधायक कार्यकर्ते म्हणूनही लौकिक आहे. हिंदुमुस्लिम ऐक्याच्या उदात्त हेतूने दीक्षितांनी 'नवजवान संघाची' स्थापना केली. त्यांच्या कविता 'चारुचयन' या काव्य-संग्रहातून प्रकाशित झालेल्या आहेत. राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्यप्रेम हा त्यांचा स्थायिभाव आहे. या दोन्ही भावनांची अभिव्यक्ती करणाऱ्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यांनी चंडिका मातेजवळही स्वातंत्र्याचीच, महाकवी सावरकरांसारखी मागणी केली आहे. ते म्हणतात,

"जळतसे हृदयी मम हिंदभू । व्यथित पीडित चिंतित जन्मभू
विजय धाम दयामय शंकरी । भरतभूस विमोचन तूं करी ॥"

दुसऱ्या एका कवितेतही कवीने हीच मागणी वेगळ्या स्वरूपात केलेली आहे. कवी म्हणतो,

"आबालवृद्ध भारतीय त्रस्त त्रस्त जाहले ।
तया स्वतंत्रता स्वराज्य–दान देई मंगले ॥"

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत पण विस्तारभयास्तव देणे अशक्य आहे. त्यांची राष्ट्रीय भावनांची उत्कट अभिव्यक्ती पाहून चिं. नी. जोशी म्हणतात, "देशप्रेम व देशस्वातंत्र्य इतक्या स्पष्टपणे खड्या सुरात गाणारा शाहीर निदान इकडे (मराठवाड्यात) हा पहिलाच आणि हेच त्याचे मोठे वैशिष्ट्य होय.[८३]" गांधीजींच्या प्रेम शांती, अहिंसा, निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह, खादी इत्यादी तत्त्वांवर दुर्गादयाळांनी अनेक कविता लिहिलेल्या असून तो त्यांच्या गांधीभक्तीचा मार्ग आहे. गांधीजींचे माहात्म्य सांगताना दुर्गादयाळ म्हणतात,

"रणधीर वीर बाणा भीतो न तो कुणाला
सेना किती असे ना घाला खुशाल घाला ॥" (– रणशिंग)

दुसऱ्या एका कवितेत

"सत्याग्रही वीर उत्साह मूर्ति;
असे प्राण सम्राट गांधी जरी
कारागृही थोर गेले पुढारी,
निराशा न कोणास वाटे तरी ॥"

पारतंत्र्याची जळजळीत जाणीव त्यांच्या 'परतंत्रता', 'वैचित्र्य', 'मला काय त्याचे !' 'कामना', 'पावस प्रतीक्षा' इत्यादी कवितांतून तीव्रतेने प्रकट झालेली आहे. परंपरेचा अभिमान तर दीक्षितांच्या ठिकाणी पराकोटीचा आहे. आपल्या पूर्वजांना उद्देशून ते लिहितात,

" स्वत्व गेले त्यासवे गेले विभव विक्रम महा !
पूर्वजांनो संततीची दुर्दशा ही या पहा ॥" (माझा मराठवाडा)

'जाण' ही त्यांची कविताही मराठवाड्याचे गुणवर्णन करणारी आहे. याशिवाय राष्ट्रीय आशावादही दुर्गादयाळांच्या राष्ट्रीय कवितेतून आलेला आहे. 'स्वातंत्र्याचे ,सुधोपम फल चाखण्याची कामना' त्यांनी अनेक ठिकाणी व्यक्त केलेली आहे. जिवंत जळजळीत भावना, मनोरम कल्पना, सुबोध भाषा-शैली या कलागुणांनी दुर्गादयाळांची राष्ट्रीय कविता संपन्न आहे.

आणखी काही राष्ट्रीय कवी– प्रस्तुत कालखंड राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा असल्यामुळे अक्षरशः शेकडो कवींनी राष्ट्रीय भावनांची थोडी फार अभिव्यक्ती केलेली असल्याचे आढळते. ज्या कवितांना काव्यसंग्रहात समाविष्ट होण्याचे भाग्य लाभले नाही अशा शेकडो कविता तत्कालीन मराठी नियतकालिकांतून विखुरल्या आहेत. त्यातील काही निश्चितच श्रेष्ठ दर्जाच्या आहेत पण काव्यसंग्रहाच्या अभावी त्या काळाच्या पडद्याआड झालेल्या आहेत. राष्ट्रीय भावनेच्या प्रबळ ऊर्मीसरशी चार सहा उत्तम कविता लिहून निवृत्त होणारेही अनेक कवी आहेत. वाङ्मयेतिहास-कारांची नजर चुकवूनही काही कवी अज्ञात राहिले आहेत. सर्वच राष्ट्रीय कवींची आणि त्यांच्या कवितांची नोंद घेणे प्रबंधाच्या मर्यादेत शक्य नाही. तशी नोंद घ्यावयाची तर त्यासाठी राष्ट्रीय काव्यकोषाचीच स्वतंत्र निर्मिती करावी लागेल. एवढे ते प्रचंड आणि दीर्घ काळ चालणारे कार्य आहे. राष्ट्रीय कवितेची व्याप्ती वाढविताना प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, " ऐतिहासिक खंडकाव्यां-नाही राष्ट्रीय काव्य म्हणणे उचित आहे. कारण ते राष्ट्रीय काव्याचे स्वरूप धारण करते." [८४] श्री. जोगांच्या या मताचा स्वीकार करून ऐतिहासिक खंडकाव्ये लिहिणाऱ्या कवींची नोंद घेण्याचा प्रयत्न प्रबंधात केलेला आहे.

कवी वसंतविहार– शंकर दत्तात्रेय जोशी उपाख्य कवी वसन्तविहार [८५] हे राष्ट्रीय बाण्याचे कवी आहेत. 'मानिनी', 'स्वराज्य बोध', 'जनाचे श्लोक', 'लोकमान्य टिळक विरह', 'केवळ स्वराज्यासाठी', 'आर्यभूमीचा अमीर', 'नेताजी पालकर' इत्यादी बारा राष्ट्रीय खंडकाव्ये त्यांनी लिहिली आहेत. स्वामी रामतीर्थांच्या देशभक्तिपर गीतांचा सरस अनुवादही त्यानी केलेला असून 'जालियनवाला बागे' वरील त्यांचा पोवाडा गाजलेला आहे. त्यांच्या कविता प्रामुख्याने वीररसप्रधान आहेत.

कवी अरविंद– भास्कर नानाजी शिंदे उपाख्य कवी अरविंद हे राष्ट्रीय बाण्याचे, शाहिरी थाटाची रचना करणारे प्रसिद्ध कवी आहेत. 'शिवबिल्वदळ' हे छत्रपती शिवाजी महाराजांवरील खंडकाव्य प्रसिद्ध आहे. त्यांची शिवकालातील घटनाप्रसंगावर आधारित स्फुट कविता आहे. 'कृष्णा घोडी' ही त्यांची कविता महाराष्ट्रात गाजली आहे. स्वातंत्र्याची उत्कट लालसा आणि पारतंत्र्याची पराकोटीची खंत त्यांच्या गीतांतून आढळते.

विनायक जनार्दन सहस्रबुद्धे– तरुण वयात काव्य करण्याची स्फूर्ती झालेले राष्ट्रीय वृत्तीचे कवी. 'किर्लोस्कर' आणि 'ज्ञानप्रकाशा'तून त्यांची राष्ट्रीय कविता प्रकाशित झालेली आहे. १९४७

साली ' दुहिता ' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. राष्ट्रप्रेम आणि आत्मप्रत्यय ही त्यांच्या कवितांची वैशिष्ट्ये आहेत. ' सुवर्णभूमी ', ' कधि न करावा निज धिक्कार ' या त्यांच्या कविता गाजलेल्या आहेत.

केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर–' बकुळीची फुले ', ' बालकवीस बाष्पांजलि ' आणि ' पुरुषार्थ शतक ' ही त्यांची काव्ये प्रसिद्ध आहेत. निरनिराळ्या नियतकालिकांतून त्यांच्या राष्ट्रीय कविता प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचे 'भारतभूमिस्तोत्र' मातृभूमीच्या प्रेमाची साक्ष देणारे आहे.

कवी मनोहर– गोपाळ गंगाधर पोतदार उपाख्य कवी ' मनोहर ' यांचा राष्ट्रकवी म्हणूनच उल्लेख करावा लागेल. त्यांची 'छत्रपती', 'महाराष्ट्र' आणि 'मुशाफर' ही खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. 'भावभेट' हा त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह. राष्ट्रीय महापुरुषांचे पूजन करण्यात त्यांच्या प्रतिभेला उल्हास वाटतो. त्यांची 'वीर वन्दन' ही कविता गाजलेली आहे.

कवी गजानन गोविंद तानवडे– तानवडयांच्या राष्ट्रीय कवितांतून पूर्वजांच्या पराक्रमाचे स्मरण आणि वीर विभूतिपूजन आढळते. त्यांच्या ' अजिक्य तारा ' आणि ' देहाची ढाल ' या कविता गाजलेल्या आहेत.

कवी रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे– कवी सरंजामे त्यांच्या ' झिम्मा ' या कवितेमुळे महाराष्ट्राला परिचित झाले. त्यांनी काही राष्ट्रीय कवितांची निर्मिती केलेली आहे. 'मायभूमीची हाक' ही प्रदीर्घ कविता त्यांच्या राष्ट्राभिमानाची व देशभक्तीची साक्ष देणारी आहे. या कवींशिवाय इतर अनेक कवींनी राष्ट्रीय कवितांची निर्मिती केलेली आहे.

ज्या कवींचा राष्ट्रीय कवितांच्या संदर्भात आवर्जून उल्लेख केला पाहिजे अशा कवींत, विनायक सदाशिव सुखटणकर, नागेश पांडुरंग फडके, ग. वि. केतकर, वासुदेव नारायण फडणीस, लालजी पेंडसे, अनंत काणेकर, के. नारायण काळे, दत्तप्रसन्न कारखानीस, ह. स. गोखले, मुकुंद लोंढे, वा. ल. शेंडे, शंकर लक्ष्मण थोरात, द. ग. जयवंत, शालीनदत्त शिदोरे आदी प्रमुख आहेत.

केवळ ऐतिहासिक महापुरुषांवर खंडकाव्याची निर्मिती करणारे काही कवी

लोकमान्यांच्या राष्ट्रवादाने प्रभावित होऊन आणि सावरकरांसारख्या महाकवीने ' कमला ' गोमांतकासारखी खंडकाव्ये निर्माण केलेली पाहून अनेक कवींनी ऐतिहासिक महापुरुषांच्या जीवनावर खंडकाव्ये लिहिली. या बहुतेक खंडकाव्यांमागील प्रेरणा राष्ट्रीय भावनेची असल्याचे आढळून येते. ' श्री शिवछत्रपतीची पहिली शपथ ' हा काव्यविषय करणारे दि. कृ. काकटे, ' शिववात्सल्य ' वर्णन करणारे कवी बा. वा. घाटे, ' सुभेदाराची सून ' ही कल्याणच्या खजिन्याची कथा सांगणारे त्र्यं. ग. घारपुरे, ' श्री छत्रपती काव्य ' रचियते मो. वि. जोशी, 'राजारामकालीन स्वातंत्र्य समराची' गाथा गाणारे कवी वा. भा. दामले, 'शिवचरित्राची कथा' गाणारे कवी रा. रा. नाबर, 'छत्रपती शिवाजी'-पासून तो 'रावबाजी'पर्यंतचा इतिहास पद्यबद्ध करणारे कवी ग. रा. साने, या सर्वांनी ऐतिहासिक खंडकाव्याची निर्मिती करून मराठी काव्यातील राष्ट्रीय कवितेचे दालन समृद्ध केलेले आहे. या खंडकाव्यनिर्मितीसंबंधी डॉ. अ. ना देशपांडे म्हणतात, " ही सर्व ऐतिहासिक खंडकाव्ये प्रत्यक्षतः वा अप्रत्यक्षतः राष्ट्रीय भावनेतून उत्पन्न झालेली आहेत. शिवरायाचे दिव्य जीवन हे यापैकी बहुतांश ऐतिहासिक खंडकाव्यांचे स्फूर्तिकेन्द्र आहे. [८१]

राष्ट्रभक्त शाहिरांची मांदियाळी

राष्ट्रीय पोवाड्यांची आधुनिक परंपरा– राष्ट्रीय कवितेच्या स्वरूपाची चर्चा करताना चवथ्या प्रकरणात पोवाडे या राष्ट्रीय काव्याच्या प्रकारासंबंधी विस्तृत विवेचन करण्यात आले आहे. भक्ति-काव्याच्या परंपरेप्रमाणे पोवाड्यांची ही परंपरा अखंडपणे अस्तित्वात आहे. परिचित चित्तवेधक वीरकथा निवेदन किंवा सामान्यांच्या सुखदुःखाचे निवेदन, रसोत्कट, प्रभावी बोलभाषेत प्रत्यक्ष साभिनय आवेशपूर्ण गायन, जनसमूहाच्या सर्वसाधारण भावनांना आवाहन या विशेषांमुळे राष्ट्रीय काव्यदृष्ट्या पोवाडे जिवंत व प्रभावी ठरलेले आहेत. शिवकाल, पेशवेकाल यातून अखंडपणे वाहत येणारा पोवाड्यांचा प्रवाह आधुनिक कालातही जोमाने वाहताना आढळतो. अर्वाचीन कालखंडातला 'पहिला पोवाडा' हरिभाऊ आपट्यांच्या 'गड आला पण सिंह गेला' कादंबरीतील तोताराम शाहिराच्या तोंडी घातलेला आढळतो. [८७] त्यानंतर आधुनिक काळात जिवंत नि जातिवंत ओजस्वी नि स्फूर्तिदायक राष्ट्रीय पोवाडे रचण्याचे कार्य महाकवी सावरकरांनी केलेले आहे. स्वातंत्र्यशाहीर गोविंदांनीही पोवाडेसदृश रचना केलेली आहे. 'मराठ्यांची संग्राम गीते' कवी माधव, किंवा अज्ञातवासी यांची काही कविता पोवाडेसदृश स्वरूपाची म्हणावी लागेल. पोवाड्यांवर प्रबंधलेखन करून आचार्य पदवी संपादन करणाऱ्या कवी सूर्यकांत खांडेकरांनी आधुनिक राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात दिलेला अभिप्राय मार्मिक आहे. ते म्हणतात, "आधुनिक राष्ट्रीय कविता म्हणजे जुन्या शाहिरी कवितेचाच उत्क्रांत, संस्कारित आविष्कार होय." (सूर्यकांत खांडेकर यांचा पोवाड्यावरील अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– संदर्भ श्री. अनंत फंदी, नागपूर यांच्या सौजन्याने)

राष्ट्रीय भावनेने प्रभावित होऊन शाहिरी कवने करणाऱ्या काही शाहिरांचा अगदी थोडक्यात परिचय करून देण्याचे योजिले आहे. या कार्यात शाहिरी वाङ्मयाचे साक्षेपी अभ्यासक आणि माझे मित्र श्री. अनंत फंदी यांनी मलाबहुमोल साहाय्य केले आहे. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

मराठी बाण्याचे शाहीर लहरी हैदर
(१८७०–१९६३)

शाहीर उस्ताद लहरी हैदर हे कोल्हापूरचे राहणारे, तालीम बहादूर म्हणून ते उस्ताद झाले. त्यांचा पीढिजात धंदा शस्त्रांना धार लावणाऱ्या शिकलगराचा परंतु त्यांचा लौकिक शाहीर म्हणूनच आहे. त्यांना जसे तालीम बहादूर शिष्य होते तसे पोवाड्यांच्या क्षेत्रातलेही शिष्य होते. सांस्कृतिक चळवळीचे केन्द्र असणाऱ्या कोल्हापूरच्या जीवनाचे संस्कार हैदरांवर झाले असल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. लोकशिक्षण आणि लोकजागृती या हेतूनेच शाहीर हैदरांनी आपल्या पोवाड्यांची रचना केली. त्यांना जो जो विचार उद्बोधक वाटला, ज्या ज्या विभूती आदरणीय वाटल्या त्यांना त्यांनी पोवाड्यात स्थान दिलेले आढळते. लो. टिळकांचा अस्मितादर्श राष्ट्रवाद असो, गांधीजींचा मानवतावादी राष्ट्रवाद असो, शाहू छत्रपतींना पटलेला सत्यशोधक समाजाचा समतावाद असो किंवा रशियाचा साम्यवाद असो सर्वांना त्यांनी आपल्या पोवाड्यात स्थानदिलेले आहे. म्हणूनच त्यांनी शाहू छत्रपतींचा पोवाडा लिहिला आणि रशियन क्रांतीचा पोवाडाही लिहिला.

' नरवीर तानाजी मालुसरे ', ' झाशीची राणी लक्ष्मीबाई ', ' सत्यशोधक समाज ', ' छत्रपती राजर्षी शाहू ', ' हिन्दुस्थानचे दारिद्र्य ', ' आधुनिक फाजील सुधारणा ' इत्यादी विषयांवर पोवाडे लिहिलेलेले आहेत.[८८] झाशीच्या राणीचे वर्णन करताना शाहीर म्हणतो, " अजरामर कीर्तीची खाण, दैदीप्यमान, समरशूर महान, राणी मर्दानी झांशी वाली । खात्री तिने इंग्रजांची केली । जगभर नाव करून गेली ।।" हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या पोवाडयात हैदरांनी गांधीजींच्या स्वदेशीचा आणि खादीचा पुरस्कार केलेला आहे. शाहीर सांगतो; " रुपये जाती साठ कोटी वर्षास । निव्वळ हे परदेशी कपडयास,... यासाठी खादी वापरा । देश हा तारा । उन्नती करा, महात्मा गांधीच्या वचनास । सत्य मानून घ्या आचरण्यास ।।"

शाहू छत्रपतींच्या पोवाडयातून समाजवादी विचारांचे, शिक्षण प्रसारासंबंधीचे विचार शाहिराने मांडलेले आहेत.[८९] तसेच अस्पृश्योद्धारासंबंधी विचारही आलेले आहेत. मातृभाषा मराठी नसूनही लहरी हैदरांनी मराठी बाण्यावरोबरच राष्ट्रीय बाणाही दाखविला आहे. त्यांची प्रतिभा पाहून टीकाकारांनी त्यांची तुलना पेशवेकालीन सगन भाऊ या शाहिराशी केलेली आहे.[९०] ग. दि. माडगूळकर म्हणतात, " कविवरा लहरी हैदरा । काव्यशेखरा थोर तू राव लेखणीचा । क्रांतिकारी तुझी वाचा । धाक नाही तिला मरणाचा ।।"[९१] या पंक्तीत हैदरांची सर्वच वैशिष्टये आलेली आहेत.

महाराष्ट्र कविभूषण शाहीर प्रल्हादराय जामखेडकर
(जन्म १८९१)

भगवान श्रीरामाच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नाशिक क्षेत्री जामखेडकरांचा जन्म झाला. जामखेडकरांना बालवयापासूनच ऐतिहासिक वाङमयाच्या वाचनाची आवड होती. त्या आवडीतूनच पुढे पराक्रमी ऐतिहासिक पुरुषांच्या जीवनावर पोवाडे रचण्याची प्रेरणा झाली. जामखेडकरांवर इंग्रजीच्या वाचनाचेही संस्कार होते. चिपळूणकर, लो. टिळक, शि. म. परांजपे आणि स्वा. सावरकर यांच्या साहित्याचे आणि राष्ट्रवादी विचारांचे संस्कार जामखेडकरांवर फार मोठया प्रमाणावर आढळतात. या संस्कारांमुळेच त्यांनी लोककर्मखात्यातील सरकारी नोकरी सोडून दिली. डफावर कणखर थाप मारून स्वतंत्र शाहिरी पेशा स्वीकारला.

स्वरचित पोवाडे खडया पहाडी आवाजात गाणारे शाहीर म्हणून जामखेडकर प्रसिद्ध आहेत. त्यांना पोवाडयात मार्गदर्शन लाभले ते दुर्गाप्रसाद तिवारी यांचे. तिवारींच्या सहवासासाठी जामखेडकर नाशिक सोडून कायमचे जळगावला राहायला गेले व तेथेच स्थायिक झाले. वीर पुरुषांचे चरित्र चित्रण करण्यात जामखेडकरांच्या प्रतिभेला स्फुरण चढते. ' वीर रत्न मुरारबाजी ', ' प्रतापी प्रतापसिंह ', ' सिंहगडचा संग्राम ', ' शेरास सव्वाशेर अर्थात अफझुलखान वध ', ' संग्रामदेवता राणी लक्ष्मीबाई ', ' जवानमर्द ब्राह्मण भाई बापू गोखले ', ' बाजी प्रभू देशपांडे ', ' बदामीचा वेढा ' इत्यादी ऐतिहासिक स्त्रीपुरुषांवर त्यांनी पोवाडे लिहिले आहेत.

आधुनिक कालातील ' पंडित मोतीलाल नेहरु ', ' स्वातंत्र्यवीर सावरकर ', ' राष्ट्रपिता महात्मा गांधी ', ' लोकमान्य टिळक ', पं. जवाहरलाल नेहरू ', ' नेताजी सुभाषचंद्र बोस ' आणि जयप्रकाश नारायण ' या राष्ट्रपुरुषांवर ओजस्वी पोवाडे जामखेडकरांनी रचले आहेत आणि खडया सुरात गायिले आहेत. जामखेडकर आपल्या पोवाडयांची सुरुवात राष्ट्रीय पुरुषांना वंदन करून

करतात हे त्यांच्या पोवाड्यांचे वैशिष्टय आहे. कल्पनाचातुर्य, भाषाप्रभुत्व आणि शब्दचमत्कृती यांनी त्यांचे पोवाडे रंगलेले आहेत. हा एक शब्दचमत्कृतीचा नमुना बघा !" " फाजलखान सिद्धी जोहार । शहाचा हार । खाईना हार ।... विजयश्री घाली सदोदित हार । पण शिवबा पुढं खाल्ली त्यांने हार !" अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत. देशप्रेमाने त्यांचे पोवाडे प्रभावी झालेले आहेत. जामखेडकरांच्या पोवाड्यांतून वर्तमानकालीन परिस्थितीचे यथातथ्य प्रतिबिंब पडलेले आढळते; " सुधारणा आणि देशस्थिती " या कवनात शाहीर सांगतो,

" दुधा तुपाचा काळ संपला । चहाचाच बेपार
अशक्तांचा, नामर्दांचा भरलासे दरबार
पुंड गुंड या लुंग्यांचा हा भरलासे दरबार
देशभक्तीच्या नावाखाली पैसे खाती फार ।।"

जामखेडकरांनी ' चलेजाव क्रांतीचा ', ' आझाद सेनेचा ', ' महात्माजींच्या अटकेचा ' आदी पोवाडेही लिहिले आहेत. जामखेडकरांच्या पोवाड्यांसंबंधी केसरीचा अभिप्राय मार्मिक आहे. केसरीकार लिहितात, " जामखेडकरांचे पोवाडे अलंकारपूर्ण असूनही सुबोध आहेत."[९२] अंतःकरणात अथांग देशप्रेम असल्याशिवाय असे ओजस्वी पोवाडे जामखेडकरांना लिहिताच आले नसते.

मराठी अस्मितेचे मराठवाड्यातील शाहीर पोहनेरकर
(१९०७)

चिकाटी, प्रयत्न आणि निदिध्यास असलेला माणूस नावलौकिकाला चढतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मराठवाड्यातील शाहीर नरहर पोहनेरकरांचे आहे. प्रत्यक्षात मॅट्रिक उत्तीर्ण नसतानाही राष्ट्रीय शिक्षणसंस्थेची निर्मिती करणारे, शिक्षक हा धर्म मानणारे, वाचन व व्यासंग वाढवून, गद्य; पद्यात्मक साहित्यनिर्मिती करणारे आणि ' लावणीचे लावण्य ' यासारख्या अभ्यासपूर्ण प्रबंधाची निर्मिती करणारे पोहनेरकर मराठवाड्यात गाजलेले आहेत.[९३] पोहनेरकरांची राष्ट्रीय कविता त्यांच्या ' बागशाही ' या कवितासंग्रहात आलेली आहे. ' झेंडावंदन ', ' राष्ट्रीय संतवंदन ', ' वीरवर जानू भिताड्या ', ' बापूची काकी ', ' कुंजपुऱ्याचा दसरा ', ' हिंदमातेची संक्रांत ', ' महाराष्ट्र गीत ', ' अश्रुमोचन ' इत्यादी कवितांतून पोहनेरकरांचे राष्ट्रप्रेम, परंपराप्रेम आणि स्वातंत्र्यप्रेम व्यक्त झालेले आहे.

" परसत्ता राक्षसीस धडकी भीतीची भरु दे ।
महाराष्ट्राच्या नसा नसातुनि चैतन्य स्फुरु दे ।।

' गा निर्भय गाणी रम्य स्वातंत्र्याची ' अशी पोहनेरकरांची गर्जना आहे. महाराष्ट्राचा अभिमान तर पोहनेरकरांच्या रोमारोमातून प्रकट होताना दिसतो. महाराष्ट्रवंदन या कवितेत ते म्हणतात, ' कुठवर गावे तुझ्या गुणाला वाचा मंदवती ' असे म्हणत असतानाच दुसरीकडे ते सांगून जातात,

" प्रतिभा देहा स्फूर्तीचे ते लावुनिया पंख ।
काव्यनभामधि विहार करण्या सजलो निःशंक ।।"[९४]

राष्ट्रीय गीते गाणाऱ्या कवी किशोर (पोहनेरकर) यांच्यापेक्षा शाहीर पोहनेरकरच महाराष्ट्राला अधिक परिचित आहेत. थोडे थोडकेच नव्हे तर सुमारे पाउणशे पोवाडे पोहनेरकरांनी रचून त्यांचे

मराठवाड्यातील गावागावातून गायनही केलेले आहे. 'गुरुगोविंदसिंह', 'येसाजी कंक', 'शिवाजीचा वाघ्या', 'गड आला पण सिंह गेला', 'मराठी मातेचा दरवार', 'मराठी मातेची त्रिस्थळी' इत्यादी पोवाडे प्रकाशित झालेले असून बरेच प्रकाशनाची वाट पाहत आहेत. पोहनेरकरांच्या पोवाड्यांची ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. न. र. फाटक यांच्यासारख्या थोर साहित्यिकांनी स्तुती केलेली आहे. राष्ट्रीय कर्तव्याच्या जाणिवेने पोहनेरकरांनी आपली साहित्यनिर्मिती केलेली आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे वीरपूजक शाहीर खाडिलकर
(जन्म १९०३)

पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर हे महाराष्ट्राचे वीरपूजक अग्रगण्य असे शाहीर. मूळचे सांगलीकडचे पण आता मुंबईत स्थायिक झालेले खाडिलकर शालेय जीवनात स्कॉलर, क्रीडापटू व वक्तृत्वकलासंपन्न म्हणून प्रसिद्धीला आलेले. पुढे मुंबई विद्यापीठाची एम्. ए. ची पदवी विभूषित करणारे आणि शिक्षकाच्या व्यवसायात हयात वेचणारे खाडिलकर नामवंत शाहीर आहेत. खाडिलकर नुसते शाहीर नाहीत तर देशभक्त आहेत. मुख्याध्यापकाच्या जबाबदारीच्या पदावर असूनही खाडिलकरांनी १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला आणि त्यासाठी सश्रम कारावासाची शिक्षाही भोगली आहे.[९५] १९२६ ते १९७५ या कालखंडात त्यांनी सुमारे ६० पोवाडे लिहिले असून अलीकडच्या काळातही त्यांचे लेखन चालूच आहे. या पोवाड्यांव्यतिरिक्त शाहिरी ढंगाची अनेक कवने आणि कीर्तनासाठी सुमारे पन्नास आख्याने लिहून कीर्तनकार म्हणूनही लौकिक संपादन केलेला आहे. खाडिलकर हे स्वतः गायक असे शाहीर आहेत. १९७५ मध्ये 'पोवाडे वाङ्मय दर्शन' या नावाचा एक मौलिक साधन ग्रंथ त्यांनी अभ्यासपूर्वक निर्माण केलेला असून त्यातून पोवाड्याचे मंत्र, तंत्र, यंत्र निवेदन केलेले आहे. खाडिलकरांच्या मते राष्ट्रात वीरवृत्ती जागविणे हा मंत्र, त्यावर कुशलतेने गेय काव्यरचना करणे हे तंत्र आणि तयार झालेला पोवाडा म्हणजेच प्रभावी यंत्र आहे.[९६]

समरवीरांच्या पराक्रमावर गेय अशी चित्तथरारक काव्यरचना करणे म्हणजे राष्ट्रीय पोवाडे अशी पोवाड्यांची खाडिलकरांची समर्पक व्याख्या आहे. आणि या व्याख्येला अनुलक्षूनच त्यांनी आपल्या पोवाड्यांची निर्मिती केलेली आहे. राष्ट्रात वीरवृत्तीची ज्योत सतत प्रज्वलित ठेवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य जगभर शाहीर करीत आले आहेत. खाडिलकरांनीही आपल्या पोवाड्याचा हेतू पुढील चरणात सांगितला आहे.

" वीर रसाचे पूजन करिती वीरश्रीला जागविती
भेकड वृत्ती दूर पळविली, धन्य धन्य शाहीर जगती ।।"[९७]

'झांशीची राणी', 'प्रतापगडचा संग्राम', 'वीरमणी बाजीप्रभू देशपांडे', 'किल्लेदार मुरारबाजी', 'धर्मवीर संभाजी महाराज', 'खंडो वल्लाळ', 'पानिपतचा संग्राम', 'महाराणा प्रताप' इत्यादी ऐतिहासिक आणि लो. टिळक, म. गांधी, सरदार पटेल, स्वा. सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अर्वाचीन काळातील महापुरुषांवर अत्यंत ओजस्वी व श्रवणीय पोवाडे लिहून गायिले आहेत.[९८] गांधीजींच्या अहिंसेसंबंधी सांगताना खाडिलकर लिहितात,

" बल हीनांची एक अहिंसा भ्याडपणा म्हणती त्याला
प्रबलांची ती दुसरी अहिंसा जिंकून येते हिंसेला ।।"

खाडिलकरांच्या पोवाड्यांची काही वैशिष्ट्ये– वीर विभूतिपूजन हा तर पोवाड्यांचा महत्त्वाचा विशेष आहेच, याशिवाय सुरुवातीच्या चार दोन पंक्तींत त्या पराक्रमी व्यक्तींच्या जीवनकार्याचे थोडक्यात सार मांडणे हे खाडिलकरांचे खास वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ, खाडिलकरांच्या लेखणीतून साकारलेले झाशीच्या राणीचे वर्णन बघा.

" सती लक्ष्मीवाई हिरकणी, भंगली रणी, नाव त्रिभुवनी; रणी रक्तानं न्हाली तरवार । मेघात वीज चमकली भूमीवर आली, गेली पाताळी धन्य ती नार ॥" 'बाजी प्रभु देशपांडे', 'धर्मवीर संभाजी', 'मुरारबाजी' अशा कितीतरी पोवाड्यांतून त्यांचा हा विशेष प्रकट झालेला आहे. दुसरा महत्त्वाचा विशेष आकर्षक, उठावदार अशी पोवाड्याची सुरुवात आणि तिसरा विशेष म्हणजे आवेशपूर्ण भिन्न भिन्न ढंगदार चालींत गायन करणे. खाडिलकरांचे पोवाडे दोन खंडांत प्रसिद्ध झालेले आहेत. [९९] महाराष्ट्रात पोवाड्यांच्या द्वारे राष्ट्रीय भावनांची जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य खाडिलकरांच्या पोवाड्यांनी केलेले आहे. खाडिलकरांच्या प्रतिभासंपन्न, वीरश्रीयुक्त, अर्थगौरवपूर्ण प्रत्ययकारी पोवाड्यांची अनेक थोर साहित्यिकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आहे. या प्रशंसकांत देशभक्त अच्युतराव कोल्हटकर, धुळ्याचे शंकर कृष्ण देव, पं. रघुनाथशास्त्री कोकजे, प्रा. पुनतांबेकर; प्रा. रा. श्री. जोग अशी गणमान्य मंडळी आहे. रा. श्री. जोग म्हणतात, " कवितांच्या संख्येने आणि काव्यगुणांनी खाडिलकरांचे स्थान आजच्या शाहिरांत वरचे आहे." [१००] श्री. शं. नवरे म्हणतात, " खाडिलकरांनी आपल्या पोवाड्यांचे वेड कितीतरी लोकांना लावलेले आहे." प्रा. रा. व. आठवले म्हणतात, " रसपरिपोष, ओजस्विता व रमणीय अलंकारांची सजावट यांनी ओतप्रोत असलेले खाडिलकरांचे पोवाडे रसिक हृदयाला आनंदाने डोलवितात." [१०१] हे सर्व अभिप्राय खाडिलकरांचे श्रेष्ठत्व सांगणारेच आहेत. लक्षावधी ध्वनिमुद्रिकांच्या द्वारे शाहीर खाडिलकर महाराष्ट्राच्या खेडोपाडी पोचले आहेत.

महाराष्ट्राचे बहुरूपी शाहीर नानिवडेकर
(१९०४–१९६२)

महादेव नारायण उपाख्य शाहीर नानिवडेकर हे कोल्हापूरकडचे. त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथे झाले. कोल्हापूरच्या वातावरणातच त्यांच्यावर राष्ट्रीयत्वाचे, कीर्तनांचे, नाटकांचे, नकलांचे नि पोवाड्यांचे संस्कार झाले. त्यांचे काही शिक्षण पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजात झाले. त्याच मुक्कामात प्रख्यात व्यायामपटू रामचंद्र धोंडो शिदेकर यांच्याकडून नानिवडेकरांनी लाठी, काठी, दांडपट्टा, तलवार, फरिगदगा इत्यादींचे शिक्षण घेतले व त्यात ते अतिशय निष्णात झाले. बाल गंधर्व, रघुवीर सावकार या सुप्रसिद्ध नटांच्या ते हुबेहूब नकला करू लागले आणि नकलांप्रमाणेच दांडपट्ट्याचे शेकडो प्रयोगही त्यांनी केले. ओव्हरसिअरच्या परीक्षेत अपयश आल्यामुळे त्यांनी आपले सर्व सामर्थ्य नकला आणि दांडपट्ट्याची प्रात्यक्षिके करण्यात पणाला लावले आणि नकलांच्या द्वारा पैसा मिळवून ते विलायतची वारीही करून आले. इंग्लंडमध्ये त्यांनी भारतीय पद्धतीच्या शस्त्रनैपुण्याचे प्रयोग करून " भारताचा उत्कृष्ट तलवार बहादर " असा गौरव संपादन केला. नकलांच्या कार्यक्रमात पोवाड्यांच्याही नकला करताना त्यांना स्वतंत्र पोवाडे रचण्याची प्रेरणा झाली आणि नकलाकार व उत्तम नट असणारे व्यायामपटू नानिवडेकर, शाहीर नानिवडेकर म्हणून ओळखले जाऊ लागले. महाराष्ट्राच्या या बहुरूपी शाहिराने हाती डफ तुणतुणे का घेतले, यासंबंधीचा खुलासा पुढील चरणात केलेला आहे. शाहीर सांगतो,

" डफ तुणतुणे हाती मी धरले सोज्वळ कार्याला ।
व्यायामाचा प्रसार हाची हेतु मनी धरिला ।
बलाविण कोण जगी तरला ?" (– व्यायामाचा पोवाडा)

तरुणांमध्ये क्षात्रतेज आणि स्वाभिमान निर्माण करणे हा पोवाडे लिहिण्यामागील हेतू असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पूर्वजांचा अभिमान सांगताना शाहीर म्हणतो,

" पूर्वज गेले झुंज झुंजुनी रण लढता लढता,
तुमी मर्दांचे वच्चे असूनी उपाशी कां मरता ?"

'राणी लक्ष्मीबाई', 'छत्रपती शिवाजी महाराज', 'तात्या टोपे', 'अहल्यावाई होळकर', 'सत्तावनचे क्रांतिवीर', 'बार्डोलीचा सत्याग्रह', 'बंगालची उपासमार', 'नौखाली अत्याचार', 'स्वातंत्र्याचा फटका' [१०२] इत्यादी पोवाडे व शेकडो कवने नानिवडेकरांनी लिहिली आहेत व आपल्या पल्लेदार खडच्या आवाजात गायिली आहेत. त्यांच्या पोवाडयांच्या ध्वनिमुद्रिकाही निघालेल्या आहेत. अंत:करणात राष्ट्रभक्ती, लोकशिक्षणाची आणि लोकजागृतीची उत्कट तळमळ आणि उद्‌बोधनाला दिलेली अप्रतिम रंजकतेची जोड यामुळे नानिवडेकरांच्या पोवाडयांनी महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य केलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय शाहीर म्हणून त्यांचा गौरव करणे उचित ठरेल.

क्रांतिशाहीर गणेश दत्तात्रेय दीक्षित चिंचणीकर
(१९०५ – १९४५)

शाहीर दीक्षित चिंचणीकर सांगली जिल्ह्यातले. 'घराणे शास्त्री पंडितांचे, कीर्तनकारांचे नि शाहिरीचे. चिंचणीकरांचे रूढ अर्थाने शिक्षण फारसे झालेले नसले तरी भारतीय इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्य, राजकारण इत्यादी साहित्याचे सखोल वाचन व मनन त्यांनी केलेले होते. कीर्तनाच्या साथीला पोवाडे म्हणण्याच्या परंपरेचे दीक्षित चिंचणीकर जनक होते. १९३० साली योगायोगाने गांधीजी सांगलीला आले. त्यांच्या विभूतिमत्त्वाने प्रभावित होऊन चिंचणीकरांना राष्ट्रकार्याची प्रेरणा झाली आणि राष्ट्रीय चळवळीत ते सहभागी झाले. दीक्षित चिंचणीकरांचे व्यक्तिमत्त्व निसर्गत:च अतिशय आकर्षक आणि रुबाबदार होते. राष्ट्रभक्ती हा त्यांच्या पोवाडयांचा स्थायीभाव असून लोकजागृती आणि लोकशिक्षण हेच त्यांच्या पोवाडयांच्या मागील प्रयोजन होते. चिंचणीकर आपल्या शाहिरी कवनांबरोबर सुप्रसिद्ध शाहिरांचेही पोवाडे गात असत. पहाडी घारदार आवाजात तडफदार पद्धतीने पोवाडे सादर करण्यात चिंचणीकरांनी नैपुण्य संपादन केल्यामुळे इन्दोर, ग्वाल्हेर, कोल्हापूर, बडोदे, देवास या संस्थानांत त्यांचे खास कार्यक्रम होत असत. या संस्थानांनी त्यांना वर्षासने बांधून दिलेली होती आणि चिंचणीकर दरबारी शाहीर म्हणून ओळखले जात होते. 'यंग इंडिया' कंपनीने चिंचणीकरांच्या पोवाडयांच्या १०७ ध्वनिमुद्रिका घेतल्या आहेत ही एकच गोष्ट त्यांचे पोवाडेगायकी-तील श्रेष्ठत्व सिद्ध करणारी आहे.

'झाशीची राणी' आणि 'भगतसिंह' हे चिंचणीकरांचे पोवाडे अतिशय गाजलेले आहेत. याशिवाय 'छत्रपती शिवाजी', 'उग्रप्रकृती संभाजी', 'कर्नाटकातील राणी चन्नम्मा' इत्यादी ऐतिहासिक स्त्रीपुरुषांवर पोवाडे लिहिले आहेत. आधुनिक महापुरुषांत लो. टिळक, महात्मा गांधी, स्वा. सावरकर, सयाजीराव गायकवाड, यांना पोवाडयात स्थान मिळाले आहे. 'हैदराबादच्या मुक्ती नंतरचा' आणि 'नोवाखोलीतील अत्याचारांचा' असे त्यांचे गाजलेले दोन पोवाडे आहेत.

नानिवडेकर; पोहनेरकर, खाडिलकर यांच्याप्रमाणेच चिंचणीकरांचाही मोठमोठ्या साहित्यिकांनी गौरव केलेला आहे. महाराष्ट्राच्या या लाडक्या शाहिराचे वयाच्या चौरेचाळीसाव्या वर्षी अकाली निधन झाले. त्यांच्यामागे त्यांची पोवाड्यांची परंपरा त्यांचे बंधू शाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर चालवीत आहेत."[१०३]

जहाल राष्ट्रवादी शाहीर अनंत विष्णू मुळे
(१९०७)

शाहीर अनंत मुळ्यांवर शालेय जीवनातच जहाल राष्ट्रवादाचे संस्कार झालेले होते. राष्ट्रीय चळवळीला ज्यांच्यामुळे उत्तेजन मिळेल अशाच पोवाड्यांची मुळ्यांनी जाणीवपूर्वक निर्मिती केलेली आहे. १९२३ साली लो. टिळकांवरील पोवाडा त्यांनी लिहिला. त्यानंतर 'लाला लजपतराय', 'क्रांतिवीरांचा आत्मयज्ञ', 'अफझुलखानाच्या वधाचा पोवाडा' हे जहाल राष्ट्रीय विचारांनी संपन्न असलेले पोवाडे त्यांनी लिहिले परंतु त्यांच्यावर जप्तीची संक्रांत आली. चित्रपट नट म्हणूनही मुळ्यांनी लौकिक संपादन केला. सरकारी दडपशाहीच्या वरवंट्याने शाहीर मुळे डगमगले नाहीत उलट त्यांना नवीन पोवाडे रचण्याची स्फूर्ती झाली. 'वसईचा वेढा', 'बाजीप्रभू देशपांडे', 'सेनापती बापू गोखले', 'प्रतापगडचा संग्राम', 'पन्हाळगडचा वेढा', आणि 'समर्थ सद्गुरु' इत्यादी अनेक पोवाडे लिहून त्यांचे शेकडो स्थळी गायन केलेले आहे.[१०४] आधुनिक काळातील 'महात्मा गांधी', 'पितापुत्र नेहरु', 'स्वामी श्रद्धानंद', 'मिठाचा सत्याग्रह' हे त्यांच्या पोवाड्यांचे विषय आहेत.

राष्ट्रीय चळवळीला पोषक ठरणाऱ्या 'जातिभेद निर्मूलन', 'अस्पृश्यता निवारण', 'दारुबंदी', 'साक्षरता प्रसार' इत्यादी विषयांवरही शाहीर मुळ्यांचे पोवाडे आहेत. मुळ्यांच्या वडगावच्या लढाईच्या सुप्रसिद्ध पोवाड्याला क्रांतिकारक डॉ. ना. दा. सावरकर यांची प्रस्तावना लाभली आहे.[१०५] शाहीर मुळे जहाल राष्ट्रवादी असले आणि त्यांनी जहाल विचारसरणीचे पोवाडे लिहिले असले तरी महात्मा गांधीजींबद्दल त्यांना पराकोटीचा आदर असल्याचे आढळते. गांधीजींवरील त्यांचा पोवाडा हा प्रत्यक्ष पुरावा आहे. गांधीजींच्या पोवाड्याची सुरुवात गांधीजींच्या नमनाने शाहिराने केलेली आहे. शाहीर सांगतो,

> " या थोर कलियुगात, अत्याचार होत, झाला अनर्थ ।
> न्याय नीतीचा, राष्ट्राचा नाश । गरीब जनतेचा जाहला दास,
> नमन गांधीच्या पुण्य चरणास ॥ धृ. ॥

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे राष्ट्रीय जीवनाचे यथातथ्य प्रतिबिंब शाहीर मुळ्यांच्या राष्ट्रीय पोवाड्यात स्पष्टपणे पडल्याचे आढळते. आकाशवाणी केंद्रावर आणि तुरुंगातून शासनाने मुळ्यांच्या पोवाड्यांचे कार्यक्रम घडवून आणलेले आहेत. राष्ट्रभक्त मुळ्यांनी लोकजागृतीबरोबरच उत्तम प्रकारे लोकरंजनाचे कार्य करून राष्ट्रीय कर्तव्य बजावलेले आहे.

दुसरे स्वातंत्र्य शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे
(१९०८ – १९४५)

शाहीर मुचाटे हे धुळ्याचे. शिक्षण जेमतेम इंग्रजी चवथ्या इयत्तेपर्यंत झालेले. या शाहिराच्या ठिकाणी शीघ्रकवित्व होते. ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या जुलुमी राजवटीविरुद्ध सुरू झालेल्या राष्ट्रीय

चळवळीत मुचाटे स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले आणि स्वराज्यासाठी व स्वातंत्र्यासाठी लोकजागृती करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी आपली प्रज्ञा नि प्रतिभा रावविली. स्वातंत्र्याच्या लढ्यात प्रत्यक्ष सहभागी झाल्यामुळे मुचाट्यांना तीनदा तुरुंगवास भोगावा लागला पण त्यांनी आपले राष्ट्र-सेवेचे खडतर व्रत सोडले नाही. कौटुंबिक स्थिती आर्थिक ओढग्रस्तीची असूनही त्यांचे पोवाड्यांच्या कार्यक्रमासाठी अव्याहत दौरे असत, सतत जागरणे घडत, प्रकृतीची आबाळ होत असे परंतु तिकडे या देशभक्त शाहिराचे लक्षच नव्हते. मुचाट्यांनी विश्रांती घ्यावी यासाठी पूज्य साने गुरुजींनीही गळ घातली पण या हट्टी शाहिराने आपले लोकजागृतीचे राष्ट्रीय कार्य थांवविले नाही. अखेर १९४५ साली काळानेच त्यांना कायमची विश्रांती दिली. त्यावेळी मुचाट्यांचे वय अवघे सदतीस वर्षांचे होते. एवढ्याशा राष्ट्रसेवेच्या अल्पकाळात मुचाट्यांनी ' छत्रपती शिवाजी ', ' अफझुलखान वध ', ' वाजी प्रभु देशपांडे ', शाहिस्त्याची धुळधान ', ' तानाजी मालुसरे ', ' कित्तुर चन्नम्मा राणी ', ' उमाजी नाईक ', ' महात्मा बसवेश्वर ', ' हुतात्मा बाबू गेनू ', ' हुतात्मा मल्लाप्पा धनशेट्टी ', ' सरदार भगतसिंग ', ' महात्मा गांधी ', ' पंडित नेहरु ', ' सुभाषचंद्र बोस ' इत्यादी सुमारे पंचविसावर पोवाडे लिहिले आहेत आणि आपल्या ओजस्वी वाणीने गायिले आहेत. वीर विभूतिपूजन हे मुचाट्यांच्या पोवाड्यांचे पहिले वैशिष्टय सांगता येईल. विषयांचे नावीन्य हे दुसरे वैशिष्टय आणि श्रोत्यांच्या मनाची पकड झटकन घेईल अशी आकर्षक रचना हे तिसरे वैशिष्टय सांगता येईल. राणा प्रतापाच्या पोवाड्याचा प्रारंभ शाहीर मुचाट्यांनी कसा केला आहे ते बघा !

" रजपूत वीर अग्रणी । क्षात्रकुलमणी । धुरंधर रणी । प्रतापसिंह महाप्रतापी थोर ।
ज्यानं राष्ट्रार्थ बांधुनिया जोर । केलं स्वातंत्र्य युद्ध घनघोर ॥ जी जी ॥"

किंवा राणी चन्नम्माच्या पोवाड्याचीही सुरुवात बघा.[१०६]

" धन्य धन्य राणी चन्नम्मा । बनविला जिनं रणांगणी
गोऱ्यांचा खिम्मा ॥"[१०७]

मुचाट्यांच्या कवनांची भाषा प्रासादिक, शुद्ध, रसाळ आणि अर्थवाहक आहे. मुचाट्यांची प्रतिभा चित्रदर्शी आहे आणि तिला कल्पकतेचे सामर्थ्य लाभलेले आहे. उमाजी नायकाच्या पोवाड्याचा शेवट त्या दृष्टीने बघण्यासारखा आहे. फितुरीचे प्रायश्चित्त फितुरी करणाऱ्याला मिळालेच पाहिजे हे काव्यातील न्यायाचे तत्त्व मुचाट्यांनी पोवाड्याचा शेवट करताना मोठ्या कल्पकतेने साधलेले आहे. फाशीवर जाण्यापूर्वी बहिणीच्या हातून तांब्याभर पाणी पिण्याची इच्छा उमाजी व्यक्त करतो. बहीण त्याची ती इच्छा पूर्ण करते. त्यावेळी उमाजी पाण्याचे एक दोन घोट घेता घेता गहिवरून बोलतो,

" काय कमी पडलं ग तुला ? म्हणून घात असा मम केला ?
पाठीच्या सख्या भावाला । वैऱ्याच्या हाती त्वा दिला ।
आणि सकळ नारी जातीला । काळिमा रांडे लाविला ।
तुजवाणी स्त्रिया जगताला । लायक नसती जगण्याला
असं म्हणून मारला फेकून । तांब्या बहिणीला ॥ जी जी ॥"

चाल, " तात्काळ झाली गत प्राण । कवटी भंगून तीथ बहिण
जगातून केली नाहीशी पार । साहेब झाले बघून थंडगार ।
कवी सिद्राम कवन गाणार ॥" [१०८]

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत पण विस्तारभयास्तव आवरते घेणे भाग आहे. राष्ट्रीय पोवाड्याने मुचाटे मराठी वाङमयात अमर झालेले आहेत.

कवी आणि शाहीर एकनाथ यादव निफाडकर– एकनाथ यादव निफाडकर हे प्रामुख्याने राष्ट्रीय वृत्तीचे कवी आहेत. स्वतः शाहीर म्हणवून घेण्यात आणि शाहिरी पद्धतीची कवने गाण्यात त्यांना भूषण वाटते. 'सतीचा शाप' या काव्याच्या प्रारंभी निफाडकर म्हणतात,

" विनायकारे कलिजा माझ्या दे आशीर्वाद
पराक्रमाचा तुझाच घेतो डफ हा शाहीर ॥"

'सतीचा शाप', 'मधुमालती', 'तारागड', 'सोनपत पानपत अथवा सोक्षमोक्ष' (अपूर्ण) ही त्यांची खंडकाव्ये आहेत. पोवाड्यासारखीच पण निर्यमक रचना करणे हे निफाडकरांचे वैशिष्टय. निफाडकरांनी स्फुट कविता लिहिलेली असून ती त्यांच्या 'काव्यानंद मुंजुषा' या कवितासंग्रहात आलेली आहे. काव्यसंपादक म्हणूनही निफाडकरांचा लौकिक आहे. 'सतीचा शाप' हे गुजराथ भूपति करण व त्याचा अमात्य असलेल्या माधवाची रूपसुंदरी नामक कन्या यांच्या कथानकावर आधारलेले, करुणरम्य, मनाला विषण्ण करणारे व नीतीची शिकवण देणारे सुप्रसिद्ध खंडकाव्य आहे.

शाहीर गो. रा. हिंगणेकर– ज्या अर्थाने निफाडकर शाहीर आहेत त्याच अर्थाने 'दख्खनचा वीर' आणि 'पावनखिंड' ही शिवचरित्रावरील ओजस्वी खंडकाव्ये लिहिणारे गो. रा. हिंगणेकर प्रसिद्ध आहेत. पहिले अफझुलखानांच्या वधावर आधारित असून दुसरे 'बाजीप्रभू देशपांडे' यांच्या पराक्रमावर आधारित आहे. या काव्यांच्या द्वारे हिंगणेकरांनी वीर विभूतिपूजन साधलेले आहे. 'काव्यकुंज' या नावाचा हिंगणेकरांचा स्फुट कवितांचा संग्रह प्रसिद्ध असून त्यातील अनेक कविता राष्ट्रीय स्वरूपाच्या आहेत. विस्तारभयास्तव उदाहरणे देणे अशक्य आहे परंतु राष्ट्रीय वृत्तीचे शाहीर आणि कवी म्हणूनही हिंगणेकरांचा लौकिक आहे.

शाहीर सखाराम गोविंद वीरकूड– निफाडकर, हिंगणेकर यांचे समकालीन राष्ट्रीय वृत्तीचे प्रतिभावंत शाहीर आणि कवी म्हणून पदवीधर विरकुडांचा लौकिक आहे. 'कर्मवीर तानाजी मालुसरे', 'महाराष्ट्र शाहीर गोविंदाग्रज', 'महाराष्ट्राची सवाई थर्मापिली' (पावनखिंड) आणि लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर लिहिलेली, 'शुक्ल पक्षातील अमावस्या' ही सुप्रसिद्ध विलापिका अशी चार खंडकाव्ये गाजलेली आहेत. वीरकुडांनी अनेक राष्ट्रीय स्फुट कविता लिहिल्या असून त्या सर्वांचा परामर्श घेणे एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. राष्ट्रीय वृत्तीचे एक थोर कवी म्हणून विरकुडांना महत्त्वाचे स्थान आहे. 'अखिल भारतीय शिवस्मारक', 'साहित्याचे कोरे पान', 'महाराष्ट्र साहित्यास, इत्यादी कविता उदाहरणादाखल सहज सांगता येण्यासारख्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांजवळ पारतंत्र्यासंबंधी खंत व्यक्त करताना वीरकूड सांगतात,

" स्वातंत्र्यातुनी अवनत झालो पारतंत्र्य पाशी
चित्र पहा ते, चित्र पहा हे म्हणशी आम्हाशी
जीवन्मृत जे आम्हि फेडितो जन्माची वेठ
मरुनि अमर होण्याचे देशी प्रत्यक्षची पाठ ॥" (अखिल भारतीय शिवस्मारक)

भावोत्कटता, कल्पनावैभव आणि भाषेची ऐट यांनी वीरकुडांची कविता सरस आणि सुरस उतरली आहे.

शाहीर बाबुलनाथ यांची राष्ट्रीय कविता– विनायक शामराव काळे उपाख्य शाहीर बाबुलनाथ हे एक प्रतिभासंपन्न राष्ट्रीय वृत्तीचे कवी आणि शाहीर आहेत. 'आकाश गंगा', 'जलधारा', 'मुंग्यांचे वारुळ', 'प्रभंजन', 'धुंवाधार', 'रसराज जगन्नाथ', 'स्वामी रामतीर्थ', 'त्रिशूळ', 'गीत वर्षाव' इत्यादी नऊ काव्यसंग्रहांतून बाबुलनाथांनी विपुल कवितालेखन केलेले असून 'त्रिवेणी' या संग्रहात त्यांची तीन ऐतिहासिक खंडकाव्ये आलेली आहेत. 'आजचे रणकंदन', 'राष्ट्रीय निशाण', 'होऊ शिपाई', 'हिंदूंनो उठा', 'आता या पुढे' या गीतांसारखी अनेक राष्ट्रीय गीते त्यांच्या या कवितासंभारात विखुरली आहेत. 'भारत मातेस', 'अर्गळची राणी' यासारख्या कविता त्यांच्या प्रतिभेची आणि ओजस्वितेची साक्ष देणाऱ्या आहेत. त्यांच्या 'त्रिवेणी'तील खंडकाव्य वंगप्रेमकवी 'चंडिदास आणि रामी-धोबीण' यांच्या आंतरजातीय प्रेमविवाहावर रचलेले असून त्यातून कवीने सुधारणावादाचा पुरस्कार केलेला आहे. दंडेलीने वा वाममार्गाने मिळविलेले सुख माणसाला फार काळ उपभोगता येत नाही हा दैवी न्याय सांगणारी आलमगीर औरंगजेब आणि जैनाबादी यांच्या जीवनावरील कथा आहे. तिसऱ्या कथेतील कथानक राजपुत्र संभाजी आणि नववधू गोदावरीचे आहे. वृद्ध वडिलांबरोबर सासरी जाणाऱ्या नववधू गोदावरीचे संभाजीने केलेले अपहरण, तिची लिंगाणा किल्ल्यात रवानगी; तिने तीन दिवस अन्नपाणी वर्ज्य करणे, संभाजीचे तीन दिवसांनंतर आगमन, त्याच्या कृत्याची तिने केलेली निर्भर्त्सना, तिच्या वडिलांच्या तक्रारीवरून शिवाजी आणि जिजाबाई यांनी संभाजीला कठोर शिक्षा करण्याचा घेतलेला निर्णय, संभाजीकडून आपले पावित्र्य भ्रष्ट झालेले नाही अशी गोदावरीची साक्ष, मात्र तिचा सती जाण्याचा अंतिम निर्णय आणि आपल्या चितेला संभाजीने अग्नी द्यावा अशी तिची अखेरची इच्छा इतक्या विविध अद्भुत रम्य करुणोदात्त घटनाप्रसंगांनी ही कथा अतिशय प्रभावीपणे बाबुलनाथांनी रंगविली आहे. एका भारतीय रमणीच्या पातिव्रत्यधर्माची आणि शुद्ध चारित्र्याची आदर्श कहाणी चितारण्यात कवी यशस्वी झाला आहे. 'बीं'च्या थोरातांच्या कमलेपेक्षा गोदावरीची कथा वेगळी आहे. परपुरुषाचा वैषयिक भावनेने झालेला केवळ स्पर्शही साध्वीचे जीवन अमंगल करतो अशी ही पावित्र्याची उदात्त कल्पना कवीने मांडली आहे. तिच्या अखेरच्या इच्छेने पश्चात्ताप झालेला संभाजी म्हणतो,

" विचित्र आज्ञा, विचित्र इच्छा तुझी सती माऊली
काय तूं वेळा ही आणली ?
कमी जाहल्या नशिबा मधल्या शिक्षा म्हणुनी मला
भयंकर देशी तूं आजला ?"

या काव्याचा शेवट कवीने संभाजीच्या पुढील आत्मनिवेदनानेच केला असून तो मोठा सूचक आहे. संभाजी म्हणतो,

" हा तुझ्या चितेला अग्नि देतो बरे
तव दिव्य पराक्रम शरीरि माझ्या शिरे
तुज समान मानी मरण मला दे खरे
रायगडाच्या पंचक्रोशी घडली अपुली कथा ।
खरी ही दोन जीवांची व्यथा ।।" [१०९]

(– राजपुत्र संभाजी आणि सती गोदावरी)

भावनोत्कटता, कल्पनाचातुर्य आणि भाषाशैली यांच्या त्रिवेणी संगमाने करुण कोमल आणि भव्योदात्त कथा अतिशय हृदयंगम झालेली आहे. उच्च प्रकारची संस्कृती हे राष्ट्रीयत्वाचे एक गमक आहे. त्यादृष्टीने ही यशस्वी अशी राष्ट्रीय कथा आहे. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटीश राजवटीत पोस्ट खात्यात नोकरी करणाऱ्या या शाहिराने अनेक कवितांतून आपल्या स्वातंत्र्यप्रेमाचा आणि राष्ट्रभक्तीचापरिचय दिलेला आहे. राष्ट्रीय कविता या दृष्टीनेच त्यांच्या काव्याचे मूल्यमापन केले तर ते एक श्रेष्ठ राष्ट्रकवी असल्याचे मान्य करावे लागते.

आणखी काही शाहीर मंडळी– ज्यांनी राष्ट्रीय कवितेची परंपरा समृद्ध करण्यासाठी पोवाडे किंवा तत्सदृश कवने निर्माण केली अशा लोककवींची संख्या राष्ट्रीय कवींपेक्षा अधिक आहे. प्रबंधाच्या पृष्ठमर्यादेत त्या सर्वांचा परिचय देणे अशक्य असल्याने त्यांची श्रेय नामावलीच सादर करीत आहे. त्यात वि. गो. साठे, रं. वि. खाडिलकर, शाहीर अनंत, "अडविलकर", श्रीधर अभ्यंकर, दा. ना. आपटे, उमातनय, बी. डी. कराडकर, श्री. प्र. काणे, आर. आर. कामत; शां. अ. कारखानीस, शं. स. कुंभार, वि. रं. कुलकर्णी, शाहीर केशव, अ. ब. कोल्हटकर; वि. ना. कोल्हटकर, ब. ग. खापर्डे, र. वि. खानविलकर, श्री. शां. गुप्ते, ग. वि. गोखले, एम्. एन्. जाधव, टी. एल्. जामगेकर, के. मा. जेधे, नी. स. जोशी, स. ल. ठोसर, जी. के. डबीर; बी. के. डोंगरे, रा. शं. दळवी, म. रा. दातार, स. ना. दातार, मा. कृ. दाभाडे, वा. भा. दामले; श. वि. दिवेकर, एच्. व्ही. देशपांडे, वा. गो. देशपांडे, धनुर्धर, वि. ग. घारप, वि. वि. घुपकर; कि. फा. बनसोडे, द. न. निंबगावकर, सरोज हृदय, सरला बाला, सोपानदेव, शांतादेवी परदेशी इत्यादींचा सन्मानपूर्वक समावेश करावा लागतो.

या सर्व शाहिरांनी इतिहासकालातील पृथ्वीराज चव्हाण, शिवाजी महाराज, बापू गोखले यांच्यापासून तो आधुनिक काळातील वासुदेव बळवंत फडके, लो. टिळक, सावरकर, भगतसिंह; नेहरु, सुभाष यांच्यापर्यंतच्या राष्ट्रपुरुषांचे अंतःकरणपूर्वक पूजन केले असल्याचे आढळते.

शाहिरी वाङ्मयाचे कलादृष्टचा मूल्यमापन– राष्ट्रीय स्फुट कवितेच्या तुलनेत विचार केला असता अनेक पोवाडे काव्यदृष्टचाही श्रेष्ठ प्रतीचे रचिले गेले आहेत. पोवाडयांची निर्मिती प्राधान्याने राष्ट्रभक्ती प्रज्वलित करण्यासाठी झालेली असल्याने व ते लोकजागृती आणि लोक-शिक्षणाचे एक प्रभावी साधन असल्याने त्यात प्रचाराचा भाग अधिक असणे स्वाभाविक आहे. पण प्रचार असूनही शाहिरांनी रसोत्कटतेच्या मूल्याला दृष्टिआड केल्याचे आढळत नाही. पोवाडयांचे विषय ठराविक आहेत तरीही प्रत्येक शाहिराने आपल्या कल्पकतेने त्यात आकर्षकता निर्माण केलेली आहे. आपल्या कवनांची रंजकता वाढविताना पारंपरिक साहित्यातून आलेल्या दृष्टांताची उचित स्थळी योजना केलेली आढळते. पोवाडयाच्या निवेदनात सुबोधता, गतिमानता आणि जिवंत संवादा-तून नाटयात्मकता आल्याने पोवाडे स्फुट कवितेपेक्षा अधिक परिणामकारक ठरलेले आहेत. पोवाडयांचा महत्त्वाचा विशेष असा की त्यांचे आवाहन रसिकांच्या अंतःकरणातील सर्वसामान्य भावनांना असल्याने शोकांतिकेप्रमाणे ते समूहाच्या अंतःकरणाची सहज पकड घेण्यात यशस्वी ठरले आहेत. हजारो लोकांचे एकाच वेळी उद्‌बोधन आणि रंजन करण्याचे कार्य पोवाडयांनी प्रभावीपणे केलेले आहे. पोवाडे वाचले जात नाहीत. शाहिरांच्या मुखातून ते आवेशाने आणि वीरश्रीने गायिले जातात. पराक्रमी पुरुषांचे जीवनचित्र निवडक घटनाप्रसंगांनी रेखाटण्यात शाहिरी साहित्य आघाडीवर आहे. या दृष्टीने 'अफझुलखानाचा वध', 'पावनखिंडीचा वीर', 'वसईचा वेढा', 'सेनापती बापू

गोखले ', ' झांशीची राणी लक्ष्मीबाई ', ' सरदार भगतसिंग ', ' उमाजी नाईक ' इत्यादी पोवाडे अभ्यासण्यासारखे आहेत.

ऐतिहासिक खंडकाव्ये आणि महाराष्ट्र गीते– पोवाड्यांच्या खालोखाल ऐतिहासिक खंडकाव्यांची निर्मिती करून अनेक कवींनी राष्ट्रीय कवितेचे दालन संपन्न व समृद्ध केलेले आहे. प्रा. रा. श्री. जोग यांनी या खंडकाव्यांची गणना राष्ट्रीय कवितेतच केलेली आहे. काहींचे ऐतिहासिक स्वरूप वरवरचे आहे. या कालखंडातील कवींनी, शाहिरांनी भारतमातेची गाणी गायिली आहेत पण बंगाली कवींप्रमाणेच महाराष्ट्राची गाणी गाण्यात अनेक कवींनी अपूर्व उत्साह दाखविला आहे. महाराष्ट्रभूमीची गीते गाण्यात कवी विनायक, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, माधवराव पटवर्धन, पांगारकर, तुळजापूरकर, श्री. कृ. कोल्हटकर, स. अ. जोगळेकर, यशवंत, वीरकुंड इत्यादी कवी प्रमुख आहेत.

ऽऽ

संमिश्र वैचारिक प्रभावाचा कालखंड
(१९३५ ते १९५०)

मानवतावादी राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद आणि व्यक्तिवाद

संमिश्र वैचारिक प्रभावाच्या या कालखंडात परंपरावादी राष्ट्रवादाची पिछेहाट झाल्याचे दृश्य आढळत असल्यामुळे अस्मितादर्श राष्ट्रवादी कवितेच्या ओहटीचा कालखंड असेही या कालखंडाचे वर्णन करता येईल. या कालखंडातील राष्ट्रीय कवितांचा आणि कवींचा अभ्यास करण्यापूर्वी या काळातील प्रमुख राजकीय घटनांची पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक ठरते. १९३५ चा सुधारणा कायदा ही या कालखंडातील महत्त्वाची घटना. या कायद्यामुळेच सात राज्यांत काँग्रेस पक्षाची कायदे मंडळे आणि मंत्रिमंडळे प्रथमच अस्तित्वात आली. स्वदेशी राजवटीचा श्रीगणेशा झाला आणि काँग्रेस पुरस्कृत राष्ट्रीय योजनांना चालना मिळाली. या घटनेमुळे तीव्रतेने चालविण्यात येणाऱ्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाची तीक्ष्णधार आपोआप बोथट झाली.

१९३९ मधील दुसरे जागतिक महायुद्ध, स्वतःच्या अधिकारात भारताच्या व्हाईसरॉयने इंग्लंडच्या वतीने भारताने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारल्याची घोषणा. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी दाखविलेल्या अविश्वासाच्या निषेधार्थ काँग्रेस मंत्रिमंडळाचे राजिनामे, पुन्हा स्वराज्याच्या लढ्याची घोषणा, तर स्ट्रॅफोर्ड स्क्रिप्स या ब्रिटीश प्रतिनिधीशी स्वातंत्र्यासाठी काँग्रेस पुढाऱ्यांच्या वाटाघाटी, स्क्रिप्सच्या स्वातंत्र्याच्या योजनेला नकार, १९४२ ची 'चले जाव'ची चळवळ, युद्धपातळीवर चळवळ दाबून टाकण्यात ब्रिटीश सत्तेला मिळालेले यश, भारताला स्वतंत्र करण्याचे नेताजी सुभाष बोस यांचे प्रयत्न, आझाद हिंद फौजेची निर्मिती आणि जपानच्या सहकार्याने ब्रिटीश सैन्याशी युद्ध, ब्रिटीश आरमारातील हिंदी सैनिकांची बंडाळी, अमेरिकेने केलेल्या जपानवरील ॲटमबाँबच्या प्रयोगाने दुसऱ्या जागतिक महायुद्धाची समाप्ती, युद्धामुळे ब्रिटिशांची झालेली आर्थिक आणि मनुष्यबळाची प्रचंड हानी, भारतीय सैन्यावरील उडालेला विश्वास, मित्र राष्ट्रांचे दडपण आणि युद्धातील विजय या सर्व घटनांमुळे ब्रिटिशांनी आपल्या सत्तेचे उदक भारतीयांच्या हातावर सोडले. मात्र जाताना अखंड भारताचे विभाजन केले. जातीय दंगलींचा डोंब उसळला. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. १९४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींची हत्या व १९४९ मध्ये गणराज्याची निर्मिती, इतक्या प्रमुख घटना या कालखंडात आहेत.

महाराष्ट्रधर्माचे पुनरुज्जीवन आणि संतांचा व्यापक मानवधर्म यांचा पुरस्कार करणारे राष्ट्रवादी कवी अनिल (जन्म १९०१ मृत्यू १९८२)

एक ज्येष्ठ भावकवी, मुक्तछंदाचे प्रवर्तक, समाजशिक्षणयोजनेचे शिल्पकार, मराठी साहित्यविषयक चळवळीतील अग्रगण्य, उमदे आणि रसिक कार्यकर्ते म्हणून आत्माराम रावजी देशपांडे

उपाख्य कवी अनिल हे महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. रवि किरण मंडळाच्या व्यक्तिनिष्ठ वर्तुळात काही काळ भ्रमण करून पुढे समाजाभिमुख असे काव्य अनिलांनी निर्माण केलेले आहे. 'फुलवात' (१९३२), 'भग्नमूर्ती' (१९४०), 'निर्वासित चिनी मुला' (१९४३), 'पेर्ते व्हा' १९४७ यानंतर 'सांगाती', 'चिरयौवन' आणि शेवटी 'दशपदी' हे त्यांचे स्फुट आणि खंड काव्यांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. १९३५ ते १९५० या कालखंडातील कवितेचा अभ्यास अभिप्रेत असल्याने उत्कट प्रेमगीते असलेला 'फुलवात' वगळून 'भग्नमूर्ती', 'निर्वासित चिनी मुलास' आणि 'पेर्ते व्हा!' एवढ्याच कवितासंग्रहांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे.

वि. का. राजवाडयांच्या राष्ट्रवादी कल्पनांचा प्रभाव– अनिलांच्या विकसनशील समाजाभिमुख व्यक्तित्वाचा प्रत्यय आंतरभारतीची प्रतिष्ठा लाभलेल्या त्यांच्या 'भग्नमूर्ती' या खंडकाव्यातून सहजपणे येतो. रामटेक येथील एका भग्न मंदिराचे आणि त्यातील भग्नमूर्तीचे दर्शन होताच वैयक्तिक सुखदुःखाच्या पातळीवर विचार करणारे कवीचे मन आता समाजाच्या, राष्ट्राच्या पातळीवरून विचार करू लागते. ते अत्यंत व्यथित होते. शिल्पांच्या, मूर्तींच्या आणि संस्कृतीच्या विनाशासंबंधी अंतर्मुख होऊन सखोल, व्यापक चिंतन करू लागते. विनाशाचा मागोवा इतिहासात घेऊ लागते आणि त्यातून एका राष्ट्रीय खंडकाव्याचा उदय होतो. अनिलांच्या या राष्ट्रीय चिंतनाचे स्वरूप बव्हंशी वि. का. राजवाडयांच्या प्रदीर्घ ऐतिहासिक चिंतनावर, समाजजीवनावर आणि संस्कृतिस्वाभिमानावर अधिष्ठित इहवादी राष्ट्रवादासारखे आहे. या राष्ट्रवादाला राजवाडयांनी 'महाराष्ट्र धर्म' असे नाव दिलेले आहे. परंपरागत वर्णाश्रमधर्मात आधुनिक राष्ट्रनिर्मितीस लागणारी बहुतेक सर्व तत्त्वे आहेत असे राजवाडयांचे मत होते. 'राष्ट्र रक्षण', 'राष्ट्र विकास' आणि 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' हे राजवाडयांच्या राष्ट्रवादाचे साध्य होते. भगवद्गीता व दासबोधादी समर्थ वाङ्मय हे या राष्ट्रवादाचे आधारग्रंथ. श्री शिवाजी महाराज ही या धर्मातील आराध्य देवता आणि भगवान श्रीकृष्णाचा प्रवृत्ति-पर कर्मयोग, शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धान्त आणि सनातन धर्मनिष्ठा हे त्या परंपराप्राप्त राष्ट्रवादाचे सांस्कृतिक घन आहे. अनिलांच्या चिंतनशील राष्ट्रवादाचा ऐतिहासिक चिंतन हाच आधार आहे. म्हणूनच तर ते सांगतात,

> "केवढया विशाल कलाकृती ह्या,
> निर्मात्री संस्कृति त्यांच्या मागली
> जिचे होत्या त्या चैतन्य, प्राण, पडल्या येथे ध्वस्त होऊन।
> संस्कृतिच देते जन्म कलेला,
> चैतन्य, विलास तिचाच असे, कला आणि विद्या,
> जणू मोहरच वृक्षावरला।... ... ...
> .....ह्यास्तव संस्कृति कला, विद्यांचे पोषण करी आणि रक्षण,
> ओळखली जाते पुढे संस्कृति त्यांच्या योगेच अस्तित्व तिचे त्यांच्यावरच॥"

स्वतःच्या संस्कृतीमध्ये ज्याला स्वाभिमानाने जगावयाचे असेल त्याने संस्कृतिविनाशाचे रहस्य इतिहासाच्या दर्शनातून शोधले पहिजे. अनिल म्हणतात,

> "आधी पोखरिली जाते संस्कृति
> तिच्यातील तेज नाहीसे होते, लयाला जाते विचार सामर्थ्य,

बनतात केवळ विद्या तात्त्विक केवळ निरुपयोगी,
चैतन्यहीन, विसंगतच लोकजीवनाशी "

आणि मग शेवटी ...

" हळूहळू मग नाहीसे होते सामर्थ्य देखील संरक्षणाचे
उपेक्षिले जाते सारेच तंत्र निजरक्षणाचे, संघशक्तीचे "

भगवान श्रीकृष्णाच्या विचारात आणि तत्त्वज्ञानात प्रचंड प्रेरक शक्ती आहे हे सांगताना अनिलांनी कुरुयुद्धाचाच दाखला दिला आहे.

प्रज्ञाहताची नेभळी तत्त्वे निराशेने बोलणाऱ्या हतबुद्ध अर्जुनाला

" तेव्हा प्रेरिले भगवंताने, तेजस्वी विचारे आणि तत्त्वज्ञानाने
गीता–उपदेश कर्मयोगाचा, तयाला केला । उत्साहे उठला अर्जुन योद्धा ।
चेतलेला त्या तत्त्वज्ञानाने । मिळविता झाला महाविजय !"
" आणि समर्थ रामदासाने । शिवरायाने छत्रपतीने । जागृत केले महाराष्ट्राला
कसे ऐकता समर्थ बोल । मराठयांना आले शौर्य सामर्थ्य ।
' अरे वन्हि तो चेतवावारे । चेतविताच चेततो ' असे निघता वचन
रामदासाचे । चेतलाच देखा स्वातंत्र्य वन्हि । महाराष्ट्रभर ।।"

इहवादाच्या उपेक्षेचे परिणाम– वासना, शरीर व कर्म अशी मानवी संस्थांच्या चरित्राची त्रिविध परंपरा राजवाडयांनी सांगितली आहे. व्यक्ती, वर्ग आणि राष्ट्र यांच्या भ्रमणालाही वर सांगितलेली त्रयीच कारण ठरते, असे सांगून इहवादच राष्ट्र बलवान किंवा सामर्थ्यवान ठरवीत असतो. इहवादाकडे पूर्णपणे पाठ फिरवून केवळ अभ्युदयाचा स्वीकार करतात ते निसर्गाच्या नियमानुसार नष्ट होतात. " महातत्त्ववेत्ते धर्मसंस्थापक येथे पाहा किती होऊन गेले महावीर बुद्ध आचार्य पूज्यपाद सारे निःशंक वंद्य ..... कल्याणासाठीच झटले सारे, मानवजातीच्या आणि जगाच्या ।" पुढे अनिल सांगतात,

" त्यांच्या त्या आत्म्याच्या मुक्तीसाठीच
स्वरेच दिसला स्वर्ग तयांना । पडले सदाचे दास्य पंकात ।
मेलेल्या मने । नाचवले इह वैभवालाहि "
" संस्कृतीत न्यून हेच आमुच्या आम्ही उपेक्षिले इह जगाला ।
तुच्छ लेखिले इह वैभवा । कर्मफलाचे कमनशिबी ।
तत्त्वज्ञान बाळगले उराशी ।।"

रक्षणतंत्राची अवहेलना– इहवादाची उपेक्षा आणि त्यातून झालेली रक्षणतंत्राची अवहेलना हिंदुसंस्कृतीला नडली. त्यातच व्यक्तिवाद, पंथोपपंथ, जीवनाविषयीचे औदासीन्य, कणखर वृत्तीची उपेक्षा इत्यादी कारणांनी आपल्या राष्ट्रीय जीवनाला कशी अवकळा आली हे अनेक उदाहरणे देऊन अतिशय हृदय–द्रावकतेने कवीने वर्णन केलेले आहे. या रक्षणतंत्राच्या उपेक्षेने केवळ सुंदर भव्य अशा मंदिराचा आणि मूर्तीचाच विध्वंस झाला नाही तर ही शिल्पे निर्माण करण्यात ज्यांनी पुढाकार घेतला, त्या त्या लक्षावधी मानवी मूर्तींचाही या जंगली आक्रमकांनी विनाश केला. त्यांनी उद्ध्वस्त

केलेली शिल्पे, मूर्ती आपली करुण कहाणी सांगू शकली पण मानवी शिल्पे कालोदरात गाडली गेली. 'भग्नमूर्ती' च्या द्वारे सुचविण्यात आलेला हा ध्वनी लक्षात घ्यावा म्हणून कवी सांगतो,

" जेव्हा राहतात सारेच लोक, ओळखून जीवनैक्य सर्वांचे,
तेव्हाच नांदते शक्तिसामर्थ्य, स्वरक्षणाचे प्रतिकाराचे ॥"

या पंक्तीतून कवीने राष्ट्रधर्माचे रहस्यच कथन केलेले आहे.

या खंडकाव्याच्या शेवटी नवजीवनाच्या पुनरुत्थानाचा आशावादी संदेशही कवीने दिलेला आहे. कवी सांगतो,

" तापलेल्या भूमीत दडलेल्या ह्या नव बीजांना । फुटणार खास नव अंकुर
समृद्ध होईल धरणी पुन्हा । विराजेल येथे नवे, शूर राष्ट्र ॥"

राष्ट्राच्या अधोगतीला कारणीभूत होणाऱ्या तत्त्वांचा त्याग आणि उपयुक्त तत्त्वांचा स्वीकार केला म्हणजे तुम्हाला गुलाम म्हणून ठेवण्याची कुणाचीही प्राज्ञा नाही असे शेवटी कवीने सुचविले आहे.

" असलात जरी आज वामन । वाढ खुंटलेले, खुजटलेले, दबले,
दाबले चारही बाजूंनी । तरीही धरा त्रिविक्रमरूप दाबा
पायाखाली बळी काळाला ॥"

असे सांगून हे राष्ट्रीय खंडकाव्य कवीने संपविले आहे. स्वतंत्र खंडकाव्यातून उपयुक्ततावादी राष्ट्रधर्माचे उद्‌बोधक तत्त्वज्ञान क्वचितच एखाद्या कवीने केलेले आढळेल. 'भग्नमूर्तीच्या' निमित्ताने अनिलांनी केलेले हे राष्ट्रीय तत्त्वांचे चिंतन अपूर्व असेच आहे. 'भग्नमूर्ति' नंतर सात वर्षांनी लिहिलेल्या भग्नमूर्तीचे पुनर्दर्शन या कविवेत कवीने काहीसा निराशावादाचा सूर काढलेला आढळतो.

अतिरिक्त वैचारिकतेच्या दडपणाखाली दबलेली पाल्हाळीक व अवडंबरपूर्ण, शुष्क नि कंटाळवाणी अशी अनिलांची खंडकाव्ये आहेत अशा भावार्थाचा एकसुरी अभिप्राय प्रा. भ. श्री. पंडितांनी दिलेला आहे.[१] डॉ. अ. ना. देशपांडे यांना त्यात "एकाच वेळी वास्तवता आणि आदर्शलक्षी असलेल्या या काव्यात भावनात्मकता आणि वैचारिकता यांचा अत्यंत हृदयंगम आणि स्फूर्तिदायक संयोग घडून आल्याचे "[२] आढळले आहे. श्री. ना. ग. जोशी यांच्या अभिप्रायाचा भावार्थ असा की या काव्यात विचारसृष्टीचे फारच प्रगल्भ दर्शन घडते आणि कवीचे मन राष्ट्रसमाजाच्या पातळीवर गेल्याचा साक्षात्कार होतो.[३] डॉ. वा. भा. पाठक म्हणतात, " मूठभर रानटी लोक उभ्या राष्ट्राला कसे मोडतात ? या प्रश्नाचे उत्तर तो (कवी) शोधतो आहे." (कवीने) "भग्नमूर्तीत मानवाच्या संस्कृति-ऱ्हासाचे हृदयद्रावक चित्रण केले आहे."[४] भग्नमूर्तीच्या दर्शनाने अंतर्मुख होऊन राष्ट्रीय कर्तव्याच्या भूमिकेतून अनिलांनी हे काव्य लिहिलेले आहे.

निर्वासित चिनी मुलास– निर्वासित चिनी मुलास हे १९४३ मध्ये प्रकाशित झालेले अनिलांचे दुसरे खंडकाव्य. दुसऱ्या जागतिक महायुद्धात जपानने चीनवर आक्रमण केले. या आक्रमणाने अनेक चिनी कुटुंबांची वाताहत झाली. जपानी साम्राज्यवादाची शिकार झालेल्या नि आईबाप, बहीणभाऊ इत्यादी आप्तस्वकीयांना मुकलेल्या एका निर्वासित चिनी मुलाची करुण कहाणी अनिलांनी या काव्यातून सांगितली आहे. त्या बालकाच्या रूपाने व्यक्त झालेली 'पराकोटीची असहायता' पाहून कवीचे कोमल मन अनुकंपेने थरथरले, संतप्त झाले. या काव्यासंबंधी अभिप्राय देताना डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " भग्नमूर्तीत मांडलेला आदर्श राष्ट्रीय संस्कृतीच्या पुनःस्थापनाचा आहे तर या

काव्याची भूमिका अधिक व्यापक म्हणजे शुद्ध आंतरराष्ट्रीय स्वरूपाची व मानवहितवादी आहे. भग्नमूर्तीतील दगडांच्या छिन्नभिन्न मूर्तींच्या प्रतीकांच्या मानाने या काव्यातील चिनी बालक हे प्रतीक निस्संशय अधिक मानवी व अधिक जिव्हाळा उत्पन्न करणारे आहे. " भग्नमूर्तीच्या निर्मितीनंतर कवीचे मन अधिक विकसित झालेले आढळते. राष्ट्रवादाकडून व्यापक अशा आंतरराष्ट्रीय वादाकडे, मानव कल्याणाकडे त्याची वाटचाल झालेली आहे. हा मानवतावाद म्हणजेच मानवतावादी राष्ट्रवाद होय. गांधीजींनी याच मानवतावादी राष्ट्रवादाचा आयुष्यभर पुरस्कार केला हे लक्षात घेतले पाहिजे.

चिनी मुलांच्या दुःखाच्या सहानुभावाने ओथंबून आलेले कविमन ते दुःख निर्माण करणाऱ्या समाजरचनेबद्दल, राजकीय विचारसरणीबद्दल प्रक्षुब्ध झालेले असून ते दुःख निर्माण करणाऱ्यांचा अंत होवो अशी शापवाणी उच्चारत आहे. " त्या जीर्ण जगाच्या चितेतूनच । उजाडणार आहे अमर पक्षी नव्या स्थितीच्या नवव्यवस्थेच्या, नव आदेशाचा, नवाकांक्षांचा घेत जगदंड स्वपक्षाखाली ।" जुन्या जगाने केलेल्या अन्यायाचे पापक्षालन करावयाचे तर नवे जग निर्माण करूनच हे होणारे आहे. त्या नव्या आदर्श जगाचे भावात्मक स्वरूपही अनिलांनी सांगितले आहे. ते म्हणतात,

" उरेल न भीति मानवांचीच, संहाराचे शोध लावे जी बुद्धि,
करील ती उभा सर्वांच्यासाठी, मानवहिताचा – समाहाराचा, नवा संसार !!"

या काव्यासंबंधी अभिप्राय देताना ना. ग. जोशी म्हणतात, " प्रेम गीतातील वैयक्तिकता व भग्नमूर्तीतील राष्ट्रीयता यांची पुढची पायरी वरील काव्यातील मानवता होय. मानवधर्म ही प्रेमधर्माचीच अंतिम अवस्था आहे."[१]

'पेर्ते व्हा' तील राष्ट्रीय कविता– 'फुलवात' या पहिल्या कवितासंग्रहानंतर १९४७ मध्ये प्रकाशित झालेला अनिलांचा 'पेर्ते व्हा' हा दुसरा स्फुट कवितांचा संग्रह. 'निर्वासित चिनी मुलास' या खंडकाव्यापूर्वीच्या एक दोन वर्षातील व नंतरच्या काळातील कविता या संग्रहात आलेल्या आहेत. समाजाभिमुखता हे या संग्रहातील कवितांचेही वैशिष्ट्य आहे. 'प्रेम आणि जीवन', 'प्रीती तुझी माझी' या कवितांतून अनिलांनी आपली जीवनविषयक आणि काव्यविषयक भूमिका मांडलेली आहे. पत्नीप्रेमातही कुसुमाग्रजांप्रमाणे त्यांची सामाजिक जाणीव जागृत असल्याचे आढळते.

" प्रीति तुझी माझी नाही निराळेपणाची
जगातल्या सुखदुःखी मिळालेपणाची ।" (– प्रीति तुझी माझी)

जीवनाचा प्रत्येक जिवंत क्षण त्यातल्या आशा निराशांसह उष्ण रक्ताने तळमळून अनुभवल्याचे सांगून कवी म्हणतो,

" अजूनी न माझा रोमांच त्यातील ओसरलेला । तीच आहे माझी
आजीव सेवा, जीवनाची आणि मानवतेची ।" (– विशेष)

आपली भूमिका अधिक स्पष्ट करून सांगताना कवी म्हणतो,

" कारण नाही मी प्रीतिशाहीर । प्रीतीचे रडगाणे गाणारा ।
शाहीर आहे मी तेजस्वी गाणे गाणारा, प्रीतीच्या आशावादाचा ॥"
(– प्रेम आणि जीवन)

अनिलांचा मानवतावादी राष्ट्रवाद प्रवृत्तिवादाकडे झुकलेला आहे. इहवादी जीवनानुरक्तीने त्याचे पोषण झालेले असून आशावादाच्या उत्साहाने तो मुखरित झालेला आहे.

" अजून ऊन रक्त हे भरे नसानसांतुनी ।
तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारुनी । विरक्ति ? छे ! सदानुरक्ति !
भक्ति ? प्रेम भक्त मी ! तरंग ऊर्मि प्रीतिच्या अजून यौवनात मी ।।"
किंवा (– चिर यौवन)

" जीवनातली निशा संपवित । वाहवीत आशांचा वारा
पसरवीत तव तेज उषेचे । निज तेजासह प्रभात तारा " (– प्रभात तारा)

मानवतावादाचा पुरस्कार– ' पेर्ते व्हा ' तील ' मानवता ', ' बंड ', ' सुप्त ज्वालामुखी '; ' धडकी ', ' पेर्ते व्हा ', ' प्रेम आणि जीवन ' इत्यादी कवितांतून अनिलांनी पुरस्कारिलेल्या मानवतावादाचे व मानव जातीबद्दलच्या अपार सहानुभूतीचे दर्शन घडते. मानवजातीच्या सुख-दु:खाचे आपण सर्वंच वाटेकरी आहोत अशी सहानुभूतीची नि समतेची भावना ' मानवता ' या त्यांच्या प्रसिद्ध कवितेतून व्यक्त झालेली आहे.

" अन्याय घडो कोठेही । चिडून उठू आम्ही
घाव पडो कोठेही । तडफडू आम्ही...
अवघ्या अभाग्यांचे अश्रू । उभे आमच्या डोळ्यात ।
दु:खितांच्या वेदनांच्या । कळा उरात आमच्याही ।
कारण मानव तेही मानव आम्ही ।।" (– मानवता)

' बंड 'मध्ये क्रांतीचा संदेश आहे.

" आहो घेऊन घ्यास । हटविण्यास हल्ले ।
शत्रूचे मानवमात्राच्या । किल्ले उडविण्यात त्यांचे ।।"

' धडकी 'तूनही क्रांतीचा उद्घोष कवीने केला आहे. कवी म्हणतो,

" खास उद्या उठतील हे भुके कंगाल । आणि लोक सारे जग
निष्ठावंत । सोडून भ्रांति करीत क्रांति । भविष्य दिसून रोमांच
स्फुरून येत थरथरून धडकी सरे ।।" (– धडकी)

" सुप्त ज्वालामुखीत ' विषमतेचे पोषण करणाऱ्या जगाला निर्वाणीचा इशारा आहे. कवी म्हणतो,

" पृथ्वीच्या अथांग उदरातूनी । उकळत आहे आत तप्त रस ।
वरती फुललेल्यांनो । घ्यानात ठेवा । आहे खालती सुप्त ज्वालामुखी ।।"
(– सुप्त ज्वालामुखी)

परिस्थितिवादाचा स्वीकार– काही कवितांतून अनिलांनी परिस्थितिवादाचा स्वीकार केल्याचे आढळते. ' गरीब आणि पावसाळा ', ' भग्नमूर्तीचे पुनर्दर्शन ', ' काम आणि आराम ', ' सुप्त ज्वालामुखी ' ही त्यांची उदाहरणे सांगण्यासारखी आहेत. ओला कोरडा दुष्काळ, गरिबीचे दैन्यमय जीवन, भांडवलशाही शोषण आणि दुबळी आत्मवंचक भेकड मनोवृत्ती यांचे दर्शन कवीने घडविले

आहे. ही अशी विषम परिस्थिती असली तरी तिच्यातून मार्ग काढता येईल असा दिलासाही कुठे कुठे कवीने दिला आहे. परंतु परिस्थितिवादाचा प्रभाव अधिक जाणवणारा आहे. अनिलांच्या ' पेर्ते व्हा ' या कवितेवद्दल दि. के. बेडेकर म्हणतात, " अंतर्मुखतेच्या काव्यनिर्मितीमध्ये अनिलांच्या काव्योद्गारांना ' पेर्ते व्हा ' मधील ' पावश्या ' पक्षाच्या उद्गारामुळे अग्रदूताच्या ललकारीचे महत्त्व आहे."[७] क्रांतीची गीते गाणाऱ्या अनिलांच्या ' पेर्ते व्हा 'तील कविता लक्षात घेऊन डॉ. वि. स. जोग म्हणतात, " साम्यवादी मानवतावादाचा सावेश पुरस्कार करणारे अनिल भूतदयावादी मानवतावादाच्या आहारी गेले. वैयक्तिक प्रेमभावनेच्या कोंडीतून सुटलेले अनिल पुन्हा त्यात अडकले. शब्दसौंदर्याचा आविष्कार आवडीने करू लागले. राष्ट्रवादी ऊर्मी उफाळून आल्या."[८] अनिलांची राष्ट्रवादी ऊर्मी उसनी वाटत नाही. ती त्यांनी चिंतन करून स्वीकारलेली अशी विवेक-निष्ठ आहे. ती कठोर आत्मपरीक्षणावर आणि उपयुक्ततावादावर आधारित आहे. साम्यवादी देवधर्म मानत नाहीत. अनिल धार्मिकवृत्तीचे आस्तिक आहेत. ' दुरितांचे तिमिर जावो विश्व-स्वधर्मसूर्ये पाहो ।' या संतांच्या परंपरेचे अभिमानी आहेत. त्यांची भाषा आधुनिक असल्याने ती क्रांतीचीच वाटते पण तिचा सूर उत्क्रांतीचा आहे. भारतीयांच्या अद्वैतवादात समतेचे तत्त्व अनुस्यूत असल्याने त्याचा ठिकठिकाणी अनिलांनी पुरस्कार केलेला आहे.

समारोप– काव्यदृष्ट्या अनिलांची राष्ट्रीय कविता श्रेष्ठ प्रकारची आहे. मुक्तछंदातून तिची अभिव्यक्ती झाल्याने ती ओजस्वी उतरली आहे. मुक्तछंदाच्या प्रवर्तकांपैकी अनिल प्रमुख कवी आहेत. त्या छंदाचे तंत्र व मंत्र सांगणारी विपुल चर्चा त्यांनी केलेली आहे. भग्नमूर्तीसंबंधीचा प्रा. रा. श्री. जोगांचा अभिप्राय मार्मिक आहे. ते म्हणतात, " आहे या स्वरूपातही विषयामधील वैशिष्ट्याने, व्यापक सांस्कृतिक विचाराने व प्रौढ लेखनशैलीमुळे ते उच्च दर्जाचे काव्य ठरते. मुक्त छंदामधील इतके प्रदीर्घ असे पहिलेच काव्य म्हणूनही त्यांचे स्थान महत्त्वाचे मानावे लागते."[९] अनिलांच्या अनेक कविता लाक्षणिक अर्थाने संपन्न आणि ' प्रतीकात्मक ' आहेत. ' पेर्ते व्हा ', ' सुप्त ज्वालामुखी ' ही त्यांची उदाहरणे. अनिलांनी आपल्या काव्यातून राष्ट्रधर्म आणि मानवधर्म यांचा पुरस्कार केलेला आहे. म्हणूनच राष्ट्रीय कवी म्हणून त्यांना गौरविले पाहिजे.

क्रांतीच्या जयजयकाराची निर्भयतेने गर्जना करणारे ध्येयप्रवण राष्ट्रकवी कुसुमाग्रज
(जन्म १९१२)

जीवनपरिचय– [प्रकाशपूजक !' ' अग्नि संप्रदायी ', ' यज्ञ संप्रदायी ', ' विद्युल्लतेच्या तेजात लेखणी बुडवून अग्निरेखेने काव्य लिहिणारे आणि काव्यातून क्रांतीच्या मार्गाचा ओजस्वी पुरस्कार करणारे मानवतावादी कवी ' म्हणून ओळखले जाणारे विष्णू वामन शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांचा जन्म नाशिक येथे झाला. आधुनिक मराठी कवितेला लागलेली ओहटी थोपवून " महाराष्ट्र कवी परंपरा । खंड न पडला तिला जरा " असा आत्मविश्वास निर्माण करणारे अनिलांच्या काल-खंडातील प्रतिभासंपन्न कवी म्हणजे कुसुमाग्रज. केशवसुतांची चिंतनशीलता, गोविंदाग्रजांची कल्पकता, ' बीं 'चे तत्त्वचिंतन, बालकवींचे निसर्गप्रेम आणि तांब्यांची नाट्यात्मकता कुसुमाग्रजांना प्रभावित करून गेलीही असेल पण त्यांच्या क्रांतीच्या जयजयकाराची प्रेरणा, ध्येयप्रवण राष्ट्रवादाची प्रेरणा ही त्यांच्या नाशिकची, स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद आणि महाकवी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची आहे. " अनादी मी, अनंत मी, अवध्य मी मला " असे ' आत्मबल ' या कवितेत अमरत्वाचे स्तोत्र

गाणाऱ्या सावरकरांची प्रेरणाच " मृत्युंजय आम्ही । आम्हाला कसले कारागार ?" या कुसुमाग्रजांच्या पंक्तीतून प्रकट झालेली आहे.

' वादळवेल ' या कविता संग्रहातील ' बोळ ' ही कविता सावरकर परंपरेची जिवंत साक्ष आहे.

" याच कोंदटामधून फुटल्या त्या मृत्युंजय ज्योती
घुमसत गेल्या ठिणग्या ज्यांच्या त्रिखंड पृथ्वीवरती
काळोखावर याच पसरला असला दिव्य धुमारा
धुक्यातुनी वर तळपत आला एक तांबडा तारा
मरणाचा द्रव काढुनी येथे लिहिली जीवन गाणी
वधस्तंभ येथून उसळले उसळे काळे पाणी
' सुंदर मी होणार ' म्हणाला इथे पांगळा एक
करीत बसला निज स्वप्नावर रक्ताचा अभिषेक "

स्वातंत्र्यनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आणि मानवनिष्ठा या तीन निष्ठांनी कुसुमाग्रजांचे व्यक्तिमत्त्व साकार झालेले आहे. त्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेचे एक गमक म्हणजे कुसुमाग्रज सरकारी नोकरीकडे वळले नाहीत. मामा शिंदे यांच्या सहकार्याने जवळ होते नव्हते ते वेचून त्यांनी ' गोदावरी सिनेटोन ' या नावाची एक चित्रपट संस्था काढली. परंतु या व्यवसायात ते पूर्ण अयशस्वी झाले. जबर आर्थिक फटका बसला आणि दारिद्र्य स्वीकारावे लागले. शेवटी त्यांनी या रुपेरी जगाचा कायमचा निरोप घेतला. नंतर मोठ्या उमेदीने ते वृत्तपत्र व्यवसायात शिरले. प्रतिभासंपन्न कवी, श्रेष्ठ नाटककार, कादंबरीकार, कथाकार आणि ललितलेखक या विविध रूपाने आज प्रसिद्ध आहेत पण त्यांचा मूळ पिंड मात्र कवीचा आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितांचाच अभ्यास प्रस्तुत विवेचनात अभिप्रेत असून १९५० पर्यंतच्या ' जीवन लहरी ', ' विशाखा ' आणि ' किनारा ' या कवितासंग्रहांतील कवितांचाच विचार करण्याचे ठरविले आहे.

जीवनदृष्टी– कुसुमाग्रजांच्या राष्ट्रीय कवितांचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनदृष्टीचा परिचय करून घेणे महत्त्वाचे ठरते. ' जसे जीवन तसेच काव्य ' असे जीवन आणि काव्याचे अद्वैत त्यांच्या जीवनात आढळते. ज्या निष्ठा त्यांनी जीवनात स्वीकारल्या त्या निष्ठांचा आयुष्यभर त्यांनी निर्भीडपणे पुरस्कार केला. वि. स. खांडेकर म्हणतात, " त्यांचा मनःपिंड साधुत्वाची पूजा करीत बसणाऱ्या विरक्त किंवा स्थितप्रज्ञ तत्त्वचिंतकाचा नाही. तो सौंदर्य आणि सामर्थ्य यांची पूजा करणाऱ्या कवीचा आणि क्रांतिकारकाचा आहे. या श्रद्धेमुळेच त्यांच्या राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी कवितांना चांगले तेज चढते."[१०] आपल्या जीवनदृष्टीसंबंधी त्यांनीच ' वैष्णव ' या कवितेत म्हटलेले आहे.

" बलहीनांचा नत पाइक मी । प्रबलांचा नेता
उन्मत्तांचा अजिंक्य वैरी । दलितांचा त्राता
आकाशापरि उदार माझी गहन गाढ प्रीती
दास्य अनीती, सहानुभूती । हीच मला नीती
... जुमानितो ना जातिवर्ण मी । कर्म बंधने वा
एक मानतो मी मानवता । योग्य तिची सेवा ।।" (– वैष्णव)

' स्वगत ' या कवितासंग्रहातील पहिल्याच कवितेत ते म्हणतात;

" दारिद्र्यासारखा शाप नाही
पृथ्वीच्या पाठीवर
इतके अमंगल, इतके दुःखदायक, इतके भेसूर दुसरे पाप नाही ।
जोपर्यंत माझ्याजवळ गीतासाठी शब्द आहेत,
शब्दासाठी श्वास आहे ... तोपर्यंत
याच ध्रुवपदाचा याच ध्रुवपदाचा माझ्या गीताला ध्यास आहे ।।" (– ध्रुवपद)

समाजाभिमुखता आणि समाजसापेक्षता ही त्यांच्या जीवनदृष्टीची एक महत्त्वाची बाजू आहे. त्यामुळे त्यांच्या आत्मनिष्ठ वाटणाऱ्या प्रेमकवितांतूनही त्यांच्यातील समाजाभिमुखतेचे दर्शन घडते. त्यांचा नायक एका ठिकाणी म्हणतो,

... " नभ नाविक मी कुठवर राहूं । या आकुंचित जगि गुदमरुनी
करी मुक्त विहंगम हा रमणी ।।" (– आस)

कुसुमाग्रजांची जीवनासंबंधीची जाणीव उथळ नसून ती व्यापक आणि विशाल आहे. म्हणूनच किनाऱ्यावर आलेला नायक आपल्या प्रेयसीला गंभीरपणे सांगतो–

" होय किनाऱ्यावरती अपुले । आज सखे हे मंगल मीलन
जीवित दर्यापरि, नसे ते – केवळ सुंदर केवळ भीषण ।" (– किनाऱ्यावर)

भव्योदात्त जीवनाची ओढ– भव्योदात्त जीवनाची ओढ हे कुसुमाग्रजांच्या जीवनदृष्टीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रकाशपूजनाचे, अग्नी प्रज्वलित करण्याचे त्यांना आकर्षण आहे. आपल्या कवितांना त्यांनी समिधा म्हटले आहे. या समिधांची आकांक्षा सांगताना ते म्हणतात,

" जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आन्तर अग्नि क्षणभर तरि फुलवावा ।।" (– समिधाच सख्या या)

जीवनात काहीतरी भव्यदिव्य निर्माण करण्याची अदम्य मनीषा ठेवण्यालाच त्यांनी खऱ्या अर्थाने जीवित संबोधले आहे. ' टिळकांच्या पुतळ्याजवळ ' या कवितेतील जीवनाच्या संदर्भात त्यांनी केलेले हे चिंतन त्यांच्या उदात्त, भव्य जीवनदृष्टीची साक्ष देणारे आहे. म्हणूनच त्यांची पृथ्वी आपल्या प्रेमगीतात म्हणते,

" परी भव्य ते तेज पाहून पुजून । घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा । तुझी दूरता त्याहुनी साहवे ।"
(– पृथ्वीचे प्रेमगीत)

या सूर्याच्या प्रेयसीप्रमाणेच भव्यतेची उदात्ततेची ओढ त्यांच्या दर्यासारंग कोलंबसालाही आहे. तो गर्वाने म्हणतो,

" कोटयावधी जगतात जिवाणू जगती अन् मरती ।
ते। गवतांची पाती ... ...
.....मार्ग आमुचा रोधू शकती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा

मानवतेचे निशाण मिरवू महासागरात ।
जिंकूनी खंड खंड सारा ॥" (– कोलंबसाचे गर्वगीत)

ध्येयवाद्यांचा मार्ग हा नेहमीच कंटकाकीर्ण असतो. कुसुमाग्रजांच्या जीवनदृष्टीबद्दल प्रा. नि. शं. ठकार म्हणतात, " कुसुमाग्रज राष्ट्रवादी असले तरी त्यांचा राष्ट्रवाद सावरकरी नाही. पण सावरकरांच्या काव्याचे भव्योदात्त रूप व त्यांची मृत्युंजयता, त्यांची ध्येयासक्ती व व्रतनिष्ठा यांचा स्वीकार त्यांनी केलेला आहे. त्याला एका काव्यात्मपातळीवर चित्रित केले आहे." [११]

राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यप्रेम आणि पारतंत्र्याची तीव्र जाणीव– राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यप्रेम आणि पारतंत्र्याची तीव्र जाणीव ही एकाच राष्ट्रभावनेची तीन वेगवेगळी रूपे आहेत. राष्ट्रप्रेम अंतःकरणात उत्कटतेने वास करीत असेल तर ते स्वातंत्र्यासाठी वेडे झाल्याशिवाय राहणार नाही आणि पारतंत्र्याच्या तीव्र जाणिवेने ते अस्वस्थ होऊन त्याचा प्रक्षोभ झाल्याशिवाय राहणार नाही. राष्ट्रप्रेमाचा वारसा कवी गोविंद, महाकवी स्वा. सावरकर यांच्याकडून परंपरेने घेऊनच कुसुमाग्रज राष्ट्रीय कवितेच्या क्षेत्रात संचार करीत आहेत. त्यामुळेच ' क्रांतीचा जयजयकार ', 'माझा हिंदुस्थान', 'जय भारता', 'मातीचा पुत्र', 'माता', 'निळे चक्र', 'मायदेशचा वारा', 'व्यर्थ न हो बलिदान', 'हा काठोकाठ कटाह भरा' अशा श्रेष्ठ राष्ट्रीय कवितांची ते निर्मिती करू शकले. राष्ट्रप्रेमाने ओथंबून " हे मातृभूमी तुजला मन वाहियेले ॥" म्हणणाऱ्या महाकवी सावरकरांसारखेच कुसुमाग्रजांचे अंतःकरण आहे. त्यांची ' क्रांतीचा जयजयकार ' ही कविता अशाच एका सर्वस्पर्शी व सर्वव्यापी राष्ट्रीय भूमिकेवर आपणास घेऊन जाते. 'डमडमच्या तुरुंगात' अन्नसत्याग्रह करणाऱ्या देशभक्त वीरांची कहाणी कुठल्या तरी वृत्तपत्राच्या कचेरीत बातम्यांची भाषांतरे करीत असताना व काही मजकूर लिहीत असताना कुसुमाग्रजांनी वाचली आणि त्यांच्या संवेदनाक्षम कविमनावर ओरखडा उठला. त्यातून ' धारा रक्ताची ओघळली ' वेदना बोलली, रक्त पेटले व धगधगणाऱ्या अंगारमय मनःस्थितीत कवी लिहून गेला. [१२]

" गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार ॥"

त्या देशभक्तांनी शेवटी आपल्या श्वासाबरोबर भारतमातेला अखेरचा निरोप पाठविला. ते आपली वेदना प्रकट करून सांगू लागले,

" श्वासांनो जा वायुसंगे ओलांडूनि भित
अन् आईला कळवा अमुच्या हृदयातिल खंत
सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार "

जिच्यासाठी जीवनअर्घ्य द्यायला सत्याग्रही सिद्ध झाले ती त्यांची भारतमाता, त्यांची आई मोठी वैभवसंपन्न आहे. कुसुमाग्रज सांगतात,

" हिमाचलाचे हीरकमंडित शिर भूषण भरदार
वक्षावर गंगायमुनांचे रुळती मौक्तिकहार

कटीस तळपे मराठमोळचा गोदेची तरवार
महोदधीचे चरणाजवळी गर्जतसे आव्हान ।।" (– माझा हिंदुस्थान)

पारतंत्र्याची खंत– कुसुमाग्रजांनी आरंभी लिहिलेल्या 'जीवनलहरी' त अनेक ठिकाणी या पारतंत्र्यासंबंधी चीड व्यक्त केलेली आहे. दास्य हीच घोर अनीती आहे असे कवीला वाटते.

" जुलुमाविण अन्य न हो। क्रूर पाप जगती हो
दास्याहूनि नाही दुजी। घोर अनीतीहि जशी ।।" (– जीवनलहरी)

दुसऱ्या एका ठिकाणी कवी म्हणतो,

" परदास्याहून दुजे। काही अपवित्र नसे
समते परि पुण्य न हो। जुलुमापरी पाप न हो।।" (– जीवनलहरी)

देवाचे या विश्वातील अस्तित्वच संशयास्पद समजले पाहिजे अथवा तोही दीनदलित मानवासारखा दास्यात जखडला गेला असला पाहिजे असे विचार कवीने मांडलेले आहेत.

" दुर्बल हो बलसागर, निष्ठूर हो करुणाकर
अथवा या दलितापरि, देवही दास्यात रुते। " (– जीवनलहरी)

या शेवटच्या जीवनलहरीतील उपहास अत्यंत जळजळीत असून दास्याची जाचक तीव्रता त्यातून व्यक्त झालेली आहे. 'गुलाम', 'बंदी', 'बलिदान' या कविता प्रतीकात्मक असून त्यातून या गुलामगिरी-विरुद्ध सरळ सरळ 'बंड' करण्याचे आवाहन कवीने केलेले आहे. मात्र या बंडाची परिणती बलिदानात झाल्याचे दाखविले आहे. हे बलिदान प्रेरक आहे.

" तनु दुभंग झाली आणि थांबले चाक।
घंटाध्वनी घुमला गंभीर आकाशात ।।" (– गुलाम)
" आणि बंदी खग क्षुब्ध होत भारी
मारि धडका धडधडा बंद दारी ।।
शांत झाला अन् शेवटी शिणोनी
जाय भरुनी पण पिंजरा पिसांनी ।।" (– बंदी)

स्वातंत्र्यप्रेम आणि त्याकरिता हौतात्म्याची सिद्धता कवीने अनेक ठिकाणी व्यक्त केलेली आहे. 'माझा हिंदुस्थान', 'जय भारता', 'बलिदान', 'मातीचा पुत्र', 'निळे चक्र', 'वनराज आणि शुक्र' या कविता त्याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. १९४३ मध्ये कुसुमाग्रजांनी लिहिलेली 'माता उदासीन झाली' ही कविता बघा--

....." अर्धनग्न ती पडे कुशीवर। भूवर लोळे मलीन लक्तर।
दिसे काळजाखालिल धूळित रक्ताची लाली ।।" (– माता उदासीन झाली)

१९४२ च्या क्रांतीसाठी झालेले बलिदान व्यर्थ ठरू नये असे कवीला वाटते. हा स्वातंत्र्यासाठी केलेला संग्राम वांझ ठरू नये अशी कवीची प्रामाणिक इच्छा आहे. त्यातून त्यांची स्वातंत्र्याची आकांक्षाच स्पष्ट झालेली आहे.

" बाळमुठी वळतिल बाजेवर। थरथरतिल अस्थींचे पंजर
धूळीमधोनी फुलतिल ज्वाला। धगधगतील पाषाण ।।" (– व्यर्थ न हो बलिदान)

" येशूच्या प्रेषितांनी प्रेम, शांती, क्षमेचा घोष करीत केलेली कत्तल म्हणजे जालियनवाला बाग !" [१३] हा विषय कुसुमाग्रजांसारख्या तेजाळ व्यक्तित्वाच्या कवीला न फुलवील तरच नवल ? या कवितेची सुरुवातच मुळी जळजळीत उपरोधातून होते.

" रक्ताचे नच ओघळ सुकले, अजुनी क्रुसावरचे
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे ....."

शांती अहिंसेचे श्वेत निशाण हातात घेतलेले, तुझ्या गीतांचा जयजयकार करणारे हे तुझे लोक इकडे या देशात मात्र—

" आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातात
निःशस्त्रांच्या रक्तामांसामध्ये वाहतात ।
मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलाबायकांत
जगज्जेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तीप्रद रीत ।।"

पारतंत्र्याचे किती भीषण परिणाम राष्ट्राला भोगावे लागतात याची जिवंत उदाहरणेच या कवितांच्या रूपाने कुसुमाग्रजांनी दिलेली आहेत.

मानवी जीवनातील विषमतेची भयानकता, त्यामुळे आलेली चीड आणि उफाळलेला प्रक्षोभ आणि दलितांवद्दलची अपार सहानुभूती यांचे चित्रण करण्यासाठी कुसुमाग्रजांनी अनेक कवितांची रचना केलेली आहे. राजकीय पारतंत्र्याप्रमाणेच मानवनिर्मित, आर्थिक पारतंत्र्य भयानक आहे. त्याने फार मोठ्या मानव जातीवर अत्याचार आणि जुलूम केला आहे. ही केवळ नैसर्गिक किंवा दैवी आपत्ती नाही तर बव्हंशी मानवनिर्मित अशी आपत्ती असून त्याला मानवच जबाबदार आहे असे कुसुमाग्रजांचे मत आहे. म्हणूनच रंजल्या गांजल्या दुर्दैवी दलित जीवांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य अनेक कवितांच्या द्वारे त्यांनी केलेले आहे. विशाखातील ' हिमलाट ', ' अहि-नकुल ', 'आगगाडी व जमीन', 'बळी', 'लिलाव', 'गुलाम', 'सहानुभूती', 'माळाचे मनोगत', 'पाचोळा', 'मूर्तिभंजक' ह्या कविता आणि 'किनारा'मधील 'कायदा', 'एकच गाणे', 'दीन याचक' यासारख्या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. धनाढ्य नव्हे तर गरीब लोकच हिमलाटेची शिकार बनतात असे 'हिमलाट' या प्रतीकात्मक कवितेतून सांगितले आहे.

".....पाहून परंतु कुठे कुडाची खोपी । कंगाल कांबळी टाकुनी गेली झोपी ।
शेकडो कवाडे । वाट जावया सोपी । कडकडून पडते तेथे लाव भुकेली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली ।।" (– हिमलाट)

एका गरीब जीवाचा उपासमारीने झालेला मृत्यू हा ' बळी ' या कवितेचा विषय आहे. विरोधाभासात्मक चित्रणाने त्या विषयाचे आत्यंतिक कारुण्य अंतःकरणाचा ठाव घेतेच पण एक प्रकारची चीडही निर्माण करते.

" मानवांच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या की दयेचे हे मढे ।।" (– बळी)

हे असे उघड्या रस्त्यावर प्रेत असताना भोवती चाललेला शृंगार पाहून कवीच्या अंतःकरणाचा क्षोभ होतो. तो चिडून म्हणतो,

"-- भेकडांनो ! या इथे ही साधण्याला पर्वणी
पेटवा येथे मशाली अन् झडू द्या चौघडे ।।" (– बळी)

कर्जाच्या ओझ्याखाली चिरडल्या गेलेल्या आणि शेवटी सावकाराने केवळ घरादाराचा व किरकोळ सामानाचाच नव्हे तर अब्रूचाही लिलाव मांडल्याचे करुणाजनक आणि तितकेच संतापजनक चित्र 'लिलावात' रेखाटले आहे. 'किनारा' काव्यसंग्रहातील 'कायदा' ही कविता 'बळी' सारखीच आहे.

" मातीमध्ये काष्ठापरी । पडली पहा अबला कुणी
निष्प्राण झाले नेत्र ते । ओली अजूनी पापणी
घे संगती निज अर्भका – पडले कुठे केरापरी
संग्राम वा सत्ता नको, होती हवी तिज भाकरी ।।" (– कायदा)

'अहि–नकुल', 'आगगाडी व जमीन', यासारख्या रूपकात्मक कवितांतून त्यांनी साम्राज्यवादी सत्तेला इशारा दिलेला आहे. अन्याय सहन करण्याची प्रजाजनांची एक मर्यादा असते. या मर्यादेबाहेर अन्याय अत्याचार गेल्यावर ती सत्ता झुगारून देणारे क्रांतिकारक पुढे येतात. ते हुकूमशहाचा बळी घेतात. हे तत्त्व ' अहि–नकुल ' या कवितेतील संग्रामात सांगितले आहे. त्या संग्रामाचा शेवट पुढीलप्रमाणे आहे.

" संग्राम सरे रक्ताचे ओघळ जाती, आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती,
पिंजून कापसापरी पडे तो नाग, खंड गिळाया जमले कीटक भोवती ।।"

' आगगाडी व जमीन ' मध्ये

" उलटी पालटी । होऊन गाडी ती
हजार शकले । पडली खालती ।।" (– आगगाडी व जमीन)

क्रांतिकारकांच्या आकस्मिक उठावाचे चित्रण या दोन कवितांतून दोन स्वरूपात केलेले आहे. पहिल्यात आहेत साम्राज्यशाहीला गदगदा हलविणारे देशभक्त क्रांतिकारक तर दुसरीत आहेत जनजागृती करून क्रांतीचा उठाव करणारे जननायक. 'विशाखा'तील कुसुमाग्रजांवर साम्यवादाचा दाट प्रभाव असल्याचे मत ' विशाखा ते किनारा ' या सत्यकथेतील लेखातून प्रो. धों. वि. देशपांडे यांनी मांडलेले असून 'किनारा' या संग्रहातील कवितांसंबंधी ते म्हणतात, " किनारा संग्रहातील वैष्णव पुरुषोत्तमाचा तोंडवळा गांधीवादी वळणाचा आहे. या कवितेत मार्क्सपूत लोहपुरुष दिसत नाही एवढे नक्की."[१४] डॉ. वि. स. जोगांना ' विशाखा ' मध्ये त्यांची क्रांतिपूरक अभिव्यक्ती आणि साम्यवादासारखे जहाल क्रांतिकारक तत्त्वज्ञान यांचा मनोहर मिलाप झाल्या[१५]चा साक्षात्कार झालेला आहे. दुसरीकडे कुसुमाग्रज आणि प्रभाकर अत्रे यांच्या मुलाखतीतून कुसुमाग्रजांच्या राष्ट्रवादी संस्कारांचाच प्रत्यय आल्याचे डॉ. वि. स. जोगांनी नमूद केलेले आहे.[१६] थोडक्यात या विवेचनाचे सार सांगावयाचे तर असे की, टीकाकारांनी कुसुमाग्रजांना मार्क्सवादी विचारसरणीचे कवी ठरविण्याचा प्रयास केलेला आहे. स्वतः कुसुमाग्रज राष्ट्रवादी भूमिकेला महत्त्व देताना दिसत आहेत.

मानवतावादी राष्ट्रवाद, विवेकनिष्ठ राष्ट्रवाद हा मानवतावादी मूल्यांना महत्त्व देणारा आहे. कुसुमाग्रजांच्या कविता या राष्ट्रवादाच्या भूमिकेतूनच लिहिल्या गेल्या असल्याचे म्हणता येते. त्यांचा राष्ट्रवादी आशय मान्य केला तर मग कुसुमाग्रजांची भूमिका घरसोडीची न ठरता सुसंगत ठरते आणि त्यांच्या कवितांचा आशय आणि अर्थही योग्य प्रकारे समजावून घेता येतो. डॉ. वि. स. जोगही

याच निष्कर्षाप्रत आलेले आहेत. ते लिहितात, " साम्यवाद ही आपली जीवननिष्ठा कुसुमाग्रजांनी मानली नाही. साम्यवादाचा सखोल अभ्यास करून चिकित्सापूर्वक त्यांनी स्वतःच्या व्यक्तित्वात मुरवून घेतला नाही. ..... राष्ट्रवादाचा कुसुमाग्रजांवरील प्रभाव बळकट टिकावू आहे.[१६]"

राष्ट्रीय भावनेतून क्रांतीचा पुरस्कार– म्हणूनच विश्ववंद्युत्वाच्या नव्हे तर राष्ट्रीय भावनेतूनच कुसुमाग्रजांनी क्रांतीचा जयजयकार केला आहे. त्यांच्या 'हा काठोकाठ कटाह भरा', "क्रांतीचा जयजयकार', 'बलिदान', 'आव्हान', 'अजिंक्य निर्धार', 'मेघांची सेना' या राष्ट्रीय कविता त्याचा पुरावा आहेत. आपल्या राष्ट्राला पुढे ठेवूनच कुसुमाग्रजांनी ही गीते लिहिली आहेत.

"संहारक काली तुज देती बळीच आव्हान ।
बलशाली मरणाहून आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही ! आम्हाला कसले कारागार ?" (– क्रांतीचा जयजयकार)

यातून व्यक्त होणारा आणि सर्वस्वाचा त्याग करायला शिकविणारा अभिमान राष्ट्रीयत्वाचाच आहे. दुसऱ्या एका कवितेत, लोकदेवतेचे प्रचंड सामर्थ्य कवीने व्यक्त केले आहे.

"हे लोकदेवते क्रुद्ध तुझ्या नर्तने । डळमळो पृथ्विचा तोल नभी भीतीने
राखेत लोळू दे किरीट सिंहासने । शापमुक्त त्या भूवर कर मानवता बलशाली ।।"
(– आवाहन)

'अजिंक्य निर्धार' मधून अशाच क्रांतीचा पुरस्कार कवीने केला आहे. १९४२ च्या क्रांतीच्या लढ्यावर आधारलेली 'मेघांची सेना' ही रूपकात्मक कविताही क्रांतीचा पुरस्कार करणारी आहे.

"चालली मेघांची सेना ।
समर घोष गंभीर पुकारत निघे आत्मदाना ।
चालली मेघांची सेना ।।" (– मेघांची सेना)

कुसुमाग्रजांच्या राष्ट्रीय कवितेची कालसापेक्षता– कुसुमाग्रजांच्या अनेक कविता कालसापेक्ष असून तीत तत्कालीन राजकीय घडामोडींचे, त्यांच्यातील बदलाचे स्वच्छ प्रतिबिंब पडलेले आहे. 'जालियनवाला बाग', 'जा जरा पूर्वेकडे', 'दोन याचक', 'मेघांची सेना', 'आवाहन', 'बलिदान', 'अजिंक्य निर्धार', 'किनारा', या सर्वच कविता या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. ज्या चिनी जपानी युद्धाच्या पार्श्वभूमीवर 'अनिलांनी निर्वासित चिनी मूलास' हे खंडकाव्य लिहून मानवतेचा परिचय दिला त्याच चिनी–जपानी युद्धात चाललेले राक्षसी अत्याचार 'जा जरा पूर्वेकडे' या कवितेत चित्रित केले आहेत असे प्रत्यक्ष कवीनेच सांगितले आहे.

"आर्त धावा आईचा ऐकून धावे अर्भक,
ना जुमानी बंदूक
आणि लोंबे संगिनीला छान छोटे आतडे
जा जरा पूर्वेकडे ।" (– जा जरा पूर्वेकडे)

महायुद्धाचे भयानक परिणाम सांगणारी 'फेरीवाला' ही कविता उदाहरण म्हणून सांगता येईल.

"आला हा ललकारित आला, आला फेरीवाला...
... हा घट देखा यांतिल शोणित, मेले तरि अद्याप उघाणत

उमद्या युवकांचे हो जीवित, रणांगणावर पिळून त्याचा
घट ताजा हा भरला । आला आला फेरीवाला ।" (– फेरीवाला)

स्वातंत्र्य दृष्टिपथात येताच लिहिल्या गेलेल्या ' माझा हिंदुस्थान ', ' मातीचा पुत्र ', ' जय भारता '; ' निळे चक्र ' यासारख्या कविताही कालसापेक्ष आहेत. दुभंगलेल्या देशाच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेले आईचे भग्न हृदय ' निरोप ' या कवितेत प्रतिबिंबित झालेले आहे. या कवितेला कवीनेच पुढील टीप जोडली आहे. " फाळणीच्या काळात पश्चिम पंजाबातून निर्वासितांना हालवीत असता; एका स्त्रीने आपले मूल विमानात ढकलून दिल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते." विमानतळावरील गर्दीत ती उभी होती, कारण तिथेही श्रीमंतांचीच वर्णी प्रथम लागत होती. पण,

" फेकुनिया बाळ दिले विमानी, व्हावे पुढे काय प्रभूच जाणे ।
जा पाखरा जा वणव्यातुनी या, पृथ्वीच आई पुढती तुझीरे
आकाश घेईल तुला कवेत चारी दिशांचा तुज आसरा रे ।" (– निरोप)

वीर विभूतिपूजन– कुसुमाग्रज हे पराक्रमाचे, पौरुषाचे पूजक आहेत. त्यामुळे त्यांनी वीर विभूतिपूजन आपल्या अनेक कवितांतून केलेले आहे. ' सात ' ही कविता शिवाजी महाराजांचे सेनापती प्रतापराव गुजर यांच्या एका पराभवाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आहे. दुसरी, ' पावन खिंडीत ' ही नरवीर स्वामिनिष्ठ बाजीप्रभू देशपांडे यांच्या हौतात्म्यावर आधारलेली आहे. लागलेला कलंक धुऊन काढण्यासाठी अतुल पराक्रम प्रतापरावांच्या हातून घडला. कवी सांगतो,

" ढग जात धुळीचे दूर क्षणी क्षितिजात
खग सात जळाले अभिमानी वणव्यात ।।" (– सात)

प्रयत्नांची शिकस्त करून खिंड लढविणाऱ्या बाजीप्रभूच्या अंतःकरणाची आर्तता कवीने व्यक्त केली आहे.

" होय तनूची केवळ चाळण
प्राण उडाया बघती त्यातुन
मिटण्या झाले अधीर लोचन
खड्ग गळाले भूमिवरी
सरणार कधी रण प्रभू तरी ।।" (– पावनखिंडीत)

' टिळकांच्या पुतळ्याजवळ ' या कवितेतून लोकमान्य टिळकांचे धीरोदात्त जीवनचरित्र साकार झालेले आहे. त्यांच्या कणखर, दुर्दम्य व्यक्तित्वाचा परिचय करून देताना कवी म्हणतो,

" ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
ती पाहुन सागर थबके, परते आत ।।"

टिळकांचे जीवन खऱ्या अर्थाने जीवन होते. आमचे जीवन हे आभासात्मक आहे असे सांगून, लोकमान्यांच्या जीवनाने त्यांनी तेजस्वी, प्रेरक, चैतन्यमय, कर्मयोगी, खंबीर, अशा त्यागी जीवनाचा वस्तुपाठच दिला आहे. ' नेता ', ' वैष्णव ', ' साक्षात ईश्वर ', ' ती संध्याकाळ ' या कवितांतून गांधीजींच्या विभूतिमत्त्वाचे दर्शन कुसुमाग्रजांनी समर्थपणे घडविले आहे. " वीरा, अमित तुझा महिमा ।" या ध्रुवपदाने ' नेता ' या कवितेचा प्रारंभ झालेला आहे. पुढे–

" शान्ततेत तव भरे रणांगण । दयेमध्ये निर्दय आत्मार्पण
नम्रतेत निर्धार विलक्षण । वैरातहि प्रेमा ।" (– नेता)

असे त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन केलेले आहे.

" वैष्णव मी कुसुमाहुन कोमल
वज्राहून बली । सांगाती अमरांचा, भीती मरणाची नच उरली ।" (– वैष्णव)

असे वर्णन केलेले आहे.

" ओजस्वी युगकाव्य हे बघुनिया संसार हो विस्मित
त्याचे रक्त धुळीमध्ये प्रभु लिही ही अक्षरे शेवटी
खाली पूर्णविराम अंति गळला डोळ्यातुनी अश्रुचा ।।" (– साक्षात ईश्वर)

असे त्यांचे माहात्म्य ' साक्षात ईश्वर ' मध्ये वर्णन केलेले आहे. 'नेताजी सुभाष' या दोन्ही कवितांमधून देशगौरव सुभाषचन्द्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटलेले आहे. ' अनामिकास ', ' बलिदान ' या कवितांतून देशाकरिता बलिदान करणाऱ्या असंख्य अनामिक स्वातंत्र्य सैनिकांना कवीने भक्तिभावाने वंदनके लेले असून त्यातून अंत:करणातील देशभक्त सैनिकांवद्दलचा पूज्यभाव आणि कृतज्ञता व्यक्त झालेली आहे.

दुर्दम्य आशावादी राष्ट्रकवी– महाकवी सावरकर, स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद आणि तांबे यांच्या कवितांतून आढळणारा आशावाद कुसुमाग्रजांच्या सर्वच राष्ट्रीय कवितांतून आढळतो. 'क्रांतीचा जयजयकार', 'कोलंबसाचे गर्वगीत', 'आव्हान', 'नेता', 'अजिंक्य निर्धार', 'मेघांची सेना' या सर्वच कवितांतून दुर्दम्य आशावाद प्रकट झालेला आहे. मानवतेचा महान पुजारी असलेला कुसुमाग्रजांचा ध्येयवादी कोलंबस अभिमानाने म्हणतो,

" अनंत आमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ।।" (कोलंबसाचे गर्वगीत)

क्रांतीचा जयजयकार करताना बलिदानाला सिद्ध झालेल्या हौतात्म्याच्या मुखातून

" कशास आई भिजविसि डोळे उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल ।।" (– क्रांतीचा जयजयकार)

असा अमर आशावाद कुसुमाग्रजांनी वदविला आहे.

१९३२ मध्ये महात्मा गांधीजींवर रचलेल्या ' नेता ' या कवितेतही असाच आशावाद व्यक्त केलेला आहे.

" येइल उदया सोन्याचा दिन
तुटेल हे पोलादी बंधन
दिसतील अगणित देव्हाऱ्यातून
तुझ्याच रे प्रतिमा ।।" (– नेता)

किंवा " विजयासाठी कधीच नव्हती माझी कविता
म्हणून नव्हती भीती, तिजला पराजयाची ।।"

अशी अनेक उदाहरणे देऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासारखा आहे. पण विस्तारभयास्तव दुसऱ्या मुद्याकडे वळणे आवश्यक आहे.

रोकडचा प्रयत्नवादाचा पुरस्कार– प्रयत्नवादाचा पुरस्कार हे आणखी एक कुसुमाग्रजांच्या राष्ट्रवादी कवितांचे वैशिष्ट्य आहे. जीवनातले दुःख, दैन्य, दारिद्र्य परमेश्वर दूर करील अशी सुरुवातीला कवीला आशा वाटते पण नंतर त्याचा भ्रमनिरास होतो. काही काळ परमेश्वराच्या अस्तित्वाचीच शंका कवीला वाटते आणि तो उद्गारतो,

" भित्या भावनेला शोधायासी धीर । पाषाणास थोर–मीच केले ।।"

अखेर प्रभाकर अत्रे म्हणतात त्याप्रमाणे, " आत्मशक्तीची जाणीव त्याला होते. आपणच पराक्रमाने आपली जीवनस्थिती बदलू शकतो ही नवी जाणीव त्याला झाली आणि मग तो म्हणतो,[१७]

" परततो आता रणात माघारा । शूरांचा निवारा समरात
माझ्या जीवनाचा मीच शिलेदार । व्यर्थ हा पुकार तुझ्या दारी ।।"

असा रोकडा प्रयत्नवाद कुसुमाग्रजांनी पुरस्कारलेला आहे."

मूल्यमापन– कुसुमाग्रजांइतकी जळजळीत भावनेने संपन्न अशी राष्ट्रीय कविता या कालखंडातील कोणत्याही राष्ट्रीय कवीने लिहिलेली नाही. त्यांचा राष्ट्रवादही मानवतावादी आहे. लो. टिळक, स्वा. सावरकर आणि महात्मा गांधी या तीन महापुरुषांच्या राष्ट्रीय विचारसरणीचा संमिश्र प्रभाव त्यांच्या राष्ट्रवादी कवितांवर स्पष्टपणे जाणवतो, त्या अर्थाने खांडेकर म्हणतात,तसे " कुसुमाग्रज हे मानवतेचे कवी आहेत."[१८] रा. श्री. जोगांनी कुसुमाग्रजांचे वैशिष्ट्य राष्ट्रवादाऐवजी त्यांच्या " दलितांसंबंधी त्यांना वाटणाऱ्या अपार सहानुभूतीत शोधले आहे."[१९] आणि एका अर्थाने ते बरोबर आहे. सहानुभूती, सहवेदनेतूनच येते आणि व्यापक सहवेदना राष्ट्रीय जाणिवेशिवाय निर्माण होऊ शकत नाही. म्हणूनच प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " कुसुमाग्रजांची विचारसरणी ही आरंभापासूनच बलशाली मानवतेची व तेजस्वी राष्ट्रीयतेची आहे."[२०] डॉ. वा. भा. पाठकांना " स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्राकरिता ज्यांनी आत्मबलिदान केले त्यांचा जयजयकार कुसुमाग्रजांनी आपल्या अनेक कवितांतून केल्याचे दिसते."[२१] डॉ. वा. ल. कुलकर्णींनी मात्र कुसुमाग्रजांचे वैशिष्ट्य अगदी बरोबर हेरले आहे. ते म्हणतात, " कुसुमाग्रज हे मन अस्सल भारतीयच नव्हे तर मराठी मातीतून वर आलेले मन आहे. त्याची श्रद्धास्थाने, त्याचा मूल्यविचार, त्याची स्वप्ने ह्या मातीने घडविली आहेत."[२२] हाच कुसुमाग्रजांच्या राष्ट्रवादी विचारांचा आधार आहे.

काव्यस्वरूप– या कालखंडातील सर्व राष्ट्रीय कवींमध्ये काव्यदृष्ट्याही कुसुमाग्रजांची कविता श्रेष्ठ आहे. डॉ. अ. ना. देशपांडेंच्या शब्दांत सांगावयाचे तर " प्रगमनशील जीवनमूल्यांवरील प्रगाढ श्रद्धा, नवोन्मेष संपन्न असलेली कल्पकता, सखोल भावनात्मकता व भाषासरणीतील समर्पकता व समर्थता या काव्याच्या अभिजात श्रेष्ठतेला उपकारक असलेल्या गुणांचे कुसुमाग्रजांच्या कवितेत सुंदर संमीलन झालेले आहे."[२३] डॉ. प्र. न. जोशी म्हणतात, " अजूनही त्यांची प्रतिभा म्लान झालेली नाही. प्रकाशाचा, तेजाचा शोध ती घेत आहे."[२४] कुसुमाग्रजांच्या कवितांतील नाट्य अजोड आहे, रूपकांवरील त्यांचे प्रभुत्व आश्चर्यकारक आहे, वातावरणनिर्मितीचे कसब आणि शब्दचित्र रेखाटण्याचे सामर्थ्यही वाखाणण्यासारखे आहे. वक्तृत्वसंपन्न, ओजोगुणांनी युक्त, प्रासादिक, नादमधुर अशी सुडौल भाषासरणी आणि चिंतनशील प्रवृत्तीतून होणारी सुभाषितांची निर्मिती यामुळे त्यांच्या

कवितांना लौकिक पठनाचे अधिष्ठान लाभले आहे. ' क्रांतीचा जयजयकार ', ' कोलंबसाचे गर्वगीत ', ' पृथ्वीचे प्रेमगीत ', ' अहि-नकुल ' या कविता उदाहरणे म्हणून सांगता येतील. म्हणूनच क्रांतीच्या जयजयकाराची निर्भयतेने गर्जना करणारे ध्येयप्रवण राष्ट्रकवी म्हणूनच कुसुमाग्रजांचा गौरव केला पाहिजे. आनंदाची नि अभिमानाची गोष्ट म्हणजे वि. स. खांडेकरांनंतर 'ज्ञानपीठ' या साहित्यातील सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित होण्याचा राष्ट्रीय बहुमान प्रामुख्याने त्यांच्या काव्यानेच त्यांना नुकताच मिळाला आहे.

विनम्र सेवाभावाने मातृभूमीची 'आराधना' करणारे कवी वा. ना. देशपांडे (१९०३-१९७५)

जीवनदृष्टी- व्यवसायाने शिक्षक असलेले वामनराव मार्मिक टीकाकार, प्रतिभा-संपन्न, प्रयोगशील कवी, चिंतनशील गद्यलेखक आणि महानुभाव वाङ्मयाचे संशोधक होते. ' प्रतिभा ' पाक्षिकातून ' रामशास्त्री ', ' नवयुग ' मधून ' द्रोणाचार्य ' आणि ' सुषमा ' मधून, ' तटस्थ ' या टोपण नावांनी वामनरावांनी विपुल गद्यलेखन केलेले आहे. 'आराधना' (१९३८) आणि ' अनामिका ' हे त्यांचे दोन स्फुट कवितांचे संग्रह, ' कोरकू ' हे त्यांचे खंडकाव्य १९५५ मध्ये प्रसिद्ध झाले आहे. नुसत्या ' आराधना ' या त्यांच्या काव्यसंग्रहातील कविता वाचल्या तरी त्यांच्या राष्ट्रीय जीवनदृष्टीचा परिचय होतो. राष्ट्रीय विचाराच्या दृष्टीने विचार केला तर आरंभी ते लो. टिळकांच्या आणि नंतर गांधीजींच्या राष्ट्रवादी विचारांनी प्रभावित झाल्याचे आढळून येईल. या राष्ट्रीय विचारांच्या प्रभावामुळे त्यांचे जीवन ध्येयनिष्ठ बनलेले आहे. त्यांच्या काव्यावर कवी ' बीं ' च्या चिंतनशीलतेचा आणि सौंदर्यदृष्टीचा जसा प्रभाव आहे तसा ' बीं ' च्या राष्ट्रीय भावनांचाही प्रभाव आहे.

राष्ट्रीय कविता- वामनरावांच्या ' गाऊ कसे तरी ', ' अनल ज्वाला ', ' मनीषा ' आणि ' सोहागरात ' या कविता जहाल राष्ट्रवादाच्या प्रभावातून त्यांनी लिहिल्या असाव्यात असे वाटते. ' बुद्धाच्या अस्थिस ', ' देवमान्य ', ' स्वप्नमंदिर ' या कवितांवर गांधीजींच्या मानवतावादी राष्ट्रवादाचा प्रभाव आढळतो. वामनरावांचा पिंड राष्ट्रभक्ताचा होता याचा प्रत्यय ' प्रेमाचा वाटा ' यासारख्या आत्मनिष्ठ कवितेतून देखील येतो. या कवितेतील नायक आपल्या सखीला आर्जव करून सांगतो, " आपल्या दीनदरिद्री बांधवांबद्दल करुणा येऊ दे । आर्त, दुःखी, निराधार अशांना आपल्या अंतःकरणात जागा दे."

" वाहिला ठेवा तव पायी । तयांचे करि तूं काहीही,
त्यातून बाजुस राहू दे । तेवढा तरि मज वेचू दे ।
कणही सौख्याचा लाभला जरि त्याते तेणे धन्य धन्य होई खचित मग माझे
तुच्छ जिणे ॥" (- प्रेमाचा वाटा)

पारतंत्र्यात मातृभूमीचा जयजयकार करणे अक्षम्य गुन्हा ठरतो. कसा पाहा विपरीत काळ आला आहे. बिचारा रत्नाकर तोही दास झाला आहे आणि स्वतःच्या पाठीवर शत्रूच्या नौका बिनबोभाट वाहून नेतो आहे. कवी म्हणतो,

" वद मायभूमि तू ते गाऊ कसे तरी ?
तुज गीत गावयाते धजते न वैखरी ॥ ध्रु. ॥

...तव कूस धन्य केली किती वीर पुंगवी
एकाश्रुही तुझा त्या रणरंगि रंगवी ॥"

पण आज काय दृश्य दिसते,

" गत काय पुत्रकांची तव आजला परी ?
अंगार ठेविताती निज मंदिरा वरी ॥"

कवितेच्या शेवटी या भारतात महाप्रतापी फाकडा शाहीर जन्माला यावा आणि त्याने तुझी गीते गाऊन जडा अजडालाही चैतन्य द्यावे. त्याच्या शब्दाचे सामर्थ्य सांगताना कवी म्हणतो,

" एक एक शब्द त्याचा हो वज्र वैरियां
जेते म्हणून नुरती लोकी पहावया..." (– गाऊ कसे तरी... ?)

'मनीषा' या कवितेत साम्राज्यासाठी दुबळ्या जनतेवर जुलूम अत्याचार करणाऱ्या सत्ताधीशांबद्दलची आत्यंतिक चीड व्यक्त करण्यात आलेली आहे. बलोद्धतांच्या रणतरी नष्ट करण्याचे सागरासारखे, मेघातील विजेसारखे सामर्थ्य असावे,

" वाटे मजला अंबुद होऊन । करी विजेचा आसुड घेऊन
एकामागून एक विमाने । विलया न्यावी झडपून तेणे ॥" (– मनीषा)

स्वातंत्र्याची मोहकता दाहक असली तरी तिचे कवीला पराकोटीचे आकर्षण आहे. कवी म्हणतो,

" स्वतंत्रते । तूं मोहक । दाहक । मोहकता तव कुणा न मोही ?
कोटिकोटि जन, तुला विमोहुन, स्वतःस भुलले, पूजक बनले, पूजनि रतले,
प्रेमाश्रुंनी तुला न्हाणिती ॥
त्यासच ज्वाला तुझ्या वेढिती – लपेटताती...
दग्ध करीती । नच तिला क्षिती । कुठली खंती ?
स्वतंत्रते । तव अशिच असे गत ।" (– स्वतंत्रते तू मोहक दाहक)

'जशास तसे' हा न्याय सांगणारे, पतीचा कपटाने खून करणाऱ्या दाऊदखानाचा सूड घेणाऱ्या रजपूत रमणीचे कथाकाव्य 'सोहागरात' या दीर्घ कवितेत आहे भारतीयांच्या राष्ट्रीय जीवनातील स्त्रीविषयक मूल्य कल्पना या कथाकाव्यातून वामनरावांनी प्रभावीपणे मांडलेली आहे. कटयारीने जखमी झालेला दाऊदखान सुडाची भाषा बोलतो तेव्हा गौरी उत्तरते–

" गौरी गर्जे पुन्हा, यापुढे सूड कोठला ? दारुने मम महाल आहे सारा
भरला । उडेल भडका पळात तिजवरी ठिणगी पडुनी । प्रासादासह जाऊ आम्ही
राखड बनुनी । जोहाराने क्षत्रिय कन्या वरिती मरण गति
पति लोकाते पावुन धन्या होती अंती ।" (सोहागरात)

याशिवाय 'पतिता', 'गडावरील पुनव', 'तरलेले वेद', 'क्षमा' आणि 'अमृतकुंभ' या कथाकाव्यांतूनही राष्ट्रीय आशय व्यक्त झालेला आहे.

मानवतावादी राष्ट्रीय कविता– दीन दुःखी दलित आणि श्रमिक यांच्याबद्दलचा अपार जिव्हाळा आणि सहानुभूती वामनरावांच्या 'देवमान्य', 'बुद्धाच्या अस्थिस' आणि 'स्वप्न मंदिर' या कवितांतून व्यक्त झालेली आहे. " रंजल्या गांजल्या दीनांचे शरीर । आम्हा देवतांचे हेच रे मंदिर ।"

असे व्यापक तत्त्व ' देवमान्य ' या कथाकाव्यात सांगितले आहे. विश्वशांती भंगू देऊ नये असे बुद्धाला आवाहन दुसऱ्या कवितेत आहे. ' श्रमलक्ष्मी ' ही उद्याची देवता आहे आणि ' विळा-फावडे ' ही तिची प्रतीके आहेत हे ' स्वप्न मंदिर ' मध्ये कवीने सांगितले आहे.

मूल्यमापन– वामनरावांच्या राष्ट्रीय कविता मोजक्याच असल्या तरी त्यातून व्यापक राष्ट्रीय भावनांचे यथोचित दर्शन घडते. त्यांचा पिंड संशोधकाचा, चिंतनशील लेखक आणि टीकाकाराचा असल्याने त्यांनी प्रक्षोभक अशी राष्ट्रीय कविता लिहिली नाही हे खरे आहे. विश्वधर्म व विश्वशांती यांचे त्यांना आकर्षण आहे. मात्र विनम्र सेवाभावाने मातृभूमीचे पूजन त्यांनी केलेले आहे असे नमूद करावेसे वाटते.

भूमातेच्या दुधाची महती गाणारे कवी ग. ल. ठोकळ
(जन्म १९०९–मृत्यू १९८४)

जीवनदृष्टी– प्रारंभी पुणे येथे अध्ययन अध्यापनाचे कार्य करणारे गजानन लक्ष्मण ठोकळ हे हल्ली ग्रंथसंपादन, प्रकाशन आणि ग्रंथवितरण हा व्यवसाय करीत आहेत. ' सुगीचे ' संपादक आणि ' जानपदगीते ' लिहिणारे कवी म्हणून महाराष्ट्रात ठोकळांचा लौकिक आहे. १९३८ साली त्यांचा ' मीठभाकर ' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यात इतर कवितांबरोबर काही राष्ट्रीय कविताही आलेल्या आहेत. त्या कवितांतून ठोकळांच्या जीवनदृष्टीचा व काव्यदृष्टीचा परिचय झाल्याशिवाय राहत नाही.

राष्ट्रीय कविता– ' राष्ट्रप्रेम ' हा राष्ट्रीय कवितांचा स्थायीभाव आहे. ' आईचे दूध ', 'काळ्या पाण्यावर ' या कवितांमधून तो व्यक्त झालेला आहे. या दोन्ही कविता अप्रतिम आहेत. आईचे रक्षण करणे, तिच्या स्वत्वाची जपणूक करणे हे तिच्या पुत्राचे पवित्र कर्तव्य आहे. कवी म्हणतो,

" सत्व मायभूचे अमुच्या अढळ राखण्याला ।
चंग बांधुनी हे वसलो प्राण द्यावयाला
जागता पहारा करितो फाडुनिया डोळे–
दूध आमुच्या आईचे मनगटात खेळे ॥" (– आईचे दूध)

' जन्मठेप ' काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या राजबंद्यांचे मातृभूमीच्या वियोगाचे आणि त्याच्या अंतःकरणातील मातृभक्तीचे उत्कट चित्रण ' काळ्या पाण्यावर ' या कवितेत अत्यंत प्रभावीपणे केलेले आहे. श्रीकृष्ण पोवळ्यांची एक कविता याच विषयावर आहे. कवी त्या देशभक्ताच्या वेदना सांगताना म्हणतो,

" नाही शिक्षेची खंत मला काही । प्राण माझा वाहिला तुझ्यापायी
परी आता जायचे दूर दूर । म्हणून लागे हा उलायास ऊर !
... पुन्हा नाही दिसणार मला आई । राख माझी पडणार इथे नाही
... देई आशीर्वाद तू लेकराला । तुझी माती लावितो कपाळाला ॥"
(– काळ्या पाण्यावर)

ठोकळांची ' निर्धार ' ही कविताही ओजोगुणसंपन्न आहे. कुणीतरी तरुण देशभक्तांचा ' राष्ट्रावर तुझे प्रेम नाही ' अशा शब्दात उपहास केला. त्यावर हे नाट्यगीत आधारलेले आहे. कवी सांगतो,

" देऊ नका डागण्या निघालो वैऱ्याशी झुंजण्या ।
संगीनीवर नाच कराया । विस्तवामध्ये हात धराया–असे तयारी
असली नसली शक्ती वेचून । स्वातंत्र्याचे देऊळ गाठिन
नेवोत मला तेथे बांधुन । दंडाला काढण्या । निघालो वैऱ्याशी झुंजण्या ॥"
(– निर्धार)

पारतंत्र्याची चीड आणि मराठी बाणा– ठोकळांच्या ' बंदिवान ', ' मराठा ', ' आईचे दूध ', ' गढी ', ' पन्हाळगड ' या कवितांतून पारतंत्र्याची चीड, पूर्ववैभवाचे स्मरण आणि मराठी बाणा या राष्ट्रीय वैशिष्ट्यांचे दर्शन घडते. त्यांचा ' बंदिवान ' म्हणतो, अवघड डोंगरातील विकट वाट, उधाणलेला दर्या किंवा वादळी अवसेची रात यात मी संचार करू शकतो पण,

" दैना मला ही पत्करे वेडचा परंतु या नको
वैतागलो या जीवना, दारुण बंदी ही नको ॥" (– बंदिवान)

स्वातंत्र्य जिंकून आणण्याची क्षमता मराठ्यांमध्येच आहे असे कवीला वाटते.

" दास्यामधे गुंतला आता, दडाला कुठे तो मराठा गडी ?
स्वातंत्र्य जिंकून आणावयाला तया वाचुनी शक्त नाही कुणी ॥" (–मराठा)

मराठी बाणा, परंपरेचा अभिमान आणि गेलेले वैभव याचे दुःखदायक स्मरण सांगताना कवी म्हणतो,

" जरी धूळ खाती आमुचे किरीट वैभवाचे
–जरी पार लुटुनी नेले ढीग कांचनाचे ।
तरी तेज अमुचे लवही नष्ट नाही झाले
बेफिकीर रोखा अमुच्या छातीवरी भाले !
रक्त मराठ्यांचे अंगी आमुच्या सळाळे ॥" (– आईचे दूध)

' पन्हाळगड ' तर ' व्हा मुक्त पुन्हा मंत्र असा देई पन्हाळा !' असा मंत्र देतो. ' गोंधळांतून ' सिंहगडाची ' आणि ' निजामाला जिंकणाऱ्या पेशव्यांच्या खडर्याच्या लढाईची, स्मृती प्रकट झालेली आहे.

वर्तमानकाळातील राष्ट्रापुढे असलेल्या निरनिराळ्या समस्यांचे चित्रणही ठोकळांनी आपल्या कवितांतून केलेले आहे. त्यातून आर्थिक व सामाजिक विषमता, भारताचे दारिद्र्य, शेतकऱ्यांचे दैन्य, श्रमजीवी लोकांचे शोषण इत्यादी प्रश्नांना वाचा फोडली आहे. ' भिकारीण ', ' मजूर ', ' सावकारी पाश ', ' पोट ', ' शेतकरी ' आणि ' मूठभर दाणे ' या कवितांची नुसती शीर्षके वाचली तरी त्यातून विषयाचा नि आशयाचा सहज बोध होतो. ' भिकारीण' चे शेवटचे स्वगत सूचक व हृदयद्रावक आहे. ती आपल्या उपाशी बाळाला म्हणते,

" का माई हो, अशा लाविता दार ? नाहि मी पुन्हा येणार "...
" चल भीक अतां आपण मागायला । देवाच्या जाउ घराला !"
" हिंदभूची लेकरे तीस कोटी । पोट कितीकांचे जातसे खपाटी ।" (–भिकारीण)
..." गरीबांचे शिपुनी लाल रक्त । तक्त राजाचे होय शोभिवंत ॥" (– पोट)

म्हणून शेवटी बालकाच्या शरीरावर व त्याच्या अवयवांच्या हालचालीवर कवीला क्रांतीची चिन्हे आढळली आहेत. त्या कवितेचे शीर्षक 'क्रांतीचा ओनामा' असेच आहे. "तोड जुन्या वहिवाटी मूठ आवळी हो सज्ज – नवा दांडू, नवे राज्य" (– क्रांतीचा ओनामा)

आशावादी दृष्टिकोन– ठोकळांचा दृष्टिकोन आशावादी आहे. तो 'आईचे दूध', 'मराठा', 'पुढे' या कवितांतून व्यक्त झालेला आहे. "लागे सरु घोर अंधार आता फुटू लागले तेज पूर्वेतुनी। स्वातंत्र्य नांदेल देशात माझ्या, मराठाच आणील ते जिंकुनी" असा स्वाभिमानी आशावाद आहे. 'मराठा', 'कर्णा' आणि 'गोंधळ' या कवितांतून कवीने वीर विभूतिपूजनही समर्थपणे केलेले आहे. शेवटी लिहिलेल्या कवितांत ठोकळांवरही गांधीवादी राष्ट्रवादाचा प्रभाव आढळतो. ठोकळांच्या इतर कविता मीठभाकरीसारख्या असतील पण त्यांच्या राष्ट्रीय कविता दूधभाकरीसारख्या सकस आणि पुष्टिदायक आहेत. भावनांची आत्यंतिक उत्कटता नाही, कल्पकतेची उत्तुंगताही नाही पण आईच्या नैसर्गिक दुधाचा सकस लाठेपणा तीत अवश्य आहे. म्हणूनच भूमातेच्या दुधाची महती गाणारे कवी म्हणून ग. ल. ठोकळांचा गौरव करावासा वाटतो.

गोमांतकीय बाण्याचे कवी – दामोदर अच्युत कारे
(जन्म–१९०९)

मुद्रणव्यवसाय करणारे मडगाव (गोवे) येथील कारे हे आधुनिक मराठीचे पहिले गोमांतकीय कवी. १९३४ साली श्री. कारे यांनी आपला 'नंदादीप' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. वा. ना. देशपांडे अथवा ग. ल. ठोकळ हे जसे राष्ट्रीय कवी म्हणून ओळखले जात नाहीत तसेच कारेही राष्ट्रीय कवी म्हणून परिचित नाहीत. परंतु त्यांच्याही काही थोड्या कवितांतून राष्ट्रीय भावनेचे प्रकटीकरण झालेले आढळते. 'नंदादीपा'तील एकूण कवितांची संख्याच सारी अठ्ठावन्न आहे. त्यातल्या बऱ्याच कविता निसर्गप्रेम, कुटुंबप्रेम, आध्यात्मिकता या विषयांना वाहिल्या आहेत. प्रस्तावनाकार प्रा. वा. म. जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे, "कल्पनाशक्तीचा सुरम्य विलास आणि कल्पनाविलासांना सुरम्य सात्त्विक भावनांची जोड मिळाल्यामुळे त्या कविता रसिकांना विशेष आल्हाददायक झाल्या आहेत." [२५] या सात्त्विक भावनांपैकी एक सात्त्विक भावना म्हणजेच राष्ट्रीय भावना. तिचाच शोध त्यांच्या या कवितेतून घ्यावयाचा आहे.

प्रदेशाभिमान– प्रदेशाभिमान हा राष्ट्रीयत्वाचा महत्त्वाचा घटक असून कारे यांच्या काही कवितांतून तो प्रकट झालेला आहे. या प्रदेशाभिमानाबरोबर परंपरेचाही अभिमान आलेला आहे. 'गोमान्त देवी', 'गोमांत गीत', 'दर्शन' या कविता त्या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. निसर्ग-सौंदर्याचे विपुल ऐश्वर्य लाभलेल्या गोमांतकीय मातृभूमीत कारे जन्माला आले. तिच्या अंगाखांद्यावर त्यांचा पिंड वाढला म्हणून त्या भूमीचा त्यांना अभिमान तर आहेच पण तितकाच भक्तिभावही आहे. ते म्हणतात,

"मनीषा स्वर्ग सौख्याची जराही अंतरी नाही।
रुचे माझी सदा माते धरा वैचित्र्यपूर्णा ही।
फुले, वेली, नद्या, सिंधु धरेला चित्रिती रंगी
इथे वर्णछटा नाना! – निळे सारेच त्या स्वर्गी।" (– गोमांत देवी)

'दर्शन' या कवितेत गोमांतकातील ऐश्वर्यसंपन्न उषेचे रमणीय सौंदर्य कवीने वर्णन केलेले आहे. ते एक सुंदर उषास्तोत्र आहे. 'गोमांत गीत' या प्रदीर्घ कवितेतून गोमांतकीय प्रदेश आणि निसर्ग याबरोबरच परंपरेचे वर्णनही कवीने केलेले आहे.

" राष्ट्रकूट कुल विक्रमशाली तुझेच संतान
कदंबाचिया साम्राज्याचे होसि अधिष्ठान...
यादव सेनापती दिग्विजयी मायिदेव वीर
वक्षि बहाद्दर जिवबा नेई ध्वज अटकेपार।
योगिराज सोहिरानाथ तव निःस्पृह कवि संत
राजकारणी कुशल धोरणी रामचंद्रपंत ॥"

पूर्वस्मृतीचे वर्णन करताना कवी म्हणतो,

" घन रायांतुनि देव मंदिरे किती झळकतात
पूर्वस्मृतिचे तरंग भवती वातावरणात " (– गोमान्तक गीत)

भारत मातेबद्दलचे उत्कट प्रेम– 'हिमालयास' या कवितेतून भारतमातेबद्दलचे उत्कट प्रेम कारे यांनी व्यक्त केलेले आहे. हिमालयावर केलेली ही भव्योदात्त उत्प्रेक्षाच त्यांच्या भारतभक्तीची साक्ष देणारी आहे. कवी म्हणतो,

"...विश्वी श्रेष्ठच भूमिका अजुनि ही या भारताची असे
व्योमीं तो ध्वज निष्कलंक धरुनी तूं दाविसी का असे ?"
किंवा " झालासी प्रिय पुण्य भूमि मुनिची शैलेश्वरा।" (– हिमालयास)

स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्याची खंत– गोमांतक गीतातून कवीने पारतंत्र्याची खंत व्यक्त केलेली आहे. तो म्हणतो,

" उज्ज्वल तव यश गमे जाहले आज मलूल जरी
मायभूमि ! तूं अससी आम्हा प्रियच सदैव तरी ॥"

स्वातंत्र्याची आकांक्षा व्यक्त करताना कवी म्हणतो,

" ती विभवाची, स्वातंत्र्याची उत्कर्षाचीही
पहाट मंगल तुझिया क्षितिजी उगवी लवलाही
रक्त सिंचनाविना उषा ती उदित जरि न झाली
रुधिर हृदीचे शिंपून आणू क्षितिजावर लाली।" (– गोमांतक गीत)

स्वातंत्र्यलक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी 'आत्मयज्ञ' करण्याची तयारी कवीने 'आत्मयज्ञ' या शीर्षकाच्या गीतातून केलेली आहे. कवी म्हणतो,

" नेत्रातुनी सांडून पाणी, धार चित्ती सोडून–
स्वातंत्र्य देवीला करुं। तनुचित्त वित्त समर्पण ..." (आत्मयज्ञ)

आधुनिक महात्म्याचे पूजन– ऐतिहासिक पुरुषांच्या पूजनाप्रमाणेच आधुनिक महात्म्याचे पूजनही बा. भ. बोरकरांच्या पूर्वी 'महात्म्यास' ही कविता लिहून कारे यांनी केलेले आहे. कोणत्या प्रतिकूल परिस्थितीत महात्म्याचा उदय झाला हे सांगून गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्र कारे यांनी

उत्तम रेखाटले आहे. ते म्हणतात, रक्ताचे सडे भूमीवर सांडलेले होते. हिंसा थैमान घालीत होती. दुबळे हैराण झाले होते.

" तोच मूर्तितव तपःक्लांत, कृश परि तेजःपुंज । भूषवी भारत भू–क्षितिज ।
– स्वर्गीचा संदेश जनांना वितराया आणी । सुधामय साधी नव वाणी ।
मुक्त कराया मायभूमि जी जाहली गुलाम । मांडिसी अभिनव संग्राम
इथे अनत्याचार झुंजतो भयंकर शस्त्रांशी । अहिंसा घोर प्रहारांशी ॥"

(महात्म्यास)

सामाजिकता अर्थात दीन दुःखितांबद्दलचा कळवळा– दीन दुःखितांबद्दलचा कळवळा कारे यांच्या ' दुपार ' आणि ' शापित अहल्या ' यासारख्या कवितांतून व्यक्त झालेला आहे. आगीसारख्या पेटलेल्या दुपारच्या उन्हात श्रमिकांना राबताना पाहून कवी म्हणतो,

" महालात श्रीमंती निजली । सुखोपचारी शीतल रमली
कामकरी कुणी परि रस्त्यावरि । खपती निथळित घामा ॥" (– दुपार)

स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन किती पुरातन आहे हे सत्य ' शापित अहल्या 'या कवितेतून सांगितले आहे. अगदी मोजक्याच अशा काऱ्यांच्या या कविता असल्या तरी त्यातून राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती झालेली आहे. श्री. कारे आशावादी कवी असून त्यांच्या आशावादाला प्रयत्नवादाची जोड आहे. ' आत्मयज्ञ ' या त्यांच्या प्रसिद्ध कवितेतून तो प्रकट झालेला आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितांतून गोमांतकीय वाणाच सर्वत्र आढळतो.

गांधीवादी जीवननिष्ठेशी तादात्म्य साधून आलेल्या अनुभूतीतून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय कविता लिहिणारे कवी बा. भ. बोरकर (जन्म १९१० – मृत्यू १९८४)

बोरकरांचे व्यक्तिमत्त्व– बाळकृष्ण भगवंत बोरकर हे ' कारे ' यांच्याप्रमाणेच गोमांतकीय कवी कुसुमाग्रज एकाच वेळी सामर्थ्याचे आणि सौंदर्याचे कवी म्हणून ओळखले जातात. परंतु बोरकर प्रामुख्याने सौंदर्यवादी भावकवी म्हणूनच महाराष्ट्रात परिचित आहेत. बोरकरांवर जसे तांब्यांचे संस्कार झाले तसेच मामा वरेरकर, काका कालेलकर आणि दॉन प्रापेसिय कु–रॅय ऑफॉसू ई फिगॅरेंदु या गोमांतकीय विदुषीचेही दाट संस्कार आहेत. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे; " या गोमांतकीय विदुषीने तर बोरकरांना आपला मुलगा मानून आणि त्यांचे ज्ञानक्षितिज वाढवून त्यांचा आंतरिक विकास घडवून आणला आहे. असल्या विविध व मौल्यवान संस्कारांनी बोरकरांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झालेले आहे."[२६] गोमांतक सृष्टिसौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहे. त्या सृष्टिसौंदर्याच्या सहवासात बालपणापासूनच बोरकर वावरले असल्याने ते संस्कारही त्यांच्यावर सखोल आहेत. परंतु सौंदर्यवादी भावकवी म्हणून बोरकर ओळखले जात असले तरी ते आत्मतृप्त वा आत्मनिष्ठ नाहीत. तांबे, ' बी ', कुसुमाग्रज, कांत यांच्याप्रमाणेच त्यांच्या अनुभूतीचे आणि सहानुभूतीचेही क्षेत्र विशाल आणि व्यापक आहे. सौंदर्यवादी भावकवी म्हटला की ' मी ' आणि ' तू ' ची प्रणयगीते गाणारा कवी असाच सामान्यतः अर्थ केला जातो. पण तो अर्थ योग्य नाही. पत्नीवर, कुटुंबावर उत्कट प्रेम करणारा माणूस समाजावर आणि राष्ट्रावर नव्हे तर अखिल मानवतेवरही प्रेम करू

शकतो हे कुसुमाग्रज, कांत, अनिलांप्रमाणे बोरकरांनीही सिद्ध केलेले आहे. बोरकरांची जीवनदृष्टी आणि साहित्यदृष्टी त्याची साक्ष देणारी आहे.

जीवनदृष्टी– बोरकरांनी वयाच्या विसाव्या वर्षीच आपला प्रतिभा (१९३०) या नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. त्यानंतर 'जीवनसंगीत' (१९३८), 'दूधसागर' (१९४७) आणि 'आनंदभैरवी' (१९५०) हे कवितासंग्रह एकामागोमाग प्रसिद्ध झाले. 'बोरकरांची कविता' हा मंगेश पाडगावकरांनी १९६० मध्ये संपादन करून प्रकाशित केलेला त्यांच्या प्रातिनिधिक कवितांचा संग्रह. एवढचा संग्रहातील राष्ट्रीय कवितांचाच या ठिकाणी प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. राष्ट्रीय कवितेच्या तुलनेत विचार केला तर सौंदर्यवादी भावकवितांची संख्या किती तरी अधिक आहे हे मान्य करावे लागते. पण तेवढचावरून "दूधसागरच्या" प्रस्तावनेत काका कालेलकरांनी म्हटल्याप्रमाणे, "प्रकृतीचे रूपसौंदर्य आणि दांपत्य जीवनातील प्रणय सौंदर्य ह्याचाच तो आजवर उपासक राहिला आहे." [२७] हे मत बोरकरांना अन्याय करणारे आहे. सैनिकाचे जीवन जगणारा माणूसही चोवीस तास वा महिनोगणती युद्ध करीत नाही. सौंदर्यवादी कवीही राष्ट्रीय कर्तव्य म्हणून आपल्या प्रतिभासामर्थ्याचा प्रसंगाप्रसंगाने उपयोग करीत असतात आणि परत आपल्या आवडीचे कार्यक्षेत्र निवडून त्याचाच आविष्कार करतात. म्हणूनच बोरकर म्हणतात,

"...ज्या सेवेचा मणी बांधिला । सतिसम जीवन वाहु त्याजला
ती अपुरी तो वरी विटेवरी । तिष्ठवु भगवंतास ।
अंगिकारिली ज्यांची निष्ठा । त्यांच्यास्तव ठोकरू प्रतिष्ठा ।।"

काव्यदृष्टी सांगताना बोरकर म्हणतात,

"...मौनी अमुच्या मंत्र मुक्तिचे । तपांत अमुच्या सृजन शक्तिचे
कोमल करुणेतुनी कलांचा । दिव्यानंद विलास ।.....
समिधा यातनुची काष्ठे । जाळुनि येथिल हरु अरिष्टे
निज भस्मातुन ऊर्ध्वदिशेतुन अमुचा पुढे प्रवास ।।" (– चिरंतनाचा ध्यास)

ध्येयनिष्ठ कवी आणि कलावंत यात बोरकरांनी अंतर ठेवले आहे. ते म्हणतात,

"कलावंत मागतो प्रसिद्धी शिवाय आणिक नाही
कोण मागतो काय याजला हिशेब उरला नाही
एक मागतो माणूसकी मी पुरे एवढी भिक्षा
रुद्र येतसे मागून माझ्या घ्याया सत्त्वपरीक्षा ।" (– कानफाटचाचा फटका)

बोरकरांना आपल्या सामर्थ्याची नव्हे मर्यादांचीही जाणीव आहे. महापुरुषांच्या, त्यागी देशभक्तांच्या कर्तृत्वाचे भान आहे म्हणून ते नम्रपणे म्हणतात,

"हे मित्रांनो ! भाग्य न माझे तुमच्या सम जळण्याचे
मुख मंगल निज मातृदेवीचे युग युग पाजळण्याचे
तुम्हि श्रद्धेच्या ज्योति । तुम्ही धैर्याच्या मूर्ति...
नमन तुम्हाला त्रिवार माझे, पुढच्या सर्व पिढचांचे ।" [२८] (– माझी पूजा)

उत्कट राष्ट्रप्रेम– बोरकरांच्या विचारांची व भावनांची दखल प्रा. रा. श्री. जोगांनीही घेतलेली आहे. ते म्हणतात, "प्रेमभावनेबरोबरच गंभीर विचारालाही त्यांच्या कवितेत स्थान मिळाले आहे.

' अमृत घट '; ' तेजो देवता ', ' तेथे कर माझे जुळती ' इत्यादी कवितांमधून त्याची साक्ष पटते."[१९] गंभीर विचारांच्या कवितांत प्रामुख्याने राष्ट्रीय कविताच प्रा. रा. श्री. जोगांना अभिप्रेत असण्याची शक्यता आहे. बोरकरांच्या ' हुषार भाई ', ' स्वातंत्र्याची सिंहगर्जना ', ' महाराष्ट्र गीत '; ' जळता संदेश ', ' आमुचे राष्ट्र निशाण ' इत्यादी कवितांतून उत्कट राष्ट्रप्रेम व्यक्त झालेले आहे. ' महाराष्ट्र गीतात ' कवी म्हणतो,

" राकट कणखर देश मराठा जित्या हिंदवी रक्ताचा
सरळ मनाचा सिधा सिपाई भीम जसा की कुंतीचा ।।" (– महाराष्ट्र गीत)

दुसऱ्या एका गीतात कवी राष्ट्रदेवाला प्राणपुष्प आदरपूर्वक वाहण्याचा संकल्प करतो.

" राष्ट्र देविस वाहुनी ही प्राणपुष्पे आदरे
स्वातंत्र्य नांदी गाउनी उजळू उषा सारी त्वरे ।।" (– जळता संदेश)

आमच्या देशभक्तांचे राष्ट्रप्रेम इतके उत्कट आहे की त्याचा गर्भवतीच्या गर्भातून देखील हुंकार ऐकायला येतो."

गर्भवतीचे गर्भ पुकारित सुटले जयहिंद
स्वातंत्र्याच्या जयघोषांनी गिरीदरी धुंद ।" (– हुतात्म्यांची जागृती)

अशी अनेक उदाहरणे देऊन हा मुद्दा स्पष्ट करता येईल. पण विस्तारभयास्तव थांबणे भाग आहे.

गुलामगिरीचा तिटकारा– उत्कट राष्ट्रप्रेम हा स्थायिभाव. बोरकरांना गुलामगिरीचाही तिटकारा आहे. त्यांना पारतंत्र्याची मनस्वी चीड आहे. ' इमानी कुत्र्यास ', ' जळता संदेश '; ' लोक सागरा ' इत्यादी कविता त्यादृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. गुलामगिरीत सुख मानून त्या सुखाचे समर्थन करणाऱ्या दास्य वृत्तीच्या लोकांचे अत्यंत प्रभावी चित्रण ' इमानी कुत्र्यास ' या रूपकात्मक कवितेत केलेले आहे. कवी म्हणतो,

" जरि तुझ्या धन्याच्या सुटल्या सूं सूं गोळ्या
रक्ताच्या अमुच्या फुटल्या जरि आरोळ्या
रे, मोड आपुले कान, मिटुनि घे डोळे
तू चघळ हाडके, चघळ सुखाने पोळ्या ।।" (– इमानी कुत्र्यास)

स्वाभिमानी माणसाला पारतंत्र्याची चीड वाटली पाहिजे, पण काही माणसे सत्व विसरतात त्यांना उद्देशून कवी म्हणतो,

....." जगसी कसे अवमानिलें लाजीरवाणे हे जिणे ?
फिरसी असा दारी उन्ही का भाकरी मागे सुने ?" (– जळता संदेश)

सत्त्वशील लोकांना जिथे मान नाही अशा देशात मला जन्माला घालू नको असे कवीने त्राग्याने म्हटले आहे.

" सैरंध्री परि जिथे शारदा वटीक झाली सत्तेची
कला नाचुनी कंचनी परी पात्रे भरिते मदिरेची
नको अशा नरकात पुनरपि घालू जन्मा प्रभो ! मला
त्वरित ना तरी तव बज्राचा या वाणीला दे उजळा ।।"

(घालू नको मज जन्मा तेथे)

या चार सहा पंक्तीतून बोरकरांनी गुलामगिरीचे विविध प्रकार सूचित केलेले आहेत. शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सर्व प्रकारच्या गुलामगिरीचे समर्थ चित्र या कवितांतून कवीने रेखाटलेले आहे.

स्वातंत्र्याची तळमळ– गुलामगिरीच्या तिटकाऱ्याप्रमाणेच स्वातंत्र्याची तळमळ कवीला लागलेली आहे. १९२७ साली बोरी येथे लिहिलेल्या 'एक मागणे' या कवितेत या तळमळीचे स्वरूप कसे जहाल होते याचा प्रत्यय येतो. कवी म्हणतो,

" करी तरवार तेजस्वी मुखी रसवंति ओजस्वी
तये स्वातंत्र्य जिकाया मला सामर्थ्य दे प्रभुजी ।।"

असे परमेश्वराजवळ मागणे आहे. त्यांच्या ' हुषार भाई ', ' महाराष्ट्र गीत ', ' यापुढे ', ' स्वातंत्र्याची सिंहगर्जना ', ' हुतात्म्याची जागृती ', ' भगवती स्वतंत्रतेस ' आणि ' स्वातंत्र्य लक्ष्मीस ' या कविता अभ्यासण्यासारख्या आहेत. स्वातंत्र्यासाठी भारतभर रुद्र जागा करा असा कवीचा इशारा आहे.

" शिंगे कर्णे झांज नगारे । रणवाद्ये या फुंकित बडवित
भैरव तांडव करा देशभर । हर हर हर सावेश गर्जुनी ।
रुद्र करा भारतभर जागा ।।" (– हुषार भाई)

भगवती स्वतंत्रतेस कवी म्हणतो,

" प्रीतीची जिवास ओल । मुक्तीचा कृतीस डौल
जीवना नवीन मोल । यज्ञ वैभवे ।।" (– भगवती स्वतंत्रतेस)

स्वातंत्र्य लक्ष्मीचे अत्यंत भव्योदात्त चित्र बोरकरांच्या प्रतिभेने रेखाटले आहे.

" स्वर्णारुण अंशुमालि भाग्य तिलक भालीं । कोटि चंद्र कोटि अरुण इंद्रनीलगाली
नयनी हिच्या गगन निशा । विवाधरि उदित उषा । मुदित करित दाहि
दिशा चारुता निघाली ।
प्रलयाच्या प्रहरांतुन, कलहाच्या जहरांतुन,
मंथनातुनी महान लक्षुमि सम आली ।।" (– स्वातंत्र्य लक्ष्मीस)

राष्ट्रीय कवितांच्या संदर्भात टीकाकारांचा ग्रह जरा प्रतिकूल असाच आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " बोरकरांचे अंतःकरण हे एक संवेदनशील कवीचे अंतःकरण असल्यामुळे देशातल्या अनेक महत्त्वाच्या घटनांचा त्यावर परिणाम झालेला आहे. पण प्रणयगीतांत व सृष्टिगीतांत वा आध्यात्मिक गीतांत यांची प्रतिभा जशी समरसतेने व उत्साहाने विहार करताना आढळते तशी ती या कवितांत आढळत नाही हे मात्र खरे आहे."[३०] एखादी अल्लड मुलगी जशी चालेल, बोलेल, वागेल, हासेल, तशी अपेक्षा एखाद्या पुरंध्रीकडून कशी करता येईल ? मुळात दोन वृत्तींचाच फरक इथे लक्षात घेतला पाहिजे. आणि तसा तो लक्षात घेतला म्हणजे या कवितांतूनही प्रतिभेचा समरसतेने व उत्साहाने विहार झाल्याचे आढळून येईल.

परंपरेचा अभिमान– स्वातंत्र्याच्या तळमळीप्रमाणेच परंपरेचा अभिमान हेही बोरकरांच्या राष्ट्रीय कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्या परंपरेतही ' मराठी बाणा ' त्यांना अभिमानास्पद वाटतो. ' महाराष्ट्र गीत ', ' जळता संदेश ', ' माझी पूजा ', ' शांता दुर्गा ' इत्यादी कविता वाचण्यासारख्या आहेत. मराठ्यांच्या पराक्रमाचे वर्णन करताना कवी म्हणतो,

..... " विळा मराठी फिरता अव्वल महावृक्ष ही उन्मळले
महाराष्ट्राच्या रणनादाने कडे मेरुचे कोसळले ... ...
...धन्य सती त्या, धन्य मराठे राष्ट्रमुक्तिस्तव मरणारे ।।" (– महाराष्ट्र गीत)

राष्ट्रीय जीवनातील विषमता आणि अन्यायाची चीड– परंपरेच्या अभिमानाप्रमाणेच राष्ट्रीय जीवनातील विषमतेवर बोरकरांनी नेमके बोट ठेवले आहे. पराकोटीची विषमता पाहून क्रांतीचे आवाहनही त्यांनी केलेले आहे. त्यांना अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड आहे. ' लोकसागरा ', ' यापुढे ', ' तेथे कर माझे जुळती ', ' आमुचे निशाण ', ' घालु नको मज जन्मा येथे ', ' माझी पूजा ', ' समतेचा पुरस्कार ' इत्यादी कविता ह्या दृष्टीने वाचण्यासारख्या आहेत. स्थितिलोलुप, स्थिरपद, प्रतिकारशून्य लोक पाहून कवीला खेद वाटतो, वास्तविक अन्याय, अत्याचाराने लोकांनी पेटून उठायला पाहिजे पण तसे घडताना दिसत नाही. कवी म्हणतो,

" लोकसागरा ! स्थिरपद कां तूं ! स्थितिलोलुपता पाहुनिया तव
उरीं गुदमरे माझे गाणे । असता पोटी खर वडवानल ।।" (– लोकसागरा)

जगात कसे अन्याय चालतात हे सांगताना कवी म्हणतो,

" सती जुनेरा महाग जेथे, कुलटेला शालु–चोळी
शेतकऱ्या नच घास दुपारी, धनिक श्वाना परि पोळी
श्रमा जिथे अपमान प्रत्यही, ढोंग आळसा बहुमान ।।"
(– घालु नको मज जन्मा तेथे)

दुसऱ्या कवितेत ढोंगी लोकांचा दंभस्फोट कवीने केलेला आहे. तो म्हणतो,

" अश्वत्थामा तेल मागतो ख्रिस्त मागतो पाणी
धनिक मागतो अन् प्रेताच्या टाळूवरचे लोणी
रक्त मागतो सुभाष आणिक सूत मागतो गांधी
खादी घालून लाच मागती वजीर आणि प्यादी ।।" (– कानफाटयाचा फटका)

समाजासाठी कष्ट उपसणाऱ्यांबद्दल कृतज्ञ राहिले पाहिजे आणि त्यांना सन्मानाने वागविले पाहिजे असा विचार पुढील पंक्तीतून कवीने मांडला आहे. तो म्हणतो,

" वरिती कुणी अव्याहत लाठी । धरिती कुणी घाणीची पाटी
जो नरवर इतरांसाठी । तेथे कर माझे जुळती ।" (– तेथे कर माझे जुळती)

नव्या स्वातंत्र्याने आम्हाला विराट शक्ती प्राप्त झालेली आहे. तिचा उपयोग दलितांच्या उद्धारा-करिता केला पाहिजे हे सांगताना कवी म्हणतो,

" विराट शक्ती आम्ही वामन । वाण आमुचे दलितोद्धारण
नमवू बळिचा किरीट उद्धट ठेवुनि पादत्राण " (– आमुचे निशाण)

बोरकरांच्या काव्यातील ही विविध प्रकारची सामाजिकता लक्षात घेऊनच प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " बोरकरांची प्रतिभा स्वयंपूर्ण नाही. भोवतालच्या वाद्यांचे सूर वातावरणात उमटू लागले की, तिच्या तारा आपोआप छेडल्या जातात."[३१] व्यापक सामाजिक जाणीव, संवेदनशील अंतःकरण

आणि विशाल सहानुभूती त्यासाठी कवीच्या ठिकाणी असावी लागते तेव्हा कुठे सुसंवादी संगीत निर्माण होते.

वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब– प्रा. पंडितांनी बोरकरांच्या समाजशील वृत्तीचा परिचय दिलेला आहे. ही समाजशील वृत्ती त्यांचे समाजातील सुखदुःखाशी नाते जोडते. 'जळता संदेश'; 'यापुढे', 'हुषार भाई', 'आमुचे निशाण', 'दिवाळी कशी करू साजरी?' एवढ्याच कविता वाचल्या तरी राष्ट्रीय जीवनाचे ठसठशीत प्रतिबिंब पडल्याचे आढळते. १९२९ मध्ये लिहिलेल्या 'जळता संदेश' या कवितेतून स्वातंत्र्याची नांदी कवीने गायिली आहे.

"राष्ट्रदेविस वाहुनी ही प्राण पुष्पे आदरे
स्वातंत्र्य नांदी गाउनी उजळू उषा सारी त्वरे"

'यापुढे' मध्ये आदर्श राष्ट्रीय जीवनाचे चित्र कवीने रेखाटले आहे. १९३५ मध्ये लिहिलेल्या 'हुषार भाई' मध्ये प्रखर राष्ट्रीयत्वाची जाणीव कवीने दिली आहे.

"तिलांजली द्या सर्वस्वावर। आणि दृष्टीचे तेज वाढवा
विराट तेजे प्रगटुनि दाविल। विश्वरूप दर्शने तुम्हाला॥" (– हुषार भाई)

'आमुचे निशाण', 'स्वातंत्र्याची सिंहगर्जना' या कविता भारत स्वतंत्र होणार हे सांगणाऱ्या आहेत. त्याच काळातील 'हुतात्म्याची जागृती' ही कविता आहे.

वीर विभूतिपूजन– 'वीर विभूतिपूजन' हे राष्ट्रीय कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बोरकरांच्या अनेक कवितांमधून अतिशय प्रभावीपणे हे वैशिष्ट्य प्रकट झालेले आहे. 'साहित्य हे साध्य नसून जीवन हे साध्य आहे' ही दृष्टी काका कालेलकरांकडून बोरकरांनी स्वीकारली असली तरी जीवनाची व्यापकता, जीवनाचा वास्तव अर्थ त्यांना परंपरेनेच, आस्तिक्य श्रद्धेनेच कळलेला असल्याचे दिसते.[३१] डॉ. वा. ल. कुलकर्णी म्हणतात, "कुसुमाग्रजांपेक्षा बोरकरांची प्रकृती वेगळी. बोरकर हे प्रेमाबरोबरच मांगल्याचे, पावित्र्याचे, त्यागाचेही पूजक आहेत. गांधीजींमध्ये बोरकरांना त्यांची पूजामूर्ती आढळली. मराठीमध्ये बोरकर हेच तेवढे 'महात्मायन' लिहावयास प्रवृत्त झाले आहेत ते उगीच नव्हेत."[३३]

'महाराष्ट्र गीत', 'तेथे कर माझे जुळती', 'आमुचे निशाण', 'हुतात्म्यांची जागृती'; 'स्वातंत्र्याची सिंहगर्जना', 'माझी पूजा', 'शांता दुर्गा', 'खादी गीता', 'धृतराष्ट्रास', 'मज लोभस हा इहलोक हवा', 'भंग्यांच्या घरी'; 'हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्र मौली' आणि 'महात्मायन' या अपूर्ण महाकाव्यातून हे विभूतिपूजन बोरकरांनी केलेले आहे. 'महाराष्ट्र गीतात' मराठ्यांच्या पराक्रमाचे गुणगान आहे. दुसऱ्या एका कवितेत हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करताना कवी म्हणतो,'

"हिंदराष्ट्रोद्धारणी वीराग्रणी लढले रणीं
ते हुतात्मे दिव्य झाले प्राण पिंड समर्पुनी
राष्ट्र यज्ञी आत्मज्योती ज्या स्वतेजे चेतल्या॥" (– अमृत)

मानवतेचे मंदिर घडविण्याचे कार्य करणाऱ्या असंख्य अनामिक वीरांनाही कवीने आदरपूर्वक अभिवादन केलेले आहे.

" यज्ञी ज्यांनी देउनि निजशिर
घडले मानवतेचे मंदिर
परी जयांच्या दहन भूमिवर
नाहि चिरा नाही पणती–
तेथे कर माझे जुळती !" (– तेथे कर माझे जुळती)

महात्मायन– कवी बोरकरांनी इतर विभूतींपेक्षा गांधीजींचे पूजन परोपरीने केलेले आहे. कुसुमाग्रजांच्या ' क्रांतीच्या जयजयकाराला ' उत्तर म्हणून बोरकरांनी ' शांतीचा जयजयकार ' ही कविता लिहिली आहे असे वाटते. कुसुमाग्रजांनी युद्धाचे परिणाम ' जा ! जरा पूर्वेकडे ' या कवितेतून मांडले आहेत. ' शांतीचा जयजयकार ' करताना निवेदन करून शांतीची महती बोरकरांनी कथन केलेली आहे. १९२८ साली धारवाडला लिहिलेल्या ' खादी गीता 'त गांधीजींचे मोठेपण सांगताना ते म्हणतात,

" भारतभूला मंगलमंत्रे नवजीवन द्याया
परमेशाने धरिली आता गांधींची काया..." (– खादी गीता)

गांधीजींनी भारतीयांना स्वातंत्र्यलढ्यासाठी जागृत आणि संघटित केले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली ते लढ्याला सिद्ध झाले. त्या घटनेवर १९४६ साली गांधीजींचे माहात्म्य सांगणारी ' शांतादुर्गा ' ही कविता बोरकरांनी लिहिली. कवी म्हणतो,

" शांता झाली दुर्गा रे
जागृती आली दीन दुर्बळा सगळ्या पीडित वर्गा रे
सत्य अहिंसा शिस्त शांतता । मोक्षास्त्रे फेकीत ऋतरता ॥
भूगर्भातून हृद्गर्भातून आणि अक्षय स्वर्गा रे ॥" (– शांता दुर्गा)

१९४७ च्या ' धृतराष्ट्रास ' या कवितेत गांधीजींना हरी कल्पून बोरकर लिहितात;

" सर्व संग वर्जून हरी तो वज्र दंडधारी
प्रेम मंत्र घोषीत चालला कलीचिये द्वारी ॥" (– धृतराष्ट्रास)

१९४६ मध्ये गांधीजी दिल्लीला भंग्यांच्या वस्तीत उतरले त्या घटनेवर बोरकरांची ' भंग्यांच्या घरी ' ही कविता लिहिली गेली आहे. गांधीजींच्या सेवाव्रती जीवनाचा परिचय ती करून देते.

" हरि आला हो, हरि आला हो
भंग्या घरि हरि आला हो " (– भंग्यांच्या घरी)

गांधीवादी जीवनदर्शनाच्या मर्यादेत लोकांनी नांदले पाहिजे असे सांगितले आहे. कवी म्हणतो,

" मार्क्साचा मज अर्थ हवा अन् फ्रॉईडाचा मज काम हवा
या असुरां परि राबविण्या घरि गांधीचा मज राम हवा ॥"
(– मज लोभस हा इहलोक हवा)

गांधीजींच्या जीवनावर ' महात्मायन ' नावाचे १८ हजार कडव्यांचे प्रदीर्घ महाकाव्य लिहिण्याचा बोरकरांचा संकल्प अजून प्रत्यक्षात उतरलेला नाही. त्यातली प्रारंभीची पंधराशे कडवी लिहून झाली आहेत. महात्माजींच्या सायंप्रार्थनेचे भावचित्र बोरकरांनी त्यातून अत्यंत कुशलतेने रेखाटलेले आहे.

" आताच संपली सांध्य वंदना त्याची...
...ती मूर्ति साजिरी ज्योती कर्पूर गौर
ऋत शांति अहिंसा दलित स्फूर्ति गभीर
गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीने
निःशब्द प्रीतीने जिवधुनि दोन्ही तीर ॥" (महात्मायन)

म्हणूनच प्रा. म. शं. वावगावकर म्हणतात; " गांधीवादी जीवननिष्ठेशी अनुभवलेल्या आत्यंतिक तादात्म्यातून उत्कट रसरशीत जिवंत गांधीवादी जाणिवांतून काव्य स्फुरलेले बोरकर हे एकमात्र कवी दिसतात. "[३४]

दुर्वम्य आशावाद– बोरकरांच्या लोकप्रियतेचे मर्म सांगताना प्रा. निशिकांत ठकार म्हणतात; " जीवनातील उदात्तता, शुचिता, श्रद्धा आणि उपासना करणारा, जीवननिष्ठ आस्वादक, शिवसौंदर्याचा पुजारी, सांस्कृतिक मूल्यांची चाड वाळगणारा, मंगलतेचा पुरस्कर्ता, शांतीचा जयजयकार करणारा कवी म्हणून बोरकर लोकप्रिय असतील,"[३५] पण कवी बोरकरांच्या लोकप्रियतेची इयत्ता त्यांच्या काव्यातील सखोल अनुभूतीवर, व्यापक सर्वस्पर्शी सहानुभूतीवर अवलंबून असल्याने आधुनिक कवींत त्यांची श्रेणी पहिल्या प्रतीची आहे. कोणत्याही श्रेष्ठ प्रतीच्या काव्याचे गमक त्याच्या रचनेपेक्षा जीवनस्पर्शी मूल्यविचारावरच अधिष्ठित असते तसे ते बोरकरांचे असल्याने ते श्रेष्ठ दर्जाचे कवी आहेत. त्यांच्या काव्यातून राष्ट्रीय आशावाद प्रकट झालेला आहे. ' जळता संदेश ' या कवितेत ते म्हणतात;

" नूतनाशे हिंदभू पाहील तुजला लाडक्या
स्वातंत्र्य शूरा लाभती दैवी सुखाच्या पालख्या ॥"

बोरकरांच्या काव्यात्मतेबद्दल सर्वच टीकाकारांत एक मत आहे. सर्वांनी त्यांच्या काव्यगुणांचा मुक्त-कंठाने गौरव केलेला आहे. त्यांची जीवननिष्ठा गांधीवादाच्या म्हणजेच मानवतावादी राष्ट्रवादाच्या ध्येयाने परिपूर्ण झालेली आहे आणि म्हणूनच गांधीवादी जीवननिष्ठेशी तादात्म्य साधून त्या अनुभूती-तून प्रेरणा घेऊन राष्ट्रीय कविता लिहिणारे कवी म्हणूनच बा. भ. बोरकरांचा गौरव केला पाहिजे.

बंडखोर लोककवी मनमोहन यांची राष्ट्रीय कविता

(जन्म १९११)

जीवनपरिचय– पुण्याचे गोपाळ नरहर नातू उपाख्य मनमोहन हे लोककवी मनमोहन या नावाने महाराष्ट्राला परिचित आहेत. एक ज्येष्ठ, अग्रगण्य आणि प्रतिभासंपन्न पण बंडखोर वृत्तीचे जातिवंत कवी म्हणून त्यांनी आपली मुद्रा काव्याच्या क्षेत्रात उमटविली आहे. ' आदित्य ' या मन-मोहनांच्या प्रातिनिधिक कवितासंग्रहाला लिहिलेल्या रसोद्ग्राही प्रस्तावनेत शंकर वैद्य म्हणतात, " बंडखोरपणा हा मनमोहनांच्या रक्ताचाच धर्म आहे.... ..." [३६] मनमोहन यांनी साहित्यनिर्मिती हाच व्यवसाय निवडला आहे. काव्य, कथा, कादंबऱ्या या सर्वच क्षेत्रांत त्यांच्या प्रतिभेचा विमुक्त संचार आहे. लोककवी मनमोहनांच्या प्रतिभेचा झपाटा एवढा जबरदस्त आहे की अल्पकाळात त्यांनी विपुल काव्यलेखन केले आहे आणि म्हणूनच डॉ. अ. ना. देशपांडे त्यांचा ' उद्दाम व प्रसवबहळ लेखणीचे लोककवी '[३७] असा उल्लेख करतात. मनमोहनांच्या काव्यातील कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या

कोणत्याही रसिक मनाला मोह घातल्याशिवाय राहणार नाहीत आणि म्हणूनच त्यांनी धारण केलेले मनमोहन हे नाव सार्थ वाटते. या लेखात मनमोहनांच्या राष्ट्रीय कवितेसंबंधीच प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. अचाट, अफाट, उत्तुंग आणि भव्योदात्त कल्पनावैभवाची दैवी देण लाभलेल्या या कवीला कविवर्गात प्रतिष्ठा नाही. मानसन्मान नाही की टीकाकारांची प्रशस्ती नाही. आधुनिक मराठीच्या क्षेत्रातला तो एकांडा शिलेदार आहे. त्यांच्या बंडखोरीला अहंकाराची जोड आहे. म्हणूनच " कोणत्याच प्रवाहात वा संप्रदायात न सामावणारा एक एकलकोंडा व मनस्वी, उपेक्षित आणि म्हणून अहंकारी अस्सल मराठी बाण्याचा कवी म्हणजे मनमोहन " ३८ असे उद्‌गार प्रा. निशिकांत ठकार यांनी काढलेले आहेत.

काव्यपरिचय, जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी– केशवसुतांनंतर काव्यदृष्टी सांगणाऱ्या कविता लिहिणाऱ्या आधुनिक मराठी कवींत मनमोहनांचेच नाव अग्रगण्य समजावे लागेल. नाही म्हणायला; गडकरी, बी, तांबे यांनी जीवनदृष्टी व काव्यदृष्टी स्पष्ट करून सांगण्याकरिता चार सहा कविता लिहिलेल्या आहेत, पण मनमोहन त्या सर्वांच्या पुढे गेलेले आहेत. मनमोहनांचा पिंड कलावंताचा असल्यामुळे ते अगदी किशोर वयापासूनच काव्यनिर्मिती करू लागले. १९२१ सालापासून त्यांचा कवी म्हणून महाराष्ट्राला परिचय झाला. ' ताई तेलीण ' (१९२६), ' सुनीत गंगा ' (१९२८); 'कॉलेजियन ' (१९२९); ' शंखध्वनी अथवा बोंबाबोंब ' (१९३२), ' उद्धार ' (१९३३), ' अफूच्या गोळ्या ' (१९३३), ' बाँब ' (१९३४), ' जीवनाधार ' (१९३४), ' दर्यातील खसखस '(१९३६); ' युगायुगांचे सहप्रवासी ' (१९४६); ' कुहू कुहू ' (१९४९); ' शिवशिल्पांजली ' (१९६५); ' आदित्य ' (१९७१) असे त्यांचे एकूण तेरा कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. ' शंखध्वनी अथवा बोंबाबोंब ' ' अफुच्या गोळ्या ' आणि ' दर्यातील खसखस ' हे तीनही विनोदी कवितासंग्रह आहेत. ' ताई तेलीण ', ' कॉलेजियन ', ' उद्धार ', ' युगायुगांचे सहप्रवासी ' ही कथाकाव्ये आणि खंडकाव्ये आहेत. ' बाँब ' आणि ' शिवशिल्पांजली ' तूर्त अनुक्रमे गांधीजी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे विभूतिपूजन आलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि गांधीजी यांच्याप्रमाणेच देशगौरव नेताजी सुभाषचन्द्र बोस यांच्यावरही मनमोहनांनी काव्यलेखन केलेले आहे.

मनमोहनांचे पोवाडे–'ताई तेलीण' हा मनमोहनांनी लिहिलेला पहिला पोवाडा आहे. याशिवाय 'शिवाजी', 'संभाजी', ' त्र्यंबकजी डेंगळे ', ' नाना फडणवीस '; 'थोरले बाजीराव पेशवे'; ' पानिपत ' इत्यादी पोवाड्यांची जोड मिळाली आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे यातील ' नाना फडणवीस '; ' थोरले बाजीराव पेशवे '; ' पानिपत ' इत्यादीवरील पोवाडे त्यांच्या त्या त्या विषयांवरील कादंबऱ्यांतून आलेले आहेत. या बाबतीत त्यांनी हरिभाऊ आपट्यांच्या ' गड आला पण सिंह गेला ' या कादंबरीचे अनुकरण केलेले आहे. या काव्यमय ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखनही मनमोहनांनीच केलेले आहे.

' उद्धार ' आणि ' युगायुगांचे सहप्रवासी ' ही दोन्ही खंडकाव्ये ही मनमोहनांनी राष्ट्रीय दृष्टिकोनातून लिहिलेली आहेत. गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने आणि तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन त्यांनी ही खंडकाव्ये लिहिल्याचे आढळते. दलितोद्धाराच्या आणि स्त्रीसुधारणेच्या गांधीजींच्या विचाराने मनमोहन भारावले आणि अस्पृश्यता निवारण करण्याच्या भूमिकेतून ' उद्धार ' या खंडकाव्याची त्यांनी निर्मिती केली. यांत उच्चवर्णीय स्पृश्य आणि अस्पृश्य यांचा विवाह कवीने घडवून आणलेला

आहे. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचे स्वप्न गांधीजींनी आयुष्यभर आपल्या उराशी बाळगले होते. त्या हिंदु मुसलमान ऐक्याच्या मध्यवर्ती कल्पनेवर 'युगायुगाचे सहप्रवासी' या अद्‌भुतरम्य खंडकाव्याची यशस्वी उभारणी मनमोहनांनी केलेली आहे.

मनमोहनांच्या 'ही नदी सारस्वताची', 'सरणावर सरणाऱ्यांच्यासाठी', 'सुदृढ', 'चिर जीवन', 'कविता', 'श्रेष्ठ कवी जन्माला याया', 'राजकवींना थोवाडाया', 'प्रियही माझी कविता केवळ', 'मी न माझा राहिलो' आणि 'गुलाबा काटे घेऊन ये' यासारख्या कवितांमधून त्यांची काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी प्रामुख्याने व्यक्त झालेली आहे. आधुनिक कवींची परंपरा झुगारून देणाऱ्या या बंडखोर कवीने प्राचीन गौरवपूर्ण परंपरेचा मोठ्या भक्तिभावाने उल्लेख केलेला आहे. वास्तविक प्राचीन परंपरा म्हणजेच राष्ट्रीय परंपरा आहे. त्या परंपरेचा एक नम्र पाईक असल्याचे कवीने सांगितले आहे. ती अखंड राष्ट्रीय परंपरा सांगताना मनमोहन म्हणतात,

"ही नदी सारस्वताची त्या अनंतातून आली।
वाल्मिकी-व्यासादिकांचे, अर्घ्य तीने स्वीकारीले
भास होता लहर नुसती, कालि होता दास तीचा"
"मी नसे शिल्पज्ञ मोठा, ताज वेरुळ घडविलेला
मी वडारी - भक्तिभावे छिन्नी माझी चालली
ही नदी सारस्वताची, त्या अनंतातून आली॥"

स्वत:ची कविता मनमोहनांना अत्यंत प्रिय वाटते. ते लिहितात,

"प्रिय ही माझी कविता केवळ। द्रवलेल्या आत्म्याची धारा।"

(- प्रिय ही माझी कविता केवळ)

'द्रवलेल्या आत्म्याची धारा' असे आपल्या कवितेचे स्वरूप आत्मविश्वासाने मांडणाऱ्या कवीने स्वत:ची उपेक्षा होताना पाहून मोठे त्राग्याचे उद्‌गार काढलेले आहेत. ते म्हणतात,

"श्रेष्ठ कवी जन्माला याया। मराठीचे गर्भाशय कोते॥"
"टीकाकारांच्या जथ्याशी। नाही सोयर आणि सुतकही
तोंडे फोडाया शतकांची। सरकविली मी वरती बाही॥" (- कविता)

'गुलाबा काटे घेऊन ये' या कवितेतून कवीने आपली अखेरची इच्छा व्यक्त केलेली आहे. ती त्याच्या समर्पणशील, अशा राष्ट्रीय भावनेची द्योतक आहे, किंबहुना तीच त्याची जीवनदृष्टी आहे आणि मराठी बाणाही आहे. तो म्हणतो,

"... या मराठी माउलीचा, चरणरज मी चुंबिलेला
नी तिच्या साठीच पुष्पा, प्राण हा कापूर झाला
हार हा रेडघास त्या तू वेद गोठ्यातून उमटे
मृत्युच्या वेळी गुलाबा, घेऊनी ये फक्त काटे॥" (- गुलाबा काटे घेऊन ये।)

उत्कट राष्ट्रप्रेम- मनमोहनांचे उत्कट राष्ट्रप्रेम त्यांनी लिहिलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावरील कवितांमधून व्यक्त झालेले आहे. या देशभक्तांची चरित्रे गाताना त्यांच्या प्रतिभेला सागर भरते आलेले आहे. 'बावटा अर्धा अधिक घ्या खाली

आणि सुमारे पंचवीस कडवे असलेली 'फिल्ड मार्शलची सलामी' ही प्रदीर्घ कविता वाचली तरी त्यांच्या राष्ट्रप्रेमाची कल्पना सहज करता येते. 'बावटा अर्धा अधिक घ्या खाली' या कवितेत पाच देशभक्त आझाद हिंद सैनिक वीर मरण स्वीकारतात. त्यातील एक हिंदू, एक मुसलमान, एक पारशी, एक ख्रिस्ती आणि एक शिख सैनिक असतो. भिन्न जातींचे, भिन्न धर्मांचे, भिन्न वर्णांचे पण ते एकाच भारतमातेचे पुत्र असतात. नेताजी सुभाषचंद्र बोस स्वत: या वीरांना अखेरची सलामी देताना म्हणतात,

"भारत भूमीच्या विमोचनासाठी...
खांद्याला लावून खांदा । केला कुरवंडी कडनिकडीला
लढताना एक–भाकरीला एक–जेवढे भारतीय सारे एक ।।"
(– बावटा अर्धा अधिक खाली घ्या)

समानहितत्वाच्या प्रश्नावर या देशातील सर्वांना संघटित होता येते. राष्ट्रभक्त होता येते असा संदेश या राष्ट्रीय कवितेने दिला आहे. दुसऱ्या एका कवितेत कवी सांगतो,

"तू भाग्यवान माता – त्या लक्ष पांडवांची
... तू थोर संस्कृतीची का हीन सुकृताची ?"

'माझी मायभूमी माझे सर्वस्व आहे' हे सांगताना देशभक्त सुभाषच्या मुखी पुढील पंक्ती कवीने घातल्या आहेत.

"तू मातृभूमी माझी – तू कर्मभूमि माझी
ही युद्ध भूमि माझी – ही नाश भूमि माझी ।।"...

भारतमातेचे विश्वप्रेम सांगताना कवी म्हणतो,

"दुनियेस दे निवारा – साधी तुझी कुटी जी
शत्रूसही खुली गे द्वारे तुझ्या व्यूहांची ।।"

त्या भारतमातेचे रूपवैभव कवीला कसे दिसते ते पाहा–

"काश्मीरची विराजे यमुना कचांत वेणी
'सह्याद्रिचे' मराठे – तव हात पाय मानी
बंगालची 'तुफाने–' – जी 'भावना' तुझी जी
म्हैसूरची उटी गे – तुज लागि चंदनाची ।।" (– फिल्ड मार्शलची सलामी)

स्वातंत्र्यप्रेम– कवीचे स्वातंत्र्यप्रेमही अनेक कवितांतून व्यक्त झालेले आहे. त्या दृष्टीने 'बोंब', 'बाँब' मधील कविता आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील कवितांची साक्ष देता येईल. 'फिल्ड मार्शलची सलामी' ही नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आत्मनिवेदन करणारी प्रदीर्घ कविताही उदाहरणे म्हणून देता येण्यासारखी आहे. हुतात्म्यांनी केलेल्या बलिदानाचे चित्र कवीने सूर्यग्रहणाच्या पार्श्वभूमीवर रेखाटले आहे. स्वातंत्र्यासाठी आत्मसमर्पण करणाऱ्यांचा केवळ एकच नमुना बघा.

"...रक्ताचे घातले सडे चप् चप् चप् चप् चप्
ध्येयाच्या घातल्या रांगोळ्या लक्ष्मणाच्या रेघे सारख्या
हृदयाच्या ताणलेल्या तातीं वरती हुतात्म्यांनी
क्रांतीच्या शुभागमनासाठी आसावरी छेडली ।।" (– बोंब !)

वीर विभूतिपूजन– वीर विभूतिपूजन हा तर कवी मनमोहनांच्या राष्ट्रीय कवितेचा गाभा आहे. ते सावरकर आणि नंतर गांधीजींचे भक्त असल्याने पौरुषाचे आणि त्यागाचे पूजक आहेत. हे पूजन त्यांनी परोपरीने केलेले आहे. पुनरुक्तीचा दोष पदरी घेऊनही स्वातंत्र्यवीर सावरकर आणि महात्मा गांधी यांच्यावरील त्यांच्या कवितांची या ठिकाणी आठवण करून द्यावीशी वाटते. अचाट कल्पना-शक्तीचे आणि अपार भक्तीचे दर्शन घडविणारी सावरकरांवरील कविता वानगीदाखल देता येईल. या कवितेचे शीर्षकही आश्चर्यमुग्ध करणारे आहे. 'ज्ञानेश्वरानंतर भित पुन्हा एकासाठी चालली' कवितेची पार्श्वभूमी अशी आहे. अंदमानात पन्नास वर्षांची जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना सावरकरांना काव्य स्फुरू लागले. जवळ कागद नव्हते. त्यांनी उषःकाळच्या आभाळाला विचारले, " माझा कागद होतोस काय ?" आभाळ काय उत्तरले ?

" मी मुक्ता मधले मुक्त – तूं कैद्यामधला कैदी ।
माझे नि तुझे व्हायचे – ते सूर कसे संवादी ?
आभाळ म्हणाले " नाही " – भूमीहि म्हणाली " नाही "

मग विनायकाने त्यांची आळवणी केली नाही." कवी पुढे वर्णन करतो,

" पापण्यात जळली लंका – लाह्यांपरि आसू झाले
उच्चारुन होण्या आधी – उच्चाटन " शब्दा " आले
...(ती पहाट लालम लाल अनपेक्षित झाली काळी)
दगडाची पार्थिव भित–तो पुढे अकल्पित सरली
" मी कागद झाले आहे " – " चल लिही " असे ती वदली ।"
(– ज्ञानेश्वरानंतर भित पुन्हा एकदा चालली)

गांधीजीवरील कवितांची प्रातिनिधिक कविता म्हणून त्यांच्या वधानंतर लिहिली गेलेली आणि अत्यंत लोकप्रिय ठरलेली विलापिका म्हणजे ' बापूजींची प्राण ज्योती ' ही होय. गांधीजींच्या जीवनाचे, राष्ट्रसेवेचे, त्यांच्या तत्त्वज्ञानाचे आणि उदार मानवतावादाचे दर्शन या लहानशा कवितेतून प्रभावीपणे घडते.

" ती पहा, ती पहा, बापूजींची प्राण ज्योती ।
तारकांची सुमनमाला देव त्यांना वाहती ।।"

अशा नाटचमय पद्धतीने सुरुवात झालेली ही कविता कारुण्याने अंतःकरण व्यापून टाकते.

" झुंजला राजा सवे हा, रंगला रंकासवे हा,
...चंदनाचे खोड लाजे हा झिजे त्याहुनिही...
...नाव ज्याचे ऐकुनीया थरकली सिंहासने
ना करी तलवार होती, हा अहिंसेचा पुजारी...
सत्यमानी देव आणि झुंजला खोटचा सवे ।" (–बापूजींची प्राण ज्योती)

आपल्यापूर्वी मातृभूमीच्या स्वातंत्र्याची स्वप्ने बघणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरणही सुभाषबाबूंच्या निवेदनातून कवीने मार्मिकपणे केलेले आहे. उदाहरणार्थ,

" घर मानिले तुरुंग ' गळफास माळ झाले
लाठीत मारलेले – ते लाल लाल गेले...
...जी अन्दमानमध्ये होती विनायकाची
ती चित्तरंजनाची ' फडके ' ' जतिंद्र ' यांची
झाशीतल्या ' घडांची ' काल्पितल्या ' शिरांची '
ती रंगदार केली – स्वप्ने तुझी उद्याची ।" (– फिल्ड मार्शलची सलामी)

' आठ पायांची कहाणी ' ही पोवाडेवजा प्रदीर्घ कथा कविता त्र्यंबकजी डेंगळे व त्यांची वीर पत्नी आणि त्यांचे कंदील व मंदील या इमानी घोडयांची असून ती कथा वीर विभूतिपूजनाचा उत्कृष्ट नमुना आहे. नाना फडणविसांचा पोवाडा, थोरल्या बाजीरावाचा पोवाडा, झाशीच्या राणीचा पोवाडा आणि ' पानिपत 'चे पोवाडे हे पोवाडेही वीर विभूतिपूजनाचे नमुने आहेत. मात्र ते त्यांच्या कादंबऱ्यांतून आलेले आहेत.

आशावादी दृष्टिकोन– राष्ट्रीय काव्याच्या बाबतीत विचार केला तर कवी मनमोहनांचा दृष्टिकोन आशावादी आहे. ' फिल्ड मार्शलची सलामी ' या कवितेत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मुखातून अखेरचे निवेदन आलेले आहे. ते त्यांच्या राष्ट्रीय आशावादाचे द्योतक आहे.

" माती मधे मिळाला – जरि आज हा सुभाष
राहील तो स्मृतीने – झाला जिथे विकास
...अंधार कोठडी जे आझाद जे उद्याचे
गळफासणीत कण्ठ – ललकार ते उद्याचे...
...अवतार घ्यावयाची – येईल वेळ त्याची ।।"

काव्यस्वरूप– कवीची स्वतःच्या कवितेसंबंधी कल्पना एका कवितेत आली आहे. तो म्हणतो,

" फुलापरी तिज उमलावयाचे । नदी परी तिज धावायाचे
फळापरी तिज रस द्यायाचे । निसर्ग दे दगडास पूर्णता
प्रयत्नांति ते जमते शब्दा । कवितेच्या कसलेल्या शरिरी
दागदागिण्याविना सुरुपता ।।" (– सुदृढ)

आपल्या कवितेच्या ठिकाणी नैसर्गिक सौंदर्य आहे ही कवीची धारणा आहे. गडकऱ्यांच्याच कवितांतून आढळून येईल इतकी उत्कट भावनोत्कटता, स्वा. सावरकरांच्या कवितेच्या जोडीला बसण्याच्या योग्यतेची भव्योदात्त कल्पकता आणि तुकाराम, रामदास यांच्या कवितेतून आढळणारा भाषेचा रोखठोकपणा यांनी मनमोहनांची कविता संपन्न आहे. त्यांच्या व्यक्तित्वातील बंडखोरपणा त्यांच्या कवितेच्या सर्व अंगांतून प्रकट झालेला आहे. त्यांनी आपली लेखणी तरवारीसारखी वापरली आहे. तिच्या फटकाऱ्याने मोठमोठ्यांना नामोहरण केलेले आहे. मात्र श्रेष्ठ प्रकारची काव्यात्मकता त्यांच्या राष्ट्रीय कवितेचेही वैशिष्ट्य आहे. वीर, करुण, उदात्त, शृंगार कोणत्याही रसाची निर्मिती करण्यात त्यांचा हातखंडा आहे. पराकोटीची भावविवशता व संयमाचा अभाव यामुळे कुठे अतिरेक झालेला आहे आणि हे त्यांच्या बंडखोर वृत्तीला धरूनच आहे.

राष्ट्रीय जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब चित्रित करणारे कवी भ. श्री. पंडित

(जन्म १९०६–मृत्यू १९७८)

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी, आधुनिक मराठी काव्याचे मर्मज्ञ मीमांसक, वाङ्मय संशोधक; मराठीचे अध्यापक आणि प्रभावी वक्ते म्हणून भ. श्री. पंडित मराठीच्या अभ्यासकांना परिचित होते. 'केशवसुत : पाच चिंतनिका', 'आधुनिक मराठी कविता', 'आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते भाग १ आणि भाग २', 'तांबे यांचे गीतिकाव्य' आणि 'संनिचय' हे पंडितांचे ग्रंथ विद्वानांना मान्य झालेले आहेत. पंडितांचे घराणे सातार्‍याकडचे. त्यांचा जन्म वाई येथे आजोळी झाला. वडील रेल्वे खात्यात नोकरीला असल्याने उत्तर भारत, राजस्थान आणि मध्यप्रदेशात त्यांना शिक्षण घ्यावे लागले. शेवटी त्यांचे पदवीपर्यंतचे व पदव्युत्तर अध्ययन नागपूर येथे झाले. पंडितांना कुमारवयापासूनच काव्यनिर्मितीचा छंद जडलेला होता. अजमेर येथे असताना पंडितांना कविवर्य भा. रा. तांबे यांचा सहवास लाभला. त्यामुळे त्यांच्या काव्याचे आणि काही प्रमाणात रविकिरण मंडळाचे संस्कार पंडितांच्या कवितेवर झालेले आहेत. तांब्यांप्रमाणेच सौंदर्यवादी भावकवी म्हणून पंडित ओळखले जातात. तांब्यांच्याप्रमाणे पंडितांनी शिशुगीते आणि नाट्यगीतेही लिहिली आहेत. 'पिचलेला पावा' (१९३३), 'उन्मेष' आणि 'उद्रेक' (१९५०), 'सुवास आणि रस' (१९५३) हे त्यांच्या स्फुट काव्याचे तीन संग्रह. 'बीजेची कोर', 'चवथीचा चांद', 'अष्टमीचा चंद्र' इत्यादी संग्रहांतून शिशुगीते आलेली आहेत.

जीवन दृष्टीच्या संदर्भात पंडितांचा विचार केला तर त्यांची जीवनदृष्टी तांब्यांपेक्षा 'बीं' च्या जीवनदृष्टीशी अधिक जुळणारी आहे. तांब्यांसारखे पंडित केवळ कलावादी नाहीत तर जीवनवादी आहेत. कौटुंबिक सुखी जीवनाचे पडसाद त्यांच्या काव्यात उमटले असले आणि भावकवी म्हणून ते वाटत असले तरीही त्यांच्या अंतःकरणात राष्ट्रासंबंधीचाही जिव्हाळा आहे. या जिव्हाळ्यामुळेच राष्ट्रीय जीवनातील विविध घटनाप्रसंगांचे चित्रण पंडितांनी आपल्या राष्ट्रीय कवितांतून केलेले आहे. कला आणि जीवनाचे परस्पर संबंध सांगताना, पंडित म्हणतात,

" कला आणखी जीवन यांची, असे सदा सापेक्ष संगती
कले वाचुनी अपूर्ण जीवन, कला जीवनावाचून पूर्ण न ॥"

(– कला आणि जीवन)

आपले जीवन आणि काव्य यातील संबंध भिन्न नाहीत, ते एकरूप आहेत. त्यांचे अद्वैत आहे हे सांगताना पंडित म्हणतात,

" मला माझ्या काव्यात पहा तुम्ही
त्यात दर्शन देईन तुम्हाला मी
जसा पुष्पाच्या अंतरी सुवास
असे माझ्या काव्यात तसा वास ॥" (मला माझ्या काव्यात पहा)

राष्ट्रप्रेम– 'जन्मभूमि प्रशस्ति', 'कृष्णे तुला प्रार्थना'; 'राष्ट्रध्वजास', 'भाऊ भाऊ'. 'ध्वजवंदन' यासारख्या कवितांतून पंडितांच्या अंतःकरणातील मातृभूमीवरील प्रेमाचे दर्शन घडते; या सर्व कवितांत त्यांची 'जन्मभूमिप्रशस्ति' ही कविता अतिशय प्रभावी वाटते. कवी म्हणतो,

" तूंच गे धर्म भू तूंच गे कर्म भू
तूंच गे ज्ञान भू तूंच गे मान भू
तूंच सर्वस्व भू तूंच विभु जन्मभर
टाकू तुज कारणी, काय कुर्वंडुनी ॥" (– जन्मभूमि प्रशस्ति)

पारतंत्र्याची चीड– पंडितांच्या ' देवी स्वतंत्रते !' आणि ' पिंजऱ्यातील बुलबुलांची फिर्याद ' यासारख्या कवितांतून पारतंत्र्याची चीड व्यक्त झालेली आहे. स्वातंत्र्याच्या भव्य मंदिराचे आकर्षण असूनही परिस्थिती मात्र मला त्याच्या आसपास फिरकू देत नाही अशी व्यथा कवीने व्यक्त केलेली आहे. कवी म्हणतो,

" यावे बंध झुगारुनी तुजकडे चित्तात येते असे,
दास्याच्या उलटचा परिस्थितिपुढे सारे परंतू फसे
दुर्दैवे परतंत्रतेत वपु हे माझे जरी भंगले
निष्ठा अव्यभिचारिणी तरि असे पायी तुझ्या मंगले ॥" (देवी स्वतंत्रते)

स्वातंत्र्याची उत्कट इच्छा– पंडितांच्या ' देवी स्वतंत्रते ', ' क्रांति स्तोत्र ', ' आजच्या मानवतेस ', ' कलिकुबेर ', ' सुप्तज्वालामुखी ', ' वामनास आवाहन ', ' इंद्रप्रस्थाकडे ', ' कुठुन विश्वशांती ?' इत्यादी कवितांतून समर्थपणे प्रकट झालेली आहे. " केव्हा तोडुन ताडकन या पायातल्या शृंखला । भोगाया सुख सोहळा अवशते । होईन मी मोकळा " असे ' देवी स्वतंत्रते !' या कवितेत कवी म्हणतो. ' क्रांति स्तोत्रात ' क्रांतीचा जयजयकार आहे. " क्रांति देवी ! तुझा उदय अक्षय असो !" सुप्त ज्वालामुखीमध्ये क्रांतीचाच संदेश आहे. " तप्त लाव्हा मुखे... चेत चल । रे उचल । रक्त ध्वज कौतुके ।" असे आवाहन कवीने केलेले आहे. या राष्ट्रीय कवितावाचून डॉ. वा. भा. पाठक म्हणतात, " भ. श्री. पंडितांच्या ' सुप्तज्वालामुखीस ' आणि ' युगान्त ' या कवितांतून बहुजन समाजातील दडलेली शक्ती निर्माण होणार व जुन्याची जागा नव्या प्रेरणा घेणार असे विचार आले आहेत."[३९] डॉ. अ. ना. देशपांडेही पंडितांच्या क्रांतिकारक विचारांची दखल घेतात... " क्रांतीची चाहूल त्यांना लागली असून ' अढळ राहो तुझा बावटा त्यावरी चिन्ह तव घन विळाद्वय ' या शब्दात त्यांनी तिचे स्वागत केले आहे."[४०] डॉ. वि. भि. कोलते म्हणतात, " बदलत्या राजकीय परिस्थिती-बरोबर वर्ग वैषम्याची व श्रमजीवीच्या महत्त्वाची जाणीव होऊन पंडितांनी गायिलेले ' क्रांतिस्तोत्र ' त्यांच्यावर झालेल्या साम्यवादी विचारसरणीच्या परिणामाचे दिग्दर्शक आहे."[४१] विविध प्रकारच्या स्वातंत्र्यासाठी, विषमतेच्या निर्मूलनासाठी प्रसंगी क्रांतीचे प्रखर शस्त्र उपसले पाहिजे असा या कवितांतून पंडितांनी आशय प्रकट केलेला आहे.

राष्ट्रीय जीवनाचे यथातथ्य प्रतिबिंब चित्रित करणाऱ्या कविता– १९३० ते १९५० पर्यंतच्या राष्ट्रीय घडामोडीचे यथातथ्य प्रतिबिंब कवी कुसुमाग्रजांचा अपवाद करता पंडितांच्या कवितेत जसे आढळते तसे ते इतर कवींच्या कवितेत आढळत नाही.[४२] किंबहुना पंडितांच्या राष्ट्रीय कवितांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ' वर्गवैषम्य ', ' युगांतर ', ' कर्मकन्याचे गाणे ', ' श्रमजीवीचाकांनो ', ' कलिकुबेर ', ' क्रांतिस्तोत्र ' या कवितांतून राष्ट्रीय जीवनात आढळणाऱ्या आर्थिक विषमतेचे, दीनदलितांच्या शोषणाचे प्रभावी चित्रण पंडितांनी केलेले आहे. ' विधवेचे आत्मसमर्पण ', ' परित्यक्ता ', ' स्त्री ' यासारख्या कवितांतून ' स्त्रियांचे दास्य ', त्यांची सामाजिक उपेक्षा, हीन लेखण्याची पुरुषी मनोवृत्ती आणि तिचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्वही कवीने स्पष्ट केलेले आहे.

" क्षणमात्रच केवळ तू रमणी । पण युगायुगांची तू जननी " किंवा " तुजविण कोठून समाज धारण । जग बुडेल तुज वाचुन शून्यी " या पंक्ती निश्चितच आशयगर्भ आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या परिस्थितीमुळे सुचलेले विचार ' आजच्या मानवतेस ', ' आज ', ' विमानास ' या कवितांतून आलेले आहेत. जपानवर अमेरिकेने केलेला अण्वस्त्राचा भयानक प्रहार आणि त्यामुळे घडून आलेला विनाश पाहून कवी म्हणतो,

" दिव्य शक्ती लाभली, योजिली ती घ्यावयाला शक्ति हीनांचे बळी
पूर रक्तांचे किती ! आणि अस्थिचे गिरी हे त्यास आहे का मिती ?" (– शाप)

१९४५ मधील बंगालचा भयानक दुष्काळ ' दुर्भिक्ष ' या कवितेत आलेला आहे. ' भारत स्वतंत्र होणार ! ' असे कळताच त्यासंबंधीची कवीची प्रतिक्रिया ' इंद्रप्रस्थाकडे ' या कवितेतून प्रकट झालेली आहे. भारताची दुर्दैवी फाळणी झाल्याचे पाहून कवीला झालेले दुःख ' भाऊबंदकी ' या कवितेतून व्यक्त झालेले आहे. निजाम हैदराबादमधील रझाकारांची बंडाळी ऐकून ' वामनास आवाहन ' ही कविता पंडितांनी लिहिली आहे. भारतीय गणराज्याची निर्मिती झाली परंतु त्याचे वर्णन ' २६–१–१९५० ' या कवितेत आहे. ' भाऊ भाऊ ' मध्ये प्रांतीयतेच्या वादाचे चित्रण आहे. आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांची दखल, ' कुठून विश्वशांती ?' या कवितेत घेतलेली आहे.

मानवतावादाचा पुरस्कार आणि वीर विभूतिपूजन–' देवदानवातला दुवा ', ' आजच्या मानवतेस " ' विश्व अवघे हे माझे ', ' विमान ', ' ध्वजवंदन ' इत्यादी कवितांतून कवीने मानवतावादाचा पुरस्कार केलेला आहे. ' भाऊ भाऊ आपण सगळे मानवता मातेची बाळे । स्वतंत्र आहो, समान आहो । भिन्न भिन्न परिवेष ' अशी त्यांची शिकवण आहे. ' जन्मभूमि प्रशस्ति ', ' त्यांच्या समाधी-पुढे ', ' अमरमहात्मा ', ' शाबास आहे तुझी ' या कवितांतून पंडितांनी वीर विभूतिपूजन केलेले आहे. पराक्रमी भारतीय वीरपुरुषांची स्मृती, यतींद्रदास, महात्मा गांधी आणि सरदार भगतसिंग यांचा गौरव अनुक्रमे या गीतांतून कवीने केलेला आहे. राष्ट्रीय जीवनावरील प्रतिक्रिया व्यक्त करणारे पंडित आशावादी आहेत. " कर हवन अगोदर प्राण तुझे मग मिळव पाहिजे तुज जे जे ।। " अशा ध्येयवादाने आशावाद संपन्न आहे.

काव्यात्मकता– सौंदर्यवादी भावकवी म्हणून ओळखले जाणारे पंडित राष्ट्रीय वृत्तीचे कवी आहेत. राष्ट्रीय विचारांनी त्यांच्या काव्यातील भावसौंदर्य करपलेले आढळत नाही. डॉ. अ. ना. देशपांडे त्यांच्या काव्यसौंदर्यासंबंधी म्हणतात, " चित्रातला रेखीवपणा आणि नादमधुर शब्दांची योजना हे गुण पंडितांच्या कवितेत ठळकपणे दिसून येतात." [४३] पंडितांची राष्ट्रीय कविता काव्य-दृष्ट्या श्रेष्ठ आहेच पण राष्ट्रीय जीवनाचे यथार्थ प्रतिबिंब चित्रित करण्यात तिने दाखविलेला उत्साह अधिक मोलाचा असल्याने तिचे ऐतिहासिक दृष्टीनेही अतिशय महत्त्व आहे.

द्रष्टे राष्ट्रकवी संत तुकडोजी महाराज
(१९०९–१९६८)

जीवनकार्याचा अल्प परिचय– राष्ट्रीय कवितेच्या या प्रदीर्घ परिक्रमेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची राष्ट्रीय कविता (भजने) म्हणजे पावन प्रयाग तीर्थ म्हणावे लागेल. भगवद्गीताप्रणीत ' ज्ञानमय कर्म व कर्ममय उपासना ' असे त्यांच्या जीवनाचे सूत्रमय वर्णन करता येईल. महाराजांचा

जन्म अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या लहानशा गावात झाला. त्यांच्या आईचे नाव मंजुळा आणि वडिलांचे नाव बंडोजी बाबा ! बंडोजी बाबांचा शिवणकामाचा व्यवसाय होता. विदर्भातील दुसरे महान संत प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज यांनी नवसासायासाने झालेल्या या मुलाचे नाव 'माणिक' असे ठेवले. माणिकला बालवयापासूनच ईश्वरभजनाची गोडी लागली होती. एखाद्या देवळात जाऊन बरोबरीचे सोबती जमवून एकतारी व खंजिरीच्या तालावर तो भजने गात असे. पुढे योगायोगाने वरखेडचे संतपुरुष आडकुजी महाराज यांच्या संपर्कात माणिक आला आणि त्यांच्या जीवनात विलक्षण परिवर्तन घडून आले. तिथेच त्यांचे तुकडोजी हे नाव रूढ झाले. तुकडोजींचे शालेय शिक्षण प्राथमिक दुसऱ्या इयत्तेपर्यंतच झालेले होते परंतु गुरुकृपा वा योगसाधना म्हणा, पूर्वपुण्याई आणि ईश्वरभक्ती म्हणा, पण महाराज भक्तिरसपूर्ण भजने लिहू लागले आणि पहाडी आवाजात तन्मयतेने गाऊ लागले.

ईशसेवेकडून राष्ट्रसेवेकडे– सद्गुरू आडकूजी महाराजांच्या समाधीनंतर तुकडोजींचे भ्रमण सुरू झाले. रामटेक, चिमूर, चंद्रपूर जिल्हा, विदर्भ, महाराष्ट्र असे त्यांच्या भ्रमणाचे क्षेत्र वाढले. जाणिवेचे आणि अनुभूतीचे क्षेत्र वाढले आणि जीवनाच्या अनुभवामुळे ईशसेवा आणि राष्ट्रसेवा यात त्यांना अद्वैत दिसू लागले. राष्ट्रसेवा आणि ईश्वरसेवा यात अभिन्नता आढळून आल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय भजनांची रचना केली. महाराजांनी पंढरपूर येथे अखंड परिव्राजकाची दीक्षा घेतली आणि आपल्या दैवी सामर्थ्याचा व अलौकिक प्रतिभेचा उपयोग लोकांच्या ठिकाणी धर्मश्रद्धाजागृती आणि राष्ट्रप्रेम जागृतीसाठी केला. [४४] लोकशिक्षणाच्या हेतूने संपूर्ण भारतभर त्यांनी भ्रमण केले. राष्ट्राला संघटित करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. गुरुदेव सेवा मंडळाच्या भारतभर शाखा स्थापन करून त्यांनी राष्ट्रीय जागृती आणि संघटन करण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता "श्री गुरुदेव" मासिक काढून मानवतावादी राष्ट्रीयतेचा राष्ट्रसंतांनी आयुष्यभर प्रसार केला. या सेवा मंडळाच्या माध्यमातूनच सामुदायिक प्रार्थनेच्या कार्यक्रमाची योजना महाराजांनी आखली. ग्रामोद्योग, खादी, स्वावलंबन, राष्ट्रीय शिक्षण या गांधीजींच्या राष्ट्रीय कार्यक्रमाचाही पुरस्कार केला. तरुणांच्या ठिकाणी भजन मंडळाच्या निर्मितीची आवड निर्माण केली आणि महाराष्ट्रात, मध्यप्रदेशात सहस्रावधींच्या संख्येत भजनमंडळे अस्तित्वात येऊन विधायक व सामुदायिक कार्याला दिशा मिळाली. महाराजांच्या स्वरचित खंजिरी भजनांचे आणि भाषणांचे कार्यक्रम केवळ विदर्भ आणि महाराष्ट्रापुरते किंवा मध्यप्रदेशापुरते मर्यादित राहिले नाहीत. त्यांचे क्षेत्र विस्तारले आणि त्यामुळे लक्षावधी लोकांशी त्यांचा संपर्क आला. निरनिराळ्या राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संस्थांचे लोक त्यांचे चाहते बनले आणि मग त्यांच्या कार्याचे क्षेत्रही वाढले. महात्मा गांधींसारख्या राष्ट्रनेत्याने त्यांना महिनाभर आपल्या सहवासात ठेवून घेतले व त्यांच्या भजनांचा आपल्या आश्रमवासी बंधूंबरोबर आस्वाद घेतला. [४५]

आपल्या राष्ट्रीय भजनांच्याद्वारे आणि व्याख्यानांच्या द्वारे महाराजांनी बहुजन समाजात इतकी प्रभावी जागृती केली की राष्ट्रीय चळवळीकरिता, सत्याग्रहाकरिता, सहस्रावधी लोक धैर्याने पुढे आले. राष्ट्रसंतांच्या प्रज्ञावेलीला आलेले गोंदेदार सुगंधित फूल म्हणजे त्यांनी लिहिलेली "ग्राम–गीता." [४६]

राष्ट्रसंतांचे व्यक्तिमत्त्व– राष्ट्रसंतांचे व्यक्तिमत्त्वही त्यांच्या भव्योदात्त जीवनाप्रमाणेच अतिशय प्रभावी होते. वर्णाने सावळा उंचा पूरा भरदार देह, आजानुबाहू, शुद्ध खादीचा साधा पोषाख, साधी

राहणी आणि उच्च अशी विचारसरणी, ब्रह्मचर्याचे मुखावरील तेज, राष्ट्रीय जिव्हाळा वाक्यावाक्यातून प्रतीत होणारी आणि अंतःकरणाचा ठाव घेणारी अमोघ वाणी, खडच्या पहाडी, धारदार आवाजात अतिशय उत्कटतेने खंजिरीच्या तालावर स्वकृत भजने गाण्याची त्यांची अद्वितीय शैली, मधून मधून श्रीगुरुदेवांचे स्मरण आणि भजने गाताना जनसमुदायाला उद्देशून " हे मेरे प्यारे मित्रो, माताओ, वहनो ! " सारखी संबोधने, गाण्यातील तल्लीनता, त्यांचे आश्चर्यकारक पाठांतर आणि समयसूचकता यांचा प्रभाव केवळ ग्रामवासीच नव्हे तर नागरी सुशिक्षित लोकांवरही पडत असे.

एका शंकेचे निरसन– याच ठिकाणी एका शंकेचे निरसन करण्याची आवश्यकता आहे. या प्रबंधात मराठीतील राष्ट्रीय कवितांचा अभ्यास आहे. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या मराठीतील राष्ट्रीय कवितांनाच त्यात स्थान देणे औचित्याला धरून दिसणारे आहे. परंतु भजनासंबंधी राष्ट्रसंतांची भूमिका जाणून घेणे आवश्यक आहे. ते म्हणतात, " आज प्रत्येक भजन गाणाऱ्याने आपल्या देशाची सेवा मातृभाषेत व विशेषतः राष्ट्रभाषेत राष्ट्रीय भजने गाऊनच केली पाहिजे. त्याशिवाय सामुदायिक वृत्ती समाजात जागृत होणार नाही व आजची आपत्तीही टळणार नाही." [४७] महाराजांची ही भूमिका लक्षात घेऊन व त्यांनी हिंदीतून लिहिलेली अत्यंत प्रभावी राष्ट्रीय भजने वाचून त्यातील काहींचा उल्लेख मराठी भजनांबरोबरच केलेला आहे आणि तो महाराजांच्या भूमिकेशी सुसंगत आहे.

महाराजांची जीवनदृष्टी आणि साहित्यदृष्टी– महाराजांनी ज्ञानेश्वराप्रमाणेच अखंड परिव्राजक वृत्तीने भगवद्भक्ती आणि राष्ट्रसेवा केली. त्यामुळे त्यांचे जीवनध्येयही ज्ञानेश्वरांसारखेच आहे. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे " बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणोनी कळवळा, येतो त्यांचा " या भूमिकेतूनच त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मानवांच्या सेवेत घालविले.

" खळ–निंदक हे निर्मळ होउनि । द्वेषपणाचा लेश न राहुनि
सकळ प्रभू – गुण गावो । जगाचा भेद लयाला जावो ॥
मानवधर्म मना ते लाभो, निसर्गमय वृत्ती हरि शोभो
अखिल जगा सुख होवो । जगाचा भेद लयाला जावो " ॥ १ ॥

ज्ञानेश्वरांच्या ' पसायदाना ' सारखच राष्ट्रसंतांचे मागणे आहे. सुप्रसिद्ध ग्रामगीतेतही ' ग्रामदेवता जागृत ' व्हावी या हेतूने तिची रचना केल्याचे सांगून ग्रामीण मानवाचे उत्थान व्हावे ही इच्छा व्यक्त केली आहे. शेवटी आपले ध्येय व्यक्त करताना महाराज म्हणतात,

" ऐसे नि होवो जनी वनी । संतोष होईल माझीया मनी
मित्रत्व वाढो त्रिभुवनी । तुकडया म्हणे, ध्येय हेचि ।"

' हृद्गत ' सांगताना कवी आणि संत यांच्यातील अंतर मोठया मार्मिकपणे तुकडोजींनी स्पष्ट केलेले असून ते त्यांच्या जीवनदृष्टीवर आणि काव्यदृष्टीवर प्रकाश टाकणारे आहे. महाराज सांगतात, " कवी आणि संतकवी यात महत्त्वाचा फरक आहे की कवी हे राष्ट्राच्या शरीरावर सुंदर शृंगार चढवीत असतात आणि संतकवी हे राष्ट्राचे शरीरच सुदृढ व तेजस्वी करण्याचा प्रयत्न करीत असतात. नव्या युगाचे सुखस्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याची स्फूर्ती व शक्ती राष्ट्रातील बहुजन समाजाच्या अंगी आणून देणारे संतकवी हे अधिक महत्त्वाचे कार्य करीत असतात. [४८]

..." न सोसवे आता, न धरवे धीर ।
पीडिता हे राष्ट्र पाहुनि जग ।।"

अशीच तुकारामाप्रमाणे राष्ट्रसंतांची भूमिका आहे. याच जीवनदृष्टीचा उपदेश महाराजांनी कवींना केलेला आहे. ते सांगतात, "...भजन हे केवळ ईश्वराला संतुष्ट करण्यासाठीच संतांनी केलेले नसून जनतेच्या हृदयातील जनार्दन जागृत करण्यासाठीच ते प्रामुख्याने केले आहे. भजनाच्या प्रमळ भावनेतून राष्ट्राचे कठीण कार्य मोठ्या कुशलतेने ते (संत) करीत आले आहेत. शेवटी महाराज सांगतात, " तेव्हा मित्रांनो ! राष्ट्राला राष्ट्रीय भावनेने चेतवा, देशात दैवीशक्ती निर्माण करा, धर्म व देशभक्तीच्या पाण्याने सारा समाज फुलून उठेल अशी योजना आणि भारतातील तरुण स्त्री पुरुष हे स्वतःसह आपल्या देशाचे संरक्षण करणारे शिपायी आणि स्वावलंबी जीवनाचे आदर्श नागरिक बनतील असा ध्वनी घराघरात दुमदुमू द्या ! " [४९]

उत्कट राष्ट्रभक्ती– तुकडोजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व विकसनशील स्वरूपाचे होते. आरंभी ईश्वरभजनात तल्लीन होणारे तुकडोजी देश, काल, लोकस्थितीचा प्रत्यय आल्यानंतर राष्ट्रभक्तीकडे वळले आणि राष्ट्रसेवा हीच ईशसेवा असे भजनातून प्रतिपादू लागले. राष्ट्रासंबंधीच्या आपल्या आशा, आकांक्षा, इच्छा, अपेक्षा आपल्या लाडक्या सगुण परब्रह्मरूप मनमोहनाला सांगू लागले.

" या भारतात बंधुभाव नित्य असू दे
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ – संप्रदाय एक दिसू दे
मतभेद नसू दे ।" (– या भारतात बंधुभाव)

दुसऱ्या एका भजनात म्हणतात,

" नष्ट हो ही दैन्यता, बलहीनता – दुर्भाग्यता
निर्जीवता, परकी सत्ता, झळको स्वातंत्र्याचा दिवा ।।" (– अंतरी इच्छा अशी)

पारतंत्र्य हे अवनतीचे मूळ आहे– भारताच्या अवनतीचे, पारतंत्र्य हे मूळ आहे याची महाराजांना स्पष्ट जाणीव असल्यामुळे त्या पारतंत्र्याचे भिन्न भिन्न परिणामही त्यांनी आपल्या भजनांतून लोकांच्या पुढे मांडलेले आहेत. आपले परावलंबन, दारिद्र्य, दैन्य, अज्ञान, विषमता, दुराचार, भ्रष्टाचार यांचेही चित्र महाराजांनी रेखाटले आहे. या सर्व अरिष्टांतून भारतीयांची मुक्ती करण्याचे कार्य केवळ मानवी शक्तीच्या पलीकडचे आहे असे त्यांना वाटत असावे म्हणूनच त्यांनी दैवी शक्तीला; अवतारी विभूतींना वारंवार आवाहन केलेले आहे. ते कळवळून परमेश्वराला म्हणतात,

" मोहना ! यदुनंदना !! कमललोचना !!! पहा तरि नयना ।
या भारत देशाची हि कशी रे दैना ।।"

दुसऱ्या भजनात म्हणतात,

" कधि येशिल मनमोहना । पाहण्या भारत अपुला पुन्हा ।
भारता ग्रहण लागले, अति गुलाम जन जाहले
तोडण्या येइ बंधना, पाहण्या भारत अपुला पुन्हा "

' मोहना कधी येणार !', ' मनमोहन कधि येणार हो कुणि सांगाना !' ' अवकळा अशी का आली रे भारता तुझ्या देहाला !' ' हिंद भू च्या लेकरांनो स्वस्थ का बसला असा ', ' पूजा करावयास कुठे

स्थान राहिले'; 'हरि भजनासी नुरली जागा'; अशा किती तरी भजनांतून पारतंत्र्याची ही जाणीव उत्कटतेने व्यक्त केलेली आहे. हिंदी भजनांतूनही जाणीव व्यक्त करताना महाराज सांगतात,

" बन्सीका बजाना छोड दो, बनचक्र सुदर्शनधारी "...कारण...
" भारत अब हीन दीन भया है दुसरों के स्वाधीन गया है
नाम निशाना मिटा तुम्हारा प्यारी है पेटकी नोकरी "

'बेर भई प्रभू क्यों नहि आये !' 'बस नैन लगा ध्यानमे किसके हो मुरारी '५० इत्यादी भजने त्याच जाणिवेची अभिव्यक्ती करणारी आहेत.

स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा आणि लोकजागृती– राष्ट्राची हीनदीन अवस्था आहे आणि परमेश्वरच या परिस्थितीतून भारताला मुक्त करू शकतो अशा आशयाचे विचार महाराजांनी मांडल्याचे पाहिले आहे. परंतु महाराज केवळ दैववादी नाहीत. समर्थ रामदासांप्रमाणेच " यत्न तो देव जाणावा आणि केल्याने होत आहे रे ! आधि केलेच पाहिजे " या यत्नशील कर्मयोगावर त्यांचा दृढ विश्वास आहे. परमेश्वराच्या प्रार्थनेतून शक्तीची प्रेरणा घेऊन त्यांनी प्रत्यक्ष कार्यासाठी सज्ज होण्याची शिकवण लोकांना दिलेली आहे. ते एका भजनात म्हणतात,

" शूर देश हा तुझा; राम आणि कृष्ण यात जन्मले ।
शिवाजी भूषण हे जाहले...
रक्षण करण्या भारत – भूचे वाण तुवा घेतले ।
भाग्य तुज चमकाया लागले !" (– जिवंत हृदयाच्या पुरुषा)

दुसऱ्या एका अभंगात म्हणतात,

" चला उठा रे तरुणांनो ! हा आळस घेऊनि बसला का ?
' जगणे–मरणे राष्ट्राकरिता ' धर्म असा हा तरुणांचा
' ना उरला काळचि याचा ' हे समजूनि हृदयी रुसला कां ?"
(– चला उठा रे तरुणांनो !)

" राष्ट्र सुखाची कळकळ निर्मळ वाहताना अंतरी ।
नसू दे स्वार्थ सख्या । तीळभरी !" (– राष्ट्र सुखाची कळकळ)

किंवा, ' नौजवान जाग जानारे, अब तो निंद त्याग जाना रे !', ' जाग उठो बालवीरो अब तुम्हारी बारी है ।' ' चलो चलो उठो बिरो यह वक्त सामने खडी ',

किंवा, " वाहवा रे वैभव शूरो का, देख नजर हैरान करे–
... माला जिनकी वही हाथमें – भारत कब आजाद बने ?
पूजा उनकी वही हमेशा कब जगका दुख बाद बने !"

इत्यादी कविता वाचल्या की महाराजांच्या स्वातंत्र्याच्या उत्कट लालसेची आणि त्यांच्या लोक-जागृतीच्या कार्याची सहज ओळख पटते.

परंपरेचा गौरव आणि पूर्ववैभवाचे स्मरण– महाराजांच्या भजनांतून भारतीय परंपरेच्या अभिमानाचे, गौरवाचे आणि पूर्ववैभवाचे विविध प्रकारे प्रकटीकरण झालेले आहे. भारतीय राष्ट्राची भव्योदात्त परंपरा स्मरण केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. त्यांच्या मानवतावादी राष्ट्रवादाचे पोषणही त्यांनी या परंपरेच्या अभिमानाने केलेले आहे. मनमोहनाला महाराज सांगतात.

" ऐश्वर्य तुझ्या वेळिचे, गोपाळ–गोप–मेळिचे । नच स्वप्नि दिसे त्या खुणा ।।"

दुसऱ्या एका भजनात असे सांगतात.

" पूर्वज अमुचे कार्य प्रसंगी कसे कसे वर्तले । चलावे थोरांच्या पाउले ।"

' अवकळा अशी का आलीरे ।' ' हरहर बोलाना बोलाना वीरांनो । " जब श्याम भये रे काल '; ' जो फूलभरे रोपनके थे ।' इत्यादी मराठी हिंदी अनेक भजनातून हा परंपरेचा गौरव, परंपराभिमान आलेला आहे.

वीर विभूतिपूजन– महाराजांच्या शेकडो राष्ट्रीय भजनांतून वीर विभूतिपूजन झालेले आहे. महाराज स्वत: पौरुषाचे, पराक्रमाचे पूजक आहेत. या वीर विभूतिपूजनाची महाराजांची भूमिका मराठ्यांच्या परंपरेचा अभिमान राखूनही खऱ्या अर्थाने भारतीय आहे. भगवान श्रीकृष्ण आणि भगवान श्रीराम ही तर त्यांची दैवते आहेत. राष्ट्राकरिता प्रार्थना करताना या दोन दैवतांनाच त्यांनी प्रामुख्याने आळविले आहे. 'हरहर बोलाना ।' ही मराठ्यांची वीरगर्जनाही त्यांच्या मुखी आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राणाप्रताप, समर्थ रामदास, गुरू गोविंदसिंह आदी महापुरुष आलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांची अनेक भजने आहेत. 'था खुशबुदार वह फूलफूला महाराज शिवाजी छत्रपती ।' ' भारतमे ऐसे वीर थे शिवाजी हमारे ।' ' गर्जलि महाराणी, झांशीची मर्दानी ' लक्ष्मीबाईचेही अनेक ठिकाणी स्मरण राष्ट्रसंतांनी केलेले आहे. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर महाराजांनी ' गांधी गीतांजली ' या शीर्षकाखाली हिंदीत सुमारे १०१ भजने लिहिलेली असून त्यातून गांधीजींचे विभूतिपूजनच आलेले आहे. त्यात काही विलापिकाही आहेत. मराठीतूनही गांधीजींचे विभूतिपूजन करणारे काही अभंग महाराजांनी लिहिलेले असून त्यातून त्यांचे महात्माजींवरील प्रेम, आत्मीयता व आदर व्यक्त झालेला आहे.

वर्तमानकाळाचे प्रतिबिंब– महाराजांची शेकडो भजने म्हणजे भारताच्या तत्कालीन परिस्थितीचे वास्तव प्रतिबिंब आहे. महाराजांच्या भजनाचे कार्यक्रम १९३० नंतर महाराष्ट्रात होऊ लागले आणि १९६८ पर्यंत म्हणजे सुमारे ३८ वर्षे ते सतत होत राहिले. दरम्यानच्या काळात आपल्या देशात अनेक स्थित्यंतरे घडून आलीत. अनेक चळवळी झाल्या, सत्याग्रह झाले, १९४२ ची चलेजावची क्रांती झाली, दुसरे जागतिक महायुद्ध झाले, भारताला स्वातंत्र्य मिळाले. फाळणीच्या काळात जातीय दंगली उसळल्या. गांधीजींची हत्या झाली. पुढे राष्ट्रीय योजना आल्या. भूदान चळवळ झाली. अशा किती तरी घटना घडल्या. राष्ट्राचे दैन्य, दारिद्र्य, दु:ख, परावलंबित्व, अज्ञान, जातीय द्वेष आदी पाहून महाराजांच्या अंत:करणाला अपार वेदना होतात व ते परमेश्वराचाच धावा करतात. एका भजनात ते सांगतात,

" उडाली भूमिची सीमा, पिकेना तीळभरी शेती
खर्चही ना निघे काही, राहती लोक उपवासी
विषारी चित्त जनतेचे, पसरले वैर वन–सारे
निघाले वृक्ष पापांचे । फळांच्या वाढल्या राशी ।।"

दुसऱ्या एका भजनात, महाराज सांगतात,

" कष्टही करून न मिळे खाया ।
सत्य असो न मिळे बोलाया । ' काय करा ' च कुणी सांगाया

' रहा, मरा, कुणि काहि करा ', हे झाले सगळ्या पाठ रे ।
तिळ तीळ तुटे जीव माधवा ? मन पाहतसे तव वाट रे !"

किंवा

" सति साध्वी रडति किती, सुजनांचे हाल अती ।
गुंडांची भ्रष्ट मती, चढली शिरी वारे "

भारताची फाळणी होऊन पाकिस्थान अस्तित्वात आले त्यावेळी जातीय दंगलींनी भयानक पेट घेतला. महाराज साधुवृत्तीचे क्षमाशील परंतु त्या भयानक अत्याचाराने त्यांनाही सात्त्विक संताप आला आणि ते त्वेषाने उद्‌गारले,

" जिवंत हृदयाच्या पुरुषा । तव पालट का होईना ।
धिगाणा कसा बघवतो मना ?"
... ... कापुनी मुलांची शिरे माळ घालती
किती तरी बालके अग्नीवरी भाजती
टोचुनी शस्त्र त्या फिरवुनी भिरकाविती
हृदय फाटते ऐकुनि असल्या अमानुषी यातना
पाहुनी चीड नये का मना ?
... ... का थंड तुम्ही हा बलात्कार पाहुनी ?
मरणास भिता का कोल्ह्यासम होउनी ?
... ... चाल पुढे घे पाय भिउ नको, मरण येउ दे तुला
चमकशी चारित्र्याने खुला
गिधाड होउनि जगण्यासाठी राहू नको भारती
उठ चवताळ शत्रुच्या प्रती " (– जिवंत हृदयाच्या पुरुषा)

१९४२ ची चले जाव चळवळ– विदर्भात आणि महाराष्ट्रात ४२ च्या लढ्याची तयारी करण्याचे कार्य राष्ट्रसंतांच्या शेकडो भजनांनी केलेले आहे आणि आश्चर्याची गोष्ट अशी बहुजन समाजातील लक्षावधी अशिक्षित, अर्धशिक्षित राष्ट्रभक्तीची प्रेरणा घेऊन निर्भयपणे या चळवळीत उतरले. मा. स. उपाख्य गोळवलकर गुरुजींच्या शब्दात सांगायचे तर, " ... ... राष्ट्रसंत हे केवळ एका कोपऱ्यात बसून हरिहरि करणारे नसल्याने व आध्यात्मिक मोक्षाच्या व्यवहारात राष्ट्रस्वातंत्र्य हे लौकिक रूप आहे अशी त्यांची धारणा असल्याने त्यांनी १९४२ च्या आंदोलनाच्या वेळी जी ओजस्वी स्वातंत्र्यभावनेने ओथंबलेली भजने अंत:स्फूर्तीने रचून जनमानसात शुद्ध राष्ट्रप्रेमाची ज्योती फुलविली व स्वातंत्र्याच्या लढ्यात प्राणपणाने उडी घालण्यास गावोगावच्या शिक्षित अशिक्षित सर्व बांधवांना प्रवृत्त केले त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांची त्यांच्यावर मोठी भक्ती जडली."[५१]

' चल ऊठ भारता आता !', ' राष्ट्र जागवा राष्ट्र जागवा ', ' चाल पुढे घे पाय भिउ नको!', ' घाबरला का तरुण गडचारे तुझा पुढारी आला ।' ' नौजवान जाग जानारे अब तो निंद त्याग जानारे !' ' जाग उठो बालवीरो अब तुम्हारी बारि हैं !', ' वाहवारे वैभव शूरो का ', ' अब काहेको धूम मचाते हो । दुखवाकर भारत सारे । आते है नाथ हमारे ।' आणि त्यातील,

" झाड झडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना
पत्थर सारे बाँब बनेंगे । नाव लगेगी किनारे "

या ओळी जनतेच्या मुखातून बाहेर पडत होत्या. " यह हिंद सदा के लिये आझाद रहेगा। जुगजुग जियेगा।" अशा आशादायक पंक्तींनी लोकांना स्फुरण चढले असल्यास आश्चर्य नाही. सारांश; तत्कालीन राष्ट्रीय जीवनाचे यथातथ्य प्रतिबिंब कोणत्याही तत्कालीन राष्ट्रीय कवींच्या तुलनेत राष्ट्रसंतांच्या भजनात अधिक प्रमाणात आहे आणि ते जिवंत व प्रभावी आहे. तुकडोजी महाराजांचे पोवाडे–' लोकशाहीचे पोवाडे ' या संग्रहात महाराजांचे खालील पोवाडे संग्रहीत झालेले असून लोकजागृती व लोकशिक्षण हाच त्यांचा लिहिण्यामागील हेतू आहे. (१) स्वराज्याची पूर्तता, (२) भजनाचे सार्थक; (३) प्रतिष्ठेचा पोरखेळ, (४) ग्रामराज्याची दुर्दशा, (५) मरणाचा पेला, (६) उलटी दुनिया; (७) लोकशाहीचा जयजयकार, (८) मतदान कुणा करणार ? इत्यादी उल्लेखनीय आहेत.

सामाजिकता– राष्ट्रसंतांची भूमिकाच व्यापक अशा मानवतावादाची असल्याने सामाजिक विषमतेवर, आर्थिक विषमतेवर, जातीयवादावर त्यांनी आसूड ओढले आहेत. सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करण्याची त्यांची कल्पना पारंपरिक आहे. ते समदृष्टी आहेत. समदृष्टीनेच त्यांनी या प्रश्नाकडे पाहिले आहे.

" एकाला धन धान्य मिळे आणि एकाचा जिव प्राण गळे।
नेमाने पाहता सगळे, या अन्यायामधि फसला कां ?"

असा तरुणांना त्यांचा सवाल आहे. प्रथम स्वतंत्र भारताची, नंतर महात्माजींची रामराज्याची कल्पनाच राष्ट्रसंतांनी पुरस्कारिली आहे.

" सच्चे सेवक बनेंगे हम जब आजादी को पायेंगे
घरघरमें आबादी देकर, रामराज्य कहलायेंगे
— गरिब—अमिर सब एकहि होकर, देशका मान बढायेंगे ",

दुसऱ्या एका भजनात,

" छुआँ छूतका भेद न मानो, सब है भाई हमारे
काम करो अपनी इच्छासे, सब उद्योग हमारे।"

असे सांगून सामाजिक विषमता नष्ट करण्यासंबंधी बोध केला आहे.

राष्ट्रीय आशावाद– महाराजांच्या भजनांतून दैन्य, दारिद्र्याचे वर्णन आहे. दुष्काळ, भ्रष्टाचार; अनाचार यांची वर्णने आहेत आणि त्यांचा निषेधही आहे. परंतु त्या सर्वांच्या मूळाशी राष्ट्रसंतांचे माणुसकीचे मानवधर्माचे ध्येय आहे. महाराजांचा राष्ट्रवाद हा आध्यात्मिक स्वरूपाचा असल्यामुळे " स्वदेश भुवनत्रयम् " असे त्याचे विश्वव्यापक क्षेत्र आहे. अनुभूतीही व्यापक आणि उदार आहे म्हणूनच त्यांच्या भजनाचे सूर निराशावादी नाहीत तर आशावादी आहेत. जाती, वर्ण, पक्ष, पंथ; प्रदेश, धर्म यांच्या पलीकडे जाऊन मानवी कल्याणाच्या भूमिकेवरूनच त्यांची सर्व शिकवण आहे.

" अन्याय कुणावर करू नको जाउनी
परि देशद्रोह्या दया न ठेवी मनी "

असे रोखठोक त्यांच्या राष्ट्रीय शिकवणुकीचे स्वरूप आहे. पूर्वजांचे विस्मरण कधीही होऊ देऊ नकोस, त्यांचा अनुभव पाठीशी असू दे व मग वाटचाल कर–

" ही याद असू दे विसरू नको चालता
जरी काळ आडवा आला कर पालथा ।।"

असा प्रयत्नवादी आशावादही त्यांनी सांगितला आहे. मानवजन्माचे सार्थक सांगताना महाराज म्हणतात,

" करि स्वतंत्र राष्ट्रा अपुल्या, करि स्वतंत्र देशा अपुल्या
हा धर्म मानसिल जेव्हा । नरजन्म सफल हा तेव्हा ।
तो पुरुष धन्य मानावा ।
करी कृतार्थता मातेची । पर्वा न ठेव मरण्याची ।।"

असा महाराजांचा तरुणांना ओजस्वी संदेश आहे.

काव्यस्वरूप– राष्ट्राच्या आणि मानवजातीच्या उद्धाराच्या उत्स्फूर्त प्रेरणेतून महाराजांची काव्यनिर्मिती झालेली असल्याने ती रसोत्कट आणि ओजस्वी आहे. त्यांच्या निर्मितीत सहजता आणि उत्स्फूर्तता आहे तशी त्यांच्या गायनातही भावोत्कटता असल्याने ती अतिशय परिणामकारक ठरलेली आहे. या काव्याची निर्मिती उदात्त हेतूने झाल्याने त्या काव्याला परतत्त्वाचा स्पर्श झालेला आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " दासगणूंची प्राचीन मराठी संतांची परंपरा निष्ठापूर्वक आजतागायत जिवंत ठेवण्याच्या श्रेयात त्यांचा फार मोठा वाटा आहे. संत तुकडोजी याच महान परंपरेचे एक श्रेष्ठ पाईक आहेत... तुकडोजींचे लिहिणे साधे सरळ पण हृदयस्पर्शी आणि त्यात अंतरीचा जातिवंत जिव्हाळा व तळमळ आहे."[५२] प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, "... चालू युगातही तुकडोजी महाराजांची काव्यें जनसाधारणात विलक्षण प्रसार पावली आहेत. परंतु ही काव्यें निव्वळ भक्ति-प्रचुर नसून त्यास राष्ट्रीयतेची डुब देण्यात आली आहे हे लक्षात घेतले पाहिजे."[५३] या दोन काव्य-मीमांसकांची साक्ष एवढ्याचसाठी काढली की त्यांनी महाराजांच्या कवितेची दखल घेतलेली आहे. स्वभावोक्ती, कालसापेक्षता, कल्पकता, रसाळता, सुबोधता आणि अलंकारांची योजकता या काव्य-गुणांनी महाराजांची कविता संपन्न आहे. भजनांना महाराजांनी जनसामान्यांना रुचणाऱ्या पारंपरिक आणि चित्रपट गीतांच्या फडकत्या चाली दिल्याने ती भजने स्मृतीत कायम होतात. 'ग्रामगीता' ही तर महाराजांची वाङमयमूर्ती आहे. महाराजांच्या काव्यावर नागपूर विद्यापीठात सुमारे चार लोकांनी प्रबंधलेखन करून आचार्य पदवी मिळविली आहे. यावरूनही त्यांच्या काव्याचे महत्त्व स्पष्ट होते.

रुद्रवीणेचा तीव्र झंकार करीत क्रांतीची अंगारगीते गाणारे कांत
(जन्म १९१३)

तांबे, रविकिरण मंडळ यांच्या परंपरेतील एक श्रेष्ठ भावकवी म्हणून जसा कविवर्य कांतांचा लौकिक आहे तसाच अनिल, कुसुमाग्रज, बोरकर या राष्ट्रीय पण क्रांतिप्रवण कवींच्या परंपरेतील एक प्रमुख कवी म्हणूनही लौकिक आहे. स्थंडिल संप्रदायी 'प्रकाशपूजक' अशा कवींच्या संप्रदायात कांतांचे स्थान असल्याचे 'रुद्रवीणे'च्या प्रस्तावनेत श्री. प्रभाकर पाध्ये यांनी सांगून टाकले आहे. प्रा. भ. श्री. पंडितांनी भावकवी म्हणून कांतांची योग्यता मान्य केलेली असली तरी त्यांनी क्रांतिवादी कवींच्या श्रेय नामावलीत कांतांचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात, " क्रांतिवादी कवींच्या काव्यात सौंदर्याविषयीची आसक्ती, स्वातंत्र्यासंबंधीची तळमळ, गुलामीचा तिटकारा, विषमतेची व अन्यायाची चीड, समतेचा पुरस्कार व मानवतेवरचे प्रेम या वंस प्रवृत्तींचे सूर सारख्या प्रमाणात विविध रीतींनी मोठ्या कुशलतेने आलापिलेले ऐकू येतात. क्रांतिवादी कवींची कविता पूर्वागत परंपरेच्या वारशातून आकारास आलेली आहे."[५४]

जीवनपरिचय आणि काव्यप्रेरणा– पार्थिव, कृष्णकुमारांप्रमाणे कांत हेही नांदेडचे. त्यांचे शिक्षण नांदेड येथेच झाले. किशोर वयातच कांतांचा कवितेशी स्नेह जुळला. द. ल. महाजन या कवींचा सहवास आणि त्यांची राष्ट्रीय कविताही या कवीला आरंभी प्रेरक ठरली. कवी म्हणून कांत ओळखले गेल्यानंतर त्यांना हैद्राबाद येथे शेतकरी खात्यात नोकरी करावी लागली. स्वातंत्र्योत्तर काळात ते आकाशवाणीवर अधिकारी म्हणून वावरले पण त्यांना आपल्या कवित्वाचा विसर पडला नाही.

केशवसुतांचा वारसा– 'रुद्रवीणे'च्या प्रस्तावनेत श्री. प्रभाकर पाध्ये म्हणतात, "...आजचे अग्निपंथीय कवी, गांधी युगातील तेजस्वितेशी शक्य तितकी समरसता साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. एका दृष्टीने हा केशवसुतांचा वारसा आहे."[५५] कांतांना अभिप्रेत असलेला क्रांतिकारक बंडखोरीचा आशय प्रामुख्याने राष्ट्रीयतेशी निगडित आहे तसा तो केशवसुतात आढळतो असे म्हणता येणार नाही.

कांतांची काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी– आपल्या काव्याचे प्रयोजन '१९३३' मधल्या 'फटत्कार' या काव्यसंग्रहातील 'माझे गाणे' या कवितेत कांतांनी सांगितलेले असून, ते त्यांच्यावरील राष्ट्रीय कवींच्या प्रभावाचे आणि काव्यदृष्टीचे द्योतक आहे. कांत सांगतात, "माझ्या नसानसातून स्फूर्ती उसळत आहे. मी जगाला जागे करीन व पंगूकडूनही गिरी लंघवीन. माझ्या मुखावर देशाच्या स्वातंत्र्याचे पूर्ववैभवाचे गान नाचत आहे. त्याने मेलेल्यांनाही जिवंत करीन. त्यांच्या रोमारोमात देशभक्तीची लाट उसळेल व देशार्थ ते रणांगणात प्राण देतील. मग मी माझ्या देशाचा उज्ज्वल इतिहास गाईन."

त्यात,

"शृंगार कुठे नाचेल । कारुण्य कुठे रडवील ।
अन् वीरश्री स्फुरवील । अशी गाणी गायालाच मज जगती मरणे जगणे "[५६]

(– माझे गाणे)

हे प्रयोजन केशवसुतांच्या परंपरेत बसणारे नाही. राष्ट्रभक्तीच्या भावनेतून हे काव्यप्रयोजन सिद्ध झालेले आहे आणि ते सुरुवातीपासूनच कवीच्या ठिकाणी आहे. १९३९ मध्ये लिहिलेल्या 'हे माझे जीवन गीत' या कवितेत कवी म्हणतो,

"मी रुधिरे नच उषा रंगविली
शृंखला न पायिची तोडिली
स्वप्न वंदिच्या मनिचे मी, जे तुटें जुटें रातीत
हे माझे जीवन गीत ।।"

(– हे माझे जीवन गीत)

'वन्देमारतम्' हे गीत गाण्याच्या जन्मजात अधिकाराच्या संरक्षणार्थ तेजस्वी लढा चालविणाऱ्या उस्मानिया विद्यापीठाच्या वीर विद्यार्थ्यांना उद्देशून १९३८ मध्ये लिहिलेल्या 'निर्भय गाना'तूनही आपल्या जीवन दृष्टीचे कवीने दर्शन घडविले आहे. कवी म्हणतो;

"गाणे गा ते मातृभक्तिचे
पूजन–मंत्रचि निज मातेचे
भिजुनि रुधिरी स्वातंत्र्य ऋचा ती होय दिव्य निर्माण
सख्यांनो, गा, गा, निर्भय गान ।।"

कवींना उद्देशून कवी म्हणतो,

"...काय दाउनि नव्या जगाचा मधु मंथर आभास
ध्येयासाठी रक्त सांड, ती नच कविता अनमोल" (–कवे, दे, दे, शब्दांचे मोल)

१९४५ साली सखीला उद्देशून लिहिलेल्या 'गाशिल का हे गान' या कवितेतून कवीने पुन्हा एकदा आपल्या जीवनदृष्टीचा आणि काव्यदृष्टीचा परिचय दिला आहे. कवीने प्रश्न विचारला आहे.

"देशास्तव वनवासी झाले
न्यायास्तव फांसावर चढले
अराजकांच्या अभिलाषांचे घुमते येथ तुफान
सखे, तूं गाशिल कां हे गान ?" (– गाशिल कां हे गान ?)

हे सर्व लक्षात घेतल्यावर ही केशवसुतांची परंपरा वाटत नाही. तरीही श्री. प्रभाकर पाध्ये यांनी कांतांच्या 'रुद्रवीणे'ला प्रस्तावना लिहून जी या कवींच्या परंपरेची ऐतिहासिक मीमांसा केलेली आहे ती बव्हंशी मान्य होण्यासारखी आहे.

यज्ञसंप्रदायी कवितेची ऐतिहासिक पार्श्वभूमी– कांतांच्या राष्ट्रीय कवितेचा अन्वयार्थ लावण्याच्या दृष्टीने श्री. प्रभाकर पाध्यांनी केलेली ऐतिहासिक मीमांसा जितकी मार्मिक तितकीच उद्‌बोधकही आहे. ते लिहितात, "मराठी काव्यात हे क्रांतिपूजन नवीन नाही. दहशतवाद्यांच्या आत्मार्पणाने महाराष्ट्राचे अंतःकरण भारून टाकले होते तेव्हा सावरकर गोविंदांच्या कवितेत हे क्रांतिपूजन झाले पण त्याची प्रकृती आणि प्रेरणा निराळी होती. त्यात परंपरेचे पुनरुज्जीवन होते आणि प्राचीन संस्कृतीची आराधना होती. आजच्या क्रांतिपूजेत नवे विश्व उभविण्याची आकांक्षा आहे. जीवनाचे आकाश नव्या नक्षत्रांनी मोहरून टाकण्याची इच्छा त्यात आहे."... गांधीजींच्या अहिंसायुगात ही नवी कविता यज्ञकुंडातून देवता बाहेर यावी तशी आली हे ध्यानात घेतले म्हणजे महाराष्ट्राच्या वाङमयीन प्रकृतीचे थोडेसे उद्‌बोधक दर्शन होते." [५७]

राष्ट्रप्रेम– राष्ट्रप्रेमाचे बाळकडूच कांतांना मिळालेले आहे. त्यामुळेच 'पहाटताऱ्यात' म्हणजेच वयाच्या अवघ्या सोळाव्या सतराव्या वर्षीच लिहिलेल्या 'माझे गाणे', 'अंगाई', 'दसरा' या कवितांतूनही राष्ट्रप्रेमाचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. 'पहाटताऱ्या' नंतर तीनच वर्षांनी प्रकाशित झालेल्या 'फटत्कारा' तील काही कविता रुद्रवीणेत समाविष्ट झालेल्या आहेत. 'गाशिल का हे गान', 'पहा अंगुली चिरुन', 'सदरा', 'जन्मठेप', 'सांडिता कुणास्तव', 'निर्भय गान', 'फितुर', 'फटत्कार', 'देवि येते घरा' या सर्व कवितांतून कांतांचे राष्ट्रप्रेम उत्कटपणे व्यक्त झालेले आहे. विप्रलंभ शृंगाराची आणि वियोग शृंगाराची गाणी गाणाऱ्या नायिकेला कवी राष्ट्रप्रेमाने ओथंबलेली गाणी गाशील का म्हणून विचारतो आहे. 'गाशिलका हे गान' या कवितेतून व्यक्त झालेले आहे. फाशीच्या तक्तावर उभ्या असलेल्या राष्ट्रभक्त भावासाठी सदरा शिवणाऱ्या बहिणीच्या अंतःकरणातले तुफान कवीने 'सदरा' या नाट्यगीतात साकार केलेले आहे. ती बहीण भावाला म्हणते,

"छळितात दूत तुज जुलुमी परसत्तेचे
सारेच भुकेले पशु भवती प्राणाचे
परि कुशल चिंतिते घरी आपुली आई
तुज असो औक्ष हे युगा युगाचे, भाई।" (– सदरा)

' जन्मपेठ ' ही कविता वाचताच सुप्रसिद्ध क्रांतिकारक ' वासुदेव बळवंत फडके ' यांचे ' एडन ' च्या कारागृहातील जीवन आणि हौतात्म्य यांचे स्मरण होते. कवितेची सुरुवात,

" आई नमितो श्यामल चरणी
अंतरती जे मज घडिघडिनी "

अशी उत्कटतापूर्ण आहे. शेवटले मातृभूमीजवळ केलेले आत्मनिवेदन तर अत्यंत हृदयद्रावक आहे.

" आशा वांछा एकचि चित्ती
मित्रांना शत्रूंना विनंती
मातृभूमिची मूठभर माती
मरता पदरी द्या बांधोनी !
आई नमितो श्यामल चरणीं ! "

१९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या लढ्याच्या काळात इंग्लंडच्या बाजूने भारतीय सैनिक लढताना पाहून कवीला आलेला संताप ' सांडिता कुणास्तव रुधिर तरी ?' या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त झालेला आहे. कवितेची सुरुवात,

" सांडिता कुणास्तव रुधिर तरी
उष्ण अर्घ्य अर्पिता कुणाला ? देव न उरले घरेवरी "

अशी झालेली आहे.

या सर्व राष्ट्रप्रेमाने उत्कट असलेल्या कविता वाचून महाकवी सावरकर आणि स्वातंत्र्यकवी गोविंद यांच्या परंपरेशीच कांतांचे नाते असल्याची खात्री पटते.

स्वातंत्र्याची उत्कट लालसा व्यक्त करणारी कांतांची क्रांतिगीते– कांतांच्या अनेक क्रांतिगीतांमधून त्यांची स्वातंत्र्याची लालसा आणि अन्याय अत्याचार यांच्या विरुद्धचा उग्र संताप व्यक्त झालेला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्लंडच्या तुरुंगात असताना ' मूर्ति दुजी ती ' या नावाची कविता लिहून या रुधिर संप्रदायाचे उद्घाटन केलेले आहे. कांतांनी ' नवे वर्ष ' मध्ये असेच आवाहन केलेले आहे.

" कंठी नररुद्राच्या माळा । साम्राज्याचे भस्म कपाळा
प्रेतावरती नाच मांडिला
ओल्या मानवचर्माचे करि निशाण फडकविले !
आज हे वर्ष नवे प्रकटले "

असे १९४२ च्या कवितेत वर्णन केलेले आहे. रुद्रवीणेच्या पहिल्या पृष्ठावरील पहिल्या कवितेत तांड्यांच्याप्रमाणे कांतांनी रुद्रास आवाहन केलेले आहे.

" नेत्रानर्लि करुनी त्रैलोक्याची होळी
अन्याय–असमता रगडित पायाखाली
कर तांडव रुद्रा विराट विश्वचितेत "

१९३८ मध्येच क्रांतिकारकांच्या हौतात्म्यातून क्रांतीची ' अमरज्योत ' कवीने प्रज्वलित केलेली आहे.

" वज्र अस्थीचे दधीचि निर्मिता संग्राम काली
दिव्य ठिणग्या ज्या उडाल्या ज्योत त्यांची पेटताहे !"
..." ध्येयमार्गी झुंजताना बंधने विध्वंसितांना
प्राणज्योती ज्या विझाल्या ज्योत त्यांची पेटताहे !" (– अमरज्योत)

अन्नत्यागाने मृत्यूच्या कराल दाढेत शिरणाऱ्या देशभक्तांना कवीने ' भारताचे दधीचि ' म्हणून गौरविले आहे. कवी म्हणतो,

" तुमच्या मरणाने मढी ही जिवंत होतील—
अमर–मृत ऋषींनो, वंदितो जागविला देश !
शक्ति तया, द्यावी सहाया । तुमचे ते क्लेश "

१९३८ मधील ' विराट जागरण ' या कवितेत कवीने क्रांतीचे रणशिंग फुंकिले आहे. सामान्यांच्या विराट जागरणातून क्रांती आकाराला येऊन ती यशस्वी होते असे या कवितेतून कांतांनी सुचविले आहे. १९३८ मध्ये लिहिलेल्या ' जयजयकार ' या कवितेतून स्वातंत्र्याकरिता सत्याग्रही हौतात्म्य स्वीकारायला सिद्ध आहेत असे कवी म्हणतो,

" अस्थितचि यज्ञाग्नि जागला
भिडती नभी होमाच्या ज्वाला
वृद्ध तरुण आहुतीस सजला
सत्याग्रही झुंजार करूं या अखंड जयजयकार " (– जयजयकार)

' अरुण तरुण संगीत ', ' तारुण्य संगीत ', ' दुदुंभी आमुच्या बनवा', ' ध्वज आज ', ' हिमालयास ' या सर्वच कवितांमधून कवीने स्वातंत्र्यासाठी क्रांतीचे रणशिंग फुंकले आहे. स्वातंत्र्यदेवतेचे दर्शन कवीला महाकालीत घडते. क्रांतिदेवतेला आवाहन करताना कवी म्हणतो,

" क्रांतिदेवि ये विद्युच्चरणी
तव नयनीची ठिणगी उडवुनि
असंतोष पेटवी जन मनी
मग जुलूम कितीहि वर गडगडू दे !
तव अग्निपंख नभि फडफडू दे !" (– अग्निपंख नभि फडफडू दे !)

पारतंत्र्याची भयंकर चीड– स्वातंत्र्याची उत्कट लालसा असणाऱ्या कांतांनी क्रांतिदेवतेला परोपरीने केलेले आवाहन आपण पाहिलेले आहे. हे आवाहन करण्यामागे पारतंत्र्याची भयंकर चीड असणारे संवेदनशील जागृत कविमन आहे. ' एक संवाद ' या कवितेत या पारतंत्र्याची मोठी मार्मिक जाणीव कवीने औरंगजेबाच्या मुखाने करून दिली आहे. ' मराठवाड्यातील धूळ ' त्याला म्हणते; " मातीला मिळवावयास झटला स्वातंत्र्य येथील तू । सम्राटा ! तिथल्याच धूळित पहा आता स्वयें लोळशी ।" औरंगजेब म्हणतो, " माझा प्राण गेल्यानंतर मी मातीत लोळलो हे खरे आहे परंतु तिथेही " आलमगिरचि ' तुर्बतींतहि ' अजी साम्राज्य मी भोगिले । दासांचे उरलात दासचि तुम्ही येथे मला हे सले !" तेव्हाही तुम्ही आमचे दास होता आता इंग्रजांचे नि निजामाचे दासच आहात हे शल्य त्यातून व्यक्त झालेले आहे." ' तुज बोलवी देवगिरी ' या कवितेतूनही पारतंत्र्याची दुःखद जाणीव अंतःकरण भेदीत जाते. इस्लामी आक्रमकांनी देवगिरीच्या प्रसिद्ध हरपाळ यादवाची काय अवस्था केली ? कवी सांगतो,

" महाद्वार हे देवगिरीचे । इथे चर्म त्या हरपाळाचे । लटकुनि सडले,
गळले गेले, बीज जागवित दिगंतरी । ... कथा सोलल्या ह्या कातडिची
गाणी पिळिल्या ह्या आतडिची । गाऊ ऐकूं, नवयुग दुंदुभि गजतिल
हे बनूनी गिरी । चल रे तुज बोलवी देवगिरी ! "

या पारतंत्र्याचे दर्शन ' जन्मठेप ' मध्येही घडते. ' मानवास ', ' युगचाहुली ' या कविताही वाचण्यासारख्या आहेत.

पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा अभिमान– या कालखंडापूर्वीच्या कवींच्या राष्ट्रीय कवितांतून पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा अभिमान अनेक कवितांमधून वर्णिलेला आढळतो. ऐतिहासिक काळातील पराक्रमांना त्यात प्राधान्य दिल्याचे दिसून येते. या कालखंडातील कवींचा वर्तमानकाळच भव्य अशा घटनांनी संपन्न आहे. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, सावरकर बंधू, ' खुदीराम ' बोस, रामस्वरूप बिस्मिल, सरदार भगतसिंग, नेताजी सुभाष, १९४२ चे क्रांतिकारक इत्यादी क्रांतिकारकांच्या चरित्रांनी आणि बलिदानाने हा कालखंड सजीव झालेला आहे. पूर्व परंपरेचा अभिमान कुठे ना कुठे राष्ट्रीय कवितेत डोकावल्याशिवाय राहत नाही. कांतांच्या राष्ट्रीय कवितेत तो ' चल तुला बोलवी देवगिरी ', ' मराठवाड्यातील धूळ ', ' दुंदुभी आमुच्या बनवा ', ' जा पिउनि घोटभर पाणी ', ' क्रांतिपुरुष ' आणि ' मायभाषेस ' या कवितांतून प्रकट झालेला आहे.

वर्तमानकालाचे प्रतिबिंब– इतर राष्ट्रीय कवींच्याप्रमाणेच कांतांच्या कवितेतही वर्तमानकाळाचे यथातथ्य प्रतिबिंब पडलेले आहे. अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाबरोबरच कवीला जालियनवाला बागेचे स्मरण होते. तो म्हणतो,

" सत्तावनीच्या त्या रक्तांनी रंगल्या रोटघांचा तो घास
अजून घशात घोटाळे देशाच्या
जालियनबागेमधील त्या रक्त चिखलाने—
वस्त्र मळलेली, साऱ्या भारताची "

जालियनवाला बागेबरोबर ' जन्मठेप ' काळचापाण्यासाठी नावाजलेले ते अंदमानही कवीला आठवते.

" अंदमानातील अन् काळचापाण्याचे विखार डोळघात
वादळ मांडती क्रोधाचे लज्जेचे
आणि हुतात्म्यांच्या चितांचे निखारे
खवखवोनिया त्यात पेटतात ! " (–क्रांती पुरुष)

सत्याग्रहाचा, शांतीचा, गांधीजींचा मार्ग क्रांतीचा आहे असे कवीला कधी कधी वाटते. १९३८ मध्ये लिहिलेल्या ' तोडू कडी चला ' या कवितेत कवी सांगतो,

" ही शांति दुर्बळांची शक्ति सहिष्णुतेची
क्रांती उभी करील, होमू तनू चला या "

' जयजयकार ' या कवितेत

" वृद्धतरुण आहुतीस सजला
सत्याग्रही झुंजार "—

असा गांधीजींच्या सत्याग्रहाच्या मार्गाचा उल्लेख आहे तसाच त्या सत्याग्रहामागील शक्तीचा उल्लेख 'आज नवा उभवू !' या कवितेतील,

" कपोत बाळे रक्तपिपासू श्येनाशी लढवू
ध्वज आज नवा उभवू !"

या पंक्तीतून सूचकतेने आलेला आहे. 'क्रांतिपुरुष' या कवितेत कवीने ऑगस्ट क्रांतीबरोबर निःशस्त्र प्रतिकाराच्या गांधीजींच्या लढ्याचाही गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. कवी सांगतो,

" निःशस्त्रांचा तैसा शांत प्रतिकार
तापलेल्या लाल बंदुकीच्या गोळ्या
विझती स्मितात एका दयामय ··· ···
शेवटी ··· ··· होई मेघनाद गंभीर, भीषण, प्रकटे त्यातून रुद्ररूपधारी
ऑगस्ट क्रांति ती !" (– क्रांतिपुरुष)

कांतांनी 'अक्षरे तुम्हावीण कोण करील वज्रांची', 'राणी दुर्गावती', 'झांशीची राणी', 'जा पिउन घोट भर पाणी', 'दुंदुभी आमुच्या बनवा', 'तुज बोलवी देवगिरी', '१८५७ चे हुतात्मे', 'जन्मठेप', 'क्रांतिपुरुष' यासारख्या अनेक कवितांतून वीर विभूतिपूजन केलेले आहे.

आर्थिक आणि सामाजिक विषमता– व्यापक राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेतून कांतांच्या राष्ट्रीय कवितांत 'गुन्हेगार' आहे, 'मजूर' आहे, 'करा तिथे आघात' इत्यादी कविता आहेत. या कविता वाचून कांतांच्या व्यापक सहानुभूतीची कल्पना येते. 'मजूर' ही संज्ञाही कांतांनी व्यापक अर्थाने वापरली आहे. त्यात गिरणीकामगार, गवंडी, लोहार, विणकर, शेतकरी या सर्वांचा त्यात समावेश आहे. 'भुकेची आग' आणि 'गुन्हेगार' या दोन कवितांतून आर्थिक विषमतेचे चित्रण केलेले आहे. मार्क्सवाद आणि फ्राईडचा मनोविश्लेषणवाद यांचे प्रतिबिंब या दोन्ही कवितांतून पडलेले आहे.

मानवतावादाचा पुरस्कार– राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यनिष्ठा हे कवी कांतांच्या क्रांतिगीतांचे अधिष्ठान आहे. कुसुमाग्रज, अनिल यांच्याप्रमाणेच ते पुढे व्यापक अशा मानवतावादात परिवर्तित झालेले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही त्यांच्या क्रांतीची सूत्रे आहेत. 'ये नव वर्षा', 'अरुण तरुणसंगीत', 'अग्नि पंख नभी फडफडू दे !' 'तारुण्य संगीत', 'नववर्ष', 'मानवास' या कवितांतून मानवतावाद आलेला आहे. 'आशिया', 'अग्निपथ' आणि 'युग चाहुली' या खंडकाव्यांतूनही त्यांनी प्राधान्याने मानवतावादाचाच पुरस्कार केलेला आहे.

दुर्दम्य आशावाद– कांतांच्या राष्ट्रीय कवितेमधून महाकवी सावरकरांप्रमाणे दुर्दम्य आशावादाचे दर्शन घडते. 'ध्वज आज नवा उभवू !' 'प्रकाश', 'नववर्ष ये नव वर्ष !' 'अग्नि पंख नभी फडफडू दे !' 'अरुण तरुण संगीत' यासारखी कितीतरी उदाहरणे त्यांच्या राष्ट्रीय आशावादाची सांगता येतील. ते एका कवितेत म्हणतात,

" ही प्रकाशे धरा देवि येते घरा...
··· ध्वांत कापे, पळे तो गिरी कंदरा ! देवि येता घरा "

'प्रकाश' या कवितेत कवी म्हणतो,

" चाल, चाल अंधारातचि, चाल एकटाची
पाहशील कुठवर तरुणा, वाट प्रकाशाची ?"

काव्यस्वरूप– यज्ञसंप्रदायी, प्रकाशपूजक क्रांतिवादी पण राष्ट्रवादी कांतांच्या काव्याचा आशय आपण पाहिला आहे. 'रुद्रवीणे'त या कवितांचीच संख्या प्रणयगीतांच्या तुलनेत अधिक आहे. कांतांच्या राष्ट्रीय कवितांवर केशवसुतांच्या विचारांची छाप; त्यांचे पहिले टीकाकार श्री. चिं. नि. जोशी यांना आढळली.[५८] तशीच ती श्री. प्रभाकर पाध्ये यांनाही आढळली आहे. " कांत यांनी क्रांती व सामाजिक बंडखोरीचा पुरस्कार केला " अशी प्रा. रा. श्री. जोगांची प्रांजल साक्ष आहे. प्रा. भ. श्री. पंडितांना कांतांची प्रेमगीते विशेष आवडली आहेत. ते म्हणतात, " अग्निपथ या त्यांच्या प्रदीर्घ काव्यात जी नाटचात्मक गीते आहेत ती सुंदर व सरस आहेत... कांतांची प्रेमगीते जशी पकड घेतात तशी क्रांतिगीते घेत नाहीत."[५९] डॉ. अ. ना. देशपांडे यांनी " कुसुमाग्रज आणि कांत यांच्यातील साम्यांश शोधून कल्पकता व रक्तरंजित क्रांतिप्रवणता हे सारखे विशेष सांगितले आहेत. मात्र कुसुमाग्रजांच्या कल्पकतेत त्यांना भव्यतेचा व विशालतेचा साक्षात्कार झाला तसा तो कांतांच्या ठिकाणी आढळला नाही."[६०] डॉ. प्र. न. जोशी यांना " रुद्रवीणा ' या कवितासंग्रहात क्रांतीची ज्योत प्रज्वलित झालेली दिसते."[६१]

प्रा. निशिकांत ठकारांनी कुसुमाग्रज आणि क्रांतिसंप्रदायी कवींच्या प्रवाहात कांतांच्या कवितेचा समावेश केला आहे.[६२] भावनोत्कटता, कल्पकता आणि नाटचात्मकता हे कांतांच्या राष्ट्रीय कवितेचे प्रमुख गुण आहेत. त्यांची प्रतिभा उग्र स्वरूप असल्याने तिची अभिव्यक्ती करणारी भाषाही ओजस्वी आणि वक्तृत्वसंपन्न आहे. जुलुमाविरुद्ध चीड, आवेश प्रकट करताना या भाषेचीच गरज आहे. " बंदी अशा गायनाते करोनी । गळे आमुचे कापले हे तरी । गातील गाणी मराठी कवंधे । मराठी खुल्या माळ रानावरी " अशी अग्निपंखाची फडफड करणारी मराठी भाषा आहे. कांतांनीच " नसे भावना, ती खळखळती । तव रक्ताची धारा । अर्थ कशाचा ? तुझ्या दृष्टीचा नवतेजाचा तारा । आत्माहुति दे त्यासाठी, मग ध्येयवादी निज बोल " असे आपल्या कवितेचे स्वरूप सांगितले आहे. त्यामुळेच 'रुद्रवीणे'चा तीव्र झंकार करीत क्रांतीची अंगारगीते गाणाऱ्या कवी कांतांच्या कवितेची ओळख झाली आहे. या ठिकाणी कवी ' पार्थिव ' आणि ' कृष्णकुमार ' या दोनच कवींचा थोडक्यात विचार करावयाचा आहे. कवी ' पार्थिव ' उपाख्य हरिभाऊ काशिनाथ कुलकर्णी (१९०८) यांचे मूळ घराणे विजापूरकडचे, पण बालपणापासून ते नांदेडचे रहिवासी झाले. त्यांचे शिक्षण नांदेड येथेच झाले. कवी ' पार्थिव ' हे कवी म्हणून विशेष प्रसिद्ध नाहीत पण एक सिद्धहस्त गद्यलेखक म्हणून ते मराठवाडचात सुपरिचित आहेत. ' पार्थिवा 'चे कविमित्र ' कृष्णकुमार ' उपाख्य श्रीनिवास केशव गोळेगावकर हे देखील नांदेडचे. प्रारंभी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण, शिवणकामाचा व्यवसाय आणि वाङमयसेवा असा ह्यांचा जीवनक्रम. श्री. गोळेगावकर पुढे गद्यलेखक, पत्रकार आणि भाषासंशोधक म्हणून ख्यात झालेले आहेत. या दोन्ही कवींचा सहवास आरंभी 'कांत' उपाख्य वामन रामचंद्र कांत या कवीलाही

मराठवाडचातील नांदेडचे कवित्रिकुट ' पार्थिव ', ' कृष्णकुमार ' आणि कांत– राष्ट्रीय कविता उण्या अधिक प्रमाणात लिहिण्याचे कार्य मराठवाडचातील नांदेडच्या या कवित्रिकुटाने केलेले आहे. 'रुद्रवीणे 'चा तीव्र झंकार करीत क्रांतीची अंगारगीते गाणाऱ्या कवी कांतांच्या कवितेची ओळख झाली आहे. या ठिकाणी कवी ' पार्थिव ' आणि ' कृष्णकुमार ' या दोनच कवींचा थोडक्यात विचार करावयाचा आहे. कवी ' पार्थिव ' उपाख्य हरिभाऊ काशिनाथ कुलकर्णी (१९०८) यांचे मूळ घराणे विजापूरकडचे, पण बालपणापासून ते नांदेडचे रहिवासी झाले. त्यांचे शिक्षण नांदेड येथेच झाले. कवी ' पार्थिव ' हे कवी म्हणून विशेष प्रसिद्ध नाहीत पण एक सिद्धहस्त गद्यलेखक म्हणून ते मराठवाडचात सुपरिचित आहेत. ' पार्थिवा 'चे कविमित्र ' कृष्णकुमार ' उपाख्य श्रीनिवास केशव गोळेगावकर हे देखील नांदेडचे. प्रारंभी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण, शिवणकामाचा व्यवसाय आणि वाङमयसेवा असा ह्यांचा जीवनक्रम. श्री. गोळेगावकर पुढे गद्यलेखक, पत्रकार आणि भाषासंशोधक म्हणून ख्यात झालेले आहेत. या दोन्ही कवींचा सहवास आरंभी 'कांत' उपाख्य वामन रामचंद्र कांत या कवीलाही

लाभला. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या तिन्ही कवींनी राष्ट्रीय काव्याची प्रेरणा मराठवाड्यातील नांदेडचे सुप्रसिद्ध राष्ट्रकवी, कीर्तनकार, ग्रंथकार आणि वक्ते दे. ल. महाजन यांच्यापासून घेतली. 'पहाटतारा' (१९३०) आणि 'फटत्कार' (१९३३) या दोन कवितासंग्रहांतून या तिन्ही कवींच्या प्रारंभीच्या राष्ट्रीय कविता प्रकाशित झालेल्या आहेत.

पार्थिवांची राष्ट्रीय कविता– 'पहाट तारा' या काव्यसंग्रहात पार्थिवांच्या एकूण अकरा कविता समाविष्ट असून त्यातील 'प्रभात', 'करुणा', 'तो दिवस', 'टाका निराशा झणी' या कविता राष्ट्रीय कविता म्हणून संबोधिता येण्यासारख्या आहेत. या संग्रहाच्या प्रस्तावनेतील पुढील उद्गार राष्ट्रीय आशावादाचे द्योतक आहेत. 'मोगलाईतील हा घनतमींचा शुकदेव', 'पहाट तारा' झोपलेल्यांना आल्हाद देऊ शकला नाही तरी, त्याच्याच पोटी उदयास येणारी उषा आपल्यावरोबर सर्व जीवमात्रांना जागृत करीत हेच गोदावरीकाठचे वैराण झालेले पण आता पुनरुज्जीवित होत असलेले ज्ञानेश्वरकालीन साहित्योद्यान एक दिवस जगाला दाखवीत हसत उभे ठाकेल."[13] याचा सरळ अर्थ असा आहे की, या कवितेच्या मागे लोकशिक्षण आणि लोकजागृतीची राष्ट्रीय प्रेरणा आहे. 'प्रभात' या कवितेत 'प्रभात'च्या वाऱ्याने आपल्या झुळकीने सर्वांस देशसेवेकरिता जागृत करावे. पुष्पांनी देश आनंदित करण्यास शिकवावे, पक्षांनी देशोद्धाराचे गीत आळवावे असा स्फूर्तिदायक आशावादी संदेश दिलेला आहे. 'करुणा' या कवितेतून कवीने शिवकालीन 'कर्तव्य आणि प्रेम' यांच्यातील संघर्ष अतिशय प्रभावीपणाने चित्रित केलेला आहे. या काव्यातील नायिका करुणाच आहे. कवी सांगतो,

> " करुण रसाची गंगा भरली, करुणेच्या नयनात,
> स्वातंत्र्याचे स्फूर्तीचे मग गीत नाचले त्यात ।
> फत्तर फुलले हसली धरणी हसले सर्व ही राव
> स्वातंत्र्याचे गीत घुमवुनी झाली करुणा धन्य !!"

करुणेच्या कर्तव्याच्या पार्श्वभूमीवर कवीने केलेले आत्मनिरीक्षणही आपल्या करंटेपणाचे दर्शन घडविणारे आहे. कवी सांगतो,

> " हात कपाळावरी लाविला दास्य पंकिच्या कवीने
> कसे चेपितो स्वराज्य आम्ही वरचेवर स्वार्थाने ।।" (– करुणा)

स्वदेशासाठी धारातीर्थी पडलेल्या देशभक्त वीरांचे दर्शन आणि रणांगणाचे चित्रण 'तो दिवस' या वीरकरुणमिश्र रसात्मक कवितेतून घडते. तसा विचार केला तर 'करुणा' आणि 'तो दिवस' या दोन्ही राष्ट्रीय कवितांतून 'वीर विभूतिपूजना'ची कवीची आवड दिसून येते. 'टाका निराशा झणी' या कवितेतून अनिष्ट राक्षसी रूढींचा नाश, स्वातंत्र्याची प्राप्ती आणि ऐक्याची अनिवार्यता कवीने चित्रित केलेली आहे. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे पार्थिवांच्या या कवितांमधून राष्ट्रप्रेम, पारतंत्र्याचा तिटकारा आणि राक्षसी रूढींबद्दलची चीड व्यक्त झालेली आहे. 'फटत्कार' या दुसऱ्या कविता–संग्रहात पार्थिवांच्या एकूण बारा कविता असून त्यापैकी (१) पराभूत वीर, (२) दीपास, (३) बंदीवान आणि (४) चाकरी या सामान्यपणे राष्ट्रीय कविता आहेत. या कवितांतील 'बंदीवान' आणि 'दीपास' या कविता अन्योक्तिपर आहेत. कुठे वर्णन उपरोधपूर्ण आलेले असून या कवितांतूनही पार्थिवांचे स्वदेशप्रेम व पारतंत्र्याची चीड लक्षात आल्याशिवाय राहत नाही. काही ठिकाणी कल्पनांचा अतिरेक झाल्याने अकारण क्लिष्टताही आलेली आहे.

कृष्णकुमारांची राष्ट्रीय कविता– 'पहाट तान्यात' कृष्णकुमार यांच्या अकरा कविता असून त्यापैकी अवघ्या दोन तीन राष्ट्रीय म्हणून सांगण्यासारख्या आहेत. 'स्वातंत्र्य नसेल तर!' या स्वातंत्र्यविषयक कवितेत कृष्णकुमारांनी पारतंत्र्याचा जळजळीतपणे धिक्कार केलेला आहे. कवी म्हणतो,

"पराधीनता महा नरक हा जिथे सांचला गेला!
सुगंधवाया त्या प्रांतासी शक्य काय बोला ?
परक्या पुढती वाक वाकुनी प्रेतकळा ती आली!
त्या देहावर साज घालुनी शोभा कारे चढली ?
स्वातंत्र्याचा दीप उजळला नाही तोवरि येथे
बरी सुखाची जरी मिळाली काळ झोप जीवाते ।।" (– स्वातंत्र्य नसेल तर)

दुसरी 'जयोऽस्तुते!' ही कविताही स्वातंत्र्याचे गुणगान गाणारी आहे. 'फटत्कार' या दुसऱ्या कवितासंग्रहात 'शांतिदूत', 'हुतात्मा', 'फितुरी', 'फूल आणि वारा', 'त्याला अवघे जग मेलेले', 'शेतकरी' आणि 'कन्यादान' या राष्ट्रीय आणि सामाजिक कविता आहेत. 'शांतिदूत' आणि 'हुतात्मा' या कवितांमधून पारतंत्र्याची चीड आणि राष्ट्रजागृतीची हाक कवीने व्यक्त केलेली आहे. 'फितुरी' या कवितेतून देशद्रोही फितुरास सावधगिरीचा इशारा कवीने दिलेला असून या कविता अतिशय प्रभावी उतरल्या आहेत. 'फितुरी' बद्दलचे आपले मत व्यक्त करताना कवी म्हणतो,

"बावा फितुरी नव्हे फुकाची सजिवपणीं मृत्यु सल!
रिपुनी कंठनाल तव चिरीले ।।"

जन्मभूमीवरील आपले उत्कट प्रेम व्यक्त करताना 'फूल आणि वारा' या रूपकात्मक कवितेत कवी म्हणतो,

"पावलो जेथल्या भूमीवर मी जनन,
निर्गंध नको ते करूस माझे स्थान" (– फूल आणि वारा)

आर्थिक विषमतेचे आणि त्याबरोबरच दारिद्र्याचे भीषण चित्रही कवीने 'त्याला अवघे जग मेलेले' या कवितेतून रेखाटलेले आहे. स्वार्थांधता आणि भांडवलशाही समाजरचनेच्या आहारी गेलेल्या समाजस्थितीचे उपरोधपूर्ण दर्शन 'शेतकरी' या कवितेतून कवीने घडविले आहे. सामाजिक रूढींच्या जाचक बंधनाचे आणि त्याचबरोबर स्त्रीदास्याचे प्रत्ययकारी चित्रण कवीने 'कन्यादान' या कवितेतून प्रभावीपणे घडविले आहे.

कवी 'पार्थिव' आणि 'कृष्णकुमार' यांच्या राष्ट्रीय कविता वाचल्या म्हणजे दे. ल. महाजन आणि केशवसुत यांचा त्यावरील प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. कलात्मकतेच्या दृष्टीने या कविता उच्च दर्जाच्या नसल्या तरी त्यातील भावोत्कटता, राष्ट्रप्रेम सहज जाणवणारे आहे. कवी कांतांची कल्पकता या दोन्ही कवींच्या ठिकाणी नाही पण त्यांच्या अंतःकरणात असलेली स्वातंत्र्याची उत्कट लालसा, पारतंत्र्याची आत्यंतिक चीड व देशभक्ती त्यांच्या कवितेतून त्यांनी प्रामाणिकपणे व्यक्त केलेली आहे. त्यांच्या इतर विषयांशी निगडित कवितांचा इथे विचार अभिप्रेत नाही. मात्र कवी 'कांतां' बरोबरच राष्ट्रीय कविता लिहिण्याचे कार्य त्यांनी केले आणि तेही मोगलाई राजवटीतील प्रतिकूल

परिस्थितीत केले हेही इथे लक्षात घेतले पाहिजे. अंत:करणात राष्ट्रभक्ती असल्याखेरीज कोणताही कवी हे धाडस करणार नाही. म्हणूनच त्यांच्या कवितांची संख्या मर्यादित असली तरी राष्ट्रीय कवींच्या परंपरेतच त्यांना स्थान द्यावे लागेल.

सौम्य व स्नेहशील प्रकृतीचे कवी निकुंब
(जन्म १९२०)

परिचय– कृष्ण बलवंत निकुंब हे नाशिकचे कवी. प्राध्यापकाच्या व्यवसायात असलेले निकुंब कर्नाटक कॉलेज, धारवाड येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून लागले. पुढे लिंगराज कॉलेज, बेळगाव येथे त्यांनी मराठी विषय विभागप्रमुख म्हणूनही कार्य केलेले आहे. त्यांचे 'उज्ज्वला' (१९४५), 'उर्मिला', 'अनुबंध' हे स्फुट काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'मृगावर्त' या नावाचे त्यांचे खंडकाव्यही प्रसिद्ध आहे. श्री. निकुंब जसे कवी आहेत तसेच आधुनिक मराठी कवितेचे एक रसोद्ग्राही विवेचक टीकाकारही आहेत. १९५० पर्यंतची मर्यादा या कालखंडातील विवेचनाकरिता घेतलेली असल्याने निकुंबांच्या 'उज्ज्वला' मधील राष्ट्रीय कवितांचा परिचय इथे करून घ्यावयाचा आहे.

निकुंबांच्या कवितेचे स्वरूप– प्रा. म. ना. अदवंतांनी आधुनिक मराठी कवितेतील नव्या कविपंचकात निकुंबांचा समावेश केलेला आहे. त्यांना 'अग्नि संप्रदायी' म्हणून गौरविले आहे. निकुंबांच्या विकसनशील प्रतिभेचा प्रत्यय त्यांच्या 'उज्ज्वला' मध्ये जाणवतो, पण त्याचे स्वरूप 'अग्निसंप्रदायी' न वाटता सौम्य असे चंद्रसंप्रदायी आहे. 'अग्निसुमने' आणि 'दिव्य भूषणे' लेऊन ओजस्विनीने काव्यस्वरूपात प्रकट व्हावे ही त्यांची आंतरिक इच्छा आहे, परंतु गोदेच्या परिसरात, स्वा. सावरकर, कवी गोविंद आणि कुसुमाग्रज यांनी चेतविलेल्या 'क्रांतियज्ञात' सहभागी होणे कवीला जमत नाही, कारण तो त्यांचा पिंड नाही. प्रा. रा. श्री. जोगांचा अभिप्राय असाच आहे. ते म्हणतात, "आपली कविता ओजस्विनी असावी अशी कवीची इच्छा मात्र त्यांच्या संग्रहात पूर्ण झालेली दिसत नाही. त्यांच्या बुद्धीची धाव प्रखर तेजाकडे असली तरी स्वभावाची प्रवृत्ती तद्विरुद्ध दिशेकडे आहे." [१४] प्रा. भ. श्री. पंडितांचा अभिप्रायही वेगळा नाही. ते म्हणतात, "कुसुमाग्रज पोवाळ्यांप्रमाणे निकुंब यांची कविता ओजोगुणयुक्त असल्याचा दावा करते. त्यांची 'उज्ज्वला' स्नेहशील आहे, रुचिर आहे व प्रशांत आहे, परंतु तिच्यात प्रखरता अगर दाहकता नाही." [१५]

वास्तविक अग्निसंप्रदायात सहभागी होण्याची निकुंबांची आकांक्षा असल्याचे त्यांच्या ओजस्विनीवरून वाटते. ते स्वत:च सांगतात,

"आणि तेजो गर्भातून तशा त्या
यज्ञ कुंडातुन द्रौपदी निघाली
तसे अंगी यावेस लेउनी तू
अग्नि सुमने भूषणे दिव्य काही" [११]

मात्र आकांक्षा असणे आणि मुळात प्रकृती असणे या दोन गोष्टींत अंतर आहे. म्हणूनच पंडितांना त्यांच्या कवितेत दाहकता जाणवली नाही.

डॉ. अ. ना. देशपांडेदेखील, "तेजोपासनेला आवश्यक अशी उग्रप्रकृती कवीची नाही." [१७] असाच अभिप्राय देतात. या सर्व टीकाकारांच्या अभिप्रायाचा अर्थ असा की, श्री. निकुंब हे खऱ्या-

अर्थाने सौंदर्यवादी कवी आहेत. आपली सौंदर्यवादी भूमिका त्यांनी आपल्या काव्यातून प्रांजळपणे मांडलेली आहे. कारण 'सौंदर्य हे जीवन' असा त्यांचा आत्मानुभव आहे.

विश्वसदन उजळून टाकण्याची उदात्त आकांक्षा– काव्यसंग्रहाचे शीर्षक धारण करणाऱ्या आणि प्रतिभा शक्तीला उद्देशून लिहिलेल्या 'उज्ज्वले' या कवितेत विश्वसदन उजळून टाकण्याची उदात्त आकांक्षा कवीने व्यक्त केलेली आहे. कवितेची सुरुवातच,

"उजळित येई भुवन उज्ज्वले।"

अशी आहे. पुढे कवी म्हणतो,

"तमो भ्रष्ट या नौकेवर क्षणि – फुलवि दीप; तव वेध लागले।
...विश्वसदन हे आज तमोमय। सत्तांधांचे जणुं न्यायालय
तव हास्ये फुटतिल अरुणोदय। पावन करि जग त्वरित मंगले।"
(– उजळित येई भुवन उज्ज्वले।)

क्रांतीचे दर्शन घडविणारी कविता– सौम्य आणि स्नेहशील प्रकृतीच्या या सौंदर्यवादी कवीने 'उन्मत्तास' या कवितेसारख्या कविता लिहून क्रांतीचे दर्शन घडविले आहे. १९४१ मध्ये लिहिलेल्या या कवितेत यज्ञसंप्रदायी उग्ररूप धारण केलेले आहे. त्यांच्या ओजस्विनीचा खराखुरा प्रत्यय त्यांच्या या कवितेत येतो. किंबहुना या कवितेच्या रूपावरूनच समीक्षकांनी त्यांच्या कवितेच्या क्रांतिकारक प्रकृतीचे निदान केलेले असावे इतके ओज तिच्यात आहे. मुक्त छंदात लिहिलेल्या या कवितेची सुरुवात नाट्यात्मक पद्धतीने कवीने केलेली आहे. कवी लिहितो,

"घाल एकच कठोर घाव।
तत्क्षणी होईन गत प्राण मी–
फोडीन किंकाळी कंठरवाने।
उडतील आणि उष्ण चिरकांड्या रक्ताच्या भोवती।"

आणि कदाचित – "देतील चेतना अन्य जीवांना त्या
झडेल तयांचा दुबळेपणा
– घेतील तुझिया नरडीचा घोट।
धुन्दी उतरेल डोळ्यातील तुझ्या सत्तेची – गुर्मीची विरेल उन्माद।
आणिक तुझ्या त्या मत्त रक्तानेच
रंजित होईल क्रांतीची पहाट...
नी जगी नांदेल राज्य समतेचे॥"
(– उन्मत्तास)

क्रांतीद्वारे विश्वात शांतीचे व समतेचे राज्य आणण्याची आकांक्षा कवीने व्यक्त केलेली आहे.

अशा अवघ्या चार पाच कविता सोडल्या आणि त्यातील मानवतावादी विचारांचे आवाहन लक्षात घेतले की निकुंबांच्या राष्ट्रवादी कवितांची व्याप्ती कळून येते. निकुंबांना सामाजिक दुःखांची जाणीव आहे. राष्ट्रीयतेची आच आहे. दुःखी मानवांचा कळवळा आहे पण त्यांना खरे आकर्षण सौंदर्याचे आहे. नियमित सैन्यात असलेल्या सैनिकांत आणि छात्र सैनिकांत जितके आणि जेवढे अंतर असते तितके आणि तेवढे कुसुमाग्रजांत आणि निकुंबांत आहे. राष्ट्र ही जीवननिष्ठा असणारा कवी

नियमित सैनिकासारखा असतो. छात्रसैनिक हा एक लष्करी शिक्षण घेणारा उमेदवार असतो. उमेदवारही महत्त्वाकांक्षी असू शकतो पण त्याचा लढवय्याचा बाणा नसतो. हेच अंतर निकुंबांत आणि इतर राष्ट्रीय कवींत आहे. म्हणूनच डॉ. प्र. न. जोशी म्हणतात, "उज्ज्वला मध्ये कृ. व. निकुंब यांच्या सौंदर्यपिपासू मनाची ओळख होते."[६८] प्रा. निशिकांत ठकार यांचा अभिप्रायही तसाच आहे. ते म्हणतात, "निकुंबांच्या पहिल्या काव्यसंग्रहात कवीची स्वत:ची इच्छा ही कवितेने ओजस्विनी होऊन अग्निसुमने लेऊन यावे अशी होती. त्यामुळे त्यांचा समावेश क्रांतिकवींच्या अग्निसंप्रदायात केला पण निकुंबांची वृत्ती तेवढी उग्र नाही... ही कविता शेवटी आहे ती रविकिरण काव्याची सुधारलेली सुसंस्कृत आवृत्ती."[६९]

हे सर्व टीकाकारांचे अभिप्राय मान्य करूनही 'किंचित अग्नी फुलविण्याचे' ठिणगीचे सामर्थ्य त्यांच्या या मोजक्या राष्ट्रीय कवितांत आहे. प्रकृती सौंदर्यवादी असल्याने निकुंबांची उज्ज्वला काव्य-गुणांनी संपन्न आहे. भावना, सुरम्य कल्पना आणि अचूक शब्दरचना या त्रिविध गुणांनी ती रसिक-मान्य झालेली आहे. मात्र राष्ट्रीय कवितेची तिची प्रकृती सौम्य व स्नेहशील आहे हे विसरता येत नाही.

समतावादी क्रांतीचा पुरस्कार करणारे काळेले

(जन्म–१९०७ मृत्यू–१९८१)

युगधर्माचा प्रभाव– महाराष्ट्रापासून दूर मध्यभारतात इंदूर आणि ग्वाल्हेर येथे वास्तव्य करणारे रामचंद्र अनंत काळेले महाराष्ट्रशारदेचे सच्चे उपासक आहेत. रविकिरण मंडळ आणि तांबे यांचे संस्कार काळेल्यांच्या काव्यावर झाल्याचे प्रा. रा. श्री. जोगांनी आणि डॉ. अ. ना. देशपांडे यांनी आपआपल्या ग्रंथांतून नमूद केलेले आहे. श्री. काळेल्यांनी अभिव्यक्तीसाठी मुक्तछंद स्वीकारला आणि त्या छंदात प्रभावीपणे कविता केल्या. त्याचप्रमाणे युगधर्माप्रमाणे नवे विचारही स्वीकारले आणि त्याची प्रभावीपणे अभिव्यक्ती केली. रा. श्री. जोगांनी म्हटल्याप्रमाणे, "दलितांचा कैवार; प्रकाशाची पूजा किंवा क्रांतीचा जयजयकार या गेल्या पाच दहा गोष्टींचा अंगीकार केल्याचे त्यांनी 'भावपूर्णा' या आपल्या तिसऱ्या संग्रहात दाखविले आहे."[७०] डॉ. अ. ना. देशपांडे यांनीही हीच त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये सांगितली आहेत.[७१] पण ती कुणाच्या अनुकरणाचा भाग नाही, तो युगधर्माचा प्रभाव आहे. काळेले ज्या काळात कवितालेखन करीत होते त्या काळात स्वदेश; स्वराज्य यांच्याबरोबरच लोकशाही समतावादाचे, क्रांतीचे वारे साऱ्या जगभर वाहत होते.

रा. अ. काळेल्यांची काव्यसंपदा– १९३४ सालीच रा. अ. काळेले यांचा यौवनसुलभ प्रणय-गीतांनी फुललेला 'वाग्वसंत' रसिकांपुढे आला. त्यानंतर १९४१ मध्ये 'ओळखीचे सूर' कानावर आले. १९४३ मध्ये त्यांच्या 'भावपूर्णा'ची भर पडली. त्यानंतर 'गीत निर्वाण' १९४९ मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या 'हिमअंगार' या १९५५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या काव्यसंग्रहात १९४३ ते १९५५ पर्यंतच्या कवितांचा समावेश आहे. 'रूपमती' हा १९६४ मध्ये प्रकाशित झालेला कविता-संग्रह. या प्रबंधाच्या कालमर्यादेत 'हिमअंगार' मधील १९५० पर्यंतच्या कविता येतात. त्यांचा परामर्श या विवेचनात घेतलेला आहे. 'तांबे एक अध्ययन', 'नव कवितेचे एक तप' यासारखे टीकालेखनही काळेल्यांनी केलेले असून ते अभ्यासकांना उपयुक्त ठरलेले आहे. तांब्यांचा 'ध्येयवाद' आणि डॉ. माधवरावांचा 'मराठी बाणा' काळेल्यांच्या कवितांतून स्पष्टपणे दिसून येतो. तांब्यांची

जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी काळेल्यांनी स्वीकारली असावी असे त्यांचे काव्य वाचल्यावर वाटू लागते.

काळेल्यांची जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी– 'भावपूर्णा' या कवितासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत काळेले म्हणतात, "मुद्रणाच्या आजच्या सुकाळात सक्तीमुळे नव्हे तर आसक्तीमुळेच काव्यरचनेचा अवलंब होतो खरे पाहिले तर सौंदर्य आणि जीवन यांचा जोडफळाचा सांधा आहे. त्यांच्या जिव्हाळ्याच्या संबंधात निष्कारण तंटा उपस्थित करू नये असे मला वाटते."[७१] या त्यांच्या निवेदनातील आशय लक्षात घेतला तर त्यांच्या काव्यदृष्टीचे साम्य तांब्यांच्या काव्यदृष्टीशी असल्याचे वाटू लागते. 'भावपूर्णा'तील 'नमो महाराष्ट्र वागीश्वरी' या कवितेत काळेल्यांनी आपली काव्य-परंपराच सांगितली आहे. ते म्हणतात, "तुका ज्ञानबा–दास–मोरेश्वरा ही प्राचीन" आणि,

"नमो कृष्ण रामा – नमो भास्करा
तुझे लाडके हे धरावे शिरी"

या पंक्तीतून आधुनिक केशवसुत, गडकरी आणि भा. रा. तांबे ही नावे गुरुस्थानी आली आहेत. "अरे कोहिनूरा।" या कवितेतून कला आणि जीवन यातील अंतर कवीने सांगितले आहे."[७३] 'हृदयवापी' मधून आपल्या काव्याचे महिमान सांगताना काळेले म्हणतात,

"अथांग ही माझ्या
हृदयाची वापी
गावेना किमपि तळखोल
जित्या भावनेचे बुडाशी पाझर
भरले गंभीर गीत तोय" (– हृदयवापी)

आपल्या मानवतेचा या कवीला अभिमान आहे. तो म्हणतो,

"मानव मी ! मानव मी ! धन्य धन्य मानवता !
नको मला देवपण आणि नको तो स्वर्गही ॥" (– मानवता)

यावरून काळेल्यांच्या काव्यदृष्टीचा आणि जीवनदृष्टीचा बोध होतो.

मराठी बाणा– मातृभूमीचे प्रेम, राष्ट्रप्रेम हे विषय काळेल्यांच्या काव्यात आढळत नाहीत, मात्र मराठी परंपरेचा अभिमान, मराठी बाणा, मानवतावादाचा पुरस्कार करूनही त्यांना विसरता येत नाही. 'मी मराठा', 'या इथे' या अनुक्रमे 'भावपूर्ण' आणि 'हिम अंगार' मधील कविता त्याची साक्ष आहे. १९४३ मध्ये लिहिलेल्या 'मी मराठा' या कवितेत 'ज्या मातीतून शिवाजी जन्माला आला त्या मातीचा पुत्र मी झुंजार छातीचा मराठा आहे. आम्हाला कुणाकडून शौर्याचे पाठ घेण्याची आवश्यकता नाही. राष्ट्रकल्याणासाठी प्राणाचा उत्सर्ग करणे आमचा बाणा आहे. आम्ही मराठे स्वाभिमानाचे धनी असून स्वातंत्र्याला प्राणापलीकडे जपणारे आहोत." शेवटी कवी म्हणतो,

"या मराठी वीर भूचा पुत्र हो मी औरस
थोर ऐशा त्या मराठ्यांच्या यशाचा वारस
माउली माझी मराठी। भक्त मी मोठा तिचा
गर्व हा वाटे मला की मी मराठा जातिचा"

'या इथे' मध्ये एका मराठा वीर रमणीची आणि एका मराठी कवीची स्मृती आहे.

"या इथेच या मातीवर टेकुन गाला
या धुळीत झांशीची निजली क्रांतिज्वाला
या इथे – हो इथे या पाषाण वितानी
या फत्तरांमध्ये फुलली तांबे वाणी"

स्वातंत्र्यलालसा आणि ध्येयवाद– मराठा माणूस स्वातंत्र्याला प्राणापलीकडे जपतो. त्या स्वातंत्र्याची लालसा १९४५ साली लिहिलेल्या 'हिमअंगार' मधील 'स्वैरपवन तू' या प्रतीकात्मक कवितेतून व्यक्त झालेली आहे. कवी 'स्वैर पवनाला' म्हणतो,

"कळे मला तुफान ताकत
भुवन भीम तू ये सोसाटत–
निबिड बंध हे तोड तटातट
ही सुटकेची निकट अमृत घटि ॥"

एकदा तुझ्या या मुक्तस्वातंत्र्याचा अनुभव आणि आनंद मला घेऊ दे !

'काळा कोळसा', 'लोखंड नि लाकूड', 'वादळ' या अन्योक्ती असणाऱ्या कवितांतून काळेल्यांचा ध्येयवाद स्पष्ट झाला आहे. काळा कोळसा अभिमानाने सांगतो,

"माझे माते तत्त्व हे एक ठावे
निस्स्वार्थत्वे की जळावे जळावे ॥" (– काळा कोळसा)

क्रांतीचा पुरस्कार– टीकाकारांनी 'प्रकाशपूजन' म्हणून ज्या काळेल्यांच्या काव्यवैशिष्ट्यांचा उल्लेख केलेला आहे त्या 'प्रकाशपूजन' करणाऱ्या कवितांतून कुसुमाग्रज, कांत, पोवळे यांच्याप्रमाणेच काळेल्यांनी क्रांतीचा पुरस्कार केलेला आहे. मानवी कल्याणाचे ध्येय साध्य करावयाचे असेल तर त्या ध्येयाच्या मार्गात अनेक विघ्ने उभी राहतात. अशा वेळी क्रांतीच्या मार्गाचाच अवलंब करणे हिताचे ठरते आणि म्हणून अनेक विचारवंतांनी क्रांतीचा पुरस्कार केला आहे. फ्रेंच राज्यक्रांती किंवा रशियन राज्यक्रांती ही जनसामान्यांनी केलेली क्रांती होती. कवीलाही या देशात अशीच क्रांती व्हावी असे वाटते. मात्र या क्रांतीची कल्पना निसर्गातील प्रतीकांच्या द्वारे अप्रत्यक्षपणे मांडली आहे. (१) वादळ, (२) तेज भरले, (३) चंद्र-मंगळ, (४) वणव्यापूर्वी, (५) फुंकर, (६) तेजस्विनीस, (७) दोन दीप, (८) भडकू दे ज्वाला, (९) जुना पुराण्याचा हा वाडा आणि (१०) हिम अंगार या कवितांमधून कवीने क्रांतीचा पुरस्कार केलेला आहे. 'वादळ' या कवितेत क्रांतीची व्यापकता आणि तिचे प्रचंड सामर्थ्य यांचे वर्णन कवीने केले आहे. कवी सांगतो,

"सांभाळा – सुटले भीषण वादळ।
भरारतो आहे गरगरतो आहे
दिशा दिशातून खवळतो आहे
महा प्रचंड वाऱ्याचा समुद्र ॥" (– वादळ)

'तेज भरले भरले' प्रकाशपूजन असून नव्या विचारांचा उदय त्यातून सूचित केलेला आहे. 'वणव्यापूर्वी' मध्ये शुष्क झालेले वृक्ष आहुतीला सिद्ध होतात हे सांगून "प्रगटेल मोठा दावाग्नि सहसा

संघर्ष जन्मा । आणि त्यात सर्वांचीच आहुती पडेल " असे सुचविले आहे. 'फुंकर' या कवितेतूनही क्रांतीची पुकार आहे. सुरुवात,

" चेतवा चेतवा सुप्त विस्तवाला
धुमसे केव्हाचा निघते न ज्वाला "

...शेवटी कवी सांगतो,

" चेतवा अग्नीला फुंकून स्वप्राण
साक्षात प्रकटू द्या देव हुताशन ॥" (– फुंकर)

' तेजस्विनीस ' या कवितेतून ' प्रकाशपूजन ' आलेले आहे. 'येथे क्षणी तेजस्विनी ने ध्वान्त हा उच्छेदुनी ' असे प्रारंभी आवाहन आहे. शेवटी कवीने तिच्याकडून तेजाची, चैतन्याची मागणी केली आहे कारण, त्याला मानवी जगातला ध्वान्त नष्ट करावयाचा आहे. म्हणून तो म्हणतो,

" चैतन्य जे, उत्कर्ष जे, सामर्थ्य जे, स्वातंत्र्य जे
त्वत्तेज ते विद्युल्लते । माझ्या मधे दे चेतुनी ।"

पददलितांचा कैवार आणि सामाजिकता– काळेल्यांच्या क्रांतिगीतांचे अधिष्ठानही पददलितांच्या कळवळ्यात आहे. निमूटपणे अन्याय जुलूम सहन करणाऱ्यांसाठीच त्यांना क्रांतीचा वणवा पेटवावयाचा आहे. या पददलितांत कारकुनांपासून भिकाऱ्यांपर्यंत सर्वांचाच समावेश आहे. ' महात्मा 'मध्ये रात्रंदिवस रावून अन्न परब्रह्माची उपासना कटणाऱ्या तपोधन शेतकऱ्यांचे पूजन आहे. ' माळरान ' या प्रतीकात्मक कवितेत, पददलितांना उपेक्षित म्हणून हिणविणाऱ्या, सुखवस्तू वर्गाच्या पार्श्वभूमीवर, जगण्यासाठी सतत संघर्ष करीत विकास साधणाऱ्या व खऱ्या अर्थाने जीवन जगणाऱ्यांचे चित्रण आहे. कवी त्या सुखवस्तू बांडगुळांना उद्देशून म्हणतो,

" कुण्डीमधल्या झाडांनो, वाटतो का गर्व तुम्हाला आपल्या थोर नशिबाचा ?
– भाग्याच्या बळाने झालात मोठे, परोपरीने दक्षतेने तुम्हा
जपतो माळी, ऐदी तुमचे निर्जीव जीवन ॥" (– माळरान)

' उद्धार 'मध्ये हीन, अमंगळ, अपवित्र म्हणून दुर्लक्षिलेल्या पददलितांचेच चित्रण आहे.

वीर विभूतिपूजन– ' मी मराठा ', ' या इथे ', ' महात्मा ' आणि ' गीतनिर्वाण ' या कवितांमधून काळेल्यांचे विभूतिपूजन प्रकट झालेले आहे.

" आठवा हे की मराठे ते अहो आम्ही असू
राष्ट्रकल्याणार्थ ज्यांनी सांडले पूर्वी असू ॥"

असा ' मी मराठा 'मध्ये गौरव आहे. ' या इथेच ' मध्ये ' या धूळित झांशिची निजली क्रांति ज्वाला ' असे राणी लक्ष्मीबाईचे स्मरण आहे. " महात्मन ! वदनी नित्य घेता कवळ हा असा । तुला ध्यातो मनोभावे नमो तुज तपोधना !" असे अन्नदात्या शेतकऱ्याला वंदन आहे. ' गीत निर्वाण '[७४] हा गांधीजींच्या वधानंतर स्तोत्राच्या स्वरूपात रचलेला अनेक श्लोकांचा गांधीजींवरील कवितासंग्रह आहे. गांधीजींच्या निधनावर अनेक कवींनी विलापिका लिहून वीरविभूतिपूजन केलेले आहे. काळेले यांनीही २८० पंक्तींची श्लोकबद्ध विलापिका लिहिली असून वधापूर्वी बापू प्रार्थनेला आले या प्रसंगापासून तो त्यांचे पार्थिव शरीर चितेत भस्म होईपर्यंतच्या घटनाप्रसंगाचे आणि कवीच्या अंतःकरणा-

तील गांधीजींबद्दलच्या पूज्यभावाचे वर्णन आलेले आहे. गांधीजींच्या हत्येवर भाष्य करताना काळेले म्हणतात,

" नाही रक्त, दयाच हो द्रवुनिया ही गद्गदा वाहते
नाही रक्त, अखण्ड शांतिच खरी भूमीस ही शिंपिते " (-गीत निर्वाण)

वर्तमानकाळाचे प्रतिबिंब- ' गीत निर्वाण ', ' आमच्या काळात ', ' त्यांनी चळवळ केली ' या कवितांमधून वर्तमानकाळाचे ठसठशीत प्रतिबिंब पडलेले आहे. ' हिमअंगार ' मधील १९४७ मध्ये लिहिलेल्या ' आमच्या काळात ' या कवितेत कवी सांगतो, " आमच्या काळात, विध्वंस, विप्लव; उच्छाद, उत्पाद, हिंस्र, हत्या, रक्तसांड ··· ··· आमच्या काळात प्रलय, विलय, सर्वस्व आहुति।" अन्यायाच्या प्रतिकारासाठी शासनाविरुद्ध बंड करून उठणारे व तुरुंगातही जाणारे कारकून ' त्यांनी केली चळवळ ' मध्ये आहेत.

आशावादी दृष्टिकोन- समतेचा पुरस्कार करून क्रांतीची गीते गाणाऱ्या काळेल्यांचा जीवन-विषयक दृष्टिकोन आशावादी आहे. ' आमच्या काळात ' मध्ये ते म्हणतात, " आमच्या काळात; धन्य काळात घडले जात आहे उद्याचे रामराज्य." ' अरे कोहिनूरा ! ' या कवितेत धान्याचा दाणा म्हणतो, " या विराट जीवनाचा अनंत प्रसू मी। भविष्यास मी मीच देईन। साफल्य सौभाग्य सर्वस्व ॥"

काव्यस्वरूप- काळेले यांच्या काव्यस्वरूपासंबंधी सर्वांनीच प्रशंसा केली आहे. प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, " रचनेवर त्यांचे चांगले प्रभुत्व आहे." [७५] काळेल्यांच्या कवितेत त्यांचा स्वतःचा निराळेपणा असल्याचे सांगून प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " काळेल्यांची भाषाही भावनानुगामी आहे."[७६] " रचनासौष्ठव आणि भावनांचे संयमशील आविष्करण या काळेल्यांच्या कवितांच्या गुणवैशिष्ट्यांचा निर्देश आवश्यक असल्याचे " डॉ. अ. ना. देशपांडे यांनी सांगितले आहे. [७७] प्रा. नि. शं. ठकारांना " ग्रहणशील व विकासोन्मुख कवितेची ओळख झालेली आहे." [७८] थोडक्यात काव्यदृष्ट्याही श्री. काळेले यांची कविता श्रेष्ठ आहे. परंतु तिच्या या रंगरूपापेक्षा तिचे अंतरंग अधिक वेधक आहे. पारतंत्र्य, विषमता, दैन्य, दारिद्र्य, अज्ञान या राष्ट्रीय जीवनाला ग्रासणाऱ्या आपत्तीतून मुक्त होण्यासाठी मानवतावादाचे अधिष्ठान असलेल्या समतावादी क्रांतीचा पुरस्कार काळेल्यांनी कांत; पोवळे यांच्याप्रमाणेच केलेला आहे.

क्रांती चिरायू व्हावी म्हणून भैरवीला आवाहन करणारे ध्येयवादी श्रीकृष्ण पोवळे (१९२०-१९७५)

कवी कांतांप्रमाणेच क्रांतीची उत्कट गीते गाणारे या कालखंडातील एक महत्त्वाचे कवी म्हणजे श्रीकृष्ण पोवळे. श्रीकृष्ण पोवळ्यांचे ' अग्निपराग ' (१९४६) आणि ' जळमाती ' (१९४९) हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. यानंतर पोवळ्यांनी काव्यलेखन केले नाही. श्रीकृष्ण पोवळे यांचा ' अग्निपराग ' हा काव्यसंग्रह जेव्हा प्रसिद्ध झाला तेव्हा कुसुमाग्रजांच्या ' विशाखा ' सारखेच त्याचे मराठी रसिकांनी स्वागत केले. ··· कारण आचार्य स. ज. भागवतांनी या संग्रहाच्या पुरस्कारात म्हटल्याप्रमाणे, ' तरुण महाराष्ट्राच्या भावनांचे प्रतिबिंब ' त्यात पडलेले आहे. " तरुण मनाला साजतील अशा सर्व भावना निःसंकोचपणे व्यक्त झालेल्या आहेत. सौंदर्य, भोग, प्रेम, वात्सल्य, त्याग, आशा, दलितांविषयीची सहानुभूती, विषमतेची चीड, मानव्याचे प्रेम, स्वातंत्र्याची तळमळ, निष्क्रियतेचा

तिरस्कार इत्यादी भावनांची चित्रे या संग्रहात रेखाटलेली आढळतील." [७९] हा 'अग्निपरागा-संबंधीचा भागवतांचा अभिप्राय बहुतेक सर्वांना मान्य होण्यासारखा आहे. पोवळ्यांच्या 'जळमाती'ने काही टीकाकारांचा अपेक्षाभंग झालेला आहे आणि तो स्वाभाविक आहे. 'अग्निपराग' मधील ध्येयदर्शित्वामुळे प्रभावित झालेल्या टीकाकारांची 'जळमाती'तील पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले कविमन पाहून व त्यांची "मी तर मस्त मवाली" "इहपर लोकावरची माझी श्रद्धा पार उडाली" अशी अवस्था जाणून निराशा झाली. म्हणूनच "या विचारांच्या मागे निश्चित आणि परिपक्व जीवन-निष्ठा" नसल्याचे उद्गार डॉ. अ. ना. देशपांडे यांनी काढलेले आहेत. मात्र पोवळ्यांच्या आशय-संपन्न व काव्यगुणांनी युक्त अशा कवितांचा गौरवपूर्ण उल्लेख करायलाही ते विसरले नाहीत. [८०]

प्रेरणा-प्रभाव-काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी– केशवसुत, तांबे, कुसुमाग्रज आणि उमरखय्यामचा नास्तिकवाद यांचे संस्कार घेऊन पोवळ्यांच्या 'अग्निपरागा'चा आणि 'जळमाती'चा विकास झाला असा अनेक टीकाकारांचा तर्क आहे, तो बव्हंशी खरा आहे. 'मी तर मस्त मवाली'मधील "झाकून डोळे फिरवी श्रद्धा चरकाच्या भवताली। चालतेसे मी नीतिधर्म हे तुडवित पायाखाली" ही पोव-ळ्यांची खऱ्या अर्थाने प्रलयावस्था आहे, पण त्या प्रलयावस्थेची सुरुवात 'अग्निपराग'मधील 'संक्रमण' मध्येच झालेली आहे. या संक्रमणकवितेचा नेमका काळ सांगता येत नाही पण तो १९४२-४३ नंतरचा असावा. आपल्या काव्याबद्दल नव्हे तर एकूण संपूर्ण जीवनाबद्दलच त्यांच्या ठिकाणी अश्रद्धा निर्माण झालेली आढळते. या मानसिक परिवर्तनामुळे उच्छृंखल आणि कलंदरी वृत्तीतून बेदरकारपणे त्यांनी बेबंद अशा काही कवितांची निर्मिती केलेली आढळून येते, पण या 'फकिरी' कलंदरी वृत्तीतही हॅम्लेटच्या वेडाप्रमाणे काही सुसंगती, सूत्रबद्धता आढळून येते. त्यांच्या ध्येयाचे अधिष्ठान बदलले असेल पण ध्येयवाद कायमच आहे. जीवन बदलले असले तरी जीवनदृष्टी कायमच असल्याचे आढळते. म्हणूनच तर "पूर्वीच्या श्रद्धेने मी करतो मस्तक लीन" अशी विनयशील त्यांची भाषा आहे. 'अग्निपराग'च्या पुरस्कारात शेवटी आचार्य भागवत म्हणतात, "श्री. पोवळे यांच्या काव्यसंग्रहात जीवनविषयक एक व्यापक श्रद्धा भरून राहिलेली मला दिसत आहे."[८१] हे 'अग्निपराग' या संग्रहाच्या बाबतीत अधिक खरे आहे. त्यांची ध्येयवादी आणि क्रांतिवादी कविता 'अग्निपराग'मध्येच प्रामुख्याने एकवटलेली आहे.

कवी श्रीकृष्ण पोवळ्यांच्या 'अग्निपराग', 'बुतशिकन', 'प्रेम हे सर्वस्व का?' 'गा हृदया!', 'तव रूपाहून अक्षय माझी कविता', 'कीर्ती श्री. रमणी नकोत', 'किशोरी तू काय सांगशील' आणि 'दौलत जाद्यावरती नाचली न ही कविता' यासारख्या कविता वाचल्या की त्यांच्या काव्यदृष्टीचा आणि ध्येयवादी जीवनदृष्टीचा सहज परिचय होतो. संपूर्ण 'अग्निपराग' ही कविताच काव्यदृष्टीचा परिचय देणारी आहे.

"कविता माझी ज्वालामय हृदयात
वैदेही जणु शोभे अग्निशिखेत
पावित्र्याची तिचिया हीच कसोटी
जग निंदो तिज ती हसते अग्नीत" (– अग्निपराग)

काव्याहून जीवन महान असावे अशीच या कवीची निष्ठा आढळते. म्हणून तर मूल्यहीन स्वार्थी भ्रष्ट जीवनाचा त्याने जळजळीत शब्दांत धिक्कार केला आहे. तो म्हणतो,

" इमान खोटे राखायास्तव । स्वत्व विसरली रक्त विसरती ।
बेईमान जे, जे कम अस्सल । थू त्यांच्या जिनगानीवरती ।"
(– थू त्यांच्या जिनगानीवर)

राष्ट्रभक्ती– कुसुमाग्रज, कांत यांच्याप्रमाणे राष्ट्रभक्तीची भावना पोवळघांच्या ठिकाणीही आहे परंतु तिचा आविष्कार विस्तृत प्रमाणावर आढळत नाही. मात्र राष्ट्रभक्तीचे अधिष्ठान असलेला ध्येयवाद आणि त्याचे चित्रण कांत यांच्या कवितेपेक्षा पोवळघांच्या कवितेत विशेषत्वाने आढळते. 'विद्धाचे अंत्योद्गार', 'अग्निशराचा गगन वेध', 'धन्य पराजय', 'तरं झाली मस्तके', 'कारागृहाचे मनोगत', 'गौरवाचे कसे हार घालू तुला' या त्यांच्या कवितांतून राष्ट्रभक्तीची भावना उत्कटत्वाने साकार झालेली आहे. देशासाठी हौतात्म्य स्वीकारणाऱ्या देशभक्ताचे मित्राजवळील मृत्यूपूर्वीचे निवेदन या 'विद्धाचे अंत्योद्गार' या कवितेचा विषय आहे. आपली अतृप्त आकांक्षा सांगताना मरणोन्मुख देशभक्त म्हणतो,

" राष्ट्रासाठी करीन पराक्रम । मिळेल शांती मज सेवेने
जनताही मग करील गौरव । मृतीतही मग मज चिरंजीवन
...अन्यायाच्या प्रतिकारास्तव । झुंज झुंजता गाठी मृत्यू "

दुसऱ्या एका कवितेत कवी सांगतो,

" कुणी लाविता ज्योत याला जरा
उफाळूनिया तेज ये जागृती,
खळाळून फूत्कारुनी हा उठे,
हिरीरीच की क्रांतिची पेटती " (अग्निशराचा गगन वेध)

राष्ट्रभक्तीच्या भावनेचा आवेग यातून व्यक्त झाला आहे. 'धन्य पराजय' मध्ये 'वन्देमातरम', 'महात्मा गांधी की जय' म्हणून बलिदान करणाऱ्या देशभक्त सत्याग्रही वीरांचे दर्शन कवीने घडविले आहे. त्या वीरांचा गौरव करताना कवी म्हणतो,

" वीरच तो जयशाली निर्भय वदे 'महात्मा गांधी की जय'
तोंडामधुनी शब्द उडाले वाऱ्यावरती नाचत थयथय
अन छातीवर झेलून गोळी ये धरणीला तो अकुतोभय "

स्वातंत्र्याची आकांक्षा आणि क्रांतीची गर्जना– राष्ट्रभक्तीप्रमाणेच पोवळघांच्या अनेक गीतांमधून स्वातंत्र्याची उत्कट आकांक्षा, पारतंत्र्यासंबंधीची चीड आणि अन्यायाच्या प्रतिकारार्थ क्रांतीची गर्जना प्रकट झालेली आहे. 'ज्वालागिरी', 'विद्धाचे अंत्योद्गार', 'रे भावनांनो', 'वारुळ', 'पाचोळा', 'उठतील वीर जमिनीमधुनी', 'पाथरवट' या कवितांतून स्वातंत्र्याची आकांक्षा व्यक्त झालेली आहे. शेकडो वर्षांच्या पारतंत्र्याच्या बेडघा तोडण्याची आकांक्षा व्यक्त करताना कवी म्हणतो,

" या शेकडो वर्षे पदी । राहून बेडघा गंजती,
परि शर्थ होऊ द्या अता तोडावयाची एकदा " (रे भावनांनो धुंद व्हा ।)

'वारुळ' या रूपकात्मक कवितेतूनही स्वातंत्र्याचे महत्त्व कवीने सांगितले आहे. 'वारुळ' म्हणजे स्वातंत्र्याचा जणू दुर्गच

" वारुळात नसे शत्रूंना प्रवेश
कारण सत्कारार्थ त्यांच्या लक्षावधी "
" स्वातंत्र्याचे अंगी संचारोनी वारे
हटविती अंती सर्पांना माघारे ॥" (वारुळ)

स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचा दुर्दम्य आशावाद "उठतील वीर जमिनीमधुनी" या वीर-रसात्मक कवितेतून प्रगट झालेला आहे. शत्रू कितीही बलवान आणि शस्त्रास्त्रसंपन्न असला तरी आम्ही अजिंक्य आहोत कारण,

" रक्ताच्या बिंदुबिंदुतुनी उठतील वीर जमिनीमधुनी ।
मी अमर होय अमृत पिउनी –
प्राशताच ते पेय तेजोमय । वृत्ती झाल्या स्वतंत्र निर्भय रणी ॥"
(– उठतील वीर जमिनीमधुनी)

स्वातंत्र्याच्या आकांक्षेप्रमाणेच पारतंत्र्याची चीडही 'मुक्त', 'रंगात रंगले जन', 'थू: त्यांच्या जीनगानीवरती' यासारख्या कवितांतून व्यक्त झालेली आहे. दात्याचे विस्मरण होऊन भोवतालचे जग रंगात रंगलेले पाहून कवीच्या अंत:करणाला वेदना होतात. तो म्हणतो,

" रंगात रंगले जन भवती । परि शल्ये माझ्या उरि सलती
आम्हास्तव जे वरिती बंधन । करिती रक्ताश्रूंचे सिंचन
...सेवायाला कदन्न त्यांना । लोहबंध जखडिती पायांना
आणि भिडून संगिनी उरांना । आसूड उठति पाठीवरती ॥"

गुलामगिरीहून मृत्यू बरा हे सत्य 'मुक्त' या ओजस्वी कवितेतून कवीने सांगितलेले आहे.

" बोलला तो, याहुनी मृत्यु बरा
हद्द झाली शृंखला मी तोडतो ।"
– – हाय ! ती बेडी तुटेना राक्षशी । आणि अंती ऊर त्याचे फाटले ।
हर्ष वेडा मुक्त तो आक्रोशला । रक्त त्याचे शृंखलेने प्राशिले ।"

श्रीकृष्ण पोवळ्यांनी स्वातंत्र्यासाठी क्रांतिमार्गाचा उघड उघड पुरस्कार केलेला आहे. 'ज्वाला गिरी', 'अग्निशरांचा गगनवेध', 'भैरवी', 'तर्र झाली मस्तके', 'न मिळो अन्न' यासारख्या जहाल कविता लिहिल्या आहेत. 'ज्वालागिरी' या रूपकात्मक कवितेत प्रथम असंतोष कसा लाव्हारसाच्या रूपाने खदखदत असतो हे सांगितले आहे. पोवाळ्याच्या सर्व क्रांतिगीतांचे प्रतिनिधित्व करणारी 'भैरवी' ही सुप्रसिद्ध कविता आहे. 'तांब्यांची' 'रुद्रास आवाहन', कांतांची 'नवे वर्ष' तशीच पोवळ्यांची भैरवी आहे. तिचे आवाहन करताना कवी म्हणतो,

" थयथय नाचत येई भैरवी, थयथय नाचत ये
रिपुरुंडांची घाल भयानक गळ्यामध्ये वलये
... बद्धांना करमुक्त, येऊ दे जगामध्ये नीती,
बलोद्धतांना धुळित मिळू दे, चिरायु कर क्रांती,
अग्नि चेतवित, ध्वंस करित ये, थयथय नाचत ये,
थयथय नाचत येइ भैरवी, थयथय नाचत ये " (भैरवी)

पोवळचांची ध्येयदर्शी गीते– कलंदर, अश्रद्ध आणि स्वच्छंदी म्हणून टीकेस पात्र झालेल्या पोवळचांनी अनेक ध्येयदर्शी गीते लिहिलेली पाहून आश्चर्य वाटते. अग्निशरांचा ' गगनवेध ', ' रे नसेल नसू दे '. ' न मिळो अन्न ', ' रंगात रंगले जन ', ' महापुरे झाडे जाती ', ' संकल्प ', ' कामना ', ' फकिराचे गाणे ', ' पाचोळा ', ' करकरलेली अवस हवी ', इत्यादी कविता ध्येयदर्शीत्वाची उदाहरणे म्हणून सांगता येण्यासारख्या आहेत. क्रांतीचे प्रतिनिधित्व करणारी पोवळचांची जशी ' भैरवी ' आहे तशीच ध्येयदर्शी गीतांचे प्रतिनिधित्व करणारी ' अग्निपराग ' आहे. अन्याय अत्याचाराविरुद्ध प्रतिकारार्थ सज्ज असलेली त्यांची ध्येयवादी कविता आहे.

" दुबळचांचे बळ कुठे तुडविले जाता
एकवटे बळ ही अग्नीची दुहिता.
सर्पापरि ही फुत्कारी क्रोधाने
वडवाग्नीसम भडके माझी कविता " (– अग्निपराग)

' फकीराच्या गाण्यात ' ही अशी उदात्त ध्येयदृष्टी आहे.

" अन्यायाची चीड भयंकर अन्यायी दुष्मान
मृत्तिकेपरी जीवन जगती त्यांना देऊं हात " (– फकीराचे गाणे)

रुबायांतूनही कवीचा ध्येयवाद प्रकट झाला आहे. तो सांगतो,

" इतरांच्यासाठी जाळू अपुले देह
ते सौख्य आपुले, तोच आपुला धर्म !" (– रुबाया)

' सूर्याच्या किरणांनो ' या रूपकात्मक कवितेतूनही त्यांचा ध्येयवाद प्रकट झालेला आहे.

" स्ववैभव त्यागुनिया, साहुनिया मरण संथ
सेवाया मानवता, आक्रमितो पथ अनंत ॥ '

अशी कितीतरी उदाहरणे देऊन पोवळचांच्या ध्येयदर्शित्वाचे विवेचन करणे शक्य आहे पण आता वेगळचा मुद्याकडे वळले पाहिजे.

मानवतावादाचे आकर्षण– पोवळचांच्या ध्येयवादाला व्यापक मानवतावादाचे आकर्षण आहे. त्यांच्या राष्ट्रवादाने व्यापक अशा मानवतावादाचा स्वीकार केलेला आहे. ' वसुंधरे !' ' रंगात रंगले जन !' ' सूर्य किरणांनो !' ' न मिळो अन्न ', ' करकरलेली अवस हवी !' या कविता त्या दृष्टीने वाचण्यासारख्या आहेत. मानवतेसाठीच कवीला जीवनदायी चेतना हवी आहे. तो म्हणतो,

" शांति नको मज, हवी अशांती
नकोच निद्रा हवी जागृती
काष्ठ नको द्या ज्वाला जळती
चेतना हवी जीवनदायी ॥" (– करकरलेली अवस हवी !)

' घर आणि रस्ता ' या रूपकात्मक कवितेतील रस्त्याचे औदार्य पुढीलप्रमाणे प्रकट केले आहे.

" इथे सांडले रक्त, अश्रू तयांचे । जगाला उपेक्षार्त अज्ञात ते
परी थोरवी जाणतो हाच त्यांची । नि हा जाण तो मूक ती हृद्गते "

पूर्ववैभवाचे स्मरण आणि परंपरेचा अभिमान– या कालखंडातील कवींत या राष्ट्रीय घटकांचे फारसे आकर्षण आढळत नाही. पण संपूर्ण परंपरेपासून ते पूर्णपणे वेगळेही राहू शकत नाहीत हेही तितकेच खरे आहे. 'भैरवी' चे आवाहन पारंपरिक रूपातच कवीने केलेले आहे.

आर्थिक आणि सामाजिक विषमतेची जाणीव– ध्येयदर्शी आणि क्रांतिवादी कवितांमधून आर्थिक आणि सामाजिक विषमतेची जाणीव कवीने व्यक्त केलेली आहे. 'वसुंधरे तुज लांच्छन हे!', 'घर आणि रस्ता', 'पाथरवट', 'पाचोळा', 'अग्निकरांमाजी जळली' इत्यादी कवितांतून विशेषपणे दर्शन घडविले आहे. अन्नान्नदशा होऊन उपासाने मातेच्या मांडीवर मूल मरावे आणि शेवटी मातेलाही अन्नाच्या अभावी मृत्यूला कवटाळण्याची पाळी यावी असे करुणजनक चित्र 'वसुंधरे तुज लांच्छन हे!' या कवितेत कवीने रेखाटले आहे. ती माता तळमळून म्हणते,

"अन्नाविण तळमळून मूल मरे दृष्टिपुढे
पृथ्वी ही उल्केसम कोसळुनी कान जळे?"

कवी पाथरवटाला विचारतो,

"देसी दगडा घोंडयांना हवा तसा आकार
घण केव्हा धनवंताच्या हृदयावर देणार?" (पाथरवट)

स्त्रीपुरुष विषमता किंवा सामाजिक विषमता पोवळघांच्या काव्यातून आढळत नाही.

वीर विभूतिपूजन– अश्रद्ध आणि कलंदर वृत्तीने जीवन जगणाऱ्या व टीकाकारांचे लक्ष्य ठरलेल्या या कवीने राष्ट्रासाठी हौतात्म्य स्वीकारणाऱ्या देशभक्तांचे भक्तिभावपूर्वक पूजन केलेले आहे. या विभूतीत स्वकालीनांना त्यांनी स्थान दिलेले आहे. 'विद्धाचे अंत्योद्गार', 'कारागृहाचे मनोगत' 'गौरवांचे कसे हार घालू तुला?' 'तर्र झाली मस्तके' ह्या कविता वाचण्यासारख्या आहेत. गांधीजींच्या वधानंतर लिहिलेली 'जळमाती' या संग्रहातील 'आज संपला सर्गमहाकाव्याचा' ही सुप्रसिद्ध विलापिका ही त्यांच्या विभूतिपूजनाचे उदाहरण म्हणून सांगण्यासारखी आहेत. ६ मे १९४४ साली ब्रिटिशांनी महात्माजींची सुटका केली त्या प्रसंगावर 'महात्माजीस' याच शीर्षकाची कविता पोवळघांनी लिहिली आहे. गांधीजींच्या त्यागपूर्ण जीवनाने कवी कसा प्रभावित झाला होता त्याचे प्रत्यंतर खालील पंक्तींत आल्याशिवाय राहत नाही. कवी म्हणतो,

"कष्ट तू साहिले घोर कारागृही। आणि आम्ही इथे हासलो नाचलो
बंध तोडावया दंड तू साहिला। शृंखलांची न जाणीव आम्ही परी
तेज राशीच तू सूर्य तेजाळ तू। आपदांच्या गळा मेघमाला तुझ्या॥"

'तर्र झाली मस्तके' मध्ये नेताजी सुभाष बोसांचे भारतीयांना आवाहन आहे.

"रक्त मागावयास आलो, बंडखोरांनो इथे।
रक्त द्या माते तुम्ही, देईन आझादी तुम्हा
बंडखोरांनो! असे सौदा असा आझादीचा ··· ···
गर्जला 'जयहिंद' तो अन् कापल्या साऱ्या दिशा ··· ···"

काव्यात्मकता– अश्रद्ध, बंडखोर पोवळघांची राष्ट्रीय कविता प्राधान्याने आशावादी आहे. कवीने राष्ट्रीय भावनेला सौंदर्यभावनेची जोड दिलेली असल्याचे दिसून येते. म्हणूनच डॉ. अ. ना. देशपांडे

म्हणतात, या कवीला प्रभावी स्वरूपाच्या काव्याची जाणीव आहे.[८२] पोवळ्यांच्या अनेक कवितांचा उल्लेख करून कविमनाची साक्ष पटल्याचा अभिप्राय डॉ. प्र. न. जोशी यांनी दिला आहे.[८३] "आपल्या व्यक्तिमत्त्वाची एवढी प्रत्ययकारी कविता त्याकाळी कोणी लिहिली नाही ..... ती सांकेतिक असूनही उल्केसारखी चमकून गेली" असा प्रा. निशिकांत ठकारांचा अभिप्राय आहे. उल्केचे तेज, वादळाचे सामर्थ्य, इंद्रधनुष्याचे सौंदर्य तिच्या ठिकाणी आहे. क्रांती चिरायू व्हावी, म्हणून भैरवीला आवाहन करणारे ध्येयवादी कवी श्रीकृष्ण पोवळे सदैव स्मरणात राहतील.[८४]

स्वातंत्र्याचा उत्साहप्रेरक "संजीवनी मंत्र" देणारे विंदा करंदीकर
(जन्म–१९१८)

परिचय– मर्ढेकर, मुक्तिबोध या नवकवींच्या परंपरेतील एक श्रेष्ठ नवकवी म्हणून "विंदा" उपाख्य गो. वि. करंदीकर ओळखले जातात. 'स्वेदगंगा' (१९४९), 'मृद्‌गंध' (१९५४), 'धृपद' (१९५९), 'जातक' (१९६८) या संग्रहातील करंदीकरांची वैविध्यपूर्ण आणि विपुल कविता आज मराठी रसिकांपुढे आहे. त्यांच्या कवित्वाच्या विकासाचा आलेख काढण्याइतपत प्रगल्भता त्यांच्या प्रतिभेने गाठलेली आहे. परंतु प्रबंधाच्या कालखंडाच्या मर्यादेत त्यांच्या 'स्वेदगंगेतील' राष्ट्रीय कवितांचाच आपल्याला परिचय करून घ्यावयाचा आहे. "मी परंपरेचा पुरस्कर्ता नव्हतो किंवा प्रयोगाचा उद्‌घोषक नव्हतो. जीवनवादी नव्हतो किंवा कलावादी नव्हतो, मी असलोच तर जाणीववादी होतो."[८५] हे त्यांचे सावध युक्तिवाद करणारे वकिली बाण्याचे विधान अगदी अलीकडचे कालसापेक्ष आहे. 'स्वेदगंगा' लिहिणारे तरुण करंदीकर कदाचित परंपरेचे पुरस्कर्ते नसतीलही पण राष्ट्रवादी आणि जीवनवादी नक्कीच दिसून येतात. १९३६ ते १९४८ या राष्ट्रीय जीवनातील अतिशय खळबळजनक आणि परिवर्तनशील कालखंडात करंदीकरांची 'स्वेदगंगा' अवतरली आहे.

उत्कट राष्ट्रप्रेम– ऐन तारुण्यात करंदीकर राष्ट्रप्रेमाने प्रभावित झालेले असावेत कारण त्यांच्या 'विजयी भारत', 'प्रार्थना' आणि 'ध्वजगीत' यासारख्या कविता. 'विजयी भारतात' त्याच्या भव्योदात्त रूपाचे चित्र कवीने रेखाटले आहे. १९४१ साली लिहिलेल्या या कवितेत कवी सांगतो,

"विजयी भारत, विजयी भारत प्यारा
मुकुट हिमाचल अचल शिरावरि,
निर्मल गंगा हृदय स्थलावरि;
सागर चाकर पदकमळा चुरि,
दिशादिशातून वाहे जेथे पवित्रतेचा वारा" (– विजयी भारत प्यारा)

'प्रार्थना' कवितेत कवीने स्वर्ग नको, मुक्ती नको, भारतभूचे विजय गाण्याचे मागणे भगवंताला मागितले आहे. शेवटी कवी म्हणतो,

"जीवन दे मज मरण तिच्यास्तव मरण्या
मरण तिच्या मृदु प्रेमळ मांडीवरती,
वंदे मातरम्‌ंव मुखातून स्वर गर्जत जो येती" (– प्रार्थना)

'ध्वज गीत' मध्ये कवी म्हणतो,

"अखिल हिंद राष्ट्रात्मा मूर्तिमंत जो
जो नीती ज्ञान, शौर्य तेज दाविती" (– ध्वजगीत)

स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्याची चीड– राष्ट्रप्रेमाप्रमाणेच स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्याची चीडही त्यांच्या 'कालीचे संदेश', 'संजीवनी मंत्र', 'आवाहन' यासारख्या ओजस्वी कवितांतून प्रकट झालेली आहे. "सत्तेने मत्त झालेल्यांची कत्तल करा आणि स्वातंत्र्याची तुतारी फुंका !" असा कालीचा संदेश आहे. स्वातंत्र्याचा प्रेरणादायक 'संजीवनी मंत्र' गाताना कवी म्हणतो,

"पुढे पाशवी क्रूर साम्राज्य शाही
कुणा जन्मठेपी कुणा देत फाशी
कुणा हद्दपारी नि कारा कुणाही
कुणा राक्षसी यातनांनीच नाशी,
तरी नष्ट ना जाहला क्रांतिमंत्र,
संजीवनी मंत्र – स्वातंत्र्य, स्वातंत्र्य !" (– संजीवनी मंत्र !)

क्रांतीचा पुरस्कार आणि मानवतावादी ध्येयवाद– डॉ. वा. भा. पाठकांनी राष्ट्रीय कवितेच्या स्वरूपाची चर्चा करताना एक मार्मिक मुद्दा मांडलेला आहे. त्यांच्या विवेचनाचा भावार्थ असा की, १९३५ नंतरच्या काळात राष्ट्रीय कवितेचे स्वरूप अधिक सखोल, अधिक व्यापक आणि सर्वस्पर्शी झाल्यामुळे राष्ट्रोन्नतीला पोषक ठरणाऱ्या सामाजिक मूल्यांचा पुरस्कार अनेक कवींच्या काव्यातून झालेला आहे. त्यांच्या मते व्यक्तिस्वातंत्र्य व मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या कवितांचा समावेश या गटात करणे इष्ट आहे. क्रांतीचा आणि विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या कवितांनाही याच गटात स्थान दिले पाहिजे. विंदा करंदीकरांच्या अनेक कवितांमधून या व्यापक राष्ट्रीय मूल्यांचाच पुरस्कार आहे. त्यांच्या 'स्वेदगंगा', 'क्रांती', 'प्रणाम', 'होळी !', 'लढाई व बढाई !', 'कालीचे संदेश', 'आवाहन', 'लोकशक्ती ही !' 'मानवतावाद' आणि 'विश्वरूप विराट' या कविता त्या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. 'स्वेदगंगा' ही साम्यवादी जीवनमूल्यांचा पुरस्कार करणारी आहे. साम्यवादातील या मार्क्सप्रणीत इतिहासाच्या गत्यात्मक भौतिक वादाचे आणि आणि उत्पादनशक्ती हा जीवनाच्या विकासाचा पाया असल्याचे तत्त्व मोठ्या मार्मिकपणे कवीने आणलेले आहे.

"स्वेदाची ही अखंड गंगा
देश, धर्म, रक्ताचे सारे
फोडित धरणे, नी बंधारे
भिजवित माती काळी, गोरी
पहा धावते अखिल जगावर
जीवन नौका नाचे त्यावर ॥" (– स्वेदगंगा)

'क्रांती' मध्ये विषमता, अन्याय, गुलामगिरी यातून मुक्त होण्याचा पुरस्कार आहे.

"शस्त्रास्त्रांना धरून हाती, । भिजवित रक्ताने नव माती
क्रांती नाचतसे या भूवर । स्वेदबिंदूंनो बोला जयजय,
मुक्त तुम्ही व्हा, मुक्त करा नर..." (– क्रांती)

अशी अनेक उदाहरणे देऊन क्रांतीचा पुरस्कार सांगता येण्यासारखा आहे. दुसऱ्या एका कवितेत, लोकशक्तीच्या द्वारेच क्रांती कशी होते याचे चित्र कवीने रेखाटले आहे.

" लक्ष हस्त पाद लोक शक्ति ही
क्रांतीच्या दीप्तीतून मुक्ति शोधिते "[८५]–

नव्या युगाच्या विश्वरूप विराट पुरुषाचे दर्शन कवीने अतिशय समर्थपणे घडविले आहे.

" डोक्यावर चिरभूषण साम्ययुगी शांतीचे
... नव मानव मी – माझे – विश्वरूप पाहुनि घे !" (– विश्वरूप)

सामाजिक आणि आर्थिक जाणीव– ज्या स्वातंत्र्याचा आणि क्रांतीचा ध्यास ' स्वेदगंगे ' मधील कवितांतून आढळतो त्या स्वातंत्र्याचे स्वरूप प्रामुख्याने आर्थिक स्वातंत्र्याचे आहे. दुष्ट सामाजिक चालीरीतींविरुद्धही क्रांतीची पुकार आहेच पण आर्थिक पारतंत्र्याची जाणीव तीव्र आहे. डॉ. अ. ना. देशपांडे यांना या सामाजिक व आर्थिक जाणिवांचे प्रकटीकरण करणाऱ्या कविताच मोलाच्या वाटतात. ते म्हणतात, " ज्यामुळे प्रस्तुत कवितासंग्रहाला मोल आलेले आहे आणि ज्यात कवीच्या प्रतिभेची पृथगात्मता प्रकट झालेली आहे अशा कविता या संग्रहात आहेत. ' साक्षात्कार ', ' मजूर ' आणि ' कीर्तन ' या त्या कविता."[८६] या कविता समतेच्या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. त्यामुळे अनेकांना त्यातून साम्यवादाची तरफदारी आढळते. परंतु डॉ. वा. भा. पाठक म्हणतात त्याप्रमाणे " नवकवींचा हा समाजाकडे पाहण्याचा समतेचा दृष्टिकोन हा आपल्या राष्ट्रैक्य भावनेचाच एक भाग आहे असे समजणे इष्ट होईल."[८७] आणि म्हणून या कवितांचा समावेश राष्ट्रीय कवितांमध्येच केलेला आहे. ' मुंबई ', ' ब्रह्म जाहले वामन ', ' मृत्युलाही लाज आहे ', ' टांकसाळ ती मनात हसते !', ' सव घोडे वारा टक्के ' या कविताही सामाजिक व आर्थिक जाणिवेच्या सदरातच येण्यासारख्या आहेत. स्वेदगंगेमध्ये ही " सामाजिक जाणीव प्रधान असल्याचे "[८८] प्रा. निशिकांत ठकार यांचेही मत आहे. ' मुंबई ' तील दारिद्र्य, दैन्य, बकालपणा पाहून कवी म्हणतो " छे, हे नगर नव्हे, ही हिंदभूमीच्या शरीरावरची भयंकर जहरी जखम आहे, त्यात सुखवस्तू शेटजी म्हणजे वळवळणारे किडे आहेत." ' मजूर ' आणि ' कीर्तन ' या कविता तर या संग्रहाचे भूषण आहेत. मजुरांच्या स्थितीचे वर्णन करताना कवी म्हणतो, " मजुरांच्या हाडांचा येथे जळतो अंगार सदा, मजुरांच्या घामाच्या वाफेवर फिरती ही यंत्रे." (– मजूर) ' कीर्तन ' मध्ये सामाजिक विषमतेचे दर्शन घडते. इतर लोक कीर्तनाचा आस्वाद वेगवेगळ्या पातळीवरून घेत असतात आणि मंदिराबाहेर–

" अर्ध उपाशी महार अथवा चांभार कुणी थोडे
भिती वरुनी पुढे झुकावुन माना, प्रयत्नपूर्वक ऐकत कीर्तन
जे ऐकाया ये ना – कीर्तन
संपत आले !" (– कीर्तन)

सामाजिक विषमता किती जाचक असते याचे दर्शन कीर्तनमधून प्रभावीपणे कवीने घडविले आहे.

परंपरेचा अभिमान आणि पूर्व वैभवाचे स्मरण– ' संजीवनी मंत्र ', ' उठा उठा तयार व्हा ', ' समतेचे हे तुफान उठले ' या मोजक्या कवितांमधून परंपरेचा अभिमान आलेला आहे. मराठ्यांचे वैशिष्ट्य सांगताना कवी म्हणतो,

" स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्ये मिळे
तेच मराठे आम्ही, आम्ही सह्याद्रीचे सुळे ।"

यातून मराठी मनाची स्वातंत्र्यप्रियता, त्याचा कणखरपणा आणि त्याचा पराक्रम कवीने सूचित केलेला आहे.

वीर विभूतिपूजन– राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती करणाऱ्या कवीला वीर विभूतिपूजनाचे आकर्षण असते. करंदीकरांनाही ते आहे. ' संजीवनी मंत्र ', ' उठा तयार व्हा ', ' आवाहन ', ' विजयी भारत ' या कवितांतून कवीने मोठ्या प्रभावीपणे केलेले आहे. स्वातंत्र्याचा संजीवनी मंत्र देणारे म्हणून, राणा प्रताप, छत्रपती शिवाजी, बंदा बैरागी, धर्मवीर संभाजी यांचे पूजन संजीवनी मंत्र ' या कवितेत आलेले आहे. ' उठा तयार व्हा 'मध्ये अशीच वीरपूजा आहे. आवाहन 'मध्ये " शिवरायाची स्मरुनी मूर्ती । जगात पसरा भारत कीर्ती ।" असे प्रोत्साहनपर आवाहन आहे. ' विजयी भारत 'मध्ये

" अशोक, विक्रम चंद्रगुप्त तव,
प्रताप, गुरुगोविंद, तुझा शिव
धन्य धन्य भारत तेजार्णव ।"

असा ऐतिहासिक विभूतींचा विनयपूर्वक गौरव केलेला आहे. कवी आधुनिक महापुरुषांना विसरलेला नाही. त्याना स्वातंत्र्यासाठी वेदीवर जळणाऱ्या मशाली संबोधून,

" टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी "

असे पूजन केलेले आहे. महात्मा गांधींच्या वधानंतर ' काय केलेस हे ?' या शीर्षकाची करुण गंभीर विलापिका रसोत्कट व भावगर्भ आहे. कवी म्हणतो,

" काय केलेस हे ? मानवा ! मानवा !
काय केलेस हे ? मातृभूच्या उरी । जाहला वार हा शांततेच्या उरी "

काव्यात्मकता व राष्ट्रीय आशावाद– करंदीकरांच्या राष्ट्रीय कवितांतून सर्वत्र आशावादाचे दर्शन घडते. ' स्वेदगंगा ' मध्ये ते म्हणतात,

" भूताची जर झाली माती ।
भविष्य आहे तुमच्या हाती ।"

' क्रांती 'मध्ये ते म्हणतात,

" मानवतेला उद्घोषित नव । भविष्यकाळाच्या दरबारी
दणदणते क्रांतीचे तांडव ।"

' कालीच्या संदेशा 'तही

" भूतकाळ तर कालच मेला । पहा गडचा । तू उद्याकडे " असे कवी सांगतो.

मराठीच्या टीकाकारांनी करंदीकरांच्या काव्यात्मकतेची मुक्त कंठाने स्तुती केलेली आहे. अभिव्यक्तीचे भिन्न भिन्न प्रयोग करणारे कवी म्हणूनही करंदीकरांचा लौकिक आहे. करंदीकरांच्या संपूर्ण काव्यासंबंधी अभिप्राय व्यक्त करताना प्रा. निशिकांत ठकार म्हणतात, ' करंदीकरांसारखा जीवनसन्मुख कवी दुसरा नाही तरी त्यांची श्रद्धा आस्तिक्यवादी असून तिची परिणती आत्मतत्त्वाच्या ओढीत झालेली दिसून येते."[८९] डॉ. वि. स. जोगही म्हणतात, " करंदीकरांचे

व्यक्तित्व साम्यवादातून आकारलेले नाही."[१०] याचा अर्थ काव्यात्मकता असूनही आशयघनता त्यांच्या कवितेत आहे. ही आशयघनता त्यांच्या आरंभीच्या राष्ट्रीय भावनेतून आलेली आहे. म्हणूनच स्वातंत्र्याचा संजीवनीमंत्रही त्यांनी दिला आहे.

मराठी बाण्याचे स्वातंत्र्यसैनिक नि राष्ट्रकवी वसंत बापट
(जन्म १९२२)

जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी– आधुनिक मराठी नवकवींच्या मालिकेतील एक अग्रगण्य कवी म्हणजे वसंत बापट. इतर आधुनिक नवकवींत आणि बापट यांच्यात एक महत्त्वाचा फरक आहे तो असा की इतर कवी हे राष्ट्रीय भावनांची अभिव्यक्ती करणारे कवी आहेत. बापटांनी स्वत: स्वातंत्र्यसंग्रामात प्रत्यक्ष उडी घेतलेली असल्याने ते स्वातंत्र्यसैनिक नि राष्ट्रकवी आहेत. त्याची राष्ट्रीय भावना क्रियान्वित झालेली असल्याने, सेनापती बापट, साने गुरुजी यांच्यासारख्या कवींच्या मालिकेत त्यांचे स्थान आहे. म्हणून तर प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात, " बापट हे नुसते वावदूक कवी नाहीत, बेचाळिसाच्या चळवळीत ते जातीने पडले होते."[११] बापटांचे ' बिजली ' (१९५२), ' सेतू ' (१९५७) व ' अकरावी दिशा ' (१९६२) हे तीन कवितासंग्रह मराठी रसिकांपुढे आहेत. इथे आपल्याला ' बिजली 'तील राष्ट्रीय कवितांची चर्चा करावयाची आहे कारण पुढचे काव्यसंग्रह अपेक्षित कालखंडाबाहेरचे आहेत.

व्यवसायाने प्राध्यापक असलेल्या बापटांनी काव्याव्यतिरिक्त साहित्यनिर्मिती केलेली आहे. लोकनाट्याचे लेखक, निर्माते आणि अभिनेते शाहीर म्हणूनही बापटांचा लौकिक आहे. परंतु राष्ट्रकवी बापट एवढ्याच अर्थाने त्यांची काव्यविषयक भूमिका त्यांच्याच ' सेतू ' च्या प्रस्तावनेवरून समजावून घ्यावयाची आहे. आपल्या राष्ट्रीय संस्कारांसंबंधी कवी बापट सांगतात, " त्या वेळच्या सामाजिक स्थितीचा परिणामही जबरदस्त झाला. राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याला मुकलेला, सर्व क्षेत्रात वंचित राहिलेला हा देश त्यावेळी फार वेगाने ढवळून निघत होता. छोटी मोठी आंदोलने प्रत्यही घडत होती आणि मी तर या सर्व घटनांच्या निकट सान्निध्यात होतो. नव्याने उदयाला येणाऱ्या आपल्या राष्ट्राच्या आकांक्षा पीडितांचे दु:ख, जगण्याची इच्छा, सगळे काही जवळून पाहत होतो. संघर्षाच्या धकाधकीत प्रत्यक्ष पडलो होतो. या सर्व घडामोडींचा परिणाम माझ्या व्यक्तित्वावर म्हणजेच कवीवर होणे अपरिहार्यच होते. हा परिणाम इतका मोठा होता की, त्यामुळे पुष्कळ वर्षेपर्यंत माझी कविताच केवळ नव्हे, तर माझी काव्यविषयक, एकूण वाङ्मयविषयक दृष्टीच बदलून गेली होती."

काव्यदृष्टीच्या संदर्भात या प्रस्तावनेत कवी बापट म्हणतात, " जे समष्टीच्या भावनांचे प्रतिनिधित्व करते, लोककल्याणासाठी ज्याचा जन्म झाला आहे, जे निजलेल्यांना उठविते, उठलेल्यांना कार्यान्वित करते ते साहित्य, अशी समजूत मी करून घेतली. " स्वान्त: सुखाय " हे तत्त्व " बहुजनहिताय " या तत्त्वाने झाकून टाकले. त्यामुळे माझ्याही काव्याला एक प्रयोजन निर्माण झाले."[१२] या प्रयोजनाचा परिपाक म्हणजेच बापटांची ' बिजली ' तील राष्ट्रीय कविता आहे. ' माझी कविता ' या कवितेतूनही तिचे प्रयोजन अगदी स्पष्ट झालेले आहे. त्यांच्या कवितासखीला, कल्पलतेवरील प्रीतीचे पुष्प नको, तिला हवी आहेत विद्युल्लतेची फुले !

" ऐशी ती नटली, कसून तिजला मी ही तदा भेटली
तेव्हा मी जळलो, अजून जळतो, मी अमृते पेटलो " [९३] (– माझी कविता)

बापटांची राष्ट्रीय कविता– कवी बापटांच्या काव्यात " व्यापक सामाजिकदृष्टी असल्याचे " प्रा. भ. श्री. पंडितांनी निःशंकपणे सांगितले आहे. प्रा. निशिकांत ठकारही म्हणतात, " राष्ट्रवृत्तीच्या आवाहक कविता हे ' बिजली ' चे मुख्य वैशिष्ट्य !" [९४] ' बिजली ' त एकूण ४६ कविता आलेल्या असून त्यातील ' सत्तावनचे वीर ', ' शतकानंतर ', ' पहाटेचे स्वप्न ', ' सदैव सैनिका पुढेच जायचे '; ' महायान ', 'चालू दे जयनाद ', ' जल उषा ', इत्यादी कविता राष्ट्रीय आहेत. ' शतकानंतर ', 'तुला नव्या, जगाची आण ', ' देशाची हाक !' या कवितांतून कवी बापटांचा उत्तुंग ध्येयवाद जाणवतो. देशाची हाकमध्ये कवी गरिबांना समजावून सांगतो आहे. तो म्हणतो,

" एकीचा झेंडा पुकारी वंडा देशाची हाक तुम्हा हाय हो !
अन्याय मिटवा, जुलूम हटवा मोलाची घटका जाय हो !" (– देशाची हाक)

' सदैव सैनिका पुढेच जायचे !' मध्येही असाच ध्येयवाद कवीने सांगितला आहे. सैनिकांना पुढेच जायचे असते मागे फिरायचे नसते. .....

" विशीर्ण वस्त्र हो विदीर्ण पावले । तरी न पाय हे कधी विसावले ।
न लोचना तुवां सुखे मिटायचे । सदैव सैनिका पुढेच जायचे !"
(– सदैव सैनिका पुढेच !)

' तुला नव्या जगाची आण ' या कवितेत कवी म्हणतो,

" तुझ्या श्वासामधुन, तुझ्या श्वासामधून जुळे नव्या जगाचं गान
चल उचल हत्यार तुला नव्या जगाची आण !"

उत्कट राष्ट्रप्रेम– बापटांचे उत्कट राष्ट्रप्रेम त्यांच्या ' पहाटेचे स्वप्न ', ' महायान ' आणि ' आईची वेदना ' या कवितांतून व्यक्त झालेले आहे. फाळणीमुळे देश कसा विकलांग झाला याचे हृदयभेदक चित्र एका रूपककथेच्या आधारे कवीने मोठ्या समर्थपणे रेखाटले आहे. रतीचे रूप आणि सुवर्णाची क्रांती असलेल्या शांतीला स्वयंवराकरिता आलेल्या राजे महाराजांत परिचित ऐश्वर्यसंपन्न मुद्रा दिसली. परंतु त्याला हात नव्हते,

" हाय काय हे ! थवके राजा । भव्य असे जरि भारत मोठा
कुठे तयाचे बाहू दोन्ही । हा दोन्ही हातांनी थोटा !"

पश्चिम पंजाब आणि सिंध हा उजवा हात तर पूर्व बंगाल हा डावा हात मूळ भारतापासून तुटून वेगळे झाले आहेत. बंगालच्या रक्तलांच्छित फाळणीचे अत्यंत उपरोधपूर्वक चित्र कवीने रेखाटले आहे. कवी म्हणतो,

" हिरव्या हिरव्या शालूवरती । रक्त छटांची रम्य खुलावट ··· ···
दुष्काळातील मृत जीवांना । नवीन आता आले साथी
विभक्त देशासाठी झाली । विभक्त देहापासूनि माथी !"

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. ज्यावेळी आपण स्वातंत्र्योत्सव हर्ष उल्हासाने साजरा करीत होतो त्याच वेळी सिंध, पश्चिम पंजाब आणि पूर्व बंगालमध्ये भीषण जातीय दंगली पेटल्या

होत्या, जाळपोळ, लुटालूट, कत्तली आणि क्रौर्य यांचे नग्न तांडवच चालू होते. भारतमातेच्या मुखानेच तो वेदना कवीने कथन केलेली आहे. तो म्हणतो,

" रक्त रंजित गुलाब दिला लालेलाल हाती
आणि स्वतःच वानिती त्याच्या दिव्य परिमळा
··· ··· आज गुलाब पाण्याने शिंपलेले राज मार्ग
येथे कोमेजून जाती माझ्या आसवांच्या माळा !" (– आईची वेदना)

स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्याची जाणीव– स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पारतंत्र्याची तीव्र जाणीव कवी बापटांच्या ' सत्तावनचे वीर ' आणि ' शतकानंतर ' या कवितांमधून घडते. कवी म्हणतो,

" ते धन्य खरोखर सत्तावनचे वीर ।
जे स्वातंत्र्यास्तव झाले पूर्ण फकीर
झुंजार झुंजले, परि फिरले तकदीर ।
काल्पीत तयांची तुटून पडली माथी !
··· ··· रे शंभर वर्षे होतील पुरती आता ।
ती बेडी अजुनी पिचते आहे हाता " (– सत्तावनचे वीर)

स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्यांची चित्रे ' शतकानंतर ' या कवितेत कवीने रेखाटली आहेत.

" दीप पेटवुनि घरदारांचे । पूजन केले स्वातंत्र्याचे
त्या ज्योतीचे तेज मिसळुनी झाले आज विराट !!" (– शतकानंतर)

बापटांच्या राष्ट्रीय कवितांतील सामाजिकता– बापटांच्या राष्ट्रीय कवितांतील एक वर्ग सामाजिक कवितांचा आहे. त्यातून त्यांनी राष्ट्रातील आर्थिक व सामाजिक विषमतेचे दर्शन घडविले आहे. ' बिजली ', ' देशाची हाक ', ' स्वातंत्र्य !' ' कुठे स्वातंत्र्य ?' 'दिवाळी' आणि ' तुला नव्या जगाची आण ' या त्या कविता आहेत. ' बिजली ' त बहुजन समाज क्रांती घडवून आणेल असा आशावादी विचार मांडलेला आहे. बिजलीचा अर्थ सर्व प्रकारची क्रांती आहे. कवी म्हणतो,

" बिजली नाचेल गगनात वादळ होईल जोसांत
जंगल जळेल वणव्यात, मंगल होईल देशात ··· "

' देशाची हाक ' मध्येही हाच विचार कवीने मांडला आहे. भयानक आर्थिक विषमता आणि जाति-भेद यांचा उपरोधपूर्ण शब्दांत धिक्कार, ' स्वातंत्र्य ! कुठे स्वातंत्र्य ?' या कवितेतून केलेला आढळतो. जगात सर्वत्र असंतोष, द्वेष, प्रेमाचा अभाव असताना ' दिवाळी ' साजरी करण्यात स्वारस्य काय ? असा आशय ' दिवाळी ' या कवितेतून मांडलेला आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी उद्धारासाठी कार्य करण्याचे आवाहन कवीने बहुजन समाजाला केलेले असून त्याकरिताच ' तुला नव्या, जगाची आण ' ही कविता लिहिली आहे. बापटांच्या प्रतिभेच्या पृथगात्मतेचा परिचय देणाऱ्या या कविता डॉ. द. भि. कुळकर्णी यांना निव्वळ प्रचारकी हेतूनेच लिहिलेल्या वाटल्या आहेत.[९५] वास्तविक बापटांच्या सर्वस्पर्शी सहानुभूतीतून त्यांचा उदय झालेला आहे. डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " एवढे खरे की देशातल्या राजकीय व सामाजिक घटनांसंबंधीची आपली भावनात्मक प्रतिक्रिया या कवीने प्रगतिशील भूमिकेवरून अनेक कवितांतून व्यक्त केली आहे."[९६] वर उल्लेखित पाचही कविता देशपांडेंनी उल्लेखिलेल्या कवितांच्या सदरात पडण्यासारख्या आहेत.

परंपरा आणि पूर्व वैभवाचे स्मरण 'जल–उषा' आणि 'झेलमचे अश्रू' या कवितांतून बापटांनी केलेले आहे. 'जल–उषे' च्या निमित्ताने अखेरचा चौल नृपती, विजय नगरची, 'सागर लक्ष्मी', 'कान्होजी आंग्रे यांच्या आरमाराचे स्मरण कवीने केलेले आहे. 'झेलम' नेही ऋग्वेदातील गीती ऐकल्या. हा सर्व तपशील परंपरापूजन आणि पूर्ववैभवाचे स्मरण यात मोडणारा आहे.

वीर विभूतिपूजन– विदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, यांच्या तुलनेत विचार केला असता वीर विभूतिपूजनाची प्रवृत्ती बापटांच्या ठिकाणी अधिक आहे. बापट हे परंपरेशी समरस झालेले आहेत. बापट हे केवळ कवी नाहीत तर मराठी बाण्याचे शाहीरही आहेत. संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा; लोकमान्य टिळकांचा पोवाडा, काश्मीरचा हुतात्मा, मकबुल शेरवाणी यांचा पोवाडा, याशिवाय, गोवा मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्याचा जयजयकार, वेचाळीसचे आंदोलन, हुतात्माभाई कोतवाल, हुतात्मा शिरीषकुमार, हेमुकलानी, गांधीजींची जीवनयात्रा इत्यादी पोवाडे लिहिलेले असून शाहीर लीलाधर हेगडे हे ते गात असत. पोवाड्यांप्रमाणेच 'सत्तावनचे वीर', 'शतकानंतर', 'महायान', 'हे रवीन्द्र' या कवितांमधून राष्ट्रीय विभूतींचे पूजन आलेले आहे. 'धन्य ते खरोखर सत्तावनचे वीर' असे गौरवाचे उद्‌गार सत्तावनच्या वीरांच्या बाबतीत कवीने काढले आहेत. देशासाठी फकीर होऊन हौतात्म्य स्वीकारणाऱ्यांचे पुण्यस्मरण 'शतकानंतर' मध्ये आहे. 'महायान', 'चालू दे जय नाद'; 'अमरविहंगम' आणि 'पूर्णाहुतीचा तो दिवस' या चारही कवितांतून गांधीजींबद्दलची अपार भक्ती आणि पूज्य भावना कवीने व्यक्त केलेली आहे.

'अमर विहंगम' ही गांधीजींच्या वधाच्या प्रसंगाचे चित्र रेखाटणारी कविता आहे. भारतीयांच्या अंतःकरणावर त्या वधाची प्रतिक्रिया कशी झाली हे कवीने सांगितली आहे. 'महायान' मध्ये नोआखलीमधील गांधीजींची पदयात्रा आणि त्यांनी बंगालमधील जनतेला दिलेला दिलासा आहे. 'पूर्णाहुतीचा दिवस' मध्ये गांधीजींची शिकवण लोक विसरत असल्याची खंत आहे तर 'गांधी मंदिर'मध्ये शिकवण विसरून स्मारके उभारणाऱ्यांचा उपहास आहे. 'चालू दे जय नाद!' ही अतिशय प्रभावी करुणरसपूर्ण विलापिका आहे. कवीच्या अंतःकरणातील दुःख, प्रक्षोभ आणि भक्तिभाव उत्कटतेने व्यक्त झालेला आहे.

" ··· सूडाची जळताच चूड विझला की शांतीचा दूत तो
शांतीपूजक, सत्य दीपक तसा होता अहिंसाव्रती
आहे माहित ··· ··· या कृतघ्न वर हो भाई हो यापुढे
बोला रे जय आपुला नि बडवा उन्मत्त हे चौघडे !" (– चालू दे जयनाद)

आंतरिक जिव्हाळ्याने बापटांच्या राष्ट्रीय कविता जिवंत वाटतात म्हणून तर " कुसुमाग्रजांच्या नंतर बापटांइतके सरस राष्ट्रवादी काव्य दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीने लिहिले नाही," [९७] असा मार्मिक अभिप्राय डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी दिलेला आहे.

बापटांच्या मराठी बाण्याची साक्ष– 'केवळ माझा सह्यकडा' ही 'सेतू' मधील कविता म्हणजे त्यांच्या मराठी बाण्याची प्रातिनिधिक कविता म्हणून सांगता येईल, इतकी ती अप्रतिम आणि आशयपूर्ण आहे. बापट मराठीचा अभिमान व्यक्त करताना म्हणतात,

" भव्य हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा
गौरी शंकर उभ्या जगाचा मनात पूजित रायगडा "

रामायण, महाभारत उभ्या भारत वर्षाचे असले तरी, " छत्रपतीची वीर कहाणी निधान माझ्या हर्षाचे " आहे. शेवटच्या कडव्यात विश्वबंधुत्वाची कल्पना आणि तिच्याबद्दलचा आदर व्यक्त करून कवी म्हणतो,

" मी ही माझे बाहु पसरून अवघ्या विश्वाते कवळी ... ...
मात्र भावडचा हृदयात तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करून झंजावात
कोटि कोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषात !"

आशावाद आणि काव्यसौंदर्य– ' अमर आशा ' यासारख्या कविता वाचल्या म्हणजे बापटांची राष्ट्रीय कविता आशावादाने संपन्न असल्याची खात्री पटते. सामाजिक तत्त्वज्ञानाचा सावेश व हार्दिक पुरस्कार करणारा कवी "अशा आशयाचा डॉ. वि. स. जोगांचा अभिप्राय आहे.[९८] " स्वानुभूत वासाचे दान " असलेली बापटांची कविता सर्वकलागुणांनी संपन्न आहे. म्हणूनच मराठी वाण्याचे स्वातंत्र्य-सैनिक नि राष्ट्रकवी म्हणून वसंत बापटांचा गौरव करणे उचित ठरेल.

साम्यवादाकडे झुकलेले राष्ट्रवादी कवी मंगेश पाडगावकर
(१९२९)

काव्यदृष्टी आणि जीवनदृष्टी– साम्यवादाकडे झुकलेले राष्ट्रवादी मंगेश पाडगावकर हे शीर्षक वाचून आधुनिक टीकाकारांना आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाही आणि ते स्वाभाविकच आहे. कारण "सौंदर्यवादी निसर्गवेडे भावकवी" अशा स्वरूपात आज पाडगावकरांचे मराठी रसिकांना दर्शन होत आहे. " केशवसुतांपासूनच कुसुमाग्रजांपर्यंत अर्वाचीन मराठी काव्यात मानवतावादाचा जो नवा सूर आहे त्याचा ध्वनी पाडगावकरांच्या ' धारानृत्य ' मधील कवितांत परिणामकारक रीतीने आढळतो." [९९] अशा आशयाचे प्रस्तावनाकार आचार्य स. ज. भागवत यांचे विधान या शीर्षकाला पोषकच आहे. पाडगावकरांच्या ' धारानृत्य ' मधील कवितांवर बोरकरांचा व कुसुमाग्रजांचा प्रभाव असल्याचे डॉ. वा. ल. कुळकर्णी यांचे मत आहे. [१००] या प्रभावामुळेच मंगेश पाडगावकर राष्ट्रवादी ठरतात. हे सारे कवी राष्ट्रवादी आहेत.

युगधर्मामुळे जसे काळेले, कांत, निकुंब हे राष्ट्रवादी आहेत, किंवा पोवळे, पंडित, राष्ट्रवादी आहेत तसेच पाडगावकरही राष्ट्रवादी आहेत,

" दिव्य वाणी ही कवीची । अन् तपस्या ही मुनींची
आत्मशक्ती योगियांची । विश्वप्राणातून खेळे । आज धारानृत्य चाले ।।"

राष्ट्रवादी कवीच अशी परंपरा सांगतो.

" माते धरणी ! तू अपमानित ।
फुटुनि ऊर तव, वाहे शोणित
हे जनते ! तू लांछित वंचित
तुम्हि माझे मी सर्वांचा रे !
करि माझ्या दीप युगांचा रे !"

ती अनुभूती राष्ट्रवादी कवीचीच असू शकते. आपल्या कवितेचे वेगळेपण सांगताना कवी म्हणतो,

" कविता आज निराळी, अमुची कविता आज निराळी
कधि अश्रूंपरि कोमल, अन् कधि उग्र भयंकर काली
ही दलितांची ही पतितांची, ही श्रमिकांची अन् व्यथितांची,
समता, शुचिता आणिक शांती, प्रस्थापित निघाली !"[१०१]

अशी पाडगावकरांची वेगळी कविता आहे. एका अर्थाने ती मानवतावादी राष्ट्रवाद स्वीकारणारी आहे तर दुसऱ्या अर्थाने तिला साम्यवादाचे आकर्षण आहे.

साम्यवाद आणि मानवतावाद यांनी पाडगावकरांचा ध्येयवाद साकार झालेला आहे. म्हणून सौंदर्यवादी व निसर्गवेडे असलेले पाडगावकर जीवनवादी असल्याचे प्रत्ययास येते. ' धारानृत्य 'मधील ' करि माझ्या दीप युगांचा रे ', ' बीज तू होऊन ये !' 'वायूस', 'मानव आणि फूल', ' सखि तू !'; ' हे जीवन क्षितिज !' ह्या कविता प्रकाशपूजन करणाऱ्या तशाच ध्येयवाद सांगणाऱ्या आहेत. प्रकाश-पूजन करताना पाडगावकर म्हणतात,

" समर्पणातच मज संजीवन । मी उद्‌गाता शांतीचा रे !
करि माझ्या दीप युगांचा रे !"

किंवा

" मी उद्यांच्या जीवनाची, पेरिली बीजे विजेची
प्रज्वळोनी प्राणवीची, त्यातूनी उन्मेष आले !
आज ' धारानृत्य ' चाले !" (– धारानृत्य)

अशी अनेक उदाहरणे देऊन प्रकाशपूजन आणि ध्येयवाद सांगता येण्यासारखा आहे पण विस्तार-भयास्तव थांबले पाहिजे.

' मानव आणि फूल ', ' सखि तू ', ' हे जीवन क्षितिज ', ' माती ' आणि ' त्यांचे राज्य उद्याचे ' या कविता ध्येयवादावरोबरच समाजसत्तावादाद्वारे क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या आहेत. कष्टकरी, श्रमिक, शोषित या सर्वांचेच उद्याचे राज्य आहे असे सांगताना कवी म्हणतो,

" या राज्यास्तव यज्ञ मांडिले, कुणि अपुले सर्वस्व उधळिलें
रक्ताश्रूंतुनि त्याच पेटले – हे आव्हान युगाचे –" (– त्यांचे राज्य उद्यांचे !)

पददलितांचा कैवार घेण्यासाठी आपल्या कवितेचा अवतार आहे असे कवीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे पण डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, " धारानृत्यातून त्यांच्या (पददलितांच्या) व्यथांचे दर्शन घडण्याची शक्यता फारच कमी आहे."[१०२] कारण हा कैवार कवीने बराच अलिप्तपणाने घेतलेला आहे. कवीला वंश, वर्ण, राष्ट्र वा धर्म इत्यादी भेद नको आहेत. तो मानवतेचा पुजारी आहे.

" रे मानवतेचा देव तुझा, रे मानवतेतच धर्म तुझा
सेवेतून मुक्ती सेवित ये ! हे शुचिता, समता घोषित ये !" (– हे मानव ये)

महापुरुषांचे पूजन करण्यातही पाडगावकरांच्या कवितेने उल्हास दाखविला आहे. पितरांचे, संतांचे, देवांचे आणि समाजाचे ऋण कवीने मान्य केलेले आहे. तो म्हणतो,

" आणि संतांनो तुम्ही मृत्युंजयी श्रद्धा दिली
मी उद्यांच्या जीवनाची दिव्य स्वप्ने पाहिली " (– ऋण)

' कर्मयोगी विश्वयोगी ', ' वायूस ', ' आमार जीवन ई आमार बानी ' या कविता कवींची गांधीजींबद्दलची भक्ती व्यक्त करणाऱ्या आहेत.

" दूत तू येशूपरी रे प्रीतीचा अन शांतीचा !" असे कवीने ' वायूस ' या कवितेत म्हटलेले आहे. गांधीजींचे हृद्‌गत सांगताना कवी म्हणतो,

" दास्यी अमुचे जेये बांधव, तिये साधना अमुची अभिनव
...ज्वलन आमुची नित्य साधना विश्वमुक्तिचे वाण ।
आमुचे जीवन मंगल गान !" (– आमार जीवन ई आमार बानी)

पाडगावकरांच्या अनेक कवितांतून आशावाद डोकावताना दिसतो परंतु त्या आशावादाचे स्वरूप स्पष्टपणाने दृग्गोचर होत नाही.

' कृष्णजन्म ', ' ऋण ', ' आज नवा मी देव निर्मितो ', ' माती ' यासारख्या कवितांतून त्यांच्या आशावादाचे दर्शन घडते. उदाहरणार्थ, ' माती ' या कवितेत ते म्हणतात,

" परंतु हे आहे अजून आशा अभंग आशा, अमर्त्य आशा
अणूंच्या गर्भात क्रांतीची शक्ति – माती – माती मंगलमाती ।।" (– माती)

काव्यस्वरूप– कवीचा पिंडच मुळी निसर्गवेडया सौंदर्यवादी भावकवीचा असल्यामुळे आचार्य स. ज. भागवतांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ' धारानृत्यातील ' कित्येक कविता अशा श्रेष्ठ काव्याचे चांगले नमुने आहेत."[१०३] " बोरकरांची घाटदार गीतपरंपरा पाडगावकरांनी पुढे चालविली,"[१०४] असे प्रा. नि. शं. ठकारांचे मत आहे. या सर्व अभिप्रायांचा आशय लक्षात घेतला म्हणजे पाडगावकरांची कविता अभिव्यक्तीच्या सौंदर्यात मागे नाही असे बहुतेकांचे मत दिसते आणि ते खरे आहे. भावना, कल्पना, शब्दरचना व संगीतमयता या गुणांचे सुंदर दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. आशयाच्या दृष्टीने मात्र ती पुरेशी संपन्न वाटत नाही. मानवतावादी राष्ट्रवाद आणि समाजसत्तावादी क्रांतिवाद यांची भेसळ झाल्याचे वारंवार आढळते. तिला साम्यवादाचे आकर्षण असावे असे अनेक ठिकाणच्या चित्रणावरून वाटते आणि म्हणूनच साम्यवादाकडे झुकलेले राष्ट्रवादी कवी म्हणून पाडगावकरांचा ' धारानृत्यातील ' कवितांसाठी निर्देश करावा लागतो.

स्वा. सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते कवी राजा बढे
(१९१२–१९७७)

शृंगार आणि हास्य या दोन रसांचा आविष्कार असणाऱ्या कवितांची निर्मिती करणाऱ्या आधुनिक मराठीतील श्रेष्ठ कवींत राजा बढे यांची गणना केली जाते. तसा राजा बढे यांचा पिंड कविवर्य बोबडे अथवा कविवर्य उपाध्ये यांच्याप्रमाणे अभिजात कवीचा आहे, तरीही एक श्रेष्ठ भावकवी, उत्तम गीतकार आणि कुशल अनुवादक म्हणून त्यांचा लौकिक आहे. ' सीता स्वयंवर ' आणि ' रामराज्य ' या मराठी चित्रपटांची त्यांची गीते ग. दि. माडगूळकरांच्या गीतांसारखीच गाजली आहेत. या ठिकाणी हिंदुराष्ट्रवादी कवी म्हणून थोडक्यात राजा बढे यांच्या काव्याचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

राजा बढे यांच्या हिंदुराष्ट्रवादी कवितांची ओळख त्यांच्या १९५३ मध्ये प्रकाशित झालेल्या ' क्रांतिमाला "[१०५] या कवितासंग्रहाद्वारे होते. ' क्रांतिमालेतील ' अनेक कविता त्यांच्या हिंदुत्वनिष्ठ

जीवनदृष्टीवर आणि स्वा. सावरकरनिष्ठेवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. सर्वसाधारण अशी समजूत रूढ आहे की हिंदुत्वनिष्ठ माणूस हा गांधीजींचा विरोधक असतो. तो गांधीजींचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा ध्येयवाद, त्यांच्या जीवनदर्शाच्या कल्पना आणि त्यांनी प्रवर्तित केलेली स्वराज्याची व स्वातंत्र्याची आंदोलने यांचा विरोध करतो, उपहास करतो त्या सर्वांना विडंबनाचा विषय बनवितो. परंतु हे आक्षेप सत्यावर पूर्णपणे आधारलेले नाहीत असेही म्हणता येते. थोर राष्ट्रीय नेते, त्यागी आणि कळकळीचे देशभक्त, एक कुशल संघटक आणि समन्वयात्मक विचारांचे महापुरुष म्हणून ते वंद्य होते, परंतु ते पराकोटीचे आदर्शवादी होते. सत्य, अहिंसा, शांती, साधनशुचिता, अपरिग्रह, असंग्रह इत्यादी नैतिक तत्त्वांना राजकारणात आणण्याचा त्यांचा अट्टाहास होता. उपयुक्ततावादी व व्यवहारवादी राष्ट्रीय नेत्यांचा त्यांच्या या नैतिक तत्त्वांना विरोध नव्हता परंतु त्यांचा उपयोग राष्ट्रहित, समाजहित डोळ्यांपुढे ठेवून केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. सर्वश्री न. चिं. केळकर किंवा स्वा. वि. दा. सावरकर हे अशाच विचाराचे गांधीजींवर टीकास्त्र सोडीत होते. त्या टीकेचे पडसाद अनेकदा कवींच्या काव्यातून उमटलेले आहेत. 'क्रांतिमाले'तील अनेक कविता तत्कालीन घटनांवर भावनात्मक प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या आहेत. दि. वि. देवांनी संपादित केलेल्या 'उपहासिनी' या नावाच्या प्रातिनिधिक विडंबन काव्यसंग्रहातही गांधीजींच्या आदर्शवादाचा उपहास करणाऱ्या कविता आलेल्या आहेत. राजा बढे यांच्या कवितांचे स्वरूप असेच जळजळीत उपहासाचे आहे. उदाहरणार्थ, बंगालमधील नौखालीत फाळणीच्या प्रश्नावरून दंगली उसळल्या. इकडे आम्ही स्वातंत्र्याचा विजयोत्सव साजरा करीत होतो आणि तिकडे हजारो लोक प्राणाला मुकले होते. कवी सांगतो,

" आली स्वातंत्र्य देवता खरे आम्ही भाग्यवंत
भारताच्या वैराणात चला फुलवू वसंत
आला मृत्युला बहर पहा जोहाराच्या चिता
अहिंसेने मेलेल्यांनो ! काय मरणाला भिता ?"

स्वातंत्र्यदेवतेच्या स्वागताची तयारी आम्ही कशी केली हे सांगताना उपहासाने कवी म्हणतो,

....." पंचप्राणाचे स्तवक, हुंदक्यांची हारावली
गेली पार कोमेजुनी हात सुतात ओवली .....
अहोरूप अहोध्वनि स्वातंत्र्याचे सुस्वागत
मिळे स्वगत स्वातंत्र्य आज आम्हा स्मशानात "

(– नौखालीतील जीवनमहोत्सव)

गांधीजींनी हिंदुमुस्लिम ऐक्याचे ध्येय आयुष्यभर उराशी बाळगले होते. त्यामागे अर्थात त्यांची भूमिका राष्ट्रीय विचारांचीच होती. पण शेवटी मुस्लिम समाजाचे नेतृत्व करणाऱ्या बॅ. जिनांनी पाकिस्तान निर्माण केले आणि नुकसान–भरपाई म्हणून स्वतंत्र भारताने पंचावन कोटी रुपये द्यावे अशी मागणी केली, गांधीजींनी ती मागणी राष्ट्रीय सरकारने पूर्ण करावी यासाठी लकडा लावला आणि शेवटी उपोषणाची धमकी दिली. त्या प्रसंगावरील आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना कवी म्हणतो,

" होती मान्य जगात जे उडविली नेत्री धुळीचे कण
चातुर्ये रचिल्या हिमालय चुका द्यायास तीलांजलि
व्हाया भारत मुक्त गुप्त कुहरी हो राष्ट्र गंगाजळी "

(– खदखदा हासे विभूती अता !)

' आम्ही लावले दिवे ' ही कविताही जळजळीत उपहासाचा नमुना आहे. कवी म्हणतो,

" आली आज दिवाळी–मंगलता मालवे
ओवाळाया स्वतःभोवती अम्ही लावले दिवे. ... ...
अशा दिवाळीत दिवाभितांना मिळे मोकळे रान
परमुंडीपर करि पांडेपण खादीचा सैतान
चरख्यावरती सूत वळोनी अलक्ष्य केल्या वाती
अंधभक्त स्नेहात भिजवुनी दिल्या नरोटया हाती " (– आम्ही लावले दिवे)

' फाळणी ' या कवितेत कवी म्हणतो,

" भंगला वंग पांचाल भंगली दुर्गा
परधर्मरंजना अम्ही बांधला दर्गा
विसरलो स्वत्वसंस्कृति आपुल्या मोला
आणखी काय विसरावे आता बोला
विसरुनी पुन्हा आम्हीच जरी अपराधी
तरि क्षमा मागतो अहो महात्मा आधी " (– फाळणी)

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत, परंतु विस्तारभयास्तव अधिक देण्याचा मोह आवरतो. या काव्यसंग्रहासंबंधीचा प्रा. म. शं. वाबगावकरांचा अभिप्राय मोठा मार्मिक आहे. ते म्हणतात, " महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी विचारधारेच्या गांधीविषयक प्रतिक्रियांचे हे काव्य प्रातिनिधिक चित्र आहे; असे म्हटले असता त्यात अतिशयोक्ती होणार नाही." [१०१] या त्यांच्या मताशी बहुधा कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही.

हिंदुराष्ट्रवादी कीर्तनकार, कवी आणि शाहीर गोविंदस्वामी आफळे

(जन्म–१९१७)

पुण्याचे गोविंद रामचंद्र आफळे उराख्य गोविंदस्वामी आफळे हे महाराष्ट्रात आणि 'महाराष्ट्र मंडळा 'त एक श्रेष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. ' राष्ट्रीय कीर्तन केसरी ', ' राष्ट्रीय कीर्तन सम्राट ' या कीर्तनक्षेत्रातील मानाच्या पदव्या त्यांनी संपादन केलेल्या आहे. एम्. ए., एल् एल्. बी. या शैक्षणिक पदव्यांनी विभूषित असणारे गोविंदस्वामी सावरकरभक्त असून प्रखर हिंदु-राष्ट्रवादी आहेत. ते जसे कीर्तनकार आहेत तसेच कवी, शाहीर आणि उत्तम नट आहेत. अनेक मराठी चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या आहेत. परंतु कीर्तनाद्वारे हिंदुराष्ट्रवादाचा प्रचार करणे हेच त्यांचे जीवितकार्य आहे. या निष्ठेपायी आफळ्यांनी जीवनात अनेकदा अरिष्टांना आमंत्रण दिलेले आहे. परंतु तितक्याच धैर्याने तोंड देऊन ते अचल राहिलेले आहेत. १९३८ सालीच आफळ्यांनी स्वा. सावरकरांवर पोवाडा लिहून त्या वेळच्या पोवाडास्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला होता. गोविंदस्वामी उत्तम गायक आहेत. त्यांचा आवाजही एखाद्या गवयासारखा वजनदार आणि पहाडी आहे. आफळ्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की भारतीय स्वातंत्र्याकरिता बलिदान करणाऱ्या; लढा देणाऱ्या राष्ट्रभक्तांची आख्याने स्वतः आफळ्यांनी रचलेली असून त्यातील काव्यनिर्मितीही त्यांचीच आहे. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, झाशीची राणी लक्ष्मीबाई, मदनलाल धिंग्रा, स्वा.

सावरकर इत्यादी त्यांची आख्याने खूपच गाजलेली आहेत. या आख्यानांची संख्या शेकडचांनी भरेल इतकी आहे. आफळचांची एकूण कविता ही संख्येने चार हजारांवर जाईल. आफळचांच्या कीर्तनाचा लाभ बालगंधर्व, स्वा. सावरकर, काकासाहेब गाडगीळ, दादासाहेब पाटसकर, सेनापती बापट, नेताजी सुभाषचंद्र बोस या थोर देशभक्तांनी व कलावंतांनी घेतलेला आहे.

सावरकरगाथा– स्वा. सावरकरांच्या भव्योदात्त जीवनातील हृदयाला चटका लावणाऱ्या प्रसंगावरील काव्ये, ' सावरकर गाथा ' या पुस्तिकेत समाविष्ट आहेत. या गाथ्याला लिहिलेल्या प्रस्तावनेत आफळे म्हणतात, "स्वा. सावरकरांचे चरित्र म्हणजे स्वातंत्र्य उत्थानाची भगवद्गीता आहे. पराक्रम, त्याग, दुःख, उपहास, कौतुक, सन्मान, सत्कार, धाडस, साहस, तिरस्कार, आशा, निराशा अशा अनेक भावनांच्या परमोत्कर्ष बिंदूंची ती मालिका आहे. ते संजीवनी मंत्राचे अमृत आहे. त्याला योग्य असा सुवर्णकुंभ मजजवळ नाही म्हणून " मृत्तिकेचा कुंभ माझा । आत गंगा अमृताची " एवढेच सांगतो." या गाथेतील, ' सत्तावनचे क्रांतिवीर ', ' क्रांतिवीर फडके ', ' चाफेकर बंधू ' यांच्यावरील गीते, ' दीक्षा देतो रण यज्ञाची ' हे सावरकर सुभाष भेटीवर रचलेले गीत सावरकरांचा संदेश सांगणारे, ' लंका जाळूनि राम जानकी आण अयोध्यापुरी ' यासारखी गीते अप्रतिम वठली आहेत. स्वतः सावरकर, सुभाषचंद्राला स्वातंत्र्यासाठी सशस्त्र उठाव करण्यासंबंधी सांगतात. त्या प्रसंगावर सावरकरांच्या मुखी कवीने पुढील पंक्ती घातल्या आहेत.

" चाफेकर फासावर चढता मी उचलली ध्वजा
प्राणपणाने फडकत ठेविली जन्मठेप जरी सजा
अता तुझ्याविण सुभाषचंद्रा देऊ कुणाच्या करी ?"

२२ जून १९४० रोजी सावरकर सुभाष भेट झाली. सावरकर त्यावेळी विकलांग होते, आजारी होते. सुभाषबाबूंशी बोलताना आपल्या अंतःकरणातल्या वेदना व्यक्त करताना सांगतात,

" जटायूचे या पंख तोडिले नसते बंदित ।
खास उडालो असतो असल्या अमोल संधीत
साह्य जर्मनी ! मुसलोनी ! जपान सुग्रिवा परी "

अशी अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत पण विस्तारभयास्तव ती देता येत नाहीत.

हिंदु राष्ट्राचा पुरस्कार करणारी ' भारता सत्य कधि न लपले ', ' मना ! हिंदुंनी हिंदुंचा घात केला ', ' बुद्ध हवा की युद्ध हवे ' यासारखी त्यांनी अनेक गीते लिहिलेली असून त्यातून ' स्वातंत्र्याचा लढा ', ' सशस्त्र क्रांती ', ' सैनिकीकरण ' इत्यादी विषय आफळचांनी मांडलेले आहेत. रक्ताचा एक थेंबही न सांडला अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य संपादन केले असे सांगणाऱ्या गांधीवादी अनुयायांना उत्तर देण्यासाठी रचलेल्या " भारता ! सत्य कधी न लपले " या गीतात कवी आफळे म्हणतात,

" विसरून गेला का सत्तावन ? वासुदेव फडक्यांचे एडन ?
अंदमानच्या छिलक्या वरले ! रक्ताचे टिकले ?
लाल, वाल अन् पाल विसरला ? बाग विसरला जालियनवाला ?
भगतसिंग सुखदेव राजगुरू । फांसावर हसले ।
भारता । सत्य कधि न लपले ।"

"बुद्ध हवा की युद्ध हवे ?" या पं. नेहरूंच्या प्रश्नाला उत्तर देताना सावरकरवादी आफळ्यांनी रचलेल्या काही काव्यपंक्ती नमुन्यादाखल बघा. बुद्धधर्मीय, चीन, जपान युद्धाची एकही संधी सोडीत नाहीत.

" नव्या जगाला हवी शांतता । जो तो गर्जुन सांगे जगता,
परी सिद्ध तो युद्धाकरिता । हाती घेऊनि शस्त्र नवे ।
... युद्धासाठी सिद्ध असे जो । तोच बुद्ध हो जगी वाचतो
शांति अहिंसा टिकवावयाला । राष्ट्रसिद्ध युद्धार्थ हवे
घडवायाला जगत नवे । बुद्ध हवा की युद्ध हवे ?"[१०७]

याशिवाय, ' का स्वराज्य मिळते क्रांतिविना ?', 'जागल्या', ' पुसु नका भाळीचा टिळा ', 'तुफान '; ' गरिबांची गाथा ' अशा कितीतरी कविता सांगण्यासारख्या आहेत.

आफळ्यांनी स्वा. सावरकरांवर, १९४२ च्या साताऱ्याकडील पत्री सरकारवर, नेताजी सुभाष बाबूंवर, डॉ. केशवराव हेडगेवारांवर अतिशय ओजस्वी असे पोवाडे लिहिलेले असून त्यांचे सहस्रावधी वेळा गायन केलेले आहे. सेनापती बापटांवरील पोवाडा खुद् त्यांच्या उपस्थितीतच आफळ्यांनी गाऊन दाखविला आहे. हे सर्वच पोवाडे त्यांच्या जीवननिष्ठेशी सुसंगत असेच आहेत.

या पोवाड्यांशिवाय ' संसारतरंग ', ' भक्तिगीते ', ' ओवाळणी ' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. आफळ्यांनी आपल्या अनेक गीतांना लोकप्रिय चित्रपटगीतांच्या चाली दिल्याने ती गीते तोंडी बसतात व स्मरणात राहतात. सर्वच प्रकारच्या भावनांचा उत्तम परिपोष, कल्पनाप्राचुर्य, परिचित पौराणिक व ऐतिहासिक दृष्टांत आणि कर्णमधुर चाली यांनी आफळ्यांची राष्ट्रीय गाणी लोकप्रिय झाली आहेत. स्वत: आफळे भावपूर्ण पद्धतीने ती गात असल्याने प्रभावी ठरली आहेत.

हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे ध्येयवादी बलवंत वष्ट आणि नाना पालकर

सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे कवी राजा बढे आणि कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांचा अगदी थोडक्यात आपण परिचय करून घेतला आहे. कवी बढे आणि आफळे यांच्याप्रमाणे हिन्दुत्वनिष्ठ अनेक कवी महाराष्ट्रात आहेत पण त्यांची कविता नियतकालिकातून विखुरली आहे. अशी कविता ' शांतासुत ', ' यज्ञोपवीत ' यासारख्या टोपण नावानेही लिहिली गेलेली आहे. परंतु सावरकरी हिंदुराष्ट्रवादाचे प्रतिनिधी म्हणून राजा बढे आणि आफळे यांना स्थान देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्रात आणि संपूर्ण भारतात हिंदुराष्ट्रवादी कवींचा आणखी एक वर्ग अस्तित्वात असून डॉ. हेडगेवारांनी निर्माण केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचा पुरस्कार करणारा हा वर्ग आहे. बलवंत वष्ट आणि नाना पालकर हे दोन कवी या विचारसरणीचे प्रतिनिधी म्हणून स्वीकारले आहेत. संघाच्या कार्याचा विस्तार आणि प्रभाव सुशिक्षित पांढरपेशा वर्गात विशेष असल्याने कवींची संख्याही बरीच आहे. मात्र ती कविता आता अनामिक स्वरूपात ' स्फूर्तिगान ' भाग–१ [१०८] आणि ' स्फूर्तिगान ' भाग–२ [१०९] अशा रा. स्व. संघाद्वारा प्रकाशित अशा काव्य-संग्रहातून आलेली असून खरीखुरी राष्ट्रीय कविता आहे. बलवंत वष्टांची कविता त्यांच्या ' प्रेरणा ' या कवितासंग्रहातून आलेली असून नाना पालकरांची कविता ' पालकरांची कविता ' या नावाने प्रकाशनाच्या मार्गावर आहे. मात्र या दोन्ही कवींच्या राष्ट्रीय कविता १९५० पूर्वीच्या आहेत. पालकरांच्या काही कवितांना ' स्फूर्तिगान ' मध्ये स्थान मिळालेले आहे.

बलवंत वष्ट आणि नाना पालकर हे दोघेही संघकार्यकर्ते आहेत. संघाच्या ध्येयवाद स्वीकारणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांमध्ये या दोघांचाही समावेश होता. बलवंत वष्टांच्या ध्येयवादाची ग्वाही ' प्रेरणेचे ' प्रस्तावनाकार श्री. द. न. गोखले यांनी पुढील शब्दात दिलेली आहे. " ···ध्येयवादासाठीच त्यांनी मॅट्रिक परीक्षेच्या वेळी घरदार सोडले आणि राष्ट्रीय फकिरी पत्करली." [११०]

राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेम– राष्ट्रभक्ती हा कवी वष्ट यांच्या कवितेचा स्थायिभाव आहे. ' शारदावंदन ' या कवितेत आपली जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी त्यांनी मांडली आहे. ते म्हणतात,

" स्वातंत्र्यभक्ती मनी बाणलेली उफाळून आंदोलते अंतरी
स्फूर्ति प्रदायी तुझ्या प्रेरणेने धरी काव्यरूपास वागीश्वरी
··· ···ही काव्य मंदाकिनी रंजवीते जधी मातृभू–दास्य पोळी मना,
देई अनेकांचिया अंतरांना नवी स्फूर्ति, लाभे तया चेतना " (–शारदावंदन)

डॉ. अ. ना. देशपांडे यांचा प्रेरणेतील कवितांसंबंधीचा अभिप्रायही असाच आहे. ते म्हणतात, " बळवंत वष्ट यांची ' प्रेरणा ' ही मुख्यतः राष्ट्रभक्तीच्या भावनेने भारलेली असून ती प्रीतीपेक्षा कर्तव्याला अधिक प्राधान्य देणारी आहे." [१११] राष्ट्रभक्तीवरोवरच भारताचे अखंडत्व कायम ठेवण्याची प्रतिज्ञा कवीने अनेक कवितांतून बोलून दाखविली आहे. त्यांच्या ' प्रतिज्ञा ', ' रक्षाबंधन ', ' मी आईचा आर्तपणा ', ' सिंधु नि बिंदु ' या कविता राष्ट्रप्रेम आणि अखंडत्व सांगणाऱ्या आहेत. कवी म्हणतो,

" अखंडत्व रक्षावया भारताचे । नि न्याया तया वैभवाच्या शिरी
करी घेतले वाण आम्ही सतीचे । मरू वा यशा जिंकणे संगरी " (प्रतिज्ञा)

याच कवितेत " करू मातृभू–बंधमुक्ता वळाने । प्रतिज्ञा अशी घेतली ज्या क्षणी " असे कवीने आपले हृद्‌गत व्यक्त केले आहे. आपल्या प्रेयसीलाही कवी सांगतो, " आयुष्य हे अर्पियले मी राष्ट्रभू–पायावरी." हेच वष्टांचे स्वातंत्र्यप्रेम ' स्वातंत्र्याच्या युद्धासाठी ', ' दीक्षा ', ' ध्येयगान ' इत्यादी कवितांतून प्रकट झालेले आहे. १९४२ च्या पत्री सरकारचे पराक्रम सांगणारी वष्टांची ' सातारा जिल्हा ' ही कविता तेजस्वी नि ओजस्वी म्हणून खूप गौरविली गेली आहे. सातारा जिल्ह्यातील सुप्रसिद्ध प्रति–सरकारचा रोमांचित इतिहास या कवितेतून वष्टांनी कथन केलेला आहे.

" स्थापूच स्वराज्या एकच उठली घाई, दुमदुमली पुनरपि चाफळची वनराई ।
झोपडी झोपडी पुनश्च झाली जागी, प्रति राज्याची अन् फिरली विजयी द्वाही !"

शेवटी कवी सांगतो,

" बुडवून मराठी रक्ताच्या रंगात, जरिपटका फडके स्वतंत्र राज्यावरती "
(सातारा जिल्हा)

' प्रखर ध्येयवाद ' हे वष्ट यांच्या राष्ट्रीय कवितांचे वैशिष्ट्य आहे. ' प्रेरणा ', ' ध्येयसाधना ', ' ध्येयगान ', ' दीपस्तंभ ', ' प्रतिज्ञा ', ' नाही माते तत्क्षती ', ' हिंदुत्वाचे मंदिर ', ' आम्ही ' ही कवितांची नुसती शीर्षके वाचली तरी त्यातून कवीचा ध्येयवाद प्रकट होताना दिसतो. स्वातंत्र्याच्या युद्धासाठी आणि ' दीक्षा ' या कवितांसंबंधी द. न. गोखले म्हणतात, " अशी कविता करायला संघटनेत मुरलेला आणि विरलेला कवी हवा. श्री. वष्टांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनेत अनेक वर्षे जीव लावून काम केले म्हणूनच ते ही कविता रचू शकले." [११२]

क्रांती आणि मानवतावाद– वष्टांचा हिंदुराष्ट्रवाद हा आक्रमक साम्राज्यवादी असा हिंदुराष्ट्रवाद नाही. तो ' जगा आणि जगू द्या ! ' असे सांगणारा मानवतावादी हिंदुराष्ट्रवाद आहे. ' प्रतिज्ञा ', ' ध्येयगान ', ' मोक्ष साधने ', ' प्रलयापूर्वी ' यासारख्या कवितांतून क्रांतीच्या घोषणेबरोबरच तो व्यक्त झालेला आहे.

" जगतास्तव जळत जळत जन्म कंठणे
जळताना हसणे ही मोक्षसाधने " (– मोक्षसाधने)

असे कवीचे मनोगत आहे. म्हणूनच द. न. गोखले म्हणतात, " त्यांची प्रतिभा कधीकधी देशभक्तीच्या सीमा ओलांडून मानवाच्या क्षितिजापर्यंत भरारून येते."

' दीपस्तंभ ', 'दीक्षा', ' प्रणामांजलि ' यासारख्या कवितांतून राष्ट्रासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या क्रांतिकारकांचे आणि देशभक्तांचे विभूतिपूजन वष्टांनी केलेले आहे. छत्रपती शिवाजी, समर्थ रामदास, सावरकर बंधू, डॉ. हेडगेवार, सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक या राष्ट्रपुरुषांना प्राधान्य देण्यात आलेले असून त्यांच्या कार्याचा गौरवही कवीने केला आहे. ' जागती ज्योत ' आणि ' अज्ञात मानकरी ' या कविता वाचण्यासारख्या आहेत. वष्टांच्या ध्येयवादाला आशावादाची जोड मिळाल्याने तो अधिकच तेजस्वी झाला आहे. ' नाही माते तत्क्षिती ', ' ती ध्वजा ', ' प्रेषित ', ' दीक्षा ' या कवितांतून तो व्यक्त झाला आहे. " असंख्यात येती जरी संकटे ती, झुगारु तयांना धरु ना तमा " असे कवीचे मनोगत आहे. उत्कट प्रखर जीवननिष्ठा, रसरशीत जिवंत भावना, प्रत्ययकारी अनुभूती आणि प्रभावी अभिव्यक्ती यामुळे 'प्रेरणे 'तील कविता तेजस्वी व ओजस्वी झालेली आहे. नाना पालकरांची कविताही अशीच आहे, मात्र ती ' स्फूर्ति गानात ' मिसळली असल्याने तिचे वेगळे अस्तित्व आज तरी आढळत नाही.

आणखी काही कवी

ना. ग. जोश्यांनी ' जीवन योग ' (१९४२) आणि ' विश्वमानव ' (१९५०) ही दोन खंडकाव्ये लिहिलेली असून या दोन्ही काव्यांवर गांधीजींच्या राष्ट्रीय विचारांचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. पहिले 'जीवन योग' हे खंडकाव्य पाच प्रकरणांचे असून त्याचे स्वरूप प्रामुख्याने एका चिंतनशील विलापिकेचे आहे. 'मंत्रणा' नामक दुसऱ्या प्रकरणात काव्याचा नायक तरुण विजय 'शांता' या पत्नीच्या अनुमतीने गांधीजींनी सुरू केलेल्या मिठाच्या सत्याग्रहात सामील होतो आणि पकडल्या जाऊन त्याला तुरुंग वासाची शिक्षा होते. इकडे नायिका शांता त्याचे आवडते रचनात्मक कार्य परिश्रमपूर्वक करीत असते. त्या कार्याच्या परिश्रमामुळे व मानसिक ताणामुळे शेवटी तिचे निधन होते व त्यानंतर विजयची तुरुंगातून सुटका होते. तो विरहाच्या दुःखात प्रथम बुडून जातो आणि शेवटी मानवी जीवनासंबंधीचे चिंतन सादर करतो.

' विश्वमानव ' हे खंडकाव्य दहा प्रकरणांचे असून त्यातील शेवटच्या ' महायात्रा ' आणि ' निर्वाण ' या दोन प्रकरणांत अनुक्रमे ' टॉलस्टॉय ' व ' महात्मा गांधी ' या दोन महान विभूतींचे-त्यांच्या थोरवीचे आत्मनिष्ठ भूमिकेवरून कवीने पूजन करून त्यांना ' महामानव ' म्हणजे ' विश्व, मानव ' या पदवीने गौरविले आहे. या खंडकाव्यातून प्रामुख्याने मानवतावादाचे प्रतिपादन कवीने केलेले आहे.

वा. सी. मर्ढेकर आणि शरच्चंद्र मुक्तिबोध हे या कालखंडातील महत्त्वाचे नवकवी. मर्ढेकरांच्या कवितेत युद्धाने, यंत्रयुगाने, विफलतावादाने हताश झालेल्या मानवाचे दुबळे करुण 'बीभत्स' अतिवास्तव असे निराशाजनक चित्रण आहे. त्यातून मानवतावाद डोकावणारा असला तरी त्याचा राष्ट्रवादाशी फारसा संबंधच नाही. नाही म्हणायला कुठे परंपरेचा ओझरता उल्लेख आढळतो. शरच्चंद्र मुक्तिबोध यांची 'नवी मळवाट' किंवा 'यात्रिक' मधील कविता साम्यवादाच्या जीवननिष्ठेतून साकार झालेली असल्याने विश्वबंधुत्वाचा तीत पुरस्कार आहे. आर्थिक शोषणाविरुद्ध चीड, अन्याय, विषमता यांच्या विरोधात संताप आणि रक्तरंजित क्रांतीच्या मार्गाचा उघड पुरस्कार आणि मानवतावादाचा उद्घोष असे तिचे स्वरूप असल्याने ती मानवतावादी कविता आहे. राष्ट्रवादी कवितांनाही. परंपरा, सनातन जीवनमूल्ये, जुनी समाजव्यवस्था असावी यावर या कवीचा विश्वास नाही. वास्तविक प्रत्यक्ष व्यवहारात कोणत्याही साम्यवादी देशाने राष्ट्रवादाची कास सोडलेली नाही. परंतु गत्यात्मक भौतिक साम्यवादाने प्रभावित झालेले कवी राष्ट्रवादापासून अलिप्त राहिले आहेत.

राष्ट्रीय अभंगकर्ते श्री. कुलकर्णी आणि 'राष्ट्रीय गीतांची मेजवानी' देणारे श्री. त्र्यं. रा. अभंग यांचाही समावेश राष्ट्रीय कवींच्या दिंडीत केला पाहिजे. काव्यतीर्थ का. र. वैशंपायन यांनी १९४७ साली संपादित केलेल्या 'काव्यमय टिळक' हा काव्यसंग्रह व त्यातील कवींनाही राष्ट्रीय कवींत स्थान दिले पाहिजे. सौ. संजीवजी मराठे या आत्मलक्षी प्रतिभेच्या तांबे संप्रदायी कवयित्रीचे १९५० पर्यंत, 'काव्यसंजीवनी', 'राका', 'संसार' आणि 'छाया' असे चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. गायक कवयित्री म्हणून त्यांचा लौकिक आहे. बहुतेक स्त्री कवयित्रींनी राष्ट्रीय कवितेच्या क्षेत्राशी असहकार पुकारलेला आढळतो. 'सरलाबाला' आणि काही प्रमाणात 'संजीवनीबाई' त्याला अपवाद आहेत. '१५ ऑगस्ट १९४७', 'लाल निशाण', 'अशोक दिन' यासारख्या मोजक्या राष्ट्रीय कविता संजीवनीबाईंनी लिहिल्या असल्या तरी उत्कटतेच्या आणि जीवननिष्ठेच्या अभावी त्या निष्प्रभ ठरल्याचे टीकाकारांचे मत आहे.

कवी सुधांशू उपाख्य ह. न. जोशी यांच्या काही कवितांतून युगधर्माप्रमाणे क्रांतीची प्रेरणा आणि पददलितांविषयीची सहानुभूती व्यक्त झालेली आहे. सुधांशू राष्ट्रभक्तीपेक्षा दत्तोपासनेत अधिक रमले आहेत.

ग. दि. माडगूळकर (१९१९–१९७७)– 'गीत रामायण' कर्ते आधुनिक महाराष्ट्राचे मराठी 'वाल्मीकी' अशा विशेषणांनी गौरविले गेलेले ग. दि. माडगूळकर पन्नासपूर्वी एक गीतकार म्हणून पुढे आले. 'सुगंधी वीणा' (१९४९) आणि नंतरचा 'जोगिया' यामुळे त्यांना कवी म्हणून प्रतिष्ठा लाभली. पुढे पटकथालेखक आणि चित्रपट 'गीतकार' म्हणून त्यांनी कीर्ती संपादन केली. राष्ट्रीय महाकाव्य रामायणाच्या गीताने ते महाराष्ट्रातील आबालवृद्धांना परिचित झाले आणि लक्षावधींच्या मुखांतून त्यांच्या गीतांचे गायन होऊ लागले. सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक आणि गायक सुधीर फडके यांनाही गीत रामायणाचे आंशिक श्रेय देणे आवश्यक आहे. 'जोगिया'मध्ये १९४८ मध्ये लिहिलेली 'अमर गांधीजीस श्रद्धांजली' ही माडगूळकरांची कविता आली आहे. माडगूळकरांच्या राष्ट्रीय वृत्तीचा परिचय 'जोगियातील'च १९४२ च्या आंदोलनाचे चित्रण करणाऱ्या 'आसरा' या कथाकाव्यामुळे होतो. सातारच्याच्या प्रतिसरकारचा भूमिगत झालेला एक क्रांतीचा मोहरा एका रात्री पोलिसांना आढळला. बंदुकीला बायनेट लावलेले व त्याचा मुडदा पाडण्यासाठी टपलेले तीस जवान त्याचा पाठलाग करू लागले. विजेरीचे झोत टाकू लागले. त्या अंधारात एका झोपडीत त्याने आश्रय

घेतला. एक नववधू व म्हातारी एवढी दोनच माणसे त्या झोपडीत होती. झोपडीच्या दारावर लाथा मारून सैनिकांनी दार तोडले आणि म्हातारीला फरारी इसमास स्वाधीन करण्याची धमकी दिली. म्हातारीने देवाची शपथ घालून नकार दिला. एवढ्यात एका शिपायाने 'कोण दोन ते त्या खाटेवर ?' असा सवाल केला. वृद्धा म्हणाली, " दादा माझी लेक आणि जावई ! " पुन्हा चावटपणाने विजेरीचा झोत टाकून ते शिपाई निघून गेले. पाऊस कोसळत होता, गारा पडत होत्या आणि त्या अनोळखी वहिणीपाशी सुखरूप होता कुशीत भाई. दहशतवादी साम्राज्यशाहीचे सैतानी दूत बडबड करीत निघून गेल्यावर अंधारातच तो क्रांतिवीर खाटेवरून बाजूस झाला आणि त्या नवोढा वहिणीस म्हणाला, " पुन्हा मी तुझ्याच पोटी येईन आई ! " ती नवोढाही गहिवरली. तिच्या मुखातून शब्द फुटेना. डोळ्यांतून अश्रूंची गंगा वाहू लागली. कवी सांगतो, म्हातारीचे मनोगत,

" कूस फाडूनि तुझ्या सारख्या
रणमर्दाला द्यावी जागा ।"
..." सखोल डोळे गळूं लागले,
कुरवाळुनिया त्या दोघांना ।
अश्रूखाली पुनश्च भिजवी, वीराला ती वृद्ध अंगना ।
बेचाळिसच्या बलवंतांना, असा लाभला दिव्य आसरा
लोकशक्तिच्या सामर्थ्यावर, चिरंजीव हो मग सातारा ।"

या कथाकाव्यासंबंधी प्रा. म. शं. वाबगावकर म्हणतात, " बेचाळीसच्या आंदोलनाचे चित्रण करणाऱ्या एकूण कवितांमध्ये ग. दि. माडगूळकरांच्या जोगियामधले त्यांचे 'आसरा' हे कथाकाव्य सर्वोत्कृष्ट आहे... कवितेतील नाट्याची उदात्तता व उत्कटता सहज संवेद्य आहे."[११३]

राष्ट्रीय शाहीर माडगूळकर– कवी, गीतकार, लावणीकार म्हणून मराठी रसिकांना माडगूळकरांचा परिचय आहे पण माडगूळकरांचे एक वैशिष्ट्य असे की ते राष्ट्रशाहीर आहेत. 'धर्मवीर संभाजी', 'समर्थांचे सामर्थ्य', 'लोकमान्य टिळक', 'झाशीची राणी,' हुतात्म्यांना वंदन', '४२ च्या चले जाव चळवळीवरील पोवाडा', 'अण्णासाहेब खाजगीवाले' इत्यादी त्यांचे पोवाडे ओजस्वी आणि स्फूर्तिदायक आहेत. 'हुतात्म्यांना वंदन' या सुप्रसिद्ध पोवाड्यात भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या हुतात्म्यांना लक्षवार नमन केलेले आहे. लोकमान्यांच्या वरील पोवाड्यात त्यांचे विभूतिमत्त्व सांगताना शाहीर म्हणतो, " जगद्वंद्य महापुरुषांत । श्रेष्ठ निश्चित । टिळक बळवंत टिळक बळवंत । तयांचे पुण्यस्मरण होता । मनी साकार होइ गीता । लोचने मिटून झुके माथा' जी जी ।" ४२ च्या चले जाव चळवळीवरील पोवाड्यात शाहीर म्हणतो, " एक पाय तुमच्या गावात, दुसरा तुरुंगात, किंवा स्वर्गात । तमा नाही त्याची शाहिराला, गुलामी उभी जाळण्याला वाणीचा हिलाल पेटविला." ते पुढे म्हणतात, " नका घेऊ नुसते ऐकून, बोला कोण कोण घरटं सोडून, गरुड होऊन उंच उडणार, देशापायि स्वर्गलोकि जाणार, धरणिवर अमृतास आणणार ।" स्वातंत्र्याच्या चळवळीला विरोध करणाऱ्यांना शाहीर बजावून सांगतो, " पूर्वजांचा पराक्रम स्मरा, बलिदान करा, प्राण अंथरा, आम्ही स्वातंत्र्य खास आणणार, त्याला प्रतिबंध जे जे करणार, दिवा नाही त्यांच्या वंशी राहणार । जी जी ।"

' हुतात्म्यांना वंदन ' या पोवाड्याची सुरुवात माडगूळकरांनी " माय माउली भारतमाते, घे पहिला मुजरा । स्वातंत्र्याचा उमदा शाहीर आला दरबारा । घडण कराया स्वातंत्र्याची स्वर्गी जे

गेले, वीर हुतात्मे दरबारी तव मानाने बसले " पुढे हुतात्मा फडके, चाफेकर, कान्हेरे, मदनलाल धिंग्रा, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव बटुकेश्वरदत्त, चंद्रशेखर, उधमसिंग, सोलापूरचे हुतात्मे इत्यादींना आदराने वंदन करून त्यांच्या त्यांच्या कार्याचे वर्णन केलेले आहे. उदाहरणार्थ, हा नमुना बघा !

" सशस्त्र क्रांती ध्वजा जयाची त्रिखंडात फडके
स्वतंत्रते, तव बाळ लाडके वीरमणी फडके "

एकंदरीत माडगूळकरांचे पोवाडे विविधतापूर्ण, ओजस्वी आणि प्रासादिक गुणांनी संपन्न आहेत. त्यांनी ' समरगीते ' व ' राष्ट्रीय गीते 'ही लिहिली आहेत पण ती १९५० नंतरच्या कालखंडात येत असल्याने त्यांचा इथे विचार केलेला नाही.

या कवींशिवाय वसंत बेंद्र, कवी शिरीष, द. चिं. सोमण, व्यंकटेश वकील, शं. गो. साठे, स. रा. माहुलकर, ना. गो. हूड, वि. भि. कोलते, ना. मा. सरपटवार, वि. ल. बर्वे, पु. मं. लाड, सूर्यकांत खांडेकर, प्रफुल्लदत्त अशा कितीतरी कवींनी अल्प प्रमाणात का होईना राष्ट्रीय कवितांची निर्मिती केलेली आहे. ज्यांचे काव्यसंग्रह उपलब्ध नाहीत आणि केवळ नियतकालिकांतूनच ज्यांनी आपल्या कविता प्रसिद्ध केल्या असे कवी अनेक आहेत. उदाहरणार्थ, गांधीजींच्या मृत्यूवर अनेकांनी कविता लिहिल्या आहेत आणि त्या वीर विभूति पूजनाचे उत्तम नमुने आहेत. वि. म. कुलकर्णी यांची 'महात्मा निघून गेला' (पहाटवारा), राम पिंगळीकरांची " हा तर या दशकाचा मान " (साद)- सूर्यकांत खांडेकरांची ' आज युगाचा अंत जाहला ', य. खं. कुलकर्णी यांची ' महात्मा ' व 'युगकर्ता', राजा महाजनांची ' तू म्हटले जेव्हा राम ', सोपानदेव चौधरींची ' ती संध्याकाळ ' ही उदाहरणे सहज देता येण्यासारखी आहेत. याशिवाय खारकर, श्रीनिवास कार्लेकर, मंगेश पदकी आणि प्रफुल्ल दत्त या कवींनी गांधीजींना आपआपल्या हृदय संवेदनानुरूप काव्यमय श्रद्धांजली वाहिलेली आहे त्यातील बऱ्याच कविता चिरस्मरणीय ठरल्या आहेत.[११४]

शाहीर अमर शेख (१९१६–१९६९)– शाहीर अमरशेख हे कवी आणि शाहीर या दोन्ही नावांनी महाराष्ट्राला परिचित आहेत पण त्याहीपेक्षा आपल्या पहाडी, पल्लेदार आणि बुलंद आवाजाने स्वतःची कवने गाणारे गायक शाहीर म्हणून अमर शेखांचा विशेष लौकिक होता. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी या गावी दरिद्री, संस्कारशून्य मुसलमान कुटुंबात मेहबूब उपाख्य अमरशेख १९१६ साली जन्माला आला. जेमतेम मराठी सातवीपर्यंत शिकलेला नि माळरानावरील झाडाझुडपांप्रमाणे वाढलेला मेहबूब मोटारवर क्लिनर बनला. राष्ट्रीय आंदोलनात भाग घेतल्याने त्याची नोकरी गेली. स्टुडिओत चाकर, कंडक्टर व गिरणी कामगार असे जीवन जगत असताना कामरेड रघुनाथ कऱ्हाडकरांकडून मेहबूबने साम्यवादाची दीक्षा घेतली आणि १९३८ पासून अमरशेख कम्युनिस्ट पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते झाले. अमरशेखांनी स्वतःचे कलापथक निर्माण केले आणि कम्युनिस्ट पक्षाचे कवी, गायक, लेखक या नात्याने फार महत्त्वाची कामगिरी बजावली. मध्यंतरी काही काळ त्यांचे पक्षाशी मतभेद झाले पण फिरून ते पक्षात गेले.

जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी– अमरशेखांची जीवननिष्ठा पूर्णपणे साम्यवादी होती. त्यामुळेच त्यांचे व्यक्तित्व व त्यांची साहित्यविषयक मतेही साम्यवादी जीवननिष्ठेशी सुसंगत अशीच होती. ' अमर गीत ' या पहिल्या काव्यसंग्रहातील मनोगत सांगताना ते म्हणतात, " कलेतून जीवनाचं प्रचंड स्वरूप व्यक्त करून कलेद्वारे जीवनाचं, जीवन कलहाचं विश्वदर्शन घडवून कलेची मूल्येही शंभर टक्के जिथल्या तिथे ठेवून, तिचं मंगल स्वरूप तसेच तेजाळ ठेवून तिला जनतेसाठी राबविलं पाहिजे."[११५]

' कलश ' मध्ये रसिकांना निवेदन करताना अमरशेख म्हणतात... "मी जन्मानं केवळ मुसलमान आहे म्हणून, तर काहींना माझी साम्यवादी पिंड प्रकृती डाचते आहे."[११६] ' धरती माता ' या काव्य-संग्रहाच्या प्रस्तावनेत काव्यदृष्टी सांगताना, " कवी काय किंवा शाहीर काय, तो स्वकालीन युगप्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्माचा तो गतिशील वाहक असतो... आजचा युगधर्म आहे समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचे वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे."[११७]

एका विरोधाभासाचे निराकरण– शंभर टक्के साम्यवादी जीवननिष्ठा असणाऱ्या अमरशेखांचा राष्ट्रशाहीर म्हणून गौरव करणे म्हणजे वदतो व्याघात ठरण्याची शक्यता आहे. कारण मुक्तिबोधांना राष्ट्रकवी म्हणता येणार नाही. त्याच अर्थाने अमरशेखांनाही ती पदवी नाकारता येते. पण साम्य-वादाच्या प्रभावाखाली आलेले पोवळे, करंदीकर, पाडगावकर ज्या अर्थाने राष्ट्रकवी म्हणून गौरविले जातात त्याच अर्थाने अमरशेख शाहीर ठरतात. कारण अमरशेख हे साम्यवादी असले तरी राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम, मराठी परंपरेचा अभिमान त्यांच्या कवितांतून, कवनातून ओसंडून वाहताना दिसतो हाच त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा मोठा पुरावा आहे. ' जन्मभूमी ', ' रात्र आहे वैऱ्याची ', ' बर्फ पेटला ' यासारख्या कविता त्यांच्या राष्ट्रप्रेमाची निष्ठा व्यक्त करणाऱ्या आहेत. महाराष्ट्र जन्मभूमीवरील प्रेम व्यक्त करताना ते म्हणतात,

" जन्म धरति वरती धन्य आम्ही ते
पुजूं पुज्य मायभू ही गाउनि गीते "

या जन्मभूमीच्या काळ्या मातीवर जर कुणी दुसऱ्याने हक्क सांगितला तर शाहीर म्हणतो,

" शत्रू ठरुनी मोल जिवाचे तयास द्यावे लागेल " (–रात्र आहे वैऱ्याची)

भारतावर कम्युनिस्ट चीनचे आक्रमण होताच शाहीर राष्ट्रीय भूमिका घेऊन पुढे आला.

" पक्ष पंथ धर्म भेद सारुनि । गिळिली भूमि मुक्त करोनी,
गान शांतीचे घुमवू गगनी ।
न्यायी भारत नाही आक्रमक दावू या जगताला ।" (बर्फ पेटला)

अमरशेखांना मराठी परंपरेचा जाज्वल्य अभिमान होता. ' आदेश ', ' जय महाराष्ट्र ' केशवसुताप्रति ' या कविता त्यांच्या परंपरेचा अभिमान प्रगट करणाऱ्या आहेत. ' आदेश 'मध्ये शाहीर शिवाजी महाराजांना म्हणतो,

" जगा पटू दे शिव वंशाला ठाउक ना माघार
निर्मुनि नव महाराष्ट्र स्वप्न तव करू दे साकार " (– आदेश)

' जय महाराष्ट्र ' मध्ये शाहीर सह्याद्रीला उद्देशून म्हणतो,

" या पर्वत राजी कसल्या । कर्वतीच तापविलेल्या
महाराष्ट्र भोवती पसरल्या । अरिसेना ज्यांनी चिरल्या "

आपली कविपरंपरा सांगताना शाहीर म्हणतो,

" रे ताता कृष्ण केशवा ।
बंडाचा या झेंडा ज्ञानेशाने रोवियला ।
अभंगवाणी तुकयाने तो तेजे झळकविला "

'पारव्यास', 'कोकिळेस', 'ओढ', 'मी शोधीत आहे', 'जागी झाली मानवता', 'अंगाराचे हृद्गान' या कवितांतून अमरशेखांचे स्वातंत्र्यप्रेम व क्रांतीचा पुरस्कार प्रकट झालेला आहे.

शाहीर अमरशेखांचे राष्ट्रीय पोवाडे– स्फुट कवितेबरोबरच शाहीर अमरशेखांनी राष्ट्रीय पोवाडे लिहिलेले असून त्यांच्या अलौकिक गायनामुळे ते खूपच लोकप्रिय झालेले आहेत. 'शिवछत्रपती', 'यशवंतराव होळकर', 'महाराष्ट्र झेंडा' आणि 'जालियनवाला बागेतील अत्याचारी युरोपियन अधिकारी ओडवायरचा वध करून फासावर जाणारा 'हुतात्मा सरदार उधमसिंग' या विषयांवर अमरशेखांचे पोवाडे आहेत. 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा' आणि 'गोवामुक्ती संग्राम' या विषयावर पोवाडे व कवने अमरशेखांनी लिहिलेली असून त्यात वर्तमानकाळाचे प्रतिबिंब पडलेले आहे.

मानवतावादाचा प्रचार करण्यासाठी, विषमतेविरुद्ध बंड पुकारण्यासाठी व शोषणविरहित समाजनिर्मितीसाठी अनेक गीते, कवने अमरशेखांनी केलेली असून ती अतिशय प्रभावी आहेत. संघर्षमय जीवन हे या शाहिराच्या काव्याचे प्रेरणास्थान आहे. "जीवन हे संग्राम मानुनी। लढण्यासाठी ये मैदानी" असे म्हणत तो जीवनाला सामोरा गेला आहे.

काव्यस्वरूप– अमरशेखांच्या काव्याचे अभ्यासक आचार्य माधव पोतदार म्हणतात, "अमरशेखांच्या राष्ट्रीय कवितेत पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत त्वेष जसा आहे तशीच मातृभूमीवरची उत्कट भक्तीही आहे."[११८] सोव्हिएट क्रांतीचा उद्गाता मायकोव्हस्कीचे उदाहरण देऊन आचार्य अत्रे म्हणतात, "तोफेच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या लाल रसरशीत गोळ्यांसारखे त्यांचे जळजळीत शब्द एकामागून एक बाहेर पडत असतात. मग ते गाणे मातृभूमीच्या अभिमानाचे असो नाहीतर साम्राज्यवाद्यांना दिलेल्या आव्हानाचे असो."

अमरशेखांच्या काव्यगायनासंबंधी आचार्य अत्रे म्हणतात, "एखादा लढवय्या तळहातावर शीर घेऊन जसा लढतो तसे अमरशेख आपले काव्य गातात."[११९] श्री. सुमन्त म्हणतात, "याचे गाणे जल्लोपाचे झाले, जोषाचे झाले, काव्य आणि कंठ एकाच व्यक्तीला लाभला म्हणून जळजळत्या रोषाचे झाले. आग आणि तेल तसे झाले. नवल नाही लोक आषक झाले."[१२०] प्रा. म. वि. राजाध्यक्ष म्हणतात, "अमरशेखांच्या कवितेची जात अलीकडच्या बहुतेक कवितेहून फार निराळी आहे. वाणी हे तिचे खरे वाहन आहे, मुद्रण नव्हे."[१२१] हे सर्व विद्वान टीकाकारांचे अभिप्राय लक्षात घेतले म्हणजे अमरशेखांच्या कवितेचे वेगळे मूल्यमापन करण्याची आवश्यकता नाही. या कालखंडातील शाहिरी परंपरेचा तो प्रमुख प्रतिनिधी आणि राष्ट्रीय लोककवी आहे यावद्दल दुमत होऊ नये.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे (१९२०–१९६९)– अक्षरओळख होण्याइतपत शाळेशी नाते असणारा, सातारा जिल्ह्यातील वारणा खोऱ्यात जन्मलेला, पददलित समाजातील लोकशाहीर म्हणजे अण्णाभाऊ साठे. हमाल, हेलकरी, झाडूवाला, घरगडी आणि गिरणी कामगार इत्यादी हलकीसलकी कामे करीत, अनुभवसंपन्न झालेला हा शाहीर पुढे कथाकार, कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून साहित्यिकांच्या जगात ओळखल्या जाऊ लागला. कामगार–चळवळीत शिरलेल्या या शाहिराने मार्क्स; गॉर्की हे मराठीतून वाचून काढले, पचवले आणि साम्यवाद ही जीवननिष्ठा कायम केली. स्वा. सावरकरांच्या सहवासात कवी गोविंद जसे स्वातंत्र्यशाहीर झाले तसेच भाई डांगे, भाई रणदिवे यांच्या सहवासात अण्णाभाऊ खरेखुरे लोकशाहीर झाले, कामगार नेते बनले, कम्युनिस्ट पक्षाचे

कार्यकर्ते बनले. परंतु शाहीर अमरशेखांप्रमाणेच अण्णाभाऊ साठ्यांना मराठी परंपरेचा अभिमान आहे. राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेमही अण्णाभाऊंच्या शाहिरी कवनांतून अनेक ठिकाणी प्रकट झालेले आढळते आणि म्हणूनच त्यांचा राष्ट्रीय शाहिरांच्या मांदिआळीत समावेश केलेला आहे.

'महाराष्ट्राची परंपरा', 'स्टॉलिनग्राडचा पोवाडा', 'अमळनेरचे हुतात्मे', 'बर्लिनचा पोवाडा', 'मुंबईचा गिरणी कामगार', 'पंजाब दिल्लीचा दंगा', 'बंगालची हाक', 'गोव्याचा पोवाडा', 'तेलंगणाचा संग्राम' हे त्यांचे पोवाडे प्रसिद्ध आहेत. या पोवाडयांतील निम्मे पोवाडे राष्ट्रीय या सदरात समाविष्ट करता येण्यासारखे आहेत. अण्णाभाऊ साठ्यांच्या अंतःकरणातील राष्ट्रीय भावना निरनिराळ्या पोवाडयांतून, वगातून व्यक्त झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, लोकनाटयातील गण म्हणताना त्यांचे नमन पुढीलप्रमाणे आहे.

"प्रथम मायभूच्या चरणा। छत्रपती शिवबा चरणा,
स्मरोनी गातो कवना। "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क" करुनिया गर्जना।
देश उठविला जागा केला त्या लोकमान्यांना।
कठीण काळी राष्ट्र नौकांना। मार्ग दाखविला त्यांना।" १२२

'महाराष्ट्राची परंपरा' या पोवाडयातूनही अण्णाभाऊंनी मराठी परंपरेचा, पूर्ववैभवाचा, पराक्रमाचा आणि मराठी बाण्याचा परिचय दिलेला असून त्यातून त्यांची अस्मिता प्रकट झालेली आहे.

अण्णाभाऊंच्या राष्ट्रीयत्वाचा ठसठशीत पुरावा म्हणजे पंजाब, दिल्लीच्या दंग्यावरील सुप्रसिद्ध पोवाडा. नेताजी सुभाषबाबूंनी आझाद हिंद सेनेच्या साहाय्याने ब्रिटिशांच्या सेनेवर म्हणजे पर्यायाने साम्राज्यवादी सत्तेवर जबर आघात केले. त्यामुळे इंग्रजांच्या पायाखालील माती कशी भुसभुशीत झाली या घटनेचा उल्लेख करून शाहीर सांगतात,

"गोऱ्यांनी वेळ ओळखली। जाण्याची तयारी झाली
कारवाई कुटिल पर केली। देशाची केली फाळणी डागणी दिली
यादवीचा सुरंग लावला देशाच्या खाली."

या शाहिराला देशाच्या फाळणीचं दुःख आहे. फाळणीमुळे उसळलेल्या जातीय दंगली, मुसलमानांनी केलेले भीषण अमानुष अत्याचार त्यांचेही वर्णन केलेले आहे. शाहीर म्हणतो,

"शिसारी घारी गिधाडांना। आली कावळ्यांना। मढी चघळून।
माणुसकी पळाली पार। होउनी बेजार। पंजाबातून
सूडाची नशा चढून। लोक पशूहून। बनले हैवान
रक्ताचा लावूनि टिळा। मुंडक्यांची माळा। गळा घालून।
मातेच्या पदराखालून। बाळ हिरावून। मारती जबरीनं।"

१९४३–४४ मध्ये बंगाल प्रांतात भयंकर दुष्काळ पडला. सुमारे पस्तीस लाख लोक अन्न–अन्न करून तडफडून मेले त्या घटनेचे वर्णन अण्णाभाऊंनी 'बंगालची हाक' या पोवाडयात केलेले असून त्यातून साम्राज्यवादी शक्तीचे जुलुमी स्वरूप स्पष्ट केलेले आहे. 'गोव्याचा पोवाडा' ही, पोर्तुगिजांच्या सालाझारशाहीच्या विरोधात गोवामुक्तीचे आंदोलन करणाऱ्या वीरांचे अभिवादन करण्यासाठीच लिहिलेला आहे. शाहीर साठ्यांचे राष्ट्रीयत्व या अशा पोवाडयांतून सिद्ध झालेले आहे. साठे साम्यवादी असले तरी साम्यवादीही राष्ट्रवादी असतात हे दुसऱ्या जागतिक युद्धाने त्यांनी ओळखले असावे. रशियन सैनिक आपल्या देशासाठीच लढत होते ही गोष्ट जगजाहीर आहे.

श्री. मनोहर देशपांडे यांनी 'सुमनबंधू' या टोपण नावाने पोवाडे व राष्ट्रीय गीते लिहिली आहेत. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे देशपांडे यांचा १९२२ साली जन्म झाला. देशपांडे हे नागपूर आणि सागर विद्यापीठाचे पदवीधर असून त्यांनी विविध प्रकारचे गद्यलेखनही विविध नियतकालिकांतून केले आहे. १९५७ ते १९६४ या कालखंडात 'रोहिणी' मासिकात 'शाहिरी कथा' व शाहिरांची चरित्रे या विषयावर लेखमाला लिहिली. आपल्या शाहिरी प्रेरणेचे श्रेय ते लोणीचे सत्पुरुष सद्गुरु सखाराम महाराज यांना देतात. श्री. सुमनबंधूंचे 'सज्ज जाहला सह्यगिरी', 'पंडित जवाहरलाल नेहरू' आणि 'महाराष्ट्र गौरवगीत' हे पोवाडे प्रसिद्ध आहेत.

शाहीर कृष्णराव सावळे यांनीही राष्ट्रीय पोवाड्यांची रचना करून लोकजागृती व रंजनातून लोकशिक्षण दिलेले आहे. शाहीर सावळेही सातारा जिल्ह्यातील असून त्यांचा जन्म १९२३ साली पसरणी या गावी झाला. योगायोगाने सावळ्यांना देशभक्त साने गुरुजींचा सहवास लाभला आणि त्यामुळेच त्यांच्या ठिकाणी राष्ट्रभक्ती जागृत होऊन त्यांच्याकडून राष्ट्रीय पोवाड्यांची निर्मिती झाली. शाहीर सावळ्यांनी स्वतःचे कलापथक निर्माण केले आणि आपल्या लोकनाट्याचे शेकड्यांनी प्रयोग केले. 'नारदाचा रिपोर्ट', 'चित्रगुप्ताच्या दरबारात', 'बापाचा बाप', 'ग्यानबाची मेख' इत्यादी त्यांची लोकनाट्ये खूप गाजलीत. 'ग्यानबाची मेख' मधील पोवाडा, 'जातीयवाद की समाजवाद ?' या विषयावरील पोवाडा', 'आधुनिक मानवाची कहाणी' इत्यादी पोवाडे प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पोवाड्यांनी सामान्यांच्या जीवनातील प्रश्न घेऊन लोकनाट्य व पोवाडे रचले आहेत.

शाहीर साबळ्यांप्रमाणेच शाहीर आत्माराम पाटलांचाही लौकिक आहे. आधुनिक शाहीरांच्या गोतावळ्यात या व्युत्पन्न शाहिराला शाहीरमहर्षी असे गौरवपूर्ण अभिधान आहे. ठाणे जिल्ह्यात १९२४ मध्ये आत्माराम पाटलांचा जन्म झाला. मुंबईला भांड्यांच्या कारखान्यात मेकॅनिक म्हणून ते लागले पण त्यांनी पुढे स्वतंत्र असा भाजीपाल्याचा व्यवसाय स्वीकारला. 'महाराष्ट्र भारती शाहीर' या नावाचे त्यांचे कलापथक आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांचे "संयुक्त महाराष्ट्र उगवतोय माझ्या सरकारा। खुशाल कोंबडं झाकून धरा।"[१२३] हे गीत खूप गाजले. 'शिवदर्शन', 'आईचे मंगळसूत्र', 'सिंह जागा झाला', 'लडाख नेफा धारातीर्थ' इत्यादी पोवाडे गाजलेले आहेत. 'सत्याग्रही मराठी' या त्यांच्या संग्रहात पोवाडा, सांघिक गीते, गोंधळ यांचा समावेश आहे शाहीर हिंगेही या कालखंडातील एक शाहीर आहेत. अनेक ऐतिहासिक व आधुनिक पुरुषांवर हिंग्यांनी पोवाडे लिहून राष्ट्रसेवा केली आहे.

आणखी काही शाहीर मंडळी

या आधुनिक शाहीरांशिवाय अनेक शाहिरांनी राष्ट्रीय पोवाडे लिहून राष्ट्रीय कवितेचे दालन संपन्न व समृद्ध केलेले आहे. अशा शाहिरांत, वि. ना. नेने, टी. व्ही. पाटील, शंकर बाखकर, भास्कर बेलवलकर, हरिभाऊ भंडारे, बी. बी. भोईटे, रा. न. माळी, ना. रा. मोरे, रमाकांत, शि. अ. लुकतुके, वाय. एन. शिंदे, डी. एल. शिखळकर, नो. रा. संगोराम, श्री. य. सोनाळकर, ना. अ. सोहनी, पु. वा. गोवईकर, निर्वासित, द. म. बाळ, व. गो. रणदिवे, ह. ह. रेणापूरकर, ज. ज. वालावलकर, बा. रा. जोशी ही नावे उल्लेखनीय आहेत.[१२४] आणखीही शाहिरांच्या नावांची ही संख्या वाढविता येण्यासारखी आहे पण नुसत्या नोंदीने कुणाचेच फारसे समाधान होणार नाही आणि प्रबंधाच्या मर्यादेत सर्वांचे मूल्यमापन करणे अशक्यच आहे.

उपसंहार

मानवतावादी, समाजवादी, साम्यवादी, व्यक्तिवादी इत्यादी जीवनदर्शने मानवीकल्याणाचे कार्य जगात करीत असली तरी त्या सर्वांची व्यावहारिक आधारशिला राष्ट्रवाद आहे हे विसरता येत नाही. जगातील सर्व राष्ट्रांच्या व्यवस्थेचा एकमेव आणि भक्कम आधार राष्ट्रवाद आहे हे सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट आहे. खुरपले तरी पुन्हा पुन्हा चिवटपणाने उगवणाऱ्या वाढणाऱ्या आणि आसमंतात पसरणाऱ्या हराळी या गवतासारखे राष्ट्रभावनेचे स्वरूप आहे. कधी ते गवत जसे सुप्त असते कधी प्रकट दिसते मात्र त्याचे अस्तित्व कायमच राहते तसेच या भावनेचे आहे. मानवतावादाच्या गौरीशंकर शिखराकडे जाणाऱ्या वाटसरूला प्रथम राष्ट्रवादाच्या रुळलेल्या विस्तृत मार्गावरुन गेल्याशिवाय तरणोपाय नाही. 'राष्ट्रवाद' हे सर्वांगीण जीवनदर्शन आहे काय ? यासंबंधी अभ्यासकात मतभेद असू शकतात. देश, काल, परिस्थितीपरत्वे राष्ट्रवादाचा प्रभाव आणि स्वरूपातही अंतर असणे स्वाभाविक आहे. पण लोकशाहीप्रमाणेच राष्ट्रवाद ही एक गतिमान कल्पना असून तिच्या अद्भुत सामर्थ्याचा प्रत्यय वारंवार जगाला आलेला आहे. अखिल मानवजातीचे डोळे दिपविणारी अशी महान पराक्रमाची, आत्यंतिक शौर्याची, अचाट साहसाची, विस्मयजनक धाडसाची, अजोड औदार्याची, अपूर्व त्यागाची आणि अवर्णनीय बलिदानाची कृत्ये याच भावनेने प्रेरित होऊन राष्ट्रभक्तांनी केलेली आहेत. गेल्या अडीचशे तीनशे वर्षांत अनेक राष्ट्रांनी भौतिक, विज्ञानाच्या औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी विविध क्षेत्रात जो प्रचंड विकास केला आहे तो या राष्ट्रभक्तीच्या भावनेचे दृश्यफळ आहे असे म्हणता येते. आजच्या व्यवहारी जगात सुप्रतिष्ठित झालेली आणि मानवाला क्रियाशील करून त्याच्या मनाचे उदात्तीकरण करणारी राष्ट्रवाद ही एक चिरंतन अशी जीवनधारा आहे.

' राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता इ. स. १८५० ते इ. स. १९५० एक चिकित्सक अभ्यास ' हा नागपूर विद्यापीठाला सादर केलेल्या शोध प्रबंधाचा विषय. मूळात विषयाची व्याप्ती मोठी असल्याने प्रबंधाचा विस्तार वाढलेला आहे. या प्रबंधाचा पूर्वार्ध राष्ट्रवादाच्या सर्वांगीण चर्चेने व चिकित्सेने संपन्न असून त्यासाठी ग्रंथाची एकशे अठ्ठावन्न पृष्ठे खर्ची पडली आहेत. त्यानंतरच्या उत्तरार्धात शंभर वर्षांच्या विस्तृत कालखंडात आधुनिक मराठी कवितेत कोणत्या राष्ट्रवादाचा, कसा, कुठे, किती प्रमाणात आविष्कार झाला याचा यथामती शक्यतो तटस्थ दृष्टीने पण चिकित्सक पद्धतीने शोध घेण्याचा मी नम्र प्रयत्न केला आहे. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कविता संख्या, स्वरूप आणि आकार या त्रिविध स्वरूपात पाहिली म्हणजे शाखोपशाखांनी संपन्न अशा विशाल वटवृक्षासारखी तिची वाढ झालेली आढळते. या कवितेच्या विविधतेची आणि विस्ताराची वाचकांना कल्पना यावी,

तिच्या व्याप्तीचे आणि मर्यादांचे त्यांना अवलोकन करता यावे यासाठी एका प्रारूपाद्वारे तिचा आलेख खाली मांडलेला आहे.



इ. स. १८५० पासून राष्ट्रीय कवितेच्या शोधाला आरंभ करण्याचे प्रमुख कारण असे की राष्ट्रत्वाची अस्फुट जाणीव तेव्हाच्या महाराष्ट्रीय नेत्यांच्या व विचारवंतांच्या लेखनात मला आढळली. एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनामध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव हा सर्वात महत्त्वाचा घटक होता आणि १९४७ साली स्वातंत्र्य मिळेतो ही जाणीव विशेषत्वाने प्रभावी राहिली आहे. इ. स. १८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या कालखंडात देशातील स्वातंत्र्याच्या राजकीय चळवळीला जसे जसे व्यापक रूप येत गेले तसतशी राष्ट्रीय जाणीव अधिकाधिक प्रखर आणि आविष्काराच्या रूपाने अधिकाधिक मुखर होत गेली. सर्वसामान्य माणसांपेक्षा मुळातच कवीचे अंतःकरण अधिक संवेदनशील असल्याने त्यांच्या प्रभावी वाणीतून तिचा उत्कट आविष्कार व्हावा हेही स्वाभाविकच आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत ज्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता आणि ज्यांच्या ठिकाणी अभिव्यक्तीचे सामर्थ्य होते त्यांनी राष्ट्रीय कविता लिहिली. पण ज्यांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता अशाही कवींनी राष्ट्रीय कविता लिहिली असल्याचे आढळते. या राष्ट्रीय कवितेत लोककवींनी आणि शाहिरांनीही आपल्या कवनांनी भर घातली. या सर्वांच्या राष्ट्रीय कवितेचा परामर्श घ्यावयाचा, त्यांच्या काव्यातील राष्ट्रीय छटांचे

दिग्दर्शन करावयाचे, त्यांच्यासंबंधी निरनिराळ्या समीक्षकांनी आणि टीकाकारांनी जी भिन्नभिन्न मते व्यक्त केली त्यांची तटस्थ भूमिकेतून, समतोल दृष्टीने चिकित्सा करावयाची आणि शेवटी त्यासंबंधीचा आपला अभिप्राय नोंदवायचा असा अभिक्रम असल्यानेही शोधप्रबंधाचा विस्तार वाढलेला आहे. त्यामुळे राष्ट्रीय कवींना योग्य न्याय देणे शक्य झाले आहे.

आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा सर्वांगीण वेध घेताना त्यासाठी जो शंभर वर्षांचा कालखंड निश्चित केला होता त्या कालखंडाचे इ. स. १८५० ते १८७४, इ. स. १८७४ ते १९०५, इ. स. १९०५ ते १९२२, इ. स. १९२२ ते १९३५ आणि इ. स. १९३५ ते १९५० असे अभ्यासाच्या दृष्टीने पाच कालखंड केलेले आहेत. या कालखंडातील प्रमुख राष्ट्रीय घटना, प्रवृत्ती, त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी विचारांचा प्रसार आणि विकास, त्यानुसार राजकीय चळवळींना लागलेले वळण आणि बदलत गेलेले स्वरूप आणि त्याचे आधुनिक मराठीतील कवितेत पडलेले प्रतिबिंब या दृष्टीनेही हे कालखंड केलेले आहेत. त्या दृष्टीनेच 'पूर्वज स्मृती कालखंड', 'राष्ट्रीय जागृतीचा कालखंड', 'राष्ट्रीय क्षोभाच्या परिस्फोटाचा आणि कृतिपरतेचा कालखंड किंवा राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग', 'राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा अथवा गांधीजींच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला कालखंड' आणि शेवटचा 'मानवतावादी राष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद व्यक्तिवाद यांच्या संमिश्र वैचारिक प्रभावाचा आणि दुसऱ्या अर्थाने राष्ट्रीय काव्याच्या ओहटीचा कालखंड', अशी नावे देऊन त्यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

पहिल्या प्रकरणात राष्ट्रवादाचा सर्वांगीण विचार करताना, या वादाची तात्विक संकल्पना काय, तिचे प्रमुख घटक कोणते, आधुनिक राष्ट्रवादाचा उदय कुठे झाला, निरनिराळ्या देशात त्याचे रूप वेगवेगळे कसे दिसते, आरल्या देशात गेल्या शंभर वर्षांत राष्ट्रवादाचा विकास कसा कसा होत गेला या सर्व मुद्यांचा चिकित्सक परामर्श घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. भारतातील राष्ट्रवादाच्या विकासाचे टप्पे सांगताना राजाराम मोहन राय, स्वामी दयानंद सरस्वती यांच्यापासून आरंभ करून मग महाराष्ट्रातील राष्ट्रधर्माच्या प्रणेत्यांचा परामर्श घेतला आहे. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी यांच्यापासून तो न्यायमूर्ती रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, सावरकर, राजवाडे. केतकर, गांधीजी, डॉ. आंबेडकर, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज मोहोड आणि डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे इत्यादी राष्ट्रभक्तांचा व विचारवंतांचा त्यात समावेश आहे.

दुसऱ्या प्रकरणात राष्ट्रीय कवितेच्या परंपरेचा मागोवा घेतला असून त्यानंतरच्या पाच प्रकरणांत राष्ट्रीय कवितेचा आशय आणि कलात्मकतेच्या दृष्टीने चिकित्सा केली आहे. शुद्ध राष्ट्रवादी कविता निर्माण करण्याचे श्रेय महाकवी सावरकर, स्वातंत्र्यशाहीर गोविंद, सेनापती बापट, साने गुरुजी, संत तुकडोजी महाराज, कुसुमाग्रज या कवींना देता येईल. विवेकनिष्ठ राष्ट्रवादाचा प्रभाव असलेली कविता लिहिणाऱ्यांत केशवसुत, डॉ. माधवराव पटवर्धन, बी. तांबे यांना स्थान द्यावे लागेल. अस्मितादर्श राष्ट्रवादी कवींच्या मालिकेत महाकवी सावरकर, कवी गोविंद यांच्या बरोबरच विनायक, चंद्रशेखर, माधव, तिवारी, टेकाडे, बोबडे, उपाध्ये, बेहरे, अज्ञातवासी, अनंततनय, राघारमण, वसंत बापट, राजा बढे यांच्यासारख्या राष्ट्रीय कवींचा समावेश करावा लागेल. महत्त्वाची ऐतिहासिक स्फुट कविता लिहिणाऱ्या कवींत प्रामुख्याने विनायक, तिवारी, माधव, अज्ञातवासी इत्यादींचा समावेश करावा लागेल. ऐतिहासिक खंडकाव्ये लिहिणाऱ्या राष्ट्रीय कवींत म. मो. कुंटे,

गणेशशास्त्री लेले, कृष्णाजी आठवले, गोविंदशास्त्री कानेटकर, वासुदेवशास्त्री खरे, स्वा. सावरकर; तिवारी, नांदापूरकर, यशवंत, मनमोहन, या. मु. पाठक, निफाडकर, हिंगणेकर, विरकूड, बाबुलनाथ हे येतील.

समाजसुधारणावादी, क्रांतिवादी आणि मानवतावादी कवींत केशवसुत, अनिल, माधवराव पटवर्धन, मायदेव, बेहरे, बी. तांबे, यांचा तसेच कुसुमाग्रज, कांत, पोवळे, काळेले, मनमोहन, पंडित, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, ना. ग. जोशी, वि. म. कुलकर्णी, कृ. ब. निकुंब इत्यादींचा उल्लेख करावा लागेल. समाज सुधारणावादी खंडकाव्याची निर्मिती करणारे पटवर्धन, यशवंत, गिरीश, ना. ग. जोशी यांचा उल्लेख करता येईल. शाहिरी काव्य निर्माण करणाऱ्यांत लहरी हैदर, जामखेडकर, खाडिलकरांपासून तो अमरशेख, अण्णाभाऊ साठे यांच्यापर्यंतच्या शाहिरांचा सिंहाचा वाटा आहे.

पूर्वज स्मृती कालखंडातील राष्ट्रीय काव्याच्या आरंभीच्या निर्मितीचे श्रेय 'राजा शिवाजी' या खंडकाव्याचे निर्माते, विचारवंत व कवी म. मो. कुंटे यांच्याकडे जाते. शंभर वर्षांच्या राष्ट्रीय कवितेच्या प्रवाहावर दृष्टिक्षेप टाकला असता परंपरेच्या अभिमानावर आधारलेल्या अस्मितादर्श राष्ट्रवादाचे प्रामुख्याने दर्शन घडते. महाराष्ट्राला लाभलेला स्वराज्याचा वारसा, महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात थेट अठराशे सत्तावनपासून महाराष्ट्रातील देशभक्तांनी निर्माण केलेली पराक्रमाची व बलिदानाची ऐतिहासिक परंपरा हेच त्याचे मुख्य कारण आहे.

सैन्यदलातील अधिकाऱ्यांच्या रूपकाच्या साहाय्याने राष्ट्रीय काव्याची निर्मिती करणाऱ्या राष्ट्रीय कवींचे भिन्न भिन्न योग्यतेचे स्तर स्पष्ट करण्यासारखे आहेत. पहिला स्तर सेनापतीची योग्यता असणाऱ्या स्वा. सावरकरांसारख्या महाकवीचा, दुसऱ्यात ब्रिगेडिअरच्या उच्च पदावर असलेले राष्ट्रकवी सेनापती बापट, कवी गोविंद, राष्ट्रसंत तुकडोजी, साने गुरुजी, विनायक, कुसुमाग्रज यांच्यासारखे तिसऱ्या स्तरातील कवींची योग्यता प्रादेशिक सेनेतील अधिकाऱ्यांची सांगता येईल. केशवसुत, तांबे, बी, माधव, तिवारी टेकाडे यांचा समावेश या श्रेणीत करता येईल. चवथे गृहरक्षक दलातील उच्च अधिकारी, त्यात डॉ. माधवराव पटवर्धन, यशवंत, गिरीश, अनिल, कांत, पोवळे, करंदीकर यांचा समावेश करता येईल. इतर सर्व राष्ट्रीय कवींची छात्रसेनेतील प्रशिक्षित अधिकाऱ्यांत गणना करता येईल. केवळ राष्ट्रीय कवितेच्या क्षेत्रातील त्यांच्या त्यांच्या कामगिरीप्रमाणे हे स्तर सांगितले आहेत. कुणालाही गौण लेखण्याचा त्यामागे हेतू नाही हे कृपा करून लक्षात घेतले पाहिजे. स्वा. सावरकरांसारखा महान क्रांतिकारक, द्रष्टा, राष्ट्रभक्त, दलितोद्धारक महाकवी राष्ट्रवादी कवितेने मराठीला दिला ही उपलब्धी महत्त्वाची आहे.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आणि ग. त्र्यं. माडखोलकर या विद्वान समीक्षकांनी, 'महाराष्ट्रातील कवी अजाण आहेत', 'आधुनिक कविता राष्ट्राच्या सुखदुःखाची प्रातिनिधिक नाही' अशा आशयाचे अनुक्रमे आक्षेप राष्ट्रीय कवितेवर घेतलेले आहेत. हे दोन्ही आक्षेप वस्तुस्थितीवर आधारलेले वाटत नाहीत असे नमूद करावेसे वाटते. कारण ही वस्तुस्थिती असती तर राष्ट्रीय आंदोलनाबरोबर इतक्या विपुल स्वरूपात राष्ट्रीय कविता लिहिलीच गेली नसती. राष्ट्रीय कवितेप्रमाणेच, निबंध, नाटक, कादंबरी, कथा, चरित्रे, आत्मचरित्र्ये, या साहित्यप्रकारांनीही राष्ट्रीय साहित्याची विपुल निर्मिती केलेली असून नव्य संशोधकांसाठी ते क्षेत्र मोकळेच आहे हेही या अभ्यासाच्या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

जीवनातील इतर क्षेत्रांप्रमाणे साहित्याच्या क्षेत्रातही पुरुष साहित्यिकांच्या बरोबर असणारा महिला कवयित्रींचा वर्ग, शांतादेवी परदेशी, संजीवनी मराठे या दोघींचा अपवाद करता राष्ट्रीय कवितेच्या क्षेत्रात बहुधा आढळत नाही. कदाचित राष्ट्रीय आघाडीपेक्षा गृह आघाडीकडे त्यांनी आपले लक्ष केन्द्रित केले असावे. काहीही अधिक उणे असले तरी राष्ट्रीय कवितेने मराठी माणसाच्या मनात देशभक्तीची भावना निर्माण केली, त्याचे मन संवेदनशील, उदात्त, उदार, त्यागी, व्यापक, विशाल आणि सहानुभूतीपूर्ण बनविले आहे. अन्याय, अत्याचार, जुलूम, गुलामी, विषमता यांच्या विरोधात झगडण्याचे सामर्थ्य तिने मराठी माणसाला दिले असून त्याची अस्मिता कायम ठेवली. सामाजिक व आर्थिक विषमतेची धार पार बोथट केली ही उपलब्धी अतिशय महत्त्वाची आहे. मराठी माणसाने सतत गुणगुणत राहावी आणि त्याला अभिमान वाटावी अशीच राष्ट्रीय कविता आहे.



संदर्भ ग्रंथ

प्रकरण १

१. जैनेन्द्रकुमार, समय और हम, पूर्वोदय प्रकाशन, दिल्ली, १९६२, प्र. पृष्ठ १४७–१४९, २. हॅन्स कोहन, नॅशनालिझम् इट्स मिनिंग ॲण्ड हिस्ट्री; डी. व्हान नॉस्डर्ड कंपनी, कॅनडा, १९६५; द्वि. पृष्ठ ३१. ३. जीन जेक्स रुसो, राष्ट्रवाद, संपा. पां. वा. गाडगीळ, य. गो. जोशी, पुणे, १९४१; प्र. पृ. ३. ४. श्री. य. कोल्हटकर, तत्रैव, पृ. ५–७. ५. हॅन्स कोहन, नॅशनालिझम् इट्स मिनिंग ॲन्ड हिस्ट्री, पृ. १३. ६. हॅन्स कोहन तत्रैव पृ. १०–११. ७. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. १२–१४. ८. हॅन्स कोहन, तत्रैव, प्रकरण १–२, पृ. १५–१७. ९. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. १७–२०. १०. हॅन्स कोहन; तत्रैव; पृ. २०–२३. ११. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. २४–२८. १२. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ३०–३२. १३. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ३४–३५. १४. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ३५–३६. १५. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ४०–४४. १६. हॅन्स कोहन, तत्रैव पृ. ४९–५५. १७. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ६६–६७. १८. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ७२–७४. १९. आर्थर दि गाबिनू, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ७३–७४. २०. आर्थर दि गाबिनू, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ७४–७५. २१. आर्थर दि गाबिनू, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ७८–८०. २२. आर्थर दि गाबिनू; हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ८२–८४. २३. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन तत्रैव, पृ. ७५–७६. २४. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ८५–८७. २५. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ८१–८७. २६. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ८८–९१. २७. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ९. २८. थिओडोर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ११. २९. लुईस एल् स्नॉयडर, दि मिनिंग ऑफ नॅशनालिझम्, ट्रस्टीज ऑफ रूटगर्स कॉलेज, न्यु जर्सी, अमेरिका, १९५४. प्रकरण ५, पृ. ११३–११५. ३०. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ११५–११७. ३१. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ११७, १२२–१२३. ३२. मॅक्स हॅन्डमन; लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. १२४–१२५. ३३. गस्टॉव्ह इक्हेझर, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. १२७–१२८. ३४. ग्रीन बर्ग, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. १३०–१३२. ३५. हॅन्स कोहन, नॅशनालिझम इट्स मिनिंग ॲंड हिस्ट्री, तत्रैव, पृ. १०–११. ३६. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ११. ३७. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. ३०–३१. ३८. व्ही. पी. वर्मा, इंडियन नॅशनालिस्ट मुव्हमेंट ॲन्ड थॉट, लक्ष्मीनारायण अगरवाल, आग्रा, १९५९, द्वि. प्रकरण, पृ. १४–१५. ३९. लुईस एल् स्नॉयडर, दि मिनिंग ऑफ नॅशनालिझम, तळटीप, पृ. ८–९. ४०. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३–४. ४१. न. ना. भिडे, भारतीय राष्ट्रवाद–खंड १, व्ही. जे. जोशी, मुंबई,

पृ. ९–१०. ४२. मर्सेलिस वूल, लुईस एल् स्नॉयडर, प्रकरण, २. तत्रैव पृ. १५–१६. ४३. हेगेल, लुईस एल् स्नॉयडर, प्र. २, तत्रैव, पृ. १७. ४४. हेराल्ड लॉस्की, स्नॉयडर, तत्रैव पृ. १९–२०, ४५. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. २०. ४६. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. २१. ४७. हॅन्स कोहन, नॅशनालिझम इट्स मिनिंग अँड हिस्ट्री, पृ. २२. ४८. हॅन्स कोहन, तत्रैव, पृ. २३. ४९. रा. प्र. पारनेरकर, संघर्ष, श्री. बा. दशरथे, औरंगाबाद, १९७५, प्र, पृ. ४८–४९. ५०. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव पृ. २३–२४. ५१. न. ना. भिडे, भारतीय राष्ट्रवाद–खंड १, पृ. १३–१४. ५२. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. २५. ५३. रा. प्र. पारनेरकर, तत्रैव, पृ. ५७. ५४. हॅन्स कोहन, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ६२–६३. ५५. इ. हॅन बरी हॉन किन्स, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ८६. ५६. सिडने हर्बर्ट, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ५६. ५७. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. १४–१५. ५८. अर्नेस्ट रेनॉन, श्री. य. कोल्हटकर, राष्ट्रवाद, य. गो. जोशी, पुणे, १९४१, प्र. पृ. ९६–९७. ५९. श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, प्रस्तावना खंड १, हिंदुस्थान आणि जग, श्री. व्यं. केतकर पुणे, पृ. ३६०. ६०. बा. गं. टिळक, लो. टिळक केसरी लेखसंग्रह भाग ४, पृ. ४१३. ६१. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. १५. ६२. लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३८. ६३. पिल्स बरी, लुईस एल्. स्नॉयडर, तत्रैव, पृ. ४३–४४. ६४. बर्नाड सी अेवर, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ४४ ६५. ज. श्री. टिळक, दैनिक केसरी, पुणे, अंक ३, आगस्ट, १९७०. ६६. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. १६, ६७. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. १६. ६८. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. १७. ६९. श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, तत्रैव, पृ. ३७९. ७०. शं. द. जावडेकर, आधुनिक भारत, र. ग. जोशी, पुणे, १९५३, द्वि. प्रक. १४, पृ. ५१७. ७१. अर्नेस्ट बार्कर, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३२, ७२. अर्नेस्ट रेनॉन, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३०. ७३. डब्ल्यू इवे स्टाईन, मॉडर्न पोलिटिकल थॉट–ग्रेट इस्यूज, गुलाब प्रेमलानी, दिल्ली, १९६०, द्वि. पृ. ७६५. ७४. फ्रांसिस लॉयबर, लुईस एल् स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३३. ७५. एम्. हावसर, पोलिटिकल सायन्स अॅन्ड गव्हर्नमेंट, पृ. १०४, ७६. जे. हालंड रोज, नॅशनालिटी इन् मॉडर्न हिस्ट्री, १९१६, पृ. १५२. ७७. पिल्स बरी, स्नॉयडर, तत्रैव, पृ. ४३–४५. ७८. अॅनी बेझंट, व्ही. पी. वर्मा, मॉडर्न इंडियन पोलिटिकल थॉट, पृ.५९–६०. ७९. बा. गं. टिळक, दैनिक केसरी, पुणे, अंक ३ ऑगस्ट, १९७०. ८०. तत्रैव, लेख. ८१. विपिनचंद्र पाल, व्ही. पी. वर्मा, तत्रैव, पृ. २५४. ८२. महर्षि अरविंद घोष, तत्रैव, पृ. २७६–२७७. ८३. वि. दा. सावरकर, हिंदुराष्ट्र–दर्शन, सी. मं. अ. गाडगीळ, पुणे, १९४७, प्र. पृ. ७३–७४. ८४. श्री. व्यं. केतकर, ज्ञानकोश, तत्रैव, पृ.४५९. ८५. ना. य. डोळे, राजकीय विचारांचा इतिहास, अ. अं. कुळकर्णी, कांटिनेन्टल, पुणे, १९६९ प्र. पृ. ५५५–५५८. ८६. न. ना. भिडे, तत्रैव, पृ. ६६. ८७. पु. ग. सहस्रबुद्धे, हिंदुसमाज–संघटना विघटना, अ. अं. कुलकर्णी, कांटिनेन्टल, पुणे, १९६७ प्र. पृ. २–३. ८८. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. २१. ८९. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. २८. ९०. धनंजयराव गाडगीळ, महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड–पहिला संपादक–गं. बा. सरदार, जोशी आणि लोखंडे पुणे,१९६० प्र. पृ. १९–२०. ९१. ग. वि. केतकर, साप्ताहिक सोबत, संपादक–ग. वा. बेहरे, अंक ३० जुलै १९७२, पुणे. ९२. व्ही. पी. वर्मा, तत्रैव, पृ. १५. ९३. व्ही. पी. वर्मा, तत्रैव, पृ. १५. ९४. वाल्टर क्रोकर, रविवारची लोकसत्ता, अंक १५ जुलै १९७९ मुंबई, ग. वि. केतकर, पृ. ५. ९५. इरावती कर्वे, मराठी लोकांची संस्कृती, रा. ज. देशमुख, पुणे, १९६२, द्वि. पृ. ३१–३३. ९६. पु. ग. सहस्रबुद्धे, भारतीय लोकसत्ता, अ. अं. कुलकर्णी, कांटिनेंटल,

पुणे, १९५४ प्र. पृ. १–२. ९७. बाळशास्त्री हरदास, वेदातील राष्ट्रदर्शन (उत्तरार्ध), ना. शं. दाते, पुणे, १९५७, प्र. पृ. १७४–१७५ ९८. बाळशास्त्री हरदास, तत्रैव, १३७–१६७–१७९. ९९. पु. ग. सहस्रबुद्धे, इहवादी शासन, ज. श्री. टिळक, केसरी, पुणे १९७२, प्र. पृ. १३०. १००. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १३६–१३७. १०१. पु. ग. सहस्रबुद्धे, हिंदुसमाज–संघटना–विघटना, पृ. ५–११. १०२. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १३–१४. १०३. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १५–१६. १०४. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव पृ. १७–१८. १०५. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. २२–२३. १०६. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. ३८–३९. १०७. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. ४७–४९. १०८. पु. ग. सहस्रबुद्धे, इहवादी शासन, पृ. १३७–१३८. १०९. श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, तत्रैव, पृ. ३८१. ११०. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. ५१–५२. १११. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १००–१०३. ११२. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १०३. ११३. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, स्वराज्य आणि स्वधर्म, प्रकरण ५, पृ. ११९. ११४. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १२०–१२१. ११५. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १२५–१३७. ११६. पु. ग सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. २०९–२१०. ११७. कुसुमावतीबाई देशपांडे, पासंग, श्री. पु. भागवत, मौज, मुंबई, १९६१, द्वि. पृ. ११५. ११८. रा. वि. ओतुरकर, महाराष्ट्र जीवन–परंपरा–प्रगती आणि समस्या, खंड पहिला, पृ. ७५–७६. ११९. हुयेनसंग–फिरस्ता, प्रबोधनकार केशवराव ठाकरे, दैनिक मराठा, महाराष्ट्र राज्य महोत्सव शिवजयंती विशेषांक, २७ एप्रिल, १९६०. १२०. ना. र. देशपांडे, महाराष्ट्र जीवन–परंपरा–प्रगती आणि समस्या, राजकारण आधुनिक काल, पृ. ३३५–३३६. १२१. मा. गो. रानडे, मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, शं. न. जोशी, पुणे, १९२५. तृ. प्रस्तावना, वि. गो. विजापूरकर, पृ. १०. १२२. मा. गो. रानडे, तत्रैव, पृ. ७–९. १२३. मा. गो. रानडे, पृ. ११–१३. १२४. पु. ग. सहस्रबुद्धे, इहवादी शासन, पृ. १४१, १२५. अप्रबुद्ध, मराठ्यांचा उदयास्त–अथवा सांस्कृतिक इतिहासाची रूपरेषा, बाळशास्त्री हरदास, नागपूर, १९४१, प्र. पृ. ७१–८०. १२६. शं. दा. पेंडसे, राजगुरू समर्थ रामदास, ज. श्री. टिळक, केसरी, पुणे, १९७४, प्र. पृ. ३८८. १२७. के. रा. पुरोहित, दैनिक मराठा–महाराष्ट्र–राज्य–महोत्सव शिवजयंती विशेषांक, २७ एप्रिल १९६०. १२८. अप्रबुद्ध, तत्रैव, पृ. १०८–१०९. १२९. जस्टीन मेकॉर्थी, केसरी १८५७ स्वातंत्र्य समर शताब्दी विशेषांक, ज. श्री. टिळक, १९५७, वि. दा. सावरकर, लेख, पृ. १७–१८. १३०. चार्लस बॉल, के. १८५७ स्वा. स. श. विशेषांक, पृ. १८. १३१, दादूमिया, रविवारची लोकसत्ता, ५–१–१९७५, मुंबई, लेख. १३२. दादूमिया, रविवारची लोकसत्ता, २६–१–१९७५, मुंबई, लेख. १३३. शं. द. जावडेकर, आधुनिक भारत, पृ. ३५. १३४. मँगल्स, केसरीची त्रिमूर्ती, पु. ग. सहस्रबुद्धे, श्री ज. टिळक, पुणे, १९७४, प्र. पृ. १२–१३. १३५. दा. न. शिखरे, महाराष्ट्र जीवन–परंपरा–प्रगती आणि समस्या, पृ. १६३. १३६. दादोबा पांडुरंग तर्खडकर, रावबहादूर दादोबा पांडुरंग–आत्मचरित्र, चरित्र, संपादक, अ. का. प्रियोळकर, के. बी. ढवळे, मुंबई, १९४७, प्र. पृ. ३७९–३८०. १३७. लोकहितवादी, महाराष्ट्र जीवन–परंपरा–प्रगती आणि समस्या, दा. न. शिखरे, पृ. १६८. १३८. शं. द. जावडेकर, आधुनिक भारत, पृ. ११४. १३९. जोतिराव फुले, महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६९, पृ. १२८. १४०. जोतिराव फुले, तत्रैव, पृ. १३५. १४१. जोतिराव फुले, तत्रैव, अखंडादी–काव्ये, पृ. ४७४. १४२. जोतिराव फुले, तत्रैव, पृ. ४६६. १४३. वा. म. जोशी, मराठी साहित्य संमेलन–अध्यक्षीय

भाषणे, खंड १, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७१, प्र. पृ. २११. १४४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महात्मा फुले समग्र वाङ्मय–प्रस्तावना, पृ. ५. १४५. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १८. १४६. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. १६. १४७. श्री. व्यं. केतकर, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, हिंदुस्थान आणि जग, पृ. ४००. १४८. नलिनी पंडित, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, नलिनी पंडित, माहीम, मुंबई, १९५५, प्र. पृ. ५०. १४९. मा. गो. रानडे, तत्रैव, पृ. १०. १५०. मा. गो रानडे, तत्रैव, पृ. ७–९. १५१. व्ही. पी. वर्मा, मॉडर्न इंडियन पोलिटिकल थॉट, लक्ष्मीनारायण अगरवाल, आग्रा, १९६७, तृ. पृ. २१. १५२. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ६, १९०५, पृ. ८२. १५३. वि. कृ. चिपळूणकर, केसरीची त्रिमूर्ती, ज. श्री. टिळक, पुणे, १९७४, प्र. पृ. २५. १५४. वि. कृ. चिपळूणकर, आधुनिक भारत, शं. द. जावडेकर, र. ग. जोशी, पुणे, १९५३, द्वि. पृ. ३५. १५५. वि. कृ. चिपळूणकर, आमच्या देशाची स्थिती, संपादक, श्री. ना. बनहट्टी, पां. ना. बनहट्टी, नागपूर, १९४५, द्वि. पृ. ३. १५६. नलिनी पंडित, तत्रैव, पृ. ५९. १५७. वि. कृ. चिपळूणकर, तत्रैव, पृ. ९२–९६. १५८. गं. बा. सरदार, रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७३, प्र. पृ. ७७–७८. १५९. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. ६–७. १६०. वि. कृ. चिपळूणकर, तत्रैव, पृ. १५. १६१. दा. न. शिखरे, राष्ट्रजनक टिळक, दा. व्यं. जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९४९, द्वि. पृ. ३८. १६२. दा. न. शिखरे, तत्रैव, पृ. ३९. १६३. दा. न. शिखरे, तत्रैव, पृ. ३९. १६४. भा कृ. केळकर, टिळक श्रद्धांजली विशेषांक–महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, २ ऑगस्ट, १९७०, लेख–क्रांति तेजाची मूर्ति. १६५. पं. जवाहरलाल नेहरू, केसरी–मराठा टिळक जन्मशताब्दी–विशेषांक, १९५६, पुणे, ज. श्री. टिळक, संदेश वृत्त पृ. ४. १६६. श्री. ना. बनहट्टी, टिळक आणि आगरकर, पां. ना. बनहट्टी, नागपूर, पुणे, १९५१, द्वि. पृ. ५. १६७. बाळशास्त्री हरदास, भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास, श्री. भा. वर्णेकर, नागपूर, १९५१, प्र. पृ. १३६–१३७. १६८. ग. प्र. प्रधान, लो. टिळक–व्यक्ति आणि कार्य, ज. श्री. टिळक, पुणे, केसरी, १९७१, पृ. २–३. १६९. पु. ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. ३१७–३१८. १७०. बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील, लेख, खंड १, केसरी मराठा संस्था, पुणे, १९२२, प्र. पृ. ४६४–४६५. १७१. बा. गं. टिळक, केसरीची, त्रिमूर्ती, पु. ग. सहस्रबुद्धे, पृ. २४५–२४६. १७२. बा. गं. टिळक, लो. टिळक–व्यक्ति आणि कार्य, ग. प्र. प्रधान, पृ. ६१. १७३. बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग २, खंड २, न. चिं. केळकर, केसरी–मराठा संस्था, पुणे, १९२४, प्र. पृ. ३३०. १७४, बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. ४८७–४८८. १७५. बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. ४३२–४३४. १७६. बा. गं. टिळक, दैनिक केसरी, अंक ३ ऑगस्ट, १९७०, पुणे, ज. श्री. टिळक, लो. टिळकांचे स्वतंत्र भारतास मार्गदर्शन. १७७. बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील लेख–भाग ४, संकीर्ण लेख–संग्रह, न. चि. केळकर, पुणे, पृ. १९०. १७८. बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. १८८–१८९. १७९. पु. ग. सहस्रबुद्धे, केसरीची त्रिमूर्ति, पृ. २३८. १८०. बा. गं. टिळक, दैनिक केसरी, ३ ऑगस्ट १९७०, पुणे. १८१. बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ४, पृ. २९२–२९३. १८२. बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. २९२–२९३. १८३. बा. गं. टिळक, दैनिक केसरी, ३ ऑगस्ट १९७०. १८४. गो. ग. आगरकर, आगरकरांशी ओळख, पु. पां. गोखले, द. र. कोपर्डेकर, पुणे, १९६९, पृ. १३१. १८५. मा. दा. अळतेकर, आगरकर दर्शन, कमलाबाई भिडे, मॉडर्न बुक डेपो, पुणे १९५६, प्र. पृ. ४. १८६. भा. कृ. केळकर, टिळक श्रद्धांजली विशेषांक–महाराष्ट्र टाईम्स,

मुंबई, १९७०. १८७. गो. ग. आगरकर, आगरकरांशी ओळख, पु. पां. गोखले, पृ. ६८. १८८. पु. ग. सहस्रबुद्धे, केसरीची त्रिमूर्ति, पृ. २०१. १८९. गो. ग. आगरकर, संपूर्ण आगरकर निबंध संग्रह, भाग १, मा. दा. अळतेकर, आगरकर प्रकाशन मंडळ, पुणे, १९३७. प्र. पृ. १७७. १९०. गो. ग. आगरकर, तत्रैव, पृ. २११. १९१. गो. ग. आगरकर, तत्रैव, पृ. १८१. १९२. शं. द. जावडेकर, आधुनिक भारत, पृ. १८५. १९३. गो. ग. आगरकर, आधुनिक भारत, शं. द. जावडेकर, पृ. १८६. १९४. नलिनी पंडित, तत्रैव, ९०–९१. १९५. मा. दा. अळतेकर, आगरकर दर्शन. प्रस्तावना, पृ. ५–१२–१४. १९६. शं. द. जावडेकर, तत्रैव, पृ. २२९–२३१. १९७. गो. ग. आगरकर, नलिनी पंडित, तत्रैव, पृ. ९०–९१. १९८. पु. पां. गोखले, तत्रैव, पृ. १२८–१२९. १९९. श्री. ना. बनहट्टी, टिळक आणि आगरकर, पृ. २१४–२१५. २००. गं. बा. सरदार, रा. प्र, सा. सु. तत्त्वमीमांसा, प्रकरण ६, पृ. ७९. २०१. पु ग. सहस्रबुद्धे, तत्रैव, पृ. २०१–२०५. २०२. बा. [illegible] टिळक, लो. टिळक लेख संग्रह, संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी, दिल्ली, १९६९, प्र. पृ. ४४९–४५१. २०३. वि. का. राजवाडे, मराठी वाङमयाचा इतिहास खंड ५, भाग २, संपा. रा. श्री. जोग, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७३, प्र. पृ. १७४. २०४. वि. का. राजवाडे, राजवाडे लेखसंग्रह, भाग १, ऐतिहासिक प्रस्तावना, शं. न. जोशी, पुणे, १९२८, पृ. ३०७–३०८. २०५. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६ पृ. ३१०. २०६. वि. का. राजवाडे, तत्रैव, पृ. ३२२. २०७. वि. का. राजवाडे, राजवाडे लेखसंग्रह, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी, दिल्ली, १९५८, प्र. पृ. २२०. २०८. वि. का. राजवाडे, तत्रैव, पृष्ठ ४६४. २०९. वि. का. राजवाडे, तत्रैव, पृ. ४२८–४२९. २१०. वि. का. राजवाडे, तत्रैव, ४२९–४३०. २११. वि. का. राजवाडे, तत्रैव, ३२६–३२७. २१२. वि. का. राजवाडे, तत्रैव, पृ. ३४३. २१३. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ४, पृ. २८५. २१४. वि. का. राजवाडे, तत्रैव, खंड ४, पृ. २८५–२८६. २१५. वि. का. राजवाडे, खंड ४, तत्रैव, पृ. २८६–२८७. २१६. वि. का. राजवाडे, खंड ४, तत्रैव, पृ. २८३–२८४. २१७. वि. का. राजवाडे, खंड ४, पृ. ४१८–४१९. २१८. वि. का. राजवाडे. म. इ. सा. खंड १, प्रस्तावना, पृ. ३१–९१. २१९. वि. का. राजवाडे, म. इ. सा. खंड १०, पृ. ४६३. २२०. श्री. के. क्षीरसागर, डॉ. केतकर व्यक्ति आणि विचार, अ. अं. कुलकर्णी, पुणे, १९६२, प्रस्तावना, पृ. १. २२१ श्री. व्यं. केतकर, हिंदुस्थान आणि जग, प्रकरण १, श्री. व्यं. केतकर, पृ. ४१. २२२. श्री. व्यं. केतकर–तत्रैव, प्रकरण १४. पृ. ३८३. २२३. श्री. के. क्षीरसागर, तत्रैव, पृ. ६. २२४. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, प्रकरण १४. पृ. ३८२, २२५. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ३७९. २२६. श्री. व्यं. केतकर, तत्रैव पृ. ३८५–३८६. २२७. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ४५९. २२८. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, प्रकरण १३, पृ. ३५९–६०. २२९. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, प्रकरण १३, पृ. ३६०. २३०. श्री. व्यं. केतकर, अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास–भाग २, स. कृ. पाध्ये, पुणे, १९५८ प्र. पृ. ५. २३१. श्री. व्यं. केतकर, म. सा. सं.–अध्यक्षीय भाषणे, भीमराव कुळकर्णी, खंड १, पुणे, १९७१, प्र. पृ. २७३–७४. २३२. श्री. व्यं. केतकर, हिंदुस्थान आणि जग, तत्रैव, पृ. ३९१, २३३. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ३८४–३८६. २३४. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ३८७. २३५. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ३७९. २३६. श्री. व्यं. केतकर, तत्रैव, पृ. ४०५. २३७. श्री. व्यं. केतकर, श्री. के. क्षीरसागर; पृ. १९. २३८. श्री. व्यं. केतकर, आ. म. वा. इति. भाग २, अ. ना. देशपांडे, पृ. १८–१९.

२३९. श्री. व्यं. केतकर, अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ३६६–३६७. २४०. श्री. व्यं. केतकर, अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ३६७. २४१. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २ पृ. २२. २४२. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. २३. २४३. वि. दा. सावरकर, समग्र सावरकर वाङ्मय–चरित्र खंड १, माझ्या आठवणी, शं. रा. दाते, पुणे, १९६३, प्र. पृ. ११९. २४४. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ११९–१२०. २४५. वि. दा. सावरकर, तत्रैव पृ. १४०. २४६. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४२. २४७. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४३. २४८. वि. दा. सावरकर, आत्मवृत्त पूर्वपीठिका, तत्रैव, पृ. ३१. २४९. वि. दा. सावरकर, माझ्या आठवणी, तत्रैव, पृ. १८१. २५०. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ, १४८, २५१. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४८. २५२. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४८–१४९. २५३. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४८–१४९. २५४. वि. दा. सावरकर, तत्रैव पृ. १८०. २५५. वि. दा. सावरकर, आत्मवृत्त पूर्वपीठिका, तत्रैव, पृ. ६९–७०. २५६. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ६६–६७. २५७. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ६६–६७. २५८. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ६७–६८. २५९. वि. दा. सावरकर, साप्ताहिक सोबत, संपा. प्रका. ग. वा. बेहरे, अंक, २६ एप्रिल १९७७, पुणे, लेख, आनंद हर्डीकर, पृ. ८–९. २६०. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ८–९. २६१. वि. दा. सावरकर, माझी जन्मठेप, तत्रैव, पृ. ५१०. २६२. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ५११. २६३. वि. दा. सावरकर, हिंदुत्व–मराठी अनुवाद, ना. दा. सावरकर. वि. दा. सावरकर, नागपूर, १९७१, तृ. पृ. १३०–१३१. २६४. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १०२–१०३. २६५. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १०९. २६६. वि. दा. सावरकर, तत्रैव पृ. १०९ २६७. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १०९–११०. २६८. वि. ना. सावरकर, हिंदुत्व, प्रस्तावना, पृ. १–३. २६९. नव गोपाल मित्रा, धर्मभास्कर वर्षारंभ विशेषांक, मे १९८०, मुंबई, लेखक, ज. द. जोग पृ. ७४. २७०. वि. दा. सावरकर, हिंदुराष्ट्रदर्शन, सौ. मं. अ. गाडगीळ, पुणे, १९४७, प्र. पृ. ११-१३. २७१. ग. दा. सावरकर, राष्ट्रमीमांसा आणि हिंदुस्थानचे राष्ट्रस्वरूप, वि. ना. सावरकर, नागपूर, ऑगस्ट १९७९. द्वि. पृ. ४१. २७२. ग. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ८७–८८. २७३. ग. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ८८–८९. २७४. ग. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४२–१४३. २७५. विद्याधर पुंडलीक, सावरकरांचे सामाजिक विचार, प्रस्तावना, अ, के. कोठावळे, मुंबई, जाने. १९७३, प्र. पृ. ६. २७६. विद्याधर पुंडलीक, तत्रैव पृ. ९. २७७. विद्याधर पुंडलीक, तत्रैव पृ. १२, २७८. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४५–४६. २७९. ग. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ३२–३३. २८०. ग. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ३३–३४. २८१. बा. गं. टिळक, प्रज्ञालोक, त्रैमासिक, टिळक विशेषांक, नागपूर, १९७२, पृ. ९१. २८२. वा. गं. टिळक, तत्रैव, पृ. ९२. २८३. राम मनोहर लोहिया, प्रज्ञालोक, त्रैमासिक, अंक, ३१–३–१९८०, नागपूर, लेख, राष्ट्रीयत्वाचा प्रतिपर्व रसोदय, ब. स. येरकुंटवार, पृ. ८. २८४. श्रीपाद जोशी, रविवारचा तरुण भारत, अंक ६ एप्रिल १९८०, नागपूर, लेख, धर्मराज्य–रामराज्य आणि हिंदुराष्ट्र. २८५. ब. स. येरकुंटवार, प्रज्ञालोक, ३१–३–१९८०, नागपूर. पृ. १२. २८६. बा. गं. टिळक, प्रज्ञालोक, नागपूर, अंक १५ जुलै १९७७; ध्येय साधना अमर रहे, ज. घु. नाईकवाडे, पृ. ९३–९४. २८७. बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. ९३. २८८. बा. गं. टिळक, तत्रैव, पृ. ९४. २८९. ना. ह. पालकर, डॉ. हेडगेवार, ह. वि. दात्ये, पुणे, १९६९, द्वि पृ. ६१. २९०. वि. दा. सावरकर, साप्ताहिक सोबत, पुणे अंक, २६ एप्रिल १९७७. आनंद हर्डीकर, पृ. ८–९. २९१. ना. ह. पालकर, तत्रैव, पृ. १३०–१३१. २९२. दादुमिया;

साप्ताहिक सोबत पुणे, अंक, १० मे १९७७. २९३. व्ही. पी. वर्मा, मॉ. इं. पो. थॉट, पोलिटिकल आयडियाज, ऑफ हेडगेवार, १९६७, तृ. पृ. ३३२. २९४. के. ब. हेडगेवार, डॉ. हेडगेवार, ना. ह. पालकर. पृ. २०५. २९५. के. ब. हेडगेवार, तत्रैव, पृ. १९६–१९७. २९६. वि. दा. सावरकर, हिंदुराष्ट्रदर्शन, पृ. २८०–२८४. २९७. ब. स. येरकुंटवार, प्रज्ञालोक, अंक, १५ जुलै १९७३, लेख, स्वर्गीय गोळवलकर गुरुजी, पृ. ६३. २९८. ब. स. येरकुंटवार, तत्रैव, पृ. ६३–६४. २९९. मा. स. गोळवलकर, राष्ट्रमीमांसा, वि. ना. सावरकर, पृ. ४. ३००. ब. स. येरकुंटवार, प्रज्ञालोक, १९७३, पृ. ६५. ३०१. मो. क. गांधी, पाञ्चजन्य, गांधी जन्मशती विशेषांक, १९६९ दिल्ली, संपा. के. र. मल्कानी, राष्ट्रधर्म प्रकाशन. ३०२. मो. क. गांधी, व्ही. पी. वर्मा, एम. के गांधी, फिलॉसफी ऑफ पॉलिटिक्स, १९६७, पृ. २९४. ३०३. मो. क. गांधी, गांधी–अशोक आणि राष्ट्रघात, आनंद हर्डीकर, अ. ज. फडणीस, विजयंता प्रकाशन, पुणे, १९६९, पृ. ११६–११८. ३०४. जे. बी. कृपलानी, 'गांधीयन वे', अनुवाद, गांधीदर्शन, शरच्चंद्र गुणे, रा. ज. देशमुख, पुणे, १ ९४७, पृ. १६७–१६८. ३०५. मो. क. गांधी, गांधी संस्मरण और विचार, संपा. काकासाहेब कालेलकर और उनके साथी, मार्तंड उपाध्याय, दिल्ली, १९६८, प्र. पृ. ३७. ३०६. मो. क. गांधी, महात्माजींचे सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, मराठी अनुवाद, सी. पु. पटवर्धन, र. ग. जोशी, पुणे, १९५१, पृ. ६३. ३०७. मो. क. गांधी, गांधी गौरव ग्रंथ, संपा. दा. न. शिखरे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, १९७०, प्र. पृ. २६१–२६२. ३०८. मो. क. गांधी, आत्मकथा, पृ. १५८. ३०९. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. २९०–२९१. ३१०. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ४२३–४२५. ३११. मो क. गांधी, तत्रैव, पृ. ३३५. ३१२. मो. क. गांधी, गांधी संस्मरण और विचार, पृ. ४७४. ३१३. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ४८०. ३१४. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ४७४. ३१५. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ५९७. ३१६. मो. क. गांधी, पाञ्चजन्य–गांधी जन्मशती विशेषांक, १९६९, हिंद स्वराज्य, पृ. २८–२९. ३१७. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. २८–२९. ३१८. मो. क. गांधी, गांधी संस्मरण और विचार, पृ. ४१८. ३१९. मो. क. गांधी, पाञ्चजन्य–विशेषांक, १९६९, पृ. ३१. ३२०. मो. क. गांधी, गांधी संस्मरण और विचार पृ. ३१७–३१९. ३२१. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ३३३–३३४. ३२२. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ३२०. ३२३. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ५२३. ३२४. मो. क. गांधी, तत्रैव, प्रस्तावना–डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, पृ. २. ३२५. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. २७५–२७६. ३२६. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ५९१. ३२७. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. २९०. ३२८. मो. क. गांधी, दैनिक तरुण भारत, नागपूर, अंक, ६ एप्रिल १९८०, श्रीपाद जोशी, पुणे, लेख–धर्मराज्य आणि हिंदुराष्ट्र. ३२९. मो. क. गांधी, गांधी व्यक्तित्व विचार और प्रभाव, संपा. काकासाहेब कालेलकर, मार्तंड उपाध्याय, दिल्ली, १९६६, प्र. पृ. ३०९. ३३०. मो. क. गांधी, गांधी संस्मरण और विचार, पृ. ५६८. ३३१. मो. क. गांधी, तत्रैव, पृ. ५११–५१२. ३३२. दि. का. गर्दे, आधुनिक भारतीय राज्यविचार, प्रकरण ६, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७५, प्र. पृ. १२६–१२७. ३३३. शं. द. जावडेकर, गांधीवाद–समाजवाद एक तुलनात्मक अभ्यास–लेखसंग्रह, संपा. भाऊ धर्माधिकारी, गो. वा. कुलकर्णी, कोल्हापूर, १९४९, प्रस्तावना, प्र. पृ. ४–५. ३३४. नरहर कुरुंदकर, जागर–लेखसंग्रह, रा. ज. देशमुख, पुणे, १९६९, पृ. १३५–१३८. ३३५. दि. का. गर्दे, आ. भा. राज्यविचार, पृ. १३५. ३३६. प्र. के. अत्रे, मराठी माणसे मराठी मने, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६३, पाचवी आवृत्ती, पृ. १०३. ३३७. प्र. के. अत्रे, तत्रैव, पृ. १०४. ३३८. वा. ना. कुबेर,

डॉ. आंबेडकर विचारमंथन, ज. श्री. टिळक, पुणे, १९७२, प्र. पृ. २९९–३००. ३३९. भी. रा. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा. फ. गांजरे, नागपूर, १९७६, प्र. पृ. १०१. ३४०. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ग. रा. भटकळ, मुंबई, १९६६, प्र. पृ. ४८४–४८५. ३४१. धनंजय कीर, तत्रैव, पृ. ४८५. ३४२. भी. रा. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ५ वा, संपा. मा. फ. गांजरे, नागपूर, १९७६, प्र. पृ. १८९. ३४३. भी. रा. आंबेडकर, भाषणे खंड ५, तत्रैव, पृ. १८. ३४४. भी. रा. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, पृ. २३६, ३४५. भी. रा. आंबेडकर, तत्रैव पृ. २७९–२८०. ३४६. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. २६२–२६३. ३४७. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. ४८२. ३४८. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. ४८३. ३४९. भी. रा. आंबेडकर, डॉ. बा. आंबेडकरांची भाषणे खंड ५, पृ. २१–२२. ३५०. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. २२–२३. ३५१. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. ५१. ३५२. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. ४२. ३५३. भी. रा. आंबेडकर, डॉ. आंबेडकर, धनंजय कीर पृ. ३३९. ३५४. वा. ना. कुबेर, डॉ. आंबेडकर विचार मंथन, पृ. १६२. ३५५. भी. रा. आंबेडकर, वा. ना. कुबेर, पृ. १६१, ३५६. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, २१०–२११. ३५७. भी. रा. आंबेडकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, पृ. ४२७–४२८. ३५८. भी. रा. आंबेडकर, डॉ. आंबेडकरांची भाषणे, खंड ५, पृ. १८२–१८३. ३५९. भी. रा. आंबेडकर तत्रैव, पृ. १८६. ३६०. भी. रा. आंबेडकर, धनंजय कीर, पृ. ५४३. ३६१. भी. रा. आंबेडकर, तत्रैव, पृ. ५१०. ३६२. श्री. गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, डॉ. कृ. मा. घटाटे, डॉ. श्री. भा. वर्णेकर, विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान, १९७८, नागपूर. प्र. पृ. १७–३३. ३६३. विश्वव्यापिनी संस्कृती, डॉ. कृ. मा. घटाटे आणि सुरेश मापारी, व. धुं. पाठक, वि. हिं. परिषद, प्रकाशन १९८३. पृ. ११. ३६४. गुलाब गुच्छ–निवडक संग्रह, संपा. डॉ. वि. गं. कावळे, वर्धा, श्री. गुलाबराव महाराज जन्मशताब्दी समारोह समिती, १९८१, पृ. २–३. ३६५. श्री. गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, डॉ. कृ. मा. घटाटे, पृ. ४०–४१. ३६६. श्री. गुलाबराव महाराज, तत्रैव, पृ. ४३–४४. ३६७. श्री. गुलाबराव महाराज विरचित, साधुबोध, श्री. गुलाबराव महाराज, नी. मा. घुई, आवृत्ती ६ वी. १९८३, पृ, १७८. ३६८. द. बा. ठेंगडी, विश्वव्यापिनी संस्कृती, डॉ. कृ. मा. घटाटे, सुरेश मापारी, व. धुं. पाठक. १९८३, पृ. ३–१०. ३६९. विश्वव्यापिनी संस्कृती, तत्रैव, पृ. ७०–७१. ३७०. विश्वव्यापिनी संस्कृती, तत्रैव पृ. ७१–७२. ३७१. म. श्री. गुलाबराव महाराज तत्रैव पृ. ७४–७६. ३७२. कृ. मा. घटाटे, तत्रैव पृ. ८२–८५. ३७३. म. श्री. गुलाबराव महाराज, तत्रैव, ८६–८८. ३७४. म. श्री. गुलाबराव महाराज, सुबोध हिंदुधर्म अर्थात समयोपदेश, गुलाबराव महाराज, नी. मा. घुई, आ. प. अमरावती, १९८७ पृ. ४९–५०. ३७५. म. श्री. गुलाबराव महाराज, तत्रैव पृ. ५४. ३७६. श्री. गुलाबराव महाराज, विश्वव्यापिनी संस्कृती, कृ. मा. घटाटे आणि सुरेश मापारी; पृ. १०. ३७७. द. बा. ठेंगडी, तत्रैव, पृ. १०. ३७८. म. श्री. गुलाबराव महाराज, साधुबोध, श्री. गुलाबराव महाराज, नी. म. घुई, १९८३, पृ. १६९–१७०. ३७९. म. श्री. गुलाबराव महाराज, श्री. गुलाबराव महाराजांची विचार संपदा, कृ. मा. घटाटे, विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान, १९७८, पृ. २९५–३०१. ३८०. म. श्री. गुलाबराव महाराज, तत्रैव, पृ. ३०२–३१२.

प्रकरण २

१. ब. स. येरकुंटवार, नवयुगाची बीजाक्षरे, राधेय प्रकाशन, नागपूर, १९७८, पृ. ३४–३५ २. डब्ल्यू बी. पिल्सबरी, प्रज्ञालोक (त्रैमासिक) नागपूर, अंक, २६–१०–१९७७. संपा. प्रकाशक, ब. स. येरकुंटवार. ३. डब्ल्यू एरेन स्टॉईन, दि मिनिंग ऑफ दि नॅशनॅलिझम, प्रकरण ४, दि सेंटिमेंट ऑफ नॅशनॅलिझम, लुईस एल् स्नायडर १९५४, अमेरिका. ४. बा. गं. टिळक, प्रज्ञालोक, भारतीय संस्कृती व विज्ञानयुग विशेषांक, १९ मे १९६२, लेखक, शं. म. कोलते, पृ. ६०. ५. लुईस एल् स्नॉयडर, व्हेरायटीज ऑफ नॅशनॅलिझम, पृ. ५१. ६. अथर्ववेदातील ऋचा, वेदातील राष्ट्रदर्शन, उत्तरार्ध, बाळशास्त्री हरदास, ना. शं. दाते, पुणे, १९५७, प्र. पृ. ६२. ७. ऋग्वेदातील ऋचा. तत्रैव, पृ. ३८२. ८. वैदिक ऋचा, तत्रैव, पृ. ३८१. ९. अथर्ववेद पृथ्वीसूक्त, तत्रैव, पृ. २७ १०. वैदिक ऋचा, तत्रैव, पृ. २६. ११. वैदिक ऋचा, नवयुगाची बीजाक्षरे, ब. स. येरकुंटवार राधेय प्रकाशन, १९७८, नागपूर. प्र. पृ. २८. १२. विष्णु पुराण, तत्रैव, पृ. २७. १३. संत एकनाथ, तत्रैव, पृ. २७. १४. ब. स. येरकुंटवार, तत्रैव, पृ. २७. १५. द. भि. कुलकर्णी, महाकाव्य स्वरूप व समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, १९७५, प्र. पृ. २३. १६. ग. त्र्यं. देशपांडे, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान, लाड स्मारक व्याख्यानमाला, नागपूर, प्रकाशन विभाग, माहिती आणि नभोवाणी, भारत सरकार, १९६४, १७. ग. त्र्यं. देशपांडे, तत्रैव, पृ. ९–१०. १८. बा. गं. टिळक, लो. टिळक लेखसंग्रह, खंड ४, केसरी प्रकाशन, पुणे, पृ. ४१३. १९. बा. गं. टिळक, महाकाव्य स्वरूप व समीक्षा, द. भि. कुलकर्णी, पृ. ६. २०. ग. त्र्यं. देशपांडे, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान पृ. ३८–४०. २१. द. भि. कुलकर्णी, महाकाव्य स्वरूप व समीक्षा, पृ. १६१. २२. संत ज्ञानेश्वर, सार्थ ज्ञानेश्वरी, संपा. शंकर वामन दांडेकर, प्रसाद प्रकाशन पुणे, १९५८ द्वि. पृ. ५८८. २३. संत ज्ञानेश्वर, तत्रैव, पृ. ७८२. २४. ग. त्र्यं. देशपांडे, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान, पृ. ५५. २५. स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंदाज् राउझिंग कॉल टू हिंदू नेशन, संपा. एकनाथजी रानडे, स्वस्तिक प्रकाशन, कॉर्नवालिस स्ट्रीट, कलकत्ता, १९६३, प्र. पृ. ३७. २६. स्वामी विवेकानंद, तत्रैव, पृ. ३९. २७. गं. बा. सरदार, संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती, प्रकरण, उपसंहार, वा. वि. कुलकर्णी, पुणे, १९८२, चतुर्थ आवृत्ती, पृ. १३३–१३४. २८. स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंदाज् राउझिंग कॉल टू हिंदू नेशन, पृ. ३७. २९. न. चिं. केळकर, मराठी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७१, प्र. पृ. ८१. ३०. म. ना. अदवंत, मराठ्यांची संग्राम गीते, दु. आ. तिवारी, दा. ना. मोघे, कोल्हापूर, प्रस्तावना, १९५४, आठवी आवृत्ती, पृ. २३. ३१. म. ना. अदवंत, मराठ्यांची संग्राम गीते, प्रस्तावना, पृ. ३. ३२. म. ना. अदवंत, तत्रैव, पृ. ३–४. ३३. श्री. वर्दे, मराठ्यांची संग्राम गीते, प्रस्तावना, म. ना. अदवंत, पृ. ४. ३४. वि. पां. दांडेकर, मराठी साहित्याची रूपरेषा, लेखक, प्रकाशक, वि. पां. दांडेकर, १९६१, बडोदा, द्वि. पृ. १६३–१६४. ३५. अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास भाग २, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५८, प्र. पृ. ४२२. ३६. सूर्यनारायण सक्सेना, मोगलांचा कर्दनकाळ ठरलेला छत्रसाल बुंदेला, रविवारची लोकसत्ता, मुंबई, अंक दि. १५–५–१९७७. ३७. रवीन्द्रनाथ टागोर, साप्ताहिक अंक, दैनिक तरुण भारत, नागपूर लेख–सरला काबाडी, कवींच्या काव्यातील शिवाजी, अंक २ जून १९७४. ३८. शाहीर राम जोशी,

संतकवी तथा शाहीर; य. न. केळकर, न. शं. कुळकर्णी, पुणे, १९५२, प्र. पृ. ७५. ३९. शाहीर परशराम, तत्रैव, पृ. २५. ४०. शाहीर होनाजी, तत्रैव, पृ. ५३. ४१. धुंडा महाराज देगलूरकर, कथा भागवत, लेखिका, वीणा बाळशास्त्री हरदास; काळ प्रकाशन, पुणे, १९७८, प्रस्तावना, प्र. पृ. २५. ४२. बा. गं. टिळक, लो. टिळकांचे केसरीतील लेख, खंड ४, केसरी प्रकाशन पुणे, पृ. ४१३. ४३. अप्रबुद्ध, प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, गौरव ग्रंथ, लेख, श्रीज्ञानेश्वरांचा मायावाद, श्यामकांत वनहट्टी, नागपूर, १९६३, प्र. पृ. १३–१४. ४४. न. चिं. केळकर, मराठी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७१, प्र. पृ. ८२–८३. ४५. ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कवी पंचक, ग. त्र्यं. माडखोलकर, भट आणि मंडळी, पुणे, १९२१, प्र. पृ. ८७–८८. ४६. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, लेख, गेल्या साठ वर्षांतील मराठी कविता, दि. मा. घुमाळ, नागपूर, १९६५, प्र. पृ. ३३०–३३१. ४७. अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङमयाचा, इतिहास भाग २. पृ. ४२६. ४८. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ४२२–४२३. ४९. वा. भा. पाठक, आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह, वा. भा. पाठक; प्रका., ग. ल. ठोकळ, पुणे, प्र. पृ. १४८. ५०. कृ. ब. निकुंब, मराठी वाङमयाचा इतिहास खंड ५ भाग १, संपा. रा. श्री. जोग, भीमराव कुलकर्णी, १९७३, प्र. पृ. ३०५–३०७. ५१. म. ना. अदवंत, महाराष्ट्र लक्ष्मी, संपा. म. ना. अदवंत, प्रस्तावना, अ. ज. प्रभु वि. म. बुक कंपनी, पुणे १९६३, प्र. पृ. १४. ५२. म. ना. अदवंत, मराठ्यांची, संग्राम गीते; प्रस्तावना; म. ना. अदवंत, दा. ना. मोघे, कोल्हापूर, १९५४, आ. आठवी पृ. १–२. ५३. म. ना. अदवंत, तत्रैव, पृ. २–३. ५४. ज. ग. करंदीकर, भारतीय राष्ट्रगीते, ज. ग. करंदीकर, न. शं. कुलकर्णी, पुणे, १९५२; प्र. पृ. १३५. ५५. प्र. ल. गावडे, विनायक दामोदर सावरकर एक चिकित्सक अभ्यास; प्रका. वि. प. महाजन, स्वा. म. प्रकाशन, पुणे, १९७०, प्र. पृ. ३५२. ५६. विनय मोहन शर्मा, 'हिन्दी साहित्य में राष्ट्रीय काव्य का विकास' लेखक, क्रांतीकुमार शर्मा, नवयुग प्रकाशन भोपाल, १९७०, प्र. १३–१४. ५७. क्रांतीकुमार शर्मा, तत्रैव, पृ. १४–१६. ५८. माखनलालजी चतुर्वेदी, तत्रैव. पृ. १–३.

प्रकरण ३

१. रा. श्री. जोग, मराठी वाङमयाचा इतिहास खंड ४; संपादक, रा. श्री. जोग, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७३, द्वि. पृ. २. २. शाहीर प्रभाकर दातार, तत्रैव, पृ. २६४–२६५. ३. बाळशास्त्री जांभेकर, मराठी माणसे मराठी मने, प्र. के. अत्रे, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६३, पाचवी आवृत्ती, पृ. १२. ४. रा. श्री. जोग, म. वा. इति. खंड ४, संपादक–रा. श्री. जोग, पृ. १७७. ५. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. २६३. ६. रा. श्री. जोग, तत्रैव, पृ. ६५२–६५७. ७. म. मो. कुंटे, राजा शिवाजी, कवी, प्रस्तावना, म. मो. कुंटे, गो. गो. अधिकारी, पुणे, १९२४ द्वि. पृ. ११–१२. ८. द. भि. कुलकर्णी, महाकाव्य स्वरूप व समीक्षा, लेखक द. भि. कुलकर्णी, सौ. जयश्री उपाध्याय, नागपूर, १९७५, प्र. पृ. ११–१२. ९. रा. वि. ओतुरकर, म. वा. इति. खंड ५, संपादक– रा. श्री. जोग, भीमराव कुळकर्णी, पुणे, १९७३, प्र. पृ. १४४. म. मो. कुंटे, राजा शिवाजी, प्रस्तावना, पृ. १३–१९. ११. रा. वि. ओतुरकर, म. वा. इति. खंड ५, पृ. १७०. १२. म. मो. कुंटे, राजा शिवाजी, प्रस्तावना, पृ. १. १३. रा. श्री. जोग, म. वा. इति. खंड ५,

पृ. ५७७. १४. ह. कि. तोडमल, अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये, ह. कि. तोडमल, अ. अं. कुलकर्णी, पुणे, १९६३, प्र. पृ. ४१४. १५. भ. श्री. पंडित, म. वा. इति. खंड ४. संपादक–रा. श्री. जोग, पृ. ३०४–३०६. १६. द. भि. कुळकर्णी, दुसरी परंपरा, द. भि. कुलकर्णी, गजानन देशमुख, नागपूर, १९७४, प्र. पृ. १०–११. १७. वा. ल. कुलकर्णी, साहित्य शोध आणि बोध, वा. ल. कुलकर्णी, ग. रा. भटकळ, मुंबई, १९६७, प्र. पृ. १९३–१९४. १८. न. चि. केळकर, मराठी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७१, प्र. पृ. ८१–८२ १९. म. गो. रानडे, म. वा. इति. खंड ५, संपादक– रा. श्री. जोग, पृ. ३०५. २०. गो. वि. कानेटकर अर्वाचीन कविता अर्थात आधुनिक महाराष्ट्र कवींच्या काव्यातील वेचे, भाग १, पूर्वार्ध, दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई द्वि. २१. वा. वा. खरे, तत्रैव, २२. परशुराम तात्या गोडबोले, तत्रैव २३. राजा सर. टी. माधवराव, तत्रैव. २४. मोरो गणेश लोंढे, तत्रैव. २५. ए. ग. भांडारे, तत्रैव. २६. वा. दा. ओक, तत्रैव. २७. वा. भा. पाठक, आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह, लेखक– वा. भा. पाठक, ग. ल. ठोकळ, पुणे, १९६४, प्र. पृ. १२६. २८. भ. श्री. पंडित, मराठी वाङमयाचा इतिहास, खंड ४. पृ. ३२३.

प्रकरण ४

१. श्री. कृ. कोल्हटकर, काव्य चर्चा, संपा. ना. म. भिडे, अनंततनय, शं. न. जोशी, पुणे; १९२५, प्र. पृष्ठ ४४. २. जार्ज इलियट, माझे आवडते कवी, ग. त्र्यं. माडखोलकर, दि. मा. घुमाळ, नागपूर, १९६५, प्र. पृ. ८. ३. ग. त्र्यं. माडखोलकर, जीवन साहित्य, अ. अं. कुलकर्णी, पुणे, १९४३; प्र. पृ. १०९–११०. ४. अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, भाग २ रा, स. कृ. पाध्ये, पुणे, १९५८, प्र. पृ. ४२६. ५. न. चि. केळकर, मराठी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, संपा. प्रका. भीमराव कुलकर्णी, पुणे, १९७१, प्र. पृ. ८१. ६. भ. श्री. पंडित, समग्र केशवसुत, संपा. भ. श्री. पंडित, स. कृ. पाध्ये, पुणे, प्र. पृ. ९०. ७. म. ना. अदवंत, केशवसुत–स्मृति ग्रंथ, संपा. प्रका. प. चि. दामले, राहूरी, १९५६, लेख–केशवसुतांचे क्रांतिकारकत्व, प्र. पृ. १४८–१५९. ८. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. ३०५–३०६. ९. ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कवी पंचक, ग. त्र्यं. माडखोलकर, प्रका. भट आणि मंडळी, पुणे, १९२१, प्र. पृ. ३९–४०. १०. वा. भा. पाठक, आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह, ग. ल. ठोकळ, पुणे, १९६४, प्र. पृ. १३५. ११. ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कविपंचक, पृ. २२. १२. मं. वि. राजाध्यक्ष, पाचकवी, संपा. मं. वि. राजाध्यक्ष, बी. जी. ढवळे, मुंबई, १९४७, पृ. ७७. १३. रा. श्री. जोग, 'कुंजकूजन', कवी चंद्रशेखरांच्या निवडक कवितांचा संग्रह, संपा. रा. श्री. जोग, स. कृ. पाध्ये, पुणे, १९५३, प्र. पृ. १५. १४. रा. श्री. जोग, कुंजकूजन, आदरांजलि, पृ. ८–१३. १५. भ. श्री. पंडित, आधुनिक कवितेचे प्रणेते, भाग १. दिगंबर मारुती घुमाळ, नागपूर, १९७१, प्र. पृ. २२२. १६. रा. श्री. जोग, वि. वा. शिरवाडकर, काव्यवाहिनी भाग १, अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६७, तृ. पृ १६२. १७. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. १२८, १३५. १८. ए. पां. रेंदाळकर, सुघडी नयन, कवी ए. पां. रेंगदाळकर. १९. रा. ग. गडकरी, (गोविंदाग्रज) वाग्वैजयंती, ना. त्र्यं.

भिडे, पुणे, सातवी आवृ. १९४९. २०. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते, भाग २, दि. मा. घुमाळ, नागपूर, पृ. ४३७, २१. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग १, स. कृ. पाध्ये, पुणे १९७४, तृ. पृ. २८३. २२. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. ३१३. २३. ग. त्र्यं. माडखोलकर, तत्रैव, पृ. ३१४. २४. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, र. दि. देसाई, मुंबई, १९४६, प्र. पृ. ९९. २५. द. भि. कुलकर्णी, पहिली परंपरा, मनोहर पिंपळापुरे, नागपूर, १९७६, प्र. पृ. १९. २६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग १. पृ. ३३४. २७. ग. त्र्यं. माडखोलकर, आधुनिक कवी पंचक, पृ. ६१–६२. २८. वि. ज. करंदीकर, विनायकांची कविता, संपादक–अनंततनय, चित्रशाळा प्रेस पुणे, द्वि. १९२५, गो. पां. देवधर यांना विनायकाचे पत्र, पृ. १३–१४. २९. ना. के. बेहरे, काव्यचर्चा, संपादक, ना. म. भिडे, अनंततनय, शं. न. जोशी, पुणे, १९२५ पृ. ३२२. ३०. वा. ब. पटवर्धन, काव्यचर्चा, प्रस्तावना, पृ. ९. ३१. म. ना. अदवंत, महाराष्ट्र लक्ष्मी (निवडक कवी विनायक), अ. ज. प्रभू, पुणे, १९६३, प्र. पृ. १९. ३२. कृ. ब. निकुंब, मराठी वाङमयाचा इतिहास खंड ५, भाग १, संपा. रा. श्री. जोग, भीमराव कुळकर्णी, पुणे, १९७३, प्र. पृ. ३०७–३०८. ३३. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. ३०७. ३४. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ६९. ३५. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग १. पृ. ३९६. ३६. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ६७. ३७. अ. ना. देशपांडे, आ. स. वा. इति. भाग १, पृ. ३९६. ३८. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते भाग २, पृ. २८१. ३९. ना. के. बेहरे, काव्य चर्चा, पृ. ३१७. ४०. वि. ज. करंदीकर, विनायकाची कविता–संपा. अनंततनय, विनायकाचे चरित्र, पृ. १९.

प्रकरण ५

१. ज. घु. नाईकवाडे, युगवाणी, नागपूर, अंक, ऑगस्ट–सप्टेंबर, १९७४, लेख–स्वातंत्र्य कवी बी, पृ. १६०. २. कुसुमावती देशपांडे, पासंग, वा. पु. भागवत, मुंबई, १९६१, द्वि. पृ. ९३. ३. ज. घु. नाईकवाडे, युगवाणी, नागपूर, अंक, ऑगस्ट–सप्टेंबर, १९७४, स्वातंत्र्य कवी बी. पृ. १६०. ४. ज. घु. नाईकवाडे, तत्रैव, १६०–१६१. ५. ज. घु. नाईकवाडे, तत्रैव पृ. १६१–१६२. ६. ज. घु. नाईकवाडे, तत्रैव, पृ. १६२, ७. ज. घु. नाईकवाडे, तत्रैव, पृ. १६२. ८. ज. घु. नाईकवाडे, तत्रैव, पृ. १६२–१६३. ९. वि. दा. सावरकर, मॅझिनी आत्मचरित्र आणि राजकारण, वि. दा. सावरकर, प्रस्तावना, व्हीनस बुक स्टॉल, पुणे, १९४६, द्वि. आवृत्ती. १०. कवी बी, फुलांची ओंजळ आणि पिकले पान, कविता संग्रह, अ. अं. कुलकर्णी. पुणे, १९५८, च. पृ. ३९–४०. ११. वा. भा. पाठक, आधुनिक मराठी काव्याचे अंत:प्रवाह, वा. भा. पाठक, ग. ल. ठोकळ, पुणे, १९६४, पृ. ३८, १२. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, भ. श्री. पंडित, पां. ना. बनहट्टी, नागपूर, १९५२, प्र. पृ. १६२. १३. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग १, स. कृ. पाध्ये, पुणे, १९७४ पुनर्मुद्रण, पृ. ३९२–३९३. १४. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, र. दि. देसाई, मुंबई, पृ. १०८. १५. प्र. के. अत्रे, फुलांची ओंजळ, प्रस्तावना, सत्कार, पृ. ११. १६. प्र. के. अत्रे, तत्रैव, पृ. ३९–४०. १७. सौ. आशा सावदेकर कविवर्य भा. रा. तांबे, एक चिकित्सक अभ्यास, सौ. आ. अ. बलसारा.

नागपूर, १९७९, प्र. पृ. १७७. १८. भ. श्री. पंडित, तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य; स. कृ. पाध्ये, पुणे, १९७२, पृ. २८–२९. १९. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. १८९. २०. वा. भा. पाठक, आधुनिक मराठी काव्याचे अंतःप्रवाह, पृ. ५५. २१. भा. रा. तांबे, दुसरी परंपरा; द. भि. कुलकर्णी, गजाभाऊ देशमुख, नागपूर, १९७४, प्र. पृ. ३५. २२. द. भि. कुलकर्णी, तत्रैव, पृ. ३५. २३. भा. रा. तांबे, कविवर्य भा. रा. तांबे, एक चिकित्सक अभ्यास, सौ. आशा सावदेकर, पृ. १७८. २४. भा. रा. तांबे, तत्रैव पृ. १८२. २५. भ. श्री. पंडित, तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य, पृ. १४८. २६. श्री. के. क्षीरसागर, दुसरी परंपरा, द. भि. कुलकर्णी पृ. ४०. २७. भा. रा. तांबे; तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य, भ. श्री. पंडित, पृ. १५९. २८. सौ. आशा सावदेकर, कविवर्य भा. रा. तांबे एक चिकित्सक अभ्यास, पृ. १३६. २९. भ. श्री. पंडित, तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य, पृ. १५०. ३०. ग. त्र्यं. माडखोलकर; कविवर्य भा. रा. तांबे एक चिकित्सक अभ्यास, पृ. १२४. ३१. वा. गो. मायदेव, तांबे यांची समग्र कविता, संपा. वा. गो. मायदेव; केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९४५ ति. आ. टीपा. पृ. २९७. ३२. भ. श्री. पंडित, तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य, पृ. १५६.३२३. भ. श्री. पंडित, तत्रैव पृ. १५५. ३४. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. १५५. ३५. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. १५२–१५३. ३६. सौ. आशा सावदेकर, कविवर्य भा. रा. तांबे एक चिकित्सक अभ्यास, पृ. १३६–१३७. ३७. वा. गो. मायदेव, तांबे यांची समग्र कविता, प्रस्तावना पृ. १०. ३८. भ. श्री. पंडित, तांबे आणि त्यांचे गीतिकाव्य, पृ. १५९. ३९. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, पृ. १४६. ४०. द. भि. कुलकर्णी, दुसरी परंपरा, पृ. ५५. ४१. सौ. आशा सावदेकर, कविवर्य भा. रा. तांबे एक चिकित्सक अभ्यास, पृ. १२४–१२७. ४२. बाळ जेरे, रविवारची लोकसत्ता, मुंबई, रविवार दि. ९, फेब्रुवारी १९७५, लेख पृ. ६. ४३. वि. दा. सावरकर, स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांची कविता, कृ. ब. महाबळ; १९४३, आ. ति. परिशिष्टांक. ४४. ज. घु नाईकवाडे, 'प्रज्ञालोक' त्रैमासिक अंक, ६ एप्रिल १९७४, नागपूर, पृ. १७०–१७१. ४५. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४१५. ४६. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, दि. मा. घुमाळ, नागपूर, १९६५, प्र. पृ. २०७. ४७. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४१५. ४८. रा. श्री. जोग, स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद यांची कविता, काव्यविवेचन, ४९. अ. ना. देशपांडे; आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४१५. ५०. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, पृ. १९५. ५१. नि. शं. ठकार, मराठी कविता–स्वरूप आणि विवेचन, डॉ. वि. प. महाजन, पुणे, १९७७, प्र. पृ. २७५. ५२. बाळ जेरे, रविवारची लोकसत्ता, मुंबई, रवि. दि. ९ फेब्रुवारी १९७५, लेख. ५३. वि. दा. सावरकर, स्वातंत्र्य शाहीर कवि गोविंद यांची कविता–परिशिष्टांक. ५४. कृ. ब. निकुंब, म. वा. इति. खंड पाचवा, भाग पहिला, संपा. रा. श्री. जोग, भीमराव कुलकर्णी, पुणे. १९७३. पृ. ३११. ५५. प्र. ल. गावडे, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, वि. प. महाजन, पुणे, १९७०, प्र. पृ. ३१५. ५६. प्र. ल. गावडे, तत्रैव, पृ. ३१५. ५७. वि. दा. सावरकर समग्र सावरकर वाङमय खंड १. चरित्र खंड, आत्मवृत्त, शं. रा. दाते, १९६३; प्र. पृ. ११६–११७. ५८. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ११९. ५९. वि. दा. सावरकर, माझ्या आठवणी, तत्रैव, पृ. १२३. ६०. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १८१. ६१. वि. दा. सावरकर; तत्रैव, पृ. १८०, ६२. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. १४३. ६३. ना. दा. सावरकर; समग्र सावरकर वाङमय खंड ७, काव्य नाटक विभाग, शं. रा. दाते, १९६५, संपादकाची परिचयात्मक टीप, पृ. २५३. ६४. संपादक–

स. सा. वा. खंड ७, संपादकीय टीप, तत्रैव, पृ. २४३. ६५. अनंत काणेकर, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान; लाड स्मारक व्याख्यानमाला; माहिती आणि नभोवाणी मंत्रालय; भारत सरकार, १९६४, पृ. ६१–६२. ६६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ३६. ६७. धनंजय कीर, 'सावरकर एक चिकित्सक अभ्यास,' प्र. ल. गावडे, पृ. ३४३. ६८. अ. ना. देशपांडे; आ. म. वा. इ. भाग २, पृ. २५. ६९. काका कालेलकर तत्रैव, पृ. ३१. ७०. व. ना. नाईक; तत्रैव, पृ. २५. ७१. वा. ब. गोगटे, हॉटसन गोगटे, आत्मवृत्त, मे १९३०, पृ. १८–१९. ७२. प्र. ल. गावडे, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, पृ. ३५५. ७३. प्र. ल. गावडे, तत्रैव, पृ. ३६६. ७४. के. ना. वाटवे, तत्रैव, पृ. ३३५. ७५. हुमायून कबीर; रविन्द्रनाथांच्या १०१ कविता (मूळ बंगालीचा मराठी अनुवाद) साहित्य अकादमी प्रकाशन; १९६३, पृ. १४. ७६. हुमायून कबीर; तत्रैव पृ. १६. ७७. वि. दा. सावरकर; समग्र सावरकर वाङमय खंड ७; परिचयात्मक टीप, पृ. ४७–४८. ७८. कवी साधुदास, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, पृ. ३७७. ७९. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. २५, २६. ८०. प्र. ल. गावडे, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, पृ. ३७७–३७८. ८१. वि. दा. सावरकर, स. सा. वा. खंड १; चरित्र खंड आत्मवृत्त– माझी जन्मठेप, पृ. २७५. ८२. प्र. ल. गावडे, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, पृ. ३७९. ८३ वा. गो. मायदेव, तत्रैव, पृ. ३००. ८४. के. ना. वाटवे, तत्रैव, पृ. ३००. ८५. वा. ना. देशपांडे; तत्रैव, पृ. ३८०. ८६. ग. त्र्यं. माडखोलकर; तत्रैव, पृ. ३८०. ८७. बाळशास्त्री हरदास, तत्रैव, पृ. ३८०. ८८. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. ३८०. ८९. प्र. ल. गावडे, तत्रैव, पृ. ३८०. ९०. वि. दा. सावरकर, समग्र सावरकर वाङमय खंड ४, पृ. ४३०–४३१. ९१. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ४३६. ९२. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ४८५. ९३. वि. दा. सावरकर, तत्रैव, पृ. ४८७. ९४. वि. दा. सावरकर, सावरकर एक चिकित्सक अभ्यास, प्र. ल. गावडे, पृ. ३८७. ९५. द. भि. कुलकर्णी, दैनिक तरुण भारत, साप्ताहिक अंक, नागपूर, दि. १३–१२–१९७०. ९६. श्री. रा. बोवडे, श्रीनिवास बोबडे यांची समग्र कविता, नागपूर साहित्य संघ, प्रकाशन, नागपूर, १९७८, कमला, पृ. ४१–४३. ९७. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, पृ. २१३–२१४. ९८. कृ. पां. कुळकर्णी, स्वातंत्र्य कवी गोविंद यांची कविता, पृ. ९. ९९. ना. के. बेहरे, मराठ्यांची संग्राम गीते, कवी दु. आ. तिवारी, दा. ना. मोघे, कोल्हापूर, आठवी आवृत्ती, प्रस्तावना, म. ना. अदवंत, १९५४, पृ. १४. १००. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, पृ. १४२. १०१. म. ना. अदवंत, मराठ्यांची संग्राम गीते, प्रस्तावना, पृ. ११. १०२. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, पृ. २७१. १०३. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. ३२४. १०४. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, पृ. १४२. १०५. म. ना. अदवंत, मराठ्यांची संग्राम गीते, प्रस्तावना, पृ. २०. १०६. वा. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, अ. ना. देशपांडे, पृ. ४१७. १०७. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, पृ. २०९–२१०. १०८. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति भाग २, पृ. ४३१. १०९. आ. रा. देशपांडे, कै. श्री. रा. बोवडे यांची समग्र कविता, संपा. दि. वा. फडणवीस, नागपूर, पृ. १०. ११०. दि. वा. फडणवीस, तत्रैव, पृ. ४. १११. आ. रा. देशपांडे, तत्रैव, पृ. १५. ११२. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, पृ. २०९. ११३. दि. वा. फडणवीस, कै. श्री. रा. बोबडे यांची समग्र कविता, पृ. ५. ११४. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४३८. ११५. श्रीसमर्थ रामदास, श्रीमनाचे श्लोक आणि करुणाष्टके,

संपा. ग. का. रायकर, जयहिंद प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ. ५, श्लोक १५. ११६. मा. श्री. अणे; आनंद गीत (भाग ३) कवी आ. कृ. टेकाडे, प्रकाशक, आ. कृ. टेकाडे, नागपूर, १९२८, प्रस्तावना, पृ. २३. ११७. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, पृ. ३२३–३२४. ११८. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति, भाग २. पृ. ४२०–४२१. ११९. भ. श्री. पंडित, आधुनिक मराठी कविता, पृ. २०७. १२०. वा. भा. पाठक, आ. म. का. अंत:प्रवाह, पृ. १४५. १२१. भ. श्री. पंडित, आ. मा. कविता, पृ. २०७. १२२. ना. के. बेहरे, मोत्यांची माळ, कवी, ना. के. बेहरे, परचुरे पुराणिक आणि मंडळी, मुंबई, १९३०, प्र. पृ. २६–२७. १२३. ना. के. बेहरे, केशवसुतांची कविता, प. चि. दामले, राहूरी, १९४२, आ. च. प्रस्तावना, पृ. ४३–४४. १२४. ना. के. बेहरे, मोत्यांची माळ, प्रस्तावना, पृ. ३६५. १२५. ना. के. बेहरे तत्रैव, पृ. ३६५. १२६. ना. के. बेहरे, तत्रैव, पृ. ३६५. १२७. ना. के. बेहरे, तत्रैव, पृ. १४–१५. १२८. ना. के. बेहरे, तत्रैव, पृ. १५–१६. १२९. रा. श्री. जोग, अ. म. का. पृ. २४७. १३०. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पृ. २०५–२०६. १३१. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४२१. १३२. वा. भा. पाठक, आ. म. का. अंत:प्रवाह, पृ. १४५. १३३. स. ज. भागवत, समग्र राघारमण, कवी राघारमण, चि. कृ. लिमये, १९४९, प्र. प्रस्तावना, पृ. ६९–७०. १३४. ह. कि. तोडमल, अ. म. खंड काव्ये, पृ. २९१. १३५. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग १, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७४, पृ. ३८८.

प्रकरण ६

१. सु. म. डोळके, 'तरुण भारत' नागपूर, लेख, महात्मा गांधी गौरव ग्रंथ परीक्षण, उत्तरार्ध, दि. १९–४–१९७०. २. सु. म. डोळके, तत्रैव; दि. १९–४–१९७०. ३. द. म. सुतार, सेनापती बापट–वाङ्मय–समग्र ग्रंथ खंड २, महाराष्ट्र राज्य, द्वि. आवृत्ती, १९७७, पृ. २४. ४. पां. म. बापट, सेनापती बापट–वाङ्मय–समग्र ग्रंथ खंड २. महाराष्ट्र राज्य, द्वि. आवृत्ती, १९७७, पृ. ६६–६७. .पां .स. साने, तत्रैव, प्रस्तावना, पृ. ५४–५५. ६. पां. स. साने, तत्रैव, पृ. ५५. ७. भ. श्री पंडित, आधुनिक मराठी कविता, पां. ना. बनहट्टी, नागपूर, प्र. आ. १९५२, पृ. २१६. ८. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इतिहास भाग २, स. कृ. पाध्ये, पुणे, प्र. आ. १९५८, पृ. ४२१. ९. पां. स. साने, सेनापती बापट–वाङ्मय–समग्र ग्रंथ, खंड २, महाराष्ट्र राज्य, द्वि. आवृत्ती १९७७, ४५. १०. शं. वा. दांडेकर, तत्रैव, पृ. ४३१–४३६. ११. लक्ष्मणशास्त्री जोशी, तत्रैव, प्रस्तावना, पृ. १. १२. प्र. के. अत्रे, 'मराठी माणसे, मराठी मने', ग. पां. परचुरे, मुंबई, आ. पाचवी, १९६३, पृ. ११४. १३. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पां. ना. बनहट्टी, नागपूर, प्र. आ १९५२, पृ. २१६. १४. स. ज. भागवत, आ. म. वा. इतिहास, भाग २, पृ. ४१९. १५. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ४१९. १६. वा. भा. पाठक, आ. म. का. अंत:प्रवाह, ग. ल. ठोकळ, पुणे, प्र. आ. १९६४. पृ. १४०. १७. बा. सी. मर्ढेकर, मर्ढेकरांची कविता, श्री. पु. भागवत, मुंबई, आ. १९७७, पृ. ११०. १८. गं. दे. खानोलकर, माधव ज्यूलियन–जीवन कथा, गं. दे. खानोलकर, मुंबई, प्र. आ. १९५१, पृ. १–२. १९. गं. दे. खानोलकर, तत्रैव, पृ. १२. २०. गं. दे. खानोलकर, तत्रैव, पृ. १२. २१. द. न. गोखले, समग्र माधव ज्यूलियन खंड १, स. कृ. पाध्ये, पुणे, प्र. आ.

१९७७, पृ. १८. २२. मा. त्रि. पटवर्धन, माधवराव पटवर्धन वाङ्मय दर्शन, वि. पु. भागवत, मुंबई, प्र. १९७३, पृ. ६०. २३. मा. त्रि. पटवर्धन, स. मा. ज्यूलियन खंड २, 'सुधारक' प्रस्तावना, स. कृ. पाध्ये, पुणे, प्र. १९७७, पृ. ९. २४. मा. त्रि. पटवर्धन, माधवराव पटवर्धन वाङ्मय दर्शन, वि. पु. भागवत, मुंबई, प्र. १९७३. पृ. ६४. २५. मा. त्रि. पटवर्धन, स. मा. ज्यूलियन खंड २, पृ. ९. २६. मा. त्रि. पटवर्धन, मराठी साहित्य संमेलन-अध्यक्षीय भाषणे, भीमराव कुलकर्णी, पुणे, आ. १९७१, पृ. ३७६. २७. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पां. ना. बनहट्टी, नागपूर, प्र. आ. १९५२. पृ. २२५. २८. बा. अ. भिडे, आ. म. वा. इति. भाग २, अ. ना. देशपांडे, पृ. ३८९. २९. रा. श्री. जोग, तत्रैव, पृ. ३९८. ३०. गं. दे. खानोलकर, तत्रैव, पृ. ३९४. ३१. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ३९७. ३२. ग. त्र्यं. माडखोलकर, माझे आवडते कवी, दि. मा. घुमाळ, नागपूर, प्र. १९६५, पृ. २४६-२४७. ३३. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, ग. ल. ठोकळ, पुणे, प्र. १९६४, पृ. १४७. ३४. द. न. गोखले, स. मा. ज्यूलियन, खंड १, प्रस्तावना. पृ. १९. ३५. सु. रा. चुनेकर, तत्रैव, पृ. १५३-१५५. ३६. रा. श्री. जोग, अर्वाचीन मराठी काव्य, र. दि. देसाई, मुंबई, प्र. १९४६, पृ. १९७-१९८. ३७. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ३९९. ३८. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ४००. ३९. बालशंकर देशपांडे, मराठीचे मानकरी; देवेन्द्र दलाल, मुंबई, प्र. १९६४, पृ. ३००. ४०. वि. स खांडेकर, 'पाणपोई' यशवंत, प्रस्तावना; अ. अं. कुलकर्णी, पुणे, द्वि. १९५४, पृ. ११. ४१. य. दि. पेंढारकर, 'छत्रपती शिवराय महाकाव्य', अ. अं. कुलकर्णी, पुणे, प्र. १९६८, पृ. ९. ४२. ग. त्र्यं. माडखोलकर, 'माझे आवडते कवी', पृ. ६५. ४३. य. दि. पेंढारकर, छत्रपती शिवराय-महाकाव्य, 'हिंदोला' पृ. ७३९. ४४. य. दि. पेंढारकर, यशोधन-(काव्य संग्रह) पृ. ६२-६३. ४५. य. ब. चव्हाण, 'छत्रपती शिवराय-महाकाव्य' पुरस्कार, पृ. २. ४६. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. २०४. ४७. रा. श्री. जोग, तत्रैव, पृ. २०५-२०६. ४८. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पृ. २३४. ४९. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इतिहास भाग २, पृ. ४०२. ५०. ग. त्र्यं. माडखोलकर, 'माझे आवडते कवी' पृ. ६५. ५१. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इतिहास, भाग २. पृ. ४४५. ५२. भा. शं. भणगे, तत्रैव, पृ. ४४५. ५३. धों. वा. गद्रे उपाख्य 'काव्यविहारी' स्फूर्ति लहरी, स्फुट कवितांचा संग्रह, ना. वा. गद्रे, १९३६, आत्मनिवेदन, पृ. ३८-३९. ५४. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. २२३. ५५. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४४४. ५६. रा. श्री. जोग, अ. म. काव्य पृ. १४८. ५७. श्री. नि. चापेकर, 'हृदय तरंग' पुस्तक २ रे, कवी द. अ. आपटे, शं. न. जोशी, पुणे, प्र. शके १८४२, पृ. ४३. ५८. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. २३०. ५९. भा. रा. तांबे, अज्ञातवासींची कविता, कवी अज्ञातवासी, तु. पुं. शेटये, मुंबई, प्र. १९३३. पृ. ५. ६०. रा. श्री. जोग, अ. म. काव्य पृ. २३२. ६१. भा. रा. तांबे, 'अज्ञातवासींची कविता', पृ. ५. ६२. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. २३२. ६३. भ. श्री. पंडित, आ. म. कविता. पृ २१५. ६४. आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४१६-४१७. ६५. नि. शं. ठकार, 'मराठी कविता-स्वरूप आणि विवेचन' वि. प. महाजन, पुणे, प्र. १९७७. पृ. ३००-३०१. ६६. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, पृ. ६३-६४. ६७. प्र. के. अत्रे, 'आशा गीत (ओढणी व इतर कविता) कवी, वा. भा. पाठक, प्रकाशक, वा. भा. पाठक, प्र. १९३३. प्रस्तावना, प्र. के. अत्रे, पृ. ८. ६८. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २. पृ. ४४८. ६९. ज. शा. देशपांडे, आहुती-स्वातंत्र्यशाहीर कुंजविहारी यांचा कविता-

संग्रह, प्रकाशक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्र. १९७२. ७०. नि. शं. ठकार, 'मराठी कविता–स्वरूप आणि विवेचन' पृ. २९८. ७१. ज. शा. देशपांडे, 'आहुती'–कवितासंग्रह, प्रस्तावना. ७२. वि. म. कुलकर्णी, लेख, राष्ट्रभक्तीने भारलेला थोर कवी कुंजविहारी, तरुण भारत, पुणे, अंक १२–११–१९७८. ७३. ह. कि. तोडमल, 'अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये' अ. अं. कुलकर्णी, पुणे, प्र. १९६३, पृ. ३६८. ७४. चिं. नी. जोशी, 'मराठवाड्यातील अर्वाचीन मराठी वाङमय (पद्य विभाग), य. गो. जोशी, प्र. १९३९, पृ. ९२–९३, ७५. दासगणू महाराज, तत्रैव, पृ. १०७–१०८. ७६. चिं. नी. जोशी, तत्रैव, पृ. ११२. ७७. यशवंतराव कोरेकल, तत्रैव, पृ. १०७. ७८. यशवंतराव कोरेकल, तत्रैव, पृ. १९४–१९६. ७९. यशवंतराव कोरेकल, तत्रैव, पृ. २०५–२०७. ८०. प्रो. लेले, तत्रैव, पृ. २६७–२६८. ८१. चिं. नी. जोशी, तत्रैव, पृ. २६७–२६८. ८२. चिं. नी. जोशी, तत्रैव पृ. २८४–२८५. ८३. चिं. नी. जोशी, तत्रैव पृ. ३५६, ८४. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. २७५–२७६. ८५. प्र. के. अत्रे, 'श्री महाराष्ट्र शारदा–कविता संग्रह, भाग २, संपादक, प्रकाशक, प्र. के. अत्रे, प्र. १९३०. ८६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ, ४२२, ८७. अ. ना. देशपांडे, तत्रैव, पृ. ४२३. ८८. लहरी हैदर, आधुनिक फाजील सुधारणांवरील पोवाडा, रामचंद्र बाबाजी, कोल्हापूर, १९३४, ८९. लहरी हैदर, कै. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांचा पोवाडा, रामचंद्र बाबाजी, कोल्हापूर, १९२९, ९०. पां. द. खाडिलकर, महाराष्ट्र शाहीर पां. द. खाडिलकर, पोवाडे भाग १, प्रकाशक पां. द. खाडिलकर, द्वि. १९४६. ९१. ग. दि. माडगूळकर, 'शाहिरी नौबद–विशेषांक' प्रथम अधिवेशन, पुणे, १९७०, महाराष्ट्र शाहीर परिषद, पुणे. ९२. अनंत फंदी, दैनिक केसरी, पुणे, अंक दि. १३–८–१९७८, लेख, 'महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर एक गुणी कलावंत'. ९३. भालचंद्र कहाळेकर, 'जय महाराष्ट्र पोवाडा', शाहीर न. शे. पोहनेरकर, गुंफराज प्रकाशन, मुंबई. ९४. चिं. नी. जोशी, म. अ. म. वाङमय (पद्य विभाग) य. गो. जोशी, प्र. १९३९. ९५. पां. द. खाडिलकर, 'शाहीर खाडिलकर यांचे पोवाडे आणि इतर शाहिरी कवन,' द्वितीय खंड, चंद्रभूषण, मुंबई, प्र. १९६८. ९६. पां. द. खाडिलकर. 'पोवाडे वाङमय दर्शन (मंत्र, तंत्र, यंत्र) एक साधन ग्रंथ' पां. द. खाडिलकर, मुंबई, प्र. १९७५. ९७. पां. द. खाडिलकर, तत्रैव, ९८. पां. द. खाडिलकर, शाहीर खाडिलकर यांचे पोवाडे, भाग १, प्रका. लेखक, खाडिलकर, मुंबई, द्वि. १९४६. ९९. पां. द. खाडिलकर, शाहीर खाडिलकर यांचे पोवाडे आणि इतर शाहिरी कवन, द्वितीय खंड, चंद्रभूषण, मुंबई, १९६८. १००. रा. श्री. जोग, अ. म. काव्य. १०१. रा. बा, आठवले, 'शाहिरी वाङमय' या अनंत फंदी यांच्या टंकमुद्रित, अप्रकाशित प्रबंधावरून, नागपूर. १०२. अनंत फंदी, 'रविवारची लोकसत्ता', मुंबई, दि. १८–६–१९७८, 'दांडपट्ट्याप्रमाणेच लेखणीची चमक दाखविणारे अपेक्षित अष्टपैलू शाहीर नानिवडेकर. १०३. अनंत फंदी, 'शाहीर सम्राट श्री. बापूराव विभूते, बुधगाव, जि. सांगली यांच्याकडून मिळविलेल्या माहितीच्या आधारे–(अनंत फंदी यांचा टंकमुद्रित प्रबंध शाहीरी वाङमय). १०४. अनंत फंदी, शाहीर मुळे यांच्याशी केलेल्या भेटीच्या व पत्रव्यवहाराच्या आधारे, संकलक, अनंत फंदी; नागपूर. १०५. अनंत विष्णू मुळे, 'वडगांवची लढाई पोवाडा', शाहीर मुळे, प्रस्तावना, डॉ. ना, दा. सावरकर, १९२८. १०६. सिद्राम बसाप्पा मुचाटे, 'राणा प्रतापाचा पोवाडा', प्र. आ, १९४३. १०७. सिद्राम बसाप्पा मुचाटे, वीरांगना कित्तूर चन्नाम्मा पोवाडा, शाहीर मुचाटे आ. २, १९४३; १०८. सिद्राम बसाप्पा मुचाटे, 'रविवार लोकसत्ता' मुंबई, दिनांक २९–१–१९७८, 'शीघ्रकवी

राष्ट्रशाहीर सिंद्राम मुचाटे, लेखक–अनंत फंदी, नागपूर. १०९. शाहीर बाबुलनाथ, 'त्रिवेणी' कवी बाबुलनाथ; वि. शा. काळे; पुणे, आ. १९८० पृ. २२–३४.

प्रकरण ७

१. भ. श्री. पंडित, 'आधुनिक मराठी कविता' सुविचार प्रकाशन, नागपूर. प्र. १९५२, पृ. २८१–२८२. २ अ. ना. देशपांडे, 'आ. म. वा. इतिहास भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र. १९५८; पृ. ४७०. ३. ना. ग. जोशी, 'साहित्य विवेचन' व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र. १९६८, पृ. १८४–१८५. ४. वा. भा. पाठक, आ. म. का. अंत:प्रवाह 'ठोकळ प्रकाशन', पुणे, प्र. १९६४, पृ. ६५. ५. मं. वि. राजाध्यक्ष, 'सांगाती', कवी अनिल, मौज प्रकाशन मुंबई ति. १९७१, पृ. १२. ६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इतिहास भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र. १९५८, पृ. ४७०. ७. दि. के. बेडेकर, 'म. क. स्व. आणि विवेचन', प्रा. नि. शं. ठकार, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्र. १९७७, पृ. ३११. ८. वि. स. जोग, 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९८१, पृ. ३५७. ९. रा. श्री. जोग, 'अर्वाचीन मराठी काव्य', र. दि. देसाई, मुंबई, प्र. १९४६, पृ. २५२. १०. वि. स. खांडेकर, 'किनारा' कवी– कुसुमाग्रज, देशमुख आणि कंपनी, पुणे, द्वि. १९६५, पृ. १९. ११. नि. शं. ठकार, 'म. क.–स्व. आणि विवेचन,' स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, प्र. १९७७, पृ. ३१४. १२. प्रभाकर अत्रे, 'कुसुमाग्रज' मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, प्र. १९६१, पृ. १७. १३. प्रभाकर अत्रे, तत्रैव पृ. १९. १४. घो. वि. देशपांडे, 'सत्यकथा', मासिक वर्ष २१ अंक २, डिसें. १९५३, लेख– विशाखा ते किनारा, पृ. ७. १५. वि. स. जोग, 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य', पृ. ३६४. १६. वि. स. जोग, तत्रैव, पृ. ३६४. १७. प्रभाकर अत्रे, 'कुसुमाग्रज', पृ. ३७–३८. १८. वि. स. खांडेकर, 'विशाखा', कवी– कुसुमाग्रज, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, नववी आ. १९७९, प्रस्तावना, पृ. १०. १९. रा. श्री. जोग, 'अ. म. काव्य', पृ. ३०४. २०. भ. श्री. पंडित, 'आ. म. कविता', पृ. ३९०. २१. वा. भा. पाठक, आ. म. का. अंत:प्रवाह, पृ. १५१–१५२. २२. वा. ल. कुळकर्णी, 'मराठी कविता जुनी आणि नवी', पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. १९८०, पृ. १९४. २३. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इतिहास भाग २, पृ. ४८०. २४. प्र. न. जोशी, 'मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्र. १९७९, पृ. १९९. २५. वा. म. जोशी; 'नन्दादीप' कवी, दा. अ. कारे, प्रकाशक का. श्री. नायक प्र. १९३४, प्रस्तावना, पृ. ८. २६. अ. ना. देशपांडे, 'आ. म. वा. इति. भाग २', पृ. ४८३. २७. काका कालेलकर, 'दूधसागर' कवी. बा. भ. बोरकर, ढवळे प्रकाशन, मुंबई, प्र. १९४७, पृ. ८. २८. काका कालेलकर, तत्रैव, पृ. ८. २९. रा. श्री. जोग, 'अ. म. काव्य', पृ. ३०७. ३०. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८२. ३१. भ. श्री. पंडित, 'आ. म. कविता' पृ. २७१. ३२. वा. भा. पाठक, 'आ. म. का. अंत:प्रवाह, पृ. ६५ ३३. वा. ल. कुलकर्णी, 'साहित्य शोध आणि बोध', पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. १९६७, पृ. १७८. ३४. म. शं. वाबगावकर, 'संशोधन व चिंतन', साहित्य प्रसार केन्द्र प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७२, पृ. १९८–१९९. ३५. नि. शं. ठकार, म. क. स्वरूप आणि विवेचन, पृ. ३१८. ३६. शं. वि. वैद्य, 'आदित्य' कवी– मनमोहन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. १९७१, पृ. १, ६, १२–३४.

३७. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४९४. ३८. नि. शं. ठकार, 'म. क. स्व. आणि विवेचन', पृ. ३२५. ३९. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, पृ. १५१. ४०. अ. ना. देशपांडे; आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४५०. ४१. वि. भि. कोलते, 'आ. म. कविता'– भ. श्री. पंडित, लेख–भ. श्री. पंडितांची कविता, पृ. २७६. ४२. वि. भि. कोलते, तत्रैव, पृ. २७५. ४३. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४५०. ४४. भाऊ मांडवकर, 'राष्ट्रसंत की जीवन झांकी', अर्थात संत तुकडोजी महाराज का जीवन चरित्र, सेवा प्रकाशन, नागपूर; प्र. १९५४, पृ. १–१८. ४५. बालकवी पुरुषोत्तमदास, 'कार्यरूप राष्ट्रसंत– अर्थात श्री. तुकडोजी महाराज की व्यक्ति, वाङमय व कार्यविषयक संक्षिप्ततम परिचय–पुस्तिका, प्रकाशन, १९६३; पृ. १–९. ४६. तुकडोजी महाराज, 'श्री ग्रामगीता', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित, तुकारामची गीताचार्य, सातवी आवृत्ती, १९८१, पृ. १–२७. ४७. तुकडोजी महाराज, 'राष्ट्रीय भजनावली–मराठी', जी. डी. निकम; मोझरी, जि. अमरावती, द्वि. १९७६, पृ. ४. ४८. तुकडोजी महाराज, तत्रैव, पृ. ३. ४९. तुकडोजी महाराज तत्रैव, पृ. ५. ५०. तुकडोजी महाराज, 'राष्ट्रीय भजनावलि (हिन्दी) जी. डी. निकम, मोझरी, जि. अमरावती, प्र. १९६९. ५१. मा. स. गोळवलकर, 'दैनिक तरुण भारत', नागपूर, अंक, ३०. आक्टो. १९६९, लेख, 'जनमानसात राष्ट्रप्रेमाची ज्योत फुलविणारा प्रतिभाशाली संत', पृ. २. ५२. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४६३. ५३. भ. श्री. पंडित, 'आ. म. कविता', पृ. ७१. ५४. भ. श्री. पंडित, तत्रैव, पृ. २८७. ५५. प्रभाकर पाध्ये, 'रुद्रवीणा' कवी, वा. रा. कांत, प्रकाशक, न. मा. कुलकर्णी, औरंगाबाद; प्र. १९४७, प्रस्तावना, पृ. ६–७. ५६. चिं. नी. जोशी, 'मराठवाडयातील अर्वाचीन मराठी वाङमय पद्यविभाग', प्रकाशक, य. गो. जोशी, पुणे. प्र. १९३९, पृ. ३३८. ५७. प्रभाकर पाध्ये, 'रुद्रवीणा', प्रस्तावना, पृ. ३–४. ५८. प्रभाकर पाध्ये, तत्रैव, पृ. ७. ५९. भ. श्री. पंडित, 'आ. म. कविता,' पृ. २९४. ६०. अ. ना. देशपांडे, 'आ. म. वा. इति. भाग २', पृ. ४८१–४८२. ६१. प्र. न. जोशी, 'म. वा. वि. इतिहास', पृ. २०१. ६२. नि. शं. ठकार, 'म. क. स्व. आणि' विवेचन,' पृ. ३२१. ६३. चिं. नी. जोशी, म. अ. म. वा. पद्यविभाग, पृ. ३२७. ६४. रा. श्री. जोग; अ. म. काव्य, पृ. ३१४. ६५. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पृ. २९२–२९३. ६६. कृ. ब. निकुंब, 'उज्ज्वला' कवी– निकुंब, के. बी. ठवळे प्रकाशन, मुंबई, प्र. १९४५, प्रस्तावना, आ. रा. देशपांडे. ६७. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८७. ६८. प्र. न. जोशी, म. वा. वि. इतिहास, पृ. २०१. ६९. नि. शं. ठकार, म. क. स्व. आणि विवेचन, पृ. ३३१. ७०. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. ३०८. ७१. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८७. ७२. रा. अ. काळेले, 'भावपूर्णा–कवी–रा. अ. काळेले, इंदूर, त्रि. अ. माईणकर, इंदूर, प्र. १९४२. प्रस्तावना, रा. अ. काळेले. ७३. रा. अ. काळेले, 'हिम अंगार–कवी– रा. अ. काळेले, प्रकाशक, रा. अ. काळेले, प्र. १९५५. ७४. रा. अ. काळेले, 'गीत निर्वाण'–कवी. रा. अ. काळेले, प्रकाशक; त्रि. अ. माईणकर, इंदूर, प्र. १९४९. ७५. रा. श्री. जोग, अ. म. काव्य, पृ. ३०८. ७६. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पृ. २९३. ७७. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८७ ७८. नि. शं. ठकार, म. क. स्व. आणि विवेचन, पृ. ३२२. ७९. स. ज. भागवत, 'अग्नि पराग कवी– श्रीकृष्ण पोवळे, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र. १९४६, पुरस्कार, पृ. २. ८०. अ. ना. देशपांडे आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८५–४८६. ८१. स. ज. भागवत, पुरस्कार, पृ. ३. ८२. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४८६. ८३. प्र. न. जोशी, म. वा. वि. इतिहास, पृ. २०१. ८४. नि. शं. ठकार, म. क. स्व. आणि विवेचन, पृ. ३३०–३३१. ८५. गो. वि. करंदीकर, म. वा.



वि. इतिहास, प्र. न. जोशी, पुणे, १९७९, पृ. २११. ८६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ५२०. ८७. वा. भा. पाठक, आ. म. का. अंतःप्रवाह, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र. १९६४, पृ. १५४. ८८. नि. शं. ठकार, म. क. स्व. आणि विवेचन, पृ. ३५०. ८९. नि. शं. ठकार, तत्रैव, पृ. ३५१. ९०. वि. स. जोग, मार्क्सवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. १९८१, पृ. ३७८. ९१. भ. श्री. पंडित, आ. म. कविता, पृ. ३१०. ९२. वसंत वापट, 'सेतु' कवी–वसंत वापट, ग. रा. भटकळ, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. १९५७. पृ. ३–६. ९३. 'बिंजली'–कवी–वसंत वापट, माधव आंबे, साधना प्रकाशन, मुंबई, प्र. १९५२, प्रस्तावना वि. वा. शिरवाडकर, ९४. नि. शं. ठकार, म. क. स्वरूप आणि विवेचन, पृ. ३५२–३५४. ९५. द. भि. कुलकर्णी, दुसरी परंपरा', प्रभा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७४, पृ. ११२. ९६. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ५२२–५२३. ९७. द. भि. कुलकर्णी, 'दुसरी परंपरा'– पृ. ११५. ९८. वि. स. जोग, मार्क्सवाद आणि मराठी साहित्य, पृ. ३८६. ९९. स. ज. भागवत, 'धारानृत्य', कवी–मंगेश पाडगावकर, सौ. सुधा महादेव जोशी, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, प्र. १९५०, प्रस्तावना, आचार्य, स, ज. भागवत, पृ. २. १००. वा. ल. कुलकर्णी, साहित्य शोध आणि बोध, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६७, पृ. २४०. १०१. मंगेश पाडगावकर, धारानृत्य, पृ. ६५. १०२. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ५२१. १०३. स. ज. भागवत, 'धारानृत्य' प्रस्तावना, पृ. ५. १०४. नि. शं. ठकार, म. क. स्व: आणि विवेचन, पृ. ३५४. १०५. राजा बढे, 'क्रांतिमाला' काव्यसंग्रह–कवी राजा बढे, मुंबई प्रथमावृत्ती, १९५३. १०६. म. शं. वावगावकर, 'संशोधन व चिंतन', पृ. २१३. १०७. गोविंद स्वामी आफळे, श्री. अनंत फंदी, नागपूर, यांनी पुरविलेल्या साहित्याच्या आधारे. १०८. 'अज्ञात राष्ट्रीय कवी', 'स्फूर्तिगान' भाग १; (राष्ट्रीय गीत संग्रह); भारतीय विचार साधना प्रकाशन, ब. शं. दाते, पुणे, पाचवी आवृत्ती, १९७७. १०९. 'स्फूर्तिगान'–भाग २ (राष्ट्रीय गीत संग्रह) भारतीय विचार साधना प्रकाशन, ब. शं. दाते, पुणे, आ. १९७७. ११०. द. न. गोखले, 'प्रेरणा' कवी–बलवंत वष्ट, प्रकाशिका, सौ. मं. अ. गाडगीळ, मुंबई, प्र. १९४७, प्रस्तावना, द. न. गोखले; पृ. ५–६. १११. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४९५. ११२. द. न. गोखले, 'प्रेरणा' प्रस्तावना, पृ. ५. ११३. म. शं. वावगावकर, संशोधन व चिंतन, पृ. २००–२०१. ११४. म. शं. वावगावकर, तत्रैव. पृ. २०३–२०४. ११५. अमरशेख, मार्क्सवाद आणि मराठी साहित्य, डॉ. वि. स. जोग, (अमरगीतमधील मनोगत) पृ. ३७९. ११६. अमरशेख, 'कलश' कवी अमरशेख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. १९५८. प्रस्तावना, आचार्य प्र. के. अत्रे, पृ. ६. ११७. अमरशेख, 'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य' (धरती माता निवेदन) पृ. ३७९–३८०. ११८. माधव पोतदार, 'अमरशेखांची कविता', माधव पोतदार, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र. १९६५. पृ. १०८. ११९. प्र. के. अत्रे, 'कलश' कवी अमरशेख, प्रस्तावना, पृ. ११. १२०. सुमन्त, "उंच अन् उंच माथा–अमरशेख कला जीवन दर्शन"; सुमन्त, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र. १९५९, पृ. ७५. १२१. मं. वि. राजाध्यक्ष, 'अमरशेखांची कविता, माधव पोतदार, प्रस्तावना, पृ. ६. १२२. अण्णाभाऊ साठे, श्री. अनंत फंदी, नागपूर यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे. (अप्रकाशित प्रबंधातून) १२३. आत्माराम पाटील, श्री. अनंत फंदी, नागपूर यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे. (अप्रकाशित प्रबंधातून) १२४. अ. ना. देशपांडे, आ. म. वा. इति. भाग २, पृ. ४२३.